वीरशैव अभंगगाथा

खंड १



संपादक
डॉ. शे. दे. पसारकर

शोधप्रकाशन ग्रंथमाला- १०४

वीरशैव अभंगगाथा

खंड १

संपादक

डॉ. शेषनारायण देवाप्पा पसारकर

संपादन सहाय्य

सौ. उषा शेषनारायण पसारकर

डॉ. अनिल काशीनाथ सर्जे

शैवभारती शोधप्रतिष्ठान
जंगमवाडी मठ, वाराणसी (उ.प्र.)
इ.स. २०२१

वीरशैव अभंगगाथा, खंड १ (मराठी)
संपादक : डॉ. शे. दे. पसारकर

Veershaiva Abhang Gatha, Vol. 1 (Marathi)
Edited by Dr. S. D. Pasarkar

ISBN 978-93-82639-44-2

प्रकाशक :
शैवभारती शोधप्रतिष्ठान,
डी. ३५/७७, जंगमवाडी मठ,
वाराणसी (उत्तर प्रदेश) २२१००१
दूरभाष : 7084321008

संगणकीय अक्षरलेखन :
सौ. उषा पसारकर
श्रीविश्वाराध्य अक्षररचना, 'पसारकर भवन',
केकतउमरा, ता.जि. वाशीम ४४४५०५ (महाराष्ट्र)
चरभाष : 9518599152

© प्रकाशक

मुद्रक :
बाबूराव कोरे
शिवानंद प्रिंटर्स, J-34, एम.आय.डी.सी., कुपवाड ब्लॉक,
सांगली ४१६४३६ (महाराष्ट्र). स्थिरभाष : 0233 - 2643255

प्रथमावृत्ती : ११ मार्च २०२१ (महाशिवरात्री)

प्रती : १०००

मूल्य : ४०० रुपये

समर्पण

श्री.ज.हरेश्वर शिवाचार्य

आद्य जगद्गुरु विश्वाराध्य

श्री.ज.प्रथम वीरभद्र शिवाचार्य

श्री.ज.राजेश्वर शिवाचार्य

श्री.ज.शिवलिंग शिवाचार्य

श्री.ज.पंचाक्षर शिवाचार्य

श्री.ज.द्वितीय वीरभद्र शिवाचार्य

श्री.ज.विश्वेश्वर शिवाचार्य

श्री काशीज्ञानपीठाच्या गुरुपरंपरेला समर्पित...!

ग्रंथदानी...

लिं. व्यंकटप्पा गुरुबसप्पा खेळगे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ
शिवकीर्तनकार शि.भ.प. श्रीमती जयश्रीताई खेळगे व खेळगे परिवार
यांनी या ग्रंथाची मुद्रणसेवा केली आहे.

लिं. व्यंकटप्पा गुरुबसप्पा खेळगे व शि.भ.प. जयश्री व्यंकटप्पा खेळगे

खेळगे परिवार...

श्री. अशोक व सौ. अरुणा खेळगे

श्री. सतीश व सौ. अनिता खेळगे

श्री. दीपक व सौ. अन्नपूर्णा खेळगे

श्री. संदीप व सौ. सविता खेळगे

श्री. महेश व सौ. वर्षा खेळगे

अपर्णा अशोक खेळगे

ओंकार अशोक खेळगे

अमृता सतीश खेळगे

अंकिता सतीश खेळगे

विश्वेश्वर सतीश खेळगे

कार्तिक दीपक खेळगे

तेजस्विनी दीपक खेळगे

राजेश्वर संदीप खेळगे

जयंती संदीप खेळगे

अक्षता महेश खेळगे

आदित्य महेश खेळगे

श्रीमत्काशीज्ञानसिंहासनाधीश्वर
श्री १००८ जगद्गुरू
डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी
जंगमवाडी मठ, श्री क्षेत्र काशी, वाराणसी (उ.प्र.)

शुभाशीर्वचन

वीरशैव समाज भारतभर विखुरलेला आहे. विविध भाषांमध्ये वीरशैवांचे साहित्य उपलब्ध झाले आहे, होत आहे. संस्कृत भाषेत सर्वाधिक वीरशैव साहित्य सापडते. त्यानंतर कन्नड, मराठी, तेलुगू इत्यादी भाषांचा क्रम लागतो. शिखरशिंगणापूरचे ष.ब्र. श्री शांतलिंगस्वामी आणि कपिलधारचे संतशिरोमणी श्री मन्मथस्वामी यांनी मराठीत विपुल रचना केली आहे. विवेकचिंतामणी, कर्णहंस (करणहसुगे) इत्यादी शांतलिंगस्वामींनी रचिलेले ओवीबद्ध ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. श्री मन्मथस्वामीकृत 'परमरहस्य' हा वीरशैवाचार स्पष्ट करणारा महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय असा ग्रंथ आहे. राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य अहमदपूरकर यांनी या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित केल्या. डॉ. सुधाकर मोगलेवार, डॉ. चंद्रशेखर कपाळे, डॉ. चंद्रकांत देऊळगावकर, डॉ. भी. शि. स्वामी, डॉ. शे. दे. पसारकर, डॉ. राम तोंडारे, डॉ. अशोक मेनकुदळे, डॉ. शिवशंकर उपासे, डॉ. श्यामा घोणसे, डॉ. वैजनाथ फास्के, डॉ. शोभा कराळे, डॉ. अनिल सर्जे, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. जितेंद्र बिराजदार आदी अनेक अभ्यासकांनी शोधप्रबंध लिहून या वाङ्मयीन वैभवाचा अभ्यास लोकांसमोर मांडला आहे. यांपैकी दहा शोधप्रबंध काशीपीठाकडून प्रकाशित करण्यात आले आहेत. वीरशैव साहित्याच्या संकलनात व प्रकाशनात कै. शांतितीर्थ स्वामी व पं. शिवाप्पा खके यांनीही मोलाची कामगिरी बजावली आहे.

वीरशैव संत-भक्तकवींनी मराठीत ग्रंथरचना केली त्याप्रमाणे गेय स्वरूपाची अभंगरचनाही केली आहे. इ.स. १८८५ मध्ये बार्शी येथे कै. पारलिंग प्रभुअय्या यांनी वीरशैव मराठी साहित्य प्रकाशनाच्या कार्याला आरंभ केला. त्यानंतर आजपर्यंत मराठी वीरशैव साहित्याची प्रकाशने होत आली आहेत. १८८५ ते १९५१ या कालखंडात प्रकाशित झालेल्या वीरशैवांच्या अभंगांची

संख्या १२ हजारांपेक्षा अधिक आहे. हे वाङ्मयीन वैभव सर्व लोकांच्या नजरेला आणण्यासाठी या अभंगांचे तीन खंडांमध्ये पुनर्मुद्रण करण्याची योजना काशीपीठाकडून आखण्यात आली. मराठी वीरशैव साहित्याचे गाढे अभ्यासक शिवकवी डॉ. शे. दे. पसारकर यांच्यावर संपादनाचे दायित्व सोपविण्यात आले. मध्यंतरी लॉकडाऊनच्या काळात शि.भ.प. श्री. मन्मथअप्पा डांगे यांनी ऑनलाईन व्याख्यानमाला आयोजित केली होती. त्यावेळी वीरशैव अभ्यासकांची व्याख्याने ऐकून भाविक जनतेच्या मनात वीरशैवांच्या अभंगांबद्दलची उत्सुकता चाळवली गेली आणि हे सर्व अभंग कोठे उपलब्ध होतील, अशी विचारणा होऊ लागली. हा अभंगप्रकल्प हाती घेण्यापाठीमागे लोकांची ही इच्छादेखील कारणीभूत आहे. त्यांपैकी हा पहिला खंड काशीपीठातर्फे प्रकाशित होत आहे. या पहिल्या खंडात श्री मन्मथस्वामी, शिवलिंगस्वामी, लिंगेश्वर, बसवलिंग, महादेवप्रभू, शिवदास, जीवन महाराज आणि लक्ष्मण महाराज यांची सर्व अभंगरचना एकत्रित करण्यात आलेली आहे.

या अभंगगाथेचे डॉ. शे. दे. पसारकर यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक संपादन केले असून त्यांना सौ. उषा पसारकर आणि डॉ. अनिल सर्जे यांनी सहकार्य केले आहे. या सर्वांना दीर्घ आयुरारोग्य लाभो आणि त्यांच्याकडून असेच कार्य पुढेही घडत राहो, हा मंगलाशीर्वाद.

वाढवणा (बु.) येथील खेळगे परिवार हा काशीपीठाचा परमभक्त आहे. लिं. व्यंकटअप्पा खेळगे काशीमहास्वामीजींचे अनुग्रहीत भक्त होते. श्रीमती जयश्री खेळगे ह्याही काशीपीठाच्या अनुग्रहीत भक्त आहेत. श्रीमती जयश्री खेळगे ह्या शिवकीर्तनकार असून त्यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी श्री अहमदपूरकर महाराजांच्या सहवासात कीर्तने केली आहेत. तसेच काशीक्षेत्री सुद्धा कीर्तन करून महास्वामीजींकडून आशीर्वाद प्राप्त केला आहे. त्यांनी घरातील सर्व मंगल कार्ये जगद्गुरूंच्या सान्निध्यातच केली आहेत. व्यंकटअप्पा खेळगे शिवैक्य झाल्यामुळे त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या संपूर्ण परिवाराने या अभंगगाथेची मुद्रणसेवा केली आहे. यासाठी खेळगे परिवाराला अनंत मंगलाशीर्वाद. लिं. व्यंकटअप्पा खेळगे यांना आत्मशांती लाभावी.

या गाथेचा लाभ सर्व अभ्यासकांनी आणि भाविक भक्तांनी घ्यावा. सर्वांना मंगलाशीर्वाद.

इत्याशिषः

निवेदन

लिं. व्यंकटअप्पा खेळगे हे काशीपीठाचे शिष्य होते. लिं. काशीजगद्गुरू विश्वेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्याकडून त्यांनी लिंगदीक्षा घेतली होती. आम्ही दोघे एकदा काशीला गेलो होतो त्यावेळी जगद्गुरू महाराज आपल्या शिष्यांना दीक्षा देत होते. 'तुम्ही पण दीक्षा घ्या' असे लोकांनी म्हटल्यानंतर आम्ही महाराजांकडून गुरुमंत्र घेतला आणि वाढवणला परत आलो. काशीजगद्गुरूंकडून दीक्षा घेतली असे सांगितल्यानंतर काही शिवभक्त म्हणाले की, गुरुमंत्र घेतल्यावर एकदा तरी आपल्या गुरूंना बिन्नावासाठी बोलवावे लागते. त्यामुळे मी अस्वस्थ झाले. काशीला जाऊन महाराजांना विनवणी केली. तेव्हा महाराज वयोवृद्ध झाले होते. ते म्हणाले, 'जेव्हा महाराष्ट्रात उत्सव होईल तेव्हा मी तुमच्या गावी येईन.' त्यानंतर महाराष्ट्रात गिरगावमध्ये पाच जगद्गुरू आले तेव्हा मी महास्वामींना भेटून विनंती केली आणि वाढवणला त्यांना घेऊन आले. भव्य मिरवणूक काढली. मिरवणुकीमध्ये शंभर घागरी, पन्नास झेंडे आणि एक हजार टाळकरी होते. ग्रामपंचायत मैदानात मिरवणुकीचा समारोप झाला आणि त्या ठिकाणी महास्वामीजींनी आशीर्वचन दिले. तेथून महाराज बार्शीला गेले, बार्शीहून पुण्याला गेले आणि पुण्याला शिवैक्य झाले.

त्यानंतर डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी हे काशीपीठावर विराजमान झाले. ते पहिल्यांदा परभणीला आले त्यावेळी आम्ही उभयतांनी त्यांना भेटून आमंत्रण दिले. ते त्यावेळी आमच्या गावी आले. त्यांची पण मिरवणूक काढली. आशीर्वचन झाले. काशीला जंगमवाडी मठात कोटी दीपोत्सव, बिल्वार्चन, कुंकुमार्चन इत्यादी कार्यक्रम झाले त्यावेळी आम्ही उभयतांनी चार महिने जंगमवाडी मठात निवास केला. त्या काळात काशी हेच आमचे गाव आहे असे आम्हाला वाटत होते. गंगास्नान, विश्वनाथ दर्शन, विश्वाराध्यांची भक्ती यामध्ये रममाण झाल्यामुळे आम्हाला गावाची आठवण देखील येत नव्हती. तेथून परत येताना आमच्या डोळ्यांना धारा लागल्या होत्या. महाराज रेणुकविजय ग्रंथ देऊन आम्हाला म्हणाले, 'तुम्ही केव्हा पण या. हे तुमचं माहेरच आहे.'

माझे सासरे गुरुबसप्पा खेळगे आणि सासूबाई प्रयागबाई हे अत्यंत गरीब

आणि सज्जन होते. आमची पाच मुले आणि पाच सुना हे देखील सज्जन आणि आज्ञाधारक आहेत. आम्ही ३०-३५ वेळेस काशीला गेलो. काशी आम्हाला माहेरासारखीच वाटत आहे.

मी मुळात भजन करणारी गृहिणी होते. प.पू. अहमदपूरकर अप्पांनी मला प्रवचन व कीर्तन करण्यास प्रवृत्त केले. तेव्हापासून मी प्रवचन व कीर्तन करण्यास सुरुवात केली. आजपर्यंत निष्ठेने हे कार्य केले. या कार्यात प.पू. श्रीकाशीमहास्वामीजींचे प्रोत्साहन व शुभाशीर्वाद मिळाला. त्यामुळे आपले जीवन धन्य झाले असे मला वाटत आहे.

गेल्या वर्षी काशीला शतमानोत्सवाच्या काळात आम्ही जाणार होतो. २६ जानेवारीला तिकीट देखील काढले होते. परंतु ४ जानेवारीला रात्री साडे दहा वाजता आमचे मालक शिवैक्य झाले. त्यानंतर महास्वामीजींच्या आज्ञेप्रमाणे काशीला जाऊन लिंगस्थापना व अन्नदान केले. म्हणून काशी हे माझे माहेर, विश्वनाथ माझे पिता आणि अन्नपूर्णा माझी माता आहे. श्रीकाशीजगद्गुरू माझे सर्वस्व आहेत. ते दयेचे आगर आहेत. कृपेचे सागर आहेत. मी त्यांचे काय वर्णन काय करू शकणार?

शि.भ.प. **जयश्री व्यंकटप्पा खेळगे**

अशोक व्यंकटप्पा खेळगे	**सौ. अरुणा अशोक खेळगे**
सतीश व्यंकटप्पा खेळगे	**सौ. अनिता सतीश खेळगे**
दीपक व्यंकटप्पा खेळगे	**सौ. अन्नपूर्णा दीपक खेळगे**
संदीप व्यंकटप्पा खेळगे	**सौ. सविता संदीप खेळगे**
महेश व्यंकटप्पा खेळगे	**सौ. वर्षा महेश खेळगे**

वाढवणा (बु.) ता. उदगीर, जि. लातूर

प्रस्तावना

वीरशैवांचे वाङ्मयीन वैभव

मराठी वीरशैव साहित्य हा महाराष्ट्रीय वीरशैव समाजाचा समृद्ध असा वारसा आहे. समाजाची समृद्धी विविध प्रकारे मापली जाते. उद्योग, संपत्ती, राजकीय प्रतिष्ठा असे अनेक मापदंड त्यासाठी लावले जातात. या मापदंडांत साहित्य या मापदंडाचाही समावेश केला पाहिजे. ज्या समाजाकडे समृद्ध साहित्य आहे तो समाज साहित्यिकदृष्ट्या समृद्ध समाज आहे, असे म्हणता येते. साहित्य म्हणजे समाजाचे वाङ्मयीन वैभव. आपल्या वाङ्मयीन वैभवाकडे समाजाने डोळेझाक करता कामा नये. उलट हा समृद्ध वारसा अत्यंत अभिमानाने माथ्यावर घेऊन मिरवला पाहिजे. महाराष्ट्रीय वीरशैव समाजाला साहित्याचा हा समृद्ध वारसा लाभलेला आहे. ग्रंथरचना, अभंगरचना, विविध प्रकारची स्फुट रचना असे अनेक पदर या वैभवाला आहेत. समाजातील सुशिक्षित, जाणत्या वर्गाने सर्व लोकांसमोर या वाङ्मयीन वैभवाची मांडणी करावयास हवी आणि जे कोणी असा प्रयत्न करीत असतील अशांना मनापासून साथ द्यावयास हवी.

खेचर विसाकृत 'शडूस्छळि' (षट्स्थल) हा तेराव्या शतकातील मराठी ओवीबद्ध ग्रंथ वीरशैवविचाराने प्रभावित असला तरी सोळाव्या शतकातील श्री शांतलिंगस्वामी हेच पहिले मराठी वीरशैव ग्रंथकार मानले जातात. त्यांचेच समकालीन असलेले श्री मन्मथस्वामी हे ग्रंथकार आणि पहिले अभंगकारही होते. एवढेच नव्हे, तर मराठीतील पहिली लावणी उपलब्ध झाली ती मन्मथस्वामींनीच लिहिलेली आहे. परधर्मीयांचे आक्रमण आणि वारकरी संप्रदायाचे आकर्षण अशा दोन आव्हानांशी सामना करीत मन्मथस्वामींनी वीरशैव धर्मज्योतीचे प्राणपणाने रक्षण केले. 'निजू नका जागा जागा। आपुल्या स्वधर्माने वागा' असे अभंगातून आवाहन केले आणि 'मन्मथ आलासे भूलोका। आता कुणी भिऊ नका' असा दिलासा भयग्रस्त समाजाला दिला. मन्मथस्वामींनी वीरशैव मराठी अभंगवाणीची पायाभरणी केली आणि पुढील संत-भक्तकवींनी ती अभंगवाणी समृद्ध केली.

वीरशैवांच्या मराठी साहित्याचा आणि अभंगवाणीचा अभ्यास अनेक अभ्यासकांनी विद्यापीठीय पातळीवर केला आणि या साहित्याची वैशिष्ट्ये विशद केली. इ.स. १८८५ ते १९५१ या कालखंडात विपुल प्रमाणात विविध ठिकाणी वीरशैव मराठी साहित्याची प्रकाशने झाली. अनेक संतांच्या आणि भक्तकवींच्या गाथा प्रकाशित झाल्या. या विखुरलेल्या पूर्वप्रकाशित साहित्याचे एकत्रिकरण करून त्याचे नव्याने प्रकाशन करण्याची निकड भासू लागली. लातूर येथील म. बसवेश्वर महाविद्यालयात १८ व १९ डिसेंबर २००४ रोजी पार पडलेल्या पहिल्या अ.भा. वीरशैव मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात मी पुढील प्रकारची कामे या अभ्यासक्षेत्रात करता येतील असे नमूद केले होते. ती अशी :[१]

१. वीरशैव साहित्याचे संदर्भग्रंथालय,
२. वीरशैव अध्यासन,
३. पूर्वप्रकाशित, दुर्मीळ वीरशैव साहित्याचे संपादन व प्रकाशन,
४. कन्नड साहित्याचा मराठी अनुवाद,
५. सूचिग्रंथ (वीरशैव ग्रंथ-ग्रंथकार-हस्तलिखित-प्रबंधविषय सूची इ.)

वीरशैव साहित्याच्या अभ्यासक्षेत्रात चाळीसपेक्षा अधिक वर्षे वावरल्यामुळे अभ्यासकांसमोर कोणकोणत्या अडचणी येतात हे लक्षात घेऊन वरील सूचना केलेल्या होत्या.

लॉकडाऊनच्या काळात शिवकीर्तनकार शि.भ.प. श्री. मन्मथअप्पा डांगे गुरुजी यांनी ऑनलाईन 'राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य स्मृती व्याख्यानमाला' आयोजित केली होती. त्यामध्ये वाराणसी येथे फेब्रुवारी २०२० मध्ये पार पडलेल्या 'चौथ्या अखिल भारतीय वीरशैव मराठी साहित्य संमेलना'त सहभागी झालेल्या अभ्यासकांचाही समावेश केलेला होता. या निमित्ताने प्रथमच अभ्यासक आणि उपासक (कीर्तनकार, प्रवचनकार, भाविक इत्यादी) एकत्र आले. अभ्यासकांनी त्या व्याख्यानमालेत आपले निबंध वाचले. त्यामुळे सर्वांच्या मनांत वीरशैव अभंगसाहित्याविषयी उत्कंठा जागृत झाली. त्यामधून

---

[१] अध्यक्षीय भाषण : विभूतिवैभव, वाराणसी, अंक ५१-५२, जानेवारी ते जून २००५, पृ. ३४-३५.

वीरशैव मराठी अभंगसाहित्याच्या पुनर्मुद्रणाची कल्पना साकार झाली. प.पू. श्रीकाशीमहास्वामीजींना ती कल्पना सांगताच त्यांनी तत्काळ त्या योजनेला पाठिंबा दर्शविला आणि त्याच व्याख्यानमालेच्या समारोपीय आशीर्वचनात त्यांनी ती योजना घोषित देखील केली.

'वीरशैव अभंगगाथा' नामक हा प्रकल्प असून तो तीन खंडांत प्रकाशित होणार आहे. त्यांपैकी पहिला खंड प्रस्तुत ग्रंथाच्या रूपाने वाचकाच्या हाती देत आहोत. इ.स. १८८५ ते १९५१ या कालखंडात प्रकाशित झालेल्या वीरशैव कवींच्या अभंगसाहित्याचे सुसूत्रपणे संपादन करून पुनर्मुद्रण करणे हा उद्देश समोर ठेवलेला आहे. श्री मन्मथस्वामींपासून भावंडीबाईपर्यंत सुमारे ३५० वर्षांच्या कालखंडातील ही सर्व रचना आहे. हा त्रिखंडात्मक प्रकल्प पुढीलप्रमाणे असेल.

वीरशैव अभंगगाथा

खंड १

श्री मन्मथस्वामी (१३७ अभंग), शिवलिंगस्वामी (१२), लिंगेश्वर (५३), बसवलिंग (१३२), महादेव प्रभू (२६३), शिवदास (२३०), जीवन महाराज (१८) आणि लक्ष्मण महाराज (३३११) = ४१५६ अभंग.

खंड २

काशीनाथ सुपेकर (१००), गंगाधर स्वामी वडांगळीकर (८४४), चन्नप्पा वारद (१३५१), बाळाबुवा कबाडी (१५०८) व शंकर मृगेंद्र (२१८) = ४०२१ अभंग.

खंड ३

विरूपाक्षप्पा शेटे (१३१६), शिवगुरुदास (७६), गुरुदास (१४३०), बसवदास (५७६) व भावंडीबाई (४५४) = ३८५२ अभंग.

या तीन खंडांमधून १२,००० पेक्षा अधिक अभंग प्रकाशित होणार आहेत. वीरशैवांची केवळ अभंगरचना एवढी विपुल आहे, ही अभिमानपूर्वक नोंद करण्यासारखी बाब होय. ओवीरचना, भारुडे इ. स्फुट रचना वेगळीच आहे. वरील अभंगसंख्या सध्या ज्ञात असल्याप्रमाणे दिली आहे. प्रत्यक्ष काम करताना तिच्यात बदल होऊ शकेल.

औसा (जि. लातूर) येथील नाथसंस्थानचे वीरनाथ महाराज (२२३३ अभंग) व मल्लनाथ महाराज (२२२ अभंग) हे वीरशैव कवी असले तरी त्यांचे अभंगसाहित्य वारकरी सांप्रदायिक असल्यामुळे त्यांच्या अभंगांचा समावेश या प्रकल्पात केलेला नाही.

वरील तीन खंड पूर्ण झाल्यानंतर ह्या सर्व कवींचे आरती, पाळणा, पद, भारूड इत्यादी साहित्य चौथ्या खंडात एकत्रित प्रकाशित करण्याचा मनोदय आहे. संकल्प आणि सिद्धी यांच्यामध्ये ईश्वरेच्छा उभी असते, असे एका नाटककाराने सांगून ठेवले आहे. माणूस संकल्प करतो आणि ईश्वरेच्छा असेल तर तो पूर्ण होतो. म्हणून आम्ही तूर्त संकल्प जाहीर केला आहे. ईश्वरेच्छा असेल तर तो पूर्णही होईल. अन्यथा पुढील अभ्यासक तो पूर्ण करतील, असा विश्वास आहे.

अभंगांची पूर्वप्रकाशने

१. **श्री मन्मथगाथा :** ही गाथा पारलिंग प्रभुअय्या, बार्शी यांनी इ.स. १८८५, १९०५ व १९२५ अशी तीन वेळा प्रकाशित केली. हीच गाथा नंतर काडादी धर्मादाय निधीने इ.स. १९६५ साली सोलापूर येथे प्रकाशित केली. यात मन्मथस्वामी, लिंगेश्वर, बसवलिंग, महादेव प्रभू, लक्ष्मण महाराज व शिवदास यांचे ५९३ अभंग आहेत.

२. **शंकर स्वामीकृत अभंग :** अमरावतीच्या नागेंद्र मठाचे श्री शंकर मृगेंद्र स्वामी यांचे अभंग वे.मू. मणूरमठाध्यक्ष मल्लिकार्जुन शास्त्री यांनी संपादित करून इ.स. १९०४ मध्ये वारद ग्रंथमालेच्या १५ व्या ग्रंथात प्रकाशित केले. यात शंकर मृगेंद्र स्वामींचे २१८ अभंग आहेत.

३. **महादेव प्रभू अभंगगाथा :** काशीनाथ स्वामी, जांब आणि शिवलिंग भाऊ ओझर्डे, देऊर यांनी १९११ साली प्रकाशित केली. पं. शिवाप्पा खके यांनी २००२ मध्ये या गाथेचे नव्याने संपादन केले. त्याचेच पुनर्मुद्रण २०११ मध्ये भाऊराव स्वामी, सातारा यांनी केले. यात २६३ अभंग आहेत.

४. **गंगाधरस्वामी गाथा :** वडांगळीचे श्रीगुरू गंगाधरस्वामी यांची ही गाथा त्यांचे शिष्य बाळाबुवा कबाडी यांनी १९१२ मध्ये प्रसिद्ध केली असून त्यात गंगाधरस्वामींचे ८५४ अभंग आहेत.

५. **बाळकृत गाथा :** गंगाधरस्वामींचे शिष्य बाळाबुवा कबाडी यांची गाथा मल्लिकार्जुनअप्पा तुकप्पा गांडजाळे, सोलापूर यांच्या मदतीने १९१२ साली

प्रकाशित करण्यात आली. त्यात १५०८ अभंग आहेत.

६. **गुरुदासकृत अभंगांची गाथा, भाग १ :** पारलिंग प्रभुअय्यांनी १९१४ मध्ये बार्शी येथे प्रसिद्ध केली. त्यात १००१ अभंग आढळतात.

७. **वीरशैव गाथा :** विरूपाक्षप्पा शेटे यांनी १९२५ साली सोलापूर येथे ही गाथा प्रकाशित केली. त्यामध्ये १३१६ अभंग आहेत.

८. **चन्नाकृत अभंगांची गाथा :** लातूरकर वीरशैव सद्भक्त मंडळींनी इ.स. १९२६ मध्ये प्रकाशित केली. ही गाथा माजलगाव संस्थानने १९८४ मध्ये पुन्हा प्रकाशित केली. त्यात चन्नांचे १३५१ अभंग आढळतात.

९. **गुरुदासकृत अभंगांची गाथा, भाग २ :** इ.स. १९५१ साली त्यांची शिष्या भावंडीबाईंनी लातूर येथे प्रकाशित केली. त्यात गुरुदासांचे ४२९ व भावंडीबाईचे ४५४ अभंग आहेत.

१०. **सांप्रदायिक सप्तरत्न गाथा :** श्री ष.ब्र. डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराजांनी ही गाथा १९८० मध्ये संपादित व प्रकाशित केली. यात मन्मथस्वामी, लिंगेश्वर, बसवलिंग, लक्ष्मण महाराज, शिवदास, महादेव प्रभू व जीवन यांचे अभंग आहेत. अभंगसंख्या १०१७. यात जीवन याचे अभंग प्रथमच प्रकाशित झाले.

११. **श्री लक्ष्मण गाथा :** डॉ. शे. दे. पसारकर यांनी २००१ मध्ये या गाथेचे संपादन केले असून त्यात लक्ष्मण महाराजांच्या समग्र वाङ्मयाचा समावेश केला आहे. या गाथेत लक्ष्मण महाराजांचे ३३११ अभंग आढळतात.

१२. **श्री बसवगाथा :** दौ. शं. साखरे यांनी २०१३ मध्ये देगलूर येथे प्रकाशित केली. यात बसवदासांचे ५७६ अभंग आहेत.

अभंगगाथेचे संपादन

प्रस्तुत गाथासंपादनाच्या काही वैशिष्ट्यांची येथे नोंद करतो.

(१) मन्मथादी संतकवींच्या आजपर्यंत अनेक गाथा प्रकाशित झाल्या. त्यांच्यापेक्षा प्रस्तुत गाथेत सर्वाधिक अभंगांचा समावेश केलेला आढळून येईल. पारलिंग प्रभुअय्यांनी इ.स. १८८५ मध्ये सर्वप्रथम प्रकाशित केलेल्या व काडादी धर्मादाय निधीने १९६५ मध्ये पुनर्मुद्रित केलेल्या 'मन्मथगाथे'तील सर्व अभंग, 'सांप्रदायिक सप्तरत्न गाथे'तील अभंग आणि शोधप्रबंधांच्या परिशिष्टांतील अप्रकाशित अभंग अशा सर्व अभंगांचा समावेश या गाथेत केलेला आहे.

(२) 'बसवलिंगकृत मन्मथस्वामींच्या समाधीचे अभंग' इतरत्र प्रकाशित झालेले असले तरी प्रस्तुत वीरशैव अभंगगाथेत ते प्रथमच समाविष्ट करण्यात आले आहेत.

(३) शिवलिंगस्वामींचे १२ अभंग देखील प्रथमच या गाथेत समाविष्ट केले आहेत.

(४) मन्मथस्वामी, लिंगेश्वर, बसवलिंग, शिवदास यांच्या नावांवर जेवढे अप्रकाशित अभंग उपलब्ध झाले त्या सर्वांचा समावेश या गाथेत केला आहे.

(५) महादेव प्रभू आणि लक्ष्मण महाराज यांचे सर्व उपलब्ध अभंग या ग्रंथात समाविष्ट केले आहेत.

(६) इ.स. १८८५ पासून 'मन्मथगाथा' ज्या स्वरूपात लोकांसमोर आलेली आहे त्याच स्वरूपात प्रस्तुत गाथेत समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामध्ये वर्गीकरण करून अभंगांचा क्रम बदललेला नाही.

(७) प्रथम 'मन्मथगाथे'तील अभंग, नंतर 'सांप्रदायिक सप्तरत्न गाथे'तील अभंग आणि त्यानंतर शोधप्रबंधांच्या परिशिष्टांतील व अन्य स्रोतांतून उपलब्ध झालेले अभंग असा क्रम ठेवण्यात आला आहे.

(८) महादेव प्रभू व लक्ष्मण महाराज यांच्या अभंगांचा क्रम त्यांच्या अलीकडे प्रकाशित झालेल्या गाथांत जसा आहे तसाच ठेवलेला आहे. त्यात बदल केलेला नाही. त्यातील अभंगांचे वर्गीकरणही जसे आहे तसेच ठेवले आहे.

(९) जे अभंग शुद्धलेखनाच्या जुन्या नियमांनुसार मुद्रित झाले होते ते तसेच ठेवले आहेत. त्यामध्ये शुद्धलेखनाच्या नव्या नियमांप्रमाणे बदल केला नाही. परंतु जे अभंग जुन्या नियमांनुसार नव्हते अथवा कोणत्याच नियमांप्रमाणे मुद्रित केलेले नव्हते ते अभंग शुद्धलेखनाच्या नव्या नियमांनुसार मुद्रित केले आहेत.

(१०) शेवटी अभंगसूची जोडली असून संदर्भसाहित्याची नोंद केली आहे.

सर्वसमावेशक भूमिकेतून या अभंगगाथेचे संपादन करण्यात आले आहे.

समारोप

संतशिरोमणी श्रीमन्मथस्वामींपासून ते भक्तकवयित्री भावंडीबाईपर्यंत सुमारे साडेतीन शतकांतील वीरशैवांच्या अभंगवाणीचा प्रवास या त्रिखंडात्मक प्रकल्पातून वाचकांच्या दृष्टीसमोर उभा राहणार आहे. वीरशैव अभंगवाणीच्या

वैभवाचे दर्शन यामधून घडेल असा विश्वास आहे. हे एक प्रकारचे आत्मभानच होय. चार-पाच दशकांपूर्वी 'कुठे आहे वीरशैव साहित्य?' असा प्रश्न विचारला जात होता. याचे साक्षीदार आम्ही स्वत: आहोत. त्यावेळीही वीरशैव साहित्य होते, ते प्रकाशितही झाले होते. परंतु एकत्रित स्वरूपात उपलब्ध नव्हते. त्यामुळे वरील प्रश्नाचे उत्तर देणे सहज शक्य होत नसे. त्र्यं. ह. आवटे यांनी इ.स. १९२४ मध्ये वारकरी संतांच्या अभंगवाणीचे 'सकल संतगाथा' नामक संकलन करून ते प्रकाशित केले. त्यामुळे त्या विषयाच्या अभ्यासकांसाठी एक ठेवा उपलब्ध होऊन त्या साहित्याचे वैपुल्य नजरेत भरले. अप्रकाशित आणि पूर्वप्रकाशित परंतु दुर्मीळ साहित्य मिळवण्यासाठी किती धावाधाव करावी लागते, किती जणांच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात आणि किती मठ-मंदिरे धांडोळावी लागतात याचा अनुभव ज्यांनी घेतला आहे अशा लोकांना या अभंगगाथा-प्रकल्पाचे महत्त्व सहज पटू शकेल. या बारा हजार अभंगांच्या प्रकाशनप्रकल्पातून पीएच.डी. पदवीसाठी कित्येक अभ्यासविषय बाहेर पडू शकतात, एवढे सांगितले म्हणजे पुरे!

ज्या अभंगकारांनी वीरशैव साहित्य समृद्ध केले आहे त्यांच्याविषयी आपण सदैव कृतज्ञ असायला हवे. साहित्यधन हे अक्षय्य असते. सम्राटांची साम्राज्ये नामशेष होतात, परंतु लेखक-कवींचे साहित्य त्यांच्या नावांवर जिवंत राहते. ते नष्ट होत नाही. मन्मथस्वामींच्या काळातील श्रीमंत माणसे आणि त्यांची श्रीमंती आज नामशेष झाली आहे, परंतु मन्मथस्वामींचे 'परमरहस्य' आणि त्यांची अभंगवाणी आजदेखील जिवंत असून 'निजू नका जागा जागा। आपुल्या स्वधर्मनि वागा' असे आपले प्रबोधन करीतच आहे. या अभंगगाथा-प्रकल्पामुळे महाराष्ट्रीय वीरशैव समाजाला आपल्या वाङ्मयीन वैभवाचे भान यावे एवढीच अपेक्षा!

प.पू. श्रीकाशीजगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी हे स्वत: संस्कृत-कन्नड भाषांचे ग्रंथकार आहेत. वीरशैव साहित्याविषयीची उत्कट प्रीती त्यांच्या मनात सदैव नांदत आलेली आम्ही पहात आलो आहोत. त्यामुळे या गाथाप्रकल्पाच्या पाठीमागे ते सर्वसामर्थ्यानिशी उभे राहिले. त्यांच्या संजीवक कृपास्पर्शाने माझ्यासारख्या अनेकांच्या जीवनाला सुगंध लाभला एवढे निश्चित. अशा करुणामय, भक्तवत्सल जगद्गुरूंच्या पदकमली त्रिवार वंदन!

ग्रंथसिद्धीसाठी अनेकांचे सहकार्य लाभले. ज्येष्ठ वीरशैव साहित्याभ्यासक, वाराणसी येथील चौथ्या अ.भा. वीरशैव मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. शांतितीर्थ स्वामी यांनी शिवलिंगस्वामीसंबंधीची सर्व कागदपत्रे तत्काळ पाठवून दिली. या प्रकल्पाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे वचन त्यांनी दिले होते. परंतु दुर्दैवाने १२ डिसेंबर २०२० रोजी ते आकस्मिकपणे शिवैक्य झाले. ह्या सुस्वभावी व कर्तव्यतत्पर वीरशैव अभ्यासकाचे स्मरण आमच्या हृदयात सदैव राहील.

आमचे परममित्र संस्कृत पंडित श्री. शिवाप्पा खके यांनी तत्परतेने हवे ते सर्व ग्रंथ पाठवले आणि वेळोवेळी मार्गदर्शनपर सूचना केल्या. मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो.

शिवकीर्तनकार शि.भ.प. मन्मथअप्पा डांगे गुरुजी, उस्माननगर (ता. कंधार, जि. नांदेड) यांच्या ऑनलाईन प्रवचन उपक्रमामुळे हा प्रकल्प साकार करण्यास बळ मिळाले. त्याचप्रमाणे काशीपीठाचे परमभक्त असलेल्या शिवकीर्तनकार शि.भ.प. श्रीमती जयश्रीताई खेळगे आणि त्यांचा परिवार (वाढवणा बु., ता. उदगीर, जि. लातूर) यांनी या ग्रंथाची मुद्रणसेवा अत्यंत आनंदाने स्वीकारली. यासाठी श्रीमती सुरेखा नागलमे, नांदेड यांचेही सहकार्य झाले. या सर्वांचे मन:पूर्वक आभार. एका शिवकीर्तनकाराच्या उपक्रमामुळे हा प्रकल्प साकार झाला आणि दुसऱ्या शिवकीर्तनकारांनी ग्रंथप्रकाशनासाठी अर्थसहाय्य केले, याची विशेष नोंद करण्यासारखी आहे.

माझी पत्नी सौ. उषा हिने संगणकीय अक्षरलेखनाचे काम केले. तसेच सौ. उषा पसारकर व डॉ. अनिल काशीनाथ सर्जे, सोलापूर या दोघांनी संपादनकार्यात सहकार्य केले. या दोघांचे आभार.

शिवानंद प्रिंटर्स सांगलीचे श्री. बाबुराव कोरे व त्यांचे सहकारी यांनी अल्पावधीत या ग्रंथाचे सुबक मुद्रण करून दिले. त्यांचे आभार.

या ग्रंथप्रकल्पासाठी अनेकांचे सहकार्य लाभले. कोणी चर्चा केली, कोणी संदर्भसाहित्य पाठविले, कोणी अप्रकाशित अभंग पाठविले, कोणी धावाधाव करून ग्रंथ आणून दिले, कोणी तांत्रिक सहकार्य केले. कोणाचे प्रबंध-ग्रंथ संदर्भासाठी उपयुक्त ठरले. कोणी आत्मीयतेने चौकशी करून या कार्यासाठी मानसिक पाठबळ दिले. कोणी ग्रंथवितरणासाठी सहाय्य केले. सर्वांचे मन:पूर्वक आभार. या सुहृदांची नावे पुढे नोंदविली आहेत.

डॉ. वैजनाथ फास्के (पुणे), श्री. दौ. शं. साखरे (देगलूर, जि. नांदेड), डॉ. राम तोंडारे (पुणे), डॉ. भी. शि. स्वामी, (पुणे), डॉ. अनंत महाराज बिडवे (बार्शी, जि. सोलापूर), डॉ. श्यामा घोणसे (पुणे), डॉ. शोभा धर्मराज कराळे (पंढरपूर), स्वाती साखरकर (कारंजा लाड, जि. वाशीम), सौ. चेतना गौरशेटे (परळी), श्री. अविनाश सखारामअप्पा पसारकर (केकतउमरा, ता.जि. वाशीम), श्री. अभिजित अशोकअप्पा पसारकर (वाशीम), डॉ. जितेंद्र बिराजदार (वडगाव, ता. दक्षिण सोलापूर), श्री. सिद्धाराम अण्णप्पा कोरे (सिंदखेड, ता. दक्षिण सोलापूर) इत्यादी.

अभ्यासकांबरोबरच शिवकीर्तनकार, प्रवचनकार आणि भाविक भक्त अशा सर्वांसाठी प्रस्तुत ग्रंथ सिद्ध झाला आहे. याचा लाभ या सर्वांनी घ्यावा अशी अपेक्षा आहे.

वीरशैव अभंगगाथा प्रकल्पातील हा पहिला खंड शिवभक्तांच्या हाती देताना मनात धन्यता दाटून आली आहे. प.पू. श्रीकाशीमहास्वामीजींचा शुभाशीर्वाद, स्नेही जनांचे सहकार्य आणि तंत्रज्ञानाची मदत यांच्या बळावर अवघ्या दोन महिन्यांतच या पहिल्या खंडाचे काम पूर्णत्वास गेले. वीरशैव अभंगवाणीची समृद्धी पाहून शिवभक्ताचे मन आनंदाने उचंबळून यावे अशीच स्थिती आहे. शिवद्वारात उभ्या असलेल्या संतमंडळीला पाहून आनंदाची दिपवाळी साजरी व्हावी, असे शिवदासांप्रमाणे मलाही वाटते. मराठी वीरशैव साहित्याच्या सहवासात जन्म सुखाचा झाला. जीवन धन्य झाले. ज्यांच्या हृदयांत शिव सदोदित नांदतो अशा शिवभक्तांचे सर्वतोपरी कल्याण व्हावे, अशी वीरशैव संतकवी शिवदासांच्या शब्दांत मंगल कामना व्यक्त करून थांबतो.

सुखी असो ही मंडळी । जे कां ध्यातीं चंद्रमौळी।।१।।
कामक्रोधाचा वळसा । नोहे माझ्या शिवदासा।।२।।
अहंकार हा दुस्तर । याचा पडो द्या विसर।।३।।
व्हावें चिरंजीव सर्व । ज्याचे चित्तीं माझा शिव।।४।।
शिवदास म्हणे त्याचें । व्हावें कल्याण त्रिवाचें।।५।।

१ जानेवारी २०२१
'पसारकर भवन', केकतउमरा,
ता.जि. वाशीम (महाराष्ट्र) 444 505

शे. दे. पसारकर
चरभाष 95185 99152
9420780570

अनुक्रमणिका

पृष्ठ क्रमांक

श्री मन्मथस्वामींचे अभंग ... १७-४१

श्री शिवलिंगस्वामींचे अभंग ... ४२-४५

श्री लिंगेश्वरांचे अभंग ... ४६-५७

श्री बसवलिंगांचे अभंग ... ५८-९१

श्री महादेव प्रभूंचे अभंग ... ९२-१३२

श्री शिवदासांचे अभंग ... १३३-१६४

श्री जीवन महाराजांचे अभंग ... १६५-१६७

श्री लक्ष्मण महाराजांचे अभंग ... १६८-७२८

अभंगसूची ... ७२९-७६७

संदर्भसाहित्य ... ७६८

श्री मन्मथस्वामी

(इ.स. १५६१-१६१३)

महाराष्ट्रीय वीरशैव परंपरेतील थोर संतकवी. शिवलिंगस्वामी व पार्वतीबाई यांच्या उदरी नेकनूर (जि. बीड) येथे त्यांचा जन्म झाला. मन्मथस्वामींवर बालपणापासून शैवसंस्कार झाले. पूर्वायुष्यात त्यांनी शाहिरी रचना केली. 'मूळपेट निवासिनी आली कराडाला' ही मराठीतील पहिली ज्ञात लावणी असून तिची रचना मन्मथस्वामींनी केली आहे. त्यामुळे ते मराठीतील पहिले लावणीकार ठरले. माणूर (ता. पाटोदा, जि. बीड) येथील नागनाथ मठाचे ते शिष्य होते. तेथील पट्टाधिकारी श्रीगुरू बसवलिंगस्वामींच्या उपदेशामुळे ते लावणीरचनेकडून वीरशैवसिद्धान्तपर रचनेकडे वळले. परमरहस्य, अनुभवानंद, स्वयंप्रकाश, श्रीगुरुगीता आदी ओवीबद्ध ग्रंथ त्यांनी रचले. त्याबरोबरच अभंगरचना केली. भाद्रपद शुद्ध तृतीया, शके १५३५ या दिवशी कपिलधार येथे त्यांनी समाधी घेतली. काही संशोधक त्यांचा समाधिशक १५२३ हा मानतात.

शिखरशिंगणापूरचे श्री शांतलिंग स्वामी हे मराठी वीरशैव साहित्यातील पहिले ग्रंथकार असून मन्मथस्वामी हे वीरशैव परंपरेतील पहिले अभंगकार आहेत. त्यांच्या अभंगांत त्यांचा आध्यात्मिक प्रवास नोंदलेला आढळतो. साधकदशेपासून साक्षात्कारापर्यंत त्यांच्या भावजीवनातील विविध छटा त्यांच्या अभंगांत आढळतात. त्यांची रचना सहजसुंदर व भावगर्भ आहे. स्वधर्मवंचित वीरशैवांना त्यांनी कठोर शब्दांत वाक्ताडन केलेले आढळते.

या अभंगगाथेतील पहिले ११० अभंग 'श्रीमन्मथगाथे'तील असून १११ ते १३० हे अभंग 'सांप्रदायिक सप्तरत्नगाथे'तील आहेत. क्र. १३१ ते १३७ हे अभंग 'मन्मथस्वामी : व्यक्ती आणि वाङ्मय' (डॉ. चंद्रकांत देऊळगावकर) या शोधप्रबंधाच्या परिशिष्टातून घेतले आहेत.

मन्मथस्वामींपासून अभंगलेखनाची परंपरा मराठी वीरशैव साहित्यात रूढ झाली. त्यानंतर अनेक कवींनी विपुल प्रमाणात अभंगरचना केली.

श्री मन्मथस्वामींचे अभंग

१. प्रमथ गणाचिये मेळीं। चंद्रमौळी देखियेला।।१।। भस्म शोभें सर्वांगीं। वामभागीं भवानी।।२।। शोभें पन्नगभूषण। नंदीवाहन साजिरे।।३।। संगें तापसांचे भार। रमावर विरंची।।४।। छत्रचामर उभविती। गीतीं गाती बडिवार।।५।। ऐसा पाहूनिया डोळां। सुखसोहळा सुखाचा।।६।। मन्मथ घाली लोटांगण। कवळी चरण आवडी।।७।।

२. जटाजूटीं गंगा व्याघ्रचर्मधारी। त्याची सेवा बरी वाटे जीवा।।१।। वामांगी पार्वती अंगाशीं विभूती। तेथें माझी मति बैसलीसे।।२।। तयावीण दुजें नये माझें मना। चातकाशीं जाणा मेघ जैसा।।३।। मत्स्यालागी जैसें जळीं जीवपण। तयातें सांडून वांचे केवीं।।४।। तैसें आम्हां आहे सांडिता ही सोय। बहु बोलूं काय वाचें आतां।।५।। जन्मताचें पूर्वीं शिवार्पण पिंड। वृत्ति ही अखंड झाली असे।।६।। मन्मथशिवलिंग म्हणे ऐसा नेम। अंतरीचा प्रेम सदाशिव।।७।।

३. सनकादिकांचे जे गुज। हरि ब्रह्मा याचे निज।।१।। योगिजन ज्यातें ध्याती। तो हा पार्वतीचा पती।।२।। भाळीं भस्म चंद्रकळा। गळां शोभे रुंडमाळा।।३।। माझें आराध्यदैवत। तेथें विसावलें चित्त।।४।। गौरवपू शुभ्रकांती। अंगी चर्चिली विभूती।।५।। हर काया वाचा मन। मन्मथ आधीचा शरण।।६।।

४. कोणी एक चोर करावया चोरी। ग्रामाचे भीतरीं प्रवेशला।।१।। तया राजदूतें मारूनियां जीवें। टाकियलें शव पापीयाचें।।२।। राखेंत बैसलें होतें एक श्वान। देखिलें दुरून प्रेत त्यानें।।३।। आमिषाचे लोभें समीप येऊन। ठेविला चरण भाळीं त्याच्या।।४।। राखेचा त्रिपुंड्र मस्तकीं लाधला। शिवलोकीं झाला जयजयकार।।५।। उदेलें संचित जळालें पातक। कैलासनायक संतोषला।।६।। केली गणां आज्ञा सन्मानें आणिला। निजपदीं दिधला ठाव त्यासीं।।७।। मन्मथ शिवलिंग म्हणे कृपावंत। होऊनि पतित जनां तारी।।८।।

५. शिव तोचि देव येर ते सेवक। विष्णु ब्रह्मादिक सुरासुर।।१।। महादेव ऐसें जया असें नांव। येथें अभिप्राय तोचि असे।।२।। वेदशास्त्रें आणि पुराणें

बोलती। सर्वांसी पशुपती वंद्य जाणा।।३।। ऐसा सनकादिकीं केलासे निश्चय। सर्वांसी तो ध्येय उमाकांत।।४।। मन्मथ म्हणे शिव सगुण निर्गुण। असे परिपूर्ण अविनाश।।५।।

६. सुखी केलें मज पार्वतीरमण। आपुलें भजन देवोनिया।।१।। देवोनिया मज सुखी केलें ऐसें। पुन्हा मृत्युफांसे न लागती।।२।। यमाचा दरारा चुकविला माझा। सांगूं काय चोजा नामाच्या हो।।३।। नाम घेतां वाचें तारिलें कित्येका। गौळीपोर देखा गणिका भिल्ल।।४।। मन्मथ म्हणे काय वर्णूं त्याची थोरी। मोक्ष घरोघरीं भक्ताचीया।।५।।

७. सार सकल तीर्थांचें। वंद्य पाऊल गुरूचें।।१।। न लगे काशीलागीं जावें। रूप हृदयीं धरावें।।२।। तेणें सुख होय जीवा। न पडे संसाराचा गोवा।।३।। पद जलपान करितां। मोक्ष चढतसे हातां।।४।। न लगे योग मुद्रा ध्यान। ध्यातां गुरूचें चरण।।५।। म्हणे मन्मथशिवलिंग। गुरुरूप होय अंग।।६।।

८. पिंडीवरी ठेवितां पाय। ठाय त्यासी अर्पिला।।१।। भिल्लामुखीच्या गरळा। बेलपाल्या मिश्रित।।२।। त्यासी डोलविला माथां। केला सरता कैलासी।।३।। काय नेणों त्याची गोडी। कोण आवडी प्रेमाची।।४।। चांडाळीची बिल्वपूजा। महाराजा तुज चांग।।५।। मन्मथ म्हणे देव भोळा। त्याची लीला अगम्य।।६।।

९. वाणूं नये गुणदोष। जंगमवेष पाहिल्या।।१।। शंकर ऐसा भावोनि मनीं। श्रेष्ठासनीं बैसवावा।।२।। भावें करावें पूजन। यथाशक्तीं द्यावें अन्न।।३।। पुसूं नये यातीकूळ। त्याचें मूळ शोधूं नये।।४।। मन्मथ म्हणे ऐसे यात। साधन बहुत साटोपें।।५।।

१०. अवघ्या शकुनाचा शकुन। झालें दर्शन संताचें।।१।। पाप ताप दैन्य नासें। सुखा फुटें हो दोंदले।।२।। होय जन्माचें सार्थक। एकाएकीं समसाम्य।।३।। मन्मथ म्हणे फळा आलें। मागील केलें सुकृत।।४।।

११. देव शरणांगता तारी। पाप पुण्य न विचारी।।१।। तोडी संसारबंधन। लावी चरणीं अंतःकरण।।२।। दावी भजनाची ठेव। नामी गोवीं चित्तभाव।।३।। दासा जाऊं नेंदी वाया। पूर्णानंद करी छाया।।४।। मन्मथ म्हणे महादेव। राखी आपुलें वैभव।।५।।

१२. पार्वतीशी म्हणे शिव भक्ताचें घरी। रहावयाची थोरी वाटें मज।।१।। नावडें कैलास नको मंद्रागिरी। आवीमुक्तिपुरी तीही नको।।२।। नावडें श्रीशैल्य नागपृष्ठी वास। हिमालयीं त्रास आला मज।।३।। मुखीं नाम गाती सद्भावें अर्चिती। कीर्तनीं नाचती आनंदाने।।४।। तेथींचे हें सुख न बोलावें वाचें। मीही तैसा नाचें प्रेमभरें।।५।। तयाचा संसार करी निज आंगें। चित्त प्रेमभंगें होऊं नेदी।।६।। मन्मथशिवलिंग म्हणे नेमोत्तर। स्वमुखें शंकर बोलिलासे।।७।।

१३. पुण्यवंत तोची देश। केला वास शिवभक्तें।।१।। नसे पातकासी थारा। वारा न यमदूताचा।।२।। उमेसह रक्षण करी। राहात द्वारी भक्तांच्या।।३।। म्हणे मन्मथशिवलिंग। येणें जग हें पावन।।४।।

१४. भाळीं भस्म लिंग गळां। शोभे रुद्राक्षांच्या माळा।।१।। मुखीं मंत्र पंचाक्षर। धन्य धन्य तें शरीर।।२।। तीर्थव्रतासी आधार। महादोषांचा संहार।।३।। त्याचें झालिया दर्शन। पापी उद्धरती जन।।४।। मन्मथ म्हणे हें खरें। भू ईश्वर अवतरे।।५।।

१५. तेची पुण्यवंत नर। जे कां पूजिती शंकर।।१।। शिवस्मरणीं चित्त ज्यांचें। पाप दग्ध झालें त्यांचें।।२।। सदा शिवनाम मुखीं। कोण तयाविण सुखी।।३।। शिवपूजा विलोकनीं। ज्याची न हाले पापणी।।४।। शिवकथा श्रोतीं प्रीती। शिवध्यानीं जडे वृत्ती।।५।। म्हणे मन्मथशिवलिंग। घडो ऐसियाचा संग।।६।।

१६. शंकरा शरण गेलियावांचून। नोव्हेची कल्याण कर्म केल्या।।१।। आचरतां धर्म अधर्म तो होय। मृत्युंजय पाय स्मरल्यावीण।।२।। तीर्थ व्रत दान अष्टांगादि योग। आचरतां भोग न चुकेची।।३।। नाना दैवताचें केलिया पूजन। अनन्यता तेणें नष्ट होय।।४।। मन्मथ म्हणे जन वर्म ते चुकती। चौऱ्यांशीचें गुंती पडे तेणें।।५।।

१७. माझें जीवीचें जीवन। देव पार्वतीरमण।।१।। चित्त जडलें त्याचें पायी। आतां दुजें नेणो कांहीं।।२।। अवघा आनंदाचा काळ। पोटीं भरला जाश्वनीळ।।३।। प्रेम शरीरीं दाटलें। सर्व दुःख दुरावलें।।४।। सुखा नाहीं अंतपार। अर्थ लाधला अपार।।५।। म्हणे मन्मथशिवलिंग। सुखी केलें

उमारंग।।६।।

१८. आधीं आम्हीं द्वाड मातेपोटीं जन्म। बहुताचें काम बुडवीलें।।१।। घेऊनी पडलो बहु अर्थ जनां। साधकाच्या मनां भेद केला।।२।। जागे केले मुनी समाधीपासूनी। सांख्य ब्रह्मज्ञानी चेवविले।।३।। यज्ञाचीया वाटा टाकिल्या मोडूनी। तीर्थालागीं जाणें खुंटविले।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे एकवेळा। भक्तीचा सोहळा घरोघरीं।।५।।

१९. उठोनिया प्रात:काळीं। नाम घ्यावें हो शिवाचें।।१।। तेणें अविद्येचें ज्ञान। अवघें नासे जिवाचें।।२।। नेमें त्रिकाळ जपतां। मोक्षपद येतें हातां।।३।। भावें सर्वदा जपतां। तद्रूपच तूं होशी।।४।। जयाचिया निजध्यासें। अळी होतसे भ्रमरी।।५।। मन्मथशिवलिंग म्हणे। तैसें परी हें होय।।६।।

२०. धरी इच्छा सत्संगाची। बहु आवडी गुणांची।।१।। सेवन असे सद्विद्येचें। दास्य करी सद्गुरूचें।।२।। लोकनिंद्य कर्म टाळी। स्वस्त्री भोगी ऋतुकाळीं।।३।। सदाशिवीं दृढ भाव। इंद्रिये जावो नेदी वाव।।४।। न धरीं संग दुर्जनाचा। शंकरनामीं दृढ वाचा।।५।। मन्मथ म्हणे ऐसा नर। तया माझा नमस्कार।।६।।

२१. शंकर तोची निर्विकार। ब्रह्म मायेचे पसार। अवघा तोची परात्पर। शंकरचि शंकरचि।।१।। शंकर जळीं काष्ठीं भरला। पिंडीं ब्रह्मांडीं बिंबला। अलक्षदृष्टीनें लक्षिला। शंकरचि शंकरचि।।२।। शंकरनामीं मन रंगलें। आंगीं प्रेम हो दाटलें। भक्तां संकटी रक्षिलें। शंकरचि शंकरचि।।३।। शंकर पायीं जडलें मन। हरपलें मीतूंपण। ब्रह्ममायेतें उत्पन्न। शंकरचि शंकरचि।।४।। उभा जान्हवीचें तटीं। वाट पाहे भक्तांसाठीं। मन्मथ शिवलिंगाचें भेटीं। शंकरचि शंकरचि।।५।।

२२. आपोनारायण श्रुतीचें प्रमाण। जेथींची ही खूण पाहा तेथें।।१।। घटामाजीं येतां होय विभिन्नता। तेथें स्वधर्मता न चुकेची।।२।। उपासनाद्वारा आराधना भिन्न। तेथेंही समान पाहू नये।।३।। हरी हर ऐसा नामीं आहे भेद। तेथें अभेद म्हणती मूर्ख।।४।। अर्चन आव्हान सगुणाचें ध्यान। भक्तीचें लक्षण हेंची असें।।५।। स्वधर्मी जे इष्ट करितांना स्पष्ट। तेथेंही अनिष्ट नोव्हे कदां।।६।। मन्मथशिवलिंग म्हणे हा विस्तार। वेदान्तीचें सार निवडिलें।।७।।

२३. शिवभक्तिविन्मुख तो नर पातकी। ऐसा सनकादिकी केला नेम।।१।। हो कां पुण्यश्लोक अग्रकुळीं जन्म। अंतरीं निष्काम असेना कां।।२।। वेदाचा गौरव शास्त्राचा अनुभव। पुराण सावयव जाणेना कां।।३।। हो कां तपोनिष्ठ सदा तीर्थवासी। गया आणि काशी सेवीना कां।।४।। यज्ञादिक कर्म करूनिया सांग। पावला अव्यंग स्वर्गसुख।।५।। मन्मथशिवलिंग म्हणे भक्तीविण। जाणावा तो शीण रितें माप।।६।।

२४. सांडोनि शिवातें दुजियातें ध्याती। त्याचें तोंडीं माती जन्मोजन्मीं।।१।। जन्म तो तयाचा उत्तम हो कैचा। श्वानसूकरांचा निंद्य देह।।२।। निंदा शंकराची ज्या मुखें घडली। तयाप्रती भली विष्ठा मूत्र।।३।। मूत्रामाजीं स्नान विष्ठेंत शयन। भक्षूनिया राहणें लोकद्वारीं।।४।। द्वाराचिया आंत पाऊल घालीतां। मारिताती माथां शिळाघायें।।५।। ऐसी दुःखें ज्यातें होती असंख्यात। शेखी निरया जात तया दोषें।।६।। मन्मथशिवलिंग म्हणे शिवभक्त। निंदकाची वार्ता न ऐकावी।।७।।

२५. लिंगांगासी लग्न गुरुनाथें लावीलें। तेथें ध्यातां भले एकनिष्ठ।।१।। तयावीण अन्य दुजियातें ध्यातां। व्यभिचार माथां शीघ्र बैसे।।२।। स्त्रियांलागीं जैसा जारत्वाचा दोष। तेणें ते नरकास जाणें घडे।।३।। यास्तव लिंगीं धरितां आवडी। तेणें पैलथडी प्राप्त होय।।४।। लिंगार्पित कर्म परम हाचि धर्म। जाणोनिया वर्म सुखावला।।५।। मन्मथशिवलिंग लिंग आणि अंग। करून अभंग ऐक्य झाला।।६।।

२६. सांडोनि सकळ गेलों याच वाटें। जाता नीलकंठे करूं काय।।१।। करूं जाता धर्म पाहू जातां वर्म। तेणें चित्तीं भ्रम वाटें बहू।।२।। करितां तीर्थाटन पाहतां प्रमाण। व्रतामाजी भिन्न नाना अर्थ।।३।। देश कालमान प्राणाचें रोधन। साधतां कठीण नये हातां।।४।। शिणला हा जीव उबगलें मन। न पडे समाधान कांहीं केल्या।।५।। मन्मथशिवलिंग म्हणे न कळे गती। धरियेले चित्तीं पाय तुझे।।६।।

२७. पतिव्रता न पाहे पतीविण अन्य। काया वाचा मन एकविध।।१।। स्वप्नीं करूं नेणें आणिकाची स्तुती। जागृती सुषुप्ती पतीविण।।२।। तैसे इष्टलिंगी ऐक्य होय मन। काया वाचा पूर्ण एकलक्ष।।३।। बाह्यपूजा करी

प्रसाद स्वीकारी। नुपेक्षी क्षणैक शिवधर्म।।४।। तोची लिंगी प्राणी म्हणावा नैष्ठिक। येर ते मायीक ज्ञानहीन।।५।। मन्मथ म्हणे तेथें निष्ठा तेंची फळ। येर ते गबाळ नये कामा।।६।।

२८. शिवभक्ताचें कुळीं जन्मुनी करंटा। न भजे चोरटा शंकरासी।।१।। छपवूनी लिंगा घाली तुळशीमाळ। जन्मला चांडाळ मातेगर्भीं।।२।। सांडोनी भस्मातें लावितो चंदन। तयासी बंधन यम करी।।३।। ऐसा जो दुर्जन अपवित्र खल। तयाचा विटाळ वीरशैवां।।४।। कुंभीपाकादिकी तयासी जांचणी। देती ढकलूनी नरकांमाजी।।५।। ऐसीं दुःखें जेथें होतसे अपार। सांगती विस्तार धर्मशास्त्रीं।।६।। मन्मथशिवलिंग म्हणे तो नर। यमलोकीं चोर म्हणती तया।।७।।

२९. शंकर हा मंत्र त्रिअक्षरी सोपा। निरंतर जपा ध्यानीं मनीं।।१।। तेणें हें सार्थक होईल देहाचें। पुढील जन्माचें तुटे मूळ।।२।। काळाचें शासन चुके याच नामें। देहीं ब्रह्म व्हावें येणें खरें।।३।। यावेगळें वृथा दुःखासी कारण। न घडे समाधान तुज राया।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे नाम सार। येणें भवपार होशी राया।।५।।

३०. कोण्याही साधनीं नातुडे हा देव। धरूनिया भाव जपा नाम।।१।। करा नामघोष कीर्तनीं आनंद। तयालागीं छंद हाची गोड।।२।। बराडी हा ऐसा नामासाठी धावें। आठवितां पावे संकटास।।३।। न सोडीच धरी नामनिष्ठा सवें। मागें पुढें धावें करी काज।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे नाम सोपें। करी एकरूपें भाविकासीं।।५।।

३१. शिव शिव गर्जे वाचें। काळ त्याचें पद वंदी।।१।। देव येती लोटांगणीं। चक्रपाणि हो विरंची।।२।। प्रेमें आलिंगिती तया। म्हणती काया ही धन्य।।३।। करी जयजयकार। वदे हर हर शब्द।।४।। मन्मथ म्हणे हें ऐसें। व्यासें स्वयें वर्णीयलें।।५।।

३२. हर मुखीं नाम घेई। तेणें सर्व सुखी होई।।१।। मग चुके येरझारा। लक्ष चौऱ्यांशीचा फेरा।।२।। ऐसा सुगम उपाय। तुज सांगतसे स्वयें।।३।। आणखी साधनाचा शीण। नाम पतितपावन।।४।। म्हणे मन्मथशिवलिंग। नाम घेई प्रेमरंग।।५।।

३३. शरण आले त्याचें राहू नेदी दोष। पातकाचे लेश अंगीकारी।।१।। नाम घेतां वाचें न लावी उशीर। करी भवपार भवसिंधू।।२।। सेवकाची आस पुरवीं सांकडे। निवारूनी पुढें उभा ठाके।।३।। ऐसा हा कृपाळु कैलासीचा राणा। कां रे त्यासी गाना गीतीं तुम्हीं।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे साधा काज। नांदा साम्राज्य नामबळें।।५।।

३४. जोडोनिया हात करितों विनंती। वेळोवेळां गीतीं गाई नाम।।१।। सुखें हा संसार करा स्त्रीसंगती। वेळोवेळां गीतीं गाई नाम।।२।। कवडी कवडी द्रव्य जोडा लक्षशती। वेळोवेळां गीतीं गाई नाम।।३।। करा शास्त्रपाठ पाहा धर्मनीती। वेळोवेळां गीतीं गाई नाम।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे पुण्यकीर्ती। वेळोवेळां गीतीं गाई नाम।।५।।

३५. मुळीं शिंपिलिया जळ। शेखीं येती पल्लव फळ।।१।। पुरतील अंतरीचे अर्थ। धरी इतुका परमार्थ।।२।। एक नामीं वेंची वाचा। वाहे भार संसारीचा।।३।। मग तूं तरलासी निःशंक। सत्य घेई माझी भाक।।४।। मिथ्या मानशील जरी। साक्ष असे त्रिपुरारी।।५।। मन्मथ म्हणे वाणी। लावी देवाचें कारणीं।।६।।

३६. साधन तें हेंची दोन्ही। साधा तरी भक्तजनीं।।१।। परद्रव्य परनारी। याचा विटाळ तूं धरी।।२।। भाग्यें देव घरां येती। ऋद्धी सिद्धी हो राबती।।३।। म्हणे मन्मथशिवलिंग। देव होई हेंची आंग।।४।।

३७. भवरोग जाय जेणें। ऐसें रसायन घेणें।।१।। नका जाऊं आडवाटें। खोटे सर्व उपाय।।२।। तुम्हां सांगतों स्वहित। ठेवा चित्त या बोला।।३।। नाममात्रा प्रेमरसें। घेतां नासे भवरोग।।४।। मन्मथ म्हणे सुखी होई। मुखीं शंकर हें गाई।।५।।

३८. पातकी म्हणोनि देवा शरण जावें। सद्भावेसीं गावें नाम त्याचें।।१।। भाकावी करुणा करा विनवणी। नसे आम्हां कोणी तयावीण।।२।। शिव शूळपाणि कैलासींचा राणा। दीनाच्या धावण्यां धांवे वेगीं।।३।। मग तो दीनबंधू हांकेसरसी उडी। घालूनिया तोडी भवपाश।।४।। कुरवाळी हस्तकीं पालवाने झांकी। बैसवूनि अंकीं सुखी करी।।५।। मन्मथशिवलिंग म्हणे उमाकांत। तारी असंख्यात शरणांगता।।६।।

३९. बहुता सुकृती लाधला हा तारु। वोखटें तें भरूं नका केणें।।१।। अप्राप्य जें कांही लाधलें हातां। सन्मार्गी थोकितां घडे लाभ।।२।। अविद्या उपाधि झडपिल्या वातें। बुडे गलबते पाण्यामध्यें।।३।। धरा एक लक्ष चुकूं नका वाट। भवसिंधू दुर्घट तरा वेगीं।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे शिरोभाग। आतां येथें लाग सोडूं नका।।५।।

४०. देह नोव्हें साच रोगाचें भातुक। अंतरीं विवेक करूनि पाही।।१।। काळाचे भागाला तुझी काय सत्ता। कांता पुत्र वित्त भुललासी।।२।। सर्पजाभाडीचा बेडूक आवडी। मक्षिका सावडी जैंशापरी।।३।। विषय सेवितां वय गेलें सारें। भवसिंधु वारें भरलासे।।४।। शेवटील घडी कांहीतरी करी। बुडतोसी धरी तारू हातीं।।५।। मन्मथशिवलिंग म्हणे नामनौका। बैसोनिया हाका पैलपार।।६।।

४१. भावेविण ज्ञान योग याग ध्यान। दुःखरूप जाण क्लेश करी।।१।। शरीरीं दाटले कनकभूषण। कंठसूत्रावीण व्यर्थ जैसें।।२।। उभारिलें घर पताका तोरणीं। नसे त्यांत कोणी वस्ती करी।।३।। लतावृक्षादिकीं वेष्टित कासार। नसे त्यांत सार नीर जैसें।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे भक्ती करा। सांडोनी पसारा दांभिकाचा।।५।।

४२. उदास असावें साधकाचें चित्त। कांता पुत्र वित्त असोनिया।।१।। जळाचिया संगें कमला होय वाढी। परी नेदी बुडी तयामाजी।।२।। तैसें संसारात असावें अलिप्त। अदृष्टी जें प्राप्त सुखी होय।।३।। मानसत्काराची तूं न धरी चाड। विषयाची वाढ होऊं नेदी।।४।। अलभ्य लाभाचा हर्षखेद नाणी। चित्तीं शूळपाणि स्मरे सदा।।५।। मन्मथशिवलिंग म्हणे सुदैव। नासूं नये काव रंगासाठीं।।६।।

४३. द्विविध हें कर्म उपाधी जनासी। गुंतोनिया फाशी होती बद्ध।।१।। केलिया कर्माचें भोगावें तें फळ। पापें घडे छळ पुण्ये सुख।।२।। स्वर्ग नर्क दोन्ही दोघांचें मंदिर। पाहून अपार दोहीं जागीं।।३।। जाती भोगावया तेथें उपचार। सरे जन्मांतर चुके त्यासी।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे कर्मकुंड। भक्तां आहे गोड भक्तिपंथ।।५।।

४४. सदा भस्म लावा भाळीं। लिंग पूजा बिल्वदळीं। होय पातकाची

होळी। मागील केल्या कर्माची।।१।। नलगे साधन सायास। धारण करा रुद्राक्षास। चुके बहु जन्मीचे क्लेश। भवभय याचेनें निरसे।।२।। भाव धरूनीया पोटीं। शिवनाम वदा ओंठीं। प्रेमें आळवा धूर्जटी। स्वार्थालागीं आपुलिया।।३।। मन्मथ आलासे भूलोकां। आतां कोणी भिऊं नका। नारीनरां सकळीकां। सांगतों हें अवधारा।।४।।

४५. सोपे आहे बहू फार। भवपार तराया।।१।। सर्व व्रतांमाजी सार। सोमवार व्रतराज।।२।। दिवा राहे उपोषित। नामीं चित्त ठेवूनिया।।३।। सायंकाळी बिल्वदळीं। चंद्रमौळी अर्चावा।।४।। अंती पारणें करूनी। शूळपाणिप्रसादें।।५।। जीवशिवा ऐक्य होय। ऐसी सोय येयाची।।६।। मन्मथ म्हणे हेंची करा। करूनी तरा संसारा।।७।।

४६. शंभु महादेवा पार्वतीच्या धवा। जीवीचिया जीवा पाव वेगीं।।१।। बुडालों संकटीं प्रपंचाचें डोहीं। धरूनीया बाहीं काढी मज।।२।। भाकितों करुणा पसरूनीया मुख। देई निजसुख मज देवा।।३।। अनाथांचा नाथ भक्तांचा कैवारी। पुराणीं ही थोरी गाती तुझी।।४।। म्हणोनिया तुज आलों मी शरण। आतां थोरपण तुम्हांकडे।।५।। हातीं धरी अथवा सोडी नाहीं भीत। जें तुज उचित तें तूं करी।।६।। मन्मथशिवलिंग म्हणे नामासाठीं। भय तुझ्या पोटीं नाहीं काय।।७।।

४७. देवा मज तारी या भवापासूनी। विषयचोरांनी नागवीलें।।१।। नागवोनीं मज दीन केलें यांनी। चौऱ्यांशीचे योनीं फिरविलें।।२।। शीण झाला मज घेतां जन्मफेरे। चुकवी येरझार माझी आतां।।३।। देवा तुज आतां मागणे एवढें। अनाथा परिपाडें उद्धरावें।।४।। सर्वस्वी अन्याय क्षमा करी रंका। आलों शरण देवा पशुपती।।५।। सर्वस्वीं अन्यायीं म्हणवितो तुझा। आपुल्या ब्रीद लाजा सांभाळावें।।६।। मन्मथ म्हणे ब्रीद करा हें जतन। तुम्हांलागीं आण षण्मुखाची।।७।।

४८. नाहीं मज ज्ञान नेणों गा साधन। करितों भजन भोळ्या भावें।।१।। नाहीं आंगीं शक्ति करूं तीर्थाटन। करितों पूजन भोळ्या भावें।।२।। न कळे चातुर्य करावया स्तुती। अल्प माझी मति उमारमणा।।३।। मन्मथशिवलिंग म्हणे देवराया। विनवितों पायां भोळ्या भावें।।४।।

४९. आपुल्या ब्रीदाचा अभिमान ऐसा। उपेक्षिलें दासा घडे केवीं।।१।। माता जैसी जाय तान्हुल्याचें सवें। राखी जीवें भावें प्रेम त्याचें।।२।। न विसंबे देव धावें भक्तापाठीं। धरूनिया पोटीं आस त्याची।।३।। निवारी सांकडे पडो नेदी उणें। वाढवी महिमान सेवकांचें।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे शिवाऐसा। कृपाळू सहसा नाहीं दुजा।।५।।

५०. घेवोनिया सोंग जन्मवरी देवा। केली तुझी सेवा स्वहितालागीं।।१।। द्यावयाचे वेळीं चुकविसी तोंड। तेणें कानकोंड जगामाजी।।२।। शेवटील सोंगीं उचिताची वेळ। लपोनी केवळ बैसलासी।।३।। आतां एक करी दावी आपुलें तोंड। मागणें उदंड असो तेंही।।४।। भेटी अंती सर्व पावलों भरून। आमुचें हें ऋण तुज नाहीं।।५।। मन्मथशिवलिंग म्हणे भेटीवीण। येथें दुजी खूण न चले कांहीं।।६।।

५१. सर्वगत तुझें राहो तुजपाशीं। आम्हां एकदेशीं आवडे ध्यान।।१।। मुखीं नाम गाऊं रूप पाहूं डोळां। पुजूं जाश्वनीळा एकविध।।२।। सर्वगत पाहतां वेडावले ऋषी। उबगोनी मानसीं ठेले उगे।।३।। ते रूप कासया आम्हांलागीं व्हावें। कोणासी पूजावें गावें कोणां।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे उमापती। सांठविली मूर्ती चित्तीं तुझी।।५।।

५२. सत्संगे न धरी निष्ठा। मिरवी आपुली प्रतिष्ठा।।१।। अयोग्यासी अर्पी पदवी। श्रेष्ठांहातीं पाय धुवी।।२।। मानी स्वधर्माचा त्रास। धरी अधर्मी उल्हास।।३।। दासी दासां घाली अन्न। करी साधूचा अपमान।।४।। विषयासाठीं द्रव्य जोडी। धर्मीं वेंचीना कवडी।।५।। कामीं ठेवूनिया मन। करीतसे नाना यत्न।।६।। म्हणे मन्मथशिवलिंग। ऐसा आचरे तो मांग।।७।।

५३. काय केलें रांडलेका। जन्म गमाविला फुका।।१।। नाहीं केलें बा साधन। काय माड्या ह्या बांधून।।२।। नाहीं अर्चिलें शंकरा। पैका वेंचीला संसारा।।३।। नाहीं पूजिले अतिथी। सदा स्त्रियांची संगती।।४।। म्हणे मन्मथशिवलिंग। बोलो जातां येतो राग।।५।।

५४. आलीया संकट। नाम घेई नीलकंठ।।१।। आलें विघ्न जाये। ऐसें नाम थोर आहे।।२।। हरनाम घेतां ओंठीं। सुख भरे पाठीं पोटीं।।३।। दुःखां नुरेची बा ठाव। दृढ जडे आत्मभाव।।४।। म्हणे मन्मथशिवलिंग। नाम

ब्रह्मीचें बा अंग।।५।।

५५. सोडोनिया आत्मवर। जी कां रिघाली परघर।।१।। तया पतिव्रतास्तुती। कानीं येतां दुःख चित्तीं।।२।। तैसा स्वधर्मी भ्रष्टला। अन्य धर्मीं प्रवर्तला।।३।। गेला एकविध भाव। सैरा फावे तिकडे धांव।।४।। आंगी भरला अविश्वास। दोन्ही लोकीं केला नाश।।५।। मन्मथ म्हणे पाहतां येणें। घडे अधःपाता जाणें।।६।।

५६. फट् रे द्वाडा पापीष्ठा। नाहीं घडली आत्मनिष्ठा।।१।। सुख मानूनि संसारीं। भरवी लौकिक बाजारीं।।२।। कन्या पुत्र हीं सोयरी। भावें त्यांची सेवा करी।।३।। जन्मवरी शीण केला। अंतकाळी व्यर्थ गेला।।४।। म्हणे मन्मथशिवलिंग। नरकीं पचे त्याचें आंग।।५।।

५७. निजूं नका जागा जागा। आपुल्या स्वधर्मानें वागा।।१।। वेद शास्त्र इतिहास। हाची करिती उपदेश।।२।। आणखी व्यासादिक मुनी। हेंची सांगती पुराणीं।।३।। ऊर्ध्वगती स्वधर्मात। परधर्मीं अधःपात।।४।। मन्मथ म्हणे जाणा वर्म। बरा वाईट तो स्वधर्म।।५।।

५८. स्वधर्माचा त्याग उपजे खळाअंगीं। सांगतसे जगी भक्तिमार्ग।।१।। विश्वीं विश्वंभर जना बोध करी। शिवयोगी द्वारी येऊं नेदी।।२।। इष्टलिंगा पाणी नसे बिल्वदळ। पूजितसे खळ देवांतरा।।३।। मायबापा अन्न न घाली चांडाळ। अन्नछत्रीं जळ वाढीतसे।।४।। पुण्य करितां पाप जोडे तयालागीं। कल्पवरी भोगी नर्कवास।।५।। मन्मथशिवलिंग म्हणे वेडावलें। हातें बुडविलें घर त्यानें।।६।।

५९. साधूच्या वचनीं सज्जना उपदेश। खळालागीं द्वेष वाटे चित्तीं।।१।। चंद्रोदयीं सुख पावती चकोर। दुःखी होती चोर दुष्टबुद्धी।।२।। सूर्याचे प्रकाशें वर्तती सकळ। दिवाभीत बीळ धरून राहे।।३।। मन्मथ म्हणे हित सज्जनासी होय। दुर्जन तो जाय अधोगती।।४।।

६०. सांडोनी स्वधर्म परधर्मीं रत। पाप तें तयास आचरतां।।१।। ऐसा गीतेमाजी अर्जुनासी भाव। कथिला वासुदेवें सारांश।।२।। नेणोनिया जन आडमार्गी चालती। आंधळ्यानें हातीं धरिलें अंधा।।३।। तैसें शास्त्रांतील नेणोनिया वर्म। सांगूनि अधर्म राहाविती।।४।। गर्दभ गाळामाजी गुंतला

एकला। अवघेचि तयाला साह्य होती।।५।। मन्मथ म्हणे तैसें भांबावलें जन। आपुलें कल्याण न पाहती।।६।।

६१. जयासी नावडे शंकराची स्तुती। तो जाणा दुर्मती भाग्यहीन।।१।। जयाचीये वाचें न ये शिवनाम। तो जाणा अधम महादोषी।।२।। कदां न ऐकेचि कानी शिवकथा। तो जाणा सर्वथा आत्मघाती।।३।। कल्पवरी भोगी यमाची यातना। न चुके बंधनापासोनिया।।४।। मन्मथ म्हणे ऐसी पापिष्ठाची गती। पुराणे बोलती धर्मशास्त्र।।५।।

६२. तोची शिवभक्त शिवासी अंकित। जीव हें शिवत्व केलें जेणें।।१।। हातीं बिल्वपत्र गळां शिवसूत्र। मस्तकीं पवित्र भस्म शोभे।।२।। रुद्राक्षाच्या माळा रुळताती गळां। शिवपूजा सोहळा एकनिष्ठ।।३।। तीर्थप्रसादाचा नित्यनेम ज्यासी। सदा वसे काशी सदनीं त्याच्या।।४।। मुखीं शिवनाम अंतरी सप्रेम। अहर्निशीं नेम नाहीं दूजा।।५।। मन्मथ म्हणे ऐसा जाणा वीरशैव। येर जाण वाव धर्मलोपी।।६।।

६३. वीरशैवमार्ग क्रिया करी निष्ठ। त्यासी मानी श्रेष्ठ उमापती।।१।। परस्त्री जननी ध्यान शिवार्चनीं। संताचे सेवनीं मानी हर्ष।।२।। तोचि मान्य झाला स्वर्ग मृत्युलोका। परद्रव्यें देखा नाणी दृष्टी।।३।। वाचेलागी छंद शंकरनामाचा। मनीं आनंदाचा पूर वाहे।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे पूज्य जगा। भक्तीचिया अंगा देव करीं।।५।।

६४. सुखें असा गृहाश्रमीं। लक्ष लावा शंकरनामीं।।१।। नटा नामी शंकराच्या। आपदा चुकवा भयाच्या।।२।। संसार धंदा सर्व करा। ध्यानीं निजध्यास धरा।।३।। राग करूं नका बोला। रात्रंदिवस विवेकाला।।४।। मन्मथ म्हणे संतालागीं। एवढी विनंती परिसा वेगीं।।५।।

६५. आम्ही वंद्य म्हणो त्यासी। सर्वभावेसी शरण।।१।। मग हो कां भलते याती। ज्याचें चित्तीं शूळपाणि।।२।। अनुसरें एकभाव। वेंची जीव परकाजा।।३।। सर्वभूतीं शिव पाहीं। दुजा नाहीं त्या भावार्थ।।४।। मन्मथ म्हणे ऐसा भाव। तेथें देव तोचि एक।।५।।

६६. इष्टलिंग हृदयावरी। अन्य देवा नमस्कारीं।।१।। महापाप तया जोडें। तेणें अधःपात घडें।।२।। करितां दुजें ठायीं रती। तेणें घडें अधोगती।।३।।

अंग लिंगासी अर्पिलें। तेव्हां तयाचेंची झालें।।४।। मन्मथ म्हणे नेणती वर्म। न पाहती धर्माधर्म।।५।।

६७. शिव शिव म्हणतां वाचें। काय गेलें तुझ्या बाचें।।१।। शिवनाम असें श्रेष्ठ। पापी उद्धरती नष्ट।।२।। शिवनाम घेतां वाचें। दोष जाती वैष्णवांचें।।३।। शिवावांचून आहे कोण। विठ्ठलमस्तकीं शिव जाण।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे। शिवावांचून व्यर्थ जिणें।।५।।

६८. न करिती सोमवार। न पुजिती गौरीवर। ऐसें पातकी जे नर। यमपुरी तयासी।।१।। मुखीं न घेती शिवनाम। चित्तीं नाहीं ज्याच्या प्रेम। ऐसें दोषी जे अधम। कुंभपाक तयासी।।२।। शिवनिंदा करिती वाचें। माहार जाणा ते जातीचे। प्रायश्चित्त तया दोषाचें। नसें वेदपुराणीं।।३।। मन्मथ म्हणे जन्मा आले। जननीलागीं श्रमविलें। जन्मताच कां नाहीं मेलें। रांडलेक अपवित्र।।४।।

६९. वरवर दावी शिवाचार। परी अंतरीं अनाचार।।१।। भगवें तो जाश्वनीळ। जो कां निंदितो चांडाळ।।२।। न पाहावें वदन त्याचें। ते प्रिय यमदूताचे।।३।। काय गेरू कळली त्याला। गेरू अंतरीं रंगला।।४।। ऐसा गेरू आहे श्रेष्ठ। नकळे तो महाभ्रष्ट।।५।। म्हणे मन्मथशिवलिंग। भगवें रूप उमारंग।।६।।

७०. जन्मा आलिया तूं करी हें स्वहित। दारा पुत्र वित्त नये कामा।।१।। निष्काम होऊनी शिवनाम उच्चारी। धरूनी अंतरी दृढ प्रेम।।२।। प्रेमाचा अंकित पार्वतीचा पती। न सोडी संगती प्रेमळाची।।३।। होऊनिया वेडा भोंवता भोंवता। करी न सांगता काज त्याचे।।४।। मन्मथ म्हणे देव प्रेमाचा भुकेला। आणिक कोणाला नाटोपेची।।५।।

७१. शिव नाद शिव छंद। वाचें शिव स्मरावा।।१।। शिव अवघा प्रेमानंद। सदाशिव स्मरावा।।२।। शिव हृदयीं रात्रंदिन। मुखीं ध्यान सदाशिव।।३।। शिव सुखां शिव दुःखां। मन्मथमुखां सदाशिव।।४।।

७२. बा रे गेलों गेलों वाया। मज तारी शंभुराया।।१।। नको अंत पाहूं माझा। दास अंकित मी तुझा।।२।। मज म्हणती पतित। तुज नोव्हे गा उचित।।३।। पावन असशील जरी। तरी धांव गा लौकरी।।४।। म्हणे मन्मथशिवलिंगा। आतां देऊं नको दगा।।५।।

७३. वासनेचा फासा घालूनी जिवाशी। आम्हां फिरविसी नाना योनीं।।१।। आम्हीं तुझें काय केलें होतें देवा। म्हणोनिया दावा साधियेला।।२।। आतां तरी मज सोडवी एथूनी। काम क्रोध यांनी नागवीलें।।३।। सिंहाचिया वस्तु जंबुकानें नेली। कीर्ती ही बुडाली देवा तुझी।।४।। म्हणोनी लौकरी मन्मथाशी तारी। त्या कीर्तीनें भरी त्रिभुवन।।५।।

७४. आमुचें प्रारब्ध झांकोनिया ठेवा। पाऊल हें दावा उमाकांता।।१।। लोकभयासाठीं भूमीआड केलें। पाहिजे दावीलें पुत्रालागीं।।२।। लाडकें लेकरूं करी अपराध। माता त्याचा खेद काय मानी।।३।। असंख्य पातक भरलें माझें अंगीं। म्हणवितों जगीं दास तुझा।।४।। आपुलिया दासा पडलिया उणें। जाईल दूषण त्रैलोक्यांत।।५।। मन्मथशिवलिंग म्हणे बरवेंपण। आपुलें आपण ओळखावें।।६।।

७५. माझ्या मना लागो चाळा। पाहावया संत डोळां।।१।। आणिक नाहीं मज चाड। न लगे संसार धड गोड।।२।। तरीच फळ जन्मा आलों। उमारंगीं धन्य झालों।।३।। मन्मथ म्हणे महादेवा। देई सज्जनाची सेवा।।४।।

७६. आम्हां नसेचि विटाळ। आंगी पातकांचा मळ। आम्ही शिवभक्त केवळ। मुद्रांकित तेथीचें।।१।। आम्ही नेणों कर्माकर्म। वर्म विधिनिषेधाचें। लिंगपूजा हा स्वधर्म। एकविध आमुचा।।२।। नेणों आणिकांची स्तुती। गीतीं गाऊं गौरीपती। हरी ब्रह्मादिका ध्यातीं। पादपद्में जयाचीं।।३।। आम्हीं न भिऊं कळिकाळा। जिंकूं कृतांताचा मेळा। दीन अनाथां दुर्बळा। पार करूं भवसिंधू।।४।। या रे मोठे लहानथोर। भलते याती नारीनर। एथें साधन विस्तार। नलगे कोण्या सायासें।।५।। मन्मथ म्हणे कौलनामा। अनुसरून करा जमा। एथें सकाम निष्काम। भेद नसे अणुमात्र।।६।।

७७. संसाराचें ठायीं असतें जरी सुख। टाकूनियां देख जातें केवीं।।१।। पार्वतीचा पुत्र षडानन ज्ञानी। आहाच म्हणोनी जातां केवीं।।२।। थोर थोर मुनी कुटुंब सोडूनी। निरंतर वनीं राहते केवीं।।३।। ऐसे मुनीश्वर सांडोनी संसार। झाले दिगंबर तयासाठीं।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे संसारात। सुख अणुमात्र नसे कांही।।५।।

७८. तोंवरीच देवा तुजलागी भ्यावें। मागायाची हाव वसे चित्तीं।।१।।

तितुकें सांडितां तुझें भय काय। रंक आणि राव तुल्य आम्हां।।२।। नागवें झालीया गेली सर्व लाज। शंकावया काज नसे कांहीं।।३।। उदास होऊनी फिरतों वेडेपणें। चित्तीं देहभान नसे कांही।।४।। तेथें तुझें कोण करितो स्मरण। देवभक्तपण कैचें वेड्या।।५।। मन्मथशिवलिंग म्हणे वेडावलों। असतांची मेलों संसारासी।।६।।

७९. वेडा झालों वेडा झालों। वेडियाच्या गांवा गेलों।।१।। वेडा बैसलासे भोळा। कृपा करी शिवलीला।।२।। वेडियानें वेडें केलें। अवघें शिवरूपीं नेलें।।३।। मन्मथ म्हणे वेडा खरा। गुप्तरूपें आला घरा।।४।।

८०. वर्णांमाजी श्रेष्ठ ब्राह्मण मी एक। वाखाणी कौतुक लोकामध्यें।।१।। क्षमा दया शांती ईश्वराची भक्ती। नसे एक रती भूतदया।।२।। तेथींचें ते वर्म चुकुनीया गेला। भवपाशीं गुंतला चौऱ्यांशीच्या।।३।। उत्तम मिष्ठान्न चांडाळें शिविलें। तैसें तेथे झालें अभिमानें।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे मीपणाचें। घेऊनिया नाचें ओझें माथां।।५।।

८१. न पडो विसर तुझिया पायांचा। गीतीं गाऊं वाचा नाम तुझें।।१।। तुझिया सेवेचा नसावा वियोग। इच्छितों संयोग जन्मोजन्मीं।।२।। हेंचि देई देवा न मागे आणिक। स्वामी मी सेवक तूं हें करी।।३।। त्रैलोक्याचा स्वामी दाता तूं उदार। मागती तुज फार स्वर्ग मोक्ष।।४।। मज दुर्बळासी इतुकेंचि देई। विनवितों डोई ठेवूनि पायां।।५।। कृपाळू होऊनी मन्मथा अपंगी। महाराज योगियाचें निजा।।६।।

८२. जळो त्याचें ज्ञान जळो त्याची भक्ती। लिंगांगाची स्थिती न कळे ज्यासी।।१।। अध्यात्माची पोथी सोडूनी बाजारीं। वैराग्याची थोरी सांगे लोकां।।२।। भक्ती भावार्थाचें घेऊनिया सोंग। जगामाजी ढोंग भोंदावया।।३।। व्यर्थ त्याचा जन्म शिवभक्ताचे कुळीं। वंशाची रांगोळी केली तेणें।।४।। अमृताचें ताटीं ओगरिलें विष। तैसें त्या कुळास नागविलें।।५।। रूपवंत नार व्यभिचार करी। लावण्याची थोरी जळो तिच्या।।६।। मन्मथशिवलिंग म्हणे भूमिभार। लिंगांगीविचार नाहीं जया।।७।।

८३. तेणें सर्व केलें सांग। वरिला लाग भक्तीचा।।१।। तपें तपला अमूप। जपें जपला सकळ।।२।। केल्या बहू तीर्थावळी। आहुती अनळी

ओपिल्या।।३।। अमोघ ओगरिलें अन्न। याचकां धन अर्पिलें।।४।। पुण्यक्षेत्रें धुंडाळिलीं। व्रतें घडलीं अपार।।५।। मन्मथ म्हणे प्रेमभावें। देव पावे सोयरा।।६।।

८४. जारिणीसी पतिसेवेचा कंटाळा। व्यभिचारसोहळा गोड वाटे।।१।। जाराकडे पाहे डोळे मोडी हासे। पतीबोला त्रास मानी मनीं।।२।। तैसें इष्टलिंगपूजेचा कंटाळा। देवांतर गोळा करी बहू।।३।। काय नेणों गती त्याची पुढें होय। वाटतो विस्मय मनामाजी।।४।। मन्मथ म्हणे वाचें बोलावें तें काय। जनां दिसे सोय अधर्माची।।५।।

८५. देऊळा आधार देवाचाची झाला। देवळानें केला देव उभा।।१।। देवें आणियेली देऊळासी शोभा। देऊळाची प्रभा देवावरी।।२।। तंतुमाजी शेला शेल्यामाजी तंतू। एक एका आंतु एकपणें।।३।। ऐकता हें कैसें सांच पडे लोकी। देखणी विवेकीं जाणें खूण।।४।। अलंकार सोनें सोन्या अलंकार। पाहतां विचार ठायीं पडे।।५।। सद्गुरुप्रसादें मन्मथें देखिलें। दोहीं भाग ठेलें एकरूप।।६।।

८६. भक्ताचिया घरी मुक्ती राबताती। वेदांत हें गाती श्रुतिमुखें।।१।। काजा भक्ताचिया आपण करी दास्य। विघ्न वारीतसें बहुळेचे।।२।। बहुळा ती नेली कैलासालागूनी। आपुल्या आसनीं बैसविली।।३।। दाशार्णव राजा शबरी सिंहकेत। त्याचे मनोरथ रक्षिसी तूं।।४।। गोकर्णी चांडाळी तिचा उद्धार केला। कल्मषपाद नेला कैलासासी।।५।। मन्मथ म्हणे ऐसे दोषी उद्धरिसी। आम्हां उपेक्षीसी कशास्तव।।६।।

८७. सायंकाळी शिव पूजा। सुख होय नंदीध्वजा।।१।। वाढी भुकेलिया अन्न। हो कां कैसेंही भोजन।।२।। तेथें अर्पिल्याचें फळ। राहूं नेंदी दोष मळ।।३।। करी कृपा लोभ फार। भव ओसरें अपार।।४।। मन्मथ म्हणे ऐसी घडी। आनंदासी कोंब फोडी।।५।।

८८. हर जित्ता मेल्या तारी। एक भक्त भवसागरी।।१।। अवघें कुळ करी पावन। पापी दोषी तारी जन।।२।। हें तों एकासाठी घडें। सुख सकळांसी जोडे।।३।। गायी वत्सालागीं पान्हा। क्षीरपान सर्व जनां।।४।। मन्मथ म्हणे भगीरथ। सागरा आणिलें गंगातीर्थ।।५।।

८९. भाळीं भस्मरेखा। तुम्हीं तयासी ओळखा।।१।। करा साष्टांग वंदना। सव्य घाला प्रदक्षिणा।।२।। ऐसी दूता आज्ञा करी। यम भिऊनी अंतरीं।।३।। गीत गाती नारी नर। मुखीं नामाचा उच्चार।।४।। असे रुद्राक्षमंडित। बिल्वमाळा विराजित।।५।। देह असो भलतेपरी। जे कां शैव वेषधारी।।६।। मन्मथ म्हणे ऐसी मात। दूता सांगे वैवस्वत।।७।।

९०. धन्य तयाचा संसार। जेथें गजर नामाचा।।१।। कांता पुत्र बंधू जन। अवघे शरण देवासी।।२।। घरीं उद्योग करिती। वाचे वदती शिव शिव।।३।। भावें करिती शिवपूजा। नसे दुजा भावार्थ।।४।। वाढी याचकांसी अन्न। करी भोजन अवश्य।।५।। मन्मथासी सेवा घडो। द्वारीं पडो ये याच्या।।६।।

९१. कानीं ठेवूनीया मन। करा कीर्तन श्रवण।।१।। ऐकिलें तें धरा मनीं। वाचें वदा शूळपाणि।।२।। सदा ध्यान करा त्याचें। भय नाहीं कळिकाळाचें।।३।। देव बोला माथां वाहे। जेथें वांछी तेथें जाये।।४।। मन्मथ म्हणे गुणकीर्तनीं। देव जोडा सर्वजनीं।।५।।

९२. अहो दीपकीं पतंग। सुखें जाळी आपुलें अंग।।१।। कमळीं घ्यावया सुगंध। लोभें भृंग पावे बंध।।२।। काय लाभ तया झाला। शेखीं प्राणासी मुकला।।३।। तैसें विषयाचें सुख। पाहू जातां अवघें दुःख।।४।। करी आतांचि विवेक। पुढें न घडे जेणें शोक।।५।। शरण सद्गुरूसी जाई। चित्त ठेवी त्याचें पायीं।।६।। म्हणे मन्मथशिवलिंग। ब्रह्मरूप होय अंग।।७।।

९३. तया भावें शरण जावें। सदा वाचें नाम घ्यावें।।१।। करी दीनावरी कृपा। उरो नेदी दैन्यपापा।।२।। नवविधामाजी सार। नाममात्रें होती पार।।३।। मन्मथ म्हणे धरा जीवीं। हेचि भक्ति सदाशिवीं।।४।।

९४. काम जिंकिला कवणें। ऐका त्यांची महिमानें।।१।। रंभा आली शुकापार्शी। माय म्हणूनि वंदी तिसी।।२।। काम षण्मुखें ग्रासिला। जनक विदेहीं तो झाला।।३।। काम त्रासिला भीष्मानें। मन्मथ म्हणे वरदानें।।४।।

९५. कामें नाडिलें जनांला। अंतर पडे परमार्थाला।।१।। कामें केलें देशोधडी। फिरवी संसार बांधोडी।।२।। कामें नाडिलें थोरासी। इतरांची गती कैसी।।३।। कामें नारद भुलविला। साठी संवत्सर व्याला।।४।। कामें ब्रह्मा चेवविला। कन्येपाठीं तो लागला।।५।। काम ऐसा अनिवार। नागविले

ऋषीश्वर।।६।। कामें विष्णू केला दीन। वसवी वृंदें स्मशान।।७।। कामें गिंवसिलें शिवासी। हिंडे भिल्लिणी पाठिशीं।।८।। काम कैसीयानें सरे। मन्मथ म्हणे नामस्मरें।।९।।

९६. हर रे वीरशैवधर्म। चाले तोचि तो उत्तम।।१।। शील क्रिया करी नेम। लिंगपूजें लावी प्रेम।।२।। न करी कवणाची निंदा। शिवस्मरणीं हाचि धंदा।।३।। हर रे इंद्रियांसी मारी। संताघरीचा कामारी।।४।। मन्मथ म्हणे ऐसा वर्ते। तयालागी म्हणिजे मुक्त।।५।।

९७. हर रे शंकर मंत्र सोपा। करी निर्मळ अवघ्या पापा।।१।। हर रे शंकर दैवत भोळा। स्मरतां नासे कळिकाळा।।२।। हर रे शंकर छंद मनीं। गोड ऐकतां श्रवणीं।।३।। मन्मथ म्हणे भलते याती। धन्य शंकर ते ध्याती।।४।।

९८. उमारंग आमुची माय। आम्हां सुखां उणें काय।।१।। घेतां नामामृत ध्वनी। प्रेम वोसंडीत मनीं।।२।। क्रीडूं गणांचिया मेळीं। करूं आनंदाची टाळी।।३।। मन्मथ म्हणे कृपावंत। ठेवी आम्हांपाशीं चित्त।।४।।

९९. हर रे निर्मळ ही काया। माझी करी देवराया।।१।। हर रे कानाचे श्रवणीं। तुझी पडो नामध्वनी।।२।। हर रे डोळ्याचें पाहणे। अवघा तूंचि परिपूर्ण।।३।। घडो हस्तानें ही पूजा। निरंतर शिवराजा।।४।। घडो पायांचें भ्रमण। तुझें क्षेत्रालागीं जाण।।५।। म्हणे मन्मथशिवलिंग। देई हाचि गा उद्योग।।६।।

१००. ज्ञानगर्वे झाला धीट। बांधून व्युत्पत्तीची मोट।।१।। वेदशास्त्रें अभ्यासिलीं। थोर प्रतिष्ठा जोडिली।।२।। जळो त्याचें थोरपण। वाचें नाणी उमारमण।।३।। शिवकीर्तनाच्या ठायीं। चित्तीं लोभ ज्याच्या नाहीं।।४।। नाहीं भक्तीचा ओलावा। पातकी तोचि जाणावा।।५।। परस्त्री परधन हरणीं। सदा इच्छीतसे मनीं।।६।। सर्वकाळ निंदा करी। कोणा राहूं नेदी उरी।।७।। मन्मथ म्हणे अभिमान। करी दोषाचें साधन।।८।।

१०१. जय जय मदनांतका। सर्वव्यापका सर्वेशा।।१।। उमापती गंगाधरा। चंद्रशेखरा सांबमूर्ती।।२।। पशुपती परशुधरा। परात्परा परपुरुषा।।३।। सदाशिवा शूळपाणि। भाळनयनी त्रिलोचना।।४।। भक्तवत्सला भयनाशका। भवभंजका त्रिपुरारी।।५।। नीलकंठा शशिशेखरा। गौरीवरा गणनाथा।।६।। महादेवा

महाराजा। नंदिध्वजा तुज नमो।।७।। हर रे मन्मथाची वाणी। नामस्मरणीं ठेवावी।।८।।

१०२. ऐका कथेचें महिमान। भक्तजन भाविक हो।।१।। कलियुगीं हेंचि सार। तरले फार या वाटें।।२।। कानीं पडतां शिवनाम। वाटे प्रेम शरीरीं।।३।। होय पातकाचा नाश। तुटे पाश भवाचा।।४।। उपजे श्रवणीं आवडी। जोडे जोड भक्तीची।।५।। मन्मथ म्हणे कथामृत। करी तृप्त सकळिका।।६।।

१०३. असे शुद्ध भाव ज्याचा। देव अंकित तयाचा।।१।। अहो आठवितां पोटीं। धांवे तयाचे संकटीं।।२।। कोठें पडो नेदी उणें। जाणें अंतरींच्या खुणें।।३।। गुंते भावार्थाच्या लोभा। जेथें पाहे तेथें उभा।।४।। म्हणे मन्मथशिवलिंग। देव भाविकाचा योग।।५।।

१०४. जाणोनि न नेणें करी माझें मन। आपुली प्रेमखूण देऊनिया।।१।। मग मी संसारीं असेन व्रतस्थ। जैसें हो जळांत पद्मपत्र।।२।। ऐकूनी न ऐके निंदा स्तुति कानीं। जेवीं कां उन्मनीं योगिराज।।३।। देखूनी न देखे प्रपंच हा सृष्टीं। स्वप्नीचिया दृष्टी चेवलिया।।४।। बोलूनी अबोला असावा लौकिक। निर्वाणी निःशंक देहभान।।५।। मन्मथ म्हणे ऐसें करी कोणेवेळीं। जेवीं लवण जळीं मिळे तेवीं।।६।।

१०५. कैलासीचें ठायीं न वसे वसती। सद्गुरूची संगती होई जेव्हां।।१।। साधुसंगे मोक्ष लुटे सर्वकाळ। विश्रांतीचें मूळ साधुजन।।२।। धन्य साधुजन साधिती जे नर। भवसिंधू दुस्तर तरती कीं।।३।। मन्मथ म्हणे साधु तोचि निजानंद। त्यांचे पायी छंद लागो आम्हां।।४।।

१०६. काय कैलासा करावें। मुखीं शिवनाम घ्यावें।।१।। काय कैलासासी काम। मुखीं घ्या रे शिवनाम।।२।। अहो शिवनामापुढें। काय कैलास बापुडें।।३।। काय कैलासाची चाड। मन्मथ म्हणे शिव गोड।।४।।

१०७. भोळ्या शंकरा शंकरा। पार्वतीचिया हो वरा भोळ्या शंकरा।।१।। माझी ऐकावी प्रार्थना। बहुत पावलों यातना भोळ्या शंकरा।।२।। तोडी संसारबंधन। लावी चरणीं अंतःकरण भोळ्या शंकरा।।३।। आता नको गर्भवास। फार झालों कासावीस भोळ्या शंकरा।।४।। मन्मथासी सोडवी आतां। विश्वलोचना अनंता भोळ्या शंकरा।।५।।

१०८. वाचें वदा नमः शिवाय। सुलभ उपाय सर्वांशीं।।१।। पार्वतीस सर्वेश्वर। हाचि सारबोध केला।।२।। मूळमंत्र पंचाक्षर। जपतां पार भवसिंधू।।३।। नारीनर सकळिका। नाहीं धोका या मार्गीं।।४।। वेदशास्त्रें देती ग्वाही। याहून नाहीं साधन।।५।। मन्मथ म्हणे धरा कंठीं। लाभ पोटीं सांठवा।।६।।

१०९. गुरु आणि लिंग जंगमाची सेवा। देई मज देवा जन्मोजन्मीं।।१।। रुद्राक्षाच्या माळा भस्म लावूं भाळी। हेंचि चंद्रमौळी देई मज।।२।। तीर्थ आणि प्रसाद मंत्र षडक्षर। ध्याऊं उमावर जन्मोजन्मीं।।३।। मन्मथशिवलिंग म्हणे आचरण। हेंचि अष्टावरण वीरशैवा।।४।।

११०. तुजलागीं हेंचि मागों। तुझें नामीं छंद लागो।।१।। सुखें संसारासी घाली। देई आवडी पाऊलीं।।२।। नको नीचांचा सहवास। नको साधूजनीं त्रास।।३।। मोह पुत्रकलत्राचा। नको लोभ शरीराचा।।४।। नको एकांतीं लोकांतीं। नको परनारी संगती।।५।। म्हणे मन्मथशिवलिंगा। देई चरणापाशीं जागा।।६।।

१११. सुंदर ते रूप पाहिन मी डोळा। भस्म जाश्वनीळा शोभतसे।।१।। नागाचे कुंडल तळपती श्रवणी। कंठी स्फटिकमणी विराजित।।२।। गळा बिल्वहार कासे व्याघ्रांबर। आवडे निरंतर हेचि ध्यान।।३।। माथा जटाभार मध्ये गंगा वाहे। वामांगी ते पाहे गिरिजादेवी।।४।। पुढे संतमेळा गणांचा परिवार। नामाचा गजर करीतसे।।५।। ब्रह्मा विष्णु तेथे करिती पूजन। करिती गायन नारदादी।।६।। मन्मथ शिवलिंग म्हणे आवडे ध्यान। त्याने माझा प्राण निवविला।।७।।

११२. सर्व देवांमाजी श्रेष्ठ। एक माझा नीलकंठ।।१।। पाहा पाहा डोळेभरी। पितांबर अंगावरी।।२।। गळा रुद्राक्षांच्या माळा। कंठ दिसतसे निळा।।३।। जटेमाजी गंगाजळ। गळा घालूनिया माळ।।४।। अंगी भस्माचे लेपन। कंठी शेषाचे भूषण।।५।। नंदीवाहन शूळपाणि। शंभु त्रैलोक्याचा धनी।।६।। ऐसा देव उमापती। विष्णु करीतसे भक्ती।।७।। गायन गंधर्व करिती। पुढे अप्सरा नाचती।।८।। वाद्ये वाजती अपार। वेद गर्जताती चार।।९।। मन्मथ म्हणे धरा चित्ती। देव पार्वतीचा पती।।१०।।

११३. गुरुदेव सार गुरुदेव थोर। आदि अगोचर परब्रह्म।।१।। वेदश्रुति शास्त्रे गर्जती पुराणे। न कळे महिमान ब्रह्मादिका।।२।। रवि शशी ऋषी सर्व तारांगण। करिती प्रदक्षिणा अहर्निश।।३।। मन्मथ म्हणे गुरु परब्रह्म मूर्ती। त्रिभुवनी वंदिती सुरासुर।।४।।

११४. सद्गुरूशी शरण जाती। अथवा जाऊ जे म्हणती।।१।। त्यासी आहे हा संसार। ऐसे म्हणे तो महार।।२।। असो नसो मनी भाव। जो का देखे गुरुराव।।३।। चरण उदकी जे नाहती। मन्मथ म्हणे तेचि तरती।।४।।

११५. शिव शिव वेळोवेळां। जिव्हेलागी लागो चाळा।।१।। सकळ जगाचे जीवन। जडो डोळा माझे ध्यान।।२।। तीर्थयात्रा पायी घडो। परोपकारी देह पडो।।३।। मन्मथ म्हणे हेचि द्यावे। वारंवार जन्मा यावे।।४।।

११६. नाम सार नाम सार। तरती पार भवसिंधु।।१।। नाम चांग नाम चांग। फिटे पांग देहाचा।।२।। नाम गोड नाम गोड। तुटे ओढ विषयाची।।३।। मार्ग निका मार्ग निका। मन्मथ हाकारी हाकारी।।४।।

११७. शिवरात्री व्रत करी नित्य नेम। धरूनिया प्रेम अंतरी ते।।१।। नित्य नेम पूजा करी उपोषण। रात्री जागरण करी प्रेमे।।२।। शिवाच्या कीर्तनी आनंदे नाचत। शिवकीर्ती गात प्रेमभरे।।३।। प्रात:काळ होता गुरुलिंगपूजा। पारणे ते ओजा होये।।४।। मन्मथ म्हणे ऐसा एकनिष्ठ भक्त। सदाशिव अंकित प्रेमे त्याच्या।।५।।

११८. करितो शिवरात्री व्रत। जो का वीरशैव भक्त।।१।। तया नाही गर्भवास। चुकला चौऱ्यांशीचा फास।।२।। उपवास शिवपूजा। होय करिता सुख नंदीध्वजा।।३।। मन्मथ म्हणे धरा जीवी। एकनिष्ठा सदाशिवी।।४।।

११९. प्रदोष शिवरात्र तैसा सोमवार। व्रतेही साचार जाणा तुम्ही।।१।। तयाविण अन्य करिता ते व्रत। होय अध:पात शिवभक्ता।।२।। शिवभक्त जीव शिव उपासना। टाकोनिया जाणा न करी अन्य।।३।। सोडूनि शिवाते भजे इतराते। तेणे हो यमाते बोलविले।।४।। मन्मथ म्हणे चित्ती असू द्यावी मात। व्यभिचारे घात होय जीवा।।५।।

१२०. संन्याशाचे सोंग संपादिले सांग। वैराग्याचे अंग आणिता नये।।१।। चित्रकारे सूर्य चित्री लिहिला चांग। प्रकाशाचे अंग आणता नये।।२।। चातुर्य

योग्यता कवित्व करी सांग। प्रासादिक गुण आणिता नये।।३।। मन्मथ शिवलिंग म्हणे कीर्तन करी सीमा। वियोग प्रेमा आणिता नये।।४।।

१२१. तया भुकेचिया तोंडा। मिळो कोंडा अथवा मांडा।।१।। सदा संतुष्ट तो योगी। जो सुखदुःख न धरी अंगी।।२।। वस्त्र देवांग पाठादिका। अथवा उघडा का बोडका।।३।। निद्रे मंचकी सुषुप्ती। अथवा पाषाण हो का क्षिती।।४।। पूजा माने तो फुगेना। हानी अपमाना उत्तरेना।।५।। मन्मथशिवलिंग म्हणे ऐसा। निराकार तो आकार ठसा।।६।।

१२२. जेणे देव चढे हाता। ऐशा स्वहिता लागा रे।।१।। जेणे तुटे जन्मकोडी। ऐसी जोडी जोडा।।२।। जेणे सदा सुख होय। ताप हा जाय त्रिविध।।३।। जेणे साधुसंग जोडे। सेवा घडे संताची।।४।। मन्मथ म्हणे ऐसे करा। करूनि तरा संसारा।।५।।

१२३. साठविला पोटी। जेणे आवडी धुर्जटी।।१।। त्याचा तुटला भवबंध। झाला अंतरी शुद्ध।।२।। जन्मा आलियाचे सार्थक। झाले जळाले पातक।।३।। मन्मथ म्हणे लाभ झाला। देव अंतरी संचला।।४।।

१२४. हलवूनिया खुंटा। आधी करा बळकटा।।१।। मग तयाचे आधारे। करशील तेचि बरे।।२।। सुख दुःख साहे। आशा तृष्णा भंगोनि जाय।।३।। मन्मथ म्हणे या जीवे। आधी मारूनिया राहावे।।४।।

१२५. हर हर गेलो वाया। मज तारी शंभुराया।।१।। नको अंत पाहू माझा। दास पतित मी तुझा।।२।। मज म्हणती पतित। नोहे तुजला हे उचित।।३।। पावन करावे या जरी। तरी धाव गा लवकरी।।४।। म्हणे मन्मथशिवलिंगा। आता देऊ नको दगा।।५।।

१२६. लिंगबोली वेद बोले। लिंगचाली सूर्य चाले। लिंगआज्ञे वायू हाले। ऐसे पुराणी बोलिले।।१।। लिंगे रचिल्या विश्व रचे। लिंगे खचिल्या सर्व खचे। स्थिती नादावी तो साचे। तया आज्ञे सर्व नाचे।।२।। मन्मथ म्हणे लिंगांकित। सर्व जग हे विख्यात। महापुराणी ही मात। शिव सांगतो सकळा।।३।।

१२७. लिंग म्हणे धोंडा धोंडा। किडे पडो त्याच्या तोंडा।।१।। लिंग म्हणे खडा खडा। होय जन्मोजन्मी वेडा।।२।। लिंग म्हणे जो पाषाण।

त्याच्या मुखी कीटक जाण।।३।। मन्मथ म्हणे ऐशा नरा। मोजून माराव्या पैजारा।।४।।

१२८. दुष्ट लोक जरी विघ्न आणिती। त्यासी सुष्ट मार्ग दावूनि निश्चित।।१।। कोणेही प्रकारे श्रीगुरुभक्ती। देऊनि जन हे बंधमुक्त करवितो।।२।। मन्मथ शिवलिंग म्हणे अंतरंग। सद्गुरू माझे हे नागलिंग।।३।। नादबिंदुकलातीत नागनाथ। माणुरी असती निरंतर सिंहासनी।।४।।

१२९. ऐक पंढरीच्या राया। मौन धरिसी तू का वाया।।१।। स्वये शिवभक्त तू असशी। शिवनिंदा का ऐकसी।।२।। तूही झालासी गर्विष्ठ। ऐसे भासे मज स्पष्ट।।३।। शिवभजन आता करी। वैभवाचा गर्व हरी।।४।। मन्मथ म्हणे पंढरीराया। वेळ दवडू नको वाया।।५।।

१३०. भस्म आम्ही व्हावे निंदकाचा हेत। परि झाले व्यर्थ श्रम त्याचे।।१।। ज्ञानाग्नीने आम्ही जळयलो स्थूळ। काय करी काळ अग्निरूप।।२।। शिवनेत्रस्थानी अग्नीचा तो ज्वाळ। तेणे आम्हा स्पर्श झाला सदा।।३।। भोळा उमाकांत कैलासीचा नाथ। अभंग रक्षीत अग्नीमाजी।।४।। मन्मथशिवलिंग म्हणे त्रिपुरारी। आमुचा कैवारी सदाशिव।।५।।

१३१. सदाशिव श्री महेशा। का धरिशी फकीरवेषा।।१।। सर्वाभूती तू व्यापून। असशी गा परिपूर्ण।।२।। निर्गुणचि तू साकार। का झालासी दीनोद्धार।।३।। नाना रूपे तू नटशी। जाणतो मी तव मायेशी।।४।। पंचवदन त्रिनयन। रूपे देई मज दर्शन।।५।। मन्मथ म्हणे माझे आई। कृपे आलिंगन देई।।६।।

१३२. पंचाचार हेचि धर्मासी आधार। नाही पारावार शिवभक्ता।।१।। लिंगोद्भवी शरण अनादी ते सिद्ध। झाले कटिबद्ध विश्वाठायी।।२।। रेणुक दारुक तृतीय येकोराम। पंडित पंचम विश्वाराध्य।।३।। शिवाचारधर्मी आचार्य पंचक। वर्तती भाविक काळत्रयी।।४।। अवताररूपी शिवाचारी एक। बसवनाम देख भूलोकी।।५।। धर्म वीरशैव रसातळी जाता। झाला बसव त्राता शिवरूपी।।६।। मन्मथशिवलिंग म्हणे पंचाचार। श्रेष्ठ सूत्रधार रेणुकादी।।७।।

१३३. षट्स्थल ज्ञान हाचि महायोग। भक्ताचा अनुराग सर्वकाळ।।१।। शिवाविण अन्य दुजा नाही देव। भक्तस्थळी भाव हेचि शुद्ध।।२।। महेश्वरा

ऐसा असे दुजे स्थळ। देखिली सकळ शिवरूपी।।३।। लिंगार्पीत सर्व प्रसादचि होती। हेच दृढ चित्ती प्रसादिका।।४।। लिंग तोचि प्राण प्राण तोचि लिंग। असे तो अभंग प्राणलिंग।।५।। त्रिकाळ पूजन गुरुलिंगाठायी। शरणस्थळी पाही भक्त तैसा।।६।। सहावे स्थळ ऐक्यभावे श्रेष्ठ। शिवरूपी दृष्ट वीरशैवा।।७।। म्हणे मन्मथ बसवभक्तादिका। सर्वश्रेष्ठ देखा षट्स्थले।।८।।

१३४. शिवसुता गणपती। चौदा विद्येचा सारथी।।१।। करी कृपा लंबोदर। गजमुख निर्विकार।।२।। वेद भुजांगी सेंदूर। वहान मूषक सुंदर।।३।। फरश अंकुश घेऊनि हाती। तेणे नाना विघ्ने जाती।।४।। तुझे नाम विघ्नहर। करिसी विघ्नाचा संहार।।५।। म्हणे मन्मथशिवलिंग। गण तोचि उमारंग।।६।।

१३५. धन्य धन्य गुरुराया। मज न्यावे निजठाया।।१।। देहभान हारपले। चित्त चरणी वेचले।।२।। काढी भ्रांती निजरूपा। करी दीनावरी कृपा।।३।। डोही बुडालो बुडालो। श्वास कोंडूनी वेडावलो।।४।। मन्मथ म्हणे साधनार्थ। गुरुप्रसादाविण व्यर्थ।।५।।

१३६. ज्योर्तिलिंग आदि दैवत। आधी स्मरा विश्वनाथ।।१।। ओंकार अमलेश्वर। पुढे पहा हिमकेदार।।२।। सोमनाथ तो सोरटी। महाकाळेश्वर उत्तरतटी।।३।। भीमाशंकर त्रिंबकराज। पहा घृष्णेश्वराचे तेज।।४।। रामनाथाचे दर्शन। श्रीशैल्य मल्लिकार्जुन।।५।। काली नगरी वैद्यनाथ। नागभूषण नागनाथ।।६।। म्हणे मन्मथशिवलिंगा। नमस्कार द्वादशलिंगा।।७।।

१३७. हर हर शिव धन्य काशी। मनकर्णिका ज्ञानवापी।।१।। धन्य धन्य त्रिवेणी। काळभैरव दंडपाणि।।२।। जगन्माते तू अन्नपूर्णा। धोंडीराजा श्री गजवदना।।३।। मन्मथ म्हणे तेथे वास। सदाशिवचित्ती शिवदास।।४।।

श्री शिवलिंगस्वामी

मन्मथस्वामींचे शिवलिंगनामक शिष्य होते, अशी पारंपरिक समजूत आहे. परंतु शिवलिंगांची रचना उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे अस्तित्व डॉ. रा. चिं. ढेरे व डॉ. चंद्रशेखर कपाळे या संशोधकांनी अमान्य केले होते. शिवलिंगस्वामींच्या अस्तित्वासंबंधी आणि अभंगरचनेसंबंधी चर्चा करणारी 'शिवलिंगस्वामींचे अभंग' ही पुस्तिका डॉ. शे. दे. पसारकर यांनी प्रकाशित केली.[१] शिवलिंगस्वामींचे अभंग शिवदासांच्या नावावर मुद्रित झाल्याची साधार नोंद त्यांनी केली. त्यासाठी हस्तलिखित ग्रंथांचे आधार दिले. या पुस्तिकेत शिवलिंगस्वामींचे १२ अभंग त्यांनी प्रसिद्ध केले. त्यामुळे संशोधक-अभ्यासकांना शिवलिंगस्वामींचे अस्तित्व मान्य करावे लागले.

हे शिवलिंगस्वामी कोण होते? मन्मथस्वामींचे शिष्य की मन्मथस्वामींचे वडील? हे ठरविणे अभ्यासकांपुढील आव्हान आहे. याबद्दल ज्येष्ठ अभ्यासक शांतितीर्थ स्वामी यांनी एक टिपण लिहून पाठविले. त्यांच्या मते, शिवलिंगस्वामी म्हणजे मन्मथस्वामींचे वडीलच होत. डॉ. चंद्रशेखर कपाळे यांनी देखील आपल्या प्रबंधात 'शिवलिंगस्वामी हे मन्मथस्वामींचे वडील असावेत का?' अशी शंका उपस्थित केली आहे.[२]

शांतितीर्थ स्वामींच्या मते, शिवलिंगस्वामी हे मन्मथस्वामींचे वडील असून मन्मथस्वामी आणि लिंगेश्वर हे गुरुबंधू आहेत. एवढेच नव्हे, तर 'शिवागम' या ओवीबद्ध लघुप्रकरणाची रचना करणारे नागेशदास म्हणजे शिवलिंगस्वामीच होत, असे त्यांचे प्रतिपादन आहे. त्यांच्या ह्या मताची आणि शिवलिंगस्वामींच्या व्यक्तित्वनिश्चितीची अधिक चर्चा होण्याची गरज आहे. शिवलिंगस्वामी हे मन्मथस्वामींचे वडीलच आहेत हे मानून इ.स. १५२३-१५८८ हा त्यांचा काळ शांतितीर्थ स्वामींनी आपल्या टिपणात दिला आहे.

शिवलिंगस्वामींचे १२ अभंग या गाथेत प्रथमच समाविष्ट करण्यात आले आहेत.

---

[१] शिवलिंगस्वामींचे अभंग, अबोली प्रकाशन, सोलापूर, २०१०

[२] वीरशैव संतकवी बसवलिंग : चरित्र व वाङ्मय, शैवभारती शोधप्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी, १९९४, पृ. ३५

श्री शिवलिंगस्वामींचे अभंग

१. तुझें नाम पशुपति। ऐसे निगम गर्जती।।१।। तया नामाचा विसर। तुज पडला साचार।।२।। ऐसे भासे विश्वेश्वरा। की मी पशु असे खरा।।३।। तेव्हां पतित मी सहज। म्हणोनि विनवितो तुज।।४।। माझा अव्हेर न करी। शिवलिंग म्हणे तारी।।५।।

२. खऱ्या नागोबाचें ठेचिताती तोंड। पूजिताती लंड पाषाणासी।।१।। सजीव नंदीसी ताडिति झोडिती। पाषाण पूजिती मनोभावें।।२।। तैसें जंगमासी न भजोनि मूर्ख। पाषाणासी देख पूजिताती।।३।। शिवलिंग म्हणे ऐसे जे कां नर। त्यासी उमावर भेटे केंवी।।४।।

३. मागे बहुतांची पुरविली इच्छा। माझी कां निर्भिच्छा करीतसा।।१।। होती फार आशा दाखविसी पाय। ते तो आता काय न देखे मी।।२।। जरी म्हणूं माझें प्रारब्ध प्रमाण। मार्कंडिया कोण वाचविले।।३।। असंख्य भक्तांचे पुरविले कोड। गर्जती पवाडे वेदशास्त्रीं।।४।। शिवलिंग म्हणे लागलीसे आशा। वेगीं जगदीशा देई भेटी।।५।।

४. होणार तें सुखें होवो विश्वेश्वरा। परि तूं दातारा राहे मनीं।।१।। देह असो पडो बुडो हा संसार। परि बा विसर नसो तुझा।।२।। भक्तकामकल्पद्रुम तूं समर्थ। पुरवी मनोरथ देवा माझा।।३।। तुजवीण प्रीति नसो आणिकांची। शिवलिंग हेंचि मागतसे।।४।।

५. अंतरीचा सर्व जाणसी आशय। वारंवार काय सांगावे म्यां।।१।। जरी तुम्ही येथे केलिया आळस। होय कासावीस जीव माझा।।२।। आतां कृपा वेगीं करावी शंकरा। धांव विश्वेश्वरा पाव वेगीं।।३।। शिवलिंग बहु होतसे हिंपुटी। पाहे कृपादृष्टी येकवेळ।।४।।

६. होणाराच्या पुढे न चाले तुमचें। स्पष्ट वर्म याचे कळो आलें।।१।। शास्त्रमुखें गोष्टी ऐकिल्या साचार। टाळिलें होणार विश्वेश्वरें।।२।। मार्कंड्यादिकांचे आहेत दाखले। चौदा कल्प केले आयुष्य त्याचे।।३।। माझे कर्म झाले बहु बळिवंत। न चालेचि तेथ तुझें कांहीं।।४।। असो आतां

होवो होणार तें सुखें। परि दावी मुख येकवेळा।।५।। शिवलिंग ऐसें बोले सलगीनें। क्षमा हे करोन देई भेट।।६।।

७. अहंकार हा तो न सोडी पापीष्ट। म्हणोनिया कष्ट वाटे बहु।।१।। आम्ही टाकिल्याने राहे मनामाजी। म्हणोनिया तुझी आस करूं।।२।। तुम्ही उपेक्षिल्या कोण सोडविता। धांव गौरीकांता पाव वेगीं।।३।। येकवेळा करी या दुःखावेगळे। बहु तळमळ वाढलीसे।।४।। अगा गंगाधरा अगा विश्वेश्वरा। अगा विश्वाधारा पाव वेगी।।५।। शिवलिंग ऐशा मारीतसे हाका। जाहलासे मुका कां गा देवा।।६।।

८. ज्ञानियाचे कर्म जाणा स्वाभाविक। निंदी तोचि देख होय पापी।।१।। कलह प्रिय तो असे नारदा। वसिष्ठ मुनी सदां क्रोधयुक्त।।२।। कुर्कुट तो सदां मांसचि भक्षीत। वामदेव रत वेश्येलागीं।।३।। रामचंद्र असे एकपत्नीव्रत। कृष्ण दिसे रत जारकर्मी।।४।। वेव्हारी पाहतां भिन्न भिन्न रीती। परमार्थी गति सर्वां सम।।५।। शिवलिंग म्हणे धन्य ते जे ज्ञानी। गुणदोष त्यागूनि वंदावे हो।।६।।

९. भक्तकामकल्पद्रुम। ऐसे असे तुझें नाम।।१।। तरी माझा काम पूर्ण। कां न करिसी अजून।।२।। हाचि काम असे मनीं। तुज पाहावें लोचनी।।३।। शिवलिंग म्हणे शिवा। सांग भेटसी केधवा।।४।।

१०. जरीपटका तो न प्रार्थी धन्यासी। रक्षावें मजसी म्हणोनियां।।१।। परि अभिमान असे त्या नृपासी। सांभाळी ब्रीदासी आपुलिया।।२।। मानवासी असे ऐसा अभिमान। तूं तो धनी पूर्ण त्रैलोक्याचा।।३।। तुमच्या ब्रीदाचा तुम्हा अभिमान। शिवलिंगा जाण भय काय।।४।।

११. बाळपण व्यर्थ खेळोनियां गेलें। नाहीं आठविलें नाम तुझें।।१।। तारुण्याचा अंगीं खवळला काम। तेथें तुझें नाम कैचें देवा।।२।। धन सुत दारा मानूनि आपुलें। मोहें भुलविलें मन माझें।।३।। तेथे देवा तुझे कैचें हो भजन। न घडे पूजन तें ही तेव्हां।।४।। बद्धचि जाहलों मदनाच्या जाळें। अरे या चांडाळे गोवियलें।।५।। वार्धक्याच्या वेळी विकळ इंद्रियें। तेथें कैची सोय मजलागीं।।६।। यालागीं मी तुज करितो विनंती। कृपा गौरीपती करी

माझी।।७।। कृपा करी बापा शिवलिंगावरी। भेट लवकरी आशुतोषा।।८।।

१२. कोणेक अभागी कोडी कुश्चळ अंगीं। शिवद्वारीं ढोंगी पडला होता।।१।। तयाचा दुर्गंध येतां तेथे श्वान। पातले आननें डसायासीं।।२।। येतां जवळीं श्वान वारायाची शक्ती। नसोनियां चित्तीं कळवळे।।३।। जिव्हे शब्दोच्चार न येती म्हणोनी। विव्हल होवोनि बोभातसे।।४।। हाका हाका ऐसें सांगाया जोकरी। शब्द तो उच्चारी न ये त्यासी।।५।। शब्दाचा उच्चार होय हर हर। ऐकोनि शंकर तोषे बहु।।६।। स्मरला आपण येतां अंतकाळ। म्हणतो कृपाळू भक्त माझा।।७।। अंतकाळी नाम घेतलें म्हणोनी। विमान आणोनि बैसविला।।८।। करूनि दिव्यदेह कैलासासी नेला। निजपदीं स्थापिला सदाशिवें।।९।। शिवलिंग म्हणे नकळे याची लीला। सुखाचा सोहळा भोगी रोगी।।१०।।

□□

श्री लिंगेश्वर

(अंदाजे इ.स. १५७८-१६३८)

हे मन्मथस्वामींचे शिष्य असून त्यांच्या परंपरेतील अभंगकार होत. त्यांच्या चरित्राविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. लिंगेश्वर हे बसवलिंगांचे वडील होते असे बसवलिंगांच्या अभंगातील 'लिंगेश्वर मायबाप.. बसवलिंग पोटीचा बाळ।' या उल्लेखावरून स्पष्ट होते. लिंगेश्वर, लिंगय्या, लिंगप्पा या नाममुद्रा त्यांच्या रचनेत आढळतात. बार्शीच्या उत्तरेश्वर मंदिराच्या परिसरात जयरामबुवाच्या समाधीशेजारी दोन समाध्या आहेत. त्यांपैकी एक समाधी लिंगेश्वरांची असावी, असे डॉ. चंद्रशेखर कपाळे व शांतितीर्थ स्वामी या अभ्यासकांचे मत आहे. शांतितीर्थ स्वामींच्या मते, मन्मथस्वामी व लिंगेश्वर हे गुरुबंधू असावेत. मन्मथस्वामी हे गुरुपुत्र व गुरुबंधू असल्यामुळे त्यांच्याविषयी लिंगेश्वरांनी आदरभाव व्यक्त केला, असे ते म्हणतात.

प्रासादिक व दृष्टान्तपर रचना हे लिंगेश्वरांच्या अभंगांचे वैशिष्ट्य होय. या गाथेतील क्र. १ ते ४० हे अभंग 'मन्मथगाथे'तील असून क्र. ४१ ते ५३ हे अभंग 'सांप्रदायिक सप्तरत्नगाथा' या ग्रंथातून घेतले आहेत.

श्री लिंगेश्वरांचे अभंग

१. गुरु ध्याई गुरु ध्याई। गुरुपरतें सार नाही।।१।। गुरुसेवेचा संकल्प। तेंची माझें पूर्ण तप।।२।। गुरुचरणींची रजधूळी। तेची तीर्थाची आंघोळी।।३।। केले सद्‌गुरूचें भजन। तेंची माझें अनुष्ठान।।४।। लिंगेश्वर सांगे वर्म। गुरु तोची परब्रह्म।।५।।

२. येई बा शंकरा कृपेच्या सागरा। भेट दे दातारा अनाथासी।।१।। अनाथ अपराधी आलो मी शरण। कृपा मज पूर्ण करी देवा।।२।। देवा आदिदेवा शंभु सदाशिवा। निजपदी ठेवा देई मज।।३।। देई मज ज्ञान तुझ्या स्वरूपाचें। तेणें अविद्येचे तुटें मूळ।।४।। तुटती बंधनें तुझिया कीर्तनें। चुके येणे जाणें नाम घेतां।।५।। नाम घेतां रूप आठवें सुंदर। ध्याई लिंगेश्वर वेळोवेळां।।६।।

३. अंतरात्मया कृपाळू स्वामिया। यावें करुणालया अंतर्यामी।।१।। अंतरीं बैसून सुख द्यावें मज। आनंदाची भूज नाचवीन।।२।। नाचवीन मन तुझिया चरणीं। गाईन कीर्तनी नाम तुझें।।३।। तुझें नाम गाता सुख वाटे चित्ता। मुक्ति सायुज्यता न लगे मज।।४।। नलगे वैभव कनक आणि कांता। तुझें नाम घेतां सदाशिवा।।५।। देवा मज देई नामामृत गोडी। ही पूर्ण आवडी लिंगेश्वरा।।६।।

४. तृषाक्रांता जैसी जीवनाची गोडी। तैसी तुझी गोडी लागो मज।।१।। भुकेलिया जैसा जेवितो तातडी। तैसी तुझी गोडी लागो मज।।२।। तारुण्यी वनिता भ्रतारा आवडी। तैसी तुझी गोडी लागो मज।।३।। लिंगेश्वर म्हणे नामाचा बराडी। प्रेम प्रीति आवडी पुरवी देवा।।४।।

५. चौऱ्याऐंशी लक्ष भ्रमें फिरलासी। शेवटी आलासी मनुष्यजन्मी।।१।। सांडोनी भजन विषय स्मरसी। तेणें तूं पावसी जन्मदुःख।।२।। सोय धरी अतां अरे जडमूढा। काळाचीया दाढां पडशील।।३।। पडशील कैसा ऐक रे गव्हारा। मूषक मांजारा सांपडला।।४।। सांपडला जैसा जंबुक सिंहासी। पारधी पाडसा धरूनि आणी।।५।। धरिला वृषभ व्याघ्रें जैसा मुखीं। तैसें तुज शेखी होईल जाण।।६।। लिंगेश्वर म्हणे धरा शिवसोय। मग नाहीं भय कळिकाळाचे।।७।।

६. देही घरामाजी दाटलें बहु कर्म। प्रपंच आश्रम नांदतसे।।१।। स्त्रिया चौघीजणी कलकला करिती। मत्सरे भांडती नानापरी।।२।। कन्या सातजणी स्वार्थाचे लक्षणी। आपुलाले गुणीं पडतसे।।३।। पुत्र तेरा जण करिती अवगुण। विषयाला गुण धांवताती।।४।। ऐशा आश्रमाचा लागलासे घोर। ते वेळी विचार आठवला।।५।। उबगोनी शरण गेलों सद्गुरूसी। तेणें कुटुंबासी निवारिलें।।६।। लिंगेश्वर म्हणे आपणां ऐसें केलें। बैसविलें निजपदीं अढळ।।७।।

७. पांच गेले पांचा ठाया। कैसा देह गेला विलया।।१।। मृत्यु पावला तो कोण। ते मज देई बा सांगून।।२।। देह आत्मा काय मेला। सांगा विचार कैसा ह्याला।।३।। विश्व पहाता अवघे मुक्त। परी कल्पना बाधीत।।४।। लिंगेश्वर विनवी मना। वेगीं सोडी तूं कल्पना।।५।।

८. रुईच्या फळामाजीं कोठून असे रस। पहाता कापूस अभ्यंतरी।।१।। तैसा निंदकाचा व्यर्थ जन्म जाय। कल्पांती उपाय नाहीं तया।।२।। शेवरीचा वृक्ष सर्वांगी पोकळ। वरी पुष्प फळ नास्ति जैसें।।३।। पांगाऱ्याची फुले सुरंग तेजाळ। सांडील परिमळ थोरवी कोणा।।४।। सांडण्याचे अन्न जरी झालें मिष्ठ। सज्जन श्रेष्ठ नातळती।।५।। लिंगेश्वर म्हणे जो पडे भोंवरी। तो केंवी माघारी येई तीरा।।६।।

९. कोणी एक मेंडका असत संसारी। मन श्वानावरी असे त्याचे।।१।। त्यासी अंतःकाळ आला एका वेळी। पहातां जवळी कोणी नसे।।२।। रात्रंदिवस माझ्या जीवाचा सांगाती। तो जिवलग अंतीं आठवला।।३।। श्वान श्वान म्हणतां शिवशब्द आले। सहज घडलें भजन त्यासी।।४।। रुद्रगणाहाती विमान आणिले। कैलासासी नेले घालूनीया।।५।। लिंगेश्वर म्हणे काय वाणूं त्यासी। मेंडका कैलासी राज्य करी।।६।।

१०. सांडोनियां जन वसविलें वन। दावावया चिन्ह वैराग्याचें।।१।। वैराग्य वितंड प्रबोधी प्रचंड। स्वरूप अखंड उद्धरिसी।।२।। उपदेशिले जन कृपा केली पूर्ण। पतित पावन शिवराज।।३।। शिवराज सद्गुरु मुखें उच्चारितां। तुटली भ्रमता चौऱ्यांशीची।।४।। चौऱ्यांशीचा फेरा चुके सद्गुरूनामें। म्हणोनी मनोधर्मे शिव स्मरा।।५।। स्मरा शिवलिंग धरा साधुसंग। लिंगया अभंग गुरुचरणी।।६।।

११. जास्वंदाचे पुष्प होतें शिवांगणी। घारीने नयनीं देखियलें।।१।। आमिष म्हणोनी मुखीं धरियलें। झडपोनी नेलें नभामाजी।।२।। झडपी सरीसें आंगण लोटिलें। मन संतोषलें शंकराचे।।३।। हस्तावीण कैसें आंगण लोटिलें। विमान धाडिलें घारीलागीं।।४।। लिंगेश्वर म्हणे न कळे याची थोरी। घारीला शिवपुरी प्राप्त झाली।।५।।

१२. ऐसा कोण आहे देव। नाम घेतां नुरे भव।।१।। एका शंकरावांचुनी। कोण आहे मोक्षदानी।।२।। न पाहेचि भाव शुद्ध। तोडी पतिताचें बंध।।३।। महापातकी तारिले। नारी नर उद्धरिलें।।४।। लिंगयासी आणिली शोभा। केला कैवल्याचा गाभा।।५।।

१३. पटकर पोतेरें करी सुगरण। तैसा जन्म जाण व्यर्थ गेला।।१।।

काष्ठापरी जैसा जाळिला चंदन। तैसा जन्म जाण व्यर्थ गेला।।२।। कवडीचे मोलें दिधलेसें रत्न। तैसा जन्म जाण व्यर्थ गेला।।३।। लिंगेश्वर म्हणे न करी भजन। त्याचा जन्म जाण व्यर्थ गेला।।४।।

१४. उदयालागी कैसा आला तये काळीं। तस्कर देऊळीं प्रवेशला।।१।। माथां ठेवूनी पाय चांदवा सोडिला। शिव संतोषला मनामार्जी।।२।। म्हणे माझे भक्त उदंड हे उर्वी। देह कोणी पूर्वीं न अर्पिला।।३।। महाभक्त म्हणोनी कैलासीं नेला। निजपदीं स्थापिला सदाशिवें।।४।। लिंगेश्वर म्हणे न कळे याची महिमा। चोरटा निजधामा पावलासे।।५।।

१५. कोणी एक अभागी कुष्ठ कुश्चळ अंगी। शिवदारी रोगी पडिला असे।।१।। दुर्गंधासी त्यांच्या जाणोनिया श्वान। करू आलें चाटन तयाप्रती।।२।। हड हड म्हणतां हर हर बोले। तेणें संतोषले शूळपाणि।।३।। एवढ्या दुःखांत घेतो माझें नाम। म्हणोनि निजधाम अर्पी त्यासी।।४।। दिव्य देह करूनी कैलासीं नेला। निजपदी स्थापिला सदाशिवें।।५।। लिंगेश्वर म्हणे न कळे याची लीला। सुखाचा सोहळा रोगी भोगी।।६।।

१६. भोळा चक्रवती कोणे म्हणविले। नाम पडियले शिवराय।।१।। शंकरासारिखा कोण देव आहे। विचारूनी पाहे त्रिभुवनीं।।२।। कोणीं अग्निनेत्रें मदन जाळिला। कोणी संहारिला त्रिपुर दैत्य।।३।। कोणीं ब्रह्मयाचे ज्येष्ठ मुख छेदिले। कोणी म्हणविलें पूर्ण योगी।।४।। कोणीं वरदान असुरा दिधलें। कोणीं राज्यीं स्थापिलें राक्षसासीं।।५।। कोणी राज्यसंपत्ती वाहन अर्पिले। कोणीं दान केलें स्वस्त्रियेचें।।६।। कोणी विषालागीं दिधलेसे पाठीं। धरियलें कंठीं भक्तकाजा।।७।। लिंगेश्वर म्हणे विचारूनी पहातां। शंकरापरता आणिक नाहीं।।८।।

१७. चहू युगामाजी कलियुग बोलिजे। क्षीराब्धी साजे समुद्रास।।१।। याही परतें सार आणिक नाही थोर। शास्त्रीं हा निर्धार केला असे।।२।। सकळ सरिता असती अनेगा। पवित्र ते गंगा पुण्यशीळ।।३।। सप्त द्वीपामाजीं जंबुद्वीप सार। पतिव्रता थोर उमादेवी।।४।। हस्तींमाजीं शोभे रत्न ऐरावती। धेनु जे बोलती कामधेनु।।५।। वृक्षामाजीं एक शोभे कल्पतरू। पर्वतांत मेरु थोर असे।।६।। वृषभामाझारीं नंदी हा उत्तम। जन्मामाजीं जन्म मनुष्यदेह।।७।।

सर्व देवांमाजी समर्थ शंकर। ध्याय लिंगेश्वर वेळोवेळां।।८।।

१८. एक वेळां मिळे दूध तूप मांडा। एक वेळां कोंडा ताकासवें।।१।। अवघेचि दिवस सारिखे नाहींत। करावें स्वहित शिवनामीं।।२।। एक वेळां मिळे मंचकीं शयन। एक वेळां तृण अंथरावया।।३।। एक वेळां मिळे अश्व हस्ती वृषभ। एक वेळां रासभ प्राप्त होय।।४।। एक वेळां वस्त्र अलंकार। एक वेळ झांजर वाकळ ती।।५।। एक वेळां जगीं जोडला सन्मान। एक वेळां अपमान होत असे।।६।। लिंगेश्वर म्हणे सांडा सुख दुःख। भजा पंचमुख दृढ भावें।।७।।

१९. दळण दळितां स्त्रियांचिये स्थिती। तोंडे बरळती भलतेंचि।।१।। शंकरा सांडोनी पितयासी गाती। सत्य त्या म्हणती अमंगळा।।२।। चिमुकल्या कारणें वर्णिती जननी। शिव न ये वदनीं धांगडीच्या।।३।। आपुल्या स्वार्थासी वर्णिती बंधूला। शिव स्मरणाला आठवेना।।४।। बहीण चुलती कुळ गोत्र सकळां। गाताती खटाळा नानापरी।।५।। लिंगेश्वर म्हणे किती सांगू रांडेस। दळिता शिवास आठवीना।।६।।

२०. तारु बांधोनिया पैलतीरा जाती। सांगड फोडिती काम झाल्या।।१।। ऐसें जे चांडाळ गुण विसरती। सहज पडती नरककुंडी।।२।। नांवेचे सांगातें उतरले नदी। नांव अग्नीमधीं जाळिताती।।३।। गायत्रीचें क्षीर घेतलें पिळोनी। उपवासी बांधोनी ताडिताती।।४।। नऊ मास उदरीं वागवी सुंदरी। ते माता चौ बारीं नग्न केली।।५।। फळें भक्षोनियां तोडी कल्पवृक्ष। गंगाजळ प्रत्यक्ष घेवोनी निंदी।।६।। अष्टोत्तर संख्या रोगाच्या काढोनी। तो वैद्य मारोनी दवडिला।।७।। दुष्काळीं वाचला सुकाळीं माजला। शेखीं मारून गेला द्रव्य नेलें।।८।। सुपंथें पावला आत्मनगरासी। गेलीया पंथासी निखंदीजे।।९।। दोराच्या आधारें पर्वत चढला। पावलासाठीं केला अपघात।।१०।। लिंगेश्वर म्हणे धरा संतसंग। नको तो संसर्ग अभक्ताचा।।११।।

२१. फाकट फुकट बोलती फोलकट। बोधितां बळे कट धरिती गा।।१।। खोटी वटवट कोरडी चावट। व्यर्थ कटकट करिती गा।।२।। कल्पना कळकट त्रिगुण चोखट। माया मळकट करिती गा।।३।। निर्गुणीं निघोट वस्तु ते घनवट। नेणोनी हळुवट मारिती गा।।४।। लिंगेश्वर निकट गुरुकृपे निष्ठ। येर

भेद भ्रष्ट हरती गा।।५।।

२२. कामसर्पे मज अवचित डंशीलें। तें विष चढलें ब्रह्मांडासी।।१।। मन भांबावलें शुद्धि नसे कांही। आप पर तेंही आठवेना।।२।। पाया पिळ पडे हातही भागले। बहु दुःख झाले तये वेळी।।३।। कुकर्माचा झेंडू अंतरीं लोटला। कंठीं जो दाटला वासनेनें।।४।। प्रपंच कडुलिंब मज गोड वाटें। रुतती विषयकाटें म्हणोनीया।।५।। तया वेळी थोर दुःख वाटें जीवा। भावे केला धांवा सद्गुरूचा।।६।। आला झडकरी गुरु धन्वंतरी। सोहं बीजें मंत्रीं झेंडू फोडी।।७।। विष उतरोनी देहशुद्धी केली। मूर्छना हरली इंद्रियाची।।८।। प्रपंच कडूलिंब सहज वाटला। सावध हो ठेला परब्रह्मीं।।९।। कडू वनौषधीं मधुरता आली। तैसी परी झाली लिंगेश्वरा।।१०।।

२३. सर्व साधनाचें सार। सर्व व्रतासी आधार। सकळ तीर्थाचे माहेर। कपिलधार अघनाशी।।१।। सर्व सिद्ध ऋषिमुनी। अनेक तापसांच्या श्रेणी। गिरिजासहित शूळपाणि। वसे या स्थानी सर्वदा।।२।। इंद्र विरंची सुर नर। जो कां लक्ष्मीचा वर। आवडी वसती निरंतर। कपिलाधार अनुपम्य।।३।। कपिलाधार वाराणसी। कपिलाधार पुण्यराशी। कपिलधार सर्व जीवांसी। सुखदायक अक्षयी।।४।। कपिलाधार भू-कैलास। कपिलाधार तोडी पाश। कपिलाधार जड जीवांस। भवमोचन भवभीता।।५।। लिंगेश्वर म्हणे या रे। सांडून साधन पसारे। अवघे जीवन्मुक्त व्हा रे। कपिलधारीं न्हावोनी।।६।।

२४. सावध होई सावध होई। आपणा आपण लक्षुनि राही।।१।। अंतर वोवरीं सुखें क्रीडा करी। इंद्रियद्वारां नको येऊ बाहेरी।।२।। तद्रूप तन्मय झाली अखंडता। वृत्ती विराली अवघी वस्तुता।।३।। मुक्ति मायीक मोक्ष कल्पनीका। निर्विकल्प देहीं तोचि स्वयें मुका।।४।। लिंगेश्वर म्हणे सांगेन तो कोश। तूंचि परब्रह्म परतोनी असे।।५।।

२५. स्वामीसी चुकलें कपड्याचें श्वान। तैसें झालें जिणें निगुऱ्याचें।।१।। दर्हीं क्षिरीं मार्जीं चाटू हिंडे मानें। तैसें झालें जिणें निगुऱ्याचें।।२।। गणिकेचा पुत्र पितयासी नेणें। तैसें झालें जिणें निगुऱ्याचे।।३।। लिंगेश्वर म्हणे जो सद्गुरूसी नेणे। अजागळीं स्तनें तैसा जन्म।।४।।

२६. सद्गुरु सज्जन माय। शिष्य बाळा टाळी भय।।१।। ओसंगळां

घेवोनियां। प्रेमपान्हा पाजूनिया।।२।। बोधी पोटीं प्रेमलहरी। स्वानुभवें सुखी करी।।३।। अद्वय शोभे अलंकार। विवेक अंगीं टोपी सार।।४।। कृपादृष्टी अवलोकी। बैसविलें विजय अंकीं।।५।। मुक्तपणें रांगे खेळे। परतोनी चरणी लोळे।।६।। अज्ञान लिंगेश्वर बाळ। बोलूं नेणें वाचा बरळ।।७।।

२७. ॐ नमो सद्गुरु शिव परब्रह्मा। स्वामी सर्वोत्तमा परात्परा।।१।। परातीत परा निज निर्विकारा। वंदू सर्वेश्वरा गुरुदेवा।।२।। देवाधिदेवा नित्यानंद शिवा। शुद्ध स्वानुभवा निजरूपा।।३।। रूपनामातीता अद्वय अवधूता। निर्भय निर्धूता निरंजना।।४।। लिंगेश्वर म्हणे अलक्ष अमूपा। नित्य निर्विकल्पा अजा अक्षरा।।५।।

२८. जाणा पशु पक्षी श्वापदें जळचरें। ओघ नदी क्षेत्र ब्रह्मरूप।।१।। ब्रह्मरूप असे पिपिली मशक। अन्न धात कीटक ब्रह्म तेंचि।।२।। तेंचि इष्ट मित्र गोत्र पिता पुत्र। सखा शत्रु सर्व ब्रह्म भासे।।३।। लिंगेश्वर रूप द्रव्य-दारादिक। स्वामीही सेवक ब्रह्म देखा।।४।।

२९. ब्रह्मत्वें वर्तती इंद्रिय-दशक। विषय पंचक प्राणांसहित।।१।। हिताहित मात सद्गद सांगतां। गुरु शिष्य समस्ता ब्रह्मानंद।।२।। ब्रह्मीं ब्रह्मानंद आनंदी आनंद। स्वानंदी निजबोध सहजची।।३।। सहजानंद बोध सहजचि लाधला। सहज होऊनी ठेला सहजाकार।।४।। सहज सहजाकार ब्रह्म ठसावलें। सहजी साठवले सहजामार्जी।।५।। सहजामार्जी असें आशने न साहे। न साहोनी राहे ऐसें ब्रह्म।।६।। ऐसें ब्रह्मरूप केले सद्गुरूने। मान्य आणि बोलणें राहिले जेथें।।७।। जेथें सुखदुःखातीत सुखसारा। तेंचि निर्धारा अनुपम्य।।८।। लिंगेश्वर म्हणे अवघा वस्तुभाव। शिष्या आडनांव तेंही तेंचि।।९।।

३०. नाहीं तो प्रकाश दीपाशी वेगळा। तैसे चंद्रकळा मिरवतसे।।१।। मिरवतसे कीळ रत्नीं परिमळ। उष्णता अनळ एकरूप।।२।। रूप तेचि इच्छा ब्रह्मीं तेवी माया। मिथ्या असोनिया जाणतसे।।३।। जाणिजे तें तत्त्व सुमनीं सुवास। जळीं जळ रस तैसा असे।।४।। असें समिरण पवनीं पवन। तंतुपटपण ऐक्य दिसे।।५।। दिसे अलंकार सर्व सोनियाचे। तयाचें तद्रूप कारण ते।।६।। कारण कनक कार्य झाल्या नग। कुकडी गेटा नथ परोपरी।।७।।

परोपरी मुद्रा शोभती पवित्र। कंठी गळसूत्र भूषणचि।।८।। भूषण बहुविध परि सर्व हेम। तैसें जग ब्रह्म सत्य जाण।।९।। लिंगेश्वर म्हणे जळ आणि तरंग। तैसें ब्रह्मीं जग ऐक्य असे।।१०।।

३१. क्षरक्षरातीत उत्तम पुरुष। परमात्मा परेश नित्यानंद।।१।। नित्य शुद्ध बुद्ध नित्य मुक्तमानी। आदि मध्य अवसानीं तोचि एक।।२।। एकाचे अनेक अनेकाचे एक। नवल कौतुक अभिनव।।३।। अभिनव कैसें स्वरूप जयाचें। कोण जाणे तयाचें महिमान।।४।। महिमा अपार नेणवे वेदासी। शास्त्र पुराणासीं न कळेची।।५।। नकळे म्हणोनी श्रुति नेती नेति। परादि मुरडती चारी वाचा।।६।। लिंगेश्वर म्हणे स्वरूपी निर्धार। विवेक विचार हरपला।।७।।

३२. बोली बोलवेना मना जाणवेना। अलक्ष लक्षेना चर्मदृष्टी।।१।। दृष्टीसी अतीत असोनी लपत। लपोनी जाणत सकळांसी।।२।। सकळीं सकळ होऊनी निखळ। अमूळाचें मूळ तुळान्वय।।३।। अन्वय पहातां मुख्य अधिष्ठानी। दुजा नाही कोणी दावावया।।४।। दावावया जोगें कोठेची हे नसें। नाही म्हणतां भासे अवघेचि।।५।। लिंगेश्वर म्हणे शिवमय जग। ऐसें परम भाग्य भावनेचें।।६।।

३३. भावना भावितां आपणचि ब्रह्म। स्वानुभव वर्म ठसावलें।।१।। ठसावलें ठायीं देहीं देव पाही। लक्षुनियां राही तुझा तूंचि।।२।। तूंचि ब्रह्मरूप होसी विश्वाकार। महावाक्य विचार निर्धार तो।।३।। निर्धार तो आत्मा आमुचा होईल। ज्ञान प्रकाशेल स्वतःसिद्ध।।४।। स्वतःसिद्ध ब्रह्म असतां आपण। नेणें मूढ जन अविचारें।।५।। लिंगेश्वर म्हणे दुरी दुरावला। राज्यत्वा मुकला राजा जैसा।।६।।

३४. भावना विपरीत सुपरीत करावी। वृत्ति ही धरावी शुद्धसत्त्वीं।।१।। शुद्धसत्तात्मक तरीच साधेल। एकाग्र होईल चित्तवृत्ती।।२।। वृत्तीही विराली समत्वें समान। घटीं मठीं गगन तदाकारें।।३।। तदाकार आत्मा अवघाचि असे। तोचि तो प्रकाशे सर्वाठायीं।।४।। सर्वाठायीं तया असोन नसणे। आत्माआत्म लक्षण सर्वगत।।५।। सर्वगत वस्तु सर्वत्री संचला। सर्व तोचि झाला सांग आतां।।६।। लिंगेश्वर म्हणे अशी अवचित। वृत्ती आनंदित

असो द्यावी।।७।।

३५. आतां मी सांगेन महाद्वैत मत। जेथें द्वैत अद्वैत ऐक्य होय।।१।। ऐक्य दिसे ब्रह्मीं प्रपंच समस्त। बोली वेदांत स्वतःसिद्ध।।२।। स्वतःसिद्ध बोले पूर्वपक्षावीण। उत्तरपक्षी जाण निरसीता।।३।। निरसी उभयतां भेदाभेद वार्ता। महावाक्य तत्त्वतां सिद्धांत गा।।४।। सिद्धांत सांगणें जग ब्रह्म एक। येक न अनेक ऐसे होय।।५।। लिंगेश्वर म्हणे निर्धारी असतां। किरण सविता भिन्न नाहीं।।६।।

३६. जसी सिंधु आपणा सरिता म्हणवी। पुरंदर कवी म्हणवितो।।१।। म्हणवी कल्पतरू शेवरीचा वृक्ष। तैसा आत्मा प्रत्यक्ष जीव भावी।।२।। मृगजळ भास देखती हे जन। परी नव्हे जळ किरणें खरी।।३।। खरे किरणज्वाळा त्यासी ह्मणती जळ। अज्ञान केवळ अंधमृग।।४।। अंधमृगा ऐसें जाणे मतिमंद। पूर्ण चिदानंद नकळेचि।।५।। नकळे सांग ब्रह्म तोचि शतमूर्ख। व्यर्थ तर्कातर्क वाढविती।।६।। वाढविती भेद नेणोनियां वर्म। सकळ हे ब्रह्म नकळें त्यासी।।७।। त्यासी कळावया उपाय असती। संत त्या म्हणतीं महावाक्य।।८।। महावाक्य लक्षीं मूळ दृष्टी धाली। सकळ न्याहाळी ॐकारवृक्षा।।९।। वृक्षा बुडीं राहे ऊर्ध्व दृष्टीं पाहें। खोड खांदीया होय एकरूप।।१०।। लिंगेश्वर म्हणे पत्रीं पुष्पीं फळीं। पहातां समुळीं अवघा वृक्ष।।११।।

३७. वृक्ष परब्रह्म चिद्रूप सकळ। प्रपंच हें फळ सत्ता देंठ।।१।। देंठ फळ वृक्ष एकचि आकृती। बृहदारण्या ऋषि श्रुति बोले।।२।। बोलती सद्गुरू अवघा ब्रह्मतरु। मायादि संसारु एकरूप।।३।। लिंगेश्वर म्हणे ब्रह्मरूप तितुकें। सांगेन निष्टंके प्रथगाकारे।।४।।

३८. प्रथगाकार ब्रह्म विष्णु महारुद्र। अग्नि सूर्य चंद्र ब्रह्म असे।।१।। असे शिवगण ऋषी मुनी गंधर्व। इंद्रादिक देव ब्रह्म जाणा।।२।। जाणा थळ जळ नळा कळी नळ। खग रूप मंडळ ब्रह्म जाणा।।३।। सत्य जाणा तुम्ही नरनारी समस्त। दैवत भूत प्रेत ब्रह्म असे।।४।। लिंगेश्वर म्हणे पर्वत पाषाण। गुल्म लता तृण ब्रह्म जाणा।।५।।

३९. हरपलें मन इंद्रियासहित। हरपलें चित्त बुद्धीं नाहीं।।१।। नाहीं

अंतःकरण निर्विकल्प जाण। वस्तु परिपूर्ण तेंचि असें।।२।। असे वसे ठसे पूर्णत्वें प्रकाशें। गुरुकृपालेशें प्राप्ती होय।।३।। होय ब्रह्मरूप सर्वत्री सर्वदा। महाद्वैत बोधा लाधलीया।।४।। लिंगेश्वर म्हणे ब्रह्म सनातन। महावाक्य जाण उपदेश।।५।।

४०. उपदेश करिती स्वामी शिवलिंग। सद्गुरु भुजंग परात्पर।।१।। परेपरते पर निरोपिलें सार। वस्तु निराकार निरामय।।२।। निरामय केलें द्वैत निरसिले। अद्वैत दाविलें कृपाळुत्वें।।३।। कृपा करोनिया भेदास खंडिलें। अभेद दाविले द्वंद्व-दृष्टी।।४।। लिंगेश्वर म्हणे सद्गुरूच्या बोधे। भेदाभेद द्वंद्व निरसियला।।५।।

४१. गुरुराया धन्य धन्य रे। येती योगी सुरगण रे। ब्रह्मा विष्णू रुद्रगण। सकळांसी तू मान्य रे।।१।। दवडिसी द्वैतदैन्य। वारिसी विकारसैन्य। छेदी सर्व भवारण्य। दिव्य बोध-कुठारे।।२।। भवतापे तापलो। विषयविषे आहाळलो। वर्षूनि कृपापर्जन्य। शिवा शांत करी रे।।३।। जडमूढा तारिसी। जीवाशी पावनत्व देशी। भवभयाते वारिसी। बोधूनि चैतन्य रे।।४।। हृदयी धरूनि ते पाय। चिंती तू सद्गुरुमाय। लिंगेश्वरा ठाय ठाय। तूचि दिससी बाप रे।।५।।

४२. सिंह व्याघ्र सर्प आमुचे संगती। तयाची संगती गोड वाटे।।१।। नाही तेथे राग द्वेष मत्सर तो। निर्भय विचार तो तयामाजी।।२।। नाही निंदा स्तुती ऐकू येत कानी। सदाशिव मनी राहे सदा।।३।। लिंगेश्वर म्हणे मानवासंगती। संसाराची गुंती बळे पडे।।४।।

४३. कांता पुत्र वित्त धनसंपत्ती। संसार म्हणती अज्ञ जन।।१।। संसाराचे रूप न कळे मानवा। म्हणोनिया गोवा पडे गळी।।२।। देहात्मबुद्धी हाचि संसार। करावा विचार शुद्ध बुद्धी।।३।। लिंगेश्वर म्हणे त्यागिता वासना। संसाराचे जाणा मूळ जाय।।४।।

४४. देहात्मभावना प्रपंच हा भारी। करा लवकरी त्याग याचा।।१।। देहात्मभावने लागी सर्व जोडी। त्यागिता न सोडी प्रपंच हा।।२।। देहसुखालागी कांता पुत्र वित्त। बैसलेसे चित्त तया सुखी।।३।। लिंगेश्वर म्हणे कंटाळलो फार। देहात्मविचार सोडू वाटे।।४।।

४५. अध्यात्माचे ग्रंथ वाचूनि शिणलो। प्रेमा अंतरलो देवा तुझ्या।।१।। भक्ती भावार्थाची रुची नाही कळली। वृत्ती पांगुळली श्रद्धाहीन।।२।। काय म्या करावे कार्य ते कळेना। वृत्ती ही वळेना परमार्थी।।३।। लिंगेश्वर म्हणे पुरे खटाटोप। दाखवी स्वरूप देवराया।।४।।

४६. अणुहूनि आम्ही होतो की लहान। मोठे गगनाहून झालो आता।।१।। भाव हा द्वैताचा पायी तो निमाला। खंडिता भेदाला अखंडचि।।२।। अणुता महत्ता गिळिली एकसरा। उरलो मी दातारा सेवेपुरता।।३।। लिंगेश्वर म्हणे केली बोळवण। शिवचरणी मन विसावले।।४।।

४७. पाहाता स्वरूप जाहलो अरूप। कैचे निजरूप आठवे मज।।१।। मीतूपण गेले सहसा गळून। पूर्ण समाधान लाभले हो।।२।। अखंड समाधी अचळ स्वरूपी। गुरुकृपारूपी लाधली हो।।३।। लिंगेश्वरी सहज जाहली जागृती। स्वरूपाची स्थिती अखंड ती।।४।।

४८. उत्तम क्षीरामाजी सराटा शिजेना। निंदक शोभेना संतामाजी।।१।। केळाचिया शेजे दोडका पिकेना। निंदक शोभेना संतामाजी।।२।। आम्रफळामाजी इंद्रावन रुचेना। निंदक शोभेना संतामाजी।।३।। पतिव्रतामाजी वेश्या मिरवेना। निंदक शोभेना संतामाजी।।४।। वीर्यवंतापुढे नपुंसक शोभेना। निंदक शोभेना संतामाजी।।५।। लिंगेश्वर म्हणे जळी उरी पाषाणा। निंदक शोभेना संतामाजी।।६।।

४९. पतितपावन शिवनामे होती। भवसिंधू तरती हेळामात्रे।।१।। तेही शिवनाम सर्वांमध्ये सार। परादी वाचा चार खुंटलिया।।२।। शंकरनामाचा कोण जाणे महिमा। चतुर्मुख ब्रह्मा शिणलासे।।३।। वेद आणि श्रुती म्हणती नेति नेति। पुराणे बोलती नकळे पार।।४।। सहस्रमुख शेष आला वर्णावया। जिव्हा चिरलिया न वर्णवे।।५।। लिंगेश्वर म्हणे भाव धरा दृढ। गगनाहूनि नाम वाढ असे।।६।।

५०. ऐका नवल वर्तले। अव्यक्त व्यक्तीस आले।।१।। ज्याचे मुखी ब्रह्म उपजले। त्याचे दरुशने जीवन गेले।।२।। संत भेटती जेव्हा। ब्रह्मानंद होईल तेव्हा।।३।। जेही शून्यासी खादले। क्रियाकर्म कूळ बुडविले।।४।। अभक्ष्य तेचि भक्षिले। तेणे संसाराचे वर्तुळ झाले।।५।। गोहत्यारी अवगुणी।

निकामी मात्रागमनी।।६।। भोग भोगितो जन्मस्थानी। परद्वारिया शिरोमणी।।७।। मंगळाचे कमळीचा। बोध आत्मानंदाचा।।८।। महावाक्य गाढी वाचा। लिंगय्या इच्छीतसे संग त्याचा।।९।।

५१. हाय हाय हाय हाय। जन हे बुडत जाय।।१।। गुरुदेव ज्ञान ध्यान। धरी तरणोपाय रे।।२।। माय मंगळा हो। सत्य मानिता हो।।३।। अंतिम ती सत्य गती। तीच अविद्या खाय रे।।४।। गुरुभक्तीविण त्याचा। जन्म व्यर्थ जाय रे।।५।। लिंगेश्वर म्हणे आता। मी करू काय रे।।६।।

५२. शंकर पाहुणा आला माझ्या घरा। हृदय अंतरा बैसवीन।।१।। द्वादश रत्नांचे शोभे सिंहासन। त्यावरी आसन शंकराचे।।२।। अनुहात उदके प्रक्षाळूनि देख। केला अभिषेक पंचामृते।।३।। वासना निर्मळ एकनिष्ठेकरून। चर्चिला चंदन चंद्रमौळी।।४।। दशही इंद्रिया विकाशी कमळी। अष्टपरिमळी पूजा होय।।५।। आवडी अपार तोचि अलंकार। शोभे दिव्य वस्त्र सदाशिवा।।६।। शंख घंटानाद गर्जे तो अपार। वाद्यांचा गजर परोपरी।।७।। मनचि हे बीज प्रीतीपात्री वाटून। केले समर्पण स्वामी माझा।।८।। लिंगेश्वर म्हणे आवडी माझिये। अखंड राहावे हृदयी माझ्या।।९।।

५३. विषय स्मरता शिव उभा पुढे। विराले साकडे संसाराचे।।१।। विषय ते झाले अवघे शिवरूप। मनीचा संकल्प तोही गेला।।२।। निर्वाणी शिवरूप मागे पुढे दिसे। संकल्प हा नासे मनीचा तो।।३।। लिंगेश्वर म्हणे भावार्थाची खूण। तो हा उमारमण व्यापक हो।।४।।.

□□

श्री बसवलिंग

(अंदाजे इ.स १७ वे शतक)

बसवलिंग हे वीरशैव संतकवी लिंगेश्वर यांचे पुत्र व शिष्य होते. या पितापुत्राचे वास्तव्य बार्शी (जि. सोलापूर) येथे असावे, असे अभ्यासक मानतात. बार्शीच्या उत्तरेश्वर मंदिराच्या प्राकारात जयरामबुवाच्या सामाधीशेजारी असलेल्या दोन समाध्यांपैकी नंदी स्थापिलेली समाधी बसवलिंगांची असावी, असा तर्क आहे. भालचंद्र ऊर्फ भाऊअय्या मठपती, बार्शी (१८५०-१९१२) हे लिंगेश्वर-बसवलिंगांचे सहावे वंशज होत, अशी नोंद शांतितीर्थ स्वामींनी पाठविलेल्या हस्तलिखित टिपणात आढळते. बसवलिंगांची शिवानंदबोध (श्रीगुरुगीता टीका), गजगौरी आख्यान, भामाविलास, मुरलीचरित्र, उमामहेश संवाद आदी रचना उपलब्ध झाली आहे. बसवलिंग हे उत्तम कीर्तनकार असावेत. त्यांचे ५४ अभंग 'मन्मथगाथे'त प्रकाशित झाले असून त्यांच्या नावावरील 'मन्मथजन्माचे अभंग' डॉ. राम तोंडारे यांनी 'कपिलधार' (नोव्हें. १९८२) त्रैमासिकातून प्रकाशित केले. डॉ. चंद्रशेखर कपाळे यांनी 'मन्मथसमाधीचे अभंग' प्रसिद्ध केले ('अनुबंध', एप्रिल १९७७). जन्माचे व समाधीचे अभंग 'विभूतिवैभव' त्रैमासिकात दोन वेळा पुनर्मुद्रित करण्यात आले (अंक ५४ व ११३). प्रस्तुत गाथेत जन्माचे व समाधीचे अभंग समाविष्ट केले आहेत.

क्र. १ ते ५४ हे अभंग 'मन्मथगाथे'तून, मन्मथ जन्माचे अभंग व समाधीचे अभंग उपरोल्लेखित नियतकालिकांतून, क्र. ८४ ते ११८ हे अभंग 'सांप्रदायिक सप्तरत्नगाथे'तून आणि क्र. ११९ ते १३२ हे अभंग डॉ. कपाळे यांच्या 'वीरशैव संतकवी बसवलिंग : चरित्र व वाङ्मय' या प्रबंधाच्या परिशिष्टातून घेतले आहेत.

मन्मथजन्माचे अभंग व क्र. ८४ ते ११८ हे अभंग लिंगेश्वरपुत्र बसवलिंगांचे नसून उदगीरकर बसवलिंग (इ.स. १८२०-१८९२) यांचे आहेत. नामसाम्यामुळे ते बसवलिंगांच्या रचनेत समाविष्ट झाले. हे बसवलिंग वीरशैव गृहस्थीमठाचे असून उदगीरला चिल्लरगी गल्लीत हा मठ होता. रामलिंग- शिवलिंग- बसवलिंग अशी ही परंपरा असून बसवलिंगांचे बंधू संगनबसवय्या हे वीरशैव भक्तकवी चन्नप्पा वारद यांचे गुरू होते.[1]

---

[1] श्री बसवगाथा, संपा.- दौ. शं. साखरे, मानवता प्रकाशन, उदगीर, २०१३, पृ. १८६

श्री बसवलिंगांचे अभंग

१. गुरुवाक्य धरा ध्यानीं। अवघी सांडावी चाळणीं।।१।। सद्‌गुरूचा उपकार। त्यानें दाविलें आपपर।।२।। ज्याला शोधीत गेले दुरी। तें दाविलें मज माझारीं।।३।। गुरुवांचुनी आहे कोणी। दुजा नाहीं त्रिभुवनीं।।४।। बसवलिंग वाट उघडी। पाहू अमृताची गोडी।।५।।

२. आकार मिथ्या वोडंबर। नासून जाय चराचर।।१।। दिसें तितुकें नासून जाय। न दिसें तितकेंच आहे।।२।। पंच तत्त्वें न राहाती। इतरांची कैसी गती।।३।। रवी शशी रत्नें दोन्हीं। तेही जाती निरंजनी।।४।। बसवलिंग बोले खूण। श्रोतीं घ्यावें ओळखून।।५।।

३. मरण कवणासी न चुकें। न राहतीं ब्रह्मादिकें।।१।। साही गेले चक्रवर्ती। अवतार ही न राहाती।।२।। मोठे मोठे अनुष्ठानीं। तेही न राहती कोणी।।३।। गुरुकृपा जयावरी। जन्म-मरणासी निवारी।।४।। बसवलिंग गुज गाय। धरा अजून बरवी सोय।।५।।

४. शिव जीवासी उद्धरी। दुजा नाहीं अधिकारी।।१।। जीव शिवाचा एकला। म्हणूनी अंगीकार केला।।२।। घटाप्रती अधिष्ठान। घट भंगता अभिन्न।।३।। काष्ठ अग्नीसंगे जळे। ज्वाळा तेजामाजी मिळे।।४।। ज्याचें बाळ त्यासी माया। इतर बोलणें ते वाया।।५।। बसवलिंगासी तो तारू। शिवभक्तासी आधारू।।६।।

५. शिव झाला गेला नाहीं। तो जेथें तेथें पाही।।१।। जीव शिव झाला कैसा। उदकीं सूर्य बिंबे तैसा।।२।। वायू व्यापूनी अलिप्त। तैसा शिव परम तत्त्व।।३।। जैसें व्यापक गगन। तसा शिव परिपूर्ण।।४।। उपमा द्यावया ऐसें। शिव रूप होत नसे।।५।। बसवलिंग म्हणे शिव। जाणे गुरू एकभाव।।६।।

६. आदी नमो आदी गण। चौदा विद्याचे भुवन।।१।। आधारचक्राची मांडणी। तेथे नांदे कुंडलणी।।२।। आधार लिंगातळीं असें। चारी पाकळीका वसे।।३।। पृथ्वी पूर्व मुखी दिसे। गंध हंकार प्रकाशे।।४।। गण दैवत एके पाती। कुंडलणी सरस्वती।।५।। वर्ण रक्त सहा शत। तळीं अपान नांदत।।६।। नाभीं असे मुख्य प्राण। परि तयाचें ह्रदयीं स्थान।।७।। अधारी पाव घटिका

जाण। सवाघटी प्राणायाम।।८।। सूर्य देखणे अंधारी। लक्ष त्रिकुटी माझारी।।९।। तेथून अजपाचा डाव। चित्तीं धरा शुद्ध भाव।।१०।। बसवलिंग म्हणे बापा। अजपा मंत्र आहे सोपा।।११।।

७. मंगळमूर्ती मोरेश्वरा। चौदा विद्येच्या दातारा।।१।। षट्चक्र भेदूनि जासी। बावन किल्ल्या ओळखसी।।२।। आधार लिंग नाभी प्रगटी। हृदयीं मुळें लल्लाटीं।।३।। पन्नास नेमल्या त्रिकुटीं। दोन राहिल्या श्रीहाटीं।।४।। बारा सोळाची मिळणी। भेटे सत्रावी जननी।।५।। बसवलिंग औट मात्रा। परम रस वोपी वक्त्रा।।६।।

८. देह देऊळ शिरोमणी। नवा खणाची आखणी।।१।। पाच पंचवीस त्रिगुणी। मन पवनाची मिळवणी।।२।। चिरे जडले तीनशें साठ। बंध तितुके बळकट।।३।। चौदा चक्राची मांडणी। सोळा सांध्याची जोडणी।।४।। बहात्तर कोठडी निराळे। नऊ दरवाजे मोकळे।।५।। बावन हात उंच देऊळ। बारा सोळा ज्योती प्रबळ।।६।। अवघड उन्मनीची पेठ। षट्चक्रावरूनी वाट।।७।। त्रिकूट सांडून औटपीठ। भ्रमरगुंफा चढा नीट।।८।। तया परतें परात्पर। लिंगवर्ण तो आकार।।९।। ऐसा आहे महालिंग। पाहा म्हणे बसवलिंग।।१०।।

९. जीव शिवाचा असूनी। कदा वदेना वदनीं।।१।। देवीं देव पूजीताहे। शिव वाचेसी तो नये।।२।। लागे पाखंडाचे मार्गे। गोड वाटे नटी सोंगे।।३।।अन्न भक्षितो शिवाचें। नांव घेतो आणिकाचें।।४।। कधी वाचे न ये शिव। तो पावे रव रव।।५।। बसवलिंगाचे वदनीं। शिव शिव वदे वाणी।।६।।

१०. लिंगस्थानीं ब्रह्म देवा। नमो गावें त्या अनुभवा।।१।। स्वाधिष्ठानीं साडे सात। घटका घालूनी गणित।।२।। ब्रह्मा प्रकाशला थोर। जप केला सहा हजार।।३।। सावित्री सुषुम्ना आपण। व्यानागीचें सन्निधान।।४।। प्राणा वानासी भेटून। वर्ण श्वेत पीत जाण।।५।। बसवलिंग म्हणे पाही। बाल मध्वरी रीग नाहीं।।६।।

११. ज्याचे संचित त्या सांगात। कोण जाणे पूर्व दत्त।।१।। जेव्हां गर्भी रचिला गोळा। बरे वाईट तये वेळां।।२।। जैसे घेणें तैसे देणे। उणें अधिक नाही जाणें।।३।। हेतू बीज संसारासी। थोर नाडले सायासी।।४।। एक राव दुजा रंक। याचा न करिजे शोक।।५।। बसवलिंग म्हणे न ठेवी। आशा मनशा

घर बुडवी।।६।।

१२. सत्य तोची धर्म होय। असत्य हेंच कर्म आहे।।१।। सत्य धरा हो जीवासी। लाथ मारा असत्यासी।।२।। सत्य सावित्रीचें घरी। असत्यासी यमपुरी।।३।। सत्य बेचाळीस उद्धरी। असत्यें चौऱ्यांशीची फेरी।।४।। सत्य देवाजीचा गडी। असत्यासी तो रगडी।।५।। बसवलिंग म्हणे घाई। सत्य सोडूं नका भाई।।६।।

१३. अष्टदळाचा जो सज्जा। तेथें प्राण असे माझा।।१।। डपावरी अष्टदळ। अधोमुख अविद्या मळ।।२।। जीव नांदतसे प्रबल। ईश्वर ज्योतीच केवळ।।३।। विश्व प्रतिबिंब नव्हे। तरी साकार स्वभावे।।४।। तैसें जीवा ओळखावे। प्रवृत्ति सगुणा जाणावे।।५।। शब्द स्पर्श रूप रस। गंध पांचवा प्रकाश।।६।। श्वेत पीत कृष्ण रक्त। तेथे प्राण वसे सक्त।।७।। जीव ईश्वरीं अंकिला। भेद प्रकार नाहीं त्याला।।८।। चहू वेदां नाही कळला। सहस्रमुखा शेष शिणला।।९।। आधारीची परा शिणली। मनपुरी ती पांगुळली।।१०।। अनुहात वेडावले। कंठी वैखरी केवीं बोले।।११।। बसवलिंग म्हणे सुणे। त्या वांचुनी वेदपुराणे।।१२।।

१४. सत्पुरुषाची चिन्हें सांगितली शास्त्रीं। कैसीं त्याची परी पाहूं आता।।१।। होणारा सारखी आठविली बुद्धी। काय कृपानिधी करील पाहो।।२।। काय मज हातीं करवील संसार। किंवा सारासार वैराग्याचा।।३।। बसवलिंग म्हणे काही न कळे मज। करील शिवराज तेंचि खरें।।४।।

१५. आपुला निश्चय मनाचा हा झाला। परतोनी आला ऐसा नाहीं।।१।। भोगियलो आह्मी संसारीचा भोग। आतां वाटे त्याग करावा हो।।२।। अग्नीचें तें सुख मानी जैसी सती। पुढें मोक्षगती भ्रतारासी।।३।। बसवलिंग म्हणे तैसेंचि करावें। आतां काय पहावे मागें पुढें।।४।।

१६. करीन अट्टाहास आपुल्या जीवाचा। पाहीन देवाचा महिमा आतां।।१।। टळटळीत ज्ञान कळे मज पूर्ण। आत्मत्वें निपुण चित्त होय।।२।। गुरुपुत्र म्हणे गुरुगम्य नेणें। तेचि लाजिरवाणें जनामध्यें।।३।। क्षत्रियाचा पुत्र पळूं लागे रणी। मग तो काय जनीं बरवा दिसे।।४।। राजपुत्र राज्य सांडूनिया भिक्षा। मागितली दीक्षा बरवी नसे।।५।। सभाग्याचें पोटीं जन्मला करंटा।

काय जनीं मोठा जाणिजे तो।।६।। बसवलिंग म्हणे तैसी आम्हां लाज।
सत्पुरुषाचें बीज कैसें आम्हीं।।७।।

१७. देवें माझा जन्म सुखाचा पै केला। पोटीं जन्म दिला साधूचिया।।१।।
बाळपणीं दीक्षा लाधली गुरूची। संसाराची रुची न कळे मज।।२।। स्मरण
भजन पूजन संताचें। सदा कीर्तनाची प्रेमगोडी।।३।। नाहीं जाऊं दिलें अन्य
ठायीं चित्त। धन्य गोत वित्त देव झाला।।४।। सर्व सुख मज दावी आपुलें
ठायीं। बसवलिंगा पायीं स्थिर केलें।।५।।

१८. ऐसियासी माझें नमन। गुरुमार्गी अवघे जन।।१।। गोपिचंद गुरूच्या
बोला। राज्य सांडून जोगी झाला।।२।। गोरक्षांनी मच्छेन्द्राला। मायेपासून सोडविला।।३।।
राम पाताळासी नेला। तेथें हनुमंत पातला।।४।। शुक्राचार्यी मृत्यु झाला। पुन्हां कैसा
उठविला।।५।। गुरुकृपा ज्याचें ठायीं। बसवलिंग त्याचे पायीं।।६।।

१९. भावार्थ तो ऐसा पाहिजे बहु गोड। जसा इक्षुदंड चवी न सोडी।।१।।
तोडिता मोडिता सोलिता पिळिता। अग्नीने जाळितां चवी न सोडी।।२।।
पाक झाल्यावरी तुडविती चरणे। अंती साखर होणे चवी न सोडी।।३।।
बसवलिंग म्हणे धन्य त्याची निष्ठा। साहून नाना कष्टा सुखवी जना।।४।।

२०. निज ज्ञानी उन्मत्त झाला। जन ह्मणती मन्मथ त्याला।।१।। याचिलागी
मन्मथ नाम। धरी रूप क्रीडा राम।।२।। रिपु मन्मथ जिंकून देहीं। विचरे
मन्मथ विदेही।।३।। बसवलिंग म्हणे काज। भवध्यासें होई सहज।।४।।

२१. देव आपणा जवळीं आहे। अवतारासी करी काय।।१।। कार्या
कारण अवतार होय। कार्य होता स्थळां जाय।।२।। ज्याचा अंमल उठिला
पाही। त्याची न चले कदां द्वाही।।३।। करितां यात्रा तीर्थाटन। तेथे जळ
आणि पाषाण।।४।। पूजा पदार्थाचा भोगी। आहे आत्मलिंग योगी।।५।।
बसवलिंग म्हणे शेखीं। आत्मलिंगासी ओळखी।।६।।

२२. रुद्र अनुहताचा राजा। त्यासी स्मरा भावें वोजा।।१।। अष्टदळावरी
अनुहात। बारा पाकळ्या शोभत।।२।। पंधरा घटिका राहत। तेथे प्राणी तेवी
भ्रांत।।३।। सहा हजार होता जप। दशनाद आपोआप।।४।। चित्ती आणी
तेज रूप। तेथे सर्व जाय ताप।।५।। रुद्र दैवत तेथीचें। आहार मुख तें
तेजाचें।।६।। कान आकाशीं लाऊनी। खेळतसे मन पवनी।।७।। बसवलिंग

म्हणे नीट। अनुहतावरी कट।।८।।

२३. धन्य त्याचा जन्म शिवभक्ताचें कुळी। जेथे चंद्रमौळी वास करी।।१।। संसाराचा बंध तयाचा तुटला। पूर्णत्वासी आला म्हणूनिया।।२।। चालतांना मार्गी उडे जेथें माती। ब्रह्मादि वांछिती स्नान तेथे।।३।। इतराचा पाड कायसा उगेला। विष्णु हा निमाला ध्यानी त्याच्या।।४।। बसवलिंग म्हणे ऐसियाची सेवा। देई मज देवा जन्मोजन्मीं।।५।।

२४. मरणाभेणें भीती जीव। आम्हां मरण्याचा उत्सव।।१।। कधीं मरूं कधीं मरूं। कधीं देहाते विसरूं।।२।। हेंचि आमचें चिंतन। मागूं सांबापाशी दान।।३।। बसवलिंग म्हणे मरा। ऐशा मरणें चुके फेरा।।४।।

२५. काय तैसा भाव कुसंब्याचा रंग। बेगडाचे नग चार दिवस।।१।। अग्नीजवळी लाख नेतां होय पाणी। काढितां तेथूनी दगड जैसा।।२।। ऐसें हें ऐकतां चित्तीं धरी ताठा। तो भाव गोमटा न सरे येथे।।३।। बसवलिंग म्हणे अंतरी विक्षेप। वरी मायबाप म्हणोनी काय।।४।।

२६. दिधलें ते घेत नाही। मागितल्या देत नाहीं।।१।। तीर्थ तपाचे डोंगर। फळप्राप्ती परी अघोर।।२।। खोटें नाहीं खरें कैचें। काय साधितां तयाचे।।३।। आतां श्रम नका करूं। जमा होतो फार केरू।।४।। आप आपणाते पाहे। कोठे कोण कसा आहे।।५।। बसवलिंग म्हणे माय। गुरुकृपा थोर आहे।।६।।

२७. जीव शिवा वेगळा नाही। का रे भुलसी नरदेहीं।।१।। आकाश व्यापिला पसारा। वायू त्रिभुवनी थारा।।२।। पृथ्वी आप तेज बीज। जीव निपजे सहज।।३।। सहज पदार्थ शिव योगी। पुष्प पत्री पूजेलागी।।४।। ज्याने ओळखिला शिव। त्यासी न म्हणिजे जीव।।५।। बसवलिंग म्हणे शिव। न ओळखी तोचि जीव।।५।।

२८. सकळ जिवाचा एक धनी। त्यासी ओळखीना कोणी।।१।। एक पूजिती अंबिका। कोणी ध्यातो विनायका।।२।। एक ह्मणती खंडेराव। कोणी पूजिती भैरव।।३।। कोणी म्हणती ब्रह्मा दैवत। विष्णु रुद्रचि साक्षात्।।४।। एक म्हणती दश अवतार। कोणी म्हणती तत्त्वसार।।५।। एकें शेंदूर लाऊन गोटा। त्यासी म्हणती देव मोठा।।६।। ऐसें भुलले पामर। त्यासी न कळें हें घर।।७।। अनंत अवतार ईश्वराचे। माया प्रपंच त्रिगुणाचे।।८।। चार अवतार

नामांकित। दोन प्रगट दोन गुप्त।।९।। तया रजोगुणाचे जाण। दहा जन्मले सगुण।।१०।। तमोगुणाचीं महत्वे। आदिनाथादि झाले सत्य।।११।। मोठा चैतन्य पसार। थोर व्यापिले चराचर।।१२।। बसवलिंग म्हणे स्वामी। तुज वेगळे नेणों आम्हीं।।१३।।

२९. पश्चिमेची न कळे वाट। परम गुरु दावी नीट।।१।। षोडशेश्वरा मागे वाट। सुईच्या वेजाहुनी नीट।।२।। तेथे सत्रावी चोखट। अमृताचा भरला घट।।३।। तेणें पंथे द्विदळा गेला। तेथे विश्रांती पावला।।४।। एक हजार जप केला। पन्नासाचा नेम झाला।।५।। तेथें इडा आणि पिंगळा। चंद्रसूर्याचा झळाळा।।६।। नेत्रावरी असें नीट। त्यासी म्हणाचे त्रिकुट।।७।। तयामध्ये सुषुम्ना बाळा। तिसरी असे सुढाळा।।८।। ऊर्ध्व पाकळीका आट। श्रीहाटावरी गोल्हाट।।९।। बसवलिंग म्हणे जाणा। थोर सद्गुरूच्या खुणा।।१०।।

३०. कोण जन्मले हो मेले। आर्धी विचारावें भलें।।१।। बुडबुडा जेवीं जळीं। क्षण भासे भंगे तळीं।।२।। लावितां दीप प्रकाशला। मालविता कोठें गेला।।३।। रवी तडागीं देखिला। जळ आटता बिंबीं गेला।।४।। आला नाहीं कैसा गेला। येतां जातां कोणी देखिला।।५।। बसवलिंग म्हणे खोल। जन्म मरण हेंचि फोल।।६।।

३१. सदाशिव ये गा वेगीं। माझी लज्जा राखा जगीं।।१।। बहु मजला श्रम झाले। आतां पाहिजे सांभाळिले।।२।। तुजएवढा दाता कोणी। दुजा नाहीं त्रिभुवनी।।३।। जरी करसी अव्हेर। मज तुझाचि आधार।।४।। त्वां बसावें माझें घरीं। सुख संसारसागरीं।।५।। बसवलिंग म्हणे अंतरीं। तीर्थयात्रा पाहू बरी।।५।।

३२. शिव निराकार आहे। आकारला जीव पाहे।।१।। जीव न ओळखी शिवासी। तेणें पडला गर्भवासी।।२।। गर्भवासाची दुर्गंधी। नव मास पडला बंदी।।३।। गजबजोनी म्हणे शिव। जन्मतांचि झाला देव।।४।। धरी मागील आठव। जीव विरे उरें शिव।।५।। बसवलिंग म्हणे भाव। जिकडे तिकडे सारा शिव।।६।।

३३. सारा ब्रह्माकार आहे। पृथ्वी पर्वतादि पाहे।।१।। देव देऊळ राउळ। ब्रह्मस्वरूप केवळ।।२।। अठरा भार वनस्पती। जीव जनांची उत्पत्ती।।३।। प्रतिमा ब्रह्मची स्वरूप। धनधान्य धातुरूप।।४।। शक्ती पुरुष ब्रह्म पाही।

येथे भेद कांही नाही।।५।। बसवलिंग म्हणे देख। आकाराचे सुख दुःख।।६।।

३४. विष्णु आपरूप आहे। सारा रस आप होय।।१।। विष्णुस्वरूप कृपाळ। आपासारिखें निर्मळ।।२।। आप जिवींचा जिव्हाळा। सत्रावी ते जीवनकळा।।३।। आप सीतळ सोज्वळ। गंध सुगंध परिमळ।।४।। आप निज बीज औषध। पदार्थ तो परमानंद।।५।। बसवलिंग म्हणे खाणी। हिरा लाल मोती पाणी।।६।।

३५. रुद्रस्वरूप तेजाळ। सारा अग्नीचा कल्लोळ।।१।। रुद्रतेज सर्वांठायीं। घटीं पटीं देहीं गेहीं।।२।। काष्ठीं पाषाणीं जळीं स्थळीं। रुद्रतेजाची झळाळी।।३।। जेथे तेज नसें कांही। तेथे जीवनकळा नाही।।४।। रुद्रप्रतापाची थोरी। तिन्ही लोक अंगीकारी।।५।। बसवलिंग म्हणे दीप्ती। रुद्रतेज आम्हां ज्योती।।६।।

३६. जप करोनी काय होय। वस्तू अजपचि आहे।।१।। उत्तम तो तयीं लीन। मध्यम ध्यान धारणा।।२।। कनिष्ठ तो देवार्चन। अधम तीर्थयात्रा जाण।।३।। देवता देवी महा विघ्न। मोठें हत्यारी दुर्जन।।४।। मिथ्या माया आवरण। संसारासी हेंचि कारण।।५।। बसवलिंग म्हणे देही। वस्तू आहे तेचि पाही।।६।।

३७. सदाशिव कैसा आहे। जैसा महदाकाश पाहे।।१।। आकार कांही होणें नाहीं। व्यापक तो सर्वांठायीं।।२।। जैसे घटीं मठीं गगन। तैसा राहिला व्यापून।।३।। तत्त्वें झाली त्या पासोन। निराकार निरंजन।।४।। जैसा ज्याचा भाव आहे। तैसा त्या सारिखा होय।।५।। बसवलिंग म्हणे ग्वाही। आत्मपुराणांत पाही।।६।।

३८. दैवत कवण तत्त्वाचें। कवण लिंग दैवताचें।।१।। याचे ऐकावें कौतुक। लिंग कवण कवणा आंत।।२।। ब्रह्मा दैवत पृथ्वीचें। आचारलिंग ब्रह्मी याचें।।३।। विष्णु दैवत आपाचें। गुरुलिंग तें विष्णूचें।।४।। रुद्र दैवत तेजाचें। शिवलिंग तें रुद्राचें।।५।। ईश्वर दैवत वायूचें। जंगमलिंग ईश्वराचें।।६।। सदाशिव आकाशाचें। प्रसादलिंग शंकराचें।।७।। पंचलिंग पंचमुख। महालिंगासी ओळख।।८।। पाहे म्हणे बसवलिंग। निरंजनी आत्मलिंग।।९।।

३९. येणें जाणें नाही आम्हां। बीज भाजलें न ये कामा।।१।। भरला कुंभ फुटूनी जाय। तो मागुती हातां न ये।।२।। लवण जीवनीं मिळुनी जाय। ते मागुती हातां न ये।।३।। कर्पूर ज्योती मिळतां पाही। तेथें भस्म नुरे कांहीं।।४।।

उसापासूनी गूळ होय। गूळ पेरिता कांहीं न ये।।५।। बसवलिंग म्हणे खंडा। मरण मारी तोचि गुंडा।।६।।

४०. आत्मा नाहीं येत जात। हे कोणासी नाहीं श्रुत।।१।। नातें वर्ण नोहे व्यक्ती। कैसी प्रकाशली दीप्ती।।२।। नोहे श्वेत पित जाण। नाहीं रक्त नीळवर्ण।।३।। नोहे शाम माया मन। ब्रह्मा विष्णू रुद्रगण।।४।। ज्याचा गुरु स्वतःसिद्ध। तोचि जाणे हा निजबोध।।५।।

४१. भक्तीचें धनुष्य वैराग्याचे ओढी। ज्ञानबाण सोडी देवावरी।।१।। झुंजू गेलों वैरें तो देव स्वजाती। झुंजू कोणाप्रती ऐसें झालें।।२।। बसवलिंग म्हणे राहो खटाटोप। झालो आपोआप देवचि मी।।३।।

४२. मी तूं हें विराले एकरूप झालें। रूपचि रंगले सोज्वळ तें।।१।। आतां देव आम्ही झालों एकरूप। द्वैताचा संकल्प हारपला।।२।। जेवीं आम्ही देहीं तो देव विदेही। अद्वैत पाही तेची आम्ही।।३।। आमुचेच हातें देव सर्व करी। तेचि जाणा खरी आमुची सत्ता।।४।। बसवलिंग म्हणे देव आम्ही एक। होतसे कौतुक तें आमुचें।।५।।

४३. जीव आणि शिव दोघे सख्खे बंधु। आहे तो संबंधु मुळींचा एक।।१।। तेथे शिवें केली मोठी ती शिष्टाई। आमुचा भाग काही न दे आम्हां।।२।। आपण आटोपिलें सगळे ब्रह्मांड। आम्हां दिला पिंड औटहात।।३।। तोही पिंड परी नाहीं चिरंजीव। नाना योनीं जीव भोगीतसे।।४।। जन्ममरणातीत आपण राहिला। आम्हां लावियला कर्मभोग।।५।। कांही नेदी आम्हां न बोले धड गोष्टी। आम्ही होतो कष्टी आप सुखें।।६।। सोसवेना आम्हां जन्म आणि मरण। मग गेलों शरण सद्गुरूसी।।७।। सद्गुरूनें केली दोघा बुझावणी। मज केले धनी ब्रह्मांडाचे।।८।। प्रपंच परमार्थ जीव केला शिव। ऐसा गुरुराव बाप माझा।।९।। बसवलिंग म्हणे धन्य गुरुराज। आम्ही करूं काज गुरुकृपें।।१०।।

४४. परमार्थ हा नोहे लेंकराच्या गोष्टी। येथे व्हावा पोटीं अनुताप।।१।। दगडाहून जीव करावा कठीण। अंतरींचा शीण सांडूनिया।।२।। मृत्यू झालें त्याची सांडावी ही आस। तैसे व्हा उदास संसारासी।।३।। बसवलिंग म्हणे करा़राचें काम। आहे त्यासी धाम जवळींच।।४।।

४५. युतीच्या प्रसंगीं मिथ्या साचपण। सज्जना अवगुण लाविताती।।१।। इंगळासी कोठें झोंबती इंगळ। सुवर्णासी तांबे मिळे केवी।।२।। भानुबिंब जळीं चंचळसा भास। केवी गगनास सत्य पहावें।।३।। तेवीं सत्यासत्य पहा विचारूनी। जेवीं पयपानीं राजहंस।।४।। बसवलिंग म्हणे पहावें नयनीं। मग त्या दूषणीं प्रवर्तावें।।५।।

४६. काय करी प्राणी कर्म बळिवंत। केलें तें रहात पुढें उभे।।१।। गीतेमाजीं हरी बोलिलें वचन। कर्माची ही गहन गती असे।।२।। शिवाच्या स्मरणें त्रैलोक्य उद्धरे। राम वनीं फिरे कर्मबळें।।३।। भ्रतारभक्तीची दृढ चित्तबुद्धि। सीता पडली बंदी रावणाच्या।।४।। अवदशा आली दमयंती नळा। झाली अवकळा कर्मबळें।।५।। नष्टचर्या आली तया पांडवासी। केलें द्रौपदीसी नग्न सभें।।६।। अहिल्या ती शिळा इंद्रा पडली भगें। चंद्राचिया अंगी कलंक झोंबे।।७।। ऐसें परी आहे कर्म बळिवंत। म्हणोनिया होत सुखदुःख।।८।। बसवलिंग म्हणे भवसेवे चुके। तरी का मना धाकें व्यर्थ भीसी।।९।।

४७. सद्भाव देखोन माझा। सगुण रूप धरून वोजा। पाहुणा गुरुराज। आला हो बाई।।१।। प्रथम अंतःकरण जाण। चित्त बुद्धि आणि मन। चोपाळून आसन। स्वामीसी केलें।।२।। अनन्य आवडी जळ। प्रक्षाळुनी चरणकमळ। वासना ही उगाळून। चंदन लावू।।३।। कामादि विकार सहा। घेऊनि इंद्रिय दहा। सुमने करूनी पहा। वाहिली पायीं।।४।। अहंकार जाळिला धूप। सुज्ञान उजळिला दीप। पंचप्राण हा अपूप। नैवेद्य केला।।५।। रज तम सांडूनि दोन्ही। विडा दिला सत्त्वगुणी। स्वानुभवें रंगुनी। सुरंग दावी।।६।। बसवलिंग करी पूजा। पूजा पूजक न दिसे दुजा। अवघा सद्गुरुराज। होऊनी ठेला।।७।।

४८. पंचभूतिक सर्व पिंड। मध्यें चैतन्य अखंड।।१।। माझा देव सोवळा पाही। त्यासी वोवळा विचार नाही।।२।। तत्त्व एक आत्मा एक। तेथे भेद नाहीं देख।।३।। गुरुकृपें कळलें वर्म। बसवलिंगा सर्व ब्रह्म।।४।।

४९. देव जडला जाईना अंगा। आतां काय करूं सांगा।।१।। सर्व देवासी एक एक ठाणें। याचे विश्वीं व्यापून राहणें।।२।। वैद्य जोशी पंचाक्षरी। कांहीं केल्या नोहे दुरी।।३।। देव काढाया शहाणे आले। ते मज सारिखेचि झाले।।४।। देवें माझी पुरविली पाटी। तेथून संसारासी काटी।।५।। नेणु पूर्वीचा ऋणी

होता। बसवलिंग सरता पुरता।।६।।

५०. नाहीं इंद्रिय ज्यासी काय त्या बोलणें। अपूर्व करणें देवाजीचें।।१।। मुका कैसा बोले अंध कैसा देखे। बहिरट तो ऐकें कवण्या द्वारें।।२।। नाहीं कर कैसा वाजवील टाळ। कथेसी पांगुळ धावें कैसा।।३।। तरी त्याचा काय आहे हा अन्याय। जया सर्व आहे त्याणें कीजे।।४।। श्रवण असतां नाम ते ऐकावें। नेत्रानें तें पहावें शिवरूप।।५।। मुखे वाचा शुद्ध नामातें उच्चारा। चरण असतां करा तीर्थयात्रा।।६।। असतां हस्त ते वाजवावी टाळी। सदा सर्वकाळी हेंचि ध्यान।।७।। बसवलिंग म्हणे मृत्यू खाय अंतीं। नका काकुलती देहीं करूं।।८।।

५१. करी निंदा द्वेष पापी तो अधर्म। देखोनी समागम सज्जनाचा।।१।। आपण न करी करी त्यास निंदी। मुखानें उच्छेदी नाना शब्दीं।।२।। नाचोनीया गाती वाजविती टाळ। आमुचें कपाळ उठविती।।३।। कोणता तमाशा करा जागरण। तेथें आमुचें मन बैसलेंसे।।४।। वेश्येचें विलासा गायन ते समजे। दुजे कांहीं नुमजे ऐकतांचि।।५।। बसवलिंग म्हणे उष्ट्राचिया पुढें। ठेविलीं नावडे रंभाफळें।।६।।

५२. मुळीं बाप होता ज्ञानी। तेव्हां लागलों ह्या ध्यानीं।।१।। जगीं बाप ऐसा व्हावा। त्याचा वंश मुक्तीस जावा।।२।। पोटीं येतां हरलें पाप। लिंगेश्वर मायबाप।।३।। बसवलिंग पोटींचा बाळ। त्याची पुरविली आळ।।४।।

५३. धन्य भूकैलास धन्य कपिलाधार। शिवराजें साचार वास केला।।१।। काय वर्णूं वाचे तेथींची ही थोरी। धन्य कपिलाधारीं रहाती जे।।२।। सिंधुसरिता सिंधु पुण्यक्षेत्र काशी। पाहाती अहर्निशी सर्वकाळ।।३।। सकळ दोषांचें प्रायश्चित्त घडे। कपिलाधारी पडे जळ माथां।।४।। जीवन्मुक्त आहे शिवराज समाधी। पाहिल्या उपाधी तुटे बंध।।५।। पाषाण तरुवर स्वर्गीचें अमर। धरून अवतार रहाती तेथें।।६।। बसवलिंग म्हणे तारावया जन। वसे आनंदघन ऐक्यरूपीं।।७।।

५४. धन्य कपिलमुनी जेथें वास्तव्य करी। ज्याचा योग सिद्धीस नेला ऐसा हा गिरी।।१।। धन्य कपिलेश्वरी नांदे आमुचा शिवराज। संताचे माहेर प्रगट केले निजगुज।।२।। धन्य कपिलाधार सकळ तीर्थांचा राजा। धन्य

धेनुरूपें प्रगटें भक्ताच्या काजा।।३।। धन्य ती शिवगंगा धन्य कपिलाधार। धन्य नागझरी संगम झाला साचार।।४।। धन्य जया स्थळीं नाना परीचे तरुवर। धन्य पक्षी हरहर नामें गर्जती अपार।।५।। मुंजा महिषासुर सर्पव्याघ्राची खोरी। धन्य तो शिवराज अवघी केली शिवपुरी।।६।। धन्य कपिलाधार सिद्धांची भूमी। समाधिरूपीं नांदे बसवलिंगाचा स्वामी।।७।।

श्री मन्मथजन्माचे अभंग

५५ (१). चिद्गगनाचे सुंदर रूपडे। पाहता रोकडे सुखावलो।।१।। निर्मळ स्फटिक सोज्वळ कांती। दिव्य ती विभूती देहावरी।।२।। केवळ ब्रह्मीचा गाभा तो शंकर। दासाचे सुखकर योगिराज।।३।। बसवलिंग म्हणे राहणे निरंतर। दृष्टीच्या समोर माझ्या देवा।।४।।

५६ (२). महाराष्ट्र देशी झाला हाहा:कार। शिवभक्त थोर भयाभीत।।१।। पाखंड मते वाढली अपार। अनाचार थोर झाला लोकी।।२।। स्वधर्म त्यागूनी परधर्मी रत। झाले ते यथार्थ नसोनिया।।३।। बसवलिंग गुज सांगे निश्चितार्थ। अवतार समर्थ होईल हो।।४।।

५७ (३). उदास शंकर कृपावंत थोर। धाडितो कुमार भूमंडळी।।१।। परपरते पर निरोपिले सार। वस्तू अगोचर निजरूप।।२।। ऐसे तत्त्वज्ञान सांगावया समर्थ। एकचि परमार्थ कुमार तो।।३।। बसवलिंग म्हणे धन्य धन्य कीर्ती। अवतरली मूर्ती महीवरी।।४।।

५८ (४). संताचे ते ब्रीद तारावे सकळा। अंतरी कळवळा उपजे त्यांच्या।।१।। म्हणो ती मागणी जन्म मानवाचा। त्यागूनि मोक्षाचा मोठा मोह।।२।। ऐसे संतजन अवतरती कोठे। सत्पुरुषाचे पेठे ज्याचे घरी।।३।। बसवलिंग म्हणे घेतील अवतार। पाहूनिया आचार कुळाचा तो।।४।।

५९ (५). पवित्र ते कुळ पवित्र तो देह। जेथे सदा राहे शिवभक्ती।।१।। निष्ठावंत भक्त न सेविती अन्य। म्हणोनी होती धन्य जगामाजी।।२।। वीरशैव कुळी निष्ठावंत भाव। नसे अन्य देव पुजावया।।३।। बसवलिंग भावे सांगतसे मात। तेथे विश्वनाथ वास करी।।४।।

६० (६). कळंबीचा स्वामी शिवलिंगदेव। भक्ती अभिनव तयाची ती।।१।। माहेश्वरवंशी पावन चरित्र। सर्वदा पवित्र भस्म भाळी।।२।।

रुद्राक्षाच्या माळा रुळताती गळा। शिवनामसोहळा सर्वकाळ।।३।। बसवलिंग म्हणे स्थळ हे चखोट । पाहोनिया वाट धरिली देवे।।४।।

६१ (७). शिव पतिसेवा करावया तत्पर। सदा हर हर वदे वाचे।।१।। पार्वती माऊली पतिव्रता थोर। वाहिला संसार शिवापायी।।२।। त्रिकाळ पूजेची करी ती तयारी। नाही तो अंतरी आळस कोठे।।३।। बसवलिंग म्हणे पावन भूमिका। रुचली कार्तिका मनोभावे।।४।।

६२ (८). प्रदोष शिवरात्र सोमवार करी। जाय कपिलधारी नित्यनेमे।।१।। गुरुसेवेलागी सदैव तत्पर। बसवलिंगेश्वर गुरुदेव।।२।। निनगुरू ग्राम पितयाचे स्थान। राहे समाधान पतीसह।।३।। बसवलिंग म्हणे शिवतीर्थापायी। वसती अक्षयी दंपती ते।।४।।

६३ (९). माहेर निनगुरू पार्वती मातेचे। तेथे राहती साचे दंपती ते।।१।। तेथोनिया एक योजनाभीतरी। क्षेत्र निर्धारी कपिलधार।।२।। वास असे तेथे सदा योगियाचा। स्वामी अपूर्वाईचा दीनोद्धार।।३।। बसवलिंग म्हणे सदा दीनोद्धार। दीनांचा उद्धार करीतसे।।४।।

६४ (१०). संतांची संगती मातेसी फळली। श्रवणी मिळाली वृत्ती शुद्ध।।१।। शास्त्रचर्चा कथा दैवत चालली। तेथे ऐकियली नवल मात।।२।। निपुत्रालागी गती कोणे काळी नसे। ऐकिले हे ऐसे संतमुखी।।३।। बसवलिंग म्हणे तीही दुःखावली। संताची माऊली अंत:करणे।।४।।

६५ (११). कैसे त्या जीवाचा होईल उद्धार। पुत्र सुकुमार नसता पोटी।।१।। ऐसा सर्वकाळ लागलासे ध्यास। मनी श्री विश्वेश आठवे ती।।२।। गुरुकृपे घरा आला विश्वनाथ। जाणोनी भावार्थ माउलीचा।।३।। बसवलिंग म्हणे स्वामी बसवराज। करावया काज कृपादृष्टी।।४।।

६६ (१२). अष्टावरणा चारी वर्तती अभंग। स्वामी शिवलिंग नित्यनेमे।।१।। गुरुपादपूजा प्रसादाची थोरी। माहेश्वरी धरी अळुमाळ।।२।। प्रसादाच्या वेळी दिला आशीर्वाद। तुझे पोटी स्कंद येईल हो।।३।। बसवलिंग म्हणे ... विश्वास। दृढ चित्ती ध्यास माऊलीच्या।।४।।

६७ (१३). सरले नऊ मास आला माघ मास। पंचमीचा दिवस सोमवार।।१।। ब्याऐंशी अधिक चौदा शते शक। शुक्ल पक्षी ... पूर्ण

तिथी।।२।। पूर्ण अवतारी शिवराज समर्थ। द्वितीय प्रहरात अवतरले।।३।। बसवलिंगालागी झाला हो आनंद। सुखाचा तो कंद आला आता।।४।।

६८ (१४). आनंदल्या नरनारी सकळीक। पाहती श्रीमुख बाळाचे त्या।।१।। बिल्वपत्र भस्म पुष्पांचा वर्षाव। करिती सावेव सकळ जन।।२।। भूमंडळी झाला आनंद सज्जना। संतांचा तो राणा आला म्हणती।।३।। बसवलिंग प्रेमे सांगे निरंतर। पालख साचार घाला तुम्ही।।४।।

६९ (१५). सकळ मंगळ मिळाल्या त्या प्रेमे। पालख आनंदे घालिती हो।।१।। मन्मथ शिवराज ठेवियेले नाम। केले पूर्ण काम जगाचे।।२।। मन्मथ शिवराज शिवयोगी साचार। क्षेत्र कपिलाधार पुण्यभूमी।।३।। बसवलिंग म्हणे दिव्य पुण्यकीर्ती। मिरविली मूर्ती जगामाजी।।४।।

श्रीमन्मथस्वामी समाधीचे अभंग

७० (१). प्रारंभी शिवराज गाईन आवडी। ही ची मज गोडी अखंडित।।१।। अखंडित तया नाही भिन्नाभिन्न। दशदिशा व्यापून राहिलासे।।२।। राहिला तो जैसा एक सूत्रधारी। सर्व चराचरी राहिलासे।।३।। तयामध्ये एक होय नवल परी। गुरूरूप अवतारी झाला असे।।४।। आकारी असता निराकार स्थिती। धन्य जया म्हणती श्रुतिशास्त्रे।।५।। जया ज्ञानियाचे ऐकावे लक्षण। जया नाही येणे गर्भवासु।।६।। गर्भवास चुके जयाचे स्मरणे। बसवलिंग म्हणे ऐसे संत।।७।।

७१ (२). ज्ञानिया तो ऐसा देहभासु नाही। सुखदुःख काही नातळे जो।।१।। भक्ती आणि वैराग्य तिसरे ते ज्ञान। जया अंगी पूर्ण ठसावले।।२।। सर्वांभूती दया जाणोनी भजन। हेचि पै लक्षण भक्तीचे की।।३।। वैराग्य ते कैसे सर्वाविषयी त्याग। नाही जया पांग आणिकाचा।।४।। सर्व इंद्रियांसी ब्रह्मरूप केले। मन बुडविले ब्रह्मानंदी।।५।। नावडेची जया लौकिकाचा मान। सदा वसवी मन एकांताचे।।६।। स्त्रीपुत्रधन सांडोनिया मन। वसवावे अरण्य हेची वाटे।।७।। पूजा पुनःस्कार दांभिक विचार। सांडोनि डोंगर वसवावे।।८।। काम क्रोध मद मत्सर हे चारी। असता डोंगरी न चले त्यांचे।।९।। संसारी असता त्याग नोहे त्याचा। म्हणोनी अरण्याचा लोभ

थोर।।१०।। स्त्रियेसी पाहता काम उपजेल। डोंगरी पाहील कवणाते।।११।। जनी द्वेष होता उपजेल क्रोध। अरण्यी उपाधी कोण करी।।१२।। स्त्रीपुत्रधन अंगी तेणे मद। डोंगरी विदग्ध पाषाण ते।।१३।। जया दुजियाचा मत्सर उपजे मनी। असता त्या वनी दुजा कैचा।।१४।। न त्यागिता त्याग झाला चहूचा। म्हणोनी अरण्याचे महासुख।।१५।। बसवलिंग म्हणे वैराग्याची प्रौढी। शिवराजे ही गोडी जाणीतले।।१६।।

७२ (३). शिवराज सद्गुरू पूर्ण अवतारी। काय वर्णू थोरी वर्णवेना।।१।। जया तया गुणी संपूर्णची दिसे। काही एक न दिसे ऐसे नाही।।२।। बाळपणी दांडू डफाचा धुधु:कार। जिंतिले शाहीर नेणो किती।।३।। पुरुषार्थाची विद्या दाखविली जगी। करूनिया त्यागी तेही अंती।।४।। ब्रह्मज्ञानी विद्या पाहाता अगाध। बोलणे प्रसिद्ध प्रगट रूप।।५।। निश्चयात्मक ज्ञान श्रुतिशास्त्रादिकी। तेची तया मुखी उद्भवले।।६।। त्या ज्ञानाचे सुख भोगावे अंतरी। म्हणूनी डोंगरी वास केला।।७।। शिवकडा पर्वत म्हणती ज्ञानगिरी। यात्रा मार्गेशिरी भरती तेथे।।८।। संत साधुजन देखोनी विस्मित। अवतारी मन्मथ सत्य होय।।९।। बस्वलिंग म्हणे ब्रह्म अवतरले। पारणे फेडिले लोचनाचे।।१०।।

७३ (४). ब्रह्मस्थिती पूर्ण शिवराजाचे आंगी। वर्ततसे जगी जगरूप।।१।। शरीराचे आयुष्य पूर्णत्वासी आले। ऐसे जाणवले शिवराजासी।।२।। कळंबीचा भावो संपूर्ण घेतला। यात्रा नेम केला आषाढीसी।।३।। क्षेमालिंगन देऊनी सकळासी। शिवराज तुम्हासी जवळी असे।।४।। बस्वलिंग म्हणे दृढ भाव ज्याचा। स्वरूपी मिळूनी त्याचा ऐक्य झाला।।५।।

७४ (५). जो जो करी माझे सर्वदा चिंतन। त्या असो कल्याण बोलियले।।१।। कुर्वाळूनी त्याची पूर्ण केली इच्छा। धेनू जैसी वत्सा सांभाळीत।।२।। ऐशा परी आज्ञा देऊनी सकळासी। आले देहान्तासी कपिलेश्वरी।।३।। जाणोनिया स्थळ बहुतकाळाचे। सिंहशार्दुळाचे कोकस्थान।।४।। गीतेमाजी कृष्णे सांगितला भाव। सिद्धांमाजी राव कपिलमुनी।।५।। त्या कपिलमुनीचे विश्रांतीचे स्थळ। साधिला केवळ योग जेथे।।६।। द्वापारी पांडवी केला रहिवास। पंचकुंडी नाश होती पापे।।७।। उत्तरदिशेहून आली भागीरथी। पूर्वदिशा अंती शिवगंगा।।८।। भागीरथी गंगा

नागझरी नाम। झालासे संगम पंचकुंडी।।९।। चहुयुगी प्रसिद्ध स्थळाचे महिमान। जाणती ही खूण योगिराज।।१०।। साठी वर्षा कपिला होऊनि प्रगट । धन्य जया भेटे भाग्यवंता।।११।। बस्वलिंग म्हणे शिवराजे या खुणा। जाणोनिया स्थाना वास केला।।१२।।

७५ (६). वास केला जेथे व्याघ्राचे राहाणी। भयानक वनी कोण राहे।।१।। खेचर दैवत वेष्टित कपिलाधार। मुंजा म्हैसासूर सर्पादिकी।।२।। नानापरीचे वृक्ष दारुण विषारी। स्पर्श होता गांदी येती अंगा।।३।। गुप्तरूपे वल्ली नांदती अपार। धन्य कपिलाधार वर्णवेना।।४।। ऐसे उग्र स्थळ कोण येथे राहे। प्राणिमात्र होय भयाभीत।।५।। तया उग्रस्थळी ज्ञानिया आवडी। वैराग्य धडाडी ज्याचे आंगी।।६।। काम क्रोध मद मत्सरादी सर्व। ब्रह्मरूप झाले ज्याचे आंगी।।७।। कल्पना निमाली इंद्रिये गळाली। ब्रह्मरूप झाली ज्याचे आंगी।।८।। कदा काळी नये इंद्रियाच्या गावा। आहे नाही ठावा नाठवेची।।९।। दग्धपटन्याय आकारी तो दिसे। निर्विकारी वसे स्थिती ज्याची।।१०।। श्वानओकापरी जाणूनी संसार। वसवी डोंगर ज्ञानिया तो।।११।। ऐशापरी स्थिती जयाचिया आंगी। तोचि एक योगी वनवासी।।१२।। हेचि स्थिती आंगी शिवरायाच्या देही। कपिलेश्वरी पाही वास केला।।१३।। बस्वलिंग म्हणे धन्य तो शिवराज। कपिलेश्वरी गुज प्रगट केले।।१४।।

७६ (७). देहीच असता विदेह्याची स्थिती। देहान्तासी मुक्ती ऐसी नाही।।१।। जळी कुंभ बुडे अंतर्बाह्य पाणी। ऐशापरी प्राणी देही मुक्ती।।२।। परी या शिवराजे केली नवलपरी। देहान्ती चतुरी परिसावी।।३।। जाणवले आम्हा झाली पूर्ण विधी। शिवराजे समाधी आरंभिली।।४।। सदाशिव रामानंद दोघेजण। होते त्यासी खूण सांगितली।।५।। न करावी प्रसिद्ध अंतरीची मातु। येथे देह अंतु होऊ पाहे।।६।। कपिलेश्वरी करू देहविसर्जन। आवरूनि मन स्थिर करा।।७।। करविली भूमिका रचवूनि पाषाण। येथेची आसन आमुचे करा।।८।। ऐकोनिया दोघे विस्मित राहिले। रामानंदी केले प्रश्नोत्तरे।।९।। म्हणे धन्य स्वामी नवलावो ऐकिला। वणवा लागला उदकामाजी।।१०।। ब्रह्मज्ञान चर्चा सदा नित्य बोले। त्यामुखे ऐकिले नवल चोज।।११।। बहुताचा आश्रयो पुरविसी वासना। कैसे या वचना

बोलवले।।१२।। सत्य रामानंदा तेचि होऊ पाहे। स्फुरतसे बाहो ब्रह्मभेटी।।१३।। तरी शिष्या न का सांगावी ही मातु। कपिलेश्वरी अंतु शिवराजासी।।१४।। अंतकाळी होय सर्वांसी दर्शन। कीजे समाधान सर्वांविशी।।१५।। पुत्र महालिंग स्नेहाचे मंडन। समस्त मिळोन तेही येती।।१६।। शिवकथा कीर्तन संत साधुजन। पाचारून होणे समाधिस्थ।।१७।। लहानथोर येती अवघे पाहावया। देखताची तया गुप्त व्हावे।।१८।। बस्वलिंग म्हणे शिवराज समर्थ। आवडीचे अर्थ पुरवावे।।१९।।

७७ (८). सद्गुरू शिवराज बोलिले वचन। ऐका सावधान योगस्थिती।।१।। आम्हा योगियासी नसावा लौकिक। एकान्तीचे सुख भोगू सदा।।२।। त्याची सुखालागी वसविला डोंगर। पुन्हा तो विचार कैसा किजे।।३।। देहा अंत कैसा होतो या ज्ञानिया। म्हणोनी पाहावया येती सर्व।।४।। जितुक्याची आकृती तितुक्याची प्रकृती। नाही एक स्थिती अवघ्याची।।५।। बहुताच्या मनासारिखे मन धावे। कैसे हे साधावे योगतत्त्व।।६।। असती समस्त बोलती अनंग। तेणे होय भंग चित्तासी या।।७।। म्हणोनिया संग नसावा कोणाचा। एकाएकी साचा आत्मरूपी।।८।। सर्वसंगत्याग व्यासपुत्रे केला। तरीच सरता झाला जनक ज्ञानी।।९।। आणिक एक तुम्हा सांगेन वचन। ज्ञानियासी हानी की मूर्खा लाभ।।१०।। अंतकाळी होय दोघासी ही गती। सावधान चित्ती असा आता।।११।। मूर्खा लाभ ऐसा अजामेळ पापी। मांगणीच्या रूपे भाळलासे।।१२।। समंध घडला जातीच्या संगती। चारी पुत्र होती व्यभिच्यारे।।१३।। समंध घडला जातीचा ब्राह्मण। जन्म पुत्रा नामे ठेवियेली।।१४।। नारायण हरी विठ्ठल गोविंदा। आठवती शब्दा अंतकाळी।।१५।। तेणेची तोषोन वैकुंठीचा राणा। म्हणे माझीया स्मरणा येणे केले।।१६।। घालूनी विमानी आणिले वैकुंठा। तारिले पापीष्ठा अजामेळा।।१७।। मूर्खा झाला लाभ ज्ञानियासी हानी। सावधान मनी तेही ऐका।।१८।। जडभरत ज्ञानी असता संपन्न। वनवासी हरण पोसियेले।।१९।। बहुतापरी स्नेह ठेविला तयावरी। दुग्ध तृण शिरी वाहातसे।।२०।। नाठवी स्मरण आणिक देवाचे। ध्यानी मनी त्याचे रूप दिसे।।२१।। करू नेदी काही ज्ञानचर्चा पठण। गोविले मन जडभरताचे।।२२।। वेळेचिया वेळी तृण पाणी

द्यावे। भजन कैसे व्हावे विचारा हो।।२३।। त्याची करिता तृप्ती भजनवेळा जाय। घडे अंतराय संगामुळे।।२४।। अंतकाळी तया तेचि आठवले। मृगदेह झाले जडभरताचे।।२५।। ज्ञानियासी हानी जाली संगामुळे। म्हणोनि सकळ त्यजावी ते।।२६।। तरी शिष्या सनकादिका सांगावे हे मातु। आवरूनि चित्ता तू राहावे उगे।।२७।। जन्मवरी त्याचा स्नेह माझे ठाई। केवी त्या समयी उगे राहाती।।२८।। करिती आक्रोश आपल्या प्राणाचा। कैसा समाधीचा योग साधे।।२९।। पुत्र महालिंग स्नेहची दिधले। स्वप्नीही देखिले नाही दुःख।।३०।। त्यासी एकाएकी देखता हे चिन्ह। मजआधी प्राण घात करी।।३१।। होय गजबज देखता समाधी। आंतरयोगसिद्धी कैसी घडे।।३२।। आवघे तयावेळी करिती कोल्हाळ। मन राहे निश्चळ कैशापरी।।३३।। यालागी ते दुरी असताची बरी। आलो कपिलेश्वरी सांडोनिया।।३४।। आणिक एक गुज सांगतो प्रगट । आम्ही ब्रह्मनिष्ठ सर्वातीत।।३५।। आम्हा कैचा पुत्र कैची माया शिष्य। ब्रह्म उपदेश कोण करी।।३६।। गुरुशिष्य नाम जाणावया जगी। पाहाता वस्तुभागी दोन्ही नाही।।३७।। दोन्ही हरपले हळदीचुनान्याये। तैसे ब्रह्मी आहे ऐक्य होता।।३८।। सोऽहं ब्रह्म आम्ही नाही आपपर। लटिका आकार धरला होता।।३९।। ऐसे तयेवेळी बोलिले वचन। निर्धुतची ज्ञान गोष्टी सांगे।।४०।। बसवलिंग म्हणे शिवराजाची कीर्ती। सांगावया किती वाणी माझी।।४१।।

७८ (९). मंगळ बुधी दिन विधी नेम सारून। केले विवरण ज्ञानेश्वरी।।१।। धन्य ज्ञानदेव कृष्णाचा अवतार। बोलिले सादर प्रगट ब्रह्म।।२।। युद्धासमयी

हानेगाव-प्रतीत ८ व्या अभंगातील १२ ते १७ ही कडवी पुढीलप्रमाणे आहेत:-

मूर्खा लाभ ऐसा श्वेतकेतु पापी। वेश्येचिया रूपी भाळलासे ।।१२।।
रात्रंदिन कामकर्दमी लोळत । सदा आचरत पापकर्मे ।।१३।।
वेश्येचिया साठी आणिता सुमन । केले त्या शासन राजदूते ।।१४।।
ग्रंथीतील पुष्पे पडले गळूनी । शिवार्पित म्हणूनी वाचे बोले ।।१५।।
तेणेचि तोषला कैलासीचा राणा । म्हणे माझ्या स्मरणा येणे केले ।।१६।।
घालूनी विमाना कैलासा आणिले । निजपदी स्थापिले तया श्वेता ।।१७।।

दोघा नव्हती आराणुक। म्हणोनिया निःशंक बोलियेला।।३।। ज्ञानेश्वर नामे अवतार घेतला। गीता अर्थ केला प्रगट जगी।।४।। अठराही अध्यायाचे केले विवरण। निश्चयाचे ज्ञान बोलतसे।।५।। विवेकसिंधु पंचकर्णादी सकळ। बोलत प्रांजळ ज्ञानचर्चा।।६।। भागवती काही गुप्त होत्या गोष्टी। त्याही प्रगट दृष्टी करोनी बोले।।७।। समाधीच्या खुणा अंतरी ज्या होत्या। प्रगटरूप त्या त्या बोलियले।।८।। आपणासी उपकार केला होता ज्याने। ते ते संत मनी आठवीले।।९।। म्हणती आम्हा थोर संताचे वैभव। तयापरता देव दुजा नाही।।१०।। मुकुंदराज योगी ज्ञानिया संपन्न। राखिला अभिमान दर्शनाचा।।११।। निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताई। बहिणी मीराबाई चांगदेव।।१२।। नामा विष्णुदास कबीर सावता। मृत्युंजये पाहाता आत्मज्ञानी।।१३।। एका जनार्दनी तुका कुणबी जाण। कागद रक्षण जळी ज्याचे।।१४।। खेचर विसोबा चोखामेळा बंका नागा। ज्याने धरोनी वाघा आणीयले।।१५।। वैश्य तुळाधार नरहरी सोनार। गोरा तो कुंभार रोहिदास।।१६।। कानुपात्रा भानुदास स्नेहाळ। जया तोडूनि माळ विठ्ठल देत।।१७।। ऐसे परी संत वर्णावे ते किती। व्यापक विभूती परमात्म्याच्या।।१८।। तितुक्याचे चरण हृदयी आठवीले। लोटांगण घातले भूमीवरी।।१९।। आमुच्या वंशावळी नागोबाचे चरणी। मुळी अधिष्ठानी तोचि एक।।२०।। शिष्याकरवी ज्याने चालविली भिंती। मानुरात वस्ती अधिष्ठान।।२१।। सरकाळ्याचे गाडे मुंगीचिये घोडे। आणविले धोंडे वडवाळेसी।।२२।। प्रत्यक्षची आता गणाचिये रूपे। बोलिजे प्रतापे तेचि होय।।२३।। ऐसा हा प्रताप माझ्या नागोबाचा। मज मन्मथाचा साहाकारी।।२४।। पुरविली आळी केले समाधान। दासाचे रक्षण तेचि असे।।२५।। दीनोद्धारस्वामी सद्गुरू समर्थ। मन्मथ अंकित त्याचे ठायी।।२६।। अवघ्यासी प्रणिपात करोनि अंतरी। बुधी दिनरात्री कीर्तन केले।।२७।। कैशापरी अंतकाळ साधियेला। सावध हृदयाला करोनी ऐका।।२८।। बस्वलिंग म्हणे शिवराजे समाधी। घेतली ती विधी सावध ऐका।।२९।।

७९ (१०). प्रातःकाळ झाला उठले झडकरी। स्नान कपिलेश्वरी आरंभिले।।१।। शिवपूजा अर्चन विधिनेम सारोन। तेथेचि स्तवन

आरंभिले।।२।। धन्य तुझी कीर्ती पाहता अगम्य। त्रिनद्या संगम झाला असे।।३।। कपिलधारी स्थळी जया स्नान घडे। कोटी यज्ञ जोडे पुण्य तया।।४।। पुत्र कलत्र धन ब्रह्महत्यादिक। हरती निमिष एक न लागता।।५।। करोनिया स्नान आरंभिली स्तुती। धन्य तुझी कीर्ती तीर्थामाजी।।६।।

श्लोक :

पृथ्वीवरी सुंदर भूमिका जे। कपिलेश्वरी तीर्थ कपील गाजे।।
स्नाने करी पूर्ण इच्छा नराची। ही शिवगंगा आली हराची।।१।।
सामर्थ्य तूझे बहुसाल आसे। चिरंजीव पर्वत वृक्ष बैसे।।
आम्हा तुम्हा साम्य कल्याण व्हावे। साधुजनी हे स्थळ आदरावे।।२।।
नसो मूळ माया मूळ शक्ती कपीले। अधो उन्मनी अर्धमात्र कपीले।।
भावे तुझा ओघ घेती स्वदेही। पुत्री कलत्री नांदे स्वदेही।।३।।
धन संपती संतती ज्यास व्हावे। मज मन्मथा हे वाक्य घ्यावे।।
धरा कार्तिकी फाल्गुनी वारी त्याची। त्वरे पूर्ण इच्छा करीतो मनाची।।४।।
वंदोनिया ऐसे कपिलेश्वरासी। शिवराज शीघ्र आले स्वस्थळासी।।
बसवेश्वर राजा निज स्नेहदानी। ध्वजा लावियेली मुनिराज ध्यानी।।५।।

८० (११). शिवराजे आपण सारूनि भोजन। प्रहर एक दिन क्रमिला असे।।१।। उभय वर्गी भोजन केले तया काळी। सन्निध जवळी होते दोघे।।२।। सदानंद रामानंद हे दोघे जण। बैसले येऊन पाहाती चिन्ह।।३।। योगमुद्रा अंगी प्रगटली ज्योती। देह्याची आकृती पालटली।।४।। पालटली वृत्ती बोलती स्वत:सिद्ध। ऐका रे सावध होऊनिया।।५।। बहुत काळ झाला ऐकता वचन। ते करा जतन हृदयामाजी।।६।। जयेवेळी तुम्ही आठवाल शब्द। तयेवेळी सन्निध आहे तुम्हा।।७।। नाही दुरी गेलो फोडोनी आकाश। जो जो चिंती त्यास सन्निध आहे।।८।। येणे जाणे राहाणे खुंटली त्रिपुटी। यावे जावे गोष्टी वावुगाचि।।९।। वैकुंठ कैलास सप्तपुरी नाम। ज्ञानियाते मन न गुंतेचि।।१०।। पुण्य असता प्राप्त सरल्या अधोपात। अज्ञानाची मात यावे जावे।।११।। आम्हा येणे नाही जाणे कोण्या ठायी। स्वत:सिद्ध पाही सर्वी असो।।१२।। जो जो करी माझे सर्वदा चिंतन। मी तयालागून जवळी असे।।१३।। सद्गुरूचे मार्गी आहेत जे जन। त्या असो कल्याण

सर्वकाळी।।१४।। न सांडा रे तुम्ही आवडीचे अर्थ। मेढिया समर्थ आहे माझा।।१५।। आवडीच्या दासा सदा वास पाहे। ऐसा माझा आहे स्वामीराज।।१६।। दृढ भक्ती करा प्रल्हादाचे परी। अग्नी विष हरी मानियेले।।१७।। पर्वतपात पाणी शस्त्र हाणीतला। परी नाही सोडियला नामघोष।।१८।। ऐसी दृढ निष्ठा जाणोनिया देवो। निर्जीव काष्ठी पाहा वो प्रगटला।।१९।। येणेपरी असे दृढ ज्याचे मनी। तारी तत्क्षणी स्वामी माझा।।२०।। ऐशापरी तेथे बोलिले वचन। व्हावे अवघे जन ब्रह्मरूप।।२१।। मूळबंध आसनी बैसले शिवराज। समाधीचे गुज आरंभिले।।२२।। बस्वलिंग स्वामी कृपेचा सागर। महिमा अपार वर्णवेना।।२३।।

८१ (१२). आजानवृक्षातळी समभाग भूमिका। आसनविधी देखा आरंभिली।।१।। सन्मुख अश्वथा मुंजबंधन केले। ब्रह्मचर्य दिधले सदाशिवा।।२।। रामानंदा ज्ञाननिरूपण केले । नाही ठेवियले गुज काही।।३।। काय हा सांगावा आगळा प्रताप। किती या अमूप माप करू।।४।। समभाग भूमिका मूळबंधी आसन। एकाग्र हे मन करूनि ऐका।।५।। अंतःकर्णी स्फूर्ती नुरेची बाहेरी। प्रवेश अंतरी मांडियेला।।६।। स्थिरावले नेत्र प्राण पांगुळला। देहाचा राहिला चलनभाव।।७।। हस्तपादादिक अचंचळ झाले। श्वासही राहिले नासाग्राचे।।८।। न हाले न बोले झाली तटस्थता। समाधी अवस्था शीघ्र आली।।९।। ब्रह्मांडभुवनी आत्मा स्थिरावला। त्रिकुटी राहिला अचंचळ।।१०।। याहीपरता जव जाय उल्लंघूनी। तव त्या दोघांनी शब्द केला।।११।। करिती आक्रोश आपल्या प्राणाचा। शंखध्वनी वाचा फोडियला।।१२।। अधोमुखी रुदन करिती थोर शब्दे। पर्वत तेणे नादे गर्जताती।।१३।। तो शब्द ऐकता चेव आला मना। राहिली भावना समाधीची।।१४।। जवळी जाता घाला झाला संगामुळे। दोन्ही नेत्रकमळे उघडली।।१५।। आरक्त लोचने करूनी पाहती। अधोमुख रुदती दोघेजण।।१६।। बोलिले वचन क्रोधे तयालागी। का रे माझ्या संगी राहिलेती।।१७।। सांडोनी लौकिक आलो एकान्तासी। मागुती आम्हासी तैसे झाले।।१८।। का रे स्फुंद केला माझीया देहाचा। झाला जडभरताचा न्याय आम्हा।।१९।। त्याचे संगे नसते मृगदेह आता। तरी का हरण होता ज्ञानिया

तो।।२०।। ज्ञानियासी घाला होय संगेकरून। पावती बंधन संगामुळे।।२१।। याचा किजे त्याग आठवले मनी। गुप्तरूपे करूनि कीजे आता।।२२।। ऐक रामानंदा बोलिले वचन। का केले रुदन सत्य सांगा।।२३।। तव रामानंदे चरणी ठेविला माथा। धन्य स्वामी आता पुरले कोड।।२४।। मागी अवसरी सांगितले आम्हा। तेचि काय तुम्हा झाले असे।।२५।। ऐसे वाटे मना देखोनी विछीन्न। शरीराचे भान नव्हते तुम्हा।।२६।। आम्ही काय जाणो ठायीचे अज्ञान। ज्याचे तोचि जाणे अंतरगुज।।२७।। बसवलिंग म्हणे धन्य माझा स्वामी। कैवल्याचा धामी वास ज्याचा।।२८।।

८२ (१३). बोलती शिवराज ऐक रामानंदा। केव्हा त्या आनंदा देखेन मी।।१।। हे मज न कळे करणे देवाचे। बोलताती ते साचे घडे केवी।।२।। कैसे तुम्हा वाटे शरीराचे विछीन्न। दिसता लक्षण देहान्ताचे।।३।। काय झालो वृद्ध दिसतो म्हातारा। वोखटे शरीरा काय इच्छा।।४।। उठता न उठवे की झालो अशक्त। कैसी तुम्हा मात बोलवली।।५।। काय माझे नेत्र पाहता झाले मंद। श्रवणद्वारी शब्द नायकती।।६।। की वाहे रसना झालीसे बोबडी। दंतपंक्ती गाठी पडली माझी।।७।। काय हे मस्तक हाले वेळोवेळा। कैसी मरणकळा आली मज।।८।। काय झाले दुःख माझिया शरीरा। कैसे ह्या उत्तरा बोलवले।।९।। नानापरी तुम्ही का केले रुदन। आम्ही आंतरध्यान करीत होतो।।१०।। मज कैचा अंत आताची येवेळी। होय कोणे काळी देव जाणे।।११।। कुर्वाळूनि त्यासी दिधला निश्चयार्थ। आहे रे मन्मथ नाही गेला।।१२।। ऐसे शिवराजे सांगता वचन। भरवसा संपूर्ण जाला दोघा।।१३।। आनंदले मनी ऐकूनिया गोष्टी। पुन्हा झाली सृष्टी ऐसे वाटे।।१४।। हारपले होते ठेवणे बहुताचे। ते सापडले आमचे थोर भाग्य।।१५।। ऐसे परी हित मानिती आपुले। तव दोघासी बोलले शिवराज।।१६।। सदाशिवा जाई मांजरसुंब्या गावी। साखर आणावी भक्षावया।।१७।। अवश्य म्हणोनी निघाला झडकरी। सुखरूप अंतरी होऊनिया।।१८।। तेव्हा त्या रामानंदा सांगती उत्तर। तू जाई सत्वर पंचकुंडा।।१९।। पाचही कुंडांचे आणावे जीवन। ऐसे माझ्या मने घेतले असे।।२०।। समर्थाची आज्ञा मानूनी अंतरी। निघाला झडकरी रामानंद।।२१।। तोडियला संग दोघाही जनाचा। केला

नि:संगाचा लोभ थोर।।२२।। दत्तात्रये जैसा पाहियेला गुण। कुमारी कंकण केला गुरू।।२३।। तयापरी मना केले एकनिष्ठ। जाहाले प्रविष्ट परब्रह्मी।।२४।। मूळबंध आसनी बैसले सावध। इंद्रियासी बंधन देऊनिया।।२५।। मनबुद्ध्यादिक अंत:कर्णी स्फूर्ती। स्थिरावली पाती लोचनाची।।२६।। परा हे पश्यंती मध्यमा वैखरी। बुडाल्या ह्या चारी वाचा जेथे।।२७।। पिंड आणि ब्रह्मांड वेगळे होऊनि। ज्ञप्तीमात्र भरूनि गेला आत्मा।।२८।। लवण जैसे जळी विरोनिया जाय। तैसे ब्रह्मी होय ब्रह्मरूप।।२९।। ऐशापरी तेथे पावले समाधी। तुटली उपाधी शरीराची।।३०।। दिसे कैसे रूप बैसले ध्यानस्थ। असे साक्षभूत शरीराकृती।।३१।। झडकरी दोघे आले त्या ठायासी। पाहती स्वरूपासी न्याहाळूनी।।३२।। म्हणती पुनरावृत्ती तैसेची झाले। हस्ताते पाहिले धरूनिया।।३३।। अचेतन हस्त पडती अंगावरी। ऐसे दृश्य प्रहरी वर्तलेसे।।३४।। दूर करूनि आम्हा साधियले गुज। गेला शिवराज टाकूनिया।।३५।। हृदयी आलिंगन देती त्या रूपासी। आता कधी भेटसी मायबापा।।३६।। जगलोक दुजा जाला आम्हालागी। गेले पूर्ण योगी शिवराज।।३७।। न कळत कोणा गुप्त घात केला। देहान्त साधिला एकाएकी।।३८।। आज भवजळी बुडाले ते तारू। लोपला दिनकरू तैसे झाले।।३९।। आज चरणांकिती पोरटीय जाले। सांडोनिया गेले शिवराज।।४०।। ऐशापरी तेथे करिती रुदन। मिळाले बहुजन कपिलेश्वरी।।४१।। मन्मथासारिखे गेले रे निधान। ही कीर्ती ऐकून बहुत आले।।४२।। विधिमार्ग केला समाधीचा सांग। विभूती बेले सर्वांग झाकियले।।४३।। स्वजाती मिळोनी करिती जैजैकार। शंख घंटा कर वाजवोनि।।४४।। फाल्गुनमास चतुर्थी शुक्लपक्षी जाण। उत्तरायण साधून देहान्तासी।।४५।। गुरुवारी माध्यानी अमृतघटिका। समाधिपीठिका साधियेली।।४६।। शिवराजे समाधी घेतलिया वरी। धन्य कपिलेश्वरी नांदतसे।।४७।। नांदतुसे आम्हा सकळाचा विसावा। धणीवरी घ्यावा लाभ तया।।४८।। आंतरी म्हणो तरी रीता ठाव कोण। आंतरबाह्य पूर्ण शिवराज।।४९।। बस्वलिंग म्हणे माझ्या अंतर्यामी। नांदतसे स्वामी शिवराज।।५०।।

८३ (१४). धन्य भूकैलास धन्य कपिलाधार। शिवराजे साकार वास केला।।१।। काय वाणू वाचे तेथीची ही थोरी। धन्य कपिलाधारी नाहाती

जन।।२।। सिंधु सरिता सिद्धी पुण्यक्षेत्र काशी। राहाती अहर्निशी तयाठायी।।३।। सकळ दोषासी प्रायश्चित्त घडे। कपिलाधारी पडे जळ माथा।।४।। जीवन्मुक्त होती शिवराज समाधी। पाहिल्या उपाधी तुटे बंध।।५।। पाषाण तरुवर स्वर्गीचे अमर। धरोनी अवतार राहाती तेथे।।६।। बस्वलिंग म्हणे तारावया जन। वसे आनंदघन ऐक्यरूप।।७।।

।। इति श्री मन्मथ आयाचे समाधिसुख बस्वलिंगकृत संपूर्णमस्तु।।

हानेगाव-प्रतीत ९ वा अभंग पुढीलप्रमाणे आहे—
मंगळ बुद्धी दीन विधिनेम सारोन। केली विवरण शिवगीता ।।१।।
सीतेच्या वियोगे राम हिंडे वनी। दुःखित होऊनी रात्रंदिन ।।२।।
कुंभोद्भव मुनी भेटुनी त्या क्षणी। विरजा दीक्षा त्यांनी दीधलीसे ।।३।।
शिवसहस्र नाम चातुर्मास जप। करिता साक्षप शिव झाला ।।४।।
अष्टादशाध्याय शिवगीता उपदेश। केला विरूपाक्षे रामालागी ।।५।।
माया मोहजाळ निरसूनी सकळ। झालासे प्रांजळ सीतापती ।।६।।
ऐशी ही शिवगीता कैवल्यदायिनी। पापविनाशिनी साधकासी ।।७।।
शिवगीतेचे सुख मन्मथे घेतले। प्रेमे आलिंगिले पुस्तकासी ।।८।।
अठराही अध्याय केले विवरण। निश्चयाचे ज्ञान बोलियले ।।९।।
बसववचन पंचीकर्णादी सकळ। बोलता प्रांजळ ज्ञानचर्चा ।।१०।।
शिवपुराणी काही गुप्त होत्या गोष्टी। त्याही प्रगट दृष्टी करूनी बोले ।।११।।
समाधीच्या खुणा अंतरी ज्या होत्या। प्रकटरूप त्या त्या बोलियले ।।१२।।
गुप्त जो का होता परमरहस्य ग्रंथ। प्रसिद्ध जगात केले स्वामी ।।१३।।
अनुभवानंद नामे दुजा ग्रंथ। बोलिले वेदान्त सर्व सार ।।१४।।
आपणा उपकार केला होता ज्यानी। ते ते निजमनी आठवले ।।१५।।
म्हणती आम्हा थोर संताचे वैभव। तयापरते देव दुजा नाही ।।१६।।
सिद्धराम योगी ज्ञानिया संपन्न। राखिला अभिमान दर्शनाचा ।।१७।।
प्रभुराज आणि बसव चन्नबसव। वीरमाची देव मंचणार्य ।।१८।।
पिटेव्वा लिंबेव्वा वैज्यांबा नागंबा। चोळेव्वा गंगांबा महादेवी ।।१९।।
ऐदक्की मारय्या किन्नरी ब्रह्मय्या। एकांतरामय्या मुग्धसंग ।।२०।।
मोळिगे मारय्या चांभार हरळय्या। कुंभार गुंडय्या मरुळसिद्ध ।।२१।।
ऐशापरी संत वाखाणावे किती। व्यापक विभूती परमात्म्याची ।।२२।।

(पुढील पृष्ठावर)

८४. ॐकारस्वरूपा अविनाशरूपा। विधिजनकाचिया बापा शंभुराया।।१।। तुजपासोनिया अवघे चराचर। जहाला तो आकार पृथिवीचा।।२।। मायेच्या भ्रांतीने भ्रमले सकळ। करिती गोंधळ जगदंबेचा।।३।। ऐसे जे पामर तुज विसरती। चौऱ्याऐंशीची पडे गुंती तेणे।।४।। पाहूनिया सर्व शरण बसवलिंग। धरिलासे लाग तुझा मनी।।५।।

८५. मायबाप सखया गौरीवरा। वेगी पूर्ण करा मनोरथ।।१।। तुझिया चरणा पाहीन डोळेभरी। लागली अंतरी प्रीती हेचि।।२।। तुझिया नामाचा करीन नामघोष। हेचि माझी आस पुरवी देवा।।३।। शेवटीचे वेळी लागो तुझा छंद। जेणे भवबंध तुटे माझा।।४।। बसवलिंग बोले ऐका चंद्रमौळी। देवा माझी आळी पुरवावी।।५।।

८६. बहुत दिवस नाही भेट झाली। का सांड माझी केली शंभुराया।।१।। फार दिवस झाले तुझी वाट पाहता। शिणले हे तत्त्वता नयन माझे।।२।। ऐसा काय तुझा अपराध केला। म्हणोन अबोला धरिलासी।।३।। बसवलिंग म्हणे घेतलीसे आळी। भेट चंद्रमौळी लवकरी।।४।।

८७. भोळ्या चक्रवर्ती कैलासाच्या नाथा। पार्वतीच्या कांता शंभुराया।।१।। अगाध तुझी कीर्ती वर्णिती पुराणे। शिणला सहस्रफणी तुज ध्याता।।२।। तेथे माझी मती मानवाची किती। वर्णू तुजप्रती शंभुराया।।३।। तुझी स्तुतीच असे

(मागील पृष्ठावरून)

तितक्याचे चरण हृदयी आठविले। लोटांगण घातले भूमीवरी ।।२३।।
आमुच्या वंशावळी नागुबाचे चरणी। मुळी अधिष्ठानी तोचि एक।।२४।।
शिष्याकरवी ज्यानी चालविला रथ। मानुरात स्वस्थ अधिष्ठान।।२५।।
सरकाळ्याचे गाडे मुंगीयाचे घोडे। आणविले धोंडे वडवाळेसी।।२६।।
प्रत्यक्षचि आता गणाचिये रूपे। बोलिजे प्रतापे तेचि होय।।२७।।
ऐसा प्रताप माझ्या नागोबाचा। मज मन्मथाचा साहाकारी।।२८।।
पुरविली आळी केले समाधान। दासासि रक्षण तोचि असे।।२९।।
दीनोद्धारस्वामी सद्गुरु समर्थ। मन्मथ अंकित त्याचे पाई।।३०।।
अवघ्यासी प्रणिपात करूनि अंतरी। बुधी दिन रात्री कीर्तन केले।।३१।।
कैशापरी अंतकाळ साधियेला। सावध हृदयाला करूनी ऐका।।३२।।
बसवलिंग म्हणे शिवराज समाधी। घेतली ते विधी सावध ऐका।।३३।।

बोलवीत। पुढे हे निमित्त बसवलिंग।।४।।

८८. कपिलधार क्षेत्र अती पुरातन। तेथे जगजीवन वास करी।।१।। वास करी तेथे बाबा दीनोद्धार। तपस्वी तो थोर महाराज।।२।। महाराज ऐसा मन्मथ योगेश्वर। शिवयोगा आधार शिवराज।।३।। बसवलिंग म्हणे महायोगिराज। करावया काज मुमुक्षूचे।।४।।

८९. मन्मथ शिवराजे केली नवलपरी। केले कपिलाधारी परमरहस्य।।१।। परमरहस्य ग्रंथ ग्रंथराज थोर। शिवयोग विचार सांगितला।।२।। सांगितले ज्ञान निगमागमीचे। सार वेदान्ताचे निवडिले।।३।। बसवलिंग म्हणे ब्रह्म जे निर्गुण। ते केले सगुण शब्दबळे।।४।।

९०. येई बा मन्मथा येई बा मन्मथा। तुजविण त्राता कोणी नाही।।१।। तुझा वीरशैव झाला बा पोरका। तुजविण देखा हीन दीन।।२।। वत्स गाईविण हंबरडा फोडीत। तैसे आळवीत भक्त तुझे।।३।। बसवलिंग तुज येतो काकुलती। येई शीघ्रगती माय माझे।।४।।

९१. नागनाथ सिद्ध गुरुदेव आम्हा। अवतार परब्रह्मा घेणे झाले।।१।। माणूर हे क्षेत्र नागनाथ धाम। तेथूनि उगम भक्तिपंथा।।२।। सिद्ध नागनाथ गुरू मन्मथाचा। शिवलिंग तयाचा शिष्यराव।।३।। शिवलिंग बोध लिंगेश्वरा करी। केला लिंगेश्वरी बोध आम्हा।।४।। बसवलिंग म्हणे ज्ञानाची ही धारा। केली परंपरा शिवदासा।।५।।

९२. फळ देठीचे तुटूनि पडे। मग का मागुती येऊनि जडे।।१।। मृत्यू झालिया प्राणी जात। शोक केलिया का परतूनि येत।।२।। पळत्या पाठी लागूनि काय। जया नाही मागील सोय।।३।। बसवलिंग म्हणे पुरे। आता बोलिलो तितुके खरे।।४।।

९३. शंकर म्हणे गौरी ऐक हो सुंदरी। वाटे नवल परी शिवभक्ताचे।।१।। भस्म धारण करिती नित्य। शिवाचे स्मरण रात्रंदिन।।२।। ऐसा निजध्यास धरूनि उल्हास। होईन दास त्याचे घरी।।३।। तयाचे मुखीचे ऐकूनि कीर्तन। होतसे आमुचे मन उन्मन।।४।। काज तयाचे निरंतर करीन मी। पडो नेदी अंतर भजनासी।।५।। ऐसिया भक्ताची मजसी आवडी। म्हणे पार्वतीसी देवराव।।६।। बसवलिंग ही करितो गुंजन। चित्त चरणावरी ठेवोनि।।७।।

९४. सर्व मायेचे ममतेचे। कोण नाही संगतीचे।।१।। इष्ट मित्र पुत्र होती।

यमाहाती धरूनि देती।।२।। घेती भूषणे काढून। जगा दाविती रडून।।३।। यांचा धरू नको विश्वास। धरा शंकराची कास।।४।। बसवलिंग म्हणे देवा। यांचा संबंध नसावा।।५।।

९५. जना हा सारिखा वर्तूनि व्यापार। करावा गजर शिवनामाचा।।१।। अखंड हा ध्यास अंतरी असावा। दुराग्रह नसावा जे नाम घेता।।२।। तोचि साधू जाणा प्रपंची परमार्थी। ओळखावा संत निजधामी।।३।। कमळ अलिप्त असे जळावरी। प्रपंचामाझारी साधू तैसा।।४।। बसवलिंग म्हणे झाले ऐसे संत। तयाशी प्रणिपात असे माझा।।५।।

९६. मना तुजलागी विनवीत आहे। नको सोडू पाय शंकराचे।।१।। एकविधा भक्ती करी त्या लिंगाची। नको इतराची आस करू।।२।। लिंगधारी प्राणी जन्मूनि संसारी। न भजे अंतरी शंकरासी।।३।। तयाचा तो जन्म व्यर्थ हाचि गेला। भवपाशी गुंतला चौऱ्यांशीचे।।४।। बसवलिंग विनवी आपुल्या मनासी। शरण शिवासी जाई वेगी।।५।।

९७. सेविता विषय वाढती सकळ। सदा तळमळ भोगावया।।१।। अग्नीमाजी तूप घालिता प्रबळ। वाढतो अनळ शांत नोहे।।२।। इंधन सरता स्वये शांत होय। तैसी मातु होय इंद्रियांची।।३।। म्हणूनि त्यागावे तया विषयाते। होय मग त्यात समाधान।।४।। बसवलिंग म्हणे हेचि त्याग अंग। भक्ताचे अभंग मुळी देतो।।५।।

९८. दुर्जना नावडे साधूची संगती। लोके त्याची युक्ती म्हणोनिया।।१।। राजहंसा द्वेषी विष्ठेचा कावळा। हंस मुक्ताफळा सुख मानी।।२।। गजासी प्रतिपाळ करिती बहुवसा। देखोनिया भैसा सुख न मानी।।३।। बहुतापरी करी ज्या रक्षण। तयाते देखून सुख न मानी।।४।। बसवलिंग म्हणे दुष्टाचा ठेवा। दुजियाचा हेवा करूनि काय।।५।।

९९. शिवभक्तालागी निष्ठावंत भाव। सांगे सदाशिव उमेलागी।।१।। तीच गुरुगीता मन्मथे आणिली। निज मायबोली मराठीत।।२।। गुरुरूप कैसे घ्यावे ओळखून। सांगितली खूण भक्तालागी।।३।। बसवलिंग म्हणे स्कंदाचा अवतार। शिवलिंगेश्वर मायबाप।।४।।

१००. पाहूनिया भस्मधारी। यम तया नमस्कारी।।१।। उभा जोडोनिया

हात। भावे घाली दंडवत।।२।। दुता सांगे यमराज। फार लाभ झाला आज।।३।। ऐसा हर्षला तो मनी। धन्य बसवलिंग वाणी।।४।।

१०१. धाव धाव गौरीवरा। मज दीनाते उद्धरा।।१।। अनाथ मी अपराधी। हीन दीन मंदबुद्धी।।२।। म्हणवितो तुझा दास। नको पाहू गुणदोष।।३।। बसवलिंग म्हणे शिवा। सांग भेटसी केधवा।।४।।

१०२. तैसा नोहे माझा देव। तो हा देवाचाही देव।।१।। मागे जोगवा की वारी। भक्त हिंडे दारोदारी।।२।। गळा टोचूनि रक्त काढी। भक्त लाविती बागाडी।।३।। नर केले श्वानरूपी। ऐसे देव हे कुरूपी।।४।। नाही त्याने चेपी नरडी। देवे हाती दिली परडी।।५।। निळी वस्त्रे डोमाची। होता जिवंत देहाची।।६।। हाती खोडा पायी बेडी। ती का दैवते दैन्य फेडी।।७।। बसवलिंग स्वामी शंभू। देई अक्षयी पदाचा लाभू।।८।।

१०३. शंकर न म्हणे जोगी। त्रैलोक्यसंपन्न भोगी।।१।। द्रव्य नवनिधी पदरी। कल्पतरू असे द्वारी।।२।। कामधेनू चिंतामणी। सदा वसे शिवगणी।।३।। रावणासी सुवर्णलंका। केली ठाऊक तिन्ही लोका।।४।। देहभावा करावा नाश। म्हणोनिया घेतला संन्यास।।५।। बसवलिंग स्वामीपाशी। रिद्धी सिद्धी घरीच्या दासी।।६।।

१०४. काय होती संत अरण्याचे वासे। श्वापदे बहुवसे व्याघ्रादिक।।१।। काय होती संत पर्ण खाती तोंडा। शेळिया वाके आन घडे काही।।२।। काय होती संत सेविता जीवन। मगरी मत्स्य सेविती की।।३।। काय होती संत वाऱ्याचा आहारे। सर्प अजगरे घडे काही।।४।। काय होती संत त्यागिता घरदार। पक्षिया आधार काय असे।।५।। बसवलिंग म्हणे आत्मज्ञानाविण। व्यर्थ आहे शीण की हो।।६।।

१०५. स्वहित कीजे कैसे लवलाह्याच्या परी। काळ हा वैरी मापारी बैसलासे।।१।। जैसा का नोवरा साधी लग्नघडी। यापरी तातडी स्वहित कीजे।।२।। दीपी पतंग जैसा घालीतसे उडी। यापरी तातडी स्वहित करा।।३।। बसवलिंग म्हणे ऐशापरी जाण। श्रीगुरू चरणा शरण जावे।।४।।

१०६. सर्व विश्वाचा तू राव। ऐसा आमुचा अनुभव।।१।। म्हणोनि आलो तुज शरण। आता दावी थोरपण।।२।। भ्यालो भ्यालो या संसारा।

म्हणोनि शरण गौरीवरा।।३।। बसवलिंगा सोडवी आता। वेळ दवडू नको ताता।।४।।

१०७. स्मरण करा हो मनी भाव धरा हो। संसारसागर भक्तिबळे तरा हो।।१।। अभ्रांची साउली तैसी संपदा भुली। साच नोहे वश करा गुरुमाउली।।२।। विषयमदा हो काय भुलला सदा हो। टाळी वाजवून मुखी शिवनाम वदा हो।।३।। बसवलिंग हेचि तुम्हा हित सांगतो। सर्व जग ब्रह्म व्हावे हेच मागतो।।४।।

म. बसवेश्वर जन्माचे अभंग

१०८ (१). धवळा हिमालय धवळाचि कैलास। धवळे सिंहासन स्फटिकाचे।।१।। धवळा महादेव धवळे गजांबर। धवळा नंदीश्वर पुढे उभा।।२।। शक्ती का धवळी मौक्तिक धवळे। तेज ते धवळे शिवरूप।।३।। बसवलिंग म्हणे धवळ्याशी ध्याता। धवळा तत्त्वता झालो ध्यासे।।४।।

१०९ (२). प्रथम शुक्तिका सोज्वळ निर्मळ।। त्यात मुक्ताफळ महादेव।।१।। ऐसा महादेव बैसला आसनी। आला नारदमुनी कैलासासी।।२।। धर्म हा बुडाला भक्ती उदासली। स्थिती नाही भली मृत्युलोकी।३।।। ऐसा बसवलिंग सांगे नेमोत्तर। नारदे शंकर प्रार्थियेला।।४।।

११० (३). मते ती पाखंड जैनादी विखंड। गाजविती बंड भूमीवरी।।१।। तयासी खंडूनि भक्ती ते उदंड। स्थापणे अखंड मृत्युलोकी।।२।। यासी योग्य असे एक नंदीश्वर। तयानी अवतार घ्यावा तेथे।।३।। बसवलिंग म्हणे दयाळू शंकर। नारदा सत्वर अभय देत।।४।।

१११ (४). बा रे नंदीश्वरा जावे त्वा सत्वरा। तुजविण धरा दुःखी होते।।१।। भक्तिमार्ग माझा असे बहू सोपा। स्थापूनिया बापा सुखी करी।।२।। समस्त पाखंड शीघ्रचि खंडावे। भक्तिसुख द्यावे जनालागी।।३।। बसवलिंग म्हणे शिव आज्ञाधारी। निघाला सत्वरी मृत्युलोका।।४।।

११२ (५). मादिराज भक्त नांदे बागेवाडी। शिवभक्ती आवडी मादलांबा।।१।। संगमदेवाची सेवा शिवभक्ती। सदैव करिती दृढ निश्चये।।२।। पुत्रप्राप्तीलागी नंदीव्रत घेती। सद्गुरूची प्रीती पाहूनिया।।३।। बसवलिंग म्हणे तो हा जंगम थोर। जाणा संगमेश्वर महायोगी।।४।।

११३ (६). पुत्रप्राप्तीलागी करिती नवस। जन्मता पुत्रास लिंग बांधू।।१।। लिंगवंत पुत्र होता भाग्य थोर। राहे गौरीवर सदा जवळी।।२।। जंगमकृपेने मादांबा सुंदरी। दिव्य गर्भा धरी उदरी आपुल्या।।३।। बसवलिंग म्हणे ऐसा हा अवतार। नंदीश साचार घेत आहे।।४।।

११४ (७). गर्भवासाचे ते दुःख भयंकर। शिवभक्ता निर्धार नव्हे कदा।।१।। म्हणोनि वृषभेश मातेच्या गर्भात। होऊनि निवांत राहिला तो।।२।। तीन वर्षे गेली बाहेर येईना। माता झाली जाणा कष्टी बहू।।३।। बसवलिंग म्हणे आठविता शंकर। वेगी उमावर धाडी भक्ता।।४।।

११५ (८). चौसष्ट अधिक सहस्र शकाच्या। वसंतऋतूच्या मध्यभागी।।१।। शुक्लपक्षी जे का अक्षय तृतीया। मध्यान्हा समयी सूर्य येता।।२।। सद्गुरू समर्थ संगमेशपायी। चित्त ठेवी माई सर्वकाळ।।३।। बसवलिंग म्हणे प्रसूतीचे दुःख। नाही झाले देख मातेलागी।।४।।

११६ (९). उदयाचळी निघाला मार्तंड। भेदूनि करंड ब्रह्मांडाचा।।१।। तैसा बसवराज उदय पावला। त्रैलोक्यासी झाला आनंद तो।।२।। देवकन्या आणि सुरवर सकळ। पुष्पे परिमळ वर्षताती।।३।। बसवलिंग म्हणे आनंदले पूर्ण। झाले समाधान मर्त्यलोकी।।४।।

११७ (१०). जंगम शिवयोगी कुडलीचा राजा। आला महाराजा संगमेश।।१।। मस्तकी विभूती कंठी बांधी लिंग। बसव हे अभंग नाम दिधले।।२।। आनंदले जन अंदोला घालिती। प्रेमभरे नाचती आनंदाने।।३।। बसवलिंग म्हणे शास्त्राचा विचार। पुराणी साचार पाहा तुम्ही।।४।।

११८ (११). झाला भक्ताचा हो जन्म। सुखी झाले त्रिभुवन।।१।। अवघा आनंदी आनंद।। चोहीकडे परमानंद।।२।। पापताप गेले दुरी। भक्ती साजिरी गोजिरी।।३।। बसवलिंगालागी उरी। नाही कोठे हो अंतरी।।४।।

।। म. बसवेश्वर जन्माचे अभंग संपूर्ण ।।

११९. विष्णु मन पवनीचा राणा। त्यासी ध्याना बरवे आणा।।१।। मनपुर स्वाधिष्ठानावरी। दश पाकोळिका अवधारी।।२।। सहा हजार जप करी। मन अष्टदळावरी।।३।। तेथे साडे बारा घटिका। प्राण राहिला नेटका।।४।। आपासहित मिसळला। सर्व श्वेत रक्त शोभला।।५।। विष्णु लक्ष्मीसहित।

विराजला मणिपुरात।।६।। रस आहार प्रकाशी। स्वाद लागला जिव्हेसी।।७।। बस्वलिंग बोले तेथे। उपावरी आणू हात।।८।।

१२०. कैसा तू सीलवंत लींगा। झाकाझाकी करिसी आंगा।।१।। चिताभस्म नरकरुटी। तीचि भोजनासी वाटी।।२।। गजचर्म व्याघ्रांबर। देव पांघरे करुनी आदरे।।३।। अमंगळा मंगळ करिता। शिवे मुंड ग्रीवे धरता।।४।। कोण आचार कोण दीक्षा। चहुवर्णी मोकळी भिक्षा।।५।। लिंगाकार अवघी सृष्टी। भवी नाही तुझ्या दृष्टी।।६।। नर नाही जो स्वानुभवी। तोचि तुझ्या दृष्टीस भवी।।७।। बस्वलींग स्वामींसी पाही। जग मुक्तच भेद नाही।।८।।

१२१. कैसी सभेसी आली शोभा। देवा भक्ताचिया लोभा।।१।। बरवे मिष्टान्न भोजन। वरी तांबूल मुखमंडण।।२।। सुंदर आत्री तारुनी कळा। कांता सभाग्या असे जवळा।।३।। कोड कवतुक बाळा होये। पित्या वांझपण जाये।।४।। गुरु विरक्त वैभवासी। शिष्या सर्व भजे त्यासी।।५।। भक्त भक्त करिता तरे। देव कीती विश्व भरे।।६।। बस्वलिंग म्हणे सोने। हीरा जडला अधिक होणे।।७।।

१२२. का रे माझे मना स्त्रीयाची चिंता। पूर्वापूर्व पाहाता दुःख मूळ।।१।। दशरथासी मरण आले कोणामुळे। उदरीची बाळे दुरी केली।।२।। तुकोबासी झाला थोडा वनवास। नामा विष्णुदास सुखी होता।।३।। कबीराचे किती सांगावे गाऱ्हाणे। यंकुबाचे वचन ऐकवेना।।४।। ज्ञानियासी विघ्न भलतेया ठाई। होय ज्याचे पाई स्त्रीसंगे।।५।। बस्वलिंग म्हणे दारुण ही कळी। फोडूनीया फळी स्वहित करा।।६।।

१२३. काया हेच काशी वाचा वाराणसी। कासया हिंडसी तीर्थालागी।।१।। तीर्थी जाऊनीया काय तेथे पाहासी। उदक पाषाणासी पडत्या गाठी।।२।। भाव भागीरथी विश्वास ईश्वर। भरली भीमा तर अखंडित।।३।। ज्ञान हीच गंगा गया ती विवेक। धन्य पुंडलीक दर्शन।।४।। बस्वलिंग म्हणे तीर्थी स्नान झाले। हे गुज सांगितले सद्गुरूने।।५।।

१२४. बहुता जन्मोनी पुनीत झालो। तरीच याच्या पोटा आलो।।१।। माझा बाप कळवळ्याचा। ठेवा दिधला निजधनाचा।।२।। हाती एकांती ठेवणे दिले। तव ते लोकात प्रगट झाले।।३।। जन ठेवन पुत्राची घेत। येथे

येउनी भलते नेत।।४।। सर्व जनासी पुरले पाही। परि माझे सरले नाही।।५।। म्हणे बसवय्या अघटित गोष्टी। आयती खातो बापाची रोटी।।६।।

१२५. बाळा कळवळा मायचि जाणे। वरकड काय करावे शहाणे।।१।। वोझे सोसिले अवघड ठाई। पुत्र उतराई होईल काही।।२।। क्षुधातृष्णादी नाना दुःखे। माता हारवून मेळवी सुखे।।३।। मळमुत्रा नरका खेळी। विसंबेना कवणे काळी।।४।। मृत्यू झाल्या चारी दिवस कांता। जन्मावरी आठवी माता।।५।। बस्वलिंगाची निज माता। वाचा खुंटली रे गुण गाता।।६।।

१२६. बोलोनि वचन कष्टविले तुम्हा। तुमचा भार आम्हावरी झाला।।१।। मुखे श्रमविले बोलोनी हर हर। टाळीसाठी कर शिणविले।।२।। फार उजगार झाला या देहासी। ताटस्ताने त्रासी पडलिया।।३।। प्रतिदिनी येता जाता झाला शीण। भागले चरण येताचि।।४।। ऐसा भार थोर झाला आम्हावरी। तो असो अंतरी देवाजीच्या।।५।। ऐसे ही म्हणता दिसे अनुचित। आपुलेही हित होऊनि राहे।।६।। केले कष्ट काही जाईनाती वाया। भार देवराया वरी झाला।।७।। धन्य भक्तजनी परिसिली वचन। माझिया कीर्तनी सुखी झाले।।८।। बस्वलिंग म्हणे नव्हेचि हे कष्ट। सायुज्याची वाट सरती झाली।।९।।

१२७. श्रेष्ठ पद पाहाता नामयालागून। श्रीगुरुवाचून नसे कोणी।।१।। प्रथमारंभ नमिजे गणेश सरस्वती। परि तेही करिती गुरुसेवा।।२।। पाताळिया शेष पुण्यप्राय शिरी। धरिली धरित्री गुरूच्या बळे।।३।। अपुल्या प्रतापे दुजी सृष्टी केली। गुरुमूर्ती वंदिली विश्वामित्रे।।४।। वसिष्ठे सूर्यासी तपविल्यासाठी। परि ते हृदयपुटी धरिती गुरु।।५।। अगस्तीने चूळ केला समुद्राचा। परि सद्गुरूचा शरणागत।।६।। इंद्र चंद्र सूर्य मार्कंडी दुर्वास। सुरवर किन्नर शेष जपती गुरु।।७।। बस्वलिंग म्हणे ऐसेचि जाणूनी। श्रीगुरुचरणी स्थिर झाले।।८।।

१२८. असतां वैभव हाणिजे हो लाथें। तरीच तयातें म्हणिजे योगी।।१।। नाहीं तरी तसे नव्हे हे बोलणें। नपूंसकी होणे वैरागिया।।२।। दरिद्री धन त्यागी अशक्तीया शांत। वृद्ध स्त्री निवांत पतिव्रता।।३।। बस्वलिंग म्हणे तैसा नोहे त्याग। कोडियाते भोग चंदनाचा।।४।।

१२९. शिवजटा भारी झाला जन्म ज्यासी। नमन तयासी करितों भावें।।१।। दीर्घकाय उग्र भयानक भारी। मेदिनी थरारी पादघातें।।२।। षड्भूज सायुध

वीरशिरोमणी। नेपुरे चरणी भयंकरे।।३।। अंगकांती ज्याची कज्जल संनिभ।
सूर्य समप्रभ तेज फांके।।४।। त्रिशूल डमरू परशु खड्गलता। नयनी पाहतां
पाहवेना।।५।। वदन विक्राळ दंष्ट्रा भयंकर। पाहतां थरार कांपे काळ।।६।।
क्रोध भरें जेव्हां सिंहनाद घडे। नक्षत्रांचे सडे होती तेव्हां।।७।। जटाभार शिरीं
आपाद लोळत। नेत्र ते आरक्त भयानक।।८।। उरग रुद्राक्ष स्फटिक रुंडमाळा।
असति ज्याच्या गळा अलौलिक।।२।। धगधगती जिव्हा काळा ग्रासूं पाहे।
शिरी गंगा वाहे झरझरां।।१०।। कटिबंध शिरी आटोप मकुट। कुंडले बिकट
हेममय।।११।। नवरत्न कोंदणी भव्य गळां हार। पाहोनियां हर तोषे सदां।।१२।।
प्रतापें देवासी लावोनियां शिक्षा। मारियलें दक्षा क्रोधभरे।।१३।। नारसिंहदर्प
हरोनि सकळ। केलासे विकल वीरवरें।।१४।। दुष्टसंहारक भक्ताचा कैवारी।
स्मरतांचि तारी दयाघन।।१५।। प्रतापी म्हणोनी वीरभद्र नाम। ठेवितो परम
कृपानिधी।।१६।। भ्यासुर प्रतापी ऐसी उग्रमूर्ती। स्मरूनियां चित्तीं
विसावतों।।१७।। तयाचिया पायां माझे दंडवत। करितों सतत
भक्तिभावें।।१८।। भूतप्रेत ग्रहा शाकिनी डाकिनी। स्मरतां पळोनी जाति
दूरी।।१९।। नित्य स्मरे त्याचे दुर्धर संकट। वैरीही निपट निर्दळील।।२०।।
बस्वलिंग म्हणे वीरभद्र वीरा। भक्तिभावें स्मरा अनुदिनीं।।२१।।

१३०. अंबे तुझे अंकी शोभती किशोर। हेरंब कुमार लाडके हे।।१।।
सख्या तुझ्या सेवे सादर असती। प्रेमें खेळविती बाळ तुझे।।२।। वेळोवेळां
देसी चुंबन तयांसी। स्नेहें आलिंगीसी प्रेमभावें।।३।। पयोधर पान अमृत
निंदिती। सुस्वादें सेविती आनंदाने।।४।। क्षणैक रांगती क्षणैक बैसती।
क्षणैक लोळती तुझ्या पाईं।।५।। लंबोदर उभा राहोनि नाचत। पडतां त्वरित
हांसे स्वामी।।६।। स्वामी पडे उठे हांसे गजानन। उदर धरून अट्टाहासें।।७।।
खेळता खेळतां करिती भांडण। स्वामी गजानन तुजपुढे।।८।। एकमेकां वर्म
काढूनि भांडती। कलह करिती अनिवार।।९।। स्वामीसी आपण मारोनिया
जाण। करिती रोदन एकदंत।।१०।। दोघेही तुजला सांगती कागाळ। कर्पूर
धवल हासे तेव्हां।।११।। गहिवरे दोघां उचलोनी उरी। घेती त्रिपुरारी
अंकावरी।।१२।। दोघांचेही सांब शांतवन करी। चुंबोनी अधरी प्रेमभावें।।१३।।
जगन्माते तुझे कुमार हे दोघे। तारिती अवघे विश्व स्वयें।।१४।। बस्वलिंग

म्हणे ऐसा हा विनोद। गातां भवबंध तुटतसे।।१५।।

१३१. प्रतापी माझा हा नंदिराजा थोर। करोनी जर्जर शंकराते।।१।। त्रैलोक्यीं गाजला यशवंत झाला। बसवण्णा नामाला पावलासे।।२।। शंकराच्या अंशरूपें झाला नंदी। जिंकोनी आनंदे शंकराते।।३।। विचित्र नाटकी नट होई नाचे। पुरवितो मनाचे खेळ नाना।।४।। अज्ञानी नेणती नाटक रचना। सांठविती नाना भेदबुद्धि।।५।। शंकर जिंकिला नंदी रायें ऐसा । भेदाचा परोसा करिताती।।६।। नंदीचा प्रताप स्वये गाजवोनी। शिव स्ववाहनी योजीतसे।।७।। नंदीचा आनंद त्रैलोक्यी मावेना। शंकराच्या ध्याना करीतसे।।८।।

१३२. रुद्राच्या तेजांशें जन्मा आला नंदी। घालतसे बंदी ब्रह्मा विष्णु।।१।। शंकर जर्जर करी गर्जोनीयां। तिन्ही देव काया व्यर्थ म्हणे।।२।। कासया थोरवी धरिलीसे मनीं। तुम्हां देवपणी लाज नाही।।३।। अजिंक्य त्रिभुवनीं म्हणा एक नंदी। त्यागा गर्व धुंदी तिन्ही देव।।४।। महादेव थोर सर्व देवांमाजी। शरण यावे आजी वर मागा।।५।। मागाल तें देतों स्वमुखे मागतां। ईश्वरत्व वार्ता सोडोनिया।।६।। शंकर दयाळ भोला सांब मनीं। म्हणे रुद्र वाणी हेचि असे।।७।। अतुल प्रतापी मदंशचि एक। वीरांचा नायक वीरभद्र।।८।। स्मरोनिया नाते मागे सदाशिव। अहो नंदीराव वर द्यावा।।९।। वर मागे माझे वाहन व्हावया। स्त्री जगी मज द्याया बहुमान।।१०।। औदार्यसिंधु हा नंदीराजा थोर। बैसवी शंकर पाठीवरी।।११।। म्हणे मज धन्य केलेसी शंकरा। पार्वतीच्या वरा योगिनाथा।।१२।। बस्वलिंग म्हणे थोरांचे लक्षण। दाखवी श्रीमान नंदीराजा।।१३।।

श्री महादेव प्रभू

(इ.स. १८२४-१८९८)

सातारा जिल्ह्यातील जांब या गावी नीलकंठस्वामी व भागीरथीबाई या माहेश्वर दांपत्याच्या उदरी महादेव प्रभूंचा जन्म झाला. ते राजयोगी होते. १२ वर्षे तीर्थयात्रा केल्यानंतर त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला. त्यांच्या पत्नीचे नाव सगुणाबाई. दरवर्षी चैत्र शुद्ध पंचमीला जांब येथे त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त यात्रा भरते. त्यांचा बराच शिष्यपरिवार आहे.

महादेव प्रभूंनी आपल्या अभंगांत महादेव, महादेव प्रभू, प्रभू महादेव, नीलकंठात्मज, नीलकंठ बाळ अशा नाममुद्रा योजिल्या आहेत. त्यांची रचना गोड व प्रासादिक असून त्यांनी अनेक कथात्मक अभंगही रचिले आहेत. शिवनाम, शिवरूप, शिवभक्ती, गुरुमहिमा, संतमहिमा, आत्मस्थिती अशा विषयांवरची त्यांची अभंगरचना आहे.

इ.स. १९११ मध्ये महादेव प्रभूंचे चिरंजीव काशीनाथ स्वामी यांनी शिवलिंगभाऊ ओझर्डे यांच्या सहकार्याने 'महादेव प्रभूकृत गाथा' प्रसिद्ध केली. इ.स. २००२ मध्ये पं. शिवाप्पा खके यांनी ही संपूर्ण गाथा प्रस्तावनेसह संपादित करून प्रकाशित केली. हीच गाथा २०११ मध्ये महादेव प्रभूंचे वंशज श्री. भाऊराव स्वामी यांनी पुनर्मुद्रित केली.

पं. शिवाप्पा खके संपादित 'महादेव प्रभूकृत गाथे'तील सर्व अभंग प्रस्तुत गाथेत समाविष्ट करण्यात आले आहेत. यापूर्वी महादेव प्रभूंचे ९७ अभंग 'मन्मथगाथे'तून प्रकाशित झाले होते.

श्री महादेव प्रभूंचे अभंग

मंगलाचरण : रूपाचे अभंग

१. रूप सगुण सुंदर। नाम शोभे श्रीशंकर।।१।। माझे हृदयभुवन। करा आपुले सिंहासन।।२।। इतुके द्यावे मज आता। दीनबंधु विश्वनाथा।।३।। म्हणे महादेव किंकर। जवळी राहावे निरंतर।।४।।

२. देव पाहता पंचमुख। तहान हारपली भूक।।१।। कोण पुण्य उदया आले। पाप समूळ दुरावले।।२।। दहन झाले त्रिविध ताप। पुरला दासाचा संकल्प।।३।। महादेव म्हणे धालो। रूपसागरी नाहालो।।४।।

३. देव कोठे आहे सांगा। ज्याचे मुकुटी वाहे गंगा।।१।। अंगी विभूतीचे भूषण। दश भुजा पंच वदन।।२।। दक्षबाळा वामभागी। दीनबंधू महायोगी।।३।। म्हणे महादेव किंकर। तया माझा नमस्कार।।४।।

४. कोटि सूर्यसम प्रभा। स्वरूप स्वानंदाचा गाभा।।१।। अर्ध अंगी दक्ष बाळा। जेवी प्रलयीची चपला।।२।। होते निर्शून्य निर्गुण। भक्तांसाठी झाले सगुण।।३।। महादेव म्हणे ध्यान। कैलासीचे निधान।।४।।

५. रत्नजडित सिंहासन। वरी शोभे पंचवदन।।१।। सुराअसुरांचे ध्यान। सर्व जीवीचे जीवन।।२।। वामभागी दक्षदुहिता। आदिमाया विश्वमाता।।३।। महादेव म्हणे नेत्र। धन्य धन्य ही पवित्र।।४।।

६. अर्धनारीनटेश्वर। ध्यानी शोभे श्रीशंकर।।१।। पहा नेत्र आनंदले। आजी पाहिली पाऊले।।२।। कोटी मदनलहरी। शोभे तया मुखावरी।।३।। अर्धचंद्रा भाळी वाहे। तो हा महादेवा साहे।।४।।

७. गजचर्माचे भूषण। व्याघ्रत्वचेचे आसन।।१।। नरमुंडाचा प्रिय हार। तृतीय नेत्री वैश्वानर।।२।। कर्णी कुंडले व्यालाची। दिव्य शोभा नगबाळाची।।३।। म्हणे महादेव किंकर। देवा माझा नमस्कार।।४।।

८. उमावल्लभ शंकराचे। ध्यान विराटरूपांचे।।१।। जलधर हार कमंडलू। सप्त पाताळी पाऊल।।२।। दिशावसन शशिमित्र। झाले ज्याचे दोन्ही नेत्र।।३।। मेघमाळा जया वर्षती। तुम्हा स्नान पशुपती।।४।। नक्षत्रे होती पुष्पहार। कैसा पुजू हा शंकर।।५।। म्हणे महादेव विराट। अंत नाही कोठे मुकुट।।६।।

९. सुंदर ती मूर्ती पाहिली मी डोळा। ज्याच्या दक्षबाळा वामभागी।।१।। रत्नजडिताचे शुभ्र सिंहासन। द्वारी नंदीवाहन शोभतसे।।२।। विराजतो चंद्रमौळी सुरसहित। जगाचे दुरित दहन केले।।३।। महादेव म्हणे भोळा भाविकाचा। भुकेला भक्तीचा वाट पाहे।।४।।

१०. सुंदर रूपडे दिसे दृष्टीपुढे। मन झाले वेडे माझे मन।।१।। अगा कैलासीच्या स्वामी देवराया। दंडवत तुमच्या पाया दंडवत।।२।। चौसष्ट कोटि गण स्वामी आणि गजानन। सहित आपण इतुक्यासहित।।३।। महादेव जोडी पाणि परिसावे शूळपाणि। नाचावे रंगणी माझ्या नाचा।।४।।

११. विश्वनाथ नाम शोभते सुंदर। मुक्तीचे मंदिर भाविकांचे।।१।। मौली सुरसरित विराजतो चंद्र। हार तो फणींद्र झाला ज्याचा।।२।। नेत्री वैश्वानर वामभागी अंबा। षण्मुख हेरंब पुत्र ज्याचे।।३।। महादेव म्हणे लागले ते ध्यान। दिसे नंदीवाहन जनी वनी।।४।।

१२. गळा रुंडहार प्रिय व्याघ्रांबर। आवडते सुंदर ध्यान मज।।१।। कुंडले श्रवणी जडिले ते फणी। देव दशपाणि पंचमुख।।२।। जगाचे जीवन शोभे नंदीवाहन। पार्वतीरमण स्वामी माझा।।३।। महादेव म्हणे आम्हा काय उणे। कैलासीचे केणे भरियेले।।४।।

१३. हिरियाचे खांब सोन्याचे तुळवट। माणिकाचे वाट तयामाजी।।१।। मोत्यांचा मंडप दिसतो सुंदर। कोंदणी पुष्कर जडियेले।।२।। पाचूचे अंगणी नीळाचे मयूर। गर्जती हर हर सर्वकाळ।।३।। रत्नकीळ दीप पद्मराग ज्योती। मरकताच्या भिंती शोभा आली।।४।। ऐशा मंदिरात दिव्य सिंहासन। बैसले आपण उमारंग।।५।। साठ कोटी गण सभा घनदाट। वारियासी वाट न फुटे तेथे।।६।। चंद्रसूर्य दोन्ही तेथीचा प्रकाश। धन्य तो कैलास शंकराचा।।७।। महादेव म्हणे स्वामी हा आमुचा। जाऊ कायावाचा शरण त्यासी।।८।।

नाम

१४. कलियुगी नाम सार। जवळी भाविका शंकर।।१।। असो त्याचे कुळ गोत्र। करी दुनिया पवित्र।।२।। उंच नीच मना नाणी। निंदा नायके श्रवणी।।३।। ऐशा चिन्हे जो मंडित। झाला महादेव अखंडित।।४।।

१५. गोड नाम शंकराचे। घेता जिव्हे काय वेचे।।१।। नाही यापरते

साधन। अमित ओतलिया धन।।२।। भवसिंधु नामनौका। झाली निर्माण भाविका।।३।। म्हणे महादेव किंकर। नाम मुक्तीचे माहेर।।४।।

१६. नाम गोड नाम गोड। येवढी द्यावी देवा जोड।।१।। म्हणोन शरण आलो पाया। शंभुराया महाराजा।।२।। नामे तरिला मार्कंडेय। भरिले कीर्तीने ब्रह्मांड।।३।। महादेव म्हणे पुरे। दोन अक्षरे दातारा।।४।।

१७. भवरोगियासी नाम रसायन। पार्वतीरमण वैद्य माझा।।१।। पथ्य सांभाळितो मोक्ष येतो हाता। मग कैची चिंता कलिकाळाची।।२।। जीव शिव ऐक्य झाला समरस। द्वैताचा तो भास उरला नाही।।३।। महादेव म्हणे कैचे येणे जाणे। सहजचि बोलणे खुंटले ते।।४।।

१८. नामामृत गोड आवडते मज। हेचि मूळ बीज ओंकाराचे।।१।। नाम अभिमान पतितपावना। पार्वतीजीवना सांभाळावे।।२।। पाहा ते जीवने तारियेली नाव। बुडविले नाव नाही जगी।।३।। महादेव म्हणे घेऊ नाममात्रा। सर्व तीर्थयात्रा शंभोराया।।४।।

१९. कलियुगामाजी भजन हे सार। हृदयी शंकर साठवावा।।१।। शिव शिव वाचे सतत आठवा। आणिक नाठवा दुजे काही।।२।। नरजन्म जळावरील तरंग। करा उमारंग जवळी वेगी।।३।। महादेव म्हणे साधिता साधन। आयुष्याचे धन चोरी गेले।।४।।

२०. घनगर्जनेचा ऐकूनि तो नाद। मयूरा आनंद थोर झाला।।१।। तैसे शिवनाम आम्हा सेवकाला। नाही त्या सुखाला अंतपार।।२।। शोधू जाता रूप जन्म गेले कोटी। म्हणोनि हे कंठी धरियेले।।३।। महादेव म्हणे पार्वतीचा नाथ। बद्ध किंवा मुक्त करू आता।।४।।

२१. अनंत जन्मीचे दुरित डोंगर। करीत संहार नाम तुझे।।१।। म्हणोनी ते कंठी धरिले आवडी। लाचावली गोडी जिव्हेलागी।।२।। नको मज आता दुसरे साधन। अचळ हे धन सापडले।।३।। महादेव म्हणे ओंकाराचा कंद। नाम ब्रह्मानंद गाऊ आम्ही।।४।।

२२. सुधेहुनी गोड नाम हे शिवाचे। घेई घेई वाचे माय माझे।।१।। नरतनू हेचि मुक्तीचे माहेर। किती वारंवार प्रार्थू आता।।२।। लक्ष चौऱ्यांसी शोधिता शोधिता। महालाभ हाता लाभलासे।।३।। महादेव म्हणे जेवी जलगार।

विरालिया नीर जैसे तैसे।।४।।

२३. अठरा युगे शिवस्वरूप अखंड। अवतार उदंड विबुधाचे।।१।। ब्रह्मा हरी कोटी वेळा जन्मा आले। मुकुट पाऊले न पडे ठाई।।२।। कोण पाड म्हणे तेथे आम्हा मानवांचा। चारी वेद वाचा शिणल्या तेथे।।३।। महादेव म्हणे नाम हे आपुले। तुम्हा गुंतविले ठेवोनिया।।४।।

गुरू

२४. गुरू देवांचाही देव। कळे घेता अनुभव।।१।। करी आपणा समान। तेथे नाही दुजेपण।।२।। गंगेवरील वाहनी। नेत पैलतीरा प्राणी।।३।। म्हणे महादेव दाता। दान देतो सायुज्यता।।४।।

२५. गुरु उपदेशिती कानी। वर्म चुकले निशाणी।।१।। मंत्रराज अनिर्वाच्य। सांगे रमण पार्वतीचा।।२।। लक्षामाजी तैसा येक। वेषधारी ते अनेक।।३।। महादेव म्हणे रळी। नको पाहिजे करतळी।।४।।

२६. बीज रोपिले श्रवणी। रूप दाविले नयनी।।१।। झाले कोटी उपकार। कैसा फेडू मी पामर।।२।। द्यावे तनमनधन। तरी ते दिसते गौण।।३।। म्हणे महादेव थिल्लर। केवी न्हाणील सागर।।४।।

२७. लोहामाजी सोने आहे। परिसाविणे हाता नये।।२।। तेवी वपूसी तो गुरुकर। स्पर्श होता करी अमर।।२।। त्या मंथनावाचूनी। कैसे प्राप्त होय लोणी।।३।। महादेव म्हणे साधु-। संगे लाभे ब्रह्मबोधु।।४।।

२८. गुरुरूप हे कोणचे। सांग कैसे मूळ याचे।।१।। विश्वी भरला विश्वंभर। दिसे अवघाचि शंकर।।२।। तया दुजेपण नाही। साक्ष देती चारी साही।।३।। म्हणे महादेव ब्रह्मांड। उगवे एकचि मार्तंड।।४।।

२९. सद्गुरुरायाचे पद रजःकण। तेचि माझे स्नान त्रिवेणीचे।।१।। खरा देव जेणे दाखविली खूण। केले समाधान सेवकाचे।।२।। जन्ममरणाचा चुकविला पंथ। सापडला अंत अनंताचा।।३।। महादेव म्हणे धन्य ती सुशीला। माय ऐसी याला प्रसवली।।४।।

३०. भवरोगियासी ब्रह्म रसायन। सद्गुरू सुजाण वैद्य एक।।१।। तत्त्वमसि पद दाखविले मज। श्रवणी ते बीज रोपियले।।२।। आपणासमान तुकी केले तूक। वाचेने ते सुख बोलवेना।।३।। महादेव म्हणे कोटी उपकार। करतळी

शंकर ठेवियेला।।४।।

३१. ब्रह्मांडपालक पावनाचे सूत्र। अदृश्य विचित्र बाळ खेळे।।१।। सद्गुरू समर्थ भेटे पूर्णब्रह्म। तरीच हे वर्म सापडेल।।२।। कर्णाचे श्रवण मनाचे संकल्प। डोळियाचे पाप आले येथे।।३।। दावीत दडपीत येक ओठरीत। कोणी ऊर्ध्वप्रांत पाहे म्हणे।।४।। महादेव म्हणे आलो काकुलती। नेत्राची विपत्ती फार झाली।।५।।

३२. स्थिरचर भरूनि देव उरला असे। भाविकाच्या भासे दृष्टीपुढे।।१।। शास्त्र ग्रंथीकाचे न लागे कारण। पोटाचे तारण खरे आहे।।२।। भाव कैसा आहे देव कोठे राहे। ही खूण जो लाहे लक्षामाजी।।३।। महादेव म्हणे पाहिजे आधार। गुरुविणे सार न कळे काही।।४।।

३३. वाटुळे बिंदुले जेणे दाखविले। तयाची पाउले वंदू माथा।।१।। द्यावया उचित दिसते ठेंगणे। येक सेवेविणे दुजे नाही।।२।। आपुले त्वचेच्या पादुका करोनी। लेवविता चरणी नाशिवंत।।३।। महादेव म्हणे नोहेचि उत्तीर्ण। घालीन लोटांगण वारंवार।।४।।

स्थिती

३४. व्यर्थ गेला जन्म सारा। दावी पाय गौरीहरा।।१।। अपराधी मी पतित। आपुले नाम दीनानाथ।।२।। पाडसाते सांडूनि वनी। कैसी राहील हरणी।।३।। तुम्ही जननी आणि जनक। म्हणे महादेव बालक।।४।।

३५. कोटि कीटकाचे मधी। माझी वायाची उपाधि।।१।। कायावाचा झालो दास। दृढ धरिली तुमची कास।।२।। जलसिंधु उपसी कपुता। गुणसिंधु तैसे आता।।३।। मनी धरियेली हाव। पुरवा म्हणे महादेव।।४।।

३६. किती वेळ जन्म घ्यावा। फार शिणलो मी देवा।।१।। नको ताप हे त्रिविध। ठेवा आपुल्या सन्निध।।२।। उदरसंपुटी नव मास। बहु जाहलो कासावीस।।३।। महादेव म्हणे पुरे। लक्ष चौऱ्यांशीचे फेरे।।४।।

३७. माझे अपराध अगणित। नाही शंभुराया गणित।।१।। तीर्थ-व्रतांनी त्यागिले। उपेक्षिले संत महंते।।२।। करा पतिताचा सांभाळ। भरिला कीर्तीने भूगोल।।३।। महादेव म्हणे लोहा। वेगी सोने करूनि दावा।।४।।

३८. करी फोडी काष्ठे थोर। मुंगी सेवीत साखर।।१।। नको मज थोरपण।

वाहातो पायाची मी आण।।२।। केतकीचे स्थूल पत्र। पुजेलागी अपवित्र।।३।। लघु स्वासिक केवडा। कोण वंदील शिरी ताडा।।४।। रत्न धाकुटे चिमणे। परि ते देवा भूषण।।५।। महादेव म्हणे बाळ। घेती ओसंगा सकळ।।६।।

३९. माझी दीनाची करुणा। परिसावी उमारमणा।।१।। देवा धरिली तुमची कास। झालो दासाचाही दास।।२।। रंक म्हणोनी द्यावे दान। करा पतिताचे कल्याण।।३।। महादेव म्हणे आता। देवा अंत काय पाहता।।४।।

४०. गावीचे ते ओहळ। अवघे झाले गंगाजल।।१।। लोह परिसासंगती। उरे कैची पूर्वस्थिती।।२।। तैसे देव भक्त दोन। न धरी म्हणोनि शरण।।३।। महादेवा सांभाळावे। ब्रीद आपुले राखावे।।४।।

४१. नाही केले तीर्थाटन। नाही आवरिले मन।।१।। नाही सोडिला संसार। विलोकिला गौरीहर।।२।। नाही शिणविले शरीर। नाही सेविले कांतार।।३।। संती दाखविले मूल। देव जैसा मुक्ताफल।।४।। महादेव म्हणे धन। भरिले ब्रह्मांड सदन।।५।।

४२. लक्ष चौऱ्यांशीचे फेरे। घेता मी शिणला पुरे।।१।। शरण आलो तुमच्या पाया। करा कृपेची ती छाया।।२।। राहो जावो हे शरीर। ठेवा अक्षयी अमर।।३।। म्हणे नीलकंठ बाळ। येवढी आळ पुरवावी।।४।।

४३. मज भेटो ऐसा सिद्ध। होय जेणे ब्रह्मबोध।।१।। तयावरूनि पंचप्राण। दीप जैसा ओवाळीन।।२।। पादुका चरणी त्याच्या। करीन आपुल्या त्वचेच्या।।३।। महादेव म्हणे मन। झाले उन्मन कृपेन।।४।।

४४. मज कैचे ज्ञान खरे। बोलविले श्रीशंकरे।।१।। किती पृथ्वीचे वजन। आणू ताजवा कोठून।।२।। कोण्या मापे मोजू सिकता। कैसा सविता लागे हाता।।३।। म्हणे महादेव गुणसिंधू। लंघू केवी दीनबंधू।।४।।

४५. ग्रंथ वाचोनी काय। तुमचे अंतरले पाय।।१।। नाही घडला साधुसंग। दुरावला उमारंग।।२।। जन्मोनिया केले काय। व्यर्थ शिणविली माय।।३।। म्हणे महादेव अभागी। नोहे मोक्षाचा विभागी।।४।।

४६. नरजन्म गेला वाया। तुम्हाविण देवराया।।१।। नाही शोधिले सारासार। मग कैचा परोपकार।।२।। घडले नाही तीर्थाटन। अनिवार नावरे मन।।३।। म्हणे महादेव तारुण्य। गेले आले वृद्धपण।।४।।

४७. तृषाक्रांता लाभे शीतळ उदक। तोचि जाणे सुख त्याचे तोचि।।१।। बहुता दिवसा जननीची भेटी। बाळ घाली मिठी आनंदाने।।२।। तैसे तुम्हाविण झाले देवराया। सोडविना पाया तुमचे आम्हा।।३।। महादेव म्हणे कृपणाची गाठी। ह्रदयी संपुटी धरियेली।।४।।

४८. मंद माझी बुद्धी कैसे गावे गुण। जिव्हाग्री आपण बैसा देवा।।१।। मुक्याचा वाचाळ चालेल पांगूळ। जरी जाश्वनीळ वश झाला।।२।। महादेव म्हणे देवा तू परीस। लोहां आम्ही त्रास फार दिला।।३।।

४९. गंगेने त्यागिले ग्रामथिल्लरासी। शरण कवणासी जावे तेणे।।१।। मत्स्यावरी जल जरी कोपू पाहे। तरी प्राण जाय तत्क्षणी।।२।। वृक्षाने पक्ष्यासी ठाव नाही दिला। तरी व्यर्थ गेला जन्म त्याचा।।३।। महादेव म्हणे देवा आम्ही घण। सोसावे ऐरण होऊनिया।।४।।

५०. ललाट पटांत तुम्हीच लिहिले। निमित्तासी केले पात्र आम्हा।।१।। देवा तुम्हा आला भक्तांचा हा त्रास। असा सावकाश येकलेचि।।२।। देवा म्हणोनि हाका माराव्या त्या कोणी। पाहा मनापाशी विचारूनी।।३।। महादेव म्हणे वाटेल निर्वाण। कैचे मी-तूपण तेथे आहे।।४।।

५१. काय मी पामरे वर्णावे ते गुण। परब्रह्म सगुण झाला तुम्ही।।१।। ब्रह्मांडकरंडा भरले स्वरूप। भव विश्वरूप तूचि देवा।।२।। चंद्रार्क वन्हि शिवा तुझे नेत्र। पाणि ते पवित्र पुरंदर।।३।। महादेव म्हणे स्थूल ना सूक्ष्म। चिन्मय रमण पार्वतीचा।।४।।

५२. हरीच्या पाडिया पीडी ते जंबूक। काय त्यासी सुख जनकाचे।।१।। शिवभक्त म्हणोनि बोलती हे जन। लागेल दूषण न कळे कोणा।।२।। धेनुकांसे क्षीर भरूनि ते वाहे। क्षुधे प्राण जाये वत्साचा तो।।३।। महादेव म्हणे माउलीने बाळ। सांडिता सांभाळ करील कोण।।४।।

५३. सिंधू सरितेसी उपेक्षील जरी। काय मग थोरी असोनि त्याची।।१।। तैसे ह्या जीवाचे ब्रह्म नाही झाले। श्रम व्यर्थ गेले तुमचे देवा।।२।। शिवशक्तिरूपे उभारिला पिंड। आरंभिला दंड काय आता।।३।। नाचती चकोरे पाहूनि तो इंदु। अमृताच्या बिंदु लाभासाठी।।४।। महादेव म्हणे तरूचि कोपला। शाखेसी अबोला धरिला तेणे।।५।।

५४. अष्ट प्रहर गेले नामाविणे व्यर्थ। भवजळी परमार्थ बुडविला।।१।। लाचावली जिव्हा विषयाची गोडी। काळाचा बराडी अन्ना जैसा।।२।। दैवे हाता आली धेनु क्षीरता ही। अर्की दुग्धासाठी वनी हिंडे।।३।। महादेव म्हणे सांडूनि ते वारी। मग कैंची उरी मीनालागी।।४।।

५५. देव जोडे ऐसा दाखवा तो पंथ। वाचूनि हे ग्रंथ वेडावलो।।१।। कोणत्या साधने साधे निरंजन। तयाचे अंजन द्यावे मज।।२।। अभ्यासिले ज्ञान बहू पाठांतर। वर्म ते शंकर कोठे आहे।।३।। नाही तरी आता असावे निवांत। सापडेना अंत अनंताचा।।४।। महादेव म्हणे संसाराचा काला। लाभ दुरावला परत्राचा।।५।।

५६. अधिकार काय पाहता पतिताचा। झालो काया वाचा दास आम्ही।।१।। शिवभक्त म्हणोनी उद्धरावे देवा। सांभाळावे नांवा आपुलिया।।२।। आम्हा कैची लाज जन्म घ्यावयासी। मिरास चौऱ्यांसी मुळीची आहे।।३।। महादेव म्हणे कुबेराचा सुत। फिरले मागत रंकापुढे।।४।।

५७. आम्हासी चोरूनि ठेविले निजगुज। काय देवा तुज म्हणो आता।।१।। ठका महाठका पडलीसे गाठ। लुटूनि सपाट करू आता।।२।। कांता कनक बीज देऊनि भुलविले। स्वहित अंतरिले आमुचे तुम्ही।।३।। आजवरी बहू केला आम्ही श्रम। आता भक्तिवर्म सापडले।।४।। महादेव म्हणे गुप्त आले हाता। वाटीन समर्था नाम तुझे।।५।।

मागणी

५८. लडिवाळ आपुले बाळ। येवढी पुरवावी आळ।।१।। माझा इतुलाचि छंद। भक्तिमकरंद भातुके।।२।। नको हेम अलंकार। उमावर दोघाविणे।।३।। महादेव तुमचे तान्हे। आन नेणे माउलिये।।४।।

५९. नको मज मोक्ष देवा। जन्मोजन्मी घ्यावी सेवा।।१।। आपण सन्निध असावे। हेचि लिहूनिया घ्यावे।।२।। पाहू नये अधिकार। कीर्ती वाढेल अपार।।३।। महादेव म्हणे लोहा। देवा सोने करूनि दावा।।४।।

६०. गर्भवास प्रिय मोठा। मज द्यावा नीलकंठा।।१।। जन्मोजन्मी आपुले गुण। देवा आवडीने गाईन।।२।। नको तुमचे मोक्षसुख। वारंवार दावा मुख।।३।। म्हणे महादेव उंची सोनें। काय अलंकाराविणे।।४।।

६१. लक्ष चौऱ्यांशीचे पोटी। अवचट झाल्या भेटी।।१।। आता हेचि द्यावे देवा। जन्मोजन्मी घ्यावी सेवा।।२।। माझ्या जिव्हाग्री बैसावे। कळे तैसे बोलवावे।।३।। महादेव म्हणे भावे। नामसत्र चालवावे।।४।।

६२. द्यावी सेवेची निकट। भक्ती असे एकनिष्ठ।।१।। अणू रेणू परमाणू। यावे पाहण्यात समानू।।२।। स्थूल सूक्ष्म कारण। यात नोहे भिन्नाभिन्न।।३।। म्हणे महादेव दासासी। करूनि द्यावी हे मिरासी।।४।।

६३. जन्म घेऊ वारंवार। जोडे जरी उमावर।।१।। मग हो का नारीनर। भजू आवडी शंकर।।२।। वरी येक द्यावे देवा। घडो शिवदासाची सेवा।।३।। महादेव म्हणे मोक्ष। कैसा भोगील अलक्ष।।४।।

६४. तोडी तोडी ह्या भवपाशा। आनंदघनविलासा।।१।। त्रिनयना महाराजा। करिसी रंकाचा राजा।।२।। मृग उद्धरूनि नेले। तारामंडली स्थापिले।।३।। महादेव तुझे पायी। ठेवी वारंवार डोई।।४।।

६५. शेवटची विनवणी। परिसावी शूलपाणि।।१।। इतुकेचि द्यावे दान। जवळी राहावे आपण।।२।। गोड नाम निरंतर। सेवकासी अलंकार।।३।। महादेव म्हणे धन। माझे पार्वतीजीवन।।४।।

६६. भाळी स्रवते चंद्रामृत। आनंदले चकोरभक्त।।१।। मौळी गंगेचे जीवन। करी त्रैलोक्या पावन।।२।। परोपकारी हे भूषण। म्हणोनि केला नंदिवाहन।।३।। महादेव म्हणे देवा। आम्हा द्यावी तुमची सेवा।।४।।

६७. उपदेशिले मज ज्ञान। गुरुरूपचि आपण।।१।। पामरासी अधिकार। दिला म्हणोनि बोले फार।।२।। ब्रीदा सांभाळावे आता। बाळा पोशी जेवी माता।।३।। महादेव म्हणे देवा। शिवा तुमची घडो सेवा।।४।।

६८. नवनिधी द्रव्य कुबेर भांडारी। आम्ही दीन द्वारी वाहतसो।।१।। मुक्तीचे याचक मागू आलो दान। सायुज्याची खाण उघडी देवा।।२।। येणे जाणे खत फाडूनि टाकावे। अक्षयी राखावे पायापाशी।।३।। महादेव म्हणे पुरे येरझारा। हेचि गौरीहरा द्यावे आता।।४।।

६९. संचित प्रारब्ध आणि क्रियमाण। डुललेले हे गहाण पायापाशी।।१।। चित्त मन दास करावे दातारा। कल्पनेचा थारा मोडी देवा।।२।। सांडूनिया अंग करावे नि:संग। हेचि उमारंग द्यावे आता।।३।। महादेव म्हणे देवभक्त

एक। झाल्याविणे सुख कोठोनिया।।४।।

७०. आपुला म्हणोनि सांभाळावे देवा। घडो काही सेवा तुमची मज।।१।। लडिवाळपणे बोबडे बोलणे। सावडेचि राहणे उमापती।।२।। अश्लाघ्य म्हणोनि टाकू नये दुरी। श्लाघ्यतेची थोरी करूनी दावी।।३।। महादेव म्हणे समर्थाचा दास। मान्य तो सर्वास सहज होतो।।४।।

७१. दीनानाथा ब्रीद सोडोनि ते द्यावे। शेवटीचे घ्यावे दंडवत।।१।। आपुले स्वरूप भृंगी दे अलिका। कोण त्या कीटका अभिमान।।२।। कळू आले आता तुमचे देवपण। स्वप्नीचे हे धन हाता नये।।३।। श्रुतीचे प्रमाण ऐकूनि विश्वास। धरियेली कास दृढ भावे।।४।। महादेव म्हणे बोल हे नि:संग। लाज उमारंग सांभाळील।।५।।

७२. विबुध अवतार धरिले अनंत। फिटली ही भ्रांत आमुची आता।।१।। गर्भवास सर्व साधनाचे सार। देई वारंवार शंभुराया।।२।। ध्रुव म्हणे गुंतलो मागूनि अढळ। करी तळमळ जन्मावया।।३।। अवघे ब्रह्मरूप शुद्ध निरंजन। सद्गुरू अंजन भरिले डोळा।।४।। महादेव म्हणे नको मज मोक्ष। मुळीचे अलक्ष बद्ध नाही।।५।।

७३. इतुकेचि आता मज द्यावे दान। पार्वतीरमण देवराया।।१।। करा सेज माझे हृदयमंदिर। तेथे निरंतर अचल रहावे।।२।। शांतिसुमनाचे रचियले भार। अद्वैताचा हार गुणरहित।।३।। महादेव म्हणे भक्तिबळे शिव। आकळिला जीव ऐक्य झाला।।४।।

७४. इतुकेचि आता मागणे दातारा। पुरवावी शंकरा आळ माझी।।१।। आपुले स्वरूप असो निरंतर। नेत्रांच्या समोर सेवकाच्या।।२।। याहूनिही थोर दिल्हे जरी दान। नको वाहतो आण तुमची देवा।।३।। महादेव म्हणे साक्षीसमरस। करूनि मीरास द्यावी।।४।।

७५. सकळांसी हेचि मागणे शेवटी। हृदयी संपुटी दृढ धरा।।१।। शिवनाम कंठी न पडो विसर। पार्वतीचा वर मुक्ती देतो।।२।। कल्याणदायक परिसावी उत्तरे। पहा सारासार विचारूनी।।३।। महादेव म्हणे प्रसादाची वेळ। सुषुप्तीत काळ दवडूं नका।।४।।

शिवमहिमा

७६. चहू वेदांचे जिव्हार। येक माझा उमावर।।१।। अठरा भार वनस्पती। रोपी पार्वतीचा पती।।२।। अवघे जीव चराचर। विनटला गौरीहर।।३।। म्हणे महादेव ओतप्रोत। दक्षदुहितेचा कांत।।४।।

७७. श्रुती शास्त्रे मौनावली। फणिमुखे ती शिणली।।१।। निरामय निरंजन। सनकादिकांचे ध्यान।।२।। तो हा माझा विश्वनाथ। विश्व चाळूनि अतीत।।३।। म्हणे महादेव निर्गुण। भक्तांसाठी झाला सगुण।।४।।

७८. सर्व देवांमध्ये थोर। येक माझा श्रीशंकर।।१।। तो हा पार्वतीचा पती। अवघी तयाची विभूती।।२।। तोचि ॐकाराचे मूळ। ज्यासी नाही याती कुळ।।३।। चारी वेदांचे जीवन। त्यासी महादेव शरण।।४।।

७९. किरीट कुंडले शोधिता। शिणले दोघे धाता पिता।।१।। ऐसी यासी नलगे ठाव। आम्ही बापुडे मानव।।२।। आगमनिगमा न कळे अंत। पडली अष्ठाविसा भ्रांत।।३।। महादेव झाले वेडे। आपण पुढे बोलवावे।।४।।

८०. अधिकार काय पाहता। शंभुराया दीनानाथा।।१।। चराचर शिवरूप। ऐसा श्रुतीचा संकल्प।।२।। तुम्हाविणे दुजे नाही। साक्ष देती शास्त्रे साही।।३।। म्हणे महादेव कोपला। तरुशाखेसी अबोला।।४।।

८१. वत्सलांछन हृदयी। ब्रीद मिरवी शेषशायी।।१।। तो हा माझा विश्वेश्वर। करी आरोहण शंकर।।२।। सुरपतीचे सिंहासन। दिले भूतली टाकून।।३।। सोळा गावे श्वासे रथ। उडविला विष्णुसहित।।४।। झाले युद्ध घोरांदर। केले त्रिदशे बेजार।।५।। म्हणे महादेव मत नोहे। स्कंदपुराणी शोधावे।।६।।

८२. कूर्मनाभीसी आधार। दिला एक रोमागर।।१।। त्याचे पृष्ठी वसुंधरा। धरी आपण शंकरा।।२।। शेषरूप ते आपुले। ऐसे वेदे निरूपले।।३।। केली ब्रह्मांड उभवणी। लोळे महादेव चरणी।।४।।

८३. सदाशिव नाम मंत्र चतुर्वर्ण। जपे जो अंतरी सर्वकाळ।।१।। तीर्थे त्याचे पायी ओढविती माथा। पादधुळी न्हाता सुखावली।।२।। ब्रह्मादिक ज्याचे वंदिती चरण। जितेची मरून मुक्त झाले।।३।। महादेव म्हणे सर्वासी आधार। जीव चराचर उद्धरिले।।४।।

८४. पंचवदनाचे एक्या आननाने। होईल वर्णन केवी घडे।।१।। दशपाणि ज्याचे त्याचे दो करांनी। करावे पूजन सांग कैचें।।२।। पंचदश अक्षा नेत्रद्वये जाण। धरावे ते ध्यान कैसे आता।।३।। महादेव म्हणे वेडावला जीव। मनाची ही धाव खुंटली असे।।४।।

८५. सहस्रमुख शेष वर्णिता शिणला। तोहि हार झाला कंठी ज्याच्या।।१।। परा ही पश्यंती मध्यमा वैखरी। वेद वाणी चारी मौनावल्या।।२।। भांबावली साही अष्टादश वेडी। काळाची बोबडी वळली तेव्हा।।३।। महादेव म्हणे काय बोलूं फार। अंत नाही पार तुमचा देवा।।४।।

८६. सिंधू मषीपात्र पृथिवीचे पत्र। लिहीत विचित्र कंजकन्या।।१।। शेवटीचा शेरा करावा श्रवण। धरियेले मौन शारदेने।।२।। राहिली लेखणी ठेवियेली कानी। काय अन्य प्राणी करील तेथे।।३।। ऐसे याचे गुण पार नाही गेले। महादेव बाहुले नाचविता।।४।।

८७. वर्णिता शिणले गुण अठ्ठावीस। मौनावला शेष देवराया।।१।। तेथे मी पामर कोण विश्वनाथा। चरणावरी माथा ठेवीतसे।।२।। ब्रह्मादिक ध्यानी ध्याती निरंतर। मानव किंकर बापुडे ते।।३।। महादेव म्हणे पहा सिंहापुढे। मार्जार पोवाडे दावीतसे।।४।।

८८. देव पाहता आहे रतीहुनी लहान। श्रुति निरूपण ऐका बरे।।१।। खंब्रह्म म्हणोनि दुसरे प्रमाण। आता भिन्न भिन्न कैचे तेथे।।२।। परि ते ब्रह्मांड भरूनी उरले। शेष दशांगुले वरी असे।।३।। महादेव म्हणे सद्गुरुवाचोन। नकळे ती खूण कोठे आहे।।४।।

शिवनिष्ठा

८९. शिवभक्त ऐसे बोलती हे जन। दुजिया शरण कैसे जावे।।१।। कल्पतरूचा पक्षी न शिवे बाभूळ। बैसोनिया फळ काय तेथे।।२।। धनवंत पुत्र फिरे लोकद्वारी। अन्नसत्र घरी असोनिया।।३।। महादेव म्हणे देवाधीशा देवा। सांभाळावे नावा आपुलिया।।४।।

९०. लोकलाजेवरी सोडियेले पाणी। नाचू या कीर्तनी आंनदाने।।१।। गाऊ ते अभंग ज्यासी नोहे भंग। आणू उमारंग हृदयामाजी।।२।। या परते ज्ञान न ऐको श्रवणी। ठेवावे बांधोनी असले जरी।।३।। महादेव म्हणे आम्ही

शिवदास। येथे नाही आस दुजियाची।।४।।

९१. जाळिला मदन अग्नीने अक्षीच्या। मोडिला दक्षाचा यज्ञ जेणे।।१।। त्रिपुर मर्दुनी निर्जर रक्षिले। विष ते भक्षिले अनिवार।।२।। शोधिता उदार तुम्हा ऐसा कोण। दशकंठा दान दिली अंबा।।३।। महादेव म्हणे मागावे ते काय। सांडोनिया पाय तुमचे देवा।।४।।

९२. क्षीरसिंधुतीरी चातकाचे राहणे। परि मेघाविणे तृषाक्रांत।।१।। तैसे शिवभक्त आम्ही क्रियावंत। झाला जरी अंत सुख मानू।।२।। तरी तुम्हाविणे दुजिया शरण। जाईल हा प्राण तत्क्षणी।।३।। महादेव म्हणे सखा शितिकंठ। वारील संकट पडिले जरी।।४।।

९३. उदार म्हणोनि ऐकियेले कानी। गर्जती पुराणी शास्त्रे साही।।१।। बहुतासी केले देवचि आपण। तेथे मीतूपण उरले नाही।।२।। कृपणता कैसी आता हे धरिली। मुक्ती ते सरली ऐसे वाटे।।३।। महादेव म्हणे स्वामी उमारंगा। शरण जाऊं सांगा कोण्या देवा।।४।।

९४. गर्जती पुराणे भोळ्या नीलकंठा। दीनाची उत्कंठा पूर्ण करी।।१।। त्रैलोक्याचा नाथ ऐकियेले कानी। काय शूळपाणि अंत पाहसी।।२।। प्राण गेला तरी पृथ्वीचे उदक। न घेती चातक मेघाविणे।।३।। महादेव म्हणे देवा तुझी आण। अन्यासी मी शरण जाय जरी।।४।।

९५. प्राणहीन वपू नाथहीन घर। कोरडा सागर जलाविणे।।१।। देवा तुम्ही आम्हा उपेक्षिले जरी। दुजा धरेवरी कोण आहे।।२।। दीनानाथ नाम बांधियले ब्रीद। आता शुद्धाशुद्ध निवडो नये।।३।। महादेव म्हणे स्वामी हा शंकर। पाहिजे समोर सूत्रधारी।।४।।

९६. आपुल्या स्वहिता धरियेली कास। विदित पायास सर्व आहे।।१।। पार्वतीशंकरावाचोनि आसरा। नाही गा दातारा कोठे आम्हा।।२।। उपेक्षिले जरी लागेल दूषण। आपुले भूषण सांभाळावे।।३।। महादेव म्हणे घेतले धरणे। सांगावे गाऱ्हाणे कोणापुढे।।४।।

भक्ती

९७. डोळे तुम्हासी प्रार्थना। पहा कैलासीचा राणा।।१।। ऐका उभय श्रवण। माझ्या शंकराचे गुण।।२।। शिव शिव वदे वाणी। करटाळिया

कीर्तनी।।३।। महादेव म्हणे मन। झाले सहज उन्मन।।४।।

९८. सर्व सुखाचे भांडार। तो हा पार्वतीचा वर।।१।। गाऊं नाचू आनंदाने। पाहूं कैलासीचे केणे।।२।। भक्तासाठी भूमंडळ। धुंडाळितो जाश्वनीळ।।३।। महादेव म्हणे भोळा। भरो माझ्या दोही डोळा।।४।।

९९. आम्हा न लगे तपोवन। जवळी पार्वतीरमण।।१।। जरी का स्नानपाने मुक्त। मीन अक्षय्य गंगेत।।२।। तैसी मेश परनाशनी। व्यर्थ दर्दुराची वाणी।।३।। श्रम हा महादेवा नको। वायुआहारी व्याल लाखो।।४।।

१००. माझे जीवीचे जीवन। तो हा पार्वतीरमण।।१।। काया वाचा आणि मन। झाले अनन्य शरण।।२।। ऐसा निश्चय जयाचा। योगक्षेम वाहे त्याचा।।३।। म्हणे महादेव निर्गुण। भक्तांसाठी झाला सगुण।।४।।

१०१. भस्म जयाचे ललाटी। रुद्राक्षांचा हार कंठी।।१।। मुखी शिव शिव उच्चार। तया माझा नमस्कार।।२।। घडो ऐसियाचा संग। तेथे राहे उमारंग।।३।। महादेव म्हणे हे नर। स्वये झाले ते शंकर।।४।।

१०२. कोटी पुण्याचे पर्वत। म्हणोनि झालो शिवभक्त।।१।। आता इतुकेचि द्यावे। येणे जाणे खुंटवावे।।२।। कठीण हा गर्भवास। शीण झाला नव मास।।३।। महादेव म्हणे देहक्लेश। भोगिता हे कासावीस।।४।।

१०३. परिसाचे थोरपण। लोहाविण ठेवील कोण।।१।। वैद्ये रसायन केले। रोगी नसता व्यर्थ गेले।।२।। दीपप्रकाश सुंदर। त्याचा ग्राहक अंधार।।३।। म्हणे महादेव तैसे आम्ही। म्हणोनि देवा झाला तुम्ही।।४।।

१०४. धन्य धन्य शिवदीक्षा। लावी कलिकालासी शिक्षा।।१।। भाळी रेखिला त्रिपुंड्र। मुखी अजपा अखंड।।२।। गळा रुद्राक्षांचे हार। झाला दुरिताचा संहार।।३।। महादेव तोचि म्हणे। येणे जाणे खुंटवावे।।४।।

१०५. धन्य धन्य शिवभक्ति। अढळ सायुज्याची मुक्ति।।१।। सरूप समीप सलोकता। जन्म होय पुण्यसरिता।।२।। नाही कलिकाळाचें भय। मग इतराचे काय।।३।। म्हणे महादेव अवचित। लाभ झाला नाही अंत।।४।।

१०६. शिव शिव हाचि मंत्रराज थोर। करील संहार दुरिताचा।।१।। किंचित् स्फुल्लिंग तृणाचे अचल। जाळील समूल नाम तैसे।।२।। अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ। पाहिजे प्रेमळ भक्त येथे।।३।। महादेव म्हणे

पार्वतीवल्लभ। भाग्यवंता लाभ देत असे।।४।।

१०७. नगदुहितेचा पति मित्र जोडू। कलिकाळाचा पाडू काय आम्हा।।१।। सुखाचे आगर वेदाचे जे सार। साधूचे माहेर आनंदाचे।।२।। आनंदाचा कंद दयेचा सागर। चातकाचा आहार मेघ जैसा।।३।। महादेव म्हणे भवभय नाही। कोंदले सबाह्य शिवरूप।।४।।

१०८. देवद्वारी उभा राहे एक पळ। दंडवत काळ करील तया।।१।। शिव शिव वाचे भावे उच्चारिता। मुक्ति सायुज्यता लाभ होय।।२।। पाप पुण्य तेथे ना शिवे विकल्प। अवघाचि संकल्प ब्रह्म म्हणोनी।।३।। महादेव म्हणे धन्य शिवदास। मरूनि पोटास यावे त्याच्या।।४।।

१०९. प्रेमळाचा देव झालासे अंकित। शत्रुसी जिंकीत क्षणामाजी।।१।। परि ऐसा दास लक्षामाजी एक। तया पंचमुख वश झाला।।२।। वृंदावन फळ दिसते सुंदर। अंतरी जहर भरिले असे।।३।। महादेव म्हणे साक्ष उमारंग। खरे असो ढोंग जाणे तोचि।।४।।

११०. प्रातःकाळी होता शिवाचे दर्शन। निशीचे दुरित दहन झाले।।१।। आजन्माचे दोष माध्यान्ही संहार। करी गौरीहर भाविकाचे।।२।। सायान्ही ते सप्तजन्म फळा आले। पाहाता पावले शंकराचे।।३।। महादेव म्हणे कैलासी मिरास। देतो सेवकास भोळा देव।।४।।

१११. चिताभस्म भाळी रेखिला त्रिपुंड्र। गळाहार रुंड शोभतसे।।१।। नीलकंठ ब्रीद पतितपावना। पार्वतीजीवना धरियेले।।२।। दीनोद्धारालागी सोडले कैलास। भूमंडळी वास केला तुम्ही।।३।। सायुज्यपदाचे आरंभिले सत्र। देवा पात्रापात्र निवडू नये।।४।। महादेव म्हणे आलो मी वराडी। स्वानंदाची गोडी चाखावया।।५।।

११२. शरण रिघेल जो कायामनेवाचा। देव ऋणी मग होईल त्याचा।।१।। वैद्य तो आरोग्य करील हे सत्य। जरी रोगी सांभाळील पथ्य।।२।। लोहचि पाहिजे त्या परिसाला। घासूनि काय व्यर्थ पितळाला।।३।। महादेव म्हणे सम काग कोकिळा। सहज निवडतील वसंतकाळा।।४।।

११३. चातकाने काय घनाच्या उपकारा। उत्तीर्ण दातारा कैसे व्हावे।।१।। दासालागी दान दिली सायुज्यता। तेथे काय वाहता सम होय।।२।। अमृताचा

कवळ ओगरिला ताटी। तया कांजी वाटी कैसी द्यावी।।३।। महादेव म्हणे लाजविते चित्त। द्यावया उचित कोठे नाही।।४।।

११४. पंचमहाभूते झडपील जाण। भेटेल सुजाण कोण ऐसा।।१।। ओगरील कानी मंत्र पंचाक्षर। आणील सामोर मजलागी।।२।। ब्रह्म सनातन देईल जो दान। भावे पंचप्राण ओवाळीन।।३।। महादेव अक्ष राहिले अचळ। मग स्वातीफळ सापडले।।४।।

११५. नको शास्त्राभ्यास घोकावे निशिदिन। तुझे पायी मन जडो माझे।।१।। इतुकेचि देई न मागे आणिक। वाटे ऐसे सुख कोठे नाही।।२।। तीर्थींचे आगर पदजलबिंदु। पुरेना क्षीरसिंधू उपमेसी।।३।। महादेव म्हणे ठेवी तेथे चित्त। तोचि भाग्यवंत अहर्निशी।।४।।

मंत्र

११६. कोटी यागांचे सुकृत। म्हणूनि झालो शिवभक्त।।१।। अंग लिंगा समरस। तया कैलासी मिरास।।२।। मंत्रराज पंचाक्षर। जया मुखी निरंतर।।३।। महादेव म्हणे नर। स्वये झाला तो शंकर।।४।।

११७. मंत्रामाजी पंचाक्षर। देवामाजी श्रीशंकर।।१।। तैसे नाम कलियुगी। सेवी तया करी अरोगी।।२।। नामरूपा आले फळ। नाम ब्रह्मचि केवळ।।३।। महादेव म्हणे सदोदित। आम्ही घेऊ नामामृत।।४।।

संत

११८. सबाह्य आभ्यंतर। जया कोंदला शंकर।।१।। त्याचे पादधूलिस्नान। आम्हा त्रिवेणीसमान।।२।। उरले नाही ध्येय ध्यान। वृत्ती झाली ब्रह्मार्पण।।३।। महादेव म्हणे मुक्त। स्वप्न सुषुप्ती जागृत।।४।।

११९. धन्य धन्य साधुसंग। आकळिला उमारंग।।१।। पूर्वतपा आले फल। झाला जन्म हा सफल।।२।। वाचे बोलवेना सुख। तान्ह हरपली भूक।।३।। महादेव म्हणे घन। सिंधु येकचि जीवन।।४।।

१२०. तोचि एक भाग्यवंत। आकळिला उमाकांत।।१।। नम्र झाला सर्वांभूती। भासे शिवाची विभूती।।२।। दैताद्वैत मावळले। ऐक्यरूपी फळ आले।।३।। उरले नाही दुजेपण। तया महादेव शरण।।४।।

१२१. ज्ञान चातुर्य वैराग्य। वसे जेथे धन्य भाग्य।।१।। घडो त्याचे

दर्शन। जाऊं अनन्य शरण।।२।। आपण तरोनि तारी जन। जैसे मीनासी जीवन।।३।। महादेव म्हणे शैव। तोचि एक सदाशिव।।४।।

१२२. लोहाने परिसाची धरिली संगती। तेणे पूर्वस्थिती पालटली।।१।। साधुसमागम तैसाचि दुर्लभ। पार्वतीवल्लभ जोडे जेणे।।२।। गावीचे ओहोळ जाले गंगारूप। सोडील संकल्प तीर्थ म्हणोनी।।३।। महादेव म्हणे नरजन्म वाया। जातो शंभोराया सांभाळावे।।४।।

१२३. कुर्मा तान्ही बाळे पोशिली प्रीतीने। अन्य दुधाविणे न वाढती।।१।। नीरामाजी क्षीर निवडितो हंस। वर्म ते वायस नेणे त्याचे।।२।। जळी निद्रा आहार मीन भोगी सोहळा। जाय त्याचे कुळा कळे त्यासी।।३।। महादेव म्हणे साधु आणि जन। होतील समान कैसे आता।।४।।

१२४. पाषाण परीस सारखेचि पाहता। तैसा मोक्षदाता लक्षामाजी।।१।। सापडेना अंत पडूं पाहे भ्रांत। कोणही सिद्धान्त नोहे तेथे।।२।। नीरक्षीर हंस निवडितो जैसा। पाहिजे तो तैसा भाग्यवंत।।३।। महादेव म्हणे साक्ष समरस। धन्य ते पुरुष लक्षामाजी।।४।।

१२५. जरायुज अंडज स्वेदज उद्भिज। चारी ब्रह्मबीज रोपियले।।१।। नाही नाही कोठे पाहता रिता ठाव। भरला देवराव मागे पुढे।।२।। अभाविकालागी परि ते दुर्लभ। भाविका सुलभ सहज आहे।।३।। महादेव म्हणे धरा साधुसंग। घरा उमारंग बळे येतो।।४।।

अनुभूती

१२६. डोळियाचा डोळा उघडिला जेणे। कैलासीचे केणे दाखविले।।१।। गगनगाभारा कोंदला घनदाट। कोठे औट पीठ पाहूं आता।।२।। सद्गुरुप्रसादे हंस जीव झाला। ओगरु वाढिला स्वातीचा तो।।३।। महादेव म्हणे झालो वेडापिसा। मुक्ते दाही दिशा विखुरली।।४।।

१२७. सुखा नाही अंतपार। पाहिला उमाशंकर।।१।। देव माझा मूळस्तंभ। जेवी स्वानंदाचा कोंब।।२।। चंद्र शक्ति शिव दिनकर। तोचि प्रणवाचा उच्चार।।३।। छत्तीसावी जीवनकला। अष्ट सोळा चार बारा।।४।। महादेव सांगे खूण। सांभाळावा संकर्मण।।५।।

१२८. प्रेमे पाझरे सर्वांग। जवळी आला उमारंग।।१।। कंठ झाला

सद्गदित। अश्रु आनंदाचे वहात।।२।। भरते दाटले अपार। आला स्वानंदाचा पूर।।३।। स्वानुभवाचा मकरंद। नेत्र मिलिंद सेवीत।।४।। महादेव म्हणे इंदु। पाहता उचंबळे सिंधु।।५।।

१२९. जन्मा आलियाचे फल। आजि जाहले सुफल।।१।। गुणरत्नाचे भांडार। आवडीचे अलंकार।।२।। चला घालू रे दरवडा। देव आहे भोळा वेडा।।३।। बांधू मोट दाबू पटे। लुटू फुकट सर्वांसी।।४।। न घे त्यासी करू दंड। भक्तिबंड आरंभावे।।५।। तुम्ही वाचवावे प्राण। द्यावे मजला धरून।।६।। महादेव म्हणे धरा। देवा सापडलो बरा।।७।।

१३०. शुद्ध संकल्पाचे फळ। करी ब्रह्मचि केवळ।।१।। वृत्ती पालटोनि जाय। चित्त समाधान होय।।२।। मन बुद्धी पांगुळली। स्मरणे हळहळ गेली।।३।। म्हणे महादेव किंकर। झाला अवघाचि शंकर।।४।।

१३१. ज्ञान अज्ञानाची पाती। मिथ्यापणे लवत होती।।१।। स्थिर नेत्राचे आगर। आपण उभेचि समोर।।२।। सहजसमाधीचे सुख। तहान हारपली भूक।।३।। पाहे महादेव जिकडे। रूप भासे चहूकडे।।४।।

१३२. अनिर्वाच्य जाती वाणी। शब्द सामावला गगनी।।१।। जली मिळाले ते जल। तेज शोधी आपुले मूळ।।२।। वायू आणि वसुंधरा। गेली तेही स्वमंदिरा।।३।। लय झाला हो पिंडाचा। महादेव तेथे कैंचा।।४।।

१३३. अखंड मंडलाकार। स्वरूप व्यालें चराचर।।१।। नेति नेति म्हणे श्रुती। तेथे माझी वाचा किती।।२।। आपण बोलविले बोल। तेचि लिहिले अमोल।।३।। झाला महादेवा आनंद। अवघा भासे ब्रह्मानंद।।४।।

१३४. माझे मज दाखविले। होते जुनाट ठेविले।।१।। धन्य कोणती सुशीला। ऐशी प्रसवली याला।।२।। ज्ञाने कासिले तीक्ष्ण। उडविले जीवपण।।३।। आणिले अदृश्य उजेडा। आले अमरफल पाडा।।४।। महादेव म्हणे दान। दिले अचल निधान।।५।।

१३५. काय गावे काय ल्याहावे। वाटे मौनचि धरावे।।१।। चित्त झाले चिदानंद। अवघा कोंदला आनंद।।२।। मज शंकरावाचूनी। दुजे न दिसे नयनी।।३।। महादेव म्हणे धालो। विसरली पाती हालो।।४।।

१३६. महालाभ आजि झाला। आले भाग्य उदयाला।।१।। देव

पंचवदनाचा। माझा जिव्हाळा जीवीचा।।२।। चाड नाही आणिकाची। वाहतो आण निर्वाणीची।।३।। महादेव म्हणे अर्थ। माझे पुरवील समर्थ।।४।।

१३७. आज भाग्याचा तरणी। उदय झाला वाटे गगनी।।१।। कोण पुण्य फळा आले। म्हणोनि पाहिली पाउले।।२।। गजच्छाया महोदय। कपिलाषष्टी अर्धोदय।।३।। सर्व पर्वे येकवटली। महादेवा भेटी झाली।।४।।

१३८. त्रिगुणाची वळली वाती। दिव्य ज्योती प्रकाशली।।१।। नाम रूप हे सगुण। नाही उरले मीतूपण।।२।। अलंकार ते आटले। अवघे सोनेचि जाहले।।३।। म्हणे महादेव शंकर। आहे मुळीचा निराकार।।४।।

१३९. नग्न मौन जयासाठी। विवरी कोरली कपाटी।।१।। पंचाग्नि धूम्रपान। घेती दर्भांगी जीवन।।२।। कोण तपांचे साकडे। तो हा उभा आम्हापुढे।।३।। महादेव म्हणे वीरशैवा। धन्य जन्म लिंगसेवा।।४।।

१४०. मन मोहिले शंकर। सुटती प्रेमाचे पाझर।।१।। जनी वनी पाहता उभा। दिसे स्वानंदाचा गाभा।।२।। नाही कोठे रिता ठाव। भरूनि उरला सर्व देव।।३।। म्हणे महादेव वटबीज। तैसे आहे ब्रह्मतेज।।४।।

१४१. सुकृताचा मित्र उदय। म्हणोनि पाहिले हे पाय।।१।। थोर तपासी आतुडे। तो हा उभा दासापुढे।।२।। उमाकांत म्हणती ज्याला। तोचि भक्ताधीन झाला।।३।। म्हणे महादेव मिठी। दृढ घाली त्याचे कंठी।।४।।

१४२. बहुत जन्मांचा आज लाभ झाला। म्हणोनि भेटला देवा तुम्ही।।१।। नरतनु मज द्यावी वारंवार। भासतो संसार ब्रह्मरूप।।२।। सर्व साधनांचे वाटते आगर। पाहाता सारासार सुख आहे।।३।। महादेव म्हणे नाही बद्धमुक्त। दोहीसी अतिथी आत्माराम।।४।।

१४३. आता आम्ही काय मागावे दातारा। पार्वतीरमणा शंभुराया।।१।। राई ठेवू जाता नाही रिता ठाव। मागे पुढे देव भरिला दिसे।।२।। आत्मा शिवरूप देवाचा संकल्प। कोण मी विकल्प वाया माझा।।३।। महादेव म्हणे पंचतत्त्वांचे बाहुले। बोलविता बोले नवल वाटे।।४।।

१४४. धन्य राजयोगी भेटले सुजाण। केले समाधान तेणे माझे।।१।। पेरिले श्रवणी उगवले नयनी। तेचि जनी वनी फळे आली।।२।। लाचावले मन ब्रह्मरस गोडी। काळाचा वराडी चाखी जैसा।।३।। महादेव म्हणे फेडू

जरी ऋण। तन मन धन नाशिवंत।।४।।

१४५. निराकाररूप आकाराशी आले। दिसो जे लागले दृष्टीपुढे।।१।। निवाले अंतर सुखावले सुख। सहज तहान भूक हारपली।।२।। चिदानंद चित्त होऊनिया ठेले। कोणे बोले चाले नकळेचि।।३।। महादेव म्हणे कंठ सद्‌गदित। वारंवार होत शंभोराया।।४।।

१४६. मसुरे प्रमाण जेवी मुक्ताफल। पाहाता अचळ दृष्टीपुढे।।१।। स्मरण उपाधी नाठवेचि कधी। सहज समाधी सुखावली।।२।। कोठील उपमा द्यावी येथे कोणी। वेदाचीही वाणी मौनावली।।३।। महादेव म्हणे हेचि निजखूण। पाहिजे निर्वाण भक्ती येथे।।४।।

१४७. घृतकणिकेचा झाला दुजा भास। शेवटी समरस मुसावला।।१।। पडिले आम्हा ठक पिंडब्रह्मांडाचे। रूप अखंडाचे खंडातीत।।२।। अहंकार भुली पडलीसे गाढी। स्वानंदाची गोडी चाखू नेणे।।३।। महादेव म्हणे अनुभवाविणे। गेले व्यर्थ जिणे जन्मोनिया।।४।।

१४८. सुंदर रूपांचे पाहिले पाखरू। भवसिंधू तारू सापडले।।१।। हिरियासारिखे तेज मनोहर। ज्याच्या अंगावर पाच रंग।।२।। गुरुसमर्थांनी दिले ते धरून। ब्रह्मांड भरून कोंदाटले।।३।। महादेव म्हणे भाग्य ते सुफळ। जया मुक्ताफळ लाभ झाला।।४।।

१४९. त्रिवेणीसंगम पर्व हे मकर। अर्धचंद्राकार भास होतो।।१।। मयूरपिच्छाच्या वरील ते डोळे। रक्त पीत नीळ कृष्ण शुद्ध।।२।। तया पलीकडे सुंदर रूपडे। पाहता दृष्टीपुढे सुख वाटे।।३।। महादेव म्हणे अलक्ष्याते लक्षी। विहंगम पक्षी हाचि बा रे।।४।।

१५०. चित्त चैतन्य ध्येय झाले ध्यान। ज्ञेयरूपी ज्ञान विसावले।।१।। शब्द सामावला गगनसंपुटी। शून्यचि शेवटी तेथे आले।।२।। हाच आला येक तेचि ब्रह्मसुख। संसाराचे दुःख मावळले।।३।। तया पलीकडे निःशून्य रोकडे। महादेव बापुडे कैचे तेथे।।४।।

१५१. गगन सरिता स्वरूपाचा पूर। रजताचा चर उधळिला।।१।। नातरी वाटते मुक्ती विखुरली। समाधी साधिली सहजासहजी।।२।। हालू विसरली पाती डोळियांची। गोडी स्वानंदाची धणी घेता।।३।। महादेव म्हणे जीव

झाला शिव। संसाराची सीमा ओलांडिली।।४।।

१५२. दोची अक्षरांचा मंत्र महाराज। पेरियेले बीज श्रवणी माझ्या।।१।। औट हात वृक्ष पूर्ण फळा आला। जीव लाचावला हंसरूपे।।२।। सेविता न सरे तृषाक्रांते सिंधू। आनंदाचा कंदू उर्वरीत।।३।। महादेव म्हणे भाग्य आले हाता। नम्र झाला माथा जनी वनी।।४।।

१५३. धन्य गुरुराया दाखविली सोय। अनाथाची माय कृपावंत।।१।। नेत्रामाजी जेणे भरिले अंजन। तेणे निरंजन सामोरले।।२।। चित्त आचविले चैतन्य वाढिले। द्वैतासी धाडिले देशांतरा।।३।। महादेव म्हणे भक्त आणि देव। उरला नाही ठाव पाहाता कोठे।।४।।

बोध

१५४. नको कोरडे हे ज्ञान। वृथा शिणले श्रवण।।१।। नाही भक्तीचा जिव्हाळा। कळा असूनि विकळा।।२।। वृंदावन वरी गोमटे। आत भरले काळकुटे।।३।। साधुवेष मंदे धरिला। यात्रेलागी लुटू आला।।४।। चुना लावूनि वायस। बळे झाला राजहंस।।५।। म्हणे महादेव निस्संग। नको ऐसियाचा संग।।६।।

१५५. क्रियेविण बोले बोल। अवघे फोल निरंतर।।१।। दावी अभ्यासाच्या कळा। नाही भक्तीचा जिव्हाळा।।२।। मूळ वर्म ते चुकले। इह पर अंतरले।।३।। महादेव म्हणे पंथ। अंधसंगतीने अंत।।४।।

१५६. परिसाचा अधिकार। काय जाणे ते खापर।।१।। सर्व तरूते करी चंदन। वेळु न घे त्याचा गुण।।२।। धरा पोटी हिरा गार। येक व्यर्थचि भूभार।।३।। म्हणे महादेव साखर। मरे वाहोनिया खर।।४।।

१५७. नादबिंदा पडल्या गाठी। लिहिले तेव्हाचि ललाटी।।१।। केली आयुष्यगणना। तेथे कोणाचे चालेना।।२।। ब्रह्मादिकास पडले ठक। काय मानव मशक।।३।। महादेव ह्मणे संचित। जितुकें तितुकें ते प्राप्त।।४।।

१५८. कृतयुगी लक्ष वरुषे। होतें मानवा आयुष्य।।१।। घोर तपे आचरोनी। वश केला शूलपाणि।।२।। त्रेतायुगी दहा हजार। झाला सकल बाजार।।३।। लक्षावरिले शून्य गेले। मोजू जाता उणे आले।।४।। एक सहस्र ते द्वापर। दुजे पूज्य झाले ठार।।५।। शत वरुषे लिहिले कली। म्हणे महादेव अर्धी गेली।।६।।

१५९. तपे करूनि मोक्ष जोडे। झाली आत नाही वेडे।।१।। भ्रमे वैरिली सिकता। नोहे मवाळ रांधिता।।२।। वंध्यावल्लीचे सुफळ। मिळे शेवटी फराळा।।३।। महादेव म्हणे मोती। चाळी माती नाकी असूनी।।४।।

१६०. ब्रह्मचि ब्रह्मार्पण। दुजे नाही त्या समान।।१।। प्रकाशले रत्नदीप। काय तेथे स्नेह तूप।।२।। मिथ्या मनाच्या या ओढी। मुरडी शून्याची नरडी।।३।। म्हणे महादेव मनढोर। बांधू नासाग्रासमोर।।४।।

१६१. आत्मबोध झाल्याविणे। आपण कोण मी हे नेणे।।१।। ऐसा सुलभ उपाव। नम्र सर्वांभूती राहे।।२।। नाही कोठे रिता ठाव। भासे ब्रह्मरूप जीव।।३।। महादेव प्रार्थी मना। करी मस्तक ठेंगणा।।४।।

१६२. रोपिले ते वरी आले। तैसे फल प्राप्त झाले।।१।। कडवट आणि मधुर। बीजासारिखे अंकुर।।२।। लाविता इक्षुदंड। कैसा उगवेल एरंड।।३।। महादेव म्हणे शेण। सोने म्हणोनि घेईल कोण।।४।।

१६३. सर्व वैराग्याचे मूळ। धरी शांतीते निर्मळ।।१।। नेत्रहीना आमंत्रण। सवे येती दोघेजण।।२।। ज्ञानचातुर्याची खाणी। झाला धन्य तोचि प्राणी।।३।। म्हणे महादेव अष्टांग। सर्व झाले उमारंग।।४।।

१६४. आम्ही ब्रह्म झालो म्हणून। लोका सांगे उपदेशून।।१।। नोहे फुकाचे बोलणे। कठीण आहे सम तोलणे।।२।। योगियाची निज खूण। जाणे योगीच निर्वाण।।३।। महादेव म्हणे स्वाती। जळावाचून कैचा मोती।।४।।

१६५. शब्द ब्रह्मचि जाणावे। श्रवणाविणे काय घ्यावे।।१।। शास्त्रे पुराणे प्रसिद्ध। शब्दे झाले चारी वेद।।२।। निरोपण न ऐकून। कैसे होईल मनन।।३।। महादेव जया शरण। शब्दब्रह्मचि स्फुरण।।४।।

१६६. जेणे हृदयसंपुटी। साठविला धुर्जटी।।१।। जन्ममरणासी नातळे। त्यासी ओगळिले काळे।।२।। झाला सुरासुर वंद्य। डोले सहज निजानंदे।।३।। म्हणे महादेव भवतारू। करी जीवा पैलपारू।।४।।

१६७. धालेपणाचे ढेकर। जेवी त्यासी वारंवार।।१।। काय गर्भिणीची खूण। वांझ सांगेल कोठून।।२।। तैसे आहे ब्रह्मज्ञान। गुरुविण नोहे जाण।।३।। महादेव म्हणे जल। तृप्ती करी जाश्वनीळ।।४।।

१६८. कलीमाजी घटिका औट। भेट देतो नीलकंठ।।१।। ज्याचा भाव

शुद्ध आहे। त्याचे हृदयी देव राहे।।२।। ऐसे शास्त्रे देती हाका। भक्ता तुम्ही देवा ऐका।।३।। हिरा परीक्षोनि पाहे। गार म्हणूनि टाकू नये।।४।। जरी चित्त साह्य झाले। म्हणे महादेव व्यर्थ गेले।।५।।

१६९. शिव शिव वेळोवेळा। जिव्हेलागी लागो चाळा।।१।। सकळ जगाचे जीवन। जडो डोळा माझ्या ध्यान।।२।। तीर्थयात्रा पायी घडो। परोपकारी देह पडो।।३।। म्हणे महादेव हेचि घ्यावे। वारंवार जन्मा यावे।।४।।

१७०. अढळ समाधी ढळेना सर्वथा। हेचि सायुज्यता श्रुती म्हणे।।१।। मेले पांघरून जिते पांघरीना। तोचि नर जाणा जीवन्मुक्त।।२।। दग्धपटसम शरीराचा भाव। तरी देवराव तोचि झाला।।३।। महादेव म्हणे आनंदाश्रू नेत्र। दिसे पंचवक्त्र ध्यान तुझे।।४।।

१७१. सगुण स्वरूप दृष्टीने पाहिले। तेणे माझे झाले समाधान।।१।। शंकर हे नाम वदे ज्याची वाणी। धन्य तोचि प्राणी पुण्यवंत।।२।। अनंत जन्माची सुकृताची गाठी। तेणे तो धुर्जटी मित्र केला।।३।। महादेव म्हणे धरा संतसंग। जेणे उमारंग ओळखिला।।४।।

१७२. शिव शिव शिव त्रिवार बोलता। पाप जाय हाता मोक्ष लागे।।१।। आणिक साधन नाही या समान। दुजे नामाविण कलियुगी।।२।। सुधर्म रायासी नामें जीवविले। भक्त उद्धरिले असंख्यात।।३।। महादेव म्हणे नामें बाळा वृद्धा। केले महानंदा मोक्षभागी।।४।।

१७३. शिव शिव वाचे का न ये फुकाचे। घेता काय वेचे सांगा बरे।।१।। ऋषि मार्कंडेय जपतो अखंड। तेणे काळदंड फिरविला।।२।। चतुर्दश वरुष अल्पचि आयुष्य। नाम हे पीयूष अमर केले।।३।। महादेव म्हणे कलिमाजी सार। नामचि आधार भक्तालागी।।४।।

१७४. नरजन्म जलावरील तरंग। सखा उमारंग जवळी करा।।२।। साधने साधिता शीण होतो फार। आयुष्यभास्कर अस्ता गेला।।२।। रोगहरणार्थ द्यावे रसायन। गेल्यावरी प्राण सुख कैचे।।३।। महादेव म्हणे जीव अशाश्वत। शिव तो शाश्वत ओळखावा।।४।।

१७५. मृगअक्षासम नरा दिव्य नेत्र। नाही पंचगात्र विलोकिला।।१।। शिवकथामृत न करी श्रवण। व्यर्थचि श्रवण वल्मीक ते।।२।। वदन शोभते

जेवी पूर्ण इंदु। नाम मकरंदु सेवू नेणे।।३।। पदे तीर्थयात्रा न घडे पाणीदान। चित्त बुद्धी मन भांबावले।।४।। महादेव म्हणे झाला भूभार। मातेचे उदर शिणविले।।५।।

१७६. भवसागरीचे नाम झाले तारू। करी पैलपारू भाविकासी।।१।। सुकाणुधारका जाऊनि पुसावे। आधी का रुसावे देवावरी।।२।। सद्गुरूवाचोनी ग्रंथ हे वाचोनी। आपण वाचोनी काय केले।।३।। महादेव म्हणे अनुभवाविणे। कैलासीचे केणे न ये हाता।।४।।

१७७. प्रपंच परमार्थां आहे एक अंग। करोनिया सांग ऐक्य व्हावे।।१।। नरजन्म ऐसा नाही नाही पुन्हा। चुकवी यातना चौऱ्यांशीची।।२।। सत्संगावाचोनी न घडे साधन। ओतलिया धन अमित जरी।।३।। महादेव म्हणे असो दशग्रंथी। पूर्वपुण्य ग्रंथी असल्याविणे।।४।।

१७८. सोडिता प्रपंच घडेना परमार्थ। विचारूनि अर्थ पाहे मनी।।१।। अंतकाळाहूनि कठीण माध्यान्ह। मागवी कोरान्न पोटासाठी।।२।। पुत्रदारात्याग करूनि जोगी झाले। जनाद्वारी आले भिक्षेलागी।।३।। महादेव म्हणे साधुत्वाचे डींब। निरामाजी बिंब क्षणिक जैसे।।४।।

१७९. यथासांग कर्म तेही बा घडेना। घडे ते पडेना आचळामाजी।।१।। वासनेचे बीज जाळोनिया स्नान। करी वेगे ज्ञानगंगेमाजी।।२।। धरू जाता संग तोचि होय बद्ध। मग कैचा शुद्ध पंथ लाभे।।३।। महादेव म्हणे सत्यसंकल्पांचा। दाता कैलासीचा शंभुराया।।४।।

१८०. महालाभ हाचि लागला बा हाती। नको करू माती नरदेहाची।।१।। दैवे कामधेनु सिंधु आली घरा। मारी काष्ठप्रहार मतिमंद।।२।। सुकृते लाधला सोनियाचा गोळा। बळेचि आंधळा झाला तेथे।।३।। महादेव म्हणे गोड इक्षुदंड। त्यागूनि एरंड शिरी वाहे।।४।।

१८१. गोफाणिला हिरा पाषाण शोधिता। भाग्यहीन घेत काच हाती।।१।। कल्पतरु दैवें अंगणी उदेला। तोडूनि लाविला कुंपणाते।।२।। तशी नरतनु अवचट लाधली। परि ते व्यर्थ गेली ज्ञानाविणे।।३।। महादेव म्हणे सांभाळी हा लाभ। पार्वतीवल्लभ जोडे येणे।।४।।

१८२. परोपकारे मेरू वाढे सुकृताचा। तैसा परपीडे दुरिताचा।।१।। योग

याग तप नको अनुष्ठान। एवढीच खूण ओळखावी।।२।। सर्व साधनांचे सार हेचि आता। ठेंगणा हा माथा करी राया।।३।। महादेव म्हणे सोडी अभिमान। होई बा रे लहान जनाहूनी।।४।।

१८३. धन्य ती माऊली प्रसवली पिंड। जो वदे अखंड शिवनाम।।१।। उद्धरिले कोटी कुळे सर्व गोत्र। पुरे एक पुत्र वंशामाजी।।२।। नातरी क्षणिक जंतूचे साजणे। अजाकंठी स्तन दुग्धहीन।।३।। सुधाफळे त्यजुनी पंच अंध रडे। शत एक हिरडे आचळी बांधी।।४।। महादेव म्हणे सुनीतीचा सुत। त्रिलोकी विख्यात कीर्ती ज्याची।।५।।

१८४. बद्ध आणि मोक्ष हाचि द्वैतपक्ष। स्वरूप अलक्ष लक्षातीत।।१।। तत्त्वमसि वाक्य शोधूनिया पाहावे। व्यर्थ का शिणावे खटाटोपे।।२।। ताडिता वल्मीक न मरे उरग। तैसे वाया अंग कृश केले।।३।। महादेव म्हणे यापरती खूण। नाही वाहतो आण शंकराची।।४।।

१८५. जीव-शिवऐक्य झाल्याविण जाण। कोठील प्रमाण द्यावे यासी।।१।। दुग्धामाजी लोणी मंथनावाचोनी। बोलताती शहाणे नये हाता।।२।। जरी देव व्हावे ऐसे वाटे तुज। गुरुमुखे बीज घेई बापा।।३।। महादेव म्हणे पाचाचे गाठोडे। ठेवी एकीकडे बांधोनिया।।४।।

१८६. वंद्य अभिमान शुद्ध समाधान। आवडते कोण घेई राया।।१।। धरिले मानसी मोल देऊ गारा। मग कैंचा हिरा प्राप्त होय।।२।। चोरूनि ऐरण सुई देतो दान। इच्छितो विमान कैलासीचे।।३।। महादेव म्हणे लाविता धोतरे। आता फणस बा रे कैचे तेथे।।४।।

१८७. मानवाचा जन्म हाचि महालाभ। उपाव सुलभ सापडला।।१।। आत्मा गुरू शास्त्र परिचय तीन। पाहूनि ती खूण ओळखावी।।२।। त्रिपद शोधूनि बोधील निर्वाण। तयासी शरण जावे मग।।३।। महादेव म्हणे प्रत्ययावाचून। फुंकिताती कान वेषधारी।।४।।

१८८. विधी लिहीतसे सर्वांचिये भाळी। लिहिल्या कपाळी कोण सांगा।।१।। सत्त्वगुणी विष्णू पाळितो जनाते। सांभाळीत त्याते कोण देव।।२।। शेवटी शंकर संहारी ब्रह्मांड। जाळी त्याचा पिंड कोण ऐसा।।३।। महादेव म्हणे वेदाचे हे बीज। सांगितले गुज गुरुराया।।४।।

१८९. उफराटे वृक्षी बांधिले चरण। येके धूम्रपान आरंभिले।।१।। आत्मज्ञानावीण साधन पोचट। तया नीळकंठ दुरावला।।२।। नाना देव पूजा करो ग्रंथ गोळा। वाचूनि आंधळा झाला बळे।।३।। दुधाधारी म्हणूनि ठकविले जन। नाही ब्रह्मखूण ठसावली।।४।। महादेव म्हणे वाढविले ढोंग। वैराग्याचे अंग नोहे राया।।५।।

१९०. भवरूपी आणिले योगियाचे सोंग। साधने अष्टांग कैची तेथे।।१।। शूरत्वाचे धैर्य दावितो कोल्हाटी। वीर हातवटी वेगळेचि।।२।। साधुवेष मैंदे उत्तम धरिला। लुटूनि तो गेला सर्वलोका।।३।। महादेव म्हणे बळेचि वायस। झाला राजहंस नवल वाटे।।४।।

१९१. कुरंगाचे नाभी कस्तुरी असोनी। व्यर्थ तो काननी भ्रमतसे।।१।। तैसेचि अज्ञान नरजन्मा आले। स्वहित आचविले मुळीहूनि।।२।। लाभ मकरंद सेवूनि भ्रमर। कर्दमचि उरे मंडूकासी।।३।। महादेव म्हणे बहुता सुकृती। उपजूनि माती कैसी केली।।४।।

१९२. हृदयमंदिरी साठविला देव। आठविला भवसिंधू तेणे।।१।। आपण तरोनि तारी दुजियाते। वाढविले माते बाळा जैसे।।२।। गंगा थिल्लरासी आपुले स्वरूप। करी तीर्थरूप वंद्य जगी।।३।। महादेव म्हणे भूलोकी ईश्वर। हेचि जगदुद्धार करो आले।।४।।

पारमार्थिक

१९३. शिवचरणी जडले मन। झाले मिरासी उन्मन।।१।। मग कैचे येणे जाणे। सहज खुंटले बोलणे।।२।। षड्रिपूंसी नाही थारा। द्वैत गेले देशांतरा।।३।। म्हणे महादेवा आनंद। अवघा झाला ब्रह्मानंद।।४।।

१९४. अनंत ब्रह्मांड भरूनि उरले। दृष्टी सामोरले भाविकाच्या।।१।। योग याग तप मौन जयासाठी। तो हा धुर्जटी मागे पुढे।।२।। शुद्ध कृष्ण पक्ष निबिड अंधार। लिंग निरंतर ज्योतिरूपे।।३।। महादेव म्हणे अढळ अभंग। माझा उमारंग चहूंकडे।।४।।

१९५. लिंग अंगा समरस कैसा होतो। अलक्ष्य ती वस्तु दिसताहे।।१।। शरीर हे पंचतत्त्वांचे बाहुले। ऐसे निरोपिले श्रुतिशास्त्रे।।२।। पस्तीस गुणांचा उभारिला पिंड। छत्तीस अखंड वेगळेचि।।३।। महादेव म्हणे सूक्ती वाळवंटी।

मुक्ताफळ कंठी समर्थाच्या।।४।।

१९६. जनी वनी पाहता भरूनि अलक्ष। तेथे माझे लक्ष जडो आता।।१।। उपनिषदांची मौनावली वाणी। सनकादिक ध्यानी सुखावले।।२।। पाहता स्वरूप जेवी मुक्ताफल। अढळ अचल स्वामी माझा।।३।। महादेव म्हणे हेचि निजखूण। सत्संगावाचून नये हाता।।४।।

१९७. आत्मा अविनाश तो हा नित्यमुक्त। गुणेविण मुक्त जेवी भासे।।१।। जीवनी ते बिंब बिंबूनि अलिप्त। तैसा विश्वनाथ विश्वामाजी।।२।। कोंदले सबाह्य अवघे शिवरूप। श्रुतीचा संकल्प हाचि आहे।।३।। महादेव म्हणे देवाचा हा देव। नाही रिता ठाव पाहता कोठे।।४।।

१९८. आत्मा ब्रह्मरूप तया कैचा दंड। संचला अखंड सिंधू जैसा।।१।। नाही नाही दुजे श्रुतीचे वचन। तेथे ऐक्यपण सहज आले।।२।। त्रैलोक्याचे सूत्र चाळितो शंकर। तोचि निरंतर आत्मरूप।।३।। महादेव म्हणे मुळीचा संकल्प। वाउगा विकल्प कल्पू नये।।४।।

१९९. पस्तीस गुणांचा ओतिला पुतळा। आपण वेगळा छत्तिसावा।।१।। तया देवराया शिणलो शोधिता। गुरुविणे हाता नये कोणा।।२।। आकळेना कोटी यागाते शोधिता। येक वाहे माथा जटाभार।।३।। कर्मधर्माश्रम पंथासी अतीत। त्रैलोक्याचा नाथ स्वामी माझा।।४।। महादेव म्हणे पाहिजे अंजन। त्यासी गुप्तधन सापडेल।।५।।

२००. आणिले उजेडा अंधारे दीपास। कोंदणी प्रकाश हिरियाचा।।१।। न वाहे मानव जरी चिंतामणी। काय चिंतामणी द्यावे त्यासी।।२।। कल्पतरू धनिक झाला पूर्णदाता। परि तो कल्पिता थोर आहे।।३।। परिसाची थोरी वाढवील कोण। लोहचि निर्माण नसते जरी।।४।। महादेव म्हणे झालो आम्ही शुक्ती। शुक्ताफळ कंठी समर्थांच्या।।५।।

२०१. कुरंग नाभीचा परिमल नेणे। वने उपवने शोधू जाय।।१।। तैसे या मानवा मोहिले निभ्रांत। जवळी अनंत असोनिया।।२।। सबाह्याभ्यंतर कोंदले स्वरूप। होय जागा झोप आवरी आता।।३।। महादेव म्हणे धरी बा सुसंग। मग उमारंग दृष्टीपुढे।।४।।

२०२. स्थूल म्हणू जरी दिसते सूक्ष्म। अनिर्वाच्या नाम काय ठेवू।।१।।

घटामाजी बिंब भासते क्षणिक। विरालिया सुख कोण सांगे।।२।। मौनमुद्रा आता धरावी निवांत। सापडेना अंत शब्दाविणे।।३।। महादेव म्हणे शब्दब्रह्म आहे। श्रुतिशास्त्र गाय कोण दुजा।।४।।

२०३. पिंडी ते ब्रह्मांडी जरी सत्य आहे। येक झाले लये आचळ दुजे।।१।। भ्रमरगुंफा मृत सत्रावीचा पाठ। देहचि सपाट झाले तेथे।।२।। डोळ्यामाजी ब्रह्म एके दाखविले। शेवटी भंगले काच जैसे।।३।। उफराटे दृष्टी जरी ते आकळे। कित्येक आंधळे झाले जगी।।४।। महादेव म्हणे विरालिया कुंभ। बिंब ते स्वयंभू जैसै तैसे।।५।।

२०४. देही देव आहे बहुताचे मते। मग का ते मृत्युपंथे गेले।।१।। श्रमू नका व्यर्थ पोचट हे ज्ञान। शंकराचे ध्यान भजन करा।।२।। प्रेमभावे तुम्ही नाचावे रंगणी। जनी वनी अंगणी तोचि आहे।।३।। महादेव म्हणे निश्चयाचे फळ। पडेल तत्काळ अचळामाजी।।४।।

२०५. सगुण निर्गुण भासताहे भिन्न। सद्गुरू अंजन डोळे भरी।।१।। मग बा रे विश्वब्रह्मीचे अंकुर। अवघा चराचर ब्रह्मरूप।।२।। येक ब्रह्म म्हणोनि श्रुती देती साक्ष। आता बद्ध मोक्ष कैचा तेथे।।३।। महादेव म्हणे दाखविली खूण। पाहूनि उन्मन मन झाले।।४।।

२०६. आपण असावे करतळी अमल। मग तळमळ गेली माझी।।१।। येवढेचि आता देई सदाशिवा। घडो सदा सेवा तुमची मज।।२।। अलक्ष स्वरूप दिसते तोवरी। मोक्ष तुजवरी ओवाळीन।।३।। महादेव म्हणे आत्मा हा अखंड। तया काळ दंड करील काय।।४।।

२०७. भाविकासी देव सन्निधचि आहे। अभाविका राहे दुरी कैसा।।१।। विश्वनाथ नाम गर्जती पुराणी। वेदाचीही वाणी वदतसे।।२।। स्थिरचर भरूनि दुसरे प्रमाण। उरले हे सुजाण बोलतात।।३।। महादेव म्हणे भावहीना दंड। चालवितो पिंड कोण त्याचा।।४।।

२०८. ब्रह्मांडमंडप भासे लिंगाकार। साळुंखा आकार धरा दिसे।।१।। मोतियांचा भात जेविता दाहलो। विसरली पाती हालू तेव्हा।।२।। खुंटली वैखरी लाचावले मन। दाही दिशा पूर्ण रूप तुझे।।३।। महादेव म्हणे संपला अंधार। सूर्यगौरीहर उदय झाला।।४।।

२०९. शिव शिव दोचि अक्षरांचा मंत्र। चालतो स्वतंत्र अजपाचा।।१।। येकवीस सहस्रवरी सहाशे जाण। मुळी हे प्रमाण ऐसे आहे।।२।। उठले सुटले फिरतसे यंत्र। सगुणाचे तंत्र हेचि खरे।।३।। महादेव म्हणे निर्गुण आधार। चालतो व्यापार सकळीक।।४।।

२१०. वर्णाश्रम धर्म कर्म आचविले। अक्षय लागले ध्यान तुझे।।१।। जन्ममरणाचा केलासी मातेरा। धन्य हे दातारा नवल वाटे।।२।। विसरले आप्त गोत्र आणि मित्र। कैचे शाखा सूत्र सांगू आता।।३।। महादेव म्हणे कोठील मी कोण। दाखवावी खूण विश्वनाथा।।४।।

२११. कोठील मी कोण मज कळले नाही। सांगा याची सोय विश्वनाथा।।१।। अस्थिमांसचर्मे बांधिले देऊळ। सांगा याचे मूळ कैसे आहे।।२।। नाही तीच आळ करितो उपाधी। म्हणो नये वादी देवा मज।।३।। महादेव म्हणे विनोदाचे बोल। तुम्हाविणे फोल सर्व दिसे।।४।।

२१२. हृत्कमलामधी अठ्ठावीस गुण। साठवी निर्गुण सहस्रदळी।।१।। भावे शरण जाता पंचमुखाला। मग बा सुखाला पार नाही।।२।। सहज समाधी अखंड मंडल। पन्नगकुंडल तोचि नटला।।३।। चिदानंद सद्रूपघन भरला। महादेव उरला घेत धनी।।४।।

२१३. चतुर्दली गणपती षड्दळी विधाता। तयाचा जो पिता दशदळी।।१।। देही देव आहे दिसते हे फोल। व्यर्थ गेले बोल साक्ष नाही।।२।। द्वादश दळात पार्वतीचा वर। हंसऋषीश्वर सोळा दळे।।३।। परेचे द्विदल वरी सहस्रकमल। निरंजन मूळ योगियांचे।।४।। सत्रावीचा पाट वाहतो मंजुळ। मग का गंगाजळ शोधू।।५।। अस्थिमांसमलमूत्राचे कोठार। कैचा सर्वेश्वर तेथे आहे।।६।। महादेव म्हणे घरधनी आट। मोडिले कपाट नवल वाटे।।७।।

राजयोग

२१४. अठरा योगामाजी राजयोग श्रेष्ठ। सांगे नीळकंठ पार्वतीसी।।१।। जरी ते उदंड माजविले बंड। समाधी अखंड राजयोग।।२।। बोलता चालता सदा देता घेता। ढळेना सर्वथा दृष्टीपुढे।।३।। महादेव म्हणे राजयोगी नर। करूनि संसार गुरुरूपे।।४।।

२१५. कलियुगी धन्य राजयोग श्रेष्ठ। सांगे नीलकंठ पार्वतीसी।।१।।

औट घडीमाजी भेटतो ईश्वर। नको घोरांदर सेवावया।।२।। योग याग तप मौनाचा संकल्प। पंचाग्नीचा ताप तोही नको।।३।। महादेव म्हणे सद्गुरूवाचून। नकळे ती खूण दुजियासी।।४।।

२१६. नको षड्मुद्रा पंचाग्नीचा ताप। मौनाचा संकल्प तोही नको।।१।। नको याग यज्ञ महाघोर तप। गूढस्थळी जप तोही नको।।२।। सप्तकोटी मंत्र उच्चाटन यंत्र। काही येक तंत्र नको देवा।।३।। महादेव म्हणे राजयोग बरा। सुखे येतो घरा उमाकांत।।४।।

२१७. मौनावला देव पाहूनि ते काय। सांगा याची सोय मजलागी।।१।। पराही पश्यंती मध्यमा वैखरी। नेति नेति चारी श्रुती तेथे।।२।। दाखवा ती खूण परब्रह्म पूर्ण। तुम्ही संतजन भाग्यवंत।।३।। महादेव म्हणे राजयोगी नर। सहज त्यासमोर खेळताहे।।४।।

२१८. ब्रह्मरूप भासे अवघाचि संसार। पहा सारासार विचारूनी।।१।। अनुभवाविणे बोलू नये फार। तेव्हा गौरीहर वश होतो।।२।। कल्पनेचे मूळ शोधूनि टाकावे। भेदूनि असावे सहज स्थिती।।३।। महादेव म्हणे धन्य राजयोग। त्रिवेणीचा ओघ हाचि आहे।।४।।

२१९. देह काशीक्षेत्र आत्मा विश्वनाथ। होतो अखंडित नामघोष।।१।। येवढेचि आता पुरे हे साधन। अवचित धन सापडले।।२।। निद्राळूसारिखे नेत्राग्राचा झोक। घेऊ स्वात्मसुख आवडीने।।३।। महादेव म्हणे धन्य राजयोग। जेणे भवरोग दग्ध केला।।४।।

कथा भद्रसेनाची

२२०. स्कंदपुराणीचे ब्रह्मोत्तरखंड। जपता अखंड मोक्ष जोडे।।१।। भाळी भस्म कंठी रुद्राक्षांचा हार। दुरिते संहार झाली त्यांची।।२।। सुधर्म तारक धन्य राजपुत्र। आवडेना छत्रसिंहासन।।३।। नावडेचि वाजी गज अलंकार। ध्यान निरंतर शंकराचे।।४।। पंचवरुषांचे समान किशोर। राज उपचार घेऊ नेणे।।५।। महादेव म्हणे धन्य शिवदास। तेथे नाही आस दुजियाची।।६।।

२२१. जन्मताचि अंगी वैराग्य विरक्त। महाशिवभक्त उपजले।।१।। मुखी नामघोष पुराणश्रवण। काया वाचा मन जडले तेथे।।२।। चिंताक्रांत राव सचिव मानसी। घरा आले ऋषि पराशर।।३।। प्रेमभावे राव करी

दंडवत। दाखविले सुत तयालागी।।४।। तेज:पुंज जैसे शशी आणि मित्र। पाहता राजपुत्र आनंदले।।५।। महादेव म्हणे भस्मरुद्राक्षाचे। प्रिय आवडीचे अलंकार।।६।।

२२२. ऋषिलागी राव जोडी उभय कर। पुत्र जन्मांतर सांगा स्वामी।।१।। पराशर म्हणे ऐक सावधान। जन्मनिरूपण करू त्याचा।।२।। काश्मीर देशात येक नंदिग्राम। महापट्टण नाम शोभे त्याचे।।३।। राज्याधिकारी महानंदा जाण। होती वारांगना पतिव्रता।।४।। शिवदीक्षाव्रत आरंभिले तिने। कैलासीचे केणे जोडावया।।५।। कुक्कुट मर्कट पाळिले ते दोन। पुराणश्रवण होत त्यासी।।६।। महादेव म्हणे धन्य तो सत्संग। जोडे उमारंग येणे पंथे।।७।।

२२३. मंदिरांत लिंग स्थापिले सुंदर। बांधिले समोर तेही तेथे।।१।। सत्त्व पाह्यालागी पातले शंकर। झाले सौदागर उमारंग।।२।। देऊनि आसन जोडी उभयपाणि। बत्तीस लक्षणी रंभा जैसी।।३।। पृथिवीचे मोल काढिले कंकण। स्वर्गीचे भूषण दाखविले।।४।। पाहूनि कंकण म्हणे वारांगना। झाले मी अंगना दिन त्रय।।५।। महादेव म्हणे सोडूनि कैलास। तारावया दास आले तेथ।।६।। सवेचि काढिले दिव्य ज्योतिर्लिंग। सत्त्व उमारंग पाहे तिचे।।७।।

२२४. महानंदा भावे करी नमस्कार। उगवले दिनकर कोटी जैसे।।१।। शिव म्हणे माझे लिंग पंचप्राण। ठेवी हे जतन तुजपाशी।।२।। दग्ध झाले किंवा भंगले निधान। देईन मी प्राण तुजवरी।।३।। दोन प्रहर रात्री चेतला त्रिचरण। शिवे त्रिनयन उघडिला।।४।। ग्रामामाजी हाक झाली चहूंकडून। लागलेसे अग्नी सदना।।५।। शिव म्हणे अग्नी लागला मंदिरी। सावध सुंदरी होय आता।।६।। महादेव म्हणे देव दीनानाथ। पाहतसे अंत साधकाचा।।७।।

२२५. नृत्यशाळा भस्म झाल्यावरी जाण। म्हणे उमारमण महानंदे।।१।। माझे दिव्य लिंग आहे की जतन। घाबरी ऐकून झाली तेव्हा।।२।। महानंदा म्हणे अन्याया समर्था। चरणावरी माथा ठेवीतसे।।३।। शिव म्हणे दुजा नेमाचा आज दिन। देतो आता प्राण तुजवरी।।४।। पुन्हा चेतविला महाज्वाळामाळी। आले चंद्रमौळी कुंडापासी।।५।। महादेव म्हणे कोण हे संकट। महानंदा कंठ भरूनि स्फुंदे।।६।।

२२६. दग्ध झाले लिंग म्हणे उमारंग। घातली नि:संग उडी तेव्हा।।१।। दुःखे महानंदा पिटी वक्षस्थल। म्हणे शिव दयाळ कैसे केले।।२।। स्नान दान करूनि झाली ती पवित्र। ठेवी बिल्वपत्र राज्यावरी।।३।। भस्मरुद्राक्षाचे करी अलंकार। मंत्र पंचाक्षर जपतसे।।४।। कुंडामाजी उडी घातली नि:संग। झेली उमारंग वरीच्या वरी।।५।। महादेव म्हणे मग चंद्रमौली। धरी हृदयकमळी दासालागी।।६।।

२२७. शिव म्हणे तुज झालो मी प्रसन्न। माग वरदान महानंदे।।१।। जन्मोजन्मी सेवा मानसी उत्कंठा। पुरवावी नीलकंठा आळ माझी।।२।। पार्वतीरमणा भोळ्या शूळपाणि। न्यावे उद्धरूनि नगर सारे।।३।। आणिले विमान भरिले शिवगण। नाही थोर लहान निवडिले।।४।। धन्य शिवभक्ती धन्य शिवदास। कैलासी मिरास झाली त्यांची।।५।। महादेव म्हणे सिंहविलोकन। करावे श्रवण श्रोते पुढे।।६।।

२२८. पराशर म्हणे राया भद्रसेना। ऐक बा सुजाणा नृपवर्या।।१।। कुक्कुट मर्कट पावले निर्वाण। तुझे पोटी जाण तेचि आले।।२।। विलोकिली त्यांनी नित्य शिवपूजा। म्हणोनि तो राजा झाला येथे।।३।। बत्तीस लक्षणी रूपाने डोळस। करतील निर्दोष राज्य पुढे।।४।। राव म्हणे याचे आयुष्यप्रमाण। सांगावे सुजाण गुरुवर्या।।५।। महादेव म्हणे वाटेल निर्वाण। सांभाळा आपण दासालागी।।६।।

२२९. ऋषी म्हणे राया बोलतो मी सत्य। सप्त दिन मृत्यु पुत्रा तुझ्या।।१।। ऐकूनि उत्तर नृप चिंतातुर। दुःखाचे डोंगर कोसळले।।२।। मूर्छागत राव लोळे धरणीवर। झाला हाहाकार राज्यामाजी।।३।। अंत:पुरामध्ये सकळ कामिनी। जळती दुःखाग्नीमाजी तेव्हा।।४।। राव म्हणे बाळ कोटी नवसाचे। सप्त दिन याचे आयुष्य उरले।।५।। महादेव म्हणे माया अनिवार। ब्रह्मादिका पार न कळे जिचा।।६।।

२३०. साहिना हा योग जाऊ पाहे प्राण। धारातीर्थी मरण निरविले।।१।। राव म्हणे मज नको राज्यछत्र। संन्यास पवित्र घेईन आता।।२।। निपुत्री म्हणोनि लागेल दूषण। कैसे हे वदन दाखवावे।।३।। तिलांजली कोण देईल शेवटी। वक्षस्थल पिटी भद्रसेन।।४।। पराशर म्हणे सांगतो विचार। सोडूं नये

धीर नृपश्रेष्ठा।।५।। महादेव म्हणे आलिया प्रसंगा। साह्य उमारंगा व्हावे तुम्ही।।६।।

२३१. शतरुद्र करूनि पुत्र गंडांतर। सरेल निर्धार सत्य मानी।।१।। शिव उपासक सहस्र ऋषीश्वर। आणावे सत्वर वेगी आता।।२।। पाहूनि सुपात्र आरंभावे सत्र। उठवीन पुत्र राया तुझा।।३।। राव म्हणे स्वामी वाटे समाधान। वेचीन मी धन अमित आजि।।४।। दुःखामाजी सुख आपुले उत्तर। लुटीन भांडार गुरुराया।।५।। महादेव म्हणे लिहिले ललाटी। उपाय कोटी केले जरी।।६।।

२३२. आरंभिला यज्ञ पाहूनि सुदिन। बांधूनि कंकण सिद्ध झाले।।१।। नित्य शतरुद्र झाले सप्त दिन। आला चंडकिरण माध्यान्हासी।।२।। टपतसे काळ करील आकांत। झाला तेव्हा अंत सुधर्माचा।।३।। भद्रसेन राव म्हणे संत महंत। बाळ मूर्छागत झाला कैसा।।४।। शतघटातील जान्हवी जीवन। केले अभिषिंचन पुत्रालागी।।५।। महादेव म्हणे येक मुहूर्त झाला। बाळ उठविला पराशरे।।६।।

२३३. जयजयकारे गर्जिन्नले ऋषीश्वर। आनंदले नारीनर तेव्हा।।१।। सावध होऊनि सांगतसे बाळ। येत होते काळ चौघे जण।।२।। विक्राळ दंतांचे महाभयंकर। कपाळी सिंदूर चर्चिलासे।।३।। तशामध्ये दोघे आले शिवगण। मज सोडवून नेले त्यांनी।।४।। ऐशा आनंदात आले ब्रह्मसुत। राव दंडवत घाली तया।।५।। महादेव म्हणे भाग्य आले घरा। गार घेता हिरालाभ झाला।।६।।

२३४. देऊनि आसन जोडी उभय कर। अमृत उत्तर ऐकावया।।१।। स्वामी म्हणे मज भेटले शिवगण। मृत्यूसी बांधून नेला त्यांनी।।२।। सहस्रायु आहे भद्रसेनसुत। का रे तुम्ही आणीत होता त्यासी।।३।। अपराध झाला म्हणे त्यासी काळ। राया तुझे बाळ सोडविले।।४।। पावले सवेचि स्वामी अंतर्धान। गुरुलागी धन समर्पिले।।५।। महादेव म्हणे वस्त्र अलंकार। लुटिले भांडार याचकासी।।६।।

२३५. पुत्रालागी राज्य देतो भद्रसेन। राव तपोवन सेवीतसे।।१।। शेवटी शिवपद पावले ते भक्त। जन्ममरण मुक्त झाले त्याचे।।२।। अकरावा

अध्याय शिवलीलामृत। पाठ ज्याचा नित्य धन्य तोचि।।३।। आता यापरते नको जप तप। पुरेल संकल्प सत्य येणे।।४।। प्रेमभावे नित्य जपे जो त्रिकाळ। दंडवत काळ करील त्यासी।।५।। महादेव म्हणे सोळा अभंगांचे। भांडार मुक्तीचे उघडिले।।६।।

भिल्लीण

२३६. सारीपाट खेळ मांडिला देवीने। जगाचे जीवन भुलविले।।१।। हारिली भूषणे सर्व अलंकार। झाला दिगंबर चंद्रमौळी।।२।। त्रैलोक्याचा नाथ जिंकिला ईश्वर। वाहन बस्वेश्वर तेही नेले।।३।। नारदे त्रिचरण घृते भिजविला। कलह माजविला दोघामाजी।।४।। अमृतात बिंदू संचरे विषाचा। खवळिला पिशाच्चस्वामी तेणे।।५।। वर्ष होता तेथे दरारे उठविले। मायेने लुटिले ब्रह्म भोळे।।६।। घोरारण्यामाजी बैसले जाऊनी। कपाटे लावूनि नेत्रपाते।।७।। भिल्लिणीचे रूप धरी आदिमाया। पालटली काया गोंडणीची।।८।। स्वरूप शृंगारजाळे पसरिले। मन आकर्षिले शंकराचे।।९।। नृत्यगायनाने मोहिले ते चित्त। करूनि अंकित आणियले।।१०।। शिवशक्ति सहज आली आनंदवन। आरंभिले द्यूत पण करूनी।।११।। महादेव म्हणे माया अनिवार। ब्रह्मादिका पार नकळे जिचा।।१२।।

चिलया बाळ

२३७. पतिव्रतेमाजी शिरोरत्न खाणी। सत्त्वधीर राणी श्रियाळाची।।१।। कांतीपट्टणाचा लक्षूनि तो पंथ। देव उमाकांत आले तेथे।।२।। अतिथीचा वेष धरिला सुंदर। रायाचे मंदिर प्रवेशिले।।३।। देऊनि आसन जोडी उभय पाणि। करी राजगृहिणी दंडवत।।४।। काय इच्छूनिया झाडिली पादधूळ। योगी म्हणे बाळ भोजनासी।।५।। चोर हेर जरी आणसी धरून। जाईन घेऊन सत्त्व तुझे।।६।। राजपुत्र तुझा चिलया नामाचा। करी पाक त्याचा भोजनासी।।७।। ऐकूनि उत्तर बोले राजबाळा। येई बा स्नेहाळा तान्ह्या माझ्या।।८।। महायोगिराज मागतो भोजन। करी समाधान वत्सा वेगी।।९।। घेऊनि वोसंगा म्हणे उमारंगा। काय या प्रसंगा करू आता।।१०।। योगियाचे पुढे ठेविला निजसुत। म्हणे क्षुधा शांत करा स्वामी।।११।। वृक व्याघ्र सिंह नोहे मी अतिथी। भक्षू तुझा सुत सांग कैसा।।१२।। चिरोनि कांडूनि घाली

पचवूनी। नको आणू पाणी नेत्रालागी।।१३।। आठविसी दुःख जाईन विन्मुख। असो माझी भूक मजपासी।।१४।। घेऊनि तो पुत्र गेली मंदिरात। म्हणे उमाकांत कैसे करू।।१५।। मुखामाजी स्तन घालूनि बाळाचे। काढिले धैर्याचे शस्त्र तिने।।१६।। स्मरोनी नीळकंठ सोडविला कंठ। वारील संकट कोण आता।।१७।। शिरविरहित करी पाकशुद्धी। योगियाने आधी ओळखिले।।१८।। सर्व गात्रामाजी शिर हे प्रधान। ठेविले चोरून कैसे माते।।१९।। पुरे माय तुझे पावले भोजन। चालिले उठोन योगिराज।।२०।। घेऊनि ते शिर आली राजकांता। चरणावरी माथा ठेवीतसे।।२१।। अपराध माझा घालावा पोटात। करी दंडवत वारंवार।।२२।। योगी म्हणे आता पाक झडकरी। करी मी अंतरी क्षुधाक्रांत।।२३।। आणी मुंड मज देखता समोर। उखळी ते शिर कांडी आता।।२४।। बाळकासी गाणे गाऊनि आनंद। करी ब्रह्मानंद आवडीने।।२५।। सत्य सांभाळीत सती राजबाळी। हृदयकमली आनंदित।।२६।। आरंभिले गाणे चिलया सुजाणा। आला की रे पान्हा स्तनी माझ्या।।२७।। आपुले सार्थक करूनि गेलासी। आम्ही परदेशी तुजविण।।२८।। निपुत्री म्हणोनि बोलतील जन। कैसे हे वदन दाखवावे।।२९।। पंच वरुषांच्या तानुल्या सुंदरा। सायुज्यमंदिरा जवळ केले।।३०।। वाढविली कीर्ती जन्मोनिया पोटी। आता वाळवंटी निरविले।।३१।। तिळांजली कोण देईल पाडसा। मज दाही दिशा शून्य झाल्या।।३२।। जेवूनि तो योगी जाऊ दे बाहेर। त्यागीन शरीर तत्क्षणी।।३३।। राजीवनयना धरवेना धीर। नेत्री आला पूर गंगा जैसी।।३४।। आवरिला पाक आणिले उदक। सती मारी हाक योगियासी।।३५।। उठा महाराज वाढियेले ताट। ठेवूनिया पाट आली येथे।।३६।। यजमान तुज सोडूनि जेवावे। दूषण हे घ्यावे कोणी माथा।।३७।। सत्त्वशील गंगा प्रार्थिती रायासी। अतिथी उपवासी जात आहे।।३८।। चालावे मंदिरी करावे भोजन। पोटीचे निधान पोटी घाला।।३९।। नवमास माझे शिणले उदर। तुम्ही चार प्रहर साठवावा।।४०।। पुण्यशील दोघे बैसली जाऊन। निपुत्री म्हणोन योगी उठले।।४१।। सती म्हणे वंशवेल तो खुंटला। परत्र आचविला आमुचा अजी।।४२।। आता काय अंत पाहसी उमारंगा। सत्त्वधीर गंगा अश्रू ढाळी।।४३।। योगी म्हणे तुझे बोलवी बालक। मारी गंगे

हाक माय माझे।।४४।। आला माय कंठी घालीतसे मिठी। देऊनि शेवटी जाते झाले।।४५।। महादेव म्हणे धन्य पतिव्रता। साधिले दो हिता चांगुणेने।।४६।।

शिवरात्रिमाहात्म्य

२३८. शिवरात्रि पर्व थोर। सर्व पर्वांचे आगर।।१।। आजि दिवस सोनियाचा। झाला उदय भाग्याचा।।२।। अहर्निशी नामघोष। होतो अंतरी उल्लास।।३।। महादेव म्हणे सुख। देतो दासा पंचमुख।।४।।

२३९. माघ कृष्णपक्ष महाशिवरात्र। मिळाले पवित्र भक्त भोळे।।१।। घोर अरण्यामाजी अपूर्व मंदिर। जुनाट सुंदर लिंग तेथे।।२।। रुद्रघोष आणि शिव हरहर। नामाचा गजर होत आहे।।३।। अकस्मात तेथे पातला किरात। ध्यान विलोकीत शंकराचे।।४।। येथे काय धन नाशितात वेडे। दावीत वाकुडे जाता झाला।।५।। महादेव म्हणे सव्य प्रदक्षिणा। घालूनि कानना प्रवेशला।।६।।

२४०. भ्रमता शिणला पाहिले सरोवर। दिव्य तरुवर विराजित।।१।। विवरिले जाळे चिरियेले पाश। वोढूनि धनुष्य लक्ष लावी।।२।। बिल्ववृक्षावरी मांडिले सुठाण। कुरंगाचे प्राण हरावया।।३।। सव्यहस्तें पत्रे तोडोनी टाकीत। पद्मजस्थापित लिंग होते।।४।। सहज शिवपूजा घडे चार प्रहर। दुरिते संहार झाली त्यांची।।५।। दिवा उपोशीत निशी जागरण। वाचेसी स्मरण अखंडित।।६।। महादेव म्हणे नकळेचि अंत। काय उमाकांत देईल यासी।।७।।

२४१. जळपानालागी येकली हरिणी। धावत काननातूनी आली।।१।। कवळूनि पाश पडिली भूतळी। जेवी सुमनकळी अग्नीमाजी।।२।। अवचिता धेनू रुतली चिखली। तैसीच मोकली धाय तेव्हा।।३।। जोडूनिया पाणि प्रार्थिती किराता। नको इच्छू घाता अमुच्या बापा।।३।। गर्भवंत स्त्रीचा घेऊ नये प्राण। शास्त्राचे प्रमाण ऐसे आहे।।५।। ऐकूनि किरात बोलतो सुजाण। कोठूनि हे ज्ञान तुम्हा झाले।।६।। आजवरी मृगे मारिली बहुत। कोणी हा ग्रंथार्थ वदले नाही।।७।। महादेव म्हणे श्रवणी सादर। मृगी जन्मान्तर कथील आता।।८।।

२४२. व्याध म्हणे तुझा पूर्वीचा अवतार। सांग सविस्तर माय माझे।।१।।

विनवीत हरणी प्रसूतीची वेळा। सोडी रे दयाळा वेगी मज।।२।। रंभा देवांगना स्वर्गीची राहणार। त्यागूनि निर्जर असुरा रतली।।३।। तयासंगे तिने केले सुरापान। दिले शापदान देवे मज।।४।। मम सख्या दोन्ही हिरण्य असुर। मृग भूमीवर झालो बापा।।५।। इंद्रे आम्हालागी दिलासे उ:शाप। पुरेल संकल्प तुझा आता।।६।। महादेव म्हणे करी बा रे मुक्त। तुज ऐसा भक्त नाही जगी।।७।।

२४३. दुजी कुरंगिणी आली तृषाक्रांत। आनंदे किरात डोलतसे।।१।। काय निजगुज सांगेल निर्वाण। उल्लासले मन ऐकावया।।२।। गुंतूनि चरणी पडियेली क्षिती। येती काकुलती व्याधालागी।।३।। पंचशरे मज मोहिले निभ्रांत। करूनि तो शांत येते बापा।।४।। अनाथ अपराधी सोडी पुण्यवंता। तुज सायुज्यता प्राप्त होय।।५।। तुम्हा आम्हा साक्षी आहे उमावर। न करावा संहार अमुचा सत्य।।६।। महादेव म्हणे भाग्य आले फळा। भक्तीचा जिव्हाळा ओलावला।।७।।

२४४. तिसरी कुरंगी विलोकूनि वारी। वेगी आली तीरी सरोवराच्या।।१।। आकळूनि यंत्री प्रवर्तली शोका। आठवूनि दुःखा पाडसाच्या।।२।। म्हणे महापुरुषा मुक्त करी प्राण। बाळा स्तनपान करूनि येते।।३।। व्याध म्हणे माते बोलूनि प्रमाण। ठेवी येथे गहाण सत्त्व तुझे।।४।। जाऊनिया तान्हे घेऊनि ओसंगा। म्हणे उमारंगा रक्षी यासी।।५।। येक झाली प्रसूत दुजी कामशांत। करूनि सिद्धीत केला त्यांनी।।६।। महादेव म्हणे धन्य हा विश्वास। जीवित्वाची आस धरिली नाही।।७।।

२४५. भक्षातुर मृग कवळिला चरणी। म्हणे शूलपाणि कैसे केले।।१।। उदकाची आलो धरूनी उत्कंठा। काहो नीलकंठा उपेक्षिले।।२।। हरणी पाडसे आली मृगापासी। किरात उपवासी वाट पाहे।।३।। मृग म्हणे व्याधा ये रे बा सुजाणा। सोडवी ह्या माना अमुच्या आता।।४।। आम्हासाठी तुवा भोगिले संकट। शस्त्रघाते कंठ उतरी आता।।५।। धारातीर्थ मृत्यू मुक्तीचे भांडार। दिला उमावर आम्हालागी।।६।। महादेव म्हणे कठीण हे बोल। पाषाणासी ओल फुटली याने।।७।।

२४६. मृग म्हणे मज वधी भिल्लराया। कैसा पुत्र जाया शोक साहूं।।१।।

कुरंगिणी पाणि जोडोनी विनवीत। नको करू घात सौभाग्याचा।।२।। पतिपुत्राआधी आम्हासी मारावे। येवढे दान द्यावे शेवटीचे।।३।। प्रार्थिती पाडसे आधी आमुचा प्राण। घेईं घालो आण शंकराची।।४।। नुचलेचि तुज जड आमुचे मांस। चालत घरास येतो आम्ही।।५।। कन्यापुत्रदारा पाहती तुझी वाट। होतील यथेष्ट आमुच्या मांसे।।६।। कंठ सद्गदित नेत्री अश्रुधारा। किरात शंकरा आठवीतसे।।७।। मी न मारी म्हणोनि घाली लोटांगण। मृगाचे चरण कवळीतसे।।८।। धन्य धन्य तुम्ही महासत्त्वधीर। करी वारंवार दंडवत।।९।। अकस्मात तेथे आले हो विमान। नेले उद्धरून शंकराने।।१०।। महादेव म्हणे तारामंडलात। मृग तो किरात पाहे डोळा।।११।।

गंगामाहात्म्य

२४७. पृथ्वीवरी तीर्थे जरी ते उदंड। परि ते दहावे खंड पुण्यभूमी।।१।। पर्वतात गंगा निघाल्या सकळ। भागीरथीचे मूळ स्वर्गस्थानी।।२।। सुरसरिता ऐसे नाम ज्या मातेसी। सर्व देवऋषी पुनीत झाले।।३।। महादेव म्हणे जलबिंदु मोक्ष। होत देत साक्ष वदे श्रुती।।४।।

२४८. वाहे भागीरथी शंकरकमळी। पातकाची होळी करू आली।।१।। आवडीने कावडी भरू वारंवार। पुजू रामेश्वर भक्तिभावे।।२।। जप तप मौन नको अनुष्ठान। प्रेमळ भजन करू आम्ही।।३।। महादेव म्हणे गंगास्नानपान। द्यावे मज दान येवढे आता।।४।।

२४९. तीही लोकामाजी येक गंगाजळ। तीर्थेचि सकळ भाविकाला।।१।। स्कंदपुराणीचे लिहिले समस्त। वेद श्रुती देत साक्ष वरी।।२।। भागीरथीविणे नाही दुजे नीर। गोड आणि क्षार धरासंगे।।३।। महादेव म्हणे असो थोर लहान। आम्हा स्नानपान सारिखेचि।।४।।

२५०. गंगा भगीरथे आणिली भूतला। सुलभ सकळा आम्हा झाली।।१।। येकवेळा डोळा विलोकिली जरी। भुक्ती मुक्ती घरी वसती त्याच्या।।३।। अक्षय्य जटेत आवडे शंकरा। सगरउद्धारालागी दिली।।३।। महादेव म्हणे काय बोलू फार। केले चराचर शिवरूप।।४।।

२५१. काशीवासालागी होती उत्कंठा। येतो नीळकंठा काकुळती।।१।। म्हणोनि चरणी ठेवीतसे माथा। काय विश्वनाथा उपेक्षिले।।२।। कोणताही

जन्म असो तये स्थळी। पुरवावी आळी येवढी माझी।।३।। महादेव म्हणे साहिना योगा। असो तेथे कागा जन्म माझा।।४।।

२५२. कनकाचळी वाहे अमर सरिता। शिव धरी माथा आवडीने।।१।। कोण पुण्य होते नकळे गणित। म्हणोनि हे प्राप्त झाली आम्हा।।२।। रजःकण अंबु स्पर्श प्राणियासी। मुक्ती अहर्निशी ग्रंथी त्याच्या।।३।। महादेव म्हणे झाला जगदुद्धार। सगरे उपकार थोर केला।।४।।

काशीमाहात्म्य

२५३. पाहू भूकैलास करू काशीवास। ऐसे अविनाश स्थळ नाही।।१।। देव उमाकांत भेटतो निवांत। ब्रह्मचि करीत दासालागी।।२।। जन्ममरण काही येणे जाणे नाही। मुक्ती लोळे पायी सदा त्याच्या।।३।। महादेव म्हणे लोखंडाचे सोने। चाले खरे नाणे चौसष्टीक।।४।।

२५४. त्रिवेणी संगम पाहिला मी डोळा। तेथे ब्रह्म सोळा लाभ झाला।।१।। तीर्थराज थोर धन्य हे प्रयाग। उणे कोटी याग उपमेसी।।२।। बहुता भाग्याचे जोडिले गिरिवर। पर्वती मकर सापडले।।३।। महादेव म्हणे दाखविला पंथ। म्हणोनि अनंत उदय झाला।।४।।

२५५. धन्य काशीपुर धन्य भागीरथी गंगा। आनंदाने जाऊ पाहू भेटू उमारंगा।।१।। सुर ब्रह्मा विष्णू मानसी धरूनि उत्कंठा। मुनिजन निशिदिन रतले ध्यानी ध्याती नीलकंठा।।२।। आनंदवनविलासी तेथे नांदतो महाराजा। भावे शरण जाता करितो रंकाचा राजा।।३।। येक दोन तीन चार वर्णिता शिणले। नेति नेति श्रुती म्हणोनि मौनचि धरिले।।४।। तारक ब्रह्म उपदेशितो आपणचि निर्वाणी। महादेव म्हणे स्वामी माझा तो मोक्षदानी।।५।।

२५६. गंगाजळे तरु समूळचि गेले। लोहोळ वाचले कैचे तेथे।।१।। सर्व साधनाचे सार हेचि आता। ठेंगणा हा माथा करी राया।।२।। जनी वनी बारे धरी लहानपण। सोडी अभिमान विपत्तीचा।।३।। महादेव म्हणे अहंकाराचा वारा। न लागो शंकरा तुमच्या दासा।।४।।

२५७. धन्य धन्य काशीपुर। शिवभक्तांचे माहेर।।१।। आज पाहिला मी डोळा। आनंदवनीचा सोहळा।।२।। सुवर्णाचे शिवमंदिर। देव लावण्य सुंदर।।३।। महादेव म्हणे काया। पडो तेथे शंभोराया।।४।।

२५८. काया काशीक्षेत्र थोर। आत्मा तो हा विश्वेश्वर।।१।। तया जाणूनि असावे। नलगे काननी वसावे।।२।। सांडावे ते दुजेपण। मग सहजचि आपण।।३।। महादेव म्हणे शोध। केल्याविणे कैंचा बोध।।४।।

शिंगणापूर

२५९. देव शिंगणापुरीचा राजा। तया नमस्कार माझा।।१।। धन्य धन्य चैत्र मास। सर्वकाळ नामघोष।।२।। चला पाहू उमावर। शिवदासाचे माहेर।।३।। महादेव म्हणे दाता। दान देतो सायुज्यता।।४।।

हनुमंत

२६०. अकरावा रुद्र लंघूनि समुद्र। विजयी रामचंद्र केला जेणे।।१।। करतळी वाहून उर्मिलारमण। हरियेला प्राण इंद्रारीचा।।२।। नागविली सेना गांजिले रावणा। जानकीजीवना भेटविले।।३।। महादेव म्हणे कपी पूर्णपिंड। धरिला मार्तंड बाळपणी।।४।।

२६१. रामे रामेश्वर आरंभी स्थापिला। दशकंठ वधिला शिववरदे।।१।। शंकरचि झाला अंजनीनंदन। सुरांचे बंधन सोडविले।।२।। सौमित्रालागोनि दिले जीवदान। लंकेचे दहन केले जेणे।।३।। महादेव म्हणे रामा वाचविले। पाताळी धरिले देवीरूप।।४।।

२६२. पंचवटीमाजी जानकीचा नाथ। शिवदीक्षाव्रत आरंभिले।।११।। कपींद्राचे रूप शंकरे धरिले। प्रतापे भरिले भूमंडल।।२।। द्रोणाद्रि आणून सौमित्र उठविला। राम भेटविला भरतालागी।।३।। महादेव म्हणे भक्ती आकळिला। क्रोधाने जाळिला काम जेणे।।१४।।

आत्मचरित्र

२६३. माय भागीरथी पिता नीलकंठ। उदरसंपुट धन्य जिचे।।१।। आजवरी मज भ्रांतीने मोहिले। आता कळो आले प्रसादाने।।२।। बाळपरी मज दिले कृपादान। आपुले हे ध्यान शंभुराया।।३।। प्रथमचि भेटी झाली कृष्णातीरी। आनंदाची लहरी उसळली।।४।। पुण्यग्राम जांब सत्राशे शेचाळ। झाला जन्मकाळ महादेवा।।५।।

श्री शिवदास

हे मन्मथस्वामींचे समकालीन होते. त्यांनी मन्मथस्वामींची लिहिलेली ‘आरती शिवराजा। मन्मथ स्वामी महाराजा’ ही आरती प्रसिद्ध आहे. अभंग, शिवपाठाचे अभंग आणि अन्य स्फुट रचना शिवदासांच्या नावावर आढळते. शिवदास नावाचे अनेक कवी होऊन गेले. अभंगकार शिवदास नेमके कोण, याबद्दल संशोधकांत मतभेद आहेत. मन्मथस्वामींची आरती लिहिणारे आणि अभंगरचना करणारे शिवदास हे ‘बीडकर शिवदास’ म्हणून ओळखले जातात. सिद्धेश्वरपुराण व बसवपुराण यांची रचना करणारे एक शिवदास सोलापूर (काळ अंदाजे इ.स. १८१२) येथे होऊन गेले. याशिवाय शिखरशिंगणापूर येथे नाभिक समाजातील एक शिवदास होऊन गेल्याची नोंद आढळते. अभंगकार शिवदास हे बीडकर शिवदास असावेत, असा संशोधकांचा कयास आहे.

प्रस्तुत गाथेतील क्र. १ ते १८२ हे अभंग ‘मन्मथगाथे’तील असून क्र. १८३ ते २२३ हे अभंग ‘सांप्रदायिक सप्तरत्न गाथे’तील आहेत. क्र. २२४ ते २३० हे अभंग डॉ. वैजनाथ फास्के, पुणे यांच्या संग्रहातून घेतले आहेत.

□□

श्री शिवदासांचे अभंग

१. धन्य आजि दिन भला। आम्हां थोर लाभ झाला।।१।। बहुत सुकृताची गांठी। तेणें झाली संतभेटी।।२।। मिळे पूर्वजांचा ठेवा। किंवा बाळकासी मेवा।।३।। शिवदास म्हणे देखियलीं। शिवयोग्याची पाउले।।४।।

२. होतां ज्याचें समदर्शन। सर्व पापें होतीं दहन।।१।। भाळ ठेवितां पायास। कुबुद्धीचा होय नाश।।२।। होतां जयासी भाषण। उरो नेंदी द्वैतभान।।३।। शिवदास म्हणे आहे। धन्य विरक्ताचें पायें।।४।।

३. पुरे पुरे हा संसार। मन कंटाळलें फार।।१।। जगा करितां आर्जव। थोर दुखावला जीव।।२।। आतां धांवूनीयां मिठी। प्रेमें घालूं तुझे कंठीं।।३।। शिवदास म्हणे देवा। सदा प्रेमा मज द्यावा।।३।।

४. मना करी लागवेग। स्मरी सखा उमारंग।।१।। कोणे वेळें होय काय। नाहीं देहाचा निश्चय।।२।। पाहे बा रे हा संसार। नचि सरे जन्मभर।।३।।

सर्व सांडोनी एका। स्मरी कैलासनायका।।४।। शिवदास म्हणे भावें। आधीं स्वहित साधावें।।५।।

५. दृष्टी करूनी उफराटी। रिघा शूरत्वें त्रिकुटीं।।१।। चहुं शून्या मध्यभाग। पहा सखा महालिंग।।२।। होत दशनाद ध्वनीं। लागे अवस्था उन्मनीं।।३।। शिवदास म्हणे तेथें। सदा राहे आनंदानें।।४।।

६. बा या निजसुखापुढे। काय विषय बापुडें।।१।। मिष्ठान्न नानापरी। काय अमृताची सरी।।२।। पहा गंगेचें निर्मळ। समय एका मृगजळ।।३।। शिवदास म्हणे बा रे। निजाविण दुःख सारें।।४।।

७. निजानंदीं ठाव झाला। कोण अपेक्षी देहाला।।१।। देहीं असोनिया मेलों। शिवरूपीं सुख धालों।।२।। ऐसें अखंडित सुख। कोण त्यागी महामूर्ख।।३।। शिवदास म्हणे सदां। टाळी लावी ब्रह्मानंदा।।४।।

८. धांव धांव चंद्रमौळी। रक्षी तुझी ब्रीदावळी।।१।। पतितपावन दीनानाथें। करुणाकर नाम तूतें।।२।। असो नामीं अभिमान। तारी देवा तरी दीन।।३।। शिवदास म्हणे आतां। सर्व तुझी तुज चिंता।।४।।

९. तुझ्या कृपें देवा निश्चिंत मी आहे। सर्व चिंता पाहे माझी तुज।।१।। मजलागीं चिंता हेचि देवराया। पाहीन मी पाया कधीं तुझ्या।।२।। तुजविण सर्व दिसे नाशवंत। दिसे तें नासत वेळोवेळां।।३।। शिवदास म्हणे अविनाश एक। कैलासनायक स्वामी माझा।।४।।

१०. क्षणैक जाणोनी देवा तुजवीण। नावरेचि जाण कांहीं मज।।१।। गोड तुझी कांती स्वरूप लावण्य। सर्वदां तारुण्य युगायुगीं।।२।। तैसें तुझें नाम गोड गोड तातां। नयेचि सरी त्या अमृतासी।।३।। शिवदास म्हणे ऐसें रूप नाम। सर्वदां सप्रेम आठवावें।।४।।

११. शिवाबाई शिवाबाई। मज अनाथाची आई।।१।। गौरतनु कंठ श्याम। अविनाश सुखधाम।।२।। तुज पाहतां हे माउले। सुख अखंडित झालें।।३।। शिवदास म्हणे आतां। मन धालें तुज पाहतां।।४।।

१२. अग्नी भेटतां कर्पूरा। कैंचा आकारासी थारा।।१।। जळ लवणा पडे गांठी। पुन्हा कैंची उरे खोटी।।२।। जीव शिव झाल्या एक। कैंची राहे कमरेख।।३।। शिवदास म्हणे भला। चहू देहां नागवला।।४।।

१३. पाहूनियां नीळकंठा। डोळां धरियेला ताठा।।१।। प्रेमें सुखाचें उमाळें। जैसा सिंधु उचंबळें।।२।। जैसे कापूराचे रवे। तैसे समरस भावें।।३।। पाहूनियां पंचमुख। शिवदास म्हणे सुख।।४।।

१४. तूंचि सखा माझा जीवीचा जिव्हाळा। होशी जाश्वनीळा मायबापा।।१।। अनाथाचा नाथ दीनाचा दयाळू। गौरतनू भाळीं चंद्र ज्याचें।।२।। कृपेचा सागर करुणेचा घन। भाविकाचा पूर्ण इच्छादानी।।३।। शिवदास म्हणे थोर दयाघन। आवडती भक्त प्राणाहून।।४।।

१५. जोंवरी काळ पाठीं दडे। तोंवरी नाना विघ्न पडे।।१।। कांहीं न चाले सायास। जेथें जाय तेथें नाश।।२।। शहाणा होय महामूर्ख। मुख त्यागे होय दुःख।।३।। शिवदास म्हणे त्रास। होय काळ पाठी ज्यास।।४।।

१६. म्हणती आजी पुढें आला। जाणें आनंद आम्हाला।।१।। काळ झालीयां सन्मुख। कैंचे भवभय दुःख।।२।। सर्व सुखाचा सोहळा। तो हा आजी साह्य झाला।।३।। शिवदास म्हणे जाण। धन्य धन्य आज दिन।।४।।

१७. शिरीं जटा आणि भागीरथी असे। मौळीं चंद्र दिसे सुशोभित।।१।। भाळीं अग्निनेत्र कंठ असे निळा। अर्धांगीं ती बाळा पर्वताची।।२।। श्रवणीं शोभती सर्पाचें कुंडल। गळां रुंडमाळ विराजित।।३।। नागपाश घंटा डमरू त्रिशूळ। आधीं ही सकळ आयुधें करीं।।४।। गजचर्मांबर ऐसा विश्वंभर। तोचि दिगंबर समर्थ जो।।५।। शरीर तें असे शुद्ध श्वेतवर्ण। त्यावरी भूषण विभूतीचें।।६।। शिवदास म्हणे ऐसा जो समर्थ। तोचि विश्वनाथ स्वामी माझा।।७।।

१८. कैसें परी तुझें घडो हें दर्शन। न कळे साधन मजलागीं।।१।। न मिळतीं शास्त्रें येकामाजीं एक। भिन्न भिन्न देख मार्ग त्यांचे।।२।। आपुलीं मतें बोलती सकळ। परी तळमळ न जाय त्यांची।।३।। तैशापरी मज न सुचे उपाय। म्हणोनिया पाय धरिले तुझे।।४।। शिवदास म्हणे धांव पाव वेगीं। तुजविण जगीं कोण आम्हां।।५।।

१९. हीनाचा तांब्याचा जरी तो रुपाया। न म्हणेचि राया खोटा त्यासी।।१।। आपुली निशाणी असें जयावरीं। त्यासी अंगीकारी प्रीतियुक्त।।२।। तैशापरी आम्ही जरी दोषवंत। परि तुझा भक्त म्हणवितो।।३।। म्हणोनी तू माझा न

करी अव्हेर। करावा उद्धार पतिताचा।।४।। शिवदास म्हणे तू तो उद्धरिसी। परि बा आम्हासी धीर नाहीं।।५।।

२०. बाळकासी माता न करी सांभाळ। कैसें परी बाळ वाचेल तें।।१।। चंद्र चकोराचा न पुरविता हेत। कैसी त्याची गत चंद्रचूडा।।२।। चातकाची तृषा न हरितां मेघ। कैसा मग प्राण राहे त्याचा।।३।। तैशापरी मज जहालेसे देवा। जीवीचिया जीवा भेट वेगीं।।४।। भेटूनिया पुन्हा नोहेचि वियोग। ऐसी भवभंग भेट तुझी।।५।। शिवदास हेंचि मागे वारंवार। दयासागर तूं पुरविसी।।६।।

२१. बहु माझ्या जीवा वाटतसे दुःख। कधीं तुझें मुख दाखविसी।।१।। बाळालागीं माता गेलिया टाकून। कैसा त्याचा प्राण वाचे देवा।।२।। युगायुगीं तुम्हीं उद्धरिले जडा। ऐसे ही पवाडे ऐकतो की।।३।। आम्हाविसीं काय देवा झालें तुज। हेंचि मज चोज वाटतसें।।४।। शिवदास म्हणे ये बा विश्वेश्वरा। भेट दे शंकरा शीघ्र मज।।५।।

२२. काय माझें मन तुज आंवरेना। माझी कां करुणा नये तुज।।१।। किंवा माझें पाप झालें बळिवंत। काय माझें चित्त पाहतोसी।।२।। आतां नका पाहू माझा तो निश्चय। दाखवी गा पाय लवकरी।।३।। शिवदास बोले लडिवाळपणे। क्षमा ही करून भेट देई।।४।।

२३. आतां मी कोणाची न धरीच आंस। आमुचा विश्वास तुझे पायीं।।१।। मारी तारी चित्तीं आहे ते करावें। आम्हीं जीवें भावें शरण आलों।।२।। शरण आलों तुझ्या नामाची आवडी। जीव चरफडी तया सुखे।।३।। एकवेळां भेटी द्यावी शिवदासा। मग सुखीं बैसा अंतरीच।।४।।

२४. पळपळ व्यर्थ आयुष्य चालिलें। वाटें गमाविलें नरदेह्या।।१।। आतां केव्हां कृपा करिसी दयाळा। लाविसी जिव्हाळा भक्तीचा तो।।२।। भक्तिविण जिणे जळो का सायास। व्यर्थ या भूमीस भार वाहो।।३।। म्हणोनी शरण शिवदास आला। भक्तिप्रेम त्याला देई तुझें।।४।।

२५. अगा शंभुराया धांव पाव वेगीं। तुजविण जगीं कोण आम्हां।।१।। म्हणोनिया देई दृढ आलिंगन। करावे पावन पतितासी।।२।। पतित मी पापी मूढ मतिमंद। परि मनीं छंद आहे तुझा।।३।। यालागीं मी तुज येतो काकुलती। वेगीं गौरीपती भेट देई।।४।। भेटीविण दुजे नसेंचि मागणे। शिवदास म्हणे

हेंचि देई।।५।।

२६. काय करूं देवा न सुचे उपाय। जेणें तुझे पाय जोडे ऐसें।।१।। नेणो भक्तितत्त्व नेणो आत्मज्ञान। पश्चात्ताप पूर्ण नाहीं चित्तीं।।२।। साधु संत तुझे अवतार जाण। तयासी शरण नाहीं गेलों।।३।। शिवदास तुज येतो काकुलती। काय माझी गती शंभुराया।।४।।

२७. धांव पाव वेगीं आता लवकरी। मज या संसारीं दुःख वाटे।।१।। दुःखरूप बुडे ह्या भवसागरी। धरूनिया करी ओढी वेगीं।।२।। लोभे मोहें लज्जें घातलीसे मिठी। सोडवी धुर्जटी मजलागीं।।३।। न करी आळस न लावी उशीर। नसे न मज धीर विश्वेश्वरा।।४।। कृपासिंधु हो तो तोडी भवपाश। ऐसें शिवदास विनवितसे।।५।।

२८. आता लवकरी देई मज भेटी। होतो बहु कष्टी जीव माझा।।१।। नाहीं तरी तोडी हें भवबंधन। सुखरूप पूर्ण करी मज।।२।। ऐसा मनोरथ माझिया जीवीचा। भाव अंतरीचा जाणसी तूं।।३।। शिवदास बहू होतो कासाविसी। केव्हां पुरविसी इच्छा माझी।।४।।

२९. डोळेंभरीं तुझें रूप मी पाहीन। तैसेचि राहीन सर्वकाळ।।१।। मुखभरी गुज तुज मी बोलेन। सन्निध राहीन दासपणे।।२।। ऐशापरी माझ्या हृदयींचा हेत। पुरवी मनोरथ देवराया।।३।। शिवदास तुम्हां येतो काकुलती। उदास विनंती करूनिया।।४।।

३०. आम्ही वीरशैव नेणो दुजा देव। परि तूंचि सर्व जाहालासी।।१।। सर्व नामरूप मज भेट देसी। प्रगट झालासी हृदयीं माझ्या।।२।। काय उतराई होऊ मी तुजला। ऐसा मज दिला अनुभव।।३।। हाचि अनुभव दृढ राहो चित्तीं। करितो विनंती शिवदास।।४।।

३१. जैसी कळे तैसी करितो मी स्तुति। गोड उमापती करा तुम्ही।।१।। नोहे मी पंडित नोहे बुद्धिवंत। नोहे ज्ञानी भक्त आत्मयोगी।।२।। नेणते लेकरूं भलतेचि बोलें। परि सुखी डोले माता त्याची।।३।। तैशापरी हाही अज्ञानी सेवक। न नेणो आणिक तुजविण।।४।। काय परिहार देऊं मी तुजला। बुद्धि साक्षी तुला सर्व ठावें।।५।। शिवदास म्हणे मायबाप बंधु। तूंचि कृपासिंधु सर्व आम्हा।।६।।

३२. तुजविण नेणो आणिक दैवत। विश्वेश्वरा सत्य जाण बापा।।१।। तुजविण कोणा न जाय शरण। गेलिया हा प्राण सत्य जाण।।२।। तुजविण नेणो आणिकाची स्तुती। अगा गौरीपती सत्य बापा।।३।। तुजविण दुजें नेणेंच मी कांहीं। शिवदास पायीं लागतसे।।४।।

३३. का हो मजलागीं उपेक्षिले तुम्ही। विश्वेश्वरा स्वामी दयानिधे।।१।। तुम्ही उपेक्षिल्या कोण सोडविता। धांव उमाकांता पाव वेगीं।।२।। पावसी म्हणोनी फार केली आंस। शेवटीं निराश करूं नका।।३।। शिवदास बहु करुणा भाकीत। करी वेगीं मुक्त भवपाशीं।।४।।

३४. बहुत दिवस लागली ही आशा। भेट जगदीशा लवकरी।।१।। बाळकासी माता उपेक्षिल्या जरी। कोण पूर्ण करी मनोरथ।।२।। तैशापरीं तुम्ही उपेक्षिल्या देवा। कोण मनोभावा पुरवील।।३।। शिवदास म्हणे अगा गौरीवरा। वेगीं पूर्ण करा मनोरथ।।४।।

३५. वेगीं झडकरी विश्वनाथा येई। भेट मज देई अनाथासी।।१।। बहुत हिंपुटीं जहालों मी दीन। न सुचे साधन मज़ कांहीं।।२।। स्वहितासी नेणे जरी तो बाळक। तरी माता देख हित करी।।३।। तैसे परी माझें तूंचि सर्व गोत। करी मज मुक्त चंद्रचूडा।।४।। शिवदास बहु भाकितो करुणा। भेट पंचानना लवकरी।।५।।

३६. सर्व माझी लाज तुज विश्वेश्वरा। पतित मी खरा आहे पापी।।१।। आणि तुझा दास म्हणवी मुखानें। इतर साधनें नेणें कांहीं।।२।। याचा अभिमान सर्वस्व तुम्हाला। सांभाळी ब्रीदाला आपुलिया।।३।। शिवदास म्हणे उपेक्षाल जरी। तरी गती बरी न दिसेचि।।४।।

३७. शरण मी आलों तुज विश्वेश्वरा। सोडवी दातारा मजलागीं।।१।। वासना ही रांड लागलीसे पाठी। होतो बहु कष्टी जीव माझा।।२।। म्हणोनीच तुम्हा येतो काकुलती। निजदासाप्रती सोडवी बा।।३।। तुझा दास ऐसें म्हणवितो जगीं। कृपा करी वेगी मजवरी।।४।। वारंवार हेंचि मागे शिवदास। वेगी भवपाश मुक्त करी।।५।।

३८. कैसा माझा तुज पडला विसर। होशी विश्वंभर व्यापक तूं।।१।। बहुताचे केले मनोरथ पूर्ण। मजविषयीं जाण ऐसें का हो।।२।।

भक्तकामकल्पद्रुम म्हणविसी। मज कां जहालासी विपरीत।।३।। लडिवाळपणें बोलिलो हें ऐसें। अधिकार नसे मज कांहीं।।४।। शिवदास म्हणे क्षमाही करून। वेगे भेट देणें मजलागी।।५।।

३९. काय म्यां करावें स्वहित कळेना। वृत्ती ही वळेना परमार्थी।।१।। कर्मपिसें झालों कर्माचें स्वाधीन। चित्त लगटेना नामरूपीं।।२।। माझा मीच कोण नकळे मजसी। तुझ्या स्वरूपाशीं जाणूं कैसे।।३।। ऐसेंपरी मज जहाले दुस्तर। अभय तूं कर ठेवी माथां।।४।। शिवदास म्हणे तुझ्या भेटीविण। सर्व मज शीण वाटतसे।।५।।

४०. बहुरूपी सोंग दाविता जनासी। इच्छीलें दे त्यासी संतोषोनीं।।१।। तूं तो त्रिलोक्याचा आहेसी गा भूप। आम्ही बहुरूपें दाखविली।।२।। पाहोनी तें रूप जरी तूं प्रसन्न। वरी देई दान सायुज्य गा।।३।। नाहीं तरी सोंग नको आणूं पुन्हा। ऐसें तरी म्हणा मजप्रती।।४।। शिवदास म्हणे न लावी उशीर। कंटाळलों फार सोंगासी या।।५।।

४१. ज्याचें चित्तीं तुझा वास। त्याचा होईन मी दास।।१।। जैसा माझा मनोरथ। ते तूं पुरवी गा अर्थ।।२।। त्याचें मुखें तुझे गुण। सदां सर्वदा ऐकेन।।३।। शिवदास म्हणे शिवा। त्याचें दास्य देई देवा।।४।।

४२. चित्तीं विषयाचा ध्यास। मुखें म्हणवितो दास।।१।। ऐसा दुष्ट मी पतित। नसे विषयीं विरक्त।।२।। ऐसा असोनी दुर्गुण। तुज आलों मी शरण।।३।। तरी ते न पाहतां कांही। शिवदासा भेट देई।।४।।

४३. कैसें करूं मी भजन। होईना की स्थिर मन।।१।। तूंचि कर्ता करविता। देवा अवघी तुझी सत्ता।।२।। आम्ही बाहुल्याच्या जाती। सूत्रदोरी तुझे हातीं।।३।। जैसें नाचविसी देवा। तैसें नाचूं सदाशिवा।।४।। शिवदास म्हणे आतां। आम्हां लावी भक्तिपंथा।।५।।

४४. आम्ही नेणो भक्तिभाव। चित्तीं भेटायाची हाव।।१।। भेट भेट बा शंकरा। सखया पार्वतीच्या वरा।।२।। नंदी भृंगी सहित यावें। मज अनाथा तारावें।।३।। शिवदासासी तारक। ऐसा निश्चयचि एक।।४।।

४५. माझ्या विश्वेश्वरा येई। मज दीना भेट देई।।१।। माझ्या महादेवा यावें। मज पतिता तारावें।।२।। येई माझ्या तूं शंकरा। देई भेट विश्वेश्वरा।।३।।

भेट भेट शंभुराया। शिवदास लागे पाया।।४।।

४६. काय तुज आम्ही मागतसे देवा। त्यालागीं तूं धांवा न ऐकसी।।१।। न ऐकसी जरी आमुची विनंती। तरी त्रिजगतीं ठाव नाहीं।।२।। ठाव नाहीं मज तुजविण हरा। म्हणोनिया त्वरा धांव वेगी।।३।। धांव पाव सांबा शिवदासालागी। तुजविण जगीं कोण आम्हा।।४।।

४७. पश्चात्ताप देई देवा। जेणें घडे तुझी सेवा।।१।। नाहींतरी दे मरण। व्यर्थ जिणें भक्तिविण।।२।। म्हणोनिया वेगी हरा। दोहींतूनी एक करा।।३।। शिवदासा वाटे खंती। म्हणोनी येतो काकुलती।।४।।

४८. निजूं नका जागा जागा। पुढें आहे बहु दगा।।१।। लक्ष चौऱ्यांशीचा फेरा। जेणें चुके ऐसें करा।।२।। सर्वकाळ करा भक्ती। दुजें येऊ नेदी चित्तीं।।३।। शिवदास म्हणे मना। तूंही ऐक बा सज्जना।।४।।

४९. तुझी धरियेली कास। तारी आम्हा पतितास।।१।। बहु तारिले पतित। ऐशी ऐकिली म्यां मात।।२।। म्हणोनिया तुझी आंस। फार लागली जीवास।।३।। शिवदासाप्रती तारी। धांव पाव मदनारी।।४।।

५०. सर्व देवांमाजीं थोर। एक माझा उमावर।।१।। विष्णु पूजी त्याचे पाय। इतरांचा पाड काय।।२।। मिथ्या नोहे हें भाषण। पहा पुराण शोधून।।३।। शिवदास म्हणे शिव। सर्व देवाचा तो देव।।४।।

५१. आम्हां ऐसे पुण्यवंत। कोणी नसे त्रैलोक्यांत।।१।। बहु आमुचें सुकृत। म्हणोनी झालों शिवभक्त।।२।। आतां चुकली चौऱ्यांशी। वास करूं त्या कैलासीं।।३।। शिवदास म्हणे शिव। दासा कैचा पुनर्भव।।४।।

५२. मागें बहुतांचे अर्थ पुरविले। मजविषयीं झालें काय नेणो।।१।। तरी आतां ऐसें न करी दयाळा। नसे धीर या वेळा विश्वनाथा।।२।। बाळालागीं माता येतसे धांवून। परी तो रुदन करीतसे।।३।। तैसे परी माझे मनीचा भावार्थ। पुरवी वांछितार्थ शीघ्र देवा।।४।। शिवदास म्हणे पुरवाल हेत। तों वरी दुश्चित धीर नसे।।५।।

५३. काय वांचोनिया व्यर्थ भूमिभार। तुझ्या पायीं स्थिर मन नसे।।१।। न घडेचि पूजा न घडें भजन। नसे भक्ति ज्ञान वैराग्य तें।।२।। सर्व गुणी ऐसा अपराधी खळ। परि तूं दयाळ भक्तालागीं।।३।। न पाहे कांहीं कोणता

सद्गुण। व्याधा उद्धरून नेले देवा।।४।। चांडाळीनें बेल सहज टाकिला। कृपासिंधु जहाला समाधान।।५।। ऐसा हा निश्चय धरोनीया पोटीं। शिवदास भेटी इच्छीतसे।।६।।

५४. पतित मी पापी असे मतिमंद। परि मनी छंद वसे तुझा।।१।। तुजविण कोणा येऊं काकुलती। कोण माझी खंती उडवील।।२।। मोह लज्जा भय न सोडीच मज। सोडवितां तुजविण कोण।।३।। तुजविण माझे दुजे कोणी नाहीं। शिवदास पायीं लागतसे।।४।।

५५. माझेचि प्रारब्ध झालें अनिवार। हेचि मज फार चोज वाटें।।१।। अल्प आयुष्याचें दीर्घ वय केलें। मजलागीं झाले काय तुम्हां।।२।। मृत्यु झाले त्यासी पुन्हा उठविले। मजविषयीं झाले काय तुम्हां।।३।। ऐसें असंख्यांत भक्त त्वां रक्षिलें। मजविषयीं झाले काय तुम्हां।।४।। शिवदास म्हणे वाटतसे खंती। वेगी गौरीपती भेट देई।।५।।

५६. धरी हातीं किंवा टाकी या भवांत। जे तुज उचित ते तूं करी।।१।। परि तुझी सेवा देई मज प्रेमा। मग सुखे आम्हां जन्मा घाली।।२।। जन्मा घाली नाहीं भीत या भवासी। कृपावंता होसी साह्य जेव्हां।।३।। साह्य होऊनिया हृदयीं वसावें। शिवदासा द्यावें दान हेंचि।।४।।

५७. कामें क्रोधें लोभें मूढ झाली मती। चालली दुर्गती तेणें योगें।।१।। तुझे दास आम्ही दुर्गतीस जातां। त्याची गौरीकांता लाज कोणा।।२।। अघटित हें तो न घडे कल्पांती। परि आम्हांप्रती घडलेसे।।३।। शिवदास म्हणे निजदासा मुक्त। करणे हेंचि उक्त आहे तुम्हा।।४।।

५८. चौऱ्यांशी लक्ष घेऊनिया सोंग। तुज यथासांग दाखविलें।।१।। परि त्वां आम्हासी दिलें नाहीं कांहीं। आतां तरी देई मोक्षदान।।२।। नाहीं तरी स्पष्ट सांग बा आम्हासी। न आणी सोंगासी म्हणोनिया।।३।। शिवदास म्हणे एक दोहोतूनी। करी शूळपाणि लवकरी।।४।।

५९. तुझें कराया पूजन। सहस्रहस्त शक्तिहीन।।१।। तुझें स्वरूप पहायासी। शक्ति नोहे सहस्राक्षासी।।२।। तुझी वर्णावया कीर्ति। सहस्रमुखां नोहे शक्ति।।३।। तेथें माझा केवा किती। पुजूं पाहूं वर्णूं स्तुति।।४।। शिवदास म्हणे बाप। तुझें नामीं करूं जप।।५।।

६०. तुझें नामीं प्रीती जडो। दुजें विषय नावडो।।१।। ऐसे करी माझें चित्त। कृपा करोनि सतत।।२।। मग पूर्वकर्म जैसे। मज भोग घडो तैसे।।३।। त्याचा कांहीं तुम्हावर। देवा न घाली मी भार।।४।। म्हणे शिवदास कामारी। नामीं प्रीति दे सत्वरी।।५।।

६१. कांहीं न मागे मी तुज। एक्या नामावीण दुजें।।१।। नामें हरे भवदुःख। नामें लाधे आत्मसुख।।२।। ऐसें सोडोनिया नाम। कोण इच्छी अन्य काम।।३।। शिवदास म्हणे स्वामी। देई प्रेम तुझें नामीं।।४।।

६२. आम्हीं शरण शरण। आलों कामक्रोधा भेणें।।१।। बळें सकळ झोंबती। नाहीं नाहीं बा विश्रांती।।२।। करूं न देती भजन। यास्तव आलों मी शरण।।३।। पंचाक्षरी तूंचि एक। निवारितां द्वंद्व दुःख।।४।। शिवदासासी तारक। आदि अंतीं तूंचि एक।।५।।

६३. आम्हीं अपराधी खळ। अंगीं नाहीं भक्तिबळ।।१।। क्षमा दया नाही शांती। भक्तिभाव नाहीं चित्तीं।।२।। नाहीं ज्ञान ध्यान योग। नेणो कोणताही मार्ग।।३।। परि निश्चय चित्तासी। शिवदासा उद्धरिसी।।४।।

६४. शरण आलों मी दयाळा। देई भक्ति गा प्रेमळा।।१।। मुखीं म्हणे मी शरण। शरण यावें कैसे नेणे।।२।। देहीं बुद्धि दृढ झाली। हिताहित विसरली।।३।। पश्चात्ताप नसे चित्तीं। विषयीं वाढलीसे प्रीति।।४।। नाहीं प्रेम अंगीं भक्ति। ऐसा खळ मूढमती।।५।। परि लागलीसे आंस। भेटा म्हणे शिवदास।।६।।

६५. तुझे न करितां दास्य। व्यर्थ चालिलें आयुष्य।।१।। यासी आतां करूं काय। मज सुचेना उपाय।।२।। म्हणोनी आलों शरण। करी पतिता पावन।।३।। शिवदास म्हणे तुझें। पतितपावन ब्रीद गाजे।।४।।

६६. कांहीं न रुचे बा मज। तुझें नामाविण आज।।१।। जरी नाना विषयसुख। तरी ते भासे मज दुःख।।२।। अथवा स्वर्गभोग देसी। तरी तो कारण भवासी।।३।। शिवदास म्हणे शिवा। नामीं प्रेमा देई देवा।।४।।

६७. टाकून प्रपंच व्यवहार। या रे सज्जन हो सत्वर।।१।। साह्य होऊं एकमेकां। भजूं कैलासनायका।।२।। ब्रह्मानंदें नाचूं सर्व। वाचें वदू शिव शिव।।३।। करूं जन्माचें सार्थक। मिळोनिया सकळीक।।४।। शिवदास

म्हणे ऐका। लाज आळस धरूं नका।।५।।

६८. जो कां म्हणवी आपुला। सांब तारीतसे त्याला।।१।। न पाहेचि पुण्य पाप। अवघे करीतसे माफ।।२।। नार्मी देऊनिया प्रेम। हरीतसे मृत्यु जन्म।।३।। शिवदास म्हणे त्यासी। तुम्ही भजा सद्भावेसी।।४।।

६९. पतितपावन तुझें ब्रीद। म्हणोनि वाटे मज खेद।।१।। कीं मी पतित तो खरा। पावन करिसी शंकरा।।२।। म्हणसी तारिलें बहुत। तरी ती जीर्ण झाली मात।।३।। शिवदास म्हणे तारी। ब्रीद सोडी नाहीं तरी।।४।।

७०. हेंचि मागो तुजप्रती। पाडी देहाची विस्मृती।।१।। देवा तरीच ध्याऊं ध्यान। आम्ही सुखी होऊं पूर्ण।।२।। ऐसे समजलों गुज। म्हणोनी विनवितो तुज।।३।। शिवदास म्हणे तरी। ब्रीदा रक्षी नानापरी।।४।।

७१. कैसें असें तुझें रूप। आम्हीं नेणो तें स्वरूप।।१।। सगुण निर्गुण त्रिगुण। एक निश्चय नोहे पूर्ण।।२।। कैसा अससी शंकरा। विश्वनाथ विश्वेश्वरा।।३।। नमस्कार त्या रूपास। असो म्हणे शिवदास।।४।।

७२. किती पहासी निर्वाण। जाऊं पाहे माझा प्राण।।१।। म्हणोनिया धांव घेई। भेट मजला लवलाही।।२।। तुजविण माझे कोण। नसे त्रिलोकींही जाण।।३।। म्हणोनि या शिवदासा। भेट भेट गा विश्वेशा।।४।।

७३. मृत्यु असोनिया शिरीं। सुख मानितां संसारीं।।१।। काय म्हणावें तुम्हाला। ऐसे कैसे मूढ झाला।।२।। आतां तरी व्हा सावध। कोण मी हा करा शोध।।३।। तेणें नोहे जन्म मृत्यू। शिवदास म्हणे सत्य।।४।।

७४. विष्णु थोर शिव थोर। ऐसे भांडो भांडणार।।१।। आम्हीं न लागूं त्या छंदा। व्यर्थ कोण करी निंदा।।२।। भजूं एका विश्वेश्वरा। न भजूं न निंदू श्रीधरा।।३।। शिवदास म्हणे साचें। मुख्य वर्म हो भक्तीचें।।४।।

७५. मुखीं नाम मनीं ध्यान। ऐसें देई मज दान।।१।। तुम्हा देणें हें उचित। आम्हां मागणें हें हित।।२।। यासी न करी आळस। होतो आयुष्याचा नाश।।३।। शिवदास म्हणे त्वरा। इच्छा पुरवावी शंकरा।।४।।

७६. रामचंद्राचा ईश्वर। तो हा जाणा रामेश्वर।।१।। हें तो असोनी प्रसिद्ध। नेणती गा मतिमंद।।२।। म्हणती शिव स्मरें राम। न कळे तया मुख्य वर्म।।३।। कोण सेव्य आणि सेवक। याचा करा हो विवेक।।४।। शिवदास

म्हणे शिव। सर्व देवांचा तो देव।।५।।

७७. अनन्यशरण आदी गणानाथा। पार्वतीच्या सुता लंबोदरा।।१।। कळा विद्या सर्वसिद्धीचा नायक। कल्याणदायक वृंदमूर्ती।।२।। मूषकवाहन पाशांकुशधरा। हेंचि दे दातारा कृपादान।।३।। बैसोनि हृदयीं वदवावें स्तोत्र। जेणें भाळनेत्र वश होय।।४।। शिवदास म्हणे करी प्रेमवृष्टी। जेणें पडो मिठी शिवापायीं।।५।।

७८. आतां नमस्कार माझा। वेदमाता ब्रह्मात्मजा।।१।। श्वेतांबर हंसवाहनीं। करी वीणा मंजूळ वाणी।।२।। स्मरू वाटतो शंकर। नाहीं अंगीं तालसूर।।३।। त्वरें माउली त्वा यावें। माझ्या रसनीं बैसावें।।४।। शिवदास म्हणे आतां। तोषवावें गौरीनाथा।।५।।

७९. लागा वेगीं आतां प्रेमानंद मिठी। घालूं पदांगुष्ठीं सद्‍गुरूच्या।।१।। जेणें शब्दांजन लेवोनिया कानी। स्वरूप करोनी ठेवियले।।२।। काय उपकार होऊं मी उतराई। देहादिक आहे नाशवंत।।३।। मौन्य सद्‍गद होऊनीया चित्तीं। तुज कृपामूर्ति प्रणिपात।।४।। शिवदास म्हणे अखंड प्रेमेशीं। तुझे चरणासी ऐक्य करी।।५।।

८०. ॐ नमोजी सदाशिवा। सर्व देवाचिया देवा।।१।। नाम तुझें महादेव। हाचि येतो अनुभव।।२।। प्रेमहंसा निरालंबा। कोठें गुंतलासी सांबा।।३।। निर्गुणा तूं सगुणा येई। मज दीना पाय दावी।।४।। शिवदास म्हणे त्वरा। येई सख्या करुणाकरा।।५।।

८१. दशभुज पंचमुख त्रिनयना। वृषभवाहना महाराजा।।१।। जटाजुटीं गंगा मुगुट सुंदर। कंठीं शेषहार शोभिवंत।।२।। श्रवणीं कुंडल दिसे मनोहर। कपाळीं त्रिपुंड्र भस्म शोभें।।३।। गौरतनुवरी गजांबर शोभा। उमासहित उभा शंभुराया।।४।। शिवदास म्हणे सर्वकाळ पायीं। ठेवोनिया डोई पाहूं रूप।।५।।

८२. बहु जन्मीचा सोयरा। होशी माझ्या उमावरा।।१।। आतां विसरसी कां। बापा कैलासनायका।।२।। माझें जीवीचे जीवना। येई सख्या पंचानना।।३।। हेंचि माझी तळमळ। पाहूं तुझें पदांजुळ।।४।। शिवदास म्हणे मिठी। प्रेमें घालूं तुझे कंठीं।।५।।

८३. येई माय आतां कैलासनिवासी। भवभय पिसें वारी माझे।।१।।

पाडस मी तुझें तूं होशी हरणी। नकों भवारण्यीं सोडूं मज।।२।। कामधेनू तूं मी वत्स तुझे पायीं। नको चोरू मायी प्रेमपान्हा।।३।। तान्हुलें मी तुझें तूं होसी जननी। घेई उचलूनी माय माझी।।४।। शिवदास म्हणे चातक मी जाणा। भाकितों करुणा वृष्टि करी।।५।।

८४. जयजयाजी जाश्वनीळा। वेगीं येई हो दयाळा।।१।। जयजयाजी निरालंबा। कोठें गुंतलासी सांबा।।२।। तुझें लडिवाळ तान्हें। पडिलें भवाब्धीत जेणें।।३।। वेगीं फिरवा दृष्टि देवा। लक्ष लावा स्वयें भावा।।४।। शिवदासाची विनंती। मान्य करा उमापती।।५।।

८५. अहो देवराया कोठें गुंतलासी। वेगी या रंकासी पाय दावी।।१।। तुजविण मज प्रतिपाळकर्ता। कोणी उमानाथा दुजा नाहीं।।२।। तुझा हस्त जरी माझें शिरीं पडता। मग उमानाथा काय उणें।।३।। यास्तव शंकरा धांवूनिया वेगीं। मज रंकालागीं पाय दावी।।४।। शिवदास म्हणे अहो उमाकांता। तुझी तुज चिंता नाही काय।।५।।

८६. आम्हां पतितासी करावें पावन। हेचि थोरपण तुम्हाकडे।।१।। पुण्यवंत होती पावन सहज। तेथें थोरपण तुज काय।।२।। तरे त्या तारिता नवल तें कोण। बुडे त्यासी जाण तारावें जी।।३।। म्हणोनी करुणा भाकी शिवदास। तारी पतितास आम्हां देवा।।४।।

८७. देवामाजी देव परम तूं भोळा। न पाहसी शीला कांहीं एक।।१।। कांहीं तरी मिषें करूनिया देवा। असंख्यात जीवा उद्धरिसी।।२।। दृष्टिआड बेल टाकी खुडूनिया। तारियेलें तया कृपानिधी।।३।। चांडाळी ती बेल टाकी झुगारूनी। ते पूजा मानोनी उद्धरिले।।४।। ऐसे अगणित तारिलें दयाळा। माझिया कपाळां ऐसे कां हो।।५।। शिवदास म्हणे वाटतसे खंती। वेगीं उमापती भेट देई।।६।।

८८. किती तुम्हांलागीं यावें काकुलती। दया तुम्हाप्रती नये माझी।।१।। तुजविण कोण सोडवी येथून। कर्माची गहन गती दिसे।।२।। धांव पाव वेगीं न करी आळस। तोडी भवपाश लवकरी।।३।। जन्मोजन्मीं झालों दास मी शंकरा। न मागे मुशारा तुज कांहीं।।४।।

८९. वारंवार तुम्हां मागणें तें एक। वियोगाचें दुःख नका देऊं।।१।। सदा

सर्वकाळ स्वात्मसुख देई। प्रगट तूं होई हृदयीं माझ्या।।२।। प्रगट होऊनि दाखवी तें रूप। सगुण स्वरूप सुंदर जें।।३।। शिवदास म्हणे सगुण निर्गुण। तूंचि दुजे कोण आहे तेथें।।४।।

९०. तुझा बा विसर नसो पळभरी। ऐसे मज करी शंभुराया।।१।। देवोनिया मज दृढ आलिंगन। करी समाधान अनाथासी।।२।। तुजविण प्राण होतो कासाविसी। केव्हां भेट देसी विश्वेश्वरा।।३।। भेटोनिया पुन्हां नोहेचि वियोग। ऐसी तूं अभंग भेट देई।।४।। शिवदास मागे हेंचि वारंवार। तूं दयासागर पुरविसी।।५।।

९१. किती तुम्हांलागी यावें काकुलती। मज बहु खंती वाटतसे।।१।। माझेंचि प्रारब्ध झाले अनिवार। हेंचि मज चोज वाटतसे।।२।। चौदा कल्पवरी मार्कंडी रक्षिले। मजविषयीं झालें काय तुम्हां।।३।। ऐसें बहुताचें प्रारब्ध हरिले। माझेचि कां पडे कोडें तुम्हां।।४।। तरी आतां स्पष्ट द्यावें जी उत्तरा। भोगोनिया साऱ्या प्रारब्धाशी।।५।। शिवदास म्हणे सोडोनिया आस। भोगूं सावकाश प्रारब्धाशी।।६।।

९२. षोडश वर्षांचें चवदा कल्प केलें। प्रारब्ध राहिले कोठें त्याचें।।१।। माझ्या प्रारब्धाची राखीसी मर्यादा। म्हणोनिया खेदातुर आम्ही।।२।। तुम्हाविण कोण निवारी हें दुःख। धांव पाव मुख दावी मज।।३।। जैसे तैसे परी म्हणवितो दास। करी पतितास पावन तूं।।४।। शिवदास म्हणे न करी उपेक्षा। धांव कर्माध्यक्षा लवकरी।।५।।

९३. गाळांमाजी पशु पडले रुतूनी। निघणें तेथूनी नोहे जैसे।।१।। तैसे माझें मन गुंतलें विषयीं। काढी लवलाही तूंचि त्यासी।।२।। बहुतांचा तुम्हीं केला जी उद्धार। माझा कां विसर कृपानिधी।।३।। शिवदास म्हणे अगा सर्वेश्वरा। वेगीं मुक्त करा पतितासी।।४।।

९४. पाहूनी शुक्तीक म्हणती रजत। कांचासी म्हणत दिव्य मणी।।१।। पीठमिश्र जळ भावें त्यासी क्षीर। मृगजळ नीर म्हणती सत्य।।२।। तैसे शिवाविण इतर दैवत। भावित ते नर मूर्ख जाणा।।३।। शिवदास म्हणे महादेव देव। इतर ते सर्व दास त्याचे।।४।।

९५. उदंड तें गाती उदंड वर्णिती। उदंड सांगती क्षेत्रमहिमा।।१।। कपिलधार

ऐसे स्थळ कोठें नसे। प्रत्यक्ष तें भासें कैलासचि।।२।। पूर्वेकडोनिया शिवगंगा वाहे। उत्तरेस आहे भागीरथी।।३।। पंचकुंड जे कां पवित्र ते तीर्थ। समाधी मन्मथ महाराजांची।।४।। ऋषीसहित जे कां वसोनि पांडव। इच्छितार्थ सर्व लाधले हो।।५।। देह शमवीत कपिल महामुनी। वसे तया स्थानीं सर्वकाळ।।६।। शिवदास म्हणे आम्हां दीनासाठीं। स्थळ हें धुर्जटीं निर्मियलें।।७।।

९६. आधी नमू उमापती। जो कां असे आदि अंती।।१।। मध्यें जें हें विश्व भासे। त्याते व्यापक तो असे।।२।। जैसा पटामाजी तंतु। तैसा विश्वीं उमाकांतु।।३।। शिवदास म्हणे त्याला। आम्ही नमो वेळोवेळा।।४।।

९७. जिव्हीं नाम श्रवणीं कीर्ती। नेत्रीं वसो तुझी मूर्ती।।१।। मन तुझे पायीं स्थिर। राहो माझें निरंतर।।२।। विसरोनी देहभाव। तुज न सोडो हा जीव।।३।। शिवदास म्हणे हरा। हेंचि दान दे दातारा।।४।।

९८. विश्वी असोनी व्यापक। कां गा न ऐकसी हांक।।१।। नोहे उचित हें तुज। भेट सत्वर तूं मज।।२।। तुझा म्हणवितो दास। नको पाहूं गुणदोष।।३।। शिवदास म्हणे भेट। देता न लावी मी झट।।४।।

९९. शिरीं जटा हेमबाळा। मौळीं चंद्रनेत्रीं ज्वाळा।।१।। कर्णी सर्प कंठीं विष। वामभागीं उमा वसे।।२।। जाळूनिया मन्मथासी। राख लाविली अंगासी।।३।। गळां शोभे रुंडमाळा। कंठ दिसतसे निळा।।४।। ऐसें रूप मज कधीं। दाखविसी कृपानिधी।।५।। लागलासे निजध्यास। भेटा म्हणे शिवदास।।६।।

१००. घालूनिया पद्मासन। हृदयीं बैसावें येऊन।।१।। येणें जाणें तुम्हां नाहीं। परि भेट आम्हा देई।।२।। बुद्धिहीन मंद आम्ही। ज्ञानचक्षु देई स्वामी।।३।। पाहुनी सुंदर रूपडे। बहु हृदयीं आवडे।।४।। स्वामी पूर्ण करा हेत। शिवदास विनवीत।।५।।

१०१. काय करूं कोठें जाऊं। काय अंगा राख लावूं।।१।। काय करूं देहपात। काय बसू अरण्यांत।।२।। काय करूं उपवास। काय करूं जीव नाश।।३।। शिवदास म्हणे जिणें। व्यर्थ भासे भक्तिविणें।।४।।

१०२. आम्ही न करू ही व्रतें। नच जाऊं दुजा तीर्थे।।१।। न करूं योग

अभ्यास। नेणो तपाचें सायास।।२।। सर्वकाळ स्मरूं शिव। जेणें नोहे पुनर्भव।।३।। ऐसा लाभ टाकूनिया। व्यर्थ कोण शिणे वाया।।४।। म्हणोनिया शिवदास। करीतसे नामघोष।।५।।

१०३. इतके देई गा तूं आम्हां। मग सुखें घाली जन्मा।।१।। तुझा विसर नसावा। संग साधूचा असावा।।२।। नको विषय कांहीं मनीं। असो प्रेम तुझें गुणीं।।३।। जन्मोजन्मीं तुझा दास। करी म्हणे शिवदास।।४।।

१०४. नरदेहासी येऊनी। व्यर्थ झालों शूळपाणि।।१।। कीं त्वां केली नाहीं कृपा। पुढें कैशा चुकती खेपा।।२।। यासी ग्वाही माझें चित्त। कीं तें विषयीं अशक्त।।३।। शिवदास म्हणे आतां। विषयातीत करी चित्ता।।४।।

१०५. जोंवरी काळ होता पाठीं। तोंवरी झालों फार कष्टी।।१।। लक्ष चौऱ्यांशी फिरलों। दुःखें अमित भोगलों।।२।। काळ नसोनिया साह्य। वासनेचें मूळ राहे।।३।। तेणें गर्भवासादिक। फार सोसियलें दुःख।।४।। शिवदास म्हणे पाहे। आजि काळ झाला साह्य।।५।।

१०६. आतां नमस्कार पाया। तुझें सखया काळराया।।१।। ऋद्धिसिद्धीच्या दातारा। सर्वसुखाचा सोयरा।।२।। दीनानाथ तुजप्रती। हेंचि माझी गा विनंती।।३।। सावधान पायीं मिठी। पडो शंभूच्या शेवटी।।४।। शिवदास म्हणे शिव। तूचि होसी काळराव।।५।।

१०७. तुज रिघालों शरण। हेंचि देई कृपादान।।१।। नेणो तुज मागूं काये। जाणसी तूं बाप माय।।२।। सदा संतोषें त्वां रहावें। माझें परम हित व्हावें।।३।। तुझा म्हणवोनी दास। कीर्ति व्हावी त्रैलोक्यांस।।४।। शिवदास म्हणे पायीं। तुझ्या मज प्रेम देई।।५।।

१०८. नरदेहा ऐसा लाभ। प्राप्त झाला प्रारब्धे।।१।। तो गमाविला व्यर्थ। कांहीं न करितां स्वार्थ।।२।। ऐसा मी तो दैवहत। नसे तुझ्या ध्यानीं चित्त।।३।। शिवदास म्हणे जीवें। मज मारूनी टाकावें।।४।।

१०९. तुजविण शंभुराया। व्यर्थ जन्म गेला वाया।।१।। शिवभक्ती नाहीं केली। व्यर्थ शिणविली माऊली।।२।। झालों संसार कबाडी। सुख नाहीं पलघडी।।३।। आयुष्याचा नाश झाला। दास म्हणे वाया गेला।।४।।

११०. आजि भूमिसुत दिन। राहू पश्चिमेसी जाण।।१।। तया दिशे जाऊं

नये। काळ राहू पुढें होय।।२।। ऐसें प्रणताची लोक। शिवदास मानी सौख्य।।३।।

१११. द्रव्य नाहीं जयापाशी। ऐका त्याची गती कैसी।।१।। जेणें कंटाळती सर्व। हा करितो उपद्रव।।२।। माता पिता कन्या सुत। दुष्ट उत्तर बोलत।।३।। भार्या आवडीची मोठी। घाली कपाळासी आठी।।४।। सर्व द्रव्यलोभी देखा। नाहीं कोणी प्राणसखा।।५।। शिवदास म्हणे पाहे। सखा एक शंभू आहे।।६।।

११२. धन्य धन्य गुरुमाय। आजि देखियेले पाय।।१।। तुज पाहता माऊले। पाप ताप दैन्य गेले।।२।। तुझ्या वचनामृतें। जहालों मी पूर्ण तृप्त।।३।। शिवदास म्हणे दाता। नाहीं सम गुरुनाथा।।४।।

११३. किती उदार सद्गुरु। नाहीं ज्यासी अंतपारू।।१।। घेवोनिया कांचवाटी। दिव्य रत्न दे गोमटी।।२।। घेवोनीया खापरीस। सखा देतसे परीस।।३।। नाशवंत उपचारा। अर्पी स्वानंदसागरा।।४।। शिवदास म्हणे किती। दयावंत गुरुमूर्ती।।५।।

११४. येई येई आतां माझीये माउले। दाखवी पाऊलें कृपाळुवे।।१।। वेळोवेळां तुज देखिल्यावांचून। न पडेचि चैन पळभरी।।२।। घडोघडी तुज पाहोनिया डोळां। स्वरूपसोहळा भोगूं प्रेमें।।३।। शिवदास म्हणे देवा तुजविण। नावडेचि जाण मज कांहीं।।४।।

११५. तानुलीया बाळा जवळीच आहे। परि माय माय हाका फोडी।।१।। क्षणोक्षणां पाहे माऊलीचे मुख। मग खेळे सुखें आवडीनें।।२।। तैसे वेळोवेळां पाउलें पाहीन। आवडी गाईन गुण तुझे।।३।। शिवदास म्हणे क्रीडेन स्वानंदें। शिव शिव छंदें घेवोनिया।।४।।

११६. अहो या स्वरूपाचा पार। पाहूं जाताती पामर।।१।। वेद चारी मौनावले। महाऋषी वृद्ध झाले।।२।। धराधर दशशत। मुखें पुरला नाहीं अंत।।३।। तेथें दुर्बळ हे वेडे। सीमा लाविती बापुडे।।४।। शिवदास म्हणे देखा। अंत नसे ब्रह्मादिका।।५।।

११७. धांव न पुरे मनाची। गती खुंटली वाचेची।।१।। जया विलोकिता दृष्टी। झाली तरळोनी उफराटी।।२।। नसे त्रिगुणासी रीघ। सखा ऐसा

उमारंग।।३।। शिवदास म्हणे किती। तयें मानवाची गती।।४।।

११८. लवण गेलिया सागरा। पुन्हां न परते माघारा।।१।। भेटे कर्पूर अग्नीसी। नये मागुता ठायासी।।२।। सती पति झाल्या भेटी। प्रगटवेना गुजगोष्टी।।३।। शिवदास म्हणे मौन। बोलावया नाहीं भान।।४।।

११९. घडोघडी प्रेमभावां। मना आठवी महादेवा।।१।। सर्व सांडोनी जंजाळ। शिवपदीं ठेवी भाळ।।२।। नाहीं साधन याविण। पाहे अंतरीं शोधून।।३।। शिवदास म्हणे हर। सर्व सुखाचे आगर।।४।।

१२०. देवा तूंचि अंगीकार। केल्या काय माझा भार।।१।। गुणनिधी ऐसा दोषी। केले कुबेर त्वां त्यासी।।२।। गुरुद्रोही चंद्र झाला। तो त्वां मौळीं धरियेला।।३।। ऐसें किती महापापी। मिळविले निजरूपीं।।४।। शिवदास म्हणे जाणा। मुख्य तुज यावी करुणा।।५।।

१२१. करुणाकर दीनानाथा। पतितपावन कृपावंता।।१।। ऐसें बोलती सर्वही। वरी वेद गर्जे पाही।।२।। जाणोनिया शूळपाणि। आलों पायीं लोटांगणी।।३।। शिवदास म्हणे आतां। धांव पाव उमाकांता।।४।।

१२२. भय कासियाचें नको धरूं अंगीं। कांहीं तुजलागीं मागे मी।।१।। नको धन सुख ऐश्वर्य संपदा। नामीं राहो सदा छंदा तुझ्या।।२।। भजनपूजनीं प्रेम अखंडित। सज्जना संगत वास देई।।३।। शिवदास म्हणे सदा शूळपाणि। राहे ध्यानीं मनीं वाचें माझ्या।।४।।

१२३. लक्ष लावा शिवापायीं। हित यावेगळें नाहीं।।१।। सर्व मायेचा व्यवहार। भास जैसे मृगनीर।।२।। तरी सावधान व्हावें। जगा सर्व सोऽहंभावें।।३।। शिवदास मारी हाका। आतां दीना लोटूं नका।।४।।

१२४. गेले मोठे मोठे थोर। नभीं गंधर्वाचे भार।।१।। अवतारादी चिरंजीव। तेही लोपती स्वभावें।।२।। ऐसी माव ईश्वराची। बहु गोळ मोडीवरची।।३।। शिवदास म्हणे ऐका। तया नादीं लागूं नका।।४।।

१२५. पुरे पुरे हा संसार। देवा त्रासलों मी फार।।१।। मन विटलें सर्वांसी। तेणें आलों पायापाशीं।।२।। आतां येई शिवराया। भक्तकाज कैवारीया।।३।। गोड रूप ऐसें दावी। दृष्टी कदा न फिरावी।।४।। शिवदास म्हणे ताता। नको अंत पाहूं आतां।।५।।

१२६. काय बोलूं मी अपार। देवा जाणसी अंतर।।१।। नाहीं अंगीं शुद्ध भाव। परि भेटायाची हाव।।२।। अंगीं नाहीं प्रेमगोडी। परि पायाची आवडी।।३।। सर्वापरी व्यंग देखा। परि तुमचा लाडका।।४।। शिवदास म्हणे आई। धाव माझे शिवाबाई।।५।।

१२७. देखोनिया उंच माडी। आलों धावूनी तांतडी।।१।। कीर्ति ऐकिली भूमंडळीं। म्हणूनी देतसे आरोळी।।२।। द्वारीं दाटले सुरवर। मुनी गंधर्वांचे भार।।३।। वाजताती नाद भेरी। दश वाद्याचे कुसरी।।४।। ध्वनी करिती आरोळी। शिवनाम करटाळी।।५।। शिवदास म्हणे तेव्हां। विसरलों मी देहभावा।।६।।

१२८. कैचा दाता आणि मागतां। सर्व तूंचि उमानाथा।।१।। काय सामर्थ्य दात्याचें। अर्थ पूर्वी याचकाचें।।२।। विश्वकुटुंबी ईश्वर। तूंचि रक्षिता साचार।।३।। शिवदास म्हणे सर्व। वर्णू किती गुणगौरव।।४।।

१२९. सर्वांभूर्ती दया लक्ष्यामार्जी एक। आहे मी दांभिक घरोघरीं।।१।। बहुतांत एक प्रेमाचा पुतळा। होती बहु गोळा वेषधारी।।२।। शिवदास म्हणे पोटाचें हें सोंग। तेथें उमारंग स्थिर कैंचा।।३।।

१३०. नाहीं तुझी बरी चाल। काय देवावरी बोल।।१।। नाहीं अंतरीं निर्मळ। काय घालूनिया माळ।।२।। वृत्ती ठेवी सदा कोपी। काय घालूनिया टोपी।।३।। नाहीं अंगीं क्षमा शांती। काय लावोनी विभूती।।४।। शिवदास म्हणे मोक्ष। नसे न होता मुमुक्षे।।५।।

१३१. तुजविण शंभुलिंगा। नाहीं अणु रिती जागा।।१।। सर्व लिंगाकार दिसे। मही वीटलिंग असे।।२।। कैसा करूं भेदभाव। जेथें तेथें महादेव।।३।। ऐसी आम्हा आली प्रचीती। वरी वेदही गर्जती।।४।। शिवदास म्हणे शिव। परिपूर्ण स्वयमेव।।५।।

१३२. नको वेळ बा रे उठावें तातडी। आली ऐसी घडी पुन्हां न ये।।१।। येईल ऐश्वर्य संपदा बहुत। मना आवरीत तयालागीं।।२।। धरूनिया हातीं उभा काळ दंड। आयुषांती धंड पाडीतसे।।३।। शिवदास म्हणे यालागीं सत्वर। पार्वतीचा वर आठवावा।।४।।

१३३. तोचि दैवाचा पुतळा। मुखीं ज्याचे नाममाळा।।१।। तोचि धन्य

त्रिभुवनीं। प्रेम भजनीं पूजनीं।।२।। ज्याचे मुखीं हाचि चाळा। शिव शिव वेळोवेळां।।३।। सर्व सांडूनिया धंदा। लागला जो याचे छंदा।।४।। शिवदास म्हणे त्याचा। दास होईन दासाचा।।५।।

१३४. मना धैर्यबळें राहे समाधान। प्रेमें आठवून शिवराया।।१।। देव जे करितो तुझ्या हितासाठीं। नको होऊं कष्टी नेणानिया।।२।। देई तापत्रय आणि तें संकष्ट। आणावया वीट संसाराचा।।३।। सारूनि उपाधी लावूनिया छंद। सदा ब्रह्मानंद सुख पाही।।४।। शिवदास म्हणे भक्ताची माऊली। निजांगीं धांवली भेटावया।।५।।

१३५. आदि अंती सुखदाता। तूंचि होसी उमाकांता।।१।। मध्य उपाधी गोंधळ। नाशिवंत हे सकळ।।२।। जळीं तरंगाचे परी। होय जाय ज्या अंतरीं।।३।। शिवदास म्हणे त्यास। दावी ब्रह्म अविनाश।।४।।

१३६. मना कळ आहे थोडी। संग लज्जेचा तूं सोडी।।१।। मग होऊनिया भांड। नामें गर्जवी ब्रह्मांड।।२।। उभा ठाकोनि चौबारी। हस्त उभारूनि वरी।।३।। दीन मुखें मारा हाका। सख्या पार्वतीनायका।।४।। शिवदास म्हणे कधीं। मग वेळ लागो नेदी।।५।।

१३७. सर्व घेऊनिया चवी। आतां आलो महादेवी।।१।। पाहूनिया पंचमुख। हारपली तहान भूक।।२।। दृष्टी स्वरूपीं रुतली। तनुभ्रांती विसरली।।३।। शिवदास म्हणे पुन्हा। तुजवेगळी होईना।।४।।

१३८. होई सावधान मना। सांडी विषयवासना।।१।। स्मरूनिया उमावर। चित्तीं करावा विचार।।२।। तनु भूता पंचकाची। अस्थी मांस कातडीची।।३।। शिवदास म्हणे वृथा। भुललासी इंद्रियनाथा।।४।।

१३९. दास तुझे आम्ही जाहलों शंकरा। न मागूं मुशारा तुम्हां कांहीं।।१।। जैसा तैसा भोग घडो ह्या देहासी। न घालूं तुम्हासी संकट तें।।२।। परि तुम्हां असें मागणें हें एक। वियोगाचें दुःख देऊं नका।।३।। सतत ही सेवा घ्यावी या दासाची। शिवदास हेंचि इच्छीतसे।।४।।

१४०. मजसम पापी कोणी। नसे पाहतां या जनीं।।१।। बोले एक करी एक। ऐसा दुष्ट मी निःशंक।।२।। सेवा न करोनि कांहीं। म्हणवितो दास पाही।।३।। शिवदास म्हणे हरा। हा अन्याय माफ करा।।४।।

१४१. अहो तुम्ही जडजीव। प्रेमें आठवावा शिव।।१।। शिव सर्व जीवाप्रती। पहा प्रचीती देहांती।।२।। नाना मत्त नाना वर्ण। पहा शोधून पुराण।।३।। सर्व जीवीच असती। तया शिवचि म्हणती।।४।। शिवदास म्हणे शिव। स्मरता होय स्वयमेव।।५।।

१४२. जीव शिवाची मिळणी। जैसी सती पती दोन्ही।।१।। सतीपतीच्या विलासी। कोण सुख हो कोणासी।।२।। सतीलागी कामसुख। पति लाभे रती देख।।३।। जीव शिवाचे संयोगीं। कोण सुख कोणालागीं।।४।। शिवा भक्तिसुख मिळे। जिवा ब्रह्मीचे सोहळे।।५।। जीवासी समरस। होय असीपदीं वास।।६।। शिवदास म्हणे पाहे। सदाशिवीं लावा सोय।।७।।

१४३. देहीं असतांचि मेला। काळ काय करी त्याला।।१।। मूळचाचि दिगंबर। तया काय करी चोर।।२।। काढी मुळी वासनेची। तया चाड कासयाची।।३।। शिवदास म्हणे स्वस्त। नाहीं आदी मध्य अंत।।४।।

१४४. गाऊं वाटें तुज मना। तरी गावें शिवगुणा।।१।। पाहूं वाटें जरी तुज। तरी पहा शिवराज।।२।। ऐकूं वाटें प्रेमप्रीती। तरी ऐक शिवकीर्ति।।३।। जाऊं वाटें शिवदास। म्हणे निजानंदी वास।।४।।

१४५. सर्व देवाची उत्पत्ति। श्रुती पुराणीं बोलती।।१।। माता पिता जन्मभूमी। वर्णिताती गुरुस्वामी।।२।। परि पार्वतीच्या नाथा। नसे कोठें कांहीं वार्ता।।३।। शिवदास म्हणे पूर्ण। ब्रह्म चिदानंद घन।।४।।

१४६. सर्व धरोनिया वीट। स्मरीं शिव पादांगुष्ट।।१।। बा रे आलिया संसारीं। आधी स्मरावा कैवारी।।२।। नाना करितां व्यवहार। शिवचरणीं ठेवी स्मर।।३।। शिवदास सांगे लये। जैसा भृंगीकीटकन्याये।।४।।

१४७. प्रभुराया तुज आलों मी शरण। कृपा मज पूर्ण करी देवा।।१।। बहु झाला शीण घेतां जन्मफेरे। चुकवा येरझारे माझी आतां।।२।। मागें बहुतांची पुरविली आंस। माझी कां जगदीश करुणा नये।।३।। शिवदास म्हणे ये बा विश्वेश्वरा। भेट दे दातारा शीघ्र मज।।४।।

१४८. काय माझा गुण पहासी शंकरा। पतित मी खरा आहे पापी।।१।। म्हणोनीच तुम्हा माझी ही विनंती। वेगी गौरीपती भेट देई।।२।। भेटीची आवडी लागलीसे आतां। धांव विश्वनाथा लवलाही।।३।। शिवदास हेंचि

मागे वारंवार। तूं दयासागर पुरविसी।।४।।

१४९. सुखी असो ही मंडळी। जे कां ध्यातीं चंद्रमौळी।।१।। कामक्रोधाचा वळसा। नोहे माझ्या शिवदासा।।२।। अहंकार हा दुस्तर। याचा पडो द्या विसर।।३।। व्हावें चिरंजीव सर्व। ज्याचे चित्तीं माझा शिव।।४।। शिवदास म्हणे त्याचें। व्हावें कल्याण त्रिवाचें।।५।।

१५०. चरणीं नृत्य करीं टाळी। मुखीं शिवनामावळी।।१।। धन्य धन्य हा सुदिन। जे हे मिळालें सज्जन।।२।। घोषें गर्जविती नभ। वाटें अलभ्य हा लाभ।।३।। शिवदास म्हणे शिवा। यासी साह्य व्हावें देवा।।४।।

१५१. नमस्कार माझा श्रोते लहानथोरा। नारी आणि नरा सर्व याती।।१।। सांडोनि आळस लाज अभिमान। करावें भजन प्रेमानंदें।।२।। शिव हर हेंचि करूनि आरोळी। लावावी देऊळीं दाद माझी।।३।। अशक्त मी आहे दुर्बळ सर्वथा। म्हणोनिया माथा श्रोत्यापायी।।४।। शिवदास म्हणे सकळ मिळोनी। द्या शिवचरणी लोटूनिया।।५।।

१५२. शिवद्वारीं उभी संताची मंडळी। ती माझी दिपवाळी आनंदाची।।१।। कायाकनकताटी पंचप्राण ज्योती। ओवाळूं पशुपती मनोभावें।।२।। ओवाळीन दोघा पार्वती शंकरा। उचित दातारा हेंचि द्यावें।।३।। शिवदास म्हणे हेंचि मज द्यावें। अहर्निशीं घ्यावें नाम तुझें।।४।।

१५३. स्मरण करा हो मनीं भाव धरा हो। संसारसागर भक्तिबळे तरा हो।।१।। अभ्रांची साऊली तैसी संपदा भुली। साच नोव्हे वश करा गुरुमाऊली।।२।। विषय मदा हो काया भुलाल सदा हो। टाळी वाहून मुखीं गुरुनाम भजा हो।।३।। शिवदास हेंचि तुम्हा हित सांगतो। सर्व जगीं ब्रह्म व्हावे हेच मागतो।।४।।

शिवपाठ

१५४ (१). शिवपाठ करा शिवपाठ करा। चौऱ्यांशीचा फेरा चुके येणें।।१।। शिवाविण अन्य वेदशास्त्र पाठ। व्यर्थ खटपट जाणावी ते।।२।। शिवनाम पाठ जया सर्वकाळ। काळाचाही काळ होय तो।।३।। शिवदास म्हणे असार संसार। शिवनाम सार तयामाजी।।४।।

१५५ (२). शिवनाम पाठ ज्या नरा सर्वदा। समाधिस्थ सदा जाणावा

तो।।१।। निर्गुण समाधी साधिता कठीण। अनिवार मन होय तेथे।।२।। शिवाच्या स्मरणे शिवरूप मन। अनायासे जाण होत असे।।३।। शिवदास म्हणे भृंगीकीटन्याये। शिवरूप होय निश्चयेसी।।४।।

१५६ (३). शिवनाम कीर्ति सदा चारी वेद। वर्णिती सद्गद होऊनियां।।१।। साही शास्त्रें ज्याच्या नामीं पारायण। सदा गातो गुण तयाचेचि।।२।। अठराही पुराणें शिवलीला गाती। ऐसा उमापती समर्थ जो।।३।। शिवदास म्हणे त्याचें नाम वाचें। घेतां मग कैचें भवभय।।४।।

१५७ (४). शिवनाम पाठ सदा प्रेमयुक्त। श्रीहरी करीत स्वात्महितां।।१।। विधि इंद्र चंद्र गंधर्व सुरवर। ध्याती उमावर स्वार्थालागीं।।२।। ऋषि मुनि योगी साधनसिद्ध्यर्थ। गाती विश्वनाथ सर्वकाळ।।३।। शिवदास म्हणे सर्वांसी तो ध्येय। असे मृत्युंजय पहा सत्य।।४।।

१५८ (५). उपनिषद जे कां अथर्वणशिर। उभारूनि कर गर्जताहे।।१।। महद्भूत एक रुद्र भगवान। येर सर्व जाण अंश त्याचें।।२।। ऐसा सर्वोत्तम असे माझा शिव। एक वेळां नांव घेतां तारी।।३।। शिवदास म्हणे मग जे सतत। उच्चारिती त्यातें उणें काय।।४।।

१५९ (६). असकृदुच्चारें श्वेतादी करूनी। कैलासभुवनीं पावले कीं।।१।। पुराणप्रसिद्ध असती या कथा। गेले मोक्षपंथा असंख्यात।।२।। दोषियांचे दोष हरूनिया मुक्ति। द्यावयाची शक्ति नामीं बहू।।३।। शिवदास म्हणे ऐसें शिवनाम। उच्चारितां जन्म मृत्यू खंडे।।४।।

१६० (७). नामावांचूनिया आणिक साधन। करितां तें मन नावरेचि।।१।। योग याग तप प्राणायामादिक। कलीमार्जी देख न साधती।।२।। शिवनामपाठें अनायासें मन। होतसे उन्मन निश्चयेसी।।३।। शिवदास म्हणे शिवनाम स्मरा। साधनपसारा टाकूनिया।।४।।

१६१ (८). साधनाचें सार योग्याचें जीवन। योगासी कारण मुख्य नाम।।१।। प्राणायाम बीज तपाचें भूषण। मुमुक्षूसी जाण मोक्षपद।।२।। ऐसें शिवनाम सर्वांशीं कारण। म्हणोनि स्मरण करा सदा।।३।। शिवदास म्हणे शिवनामापुढें। साधन बापुडें अन्य किती।।४।।

१६२ (९). तीर्थ व्रत दान केलें जें पुष्कळ। तरी पावे फळ नोहे

मोक्ष।।१।। तैसे नोहे नाम माझ्या शंकराचे। उच्चारितां वाचें होय मोक्ष।।२।। सर्वकाळ प्रेमें वाचें उच्चारितां। व्हावया मुक्तता नवल काय।।३।। शिवदास म्हणे तयाचें दर्शन। घेतां जीव जाण उद्धरती।।४।।

१६३ (१०). सदा प्रेमयुक्त जपा शिवनाम। सकळही काम टाकोनिया।।१।। तयाचें संचित जातसे जळोनी। नासे क्रीयमाण नामबळें।।२।। प्रारब्ध तों त्याचें सरतसे भोगें। मग देहत्यागे शिवचि तो।।३।। शिवदास म्हणे माहात्म्य नामाचें। कोठवरी वाचें वर्णावें तें।।४।।

१६४ (११). शिवभक्तिविण केलें जें सत्कर्म। तरी तें दुष्कर्म होय पहा।।१।। दक्षप्रजापति यज्ञ करूं गेला। शिरच्छेद झाला तयाचा कीं।।२।। चंडादि सद्‌भक्त वधूनि पितर। पावले सत्वर मोक्षपदा।।३।। शिवदास म्हणे ऐसी शिवभक्ति। कर्माकर्मीं गुंती नसे जेथें।।४।।

१६५ (१२). अलभ्य हा लाभ नरदेह ऐसा। लाधला तो कैसा गमाविता।।१।। मग कोण्या देहीं कराल सार्थक। पहा हो विवेक करूनिया।।२।। यालागीं मी तुम्हां सांगतों ही सोय। गेली घडी न ये परतोनी।।३।। शिवदास म्हणे सदा शिव शिव। स्मरा मग भव कैचा तुम्हां।।४।।

१६६ (१३). भवरोगावरी दिव्य रसायन। औषध हें जाण शिवनाम।।१।। तयाविण अन्य करितां उपाय। जाणा ते अपाय होती सर्व।।२।। म्हणोनिच तुम्हां सांगतों हें हित। स्मरा हो सतत शिवनाम।।३।। शिवदास म्हणे मग भवभय। स्वप्नींही न होय बाधक तें।।४।।

१६७ (१४). कांता पुत्र वित्त देहादि प्रपंच। दिसतसे साच परि मिथ्या।।१।। म्हणूनि हो त्याची टाकूनिया आस। स्मरा शंकरास सुखालागीं।।२।। आपुल्या भक्तातें असे सुखकर। म्हणूनि शंकर नाम त्याचें।।३।। शिवदास म्हणे शंकरावांचूनी। कोण त्रिभुवनीं सुखदाता।।४।।

१६८ (१५). आपुलें कल्याण व्हावें ज्यांचें चित्तीं। त्यांनी शिवाप्रति शरण जावें।।१।। कल्याणस्वरूपीं कल्याणीरमण। नामही कल्याणप्रद त्याचें।।२।। शिवाचें तें नाम करिता स्मरण। शीघ्रचि कल्याण होय त्याचें।।३।। शिवदास म्हणे कल्याणदायक। असे माझा एक शिवचि तो।।४।।

१६९ (१६). आसनीं शयनीं भोजनीं गमनीं। प्रेमें शूळपाणि स्मरावा

तो।।१।। ऐसा निजध्यास लागतां जागृतीं। स्वप्नींही स्मृती सहज राहे।।२।। सुषुप्तींत जीव होय शिवीं लीन। नसूनि स्मरण स्मृती असे।।३।। शिवदास म्हणे हाचि शिवयोग। असे शिरोभाग साधनाचा।।४।।

१७० (१७). सुवर्णात नग नगीं तें सुवर्ण। तैसेंचि अभिन्न जीव शिव।।१।। ऐसें जन्मवरी करितां मनन। नावरेंचि मन साधकासी।।२।। अंतरीं तो ऐसा असोनि विचार। स्मरे निरंतर शिवासी जो।।३।। शिवदास म्हणे तयाचें तें मन। होतसे उन्मन शिवकृपें।।४।।

१७१ (१८). अन्न आच्छादन सुखदुःखादिक। प्रारब्धेंचि देख लभ्य जीवा।।१।। म्हणूनियां त्याचें टाकूनि चिंतन। करावें स्मरण शंकराचें।।२।। नरदेहामाजी अलभ्य हा लाभ। पार्वतीवल्लभ गावा गीतीं।।३।। शिवदास म्हणे शिवस्मृतिविण। पळभरी जाण राहूं नये।।४।।

१७२ (१९). चौऱ्याऐंशी लक्ष जन्मफिरक्यांत। अवचित प्राप्त नरदेह।।१।। तयाचें आयुष्य जाय ऐसें तैसें। पुन्हा तेंचि असे शिरावरी।।२।। यालागीं सावध होऊनि सत्वर। स्मरा निरंतर शिवनाम।।३।। शिवदास म्हणे मग ती चौऱ्याऐंशी। चुके निश्चयेशी सत्य जाण।।४।।

१७३ (२०). अनंत जन्मीचें ज्या गाठीं सुकृत। तोचि शिवभक्त होय पहा।।१।। शिवनाम जया आवडें अत्यंत। तोचि जीवन्मुक्त जाणावा हो।।२।। ज्ञानेंविण मोक्ष नव्हेचि निश्चय। ऐसा हा संशय धरूं नये।।३।। शिवदास म्हणे ज्ञानासी कारण। असे मुख्य जाण शिवचि तो।।४।।

१७४ (२१). निर्गुणीं निर्गुण सगुणीं सगुण। त्रिगुणीं त्रिगुण शिवचि तो।।१।। ऐसे साधुमुखें जाणूनिया तत्त्व। स्मरतां जीवित्व नुरे कांहीं।।२।। हा जरी आपणा न कळेचि बोध। तरी नाम शुद्ध जपावे हो।।३।। शिवदास म्हणे तेणें शुद्ध सत्त्व। होय मग तत्त्व कळें स्पष्ट।।४।।

१७५ (२२). अव्यक्त चित्तासी योजू जातां बळें। कष्टाप्रती गेले उपासक।।१।। बाहुबळें जैसें समुद्रीं तरण। हें जैसें कठीण तैसें तेही।।२।। शिवनामबळे विश्व शिवमय। होय निःसंशय साधकासी।।३।। शिवदास म्हणे साधन हें श्रेष्ठ। शिवनाम स्पष्ट जपा तुम्हीं।।४।।

१७६ (२३). सगुण प्रसाद श्रुती म्हणे मोक्ष। साधूचाही पक्ष हाचि

असे।।१।। दयाळुत्व आदी गुणया सगुण। हें नसे निर्गुण अगुण तें।।२।। तयाचा प्रसाद तयाचेंचि नाम। स्मरावें तें प्रेमभरे सदा।।३।। शिवदास म्हणे मग तो प्रसन्न। होऊनियां जाण करी मुक्त।।४।।

१७७ (२४). नाम स्मरे त्याच्या रूप लागे पाठीं। न इच्छितां भेटी देऊं धांवें।।१।। नामाविण अन्य करितां साधन। नेदी भेटी जाण शीघ्र त्यासी।।२।। नाम स्मरें तोचि आवडे अत्यंत। म्हणूनि धांवत भेटावया।।३।। शिवदास म्हणे शिवनाम ऐसें। साधनचि नसे दुजें अन्य।।४।।

१७८ (२५). रूप तेंचि नाम नाम तेंचि रूप। नाम ऐका माप विशेष कीं।।१।। ज्ञान होवोनियां स्वरूपाचे ध्यान। करी तेव्हां जाण मुक्त होय।।२।। तैसें नोहे नाम स्मरे त्यासी ज्ञान। देऊन सत्वरें मुक्त करी।।३।। शिवदास म्हणे विश्वरूपाहून। अधिक म्हणून स्मरा नाम।।४।।

१७९ (२६). अन्य साधनांत साध्य असे भिन्न। तैसे नसे जाण नामामाजीं।।१।। यांत साध्य आणि साधन तें एक। पहा हो विवेक करूनिया।।२।। नाम तेंचि रूप रूप तेंचि नाम। ऐसें तें निगम गर्जताती।।३।। शिवदास म्हणे नामाऐसें आन। साधनचि जाण नसे दुजे।।४।।

१८० (२७). सर्व साधनांत नाम असे सार। किती सांगावें हो वारंवार।।१।। तीर्थ व्रत नेम दान यज्ञादिक। न कळेचि देख नामाविण।।२।। भुक्ति मुक्ति ज्ञान वैराग्यादि सर्व। न लाभे वैभव नामाविण।।३।। शिवदास म्हणे नामाचें महत्त्व। स्मरे त्याशी तत्त्व कळे त्याचें।।४।।

१८१ (२८). शिवपाठ पाठ नित्यनेम ज्यासी। यम वंदी त्यास दुरूनिया।।१।। ब्रह्मा विष्णु आणि रुद्रादि सुरवर। करिती सत्कार बहु त्याचा।।२।। चरणींचें त्याच्या तीर्थ मागावया। येती धांवोनियां सर्व तीर्थें।।३।। फलश्रुती सुद्धां असे अठ्ठावीस। म्हणे शिवदास अभंग हे।।४।।

१८२ (२९). न कळोनि अर्थ पाठ करी भावें। तोही ज्ञान पावें शिवकृपें।।१।। भावही न कळे ऐसे जे कां मूर्ख। स्त्रिया बाळादिक हो का कोणी।।२।। त्यांहीं नित्यनेमें करितां पठण। क्रमें भावें ज्ञान लाधतें कीं।।३।। शिवदास म्हणे पूर्वसंख्येहून। अधिक हा जाण एक असे।।४।।

।। शिवपाठ संपूर्ण ।।

१८३. हृदयसंपुटी शिव साठवावा। ऐसे वाटे जीवा सर्वकाळ।।१।। परि ते हृदय भरले घनदाट। षड्‌रिपू अचाट वसती तेथे।।२।। कैसे घालवावे तयाते कळेना। शरण जावे कोणा तुजविण।।३।। शिवदास म्हणे दयेचा सागर। हृदयमंदिरा यावे देवा।।४।।

१८४. आम्ही जाऊ तया ठाया। जेथे असे देवराया।।१।। आम्ही जाऊ तेचि गाव। ज्यासी म्हणती शिवभजन।।२।। कानी ऐकू त्याच्या गोष्टी। ज्याच्या शिवनाम कंठी।।३।। शिवदासा एक छंद। शिवरूपी सदा धुंद।।४।।

१८५. तूचि सखा माझा जीवीचा जिव्हाळा। होशी जाश्वनीळा मायबापा।।१।। अनाथाचा नाथ दीनाचा दयाळू। गौरतनू भाळी चंद्र ज्याच्या।।२।। कृपेचा सागर करुणेचा घन। भाविकाची पूर्ण इच्छा जाणे।।३।। शिवदास म्हणे थोर दयाघन। आवडती भक्त प्राणाहून।।४।।

१८६. आदि अंती चंद्रमौळी। म्हणसी कैसा रजासी सांभाळी।।१।। मध्यांतरी जैसे म्हण। ब्रह्मांडादी हे त्रिगुण।।२।। सर्व नासे लया जाय। अंती शिव तोचि राहे।।३।। शिवदास म्हणे धन्य। बोलवेना झालो मौन।।४।।

१८७. चहुशून्याचे शिखरी। मूर्ती देखिली गोजिरी।।१।। अणुरेणू सहस्र भाग। सखा उभा शिवलिंग।।२।। ज्याचे तेज अवलोकिल्या। दिशा दाही कोंदाटल्या।।३।। ऐसे पाहताचि दृष्टी। तरळोनि उफराटी।।४।। झाली म्हणे शिवदास। सरला जाणिवेचा भास।।५।।

१८८. आम्ही शिवदास शिवापरी भोळे। परि ते निराळे ध्येय आमुचे।।१।। संतसज्जनाते सर्वस्व ते देऊ। दुष्टालागी देऊ माथी डांग।।२।। शिवभक्त जन शिवसेवेलागी। अक्षयी निजांगी तिष्ठती ते।।३।। शिवदास म्हणे अवखळा शिवदासा। छेडू नये खासा सांगतो हे।।४।।

१८९. येई माय माझे माऊली शिवाई। माथा तुझे पायी ठेवू वाटे।।१।। भेट देई माते लवकरी वत्साला। कासावीस झाला जीव माझा।।२।। जीव तळमळी भेटीसाठी देवा। भेट सदाशिवा द्यावी आता।।३।। आता शिवदासा भेटीची तळमळ। दवडू नको वेळ देवराया।।४।।

१९०. नेणो योग ज्ञान साधन ते मुद्रा। मुखी भालचंद्रा नाम तुझे।।१।। शक्ती नाही जरी करू तीर्थयात्रा। मुखी त्रिनेत्रा नाम तुझे।।२।। नाही द्रव्य

देऊ अन्नक्षेत्रदान। मुखी पंचानन आठवी तो।।३।। शिवदास म्हणे न येती सुशब्द। नामी तुझ्या छंद देवराया।।४।।

१९१. वाचे शिवहर शंकर स्मरा। तेणे चुके फेरा चौऱ्यांशीचा।।१।। चौऱ्यांशीचा फेरा चुके शिवनामे। म्हणोनि मनोधर्मे शिव स्मरा।।२।। स्मरा शिवलिंग सतत निजध्यास। तेणे तो महेश मुक्त करी।।३।। शिवदास म्हणे सत्य हे वचन। पाहावे पुराण जाऊनिया।।४।।

१९२. शिव शिव नाम वदा की हो वाणी। तेणे होय धुणी पातकांची।।१।। शिवनामापुढे साधन ते किती। लक्ष्मीचा पती तोही ध्यातो।।२।। ब्रह्मा इंद्र चंद्र सुरवर किन्नर। तेही निरंतर जपती नाम।।३।। शिवदास म्हणे नाम चित्ते सार। येणे भवपार होसी राया।।४।।

१९३. तेणे जोडिल्या पुण्याच्या राशी। जो का अहर्निशी गातो शिवा।।१।। नाम स्मरे त्याची झाली पुण्यकाया। जाई उद्धरूनिया कैलासी।।२।। शिवदास म्हणे शिव कृपावंत। करी जीवन्मुक्त निजदासा।।३।।

१९४. सर्व विश्वाचा तू राव। ऐसा आमुचा अनुभव।।१।। म्हणोनि आलो तुज शरण। आता दावी थोरपण।।२।। भ्यालो भ्यालो या संसारा। म्हणोनि शरण गौरीहरा।।३।। शिवदास म्हणे आता। वेळ करू नको ताता।।४।।

१९५. सर्व करिता समर्पण। देव ऋणी हो आपण।।१।। मागू नये काही वस्तु। देव देईल इच्छितु।।२।। मनी भाव ठेवी दृढ। शिव पुरवील कोड।।३।। शिवदास तो अंकिला। देव आपुलासा केला।।४।।

१९६. जरी सुख व्हावे जीवा। तरी शरण जावे शिवा।।१।। काया वाचा आणि मन। करी देवासी अर्पण।।२।। सेवा करावी निर्मळ। होय सुखाचा सुकाळ।।३।। शिवदास विनवी भावे। प्रेमे शिवा शरण जावे।।४।।

१९७. काळाचिया दाढी पडिलिया प्राणी। सोडवीना कोणी मायबाप।।१।। सोडवीना कोणी आप्त सोयरे ते। पुत्रदारादिक कोठे पाहा।।२।। जीव तळमळी सोडवीना कोणी। पैशाचे ते धनी होऊ पाहाती।।३।। शिवदास म्हणे शंकरावाचूनि। सोडविता कोणी जगी नाही।।४।।

१९८. शरण्या सोयऱ्या शंकरा। तुजविण कोठे थारा।।१।। तूचि सखा मायबाप। हरी आमुचे दैन्य ताप।।२।। तुझे नामी गोडी लागो। अन्य काहीही

न मागो।।३।। शिवदासा सांभाळावे। निजभक्तीसी लावावे।।४।।

१९९. मायामोह हा अनिवार। येथे गुंतले की फार।।१।। ब्रह्मा मायेने मोहिला। कन्यापाठीसी लागला।।२।। वृंदेपाठी विष्णू फिरे। मायेच्याचि परिकरे।।३।। माया अनिवार अनिवार। तीसी फिरवी तो शंकर।।४।। शिवदास म्हणे जीवा। जीवेभावे शंकर ध्यावा।।५।।

२००. तुज करिता प्रणाम। हरे बहू जन्मीचा श्रम।।१।। तुज पाहता लोचनी। होय महापापा धुणी।।२।। आवडीने तुज गाता। हरे भवभयव्यथा।।३।। देता प्रेमे आलिंगन। उरो नेदी द्वैतभान।।४।। शिवदास म्हणे शिव। जीवे ध्याता होय शिव।।४।।

२०१. पूर्णब्रह्म निराकार। तोचि जाणा शुद्ध हर।।१।। तया देऊनिया लाटी। केली हरे मायाताटी।।२।। आड लावूनिया स्वस्थ। देवा बैसलासी आत।।३।। परि आम्ही शिवदास। ओढू धरूनि हातास।।४।।

२०२. मना शिव तोचि देव। थोर भक्त जो सर्व।।१।। महादेव हा निश्चय। म्हणावया अभिप्राय।।२।। मीच म्हणतो ऐसे नाही। वेद चारी देती ग्वाही।।३।। शिवदास म्हणे देख। आदि अंती तोचि एक।।४।।

२०३. मना सर्वकाळ बुडी देई। बुडी निजानंद डोही।।१।। नाद बिंदू कळा ज्योती। होय तेथे पूर्ण तृप्ती।।२।। तयाविण दुजे सुख। सर्व नाशवंत देख।।३।। शिवदास म्हणे सदा। ऐक्य राहे ब्रह्मानंदा।।४।।

२०४. अवघे नाठाळ पिटाळ। जिभेचे हो चोखंदळ।।१।। काय म्हणावे ययाला। स्वकर्तव्य तो विसरला।।२।। संसाराच्या पडला गुंती। दुःख होई हो अंती।।३।। शिवदास सावध होई। हित आपुले करून घेई।।४।।

२०५. जेथे गाती माझे भक्त। तेथे उभा मी सतत।।१।। तैसा नसे सर्वांभूती। नसे मंदिरी पार्वती।।२।। तैसा नसे मी कैलासी। जैसा असे भक्तापाशी।।३।। ऐसा पार्वतीसी शिव। सांगतसे निजभाव।।४।। म्हणोनिया शिवदास। करा म्हणे नामघोष।।५।।

२०६. बीज धाकटे एकटे। तया विश्वकोंब फुटे।।१।। झाले विश्वाचा पसारा। बहु ब्रह्मांडाचा सारा।।२।। करोनि ब्रह्मांडाची रचना। मध्ये बैसला कैलासराणा।।३।। शिवदास देखियेला। विश्वरूप फोफावला।।४।।

२०७. समर्थाचा झालो दास। चुकला चौऱ्यांशीचा फास।।१।। समर्थाच्या दासा उणे। केवी येईल शिव जाणे।।२।। तुझ्या सामर्थ्येचि देवा। भवा जिंकेन सदाशिवा।।३।। शिवदास समर्थांचा। दास सदैव दासाचा।।४।।

२०८. पाहा पाहा हो संसार। सकळ दुःखाचे माहेर।।१।। गणगोत आप्त सखे। पुत्रदारादी सारिखे।।२।। धनवंताजवळ येती। धन जाता निघूनि जाती।।३।। जगी स्वार्थ हा भरला। शिवदासचि एकला।।४।।

२०९. आमुचे ते आप्त वृक्ष वनचरे। नित्य संग बा रे त्याचा आम्हा।।१।। सर्प व्याघ्र व्याळ स्नेही ते केवळ। रक्षण प्रेमळ करिती जीवे।।२।। वृक्षवल्ली साऱ्या देऊनि फळाते। पोषिती आम्हाते वेळोवेळी।।३।। शिवदास म्हणे आम्हा दीनासाठी। केली आटाआटी देवा तुम्ही।।४।।

२१०. चवदा वर्षांचे चवदा कल्प केले। प्रारब्ध राहिले कोठे त्याचे।।१।। माझ्या प्रारब्धाची राखीशी मर्यादा। म्हणूनिया खेदातुर आम्ही।।२।। तुम्हाविण कोण निवारील हे दुःख। धाव पाव मुख दावी मज।।३।। जैसे तैसे परी म्हणवितो दास। करी पतितास पावन तो।।४।। शिवदास म्हणे न करी उपेक्षा। धाव कर्माध्यक्षा लवकर।।५।।

२११. नको मना गुंतू रांडेच्या व्यसनी। होय नागवणी परमार्थी।।१।। रांड हेचि पाहे गर्वाची जननी। न विचारी मनी पापपुण्य।।२।। रांड हे विवसी सुसंगाची वाट। सर्वाशी सराटा नाही तैसे।।३।। शिवदास म्हणे रांड बहु द्वाड। मोठा अवघड घाव घाली।।४।।

२१२. रांडेच्या दर्शनी अधीनसे चित्त। आलिंगिता वित्त हरीतसे।।१।। विषयसंयोग तया घडलिया। शक्ती पिळोनिया टाकी सर्व।।२।। लागो नेदी वेळ तन मन धन। ग्रासीतसे जाण राक्षसी ते।।३।। शिवदास म्हणे पाहता ऐकता। नको मना गुंतू पडो तेथे।।४।।

२१३. मुख पाहता लाळ अस्थी रोम चर्म। स्तनाचे ते चर्म मांस सर्व।।१।। योनी ती प्रत्यक्ष मलमूत्रद्वार। नरक अंगीकार हेचि देही।।२।। ऐसिया आधारी गुंतूनिया मन। होय बुडवण परमार्थी।।३।। शिवदास म्हणे नाशिवंत सर्व। सांडियेला भाव विषयाचा।।४।।

२१४. प्रभू शिवलिंग केव्हा कृपा करी। मज या संसारी दुःख वाटे।।१।।

म्हणूनिच तुम्हा येतो काकुलती। काय माझी गती शिवराया।।२।। शंभो तुजविण मज कोण तारी। सख्या त्रिपुरारी पाव वेगी।।३।। शिवदास तुम्हा भाकितो करुणा। वेगी पंचानना पाय दावा।।४।।

२१५. इंद्रावन पाहता दिसे हो सुरंग। वाटे अती गोड बहिरंग।।१।। तैसे प्रपंचासी पाहता। बहू सुख वाटे चित्ता।।२।। परि शिरता त्या अंतरी। मना खेद होय भारी।।३।। शिवदास म्हणे बापा। आता करी पश्चात्तापा।।४।।

२१६. जेथे जाय आमुची दृष्टी। तेथे उभा तो धुर्जटी।।१।। जो जो शब्द ऐकू कानी। तुझे नामचि शूळपाणि।।२।। जेथे जाती पाय आमुचे। तेचि स्थान शंकराचे।।३।। शिवदास जोडी हात। तेथे असे उमाकांत।।४।।

२१७. जो पोटाचा भुकेला। अन्ने तृप्ती होय त्याला।।१।। वासनेची मोठी भूक। काही केल्या नव्हे सुख।।२।। मूळ संसाराचे एक। तीही वासनाचि देख।।३।। शिवदास म्हणे कोटी। वासना ही जीवापाठी।।४।।

२१८. आपुले वागणे ते फोल। देवावरी ठेवी बोल।।१।। तया बोला कोण पुसे। ज्याची चाल नीट नसे।।२।। सांगे तैसा वागे जो का। तया नसे काही धोका।।३।। शिवदास म्हणे जागा। आपुल्या स्वधर्माने वागा।।४।।

२१९. धर्म आणि कर्म दोघे सखखे बंधू। आहे तो संबंधू अखंडचि।।१।। अखंडचि आहे संबंध हा गोड। येथे असे चाड स्वधर्माची।।२।। स्वधर्माची चाड असे जया अंगी। तोचि मनी जगी सुखी होय।।३।। शिवदास म्हणे धर्मासी सोडिता। कर्महीं तत्त्वता हातीचे जाय।।४।।

२२०. माझे माहेर कपिलधारी। घर आमचे डोंगरी।।१।। गिरजादेवी आमची माता। शंकर तो आमचा पिता।।२।। भाऊ बळे आम्हा जने। गुप्तगंगा त्या वाहिनी।।३।। शिवदास म्हणे त्या झाला। मूळ माहेरा भेटलो।।४।।

२२१. नाम गाई नाम गाई। माझे डोई मन्मथपायी।।१।। तयापाशी माझा भाव। कोठे उरला नाही जीव।।२।। तोचि माझा बाप जाणा। त्याने सांगितल्या जीव खुणा।।३।। शिवदास म्हणे तारा। गुरुरूपी हात धरा।।४।।

२२२. तुझे रूप घडोघडी। माझे नेगी लागो गोडी।।१।। तुझे नाम वेळोवेळा। फुटी अंतरी जिव्हाळा।।२।। शिवदास म्हणे ओजा। वारी नेम चालवी माझा।।३।।

२२३. धन्य धन्य वारकरी। त्यास नाही यमपुरी।।१।। धन्य सोमवार व्रत। करिता चुके यमपंथ।।२।। धन्य कपिलधार गाव। तेथे राहे मन्मथ नाव।।३।। शिवदास धन्य झाला। शिव भेटायासी आला।।४।।

२२४. शिवरात्रीस निराहार। करी कीर्तन जागर।।१।। शिवनामे गर्जे सिद्धा। दुजा करू नये धंदा।।२।। शिवरात्री उपोषण करी। दोष जाती गहन।।३।। शिवदास म्हणे ऐसे दिनी। मस्तक ठेवी शिवचरणी।।४।।

२२५. जे का शिवरात्र करिती। त्यासी नाही पुनरावृत्ती।।१।। नाही यमाचे बंधन। झाले पापाचे खंडन।।२।। आज होते शिवभेटी। घेता शिवनाम कंठी।।३।। शिवरात्रमहिमा ऐसा। स्वामी सांगे शिवदासा।।४।।

२२६. करा करा शिवरात्र। वाचे व्हा रे पवित्र।।१।। नरदेहासी आलिया। मुखी गाई शिवराया।।२।। आज गावे त्याचे गुण। नरदेहासी येऊन।।३।। शिवदास म्हणे आज दिनी। शिवनाम घेऊ भजनी।।४।।

२२७. दावी रूप आता मज। कैसे आहे दशभुज।।१।। व्याघ्रचर्म पंचानना। भूक लागली या नयना।।२।। कोटी शशी चंद्रकळा। कैसा दावी कंठ निळा।।३।। शिवदास म्हणे मज। दावी रूप तेज:पुंज।।४।।

२२८. देव येता तुम्हा घरी। अनायासे माझी थोरी।।१।। नाही मागत वरदान। बरा आहे ऐसा दीन।।२।। तुम्ही देता मोठेपणा। परि न येई पतितपावना।।३।। माझी गरिबीची थोरी। हीच आहे मजवरी।।४।। शिवदास म्हणे सुख। तेचि आम्हा बहू दु:ख।।५।।

२२९. शिवराज पाहुणा आला माझे घरी। वैभवाची थोरी झाली माझ्या।।१।। चुकविल्या गोष्टी जन्ममरणाच्या। चौऱ्यांशीचा फेरा चुकविला।।२।। आता अगोचर झालो माझा मी। नाही त्या यमाची फेरी पाळी।।३।। शिवदास म्हणे भेटली माउली। बोळवण केली त्याने माझी।।४।।

२३०. पहा देवाचे कौतुक। जन्मा आल्याचे सार्थक।।१।। कैसी लीला केली त्याने। पंचभूते एका स्थाने।।२।। पंचधातु सूत्र केले जीर्ण। एका सूत्रात ओवून।।३।। शिवदास म्हणे धर्म। जाणे तोचि तो वर्म।।४।।

□□

श्री जीवन महाराज

मन्मथस्वामींच्या शिष्यांपैकी एक शिष्य 'जीवन' नामक होते. ते मारवाडी होते, एवढीच माहिती मिळते. ते मन्मथस्वामींचे समकालीन होते यापेक्षा त्यांच्या चरित्राविषयी कोणतीही माहिती उपलब्ध होत नाही. त्यांच्या नावावरील १८ अभंग डॉ. शिवलिंग शिवाचार्य अहमदपूरकर महाराजांनी 'सांप्रदायिक सप्तरत्नगाथा' या ग्रंथात प्रथमच प्रकाशित केले. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत 'जीवनाचे २३ अभंग उपलब्ध झाले' असा उल्लेख असून प्रत्यक्षात १८ अभंगच मुद्रित केलेले आढळले. हे १८ अभंग प्रस्तुत गाथेत समाविष्ट केले आहेत.

श्री जीवन महाराजांचे अभंग

१. आनंदी आनंद प्रेमाचा निश्चंद। सद्गुरूचा बोध प्राप्त झाला।।१।। सर्व मते ती शोधूनि पाहिली। वृत्तीहि निमाली परब्रह्मी।।२।। तेथिचिये सुख न बोलवे वाचे। प्रेम भरेनाचे वेडा जैसा।।३।। लाविलेसे वेड जीवनालागी जाण। सद्गुरूने निजखूण दाखविली।।४।।

२. दया करा स्वामी कृपावंता। लागलीसे चिंता संसाराची।।१।। याचे पुढे कांही नसेचि परमार्थ। अर्थालागी स्वार्थ वाटे चित्ता।।२।। पुत्रकलत्राचा मोह फार असे। अनुतापलेश नसे कांही।।३।। जीवन म्हणे आता करावे निराश। संसारी उदास असावे हो।।४।।

३. वासना ही रांड लागलीसे पाठी। आता तेणे धुर्जटी अंतरला।।१।। मिथ्या या देहाचा दृढ अभिमान। विषयाचे ध्यान वसे चित्ती।।२।। नसो सवे मज प्रपंचाचा ताप। कधी अनुताप प्राप्त होईल मज।।३।। जीवन म्हणे मज आलासे कंटाळा। सद्गुरू दयाळा कृपा करी।।४।।

४. काय करू देवा न सुचे उपाय। धरियेले पाय चित्ती तुझे।।१।। थोर थोर गेले देहाते सांडोन। मिळाले निर्गुणी जाऊनिया।।२।। आम्हा पतिताला तारावयासाठी। कोण जगजेठी ठेवियेला।।३।। जीवन म्हणे मज वाटतसे खंत। देहाचा संबंध तोडी माझ्या।।४।।

५. जावे जावे जावे संतासी शरण। तेणे आत्मज्ञान प्राप्त होय।।१।। पाहावे पाहावे पाहावे शरीर ब्रह्म। महावाक्याचे वर्म हेचि आहे।।२।। व्हावे व्हावे व्हावे स्वरूपी निमग्न। तेणे समाधान होत आहे।।३।। व्हावे व्हावे व्हावे मन हे उन्मन। देहाचे विस्मरण जीवन म्हणे।।४।।

६. अनंत ब्रह्मांडे जयाचे उदरी। सर्व चराचरी व्यापक तो।।१।। तेणे भेदोनी आकारही नाही। आकार ते पाही भूतांमाजी।।२।। आकाशाते कोणी हाणू जाता लाथा। न लागे तत्त्वता त्यासी कांही।।३।। सर्वठायी ब्रह्म घनदाट असे। द्वैताचा निराश होईल जेंव्हा।।४।। आदि मध्य अवसानी एकले असे। वेगळीक नसे कोठे जीवन म्हणे।।५।।

७. जीव तोचि शिव करीतसे गुरु। महावाक्य विचारु सांगोनिया।।१।। संसाराचे भान केलेसे निरसन। आत्म्याचे साधन लाविलेसे।।२।। सांगूनिया गुज साराचे जे सार। ब्रह्म निराकार केले मज।।३।। जीवन म्हणे कैसे होऊ उतराई। जीव दिला पायी सद्गुरूच्या।।४।।

८. गुरु तोचि शिव शिव तोचि गुरु। वेदांती निर्धारु हाचि असे।।१।। निर्गुणाचे ध्यान नयेच करिता। सद्गुरूचे आता ध्यान करा।।२।। मुखी गुरुनाम निर्गुणी हो लक्ष। धरिता तो मोक्ष प्राप्त तत्काळचि।।३।। जीवन म्हणे सखा विश्वंभर। ब्रह्म निराकार सद्गुरूचि।।४।।

९. तेथीचे ते सुख न बोलवे वाचे। सोय आनंदाचे बोल तेथे।।१।। साखरेची गोडी ज्याचे तोचि जाणे। इतर ते नेणे काही एक।।२।। सद्गुरूचे कृपे प्राप्ती ब्रह्मानंदा। अक्षयी आनंदा भोगवितो।।३।। जीवन म्हणे पाहे चराचरी ब्रह्म। जाणोनिया वर्म सुखी होई।।४।।

१०. योगयागादी साधन। प्राप्त नोव्हे ब्रह्मज्ञान।।१।। करिता तीर्थव्रत दान। प्राप्त नोव्हे ब्रह्मज्ञान।।२।। क्रियाकर्मादिकार्चन। प्राप्त नोव्हे ब्रह्मज्ञान।।३।। जहाली गुरुकृपा ज्याला। जीवन म्हणे प्राप्त त्याला।।४।।

११. सुखी होई सुखी होई। शरण सद्गुरूशी जाई।।१।। मग चुकती येरझारा। लक्ष चौऱ्यांशीचा फेरा।।२।। याची देही याची डोळा। पाहे मुक्तीचा सोहळा।।३।। जीवन म्हणे सद्गुरुयोगे। स्वये आपण तोचि होती।।४।।

१२. मोक्षप्राप्तीलागी युक्ती। धरी साधूंची संगती।।१।। करी अध्यात्म श्रवण। तेणे कळे सद्गुरूहून।।२।। प्राणायामादी साधन। षड्चक्राचे भेदन।।३।। वासनेचा झाला क्षय। जीवन म्हणे ब्रह्मलाभ।।४।।

१३. आत्मा नाही नाही दूर। पहावे शोधूनि अंतर।।१।। आहे तुझे तुजपाशी। का रे व्यर्थ धुंडाळिसी।।२।। येणे साधूची संगती। तेणे होय आत्मप्राप्ती।।३।। त्रिलोकासाठी हानी। जीवन म्हणे केली जनी।।४।।

१४. गुंतोनिया विषयलोभा। चुकलासी स्वात्मलाभा।।१।। राजा असोनि रंक झाला। काय उणे मग दैन्याला।।२।। कैवल्याचे कवल केले। विषय संगाने लागले।।३।। वमनप्राय विषय मानी। मग स्थिर तो निर्गुणी।।४।। करी वासनेचा त्याग। जीवन म्हणे तो अभंग।।५।।

१५. अन्य अन्य आडवी सिद्ध। पूर्णानंद तत्त्वबोध।।१।। कलीमाजी ऐसा कोण। नाही देहाचा अभिमान।।२।। विषय वमनप्राय मानी। धन्य तोचि साधु जनी।।३।। जीवन म्हणे साह्य करी। दीना पतिता उद्धरी।।४।।

१६. सांडी देहाची तळमळ। सुखी होई बा निश्चळ।।१।। तळमळीने दुःख आहे। वाचे बोलावे ते काय।।२।। शांती धरिता ज्ञानप्राप्ती। स्वये होय ब्रह्ममूर्ती।।३।। जीवन म्हणे जाणा वर्म। चंचळ निश्चळाचे धर्म।।४।।

१७. आज भाग्य उदया आले। संतपाऊल देखिले।।१।। ओघ जान्हवीचा आला। स्नान घडले पतिताला।।२।। आनंदले माझे मन। चित्त झाले समाधान।।३।। जीवनालागी ऐसे झाले। संतपाऊल देखिले।।४।।

१८. आजि मोठा लाभ झाला। सखा सद्गुरू भेटला।।१।। बहु जन्मीचा शीण गेला। कर मस्तकी ठेविला।।२।। ऐसी गुरुकृपा थोर। केला दीनाचा उद्धार।।३।। जीवन म्हणे ऐसा दाता। नसे त्रिभुवनी शोधिता।।४।।

□□

श्री लक्ष्मण महाराज

(इ.स. १८०८-१८७८)

लक्ष्मण कृष्णाप्पा रऊळगावकर हे यांचे पूर्ण नाव असून ते जालना जिल्ह्यातील आष्टी येथील राहणारे होते. कृष्णाप्पा व बजाबाई या सत्त्वशील वीरशैव दांपत्याच्या उदरी त्यांचा जन्म झाला. लक्ष्मण महाराजांना लहानपणापासून शिवभक्तीची गोडी लागलेली होती. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांचे लग्न झाले आणि त्यानंतर त्यांना पहिली मुलगी झाली. वडलांसोबत ते दुकानी बसू लागले. परंतु अंतरंगात अस्वस्थ होते. एकेदिवशी ते घराबाहेर पडले आणि देऊळगावराजा येथे गेले. तेथील वीरशैव मठात दमय्या स्वामी यांच्याकडून त्यांनी अनुग्रह घेतला.

पुढे खामगावच्या एका दुकानात मुनिमाचे काम केले. कामात लक्ष नाही अशी मालकाची तक्रार ऐकून ते बाहेर पडले आणि साखरखेड्यांच्या इतिहासप्रसिद्ध पलसिद्ध मठात आले. तेथे मठाधिपती ष.ब्र. गंगाधर शिवाचार्यांनी व कारभारी रेवणसिद्धय्या यांनी त्यांना आश्रय दिला. पुढे बरीच वर्षे लक्ष्मण महाराज पलसिद्ध मठात राहिले. त्यांना पलसिद्ध स्वामींचा साक्षात्कार झाला. त्यानंतर श्रीसिद्धेश्वर माहात्म्य, श्रीगुरुस्तोत्र, सिद्धस्तोत्र अशी ओवीबद्ध रचना आणि विपुल अभंगरचना त्यांनी केली. नंतर ते गावी गेले. तीर्थयात्रा केली.

त्यांचे समग्र साहित्य 'श्री लक्ष्मण गाथा'[१] या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहे. या ग्रंथातील समग्र रचनांपैकी केवळ अभंगरचना प्रस्तुत गाथेत समाविष्ट करण्यात आली आहे. वीरशैव अभंगकारांमध्ये लक्ष्मण महाराजांची सर्वाधिक रचना उपलब्ध झाली आहे. साधी सरळ प्रासादिक रचना हे लक्ष्मणांच्या अभंगाचे वैशिष्ट्य होय. शिवपुराणादी ग्रंथांतील शिवभक्तांच्या कथा त्यांनी अभंगातून गायिल्या आहेत. याशिवाय गोदावरीच्या दोन्ही तीरांवरील पंचक्रोशीतील गावांत फिरून त्यांनी त्यावर गंगामाहात्म्याचे अभंग लिहिले आहेत.

---

१. श्री लक्ष्मण गाथा, संपादक- डॉ. शे. दे. पसारकर,
श्री सिद्धेश्वर प्रकाशन, आष्टी, जि. जालना, २००१

श्री लक्ष्मण महाराजांचे अभंग

मंगलाचरण

गणपती

१. विघ्नहरा वेगी येई। शिवप्रिया भेटी द्यावी।।१।। तुझे नाम विघ्नहर। करिसी विघ्नांचा संहार।।२।। सिद्धीबुद्धीचा तू दाता। सर्वमान्य तू शिवसुता।।३।। ब्रह्मा आदि सुरवर। तुज स्तविती निरंतर।।४।। सर्व मंगळ करिसी। भक्तवत्सल आहेसी।।५।। सुखरूप तू सर्वदा। स्वामी स्वानंदाच्या कंदा।।६।। लक्ष्मण म्हणे देवा। वेगी येई कृपाळुवा।।७।।

२. गणाधीशा पाय दावी। मी रे पतित अन्यायी।।१।। चौसष्ट कोटी गण। मध्ये मुख्य तू प्रवीण।।२।। सर्वाआधी रे पूजन। तुझे करिती सुरगण।।३।। ब्रह्मादिक तूते स्तविती। तुझे नाम मंगलमूर्ती।।४।। सकल भया रे पासून। सोडविसी भक्तजन।।५।। कृतांताते वंद्य तू रे। तुझे नाम मंगल रे।।६।। लक्ष्मण म्हणे देवा। दीन आपुला म्हणावा।।७।।

३. विघ्नांते हरूनि पायी तू ठेविसी। निजभक्ता देशी सुख देवा।।१।। ऐसी तुझी कीर्ती आहे पुराणी रे। श्रेष्ठ वर्णिती रे गुण तुझे।।२।। स्वामी विज्ञापना माझी परिसावी। प्रेमयुक्त वदवी गुण मुखी।।३।। लक्ष्मण म्हणे येई लवकर। दीनांचे माहेर आहेसी तू।।४।।

४. मूळ ॐ कार गणपती। माया लीला तुमची वृत्ती।।१।। निजरूपा आदिगणा। तुम्हा नमो निरंजना।।२।। चहु वाचेचिया पर। शुद्ध बुद्ध तू निर्विकार।।३।। स्वमाये तू सगुण। करिसी भक्तांचे रक्षण।।४।। वेद सिद्ध तुम्हाप्रती। अष्टभावे हो स्तविती।।५।। लक्ष्मण म्हणे शिवा। अतिप्रिय तू कृपाळुवा।।६।।

५. विघ्नहरा गजानना। भेटी द्यावी रे सर्वज्ञा।।१।। तुझे नाम विघ्नहर। करिसी विघ्नांचा संहार।।२।। पाय दावी वेगी ताता। गौरीहराचिया सुता।।३।। लक्ष्मण म्हणे देवा। दीन आपुला म्हणावा।।४।।

६. गणराया लौकर येई। दीनानाथा भेटी द्यावी।।१।। तुझे नाम विघ्नहर। गुण तुझे रे अपार।।२।। सकल सिद्धीचा तू दाता। बुद्धी द्यावी कृपावंता।।३।।

जडबुद्धी मी अन्यायी। गणराया गुण वदवी।।४।। लक्ष्मण दीन तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।५।।

७. यावे यावे गणपती। महाराजा कृपामूर्ती।।१।। धाव पाव गजानना। विघ्नहरा बा सर्वज्ञा।।२।। अंगी शेंदुराची उटी। केशर शोभे हो लल्लाटी।।३।। रत्नखचित अलंकार। स्वामी माझा विघ्नहर।।४।। लक्ष्मण म्हणे गणाधीशा। धावा पावा हो सर्वेशा।।५।।

८. विघ्नहरा विज्ञापना। माझी परिसावी सर्वज्ञा।।१।। प्रभुगुण ते वदवी। दीनानाथा बुद्धी द्यावी।।२।। ऋद्धिसिद्धीचा तू दाता। सर्वा वंद्य तू शिवसुता।।३।। करिसी भक्तांचे कल्याण। सौख्य देशी निजधन।।४।। चौसष्ट कोटी गण। त्याहामध्ये तू प्रवीण।।५।। ब्रह्मा आदी सुरमुनी। स्तविती प्रेमे तुजलागूनि।।६।। लक्ष्मणाचे तू धन। गौरीप्रिय तू गजानन।।७।।

९. गजवदना वेगी येई। मज दीना भेटी द्यावी।।१।। अंगी शेंदुराची उटी। रत्ने शोभती मुकुटी।।२।। नाना अलंकार त्याला। गणसमुदायी शोभला।।३।। छत्र शोभती अपार। चामरे उडती प्रभोवर।।४।। सकल सिद्धीचा तू दाता। बुद्धी द्यावी कृपावंता।।५।। नाना वाद्यांचा गजर। स्तुती करिती सुर नर।।६।। काय स्तवू मी रे दीन। अकथ्य तू पूर्णघन।।७।। तुमचे नाममात्रे गणा। विघ्ने नाशती सर्वज्ञा।।८।। कृपा करा गणराया। गुण वदवा स्वामिया।।९।। भेटी द्यावी गणनाथा। हरा माझी भवव्यथा।।१०।। लक्ष्मण दीन तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।११।।

१०. गजवदन तू विघ्न रे दाहक। भव ते दाहक नाम तुझे।।१।। तुझे नामे तरले फार अपराधी। गणा कृपानिधी तारा मज।।२।। अवगुण नका पाहू हो सर्वज्ञा। बोलवावे दीना वेगी देवा।।३।। एकदंत तू रे कृपेचा सागर। तुझा मी किंकर म्हणवितो।।४।। लक्ष्मण म्हणे फार येरझारा। केल्या विश्वंभरा गणराया।।५।।

११. गणपती कृपावंत। विघ्ने हरी दयावंत।।१।। नाम घ्या हो निरंतर। कृपा करी विघ्नहर।।२।। कार्यारंभी त्याते स्तविती। सुरनर त्या वंदिती।।३।। चतुर्भुज एकदंत। नाना अलंकारमंडित।।४।। मूषकावरी हो स्वार। मूर्ती शोभली सुंदर।।५।। मस्तकी मुकुट शोभला। भर्जरी वस्त्र शोभे त्याला।।६।।

त्याचे दर्शन घ्यावे हो। कार्य आपुले साधा हो।।७।। लक्ष्मण दास त्याचा। करी उच्चार नामाचा।।८।।

१२. गणराया येई कृपेच्या सागरा। अनादी सोयरा तूचि देवा।।१।। तुझे नाम घेता भव हा उरेना। विघ्नही दिसेना नामस्मरणे।।२।। ऐसे तुझे नाम मंगलदायक। अज्ञानछेदक नाम तुझे।।३।। निजभक्ताप्रती धावूनि रक्षिसी। पावन करिसी हीनादीना।।४।। लक्ष्मणामुखे गुण वदवावे। पाय दाखवावे दीनाप्रती।।५।।

शारदा

१३. त्रिभुवनजननी शारदा ती माय। नमू वेगी पाय माय श्रेष्ठ।।१।। मन आवरा हो पाय ते धरा हो। स्वहित करा हो जाणे आहे।।२।। श्रेष्ठ गेले मार्गे तोचि मार्ग धरा । विचार रे करा प्रौढ तो ।।३।। साधकाते माय पाय रे दाखवी । मायेविण काही कार्य नोहे ।।४।। लक्ष्मण म्हणे सुविद्या ती माता । स्वरूपी पाहाता तन्वंगी ते ।।५।।

१४. येई येई शारदे माय। दावी वेगे जननी पाय।।१।। भेटी द्यावी लवकर। नको करू गे उशीर।।२।। मूलरूपिणी शारदे। सत्यरूप ब्रह्मानंदे।।३।। तुझी कृपा होता माये। आत्मरूपा भेटी होये।।४।। तुर्ये माये तू वेल्हाळ। ब्रह्मीचा तूचि जिव्हाळ।।५।। तुझी ब्रह्मी आहे वस्ती। तूचि ब्रह्मांडनिर्माती।।६।। तूते त्याते भिन्न काय। तन्वंगी तू गे माय।।७।। काही भिन्नता दिसेना। गुणा पार गे लागेना।।८।। मायाब्रह्मी भेद नाही। कैसी वेगळी करावी।।९।। सूर्याअंगी जेवी कांती। तैसी स्वरूपी चिच्छक्ती।।१०।। दीपज्योती वेगळी होईना। तैसी माया ब्रह्मी जाणा।।११।। नाममात्र माया वदती। स्वयं आहे एकज्योती।।१२।। गुण वदवी गे माये। दावी वेगी माये पाय।।१३।। लक्ष्मण तुझा दीन। लाज तुज गे कारण।।१४।।

१५. शारदे वो माये दाखवी वो पाय । जगज्जननी ये भेटी देई ।।१।। तुझे नामस्मरणे पापे भस्म होती। इंद्रादी स्तविती तुजलागी।।२।। सत्यवतिसुत गातसे वो गुण। वेदशास्त्रे तूते स्तविती माये।।३।। मुक्यामुखे वेद बोलविसी माये। पायाविण पांगुळा चालविसी।।४।। लक्ष्मण दीन तुझा म्हणवीन। वदवावे गुण दीनामुखे।।५।।

१६. आदि शारदे तू माय। निजभक्ता दावी सोय।।१।। भवसमुद्र दुस्तर। येथे बुडाले रे फार।।२।। माते तुम्ही कृपा केले। तेचि पहिले पार झाले।।३।। लक्ष्मणा तुजविण। कोण सोडवी येथून।।४।।

१७. मूळ प्रकृती तू अंबे। तुज नमू जगदंबे।।१।। महामाय तू भवानी। त्रैलोक्याची तू जननी।।२।। ब्रह्मा आदी सुर तूते। प्रेमे स्तविती जगन्माते।।३।। करिसी भक्तांचे कल्याण। विघ्ने हरिसी दारुण।।४।। कृपाकटाक्षे पाहसी। त्याते मुक्त तू करिसी।।५।। लक्ष्मणाते सोडवी। दीन आपुला म्हणवी।।६।।

१८. आदिपुरुषा तू अंगी। सदा शोभसी तन्वंगी।।१।। वायू आकाशी उत्पन्न। ब्रह्मी तू सगुण।।२।। अहंस्फूर्ती तू गे परा। निर्विकल्पी तू सुंदरा।।३।। अनंत ब्रह्मांडे उभविसी। क्षणी स्वेच्छे लपविसी।।४।। शिव-इच्छा तू गे देवी। प्रभोपाशी तू अक्षयी।।५।। लक्ष्मण म्हणे माते। प्रेम देई मज दीनाते।।६।।

१९. त्रिभुवनमाते शारदे सुंदरी। ब्रह्म इंद्र हरि तुझे रूप।।१।। नाना रंगरूप तुझी सर्वकळा। ब्रह्मीचा जिव्हाळा तूचि माये।।२।। तुझी लीला जाणावया कोण श्रेष्ठ। मूळ आदिपीठ तू गे देवी।।३।। लक्ष्मण म्हणे अन्यायी मी फार। सर्वस्वी आधार माते तुझा।।४।।

२०. माते शारदे सुंदरी। तूचि वससी चराचरी।।१।। माते ब्रह्मांडपसारा। त्वाचि रचिला गे सारा।।२।। ब्रह्मी वससी सदोदित। तुझा न कळे गे अंत।।३।। प्राणाते तू चेष्टविसी। त्रिगुणाते नाचविसी।।४।। तुझा अनुग्रह घडे। करिसी कार्य ग रोकडे।।५।। लक्ष्मणावरी माते। करी कृपा पूर्णभरिते।।६।।

२१. माते शारदे सुंदरी। ब्रह्मप्रिये कृपा करी।।१।। प्रभुगुण गे वदवी। महामाये बुद्धी द्यावी।।२।। योगियाचे समाधान। नव्हे तुझे कृपेविण।।३।। कृपाकटाक्षे पाहासी। त्याते मुक्त तू करिसी।।४।। लक्ष्मण म्हणे माय। वेगी करी माझी सोय।।५।।

२२. शारदा ती माया प्रणवरूपिणी। विश्वाची जननी महामाया।।१।। आकार हा सर्व मायेने हो केला। सर्वत्र देवाला माया वंद्य।।२।। अनंत ब्रह्मांडे माया ही उभवी। स्व-इच्छे लपवी एका रोमी।।३।। लक्ष्मण म्हणे महिमा कळेना। मायेचा लागेना पार कोणा।।४।।

सद्गुरू

२३. गुरुदेवा मायातीता। पूर्णब्रह्म तू रे ताता।।१।। नामरूपातीत तू रे। शुद्ध बुद्ध मुक्त बा रे।।२।। सर्वाआदी तू रे अंती। गुरू चिन्मात्र तू ज्योती।।३।। ब्रह्मा आदी हरिहर। देवा तुझेचि अवतार।।४।। अलक्षपुरीचा तो राव। परात्पर गुरुदेव।।५।। लक्ष्मणाचे तू धन। महामायेचे जीवन।।६।।

२४. गुरू स्तवा गुरू स्तवा। जन्मव्यथा चुकवी गोवा।।१।। फार बद्ध मुक्त झाले। गुरुराये सोडविले।।२।। अति दोषी दुराचार। गुरुकृपे झाले थोर।।३।। कालभया हो पासून। सोडविले कृपाघने।।४।। मायानदी ही दुस्तर। येथे बुडाले हो फार।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। गुरुदेव तो काढी रे।।६।।

२५. गुरुदेवा तुझे पद रे निश्चळ। भक्ताते अढळ पद देशी।।१।। ब्रह्मांड संपत्तीहूनि सुख थोर। देशी तू माहेर साधकाचे।।२।। वेदसिद्ध जेथे आराम पावले। स्वामी ती पाउले दाविसी तू।।३।। तुजविण थोर दिसेना रे कोणी। न कळे करणी तुझी ताता।।४।। लक्ष्मण म्हणे तूचि माझे धन। करावे पावन दीनानाथा।।५।।

२६. गुरुदेवा तुझी कीर्ती। ब्रह्मा आदी सुर वर्णिती।।१।। वेदसिद्धांचे तू मूळ। परब्रह्म गा निर्मळ।।२।। लक्षातीत निजरूप। शुद्ध चिन्मात्र स्वरूप।।३।। परेपरता तू धनी। तुझी कीर्ती रे पुराणी।।४।। सत्ता तुझी अगोचर। सुखानंदे तू निर्घोर।।५।। लक्ष्मणा सुख देई। तूचि धन त्या अक्षयी।।६।।

२७. गुरू माउली दीनाची। छाया शोभे हो कृपेची।।१।। निजभक्ता तू सावली। भक्त अक्षयी बैसली।।२।। तुझे छायेचे सुख रे। ब्रह्मादिक इच्छिती रे।।३।। छाया अक्षयी सघन। सुख तुजपाशी पूर्ण।।४।। लक्ष्मणा देई तेचि। तूचि साउली सर्वांची।।५।।

२८. कल्पवृक्ष न्यून दिसे। तुझे पाय अविनाश।।१।। कामधेनू चिंतामणी। हेही न तुळती तुळणी।।२।। भक्त तुझिये चरणी। प्रेमे राहिले गुंतूनि।।३।। परीस लोहा सोने करी। हेचि परिसाची थोरी।।४।। आपुलेपण लोखंडाला। देववेना परिसाला।।५।। गुरुदेवा तू रे पूर्ण। भक्ता करिसी समान।।६।। लक्ष्मण म्हणे तू रे। सर्वा पूज्य तू स्वामी रे।।७।।

२९. गुरुपायी सुख दिसे। दिसे भासे सर्व नाशे।।१।। गुरुपद ते अक्षयी। गुरू त्रिभुवन गोसावी।।२।। गुरू हरिहरा वंद्य। गुरू स्वानंदाचा कंद।।३।। सिद्ध मुनी अवतार। गुरुभजने तरले फार।।४।। गुरुकृपे फार धाले। ब्रह्म स्वतःसिद्ध झाले।।५।। लक्ष्मण म्हणे तात। करी जन्ममरणातीत।।६।।

३०. गुरू अनाथाची आई। हीना दीना लावी सोई।।१।। शरणांगताचा कैवारी। भवदुःख हो निवारी।।२।। लक्ष चौऱ्याऐंशी योनी। बहु जीवांते जाचणी।।३।। यास्तव गुरूते शरण। जावे अष्टभावेकरून।।४।। मनोभावे शरण गेला। तोचि ताते सोडविला।।५।। लक्ष्मण म्हणे मन। पायी ठेवावे भक्तीने।।६।।

३१. तीर्थे सर्वत्रही पायी। तुझ्या शोभती अक्षयी।।१।। नाना मतांचा गलबला। तुझे पायी रे विराला।।२।। नाना युक्तींचा विचार। खुंटला तू सबराभर।।३।। कल्पनेचे अवडंबर। तू तव कल्पनेच्या पर।।४।। तुझा अनुभव घडे। तुटे कल्पनाबिरडे।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। माझा सांभाळ करावा।।६।।

३२. गुरू वत्सालागी माय। दावी स्वानुभव सोय।।१।। चहु देहांते नासून। दावी चिन्मात्र निर्गुण।।२।। गुणातीताचे चरणी। ज्ञानांजनी होय मिळणी।।३।। मिळणी होता तेचि अंग। भक्त होतसे निःसंग।।४।। निःसंगत्व हेतु नुरे। स्वानंदाचा फुंज जिरे।।५।। लक्ष्मण म्हणे वस्तू। नाही तीते आदिअंतू।।६।।

३३. गुरुराव आमुचा दाता। पूर्णब्रह्म तू रे ज्ञाता।।१।। जीवदशेचे खंडन। केले कृपादृष्टीकरून।।२।। सत्ता प्रभूची हो थोर। केले मीतूपणाते दूर।।३।। निजरूपाते दाविले। सुख अक्षयी दिधले।।४।। लक्ष्मण दीना छाया। ध्याता प्रेमयुक्त पाया।।५।।

३४. गुरुभजन हे सार। सर्व मिथ्या हा बाजार।।१।। जग उलटे चालिले। सत्याप्रती विसरले।।२।। स्वप्नामाजी बरळती। नाना परीच्या हो युक्ती।।३।। गुरुभक्त सदा जागे। तृप्त स्वानुभव अंगे।।४।। स्वानुभव सुख घेता। तुटे जन्ममरण गुंता।।५।। लक्ष्मण म्हणे तात। प्रेमे ध्यावा हो निवांत।।६।।

३५. गुरुराये कृपा केली। भवभ्रांती निरसली।।१।। बैसवूनिया जवळी।

हस्त ठेविला शिरकमळी।।२।। मंत्र फुंकियेला कानी। केली तत्त्वांची झाडणी।।३।। सारासार निवडिले। शास्त्र वेदान्त दाविले।।४।। नाना युक्ती हो करून। केले मनाते स्वाधीन।।५।। चहुदेहा हो पासून। सोडविले कृपाघने।।६।। निजवस्तू तत्त्वातीत। माझी मज झाली प्राप्त।।७।। मीतूपणा नाही उरी। वस्तू आंतरबाहेरी।।८।। पाहता पाहणे हरपले। स्मरविस्मरातीत केले।।९।। लक्ष्मण उरी नाही। अवघा त्रिभुवन गोसावी।।१०।।

३६. स्वामी माझा दयावंत। पद दाविले निवांत।।१।। देहनिधान दाविले। सुख निरुपम झाले।।२।। परिवार झाला दीन। मीतूपणा नागवण।।३।। शिक्का धन्याचा तो शिरी। शोभतसे निरंतरी।।४।। दिली स्वानुभवमाळ। सदासर्वदा निर्मळ।।५।। आम्ही त्याचे वारकरी। नाही विसर क्षणभरी।।६।। स्वामी आमुचा सर्वठायी। रिते दिसेना हो काही।।७।। स्वामी नाही एकदेशी। प्रभो वसे सर्वापाशी।।८।। अनंत ब्रह्मांडे भरला। त्याचा आधार सर्वाला।।९।। लक्ष्मणाते बोलवी। तोचि सर्वांचे हृदयी।।१०।।

३७. गुरुदेव तो अक्षयी। तोचि वसे सर्वठायी।।१।। सर्वत्राते तू रे सम। वसशी हृदयी आत्माराम।।२।। माया तुझे सत्तेकरून। चेष्टवी त्रैलोक्यालागून।।३।। तोचि आधार विश्वाचा। तोचि स्वामी रे सर्वांचा।।४।। एकाएकी तो एकला। दृश्य मायेचा गलबला।।५।। लक्ष्मणाचे जीवन। प्रभो आहा हो आपण।।६।।

३८. स्वामिकृपा हो जाहली। तत्क्षणी भ्रांती गेली।।१।। युक्ती प्रभोपाशी थोर। स्वामी कृपेचे भांडार।।२।। पलसिद्ध गुरुदेव। त्यांचे अघटित लाघव।।३।। केला सुखाचा सुकाळ। निरसिली तळमळ।।४।। लक्ष्मण म्हणे तात। स्वामी माझा जबरदस्त।।५।।

३९. गुरुमहिमा श्रेष्ठ वर्णिला पुराणी। गुरूचे चरणी सुख थोर।।१।। गुरुपद श्रेष्ठ सर्वत्र वंदिती। त्रयमूर्ती ध्याती गुरुदेव।।२।। सिद्ध योगेश्वर प्राज्ञ मुनीश्वर। स्वर्गीचे अमर ध्याती त्याते।।३।। गुरुपरंपरा अनादि चालली। गुरू ही माउली सर्वत्राची।।४।। गुरू निरंजन तोचि साकारला। अनाथा दीनाला मार्ग दावी।।५।। लक्ष्मण म्हणे गुरुभक्त ज्ञाते। स्तविती पाय ते निरंतर।।६।।

४०. गुरुतीर्थमहिमा अगाध पुराणी। देव श्रेष्ठ तिन्ही त्याहा प्रिय।।१।। वेदसिद्ध मुनी अवतार प्रसिद्ध। तेही तो आनंद घेती तात।।२।। चिन्मात्र ते तीर्थ सर्वांचे जीवन। घेती विद्वज्जन महाशूर।।३।। वस्तू भेदातीत आहे हो निवांत। तेथे हो किंचित भेद नाही।।४।। मतांचा गलबला निमाली ती वस्तू। स्वानंदभरितू स्वामी माझा।।५।। लक्ष्मण म्हणे आमुचे जीवन। तेथेचि निमग्न झालो आम्ही।।६।।

४१. गुरू दो अक्षरी मंत्रे। जळती पाप ते सर्वत्र।।१।। सदा जपती जे शूर। होती मायेचिया पर।।२।। गुरू सर्वत्राते वंद्य। गुरू स्वानंदाचा कंद।।३।। गुरुमहिमा शंकर। विष्णू जाणे शारंगधर।।४।। सिद्ध मुनी अवतार। गुरुभजनी तत्पर।।५।। लक्ष्मण म्हणे गुरू। मायाचक्रातीत ईश्वरू।।६।।

४२. गुरुब्रह्म निजवस्तू। स्वामी मायागुणातीतू।।१।। कर्मकाष्ठाचे दहन। करी स्वामी कृपाघन।।२।। महाराज सर्वोत्तम। सर्वांचे तो निजधाम।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते। स्वानुभवे ध्यावे नित्य।।४।।

४३. गुरुकृपामेघ पूर्ण। वर्षे निजभक्ताकारण।।१।। मायादाह निरसून। करी आपुले समान।।२।। सर्व अंगी सौख्य भरे। मन होय उन्मन रे।।३।। ते सुख योगेश्वर। घेती सर्वदा निर्घोर।।४।। लक्ष्मण म्हणे बा रे। गुरू छाया आमुची रे।।५।।

४४. तुझे चरणाची गोडी। घेती प्राज्ञ जे आवडी।।१।। माया लटकी त्याहा रे। तिन्ही लोकांते वंद्य रे।।२।। त्रय देव सन्मानिती। प्राणमित्र त्या मानिती।।३।। विश्वपूज्य तू सद्गुरू। तुझा सर्वत्रा आधारू।।४।। तुझे वर्णिता पवाडे। झाले सनकादिक वेडे।।५।। लक्ष्मण म्हणे वेद। झाले तन्मय स्वानंदे।।६।।

४५. तुझा शिक्का ज्याचे शिरी। काळ त्याचा आज्ञाधारी।।१।। काळ सर्वत्रा अनिवार। मारा त्याचा तो दुर्धर।।२।। तुझे भक्ताने ग्रासिला। काळ नाही त्या उरला।।३।। ऐसा महिमा तुझा थोर। मूर्ख नेणती पामर।।४।। भरले मायेचिये भरी। शुद्धी नाही क्षणभरी।।५।। गुरुराय परिपूर्ण। भक्ता करिसी समान।।६।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।७।।

४६. चरण-अंगुष्ठी तीर्थ रे। तुझ्या सर्वत्र वसती रे।।१।। परेपरते चरण।

तुझे अक्षयी परिपूर्ण।।२।। स्वानुभवे तूते ध्यावे। तेव्हा तुझे सुख घ्यावे।।३।। तुझे तीर्थ सेविता रे। जन्ममृत्यू हा नुरे रे।।४।। सद्‌गुरू मायातीता। किती वर्णू तूते ताता।।५।। लक्ष्मणा तीर्थ देई। दीन आपुला म्हणवी।।६।।

४७. चहुदेहांचे आसन। केले मीपण गाळून।।१।। स्वामी आसनी बैसविला। शुद्ध भावे हो पूजिला।।२।। पाच पंचवीस छत्तीस। हाचि पूजेचा विलास।।३।। बारा सोळा सहा जणी। सदा ठेविल्या चरणी।।४।। दहा पाच तीन बा रे। प्रभोपायी शोभती रे।।५।। लक्ष्मण उरला नाही। पूजा चालली अक्षयी।।६।।

४८. गुरू ध्याहो गुरू ध्याहो। तेचि अंग वेगी व्हा हो।।१।। अळी निजध्यासे करून। गेली भिंगोटी होऊन।।२।। निजध्यास आहे थोर। सर्व साधनांचे सार।।३।। स्मरा पर ते साधन। कष्ट होती ते दारुण।।४।। निजरूपाचे स्मरण। हेचि आमुचे पूजन।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। गुरू चिन्मात्र तो ध्या रे।।६।।

४९. तुझे स्वरूप पाहाता। नुरे भवाची ही वार्ता।।१।। सबाह्य सुख सदोदित। होय महिमा अद्‌भुत।।२।। मीतूपणाची गवसणी। निघे अगम्य करणी।।३।। जीवदशा नुरे काही। अगम्य तू गुरुआई।।४।। अलक्षपुरी तुझा मठ। तेथे नेशी शिष्य श्रेष्ठ।।५।। लक्ष्मण म्हणे तू रे। सर्वाठायी अक्षयी रे।।६।।

५०. त्रयदेव तुझे भजनी। सिद्ध देव ऋषि मुनी।।१।। केवळ निजरूप तू रे। ब्रह्मानंद अक्षयी रे।।२।। अवतारमाळा होती। तेही तुजला स्तविती।।३।। व्यासवाल्मीकादी कवी। तुझे भजनी अक्षयी।।४।। तिन्ही लोक तुज ध्याती। वसशी तू सर्वांभूती।।५।। लक्ष्मण म्हणे स्वामी। स्वस्थ शोभसी मूळधामी।।६।।

५१. गुरुदेवा मीपणे रे। मज दीना भ्रमविले रे।।१।। जेथे जन्म म्या घेतला। तोचि अभिमान धरिला।।२।। त्याचे आश्रयाची गोडी। वासना हिंडवी देशोधडी।।३।। मर्कटवत् ही नाचवी। मोठे मोठे हिची गोवी।।४।। तुझे कृपेविण ताता। तुटेनाचि भवगुंता।।५।। लक्ष्मणाते सोडवी। दीन आपुला म्हणवी।।६।।

५२. गुरुदास्यत्वावाचून। शिष्य नव्हे हो प्रवीण।।१।। महिमा सेवेचा अद्‌भुत। सेवा करिती निजभक्त।।२।। सेवा केली ही श्रेष्ठांनी। मान्य झाले मुकुटमणी।।३।। गुरुसेवा अवतारांनी। केली पाहा हो पुराणी।।४।। निजध्यास श्रेष्ठ सेवा। चुके जन्ममरण गोवा।।५।। लक्ष्मण म्हणे सेवा। करा तुटे दुःखगोवा।।६।।

५३. गुरू माय हो आमुची। गुढी शोभे स्वानंदाची।।१।। स्तनपान करितो सदा। तुटी पडो नेदी कदा।।२।। माय पान्हा ती चोरीना। तृप्त करी भक्तजना।।३।। अमृताहून गोड फार। गुरुकृपारस सार।।४।। जन्मरणाची गुंती। नुरे होय अक्षयी तृप्ती।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। गुरुकृपारस प्या रे।।६।।

५४. गुरू जीवन सर्वांचे। स्थान आहे विश्रांतीचे।।१।। वाल्ह्या ब्रह्म तो हत्यारी। गुरुकृपे त्याची थोरी।।२।। शतकोटी रामायण। गुरुकृपे झाले पूर्ण।।३।। राज्य सोडी गोपीचंद। गुरुकृपे निजबोध।।४।। सिद्ध योगी वितरागी। वर्तताती गुरुमार्गी।।५।। लक्ष्मण लोटांगण। घाली गुरुभक्ताकारण।।६।।

५५. गुरुकृपे बद्ध प्राणी। गेले फार उद्धरूनि।।१।। तीही लोकी झेंडे त्यांचे। ऐसे महिमान भक्तीचे।।२।। गुरुकृपा ज्या लाधली। मुक्ती दासी त्याची झाली।।३।। नित्यमुक्त गुरुभक्त। स्वानुभवे ते निवांत।।४।। लक्ष्मण म्हणे थोर। गुरू सर्वांचे माहेर।।५।।

५६. गुरुप्रसादाची थोरी। महिमा असे श्रेष्ठ भारी।।१।। प्रसाद घेताचि स्वामीचा। नाश होय षड्‌रिपूंचा।।२।। मीतूपणा हा नुरे रे। सुख अक्षयी घेई रे।।३।। सुख ब्रह्मानंदे होय। गगनी आनंद न माय।।४।। लक्ष्मण म्हणे ध्याहो। जन्ममृत्यू चुकवा हो।।५।।

५७. गुरुराये नवल केले। जग सोयरे हे झाले।।१।। अवघे आप्तचि दिसती। गेली मीतूपणा भ्रांती।।२।। द्वेषभावचि हा गेला। अवघा ब्रह्मानंद झाला।।३।। स्वामी आपणचि सर्व। नटला दिसे कृपाळुव।।४।। तोचि नानावर्ण दिसे। परि लिप्त कोठे नसे।।५।। लक्ष्मण म्हणे मन। फिरवून पाहावे चरण।।६।।

५८. सद्‌गुरूने कृपा केली। चित्त ममता ही गेली।।१।। आता झाले मी

निर्भय। बळकट धरिले गुरुपाय।।२।। आनंद झाला मज भारी। साठवेना हो अंतरी।।३।। लक्ष्मण म्हणे गुरुकृपा। ऐक्य झालो स्वस्वरूपा।।४।।

५९. सद्गुरू माझा तो परमात्मा। सद्गुरू माझा तो सर्वात्मा।।१।। सद्गुरू सर्वघटी भरला। सर्व व्यापून असे उरला।।२।। वेदा पडलेसे मौन। शास्त्राही नकळे खूण।।३।। लक्ष्मण म्हणे गुरुदेवा। अगम्य हो तुमच्या मावा।।४।।

६०. सद्गुरू माझा विश्वजनिता। सद्गुरू माझा विश्वकर्ता।।१।। सद्गुरुपद असे अनादी। सद्गुरुराव मोक्षनिधी।।२।। सद्गुरुपद असे आराम। सद्गुरू तोचि आत्माराम।।३।। लक्ष्मण म्हणे गुरुभक्ती। पाया लागती हो मुक्ती।।४।।

६१. सद्गुरू माझा देव धनी। सद्गुरू माझा चिन्मयखाणी।।१।। गुरुराव अलक्षपूरवासी। गुरुमंत्र तारक जगासी।।२।। सद्गुरूप्रती मी उतराई। कोणे गुणे होऊ बाई।।३।। लक्ष्मण म्हणे गुरुराया। शरण आलो मी तव पाया।।४।।

६२. यावे यावे सिद्धराया। स्वामिनाथा गुरुराया।।१।। स्वामी दीनांचे माहेर। दीनानाथ सिद्धेश्वर।।२।। स्वतःसिद्धा आदिरूपा। स्वतःसिद्धा ब्रह्मस्वरूपा।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्धदेवा। अगम्य हो तुमच्या मावा।।४।।

६३. नयनी दिसतो गुरू तो विचारी। कासियासी करी खटाटोप।।१।। अहं सोहं जप चालिलासे माप। पाहे विश्वरूप ज्ञानदृष्टी।।२।। गुरुदेव बा रे कृपेचा सागर। दाविती दातार कृपावंत।।३।। परेचिया पर आहे जगदोद्धार। गुरू तो विचार सांगतील।।४।। लक्ष्मण दीन प्रभोचा किंकर। सद्गुरू माहेर सर्वांचे रे।।५।।

६४. डोळियाचा डोळा गुरूने दाविला। सर्व शीण गेला माझा बाई।।१।। स्वरूप पाहिले मन माझे धाले। अगम्य पाउले काय सांगू।।२।। श्वेतपीतरक्तनीलवर्णातीत। पाहा हो निवांत गुरुकृपे।।३।। सर्व रंगांतीत त्याचा रंग बाई। त्रिभुवन गोसावी श्रेष्ठ सर्वा।।४।। लक्ष्मण म्हणे गुरुभक्त पाहाती। इतर पाहाती टकमका।।५।।

६५. सद्गुरुदेवाने भ्रांती निरसली। साउली गे केली मजवरी।।१।। द्वैतपणाचा ठाव गे पुसिला। अभिमान गेला गुरुकृपे।।२।। मीतूपणा सये घालवी तो बाई। धन्य गुरुआई दूर करी।।३।। गुरुकृपे मग आत्मलाभ होय।

धरावे ते पाय बळकट।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य गुरुआई। काय उतराई होऊ बापा।।५।।

६६. गुरुदेव बाई दाविती निधान। धरा ते चरण प्रेमयुक्त।।१।। लक्ष चौऱ्यांशी ग्रामांचा गे तंटा। चुकवी गे श्रेष्ठा धरा वेगी।।२।। अविद्यामाईची करितो बोळवण। कामक्रोध दीन होती सहज।।३।। पाहता पाहणे हेही हरपले। निवांत गे जाहले गुरुभक्त।।४।। लक्ष्मण म्हणे गुरुकृपा बाई। आधी संपादावी भक्तिबळे।।५।।

६७. हस्तकी धरूनि परभुवना नेले। गुरूने दाविले चिन्मयरूप।।१।। स्थूळ सूक्ष्म कारण महाकारण घाट। दाविली स्वल्प वाट गुरुदेवे।।२।। नाना दळवाटे हटविले त्यांनी। अगम्य करणी गुरूची गे।।३।। देही असूनि विदेही स्थितीने मारिले। सर्वस्वी मज केले पावन गे।।४।। अंतर्बाह्य सर्वठायी दिसे देव। रिता काही ठाव दिसेना गे।।५।। लक्ष्मण दीन गुरूने रक्षिला। पावन तो केला गुरुराये।।६।।

६८. यावे यावे गुरुदेवा। स्वामिराया कृपाळुवा।।१।। सिद्धेश्वरा योगिराया। दीनबंधू स्वामिराया।।२।। अंगी भस्म गळा माळा। सिद्धा स्वामी हो दयाळा।।३।। लक्ष्मण म्हणे दातारा। महाराजा परात्परा।।४।।

६९. गुरुदेव तू निर्गुण। योगियांचे निजधन।।१।। अनंत ब्रह्मांडे हा खेळ। तुझे मायेचा हा खेळ।।२।। तू तव सर्वदा निवांत। ब्रह्मादिका न कळे अंत।।३।। वेद सिद्ध मुनीश्वर। तुझे इच्छेचे अंकुर।।४।। सूत्रकार तू सर्वांचा। आत्मा आहेसी तू सर्वांचा।।५।। लक्ष्मणाचे हृदयी। तूचि वसशी अक्षयी।।६।।

७०. गुरुदेवा तुझा उपकार थोर। भव हा दुस्तर निरसिला।।१।। निजरूप माझे मज त्वा दाविले। भ्रांतीतीत केले किती स्तवू।।२।। नाशिवंत सर्व माया हा पसारा। दिसे विश्वंभरा तुझे कृपे।।३।। हृदयनिवासी अवघा तूचि एक। मायेने अनेक झाले भेद।।४।। भेददृष्टी सर्व दुःखासी कारण। भेदास्तव येणे जाणे सदा।।५।। लक्ष्मणी नाही भेद तो उरला। ब्रह्मानंद झाला तुझे कृपे।।६।।

७१. गुरुमाय वोळली पाजिला हो पान्हा। झाले सौख्य मना उरी नाही।।१।। सौख्याचा सुकाळ सर्वदा अक्षयी। षड्रिपू पुढाई विराले हो।।२।। आशा तृष्णा ममता कल्पना निमाली। जीवबुद्धी गेली भ्रांती तम।।३।।

ब्रह्मानंदी वास सर्वदा विलास। पुराणपुरुष अंतर्बाह्य।।४।। ज्ञानदृष्टीविण वर्म हे कळेना। ज्ञानही ठसेना कृपेविण।।५।। लक्ष्मण म्हणे संतसंग सार। तेणे हा विचार कळतसे।।६।।

७२. गुरुदेवा तुझा महिमा अपार। सहस्रमुखा पार नेणवे हो।।१।। त्रिगुण पसारा मायेचा हा सारा। तू तव विश्वंभरा मायातीत।।२।। अनंत ब्रह्मांडे मायेचे उदरी। तू तव ब्रह्मचारी निर्विकल्प।।३।। मायागुण तुझे सत्तेने वर्तती। तू तव चिन्मयमूर्ती निर्विकार।।४।। समुद्री तरंग तेवी हा आकार। तू तव परात्पर निराभास।।५।। लक्ष्मण म्हणे सत्ता तुझी थोर। सर्वत्र व्यापार सत्ते तुझ्या।।६।।

७३. तुझा उपकार न फिटे सर्वज्ञा। सद्गुरु रे पूर्णा पूर्णब्रह्मा।।१।। लोह-परिसाचा दृष्टान्त साजेना। परीस करीना आपणाऐसे।।२।। कामधेनू कल्पवृक्ष चिंतामणी। न तुळती तुळणी तुझ्या ताता।।३।। कल्पनेते वाढविती हे सकळ। कल्पनेचे मूळ छेदिसी तू।।४।। पूर्णब्रह्मा ब्रह्म करिसी वत्साते। सिद्धमुनी ज्ञाते स्तविती तुज।।५।। लक्ष्मण दीन तुझे कृपे धाला। भ्रांतितम गेला तुझे कृपे।।६।।

७४. तुझी कृपा बाणे तोचि होय सिद्ध। पद ते अभेद पावे प्राणी।।१।। गुरुभजन प्रिय सनकादिकाप्रती। देव गुरूप्रती शरण गेले।।२।। अष्टभावे तूते शरण जे आले। तेचि मुक्त झाले दीनानाथा।।३।। शब्दज्ञानी खळ वाचाळी करिती। भेदमते जाती दुःखालया।।४।। मीतू वसे जेथे तेथे सुख नाही। नाना त्या उपायी दुःख कोटी।।५।। लक्ष्मण म्हणे भेददृष्टी जाय। तेव्हा तुझे पाय प्राप्त होती।।६।।

७५. सद्गुरुमाईची कृपा संपादिली। तेचि धन्य झाले तिन्ही लोकी।।१।। संसार त्याहाते सुखाचा सर्वदा। भवाची ती बाधा स्वप्नी नाही।।२।। स्वानुभवरंगी क्रीडती अक्षयी। सौख्या पार नाही त्याहाचिया।।३।। समबुद्धी श्रेष्ठ ब्रह्मनिष्ठ झाले। सार्थक ते केले जन्मूनिया।।४।। आपपरभाव नाही ज्याहापाशी। ब्रह्मांडनिवासी सखा त्याचा।।५।। लक्ष्मण दीन लोळे त्याचे चरणी। जगी ते वसूनि जगातीत।।६।।

७६. सद्गुरूचे भक्त सर्वदा संतुष्ट। स्वानंदाची पेठ वसविली।।१।।

सोऽहंभावे स्वेच्छे व्यापार अक्षयी। सुखादुःखा नाही उरी जेथे।।२।। षड्रिपू खळ अविद्येचे बाळ। जिंकूनि निर्मळ ब्रह्मानंदे।।३।। अविद्येचे केणे विकूनि विजयी। वास निरामयी सदोदित।।४।। अविनाश स्वरूपी भेद वारूनिया। स्वप्नवत् काया पाहाती ते।।५।। लक्ष्मण म्हणे त्याहाची संगती। होता मग भ्रांती नुरे नुरे।।६।।

७७. गुरुदेवा तुझी छाया ही शीतळ। त्रिताप हा ज्वाळ गेला कृपे।।१।। तापत्रयवन्ही महा हा दारुण। तुझे कृपेकरून निमाला रे।।२।। तळमळ काही नुरे कृपेस्तव। अघटित लाघव तुझे देवा।।३।। जगचि हे सर्व आप्त झाले कृपे। स्वानंदाची पेठ प्राप्त झाली।।४।। ब्रह्ममय सर्व दुजे रे दिसेना। अवघा तूचि पूर्णा दिसशी रे।।५।। लक्ष्मणी नाही उरी कृपेस्तव। देवाधिदेव विश्वाचा तू।।६।।

७८. तुझ्या चरणाची आवडी सर्वांते। सिद्धमुनी तूते स्तविती बा रे।।१।। ब्रह्मा हरी हर अक्षयी स्मरणी। चिन्मय तू खाणी सर्वा वंद्य।।२।। साक्षिभूत सृष्टिकर्मी ते वर्तती। तुझे म्हणविती सद्गुरू रे।।३।। तुजमाजी विश्व अनंत ब्रह्मांड। स्वरूप अखंड तुझे पूर्ण।।४।। सर्वाठायी वस्ती तुझी निरंतर। नाम विश्वंभर तुझे ताता।।५।। लक्ष्मण पायी वसे निरंतर। तुमचा पामर म्हणवितो।।६।।

७९. सद्गुरुमायेचे म्हणवितो दीन। आम्हा काय न्यून सौख्य सदा।।१।। भवाची ही वार्ता नुरे स्वप्नी काही। स्वानुभवडोही बुडी दिली।।२।। स्वानुभवाऐसे सुखचि दिसेना। सर्व मिथ्या जाणा मायामय।।३।। स्वप्नवत् सर्व दिसे हा संसार। यातील व्यापार असत्य ते।।४।। मृगजळपुरी तेथे कोण धाला। सांगा हो आम्हाला वंद्य आहा।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त सुख घेती। येर ते भ्रमती मायामोहे।।६।।

८०. सद्गुरूचे भक्त स्वानुभवे तृप्त। परमात्मा तो आप्त केला ज्यांनी।।१।। शेण सोने माती समान प्राज्ञाला। अविद्येचा घाला चुकविला।।२।। राजा रंक श्रेष्ठ पाहाती समान। रत्न ते पाषाण एकचि त्या।।३।। सर्वदा विजयी निःसंग निर्घोर। कृपेचे भांडार महाराज।।४।। दृश्य प्रांत सर्व मायामय जाणा। सर्वदा आपणामाजी वास।।५।। लक्ष्मण दीन त्याहाचे भजन। करी रात्रंदिन खंड

नाही।।६।।

८१. क्षेत्र ब्रह्मांडीचे थोर। मोक्षदायक ते फार।।१।। करिती पापाचे निरसन। होती पतितपावन।।२।। सकळ तीर्थांते आधार। तुझा तूचि सबराभर।।३।। स्वरूपापासाव हे सारे। तीर्थक्षेत्र देव बा रे।।४।। गुरुदेवा तू निर्गुण। तुझे इच्छेचे हे गुण।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त। सुख घेती ते निवांत।।६।।

८२. चहु देहांचे आसन। शोभे स्वामी हो कारण।।१।। वरी स्वामी हो शोभला। नाना अलंकार ल्याला।।२।। पादपूजा आरंभिली। स्वामी दीनांची माउली।।३।। शुद्ध केले अंतःकरण। तेचि अभिषेक जीवन।।४।। चरणी अभिषेक केला। ताप त्रिविध निमाला।।५।। मोहविभूती लाविली। त्रिगुणपत्री समर्पिली।।६।। आशासुगंध उपचार। दयाचंदन सुंदर।।७।। मनपुष्प हो वाहिले। चित्त पायी समर्पिले।।८।। धूप जाळिला अहंकार। मनशादीप तो सुंदर।।९।। भावनैवेद्य अर्पिला। बुद्धितांबूल समर्पिला।।१०।। तृष्णा अर्पिली दक्षिणा। स्वामी त्रैलोक्याचा राणा।।११।। नमस्कार केला पायी। देहभाव उरी नाही।।१२।। पंचप्राणांची आरती। षड्रिपूचिया वाती।।१३।। वासना ही शुद्ध घृत। सोऽहं शब्द लाविली ज्योत।।१४।। स्वामी ओवाळिला तात। वस्तू चिन्मात्र निवांत।।१५।। अद्वैत पुष्पांजुळी केली। स्वामिमूर्ती न्याहाळिली।।१६।। चिन्मात्र अक्षयी तीर्थ। शोभे चरण ते सतत।।१७।। केले तीर्थ ते प्राशन। वस्तू स्वानंदजीवन।।१८।। दिला स्वामींनी प्रसाद। फार झाला ब्रह्मानंद।।१९।। झाला सुखाचा सुकाळ। निरसिला मायाजाळ।।२०।। सुख स्वानंद ते थोर। तेचि घेतो निरंतर।।२१।। परेच्या पर तों सद्‌गुरू। त्याचा सर्वांते आधारू।।२२।। त्याचा तीर्थ हो प्रसाद। घेतो अक्षयी तो स्वाद।।२३।। लक्ष्मण प्रभोपायी। लोळतसे हो अक्षयी।।२४।।

८३. नित्य सुख तुजपाशी। निजानंदाची तू राशी।।१।। मायाचक्राच्या वेगळा। सर्वातीत तू स्नेहाळा।।२।। क्षुल्लकानंदी प्राणी हीन। पडले मायामोहेकरून।।३।। तुज नेणती बापुडी। सदा विषयी आवडी।।४।। तुझे सुख घेती भक्त। गुरुदेवा तू निवांत।।५।। लक्ष्मण अपराधी। सोडवा हो कृपानिधी।।६।।

८४. शिव तोचि गुरू मानावा आपण। करावे पूजन अष्टभावे।।१।।

विकल्पाचे काम नाही येथे काही। विकल्पाने काही कार्य नोहे।।२।। शिवरूप शिवयोगी ते जाणावे। अन्न त्याहा द्यावे प्रेमभरे।।३।। भावापाशी देव वसे स्वयमेव। अभावे तो देव वश नव्हे।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य गुरुभक्ती। गुरू कृपामूर्ती दयाघन।।५।।

८५. कोणी स्तवा निंदा करा। अथवा तोंडावरी मारा।।१।। आम्हा खेद काही नाही। गुरुकृपा वसे देही।।२।। तुम्ही सोयरे सर्व रे। जग सर्वत्र आहा रे।।३।। सर्वघटी स्वामी नांदे। त्याते नमितो ब्रह्मानंदे।।४।। तुम्ही आम्ही म्हणणे भ्रांती। अवघा स्वामी ब्रह्ममूर्ती।।५।। लक्ष्मण पाहू गेला। चरणामाजी लय झाला।।६।।

८६. निंदास्तुतीवरी पाणी। सांडून ध्या तो शूळपाणि।।१।। निंदक वंदक समान। मानूनि करितो भजन।।२।। जग अवयवापरी। मानूनि स्तवितो त्रिपुरारी।।३।। गुरुमाय आम्हा वोळली। आम्हा वत्सा पान्हावली।।४।। पान्हा तिने हो पाजिला। म्हणूनि ब्रह्मानंद झाला।।५।। अंतर्बाह्य देव भरला। लक्ष्मण नाही उरला।।६।।

८७. गुरुकृपेने नवल। झाले ऐका हो सकळ।।१।। दृश्य सरले माघारे। अवघे चिन्मयचि हे रे।।२।। हे-तेपणा उरी नाही। शब्दापरते अक्षयी।।३।। स्वयं धोड एक झाली। वस्तू अक्षयी शोभली।।४।। सांडीमांडीपर ते रे। वस्तू एकचि असे रे।।५।। लक्ष्मणा तेथे वास। मीतू सरला अवघा भास।।६।।

८८. का हो वाया भ्रमता। संग अविद्येचा दुष्ट।।१।। जीव श्रमले हो फार। सोडवावे जीव म्हणती।।२।। म्हणूनि साकारली। गुरुमाय दीनाची।।३।। सर्व तीर्थे वसती पायी। सत्य सत्य ही वाणी।।४।। शिवगिरिजेचा संवाद। पाहा स्कंदपुराणी।।५।। रामकृष्णादी अवतार। गेले शरण गुरुनाथा।।६।। ब्रह्मादिक मुनीश्वर। गुरुनाम ते जपती।।७।। चहुदेहांते निरसून। वस्तू दाविती नयनी।।८।। गुरू तत्पद शिव रे। शिष्य त्वंपद जीव रे।।९।। जीवशिवा होय मिळणी। धन्य धन्य गुरुमाय।।१०।। वेदान्ताचे हो नवनीत। गुरुराव अलक्ष।।११।। लक्ष्मणाची साउली। गुरुवृक्ष अनादी।।१२।। म्हणोनिया साकारली। गुरुमाय दीनाची।।१३।।

८९. सद्गुरूने नवल केले। मीतूपण प्रभोने नेले।।१।। आपण बैसला

हृदयी। दिसे ब्रह्मांडाचे ठायी।।२।। पाहातसे गे नेत्राने। शब्द ऐकतसे श्रवणे।।३।। वाचेने गे शब्द बोले। त्वचेने तो स्पर्श जाणे।।४।। हस्ताने घेणे देणे। पायाने गे प्रभो चाले।।५।। गंध घेतसे तो घ्राणे। मूत्रद्वार ते हो शिस्न।।६।। गुदी मळ विसर्जन। अनेक लीला करितो।।७।। चुंबकन्याये कर्म हाती। आपण साक्षी सर्वाभूती।।८।। अनंत ब्रह्मांडा आंतर। बाहेरही परमेश्वर।।९।। अंतःकरण मन बुद्धी। विलास माया ही उपाधी।।१०।। लक्ष्मण म्हणे तात। एकपणे आनंदभरित।।११।।

९०. गुरुदेवा या हो पाय दाखवा हो। भव निरसा हो स्वामिराया।।१।। सगुण झालासी भक्तास्तव देवा। अगम्य रे मावा तुझ्या नाथा।।२।। कृपा रे करिसी भव तू हरिसी। पद तू दाविसी निवांत रे।।३।। तुझी कृपा होता भव मशकप्राय। भ्रम हा रे जाय क्षणामाजी।।४।। लक्ष्मणा दीना सोडवावे नाथा। धावा हो समर्था दीनबंधू।।५।।

९१. सिद्धनाम घेता कार्य सिद्ध होय। धरावे ते पाय वेगी प्रेमे।।१।। सिद्ध दयाघन सिद्ध दयाघन। करी रे पावन पतितासी।।२।। स्वहित करा हो मन आवरा हो। प्रभोते स्मरा हो साधन स्वल्प।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य सिद्धमाय। दाखवी ती सोय निजभक्ता।।४।।

९२. पलसिद्ध योगी आहे तो निःसंग। प्रभोप्रती संग आवडेना।।१।। ब्रह्मांड हे राज्य वमन तो मानी। ऋद्धिसिद्धी त्यांनी हटविल्या।।२।। आनंदभरित सदा तो निवांत। मूर्ती ती शाश्वत पाहा वेगी।।३।। लक्ष्मण म्हणे निरपेक्ष सिद्ध। स्वानंदाचा कंद स्वामी माझा।।४।।

९३. शिव ते स्वरूप परमात्मा तो जाण। त्याज रे वाचून रिते काय।।१।। स्थावर जंगमी तोचि रे भरला। लिप्त तो कशाला नाही शिव।।२।। गुरुकृपे प्रभो पाहतो निवांत। सद्गुरू दावीत देव देही।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य गुरुमाय। सुगम उपाय दाविला हो।।४।।

९४. सद्गुरुनाथ दयाळू तो फार। भक्ताचे माहेर गुरुदेव।।१।। गुरुकृपा होता ताप निरसे रे। धरा वेगी बा रे पाय त्याचे।।२।। सद्गुरुदेवाते शरण जे गेले। पूर्वपद निधले गुरुराये।।३।। ते पाय धरा चुकती येरझारा। सखा वेगी करा गुरुदेव।।४।। लक्ष्मणा दीना त्यांनी सोडविले। पावन रे केले दीनाप्रती।।५।।

९५. सद्गुरुदेव तो कृपावंत जाणा। करी रे पावन दीनाप्रती।।१।। सद्गुरू परमात्मा वश तो करावा। विचार करावा स्वहिताचा।।२।। क्षणामाजी ते रे पावन करिती। धरूनि रे देती देवा हाती।।३।। गुरुकृपा होता देव वश होय। धरा वेगी पाय गुरूचे रे।।४।। लक्ष्मण म्हणे गुरू ती माउली। कृपेची साउली शीतळ आहे।।५।।

९६. सद्गुरूचे चरणी जे का स्थिरावले। पावन ते झाले भक्तिबळे।।१।। सद्गुरूचे दास झाले ते निर्दोष। प्रभो तो महेश सखा केला।।२।। धरा गुरुपाय स्वल्प हा उपाय। सद्गुरू ती माय कनवाळू।।३।। सद्गुरुभजनी विश्वास असावा। विसर नसावा पायाचा रे।।४।। लक्ष्मण म्हणे गुरुभक्त शूर। ज्ञानाचे सागर गुरुभक्त।।५।।

९७. सद्गुरूसारखा सखा हो दिसेना। नाना हो यातना निरसी तो।।१।। अविद्येचा संग तोडी तो सद्गुरू। कृपेचा सागरू बाप माझा।।२।। शीण ते हरिती दाविती ते मूर्ती। परमात्मा दाविती देही देवा।।३।। गुरुकृपा होता सर्वठायी देव। पाहा कृपाळुव गुरुकृपे।।४।। लक्ष्मण गेला गुरूते शरण। सद्गुरूचा दीन म्हणवितो।।५।।

९८. सद्गुरुदेव तो कृपेचा सागर। पापाचा संहार करितो तो।।१।। भ्रमकूपातून काढी तो दयाळ। ब्रह्मांडाचा पाळ दाविती ते।।२।। गुरूवाचूनिया सापडेना वाट। धरा ते बळकट पाय वेगी।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य ते गुरुभक्त। आनंदे वर्तत जगामाजी।।४।।

९९. गुरू दयावंत तारिती पतित। करिती निवांत भक्ताप्रती।।१।। अनेक जन्मांचा शीण ते हरिती। बंधन तोडिती नाना दुःखे।।२।। योगियाचा राव दाविती नयनी। न कळे करणी गुरूची हो।।३।। लक्ष्मण म्हणे माया निरसिती। पावन करिती हीनादीना।।४।।

१००. सद्गुरुराव तो आमुचा सोयरा। कृपेच्या सागरा विसरू कैसा।।१।। कामक्रोधादी बंड निवारिले। गुरूने हो केले पावन मज।।२।। अविद्यामायेचे काही हो चालेना। सद्गुरू तो राणा वंद्य सर्वा।।३।। सद्गुरूते स्तविती देव ते हो सर्व। सद्गुरू तो देव परमात्मा तो।।४।। लक्ष्मण म्हणे गुरुमायेप्रती। मी हो मंदमती काय स्तवू।।५।।

१०१. अहो गुरुदेवा कृपावंत तुम्ही। गांजलो हो देवा दीन आम्ही।।१।। कृपा हो करावी भ्रांती हो हरावी। दावी वेगी सोई देवराया।।२।। काम हा विखार झोंबतो मजला। वेगी या दुष्टाला आवरा हो।।३।। परब्रह्मा देवा यावे लवकर। अनादी ईश्वर गुरुदेवा।।४।। लक्ष्मण म्हणे माझा कोण त्राता। अनाथाच्या नाथा यावे वेगी।।५।।

१०२. सद्गुरुदेवाते शरण मी दीन। पतितपावन गुरुदेव।।१।। शरणागता त्यांनी फार हो रक्षिले। मार्गाते लाविले जग सर्व।।२।। सगुण तो झाला भक्ताचिया कार्या। नमो गुरुराया कार्य साधा।।३।। त्याची कृपा होता मग भय नाही। गुरुकृपे घेई ब्रह्मसुख।।४।। लक्ष्मण म्हणे गुरुदेव धन्य। त्याची लीला जाणे कोण ऐसा।।५।।

१०३. सद्गुरुमाय ती पाजी प्रेमपान्हा। का हो त्याते ध्या ना शिणता का।।१।। मातेची उपमा साजेना तयाला। ब्रह्मादिक त्याला ध्याती सदा।।२।। अनंत जन्मांचे साकडे तोडिती। निजवस्तू दाविती भक्ताप्रती।।३।। लक्ष्मणाप्रती बोलवी दातार। दीनाचे माहेर नाथ माझा।।४।।

१०४. सद्गुरुदेवाचा संग हो असावा। विसर नसावा पायाचा रे।।१।। काम क्रोध दुष्ट मोठे हे झुंजार। यांनी जर्जर केले फार।।२।। गुरुकृपा होता हे रे लीन होती। क्रूर ते वर्तती स्वाधीन ते।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य गुरुराय। भ्रांती कृपाळुव हरीतसे।।४।।

१०५. सद्गुरू दयाळ दयेचे सागर। भक्ताचे माहेर गुरुदेव।।१।। अज्ञानछेदक भव रे मोचक। विश्व रे व्यापक गुरुदेव।।२।। जगी तो भरला भरूनि उरला। लिप्त तो कशाला नाही नाथ।।३।। सगुण होऊनि दावीतसे मार्ग। पद ते अभंग आहे पाहा।।४।। लक्ष्मण म्हणे गुरू तो सोयरा। मायेचिया परा नमो वेगी।।५।।

१०६. गुरूने रक्षिले फार हो तारिले। अज्ञान छेदिले गुरुदेवे।।१।। अगणित पापी उद्धरिले त्यांनी। अगम्य करणी गुरूची हो।।२।। अनाथा सनाथ करी तो रे नाथ। प्रभो तो समर्थ गुरुदेव।।३।। सकलही देव गुरूते स्तविती। स्तवा कृपामूर्ती तुम्ही वेगी।।४।। लक्ष्मण दीन लोळे चरणावरी। सद्गुरुमाहेरी सुख फार।।५।।

१०७. पुण्याचा सागर तपाचा गिरिवर। सुखाचे आगर गुरुदेव।।१।। महिमा कळेना पार हो लागेना। योगियाचा राणा सर्ववंद्य।।२।। कोण्या रे मुखाने तुजला स्तवावे। आकाश कवळावे कैसे देवा।।३।। निर्गुण निवांत तू रे सदोदित। ब्रह्मादिका मात कळेना हो।।४।। लक्ष्मण म्हणे सगुण झालासी। भक्ता तू रक्षिसी स्वामिराया।।५।।

१०८. श्रुती शास्त्र वेद सर्व मौनावले। कवीही शिणले वर्णिता रे।।१।। ब्रह्मा विष्णु रुद्र तुजला स्तविती। अगम्य रे कीर्ती तुझी स्वामी।।२।। गुरुदेवा आहा मायेचिया पर। सर्वांचे माहेर तूचि देवा।।३।। अनंत ब्रह्मांडे माया निरसी जाण। मायेचे जीवन तूचि देवा।।४।। पायाचाही देवा पार रे कळेना। अविनाश जाणा गुरुदेव।।५।। लक्ष्मणा दीना वेगी सोडवावे। दीना सांभाळावे गुरुदेवा।।६।।

१०९. गुरूचे चरण विसरू मी कैसा। मजला भरवसा पायाचा हो।।१।। पाय ते तारक पाय ते तारक। भवाचे हारक गुरुनाथ।।२।। भ्रांती रे हरून केले रे पावन। देही ते निधान दाविती रे।।३।। लक्ष्मण म्हणे गुरू माझे धन। गुरू रे वाचून कोण मज।।४।।

११०. गुरुदेवा कृपा करा। भेटी द्यावी हो दातारा।।१।। सत्यस्वरूपा गुरुदेवा। दीनानाथा कृपाळुवा।।२।। योगिराया वेगी यावे। प्रभोराया वेगी धावे।।३।। सगुण भक्तास्तव झालासी। पतिता दीनासी रक्षिसी।।४।। तुझे स्वरूप चिन्मय। सत्य तूचि गुरुराय।।५।। मलरहित आहेसी। गुणापर तू दिससी।।६।। सकल देव तुजला ध्याती। वेद अक्षयी स्तविती।।७।। तुझा पार रे लागेना। तुझे लाघव कळेना।।८।। देव अवयव तुमचे। सर्व आहे तुझे इच्छे।।९।। अनंत ब्रह्मांडे निर्मिसी। अंती एकला दिससी।।१०।। कृपा करावी हो वेगी। भेटी द्यावी दीनालागी।।११।। काय स्तवू मी पामर। तू अनादी ईश्वर।।१२।। शिणला वाचेचा गलबला। सहस्रवदन तो शिणला।।१३।। श्रुती म्हणती नेति नेति। तेथे माझी वाचा किती।।१४।। लक्ष्मण हा पामर। करा दीनाचा उद्धार।।१५।।

१११. सिद्धगुरूची साउली। फार शीतळ दिसून आली।।१।। कल्पवृक्षाहूनि थोर। छाया प्रभोची सुंदर।।२।। कल्पवृक्ष कल्पना निरसेना।

स्वामिकृपे कल्पना राहीना।।३।। काय परीस मोठा आणिला। तोही तुच्छ दिसूनि आला।।४।। करी लोहाचे सुवर्ण। करीना आपुले समान।।५।। भेद तेथे दिसून आला। प्रिय नसे तो साधूला।।६।। आपणासारिखे करिता। तोही साधुमान्य होता।।७।। तैसा नाही गुरू जाण। करितो आपुले समान।।८।। भ्रमजाळे निरसितो। स्वयं ब्रह्म तो करितो।।९।। बाह्य सुख आवडेना। चिन्मयमूर्ती सिद्धराणा ।।१०।। लक्ष्मणाचा दातार। सिद्धस्वामी सर्वेश्वर।।११।।

११२. सद्गुरू पलसिद्धा स्वामी विश्व अधिकारिया। दीनानाथा दीनबंधू अहो स्वामी गुरुवर्या।।१।। भवमोचका स्वामी भवनाशका विश्वरूपा। सकलकामा स्वामी सत्यस्वरूपा।।२।। प्रभो तुमचे स्वरूप त्रिपुटी वेगळे हो सर्वज्ञा। सकल कारण तुम्ही सद्गुरू ब्रह्म सनातना।।३।। लक्ष्मण म्हणे स्वामी माझा आदिरूप। सिद्धराव परब्रह्म सत्यस्वरूप।।४।।

११३. येई येई सिद्धदेवा। दीनबंधू कृपाळुवा।।१।। स्वामी शिवाचे अवतार। भक्तजनास्तव साकार।।२।। स्वामी माझा सिद्धेश्वर। अगम्य रे परात्पर ।।३।। लक्ष्मण म्हणे जना। भावे ध्यावा सिद्धराणा।।४।।

११४. येई येई सिद्धदेवा। ब्रह्मसनातना देवा।।१।। स्वामी माझा तो सर्वात्मा। स्वामी माझा हो परमात्मा।।२।। परपुरुषा गुरुराया। अलक्षपूर रे वासिया।।३।। लक्ष्मण म्हणे गुरुमूर्ती। सिद्धस्वामी कृपामूर्ती।।४।।

११५. सिद्ध निरंजन पाहा हो। सिद्ध निरंजन गावा हो।।१।। सिद्धराज आमुचा सखा। सिद्धराज पाठीराखा।।२।। सिद्धाबाई अनाथाचे माहेर। तीच उतरील पैलपार।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्धदेवा। दृष्टी भरूनि पाहावा।।४।।

११६. माझ्या सिद्धाचे पूजन। तुम्ही करा रे प्रीतीने।।१।। सिद्धाऐसा दयाळ। कोठे न मिळे स्नेहाळ।।२।। मंगल प्रभोचे पूजन। मंगल प्रभोचे स्तवन।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्धमाउली। ध्याऊ सर्वांची साउली।।४।।

११७. सिद्धराज पाहा नयनी। स्वामी गावा हो वदनी।।१।। स्वामी भवपाश हरिता। सिद्ध मोक्षाची सरिता।।२।। भावे पुजा तो दातार। हरती विघ्ने रे दुस्तर।।३।। लक्ष्मण म्हणे देव। सत्य पायी धरा भाव।।४।।

११८. जपा पलसिद्ध चार अक्षर। हरतील पापे रे दुस्तर।।१।। मंत्र हा

जपता बा वाचे। मनोरथ पुरतील तुमचे।।२।। सत्यस्वरूप सिद्धराव। परब्रह्म देवाधिदेव।।३।। लक्ष्मण स्वामीचा बंदा। धाव स्वानंदाच्या कंदा।।४।।

११९. वीरशैव धर्म रे स्थापका। शैव धर्म रे रक्षका।।१।। धाव धाव जितेंद्रिया। पाव पाव बा योगिया।।२।। सत्य सत्य तुझी वाणी। साधकासी दाविसी खाणी।।३।। लक्ष्मणाते दातार। पावला तो सर्वेश्वर ।।४।।

१२०. धावा हो निःसंगा। सिद्धराया हो सुसंगा।।१।। उदासीन सिद्धा स्वामी। सकलकामा पूर्ण स्वामी।।२।। साधूनिया योगकार्य। झालीसी तू स्वस्थ माय।।३।। या हो या हो सिद्धदेवा। लक्ष्मण विनवी देवा।।४।।

१२१. येई येई बा विरक्ता। सत्यकामा मायातीता।।१।। ब्रह्मनिष्ठा हो स्वतःसिद्धा। यावे यावे बा पलसिद्धा।।२।। सिद्धेश्वरा तुमची कीर्ती। काय वर्णू मी पापमती।।३।। तुम्ही पातकी उद्धरिले। लक्ष्मणा पावन केले।।४।।

१२२. येई येई सिद्धाबाई। प्रणवरूपिणी तू आई।।१।। भवाब्धीच्या तरणोपाया। वेगी या बा सिद्धराया।।२।। तुझे द्वारीचा कुतरा। नको मोकलू दातारा।।३।। लक्ष्मण झाला लंड। पायी घातली मुरकुंड।।४।।

१२३. यावे यावे सिद्धरामा। भक्तकामकल्पद्रुमा।।१।। सिद्धा या हो अजरामरा। स्वामिराया सर्वेश्वरा।।२।। षड्वैरी हे दुर्मती। यांनी गांजिले मजप्रती।।३।। लक्ष्मण म्हणे सर्वमान्या। वेगी धावा हो सर्वज्ञा।।४।।

१२४. तुझे पाय वंदू आता। सिद्धस्वामी पूर्णभरिता।।१।। निर्गुणस्वरूपा स्वामिराया। सत्यस्वरूपा गुरुराया।।२।। सिद्धेश्वर दयाघन। सिद्धेश्वर अनेक रूपी जाण।।३।। लक्ष्मण म्हणे सर्वठायी। सिद्धरूप आपुले देही।।४।।

१२५. यावे यावे सिद्धेश्वरा। गुरुराया परात्परा।।१।। बहू पापे मी आचरलो। नाना कर्मी सादर झालो।।२।। माझी बरवी न दिसे गती। कैसे करू कृपामूर्ती।।३।। लक्ष्मण स्वामीसी विनवी। वेगी यावे माझी आई।।४।।

१२६. सिद्धस्वामिया दातारा। सकलव्यापका सुंदरा।।१।। गुरुराया परात्परा। सकलरहिता ईश्वरा।।२।। माया अरण्याचे ठायी। गुंतलो मी मायबाई।।३।। लक्ष्मणा तुम्हाविण। कोण सोडवी येथून।।४।।

१२७. प्रभोस्वामी सकलकामा। प्रभोस्वामी आत्मारामा।।१।। झालो प्रभोरायाचा दास। आता न मानू काळास।।२।। भय माझे हो उडाले। चरण

तुमचे पाहिले।।३।। लक्ष्मण म्हणे बापा। सिद्धस्वामी मायबापा।।४।।

१२८. धन्य धन्य तुमची करणी। सिद्धराया मोक्षदानी।।१।। प्रातःकाली दर्शन होता। सकल ताप हरती ताता।।२।। माध्यान्ही होता दर्शन। सकल हरती बा विघ्न।।३।। सायंकाळी होता दर्शन। मनोरथ पुरवितो आपण।।४।। लक्ष्मण म्हणे सिद्धाबाई। दृष्टी भरूनि पाहावी।।५।।

१२९. अविद्येने हो तुम्हा केला गोवा। मायापूर हा कैसा उतरावा।।१।। आशा मनशा मगरा धावती। यांनी केली जळामाजी वस्ती।।२।। पूर्वभाग्ये गुरुनौका मिळाली। सकल भवपीडा निरसिली।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य गुरुमाय। तुजवाचूनि कदा न सापडे सोय।।४।।

१३०. गुरूते विचारी पाय त्याचे धरी। श्वानाचिये परी भ्रमू नको।।१।। नरकाचे प्रवाही वाहतोसी जाण। स्वहित भुलून गेलासी तू।।२।। आपुला विचार आपण पाहावा। चौऱ्यांशीचा गोवा तोडावा रे।।३।। नाशिवंताचा हा अभिमान काय। करी वेगी सोय भ्रमू नको।।४।। लक्ष्मण म्हणे गुरू दयामूर्ती। पाश रे तोडिती सत्य माना।।५।।

१३१. गुरू दयाळाने दाखविला देव। रिता काही ठाव दिसेना रे।।१।। पिंडामाजी देव नांदे कृपाळुव। देव अधिदेव नाम त्याचे।।२।। स्वरूप पाहून गेला अभिमान। होता अंगी शीण तोही गेला।।३।। आनंद तो थोर सुख तेचि फार। सद्‌गुरुमाहेरी सुख माझे।।४।। लक्ष्मण म्हणे लाज मज नाही। आनंदाचे डोही बुडालो हो।।५।।

१३२. गुरुदेवा मी हो दास म्हणवितो। गुण तुझे गातो तुझे कृपे।।१।। तूचि बोलविसी मीही कोणी नाही। तुजविण काही चालेना रे।।२।। आनंदाचे डोही बुडविले देवा। तुम्ही कृपाळुवा मायबापा।।३।। आता मीतूपणा उरलाचि नाही। तूचि सर्वाठायी दिसशी रे।।४।। लक्ष्मण म्हणे तूचि आदिअंती। तुजमाजी होती जाती सर्व।।५।।

१३३. मार्ग तो कठीण आहे बापा जाण। अरण्य दारुण झाडी मोठी।।१।। पर्वत हे मोठे मोठे त्या मार्गी रे। मार्ग चालेना रे श्रम थोर।।२।। मार्गामाजी नद्या आहेत त्या क्रूर। श्वापदेही फार फिरतात।।३।। तो मार्ग प्रभो गुरुदेव जाणे। फार आडराने हिंडतात।।४।। लक्ष्मण म्हणे गुरू कृपाघन। क्षणात

नेऊन भेटविती।।५।।

१३४. सद्‌गुरूने कृपा केली। संसारव्यथा गे गेली।।१।। धन्य गुरुदेव बाई। त्याच्या उपकारा पार नाही।।२।। अनंत जन्मांचे गे पाप। क्षणात गेला माझा ताप।।३।। आनंद झाला गे साजणी। देव पाहिला नयनी।।४।। देव मजमाजी दाविला। सर्वांप्रती अचंबा झाला।।५।। जिकडे तिकडे अवघा देव। दिसतो हो गुरुराव।।६।। गुरूने कल्याण हो केले। पूर्वपदी बैसविले।।७।। बाह्य सुख आवडेना। नाशिवंत न ये माझ्या मना।।८।। अपराधी लक्ष्मण। नम्र झाला सर्वांभूती जाण।।९।।

१३५. निजरूप नेणूनि मूढ प्राणी। भ्रमत हिंडती रानोरानी।।१।। सत्यस्वरूपा विसरले। पाषाणादी पुजू लागले।।२।। कल्पनेने घाला केला। देव सन्निध दुरावला।।३।। अनिवार माया माना। तिने मोठे मोहिले जाणा।।४।। सद्‌गुरूप्रती जा शरण। क्षणात माया निरसे जाण।।५।। देव देहात भेटेल। सकल भ्रांती निरसेल।।६।। गुरूवाचूनि देव भेटेना। जन्म येरझार तुटेना।।७।। लक्ष्मण विनवी सर्वांते। नाही दयावंत गुरूपरते।।८।।

१३६. गुरुदेवा तुम्ही मायेचिया पर। दीनाचे माहेर तुम्ही देवा।।१।। ब्रह्मांड व्यापूनि लिप्त तू नाहीसी। हृदयनिवासी तूचि नाथ।।२।। सूर्याअंगी किरण तेवी विश्व जाण। लिप्त तू निर्गुण नाहीसी रे।।३।। गृहकर्मा लिप्त दीप तो होईना। तेवी तू सर्वज्ञा निरामय।।४।। लक्ष्मण म्हणे सत्ता तुझी थोर। सकळ व्यापार सत्ते तुझ्या।।५।।

१३७. पलसिद्ध योगी सुखाचा सागर। तपाचा डोंगर स्वामी माझा।।१।। सिद्धयोग त्याला बरवा शोभला। स्वामी माझा धाला योगबळे।।२।। चंद्राचा प्रकाश दिव्य तो शोभे रे। ऐसा योग बा रे सिद्धाचा तो ।।३।। लक्ष्मण म्हणे स्वामी दयावंत। रक्षिले पतित फार त्यांनी।।४।।

१३८. सिद्धयोगिराव पाहा कृपाळुव। अरे प्रभोराव भवहरी।।१।। भवाचा तो अरी भक्तांचा कैवारी। काय त्याची थोरी वर्णू दीन।।२।। आपुले पद तो देतो भक्ताप्रती। सहाही दुर्मती फिरवितो।।३।। भाव तोही धरा स्मरा त्या दातारा। अनाथा पामरा रक्षितो रे।।४।। लक्ष्मण म्हणे सत्य हे वचन। अभक्तापासून दूर आहे।।५।।

१३९. पलसिद्धस्वामी सुखाचे सदन। भक्ताचे रक्षण करीतसे।।१।। सायुज्यपदी तो नेऊनि बैसवी। तोडी गाथागोवी सत्य माना।।२।। क्षणामाजी तो रे ब्रह्मरूप करी। सद्गुरुमाहेरी सुख फार।।३।। पाय ते धरा हो सुख ते भरा हो। स्वहित करा हो काळ आला।।४।। लक्ष्मण आहे स्वामीचा किंकर। केला अंगीकार दीनाचा रे।।५।।

१४०. पळसछायेसी बैसला रे नाथ। अनाथा सनाथ करीतसे।।१।। पद्मासन शोभे प्रभोरायाप्रती। साधकाते नीती सांगतसे।।२।। मायिक हा धंदा आवडेना त्याला। स्वरूपी रमला नाथ माझा।।३।। दर्शन होता मग काय भय। धरिले रे पाय बळकट।।४।। लक्ष्मण म्हणे माझे ते जीवन। पाय ते पावून सुखी झालो।।५।।

१४१. सिद्धराया पापी मी रे दुराचारी। पडलोसे द्वारी देवा तुझ्या।।१।। सर्वस्वी भरवसा पायाचा धरिला। तुजविण मजला कोण आहे।।२।। मागणे तुजला पायी मन ठेवी। गुण रे वदवी प्रेमयुक्त।।३।। आणिक रे नको काही दीनबंधू। हेचि कृपासिंधू दान द्या हो।।४।। लक्ष्मण म्हणे नको धनद्रव्य। अक्षयी वसावे पायी तुझ्या।।५।।

१४२. प्रभोराया तू रे कृपेचे भांडार। तपाचा सागर तूचि देवा।।१।। मार्ग तू स्थापिसी पावन करिसी। सुख फार देशी भक्ताप्रती।।२।। भक्ती हा पदार्थ आवडे तुजला। भक्त रे जनाला साह्य होशी।।३।। गर्वाने डुल्लती तेथे तू नाहीसी। गर्वाचा तुम्हासी त्रास देवा।।४।। लक्ष्मण म्हणे जातिकूळ काही। न पाहसी आई भक्ती प्रिय।।५।।

१४३. गुरूविना काही सोय सापडेना। सद्गुरू तो राणा देव दावी।।१।। चिन्मयस्वरूप दावितो दातार। कृपेचा सागर गुरुदेव।।२।। भ्रमकूपातून काढितो दयाळ। करी रे मंगल गुरुनाम।।३।। त्रैलोक्याचा नाथ देहामध्ये आहे। गुरुकृपे पाहे सुखरूप।।४।। लक्ष्मण म्हणे गुरूते शरण। व्हा हो प्रेमेकरून दयाळू तो।।५।।

१४४. नयनी दिसतो गुरू तो समर्थ। योगियाचा नाथ पाहा वेगी।।१।। ज्ञानदृष्टीविण कदा तो दिसेना। गड्या गुरूविना ज्ञान नोहे।।२।। लक्ष लावी पायी गुरूते विचारी। देव वश करी गुरुकृपे।।३।। क्षणामाजी प्रभो दाविती

निधान। ऐसा आहे कोण दुजा सांग।।४।। लक्ष्मण दीन लोळे चरणावरी। सद्गुरुमाहेरी सुख फार।।५।।

१४५. गुरुरायाविण आप्त मज नाही। त्रिभुवन गोसावी दावी नाथ।।१।। मायबाप जन्मोजन्मी रे आहेत। सद्गुरू तो नाथ भेटेना रे।।२।। अनंत जन्मांचा शीण रे हरिला। प्रपंच हा केला परमार्थ रे।।३।। पिंडी ब्रह्मांडी हा देव रे व्यापला। रिते काही मजला दिसेना रे।।४।। लक्ष्मण म्हणे गुरुकृपेविण। कळेना ती खूण सत्य माना।।५।।

१४६. गुरुदेवाचे रे पाय बा धरावे। त्याहा विचारावे धर्माधर्म।।१।। सद्गुरुराव ते भ्रांती निरसिती। मन हे करिती स्वस्थ बापा।।२।। मन वश होता कार्य रे होईल। साकडे तुटेल जन्माचे रे।।३।। आळस हा नका करू या कार्याला। बा रे पुढे घाला मोठा आहे।।४।। लक्ष्मण म्हणे वचन मानी रे। कार्य हे करी रे हित फार।।५।।

१४७. सद्गुरुचरणी मन वसवावे। प्रेमयुक्त गावे गुण बापा।।१।। सद्गुरू दयाळ कृपा रे करिती। थोर अहंकृती हटविती।।२।। देहामाजी देव दिसे कृपाघन। चराचरी जाण देव दिसे।।३।। सद्गुरूवाचूनि कार्य रे होईना। नमो त्या सर्वज्ञा प्रेमयुक्त।।४।। लक्ष्मण म्हणे सद्गुरू रे माय। दाखवी उपाय सत्य मान।।५।।

१४८. कोण मी कोठून का हो जन्म झाला। वर्म त्या गुरूला पुसावे हो।।१।। अजन्मा असून जन्म काय म्हणून। हेही विचारून घेई बापा।।२।। निःसंग असूनि संग का तुजला। हेही सद्गुरूला पुसावे हो।।३।। सद्गुरू दयाळ कृपा ते करिती। तुझी तुजप्रती ओळखी होय।।४।। लक्ष्मण म्हणे तुजपाशी देव। नांदे कृपाळुव देही तुझ्या।।५।।

१४९. ब्रह्म ऐसे असूनि विसर पडला। कोण मी जीवाला कळेना हो।।१।। माझी जाया माझे पुत्र आणि धन। नाना योनी जाण हेचि गुणे।।२।। अविद्येचा घाला पडला रे क्रूर। दुःखाचा डोंगर भवताली।।३।। नानापरी दुःख नानापरी ताप। प्रभो विश्वरूप अंतरला।।४।। लक्ष्मण म्हणे पाहा विचारून। पूर्व अधिष्ठान पाहा वेगी।।५।।

१५०. गुरुराया तुझा उपकार फार। भ्रम हा गिरिवर निर्दाळिला।।१।।

परमपुरुष दाविला हो डोळा। आनंद हो झाला गुरुकृपे।।२।। सुख ते हो फार जाणती चतुर। सुख निरंतर घेती ते हो।।३।। मायिक सुख हे व्यर्थ दिसे जाण। दाविले निधान तुम्ही नाथा।।४।। लक्ष्मण म्हणे गुरुदेवाप्रती। काय मंदमती स्तवू तुम्हा।।५।।

१५१. गुरुकृपा होता भ्रम हा राहिना। ब्रह्मांडाचा राणा दिसे बाप।।१।। मीतूपणाचा रे अभाव तो होय। सुगम उपाय त्याहापाशी।।२।। सकल जग हे ब्रह्मरूप दिसे। अज्ञान निरसे क्षणामाजी।।३।। अंतर्बाह्य आहे सर्वठायी देव। पाहा कृपाळुव गुरुकृपे।।४।। लक्ष्मण म्हणे ज्ञानदृष्टीविना। कदा तो दिसेना देवराव ।।५।।

१५२. हृदयी असूनि देव तो दिसेना। पुसतसे जना देव कोठे।।१।। गर्भांधा सूर्य कदा तो दिसेना। गर्वे पाहताना देव दूर।।२।। स्तनी तो गोचीड दुग्ध रे कळेना। अज्ञाने तो राणा दिसेना रे।।३।। सद्गुरुकृपे तो दिसे हो दयाळ। वेगी तो स्नेहाळ वश करा।।४।। लक्ष्मण म्हणे सद्गुरु दातार। जगी जगदीश्वर वसतसे।।५।।

१५३. सद्गुरुरायाचे पायी मन वसो। त्याहाचा विसर मज कदाही नसो।।१।। धन्य तो सद्गुरू धन्य तो सद्गुरू। क्षणामाजी सहाजणांचा केला संहारू।।२।। सकळ दळवाडे हटविले त्यांनी। दाविले मजमाजी स्वरूप साजणी।।३।। धन्य त्यांची करणी धन्य गुरुराव। सायुज्यसदनी त्यांनी दिधला ठाव।।४।। लक्ष्मण म्हणे त्या हो गुरुरायासी। कैसा विसंबू मी तो हृदयनिवासी।।५।।

१५४. सद्गुरूप्रती शरण वेगी जावे। त्याहाचे हो दास्य विवेके करावे।।१।। भेदबुद्धी बापा सकल सोडून द्यावी हो। सद्गुरूवाक्ये आपणा परतूनि पाही हो।।२।। देव सच्चिदानंद तुझा तूचि हो। अक्षयी स्वरूप पाहा रे तुम्ही हो।।३।। देव तुजविण नसे रे बा दुजा। परमात्मा तुम्ही अक्षयी रे पूजा।।४।। बाह्य पूजेचे नसे मग कारण। अक्षयी स्वरूपी व्हावे हो निमग्न।।५।। लक्ष्मण हीनदीन सर्वा विनवी। व्हा हो लीन सदा सद्गुरुपायी।।६।।

१५५. राग मानावा कोणाचा। आत्मा एकचि सर्वांचा।।१।। दाताखाली जीभ पडली। कोणे बत्तीसी पाडिली।।२।। हात डोळ्यांसी लागला। कोणे

हात हो तोडिला।।३।। जिकडे तिकडे गुरुराव। दिसे तो हो देवराव।।४।। सद्गुरूवाचून रिते काही। आम्हाप्रती दिसत नाही।।५।। लक्ष्मण विनवी गुरूप्रती। सर्वाठायी तुम्ही केली वस्ती।।६।।

१५६. सद्गुरूने कृपा आम्हावरी केली। अविद्या माया ही माघारी फिरविली।।१।। अविद्येचे बंधन तोडिले गुरूंनी। परमात्मा तो मज दाविला नयनी।।२।। अंतरी दिसे बाहेरही तो भासे। जळी स्थळी काष्ठी परमात्मा तोचि दिसे।।३।। लक्ष्मण म्हणे नमू त्या गुरुनाथा। भवबाधा त्यांनी हरविली सकल व्यथा।।४।।

१५७. सद्गुरुकृपा बापा आधी संपादावी। प्रसन्न झालिया त्याते देती आपुली पदवी।।१।। सद्गुरुवाक्य ज्याने हृदयी धरिले। त्यांनीच दिधले जन्ममरणा बिंदुले।।२।। सद्गुरुवाक्य तेचि वेदान्ताचे सार। जपतप साधनांचे गुरूचि माहेर।।३।। सद्गुरूंनी जो आपुला सूक्ष्ममार्ग दाविला। तो मार्ग टाकूनि भ्रमू नये बाह्य साधनाला।।४।। लक्ष्मण म्हणे सूक्ष्ममार्ग थोर। ब्रह्मादिक जपती मंत्र निरंतर।।५।।

१५८. सद्गुरुवाक्ये आपुला निजलाभ जोडिला। देही असूनिया विदेही तो झाला।।१।। धन्य तो योगी धन्य तोचि योगी। मीपणा नाही तेचि सुख भोगी।।२।। मीपणा टाकी तोचि योगी जाणा। मग स्वस्थ दिसे तोचि योगिराणा।।३।। ज्ञाता ज्ञान नाही जिथे त्रिपुटीत्रय। तेथेचि चिन्मय होऊनि जाय।।४।। लक्ष्मण म्हणे तो योगी स्वरूपी मिळाला। दृश्य द्रष्टेपणा त्याचा सकलही आटला।।५।।

१५९. सद्गुरूचे आम्ही म्हणवितो दीन। तोचि आमुचा सखा सोयरा सजण।।१।। त्याहाचे कृपेने मीपणाही गेला। सर्वठायी परमात्मा दिसे हो मजला।।२।। त्याहाच्या उपकारा काही पारचि नाही। एकमुखे करूनि काय स्तवू त्याला बाई।।३।। लक्ष्मण विनवी गुरुमायेप्रती। तव पायाचाचि आधार मजप्रती।।४।।

१६०. धन्य तो सद्गुरुराव विश्वाचे माहेर। दीन तारावया त्याने घेतला अवतार।।१।। पूर्वपुण्येकरूनि माझी भेटी झाली। पापतापदैन्य त्यांनी निरसिली।।२।। धन्य आजचा दिन धन्य आजचा दिन। भेटले निधान

सद्गुरू पूर्ण।।३।। मीतूपणा उरी नसे की गे बाई आता। आत्मा दिसे सर्वाठायी उडाली अहंता।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य तो सद्गुरू। सकल हटविला त्यांनी अविद्या परिवारू।।५।।

१६१. सद्गुरूचे पूजन प्रीतीने करावे। अक्षयी त्याहाचे पायी लक्ष लावावे।।१।। संतांचा समागम अक्षयी हो करावा। बापा नित्यानित्यविवेक करीत रे जावा।।२।। काम क्रोध मद मत्सर दुष्ट हे आकळावे। मग सुखरूप परमात्मयासी पाहावे।।३।। लक्ष्मण होता रे पापरूपी दुर्जन। सद्गुरुकृपेकरूनि झाला हो पावन।।४।।

१६२. सद्गुरूचे केलेले कदाही मोडू नये। सद्गुरूचे पाय कदाही विसरू नये।।१।। भगवद्भक्ताचा अपमान न करावा। ज्ञातेपणाचा गर्व कधीही न मानावा।।२।। विवेके करूनि सदा बापा लीन रे असावे। जगाचे अपवाद विवेके साहावे।।३।। ऐसी वृत्ती धरिसी तरीच परमात्मा भेटेल। जन्ममरणादिक येरझार तुटेल।।४।। लक्ष्मण विनवी सकळ जगाप्रती। साधुसंत मंडळीने वर्तावे हो याचि रीती।।५।।

१६३. वंदू सद्गुरूची पाउले। समाधिशेजेवरी गे मी निजले।।१।। तेथे मजप्रती ऐसे दिसले। माझे मजमाजीच स्वरूप भेटले।।२।। होता प्रभूची भेटी गे। सुखरूप मी झाले की गे।।३।। ते सुख सांगवेना बाई गे। बोलता मिठी पडे बाई गे।।४।। बाह्य सुख मज आता बाई। आवडेना गे करू काई।।५।। अक्षयी रमले गे प्रभुपायी। घरधंदा न सुचे काही।।६।। धन्य धन्य ती गे गुरुमाय। तिनेच केला गे उपाय।।७।। केली गे तिने माझी सोय। लक्ष्मण की अन्यायी ये।।८।।

१६४. वैद्य मिळाला परीक्षावान। रोग हट्विला दारुण।।१।। ज्वर होता अंगी भारी। वैद्य मिळाला पंचाक्षरी।।२।। भवबाधा उडविली। काया आरोग्य ही केली।।३।। आता मजला भय नाही। भवबाधा करील काई।।४।। लक्ष्मणा सद्गुरू भेटले। म्हणूनि त्याचे भय उडाले।।५।।

१६५. रूप देखिले नयनी। झाली मीतूपणा हानी।।१।। सहा पाच चार तीन। सुखे झाले हो प्रवीण।।२।। सर्व परिवारा सुख हो। झाले मुखे वदवेना हो।।३।। गुरुमायने दाविले। क्षणामाजी कार्य झाले।।४।। त्याचा उपकार

थोर। निरसे तम अंधःकार।।५।। लक्ष्मण म्हणे। त्याते शरण व्हावे एकचित्ते।।६।।

गुरुकृपा

१६६. देव दूर नाही जवळचि आहे। गुरुकृपे पाहे परमात्मा तो ।।१।। मीपणा टाकूनिया सुखरूप पाहे। तुजमाजी आहे देवराव।।२।। कामक्रोध हे रे घालक दुर्जन। याहाचे स्वाधीन वर्तू नको।।३।। गुरुकृपा होता मीपणा न राहे। साधन हे आहे स्वल्प जाण।।४।। लक्ष्मण म्हणे गुरू कृपाघन। करिती समाधान आपुले रे।।५।।

१६७. आत्मशुद्धीविना गर्व हा जाईना। मीपणा राहिना गुरुकृपे।।१।। वाच्यांश ज्ञान हे काय कार्य करी। अनुभवाघरी जावे बापा।।२।। अनुभवजन्य ज्ञान तेचि ज्ञान। वाचाळपणा रे फार करिती।।३।। पायसामाजी रे पळी फिरविली। नाही रे कळाली गोडी तीते।।४।। पशूवरी गोणी साखरेची नेली। काय रे कळाली गोडी त्याते।।५।। ताजव्याने बापा कस्तुरी मोजिली। परीक्षा रे केली काय त्याने।।६।। वाचाळपणे रे सुख ते दिसेना। सद्गुरुचरणा लाग वेगी।।७।। नैराश्यता जेव्हा बाणेल शरीरी। तेव्हा मदनारी भेटेल रे।।८।। लक्ष्मण म्हणे निगर्वी होऊन। परेशाचे पाय धरा वेगी।।९।।

१६८. गर्वे फुंजता हो देव सापडेना। सद्गुरुचरणा लागा वेगी।।१।। मीपणा जाईल तेव्हा तो दिसेल। प्रभो तो दिसेल सत्य माना।।२।। सहाही दुर्मती स्वाधीन होतील। देवचि हो व्हाल स्वये तुम्ही।।३।। भस्मामाजी जेवी लोपे हुताशन। अविद्या आवरण तेवी आहे।।४।। लक्ष्मण म्हणे गुरुकृपेकरून। परिवार जाण हटेल हा।।५।।

१६९. देवराव वश करा तो दयाळ। ब्रह्मांडाचा पाळ देही आहे।।१।। त्यावाचूनि रिते काही हो दिसेना। व्यापका निर्गुणा स्मरा वेगी।।२।। कामक्रोध आदी क्रूर हे आवरा। सुखे विश्वंभरा पाहा मग।।३।। अभ्र फिरूनिया सूर्य तो झाके रे। अविद्या-परिवारे तेवी केले।।४।। लक्ष्मण म्हणे गुरूते विचारा। का हो येरझारा व्यर्थ करिता।।५।।

१७०. गुरुदेवे कृपा जयावरी केली। कल्पना निमाली क्षणामाजी।।१।। मग त्याते भवबाधा काय करी। सद्गुरुमाहेरी सुखी तो रे।।२।। काळाचा

विचार चालेना त्यापुढे। यमदूत रडे यमापाशी।।३।। जन्ममरणाचा गुंता नसे जया। प्रभोचिया पाया लागला तो।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य गुरुराव। पुजा कृपाळुव प्रेमयुक्त।।५।।

१७१. तुझा तूचि देव आहेसी गड्या रे। कल्पनेने बा रे केला शीण।।१।। श्रेष्ठ तो ब्राह्मण पिशाच्च होऊन। म्हणे मी रे हीन अतिशूद्र।।२।। तेवी अविद्येने तुजला रे केले। कल्पनेने आले जीवपण।।३।। निःसंग असूनि संग रे तुजला। विसर पडला संगतीने।।४।। सद्‌गुरूप्रती तू शरण रे जाय। मग तुज सोय सापडेल।।५।। पिशाच्च ब्राह्मणा वैद्य तो भेटला। भ्रम त्याचा गेला म्हणे मी विप्र।।६।। तेवी तुजला रे बाणेल बा खूण। ब्रह्म तू होऊन सुखी होशी।।७।। लक्ष्मण म्हणे गुरू मोक्षदाता। भवाचा तो हर्ता मायबाप।।८।।

१७२. सद्‌गुरूने दया केली। अज्ञानभ्रांती निरसिली।।१।। मी बुडत होतो समुद्री जाण। जलचर भक्षीतसे सत्य मान।।२।। मोठमोठे मगर विस्तीर्ण। जळी रहिवास अक्षयी जाण।।३।। तेथे सद्‌गुरू आले धावूनि। क्षणात पलीकडे नेले त्यांनी।।४।। माझे ठेवणे झाले होते अप्राप्त। सद्‌गुरुकृपे झाले प्राप्त।।५।। ज्ञानांजन नेत्री घालूनि। ठेवणे दाविले मजलागूनि।।६।। आनंदभरित केले माय। त्याते कैसी विसरू माय।।७।। लक्ष्मण दीन गुरुपायी। झाला लीन स्वामिपायी।।८।।

१७३. मुक्याने साखर खादली गे जाणा। त्याची गोडी कदाही सांगवेना।।१।। त्याते दाविता नये सांगताही नये। स्वानुभवाविण कळेना ती सोय।।२।। सद्‌गुरुकृपा हो जयासी लाभली। त्यांनीच स्वानुभवगोडी घेतली।।३।। गुरुकृपे गोडी कळली लक्ष्मणा। मुळीची गोडी आहे ती भोगिजे खुणा।।४।।

१७४. शिव बहुता युगीचा। शिव आत्मा रे सर्वांचा।।१।। गुरुकृपे तोचि पाहा। निवांत तेथेचि हो राहा।।२।। साधन स्वल्प हे आहे रे। गुरूप्रती विचारी रे ।।३।। लक्ष्मण म्हणे बा रे। वेगी सावध होई रे।।४।।

श्री सिद्धेश्वराचे (श्री सद्‌गुरू पलसिद्धांचे) अभंग

१७५. सिद्धराया या हो वेगी देवराया। पाय हो दाखवा मज दीना।।१।। भ्रम वेगी हरा कृपेच्या सागरा। अनादी सोयरा तूचि देवा।।२।। पायाविण देवा गमेना मजला। या वेगी दयाळा कृपासिंधू।।३।। कृपाळू असूनि का हो

क्रूर मनी। सोडविता धनी तूचि देवा।।४।। लक्ष्मणा दीना कोण सोडवील। सिद्धा या सर्वज्ञा पाय दावा।।५।।

१७६. सिद्ध तुझे नाम भव तू नाशक। पलामाजी कार्य करिसी देवा।।१।। फार त्वा रक्षिले हीनदीन देवा। करिसी कल्याण साधकाचे।।२।। कृपेचा सागर तुजला म्हणती। अगम्य रे कीर्ती गुरुदेवा।।३।। सोडवा मजला फार कष्टी झालो। शरण रे आलो कृपा करी।।४।। लक्ष्मण म्हणे वेगी सोडवा हो। आपुले म्हणा हो गुरुदेवा।।५।।

१७७. सिद्धराया तूचि जननी जनिता। आप्त गोत्र ताता तूचि माझे।।१।। राज्य वैभव माझे तूचि गुरुदेवा। विद्या गुण देवा तूचि सर्व।।२।। सिद्धराव माझे हृदयनिवासी। विसंबेना त्यासी प्राण माझा।।३।। गुरुदेवा तुझे गुण रे अपार। मायेचिया पर आहा तुम्ही।।४।। लक्ष्मण म्हणे तूचि सर्वकर्ता। वंद्य तू कृतांता गुरुदेवा।।५।।

१७८. अविद्या कौटाळीण गांजिते मजला। वेगी या दयाळा सद्गुरुनाथा ।।१।। अनिवार हिचा पाश रे सर्वज्ञा। काही रे सुचेना सिद्धराया।।२।। कामाजी क्रोधाजी हिचे रे कुमर। पीडिले रे फार यांनी मज।।३।। मनाजी हा बंड जाहलासे लंड। ठेचा याचे तोंड गुरुदेवा।।४।। लक्ष्मण म्हणे तुज रे वाचून। त्राता असे कोण प्रभोराया।।५।।

१७९. सिद्धराया तूचि कैवारी आमुचा। अनाथ दीनाचा कैवारी तू ।।१।। भक्तकार्यास्तव सगुण झालासी। भरवसा आम्हासी तुमचाचि।।२।। भक्तीचे व्यसन आहे तुम्हाप्रती। धावा कृपामूर्ती योगिराया।।३।। भक्तामाजी गणना नसे माझी जाण। अपवित्र हीन पातकी मी।।४।। शरण मी आलो दोष पाहू नका। भक्त रे पालका देवराया।।५।। लक्ष्मण म्हणे कृपेच्या सागरा। रक्षावे पामराप्रती देवा।।६।।

१८०. पलसिद्ध माते कृपेचे सरिते। सोडवी दीनाते येई त्वरे।।१।। कृपेचा गे पान्हा पाजी मज दीना। येऊ दे करुणा मायबाई।।२।। दयेचा सुमद्र तूचि सिद्धाबाई। निरुपम आई आहेसी तू।।३।। मातेची उपमा तुजला साजेना। येथे मायिकपणा साजेना हो।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य सिद्धाबाई। भवव्यथा चुकवी सिद्धदेवा।।५।।

१८१. सिद्धाचे स्मरणे पाप हे उरेना। का हो त्याते ध्या ना भ्रम का हो।।१।। पूजन करिता पाप निरसे रे। पावन करी रे हीनादीना।।२।। कामिका देतसे पुत्र धन द्रव्य। प्रेमे हो करावे भजन त्याचे।।३।। निष्काम भक्ताते मोक्ष देतो देव। ऐसा सिद्धराव दयाघन।।४।। लक्ष्मणाप्रती स्वामी रे पावला। दीनाचा रे केला परामर्श।।५।।

१८२. सिद्ध परब्रह्म माझा रे सोयरा। कृपेच्या सागरा विसंबेना।।१।। माया निरसून दाविली रे सोय। प्रभोचे रे पाय विसरू कैसा।।२।। त्याच्या उपकारा अंतचि रे नाही। कैसा मी उतराई होऊ बापा।।३।। अनंत जन्मांचा शीणचि हरिला। त्या गुरुदेवाला काय द्यावे।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य सिद्धराव। भक्तापाशी देव वसे सदा।।५।।

१८३. सिद्धराया तुझा पार रे लागेना। ब्रह्म सनातना गुरुदेवा।।१।। मनबुद्धीप्रती तू रे अगोचर। मायेचिया पर सिद्धराव।।२।। हृदयनिवासी सर्वा चेष्टविसी। अलिप्त आहेसी दीपा जैसा।।३।। आत्मा तो अलिप्त प्रभू साक्षिभूत। सद्‌गुरू निवांत पद तुझे।।४।। लक्ष्मणाप्रती तूचि बोलविसी। सर्वाठायी दिससी गुरुदेवा।।५।।

१८४. सिद्धराव माझे जीवीचे जीवन। ब्रह्म सनातन स्वामी माझा।।१।। योगी तो निवांत उदासीन सिद्ध। पाहा ब्रह्मानंद सिद्धराव।।२।। माया निरसूनि स्वतःसिद्ध झाला। स्वरूपी रमला नाथ माझा।।३।। ब्रह्मांड हे राज्य तृणप्राय ज्यासी। संतुष्ट मानसी स्वामी माझा।।४।। लक्ष्मण म्हणे त्याची कृपा होता। हरे भवव्यथा क्षणामाजी।।५।।

१८५. सिद्ध स्तवा वाचे पावन तो करी। भक्ताचा कैवारी स्वामी माझा।।१।। भक्तकार्यास्तव सगुण तो झाला। मार्ग हा स्थापिला वीरशैव।।२।। फार कार्य केले भक्त हो रक्षिले। मार्गाते लाविले जग सर्व।।३।। ऐसा प्रभोस्वामी कृपेचा सागर। दीनाचा उद्धार केला त्यांनी।।४।। लक्ष्मण म्हणे स्वामी परात्पर। भक्ताचे माहेर गुरुदेव।।५।।

१८६. सिद्ध म्या देखिला भस्म अंगी ल्याला। अलंकार त्याला शोभती रे।।१।। मणिमय पादुका पायी विराजती। रविवत् कांती जटाभार।।२।। रुद्राक्षाच्या माळा शोभती रे गळा। काषाय वस्त्रे त्याला शोभती रे।।३।।

भरजरी पीतांबर शोभे प्रभूप्रती। भक्तावरी प्रीती प्रभूची रे।।४।। कर्णी कुंडले हो चंद्रवत् कांती। पाहता ती मूर्ती भव हरे।।५।। लक्ष्मण म्हणे स्वामी कृपाघन। करी रे कल्याण स्वामी माझा।।६।।

१८७. देव दयावंत आहे रे दातार। पापाचा संहार करी नाथ।।१।। त्याचे नामस्मरण करा निरंतर। तेणे परमेश्वरा समाधान।।२।। पापी कुश्चळ रे शिवे उद्धरिले। स्मरा रे पाउले परमात्म्याची।।३।। कार्य वेगी साधा पाहा रे विचार। का हो येरझार चुकवा ना।।४।। लक्ष्मण म्हणे सांब माझा भोळा। भक्ताने जिंकिला भक्तिबळे।।५।।

१८८. सिद्ध माझे मायबाप। सिद्ध माझे आत्मरूप।।१।। सिद्ध माझा हृदयनिवासी। कैसा विसंबू स्वामीसी।।२।। स्वामी माझा आप्त सोयरा। तोचि नेई पैलपारा।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्धराया। धावा पावा स्वामिराया।।४।।

१८९. सिद्धाबाई धावे अती कनवाळे। सुरस मराळे अती स्नेहाळे ।।१।। वेगी धावे वेगी धावे माझे आई। मायबहिणी गे आई सिद्धाबाई।।२।। सिद्धाबाई भक्तजनाते रक्षिसी। दीना अनाथाते पाळिसी गे।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्ध माझी आई। संकटी धावतसे लवलाही।।४।।

१९०. सिद्धाबाई सौख्याची गे सरिता। पुण्यनौका तरलो भव आता।।१।। सिद्धाबाई पुण्याचा गे सागर। मोक्षाचे आगर सिद्धाबाई ।।२।। सिद्धाबाईवाचून गे मज काही। दुजा पदार्थ गे आवडत नाही।।३।। जिकडे तिकडे दिसे सिद्धाबाई। लक्ष्मण लागे अक्षयी पायी।।४।।

१९१. सद्गुरू सिद्धराया तुम्ही दीनांचे हो नाथ। अभाग्या अनाथा तुम्ही करिता सनाथ।।१।। बहु पातकी उद्धरिले सिद्धा तुम्ही दातारा। अन्यायी अपराधी शरण आलो ईश्वरा।।२।। लौकिकाची लाज मजला आता नसे काही। निःसंग होऊनि शरण रिघालो तव पायी।।३।। लक्ष्मण म्हणे मायबहिणी सिद्धाबाई। तुजविण गमेना धाव पाव वेगी आई।।४।।

लिंग

१९२. हृदयी हे लिंग येथे भाव ठेवा। जन्म मृत्यू गोवा चुकेल रे।।१।। त्याते विसरूनि बाह्यकर्म बा रे। कष्टरूप सारे करा शोध।।२।। इष्टलिंगाऐसे निधान विसरून। फिरता वनोवन कर्मसूत्रे।।३।। त्याते जाणूनिया सर्वही करा

रे। भवबाधा बा रे आतळेना।।४।। लक्ष्मण म्हणे करा हो पूजन। प्रभोने पावन केले फार।।५।।

१९३. लिंगपूजनाचा महिमा हो थोर। पूर्वी फार शूर झाले प्राणी।।१।। हरीने पूजिले लिंग वंद्य शिरी। ब्रह्मदेव करी लिंगार्चन।।२।। अठ्ठ्यांशी सहस्र मुनी लिंगध्यानी। लिंग दिक्पाळांनी पूजिले हो।।३।। शिवयोगी ज्ञाते पूजिती लिंगाते। लिंग अनादि ते आहे श्रेष्ठ।।४।। लिंगामाजी वास आहे सर्वत्राचा। अगम्य लिंगाचा महिमा श्रेष्ठ।।५।। लक्ष्मण म्हणे इष्टलिंग ध्या हो। भव हा तरा हो दुःख मोठे।।६।।

१९४. लिंगमहिमा श्रेष्ठ वेद हो वर्णिती। लिंग सर्वाप्रती अगोचर।।१।। अनंत ब्रह्मांडे माया हा पसारा। लिंगामध्ये सारा होय जाय।।२।। ब्रह्मा विष्णु इंद्र दिक्पाळ सुरनर। लिंग प्रेमभरे पूजिती हो।।३।। लिंगमहिमा श्रेष्ठ व्यासांनी वर्णिला। लिंग सर्वत्राला वंद्य आहे।।४।। लिंगपुराणी हो महिमा अद्भुत। पूर्वी शिवभक्त फार झाले।।५।। लक्ष्मण म्हणे लिंग वेगी ध्या हो। ताप हा नुरे हो महिमा श्रेष्ठ।।६।।

१९५. लिंग आमुचे जीवन। लिंग ब्रह्म सनातन।।१।। लिंग आधार सर्वांसी। ब्रह्मा विष्णू त्या रुद्रासी।।२।। लिंगध्यानी सदोदित। स्वानुभवे हो निवांत।।३।। लिंग अगोचर सर्वा। सुरा नरा त्या मानवा।।४।। लक्ष्मण म्हणे लिंग। सदासर्वदा अभंग।।५।।

१९६. लिंग आमुचे हो धन। प्रेमे करितो पूजन।।१।। हृदयी वसे ते निर्मळ। लिंग सर्वदा अचल।।२।। सबाह्य लिंगाचा प्रकाश। लिंग अक्षयी अविनाश।।३।। लिंग स्वानंदजीवन। ब्रह्म सत्य परिपूर्ण।।४।। अलक्ष लिंग मायातीत। इष्टलिंग ते निवांत।।५।। लक्ष्मण दीन बा रे। ब्रह्मादिक स्तविती त्या रे।।६।।

१९७. लिंग स्थूळ सर्वाहून। अनंत ब्रह्मांडांवरून।।१।। अनंत ब्रह्मांडे ती थोर। होती जाती लिंगी फार।।२।। अंतर्बाह्य सर्वकाळ। लिंग अक्षयी अचळ।।३।। सूक्ष्म अणुरेणूहून। योगी ध्याती त्याकारण।।४।। स्थूळसूक्ष्मव्यक्तिरहित। लिंग शोभे सदोदित।।५।। लिंगाप्रती पाहू गेले। नाही पुन्हा परतले।।६।। लक्ष्मण म्हणे श्रुती। लिंग अक्षयी स्तविती।।७।।

१९८. लिंग स्वानंदाची खाणी। लिंग ब्रह्मांड भरूनि।।१।। लिंग प्राणाते चेष्टवी। लिंग वाचेते बोलवी।।२।। अंतःकरणपंचकाते। लिंग आधार सर्वाते।।३।। तत्त्व इंद्रियांते बा रे। लिंग प्रसवले ते रे।।४।। अष्टधेचा हा प्रकार। लिंग प्रकृतीच्या पर।।५।। अलिप्त सर्वाप्रती बा रे। सत्ता प्रभोची श्रेष्ठ रे।।६।। लक्ष्मण म्हणे लिंग। सदासर्वदा निःसंग।।७।।

१९९. अनंत ब्रह्मांड पसारा। लिंग-इच्छेचा हो सारा।।१।। लिंग-इच्छे मायागुण। मायालाघव दारुण।।२।। अनंत ब्रह्मांडे दाखवी। क्षणी माया ती लपवी।।३।। लिंगसत्ता त्या मायेते। लिंग अगोचर तीते।।४।। लक्ष्मण म्हणे लिंग। स्मरा करी भवभंग।।५।।

२००. लिंग अद्वय एकले। दृश्यातीत ते संचले।।१।। नादध्वनीकलातीत। लिंग सर्वदा निवांत।।२।। मनबुद्ध्या अगोचर। चहू वाचेचिया पर।।३।। वेदान्ताचे निजधन। लिंग वसे परिपूर्ण।।४।। आकाशाचे आवरण। आकाश सर्वत्रा कारण।।५।। लिंगी आकाश लोपले। लिंग अक्षयी शोभले।।६।। लक्ष्मण म्हणे. धनी। लिंग सर्वांची जननी।।७।।

२०१. लिंग पाताळी भूतळी। लिंग वसे सर्वस्थळी।।१।। एकवीस स्वर्गावरी। लिंग शोभे नानापरी।।२।। खगोल भूगोल आवरण। असे लिंगाचे ते पूर्ण।।३।। तेचि आमुचे हृदयी। आम्हा दीनांते बोलवी।।४।। लक्ष्मण हीन दीन। गेला लिंगाते शरण।।५।।

२०२. लिंगा नाही आदि अंत। स्वयंधोंड सदोदित।।१।। अहो समुद्र त्यावरी। होती जाती त्या लहरी।।२।। तेवी ठसा हा दृश्याचा। दृश्य भास हा मायेचा।।३।। माया लहरी हो परी। निश्चळ वस्तू सबराभरी।।४।। लक्ष्मण म्हणे लिंग। देव भक्त ज्योतिर्लिंग।।५।।

२०३. सूर्याअंगी जेवी किरण। तेवी लिंगी मायागुण।।१।। दीप आणि जेवी ज्योती। तेवी लिंगी मायाज्योती।।२।। वृत्तिनिवृत्तीच्या पर। लिंग अक्षयी अचर।।३।। क्षरले हे मायागुणे। स्वयंप्रकाश ते पूर्ण।।४।। लक्ष्मणाते बोलवी। तेचि वसे सर्वठायी।।५।।

२०४. लिंगामध्ये जग सर्व। तिन्ही लोक सर्व देव।।१।। लिंगापरते हो काही। रिते स्थळ काही नाही।।२।। लिंगामध्ये चराचर। सर्व माया

ओडंबर।।३।। लिंग सच्चिदानंदघन। सकळ विश्वाचे जीवन।।४।। लक्ष्मण म्हणे नित्य। शुद्ध बुद्ध ते निवांत।।५।।

२०५. पृथ्वी शाळुंका सगुण। मेरू पिंड शोभे पूर्ण।।१।। अवकाशरूप लिंग। परात्पर ब्रह्मलिंग।।२।। नक्षत्रमाळा सुमनहार। लिंगाकंठी शोभती थोर।।३।। नाना अलंकार व्यक्ती। लिंगाअंगी हो शोभती।।४।। लक्ष्मण म्हणे थोर। महिमा लिंगाचा अपार।।५।।

२०६. लिंग धरूनिया मुळी। विष्णू ब्रह्मांड हे पाळी।।१।। अनंत ब्रह्मांडावरी सत्ता। शिवकृपे झाला ज्ञाता।।२।। प्रेमे करी लिंगार्चन। अक्षयी चरणी तो लीन।।३।। लक्ष्मण म्हणे लिंग। प्रेमे स्तवा व्हा निःसंग।।४।।

२०७. इष्टलिंगी प्रेम ठेवा। तेणे सौख्य होय जीवा।।१।। जीव तोचि शिव होय। भक्त होय निरामय।।२।। प्रेमयुक्त करा पूजा। प्रिय व्हा हो वृषभध्वजा ।।३।। स्त्रीपुत्राहूनि भक्त। प्रिय मानी उमाकांत।।४।। लक्ष्मण म्हणे बा रे। कार्य त्वरे हे साधा रे।।५।।

लिंगार्चन

२०८. लिंग धरूनि मस्तकी। विष्णू सर्वदा तो सुखी।।१।। निजध्यास भक्ती थोर। सकळ साधनांचे सार।।२।। लिंग सर्वदा स्मरावे। मग सुखा पात्र व्हावे।।३।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा पुजा त्या शंकरा।।४।।

२०९. ब्रह्मदेव लिंगस्मरणी। प्रेमे पुजी शूळपाणि।।१।। अष्टभावे पूजा करी। नसे विसर क्षणभरी।।२।। करितो ब्रह्मांड व्यापार। भक्तिसुख जाणी थोर।।३।। लक्ष्मण म्हणे लिंग। पुजा मग व्हा अभंग।।४।।

२१०. लिंग पुजी प्रेमे इंद्र। प्रेमे स्तवी महारुद्र।।१।। लिंग पूजिती गीर्वाण। त्याचे म्हणविती दीन।।२।। लिंगकृपे सर्व सिद्धी। लिंग आहे ते अनादी।।३।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा स्तवा त्या शंकरा।।४।।

२११. लिंग पूजितो कुबेर। अष्टभावे निरंतर।।१।। नवनिधी तिष्ठती द्वारी। उभ्या सर्व सिद्धी दारी।।२।। वरदपुत्र तो मानिला। प्रभोने सुखा पात्र केला।।३।। लक्ष्मणा प्रेम दिले। प्रेमे स्तवितो पाउले।।४।।

२१२. नैर्ऋत्य लिंगपूजा। करी स्मरे वृषभध्वजा।।१।। सुख झाले त्याते फार। म्हणवितो शिवकिंकर।।२।। काम जाळिला शंकरे। सुख झाले भक्ता

फार।।३।। लक्ष्मण म्हणे फार। सुख भोगिती अमर।।४।।

२१३. वायू करी लिंगार्चन। प्रभोचरणी तो निमग्न।।१।। म्हणूनि पराक्रम मोठा। प्रिय झाला नीलकंठा।।२।। सर्व देव वर्तती आज्ञे। देव श्रेष्ठ ते सर्वज्ञ।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। पूर्णब्रह्म महादेव।।४।।

२१४. आनंद भोगिती ते देव। शिवकृपे कृपाळुव।।१।। नवग्रह स्तविती शिवा। प्रेमयुक्त महादेवा।।२।। भक्त करिती पूजन। म्हणूनि जाहले ते धन्य।।३।। अहो करा लिंगार्चन। फार श्रेष्ठ हे साधन।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय आत्मप्राप्ती।।५।।

२१५. यम करी लिंगार्चन। शिवभक्त तो प्रवीण।।१।। शिवकृपा संपादिली। प्रेमे ध्यातो चंद्रमौळी।।२।। शासन करी अभक्ताते। प्रेमे पूजितो भक्ताते।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। सर्वा वंद्य महादेव।।४।।

२१६. चंद्रसूर्यनि शंकर। पूजिला तो विश्वंभर।।१।। लिंग ध्याती सदोदित। ऐश्वर्य भोगिती निवांत।।२।। तिन्ही लोका वंद्य झाले। प्रेमे आनंदे ते धाले।।३।। लक्ष्मण म्हणे लिंग। पुजा प्रेमे व्हा निःसंग।।४।।

२१७. अग्निदेवे केले प्रेमे लिंगार्चन। शिवभक्त पूर्ण शिवकृपे।।१।। तिन्ही लोका पूज्य झाला सुखा पात्र। पूजितो त्रिनेत्र महादेव।।२।। लक्ष्मण म्हणे महादेव ध्या हो। सुखा पात्र व्हा हो शिव श्रेष्ठ।।३।।

२१८. लिंगरूप शिव अंगरूपी जीव। क्रीडा महादेव करी इच्छे।।१।। भक्तजन प्रेमे जाणती गुरुकृपे। पूजन ऐक्यरूपे करिती हो।।२।। अष्ट ते सुगंध षोडशोपचार। ध्याती भक्त शूर प्रेमभरे।।३।। लिंगापाशी प्राण त्याहाचा विजयी। लक्ष्मण पायी लागे त्यांच्या।।४।।

२१९. स्वर्गवासियांनी लिंग ते पूजिले । सुखा पात्र झाले ध्या ते सुख।।१।। पाताळनिवासी पूजिती शंकरा। म्हणूनि विश्वंभरा प्रिय झाले।।२।। भूलोकीचे लोक पूजिती त्र्यंबक। सुख ते दायक झाले लिंग।।३।। लक्ष्मण म्हणे लिंग आदी अंती। चिन्मात्र ती ज्योती योगी ध्याती।।४।।

२२०. बहुत पुण्य हो ज्याचिये पदरी। तोचि प्रेमे करी लिंगार्चन।।१।। पतिव्रता करी जैसी पतिसेवा। तेवी महादेवा भजती भक्त।।२।। जारापाशी जैसे चित्त जारिणीचे। तेवी त्या भक्ताचे चित्त लिंगी।।३।। लक्ष्मण म्हणे तनु

मन धन। केले पंचप्राण लिंगार्पित।।४।।

२२१. मदर्पण क्रिया धन्य तेचि प्राणी। धन्य त्याची जननी मज प्रिय।।१।। माझे पूजेविण न घेती ते अन्न। माझेचि भजन त्याहा प्रिय।।२।। बाळक मातेते पीडी करी कष्टी। बाळ जाऊनि मिठी घाली कंठी।।३।। शिव म्हणे मज आवडती भक्त। लक्ष्मणा तात सुख देतो।।४।।

२२२. चंद्रपुत्र बुध करी लिंगार्चन। म्हणूनि तो धन्य जगी झाला।।१।। त्यापासूनि प्रजा झाले ते नृपती। सौख्य ते भोगिती शिवकृपे।।२।। शिवकृपेविण सर्व गाथागोवी। कोणा सौख्य नाही कृपेविण।।३।। लक्ष्मण म्हणे करा ती हो भक्ती। भक्तीविण गती नोहे कोणा।।४।।

२२३. लिंगार्चन करी पुजी त्रिपुरारी। नाम निरंतरी घेतसे जो।।१।। धन्य त्याचे पुण्य धन्य त्याचे पुण्य। त्याते त्रिनयन विसंबेना।।२।। बिल्व नित्य वाहे प्रभोते शरण। धन्य तोचि जाण भक्त एक।।३।। भक्ता विसंबेना प्रभो विश्वनाथ। पुजा तो समर्थ तापहारी।।४।। लक्ष्मण म्हणे शिव मनोरथ। पुरवी रे समर्थ दयाघन।।५।।

२२४. बिल्व वाहे नित्य पशुपतीप्रती। पुजी उमापती जो का प्रेमे।।१।। धन्य पुण्यवान तो रे पुण्यवान। प्रभोचे चरण ध्यातसे तो।।२।। सुकृती तो नर ध्यातसे ईश्वर। तोचि एक शूर म्हणावा हो।।३।। प्रभो सदाशिव भक्त कैवारी। रक्षी परोपरी भक्ताप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे शिवाते जे ध्याती। काळाते न भिती भक्तराज।।५।।

२२५. शिवव्रत आहे कल्याणकारक। मोक्ष रे दायक शिवनाम।।१।। शिवव्रते पूर्वी फार सुखी झाले। सौख्य ते भोगिले फार साल।।२।। नाम करूनि रे फार सुखी झाले। ब्रह्मरूप झाले शिवकृपे।।३।। इच्छित देतसे प्रभो महादेव। पुजा कृपाळुव प्रेमे तुम्ही।।४।। लक्ष्मण म्हणे प्रभो भोलानाथ। पातकी अनाथ रक्षी बाप।।८।।

२२६. लिंगपूजनाचा महिमा वर्णवेना। तुटती यातना भवपाश।।१।। मार्कंडेय मुनीने पुजिला पार्थिव। काळापासूनि तो सुटला रे।।२।। अद्यापि मुनी तो आहे चिरंजीव। लिंगपूजनाचा महिमा श्रेष्ठ।।३।। लक्ष्मण म्हणे पूजन करा हो। कैलासभुवनी हो वास करा।।४।।

जंगम

२२७. धन्य तोचि रे जंगम। अक्षयी स्वरूपी निमग्न।।१।। नित्यनेमा विसरेना। मनवृत्ती रे ढळेना।।२।। गुरुभक्तीसी सादर। षडक्षरी जप निरंतर।।३।। आत्मलिंग पाहे निरंतरी। इष्टलिंग पूजा करी।।४।। स्वधर्माते हो रक्षितो। परधर्माते नेणतो।।५।। लक्ष्मण म्हणे तो योगी। अक्षयी समाधिसुख भोगी।।६।।

२२८. सर्वा अगम्य जंगम। सकल व्यापक जंगम।।१।। जंगमावाचून रिते काही। आम्हाप्रती दिसत नाही।।२।। सकला चेष्टवी जंगम। जगद्गुरू रे जंगम।।३।। गुरू तोचि जंगम जाण। आत्मस्वरूप जंगम मान।।४।। लक्ष्मण दीन जाण। गेला जंगमा शरण।।५।।

२२९. जंगममहिमा वायुपुराणात। वदला सत्यवतिसुत पाहा।।१।। जंगमस्वरूप अनादी संचले। त्याचे सत्ते चाले सर्वत्रही।।२।। जगी हो भरले जंगम स्वरूप। अलक्ष निजरूप पूर्णभरित।।३।। तोचि हा सगुण साकार प्रत्यक्ष। भक्तजन दक्ष पूजिती हो।।४।। लक्ष्मण म्हणे जंगम अनादी। स्तवा कृपानिधी सुख होय।।५।।

विभूती (भस्म)

२३०. भस्माचा महिमा आहे श्रेष्ठ थोर। भस्म निरंतर शिवा प्रिय।।१।। सर्वा आधी भस्म नंतर सर्व क्रिया। भस्म सर्व कार्या प्रधान हो।।२।। सनकादिक योगी भस्म हो चर्चिती। सर्वत्रा हो प्रती भस्म वंद्य।।३।। भस्मधारणेने फार उद्धरिले। पुराणी वर्णिले व्यासदेवे।।४।। लक्ष्मण म्हणे वामदेव मुक्त। तोही भस्म तात लावीतसे।।५।।

२३१. विभूतिमहिमा अगाध पुराणी। आहे व्यासवाणी प्रसिद्ध।।१।। जप तप यज्ञ साधुक्रिया नेम। सर्वाठायी भस्म प्रधान हो।।२।। अती दोषी खळ भस्मे उद्धरिले। शिवसभे गेले महिमा मोठा।।३।। भस्मधारी प्राणी शिवाप्रती प्रिय। भस्मे योगिराय श्रेष्ठ केले।।४।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त थोर। भस्म निरंतर चर्चिती हो।।५।।

२३२. भस्मधारकाते व्यथा रे बाधेना। भक्त पंचानना प्रिय ते हो।।१।। रुद्राक्षधारण जे का प्रेमे करिती। त्याते पशुपती रक्षीतसे।।२।। त्रिपुंड्र हो शोभे

शिवभक्ताप्रती। हार ते शोभती रुद्राक्षांचे।।३।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त शूर। मोठे हो झुंजार शिवकृपे।।४।।

२३३. भस्ममहिमा अपार। भस्म चर्ची सिद्धेश्वर।।१।। धन्य धन्य भस्मधारी। भस्म त्रिताप निवारी।।२।। भस्मधारणेने प्राणी। फार गेले उद्धरूनि।।३।। लक्ष्मण म्हणे योगी। वंदिती ते भस्मालागी।।४।।

२३४. भस्म चर्चिती महाज्ञाते। भस्म प्रिय फार त्याते।।१।। अहो सनकादिक ज्ञानी। भस्म प्रिय त्यालागूनि।।२।। धन्य धन्य तो अवधूत। दत्तात्रेय तो विख्यात।।३।। त्याते भस्म फार प्रिय। भस्म शिव अतिप्रिय।।४।। लक्ष्मण म्हणे भस्म। फार चर्चिती निष्काम।।५।।

२३५. बगदालभ्य आदी ज्ञाते। तेही चर्चिती भस्माते।।१।। ज्ञानाचे ते बीज शेष। म्हणूनि चर्ची तो महेश।।२।। क्रियेविण ज्ञानप्राप्ती। नोहे नोहे धन्य भक्ती।।३।। आंतरज्ञान बाह्यक्रिया। भक्ती प्रिय निरामया।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। ज्ञाते सर्वज्ञ स्थापिती।।५।।

२३६. भस्मधारणेने प्राणी। गेले फार उद्धरूनि।।१।। अती हीन दीन तरले। शिवसभे शिवे नेले।।२।। त्याते भक्तीचा अभिमान। भक्ता करितो समान।।३।। लक्ष्मण म्हणे ज्ञाते। सांभाळिती या जगाते।।४।।

२३७. वामदेव महान मुक्त। भस्म चर्ची तोही तात।।१।। त्याच्या दर्शनाने तरले। फार प्राणी उद्धरिले।।२।। त्याते अती प्रिय भस्म। भक्ती करा हो निष्काम।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।४।।

२३८. विभूतिमहिमा मज वर्णवेना। भस्म पंचानना प्रिय आहे।।१।। भस्माचे धारण करावे प्रीतीने। स्वये पंचानन भस्म लावी।।२।। पापी दोषी भस्मस्पर्शे उद्धरिले। शिवनामे धाले प्राणी फार।।३।। उद्धरूनि गेले सुख ते पावले। तुम्ही ऐकिले असेल हो।।४।। लक्ष्मण म्हणे भस्म आम्ही लावू। प्रेमयुक्त गाऊ उमाधवा।।५।।

२३९. शिवाप्रती भस्म प्रिय आहे बा रे। प्रेमे तो लावी रे सर्व अंगी।।१।। भस्मधारणेने पापे भस्म होती। ऐसी आहे कीर्ती भस्माची रे।।२।। ब्रह्मराक्षसादी खळ उद्धरिले। वामदेव बोले भस्म श्रेष्ठ।।३।। समर्थाचे वाक्य आहे हो सदर। आपण उशीर करावा का।।४।। लक्ष्मण म्हणे भस्ममहिमा श्रेष्ठ। बोले

नीलकंठ बाप माझा।।५।।

२४०. शिवाप्रती बिल्व नित्य वाहे जो रे। पुण्यश्लोक तो रे प्राणी जाणा।।१।। शिवाते बिल्व रे अतिप्रिय आहे। प्रेमयुक्त वाहे पुण्ये प्राणी।।२।। तो रे तरेल ते नवल ते काई। दर्शने प्राणी तरती त्याच्या।।३।। शिव शिव प्रेमे घेती जे का प्राणी। धन्य त्याची वाणी मानी शिव।।४।। लक्ष्मण म्हणे शिव कृपाघन। भक्ताचे रक्षण करी प्रेमे।।५।।

रुद्राक्ष

२४१. रुद्र-अक्षातून उत्पत्ती। म्हणूनि रुद्राक्ष त्या म्हणती।।१।। भस्म रुद्राक्ष धारण। करिती महा ते प्रवीण।।२।। मुख्य शिवाचे हे धन। प्रेमे करिती धारण।।३।। लक्ष्मण म्हणे शिवा। वैभव प्रिय महादेवा।।४।।

२४२. भस्म रुद्राक्ष धारण। करिती प्रेमे योगी जन।।१।। योगियाचे वैभव थोर। मुखे वदती शिव हर हर ।।२।। सदोदित स्मर पायाचा। नसे विसर प्रभोचा।।३।। लक्ष्मण म्हणे धाले। ब्रह्मानंदे तृप्त झाले।।४।।

२४३. भस्मरुद्राक्ष धारण। करिती ते महा प्रवीण।।१।। रुद्राक्षमाला जपाप्रती। प्रेमे जप ते करिती।।२।। रुद्राक्षमालेचा हा जप। प्राणी झाले सुखरूप।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रेमे ते करिती।।४।।

२४४. भस्मरुद्राक्षधारक। तोचि शिवाचा बाळक।।१।। लिंगार्चनी सदा प्रेम। मुखी गाई शिवनाम।।२।। शिवापायी जीव ठेला। भक्त शिवरूप झाला।।३।। तोचि सुखी हो संसारी। जन्ममृत्यू हरली फेरी।।४।। केले सार्थक जन्मून। जगा करितो पावन।।५।। लक्ष्मण दास त्याचा। तोचि तारक जगाचा।।६।।

२४५. अहो रुद्राक्षांच्या माळा। शोभती शैवाचिया गळा।।१।। प्रेमे करिती लिंगार्चन। मुखी करिती नामस्मरण।।२।। गुळावरी बैसे माशी। तैसे स्मरती प्रभोसी।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ति-। युक्त प्रभोते पुजिती।।४।।

२४६. महाज्ञाते योगेश्वर। त्याहा अक्षयी प्रभोचा स्मर।।१।। विसर नसेचि प्रभोचा। स्मर अक्षयी पायाचा।।२।। कामिकाते विषयी गोडी। विषय सेविती तातडी।।३।। तैसे प्रभोस्मरणी भक्त। रुद्राक्षमाळा घालिती तात।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। प्रेमयुक्त ते करिती।।५।।

२४७. रुद्राक्षमहिमा पुराणी प्रसिद्ध। वेद सिद्ध शुद्ध म्हणती हो।।१।। रुद्राक्ष हा रुद्ररूप हो मानून। करिती धारण श्रेष्ठ श्रेष्ठ।।२।। अनादि ते शैव त्याहाते भूषण। योगी पुरातन रुद्रभक्त।।३।। भक्त ते प्रवीण करिती धारण। शिव ते स्मरण करिती सदा।।४।। लक्ष्मण म्हणे शिव त्याहा रक्षी। स्वामी विरूपाक्ष दयाघन।।५।।

तीर्थ–प्रसाद

२४८. तीर्थप्रसादाचा नित्यनेम ज्याला। भक्त तो शिवाला प्रिय वाटे।।१।। गुरुतीर्थ प्रसादाचा महिमा थोर। वर्णन शंकर करी मुखे।।२।। गुरुलिंगजंगमाते हो पूजावे। द्वैत न धरावे येथे काही।।३।। अष्टावरण एक जाणूनि पूजावे। आज्ञेने वर्तावे आगमांच्या।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य गुरुभक्ती। शिव पशुपती रक्षी त्याहा।।५।।

२४९. तीर्थप्रसादाचा नित्यनेम ज्याला। भवदुःख त्याला स्वप्नी नसे।।१।। त्याहाप्रती सदाशिव रक्षीतसे। भक्ताचा महेश सखा खरा।।२।। जंगमभक्तीने सदाशिव तृप्त। गुरुभक्ती समर्थ बोलिलासे।।३।। शिवयोगियाते अन्न हो घालिता। तेणे उमाकांता अती तृप्ती।।४।। लक्ष्मण म्हणे सर्वांभूती अन्न। देता उमारमण कृपा करी।।५।।

मंत्र

२५०. पंचाक्षरी मंत्र सुखाचे सदन। अज्ञान निरसन होय जपा।।१।। शिव पंचाक्षरी जपा हो अंतरी। भवव्यथा हरी मंत्रराज।।२।। पंचतत्त्वातीत वस्तू त्रिगुणातीत। होत असे प्राप्त श्रवणबळे।।३।। स्मरा ऐसे बळ दुजे हो दिसेना। स्मरा पंचानना विश्वरूपा।।४।। प्रभो कृपाबळे मी–तू हे मावळे। स्वानंदाचे बळे सुख होय।।५।। सुखदुःखातीत पद होय प्राप्त। स्मरा सदोदित पाय प्रेमे।।६।। लक्ष्मण म्हणे का हो हे सुचेना। वाया का वल्गना करिता हो।।७।।

२५१. शिव षडक्षरी मंत्र हा हो सोपा। प्रेमयुक्त जपा सुखी व्हाल।।१।। कल्याण करूनि दाविसी निधान। शिव कृपाघन वश होतो।।२।। शिव वश होता नुरे दुःख काही। सुख ते अक्षयी देतो तात।।३।। प्रभूचे म्हणविले सर्वमान्य झाले। कृतांत पाउले वंदीतसे।।४।। जपा वेगी मंत्र नका भ्रमू

वाया। नाशिवंत काया नासेल रे।।५।। लक्ष्मण म्हणे काळ आला आला। भक्षितो जगाला करा हित।।६।।

शिव

२५२. मूळ ॐकारस्वरूपा। शंभो विश्वाचिया रूपा।।१।। तुजपासून माया झाली। मायागुणा प्रसवली।।२।। अकार उकार मकार। अर्धमात्रा तू ॐकार।।३।। पूर्वी होतासी निर्गुण। मायागुणे तू सगुण।।४।। अनंत ब्रह्मांडाच्या कोटी। होती मायादेवी पोटी।।५।। ऐसी माया अनिवार। तीते तुझाचि आधार।।६।। सर्व करोनि अलिप्त। प्रभो आहेसी निवांत।।७।। तुझा न कळे रे पार। वेद शेष झाला स्थिर।।८।। लक्ष्मण म्हणे ताता। पायी ठेवा मज पतिता।।९।।

२५३. शंभोऐसा देव नाही। लागा प्रेमे शंभोपायी।।१।। सर्वदेवशिखामणी। देव झाले त्यापासूनि।।२।। ब्रह्मा विष्णू इच्छांकुर। पूर्णब्रह्म तो शंकर।।३।। विश्वी आदि मध्य अंती। सोऽहं प्रकाशे पशुपती।।४।। करितो भक्तांचे कल्याण। भक्ता देतो आपुलेपण।।५।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।६।।

२५४. भक्तकाजा घाली उडी। अती भक्ताची आवडी।।१।। शंभो भक्तालागी भोळा। पुरवी सर्वदा सोहळा।।२।। देतो ब्रह्मांडसंपत्ती। त्याचे देणे सर्वांप्रती।।३।। त्याचे देणे नारायणा। इंद्रादिका चतुरानना।।४।। असंख्य सुखी केले प्राणी। लागा प्रेमे प्रभोचरणी।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। गर्भवास चुकवा रे।।६।।

२५५. सर्व देवांमध्ये देव। पूर्णब्रह्म सदाशिव।।१।। सर्व सुखाचे आगर। सर्व भाग्याचे माहेर।।२।। मनोरथ पुरवितो भक्तांचे। प्रेमे ध्यान करा त्याचे।।३।। नका ठेवू कोठे मन। वश करा पंचानन।।४।। लक्ष्मण म्हणे बा रे। भवसिंधू हा नुरे रे।।५।।

२५६. पाय ते तारक तरले हो फार। ब्रह्मादी सुर नर ध्याती प्रेमे।।१।। जार चोर खळ पतित दुर्जन। स्मरता चरण झाले वंद्य।।२।। पायाचा महिमा जाणे चक्रपाणि। आनंदे चरणी स्थिरावला।।३।। सनकादिक योगी पाय सदा ध्याती। ब्रह्मांडसंपत्ती वमन त्याहा।।४।। पायाविण दुजे श्रेष्ठ कोठे नाही।

स्वर्गसुख काही तुळेना हो।।५।। लक्ष्मण म्हणे शिवाचे चरण। भक्त ते धरून बैसले हो।।६।।

२५७. अत्रिसुत तुझे भाळी विराजला। वासुकी शोभला गळ्यामध्ये।।१।। जटेत जाह्नवी त्रैलोक्यपावनी। वामांगी भवानी शोभली रे।।२।। स्वामी गजानन शोभती अंकी रे। अंगी विभूती रे विराजली।।३।। नाना अलंकार शस्त्रे दिव्य हाती। कुंडल शोभती तेजाळ ते।।४।। रत्नसिंहासन शोभे पद्मासन। गेले रे लोपून सूर्य कोटी।।५।। अब्जावधी ते मदन ओवाळून। तुझ्या नखाहून टाकावे रे।।६।। सकळही देव सन्निध कीर्तन। करिती प्रेमेकरून अष्टभावे।।७।। ऋषिमुनि गण सिद्ध ते ध्याती रे। भाट गर्जती रे अठ्ठावीस।।८।। कैलासाचे ठायी आनंद तो फार। विश्वाचे माहेर शिव श्रेष्ठ।।९।। लक्ष्मण म्हणे तुझे कृपेकरून। ब्रह्मादी सुरगण सुखी सदा।।१०।।

२५८. शिव दयावंत कृपेचा सागर। रक्षिले अपार प्राणी हीन।।१।। उदारपणाची सीमा बा रे झाली। ब्रह्मांडमाउली सत्य शिव।।२।। वर द्यावयाते न पाहे विचार। भक्ताते शंकर विसंबेना।।३।। शिवाप्रती आहे भक्तीचे व्यसन। भक्तापाशी प्राण त्याचा असे।।४।। लक्ष्मण म्हणे वेगी वश करा। काय त्या संसारा करिता हो।।५।।

२५९. शंभो कृपावंता तूचि कर्ता सर्व। मायातीत देव आहेसी रे।।१।। अनंत गुण हे मायेचे शंकरा। मायेते दातारा चेष्टविसी।।२।। अनंत ब्रह्मांडे रची मायादेवी। त्रिभुवनगोसावी म्हणती तूते।।३।। लक्ष्मण म्हणे सर्व तुझी आज्ञा। मायाही सर्वज्ञा नेणे पार।।४।।

२६०. शिव आप्त खरा शिव आप्त खरा। अनादी सोयरा बाप माझा।।१।। त्याते आम्ही ध्याऊ त्याचे गुण गाऊ। तोचि बाप भाऊ गुरुदेव।।२।। शिव धन आमुचे शिव धन आमुचे। त्या रे परेशाचे पाय धरू।।३।। शिव माझी विद्या शिव माझे गुण। त्याते विसरून काय करू।।४।। लक्ष्मण म्हणे शिव माझा आत्मा। त्या रे सर्वोत्तमाविण कोण।।५।।

२६१. शिव आदिपुरुष शिव आदिपुरुष। देव तो महेश जुनाट रे।।१।। प्रलयी अविनाश असे तो जगदीश। परमपुरुष नाम त्याचे।।२।। ब्रह्म आदि देव फार होती जाती। उमाईचा पती अचल तो।।३।। लक्ष्मण म्हणे त्याचे

पाय धरा। भवाचा हा वारा लागेना रे।।४।।

२६२. ब्रह्मांडदाहक विष रे भक्षी रे। देव सुखी केले शिवराये।।१।। ते दाहक विष कंठी रे धरिले। नाम हो पावले नीलकंठ।।२।। समुद्रमंथनी हे रे कार्य केले। देवांते दिधले रत्न चौदा।।३।। देवा वैभव दिले एवढा दयाळ। विषाची गरळ आपण प्याला।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती प्रिय त्याला। भक्ताने नागविला भोळा नाथ।।५।।

२६३. भक्तास्तव विष शिव प्राशन करी। झाला त्रिपुरारी भक्ता वश।।१।। विष ते दाहक पीडी शंभोप्रती। प्रभो त्याची खंती मानीना हो।।२।। जैसी माता क्लेश भोगी रे आपण। बाळाते जतन करी प्रेमे।।३।। तैसा देवराव भक्तकाजास्तव। दुःख उमाधव अंगीकारी।।४।। लक्ष्मण म्हणे मातेची उपमा। त्या सर्वोत्तमा साजेना रे।।५।।

२६४. निष्कपट शिव पूर्णब्रह्म जाणा। ब्रह्म सनातना स्तवा वेगी।।१।। फार तो उदार असे पंचानन। करा तो प्रसन्न वेगी बाप।।२।। भक्ती रे वाचून वश तो होईना। कैलासीचा राणा भक्तापाशी।।३।। भक्त अरण्यामाजी ते निधान। आणा रे धरून भक्तिबळे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तांनी तो दीन। केला असे जाण भोळा नाथ।।५।।

२६५. त्रिशूल हे खड्ग पिनाक धनुष्य। आयुधे महेश बांधितो हो।।१।। अनेक आयुधे शोभती रे त्याला। अलंकार नाना ल्याला तो।।२।। डमरू वाजवी स्वरयुक्त शंख। स्वरूपे अनेक धरितो हो।।३।। व्याघ्रांबर गजांबर शोभती रे त्याला। चिताभस्म ल्याला सर्व अंगी।।४।। लक्ष्मण म्हणे त्याचे करा स्तवन। क्षणात पावन करी नाथ।।५।।

२६६. गौतम ऋषीते गंगाबाई दिली। त्यांनी कृपा केली देवावरी।।१।। गंगाबाई करी जगाचा उद्धार। पापी रे अपार उद्धरिले।।२।। गंगेचे सामर्थ्य त्याचे सत्ते जाणा। कैलासीचा राणा वंद्य सर्वा।।३।। सर्वाते सामर्थ्य त्याचे सत्ते जाणा। ब्रह्मांडाचा राणा तोचि आहे।।४।। लक्ष्मण म्हणे त्याचे नाम घेता। सकळ तीर्थाचे स्नान घडे।।५।।

२६७. वेडा एक योगी देखिला गे बाई। वस्त्र त्याला नाही निःसंग तो।।१।। भूताचा गे पाळा असे भवताला। रुंडाच्या रे माळा गळ्यामध्ये।।२।।

आणिक नवल देखिले साजणी। जटेमाजी गंगा वाहे सदा पाणी।।३।। भिक्षापात्र हाती भिक्षाटन करी। भूता गे माझारी नाचतसे।।४।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मा चक्रपाणि। लागती चरणी त्याच्या प्रेमे।।५।।

२६८. वेडा तामस गे योगी म्या पाहिला। निःसंग देखिला योगिराव।।१।। स्मशानी लोळे गे चिताभस्म प्रिय। वैभवाची सोय नसे त्याला।।२।। आणिक नवल देखिले साजणी। मस्तकी तो अग्नी धडधडितो।।३।। वेड्याने गे सर्प गळ्यात घातला। भय बाई त्याला वाटेना गे।।४।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मा नारायण। धरिती चरण प्रेमे त्याचे।।५।।

२६९. योगी तो पाहिला शीण माझा गेला। त्रैलोक्यी व्यापिला नाथ तो गे।।१।। कानाविण ऐकतो डोळ्याविण पाहतो। जिव्हेविण चाखितो सत्य जाणा।।२।। सर्वही करूनि वेगळा आपण। नाही पंचानन लिप्त कोठे।।३।। लक्ष्मण म्हणे त्याचे पाय धरा। सुखी वास करा शिवापायी।।४।।

२७०. योगी तो पाहिला शीण माझा गेला। त्रैलोकी व्यापिला नाथ तोचि।।१।। कानाविण ऐकतो डोळ्याविण पाहतो। जिव्हेविण चाखितो रस जाणा।।२।। भोग भोगूनिया अलिप्त तो जाण। कोठेही निर्गुण लिप्त नसे।।३।। सर्व तो रे जाणे सर्व त्याचे आज्ञे। प्रभोते रे जाणे कोण ऐसा।।४।। लक्ष्मण म्हणे त्याचा संग बरा। भवाचा तो वारा न लागे हो।।५।।

२७१. रमे कैलासशिखरी। स्वामी शोभला त्रिपुरारी।।१।। देवादिक्पाळाचे मूळ। परब्रह्म जाश्वनीळ।।२।। निर्जर येती दर्शनाते। भावे पूजिती शंभोते।।३।। दुजे स्थान ऐसे नाही। सुख निरुपम ते ठायी।।४।। भक्त घेती ते अक्षयी। प्रेमे राहिले ते पायी।।५।। लक्ष्मण म्हणे त्याते। प्रेमे स्तवा घ्या सुखाते।।६।।

२७२. रूप सुंदर सगुण। दशभुज पंचवदन।।१।। कोटि सूर्यप्रभा कांती। अंगी शोभे तेजदीप्ती।।२।। कोटी चंद्राहून शीतळ। रूप तुझे रे निर्मळ।।३।। मदन असंख्य लोपले। तुझे स्वरूप फाकले।।४।। नाना अलंकार माळा। तुज शोभती स्नेहाळा।।५।। गजांबर व्याघ्रांबर। वस्त्र फार ते सुंदर।।६।। भस्म अंगी शस्त्र हाती। दिव्य कुंडले शोभती।।७।। मायाभवानी तन्वंगी। सर्वा वंद्य तू शिवयोगी।।८।। तुझे वैभव अपार। ब्रह्मादिका न कळे पार।।९।। लक्ष्मण म्हणे भक्त। निज अंगे रक्षी तात।।१०।।

२७३. तुझे कृपे वेद बोले। तुझे सत्ते सूर्य चाले।।१।। तारा चंद्र वायू हा रे। तुझे सत्ते भ्रमे तो रे।।२।। तुझे सत्ते फणिवर। वाहे ब्रह्मांडाचा भार।।३।। समुद्र आज्ञेने वर्तती। सर्वा वंद्य तू पशुपती।।४।। अनंत ब्रह्मांडे व्यवहार। तुझे सत्ते तू निर्घोर।।५।। मायागुणाप्रती सत्ता। तुझा तूचि पूर्ण ज्ञाता।।६।। लक्ष्मण म्हणे तूचि। सकळ साउली विश्वाची।।७।।

२७४. रमे कैलासशिखरी। स्वामी शोभला त्रिपुरारी।।१।। निरुपम ते स्थान रे। ब्रह्मादिका दुर्लभ रे।।२।। सपरिवारी वसे शिव। शंभो अक्षयी महादेव।।३।। सभा सनकादिक मंडळी। भक्त शोभती जवळी।।४।। देव येती दर्शनासी। भावे पूजिती शंभोसी।।५।। सदा होतो जयजयकार। वेद स्तविती निरंतर।।६।। करितो भक्ताचे कल्याण। शिव विश्वाचे जीवन।।७।। भक्तकाजा घाली उडी। त्याते स्तवा हो तातडी।।८।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। फार सोडविले प्राणी।।९।।

२७५. महादेव नाम साजे प्रभोप्रती। तिन्ही लोक ध्याती प्रभोप्रती।।१।। महा महा म्हणती प्रिय तो सर्वाला। देवा दानवाला दीनानाथा।।२।। महंतपणाची प्रभोअंगी बाणी। शिव मुकुटमणी वैराग्याचा।।३।। ब्रह्मांड हे राज्य करूनि उपेक्षा। शिवयोग दीक्षा घेतलीसे।।४।। निजानंदरूपी योगी तो निमग्न। विदेही सर्वज्ञ महाराज।।५।। ब्रह्मा विष्णु रुद्र दिक्पाळाचे भार। करिती वारंवार नमस्कार।।६।। लक्ष्मण म्हणे त्याचे नाम घ्या रे। ताप हा नुरे रे महिमा मोठा।।७।।

२७६. अनंत ते ब्रह्मे कोटी विष्णू होती। इंद्राची गणती काय तेथे।।१।। तेव्हा ईश्वराचे किंचित ध्यान रे। शिव विश्वंभर पुरातन।।२।। स्वानंदस्वरूपी रमला अक्षयी। सुखा पार नाही प्रभोचिया।।३।। त्याते जे शरण गेले ते पावन। अमरांनी चरण वंदिले हो।।४।। आपुले समान करी तो भक्ताला। शिव तो सर्वाला वंद्य आहे।।५।। त्याते विसरले अभागे दुर्मती। संसारी म्हणती माझे माझे।।६।। लक्ष्मण म्हणे गुंतले व्यसनी। नरकी फार प्राणी बुडाले हो।।७।।

२७७. शुभ्र ते कैलासस्थान श्रेष्ठ गिरी। स्वामी त्रिपुरारी वसे तेथे।।१।। शुभ्र नंदी वाहन शुभ्र ते आसन। शुभ्र ते भूषण नानाविध।।२।। शुभ्र जटाभार

शुभ्र गंगानीर। भस्म ते सुंदर शुभ्र अंगी।।३।। कुंडले तेजाळ गळा शुभ्र हार। व्याघ्रचर्मांबर शुभ्र तेही।।४।। प्रभोचिया गळा रुंडाचिया माळा। वासुकी ढवळा तोही शुभ्र।।५।। शुभ्र कटिसूत्र शुभ्र मुद्रा हाती। शुभ्र ती शोभती नाना अस्त्रे।।६।। शुभ्र छत्र हाती शंख तो ढवळा। त्रिपुंड्र शोभला भाळी शुभ्र।।७।। तिज्या नेत्री अग्नी चंद्र शुभ्र वरी। भक्ताचा कैवारी शोभला हो।।८।। वामांगी ती उमा गौरवर्ण कांती। छत्र ते शोभती शुभ्र माथा।।९।। शुभ्र ती चामरे शुभ्र भस्मधारी। पाळा बरोबरी गणांचा हो।।१०।। वैभव अपार सहस्रमुखा पार। न कळे ईश्वर पुरातन।।११।। लक्ष्मण म्हणे भक्ताचिया काजा। धावे महाराजा स्तवा वेगी।।१२।।

२७८. हरी लोळे चरणावरी। इतरांची काय थोरी।।१।। त्याचे सर्व आज्ञाधार। सर्वा वंद्य तो शंकर।।२।। योगियाचा मुकुटमणी। पूर्ण ब्रह्म शूळपाणि।।३।। ज्याचे नाम घेता वाचे। गिरी जळती पापाचे।।४।। त्याते विसरले नर। विषयी गुंतले हो फार।।५।। लक्ष्मण म्हणे स्मरा। येतो दीनाच्या कैवारा।।६।।

२७९. पत्र पुष्प अथवा जळ। तेणे तृप्त जाश्वनीळ।।१।। शुद्ध भावाचा भुकेला। सखा भाविकांचा झाला।।२।। व्याध कूळजातिहीन। ताते केला हो पावन।।३।। स्वपुत्राहूनि थोर। अती प्रीती भक्तावर।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। प्रेमे पूजा महादेव।।५।।

२८०. नावडे कैलास सुखसदन। शैव सदन आवडले।।१।। देव म्हणती कैसी नवलपरी। शिव वसे हो भक्ताघरी।।२।। अनंत ब्रह्मांडे राज्ये वमन। मानितो शिव जो विश्वजीवन।।३।। तो एका बिल्वाचे पानासाठी। भक्ताचे कंठी घालितो मिठी।।४।। ब्रह्मादिकाप्रती पार हो न कळे। तो शिव भक्तामाजी खेळे।।५।। लक्ष्मण म्हणे भक्तजनासी। निजांगे रक्षी तो कैलासवासी।।६।।

२८१. अनंत ब्रह्मांडे राज्ये वमन। तो शिव झाला भक्ताधीन।।१।। देव म्हणती याची नवलपरी। आम्हा वश नोहे मदनारी।।२।। दीप सरसाविला अती जार चोर। तो श्रेष्ठ केला पाहा हो कुबेर।।३।। योगिया जो वेगी लक्षवेना ध्यानी। कीर्तनी नाचतो पाहा शूळपाणि।।४।। स्त्री प्रिय नाही पुत्र गजानन। भक्त हीन दीन अतिप्रिय।।५।। लक्ष्मण म्हणे भक्तांनी जिंकिला।

किंचित उदकाला तृप्त होय।।६।।

२८२. नाना मते ज्यास्तव सदा विवादती। तो शिव वश हो भक्ताप्रती।।१।। नाना जप तप यज्ञ दान नेम। तो शिव वश भक्ता सर्वोत्तम।।२।। देव म्हणती कैसी नवल हो परी। आम्हा वश नोहे हो मदनारी।।३।। यज्ञाच्या हो कोडी स्वर्गसुख होय। ओवाळावे ते हो ब्रह्मसुख मोठे।।४।। वेदशास्त्रा वेगी निश्चय करवेना। तो शिव जाणा भक्तालागी धावे।।५।। अनंत ब्रह्मांडे करितो जो तृप्त। तो ये किंचित उदकासाठी।।६।। लक्ष्मण म्हणे भक्तिसुख थोर। अमरादी सुरवर इच्छिती हो।।७।।

२८३. अनंत ब्रह्मांडे क्षणी घडी मोडी। तो धावे आवडी धतुरपुष्पासाठी।।१।। देव म्हणती याची नवल हो परी। आम्हा वश नोहे हो मदनारी।।२।। भक्ताते भाळला न म्हणे उच्च नीच। नीचाचेही नीच कार्य करी।।३।। त्याचे कर्म कोणाप्रतीही कळेना। भक्त त्याच्या खुणा जाणती हो।।४।। लक्ष्मण म्हणे महाराज तात। भक्ताने अंकित केला धनी।।५।।

२८४. गळा रुद्रवीणा वाद्ये वाजवी नाना। शिवयोगिराणा नाचे प्रेमे।।१।। देखिला गे माये जाह्नवीचे तीरी। पाळा बरोबरी गणांचा गे।।२।। शिरी जटाभार झिरमिर वाहे पाणी। तृतीय नयनी अग्नी शोभे।।३।। भाळी चंद्र शोभे नाना अलंकार। सर्पाचे गे हार गळ्यामध्ये।।४।। नागाचे कटिसूत्र शोभे की गे ज्याला। गळा रुंडमाळा शोभती गे।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ताचा कैवारी। स्वामी त्रिपुरारी निजरूप।।६।।

२८५. रूप सगुण प्रभूचे। ध्याता मग दुःख कैचे।।१।। दहा भुजा पसरून। देतो भक्ता आलिंगन।।२।। पाचा मुखांनी चुंबन। देतो निजभक्तालागून।।३।। भक्तांचा तो साह्यकारी। अंगे संकट निवारी।।४।। भक्ता कृपादृष्टी पाहे। अती दयाळू तो आहे।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। भक्ता वश महादेव।।६।।

२८६. सर्व भवबाधा हरी। महाराज त्रिपुरारी।।१।। त्रिशूल पिनाक खड्ग हो। वागवितसे प्रभो हो।।२।। दुष्टाप्रती दंडीतसे। भक्ताप्रती रक्षीतसे।।३।। दुष्टावरी तमोगुण। भक्ताप्रती दयाघन।।४।। भक्ता हृदयी धरी हो। आपुले अंकी बैसली हो।।५।। लक्ष्मण म्हणे खरी। वसे प्रीती भक्तावरी।।६।।

२८७. धेनू जैसी ये हुंबरून। वत्सा चाटी अती प्रीतीने।।१।। दुग्ध पाजी तृप्त करी। अती प्रेमा त्याचा धरी।।२।। तैसा महादेव धनी। भक्तालागी ये धावूनि।।३।। मुख चुंबी वारंवार। अती प्रेमा भक्तावर।।४।। लक्ष्मण म्हणे तात। करितो आपणाऐसे भक्त।।५।।

२८८. दुकान मांडिले करितो व्यवहार। साहू आमचा थोर शंभोराव।।१।। भांडवल त्याने दिधले हो फार। अक्षयी व्यापार चाललासे।।२।। स्वानंद किराणा भरले दुकान। नव्हे कदा न्यून किराणा तो।।३।। अविद्या पसारा विकिला रद्दाळ। किराणा निर्मळ साठविला।।४।। तोट्याचा व्यवहार नाही आम्हापाशी। नफा दिवसेंदिवशी होत असे।।५।। लक्ष्मण म्हणे शिवनाम थोर। खरेदी निरंतर चाललीसे।।६।।

२८९. अंतःकरणाचा हो अंतःकरण शिव। मनाचे हो मन देव माझा।।१।। बुद्धीची हो बुद्धी माझा देवराव। चित्ताचे हो चित्त शिव माझा।।२।। अहंकाराचा हो अहंकार तात। सर्वांते जाणतो आहे तो रे।।३।। श्रवणे ऐकतो जिव्हे रस घेतो। हस्ते देतो घेतो स्वामी माझा।।४।। पायाते चालवी शिस्नाते चेष्टवी। गुदद्वारी करवी मळस्राव।।५।। त्वचेने स्पर्शणे नयनाने देखणे। घ्राणद्वारे घेणे सुगंध तो।।६।। वाचेते बोलवी सर्वांते चेष्टवी। लिप्त तो गोसावी दिसेना हो।।७।। पाच पंचवीस तत्त्वांचा हो मेळा। बारा सोळा कळा आदिकरून।।८।। त्रिगुण त्रिपुटी सर्व हा पसारा। ब्रह्मांडाचा थारा तत्त्वामध्ये।।९।। मायागुणेकरून सर्वांते चेष्टवी। स्वतः असे ठायी निरामय।।१०।। सूर्यसत्ते जैसे चालती व्यापार। राज-आज्ञा थोर सर्वांप्रती।।११।। चुंबकसत्तेने लोखंडाचे चलन। तेवी ब्रह्मी जाण मायागुण।।१२।। लक्ष्मण म्हणे शिव अविनाश। पुराणपुरुष स्वामी माझा।।१३।।

२९०. अनंत आनना अनंत लोचना। अनंत भूषणा तूते नमो।।१।। अनंत चरणा अनंत रे गुणा। शिव निरंजना तूते नमो।।२।। अनंत बाहू तू अनंता अपारा। मायेचिया परा तूते नमो।।३।। स्वमाये तू क्रीडा करिसी तू नाना। स्वानंदजीवना नमो नमो।।४।। अवयव पसारा मायेचा हा सारा। तुज निर्विकारा नमो नमो।।५।। लक्ष्मण म्हणे तुझे प्रेम देई। प्रेमी मज ठेवी निरंतर।।६।।

२९१. सुंदर ते ध्यान आम्हा आवडले। सगुण शोभले सत्स्वरूप।।१।। पंच ती वदने शोभती प्रभूला। दशभुजा ज्याला विराजती।।२।। आनने अनंत त्रिनेत्र शोभती। सर्वांगी विभूती सदा सुखी।।३।। भाळी चंद्र शोभे जटेत जान्हवी। वामभागी देवी विश्वमाता।।४।। नाना चंद्र कोटी भानू ते लोपले। वेद ते भागले वर्णिता हो।।५।। नाना अलंकार कुंडले तेजाळ। गळा रुंडमाळ वासुकी तो।।६।। दशभुजे देतो भक्ता आलिंगन। दुष्टाते दंडन करितो हो।।७।। नाना आभरणे विराजला शिव। अंगाचे वैभव आभरण।।८।। नाना वाद्ये त्याच्या नाना शस्त्रे हाती। नानापरी युक्ती करी लीला।।९।। तेचि ध्यान आम्हा सदा आवडले। मन हे ठेविले पायी त्याच्या।।१०।। लक्ष्मण म्हणे त्याते श्रेष्ठ ध्याती। पद्मनाभ स्तुती करिती ते।।११।।

२९२. शिवा तुम्ही आहा स्वयंप्रकाशी। मायेचा तू ईश पूर्णब्रह्म।।१।। परात्पर तुझे धाम ते अक्षयी। निःसंगाची आई तूचि शिवा।।२।। महत्तत्त्व आदी इच्छेचा पसारा। तुम्ही निर्विकारा निरामय।।३।। गुण ही क्रीडा तुमचा विनोद। शुद्ध ब्रह्मानंद तुम्ही शिवा।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ता ब्रह्मानंद। देशी विश्वकंद मूळबीज ।।५।।

२९३. समुद्रमंथनी विष गे पिऊन। अक्षयी गे पूर्ण सदासुखी।।१।। ब्रह्मांड दहन होय ऐसे विष। पिऊनि महेश अजरामर।।२।। नवलाची गोष्ट आइका गे बाई। रत्न त्या देवाही नेले सर्व।।३।। त्याने वैभवावरी सोडिले गे पाणी। अपरोक्षज्ञानी सदाशिव।।४।। खरे वैभव रे त्याते प्रिय झाले। देवाते गोविले मायेमाजी।।५।। लक्ष्मण म्हणे आपुलिया भक्ता। मायेची ही वार्ता लागो नेदी।।६।।

२९४. अंधकासुराते मर्दूनि प्रभूने। देवाते रक्षून सुख दिले।।१।। अती भय थोर तेथूनि रक्षिले। भक्ताचे हो केले समाधान।।२।। दीनाचे कल्याण करितो शंकर। क्रूरावरी क्रूर शस्त्रधारी।।३।। त्रिगुण त्रिपुटी चालवी व्यापार। आपण निर्घोर सदा सुखी।।४।। लक्ष्मण म्हणे भाविकांचा सखा। असे पाठीराखा निरंतर।।५।।

२९५. विरोधेकरून दैत्या गती झाली। विनोदेही झाले फार मुक्त।।१।। कामनेने फार सुखी झाले प्राणी। प्रभूची करणी अघटित।।२।। गजासुराचे ते

चर्म अंगावरी। पाहा त्रिपुरारी वागवितो।।३।। निंदा अथवा द्वेष करावा प्रभूचा। निजध्यास त्याचा असावा हो।।४।। लक्ष्मण म्हणे शुद्ध भाविकाते। आत्मा उमापती मानीतसे।।५।।

२९६. शिव कैवारी रे खरा। ध्यावे भक्तसाह्यकरा।।१।। त्याते भक्ताची आवडी। प्रेमे घालीतसे उडी।।२।। अहो काही एक न्यून। पडो न दे कृपाघन।।३।। अनन्यभावे व्हा शरण। सखा होतसे तो पूर्ण।।४।। ऐसा दयाळू बाप रे। त्याते नका विसरू रे।।५।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा स्तवा त्या शंकरा।।६।।

२९७. त्रिपुर त्रिपुटी जाळिली प्रभूने। स्वानंदजीवन स्वामी माझा।।१।। षड्गुण ऐश्वर्य शोभे निरंतर। भक्ताचे माहेर सुखदाता।।२।। अनंत म्हणती श्रुती ज्या प्रभूला। भक्तास्तव झाला सगुण तो।।३।। भक्तकाजा उडी घाली विश्वंभर। करा हो शंकर सखा वेगी।।४।। लक्ष्मण म्हणे तोचि पूर्ण सखा। येथे गुंतू नका खोटे सर्व।।५।।

२९८. सत्य भाव नंदीवरी। पाहा अक्षयी त्रिपुरारी।।१।। दया क्षमा आदी शांती। गण सभोवती शोभती।।२।। माया अद्वय पार्वती। वामांगी ती ज्ञानदीप्ती।।३।। शस्त्र वैराग्य त्रिशूळ। हस्ती शोभती निर्मळ।।४।। विज्ञान भस्म अंगी। अक्षयी शोभे तो शिवयोगी।।५।। स्वानुभव काशीपुरी। वसे प्रेमे सहपरिवारी।।६।। नाना अलंकार त्याला। चित्तप्रकाशे करितो लीला।।७।। लक्ष्मणाते बोलवी। तोचि वसे सर्वठायी।।८।।

२९९. शुभ्रवर्ण नंदी वाहन शिवाचे। दैवत सर्वांचे शिव आहे।।१।। कर्पूरगौर वरी तो बैसला। अंगी तो शोभला शुभ्रवर्ण।।२।। शुभ्र उदक ते वाहातसे गंगा। पाहा त्या अभंगा शिवाप्रती।।३।। मस्तकी चंद्रमा शुभ्र तो देखिला। अलंकार त्याला शोभलेरे।।४।। लक्ष्मण म्हणे त्रैलोक्याचा नाथ। करितो सनाथ दीनालागी।।५।।

३००. देवसमुदायामाजी तो शंकर। मान्य सर्वेश्वर सर्वांप्रती।।१।। नक्षत्रांमाजी तो शोभे रजनीकर। तैसा उमावर देवांमाजी।।२।। ब्रह्मा आदी देव त्याचे आज्ञाधार। सर्वांचे माहेर शिव आहे।।३।। लक्ष्मण म्हणे शिवनाम घेता। कृतांत त्या भक्ता आतळेना।।४।।

३०१. शिव पुरातन शिव ब्रह्म जाण। शिव तो निर्गुण गुणातीत।।१।। वेदा पार नाही कळला प्रभोचा। स्वामी तो सर्वांचा शिव आहे।।२।। स्वमायेकरूनि सगुण तो झाला। ब्रह्मादिका लीला नकळे रे।।३।। लक्ष्मण म्हणे शिव सर्वकर्ता। लक्ष्मीचा भर्ता त्याते स्तवी।।४।।

३०२. शंभो जगी भरला बाप। स्वयं प्रकाशस्वरूप।।१।। त्याची सत्ता तिही लोकी। एक वसतो अनेकी।।२।। नाना अनेक हे गुण। मायामय दृश्य जाण।।३।। दृश्या अंतर्बाह्य धनी। स्वामी पूर्ण शूळपाणि।।४।। त्याते पाहा ज्ञानदृष्टी। दीनानाथ जगजेठी।।५।। लक्ष्मण म्हणे निज। रूप अक्षयी सहज।।६।।

३०३. शिव आहे हो विश्वात्मा। परात्पर तो शिवात्मा।।१।। परा वाचा ही फिरली। बोली वेदांची खुंटली।।२।। अंतःकरणा उरी नाही। मना मनपण ते काही।।३।। केवळ लक्ष्यांश शंकर। कैची वाणी हा उच्चार।।४।। ॐकाराचे पैलतीर। केवळ परम अक्षर।।५।। लक्ष्मण म्हणे ज्ञप्ति-। मात्र असे ती प्रचीती।।६।।

३०४. केवळ चिन्मात्र तू खाणी। महाराज मोक्षदानी।।१।। सलोकता स्वरूपता। समीपता सायुज्यता।।२।। चारी मुक्ती तुजपाशी। वसती शंभो अहर्निशी।।३।। पाचवी ती निरामय। निर्गुण सायुज्यता आहे।।४।। जैसा ज्याचा अधिकार। तैसा त्याची तू शंकर।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। तू तव अलक्ष कृपाळुवा।।६।।

३०५. दुरितकाननदहना। शंभो वेदान्तजीवना।।१।। परमधाम तू अव्यय। पुरातन निरामय।।२।। भक्तकाजा तू सगुण। दशभुज पंचवदन।।३।। नादबिंदुकलातीत। केवळ आहेसी अव्यक्त।।४।। व्यक्त अव्यक्त ईश्वर। वेदा करवेना निर्धार।।५।। येथे माझी हीन वाणी। काय स्तवू शूळपाणि।।६।। लक्ष्मण म्हणे ताता। निरामय तू अनंता।।७।।

३०६. शंभो मुकुटमणी। योगियाचा शूळपाणि।।१।। सर्व तापसांचा राव। परमपुरुष महादेव।।२।। वेदाध्यक्ष सिद्धाध्यक्ष। देवाध्यक्ष सर्वसाक्ष।।३।। केवळ स्वानंदाची राशी। तत्त्वातीत अविनाशी।।४।। मायामय दृश्य बापा। दृश्यसाक्षी विश्वरूपा।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। सर्वत्राते तू विसावा।।६।।

३०७. युगी युगी तू अक्षयी। अविनाश तू गोसावी।।१।। भवसिंधूसी उतार। तुझी नामनौका सार।।२।। अती सूक्ष्म तू स्थूळ। अनंत ब्रह्मांडे सकळ।।३।। अनंत ब्रह्मांडाच्या हारी। एकएका रोमावरी।।४।। ऐसा स्थूळ तू परमात्मा। शंभो आहेसी परमात्मा।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। अवघा तूचि सदाशिवा।।६।।

३०८. विश्वमुख तू शंकर। विश्वबाहू गंगाधर।।१।। विश्वचक्षू विश्वश्रवण। विश्वपाद पंचानन।।२।। विश्वरूप विश्वंभर। विश्वा आदि मध्य तू हर।।३।। असूनि विश्वाते वेगळा। अनंत ब्रह्मांड जिव्हाळा।।४।। सूर्यापासूनि मृगजळ। तेवी विश्व हा गोंधळ।।५।। लक्ष्मण म्हणे परा। मायातीता अगोचरा।।६।।

३०९. कमलोद्भव कमलावर। तुझे इच्छेचे अंकुर।।१।। तुझे आज़ेने वर्तती। अक्षय सुखाते भोगिती।।२।। तुझे देणे सर्वत्राते। सुरा नरा राक्षसाते।।३।। वैभव सर्वत्रा देऊन। निर्विकल्प परिपूर्ण।।४।। पूर्णसुखाची तू राशी। नित्यानंद अहर्निशी।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। आहे सर्वा तू विसावा।।६।।

३१०. काशीनिवासिया हरा। अती सदया शंकरा।।१।। तुझे अगणित गुण। गुणातीत तू निर्गुण।।२।। सगुण भक्तास्तव क्रीडा। करिसी गा चंद्रचूडा।।३।। अनंत ब्रह्मांडे पसारा। तुझे इच्छेचा हा सारा।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। तुम्हा नमो जी अनंता।।५।।

३११. अक्षयी सुख तुझे पायी। जेथे अनेकत्व नाही।।१।। तेचि सुख देशी भक्ता। ऐसी कीर्ती तुझी ताता।।२।। वेद सिद्ध ग्वाही देती। अठरा पुराणे वर्णिती।।३।। अतिदोषी उद्धरिसी। आपुलेपण भक्ता देशी।।४।। ऐसा सदय तू हर। महाराज गंगाधर।।५।। लक्ष्मण म्हणे शिवा। सुख द्यावे मज देवा।।६।।

३१२. सकळ सुखाचा तू राजा। अती श्रेष्ठ वृषभध्वजा।।१।। जी जी उपमा बा द्यावी। तुम्हा साजेना ती काही।।२।। परा झाली ही लज्जित। अनुर्वाच्य तू अनंत।।३।। लक्ष्यातीत तू शंकर। मायागुणाचिया पर।।४।। लक्ष्मण लोटांगण। घाली मीतूते गाळून।।५।।

३१३. सुंदर ते ध्यान शोभे हृदयकमळी। स्वानंदबंबाळी शिव वसे।।१।।

स्वयंप्रकाश परमात्मा महेश। भक्तजना वश होतो स्मरा।।२।। त्याचे सत्ते सर्व चालती व्यापार। स्वामी निर्विकार स्वतःसिद्ध।।३।। चंद्र सूर्य अग्नी तारांगण देव। प्रकाशे ते सर्व वर्तती हो।।४।। अनंत ब्रह्मांडा आंतरबाहेर। व्याप्त चराचर विश्वात्मा तो।।५।। लक्ष्मण म्हणे चुंबकन्यायेकरून। स्वइच्छे आपण क्रीडा करी।।६।।

३१४. सुंदर ते ध्यान शोभे पद्मासनी। वामांगी भवानी विश्वमाता।।१।। ऐक्यरूप दोघे दिसती भिन्नाकृती। वेद सिद्ध ध्याती प्रेमे त्याला।।२।। स्वमायेकरून झाला पंचवदन। दशबाहूकरून रक्षी भक्ता।।३।। भानू अगणित स्वरूपी लोपले। अक्षयी शोभले चरणकमळ।।४।। अनंत ब्रह्मांडा अंतर्बाह्य तोचि। उत्पत्ती सर्वांची तेथूनिया।।५।। लक्ष्मण म्हणे स्मरा त्याचे पाय। प्रभो निरामय करितो भक्ता।।६।।

३१५. सुंदर ते ध्यान शोभे काशीस्थानी। अर्धांगी मृडानी महामाया।।१।। नागेंद्र कुंडले तळपती श्रवणी। उपनिषद् ध्वनी निघे त्या मुखे।।२।। नागेंद्रमुखाचे नृत्य ते गायन। ऐकूनि तल्लीन शिव होय।।३।। चंद्रशेखर तो प्रभो गंगाधर। स्वानंदाचे घर पूर्णब्रह्म।।४।। देव सर्वत्रही झाले त्या शरण। भक्ताचे कल्याण करितो पाहा।।५।। लक्ष्मण म्हणे त्याते प्रिय भक्ती। भक्ताघरी मुक्ती राबवी तो।।६।।

३१६. शिव सर्वांचिये आदि-। मध्य-अंती तो कृपानिधी।।१।। केवळ अद्वय शंकर। महामायेचिया पर।।२।। शरण गेले प्रभोप्रती। अद्वय झाले ब्रह्मस्थिती।।३।। लक्ष्मण म्हणे त्याला। भक्ती प्रिय स्मरू चला।।४।।

३१७. कैलास तो गिरी तेथे त्रिपुरारी। वसे सहपरिवारी भोलानाथ।।१।। असंख्य ते गण भक्त ते प्रवीण। मुख्य गजानन गणनाथ।।२।। देव दर्शनास येती निरंतर। सर्वांचे माहेरघर ते हो।।३।। लक्ष्मण म्हणे पुण्यवंत नर। वसती निरंतर शिवापाशी।।४।।

३१८. धन्य ते कैलास धन्य ते भुवन। तेथे पंचानन वसे सदा।।१।। ब्रह्मादिकाप्रती दुर्लभ ते स्थान। निरुपम जाण कैलास हो।।२।। वेद प्रभोप्रती स्तविती सर्वदा। स्वानंदाच्या कंदा स्मरा वेगी।।३।। लक्ष्मण म्हणे स्थान ते पाहाल। प्रेमे जरी गाल शिवाप्रती।।४।।

३१९. दीन तो दयाळ प्रभू जाश्वनीळ। त्रैलोक्याचा पाळ दीनानाथ।।१।। योगियांचा राव परब्रह्मदेव। स्तवा कृपाळुव उमाधव।।२।। भव हरे व्यथा स्तवा त्या समर्था। अहो जगन्नाथा वश करा।।३।। लक्ष्मण म्हणे शिव कृपाघन। करी रे कल्याण साधकाचे।।४।।

३२०. नंदीवरी तो शोभला। अंगी भस्माचा उधळा।।१।। अनंत युगाचा तो देव। वृषभध्वज कृपाळुव।।२।। कोटी सूर्याचा प्रकाश। शोभला तो उमाधीश।।३।। कैलासगिरीवरी। चालिला तो त्रिपुरारी।।४।। भक्तकार्यास्तव धावतो। पतित दीना उद्धरितो।।५।। लक्ष्मण म्हणे शंभोराया। सोडवा हो स्वामिराया।।६।।

३२१. शुभ्र शोभला तो नंदी। वरी शोभतो अनादी।।१।। मस्तकी गंगा शुभ्र पाहा। शीतकर शोभतो हा।।२।। भोवते गणांचे ते भार। चालिला तो कर्पूरगौर।।३।। वाराणसीते चालिले। सकळ देव सवे चालिले।।४।। लक्ष्मणाचा दातार। रक्षीतसे चराचर।।५।।

३२२. अंगाची साउली करी भक्तावरी। स्वामी त्रिपुरारी दयाळू तो।।१।। भक्ताचे स्वाधीन झाला तो शंकर। इच्छित हो वर देतो स्तवा।।२।। भक्तावाचूनिया त्याते प्रिय नाही। स्तवा तो गोसावी वश करा।।३।। लक्ष्मण म्हणे करितो पावन। अभक्तापासून दूर आहे।।४।।

३२३. देव भक्तांचा कैवारी। आले संकट निवारी।।१।। भक्ता न्यून रे पडेना। देव अंकित तो जाणा।।२।। क्षण एक विसंबेना। त्याविण त्याला रे गमेना।।३।। जातिकूळ न पाहे बाप। धन न पाहे आत्मस्वरूप।।४।। पंडित शहाणा पाहीना। राजा रंक तो म्हणेना।।५।। भक्ती प्रिय रे देवाला। भक्ताचा तो रे अंकिला।।६।। लक्ष्मणाचा दातार। भक्तापाशी निरंतर।।७।।

३२४. अहो शंकर हा पूर्ण। केवळ परमात्मा निर्गुण।।१।। सगुण क्रीडा करी नाना। चेष्टवितो मायागुणा।।२।। अलिप्त तो सर्वांप्रती। केवळ आनंदाची ज्ञप्ती।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। त्याते ध्याती सदोदित।।४।।

३२५. अहो जगद्गुरू शंकर। सत्यस्वरूप विश्वंभर।।१।। योगी ध्याती सदोदित। परात्पर तो अनंत।।२।। विश्वा आदि-मध्य-अंती। चिन्मात्र तो स्वयंज्योती।।३।। लक्ष्मण म्हणे तात। केवळ आनंदभरित।।४।।

३२६. अहो अनादी शंकर। कोण जाणील त्याचा पार।।१।। केवळ ज्ञानरूपी हर। मायातत्त्वातीत ईश्वर।।२।। मना बुद्धी अगोचर। केवळ आनंदा माहेर।।३।। लक्ष्मणी तो आनंद। योगी घेती ब्रह्मानंद।।४।।

३२७. जेथे आनंद आनंद। सदोदित ब्रह्मानंद।।१।। त्या सुखा उपमा नाही। भक्त सेविती अक्षयी।।२।। भेदवादिया ते स्थळ। प्राप्त नोहे ते अचळ।।३।। शिवस्वरूप उघडे। अभेद दृष्टीने ते जोडे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय प्रभोप्राप्ती।।५।।

३२८. जगद्गुरू नाम तूते। शोभे केवळ तू नित्य।।१।। जगी भरलासे ताता। सर्वांवरी तुझी सत्ता।।२।। तुझे सत्ते हा व्यापार। कोण जाणे तुझा पार।।३।। लक्ष्मण म्हणे श्रुती। प्रेमे आनंदे स्तविती।।४।।

३२९. अहो कैवल्य कैलास। तेथे प्रभोने वास।।१।। वामभागी देवी वसे। सदा संतुष्ट महेश।।२।। भक्तास्तव हा विलास। करूनि अलिप्त परेश।।३।। लक्ष्मणाचे ते धन। योगी आनंदे निमग्न।।४।।

३३०. शिव असंख्य युगांचा। आत्मा आहे तो विश्वाचा।।१।। त्याचा पार हो न कळे। अवघे पाहाणे ते वेगळे।।२।। सूत्र नाचवी परमात्मा। योगी ध्याती तो निजात्मा।।३।। लक्ष्मण म्हणे ज्ञप्ति-। मात्र आहे ती प्रचीती।।४।।

३३१. शिव अचल अविनाश। केवळ परमात्मा महेश।।१।। अखंडित स्मरे ज्ञप्ती। आनंद ज्ञानी तो सेविती।।२।। अनंत ब्रह्मांडे हे राज्य। तुच्छ मानिती भक्तराज।।३।। त्याहाचे सुख ते त्याहाला। नोहे प्राप्त ते दुजियाला।।४।। लक्ष्मण म्हणे तात। योगी ध्याती सदोदित।।५।।

३३२. काम जाळूनि निष्काम। सदा स्वानंदे आराम।।१।। तेथे सुख ते अक्षयी। आपुलेपणा विसर नाही।।२।। लक्ष्मण म्हणे शिव। अनंत ब्रह्मांडाचा देव।।३।।

३३३. बहुता युगाचा हा देव। नाम साजे महादेव।।१।। नामासारखी करणी। सदा संतुष्ट शूळपाणि।।२।। त्याचे वैभव अपार। सदा अद्वय ईश्वर।।३।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। फार सोडविले प्राणी।।४।।

३३४. अहो महादेव धनी। असे विश्वाते व्यापूनि।।१।। विश्वरूपही आपण। विश्वामध्ये पंचानन।।२।। विश्वाचे पालन करी। विश्वा साक्षी

त्रिपुरारी।।३।। लक्ष्मण म्हणे अंती। एकटा हा पशुपती।।४।।

३३५. कोट्यवधी चंद्रसूर्य हो लोपले। नंदीवरी शोभले देवराव।।१।। देवाचे हे भार भोवते शोभती। चामरे उडती प्रभोवरी।।२।। छत्र हो शोभती दिव्य ते तेजाळ। देव त्या सकळ स्तविती हो।।३।। नाना वाद्ये वाजविती ते सुस्वर। पताकांचे भार शोभले हो।।४।। लक्ष्मण म्हणे वाराणसीपती। वेद त्याची कीर्ती वर्णिती रे।।५।।

३३६. कर्मातीत शिव अनादी महेश। पुराणपुरुष वेद म्हणती।।१।। परब्रह्मदेव सत्य उमाधव। पाहा कृपाळुव गुरुकृपे।।२।। जगी तो भरला दिसेना कोणाला। चेष्टवी सर्वाला सत्तामात्रे।।३।। त्याचे सत्तेविण काही हो हालेना। लिप्त तो होईना कोण्या कर्मा।।४।। लक्ष्मण म्हणे सर्वा अगोचर। ब्रह्मादिका पार कळेना हो।।५।।

३३७. एकपणा न होता हाली। अनंत ब्रह्मांडे हो झाली।।१।। प्रभोचे चरित्र कळेना। अनेक क्रीडा करितो नाना।।२।। अनेकपणा लिप्त नाही। धन्य धन्य तो गोसावी ।।३।। भक्तापाशी सदा वसे। परब्रह्म तो महेश।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते। ध्यावे प्रेमे एकचित्ते।।५।।

३३८. एकपणाचा अभिमान। नसून ब्रह्म परिपूर्ण।।१।। तेथे द्वैताची गोवी। कोण लावितो अक्षयी।।२।। मायेचा हो विलास। मायातीत तो महेश।।३।। त्याचे सत्ते प्राण हाले। त्याचे सत्ते वेद बोले।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। अनादी तो महादेव।।५।।

३३९. एकापासून अनेक। झाले धन्य तो त्र्यंबक।।१।। अनेक क्रीडा होती नाना। विसर नसे एकपणा।।२।। श्रुती म्हणती त्या अनंत। पाहा दिसे तो निवांत ।।३।। दृश्य तितुके मायाकृत। एकाएकी तो निवांत।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते। योगी ध्याती एकचित्ते।।५।।

३४०. आत्मलिंग सदासर्वदा अनादी। स्मरू कृपानिधी सुखी होऊ।।१।। विषय हे सुखदुःखासी कारण। त्रिताप तो अग्नी जाळी बापा।।२।। विषयसुखाचा मानूनिया वीट। प्रभो तो हो श्रेष्ठ स्मरू स्तवू।।३।। लक्ष्मण म्हणे साधन फुकाचे। खंडन दुःखाचे होत आहे।।४।।

३४१. अहो अनंताचे गुण। कोण जाणे तो निर्गुण।।१।। अहो आकाशा

गवसणी। कोण घालील तो प्राणी।।२।। सदा स्वानंदभरित। प्रभू शोभे सदोदित।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। मायातीत महादेव।।४।।

३४२. शिव एकटा अनादी। तेथे माया ही उपाधी।।१।। द्वैतभाव हा पसारा। मायागुणे झाला सारा।।२।। द्वैत अद्वैत सत्ता। योगी ध्याती त्या अनंता।।३।। द्वैती दिसे हा विलास। एकपणा नाही नाश।।४।। लक्ष्मण म्हणे श्रुती। रमल्या केवळ अद्वैती।।५।।

३४३. अनंत ब्रह्मांडे स्फुरण तुमचे हो निर्गुणा। विश्वंभरा विश्वपती तू कारणा।।१।। तंतुपटापरी व्यापक भूती तू सर्वज्ञा। सकला चेष्टवूनि अलिप्त तू ब्रह्मसनातना।।२।। रंगातीता स्वामी गुणातीता ईश्वरा। नामातीता प्रभो अहो परात्परा।।३।। लक्ष्मण म्हणे सकला वंद्य आदिमूर्ती। आत्मस्वरूपा स्वामी अगम्य हो कीर्ती।।४।।

३४४. आज्ञा प्रभोची हो थोर। सकळ त्याचे कामदार।।१।। सागर मर्यादा सोडीना। वेदा बोलवितो राणा।।२।। सूर्य चाले त्याची सत्ता। सकल कर्माचा तो कर्ता।।३।। अनंत ब्रह्मांडे ही रोमी। मूळपुरुष तो स्वामी।।४।। लक्ष्मण विनवी देवा। पार न कळे कृपाळुवा।।५।।

३४५. देव फार तो दयाळ। फार आहे तो स्नेहाळ।।१।। किती अन्याय आमुचे। फार दोष हो दीनांचे।।२।। प्रभो राग रे मानीना। त्याते काहो तुम्ही ध्या ना।।३।। नाम घेता करी पावन। हीनादीना करी पावन।।४।। लक्ष्मण म्हणे नाम स्मरा। नाम प्रिय विश्वंभरा।।५।।

३४६. आपण एकला एकला। अनंत ब्रह्मांडे उभवी लीला।।१।। नाही ठायीचा हलविला। महान खेळ हा निर्मिला।।२।। धन्य धन्य त्याची करणी। श्रुती स्तविती त्यालागूनि।।३।। लक्ष्मण म्हणे त्याला। अतिप्रिय स्तवू चला।।४।।

३४७. हेमाद्री तो गिरी असे तो पवित्र। तेथे तो त्रिनेत्र नांदतसे।।१।। तापसांचे भार बैसले अपार। मध्ये महेश्वर शोभतसे।।२।। नाना योग नाना साधने करिती। प्रभोते रे गाती प्रेमयुक्त।।३।। परब्रह्म तो रे अनादिरूप रे। त्याते तुम्ही गा रे दयाळू तो।।४।। लक्ष्मण म्हणे हृदयी तो आहे। सर्वठायी पाहे शिवदेव।।५।।

३४८. हेमाद्री तो गिरी तेथे त्रिपुरारी। प्रभो तप करी फार साल।।१।। असंख्य प्रलय ध्यानामाजी जाती। ब्रह्मांडाचा पती निरामय।।२।। काशीनिवासी तो त्याते फार नाव। भक्ता देवराव रक्षीतसे।।३।। भक्ताप्रती दुःख कदाही बाधेना। धावतसे राणा भक्तास्तव।।४।। लक्ष्मण म्हणे त्याचे नाम घेता। भवाची ही वार्ता बाधेना रे।।५।।

३४९. विश्वाचे माहेर तो हा महादेव। विश्वंभर नाव त्याला साजे।।१।। विश्वाते उत्पन्न विश्वाचे पालन। संहार आपण करीतसे।।२।। सर्वा चेष्टवून आपण वेगळा। शंभोराव भोळा म्हणती त्या।।३।। त्याते कोण जाणे तोचि सर्वा जाणे। भक्त त्या शरण भावे होती।।४।। लक्ष्मण म्हणे तोचि सर्वा वंद्य। स्मरा ब्रह्मानंद भवहारी।।५।।

३५०. नाम त्याला नाही गुण त्याला नाही। रूप त्याला नाही परि तो आहे।।१।। पाहता न दिसे सर्वठायी असे। परमपुरुष पूर्ण तोचि।।२।। अंतर्बाह्य तोचि सर्वांते आवरण। सर्वा चाळवून वेगळा तो।।३।। त्याचे सत्ते सर्व व्यापार चालती। तोचि कृपामूर्ती आदिअंती।।४।। लक्ष्मण म्हणे शिव परिपूर्ण। सर्वांचे जीवन बाप माझा।।५।।

३५१. सर्वज्ञ तो शिव सर्ववंद्य देव। आहे कृपाळुव दयाघन।।१।। विश्वाचा रे आत्मा विश्वरूप तो रे। विश्वाचे आदी रे तोचि एक।।२।। आदि-मध्य-अवसानी तोचि बाप। त्याचे ते स्वरूप निरुपम।।३।। दिसे भासे हे हो मायेचे स्वरूप। चिन्मय ते रूप दीनानाथ।।४।। लक्ष्मण म्हणे मायेते चेष्टवी। त्याविना हो काही रिते नाही।।५।।

३५२. रत्नमय सिंहासनी नीलकंठ। बैसलासे श्रेष्ठ मुख्यासनी।।१।। नूपुर मुद्रिका कटिसूत्र नागाचे। कुंडल सर्पाचे शोभती त्या।।२।। नाना अलंकार शोभती रे त्याला। वेद स्तविती ज्याला प्रेमयुक्त।।३।। अनेक ते रवी स्वरूपी निमाले। वंदिती पाउले ब्रह्मादिक।।४।। लक्ष्मण म्हणे कैलासीचा राव। सर्वघटी देव तोचि आहे।।५।।

३५३. शिव योगियांचा राणा। शिव परब्रह्म जाणा।।१।। शिव वेदान्ताचे सार। शिव अनादी ईश्वर ।।२।। शिवनाम रे मंगल। शिव सकळाचे मूळ।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। सर्वघटी देवराव।।४।।

३५४. शिव माहेर देवांचे। शिव धन योगियांचे।।१।। शिव साधकांची माय। फार दयाळू शिवराय।।२।। का हो शिवाते पाहा ना। त्याचे नाम का हो घ्या ना।।३।। लक्ष्मण म्हणे नाथ। ताप हरी दीनानाथ।।४।।

३५५. शिव ब्रह्मांडाचा राणा। शिव अगम्य पुराणा।।१।। शिवापासूनि वेद झाले। शिवाने हे विश्व केले।।२।। शिवापासूनि हे सर्व। चिन्मयस्वरूप तो देव।।३।। भक्तास्तव रे सगुण। झालासे स्वमायेकरून।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। सर्वप्रिय उमाधव।।५।।

३५६. शिव मायेचिया पर। शिव सर्वा अगोचर।।१।। शिव स्वानंदसागर। शिव निर्गुण निर्विकार।।२।। शिवनाम उच्चारिता। नामे हरे भवचिंता।।३।। लक्ष्मणाचा दातार। प्रभो भक्ताचे माहेर।।४।।

३५७. शिव गुणांच्या वेगळा। शिव मायेच्या वेगळा।।१।। शिव आहे सर्वठायी। शिव कोठे लिप्त नाही।।२।। सर्वा चेष्टवी आपण। लिप्त नसे पंचानन।।३।। लक्ष्मण म्हणे देवा। पार न कळे कृपाळुवा।।४।।

३५८. शिव ब्रह्मांडाचा कर्ता। शिव मायेचा निर्मिता।।१।। माया आहे रे साभास। प्रभू आहे निराभास।।२।। नासे सकळ आकार। अविनाश तो ईश्वर।।३।। लक्ष्मण म्हणे देव। सत्यस्वरूप तो शिव।।४।।

३५९. शिव ब्रह्म रे निश्चळ। शिव प्रणवाचे मूळ।।१।। शिव ब्रह्म सनातन। शिव योगियाचे धन।।२।। शिव मना अगोचर। शिव भक्तांचे माहेर।।३।। लक्ष्मणाचा दातार। सर्वघटी सर्वेश्वर।।४।।

३६०. कुमार तुझा पुत्र देवा। दीनबंधू सदाशिवा।।१।। अर्ध्या अंगी जगन्माता। शिवा तू रे विश्वपिता।।२।। चराचरा गुरू तूचि। तूचि साउली सर्वांची।।३।। लक्ष्मण म्हणे नाथा। सर्ववंद्या आदिनाथा।।४।।

३६१. परब्रह्म तू रे शिवा। सत्य तू रे महादेवा।।१।। सनकादिकाचे दैवत। देव तू रे उमाकांत।।२।। मूळपुरुष तू नाथ। योगिराव जगन्नाथ।।३।। लक्ष्मणाची रे आस। पुरविता तू जगदीश।।४।।

३६२. वृषभावरी स्वार देखिला शंकर। नाना अलंकारे शोभला हो।।१।। वामांगी पार्वती शोभली ती माता। कोट्यवधी चंद्र शोभले हो।।२।। अंगी भस्म ल्याला गळा रुंडमाळा। शेषाचे ते यज्ञोपवित रे।।३।। जटेमाजी गंगा

वाहे निरंतर। हाती त्रिशूल डमरू शोभला रे।।४।। जटेमाजी चंद्र शोभे निशिरमण। गजांबर व्याघ्रांबर शोभे जया।।५।। कोट्यवधी सूर्य स्वरूपी लोपले। अनंत ब्रह्मांडा तोचि करी।।६।। लक्ष्मण म्हणे स्तवा त्या प्रभोते। भवापासाव तो सोडवितो।।७।।

३६३. शिवयोगी देखिला व्याघ्रांबर ल्याला। अंगी भस्म ल्याला आदिनाथ।।१।। जटेमाजी गंगा चंद्रमा शोभला। कंठी रुंडमाळा शोभती रे।।२।। मस्तकी रे नेत्र त्यामाजी रे अग्नी। प्रलयी ब्रह्मांडे दग्ध करी।।३।। कंठी हलाहल विष ते तेजाळ। ब्रह्मांडाचा पाळ भूषण त्याचे।।४।। वासुकी विखार खेळे अंगावर। शंख वाजवी रे स्वरयुक्त।।५।। वामांगी पार्वती विश्व हे निर्मिती। ब्रह्मादिका जिचा न कळे पार।।६।। लक्ष्मण म्हणे आयुधे शोभती। नाना अंलकार विराजले।।७।।

३६४. रत्नजडित सिंहासन। वरी बैसले आपण।।१।। स्वरूपी अनेक सूर्य निमाले। प्रभो नाना अंलकार ल्याले।।२।। मस्तकी शोभे जटाभार। भस्म शोभे परिकर।।३।। शेषाचे होय यज्ञोपवित। शोभला तो उमाकांत।।४।। गजांबर व्याघ्रांबर। अलंकार मिरवती सुंदर।।५।। जटेत वाहे गंगाबाई। देवा सकलांची ती आई।।६।। मस्तकी शोभे तो चंद्रमा। नमो तुम्हा पूर्णकामा।।७।। अर्धांगी असे जगन्माता। शोभली हो विश्वमाता।।८।। विघ्नहर अंकी शोभला। षण्मुख सन्निध विराजला।।९।। दोहीकडे चामरे उडती। दिव्य छत्रे हो शोभती।।१०।। अमरगण रुद्रगण मरुद्‌गण। चौसष्ट कोटी मुख्य गण।।११।। ब्रह्मा विष्णू अमरपती। बैसले सकळ दिक्पती।।१२।। तेहतीस कोटी देव बैसले। भक्त अपार तेथे शोभले।।१३।। योगी मंडळी तेथे फार। सिद्ध साधकांचे भार।।१४।। अठ्ठ्यांशी सहस्त्र ऋषीश्वर। स्तविती तो विश्वंभर।।१५।। मूर्तिमंत वेद स्तविती। सकलशास्त्र प्रभूते गाती।।१६।। अठरा भाट हो गर्जती। चौदा प्रभूला हो विनवती।।१७।। ऐसी कैलासाचे ठायी। ब्रह्मांडाची रचना पाही।।१८।। धन्य ते कैलास भुवन। तेथे नांदतो पंचानन।।१९।। चौदा लोकांचा तो राणा। गिरी कैलास तो जाणा।।२०।। भोवते सकल देवांचे भार। मुख्य सिंहासनी तो ईश्वर।।२१।। नाना सुगंधित उपचार। घेती सकलही सुर।।२२।। पुढे अप्सरा नाचती। नारद तुंबर प्रभूते

स्तविती।।२३।। सभा बैसली घनदाट। झळकती रत्नखचित मुकुट।।२४।। भक्तजनाची वाट पाहे जाणा। शंभो सोडवा लक्ष्मणा दीना।।२५।।

३६५. शंभोऐसा भोळा नाही कोणी देव। फार कृपाळुव स्वामी माझा।।१।। दीप सरसाविला केला तो कुबेर। अती दुराचार होता प्राणी।।२।। ऐसे हो अपार उद्धरिले ताते। माझ्या कृपावंते किती सांगू।।३।। पत्रपुष्पेकरून होतसे प्रसन्न। भक्ताचे जीवन स्वामी माझा।।४।। लक्ष्मण म्हणे करा की हो भक्ती। भक्तीची हो मुक्ती दासी आहे।।५।।

३६६. जैसा भक्त भाव धरितो मनी रे। तैसे प्रभोला रे होणे प्राप्त।।१।। मनोरथ त्याचे पूर्ण करी शिव। उणे कृपाळुव पडो नेदी।।२।। भक्तसखा खरा तो मदनारी। भक्त नानापरी रक्षीतसे।।३।। भक्त रक्षिण्याची आहे त्याची बाणी। भक्ताची जननी सत्य सत्य।।४।। लक्ष्मण म्हणे मजला प्रचीती। आली मनोवृत्ती पूर्ण केली।।५।।

३६७. वेदाप्रती जो बोलवी। सूर्य चालवी सत्ते।।१।। वायू भ्रमे सत्तेकरून। पृथ्वी वाहे हा भार।।२।। प्राण हालवी विश्वाचा। सत्तामात्रेकरूनि।।३।। समुद्र आज्ञेने वर्तती। सर्वा पूज्य शंकर।।४।। अनंत ब्रह्मांडे ती रोमी। रोमरोमी हो ज्याच्या।।५।। लक्ष्मण म्हणे तो हो। भक्तास्वाधीन झाला।।६।।

३६८. जगती भरला जगद्गुरू देव। नाही रिता ठाव काही एक।।१।। पाहता दिसेना परि तो आहे रे। प्रभोदेव तो रे सर्वमान्य।।२।। सत्ता त्याचि थोर चालवी व्यापार। परी तो विश्वंभर लिप्त नाही।।३।। अनंत ब्रह्मांडा त्याचे आवरण। सर्वांचे जीवन आहे बाप।।४।। लक्ष्मण म्हणे शिवा रे सर्वज्ञा। योगियाचा राणा तूचि देवा।।५।।

३६९. नीलकंठ तू रे निरुपम देव। प्रभो कृपाळुव तुझे नाम।।१।। ऊर्ध्वरेता तू रे योगियाचा राव। अनादि तू देव महादेव।।२।। तुझी योगलीला करूनि दाविसी। प्रभू तू आहेसी निरामय।।३।। सगुण लीला त्या वर्णिती कवी रे। गुण असंख्य रे तुझे देवा।।४।। लक्ष्मण म्हणे आगम स्तविती। निगमही गाती तूते देवा।।५।।

३७०. शिव दयावंत असे बापा जाण। जातिहीन नेले कैलासासी।।१।। तुम्ही व्हा सावध करा हो पूजन। करील पावन सदाशिव।।२।। संसारी

गुंतसी पुढे दुःखी होसी। विचार मानसी करी बापा।।३।। लक्ष्मण म्हणे होय रे सावध। वश करी शिव भक्तिबळे।।४।।

३७१. कौस्तुभ त्या रत्नांत। श्रेष्ठ आहे हो विख्यात।।१।। नागकुळामध्ये शेष। पूज्य आहे हो सर्वास।।२।। तेवी देवांत शंकर। पूज्य आहे परमेश्वर।।३।। सर्वत्राते त्याचे देणे। सर्व वर्तती आज्ञेने।।४।। त्याचे करिता पूजन। सौख्य देतसे तो पूर्ण।।५।। लक्ष्मणाचे तो धन। निजानंद पूर्णघन।।६।।

३७२. अनंत ब्रह्मांडाचा राणा। त्याचे वैभव न कळे कोणा।।१।। श्रुती अक्षयी स्तविती। स्वयंप्रकाश पशुपती।।२।। फार पुरातन शिव। त्याचे आज्ञे वर्तती देव।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।४।।

३७३. अनंत ब्रह्मांडी एकला। अनेकपणे करितो लीला।।१।। एकपणा न होता हानी। अनेक ब्रह्मांडाची मांडणी।।२।। धन्य धन्य तो ईश्वर। आपण दिसे सबराभर।।३।। लक्ष्मण म्हणे तात। सदासर्वदा निवांत।।४।।

शिवमहिमा : शिवपूजन

३७४. प्रातःकाली शिवदर्शन घेता। द्रष्टा तो तत्त्वाचा होत असे।।१।। माध्यान्ही दर्शन घेता शंभोचे रे। आजन्माची बा रे जळती पापे।।२।। सायंदर्शन घेता शिवाचे हो। सप्त जन्मांची हो जळती पापे।।३।। सुवर्ण ते मेरुदानाचे ते पुण्य। होता दरुशन प्राप्त होय।।४।। अगणित गाई दिल्या दानाप्रती। पुण्य तितुकेचि प्राप्त होय।।५।। लक्ष्मण म्हणे जन्ममरणातीत। करी उमाकांत स्मरा प्रेमे।।६।।

३७५. प्रभू नारदमुनी गातसे तो गुण। करी तो कीर्तन सदा प्रेमे।।१।। त्रैलोक्यी भ्रमण करी रे सर्वदा। भजन हो प्रिय सदा जया।।२।। त्रैलोक्य अजिंक्य पापपुण्यातीत। सदा हो वर्तत जगामाजी।।३।। जगाचिया कर्मा लिप्त तो होईना। भक्ता त्या प्रवीणा नसे भय।।४।। सकलही देव करिती पूजन। तुझे भक्त जाण वंद्य सर्वा।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त ते निःसंग। केला त्यांनी संग प्रभूचा हो।।६।।

३७६. सूर्यनारायणे शिवाते पूजिले। काशीमाजी केले लिंगार्चन।।१।। शिवभक्त सूर्य आहे तो प्रवीण। त्याते पंचानने दिधले पद।।२।। ब्रह्मांडव्यापार चालवितो देवा। रवीचे रे नाव सर्वा मान्य।।३।। त्याचे नाम घेता फार रे

तरती। सर्वही वंदिती त्याते प्रेमे।।४।। शिवा विसंबेना अक्षयी समाधी। पाहू कृपानिधी वेगी प्रेमे।।५।। लक्ष्मण म्हणे शिवाते स्तवा हो। सार्थक करा हो काळ आला।।६।।

३७७. अत्रीचा कुमार चंद्र तो प्रवीण। केले रे पूजन प्रेमे त्याने।।१।। काशीमाजी तप आचरले फार। उमाईचा वर केला वश।।२।। यज्ञ केला वाराणसीमाजी त्यांनी। सकळ देवांनी सन्मानिला।।३।। शिवकृपा केली मूर्ती आलिंगिली। कृपेची सावली केली शिवे।।४।। दोन लक्ष योजनांवरी तो स्थापिला। वेगही रथाला फार त्याच्या।।५।। स्वरूप ते दिव्य शिवकृपेकरून। न कळे महिमान शिवाचे हो।।६।। लक्ष्मण म्हणे शिव तो कैवारी। दीनाते उद्धरी क्षणामाजी।।७।।

३७८. सूर्याचा कुमर शनी उग्र जाणा। त्याने पंचानना पूजिले हो।।१।। शनीश्वर लिंग त्याने हो स्थापिले। प्रसन्न जाहले शिवब्रह्म।।२।। प्रसन्न होऊनि दिले स्वर्गपद। सर्वांप्रती वंद्य केला शिवे।।३।। शनी ग्रह तो हो आहे अनिवार। शिवाचा हो वर आहे जाणा।।४।। सुखी केला शिवे सूर्याचा कुमर। शिव तो उदार देतो पद।।५।। लक्ष्मण म्हणे मोक्ष देतो शिव। दयाळू तो फार स्वामी माझा।।६।।

३७९. मंगळ तो ग्रह शिवाचा तो भक्त। शिव दयावंत फार आहे।।१।। मंगळाने केले शिवाचे पूजन। शिव भगवान दाता थोर।।२।। प्रसन्न होऊनि दिले स्वर्गपद। सर्वांप्रती वंद्य केला शिवे।।३।। ग्रह तो मंगळ आहे तो प्रवीण। शिवाचे पूजन विसंबेना।।४।। लक्ष्मण म्हणे शिवभक्ती करा। स्मरा त्या ईश्वरा कृपाळू तो।।५।।

३८०. राहू केतू ग्रह शिवाचे रे भक्त। शिव कृपावंत देतो पद।।१।। सकल देवाते देणे त्या शिवाचे। सकल ही त्याचे म्हणविले।।२।। देव त्या पूजिती असुर स्तविती। सर्वा उमापती देतो दान।।३।। जातिकूळ तो रे पाहिना शंकर। भक्तावरी फार प्रेमा त्याचा।।४।। लक्ष्मण म्हणे त्याचे धरा पाय। सकल परिवारा हटवील।।५।।

३८१. शिवपूजनाचा महिमा तो मोठा। प्रेमे नीलकंठा पूजा वेगी ।।१।। कुंजर ते पाच सहस्र दानाते। पुण्य दिले याते प्राप्त होय।।२।। कपिला त्या

गाई दहा हो हजार। दान त्याहून थोर पुण्य ऐका।।३।। यज्ञकोटीहून शिवमहिमा मोठा। बिल्व नीलकंठा वाहिल्याचा।।४।। अष्टभावे शिवपूजनाचे पुण्य। आहे सर्वांहून श्रेष्ठ ऐका।।५।। लक्ष्मण म्हणे व्यासाची हो वाणी। पाहा हो पुराणी महिमा श्रेष्ठ।।६।।

३८२. तीन कोटी गावदानाचे ते पुण्य। बिल्वपत्रेकरून प्राप्त होय।।१।। शिवाप्रती पत्री प्रेमयुक्त बा रे। वाहता पुण्य रे होय प्राप्त।।२।। दहा कोटी तळी बांधिल्याचे श्रेय। एक्या पत्रे होय महिमा मोठा।।३।। कोटी यज्ञांहून महिमा तो मोठा। बिल्व नीळकंठा वाहिल्याचा।।४।। प्रभूचा महिमा अगम्य अपार। प्रेमे तो शंकर पूजा वेगी।।५।। लक्ष्मण म्हणे व्यासदेव तात। महिमा अद्भुत बोलिला हो।।६।।

३८३. मायेचा भ्रतार आहे तो ईश्वर। झाले चराचर तेथूनिया।।१।। त्रिगुण त्रिभुवनी झाली रे मोडणी। त्रैलोक्याचा धनी शिव आहे।।२।। त्याचे हो पूजन करावे निवांत। होय भवा अंत सत्य माना।।३।। लक्ष्मण म्हणे धरा त्याचे पाय। सुगम उपाय आहे हा हो।।४।।

३८४. शिवाचे पूजन करिती जे प्राणी। देतो त्यालागूनि शिवपद।।१।। पापाचा क्षालनकर्ता सदाशिव। स्मरा महादेव पूर्णब्रह्म।।२।। त्याची कृपा होता ब्रह्मांडाचे राज्य। देतसे सहज भक्ताप्रती।।३।। उदारता करी दाता तो हो शूर। न पाहे विचार देण्याविषयी।।४।। लक्ष्मण म्हणे धरा तो लवकर। करावा रे जेर भक्तिबळे।।५।।

३८५. शिवाचे पूजन अगस्ती तो करी। त्याने त्रिपुरारी वश केला।।१।। ब्रह्मादिक त्याते सन्मानिती सदा। आवडे गोविंदा प्राणाहून।।२।। इंद्र आदी देव शरण रे येती। पाय रे वंदिती त्याचे प्रेमे।।३।। समुद्र आचमन केला रे मुनीने। प्रतापी ऐसा कोण दावा।।४।। ब्रह्मांडे क्षणात करतील उत्पन्न। भक्त ते प्रवीण शिवाचे रे।।५।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त शूर। ब्रह्मांडा आधार त्याहाचा हो।।६।।

३८६. गुरू बृहस्पती शिवाचे पूजन। करी प्रेमे करून अष्टभावे।।१।। शिवकृपे त्याहा पद ते रे प्राप्त। इंद्रादी दैवत ज्याते ध्याती।।२।। सुरगुरू त्याला म्हणती पुराणी। अगम्य करणी शिवाची रे।।३।। यम वरुण अग्नी

नैर्ऋत्य कुबेर। सकळ व्यापार तुझे सत्ते।।४।। बृहस्पती भक्त शिवाचा प्रवीण। करी रे रक्षण देवाचे तो।।५।। लक्ष्मण म्हणे शिव सखा करा। अनादी सोयरा तोचि नाथ।।६।।

३८७. उमावल्लभाचे करावे पूजन। येणेचि सार्थक होय जीवा।।१।। भजनी सावध असावे सर्वदा। करी मग धंदा सुखरूप।।२।। भोजन करिता म्हणे शिवार्पण। तेणे व्रतनेम घडे तुज।।३।। नाम विसरू नको म्हणे शिव शिव। काळ रे वंदील पाय तुझे।।४।। लक्ष्मण म्हणे स्वामी जबरदस्त। कोण पीडा करी शिवभक्ता।।५।।

३८८. शिवभजनी तो सादर रे हरी। ब्रह्मदेव करी लिंगार्चन।।१।। इंद्र आदी देव शिवाते पूजिती। गण गंधर्व ध्याती निरंतर।।२।। अठ्ठ्यांशी सहस्र ऋषी रे स्तविती। दिक्पती ते पद त्याचे कृपे।।३।। का हो शिवाते तुम्ही हो स्तवा ना। त्याविना सर्वही गाथागोवी।।४।। लक्ष्मण म्हणे कार्य साधून घ्या हो। भजनी सावध राहा बापा।।५।।

शिवपाठ

३८९. शिव मनी स्मरा शिव मनी स्मरा। प्रेमे हो उच्चारा प्रभोनाम।।१।। शिवनाम सदा सर्वदा मंगल। पापाते निर्मूळ करी नाम।।२।। पुण्याची गणना करवेना कोणा। ब्रह्म सनातना भक्ती प्रिय।।३।। मुख्य शैव हरी ब्रह्मांडाचा पती। तेणे पशुपती स्तविला हो।।४।। सहस्र कमळे नित्य आणि हरी। पूजिला त्रिपुरारी अष्टभावे।।५।। दशलक्ष वर्षे सेवा नारायणे। प्रभो पंचानन वश केला।।६।। न्यून कमळ म्हणूनि नेत्र ठेविला पायी। त्रिभुवनगोसावी वश केला।।७।। ब्रह्मांडसंपत्ती सुख ते सर्वदा। झाले गोविंदाला भक्तिबळे।।८।। लक्ष्मण म्हणे भक्तिबळ थोर। सर्वांते आधार भक्तीचा हो।।९।।

३९०. हरिपुत्र ब्रह्मा शिवभजनी रत। प्रेमे उमाकांत आठवी हो।।१।। ब्रह्मपुत्र सप्त ऋषिमहामुनी। तेही शूळपाणि ध्याती प्रेमे।।२।। सनकादिक योगी ब्रह्मनिष्ठ श्रेष्ठ। तेही नीलकंठ ध्याती सदा।।३।। अगस्ती लोमश बगदालभ्य मुनी। तेही प्रभोध्यानी निरंतर।।४।। शुक वामदेव ब्रह्मवेत्ते सुर। प्रभो गंगाधर ध्याती प्रेमे।।५।। मार्कंडेय गौतम ऋषी विश्वामित्र। तापसा त्रिनेत्र ध्याती बा रे।।६।। लक्ष्मण म्हणे शिव पुरातन। सर्वांचे जीवन स्वामी

माझा।।७।।

३९१. तपाचे गिरिवर ब्रह्मांडा आधार। श्रेष्ठ मुनीश्वर शिव ध्याती ।।१।। प्रतिसृष्टी निर्मिती ऐसे मुनी थोर। प्रेमे गंगाधर ध्याती ते हो।।२।। अठ्ठ्यांशी सहस्र मुख्य मुनीश्वर। तेही शिवस्मर करिती सदा।।३।। योगी सिद्ध गण गंधर्व किन्नर। प्रभो विश्वंभर ध्याती प्रेमे।।४।। यम वरुण अग्नी नैर्ऋत्य कुबेर। दिक्पाळ शंकर ध्याती सदा।।५।। लक्ष्मण म्हणे सर्वांचा तो ज्ञाता। मायेचा नियंता स्वामी माझा।।६।।

३९२. इंद्र आदी देव स्वर्गवासी सर्व। स्वामी महादेव ध्याती भोळा।।१।। पाताळनिवासी रुद्र सर्वत्रही। प्रेमे तो गोसावी ध्याती सदा।।२।। नवग्रह चंद्र सूर्यवंशी राजे। त्यांनी वृषभध्वज आराधिला।।३।। ऋक् यजुर्वेद साम अथर्वण। प्रभोचे स्तवन करिती सदा।।४।। न्याय ते मीमांसा तर्क पातंजली। शास्त्रे चंद्रमौळी स्तविती हो।।५।। लक्ष्मण म्हणे व्याकरण वेदान्त। उमादेविकांत आठविती।।६।।

३९३. पुराणे अठरा प्रभुलीला गाती। उपनिषदे ध्याती शुद्ध बुद्ध।।१।। हरि-अवतार प्रसिद्ध चोवीस। त्यांनी तो महेश स्तविला हो।।२।। ऐसा महाराज विश्वनाथ धनी। याते कैसे प्राणी विसरले।।३।। विसर पडला म्हणूनिया ताप। नाना कष्टरूप योनी त्या हो।।४।। असत्य पसारा मानूनिया खरा। स्वहित विचारा मुकले हो।।५।। निद्रेचिया भरे स्वप्नी सुख दिसे। जागे होता नसे काही एक।।६।। लक्ष्मण म्हणे प्रभोभक्त जागे। स्वानुभव-अंगे सुखी सदा।।७।।

३९४. विषयी उदास घालूनिया कास। त्याने तो परेश वश केला।।१।। एक नाम शिव विश्वास बाणला। शिव सखा केला भक्तिबळे।।२।। श्रवण मनन होता निदिध्यास। साक्षात्कार त्यास सहजचि।।३।। साक्षात्कार तेथे स्वानुभव रंग। पद ते अभंग पावले हो।।४।। परा ती पश्यंती मध्यमा वैखरी। वाचा जेथे चारी मुकल्या हो।।५।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मरस सार। नामामृते फार धाले प्राणी।।६।।

३९५. नामामृत गोडी घेती निजभक्त। योगी ते साधिती जीवनकळा।।१।। वज्रासनी बैसूनि वायू चढविती। योगियाच्या युक्ती दुर्घट त्या।।२।।

आधारकमळ वरी स्वाधिष्ठान। मनपुरी स्थान त्याहीवरी।।३।। त्याहीवरी अनुहत विशुद्ध हो। सहस्रदळ ते हो सर्वामूळ।।४।। त्रिकूट गोल्हाट वरी औटपीठ। भ्रमरगुंफा नीट मार्ग तो हो।।५।। सत्रावीचा पाठ चालला धुदाट। योगेश्वर श्रेष्ठ प्राशिती हो।।६।। ब्रह्मरंध्रस्थान सहस्रदळ कमळ। योगी सुखकल्लोळ घेती तेथे।।७।। लक्ष्मण म्हणे योगी जबरदस्त। योगबळे स्वस्थ निरामय।।८।।

३९६. योगमार्ग हा हो आहे हो दुर्घट। येथे फार कष्ट विघ्ने थोर।।१।। भक्तिपंथ हा हो सुगम हो सोपा। प्रेमे विश्वरूपा आळवावे।।२।। नलगे वनांतरा जाणे येणे कष्ट। भक्ती ही हो पेठ वसवावी।।३।। पत्र पुष्प जळ अथवा कंदमूळ। तेणे जाश्वनीळ संतुष्टे रे।।४।। प्रेमळ भक्ताचे किंचित उदक। तेणे तो त्र्यंबक तृप्त होय।।५।। लक्ष्मण म्हणे महाराज धनी। प्रेमळ भक्तांनी जिंकिला हो।।६।।

३९७. स्वरूपी विसर म्हणोनि संसार। दुःखाचा सागर भवदुःख।।१।। गर्भवासा ऐसे दुःख नाही नाही। त्रिताप ते देही आदळती।।२।। तापत्रय खंडन नव्हे भक्तीविण। साधुसंगतीने भक्ती वाढे।।३।। संतसंगतिबळे मीतूपण नुरे। मनोवृत्ती स्थिरे अधिष्ठानी।।४।। चहू देहांचिया सहज वेगळा। स्वानुभव डोळा सुख दिसे।।५।। लक्ष्मण म्हणे स्वानुभव गुढी। उभारा तातडी काळ आला।।६।।

३९८. काळाने भक्षिले असंख्य अपार। प्रभोभक्त शूर काळा वंद्य।।१।। काळाचा हो ग्रास केला निजभक्तांनी। अलक्ष निर्गुणी लय झाले।।२।। वस्तुगत झाले ब्रह्म निरामय। स्वानुभव सोय लाधली हो।।३।। सर्व वस्तुमय ब्रह्म सबराभर। विश्व हा आकार मायागुणे।।४।। सुवर्णी ते नग तेवी हा आकार। विश्वी विश्वंभर शोभतसे।।५।। लक्ष्मण म्हणे सागरी तरंग। तेवी ब्रह्मी जग दिसे भासे।।६।।

३९९. भिंतीवरी चित्रे शोभती ती नाना। भिंतीप्रती जाणा भेद नाही।।१।। पृथुवीपासूनि नाना घट झाले। पृथुवीने केले नाही काही।।२।। घटाचा मठाचा वास त्या आकाशी। तेवी हा जगासी साक्षिभूत।।३।। अनंत ब्रह्मांडा आंतर बाहेर। हृदयी शंकर सर्वत्राच्या।।४।। लक्ष्मण म्हणे स्मरा स्तवा

त्याते। दुःख येरझारा चुकवी तो।।५।।

४००. भक्तीप्रती न लगे द्रव्याचा तो हंडा। प्रेमे चंद्रचूडा आळवावे।।१।। भक्तीप्रती न लगे सोन्याचे पर्वत। प्रेमे उमाकांत पूजावा हो।।२।। भक्तीप्रती न लगे मोतियांच्या राशी। प्रेमे अनंतासी आठवावे।।३।। भक्तीप्रती न लगे रत्नांच्या त्या खाणी। प्रभूचे चरणी लीन व्हावे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती करा करा। मिथ्या या संसारा गुंतू नका।।५।।

४०१. भक्तीप्रती न लगे खटपट शास्त्राची। नाना त्या कष्टाची उठाठेवी।।१।। भक्तीप्रती न लगे उंच याती वर्ण। सर्वांनी त्रिनयन स्तवावा हो।।२।। ब्राह्मण क्षत्रिय वैश्य सर्वांनी स्तवावा। भक्त महादेवा आवडती।।३।। लक्ष्मण म्हणे त्वरा करा करा। मिथ्या हा पसारा दुःख येथे।।४।।

४०२. विषयी हे मन गुंतले बाष्कळ। सर्वदा तळमळ करीतसे।।१।। याते युक्तीने हो वळवावे अंतरी। स्वरूपामाझारी लीन व्हावे।।२।। संतसमागमे स्वरूप ते कळे। षड्रिपू हे खळ वश होती।।३।। लक्ष्मण म्हणे रागद्वेष जाती। अंतःकरणवृत्ती स्वच्छ होय।।४।।

४०३. अभ्यासेकरून सर्व काही होय। अभ्यासाची सोय धरावी हो।।१।। व्याघ्र सर्प पाहा अभ्यासे आकळिले। विष ते जिरविले कित्येकांनी।।२।। समुद्री तरून गेले अभ्यासाने। सिद्धी त्या स्वाधीन केल्या कोणी।।३।। लक्ष्मण म्हणे अभ्यास हा सार। ब्रह्म साक्षात्कार होय जीवा।।४।।

४०४. प्रपंचकर्माचा अभ्यास करिसी। तैसा त्या चरणासी स्मर बापा।।१।। व्यवहारी वर्तता अभ्यास होतसे। स्मरावा महेश अतिप्रेमे।।२।। बैसता उठता चालता बोलता। स्मरावे अनंता प्रेमभरे।।३।। घनदाट वस्तू भरला शंकर। मायागुणापर परमात्मा तो।।४।। लक्ष्मण म्हणे त्याची सत्ता सर्व। प्रेमे महादेव स्तवावा हो।।५।।

४०५. धेनू वनी चरे चित्त वत्सापाशी। तैसे त्या शिवासी स्मरावे हो।।१।। जारिणीचे चित्त जैसे जारापाशी। तैसे त्या शिवाशी स्मरावे हो।।२।। धनलोभी हिंडे लक्ष द्रव्याजवळी। तैसा चंद्रमौळी स्तवावा हो।।३।। लक्ष्मण म्हणे विवेके हे होय। प्रभोचे ते पाय वश होती।।४।।

४०६. विवेके पाहता देह दिसे मिथ्या। देहाचिया माथा कर्मसूत्र।।१।।

प्रारब्धा स्वाधीन लागला हा देह। भक्त निःसंदेह सहजचि।।२।। दही मंथूनिया घ्यावे ते हो लोणी। तेवी शूळपाणि देही दिसे।।३।। लक्ष्मण म्हणे मीतूपण नुरे। अक्षयी शंकर मागेपुढे।।४।।

४०७. पतिव्रतेचा तो पतिपायी प्राण। गृहकर्मी वर्तून लक्ष तेथे।।१।। तेवी प्रभोभक्त स्मरणी तत्पर। क्षणभरी विसर नसेचि हो।।२।। लक्ष्मण म्हणे भृंगीकीटन्याये। स्मरती ते पाय महाराज।।३।।

४०८. जाणीवनेणिवेवेगळा तो आत्मा। विश्वाचा तो आत्मा महादेव।।१।। चहू शून्यातीत शिव तो निवांत। स्वानुभवे प्राप्त होत आहे।।२।। बाह्यानंदापर ब्रह्मानंद होय। भक्त निरामय शिवकृपे।।३।। लक्ष्मण म्हणे त्या आनंदापुढे। दृश्य हे बापुडे स्वर्गपद।।४।।

४०९. वाच्यांशाकडून लक्ष्यांश होतसे। प्रेमे तो महेश स्तवावा होय।।१।। प्रेमे नाम घेता अनामाची प्राप्ती। ऐशा त्या हो श्रुती वदती हो।।२।। शिव स्तवा स्तवा अती प्रेमभरे। कृपा तो शंकर करीतसे।।३।। भक्तास्तव तात सगुण तो झाला। अतिप्रिय त्याला भक्ती आहे।।४।। लक्ष्मण म्हणे मजला प्रचीती। आली पशुपती सुख देतो।।५।।

।। शिवपाठ संपूर्ण ।।

शिवनाम

४१०. शिवनाम घेता पापे भस्म होती। ऐसी त्याची त्याची कीर्ती असे जाण।।१।। शिवनाममहिमा जाणे चक्रपाणि। ऐसी व्यासवाणी प्रमाण हो।।२।। पितामह ब्रह्मा करी शिवभजन। सर्वांचे कल्याण शिव करी।।३।। त्याचे नाम घेता फार तरले हो। तुम्हीही करा हो त्याचे स्तवन।।४।। लक्ष्मण म्हणे नाममहिमा श्रेष्ठ। बांधा बळकट प्रेमे कंठी।।५।।

४११. शिवनाम आहे कल्याणदायक। भव रे नाशक नाम जाणा।।१।। अनेक जन्मांची पापे भस्म होती। अगम्य रे कीर्ती बापा जाण।।२।। अगणित पापी नामे उद्धरिले। फार प्राणी धाले नामस्मरणे।।३।। प्रेमयुक्त नाम घ्यावे वारंवार। भव हा करणार काय मग।।४।। लक्ष्मण म्हणे नाम वेगी घ्या हो। यमदूता का हो फिरवा ना।।५।।

४१२. शिव शब्द हा अनादी। जपा तोडी भवव्याधी।।१।। वेदपुराणांचे

सार। अति गुह्य हे अक्षर।।२।। शिव सांगे देवीप्रती। गुह्य प्रेमे धरी चित्ती।।३।। प्रेमे जपे नारायण। शिव अक्षरे ही दोन।।४।। महा महासिद्ध मुनी। अती रत शिवध्यानी।।५।। लक्ष्मण म्हणे सार। स्तवा होतो साक्षात्कार।।६।।

४१३. शिवनाम अती सार। स्तवा होतसे उद्धार।।१।। जीव अनादी चुकला। प्रभोपाया विसरला।।२।। यास्तव नामनौका केली। विश्वंभरे हो निर्मिली।।३।। भवसिंधू उतराया। हीनादीनाते ताराया।।४।। अगणित तरले फार। सुखी अक्षयी निर्घोर।।५।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा भवसिंधू उतरा।।६।।

४१४. अमृताते आणिले उणे। पाहा शिव दो अक्षराने।।१।। अमृत अक्षयी सेविती। कालांतरे ते मरती।।२।। तैसे नोहे नामामृत। दावी चिन्मात्र निजसत्य।।३।। सच्चिदानंद धनी। ठेवी त्या पायी नेऊनि।।४।। मग कैचे जन्ममरण। भक्त शिवरूप पूर्ण।।५।। लक्ष्मण म्हणे स्मरे। होय भृंगीकीटन्याय रे।।६।।

४१५. शिवनाम घेई पावन रे होई। आहे तो रे देही परब्रह्म।।१।। दही मंथूनिया घेता नवनीत। तैसा उमाकांत ध्यावा प्रेमे।।२।। नवविधा भक्ती भक्तीपाशी मुक्ती। ऐसी वेदश्रुती बोलतसे।।३।। षडक्षरी मंत्रजप हाचि सार। स्मरा वारंवार परब्रह्म।।४।। लक्ष्मण म्हणे साधन हे स्वल्प। ध्यावा विश्वरूप प्रेमयुक्त।।५।।

४१६. देव सखा करा धरा रे सुपंथ। स्मरा दीनानाथ वारंवार।।१।। कामासारखे काम करा लवकर। नका लावू उशीर काळ आला।।२।। काळ दया नाही मारा अनिवार। फार जर्जर केले प्राणी।।३।। प्रेमयुक्त शिवनाम मनी स्मरा। काळाचा रे मारा काय करी।।४।। लक्ष्मण म्हणे साधन हे स्वल्प। स्मरा विश्वरूप मायबाप।।५।।

४१७. शिवकथामृत घ्या हो प्रेमयुक्त। मन हो निवांत करोनिया।।१।। श्रवण करूनि मनन करावे। मन वसवावे सदा पायी।।२।। मनचि कारण स्वर्गनरकाप्रती। अनिवारवृत्ती मनाची हो।।३।। मन हे मातंग विवेके आवरावे। स्वरूपी लावावे त्याते बापा।।४।। लक्ष्मण म्हणे साधुसंगतीने। स्थिर होय मन प्रभुपायी।।५।।

४१८. नामस्मरणे रे प्राणी फार धाले। यमाचिये घाले चुकविले।।१।।

त्रिभुवनी शोभे त्याहांचा रे झेंडा। नाम सर्व खंडांमाजी गाती।।२।। सप्त द्वीपांमाजी करिती नामस्मरण। भाविक ते जन करिती घोष।।३।। पाताळी रे शेष करी रे स्तवन। नाम हे प्रधन सर्वांप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे करा नामस्मरण। चुकतील विघ्ने नानाविध।।५।।

४१९. नाम बळकट धरावे हो स्पष्ट। मग तो नीलकंठ वश होय।।१।। फुकाचे साधन का रे आवडेना। व्यर्थ वाचाळपणा लाभ काय।।२।। व्यवहारी वर्तता जरी घेशी नाम। तरी तुझे काम होईल रे।।३।। कामामाजी काम करी हे काम। हरेल रे भ्रम सत्य मान।।४।। लक्ष्मण म्हणे कार्य हे करा हो। मार्ग हा बरा हो स्वल्प आहे।।५।।

४२०. सांबसदाशिव मंत्र हा हो सोपा। अक्षयी हो जपा सुखी व्हाल।।१।। मान्य व्हाल सर्वा ब्रह्मादिकांप्रती। प्रभो उमापती सखा करा।।२।। प्रभूचे जे भक्त त्रैलोक्यी विजयी। भक्ताप्रती नाही दुःख स्वप्नी।।३।। प्रभुपायी मन ठेवा करा स्मर। ब्रह्मांडा आधार पायाचा हो।।४।। पातकी दुर्जन चांडाळ हे हीन। नामाने पावन झाले फार।।५।। प्रभो भक्ताभोवता फिरे सदोदित। उमादेविकांत भोलानाथ।।६।। लक्ष्मण म्हणे त्याते विसरले। दुःखी हो पडले कल्पवरी।।७।।

४२१. शंकर हा मंत्र जपा त्रिअक्षरी। त्रिताप संहारी मंत्रराज।।१।। जपता अक्षयी मग न्यून नाही। कल्याण सर्वही करितो तात।।२।। काम क्रोध मोह जाती वितळून। प्रभोपायी मन स्थिरावे हो।।३।। पायी मन मुरे भेदभाव हरे। अक्षयी सुख रे प्राप्त होय।।४।। सुखदुःखातीत पद ते निवांत। होत असे प्राप्त प्रभुकृपे।।५।। लक्ष्मण म्हणे प्रभोपायी मिळणी। स्तवा शूळपाणि महाराज।।६।।

४२२. हर हर वदा नुरे भवसिंधू। शिव ब्रह्मानंदु जोडे तात।।१।। हरनाम साजे प्रभोलागी बा रे। तापत्रय तो रे हरण करी।।२।। हकार हा शब्द भवपाशा हरी। रकार अंतरी रमे ब्रह्म।।३।। अक्षयी स्मरता जाणीव ही नुरे। मग ब्रह्म सारे अंतर्बाह्य।।४।। स्वयं तो सिद्ध झाला निजभक्त। स्मरणाची मात ऐसी आहे ।।५।। लक्ष्मण म्हणे हरवे जो मान। करी तो समान भक्तालागी।।६।।

४२३. शिव वेगी स्मरा शिव वेगी स्मरा। पाय वेगी धरा परेशाचे।।१।।

त्याची कृपा होता भव हा उरेना। त्रैलोक्याचा राणा वश करा।।२।। गर्व हा रुचेना प्रभोस तो जाणा। कैलासीचा राणा परमात्मा।।३।। त्याचे गुण गाती प्रेमयुक्त प्राणी। तेथे शूळपाणि वसे सदा।।४।। लक्ष्मण म्हणे प्रेमाविण भजन। त्याचे फोल ज्ञान दांभिक भक्ती।।५।।

४२४. संत बळवान आहेत रे श्रेष्ठ। नाम बळकट धरिले ज्यांनी।।१।। भवसमुद्र हो उतरूनि पार। झाले ते हो शूर नामस्मरणे।।२।। भवसमुद्र हो त्याहाते बाधेना। कदा नामस्मरणा खंड नाही।।३।। तुम्ही हो बा सदा करा नामस्मरण। बैसाल जाऊन त्याहामाजी।।४।। लक्ष्मण म्हणे साधन फुकाचे। नाम स्मरी वाचे शिव शिव।।५।।

४२५. पाप ताप दैन्य हरे। प्रेमयुक्त नाम घ्या रे।।१।। शिवनाम हो कल्याण। करी श्रेष्ठांचे वचन।।२।। नाम शिवाचे हृदयी। श्रेष्ठ गाती गा अक्षयी।।३।। लक्ष्मण म्हणे धाले। शिवकृपे मुक्त झाले।।४।।

४२६. शिवनाम अती गोड। निरसे अविद्येचे बंड।।१।। प्राशनमात्रे होय तृप्ती। हरे तम भेदभ्रांती।।२।। नाममहिमा अपार। घेती ब्रह्मादी सुरवर।।३।। लक्ष्मण म्हणे नाम। जाणे महिमा पुरुषोत्तम।।४।।

४२७. शंकर हे नाम सुखाचे सदन। भवबाधा आटून जाय भ्रम।।१।। भ्रांतीचा पडदा शिवकृपे निघे। नाम लागवेगे घ्या हो प्रेमे।।२।। प्राज्ञ जे पुरुष अहोरात्रंदिन। करिती भजन सदोदित।।३।। लक्ष्मण म्हणे त्याचे नाम सार। घ्या हो सुखा पार नाही मग।।४।।

४२८. शिवनाम अग्नी पाप ते अरण्य। जाळी कडकडून महिमा मोठा।।१।। स्वर्गीचे अमृत फिके नामापुढे। विश्वनाथ जोडे नामस्मरणे।।२।। कल्पांती अमृत स्वर्गीचे नाशे रे। नाम ते असे रे अक्षयी सदा।।३।। लक्ष्मण म्हणे भाग्यवंत नर। घेती नामसार ब्रह्मानंदे।।४।।

४२९. नाम मंगल मंगल। करी भवबाधा निर्मूल। पद देतसे अढळ। पावन केले अती दुष्ट ।।१।। जाराचे हो मुकुटमणी। त्याची कीर्ती हो पुराणी। सन्मानिती ऋषीमुनी। ऐसा महिमा नामाचा।।२।। दैत्य राक्षस हो क्रूर। झाले नामाने हो थोर। जातिहीन प्राणी फार। शिवनामे उद्धरिले।।३।। जार शिंदळ अती भ्रष्ट। झाले नामाने हो श्रेष्ठ। नाम श्रेष्ठाते हो श्रेष्ठ। गाती सनकादिक

मुनी।।४।। जळी तरले पाषाण। नाम सर्वांचे जीवन। लक्ष्मण विनवी दीन। स्मरा नाम हो वेगी।।५।।

४३०. यम सांगे दूताप्रती। ऐका सांगतो गोष्ट।।१।। जेथे नामाचा उच्चार। तेथे न जावे तुम्ही।।२।। न जावे त्याच्या गावा। जेथे नाम उच्चार।।३।। शिवनाम ते गर्जती। ते आपणाते वंद्य।।४।। त्याचे होता दर्शन। करा साष्टांग नमन।।५।। मी त्यांचा शरणागत। ऐसा बोलला कृतांत।।६।। नाम प्रेमे जे गर्जती। धन्य धन्य ते प्राणी।।७।। लक्ष्मण विनवी बा रे। चुके चौऱ्यांशी फेरा रे।।८।।

४३१. कर्मकाष्ठाचे दहन। करी नाम-अग्नी हो।।१।। पर्वतातुल्य पापे। जळती शिव अक्षरे।।२।। चित्तबुद्धी निरसून। दिसे अद्वैत सुख।।३।। ऐसा नामाचा महिमा। शिवनाम श्रेष्ठ हो।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। देतो आपुले पद।।४।।

४३२. शिव शिव सदा वदे जी वैखरी। सखा त्रिपुरारी होय त्याचा।।१।। कूळ ते पवित्र नाममहिमा श्रेष्ठ। प्रेमे नीळकंठ स्तवा वेगी।।२।। विषयी विरक्त होय स्मरणाने। नाम ते कल्याण करी स्मरा।।३।। दोषी ते अपार झाले नामे शूर। ब्रह्मादी सुर नर सन्मानिती।।४।। लक्ष्मण म्हणे व्यवहारी वर्तता। आठवावा ज्ञाता सदाशिव।।५।।

४३३. प्रभोगुण गाता हरे भवचिंता। व्यर्थ का भ्रमता नाना योनी।।१।। जप तप न लगे खटाटोप काही। प्रेमे नाम घेई वारंवार।।२।। कलियुगी नाम साधन हे सार। नामे तरले फार हीन दीन।।३।। प्रभोप्रती आहे नामाची आवडी। कीर्तनी तो उडी घालीतसे।।४।। लक्ष्मण म्हणे प्रेमे आम्ही गाऊ। मग सुख घेऊ पायाचे ते।।५।।

४३४. नाम तुझे पंचानना। दोषपर्वत जाळी नाना।।१।। अमृताते आणिले उणे। तुझ्या नाम-अमृताने।।२।। अमृत कल्पांती नाशे रे। नाम तुझे अक्षयी रे।।३।। तुझे नामी रत झाले। ते त्वा सर्वमान्य केले।।४।। तुझे नामामृत सार। योगी घेती निरंतर।।५।। लक्ष्मण म्हणे ताता। नामी ठेवा मज पतिता।।६।।

४३५. तुझे नाम महादेवा। तोडी जन्ममरण गोवा।।१।। भवदुःखाचे निरसन। नाम करी तुझे पूर्ण।।२।। अनामिकादी चांडाळा। भक्ती देशी तू

स्नेहाळा।।३।। तुझे नाम ज्याचे वदनी। धन्य प्राणी ते त्रिभुवनी।।४।। नाम आलय सुखाचे। घर आहे कल्याणाचे।।५।। लक्ष्मण द्यावी गोडी। नामामृताची आवडी।।६।।

४३६. तुझे नाम सदाशिवा। प्रिय ब्रह्मा आदी देवा।।१।। हरी त्रैलोक्याचा पती। अक्षयी करितो तुझी स्तुती।।२।। सर्वत्राते तुझे नाम। प्रिय ब्रह्म तू सर्वोत्तम।।३।। सनकादिकाचे हृदयी। नाम तुझे ते अक्षयी।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। सर्ववंद्य तू समर्था।।५।।

४३७. तुझे नाम गंगाधरा। चुकवी दुःख येरझारा।।१।। सायुज्यता मुक्ती प्राप्त। किंवा देशी भक्ती सत्य।।२।। नाम आनंदाचे धन। नाम स्वानंदजीवन।।३।। तुझ्या नामाची ही थोरी। तू तव अगम्य त्रिपुरारी।।४।। नाम अंगार धगधगीत। पापे जळती समस्त।।५।। लक्ष्मण म्हणे हीन। तेचि नामे झाले पूर्ण।।६।।

४३८. तुझे नाम उमापती। तारीतसे हीनाप्रती।।१।। अहंकारा होय नाश। देतसे स्वानंदविलास।।२।। मीतूपण ही गवसणी। जात असे रे निघूनि।।३।। अवघे सुखचि सारे रे। अंगी भरतसे ते रे।।४।। निजपद होतसे प्राप्त। नाममहिमा अद्भुत।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। सकळ देवा तू विसावा।।६।।

४३९. तुझे नाम सुख करी। त्रितापाते निवारी।।१।। गर्भवासाते चुकवी। श्रेष्ठ गाती ते अक्षयी।।२।। शिवा नाम तुझे गोड। सर्ववंद्य तू चंद्रचूड।।३।। नाम स्वच्छ गगनापरी। भक्ता करी रे त्रिपुरारी।।४।। अंतःकरणाच्या या वृत्ती। सर्वही स्वरूपी मुरती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त। सर्वही शिवरूप पाहात।।६।।

४४०. तुझे नामे जीवन्मुक्त। झाले फार रे पतित।।१।। असंख्य ब्रह्महत्या फार। केल्या तेचि झाले थोर।।२।। त्याच्या मुखी रामायण। शतकोटी झाले पूर्ण।।३।। धरणी लिहिता पुरेना। ऐशी पापे केली नाना।।४।। ऐसे नाम सर्वोत्तमा। अती श्रेष्ठ रे विश्रामा।।५।। लक्ष्मण म्हणे शिवा। विश्वाचा तू आत्मा देवा।।६।।

४४१. शिवनामाची हो ख्याती। निवडेना शेषाप्रती।।१।। वर्णिता तो गुंगला रे। ब्रह्मानंदे डुले तो रे।।२।। वेद तटस्थ जाहले। नामस्वरूपी रंगले।।३।।

योगीश्वरा तेचि गती। साधू सर्वदा नाचती।।४।। शिव स्तविता झाले शिव। भेदरहित स्वयमेव।।५।। लक्ष्मण म्हणे स्मरा। नामे चुकती येरझारा।।६।।

४४२. तुझे नाम विश्वनाथा। चुकवी भवरोग व्यथा।।१।। मूळधामा ते नेतसे। सुख स्वानंद देतसे।।२।। मूळ खंडी वासनेचे। तोंड फुटे षड्रिपूचे।।३।। अंतःकरणादी परिवार। स्वरूपी राहती रे स्थिर।।४।। अभ्र विरे त्या आकाशी। तैसी गती अविद्येसी।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। होत असे भक्तराव।।६।।

४४३. नाम वेदांचे मंथन। नाम शास्त्रांचे जीवन।।१।। उपनिषदांचे सार। नाम सर्वांते आधार।।२।। अठरा पुराणी निश्चय। प्रेमे स्तवावे ते पाय।।३।। ब्रह्मा आदी सुर श्रेष्ठ। म्हणती नामचि वरिष्ठ।।४।। सिद्ध योगी मुनीश्वर। म्हणती नामचि हे सार।।५।। शतकोटी रामायण। तेथे नामचि भूषण।।६।। योगयागादी सकळ। सर्वा नाममंत्र मूळ।।७।। काशी अयोध्या केदार। तेथे नामाचा उच्चार।।८।। प्रभो लक्ष्मीरमण। शिवनामी तो निमग्न।।९।। ऐसे श्रेष्ठ हे साधन। का हो करावे भ्रमण।।१०।। लक्ष्मण म्हणे बा रे। नाम प्रेमयुक्त घ्या रे।।११।।

४४४. नामामृत गोडी घेती भक्तजन। करिती प्राशन अती प्रीती।।१।। समाधान झाले सदा सुखरूप। पाहती स्वरूप निवांत ते।।२।। प्रभोचे ते भक्त प्रिय झाले त्याला। वश त्यांनी केला देवराव।।३।। लक्ष्मण म्हणे सुरा तेचि प्रिय। हरी शूळपाणि मानवला।।४।।

४४५. तुझे नाम करी पाप निःसंतान। पतितपावन नाम तुझे।।१।। तुझे नाम असे सुखाचे सदन। कल्याण करून पद दावी।।२।। नामी स्थिरावले पायी ते राहिले। शूर ते जाहले सर्वमान्य।।३।। लक्ष्मण म्हणे नाम ते वदवी। देवराया येई देई दान।।४।।

४४६. कलियुग हे हो अती आहे क्रूर। दोषाचा सागर भरलासे।।१।। पातके दुस्तर नाना नरक घोर। करिती अविचार मूढ जन।।२।। तेथे तरावया नाम हेचि नौका। स्मरा त्या व्यापका व्हा हो पार।।३।। लक्ष्मण म्हणे स्वल्प हे साधन। प्रभोचे चरण पाहा वेगी।।४।।

४४७. नाम तुझे रे मंगल। करी पापाते निर्मूळ।।१।। सूर्यप्रकाश रे होता। अंधःकार नुरे ताता।।२।। प्रेमे गाती रे तुजला। भवभ्रम निरसिला।।३।। तुझे

सखे तेचि झाले। तुजपाशी ते शोभले।।४।। लक्ष्मण म्हणे नाथा। गुण वदवा दीनानाथा।।५।।

४४८. तुझे नाम गोड फार। हरे भवविष दुर्धर।।१।। सुख होतसे साधका। सर्ववंद्य तू व्यापका।।२।। नाम कंठी रे बांधिले। तेचि सुखाते पावले।।३।। सर्वमान्य ते रे केले। तिही लोकी वंद्य झाले।।४।। लक्ष्मणामुखेकरून। प्रेमे वदवी रे गुण।।५।।

४४९. नाम तुझे सदाशिवा। करीतसे कल्याण।।१।। भवकानन हे जाळी। क्षणामाजी सर्वत्र।।२।। नाम अग्नी हा दुर्धर। नुरवी भवकानन ते।।३।। नाम त्रितापाते जाळी। सुख अक्षयी देतसे।।४।। नामी झाले रत शूर। अक्षयी सुखी ते प्राणी।।५।। लक्ष्मणा स्मर देई। तुटी न पडावी हो।।६।।

४५०. नाम तुझे हे अगस्ती। भवसिंधू प्राशी रे।।१।। शिवनाम हे मंगल। ऐशा श्रुती बोलती।।२।। सकळ शास्त्रांचा निर्धार। नाम तारक प्रभोचे।।३।। नामी रत झाले प्राणी। झाले त्रैलोक्यी वंद्य।।४।। नाम सर्वांप्रती तारू। तुझे विश्वव्यापक।।५।। लक्ष्मणा गोडी द्यावी। नामामृताची ताता।।६।।

४५१. शिवनाम हे केसरी। भक्षी भवमातंग।।१।। कामक्रोधादी चांडाळ। पळती नामप्रतापे।।२।। नाम जडजीवा तारक। सुखदायक सर्वा।।३।। रत होता नामस्मरणी। चुके लक्ष चौऱ्यांशी।।४।। करा करा वेगी त्वरा। नाम प्रेमे ते घ्या हो।।५।। लक्ष्मणा सुख झाले। शिवनामस्मरणी हो।।६।।

४५२. नाम तुझे मात्रा सार। भवरोगाते ग्रासी।।१।। करी निःपात पापांचा। सुख स्वानंद भरवी।।२।। तेथे विश्वास ठेविती। तेचि तरती भवसिंधू।।३।। अभाविक गेले वाया। कुतर्कते करूनि।।४।। तुझे भक्त ते सेविती। सर्वभावे निवांत।।५।। लक्ष्मण म्हणे धन्य। धन्य धन्य ते प्राणी।।६।।

४५३. नाम तुझे पंचानना। ग्रासी भवमृगाते।।१।। दुःख निरसी सर्वत्रही। अवीट सुख देतसे।।२।। करी द्वैताचा निरास। ऐक्यपदी ते निजवी।।३।। ब्रह्मानंद अंगी भरे। स्मरणप्रतापे करूनी।।४।। ऐसा महिमा नामाचा। तुझ्या विश्वेश्वरा रे।।५।। लक्ष्मणा गोडी द्यावी। निरंतर भजनाची।।६।।

४५४. प्रभो तुझे नामामृत। अविनाश करी रे।।१।। अमर अमृत सेविती। परि ते नाशे कल्पांती।।२।। भक्ताप्रती स्वाद कळे। नित्य मुक्त ते प्राज्ञ।।३।।

अद्वय सुख ज्या लाधले। झाले स्वानंदभरित।।४।। नाम मळाते नासून।
भीती हरी जन्माची।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। अनाथ तरले अपराधी।।६।।

४५५. अती हिंसक चांडाळ। तरले नामप्रतापे।।१।। केवळ दोषाचा
सागर। पापखाणी अपवित्र।।२।। नामे झाले ते पावन। तिन्ही लोकांते
वंद्य।।३।। शिव होतसे स्वाधीन। नामप्रतापे करून।।४।। का हो नाम ते
स्मराना। भोगदुःख भोगिता।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। नामधारकापाशी।।६।।

४५६. नाम फुकाचे सुखाचे। साधन सुलभ सोपे रे।।१।। नाही कष्ट या
योगाचे। नाही दंड देहाते।।२।। न लगे अरण्यसेवन। हठयोगादी दुःख।।३।।
सदा सर्वदा जपावे। प्रेमयुक्त अती प्रेमे।।४।। छंद लागला निशीदिनी।
जळती पापांच्या राशी।५।। लक्ष्मण म्हणे त्वरा। स्मरा दयाळू शिव।।६।।

४५७. नाम परीस शुद्ध हो। भवलोखंडा नुरवी।।१।। भवदशा निरसी
हो। जीव शुद्ध होतसे।।२।। परिसाचा हो दृष्टान्त। नामामृता न साजे।।३।।
परिसादी मायापोटी। नाममाया ही नुरवी।।४।। प्रभोचरणी ते ठेवी। सर्व संग
तुटूनी।।५।। शिवचरणी वास होता। सुख अक्षयी ते खरे।।६।। लक्ष्मण म्हणे
नाम। घेती ब्रह्मादी देव।।७।।

४५८. नामव्याघ्रापुढे कोल्हे। पळती पापजंबुक।।१।। नुरे भवबाधा
काही। नामरंगी रंगता।।२।। नामरूपी वास होता। कैचे तापबंधन।।३।।
कृतांतादी शरण येती। नामधारकाप्रती।।४।। नाम वेगी ते स्मरा हो। दीन
दयाळू शिव।।५।। लक्ष्मण म्हणे बाप। नामधारकापाशी।।६।।

४५९. बैसा नावनौकेमाजी। भवसिंधू उतरा हो।।१।। नामनौकेमाजी
फार। बैसूनि गेले हो पार।।२।। करा त्वरा हो वेगेसी। काळ ग्रासितो
फिरा।।२।। नाम धरा कंठी वेगी। होय सार्थक देहाचे।।४।। नाम सुखाची ही
राशी। तोडी पाश विषयाचे।।५।। लक्ष्मणा सुख झाले। शिवनामस्मरणे
हो।।६।।

४६०. शिव अक्षरे ही दोन। द्वैतभावाते ग्रासी।।१।। दुरिते अनेक जन्मांची।
भस्म होती स्मरे हो।।२।। दुःखदायक संसार। संग सांडा याचा हो।।३।।
नाम संसार सुखाचा। करी प्रेमे स्तवा हो।।४।। शिवरूप होय नर। शिवस्मरे
करूनि।।५।। लक्ष्मण म्हणे ताते। पूर्वी फार सोडविले।।६।।

४६१. तुझे नाम सुधारस। चुकवी बा गर्भवास।।१।। ऐसे महिमान नामाचे। निजधन ते आमुचे।।२।। फार तरले पुढे तरती। कोणा करवेना गणती।।३।। चंद्रचूड तू कल्याण। करिसी भक्ताचे तू धन।।४।। आम्हा आलीसे प्रचीत। नामामृते झालो तृप्त।।५।। लक्ष्मण हा किंकर। तुझे कृपे बा निर्घोर।।६।।

४६२. अहो नामामृतापुढे। तुच्छ स्वर्गींचे ते हुडे।।१।। अमृत पिती शेखी मरती। नामामृते सदा तृप्ती।।२।। तृप्त झाले ते निःसंग। स्वानुभवे निजरंग।।३।। निजरंगी जे रंगले। पुन्हा नाही ते फिरले।।४।। येर सर्वदा भ्रमती। चुकेना ती पुनरावृत्ती।।५।। लक्ष्मण म्हणे सेवा। जन्ममृत्यू चुके गोवा।।६।।

४६३. न लगे अरण्य सेवणे। नलगे देहा कष्ट देणे।।१।। धूम्रपानादी खटपट। न लगे थोर खटाटोप।।२।। साधन सुलभ सोपे रे। वर्म सोपे आहे बा रे।।३।। जे जे स्फुरले अंतःकरण। ते ते करावे अर्पण।।४।। ज्या ज्या उठती मनोवृत्ती। त्या त्या अर्पाव्या पशुपती।।५।। अहो बैसता उठता। स्मर असावा या चित्ता।।६।। लक्ष्मण म्हणे भजन। करिता होय समाधान।।७।।

४६४. जग मोहाने नासले। पाशी हृदयस्था चुकले।।१।। अहो ब्रह्मीचे हे अंश। असूनि भोगिती नाना क्लेश।।२।। गर्भवास नरकवास। संगे आला या जीवास।।३।। लक्ष चौऱ्याऐंशी योनी। नाना प्रकारे जाचणी।।४।। चुका झाल्या हो अपार। नाही पूर्व कोणा स्मर।।५।। लक्ष्मण म्हणे स्मर। भक्त ब्रह्म हो निर्घोर।।६।।

४६५. शिव वेगी स्मरा शिव वेगी स्मरा । भवाचा तो वारा लागो नेदी।।१।। पापे अगणित भस्म करी देव। पाहा कृपाळुव डोळे भरून।।२।। कामाचा तो अरी भक्ताचा कैवारी। दीनाते उद्धरी स्मरा वेगी।।३।। लक्ष्मण म्हणे नाम श्रेष्ठ आहे। स्वल्प साधन हे दिसे मज।।४।।

४६६. शिवनाम कंठी बांधिता सुख हो। स्मरा ते वेगी हो भव हरी।।१।। ब्रह्महत्यारी रे नामे उद्धरिले। फार पावन झाले नामस्मरणे।।२।। शिवनाम श्रेष्ठ ऐसे आहे बापा। स्मरा विश्वरूपा प्रेमयुक्त।।३।। लक्ष्मण म्हणे शिव दयाळू हो। पावन करी हो क्षणामाजी।।४।।

४६७. सुकृत असता काही जाण। तरीच घडे नामस्मरण।।१।। असता

सुकृताची जोडी। तरीच शिवपूजनी आवडी।।२।। सत्कर्माचरण काही। पूर्वपुण्याविण नाही।।३।। लक्ष्मणाचा दातार। भक्तापाशी तो शंकर।।४।।

४६८. नाम तारक तारक। नाम भव रे मोचक।।१।। नामी मनोवृत्ती लावा। चुके चौऱ्यांशीचा गोवा।।२।। नाम वेदान्ताचे सार। नाम मोक्षाचे आगर।।३।। प्रभो दयाळू रे फार। त्याने योजिला आधार।।४।। अल्प आयुष्य म्हणून। साधन काढिले निवडून।।५।। लक्ष्मणाचा दातार। कीर्तनरंगी निरंतर।।६।।

४६९. नामस्मरणाचा महिमा। जाणे वाल्मीक शुक उमा।।१।। स्वरूपी तटस्थ झाले। आनंदसमुद्री बुडाले।।२।। सकळ ऋषी तो जनक। सुख घेती ब्रह्मादिक।।३।। सनकादिक योगीश्वर। सुखी झाले अनेक फार।।४।। ते नाम का तुम्ही घ्या ना। येणे जाणे का चुकवा ना।। ५।। मायिक सुखासी भुललात। आपला आपण केला घात।।६।। फुकाचे साधन करवेना। काय म्हणावे या जना।।७।। नामे जड रे तरले। नामे पापी उद्धरले।।८।। ऐसे तुम्ही ऐकता। कळूनि का रे वेडे होता।।९।। गोड ते रे कडू झाले। कडू कैसे प्रिय झाले।।१०।। नाचामाजी जाऊनि बैससी। कीर्तन म्हणता का रे पळसी।।११।। नरजन्म हा सुंदर। यातचि होईल विचार।।१२।। परतून पाहे रे आपणा। दान हेचि द्या लक्ष्मणा।।१३।।

४७०. महादेव नाम कल्याण हो करी। अतिप्रेमे हरी घेतो नाम।।१।। नामरूपी वास म्हणूनि तो सुखी। एकला अनेकी क्रीडा करी।।२।। लक्ष्मण म्हणे सदोदित स्मरणी। म्हणूनि चक्रपाणि विश्वा वंद्य।।३।।

४७१. शिवनामाग्नी हा क्रूर। जाळी पातकांचे भार।।१।। शिवनाम जाळी क्रूरा। लागो नेदी भववारा।।२।। भस्म झाले सांगू किती। नोहे शेषाते गणती।।३।। लक्ष्मण म्हणे नाम। दावी स्वानंदाचे धाम।।४।।

४७२. नामामृताची ती गोडी। भक्त घेती ते आवडी।।१।। रात्रंदिन त्याहा ध्यास। क्षुधित सेवी त्या अन्नास।।२।। नाम जीवन भक्ताचे। थोर महिमान भक्तीचे।।३।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। केला स्वाधीन शूळपाणि।।४।।

४७३. नामाऐसे सार नाही। विचार करूनि पाहा देही।।१।। सुलभाहूनि सुलभ। महान महान असे नाम।।२।। परि हे घ्यावे प्रेमयुक्त। प्रेमे आनंद

होय प्राप्त।।३।। लक्ष्मण म्हणे शूर। झाले विजयी निर्घोर।।४।।

४७४. या युगी हे नाम तारक जीवाप्रती। दुजी युक्ती गती कठीण हो।।१।। प्रेमे नाम घ्यावे आनंदे नाचावे। प्रभोते स्मरावे साधन श्रेष्ठ।।२।। आम्हा अनाथाते तारिले हो नामे। शिव सर्वोत्तम सखा तो हो।।३।। लक्ष्मण म्हणे प्रिय सर्वांप्रती। महाज्ञानी घेती नाम मुखी।।४।।

४७५. शिवनामाचा रे उच्चार करावा। अक्षयी असावा प्रेमा पायी।।१।। निगर्वी असावे सदा लीन व्हावे। सार्थक करावे देहाचे रे।।२।। तरीच चुकेल भव ही यातना। संसार हा जाणा दुःखरूप।।३।। कोठील मी कोण गुरूते पुसावे। पाय ते धरावे बळकट।।४।। लक्ष्मण म्हणे मग पद घेशी। जाऊनि बैसशी पूर्वपदी।।५।।

४७६. शिवनाम घेता पाप क्षय होय। स्मरा वेगी पाय व्हा हो शूर।।१।। शूर होऊनिया धरा त्या शिवाशी। गिरिजावराशी करा जेर।।२।। मूर्ती गंगातीरी लुटा काशीपुरी। देव त्रिपुरारी करा दीन।।३।। टाळ वीणा वेणू मृदुंग ही वाद्ये। वाजवा हो छंदे एकनिष्ठ।।४।। भक्तापुढे त्याचे न चाले हो काही। त्रिभुवनगोसावी होय दीन।।५।। सोऽहं हा शब्द मारा अनिवार। देवाचा विचार खुंटला हो।।६।। लक्ष्मण म्हणे भक्तांनी लुटिला। नाथ हाती आला ब्रह्मांडाचा।।७।।

४७७. शिवनाम प्रेमे घ्यावे । मग पाऊल टाकावे।।१।। तेणे सर्व हरती विघ्न। नाम करी हो कल्याण।।२।। भव दाहक ते नाम। सर्व सुखाचे निजधाम।।३।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा नाम ते उच्चारा।। ४।।

४७८. नामी विश्वास ठेवावा। तेणे सौख्य होय जीवा।।१।। अहो विश्वासाचे पोटी। लाभ होय उठाउठी।।२।। जेथे विश्वासचि नाही। तेथे दुःखा पार काई।।३।। लक्ष्मण म्हणे सुख। घेती प्राज्ञ ते भाविक।।४।।

४७९. जैसी विषयाची आवडी। तैसी नामी राहो गोडी।।१।। तेणे सफळ संसार। सुख होय निरंतर।।२।। लक्ष्मण म्हणे स्मर। ठेवा हा मायेच्या पर।।३।।

४८०. नामस्मरण वेगी करा। चुकतील येरझारा।।१।। अक्षयी वदा शिवनाम। सकला वंद्य सर्वोत्तम।।२।। आराम तू रे होशील। भवपाश हा

मिटेल।।३।। नामासारिखे साधन। स्वल्प नसे दुजे जाण।।४।। लक्ष्मण म्हणे नाम। सकळ मंगलाचे धाम।।५।।

४८१. नाममात्रा हेचि सार। भवरोगा करी पार।।१।। सकल ताप निरसून। स्वस्थ करीतसे जाण।।२।। करा अक्षयी भजन। देव येईल धावून।।३।। त्याला नामाची आवडी। धावून घालीतसे उडी।।४।। लक्ष्मणाचा दातार। कीर्तनी उभा निरंतर।।५।।

४८२. नाम पतिताते तारी। दुःख ताप रे निवारी।। १।। नामनौका ही रे जाणा। नाम का हो उच्चारा ना।।२।। शिवमहिमा अपार। स्तविती ते सुर नर।।३।। पद देतसे अक्षयी। नाम धरा ते हृदयी।।४।। लक्ष्मण म्हणे देवा। नाम वदवा सदाशिवा।।५।।

४८३. नाम गोड फार जाणा। फार धाले तुम्ही का घ्याना।।१।। धालेपणाचे ढेकर। योगी देती निरंतर।।२।। नामस्मरणी सादर। असावे हो निरंतर।।३।। सुख फार रे होईल। स्वर्गी ध्वज रे लागेल।।४।। लक्ष्मण विनवी दीन। सावध असावे आपण।।५।।

४८४. कंठी बांधी बा रे नाम। हरेल रे भवभ्रम।।१।। तृणावरी जैसा अग्नी। किंचित पडता जाय जळूनि।।२।। नाम घ्या हो लवकर। होय पापाचा संहार।।३।। लक्ष्मण म्हणे बा रे। नाम अक्षयी वदा रे।।४।।

४८५. सुख देईल शंकर। पूजन करा लवकर।।१।। नाही देहाचा भरवसा। कोण दिवस येईल कैसा।।२।। लक्ष्मण म्हणे घेता नाम। पावशील सुखधाम।।३।।

४८६. न लगे अरण्यसेवन। न लगे उग्र अनुष्ठान।।१।। न लगे फार खटाटोप। सुखे पाहा आत्मरूप।।२।। नाम वदवा वदनी। रंगी जावे बा रंगूनि।।३।। नामामृत प्राशन करा। चुके चौऱ्यांशीचा फेरा।।४।। पतित तो लक्ष्मण। गेला साधूसी शरण।।५।।

४८७. नामे फार सुखी झाले। नामे जड मूढ तरले।।१।। नामावाचूनि व्रत फिके। नामसाधना नायके।।२।। नाम सुख रे सदन। नाम भव रे हरण।।३।। कीर्तनी उभा उमारंग। पद देतसे अभंग।।४।। लक्ष्मण म्हणे घ्या नाम। पावाल ते सुखधाम।।५।।

४८८. साधन करा लवकर। काळ देईल उद्या मार।।१।। फार सावध असावे। कार्य आपुले साधावे।।२।। नाम चालता बोलता। घेई विसरू नको आता।।३।। येणे प्रभू तो तोषेल। भवापासून सोडवील।।४।। लक्ष्मण म्हणे भाव। भावापाशी आहे देव।।५।।

४८९. नाम वदवा शंकरा। शरण तुम्हा विश्वंभरा।।१।। तुझा विसर न व्हावा। दान हेचि दे रे देवा।।२।। करुणाकर तुज म्हणती। का हो त्यागिले दीनाप्रती।।३।। लक्ष्मण म्हणे देवा। पाय दाखवी कृपाळुवा।।४।।

४९०. ज्या नामे ब्रह्मप्राप्ती। ते विसरे दुर्मती।।१।। करिती निंदेचा गोंधळ। त्याते लाभ नोहे केवळ।।२।। प्रेमे स्मरा प्रभोपाय। पद मिळे निरामय।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। आपणाऐसे करितो देव।।४।।

४९१. ज्या नामे प्रभोप्राप्ती। मिळे सिद्धाची संपत्ती।।१।। ते नाम आवडेना। करिती नाना वल्गना।।२।। नामी विश्वास बसेना। नाना भोगिती यातना।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। प्रभोनामी झाले रत।।४।।

४९२. ज्या नामी रतले दीन। पुढे झाले ते प्रवीण।।१।। सनकादिकाची संपत्ती। नामस्मरणे होय प्राप्ती।।२।। फुटकी कवडी खर्चत नाही। लाभ दिसे हो अक्षयी।।३।। लक्ष्मण म्हणे प्रेमे। घ्यावे नाम नित्यनेमे।।४।।

४९३. ज्या नामे क्रोध विरे। काम हाही मागे सरे।।१।। बाह्यानंद हीन रुचे। स्थान प्राप्त स्वानंदाचे।।२।। ते नाम का आवडेना। काय म्हणावे या जना।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। नामस्मरणे नित्यतृप्त।।४।।

४९४. ज्या नामे आत्मसिद्धी। होय तुटे ही उपाधी।।१।। ते नाम घेऊ प्रेमे। गाऊ नाचू नित्यनेमे।।२।। महान ज्ञानी नाम घेती। थोर नामाची त्या ख्याती।।३।। लक्ष्मण म्हणे धन। आमुचे आहे नामस्मरण।।४।।

४९५. शिव शिव नाम सदा रे उच्चारी। तरीच संसारी धन्य प्राणी।।१।। साधनप्रवाही पडू नको बापा। गुरूप्रती शरण जाय वेगी।।२।। शिवनाम सदा जपती निरंतर। क्षणामाजी पापे भस्म होती।।३।। शिवकथा श्रवण करी कर्णद्वारी। मनन करावे सदा त्याचे।।४।। लक्ष्मण म्हणे नाम श्रेष्ठ जाण। जातिहीन तरले नामस्मरणे।।५।।

४९६. नामस्मरणे फार तरले। अनाथ दीन उद्धरिले।।१।। नलगे खटपटही

फार। कामात काम स्मरा हर।।२।। साठी घटिकांमाझारी। घडीभरी तरी स्मरा मदनारी।।३।। नाम स्मरा यम वंदील। लक्ष्मण म्हणे स्वर्गात जाल।।४।।

४९७. अगाध नामाचा महिमा। झाली बोलायाची सीमा।।१।। नाम जाणे तो उद्धव। नाम जाणे जनकराव।।२।। नाममहिमा वाल्मीकासी। नाममहिमा शुकदेवासी।।३।। नाम जाणे नारदमुनी। महिमा वर्णिला व्यासांनी।।४।। लक्ष्मण म्हणे नामस्मरण। करा फुकाचे साधन।।५।।

४९८. नामस्मरण विसरू नका। नाम प्रिय त्या व्यापका।।१।। नाम घेता करी धंदा। तोचि प्रिय ब्रह्मानंदा।।२।। नाम घेता वाया गेला। ऐसा नाही हो देखिला।।३।। लक्ष्मण म्हणे नाम घ्या रे। कुळाप्रती उद्धरा रे।।४।।

शिवभक्ती

४९९. शिवभक्ती सर्वश्रेष्ठ। तोडी जन्ममरण कष्ट।।१।। दुजा उपायचि नाही। लागा प्रेमे शंभोपायी।।२।। साधन फुकाचे सुखाचे। नाही कारण द्रव्याचे।।३।। थोडा बेल थोडे पाणी। तेणे तृप्त शूलपाणि।।४।। पूजन प्रेमे हो करावे। नाम मुखी सदा घ्यावे।।५।। अती पापी उद्धरिले। चरणापाशी हो स्थापिले।।६।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा शिव येतो घरा।।७।।

५००. भक्तीविण सर्व शीण। हो का पंडित व्युत्पन्न।।१।। हो का ब्रह्मांडाचा पती। भक्तीविण नोहे गती।।२।। मुक्ती भक्तीच्या हो घरी। चुके जन्ममरण फेरी।।३।। भक्तास्वाधीन ईश्वर। होतो भक्तांचा किंकर।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा घ्या ते सुख प्राप्ती।।५।।

५०१. सनकादिक मुनीश्वर। करिती भक्ती निरंतर।।१।। भक्ती जीवन सर्वांचे। भक्तीविण सुख कैचे।।२।। भक्तीपाशी सुख बंबाळ। अक्षयी सुखाचा सुकाळ।।३।। भक्तीपाशी माया नाही। अभक्ताते ती नाचवी।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा सर्व दिसे भ्रांती।।५।।

५०२. अनंत ब्रह्मांडाच्या कोटी। वसती एका रोमादेठी।।१।। ऐसा शिवब्रह्म पूर्ण। झाला भक्ताचे स्वाधीन।।२।। अहो किंचित् उदकासाठी। मुख पसरितो धुर्जटी।।३।। म्हणे धालो धालो धालो। ब्रह्मानंदे तृप्त झालो।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। ब्रह्मभाग्याची संपत्ती।।५।।

५०३. भक्ती ज्ञानाचे जीवन। भक्ती विज्ञाना भूषण।।१।। भक्तीपाशी

पूर्ण सुख। जे का घेती ब्रह्मादिक।।२।। अवघा सुखाचा संसार। ब्रह्मानंद निरंतर।।३।। लक्ष्मण म्हणे धनी। भक्तास्वाधीन शूळपाणि।।४।।

५०४. भक्ती ज्ञानाचे आगर। भक्ती ज्ञानाचे माहेर।।१।। भक्ती स्वानंदा मिळवी। जन्ममृत्यू हा नुरवी।।२।। भक्तीविण ज्ञान स्थिर। नव्हे नव्हे साक्षात्कार।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। साधुजनांची विश्रांती।।४।।

५०५. अनेक जन्मांचा शीण तो हरी रे। पाय ते स्मरा रे प्रेमयुक्त।।१।। प्रभो तो दयाळ भक्तीने वश रे। त्याप्रती असे रे भक्ती प्रिय।।२।। नाशिवंता भुलू नका करा काही हित। तोचि खरा आप्त दिसे मज।।३।। आपुले मनी हो पाहा विचारून। सुखासी कारण हेचि दिसे।।४।। कामामाजी काम भक्ती प्रेमे करा। भवाचा तो वारा लागू नेदी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती नवविध। जाणे तोचि सिद्ध जाणावा हो।।६।।

५०६. अहो अपरोक्ष ज्ञान। होता होय समाधान।।१।। ब्रह्माकार होय वृत्ती। ज्ञानियाते ब्रह्मप्राप्ती।।२।। ज्ञान गुरुकृपे होय। स्मरा प्रेमे प्रभोपाय।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ति-। योगे होय ज्ञानप्राप्ती।।४।।

५०७. भक्ती माता भक्ती पिता। भक्ती कुळाची देवता।।१।। भक्ती गुरू भक्ती धन। भक्ती स्वानंदजीवन।।२।। भक्ती विज्ञानभूषण। भक्तीविण सर्व शीण।।३।। भक्ती नेतसे निजधामा। सखा करा तो परमात्मा।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ति-। सुख भक्त ते सेविती।।५।।

५०८. मुखे वेद तो बोलिला। भक्ती प्रिय ती देवाला।।१।। भक्तीविण सर्व शीण। हो का पंडित व्युत्पन्न।।२।। नासिकेविणें ते मुख। भक्तीविण सर्व फिके।।३।। भक्ती प्रिय ती प्रभोला। सखा भाविकाचा झाला।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय प्रभुप्राप्ती।।५।।

५०९. कर्मनदी लोंढा मोठा। त्रिताप येथे उडती लाटा।।१।। फार जीव कासावीस। झाला परि न तुटे पाश।।२।। अनंत यातना हो भोगी। सुख नाही जीवालागी।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करिता पाश हो तुटती।।४।।

५१०. शिव भक्तांची माउली। करी अंगाची साउली।।१।। भक्ता प्राणचि तो मानी। अती दयाळू शूळपाणि।।२।। आपुले स्वरूपी मेळवी। जन्ममृत्यू हा नुरवी।।३।। वेगी करा सखा करा। मिथ्यामय हा पसारा।।४।। मृगजळापरी

सर्व। एक सत्य सदाशिव।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा सुटे भवभ्रांती।।६।।

५११. भक्तीविण उद्धरिले। नाही कोठे ऐकिले।।१।। अहो ऐका लहान थोर। भक्ती करा घ्या ते सार।।२।। भक्ती सर्वत्र साधना। जीवन पुरते आणा ध्याना।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। भक्तीद्वारी चारी मुक्ती।।४।।

५१२. सोनार तो सोने पाहे हो घासून। नंतर मोजून घेत असे।।१।। कसोटीते आले तेव्हा ते घेतले। मोलाते चढले खरे म्हणूनि।।२।। तैसा देवराव भक्ताते कसून। पाहे पंचानन दीनानाथ।।३।। तुकी उतरता करी रे समान। आपुले आसन देतो नाथ।।४।। निष्काम भक्तीचे हे रे बा लक्षण। कामिकाते धन वैभव देतो।।५।। लक्ष्मण म्हणे करावी ती भक्ती। प्रभोपायी वस्ती जेणे होय।।६।।

५१३. भावापाशी देव वसे। भावे वश तो महेश।।१।। शुद्ध भावे होय सिद्ध। विपरीत भावे हो बद्ध।।२।। विपरीत भाव सांडा संग। शुद्ध भावे भरा रंग।।३।। ब्रह्मभावना मनाते। देतो सौख्य या जीवाते।।४।। भृंगीध्यासे अळी भृंगी। तेवीं सौख्य भक्तालागी।।५।। लक्ष्मण म्हणे ध्याती। देव भक्त ऐक्य होती।।५।।

५१४. भाव साधनाचे मूळ। भावे सौख्य अढळ।।१।। भावे देव येतो हाता। तुटे जन्ममरण गुंता।।२।। अभाविका कैची गती। फेरी न चुके कल्पांती।।३।। भाव शुद्ध करा वेगी। वश होतो शिवयोगी।।४।। नका वाटू विषयी मन। दु:ख विषयी दारुण।।५।। लक्ष्मण म्हणे भाव। ब्रह्मानंदाचे वैभव।।५।।

५१५. शुद्ध भावाचे उदक। किंचित घेता होतो तृप्त।।१।। जातिकूळ न विचारी। भक्तापाशी मदनारी।।२।। राज्यधनादी संपत्ती। विद्या न देखे पशुपती।।३।। भाविकाते सापडला। त्याचा सर्वस्वी हो झाला।।४।। भक्ती प्रिय सर्वोत्तमा। भक्ता मानीतसे आत्मा।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। भाव शुद्ध तो करा रे।।६।।

५१६. अनंत ब्रह्मांडाचा स्वामी। तो हा भक्तास्वाधीन।।१।। ब्रह्मादिका अगोचर। अमरा गोचर होईना।।२।। भाविकाच्या पत्रासाठी। उडी घाली तो त्वरे।।३।। तृप्त होऊनि स्वाधीन। झाला सर्वस्वी बाप।।४।। शंभो भक्तांनी

जिंकिला। भावबळे करूनि।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। माउली ही ज्ञानाची।।६।।

५१७. भक्ती मूळ पाया खरा। धावूनि देव येतो घरा।।१।। पूर्वी फारांनी ईश्वर। केला भक्तीने किंकर।।२।। भक्ती सार सर्वाहून। भक्ती ज्ञानाचे भूषण।।३।। भक्ती कामधेनू पूर्ण। भाविकाचे हे भूषण।।४।। शब्दज्ञानी हे नेणती। सदा विवाद करिती।।५।। लक्ष्मण म्हणे शूर। भक्ते जिंकिला शंकर।।६।।

५१८. मुख्य भक्तीचा निर्धार। प्राज्ञ जाणती हे सार।।१।। सर्वांभूती सदाशिव। पाहा अक्षयी कृपाळुव।।२।। स्वानुभवाच्या या खुणा। काय कळे त्या अज्ञाना।।३।। खंडभक्तीने संश्रुती। न तुटे हो कल्पांती।।४।। अक्षयी स्तवावा शंकर। तेणे बाणे हा निर्धार।।५।। लक्ष्मण म्हणे भजन। करा होतसे कल्याण।।६।।

५१९. सगुण भक्ताने बा केले। तुज वैभव ते दिले।।१।। केवळ निर्गुण होतासी। वैभव दिले तुजसी।।२।। भक्तास्तव ही संपत्ती। अनंत ब्रह्मांडे उत्पत्ती।।३।। भक्ते दिले शस्त्र हाती। भक्ते दिधली विभूती।।४।। भक्ते दिधले अलंकार। व्याघ्रांबर गजांबर।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ता-। पाशी अक्षयी वसशी ताता।।६।।

५२०. भक्तीपाशी चारी मुक्ती। वसे अद्वय संपत्ती।।१।। अद्वय सुखाते दृष्टान्त। नसे नसे त्रैलोक्यात।।२।। दिसे जितुके दुसरे। मायामय मिथ्या बा रे।।३।। अहो विभक्तीच नाही। श्रेष्ठ भक्ती ही जाणावी।।४।। प्राज्ञ जाणती ही खूण। ब्रह्ममय ते आपण।।५।। लक्ष्मणी भक्ती प्रीती। सदा सर्वदा संपत्ती।।६।।

५२१. आपणचि देव आपणचि भक्त। अव्यक्त तो व्यक्त भक्तामुळे।।१।। स्वमाये हा केला अनेक पसारा। अनादी सोयरा एकलाचि।।२।। सूत्रकार सूत्र नाचवी वेगळा। जाणीव ही कळा मायादेवी।।३।। मायेचा तू साक्षी आकाशाचे परी। विश्वाचे अंतरी विश्वबाह्य।।४।। परि भक्तापाशी अक्षयी वसतसे। भक्ताने अविनाश साठविला।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती करा वेगी। स्वामी माझा जगी भरलासे।।६।।

५२२. परीस लोखंडाते भेटे। तेथे सोनेपण उठे।।१।। परीस खापरा भेटला। परि तो शीणची झाला सारा।।२।। तैसे अभक्ताते ज्ञान। कैसे होईल ते पूर्ण।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। तेथे ज्ञानाची हो प्राप्ती।।४।।

५२३. जेथे वसे भक्तिलेश। तोचि जाणावा पुण्यांश।।१।। तोचि स्वहित करील। जगी मान्य तो होईल।।२।। भक्ती आहे नवविध। लक्षण जाणे तोचि सिद्ध।।३।। नऊ जणांनी भक्ती केली। जगज्जननी वश केली।।४।। लक्ष्मण म्हणे करा भक्ती। भक्तीपाशी वसे मुक्ती।।५।।

५२४. शिवाप्रती गाता सुख होई फार। पापांचा संहार होत असे।।१।। पाप नासूनिया शिवप्रद प्राप्त। नाम सदोदित गा हो प्रेमे।।२।। भृंगीध्यासेकरून अळी भृंगी होय। पूर्वपदा जाय निजध्यासे।।३।। तेवी देवभक्ता होतसे मिळणी। स्तवा शूळपाणि दयाळू हो।।४।। लक्ष्मण म्हणे गेले जे शरण। नाही परतून आले पुन्हा।।५।।

५२५. आगम निगम श्रेष्ठ ते सांगती। करावी हो भक्ती परेशाची।।१।। भक्ती ती निष्काम तेथे सुख फार। तेणे विश्वंभर वश होय।।२।। निष्कामावाचून सुख ते दिसेना। भ्रम ही मिटेना भक्तीविण।।३।। करावी ती भक्ती तुटे येणे जाणे। फलाशा धरून गुंतू नये।।४।। लक्ष्मण म्हणे फलाशेची गोडी। अज्ञान बापुडी गुंतती हो।।५।।

५२६. भक्तिसुख घेऊ चला। दुर्धर अविद्येचा घाला।।१।। क्षण क्षण ही नाचवी। घालीतसे दुःखार्णवी।।२।। प्रभोपायाचा तो स्मर। होऊ नेदी ही अनिवार।।३।। लक्ष्मण म्हणे खोटे। जगा खरे कैसे वाटे।।४।।

५२७. आधी भक्ती ती करावी। प्रेम रहावे हो पायी।।१।। भक्तीविण गोष्ट फोल। उष्णकाळी न दिसे ओल।।२।। अहो प्रभोचे जे होती। तनुमने शरण जाती।।३।। धन केले लिंगार्पण। धन्य धन्य ते प्रवीण।।४।। त्याहा शरण लक्ष्मण। अनाथ हीन पतित दीन।।५।।

५२८. शिवा विसंबेना शिवा विसंबेना। भक्ता हो लागेना भववायू।।१।। अंगाची सावली भक्तावरी करी। भक्ताचा कैवारी सत्य जाणा।।२।। भक्ती हा पदार्थ प्रिय देवाप्रती। भक्तापाशी मुक्ती वसे सदा।।३।। लक्ष्मण म्हणे देव जाश्वनीळ। फार रे स्नेहाळ वश करा।।४।।

५२९. जेथे वसे भक्ती ज्ञान। तोचि जाणावा प्रवीण।।१।। तेथे वैराग्य ही वश। त्याहा वश तो महेश।।२।। तेथे सुखा अंत नाही। ब्रह्मानंद तो अक्षयी।।३।। लक्ष्मण म्हणे तृप्त। सदा स्वानंदभरित।।४।।

५३०. जो जो पदार्थ पाहाल। दृश्य तितुके दिसे फोल।।१।। द्रष्टा आहे तो दृश्याचा। स्वामी साक्षी तो सर्वांचा।।२।। घटा अंतरी आकाश। तैसा भूती तो महेश।।३।। ज्ञाते परतवूनी मन। प्रेमे धरिती चरण।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। तेथे नसे हो विभक्ती।।५।।

५३१. भावापाशी देवराव। दृढ धरावा बा भाव।।१।। अहंकृतीने दिसेना। गर्वापाशी तो येईना।।२।। भक्ती प्रिय देवाप्रती। भक्तापाशी तो पशुपती।।३।। निगर्वी होता जाण। देही दिसे भगवान।।४।। लक्ष्मण म्हणे देव। दयाळू फार कृपाळुव।।५।।

५३२. अनंत ब्रह्मांडे निर्मिली। इच्छामात्रे प्रभूने केली।।१।। आपण स्वस्थ सदोदित। प्रभो मायागुणातीत।।२।। ऐसा प्रभो शिव धनी। त्याते विसरले प्राणी।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते। भक्ते जिंकिले परतल्या चित्ते।।४।।

५३३. देव भावाचा भुकेला। भक्ती प्रिय हो देवाला।।१।। भक्तास्तव अनेक रूप। घेत आहे विश्वरूप।।२।। त्याला भक्तीची वेसण। धावे संकटी आपण।।३।। लक्ष्मण म्हणे देव दयाळ। रक्षिले अनाथ दुर्बळ।।४।।

५३४. भक्ती निष्काम करावी। भक्ती निष्कामचि बरवी।।१।। न मागे त्या प्रभो देतो। योगक्षेम चालवितो।।२।। निष्कामाची प्रीती भारी। सदा वसे त्याचे घरी।।३।। शिव म्हणती अगे देवी। त्याचे स्वाधीन मी गे पाही।।४।। लक्ष्मण म्हणे जना। स्मरा वेगी पंचानना।।५।।

५३५. प्रेमयुक्त भक्ती करी। तोचि प्रिय त्रिपुरारी।।१।। शहाणा पंडित पाहीना। भक्ती प्रिय पंचानना।।२।। भिल्ल कैलासासी नेला। गणांमाजी बैसविला।।३।। भक्त असो भलते यातीचा। देव सखा हो त्याहाचा।।४।। लक्ष्मण झाला दीन। कोण त्राता तुजवाचून।।५।।

नवविधा भक्ती

५३६. प्रथम भक्ती ही श्रवण। श्रवणे फळ पावे पूर्ण।।१।। सारासारभाव कळे। तन मन हे आकळे।।२।। धरी विषयी विरक्ती। घडे संत ती संगती।।३।।

सुख फार होय जीवा। श्रवण लाभे त्या सदैवा।।४।। सर्व अंगाचे ते कान। करूनि करावे श्रवण।।५।। श्रवणे फार सुखी झाले। वेदी पुराणी वर्णिले।।६।। लक्ष्मणा ही प्रचीती। श्रवणमात्रे झाली प्राप्ती।।७।।

५३७. कीर्तनभक्ती ही दुसरी। भजने तरल्या नरनारी।।१।। अहो प्रेमे रात्रंदिन। भावे करावे कीर्तन।।२।। भजने मनोमळ जाय। शुद्ध अंत:करण होय।।३।। प्रेमळाचिये कीर्तनी। प्रेमे नाचे शूळपाणि।।४।। प्रेमळाते धरी पोटी। महाराज तो धुर्जटी।।५।। लक्ष्मण म्हणे स्तवा। जन्म मृत्यू चुके गोवा।।६।।

५३८. तिसरी भक्ती ही स्मरण। स्मरणे होई समाधान।।१।। अक्षयी स्मर तो असावा। कदा विसर नसावा।।२।। शिवस्वरूपाचा स्मर। सर्व साधना माहेर।।३।। अळी भिंगोटीचे परी। भक्ता प्राप्त त्रिपुरारी।।४।। प्रेमे करा हो स्मरण। सखा होतो पंचानन।।५।। लक्ष्मण म्हणे तात। केला भक्ताने अंकित।।६।।

५३९. पादसेवन ही भक्ती। प्रेमे जाणावी ही संती।।१।। पाय सेवावे अवीट। कदा न पडावी तूट।।२।। चरण प्रेमे ते सेवावे। तेथे अक्षयी वसावे।।३।। गुरुचरणाची गोडी। घ्यावी प्रेमे ती आवडी।।४।। आवडी चढती असावी। भेदबुद्धी ही नसावी।।५।। लक्ष्मण म्हणे मन। येणे होय ते उन्मन।।६।।

५४०. भक्ती पाचवी अर्चन। प्रेमे करावे पूजन।।१।। अर्चन आवडी करावे। भेदभावाते ग्रासावे।।२।। मी करितो हे अर्चन। हे तव न उरावे भान।।३।। 'शिवं भूत्वा शिवं यजेत्' ती। ऐसी वेदांची त्या उक्ती।।४।। येणेप्रमाणे अर्चन। होता होय समाधान।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। भावापाशी महादेव।।५।।

५४१. केले वंदन खंडेना। तेचि वंदन हो जाणा।।१।। वंदनभक्तीची परी या। तुटी न पडावी पाया।।२।। भ्रमर पुष्पी त्या मकरंद। तेवी वंदनाचा स्वाद।।३।। अक्षयी सुख तेचि घ्यावे। विषयसुख विसरावे।।४।। शिवचरणाचा स्वाद। तेणे होय ब्रह्मानंद।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। वेगी कार्य हे साधा रे।।६।।

५४२. दास्य भक्ती ही सातवी। जिने चुके गाथा गोवी।।१।। मी तू नुरवी ती सेवा। अती प्रिय सदाशिवा।।२।। अहो तन मन धन। अंतःकरण पंचप्राण।।३।। सदा स्वरूपी रमावे। पायावेगळे न व्हावे।।४।। भक्तीपाशी चारी मुक्ती। भक्तिप्रिय पशुपती।।५।। लक्ष्मण म्हणे बाप। दासाधीन विश्वरूप।।६।।

५४३. सख्य भक्ती ही आठवी। भक्त जना प्रभो आई।।१।। सखा निजप्रभू केला। जे का विटले विषयाला।।२।। राज्य ब्रह्मांडे वमन। शिव सखे मानिती प्राज्ञ।।३।। पळमात्रही विस्मर। न पडे भक्तराजा शूर।।४।। शिव सखा तो करा हो। मिथ्यामय सर्व हे हो।।५।। लक्ष्मण म्हणे विजयी। शिवसखे ते अक्षयी।।६।।

५४४. आत्मनिवेदन भक्ती। सनकादिकांची संपत्ती।।१।। आठ भक्तीचा कळस। आत्मस्वरूपी हा वास।।२।। दीपकर्पूराचे परी। येथे नसे काही उरी।।३।। मेघबिंदू त्या सागरी। लवणजीवनाचे परी।।४।। वेद सिद्ध महाज्ञानी। झाली मिळणी या स्थानी।।५।। लक्ष्मण म्हणे वस्तु-। मय असे हा एकांतू।।६।।

'शिवपुराणा'तील भक्तिपंथाचे अभंग

५४५. शिव त्या पुराणी आहे व्यासवाणी। पाहा हो शोधूनि भक्तिपंथ।।१।। सर्वत्र गीर्वाण होते ऋषिमुनी। म्हणती शूळपाणि पूजावा हो।।२।। कोणी म्हणती विष्णुपूजन करावे। कोणी म्हणती सूर्य पूजावा हो।।३।। लक्ष्मण म्हणे करिती एक नेम। आपुलाले धर्म स्थापिती हे।।४।।

५४६. कोणी म्हणती चला नारायणापाशी। तोचि हा सर्वांसी सांगेल हो।।१।। त्रैलोक्य मंडळी मिळूनिया गेले। आदिपुरुषा स्तविले प्रेमभरे।।२।। कोण देव श्रेष्ठ त्वरेने कल्याण। करितो द्या सांगून प्रभो श्रेष्ठा।।३।। लक्ष्मण म्हणे आदिनारायण। प्रेमे तो भाषण करिता झाला।।४।।

५४७. सर्वा आद्य शिव ब्रह्मसनातन। भक्तास्तव सगुण झाला प्रभो।।१।। त्याचे आज्ञे सूर्य भ्रमण हो करी। वायू चराचरी वर्ते पाहा।।२।। वेद पाहा त्याचे आज्ञे बोलतसे। इंद्रिये ही दहा चेष्टती हो।।३।। लक्ष्मण म्हणे बोलतसे हरी। श्रेष्ठ त्रिपुरारी महाराज।।४।।

५४८. समुद्र हा झाला प्रभोसत्ते थोर। मर्यादेने नीर वर्ततसे।।१।। पृथ्वी ही भूते वाहतसे भार। अनेक व्यापार तुझे सत्ते।।२।। अनंत ब्रह्मांडे त्याचे सत्तेकरून। झाले हो निर्माण सत्ता श्रेष्ठ।।३।। विष्णू म्हणे त्याचे करा हो पूजन। मीही रात्रंदिन ध्यातो त्याला।।४।। लक्ष्मण म्हणे हरी म्हणे लोका। पुजा त्या त्र्यंबका प्रेमयुक्त।।५।।

५४९. मी नित्य प्रेमे करितो लिंगार्चन। माझेही कल्याण शिवकृपे।।१।। असंख्य ही युगे गेली त्याचे ध्यानी। प्रभोची करणी न कळे कोणा।।२।। आपुले आपण करीतसे ध्यान। सगुण निर्गुण इच्छे वर्ते।।३।। लक्ष्मण म्हणे सर्वत्र ऐकिती। प्रभो रमापती काय बोले।।४।।

५५०. सनातन धर्म त्याज रे पासून। स्वानंदजीवन प्रभो आहे।।१।। निष्काम भक्ताते होय ब्रह्मप्राप्ती। सकामा संपत्ती राज्यधन।।२।। प्रभोचा विसर दुःखाचा बाजार। यातना अपार जीवाप्रती।।३।। लक्ष्मण म्हणे शिव शिव वदती। त्याते उत्तम गती देतो तात।।४।।

५५१. हरी म्हणे त्वरा करा करा करा। भक्तिगंगा धरा अतिप्रिय।।१।। बिल्वदळे करून करा लिंगार्चन। अष्ट सुगंधाने प्रेमभरे।।२।। बहु युगे गेली मी करितो अर्चन। करा नामस्मरण दयाळू तो।।३।। लक्ष्मण म्हणे हरी म्हणे सर्वा। स्तवा महादेवा सुखी व्हाल।।४।।

५५२. जाती कूळ गोत्र न पाहे शंकर। करितो उद्धार महाराज।।१।। वर देण्याप्रती प्रभो तो उदार। दयेचे आगर महाराज।।२।। मायेच्या वेगळा मायेते चेष्टवी। त्रिभुवनगोसावी महादेव।।३।। त्याचे आज्ञे आम्ही करितो कारभार। कल्याणाचे घर आहे तो हो।।४।। लक्ष्मण म्हणे प्रभो नारायण। करी तो भाषण सर्वांप्रती।।५।।

५५३. विष्णू म्हणे तुम्ही करा शिवभक्ती। भक्ती सर्वांप्रती श्रेष्ठ आहे।।१।। नाना योग याग साधने कठीण। भक्ती ही प्रधान सर्वाप्रती।।२।। युगे पूर्वी गेली नोहे कोणा गणना। तेथे योगिराणा भक्ती स्थापी।।३।। ब्रह्मदेवा हा हो भक्तियोग थोर। चालवी व्यापार भक्तिबळे।।४।। लक्ष्मण म्हणे आदिनारायण। आनंदे भाषण करी सर्वा।।५।।

५५४. कर्म उपासना तृतीय ते ज्ञान। नोहे भक्तीविण कोणाप्रती।।१।।

ज्ञानाची जननी भक्ती ही हो आहे। ज्ञानाविण नोहे आत्मप्राप्ती।।२।। भक्तीविण प्राणी कोण झाला थोर। मिथ्या हा संसार आहे हा हो।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती ही हो थोर। आनंदा माहेर प्रभो आहे।।४।।

शिवभक्त

५५५. भक्तांनी स्वामी तो जिंकिला शंकर। झाला विश्वंभर भक्ताधीन।।१।। कैलास सोडूनि येतो भक्तासाठी। भक्ताचिये कंठी मिठी घाली।।२।। जैसा भक्त भाव धरी तैसा होय। स्वानुभव सोय होय प्राप्त।।३।। बाळकाचे माता पुरवी लळे रे। तैसा शंकर रे पुरवी भक्ता।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ते केला दीन। हृदयी साठवून झाले स्वस्थ।।५।।

५५६. देव जिंका याचे आपणापाशी मूळ। भक्ती अती बळ श्रेष्ठ आहे।।१।। भक्तिपाशामाजी सापडे तो तात। भक्तीविण व्यर्थ सर्व शीण।।२।। विद्यावैभवाने न सापडे देव। मोठमोठे देव तेही शिणले।।३।। अनंत ब्रह्मांडे रोमी ऐसे धेंड। तो रे चंद्रचूड भक्ताधीन।।४।। भक्त त्याते प्रेमे नाचविती बा रे। भक्त त्रैलोक्यी रे विजयी श्रेष्ठ।।५।। लक्ष्मण म्हणे भक्तिरस घ्या हो। शिव तो सखा हो भाविकाचा।।६।।

५५७. भक्ताचे स्वाधीन तुम्ही उमापती। भक्ते तुजप्रती जिंकिले रे।।१।। अनंत ब्रह्मांडे तुझे रोमी वसती। ऐसी तुझी कीर्ती देवराया।।२।। तुजला भक्तांनी हृदयी साठविले। सुखरूप धाले ब्रह्मानंदे।।३।। भक्ताचा महिमा श्रेष्ठा वर्णवेना। तुज पंचानना भक्ती प्रिय।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तापुढे देवा। यत्न तुझा शिवा न चले रे।।५।।

५५८. भक्तांनी तुजला जिंतिले रे देवा। अरे कृपाळुवा पुरातना।।१।। ब्रह्मांड हे राज्य तुझे भक्त करिती। त्रिभुवनपती भक्त तुझे।।२।। भक्ताने तुजला सर्वस्वी जिंकिले। त्याहाचे रे केले मोडी नाशी।।३।। आप्त सहोदर भक्त तुज जाण। तुज भक्ताविण न गमे रे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तास्वाधीन रे। का रे झालासी रे जगन्नाथा।।५।।

५५९. भक्तीचा जिव्हाळा तोचि श्रेष्ठ प्राणी। धन्य त्याची जननी जाणा की हो।।१।। द्रव्यवानाप्रती तुम्ही श्रेष्ठ माना। वर्णा मोठेपणा सावकाश।।२।। असो दीन परि भक्तीचा जिव्हाळा। तोचि रे मानिला श्रेष्ठ देवा।।३।। विद्या

वैभव रे देवा आवडेना। भक्तापाशी राणा वश सदा।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य तेचि नर। नामाचा उच्चार करिती सदा।।५।।

५६०. पतितपावन नाम तुझे वेदी। दासाघरी सिद्धी तिष्ठविसी।।१।। तुझी कृपा होता रंक होय राजा। शिवा वृषभध्वजा दयाळू तू।।२।। तुझे भक्त जे का निधडे ईश्वरा। ऋद्धीचा तो वारा लागू न देती।।३।। ब्रह्मांड हे राज्य वमन मानिती। ऐसे तुझे ते रे श्रेष्ठ भक्त।।४।। लक्ष्मण म्हणे तुझे कृपाबळ। भक्त सर्वकाळ सदा सुखी।।५।।

५६१. भक्ताने तुजला आणिले रूपाते। भक्ताने महत्त्व वाढविले।।१।। नामरूप नाही संग तुजप्रती। नादबिंदुकलातीत तू रे।।२।। भक्ताने तुजला नामही ठेविले। सगुणत्व दिले रूप तुज।।३।। आपुलिया प्रेमे तूते नाचवीत। धन्य धन्य भक्त तुझे देवा।।४।। श्रुती परतल्या म्हणती नेति नेति। भक्त राबविती तेचि ब्रह्म।।५।। लक्ष्मण म्हणे भक्तिजाळ्यामधी। तुज कृपानिधी गवसविले।।६।।

५६२. शिव म्हणे कृतांताते। तुम्ही वंदावे भक्ताते।।१।। असो भलते यातीचा। परि तो आत्मा हो आमुचा।।२।। तेथे तुमचा प्रवेश। होता करीन मी नाश।।३।। शिक्षा लावीन तुम्हाला। ऐसा ईश्वर बोलिला।।४।। ब्रह्मादिक सुरपती। भावे भक्त सन्मानिती।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। प्रेमे शंकर स्तवा रे।।६।।

५६३. होते समस्त गीर्वाण। ब्रह्म इंद्र नारायण।।१।। त्याहा देखता ईश्वर। यमा बोलिला उत्तर।।२।। माझ्या भक्ताच्या रे वाटे। तुम्ही न जावे श्रेष्ठे।।३।। भक्त मजला वंद्य रे। त्याते तुम्ही पूजावे रे।।४।। तेथे भक्तिसुख थोर। भक्त विजयी निर्घोर।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। प्रेमे शंकर पूजा रे।।६।।

५६४. सूर्यपुत्राते शंकर। करी आज्ञा विश्वंभर।।१।। माझ्या भक्ताचे नाव रे। तुम्ही कदा घेऊ नेरे।।२।। भक्तावरी यमदंड। फिरवी ऐसा कोण मूढ।।३।। निर्वंश रे करीन। माझ्या भक्ता करिता विघ्न।।४।। ऐसा ब्रीदाचा अभिमान। शिवाप्रती आहे पूर्ण।।५।। लक्ष्मण म्हणे त्याते। स्तवा वंद्य व्हा यमाते।।६।।

५६५. शिव म्हणे रे कृतांता। वंदावे त्वा माझे भक्ता।।१।। भक्त प्रिय सर्वांहून। मजला आहेत रे जाण।।२।। स्वामी गजाननाहून। प्रिय भक्त मजकारण।।३।। अर्धअंगी ही पार्वती। तिजहून प्रिय भक्तमूर्ती।।४।। भक्ता मागे मोहरे मी रे। सदासर्वदा फिरे रे।।५।। भक्तापाशी यमदूत। येता करीन निःपात।।६।। लक्ष्मण म्हणे बा रे। वचन पुराणीचे हे रे।।७।।

५६६. यमाप्रती बोले देव। पूर्णब्रह्म सदाशिव।।१।। माझे भक्ताचिये द्वारा। न जावे त्वा सूर्यकुमरा।।२।। तुझा दूत तेथे जाता। तुज विघ्न रे कृतांता।।३।। यमपुराते जाळून। तुझा घेईन मी प्राण।।४।। असो कोणतीही याती। परि वंद्य तुम्हाप्रती।।५।। लक्ष्मण म्हणे बाप। सखा करी विश्वरूप।।६।।

५६७. शिव म्हणे कृतांता रे। माझा कोप दारुण रे।।१।। तुजला आहे ठाऊक रे। आणिक सांगतो ऐक रे।।२।। माझ्या भक्ताचे हेळण। करी जो पतित दुर्जन।।३।। त्याचा शिरच्छेद करीन। दुःख दारुण दावीन।।४।। तुजला असावा स्मर। करी पोक्त रे विचार।।५।। लक्ष्मण म्हणे शिवा। भक्त-अभिमान देवा।।६।।

५६८. जेथे माझे नामस्मरण। जेथे माझे लिंगार्चन।।१।। तेथे तुम्ही न जावे रे। शिव यमाते वदे रे।।२।। ऐसे प्रभोचे वचन। आहे सत्य हे जाणून।।३।। करा प्रेमे नामघोष। प्रेमे आळवा महेश।।४।। लक्ष चौऱ्याऐंशी बा रे। फेरी चुकवा वेगी रे।।५।। लक्ष्मण म्हणे धनी। फार दयाळू शूळपाणि।।६।।

५६९. यमा म्हणे उमाधव। भोळा उदार तो देव।।१।। जेथे माझे गुण गाती। तेथे वसे मी पशुपती।।२।। तेथे तुमचिया गणा। प्रवेश नोहे नोहे जाणा।।३।। माझे आवडते बाळ। भक्त प्रिय ते प्रेमळ।।४।। माझ्या प्रेमळाते वारा। तुमचा नसावा रे क्रूरा।।५।। लक्ष्मण म्हणे ऐसे। आहे स्तवा तो महेश।।६।।

५७०. ऐक दक्षिणदिशापती। शिव बोले कृपामूर्ती।।१।। तुज सांगतो प्रखर। जेथे नामाचा उच्चार।।२।। प्रेमे आनंदे गर्जती। तेथे आहे माझी वस्ती।।३।। माझे वत्स ते धाकुटे। न जावे रे त्याच्या वाटे।।४।। माझी आवड त्या फार। ऐसे वदे गंगाधर।।५।। लक्ष्मण म्हणे नाम। सखा होतो सर्वोत्तम।।६।।

५७१. भक्तापुढे तुझे सामर्थ्य चालेना। यत्न रे सुचेना तुजप्रती।।१।। भक्ते तुजला रे सर्वस्वी जिंकिले। भक्तीने घेतले तुझे पद।।२।। सोऽहं शब्दाचा करिती ते मार। तुझा रे विचार खुंटविला।।३।। अनंत ब्रह्मांडा तुझे आवरण। भक्ताचे स्वाधीन झालासी तू।।४।। लक्ष्मण म्हणे अहो सदाशिवा। भक्तापाशी देवा वसशी सदा।।५।।

५७२. शिवभक्तापुढे काळ काय करी। येईना तो घरी त्याहाच्या रे।।१।। शिवभक्ताचे रे काळा भय फार। स्वामी आहे क्रूर सदाशिव।।२।। थोरांचा आश्रय मग भय काय। त्रैलोक्याचा राय स्वामी श्रेष्ठ।।३।। धन्य शिवभक्त धन्य शिवभक्त। जाहला अंकित महादेव।।४।। लक्ष्मण म्हणे शिवभक्ताप्रती। म्हणे कृपामूर्ती उद्धरा हो।। ५।।

५७३. शिवभक्ताचे रे घडो मज दर्शन। पतितपावन शिवभक्त।।१।। धन्य पुण्यवंत धन्य पुण्यवंत। शिवाते स्तवीत अक्षयी प्राणी।।२।। जन्मूनिया त्यांनी सार्थक रे केले। भक्तिबळे केले वश देवा।।३।। शिवनामामृत पिऊनिया धाले। अक्षयी रमले स्वरूपी ते।।४।। लक्ष्मण म्हणे समान हो वृत्ती। अक्षयी डुल्लती आनंदे ते।।५।।

५७४. शिवाचे पूजन अक्षयी करिती। धन्य त्या हो मूर्ती जाणाव्या हो।।१।। बिल्वदळ प्रेमे शिवाते अर्पिती। नाम ते गर्जती वारंवार।।२।। शिवनामावळी वाहाती लाखोळी। भक्ती चंद्रमौळीप्रती प्रिय।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य तोचि नर। त्याहाचा संसार धन्य जाणा।।४।।

५७५. नित्य बिल्वदळ शिवा समर्पिती। मज त्याची कीर्ती वर्णवेना।।१।। शिवाते आहे रे बेलाची आवडी। बिल्व प्रभोप्रती वाहा तुम्ही।।२।। भोलानाथ प्रभू कृपेचा सागर। प्रेमा भक्तावर आहे त्याचा।।३।। लक्ष्मण म्हणे करितो कल्याण। करा हो पूजन प्रेमयुक्त।।४।।

५७६. शिवाते पूजिती नाम प्रेमे घेती। अभिषेक करिती लिंगाप्रती।।१।। गंध धूप दीप नैवेद्य अर्पिती। स्तवन करिती प्रभूचे जे।।२।। अतिथीपूजन करिती जे भक्त। आलियाते देत अन्न प्रेमे।।३।। धन्य तो संसारी धन्य तेचि नर। त्याते उमावर वश होय।।४।। लक्ष्मण म्हणे त्याहाचे दर्शन। होईन पावन मी रे दीन।।५।।

५७७. स्वानुभवसुख सार। व्यर्थ बाह्य हा व्यवहार।।१।। लोकेषणा वित्तेषणा। चित्तेषणा दारेषणा।।२।। योगियाते नागविती। इतरांची कथा किती।।३।। सिद्धिबळे चमत्कार। जगा दाखविती फार।।४।। सर्व सिद्धी केल्या दासी। परि तो तुळेना मुक्तासी।।५।। कालांतरे सिद्धी त्या रे। करिती अव्हेर त्याचा रे।।६।। लक्ष्मण म्हणे भक्त। स्वानुभवे सदा तृप्त।।७।।

५७८. काशीयात्रेते हो गेला। जाता मार्गी घाला झाला।।१।। कर्महीन होता खळ। गेला पंचक्रोशीजवळ।।२।। मार्गी जाता कळवातीण। फार पाहिली लावण्य।।३।। विश्वनाथा विसरला। तिशी रमूनि राहिला।।४।। द्रव्य सरता तोंडावर। मारून तिने केला दूर।।५।। ऐसा सिद्धीचा पसारा। भ्रष्टवी ती तपेश्वरा।।६।। लक्ष्मण म्हणे भक्त। प्रभोपायी हो निवांत।।७।।

५७९. देशाधिपती झाला राजेश्वर। वैभवे शंकर भेटेना हो।।१।। भक्त असो कैसा दरिद्री कुरूप। त्याते विश्वरूप भेटे तात।।२।। त्याते भक्ती प्रिय दुजे प्रिय नाही। कूळ गोत्र काही न पाहे तो।।३।। लक्ष्मण म्हणे निष्काम ते भक्त। सर्वदा ध्यानस्थ शिवनामी।।४।।

५८०. भक्त तोचि थोर मी तू जेथे नाही। स्वानंदाचे डोही बुडाला हो।।१।। आप पर नाही समबुद्धी ज्याची। साउली सर्वांची तोचि झाला।।२।। षड्रिपू त्याचे स्वाधीन वर्तती। मनबुद्धीप्रती जिंकिले हो।।३।। निःसंग जो झाला मायामोहातीत। स्वरूपी निवांत निज अंगे।।४।। ब्रह्मा विष्णू रुद्र चरणीचे रज। वंदिती तो पूज्य त्रैलोक्या हो।।५।। त्याचे दर्शन दुर्लभ तो श्रेष्ठ। स्वानंदाची पेठ वसविली।।६।। लक्ष्मण म्हणे आमुचे ते धन। त्याहाचे चरण ध्यातो सदा।।७।।

५८१. कूळ ते पवित्र वीरशैववंशी। पावन जगासी करीतसे।।१।। देश तो पवित्र करी कृपेकरून। शिव पंचानन सखा ज्याचा।।२।। भक्ताचा महिमा अगम्य अपार। ब्रह्मादिका पार न कळे हो।।३।। निजानंदस्वरूपी रंगले जे भक्त। सर्वदा निवांत प्रभोपायी।।४।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त थोर। ब्रह्मांडा आधार त्याहाचा हो।।५।।

५८२. शिडी भक्तीची करून। भक्त गेले हो चढून।।१।। अलक्षपूर ते कैलास। भक्ते केला तेथे वास।।२।। पायी राहिले अक्षयी। येणे जाणे त्याहा

नाही।।३।। निजकार्य हे साधिले। परब्रह्मी ते राहिले।।४।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। केला वश शूळपाणि।।५।।

५८३. तू रे स्वतंत्र नव्हेसी। भक्तास्वाधीन आहेसी।।१।। अनंत कोटी ब्रह्मांडे रे। तुझ्या रोमी वसती रे।।२।। ऐसा तू रे पुरातन। महाराज पंचानन।।३।। भक्ते हृदयी तुजला। साठविले रे स्नेहाळा।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ता। आत्मा मानिसी तू ताता।।५।।

५८४. शिवपूजकाचा महिमा अद्भुत। पुराणी विख्यात कीर्ती ज्याची।।१।। कैलासशिखरी ध्वजा हो फडकती। पूजका म्हणती या हो या हो।।२।। मनतंतूमाजी शिवाते गोवून। कंठी हो बांधून बैसले हो।।३।। प्रेमग्रंथीकरून बांधिला हो शिव। पूजकाचा देव सखा नित्य।।४।। लक्ष्मण म्हणे वेगी पूजा पूजा। कैलासीचा राजा भक्तापाशी।।५।।

५८५. शिवपूजनाची आवडी ज्या नित्य। वंद्य कृतांताते झाला तोचि।।१।। प्राणी ते हो जाती कैलासपंथी। कृतांत तयाते पूजी प्रेमे।।२।। अमरादि सुरगण करिती नमस्कार। म्हणती धन्य शूर भक्त हे हो।।३।। आमुचे हे पद उल्लंघूनि वरी। गेले त्रिपुरारी सखा केला।।४।। लक्ष्मण म्हणे शिवस्वरूप ते। झाले भक्तिपंथे भक्तराज।।५।।

५८६. शिवपूजकाते भवव्यथा नाही। शिवाते अक्षयी ध्याती नित्य।।१।। कायावाचामने करिती पूजन। अष्टभावेकरून करिती सेवा।।२।। नाना उपचार अर्पिती शंकरा। बिल्वदळ हरा अतिप्रिय।।३।। निष्काम ते भक्त सकामा हो परी। पूजिती त्रिपुरारी भक्तराज।।४।। लक्ष्मण म्हणे शिव त्याहापाशी। वसे अहर्निशी महाराज।।५।।

५८७. शिवलिंगपूजा करिती ते प्राज्ञ। शिवपंचानन सखा त्याचा।।१।। लिंगापाशी प्राण ठेविला त्याहाती। अक्षयी चरणी वृत्ती जडली।।२।। त्याहाचिया भाग्या पारचि हो नाही। धन्य त्याची आई धन्य तो हो।।३।। योगक्षेम त्याचा चालवी शंकर। अनन्य जे शूर भक्ती करिती।।४।। लक्ष्मण म्हणे अंतकाळी त्याते। आपणापाशी तात ठेवीतसे।।५।।

५८८. शिवपूजकाचा साह्यकारी शिव। स्वामी महादेव भोलानाथ।।१।। ब्रीदाचा अभिमान आहे प्रभोप्रती। पूजकाते गती देत असे।।२।। पतितपावन

नाम त्याला साजे। उभारिला ध्वज भक्तासाठी।।३।। कृतांत तो कापे शिव उपासका। ब्रह्मांडनायका भक्ती प्रिय।।४।। लक्ष्मण म्हणे शिव करा धनी। कीर्ती त्या पुराणी भक्तांची हो।।५।।

५८९. भाग्यवंत ते पुरुष। ज्याचे चित्ती शिव वसे।।१।। महालाभ झाला झाला। अंत नाही त्या भाग्याला।।२।। त्याची संगती घडावी। सुख तेथेचि अक्षयी।।३।। येर दुःखचि जाणावे। भ्रमती ते जीव प्राणी।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। संग देई कृपावंता।।५।।

५९०. शिव वसे ज्याचे मनी। धन्य धन्य तेचि प्राणी।।१।। सनकादिकाची संपत्ती। भाग्य त्याचे ते भोगिती।।२।। विषयी मन रते ज्याचे। मुकुटमणी ते मूर्खाचे।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते। स्वप्नी सुख नाही सत्य।।४।।

५९१. भक्त देवा आवडती। दुजी नाही त्याते प्रीती।।१।। अती प्रेमा भक्तावर। भक्तास्वाधीन शंकर।।२।। भक्त जे जे इच्छीतसे। ते ते पुरवितो महेश।।३।। थोर सान तो पाहीना। भक्ती प्रिय पंचानना।।४।। लक्ष्मण म्हणे बा रे। भक्तापाशी तो वसे रे।।।।

५९२. देवी भक्त तेचि शूर। सदा संतुष्ट निर्घोर।।१।। माझे स्वरूपी निमग्न। कदा ढळेना गे मन।।२।। ब्रह्मांड हे राज्य जाण। भक्त मानिती वमन।।३।। निंदा द्वेष विसरले। मन स्वाधीन गे केले।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। बोले अंबिकेते देव।।५।।

५९३. देवी भक्ताचे स्वाधीन। झालो म्हणे पंचानन।।१।। भक्त माझे ते पवित्र। सर्वमान्य ते सत्पात्र।।२।। परिवाराते जिंकून। झाले माझे पायी लीन।।३।। माझा पडेना विसर। सदा सुखी भक्त शूर।।४।। लक्ष्मण म्हणे नाथ। तेथे वसे दीनानाथ।।५।।

५९४. तुझे चरणकमळी स्थिर। राहिले ते निजभक्त।।१।। सनकादिक मुनीश्वर। चरणी वसती सर्वदा।।२।। चरणीचे रजःकण। इच्छिताती अमर।।३।। चरण तारक सर्वाला। विश्वव्यापका शिवा।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। मज दावा वेगेसी।।५।।

५९५. ब्रह्मा विष्णू सुर श्रेष्ठ। चरणरज इच्छिती।।१।। थोर महिमा पायाचा। वास करा वेगेसी।।२।। नाशिवंत संसार। येथे गुंतता दुःख।।३।।

पाय ध्याता दुःख नाही। शंभो सखा होतसे।।४।। शिवसखे ते विजयी। तिन्ही लोकी सर्वदा।।५।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा सर्व हे मिथ्या।।६।।

५९६. भक्त पाहू गेला देव। पाहातेपण विराले।।१।। नाही मार्ग फिरावया। लवणजीवनापरी।।२।। जेवी कर्पूरपुतळा। अग्नीमाजी रिघाला।।३।। वायू आकाशी तो मुरे। तव तेवी भक्त देवा।।४।। गंगा सागरी मिनली। नाही फिरली मागे।।५।। तेवी भक्त महाशूर। चरणकमळी सदा।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। मूळपाया हा जाणा।।७।।

५९७. त्रिपुर मर्दिला तो क्रूर। केले भक्त विजयी।।१।। दीनानाथ दीनबंधू। नाम साजे प्रभूते।।२।। बहुत रक्षिले संकटी। उडी घालूनि ताते।।३।। त्याते विसरले नर। म्हणूनि दुःख भोगिती।।४।। मनोभावे शरण गेले। सुख अक्षयी भोगिती।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। वश करा सुख घ्या हो।।६।।

५९८. शिवभक्ती केली ज्यांनी। त्यांची कीर्ती हो पुराणी।।१।। अहो स्वर्गींचे अमर। भक्तियोगे झाले थोर।।२।। अहो ब्रह्मांडसंपत्ती। भक्तियोगे ते भोगिती।।३।। भक्त चरणी राहिले। अक्षयी सुख त्या लाधले।।४।। जन्म मृत्यू चुकविला। शंभो स्वाधीन हो केला।।५।। लक्ष्मण म्हणे येर। दुःख भोगिती अघोर।।६।।

५९९. प्रेमे कर्म हो करिती। फल-आशा न धरिती।।१।। हेतुरहित जे कर्म। ब्रह्मप्राप्तीचे ते वर्म।।२।। तेणे विषयी विरक्ती। विरक्तीने शुद्ध मती।।३।। गुरुकृपा बाणे मग। भक्त होतसे निःसंग।।४।। ज्ञानबोधे सुख होय। स्वानुभव निरामय।।५।। लक्ष्मण म्हणे प्राप्ती। होय चुके पुनरावृत्ती।।६।।

६००. सुख या संसारी स्वप्नीही दिसेना। दुःख ह्या यातना नाना परी।।१।। त्रिविध हे ताप नाना हे आरोप। तेणे विश्वरूप अंतरला।।२।। माझे हे हो धन माझे पुत्र जाया। मानूनिया पाया अंतरले।।३।। नाना नरक घोर यातना भोगिती। दुःख हे कल्पांती ढळेना हो।।४।। नरकातील अळी नरक रुचे तिला। तेवी या जीवाला संगे झाले।।५।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त शूर। भवसिंधू पार झाले तेचि।।६।।

६०१. अहो पालथे घागरी। पाणी राहील कैसे वरी।।१।। तैसा अज्ञानाते बोध। कैसा होईल तो सिद्ध।।२।। वाळू शिजेना दुग्धात। तैसे जाणा ते

अभक्त।।३।। लक्ष्मण म्हणे ज्ञान। सेविती ते भक्तजन।।४।।

६०२. भक्त संसारी उदास। ध्याती परमात्मा महेश।।१।। म्हणूनि संसार सुखाचा। संग सदा स्वानंदाचा।।२।। अभक्त विषयी गुंतले। म्हणूनि दुःखार्णवी पडले।।३।। सदासर्वदा तळमळ। निंदाद्वेषाचा गोंधळ।।४।। लक्ष्मण म्हणे स्वप्नी। सुख नेणती ते प्राणी।।५।।

६०३. दुग्ध पाणी एक झाले। परि ते हंसे निवडिले।।१।। इतर पक्ष्या न कळे गती। हंस पक्षी ते जाणती।।२।। तैसे भक्त घेती सार। ब्रह्मानंद निरंतर।।३।। लक्ष्मण म्हणे देही। असूनि भक्त ते विदेही।।४।।

६०४. अहो धन्य तोचि बळी। अक्षयी स्मरे चंद्रमौळी।।१।। स्मरे मन स्वच्छ झाले। भेदपडळ निघाले।।२।। चरणकमळी केला वास। सुख अक्षयी त्याहास।।३।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। वश केला शूळपाणि।।४।।

६०५. भक्तापाशी भक्तिबळ। म्हणूनि गेली तळमळ।।१।। भक्ती नसे ज्याचे ठायी। तेथे दुःखचि अक्षयी।।२।। भक्तियोगे ज्ञान होय। प्राणी होय निरामय।।३।। शांतिघरी त्याहा वस्ती। प्रेमे स्वानंदे डुल्लती।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। अक्षयी तेथे महादेव।।५।।

६०६. वेडे वेड्याते भेटले। काय त्याला प्राप्त झाले।।१।। अंध अंधाते पाहून। काय निवडील रूप वर्ण।।२।। बहिरे बहिऱ्याते भांडले। शब्द ऐकिले की गेले।।३।। तैसे अभाविकाप्रती। कैची भक्ती ज्ञानप्राप्ती।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त। सुख घेती ते निवांत।।५।।

६०७. भक्ती सर्वत्र साधना। जीवन पुरते आणा ध्याना।।१।। भक्तीविण सर्व फोल। फोलापाशी कैचे मोल।।२।। भक्तिबळे सर्व प्राणी। गेले पाहा उद्धरूनि।।३।। लक्ष्मण म्हणे सार। भक्ती सर्वत्रा आधार।।४।।

६०८. आपला आपण करावा विचार। तेणे सुख फार होय जीवा।।१।। विचारविरहित करणे ते फोल। फोलापाशी मोल कैचे प्राप्त।।२।। आनंदसागरी भक्त राजहंस। क्रीडती महेश वश केला।।३।। लक्ष्मण म्हणे जीवन्मुक्त चारा। भक्षूनि शंकरा प्रिय झाले।।४।।

६०९. आपणा आपण ओळखिले नाही। तववरी नाही सौख्य कोणा।।१।। जपी तपी असो संन्यासी व्युत्पन्न। आत्मप्राप्तीविण फोल सर्व।।२।। कण

टाकूनिया भूसचि कांडिले। श्रम व्यर्थ गेले लाभ नाही।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त ते विजयी। जाणूनि सर्वही करिती शूर।।४।।

६१०. शिवाचे पूजन प्रेमे जे करिती। त्याते उमापती विसंबेना।।१।। स्मरा वेगी त्याते स्मरा वेगी त्याते। पावन दीनाते करी नाथ।।२।। इच्छित देतसे स्मरा तो महेश। तोडी भवपाश दयाळू तो।।३।। लक्ष्मण म्हणे त्याचे जे म्हणविले। कैलासाते गेले मिरवत।।४।।

६११. धन्य तो संसारी स्मरे त्रिपुरारी। मदनाचा अरी प्रिय जया।।१।। सदय हृदये प्रेमयुक्त गाय। वंदू त्याचे पाय प्रेमे आम्ही।।२।। अतिथी जो अन्न देतसे दयाळ। त्याते जाश्वनीळ विसंबेना।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य तेचि प्राणी। अक्षयी स्तवनी सादर जे।।४।।

६१२. धन्य तो संसार धन्य तोचि नर। उमाईचा वर विसरेना।।१।। रंगी जो रंगला वदे शिवलीला। प्रभो मानवला तयाप्रती।।२।। प्रपंच असूनि चित्त प्रभुचरणी। शिवा रे वाचूनि नेणे काही।।३।। लक्ष्मण म्हणे शिव त्याहापाशी। भक्तीने देवासी जिंकिले हो।।४।।

६१३. तोचि धन्य प्राणी तोचि धन्य प्राणी। प्रभोचे चरणी मन सदा।।१।। प्रभोचे रे गुण गातसे आवडी। तेणे केली जोडी आपुली हो।।२।। स्वानंदाचा कंद ध्यावा सदोदित। प्रभो कृपावंत आहे बाप।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती देवा प्रिय। प्रभोचिये पाय सोडू नको।।४।।

६१४. शिवाते जे ध्याती पावन ते होती। स्वर्गसुख घेती आनंदे जे।।१।। दिशेचे दिक्पती त्याचे कृपे वसती। गिरिजेचा पती दयाघन।।२।। शिवभक्ताप्रती काळही भितो रे। शिक्षा त्या लावी रे सदाशिव।।३।। भक्ताप्रती शिव कदा विसंबेना। त्याचा प्राण जाणा भक्त आहे।।४।। लक्ष्मण म्हणे शिव दीनानाथ। भक्तांचा तो नाथ वश करा।।५।।

६१५. शिवपदी स्थिर झाले तेचि शूर। त्याहाचा आधार ब्रह्मांडाते।।१।। आनंदभरित सदा समाधान। स्वरूपी रमून झाले तेचि।।२।। स्वये ब्रह्म झाले गुरुकृपे धाले। माथे तुकविले निर्जरांनी।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य योगीश्वर। अविद्येच्या पार झाले तेचि।।४।।

६१६. अक्षयी सुख तुजपाशी। सुख ते अक्षयी सेविशी।।१।। ते सुख न

देशी बा कोणा। सर्व सुखाचा तू राणा।।२।। ते सुख निजभक्ता देशी। अक्षयी वससी भक्तापाशी।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। विजयी त्रैलोक्यी विख्यात।।४।।

६१७. मोठे सुख प्रभोपाशी। प्रभो आनंदाची राशी।।१।। स्वर्गानंदाहूनि श्रेष्ठ। सुख आहे ते वरिष्ठ।।२।। विलास दिसे हा हो क्षर। क्षरातीत शिव अक्षर।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। वसती त्या आनंदात।।४।।

६१८. अहो सुख भक्तीपाशी। भक्त घेती अहर्निशी।।१।। सनकादिक योगीश्वर। तया सुख निरंतर।।२।। क्षुल्लकानंदा ते विटले। म्हणूनि सुखा पात्र झाले।।३।। लक्ष्मण त्याहा द्वारी। प्रेमे पडला भिकारी।।४।।

६१९. क्षुल्लकानंद भक्ताप्रती। नावडे ते प्रभो ध्याती।।१।। येथे पदोपदी गुंता। म्हणूनि ध्याती त्या शाश्वता।।२।। त्याहाचे सुख इतरा नाही। प्रभो सत्य रे अक्षयी।।३।। लक्ष्मण त्याहाचे श्वान। द्वारी राहिलो पडून।।४।।

६२०. कोमल बिल्वपत्र दळ। भक्त पूजिती महांकाळ।।१।। काशीनिवासियाप्रती। कोमल बिल्व ते वाहाती।।२।। सुख देतसे शंकर। करितो मायेचिया पर।।३।। लक्ष्मण म्हणे प्रेमे। पूजिती ते भक्त नेमे।।४।।

६२१. तुझे मायेचा विलास। येथे सर्वत्राचा वास।।१।। अनंत क्रीडा माया करी। तू तव आंतर बाहेरी।।२।। द्रष्टा आहेसी मायेचा। साक्षी आहेसी सर्वांचा।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। चरणी वसती सदोदित।।४।।

६२२. मृत्युंजय म्हणती श्रुती। भक्ता देतो उत्तम गती।।१।। अक्षयी आनंद आनंद। नित्य वसे ब्रह्मानंद।।२।। त्या आनंदाची चवी। भक्त घेती स्वानुभवी।।३।। लक्ष्मण म्हणे असार। त्यजून भक्त घेती सार।।४।।

६२३. तिन्ही लोकी भक्त शूर। अती शूर महावीर।।१।। महादेव त्याहापाशी। वसतसे अहर्निशी।।२।। त्याहा स्वाधीन शंकर। इच्छिले दे परमेश्वर।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। ज्ञप्तिमात्र महादेव।।४।।

६२४. चंदना अंगी तो सुवास परिमळ। आणि तो शीतळ करी अंगा।।१।। आपुलिया अंगा घासूनि घेतसे। सौख्य देत असे जगाप्रती।।२।। तैसे भक्तराज परोपकारी थोर। करिती उपकार आम्हावरी।।३।। लक्ष्मण म्हणे भजनी लाविती। भाग्यवंत किती वर्णू थोरी।।४।।

६२५. जीव मोहे झाला अती हो मोहित। अती विषयी रत भ्रमे सदा।।१।। क्षणामाजी एक क्षणामाजी एक। त्याते कैचे सुख दुःख फार।।२।। लक्ष्मण म्हणे शंकराचे दास। विषयी उदास सुख घेती।।३।।

६२६. सूर्यकुमर तो मारीतसे दुष्टा। दंडीतसे भ्रष्टा निरंतर।।१।। पापियाप्रती रे यमराव क्रूर। मारा अनिवार आहे त्याचा।।२।। शिवभक्ताप्रती येतसे शरण। करी रे पूजन भक्ताचे तो।।३।। भक्ताप्रती आहे तो रे धर्मराव। अभक्ता यमराव तो रे आहे।।४।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त तोही। मन शिवापायी वसे त्याचे।।५।।

६२७. त्रिकाल पूजन शिवाचे करिती। आनंदे करिती कीर्तन जे।।१।। मन सदा पायी वसे निरंतर। पायाचा विसर ज्याते नाही।।२।। त्याचे पाय दावा मज दीनाप्रती। पावन करिती आम्हा दीना।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त ते प्रवीण। वृत्ती समाधान त्याहाची हो।।४।।

६२८. शिव कृपावंत शिव कृपावंत। अनाथाचा हेत पुरवी हो।।१।। भक्त ते प्रवीण भक्त ते प्रवीण। चरणी गुंतून राहिले जे।।२।। धनद्रव्यादिक मानिती वमन। केला शिवार्पण देह ज्यांनी।।३।। निःसीम जे भक्त त्यांचा झाला दास। सोडीना त्याहास काही केल्या।।४।। लक्ष्मण म्हणे शिवा सर्वोत्तमा। तारी पूर्णब्रह्मा मज दीना।। ५।।

६२९. शिव म्हणे देवी भक्त मज प्रिय। धन्य भक्तराय सखे माझे।।१।। राज्य वैभव मज आवडेना। भक्ता विसंबेना कदा मी गे।।२।। असूनि जातिहीन मंद हीन दीन। मज प्रिय जाण भक्ती आहे।।३।। लक्ष्मण म्हणे शिव कृपाघन। भक्ताचे रक्षण करी सदा।।४।।

६३०. शिव म्हणे देवी प्रिय वराननें। भक्त ते प्रवीण माझे जाण।।१।। माझा विसर कदा पडेना त्याहासी। संतुष्ट मानसी माझे भक्त।।२।। ब्रह्मांडाचे राज्य मानिती वमन। मज गे वाचून प्रिय नसे।।३।। ऐसे भक्त पाहे निष्काम ते जाण। झालो मी स्वाधीन त्याहाच्या गे।।४।। लक्ष्मण म्हणे शिवा सर्वेश्वरा। माझा विश्वंभरा त्राता कोण।।५।।

६३१. शिव म्हणे देवी भक्ताचे लक्षण। करी जे श्रवण मम प्रिये।।१।। षड्रिपू त्यांनी केले गे स्वाधीन। मनही जिंकून झाले स्वस्थ।।२।। संतुष्ट

मानसी मन मजपाशी। चहूही देहांसी जाणती ते।।३।। ब्रह्मांडीचे राज्य थिक्कारिती जाण। माझे स्वरूपी जाण मिळती ते।।४।। लक्ष्मण म्हणे त्याहांचे दर्शन। अमरादी सुरगण इच्छितातीl।५।।

६३२. शिवाचे ते भक्त काळाते न भिती। अक्षयी गर्जती नाम मुखी।।१।। भक्तिबळे ते रे न मानिती कोणा। त्रैलोक्याचा राणा वश केला।।२।। दयाढाल त्यांनी पुढे रे करूनि। नामशस्त्र करूनि झाले बंड।।३।। झाले ते शूर मोठे ते झुंजार। काळा अनिवार झाले ते हो।।४।। लक्ष्मण म्हणे वश झाला शिव। स्वर्गीचेही देव मानिती त्या।।५।।

६३३. शिवाचे ते भक्त प्रेमळ ते फार। शिवाचे चाकर वंद्य सर्वा।।१।। इंद्र आदी देव त्याहा सन्मानिती। त्रिभुवनी कीर्ती भक्ताची हो।।२।। सदा ते निःसंग केला प्रभोसंग। झाले ते अभंग शिवकृपे।।३।। सर्वाते विरक्त शिवाते स्मरत। त्रैलोक्याचा नाथ केला दीन।।४।। लक्ष्मणा घडो त्याहाचे दर्शन। करी तो पावन हीनादीना।।५।।

६३४. सत्यवतिसुत गातसे रे गुण। भक्त ते प्रवीण तुझे देवा।।१।। मुनी तो गौतम करी लिंगार्चन। बगदालभ्य मुनी दास तुझा।।२।। वटपत्र शिरी घेऊनि बैसला। स्वरूपी रमला मुनी तुझ्या।।३।। कल्प रे अनेक होती जाती फार। तुझे भक्त शूर सर्वा वंद्य।।४।। लक्ष्मण म्हणे तुझे भक्त फार। प्रभो भक्ता वर तुम्ही देता।।५।।

६३५. दुर्वास मुनी ते शिवभक्त जाणा। ब्रह्मांडाचा राणा वश जया।।१।। लिंगार्चन मुनी करी तो प्रेमे रे। प्रभोचे रे पाय ध्यातो सदा।।२।। स्वर्गीचे हे देव दुर्वासा स्तविती। काळातेही भीती तयांची हो।।३।। साठी खंड्या अन्न पंच प्राणावती। लागे ऋषीप्रती अन्न फार।।४।। अन्न भक्षूनिया तो रे निराहारी। शिवभक्ताची थोरी पाहा की हो।।५।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त प्रवीण। त्याते पंचानन विसंबेना।।६।।

६३६. भृगूचा कुमर तो रे शुक्रमुनी। त्यांनी शूळपाणि पूजिला हो।।१।। शिव कृपावंत जाहले प्रसन्न। ऋषीचे कल्याण केले शिवे।।२।। अमृत संजीवनी मंत्र त्या दिधला। त्रैलोक्याते केला मुनी वंद्य।।३।। दैत्यगुरू तो आहे हो प्रवीण। शिवाते शरण आहे सदा।।४।। शुक्र तो कवी हो आहे

६२५. जीव मोहे झाला अती हो मोहित। अती विषयी रत भ्रमे सदा।।१।। क्षणामाजी एक क्षणामाजी एक। त्याते कैचे सुख दुःख फार।।२।। लक्ष्मण म्हणे शंकराचे दास। विषयी उदास सुख घेती।।३।।

६२६. सूर्यकुमर तो मारीतसे दुष्टा। दंडीतसे भ्रष्टा निरंतर।।१।। पापियाप्रती रे यमराव क्रूर। मारा अनिवार आहे त्याचा।।२।। शिवभक्ताप्रती येतसे शरण। करी रे पूजन भक्ताचे तो।।३।। भक्ताप्रती आहे तो रे धर्मराव। अभक्ता यमराव तो रे आहे।।४।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त तोही। मन शिवापायी वसे त्याचे।।५।।

६२७. त्रिकाल पूजन शिवाचे करिती। आनंदे करिती कीर्तन जे।।१।। मन सदा पायी वसे निरंतर। पायाचा विसर ज्याते नाही।।२।। त्याचे पाय दावा मज दीनाप्रती। पावन करिती आम्हा दीना।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त ते प्रवीण। वृत्ती समाधान त्याहाची हो।।४।।

६२८. शिव कृपावंत शिव कृपावंत। अनाथाचा हेत पुरवी हो।।१।। भक्त ते प्रवीण भक्त ते प्रवीण। चरणी गुंतून राहिले जे।।२।। धनद्रव्यादिक मानिती वमन। केला शिवार्पण देह ज्यांनी।।३।। निःसीम जे भक्त त्यांचा झाला दास। सोडीना त्याहास काही केल्या।।४।। लक्ष्मण म्हणे शिवा सर्वोत्तमा। तारी पूर्णब्रह्मा मज दीना।। ५।।

६२९. शिव म्हणे देवी भक्त मज प्रिय। धन्य भक्तराय सखे माझे।।१।। राज्य वैभव मज आवडेना। भक्ता विसंबेना कदा मी गे।।२।। असूनि जातिहीन मंद हीन दीन। मज प्रिय जाण भक्ती आहे।।३।। लक्ष्मण म्हणे शिव कृपाघन। भक्ताचे रक्षण करी सदा।।४।।

६३०. शिव म्हणे देवी प्रिय वरानने। भक्त ते प्रवीण माझे जाण।।१।। माझा विसर कदा पडेना त्याहासी। संतुष्ट मानसी माझे भक्त।।२।। ब्रह्मांडाचे राज्य मानिती वमन। मज गे वाचून प्रिय नसे।।३।। ऐसे भक्त पाहे निष्काम ते जाण। झालो मी स्वाधीन त्याहाच्या गे।।४।। लक्ष्मण म्हणे शिवा सर्वेश्वरा। माझा विश्वंभरा त्राता कोण।।५।।

६३१. शिव म्हणे देवी भक्ताचे लक्षण। करी जे श्रवण मम प्रिये।।१।। षड्रिपू त्यांनी केले गे स्वाधीन। मनही जिंकून झाले स्वस्थ।।२।। संतुष्ट

मानसी मन मजपाशी। चहूही देहांसी जाणती ते।।३।। ब्रह्मांडीचे राज्य धिक्कारिती जाण। माझे स्वरूपी जाण मिळती ते।।४।। लक्ष्मण म्हणे त्याहांचे दर्शन। अमरादी सुरगण इच्छिताती।।५।।

६३२. शिवाचे ते भक्त काळाते न भिती। अक्षयी गर्जती नाम मुखी।।१।। भक्तिबळे ते रे न मानिती कोणा। त्रैलोक्याचा राणा वश केला।।२।। दयाढाल त्यांनी पुढे रे करूनि। नामशस्त्र करूनि झाले बंड।।३।। झाले ते शूर मोठे ते झुंजार। काळा अनिवार झाले ते हो।।४।। लक्ष्मण म्हणे वश झाला शिव। स्वर्गीचेही देव मानिती त्या।।५।।

६३३. शिवाचे ते भक्त प्रेमळ ते फार। शिवाचे चाकर वंद्य सर्वा।।१।। इंद्र आदी देव त्याहा सन्मानिती। त्रिभुवनी कीर्ती भक्ताची हो।।२।। सदा ते निःसंग केला प्रभोसंग। झाले ते अभंग शिवकृपे।।३।। सर्वाते विरक्त शिवाते स्मरत। त्रैलोक्याचा नाथ केला दीन।।४।। लक्ष्मणा घडो त्याहाचे दर्शन। करी तो पावन हीनादीना।।५।।

६३४. सत्यवतिसुत गातसे रे गुण। भक्त ते प्रवीण तुझे देवा।।१।। मुनी तो गौतम करी लिंगार्चन। बगदालभ्य मुनी दास तुझा।।२।। वटपत्र शिरी घेऊनि बैसला। स्वरूपी रमला मुनी तुझ्या।।३।। कल्प रे अनेक होती जाती फार। तुझे भक्त शूर सर्वा वंद्य।।४।। लक्ष्मण म्हणे तुझे भक्त फार। प्रभो भक्ता वर तुम्ही देता।।५।।

६३५. दुर्वास मुनी ते शिवभक्त जाणा। ब्रह्मांडाचा राणा वश जया।।१।। लिंगार्चन मुनी करी तो प्रेमे रे। प्रभोचे रे पाय ध्यातो सदा।।२।। स्वर्गीचे हे देव दुर्वासा स्तविती। काळातेही भीती तयांची हो।।३।। साठी खंड्या अन्न पंच प्राणावती। लागे ऋषीप्रती अन्न फार।।४।। अन्न भक्षूनिया तो रे निराहारी। शिवभक्ताची थोरी पाहा की हो।।५।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त प्रवीण। त्याते पंचानन विसंबेना।।६।।

६३६. भृगूचा कुमर तो रे शुक्रमुनी। त्यांनी शूळपाणि पूजिला हो।।१।। शिव कृपावंत जाहले प्रसन्न। ऋषीचे कल्याण केले शिवे।।२।। अमृत संजीवनी मंत्र त्या दिधला। त्रैलोक्याते केला मुनी वंद्य।।३।। दैत्यगुरू तो आहे हो प्रवीण। शिवाते शरण आहे सदा।।४।। शुक्र तो कवी हो आहे

सर्वमान्य। आहे हो निपुण ज्ञानामाजी।।५।। लक्ष्मण म्हणे करा शिवभक्ती। भक्ता उमापती विसंबेना।।६।।

६३७. शिवाचे ते भक्त असंख्य ते जाणा। कैलासीचा राणा विसंबेना।।१।। ब्रह्मा हरी हे हो शिवाचे रे भक्त। त्याते रे स्तवीत अक्षयी ते।।२।। पुरातन देव आहे तो हो श्रेष्ठ। आहे नीलकंठ सर्वा प्रिय।।३।। चराचर गुरू शिव तो सर्वज्ञ। प्रभोते शरण जा हो वेगी।।४।। लक्ष्मण म्हणे दयाळू तो शिव। सकळाते देव पावे तो।।५।।

६३८. शिवभक्त ते हो अनिवार मोठे। शिवनाम सोटे शोभती रे।।१।। शिवनाम भाले शस्त्रे हो शोभती। घोडे नाचविती चहूकडे।।२।। अनुहत वाद्ये वाजविती शूर। शिव परमेश्वर वश जया।।३।। काळाचे हे भय नसे त्याहाप्रती। आनंदे नाचती प्रेमयुक्त।।४।। लक्ष्मण म्हणे त्याहाचे दर्शन। अमरादी सुरगण इच्छिती हो।।५।।

६३९. तापसांचे भार शिवाप्रती स्तविती। तपोधन मूर्ती शिव पाहा।।१।। योगियाचे भार शिवाभोवताले। प्रभोने निर्मिले नाना योग।।२।। पूर्णयोगी शिव ज्ञान कथीतसे। मार्ग दावीतसे भक्तजना।।३।। आत्मज्ञान श्रेष्ठ बोले विश्वंभर। योग हाचि थोर म्हणे शिव।।४।। लक्ष्मण म्हणे शिव कृपाघन। करितो कल्याण साधकाचे।।५।।

६४०. शिव अवघा जनी वनी। शिव स्वानंदाची खाणी।।१।। शब्द निघे त्याचे सत्ते। कोणी स्मरेना हो त्याते।।२।। विसरले प्रभोपाया। म्हणूनि सत्य दिसे माया।।३।। म्हणूनिया गर्भवास। नाना भोगिताती क्लेश।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त। ब्रह्मानंदे नित्य तृप्त।।५।।

६४१. प्रेमयुक्त भक्ती करी। तोचि धन्य हो संसारी।।१।। निजध्यास निरंतर। करी तोचि श्रेष्ठ शूर।।२।। निजध्यासे साक्षात्कार। वस्तू आंतरबाहेर।।३।। लक्ष्मण म्हणे सुख। घेती वश त्या त्रिंबक।।४।।

६४२. शिवभक्ताचिये पायी। सुख वसे ते अक्षयी।।१।। धन्य भक्तराज जगी। सखा केला शिवयोगी।।२।। अहो स्वानंदाच्या गावी। वसती सर्वदा विजयी।।३।। लक्ष्मण गेला शरण। ताते केला हो पावन।।४।।

६४३. शिवाप्रती बिल्व नित्य वाहे जो रे। पुण्यश्लोक तो रे प्राणी

जाणा।।१।। शिवाते बिल्व रे अतिप्रिय आहे। प्रेमयुक्त वाहे पुण्ये प्राणी।।२।। तो रे तरेल ते नवल ते काई। दर्शने प्राणी तरती त्याच्या।।३।। शिव शिव प्रेमे घेती जे का प्राणी। धन्य त्याची वाणी मानी शिव।।४।। लक्ष्मण म्हणे शिव कृपाघन। भक्ताचे रक्षण करी प्रेमे।।५।।

६४४. शिवभक्ताचा हो महिमा वर्णवेना। शिवभक्त जाणा शूर झाले।।१।। उमारमणाते जिंकिले हो त्यांनी। भक्तिबळे प्राणी फार धाले।।२।। काळाते न भिती प्रभोते पूजिती। प्रभोते हो गाती प्रेमयुक्त।।३।। स्वर्गीचे हे देव त्याहा सन्मानिती। कामाते जिंकिती ते हो शूर।।४।। लक्ष्मण म्हणे त्याहाचे दर्शन। घडो आम्हा दीना तेचि श्रेष्ठ।।५।।

६४५. कामक्रोधाते जिंकिले। देवा वश त्याने केले।।१।। गर्वरहित जो झाला। देव सखा त्याने केला।।२।। सर्वाभूती झाला लीन। देव झाला त्या स्वाधीन।।३।। लक्ष्मण म्हणे देव। सर्वाभूती कृपाळुव।।४।।

६४६. जो का चित्ताचा निर्मळ। त्याचे गळा न लगे माळ।।१।। कामक्रोधा जो आवरी। स्पर्शेना त्या यमपुरी।।२।। सदा विवेक जो करी। तोचि मोक्षाचा अधिकारी।।३।। लक्ष्मण अपराधी। सोडवा हो कृपानिधी।।४।।

६४७. जो का अंतरीचा निर्मळ। त्याला न लगे जपमाळ।।१।। इंद्रिये केली ज्याने स्वाधीन। त्याला न लगे बाह्य पूजन।।२।। मन झाले ज्या स्वाधीन। न लगे जप तप अनुष्ठान।।३।। लक्ष्मण म्हणे विवेकी नर। तोचि सर्वांचे माहेर।।४।।

६४८. भगवद्भक्त तोचि जाणा। समान पाही सकळ जना।।१।। भूती झाला जो का लीन। हेचि साधूचे लक्षण।।२।। स्तुती करिता सुखावेना। निंदा करिता दुखावेना।।३।। परद्रव्य मानी वमन। तोचि योगी परिपूर्ण।।४।। लक्ष्मण त्याचा दास। तोचि उद्धरी जगास।।५।।

गुरुभक्ती

६४९. मन कारण बंधाला। मन कारण मोक्षाला।।१।। मन विषयी रातले। म्हणूनि जन्मा येणे झाले।।२।। गुरुकृपे हे फिरले। म्हणूनि आम्हा सौख्य झाले।।३।। विषयी विटले हे मन। म्हणूनि झाले समाधान।।४।। आम्हा आलीसे प्रचीती। करा वेगी गुरुभक्ती।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे।

गुरुकृपा संपादा रे।।६।।

६५०. अनेक कल्पनेचे बंड। मोठे माजले थोतांड।।१।। जीव पडला हो बंदी। दुर्धर कल्पना ही व्याधी।।२।। कल्पनेचे निरसन। नोहे गुरुकृपेविण।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करू वश गुरुमूर्ती।।४।।

६५१. आपुलिये देही देव असूनिया। का हो वाया भ्रम झाला तुम्हा।।१।। परब्रह्म आपुले देही आहे बापा। त्याते सांडूनिया नाना पूजन करिसी।।२।। सद्गुरूवाचूनि न कळे ही सोई। गुरुकृपे देही दिसे देव।।३।। लक्ष्मण म्हणे करा गुरुभक्ती। मग तुझा तूचि परब्रह्म।।४।।

६५२. सद्गुरुसंग मज घडला गा। भवसंशय हा उडला गा।।१।। आता मज भय नसे काही। अक्षयी प्रभूशी मी जडले बाई।।२।। आता मज सुचेना कामधंदा। अक्षयी जडलेसे मी प्रभोपदा।।३।। लक्ष्मण म्हणे मी झाले निःसंग। आता मज नावडे घरसंग।।४।।

६५३. व्युत्पत्तिबळे रे देव सापडेना। कार्य गुरूविना होईना रे।।१।। देही देव ऐसे सर्वही बोलती। गुरूविना प्राप्ती नोहे कोणा।।२।। मार्ग तो कठीण अरण्य दारुण। सद्गुरू आपण नेती वत्सा।।३।। ब्रह्मांडाचा नाथ दाविती नयनी। मग रानीवनी देव दिसे।।४।। लक्ष्मण म्हणे देवमय सर्व। दावी गुरुराव खूण बाप।।५।।

६५४. तुझा तूचि देव आहेसी गड्या रे। कल्पनेने बा रे केला शीण।।१।। श्रेष्ठ तो ब्राह्मण पिशाच्च होऊन। म्हणे मी रे हीन अतिशूद्र।।२।। तेवी अविद्येने तुजला रे केले। कल्पनेने आले जीवपण।।३।। निःसंग असूनि संग रे तुजला। विसर पडला संगतीने।।४।। सद्गुरूप्रती तू शरण रे जाय। मग तुज सोय सापडेल।।५।। पिशाच्च ब्राह्मणा वैद्य तो भेटला। भ्रम त्याचा गेला म्हणे मी विप्र।।६।। तेवी तुजला रे बाणेल बा खूण। ब्रह्म तू होऊन सुखी होशी।।७।। लक्ष्मण म्हणे गुरू मोक्षदाता। भवाचा तो हा मायबाप।।८।।

६५५. शम दम शांती तितिक्षा उपरती। मागे पुढे शांती अभ्यासिता।।१।। शांती हाता येता होय साक्षात्कार। ब्रह्मानंद थोर प्राप्त होय।।२।। उन्मत्त हे मन होऊनि विचरे। ब्रह्ममय सारे दिसे तेव्हा।।३।। पाहाता पाहणे हाही भाव नुरे। भेद हे कावरे तेथे कैचे।।४।। लवणजीवनापरी होय गती। बोलावया

उक्ती तेथे कैची।।५।। लक्ष्मण म्हणे गुरुकृपा फळे। सारासार कळे कृपेस्तव।।६।।

६५६. गुरुभक्ती आधी संपादावी जीवे। नंतर लागावे योगामाजी।।१।। योग ते अनेक योग कष्टरूप। आचरता ताप उपजती।।२।। तैसा नोहे राजयोग हा हो श्रेष्ठ। आचरता कष्ट नाही येथे।।३।। श्रवण मनन निजध्यास सारा। तेणे साक्षात्कार होत असे।।४।। मन अधिष्ठानी लावावे विचारे। देहभाव नुरे अभ्यासिता।।५।। लक्ष्मण म्हणे आत्मानुसंधान। करिता येणे जाणे स्वप्नी नाही।।६।।

६५७. गुरुभक्ताप्रती स्वप्नी भय नाही। निःसंग ते देही वर्तती हो।।१।। काळ हा दुर्धर भक्षितो जगाला। भक्तांनी भक्षिला काळचि तो।।२।। काळचि भक्षूनि सुखदुःखातीत। स्वानंदभरित निजानंदे।।३।। अलक्ष नगरी वास त्यांनी केला। ब्रह्मानंद झाला कृपेस्तव।।४।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मांडसंपत्ती। भक्त ते पाहती वमनप्राय।।५।।

गुरुभक्त

६५८. गुरुभक्ताप्रती शंकर तो रक्षी। शिव सर्वसाक्षी दयाळू तो।।१।। गुरुभक्तीची हो शिवाते आवडी। घालीतसे उडी भक्तिकाजा।।२।। गुरुभक्तीचा हो महिमा विशेष। बोलिला महेश स्वमुखे हो।।३।। करा गुरुभक्ती भक्तीपाशी मुक्ती। येतसे विरक्ती अंगाप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे जन्ममरण गोवा। नुरे गुरुदेवा स्मरा वेगी।।५।।

६५९. सद्गुरूचे दास विषयी उदास। स्वानुभव रस सेविती ते।।१।। अहं जीवोस्मि ही उरी नाही काही। ब्रह्मभाव देही विराजित।।२।। ब्रह्मभाव होता आशा ममता नाही। साक्षिभूत देही वर्तती ते।।३।। भक्ती ज्ञान क्रिया आचरूनि दाविती। जगाते लाविती भक्तिपंथे।।४।। भजनी सर्वदा विनटले शूर। त्याहाचा आधार ब्रह्मांडाते।।५।। लक्ष्मण म्हणे धन्य तोचि तारू। भव हा दुस्तरू निरसिती।।६।।

६६०. गुरुभक्त जागे जग हे निद्रिस्त। स्वप्नी बरळत नानापरी।।१।। गुरुभक्ताप्रती भाषण रुचेना। मिथ्या हे हो जाणा भक्तालागी।।२।। जेवी भानुप्रती मृगजळ ते हो। तेवी भाषण हो निद्रिस्ताचे।।३।। आत्मारामी वस्ती

केली त्या शूरांनी। येर ते अजूनि भ्रांतीमाजी।।४।। माझे माझे म्हणूनि घेती नाना योनी। भक्त संत ज्ञानी दुःखातीत।।५।। लक्ष्मण म्हणे मायाभ्रांती थोर। संगाने अपार दुःख जगा।।६।।

६६१. गुरुभक्ताप्रती नाही जन्म जाण। गेले उतरून भवसिंधू।।१।। सागरी ती नदी गेली हो मिळूनि। नाही परतूनि आली पुन्हा।।२।। स्वरूपी रमले झाले तेचि रूप । विश्वी विश्वरूप ओळखिला।।३।। भावे गेले शरण गेले हो मिळूनि। चिन्मात्र निर्गुणी लय झाले।।४।। लक्ष्मण म्हणे तुपाचे ते लोणी। होईल कैसेनि सांगा आम्हा।।५।।

६६२. गुरुभक्त झाले मायेचिया पार। झाले ते निर्घोर गुरुकृपे।।१।। जाणीव ग्रासूनि पाहाती स्वरूप। पाहूनि ते रूप झाले तेचि।।२।। परिवार त्याहा ब्रह्मरूप झाला। आनंदी मुरले झाले स्वस्थ।।३।। लक्ष्मण म्हणे त्याहा जन्म नाही। राहिले ते पायी निरंतर।।४।।

६६३. गुरूचे ते भक्त सदा ते निर्घोर। निष्काम ते शूर गाती देवा।।१।। द्वैताते ग्रासून मनाते जिंकून। भूती भगवान पाहाती ते।।२।। अंतर्बाह्य त्याहा दिसे तो ईश्वर। दिसे चराचर ब्रह्मरूप।।३।। लक्ष्मण म्हणे खूण ते पावले। दाखवी पाउले दयाळू ती।।४।।

६६४. ब्रह्मा इंद्र हरी नैर्ऋत्य कुबेर। ध्याती निरंतर त्याते ध्या हो।।१।। त्याते विसरूनि गुंतता व्यसनी। प्रभो शूळपाणि आठवेना।।२।। पुढे हे कठीण दुःखासी कारण। धरा ते चरण सुख घ्या हो।।३।। लक्ष्मण म्हणे फार सुखी झाले। पायी स्थिरावले गुरुभक्त।।४।।

शिवगण

६६५. चौसष्ट कोटी गण तुम्ही शूर। तपाचे गिरिवर महाराज।।१।। शिवा हो समान तुमचा प्रताप। प्रभो विश्वरूप वश केला।।२।। ब्रह्मांड हे राज्य मानूनि वमन। प्रभोचे चरण सेविले हो।।३।। तुमचा प्रताप आहे हो अपार। ब्रह्मांडा आधार तुमचा हो।।४।। क्षणे हे ब्रह्मांड कराल घडामोडी। ऐसी ताता जोडी केली तुम्ही।।५।। तुमचे ते सुख नाही ब्रह्मादिका। इतराचा लेखा काय तेथे।।६।। लक्ष्मण म्हणे मज सुख द्या हो। अक्षयी ठेवा हो प्रभोपायी।।७।।

शिवयोगी

६६६. शिवयोगी तेचि शूर। ध्याती अक्षयी शंकर।।१।। राज्य ब्रह्मांडसंपत्ती। वमनप्राय त्याहाप्रती।।२।। ऋद्धिसिद्धी चाड नाही। सुख शोभे ते अक्षयी।।३।। त्याचे चरणीचे रज। वंदितो हो वृषभध्वज।।४।। लक्ष्मण म्हणे बाप। हरितो भवव्यथा ताप।।५।।

६६७. योगी पावन मनाचा। ग्रास केला त्रिगुणांचा।।१।। परिवार सर्वत्रही। स्वाधीन सुखी ते अक्षयी।।२।। मीतूपणा बोळवण। ध्याती शिव पंचानन।।३।। लक्ष्मण म्हणे त्याचे। पाय ध्याता दुःख कैचे।।४।।

६६८. मनाचे केले ते योगी न मानती। स्वानंदे रमती निजस्थानी।।१।। आप आपणाते विसरूनि सुख। वस्तू ती निघोट निजानंद।।२।। आठवा आठव आठव विराला। बंबाळ जाहला अवघा तूचि।।३।। आठवा विसरा ग्रासूनिया त्यांनी। उन्मनी अवसानी वसती हो।।४।। सुखदुःखातीत ते धाम झाले। झालेपण उरले नाही त्याहा।।५।। लक्ष्मण म्हणे सर्वाव्यतिरिक्त। योगी ते विरक्त सर्वा पूज्य।।६।।

६६९. एकांत आवडे त्या योगिरायाप्रती। अक्षयी रमती स्वरूपी ते।।१।। राजा रंक योगी मानिती समान। अक्षयी निधान पाहाती ते।।२।। स्त्रियांशी भाषण त्याहा आवडेना। घालक हे जाणा तापसासी।।३।। योगी ते निःसंग केला प्रभोसंग। सकळही रंग जाणती ते।।४।। लक्ष्मण म्हणे घडो ते दर्शन। करिती पावन दीनाप्रती।।५।।

६७०. काम योग्याने जिंकावा। आपुले स्वाधीन करावा।।१।। दुष्ट आहे तो अनिवार। काम आहे दुराचार।।२।। आहे तो रे अती क्रूर। त्याचा मारा अनिवार।।३।। याच्या कर्मा पार नाही। काम त्रिभुवनी विजयी।।४।। मोठमोठे तपोधन। क्षणामाजी केले दीन।।५।। यापासाव रे सुटला। असेल एखादा विरळा।।६।। ज्याने काम रे जिंकिला। हरिहरा वंद्य झाला।।७।। ब्रह्मादिका हा अनिवार। याचा मारा अती क्रूर।।८।। योगिजनांचा काळ। घालवितसे चांडाळ।।९।। फार हुशार असावे। नाम सद्गुरूचे घ्यावे।।१०।। यापासाव सोडवील। एक सद्गुरू दयाळ।।११।। लक्ष्मणाचा दातार। सिद्ध रक्षिता सर्वेश्वर।।१२।।

६७१. योगिजना मोह नसावा। मोह दुर्धर मानावा।।१।। मोह घालवी योगिराया। मोह ठक साधुराया।।२।। विवेकबळे तो त्यजावा। दुर्धर तो रे मानावा।।३।। निर्वेध योगियाने असावे। चित्त कोठे न गुंतू द्यावे।।४।। राजा भरत तपोधन। महायोगी तो प्रवीण।।५।। मृगवत्साचे केले पालन। मृग तो गेला हो निघून।।६।। तपोधना झोका बसला। मोहबळे ध्यास लागला।।७।। हे मृगा हे मृगा म्हणून। सोडिला रे त्याने प्राण।।८।। मृगजन्म राव पावला। केवढा धक्का हो बैसला।।९।। योगियाने निवांत असावे। मोहगर्तेत न पडावे।।१०।। लक्ष्मण म्हणे गुरुराया। मोहपाश नको स्वामिराया।।११।।

६७२. मोहाजी बाजीने फार घालविले। अनहित केले फाराचे हो।।१।। भरत तो राजा भरतखंडीचा। घात झाला त्याचा मृगीयोगे।।२।। तपोधनाप्रती धक्का रे बैसला। मृग तो रे झाला मोहाकरिता।।३।। योगिजनाप्रती मोह हा नसावा। निःसंग असावा योगिराव।।४।। लक्ष्मण म्हणे देवा विरूपाक्षा। लाज सर्वसाक्षा तुजकडे।।५।।

६७३. मन केले ज्याने स्वाधीन। तोचि योगी परिपूर्ण।।१।। जेथे वसे दया शांती। त्याला करणे न लगे भक्ती।।२।। परस्त्रीकडे पाहीना। निंदाद्वेष कदा करीना।।३।। परद्रव्य मानी वमन। सदा संतुष्ट आपण।।४।। लक्ष्मण म्हणे ऐसा नर। तोचि जाणा परमेश्वर।।५।।

६७४. ज्याची मनोवृत्ती ढळेना। तोचि पूर्ण योगी जाणा।।१।। अविद्यापरिवार हटविला। ब्रह्मस्वरूप तोचि झाला।।२।। ज्याची कल्पना निमाली। जन्म येरझार खुंटली।।३।। त्याचे घडो दर्शन। दर्शने ताप हरे जाण।।४।। लक्ष्मणा पावन करा। योगिराया सर्वेश्वरा।।५।।

ज्ञानी

६७५. ज्ञाते जगात वसती। जगाऐसे ते दिसती।।१।। परि ते मायातीत प्राणी। विषयी विरक्त असूनि।।२।। मिथ्या मानूनि संसार। तृप्त स्वानुभवे शूर।।३।। लाभ हानी ते नेणती। ब्रह्मानंदे ते डुल्लती।।४।। मान अपमान काही। भाव त्याहापाशी नाही।।५।। लक्ष्मण म्हणे धनी। केला स्वाधीन त्याहांनी।।६।।

६७६. ज्ञानी तोचि ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।१।। मीतूभाव जेथे

नाही। सदा अभेद पदवी।।२।। भेदभावाचे भजन। हे तो आहे खंडज्ञान।।३।। विश्व आपणचि झाले। निरामय जे राहिले।।४।। त्याची घडता संगती। सौख्य होय प्राण्याप्रती।।५।। लक्ष्मणा लाभ झाला। संग तोचि हो घडला।।६।।

६७७. शुक नळिकायंत्री बैसे। बळकट धरूनि होतसे पिसे।।१।। गुंतलो गुंतलो ऐसे भावी। परि तो गुंतला नसे काही।।२।। तेवी कर्मठ संशयी। पडले आत्मशुद्धी नाही।।३।। लक्ष्मण म्हणे ज्ञानी। पापपुण्य नेणती कोणी।।४।।

६७८. आवडीने कर्म करिती। फल अपेक्षा नेणती।।१।। सदा ब्रह्मार्पणभाव। धन्य धन्य ते मानव।।२।। ब्रह्मसुख ते भोगिती। होय संतुष्ट मनोवृत्ती।।३।। लक्ष्मण म्हणे ज्ञानी। जगी वर्तती अलिप्तपणी।।४।।

६७९. ज्ञानी वाद हो करीना। ज्ञानी गर्वे हो फुंजेना।।१।। ज्ञानी म्हणावे हो त्याला। जेथे वाद हो निमाला।।२।। समाधान ज्याची वृत्ती। ब्रह्मानंदे ते डुल्लती।।३।। अपमानाचा खेद नाही। सन्मानाचा हर्ष नाही।।४।। तोचि स्वरूपी मिळाला। जन्ममरण विसरला।।५।। लक्ष्मणाचा दातार। तेथे वसे निरंतर।।६।।

६८०. शिव सर्वदा विजयी। सुख अक्षयी प्रभोपायी।।१।। सुख घेती योगीश्वर। म्हणूनि सर्वदा निर्घोर।।२।। म्हणूनि ब्रह्मरूप झाले। दृश्यातीत ओळखिले।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। जगा करूनि दाविती।।४।।

६८१. ब्रह्मसुखे तृप्त झाला। तोचि वंद्य त्रैलोक्याला।।१।। अहो धन्य धन्य पूर्ण। महाराज ते प्रवीण।।२।। स्वयंप्रकाश प्रांजळ। जेथे नसे भेदमळ।।३।। केवळ ब्रह्मानंद खाणी। वास ज्याहा निरंजनी।।४।। विश्व आपणचि झाले। ब्रह्म अक्षयी संचले।।५।। लक्ष्मणाचे माहेर। प्राज्ञ श्रेष्ठ ते निर्घोर।।६।।

६८२. छत्रपती राज्यधर। स्वप्नी दिला सुळावर।।१।। अती कासावीस झाला। कोण साक्षी असे त्याला।।२।। जागा झाला शूळ नाही। स्वस्थ सिंहासनाठायी।।३।। स्वप्नदुःख लटके त्याला। वाटे मिथ्या भास झाला।।४।। तेवी स्वरूपी सावध। झाले त्याहा मिथ्या भेद।।५।। स्वयं प्रचीतीकरून। ब्रह्मानंद त्याहा पूर्ण।।६।। लक्ष्मण म्हणे नाही। त्याहा संसारगोवी।।७।।

६८३. पापपुण्य स्वर्गनरक। हे तव स्वप्नातील सुख।।१।। सत्य माने भ्रांतस्थाला। भेद अनेक गलबला।।२।। ज्ञात्याप्रती हे दिसेना। मिथ्यामय हे

रुचेना।।३।। पूर्ण स्वानंदेकरून। ब्रह्मरूप ते आपण।।४।। विश्व आपणचि झाले। अहंभावा विसरले।।५।। लक्ष्मण दास त्यांचा। असे किंकर द्वारीचा।।६।।

६८४. अहो भेदभाव गेला। तोचि जगी सुखी झाला।।१।। तोचि तारक जगाते। वर्म जाणती हे ज्ञाते।।२।। त्याची धरावी संगती। ऐसे ब्रह्मादी इच्छिती।।३।। जगी वसती जगातीत। महाराज ते वरिष्ठ।।४।। जन वन त्या समान। शत्रू मित्र कैचे भान।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। संग आम्हा तो बरवा।।६।।

६८५. ज्याते झाली ब्रह्मप्राप्ती। तेथे कैची भेदवृत्ती।।१।। सदा वसे समाधान। तेथे कैचे नाना यत्न।।२।। निजसुखे जो निवाला। कैची आशातृष्णा त्याला।।३।। आपणा आपण ओळखिले। कोठे कामक्रोध उरले।।४।। केवळ स्वानंदाची राशी। कैची मोह ममता त्यासी।।५।। लक्ष्मण म्हणे स्वस्थ। तेचि विश्वाचे दैवत।।६।।

६८६. धन्य मानू तोचि नर। सदा संतुष्ट निर्घोर।।१।। सुखदुःख ज्या समान। रंगी गेला जो रंगून।।२।। भूती झाला जो का लीन। तेथे वसे पंचानन।।३।। मायानदी उतरला। ब्रह्मपदी तो बैसला।।४।। लक्ष्मण म्हणे शूर। करिती जगाचा उद्धार।।५।।

६८७. जगी असूनि वेगळे। मनावरी स्वार झाले।।१।। परिवार निवटून। दृढ साधिती आसन।।२।। परस्त्री आणि कांचन। जे का मानिती वमन।।३।। पद्मपत्र जलावर। तेवी जगी ते निर्घोर।।४।। लक्ष्मण म्हणे श्रेष्ठ। दीना दाविती ते वाट।।५।।

६८८. मन धावता वळिती। त्याचे केले न मानिती।।१।। पायी विवेकाची बेडी। प्राज्ञ घालिती तातडी।।२।। काम क्रोध मद मत्सर। यांना करिती जर्जर।।३।। सोऽहं मंत्र हाचि जप। श्रेष्ठ झाले सुखरूप।।४।। लक्ष्मण म्हणे धाले। ब्रह्मपदी ते बैसले।।५।।

६८९. देही असूनि विदेही। जगी वर्तती प्राज्ञ तेही।।१।। गुरुकृपे ब्रह्म झाले। जगी ब्रह्म ओळखिले।।२।। दीप गृहामाजी वसे। परि कर्मा लिप्त नसे।।३।। तेवी व्यापार करिती। कदा लिप्त ते न होती।।४।। देह प्रारब्धास्वाधीन। लाविती ते विद्वज्जन।।५।। लक्ष्मण म्हणे नर। सदा संतुष्ट निर्घोर।।६।।

६९०. सकामाते प्रपंच गोड। विषयसुख ते आवडे।।१।। वारंवार जन्म घेती। विषयसुख ते भोगिती।।२।। ज्ञाते विषया विटले। म्हणूनि ते ब्रह्म झाले।।३।। लक्ष्मण म्हणे ज्ञानी। धन्य झाले त्रिभुवनी।।४।।

६९१. घृत दुग्धा हो पासून। पहा होतसे उत्पन्न।।१।। पुन्हा न मिळे दुग्धात। नाम पावले ते घृत।।२।। तैसा जगी होय ज्ञानी। जगातीत होता प्राणी।।३।। ज्ञानी पुन्हा न ये जन्मा। वश केला तो परमात्मा।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय ज्ञानप्राप्ती।।५।।

साधू

६९२. शांती साधूची साउली। शांती साधूची माउली।।१।। साधूंनी ती प्रिय करावी। शांती आहे साधुपदवी।।२।। शांती सुखकारक जाणा। शांती सुख दे साधुजना।।३।। शांतीविण साधुपणा। धक्का बैसेल ते जाणा।।४।। लक्ष्मण साधूते विनवी। शांती धरा शांती बरवी।।५।।

६९३. क्रोध साधूसी नसावा। विवेके दुष्ट तो टाकावा।।१।। योगिजनाचा घातकी। क्रोध आहे तो दुष्ट की।।२।। तो स्वाधीन रे असावा। घातकारक तो जाणावा।।३।। याचे संगे फार भुलले। तप त्यांचे वृथा गेले।।४।। लक्ष्मण पतित दीन। साधूप्रती गेला शरण।।५।।

६९४. साधूंनी पृथ्वीचा घ्यावा। गुण आहे तो बरवा।।१।। पूर्वी दत्त योगी यांनी। घेतला गुण रे मानूनि।।२।। आज्ञा मानू अवधूताची। लाज रक्षील तो आमुची।।३।। पृथ्वी ऐसे असावे। सकल समान वाटावे।।४।। पृथ्वी राग हो मानीना। पृथ्वी हर्ष हो मानीना।।५।। मळमूत्रादी त्यागिती। तिजवरी यज्ञ करिती।।६।। दोन्ही मानी ती समान। ऐसे राहावे आपण।।७।। ऐशी स्थिती बाणलिया। सुखकारक योगिराया।।८।। लक्ष्मणाचा दातार। रक्षीतसे योगीश्वर।।९।।

६९५. साधूंनी वायूचा गुण घ्यावा। गुण आहे तो बरवा।।१।। आबालवृद्धासी बोलावे। सुखरूप बा असावे।।२।। दत्तवचन मानावे। रक्षिता तो स्वामिराव।।३।। राजा रंक बरोबर। ऐसा असावा खंबीर।।४।। वायू जाय सर्वांहून। तैसे असावे आपण।।५।। वायू सर्वा आहे समान। जगी वर्तती आपण।।६।। लक्ष्मणाचा दातार। लाज रक्षी विश्वंभर।।७।।

६९६. साधू सूर्यगुण का घ्या ना। गुण प्रिय का माना ना।।१।। गुण तो हित रे कारक। गुण मोक्ष रे दायक।।२।। वैराग्याने प्रिय करावा। गुण आहे तो रे विसावा।।३।। सूर्य समान प्रभा करी। तेज ते असे चराचरी।।४।। लहान मोठा तो पाहीना। समान उष्ण करी जाणा।।५।। ऐशा रीतीने असावे। सर्व समान मानावे।।६।। आज्ञा माझ्या अवधूताची। तोचि लाज रक्षी आमुची।।७।। लक्ष्मणाचा दातार। रक्षिता तो जगदुद्धार।।८।।

६९७. जलाचा गुण घ्या हो साधुराया। नमन माझे तुमच्या पाया।।१।। जळी भेदभाव नाही। सर्वा स्वच्छ करी पाही।।२।। केवढी खंबीरता त्याची। समान वृत्ती त्या जलाची।।३।। जळी स्नानसंध्या करिती। देवा अभिषेक करिती।।४।। नीचकर्मा जळ नेती। दुर्गंधी रे त्यात धुती।।५।। जल सुख रे मानीना। जल दुःख रे मानीना।।६।। यदुप्रती दत्तराव। सांगतसे योगिराव।।७।। लक्ष्मणाची हो लाज। रक्षिता तो महाराज।।८।।

६९८. आकाशाचा गुण घ्या हो। गुण श्रेष्ठ तो जाणा हो।।१।। गुण आहे तो चांगला। गुण मान्य तो साधूला।।२।। आकाश सर्वा आवरण। तेथे नाही भेदपण।।३।। आकाश स्वच्छ दिसे जाण। तैसे असावे साधूने।।४।। कल्पना ही मुरवावी। स्वच्छ असो हृदयी।।५।। कल्पना ही निरसता। सुख फार असे ताता।।६।। यदुरायाते बोध केला। नमो त्या रे अवधूताला।।७।। लक्ष्मणाची लाज आता। रक्षा अवधूता ताता।।८।।

६९९. दत्त सांगती यदूला। मक्षिकेचा गुण घेतला।।१।। रस आणूनि संचय केला। त्यांनी नाही तो भक्षिला।।२।। कोणी मनुष्य येऊन। मोहोळ नेई रे झाडून।।३।। ते पाहूनि यदुराय। निःसंग झाले ते पाहे।।४।। संग दुःखकारक जाण। आम्ही घेतला मानून।।५।। ऐक यदुप्रती म्हणती। साधू संग्रह न करिती।।६।। योगी संग्रह करीना। स्वच्छ राहे आपण जाणा।।७।। हीच साधूची रे नीती। ऐक गा रे तू भूपती।।८।। ये नीती योगियाने राहावे। ब्रह्मसुख मग घ्यावे।।९।। लक्ष्मण म्हणे दत्ता। कृपा करावी अवधूता।।१०।।

७००. नरदेहा ऐसी पुण्ययोनी। मिळणार नाही पाहे विचारूनि।।१।। टाळी वाजविता का ग सापडला। अवचट जन्म हा प्राप्त तुजला।।२।। पूर्वपुण्ये द्रव्यघट भेटे जेवी रंका। पाषाण वेचू जाता परीस जोडे।।३।। ऐसा

नरदेह तुज प्राप्त झाला। साधन काही करी चुकवी यमघाला।।४।। सावध होई गड्या रे लवकर। धरी सुपंथ नको करू उशीर।।५।। लक्ष्मण विनवी देवराया। मज दीना सोडवा धावा प्रभोराया।।६।।

७०१. साधुसंगतीने कोण वाया गेला। सांगा हो आम्हाला प्राज्ञ तुम्ही।।१।। गेले जे शरण पावले ते खूण। कीर्ती त्या असून श्रेष्ठ गाती।।२।। ब्रह्महत्यारी ते सर्वा पूज्यमान। केले रामायण शतकोटी।।३।। असंख्य पातकी झाले रे पावन। साधुमहिमान वर्णवेना।।४।। लक्ष्मण म्हणे वैकुंठनिवासी। वसे साधुपाशी निरंतर।।५।।

७०२. अक्षयी समाधी अक्षयी हो जप। योगी सुखरूप सदा सुखी।।१।। द्वैत नासूनि अद्वैत रे झाले। स्वरूपी रमले झाले तेचि।।२।। साक्षिभूत योगी करिती व्यापार। घेऊनिया सार झाले ब्रह्म।।३।। लक्ष्मण म्हणे सुखदुःखातीत। पाहाती अनंत सर्वाठायी।।४।।

७०३. ऊर्मी जी उठे हो तिजला ग्रासून। करिती भजन साधुजन।।१।। परिवारा स्वाधीन ते हो वर्तती। व्यापार करिती साक्षिभूत।।२।। असंग ते सदा झाले समाधान। भूती भूती भगवान पाहाती ते।।३।। लक्ष्मण म्हणे स्वये ब्रह्म झाले। त्याहाची पाउले ध्यातो सदा।।४।।

७०४. साधू ते सदय विवेकाची खाणी। दाविती नयनी देवराव।।१।। नयनी तू असे वसे सर्वाठायी। रिता ठाव नाही देवाविण।।२।। अनुभवाप्रती नये कृपेविण। धरा ते चरण प्रेमयुक्त।।३।। लक्ष्मणा दीना साधुसंग झाला। देव तो दाविला कृपाळुव।।४।।

७०५. साधुसंग बरा वेगी तुम्ही करा। अनादी सोयरा वश होतो।।१।। संतसमागम लाधला फाराते। पावन दीनाते करिती ते।।२।। अहो देवराया घडो ती संगती। अहो कृपामूर्ती दान द्या हो।।३।। लक्ष्मण म्हणे साधू कृपाघन। जगाचे कल्याण करिती ते।।४।।

७०६. साधू पृथ्वीचा गुण। घेती श्रेष्ठ ज्ञानी पूर्ण।।१।। तापसा हाती जगाचे। सुख घेती ते ब्रह्मीचे।।२।। करिती प्रभोचे भजन। करिती जगाचे कल्याण।।३।। लक्ष्मणा सुख दिले। श्रेष्ठ पावन हो केले।।४।।

७०७. साधू जळाचा तो गुण। घेती श्रेष्ठ तो मानून।।१।। जगी वर्तती

जगापरी। स्वच्छ सर्वदा अंतरी।।२।। लक्ष्मण म्हणे थोर। करिती जगा उपकार।।३।।

७०८. साधू अग्नीचा तो गुण। श्रेष्ठ तो हो प्रवीण।।१।। स्वतंत्र स्व-इच्छे वर्तती। विषयी उदास तिष्ठती।।२।। स्वानुभवे सदा जागे। तृप्त झाले ते निज अंगे।।३।। लक्ष्मणाते भेटले। तृप्त कृपेने हो केले।।४।।

७०९. साधू वायूचा हा गुण। घेतो शुद्ध हा म्हणून।।१।। वसे तो हो सर्वांभूती। अलिप्तपणे त्याची गती।।२।। लक्ष्मण म्हणे शूर। वसती जगी निरंतर।।३।।

७१०. साधू आकाशाचा गुण। घेती प्राज्ञ ते प्रवीण।।१।। सर्वभूता आवरण। भूताचे ते जन्मस्थान।।२।। परि ते अलिप्त सर्वांत। दृश्य दिसे ते हो सत्य।।३।। लक्ष्मण म्हणे संत। निर्विकार ते जगात।।४।।

७११. साधू जाणूनिया वर्म। भक्ती करिती निष्काम।।१।। कामापाशी दुःख फार। म्हणूनि झाले ते निर्घोर।।२।। अद्वयसुख तेचि घेती। ब्रह्मसुख ते भोगिती।।३।। लक्ष्मण गेला शरण। साधू दयाळू ते पूर्ण।।४।।

७१२. तळमळ ज्याची राहिली। त्यांनी आपुली जोडी केली।।१।। कल्पनातीत जो का झाला। एकांत हो न लगे त्याला।।२।। कामक्रोध केले स्वाधीन। तोचि साधू परिपूर्ण।।३।। लक्ष्मण विनवी साधुलोका। क्षमा शांती टाकू नका।।४।।

७१३. कामक्रोध हे रे महा अविचारी। याते जो आवरी तोचि शिव।।१।। मोह दंभ अहंकार षड्रिपू रे। याते फिरवी रे विवेकाने।।२।। याहाचे स्वाधीन होता सुख नाही। त्रिभुवनगोसावी अंतरे तो।।३।। साधूने याहाचे स्वाधीन नसावे। आपले करावे स्वहित हो।।४।। लक्ष्मण म्हणे साधुजनाप्रती। रागे कृपामूर्ती भरू नका।।५।।

७१४. सत्त्वगुणी स्वर्गा जाती। रजोगुणी येथे वसती।।१।। तमोगुणा अधोभाग। ऐसे गुणाचे हे लाग।।२।। शुद्ध सत्त्वा ज्ञानाप्रती। ज्ञानानंदे ते वर्तती।।३।। सर्वावेगळा तो आत्मा। साधू ध्याती सर्वोत्तमा।।४।। लक्ष्मण म्हणे सुखी। ब्रह्म झाले ते विवेकी।।५।।

७१५. धन्य धन्य तोचि योगी। अक्षयी सुखसमाधी भोगी।।१।। मनोवृत्ती

समाधान। रंगी रंगला तो जाण।।२।। आत्मलिंग पूजी सदा। करी स्वहिताचा धंदा।।३।। राजा रंक रे समान। पाहे ब्रह्मरूप जन।।४।। वर्ततसे साक्षिभूत। जैसा दीप रे गृहात।।५।। प्रपंचकर्मी रे उदास। सखा केला जगदीश।।६।। आकाश पडता कोसळून। कदा ढळेना ज्याचे मन।।७।। लक्ष्मण म्हणे ऐसा नर। तोचि मानावा सर्वेश्वर।।८।।

७१६. साधू ते निवांत स्तविती अनंत। प्रभू सर्व गोत मानिताती।।१।। मन हे उन्मत्त त्याते ते जिंकिती। अक्षयी रमती स्वरूपी ते।।२।। षड् हे विकार महा अनिवार। त्याते जिंकणार साधू एक।।३।। शिव हर नाम जपा वारंवार। उमाईचा वर जिंकिती ते।।४।। लक्ष्मण म्हणे साधू ते दयाळ। मानिती सकळ समान ते।।५।।

७१७. परस्त्री माता परद्रव्य वमन। परपीडा नेणे तोचि साधू।।१।। सर्वदा संतुष्ट सर्वदा विवेक। तोचि भक्त एक राजयोगी।।२।। दया क्षमा वसे तोचि भाग्यवंत। परोपकारी चित्त तोचि धन्य।।३।। लीनता हो जेथे नाही अभिमान। तेथे पंचानन वसे तात।।४।। लक्ष्मण म्हणे बाह्य हो सोंगाने। नव्हे भगवान तृप्त बापा।।५।।

७१८. साधू तोचि श्रेष्ठ सदा संतुष्ट। स्वानंदाची पेठ वसविली।।१।। प्रभोपायाविण दुजे प्रिय नाही। वसे सदा पायी प्रेमभरे।।२।। द्वैताचा जेणे सहज केला ग्रास। माया हा विलास जाणूनिया।।३।। जाणीव नेणीव मायेचे हे गुण। जाणिवेपासून वेगळाचि।।४।। चुंबकसत्तेने लोखंडा चलन। तैसे ते आपण देहकर्मी।।५।। लक्ष्मण म्हणे त्याहाचे हो पायी। सुख ते अक्षयी वसतसे।।६।।

७१९. मन मोकळी हो मुक्ती। सदा आनंदे हो वृत्ती।।१।। तळमळ तळमळ। हाचि अविद्येचा खेळ।।२।। सदासर्वदा संतोष। मीतूरहित निर्दोष।।३।। तोचि मोक्षाचा अधिकारी। संशयरहित अंतरी।।४।। गगनाऐसा निर्मळ। अंतराकाशी सोज्वळ।।५।। लक्ष्मण म्हणे ते हो। ब्रह्मरूप प्राणी पाहा हो।।६।।

७२०. एके वृक्षाप्रती घालूनि जीवन। केले हो पालन फार दिवस।।१।। दुजियाने त्याते घाव हो घातला। फांद्या हो तोडिल्या क्रूराने त्या।।२।।

दोघाप्रती छाया एकाचि वृक्षाची। तैसी त्या साधूची वृत्ती असे।।३।। योगेश्वर सर्वा समान पाहती। निजानंदे तृप्ती निरंतर।।४।। लक्ष्मण म्हणे आपणचि जग। होऊनि निःसंग वर्तती हो।।५।।

७२१. गाईते तारावे व्याघ्राते मारावे। जीवनी तो भाव नसे काही।।१।। तैसे योगेश्वर जगाते पाहती। समान हो वृत्ती समभाव।।२।। त्याहा आपपर भाव हा हो नाही। स्वानंदे अक्षयी डुल्लती हो।।३।। समबुद्धी साधू सर्वदा निर्घोर। ब्रह्मांडा आधार त्याहाचा हो।।४।। लक्ष्मण म्हणे देव सर्वत्र रे। पूजिती त्याहा रे प्रेमभरे।।५।।

७२२. घरच्या उजेड चोराते अंधार। नेणे दीप तो रे भिन्न भाग।।१।। तैसे योगीश्वर समबुद्धी प्राणी। भेद ते हो स्वप्नी नेणती हो।।२।। त्याहाचे दर्शने सुख होय जीवा। प्राज्ञ ते हो जीवा मुक्त करिती।।३।। त्रय देव त्यांचे करिती पूजन। अष्टभावे करून प्रेमयुक्त।।४।। लक्ष्मण म्हणे दयेचे आगर। कृपेचे भांडार महाराज।।५।।

७२३. धन्य धन्य हा सुदिन। झाले साधुदर्शन।।१।। अंगी शीण होता गेला। ताप त्रिविध निमाला।।२।। हेचि आम्हा हो दिवाळी। भेटली साधूची मंडळी।।३।। अनंत जन्मीचा तो शीण। गेला साधुदर्शने।।४।। लक्ष्मणा लाभ झाला। साधुसंग हो घडला।।५।।

७२४. हाचि दिवाळी दसरा। शिवयोगी आले घरा।।१।। महान लाभ झाला मोठा। भेटी झाली आंतरनिष्ठा।।२।। त्याची संगती घडता। नुरे भवाची ही वार्ता।।३।। जेथे करिती लिंगार्चन। सिद्धक्षेत्र तेचि पूर्ण।।४।। लक्ष्मणा योगिराये। सुखी केले निरामये।।५।।

७२५. साधू ते निर्घोर सदा संतुष्ट रे। नाम गर्जती रे प्रेमयुक्त।।१।। शरीर लाविती प्रारब्धा स्वाधीन। वर्तती आपण जगामध्ये।।२।। अवयवापरी जगाते पाहती। आनंदे डुल्लती ब्रह्मानंदे।।३।। अज्ञानादीनाते मार्ग हो दाविती। घडो ती संगती आम्हा दीना।।४।। लक्ष्मण म्हणे दयेचे सागर। करिती उद्धार जगाचा ते।।५।।

७२६. साधू ते दयाळ ताप निरसती। मार्ग ते दाविती हीनादीना।।१।। माया निरसून सुख फार देती। पद ते दाविती निवांत रे।।२।। साधुसंगतीने

देवा भेटी होय। धरू आम्ही पाय प्रेमयुक्त।।३।। लक्ष्मणा दीना साधू तो भेटला। पावन तो केला क्षणामाजी।।४।।

७२७. साधुसंग करी लाभ मोठा होय। धरा हो ते पाय करा हित।।१।। अनंत जन्मांचा हरूनिया शीण। दाविती निधान देहामाजी।।२।। आपुले समान करिती दयाळ। मायेचे निर्मूळ होय कृपे।।३।। पूर्वी फार धाले साधुसंगतीने। पातकी दुर्जन वंद्य झाले।।४।। लक्ष्मणाप्रती अनुभव आला। साधूने रक्षिला दीन तो हो।।५।।

७२८. गंगा जैसी शुद्ध वाहतसे पाणी। वर्तावे साधूंनी जगी तैसे।।१।। विवेक आहे हो साधू रे कार्याचा। साहती जनाचा अपवाद।।२।। षड् हे विकार घालक हो जाणा। त्याने आतडेना साधू तो हो।।३।। परब्रह्माविण काही आवडेना। तोचि धन्य जाणा जगामाजी।।४।। लक्ष्मण म्हणे त्याहाचे दर्शन। होईल कोठून आम्हा दीना।।५।।

संत

७२९. सज्जन ते आले मार्ग दावावया। दीना उद्धराया अवतार।।१।। बिरडे तोडिती माया निरसिती। आत्मत्व ते देती दयाघन।।२।। संग तोचि बरा घडो आम्हाप्रती। देवा पशुपती विश्वनाथा।।३।। प्राणाहूनि प्रिय तुजला ते प्राणी। देवा शूळपाणि देई संग।।४।। लक्ष्मण म्हणे तेथे तू वससी। संग तो आम्हासी असो सदा।।५।।

७३०. संतसंग ज्या लाधला। तिही लोकी मान्य झाला।।१।। धन्य धन्य ती संगती। देव अमर इच्छिती।।२।। होय दीनाचे कल्याण। श्रेष्ठ आहे हे साधन।।३।। लक्ष्मणा संग लाधला। प्रभोने पावन तो केला।।४।।

७३१. धन्य आजिचा दिन माय। देखिले म्या संताचे पाय।।१।। संत जगी अवतरले। हीन दीन त्यांनी तारिले।।२।। जगी सहजस्थितीने राहती। प्रभोपायी केली वस्ती।।३।। निंदाद्वेषाते नेणती। समाधान जयाची वृत्ती।।४।। लक्ष्मण त्यांचे पायी। मनोवृत्ती निशिदिन लावी।।५।।

७३२. संतसंगतीने सुख। दिसे अविनाश ते।।१।। अती खळ हीन तरले। महादोषी हिंसक।।२।। तरूनि तारक हे झाले। जगाप्रती ते पाहा।।३।। ऐसा संगाचा महिमा। सार सार सार हो।।४।। विवेकी जे पुरुष श्रेष्ठ। त्याहा रुचे

संतसंग।।५।। लक्ष्मणा सुख झाले। साधुसंगतीने हो।।६।।

७३३. शिव ध्यावा तो निर्गुण। शिव स्तवा परिपूर्ण।।१।। मायाभ्रांती तुटेल जाणा। भव निरसेल सुजाणा।।२।। जन्मा येऊनि सार्थक। प्रीतीने पूजावा त्र्यंबक।।३।। लक्ष्मण म्हणे संतसंग। संत प्रभोचेचि अंग।।४।।

७३४. क्षमा शांती जयापाशी। तोचि जाणावा संन्यासी।।१।। सहा जणाशी आकळिले। परब्रह्मी लक्ष लाविले।।२।। सन्मानाचा हर्ष नाही। अपमानाचा खेद नाही।।३।। ज्याची वृत्ती समाधान। आनंदभरित सदा मन।।४।। लक्ष्मण म्हणे संन्यासी। वंद्य आहे हो आम्हासी।।५।।

७३५. आम्हा सुख दिसे संतांचिये पायी। संत ते अक्षयी संतुष्ट हो।।१।। दयेचे आगर कृपेचे भांडार। मायेचिया पर झाले तात।।२।। मतांचा झगडा तेथे हो मिटला। स्वानंद माजला अंतर्बाह्य।।३।। त्याहाची संगती आम्हासी फळली। भ्रांती ही निमाली क्षणामाजी।।४।। लक्ष्मण म्हणे आमुचे ते धन। अक्षयी चरण ध्यातो सदा।।५।।

आत्मनिवेदन

दर्शनाची उत्कंठा

७३६. मेघःश्याममित्रा शिवा। सर्ववंद्य महादेवा।।१।। सुनाभहस्ता मदनारी। दीनानाथा ये लवकरी।।२।। द्यावे दीना दर्शन। वारंवार हे मागणे।।३।। मंगल करिसी भक्तांचे। नाम मंगल तुमचे।।४।। लक्ष्मण म्हणे देवा। दीन आपुला म्हणावा।।५।।

७३७. वेगी येई की रे आता। विश्ववंद्य विश्वताता।।१।। पंचवदना मदनारी। दैत्यांतका त्रिपुरारी।।२।। नंदीसहित बा यावे। दीनाप्रती क्षेम द्यावे।।३।। सकळ अस्त्रे ये घेऊन। करी कर्माचे खंडन।।४।। भूक लागली लोचना। वेगी येई पंचानना ।।५।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।६।।

७३८. देवा फार युग गेले। नाही भ्रमण चुकले।।१।। शीण अंगी आता फार। काही सुचेना विचार।।२।। फार झाल्या येरझारा। पाय दाखवी शंकरा।।३।। अती त्वरे देवा यावे। दीनाप्रती सोडवावे।।४।। लक्ष्मण म्हणे

सोय। करी वेगी दावी पाय।।५।।

७३९. धाव धाव गंगाधरा। भक्तवत्सला शंकरा।।१।। तुजविण रे गमेना। भेटी द्यावी पंचानना।।२।। जीवनाविण ती मासोळी। तैसा जीव हा तळमळी।।३।। तैसे देवा तुजविण। माझा जाऊ पाहे प्राण।।४।। अंत पाहू नको ताता। भेटी द्यावी कृपावंता।।५।। लक्ष्मणा तुजविण। दुजे प्रिय नसे जाण।।६।।

७४०. देवा शूळपाणि येई अती त्वरे। सदया धावी रे गंगाधरा।।१।। तुजवाचूनिया गमेना मजला। ब्रह्मांड रे पाळा महादेवा।।२।। पाय दाखवी रे येणे समाधान। कृपाळू आपण आहा देवा।।३।। लक्ष्मण म्हणे वृषभवाहना। सुख रे सदना विरूपाक्षा।।४।।

७४१. कोठे गुंतलासी नेणो विश्वनाथा। स्नेहाळा समर्था मायबापा।।१।। कैलासी आहेसी किंवा वाराणसी। कोणत्या कार्यासी गुंता पडला।।२।। किंवा ध्यानस्थ तू बैसलासी ध्यानी। देवा शूळपाणि विश्वताता।।३।। भक्ताचिया काजा ध्यान विसर्जून। जातोसी धावून अती त्वरे।।४।। लक्ष्मण म्हणे दाखवी चरण। भेटीचे कारण आहे देवा।।५।।

७४२. कोठे गुंतलासी पूर्णब्रह्म शिवा। देवाधिदेवा मायबापा।।१।। भक्ताचे संकटी धावूनि गेलासी। भक्ताने तुम्हासी गोविले हो।।२।। आमुचे संचित हीन म्हणवून । न दाविसी चरण दीनानाथा।।३।। देवा निजध्यास लागलासे मना। पाहावे चरणा हीच इच्छा।।४।। लक्ष्मण म्हणे पूर्ण करा हेतू। अती दयाळू तू आहेसी रे।।५।।

७४३. कोठे गुंतलासी प्रभू विश्वंभरा। कृपेच्या सागरा विश्वनाथा।।१।। कोठे काय करिसी न कळे तुझे रे। स्थान तुज बा रे एक नाही।।२।। त्रैलोक्यी तुमचे भ्रमण हो शिवा। भक्ताचिया गावा धावून जाशी।।३।। तुज येण्याजाण्या नसे रे उशीर। दाता तू ईश्वर विश्वपूज्य।।४।। लक्ष्मण म्हणे मज भेटी देई। विलंब न लावी दयाघना।।५।।

७४४. कोठे गुंतलासी नेणो गंगाधरा। दीनाच्या माहेरा विश्ववंद्या।।१।। तूते गुंते फार एक नाही गुंता। अंबिकेच्या कांता निरंतरा।।२।। अनंत ब्रह्मांडे पसारा तुमचा। नाथ तू सर्वांचा सत्य सत्य।।३।। कारखाना मोठा तेथे

आमुचा स्मर। राहणे दुर्धर दिसे देवा।।४।। विश्वहृदयीचे तुम्हा श्रुत होय। सर्वज्ञ तू माय आहेसी तू।।५।। लक्ष्मण म्हणे अनंतलोचना। पुरवावी वासना तुम्ही माझी।।६।।

७४५. कोठे गुंतलासी कवणिया काजा। ताता वृषभध्वजा महादेवा।।१।। ताता तुझा मज लागलासे ध्यास। पुरवावी आस दीनबंधू।।२।। आम्हा दीनांचा गे हेतू कोण पुरवी। सांग माझे आई शुद्ध बुद्धे।।३।। नयनाते क्षुधा लागलीसे फार। तृप्तकर्ती हर तूचि एक।।४।। लक्ष्मण म्हणे भेटी त्वरित देई। आता माझा अंत नको पाहू।।५।।

७४६. कोठे गुंतलासी सिद्धाचिये मेळी। प्रभो चंद्रमौळी मायबापा।।१।। सिद्ध तुझे सखे सर्वदा जवळी। आनंदकल्लोळी नाचती रे।।२।। त्याहाची भीड रे तुजप्रती मोठी। हार तू त्या कंठी मानितोसी।।३।। ब्रह्मांड हे राज्य मानूनि वमन। तुजला धरून बैसले रे।।४।। त्याहासी सोडूनि कैसा तू रे येशी। परि तू आहेसी विश्वतात।।५।। लक्ष्मण म्हणे विश्वंभर तू रे। आमुचे आर्त रे पुरविसी।।६।।

७४७. कोठे गुंतलासी न कळे ताता रे। कामांतका तू रे निरामय।।१।। निरामय खरा परि दिसे व्यसन। घ्यावे ऐकून मायबापा।।२।। व्यसन ते मोठे कल्पांती मिटेना। तुझेही जाईना उदारत्व।।३।। भक्त जे मागती ते तू त्याते देशी। काही न पाहसी मागेपुढे।।४।। लक्ष्मण म्हणे आम्हा भेटी देई। विलंब न लावी दयाघना।।५।।

७४८. दशभुजा पंचवदना रे। वेगी पाय दावी दीनानाथा।।१।। पाय दावी पाय दावी येई रे तातडी। घाली वेगी उडी विश्वरूपा।।२।। विलंब या कार्या न करावा ताता। ब्रह्मांडाच्या नाथा विरूपाक्षा।।३।। पायाविण आम्हा दुजे प्रिय नाही। योगिराया येई अती त्वरे।।४।। लक्ष्मण म्हणे आमुचे तू धन। अनादि सगुण रूपडे रे।।५।।

७४९. कोणे गोष्टीचे हे साकडे तुजला। न घालू दयाळा भेट दे।।१।। देहभोगाचे हे गाऱ्हाणे तुजला। न सांगू स्नेहाळा ब्रह्मानंदा।।२।। देहाचे हो आता होवो जे होणार। तुजवरी भार न घालो हा।।३।। देवराया तुझे न लगे चिरगुट। परि देई भेट एकवेळा।।४।। लक्ष्मण म्हणे पाय दाखवी रे। स्वर्ग

ते नको रे तुझे आम्हा।।५।।

७५०. जी जी उपमा बा द्यावी। ती ती साजे प्रभोपायी।।१।। निरुपम तू शंकर। मायागुणाचिया पर।।२।। तुझे कर्तृत्व कळेना। परात्पर निरंजना।।३।। भक्तावर अभयकर। ठेविशी तू निरंतर।।४।। सगुण होऊनि साकार। भक्त रक्षिसी तू हर।।५।। लक्ष्मणा पाय दावी। दीनानाथा वेगी येई।।६।।

७५१. शंभो सर्वस्वी भरवसा। धरिला पायाचा म्या रे।।१।। तूचि माझे निजधन। मातापिता कुळगुरू।।२।। सकळ विश्रांतीचे स्थान। तूचि माझा दाता रे।।३।। अनंत जन्मांचा सोयरा। तूचि माझा शंकर।।४।। दीनानाथा कृपा करा। परात्परा वेगेसी।।५।। लक्ष्मण म्हणे येई। नेत्रा लागली भूक।।६।।

७५२. विष्णुमित्रा शंभो विरूपाक्षा ये रे। पाय दाखवी रे देवराया।।१।। पायाविण दुजे सुख रे मायिक। भव रे दाहक नाम तुझे।।२।। चंद्रचूडा पायी मजला गुंतवा। देवाधिदेवा नीलकंठा।।३।। विलंब या कार्या न करावा ताता। अंबिकेच्या कांता सूत्रकारा।।४।। लक्ष्मण म्हणे येई अती त्वरे। आनंदघना रे स्वामिराया।।५।।

७५३. दीनानाथा देवा यावे योगिराया। प्रभो स्वामिराया दावा पाय।।१।। तुझे नाम राया सुख रे भरित। भवा होय अंत तुझे नामी।।२।। तुझे पायी देवा गुंतूनि राहिले। सर्वमान्य झाले तुझे कृपे।।३।। लक्ष्मण म्हणे दीना पाय दावी। दुजे आम्हा काही रुचेना हो।।४।।

७५४. भेटी देई देवा दाखवी चरण। दुजे रे मागणे नसे नाही।।१।। स्वर्गीचे ते सुख नको आम्हाप्रती। वैभव संपत्ती नको तुझी।।२।। स्वरूप पाहू दे येणे समाधान। कायेते तोडून घेतो आम्ही।।३।। लक्ष्मण म्हणे देवा त्रिपुरारी। येई झडकरी मायबापा।।४।।

७५५. तुझा मोठेपणा आहे कीर्ती फार। ध्याती निरंतर योगी तुजला।।१।। हीन दीन खळ उद्धरिले ताता। फार कृपावंता सोडविले।।२।। सर्वांहूनि खळ मी रे दुराचार। करी अंगीकार दीनानाथा।।३।। भक्तास्तव विष देवा त्वा भक्षिले। भक्ताते रक्षिले नानापरी।।४।। येई अती त्वरे आता का उशीर। पूर्वी अंगीकार केलासी त्वा।।५।। लक्ष्मण म्हणे मोठेपणा थोर। देवा अंगीकार करा वेगी।।६।।

७५६. मागणे रे नाही तुझे काय भय। दाखवी रे पाय पाहू डोळा।।१।। द्रव्यवैभवाचे नाही रे कारण। पाहावे चरण हीच इच्छा।।२।। मागणे होते ते बोलूनि दाविले। तुझे काय गेले देई भेटी।।३।। उद्धट हे बोल राग मानू नका। ब्रह्मांडनायका महादेवा।।४।। लक्ष्मण म्हणे द्वारीचे हो श्वान। द्वार रे धरून बैसलो मी।।५।।

७५७. उमावरा पाय दावी। दीनानाथा वेगी येई।।१।। भूक लागली लोचना। माझी पुरवावी वासना।।२।। अती त्वरे यावे ताता। महाराजा कृपावंता।।३।। तू तव कृपेचे आगर। भक्तजनांचे माहेर।।४।। पतितपावन तू शिव। महाश्रेष्ठ देवराव।।५।। लक्ष्मणाचे तू धन। आदिपुरुष पंचानन।।६।।

७५८. नाग रे भूषणा प्रभो पंचानना। त्रितापशमना करी कृपा।।१।। मदनदहना विश्व रे जीवना। देवा निरंजना वेदगुह्या।।२।। सर्पारिवहनमित्र तू पवित्र। देवा तू सत्पात्र सर्वसाक्षी।।३।। शरीर हे माझे फार अमंगळ। काम क्रोध खळ नाचती रे।।४।। देवा या खळाचे करी निःसंतान। दाखवी चरण वेगी ताता।।५।। लक्ष्मण म्हणे स्वामी तू दयाळ। करिसी मंगल भक्ताचे तू।।६।।

७५९. येई येई त्वरे देवा विश्वताता। विश्व रे भरिता विश्वरूपा।।१।। स्वरूप पाहू दे सदया निर्घोरा। देवा निरंतरा निरपेक्षा।।२।। करिसी कल्याण भव निरसन। भक्तांचे रक्षण करिसी रे।।३।। षड्रिपू सदा करिती ताडन। नानापरी विघ्न केले यांनी।।४।। याते दंड करा पाय हो दाखवा। देव अधिदेवा योगिराया।।५।। लक्ष्मण म्हणे माये तू दयाळ। करिसी प्रतिपाळ सोयरिये।।६।।

७६०. फार अपराध माझे कृपावंता। पृथ्वीही लिहिता पुरेना रे।।१।। माता बाळकाचे न पाहे अपराध। वेगी देते स्तन प्रेमयुक्त।।२।। मातेचा दृष्टान्त साजेना तुजला। आहेसी दयाळा निरुपम।।३।। जन्मोजन्मीचा रे सखा तू आमुचा। करावा दीनाचा परामर्श।।४।। लक्ष्मण म्हणे भेटी वेगी द्यावी। कृपा हो करावी मायबापा।।५।।

७६१. विश्वपती महारुद्रा। मायेचा तू निजभर्ता।।१।। भक्तजना साह्यकारी। ऐसी श्रुती बोलती।।२।। नित्यमुक्ता निरंतरा। वेगी पाय दाखवी।।३।। पुरवी

हेतू कृपाघना। अनंत ब्रह्मांडाध्यक्षा।।४।। शरण आलो जी सर्वज्ञा। कृपादृष्टी पाहावे।।५।। लक्ष्मणा साह्यकारी। नाही तुजवाचूनि।।६।।

७६२. शंभो स्वानंदजीवना। परात्परा निरंजना।।१।। नाना नाटका सुंदरा। योगिराया दीनोद्धारा।।२।। दिशापती रे दिक्पाळ। तुझे कृपे ते सकळ।।३।। नाना क्रीडा मायायोगे। करितोसी उमारंगे।।४।। माये पाजी वेगी पान्हा। धाव वेगी निरंजना।।५।। लक्ष्मणा भेटी द्यावी। अती सदय तू आई।।६।।

७६३. शंभो त्रितापशमना। वेगी येई विश्वजीवना।।१।। विज्ञापना हेचि देवा। माझी तूते कृपाळुवा।।२।। पाय दाखवावे दीना। माझी पुरवावी वासना।।३।। तुजविण मनोरथ। कोण पुरवील अर्थ।।४।। लक्ष्मणा तूचि आप्त। सदय बा उमाकांत।।५।।

७६४. उमावरा पाय दावी। दीनानाथा वेगी येई।।१।। दुजा पदार्थ रुचेना। तुजविण पंचानना।।२।। दीन दयाळू तू बाप। मायबाप विश्वरूप।।३।। विश्वंभरा तू समर्थ। करिसी अनाथा सनाथ।।४।। ऐसी कीर्ती वेद गाती। सिद्ध मुनीही बोलती।।५।। लक्ष्मणाची वासना। पुरवावी हो सर्वज्ञा।।६।।

७६५. देवा कोठे गुंतलासी। कोणे गोविले तुजसी।।१।। ताता योगियांचे मेळी। किंवा भक्त त्या मंडळी।।२।। अहो कैलासाच्या राया। कोणे गोविले स्वामिया।।३।। धाव धाव बा त्वरित। पुरवी माझा मनोरथ।।४।। मनी इच्छा हेचि पूर्णा। चरण पाहावे सर्वज्ञा।।५।। लक्ष्मणा दुजे काही। न लगे वेगी ये गे आई।।६।।

७६६. कोठे गुंतलासी देवा। मायबापा महादेवा।।१।। षड्गुण ऐश्वर्यसंपन्न। महाराज तू सर्वज्ञ।।२।। तुझे वैभव अपार। ब्रह्मादिका न कळे पार।।३।। अनंत ब्रह्मांडांचा पती। तुझे वैभव वर्णू किती।।४।। थोर कामी गुंतलासी। म्हणूनि पाय न दाविसी।।५।। लक्ष्मण म्हणे त्वरे। ताता पाय दाखवी रे।।६।।

७६७. येई कैलासनिवासा। मज़ पायाचा भरवसा।।१।। माझा त्राता नाही नाही। मी तव पतित अन्यायी।।२।। सर्वांपरी मी बा हीन। म्हणवून आठवितो चरण।।३।। मायामोही मी गुंतलो। म्हणूनि तूते अंतरलो।।४।। अनेक केल्या येरझारा। कष्ट भोगिले शंकरा।।५।। लक्ष्मणा पाय दावी। पायी

ठेवी बा अक्षयी।।६।।

७६८. काशीधीशा वेगी येई। सत्स्वरूपा पाय दावी।।१।। नेत्र पाहती ही वाट। केव्हा येशी तू नीलकंठ।।२।। तृप्त करी गा शंकरा। मम नेत्रा विश्वंभरा।।३।। अती सदया त्रिपुरारी। अती त्वरे ये झडकरी।।४।। लक्ष्मणाचे तू धन। परब्रह्म पंचानन।।५।।

७६९. काशीधीशा गा महेशा। ब्रह्मलिंगा या परेशा।।१।। माझे मना ही आवडी। घ्यावी चरणामृत गोडी।।२।। अती त्वरे करी कृपा। महाराज विश्वरूपा।।३।। लक्ष्मण म्हणे माय। अती त्वरे दावी पाय।।४।।

७७०. कैलासाच्या राया यावे देवराया। पाय स्वामिराया दाखवा हो।।१।। लागले रे लागले रे पिसे। देवा तू महेश केव्हा येशी।।२।। काही आवडेना तुजविण धन्या। जाणसी सर्वज्ञा तू रे सर्व।।३।। लक्ष्मण म्हणे यावे लवकर। दयेचे सागर तुझे नाम।।४।।

७७१. येई येई शिवाबाई। मज दीना भेट द्यावी।।१।। तुजवाचूनि गमेना। वेगी पाजी प्रेमपान्हा।।२।। पाय दावी जगन्माते। वेगी येई कृपावंते।।३।। लक्ष्मण झाला दीन। कोण त्राता त्याकारण।।४।।

७७२. कर्पूरगौरा वेगी येई बापा। ब्रह्मांडस्वरूपा शिवा या हो।।१।। तुझे गुण मोजी ऐसा कोण प्राणी। न दिसे त्रिभुवनी एक देवा।।२।। भक्तीचे व्यसन आहे तुजप्रती। त्रिभुवनपती भक्ता वश।।३।। लक्ष्मणाप्रती सोडवी रे देवा। फार कृपाळुवा स्वामी माझा।।४।।

७७३. शंभो वेगी कृपा करा। बहू गांजलो ईश्वरा।।१।। धिक् धिक् हा संसार। धिक् धिक् हा व्यवहार।।२।। वमनप्राय दिसे मजला। याचा कंटाळा बा आला।।३।। नाशिवंत दिसे जाण। फळ काय यात गुंतून।।४।। प्रभो यावे हो लवकर। का हो करिता उशीर।।५।। लक्ष्मणाचा रे त्राता। तूचि आहेसी कृपावंता।।६।।

७७४. शिवाबाई ये ग कनुवाळे आई। भेटी वेगी द्यावी दीनालागी।।१।। भेटीची आवडी आहे मनातून। येई त्वरेकरून गुंतू नको।।२।। भेटीविण दुजे नाही गे मागणे। विश्वाचे जनने पाय दावी।।३।। लक्ष्मण म्हणे पाहू गे चरण। तेथे गे गुंतून राहू सदा।।४।।

७७५. वाट पाहू पाहू नेत्र रे शिणले। दाखवी पाउले वेगी येई।।१।। देवराया तुझा भरवसा जाणून। करितो स्तवन मी रे दीन।।२।। वेद रे शिणले अंत रे लागेना। येथे माझी गणना काय देवा।।३।। काडवाती करून सूर्य ओवाळिती। तेवी पशुपती बोल माझे।।४।। गंगाधरा माझा पुरवी मनोरथ। तुझा रे अंकित म्हणवितो।।५।। लक्ष्मण म्हणे पाहू दे स्वरूप। तेणे सुखरूप होईन मी।।६।।

७७६. तुझे द्वारीचे मी श्वान। देऊ नको झिडकावून।।१।। जग धिक्कार करिती। क्लेश मज फार होती।।२।। कोठे आधार दिसेना। चाल वेगी पंचानना।।३।। द्रव्य तुला मागत नाही। न लगे वैभव शिवाई।।४।। तुझ्या नामाची आवडी। नामामृत घेऊ गोडी।।५।। लक्ष्मणा पावन करा। वेगी यावे कर्पूरगौरा।।६।।

७७७. तोडा अविद्येची बेडी। गुण वदवा तातडी।।१।। भ्रमे भ्रम हो वाढला। तुझा विसर पडला।।२।। देवा अनाथांचा दाता। तूचि आहेसी कृपावंता।।३।। लक्ष्मण दीन झाला। भेटी द्यावी जाश्वनीळा।।४।।

७७८. शिवा या हो वेगी पाय दाखवावे। तुजविण गमेना परब्रह्मा।।१।। लोभियाचे लक्ष जैसे द्रव्यापाशी। ऐसे पायी लक्ष लागलेसे।।२।। या हो लवकर कासिया उशीर। द्रव्यवैभव न लगे आम्हा।।३।। लक्ष्मण म्हणे पाय दाखवा हो। भक्तकैवारी हो भोलानाथ।।४।।

७७९. शंभो कृपा हो करावी। माझी भ्रांती हो हरावी।।१।। पुरातना यावे शिवा। दीनानाथा महादेवा।।२।। पाय वेगी दाखवावे। ब्रीद देवा सांभाळावे।।३।। लक्ष्मणाते उद्धरा। दीनबंधू उमावरा।।४।।

करुणा

७८०. देवा तुझा दास म्हणता लाज वाटे। आचरलो खोटे कर्म फार।।१।। विचारचि नाही पाहिला कोणता। देवा उमाकांता जगद्गुरू।।२।। दोष आचरलो अपार अन्यायी। लिहिता ही मही न पुरे रे।।३।। पृथ्वीचे पत्र समुद्र ही शाई। वनस्पती पाही लेखणी केली।।४।। अक्षयी शारदा लिहिता शिणे रे। माझे दोष ते रे फार देवा।।५।। दोषियाचा अंगीकार कोण करी। म्हणूनि आलो द्वारी देवा तुझ्या।।६।। द्वारामाजी पडलो आता काही करी। पतितपावन

थोरी तुझी म्हणोन।।७।। लक्ष्मण म्हणे वेद ते गर्जती। शरणागताप्रती त्राता शिव।।८।।

७८१. देवाविषयी रे वाढली रे गोडी। अविद्येची धाडी पडली म्हणून।।१।। फार जन्म गेले विषय भोगिता। विषयी तृप्तता नोहेचि रे।।२।। अधिकचि गोडी लागत चालली। वासना भ्रमवी जारीण रे।।३।। षड्रिपू मस्त झाले हे उन्मत्त। यांनी माझा घात फार केला।।४।। लक्ष्मण म्हणे क्रूराचा बंडावा। मोडूनिया देवा पायी ठेवी।।५।।

७८२. कर्म कैसे देवा आमुचे दुर्धर। तुमचा विसर पडला आम्हा।।१।। धामधुमीमध्ये युगचि रे गेले। दंड ते भोगिले नरकभोग।।२।। यमाचे ते दंड भोगिले अपार। परी मन क्रूर उलटेना।।३।। वारंवार मन विषयी रे गोवी। मन दुःखदायी दिसे बापा।।४।। केले ते भोगिले तेही बरे झाले। दाखवा पाउले आता देवा।।५।। लक्ष्मण म्हणे मनात वळून। दाखवी चरण मायापिता।।६।।

७८३. अन्यायी मी खरा खरा हो शंकरा । दोषी विश्वंभरा फार फार।।१।। पतित मी पापी म्हणूनि शरण। दोष अवगुण निवेदिले।।२।। शरण आलियाचा धरा अभिमान। ताता दोष गुण नका पाहू।।३।। तुझी कीर्ती देवा आइकली थोर। पतिताचा उद्धार करितोसी।।४।। लक्ष्मण म्हणे सर्वाहूनि हीन। परि आलो शरण काही करी।।५।।

७८४. वेगी यावे देवा तोडावे बंधन। भ्रमे नागवण केली देवा।।११।। वेगी भ्रम हरा कृपेच्या सागरा। अनादी सोयरा तूचि होशी।।२।। कृपा तुझी होता भव हा उरेना। चुकवी यातना नानाविध।।३।। ऐसा तू दयाळ प्रभो जाश्वनीळ। ब्रह्मांडाचा पाळ आहेसी तू।।४।। लक्ष्मण म्हणे आमुचा कैवारी। तूचि मदनारी आहेसी तू।।५।।

७८५. शिवा या हो वेगी कृपेच्या सागरा। मायेचिया परा सदाशिवा।।१।। सुरगुरू देवा तुजला म्हणती। अहो कृपामूर्ती विश्वनाथा।।२।। भवसागर हा कसा उतरावा। सांगा मज देवा दीनानाथा।।३।। तूचि सर्वाप्रती प्रभू सोडविता। धाव उमाकांता येई त्वरे।।४।। लक्ष्मणाप्रती त्राता आहे कोण। येई रे धावून वृषभध्वजा।।५।।

७८६. मदनारी या हो परमपुरुषा। देवाधिपुरुषा महादेवा।।१।। भवदुःख

देवा मज सोसवेना। यावे पंचानना तापहरा।।२।। चौऱ्यांशीची फेरी नको मदनारी। देवा त्रिपुरारी दान द्या हो।।३।।। कृपेच्या सागरा परेचिया परा। फार येरझारा केल्या देवा।।४।। लक्ष्मण म्हणे लाज तुजप्रती। आम्हा दीनाप्रती त्राता कोण।।५।।

७८७. लक्ष चौऱ्यांशी ग्रामे रे पाहिले। मन भांबावले करू काय।।१।। फार युगे गेली भ्रमण चुकेना। देवा पंचानना त्रासलो रे।।२।। आता हा नरदेह दिला तुम्ही देवा।,स्वहित रे देवा न कळे काही।।३।। अविद्येचे पाश तोडी लवकर। माझी येरझार चुकवा हो।।४।। लक्ष्मण म्हणे तुजवाचूनिया। कोण शंभोराया त्राता मज।।५।।

७८८. पाय रे दाखवी येई शूलहस्ता। वंद्य तू कृतांता जगद्गुरू।।१।। सदय तुजला म्हणती रे देवा। का हो कृपाळुवा निष्ठुरता।।२।। भक्तवत्सल हे नाम टाकून देई। नाही तरी देई भेटी देवा।।३।। धन द्रव्य देवा मागणे रे नाही। येई शिवाबाई कृपावंते।।४।। लक्ष्मण म्हणे पशुपतिनाथा। दर्शन समर्था द्यावे मज।।५।।

७८९. पशुपतिनाथा कृपा हो करावी। भ्रांती हो हरावी विश्वरूपा।।१।। भ्रमे भ्रम हा हो वाढला शंकरा। कृपेच्या सागरा येई त्वरे।।२।। तुझे नाम आहे तारक दयाळा। अहो जाश्वनीळा तारा दीना।।३।। तुझी कृपा होता भव हा उरेना। चुकती यातना नानाविध।।४।। लक्ष्मण म्हणे वेगी सोडवा हो। विश्वव्यापका हो जगद्गुरू।।५।।

७९०. कोठे गुंतलासी नेणो मायबापा। प्रभो विश्वरूपा नित्यमुक्ता।।१।। स्मशानी क्रीडसी किंवा वाराणसी। सुखे रमलासी त्याहाचिया।।२।। किंवा भक्ताचिया प्रेमी गुंतलासी। म्हणूनि न देशी भेटी आम्हा।।३।। किंवा देवा आमुचे फुटके कपाळ। म्हणूनि स्नेहाळ न भेटसी।।४।। लक्ष्मण म्हणे मन लाचावले। दाखवी पाउले एकवेळा।।५।।

७९१. विश्वजनका रे यावे गंगाधरा। कृपेच्या सागरा दीनानाथा।।१।। भवपुरामाजी सापडलो ताता। कोण सोडविता येथे मज।।२।। प्राण कासावीस जाहला रे देवा। धाव कृपाळुवा काढी वेगी।।३।। जलचर दुष्ट तोडिती शंकरा। अनादी सोयरा तूचि एक।।४।। लक्ष्मणाप्रती कोणी रे दिसेना। येई

पंचानना मायबापा।।५।।

७९२. शिवा वेगी या हो तोडा माझा पाश। देवा तू महेश पूर्णदाता।।१।। पाश हा दुर्धर असे कृपावंत। दुःख फार ताता बोलवेना।।२।। भवापासाव तूचि सोडविता। ब्रह्मांडाचा कर्ता तूचि देवा।।३।। त्रिशूलेकरून करा हो छेदन। दाखवी चरण मज देवा।।४।। लक्ष्मण म्हणे काय पाहतोसी। पीडिले आम्हासी भवज्वरे।।५।।

७९३. परब्रह्मा मन आहे अनिवार। याने मोठा घोर मांडिला हो।।१।। अक्षयी भ्रमण करीतसे देवा। मनाते विसावा नसे जाण।।२।। माझा यत्न त्याचे पुढे रे चालेना। येई पंचानना वेगी बापा।।३।। क्षणामाजी मन स्थिर तू करिसी। ब्रह्मांड हालविसी क्षणामाजी।।४।। लक्ष्मण म्हणे लाज तुम्हाकडे। ज्ञान तू रोकडे देशी भक्ता।।५।।

७९४. उमारमणा मन स्थिर हो राहिना। म्हणूनि यातना मजप्रती।।१।। मनाजी बाजीने फार घालविले। तपोधना दिले धक्के देवा।।२।। मी तो सर्वस्वी अन्यायी रे दीन। माझा त्राता कोण सांगा देवा।।३।। येई वेगी माये करी माझी सोय। दाखवी हो पाय वेगी मज।।४।। लक्ष्मण म्हणे सर्वोत्तमाप्रती। लाज तुजप्रती माझी देवा।।५।।

७९५. योगिराया शिवा कामांतका देवा। अरे कृपाळुवा शरण तुज।।१।। काम हा विखार झोंबला मजला। अनिवार घाला याचा देवा।।२।। तपाचे गिरिवर याने हालविले। येथे काय चाले माझे देवा।।३।। तूचि याते देवा शासनकर्ता। माझी लाज ताता तुजकडे।।४।। लक्ष्मण म्हणे ब्रीदाचा अभिमान। तुजप्रती जाण आहे देवा।।५।।

७९६. अरे गंगाधरा मायेचिया परा। माझ्या येरझारा किती सांगू।।१।। भ्रमण करिता थकित रे झालो। फार रे पीडिलो व्यथा भारी।।२।। भवाऐसे दुःख दुजे नसे देवा। अरे कृपाळुवा येई त्वरे।।३।। दुःखाचा सागर असे हा संसार। चुकवा येरझार कृपावंता।।४।। लक्ष्मणाप्रती तूचि बा सोयरा। कोण त्या पामरा रक्षील रे।।५।।

७९७. काम हा रे जार नाचवी विखार। मोठमोठे शूर दीन केले।।१।। धडक हा मारी संचरे शरीरी। प्राणी न विचारी मग काही।।२।। मारा याचा

थोर घालविले फार। पतंग दीपावर पडे जैसा।।३।। अरे त्रिशूलहस्ता याते शासनकर्ता। तूचि कृपावंता आहेसी रे।।४।। लक्ष्मण तुझे द्वारीचा कुतरा। लाज विश्वंभरा तुज पडे।।५।।

७९८. कामाजीबुवाचा मारा मोठा बापा। अरे विश्वरूपा दुष्ट तो रे।।१।। जल ते आहारी पर्ण ते आहारी। त्याते दुराचारी झटू गेला।।२।। वायूचे आहारी याने घालविले। अनहित केले फाराचे रे।।३।। लक्षावधी वर्षे अनुष्ठान केले। त्या घालविले पुण्यवंता।।४।। अरे उमावरा कृपेच्या सागरा। त्वाचि या रे क्रूरा दंडिले रे।।५।। लक्ष्मण म्हणे आमुची कथा काही। लाज शिवाबाई तुजकडे।।६।।

७९९. शिवा दयाघना शिवा दयावंता। वेगी यावे ताता भेटी द्यावी।।१।। चातक पक्ष्याचे लक्ष जैसै देवा। तैसे कृपाळुवा झाले मज।।२।। प्रभो रे गमेना प्रभो रे गमेना। येई पंचानना मायबापा।।३।। भक्तीची आवड़ी भक्तीची आवडी। येई रे तातडी पुरानना।।४।। लक्ष्मणाकारण लक्ष्मणा कोण। ये रे तू धावून मायबापा।।५।।

८००. भ्रम फार झाला भ्रम फार झाला। येई रे स्नेहाळा जगद्गुरू।।१।। अनिवार घाला अनिवार घाला। अविद्येने केला भ्रम फार।।२।। काही रे सुचेना काही रे सुचेना। येई पंचानना तापहरा।।३।। जन्म किती घेऊ जन्म किती घेऊ। तूचि बापभाऊ सोडविता।।४।। लक्ष्मणाप्रती जन्म नको देवा। दान सदाशिवा द्यावे प्रभो।।५।।

८०१. चहुखाणीमाजी जन्म रे घेतले। ग्राम रे पाहिले नानाविध।।१।। कोण्या ग्रामामाजी नाही सुख माय। करी माझी सोय मायबाई।।२।। खेटकपूर रे पट्टण पाहिले। फार क्लेश झाले सांगू काय।।३।। योगिराया शिवा वेगी कृपा करा। अपर्णेच्या वरा येई वेगी।।४।। लक्ष्मण दीन फार गांजला हो। शंभोराया या हो व्यथा हरा।।५।।

८०२. भवभवांतका भवानीच्या वरा। निगम रे सारा जगद्गुरू।।१।। तुझे जे म्हणविले तेचि पार झाले। येर हे गुंतले मायाजाळी।।२।। तूते विसरलो म्हणूनि भ्रमलो। दुःख रे पावलो कर्मयोगे।।३।। पिनाक घेऊनि कर्माचे खंडन। करा शूळपाणि वेगी आता।।४।। लक्ष्मण म्हणे झालो कासावीस।

तोडी भवपाश वेगी बापा।।५।।

८०३. भवापासूनि रे सोडवा मजला। ब्रह्मांडाच्या पाळा दीनानाथा।।१।। जगाचा तू कर्ता पुरातना ताता। मायेचा तू भर्ता विश्वंभरा।।२।। दुःख सोसवेना दुःख सोसवेना। सोडवा हो दीना शंभोराया।।३।। भ्रम फार झाला भ्रम फार झाला। सोडवा दयाळा दीनानाथा।।४।। लक्ष्मण म्हणे आप्त तूचि खरा। चुकवा येरझारा माझ्या देवा।।५।।

८०४. येई वेगी देवा अरे उमाधवा। पुरातना शिवा योगिराया।।१।। तुझे ध्यानामाजी कल्पे फार जाती। मनूची गणती काय तेथे।।२।। अविनाश रूप तुझे शूळपाणि। ऐसी वेदवाणी आहे देवा।।३।। भक्ताचा कैवारी तुजला म्हणती। हीनादीनाप्रती रक्षिले त्वा।।४।। लक्ष्मणाप्रती उद्धरावे देवा। पाय हो दाखवा दीनाप्रती।।५।।

८०५. भवचक्र हे रे लागलेसे पाठी। याने मज कष्टी केले देवा।।१।। भवचक्र क्रूर मारा अनिवार। केले रे जर्जर बोलवेना।।२।। या चक्रेकरूनि फार पीडिले प्राणी। याते विध्वंसूनि टाका देवा।।३।। त्रिशूलेकरूनि करा हो खंडन। दाखवा चरण देवराया।।४।। लक्ष्मण म्हणे स्वामी रे शंकरा। वेगी कृपा करा मायबापा।।५।।

८०६. अविद्या ही काटी लागलीसे पाठी। जीव झाला कष्टी देवराया।।१।। अंगाते वेष्टिले काही रे सुचेना। काटे पंचानना शूलप्राय।।२।। शूलप्राय काटे अंगाते रुपती। फार पीडिताती येई वेगी।।३।। सोडविता नाही येई लवलाही। त्रिभुवनगोसावी नाम तुझे।।४।। लक्ष्मण म्हणे फार युग गेले। हिने रे वेष्टिले आम्हा दीना।।५।।

८०७. कामाजी क्रोधाजी मोह अनिवार। याने केले जेर मजला हो।।१।। योगिजनाप्रती हे रे घालविती। जगी केली वस्ती याहांनी हो।।२।। तपोधनाप्रती धक्के दिले देवा। माझा तेथे केवा काय असे।।३।। शूरावरी घाला करिती हे क्रूर। दीनाचा विचार तेथे काय।।४।। लक्ष्मण म्हणे परब्रह्माप्रती। लाज कृपामूर्ती ठेवा माझी।।५।।

८०८. तुझा विसर पडला। म्हणूनि दुःख हे आम्हाला।।१।। लक्ष चौऱ्यांशी योनी। नानापरी ही जाचणी।।२।। तुझे भक्त जे सावध। त्याते

सर्वदा आनंद।।३।। इंद्रा चंद्रा सुख नाही। भक्ता सुख ते अक्षयी।।४।। बद्ध ते त्वा सिद्ध केले। तुझे कृपे फार धाले।।५।। शरणागताचा कैवारी। महाराज त्रिपुरारी।।६।। लक्ष्मण दीन शरण। शंभो करा हो पावन।।७।।

८०९. विश्वनाथा विश्वताता। वेगी ये रे कृपावंता।।१।। भवचक्र हे अनिवार। मजभवते दुःख थोर।।२।। कामक्रोधाचिये मेळी। पडलो बा चंद्रमौळी।।३।। सोडवी या चक्रातून। दुःख दिसे हे दारुण।।४।। कामांतक तुझे नाम। भक्ता करिसी निष्काम।।५।। लक्ष्मण म्हणे फार। कष्टी झालो ये लवकर।।६।।

८१०. शंभो पायाचा भरवसा। आम्ही धरीलासे धाव।।१।। अती येई रे तातडी। नको विलंब लावू।।२।। पाजी कृपेचा गे पान्हा। माते कनवाळे आई।।३।। अहो अनाथांच्या नाथा। सर्वा पदी भरवसा।।४।। तुमचा आम्हा हो दीनाते। महाराजा सर्वज्ञा।।५।। लक्ष्मणा कोण त्राता। देवा तुम्हावाचूनि।।६।।

८११. बेल म्हणूनि गंगावती। अर्पितो मी मंदमती।।१।। देवराया अंगीकारा। दीनानाथा उमावरा।।२।। तू रे सर्वत्रा समान। ऐसे वेदांचे वचन।।३।। दोषी केवळ मी हीन। आलो तुजला शरण।।४।। लक्ष्मण पतिताते। वेगी उद्धरावे ताते।।५।।

८१२. आम्हा हीनामुखेकरून। बोलविसी तू वचन।।१।। केवळ दोषांचा सागर। अती अन्यायी मी पामर।।२।। मजऐसा दोषी देवा। नाही त्रिभुवनी शिवा।।३।। परि तू हृदयी असून। वदवी तू आपुले गुण।।४।। लक्ष्मण अविचारी। निमित्ताचा अधिकारी।।५।।

८१३. तुज पाहाता ईश्वरा। मोडे अविद्येचा थारा।।१।। वृत्ती मुरे ही चरणी। होय त्रितापाते हानी।।२।। ब्रह्मानंद अवघा होय। तुझे अक्षयी ते पाय।।३।। अनंत ब्रह्मांडे हे राज्य। वमन मानिती भक्त तुझे।।४।। चरणगोडी त्या लाधली। माया नाही त्या उरली।।५।। लक्ष्मण तुझे श्वान। त्याते वाली दावी कोण।।६।।

८१४. येई येई रे तातडी। देवराया घाली उडी।।१।। माया अरण्य दारुण। येथे पडलो गुंतून।।२।। वृक्ष दाटले रे फार। मोठा निबिड अंधार।।३।। व्याघ्र सर्प ठायी ठायी। मार्ग सुचेना रे काही।।४।। भूत पिशाच्च तस्कर। मार्गी

बैसले भ्यासूर।।५।। माझा जाऊ पाहे प्राण। विघ्न हरी हे दारुण।।६।। लक्ष्मणा सोडविता। कोणी नाही येई ताता।।७।।

८१५. उदार स्वामी शंभोराव। ऐसे बोलती रे सर्व।।१।। मोठमोठेही बोलती। फार दयाळू पशुपती।।२।। आम्हाविषयी का कृपण। कैसे तुझे थोरपण।।३।। भिक्षा हेचि मागतो रे। पाय वेगी दाखव रे।।४।। लक्ष्मण म्हणे शिवा। वेगी आपुला म्हणावा।।५।।

८१६. त्रिशूल ते खड्ग वेगी ये घेऊन। कर्माचे खंडन करी माझ्या।।१।। वृषभाच्या जैसी वेसण नाकात । तैसा या कर्मात गुंतलो रे।।२।। कर्म ही वेसण अती ही दुर्धर। भ्रमलो मी फार नाना योनी।।३।। याचे निःसंतान करी वेगी ताता। धावा उमाकांता जगद्गुरू।।४।। लक्ष्मण म्हणे तुजविण कोणी। नाही त्रिभुवनी सोडविता।।५।।

८१७. जन्म घेता घेता कंटाळा रे आला। काय या कर्माला करावे हो।।१।। किती जन्म घ्यावे किती रे भ्रमावे। कैसे रे करावे देवराया।।२।। जेथे जन्म घ्यावा तेथे दुःखचि रे। सुखाची जाती रे कोठे नाही।।३।। उपाधीप्रती बा गणनाचि नाही। धाव लवलाही नीळकंठा।।४।। गर्भवास हाचि ताता नरकवास। सुख या देहास पडेना रे।।५।। दुःखाप्रती देवा नाही पारावार। स्वामी येरझार चुकवा हो।।६।। लक्ष्मण म्हणे दाखवी चरण। तेथेचि गुंतून राहीन मी।।७।।

८१८. नको नको ताता नको हा संसार। फार मी जर्जर झालो देवा।।१।। इंगळाची शय्या निद्रा बा लागेना। शंभो पंचानना वाली नाही।।२।। तळमळ भारी काहाली हो फार। दुःखाचा सागर भरलासे।।३।। येथून काढील ऐसा नाही कोणी। शंभो तुजवाचूनि मायबापा।।४।। येथे गोवणार आहेत रे फार। त्याहाचा विचार त्याहा न कळे।।५।। लक्ष्मण म्हणे सोडविता तूचि। माउली दीनाची सत्य सत्य।।६।।

८१९. कुसंग हा देवा चुकेना येई रे। वेगी निवारी रे विघ्न थोर।।१।। समंध हा मोठा लागलासे पाठी। फार मी हिंपुटी झालो देवा।।२।। भव हा समंध निघेना रे कोणा। धाव पंचानना अती त्वरे।।३।। फार पंचाक्षरी पाहिले चुकेना। समंध हा जाणा अती क्रूर।।४।। आता या क्रूराचे करी

निःसंतान। पंचाक्षरी जाण तूचि श्रेष्ठ।।५।। लक्ष्मण म्हणे कल्पनासमंध। काढी तू स्वानंदसुख देई।।६।।

८२०. वासना हे बेट झालेसे हो भारी। गुंतलो त्रिपुरारी येथे देवा।।१।। जन्मासी कारण वासना ही मूळ। सदा खळखळ जन्ममरण।।२।। बेट हे रे खांदी करी बा सपाट। दाखवी रे वाट मायबापा।।३।। तुजविण कार्य कदा हे होईना। प्रभो रे त्रिनयना येई वेगी।।४।। लक्ष्मण म्हणे पडलो गुंतून। हात दे ओढून घेई मज।।५।।

८२१. देवा धाव धाव गौरीप्रिया रे। येई अती त्वरे मायबापा।।१।। अविद्येचे बंड मजभोवते रे। मिळाले प्रभो रे अती हीन।।२।। क्रूराने वेष्टिले मध्ये सापडलो। कासावीस झालो येई येई।।३।। धामधूम मजवरी हे करिती। काही एक युक्ती चालेना रे।।४।। लक्ष्मण म्हणे आम्हा वाली कोण। देवा तुम्हाविण करा शोध।।५।।

८२२. ताप अनेका रे प्रकारचा देही। सांगावया नाही गणना बापा।।१।। किती म्हणूनि दुःख तुज निवेदावे। त्रिताप हे गोवे नानापरी।।२।। जीव हा श्रमला भोगिता भोगिता। म्हणूनि स्मर ताता झाला तुझा।।३।। आलो लोटांगणी देवा बद्धपाणि। दाता तू निदानीचा रे श्रेष्ठ।।४।। लक्ष्मण म्हणे कृपादृष्टी पाहे। तेणे माझे कार्य होय सहज।।५।।

८२३. हेमाद्रिजामाता देवा कृपावंता। सुखदुःखातीता येई देवा।।१।। निःसंगा सुसंगा शंभो ज्योतिर्लिंगा। पावन अभंगा करी मज।।२।। भक्त रे पाळका नाना रे नाटका। विश्व रे व्यापका देई दान।।३।। लक्ष्मण म्हणे सोडवावे दीना। भ्रम हा मिटेना झालो क्षीण।।४।।

८२४. नका झिडकावू अन्यायी म्हणून। दीनाते पावन करावे हो।।१।। दोषी मी रे फार आलो तुझे द्वारी। देवा त्रिपुरारी भिक्षा द्यावी।।२।। भिक्षा हेचि द्यावी द्यावे दर्शन। वदवावे गुण प्रेमयुक्त।।३।। दाता तू दयाळ प्रभो जाश्वनीळ। करिसी निर्मूळ कल्पनेचे।।४।। लक्ष्मणाप्रती कोण त्राता दावी। त्याते कोणी नाही तुजविण।।५।।

८२५. भ्रम फार झाला सुचेना रे काही। बुडालो रे डोही भवाचिया।।१।। कासावीस झालो शुद्धी मज नाही। युक्ती मायबाई कळेना काही।।२।।

म्हणूनि तुजला मारितो हाका रे। देवराया तू रे येईनासी।।३।। त्रास मानू नका फार झालो कष्टी। प्रभो कृपादृष्टी करावी हो।।४।। लक्ष्मण म्हणे तुझी होता कृपा। भ्रम मायबापा उरेना रे।।५।।

८२६. शंभो बुडालो भवपुरी। काढी येई गा लवकरी।।१।। पाणी अथांग हे फार। देवा झालो रे जर्जर।।२।। जळचर हे तोडिती। फार क्रूर हे दुर्मती।।३।। यांनी भक्षिले रे फार। मारा यांचा अनिवार।।४।। लक्ष्मणा सोडविता। कोणी नाही येई ताता।।५।।

८२७. मनाचा हा वेग अती हा दुर्धर। धावे देशावर ग्रामोग्राम।।१।। पलमात्र देवा न राहे रे स्थिर। कोणता विचार करू आता।।२।। बंड परिवार त्याचा अधिपती। काही देवा युक्ती चालेना रे।।३।। फार भ्रमविले भ्रमवेना आता। कोणी मज त्राता दिसेना रे।।४।। लक्ष्मण म्हणे ये रे धावून। करी रे दंडन पाय दावी।।५।।

८२८. लक्ष चौऱ्याऐंशी फेरा हा हो मोठा। कष्टी नीलकंठा झालो फार।।१।। कोटी कोटी फेरे एका योनीप्रती। दुःख कृपामूर्ती सांगवेना।।२।। नरक मूत्र मज्जा जठरीचा वास। तोडिती बाळास कीटक ते।।३।। दुःखाप्रती देवा उपमाचि नाही। धाव शिवाबाई कनवाळे।।४।। लक्ष्मण म्हणे सोडवी येथून। त्राता तुजविण कोण आम्हा।।५।।

८२९. शिवा या हो वेगी त्रासलो मी फार। दीनाचे माहेर तूचि देवा।।१।। नाना हो उपाधी नाना हो यातना। दुःख सोसवेना देवराया।।२।। क्रूर समुदायी पडलो मी ताता। कोणी सोडविता दिसेना रे।।३।। लक्ष्मण म्हणे फार त्वा रक्षिले। दाखवी पाउले सोडवी रे।।४।।

८३०. तूते गुंते फार कोठे गुंतलासी। त्रास का तुम्हासी आला देवा।।१।। वाराणसीपती सदय तू फार। रक्षिले अपार हीन त्वा रे।।२।। दाता तुजऐसा नसे त्रिभुवनी। देवा शूळपाणि कृपावंता।।३।। अविद्या वाघीण ग्रासू पाहतसे। सोडवी वेगेसी बापा येई।।४।। लक्ष्मण म्हणे गिरजेच्या कांता। स्वामी मायातीता सखा तूचि।।५।।

८३१. प्रभो तळमळ जाईना रे देवा। मन कृपाळुवा आटोपेना।।१।। जाया आणि धन येथे गुंते मन। अहोरात्रंदिन हाचि ध्यास।।२।। तुझिया

पायाचा पडला विसर। न सुचे विचार स्वहिताचा।।३।। याते रे उपाय सांग वेगी येई। धाव लवलाही मायबापा।।४।। लक्ष्मण म्हणे करी समाधान । दाखवी चरण दीनानाथा।।५।।

८३२. देवराया भ्रमे भ्रमलो मी फार। स्वहित विचार चुकलो रे।।१।। जननीजठरी होतो मी गुंतून। तेथे दर्शन दिले तुम्ही।।२।। तेथे म्या तुम्हासी केले हो भाषण। प्रेमयुक्त गुण गाईन मी।।३।। सोडवा मजला नरक दुर्धर। कृपेच्या सागरा कृपा केली।।४।। विसर पडला सुचेना रे काही। गती कोणती ते करू सांग।।५।। लक्ष्मण म्हणे ये लवकर। भ्रमाचा संहार करी ताता।।६।।

८३३. केला अंगीकार थोरांनी रे ज्याचा। अव्हेर रे त्याचा नाही केला।।१।। कूर्मे पृथ्वीचा वागविला भार। देवा रे अव्हेर नाही केला।।२।। समुद्री तो अग्नी करी रे पीडन। परि तो सहन करी देवा।।३।। त्वाचि पूर्वी देवा विष रे भक्षिले। भक्त रे रक्षिले कृपावंता।।४।। कंठ निळा झाला दुःख ते दारुण। सुख त्वा मानून घेतलेसी।।५।। लक्ष्मण म्हणे आलो रे शरण। करावे पावन दीनबंधू।।६।।

८३४. सुख रे पडेना श्रमलो मी फार। कोणता विचार करू देवा।।१।। देश विदेश म्या पाहिले भ्रमूनि। घोर त्या अरण्यी फिरलो रे।।२।। पुरे रे पाटण फिरूनि पाहिले। सुख नाही झाले मज देवा।।३।। भ्रमण मिटवा देवा उमाधवा। घाला कृपाळुवा मोठा दिसे।।४।। लक्ष्मण म्हणे देवा त्रिपुरारी। पायी स्थिर करी वेगी ताता।।५।।

८३५. गर्भवास हाचि आहे नरकवास। नानापरी क्लेश होती बापा।।१।। मळमूत्रामाजी प्राणी आक्रंदे रे। जंतू तोडिती रे महादुःख।।२।। खउट लवण आम्ल माता भक्षी ती रे। होतसे दाह रे सांगवेना।।३।। ऐसी ही यातना सांगू कोठवर। लक्ष चौऱ्यांशी नगर पाहे प्राणी।।४।। लक्ष्मण विनवी स्वामिरायाप्रती। दुःख कृपामूर्ती दावू नका।।५।।

८३६. शिवा या हो वेगी कृपावंता देवा। ताप निरसावा वेगी माझा।।१।। युगे फार गेली ताप हा जाईना। भ्रमण चुकेना काय करू।।२।। अविद्येचा संग भोवला मजला। अनिवार घाला आहे हा हो।।३।। वर्म रे चुकला म्हणूनि भ्रमला। नाना योनी गेला संगतीने।।४।। लक्ष्मण म्हणे नको येरझार। सोडवा

लवकर कृपावंता।।५।।

८३७. मतिमंद हीन अन्यायी मी दीन। सोडविता कोण तुजविण।।१।। विद्या नाही गुण नाही द्रव्य काही। सर्वापरी पाही क्षुद्र असे।।२।। दोषांचा निधी मी असे स्वामिराया। आता कोणी सखया नसे मज।।३।। अनाथांचा नाथ तू रे भोलानाथ। करिसी सनाथ हीनादीना।।४।। लक्ष्मण म्हणे प्रभो वेगी येई। दीनाते सोडवी कृपावंता।।५।।

८३८. कोठे गुंतलासी देवा त्रिपुरारी। येई लवकरी वृषभध्वजा।।१।। अविद्या वाघीण महा अनिवार। ग्रासिले रे फार दीन देवा।।२।। शस्त्रपाणि हिने भक्षिले अपार। आमुचा विचार काय देवा।।३।। धरिले मजला सोडीना रे देवा। येई कृपाळुवा काय पाहसी।।४।। लक्ष्मण म्हणे उमाईच्या वरा। धाव परमेश्वरा या हो वेगी।।५।।

८३९. काय पाहतोसी अंत रे आमुचा। स्वामी अनाथाचा म्हणविसी।।१।। सदय आहेसी तू रे कृपावंत। रक्षिले पतित तुम्ही देवा।।२।। किती रे भ्रमण करावे त्र्यंबका। ब्रह्मांडनायका श्रमलो रे।।३।। लक्ष्मण म्हणे वेगी सोडवा रे। त्राता सदाशिव तूचि माझा।।४।।

८४०. तुझे नावरी सोंग। केले रंग संपादी।।१।। भक्तिहीन क्रियाहीन। सर्वापरी अपराधी।।२।। केवळ दोषाचा सागर। विषयी रत सर्वदा।।३।। पाठांतर नाही काही। शांती नाही क्षमा रे।।४।। कीर्तनी राहिलोसे उभा। आता सांभाळी ब्रीद।।५।। लक्ष्मण म्हणे शंभो। वेगी यावे तातडी।।६।।

८४१. माझे अवगुण लिहिता। न पुरे ही धरा रे।।१।। ऐसियाचा अंगीकार। कोण करील ताता।।२।। पूर्वीपासूनि रक्षीत। आलासी रे आजवरी।।३।। तुजऐसा धनी। कोणी न दिसे मज।।४।। आता काही करी देवा। तुझे द्वारी पडियेलो।।५।। लक्ष्मण म्हणे शंभो। धावा धावा तातडी।।६।।

८४२. अनंत यातना शरीरी। देवा दुःख दिसे भारी।।१।। कैसे करू चंद्रचूडा। दुःखार्णव हा मोठा गाढा।।२।। कोण काढील येथून। शंभो तुम्हा हो वाचून।।३।। लक्ष्मणा नाही त्राता। वेगी येई कृपावंता।।४।।

८४३. कामाचा तो आहे अरी। महाराज त्रिपुरारी।।१।। ऊर्ध्वरेता तो शंकर। सकल योगियांचे माहेर।।२।। भक्तजनांचा कैवारी। आले संकट

निवारी।।३।। नाम घ्या हो त्याचे वाचे। घाले चुकवी काळाचे।।४।। लक्ष्मणाते शंकरा। वेगी सोडवा दातारा।।५।।

८४४. देवा प्रलय वर्तला। वेगी सोडवा दयाळा।।१।। साधन काही हो कळेना। सत्यस्वरूपा पंचानना।।२।। मशकप्राय माझा जन्म। वृथा जन्मलो अधम।।३।। मज पापीष्टाचा त्राता। कोण आहे गा शाश्वता।।४।। तुजवाचूनि सर्वज्ञा। कोण मज उद्धरेना।।५।। लक्ष्मण दुर्व्यसनी। कोण त्राता तुजवाचूनि।।६।।

८४५. देवा पाय दावी झालो रे शरण। केला अपमान क्रूरांनी रे।।१।। सोडविता नाही काय म्या करावे। प्रभो त्वरे यावे जगन्नाथा।।२।। क्रूर समुदाय फार झाला बंड। वेगी याचे तोंड ठेचा देवा।।३।। लक्ष्मण म्हणे झाला दंगा फार। याते दंडणार तूचि नाथा।।४।।

८४६. फार म्या भ्रमण केले उमाधवा। शीण कृपाळुवा आला मोठा।।१।। याचे निरसन करिता तू एक। त्रैलोक्यनायक दयाळू तू।।२।। भवबाधा हरा देवा विश्वंभरा। अनादी सोयरा आहेसी तू।।३।। लक्ष्मण म्हणे माय शिवाबाई। आम्हा कोणी नाही तुजविण।।४।।

८४७. तुझिया स्वरूपी गुंतूनि राहिले। नाही परतले पुन्हा देवा।।१।। गुंतले व्यसनी पडले गुंतून। दुःख ते दारुण भोगिती रे।।२।। मायेचा तो घाला आडवा पर्वत। पडला गुहेत गिरी मोठा।।३।। वाट रे सुचेना येई पंचानना। सोडवा हो दीना मार्ग दावा।।४।। लक्ष्मण म्हणे वेगी पाय दावी। कृपा रे करावी मायबापा।।५।।

८४८. तुझे द्वारीचे रे श्वान मी शंकरा। पार्वती रे वरा लाज रक्षी।।१।। उपेक्षा हो माझी न करावी ताता। पूर्णब्रह्म ज्ञाता म्हणविसी।।२।। आदिनाथा पाहा बरवे विचारून। ब्रीद सांभाळून कार्य करा।।३।। लक्ष्मण म्हणे प्रभो विश्वेश्वरा। सांभाळ हो करा अनाथाचा।।४।।

८४९. शंभो योगीश्वरा देवा विश्वंभरा। भ्रम वेगी हरा देवराया।।१।। भ्रम फार झाला सुचेना रे काही। माय शिवाबाई धाव वेगी।।२।। भ्रमाते नासून दाखवी चरण। करी निःसंतान कल्पनेचे।।३।। लक्ष्मणाप्रती सोडवावे नाथा। ब्रह्मांडाच्या नाथा सत्यरूपा।।४।।

८५०. धाव धाव वेगी धाव रे तातडी। देवराया उडी घाल वेगी।।१।। समुदाय क्रूर एकमतेकरून। करिती ताडन वेळावेळा।।२।। क्षण एक देवा सुख रे पडेना। केली विटंबना भोळ्या नाथा।।३।। नको अंत पाहू सोडविता नाही। योगिराया येई झालो दीन।।४।। लक्ष्मण म्हणे शंभो तू दातार। करिसी अंगीकार दीनाचा रे।।५।।

८५१. निंद्य कर्म आचरलो। विषयमदे मी भुललो।।१।। अंगी ताठा भरला भारी। देवा फार मी दुराचारी।।२।। निंदा फार म्या हो केली। करू नये ती कर्मे केली।।३।। म्हणूनि दुःख झाले फार। भरला पापाचा सागर।।४।। दीनाचा तो कैवारी। उद्धरिले दुराचारी।।५।। त्यात मी एक दुर्जन। सोडवा हो दीनाकारण।।६।। लक्ष्मण म्हणे देवा। देवा वेगी हो सोडवा।।७।।

८५२. धाव धाव वेगी धाव रे तातडी। देवराया उडी घाली वेगी।।१।। समुदाय क्रूर एकमतेकरून। करिती ताडन वेळोवेळा।।२।। क्षण एक देवा सुख रे पडेना। केली विटंबना भोळ्या नाथा।।३।। नको अंत पाहू सोडविता नाही। योगिराजा येई झालो दीन।।४।। लक्ष्मण म्हणे शंभो तू दातार। करिसी अंगीकार दीनाचा रे।।५।।

८५३. त्र्यंबका बा यावे कृपेच्या सागरा। अरे योगीश्वरा पुरातना।।१।। त्र्यंबक दयाळ त्र्यंबक स्नेहाळ। ब्रह्मांडाचा पाळ त्र्यंबकराज।।२।। काम निर्दाळिला त्र्यंबक प्रभोनी। काळाचा तो धनी आहे तो रे।।३।। व्यापका यावे बा सोडवा मजला। भरवसा मजला पायाचाचि।।४।। लक्ष्मण म्हणे कृपेच्या सागरा। अनादी सोयरा तूचि आम्हा।।५।।

८५४. मन हे चपळ आवरेना देवा। अरे कृपाळुवा यावे वेगी।।१।। फार कर्म याने दुस्तर रे केले। मज भ्रष्टविले याने देवा।।२।। येणे जाणे सर्व याच्या रे प्रतापे। पुण्य आणि पापे हेचि करवी।।३।। याते शासनकर्ता तूचि रे समर्था। कोण आदिनाथा त्राता मज।।४।। तुझी कृपा होता सर्व हरे भय। दावा वेगी पाय उमाधवा।।५।। लक्ष्मण म्हणे येई लवकर। दीनाचे माहेर आहेसी तू।।६।।

८५५. मन हे तस्कर चोरी करी देवा। याते सदाशिवा दंडा वेगी।।१।। घाला मजवरी आणूनि घाली हे। भोग भोगवी हे मजलागी।।२।। नाना परीचे

ताप दाविले मजला। फार घात केला याने माझा।।३।। याचा बंदोबस्त तूचि रे कर्ता। दंडा याते ताता महारुद्रा।।४।। लक्ष्मण म्हणे तुझी कृपा होता। हरे भवव्यथा क्षणामाजी।।५।।

८५६. कवणिया स्थानी गुंतलासी देवा। अरे उमाधवा येई वेगी।।१।। कैलासी किंवा वाराणसी। स्वस्थ बैसलासी विश्वरूपा।।२।। आमुचे दुर्दैन्य जाहले ईश्वरा। येई परमेश्वरा वेगी आतां।।३।। लक्ष्मण म्हणे सोडविता कोण। तुज रे वाचून देवराया।।४।।

८५७. येई रे दयाळा ब्रह्मांडाच्या पाळा। प्रभो जाश्वनिळा पूर्णब्रह्मा।।१।। सहा हे माजले मज भ्रष्टविले। अनिवार घाले यांचे देवा।।२।। जबरदस्ताप्रती शिक्षा हो लाविती। माझी येथे गती काय देवा।।३।। त्रिशूलेकरून करी रे खंडन। शिव भगवान त्राता माझा।।४।। लक्ष्मणाप्रती पीडिले रे भारी। येई लवकरी महादेवा।।५।।

८५८. लाज माझी रक्षी देवा शूळपाणि। त्राता मज कोणी दिसेना रे।।१।। माझ्या अवगुणा संख्या रे होईना। लिहिता पुरेना धरणी ही।।२।। दोषी तू रक्षिसी कीर्ती तुझी फार। दीनाचे माहेर तूचि देवा।।३।। असंख्य पातकी तुम्ही रक्षिले हो। कैलासा नेले हो मिरवत।।४।। भरवसा मजला आला रे दयाळा। सोडवा स्नेहाळा मज दीना।।५।। लक्ष्मण म्हणे यावे हो व्यापका। ब्रह्मांडपाळका दाता तूचि।।६।।

८५९. कृपेच्या सागरा अजर अमरा। देवा विश्वंभरा यावे वेगी।।१।। किती जन्म घ्यावे किती रे भ्रमावे। यमाने दंडावे किती वेळा।।२।। फार दंडिले रे क्लेश भोगिले रे। कोणी दिसेना रे सोडविता।।३।। लक्ष्मण म्हणे सोडवी दीनाते। यावे कृपावंते शिवाबाई।।४।।

८६०. अरे सूत्रकारा कृपेच्या सागरा। भ्रम विश्वंभरा झाला फार।।१।। भ्रम फार झाला प्रभो जाश्वनिळा। त्रैलोक्याचा पाळा यावे त्वरे।।२।। भ्रमसागरात पडलो समर्था। यावे दीनानाथा निरसा हो।।३।। लक्ष्मण म्हणे कोण रे काढील। कोण रे रक्षील दीनाप्रती।।४।।

८६१. जन्म घेता घेता शिणलो रे ताता। अरे कृपावंता दुःख फार।।१।। गर्भवासाऐसे दुःख रे दिसेना। नाना त्या यातना जीवाप्रती।।२।। जंतू अनिवार

तोडिती प्राण्याला। बाहेर येण्याला कष्ट फार।।३।। कृपा तू करून बाहेर
आणिसी। संसारसुखासी भुलले प्राणी।।४।। प्रपंच हाही हो दुःखाचा डोंगर।
गुंतले अपार भ्रमले हो।।५।। अंतकाळी देवा प्राण रे जाईना। विंचवाच्या
वेदना फार देवा।।६।। सहस्र विंचवांच्या वेदना रे रोमी। किती दुःख स्वामी
सांगावे हो।।७।। यमराव दंडी मारा अनिवार। फार जर्जर झालो देवा।।८।।
बंधन तोडा हो पाय दाखवा हो। प्रभो वेगी या हो मायबापा।।९।। लक्ष्मण
म्हणे शूलपाणि या हो। दीना उद्धरा हो उमाधवा।।१०।।

८६२. वेगी यावे देवा फार गांजलो रे। त्राता दिसेना रे कुणी मज।।१।।
अन्यायी मी फार पापाचा सागर। अवगुणी पामर आहे देवा।।२।। जडबुद्धी
मंद सर्वापरी हीन। फार आचरण खोटे माझे।।३।। जार चोर सर्वापरी मी
पतित। अशा पामराते कोण रक्षी।।४।। जनलोक माझा त्रास रे करिती।
कोणी कृपामूर्ती बोलेना रे।।५।। श्वानापरी माझे जिणे झाले देवा। कैसे
कृपाळुवा जिणे माझे।।६।। द्वारामाजी मज येऊ न देती रे। कैसी कृपामूर्ती
गती माझी।।७।। तुजवाचूनिया कोणी रे दिसेना। वेगी पंचानना येई आता।।८।।
लक्ष्मण हीन गांजलो रे देवा। प्रभो महादेवा सोडवावे।।९।।

८६३. फार शीण आला कृपावंता येई। भ्रमणा हरवी माझी देवा।।१।।
कोठवरी क्लेश भोगावे समर्था। प्रभो आदिनाथा सोडवा हो।।२।। फार साल
झाले भ्रमतो मी पामर। कोणी अंगीकार करीना रे।।३।। लक्ष्मण म्हणे
सोडविता तूचि। माउली दीनाची तूचि देवा।।४।।

८६४. दुःख मोठे मुखे सांगवेना देवा। चौऱ्यांशीचा गोवा दुःख फार।।१।।
कितीक जन्मांचे दुःख रे सांगावे। ऐसे न करावे दयाळा रे।।२।। विचार रे
देवा नाही मी पाहिला। म्हणूनि मजला दुःख झाले।।३।। शरण रे आलो दोष
पाहू नका। सोडवी रे त्र्यंबका वेगी देवा।।४।। लक्ष्मण म्हणे फार त्वा
रक्षिले। ब्रीद सांभाळिले पाहिजे रे।।५।।

८६५. अनाथ मी रे दीन सर्वापरी हीन। मंदाप्रती कोण त्राता देवा।।१।।
काही एक माझी क्रिया शुद्ध नाही। सुचेना रे काही धाव देवा।।२।। हृदय
रे शून्य स्तवावे म्या कैसे। देवा तुम्ही ऐसे का हो केले।।३।। लक्ष्मण म्हणे
यावे लवकर। दीनाचा उद्धार करावा हो।।४।।

८६६. पापरूपी मी रे कोण मज रक्षी। देवा सर्वसाक्षी जाणता तू।।१।। तुजपुढे दोष कैसे लपवावे। जाणसी रे सर्व तूचि देवा।।२।। पापी मी रे खरा प्रभो रे शंकरा। शरण ईश्वरा आलो तूते।।३।। समर्थांनी आता पाहावा विचार। तुमचा चाकर म्हणवितो।।४।। लक्ष्मण म्हणे थोराचे लक्षण। शरणागता कोण धिक्कारी हो।।५।।

८६७. वेगी यावे देवा अंत पाहू नका। त्रिभुवनपालका सदाशिवा।।१।। फार मी गांजलो तू रे बा जाणसी। करुणा तुजसी उपजेना।।२।। सहा हे दुर्जन माझे दावेदार। माजले हो फार दीनानाथा।।३।। याते दंड करा प्रभो हो ईश्वरा। माझी सोय करा वेगी देवा।।४।। लक्ष्मण म्हणे माझा त्राता कोण। सोडवा येथून मायबापा।।५।।

८६८. गुण रे वदवी गुण रे वदवी। प्रभो वेगी येई मायबापा।।१।। मनमृग देवा चंचल हो फार। महा अनिवार भ्रमे सदा।।२।। पायी याते लावी प्रभो कृपाळुवा। मागणे रे देवा हेचि तुज।।३।। माये कृपा करी भ्रांती वेगी हरी। धावे त्रिपुरारी मायबापा।।४।। लक्ष्मण म्हणे सोयरा तूचि रे। लाज दीनाची रे गुण तुजकडे।।५।।

८६९. कोणी रे दिसेना कोणी मज नाही। येई शिवाबाई कृपाळुवे।।२।। धावूनि गे येई सखे मायबाई। स्तनी मज लावी क्षुधित मी।।२।। त्वरा करी माते कृपेचे सरिते। त्रिभुवनमाते दयाळुवे।।३।। लक्ष्मण म्हणे अनंत जन्मांची। सखी तूचि आहेसी गे।।४।।

८७०. धावा धावा हो पशुपती। मजला दुर्धर पडली भ्रांती।।१।। तुझा स्मरचि होईना। कैसे करू पंचानना।।२।। विषयगोडी ही सुटेना। बहुत भोगिल्या यातना।।३।। कोणा जाऊ मी शरण। शंभो तुज रे वाचून।।४।। पतिता करिसी पावन। ऐसे श्रेष्ठाचे वचन।।५।। लक्ष्मण पतिताते। सोडवावे कृपावंते।।६।।

८७१. फार गांजलो ईश्वरा। जगद्गुरू उमावरा।।१।। कोठे गुंतलासी देवा। परमात्मया कृपाळुवा।।२।। काशीभुवनी आहेसी। किंवा गुंतला कैलासी।।३।। फार झालो कासावीस। पुरवावी माझी आस।।४।। लक्ष्मणा तुजविण। कोण सोडवी येथून।।५।।

८७२. वेगी यावे दीनानाथा। सोडवा हो मज अनाथा।।१।। का रे तुजप्रती दया। उपजेना प्रभोराया।।२।। तूचि दीनांचा रक्षिता। ऐसे बोलती श्रेष्ठ ताता।।३।। पाव त्वरा करी देवा। प्रभोराया वेगी धावा।।४।। लक्ष्मणा कोण त्राता। वेगी सांगा कृपावंता।।५।।

८७३. दीनानाथा यावे देवा। सर्वेश्वरा कृपाळुवा।।१।। तुझ्या ब्रह्मसृष्टीमाझारी। रंक दीन मी त्रिपुरारी।।२।। विश्वाचे पालन पोषण। करिता तू पंचानन।।३।। लक्ष्मणा आपुला म्हणा। त्यासी त्राता नाही जाणा।।४।।

८७४. वाराणसीपती विश्वेशा हो देवा। धावा हो सर्वज्ञा देवाधिदेवा।।१।। कामक्रोध आदी षड्वैरी गांजिती। धावा हो सर्वेशा त्रैलोक्याधिपती।।२।। पूर्वी बहू पातकी तुम्ही उद्धरिले। ऐसे ऐकिले म्या हो ताता।।३।। लक्ष्मण म्हणे देवा त्रिपुरारी। सदया लवकरी धावा धावा।।४।।

८७५. त्रिभुवनव्यापका अहो परमेश्वरा। मेघःश्याममित्रा यावे बा शंकरा।।१।। कैलासवासिया यावे बा त्र्यंबका। विश्वा आदी तू त्रिभुवनपालका।।२।। कोटी सूर्याची प्रभा तुमचे अंगी दीप्ती। ऐसी अविनाश प्रभो तुमची मूर्ती।।३।। लक्ष्मण म्हणे शिवा परमात्मया। बुडालो भवडोही सोडवा देवराया।।४।।

८७६. एकादशस्वरूपा या हो मदनारी। अगम्यस्वरूपा यावे त्रिपुरारी।।१।। ब्रह्मादी देव तुम्हा अक्षयी स्तविती। पूर्णकामा धावा धावा बा पशुपती।।२।। बहू गांजलो प्रभो सोडवा लवकर । मायबापा धावा हो नका करू उशीर।।३।। विश्वंभरा प्रभो यावे हो दातारा। लक्ष्मण म्हणे वेगी कृपा हो करा।।४।।

८७७. येई येई आदिनाथा। शिवशंभो दीनानाथा।।१।। आदिरूपा सदाशिवा। वेगी यावे महादेवा।।२।। बुडालो बा भवपुरी। सोडवा हो बा दैत्यारी।।३।। लक्ष्मण विनवी देवा। मनोरथ हो पुरवावा।।४।।

८७८. सिद्धा यावे हो व्यापका। महाराजा हो त्र्यंबका।।१।। वेगी धावा हो शंकरा। परमपुरुषा विश्वंभरा।।२।। तुम्ही सर्वाते पाळिता। वेगी यावे उमाकांता।।३।। लक्ष्मण म्हणे महेशा। परब्रह्म हो सर्वेशा।।४।।

८७९. धावा धावा बा मदनारी। त्रिशूल घेऊनिया करी।।१।। पापसमुद्री बुडालो। मायामोही हो गुंतलो।।२।। आता माझा त्राता कोण। देवा तुम्हा हो

वाचून।।३।। लक्ष्मण विनवी देवराया। दीनबंधू स्वामिराया।।४।।

८८०. शंभो मायेचिया परा। सकलकामा अती उदारा।।१।। महारुद्रा दीनबंधू। देवराया कृपासिंधू।।२।। देवा माझा तू कैवारी। धाव वेगी संकट वारी।।३।। लक्ष्मण म्हणे देवा। धाव वेगी महादेवा।।४।।

८८१. शिव माय माझी जाणा। शंभो त्राता रे सर्वज्ञा।।१।। तूचि सर्व माझे देवा। तूचि धन कृपाळुवा।।२।। असे पायाची आवडी। गुण वदवा तातडी।।३।। मज कोणी रे दिसेना। तुजवाचूनि पंचानना।।४।। लक्ष्मण दीन देवा। त्याचा प्रतिपाळ करावा।।५।।

८८२. देवा मज पामराते। कोण सोडवील माते।।१।। काही पदरी जोडी नाही। सर्वापरी मी अन्यायी।।२।। दीन म्हणवितो तुमचा। करा सांभाळ रंकाचा।।३।। दोष पाहू नका देवा। दीन आपुला म्हणावा।।४।। लक्ष्मण झाला लंड। पायी घातली मुरकुंड।।५।।

८८३. कृपाळू तू रे असून। आज का केले निष्ठुर मन।।१।। सदय हृदया रे देवा। दीनबंधू देवाधिदेवा।।२।। अनंतवेषा या लवकर। दीन गांजलो हो फार।।३।। काही आधार दिसेना। सोडवा हो मज दीना।।४।। लक्ष्मण हो पामर। त्याचा त्राता तू ईश्वर।।५।।

८८४. बंदीखानी रे पडलो। देवराया रे चुकलो।।१।। देवा विसरलो तुजला। म्हणूनि भ्रम रे मजला।।२।। सोसवेना रे यातना। धाव वेगी कृपाघना।।३।। लक्ष्मण रे त्रासला। सोडवी रे बा दयाळा।।४।।

८८५. देवा भ्रम निरसा हो। कृपादृष्टीने पाहा हो।।१।। निवांत करा हो मजला। गुण वदवा दयाळा।।२।। तुझे पायी अक्षयी मन। हेचि द्यावे मज दान।।३।। लक्ष्मण दीन तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

८८६. परमपुरुषा येई येई। महापुरुषा रे धावी।।१।। महादेव तुझे नाम। आहेसी तू सुखधाम।।२।। महेश्वरा कृपा करा। भेटी द्यावी हो दातारा।।३।। लक्ष्मणाते पावन। करा शंभो वेगेकरून।।४।।

८८७. परब्रह्मा कृपा करी। सोडवी बा लवकरी।।१।। नाम तुझे घेता देवा। चुके जन्ममरण गोवा।।२।। ऐसा नामाचा महिमा। फार तारिले सर्वोत्तमा।।३।। आज का अंत पाहसी। काय म्हणावे तुजसी।।३।। लक्ष्मण

गांजला रे। चाल वेगी लवकर रे।।४।।

८८८. माझे आचरण हीन। पतित मी दुर्जन।।१।। नाही घडले साधन। विषयी गुंतलेसे मन।।२।। तळमळ रे जाईना। वृथा जन्म देवा जाणा।।३।। दीनाचा तू कैवारी। धाव धाव गा लवकरी।।४।। लक्ष्मणाते सोडवा। परब्रह्मा महादेवा।।५।।

८८९. पापरूपी मी रे दीन। जन्मलो रे कृतघ्न।।१।। घातकी मी रे दुराचार। फार अन्यायी पामर।।२।। माझ्या दोषा पार नाही। लिहिता पुरेना ही मही।।३।। येथे कोणी बरे पाहीना। दोषी म्हणूनि सर्वज्ञा।।४।। त्वा चांडाळ उद्धरिले। ऐसे म्या रे ऐकिले।।५।। तूते आलो रे शरण। सोडवी रे बा येथून।।६।। लक्ष्मणा दीनाप्रती। रक्षिता तू पशुपती।।७।।

८९०. भव कैसा हा तरावा। खूण न कळे मज देवा।।१।। वाट गवसेना देवा। माया दुस्तर ही लावा।।२।। कोणी दिसेना देवराया। वेगी सोडवा स्वामिराया।।३।। लक्ष्मणाते उद्धरा। धाव वेगी रे शंकरा।।४।।

८९१. जगद्गुरू कृपा करी। गांजलो रे ये लवकरी।।१।। कृपाघन तू आहेसी। आज का निष्ठुर झालासी।।२।। भक्तवत्सल तुजला म्हणती। दीनरक्षक उमापती।।३।। कनवाळू तू शंकर। तुझा म्हणवितो पामर।।४।। राखा लाज पंचानना। सोडवा हो लक्ष्मणा।।५।।

८९२. वेगी येई देवा त्रिभुवननाथा। धावी रे समर्था त्रासलो मी।।१।। दुर्मतीने मज वेष्टिले रे शिवा। यत्न माझा देवा चालेना रे।।२।। वेगी रे येऊन करी रे छेदन। दुष्टाते दंडन करा शंभो।।३।। करितोसी बा रे धर्माचे स्थापन। क्रूराते दंडन करितोसी।।४।। लक्ष्मण म्हणे तुज रे वाचून। सोडविता कोण आम्हा दीना।।५।।

८९३. कोठे गुंतलासी रे दयाळा। वेगी सोडवी रे स्नेहाळा।।१।। भव हा दुस्तर दिसे देवा। वेगी सोडवा कृपाळुवा।।२।। मायावणवा चेतला। मध्ये सापडलो दयाळा।।३।। अंग पोळले हो भारी। देवा काढा लवकरी।।४।। लक्ष्मण विनवी देवा। वेगी यावे उमाधवा।।५।।

८९४. अविद्येने मज भुलविले रे। सुचेना रे काही प्रभोराया।।१।। लक्ष चौऱ्यांशीचा मोठा रे गरका। फार दुःख ताता भोगिले हो।।२।। विश्वंभरा

देवा सोडवा मजला। येऊ द्या करुणा उमाधवा।।३।। लक्ष्मण म्हणे फार सोडविले। पुराणी ऐकिले धाव देवा।।४।।

८९५. शिवा या हो वेगी सोडवा दातारा। मायेचिया परा देवराया।।१।। अविद्या ही मजला गांजिते दातारा। सोडवी शंकरा येई त्वरे।।२।। हिचा परिवार उन्मत्त रे फार। विटंबना माझी करिती देवा।।३।। परिवार हटवी पाय रे दाखवी। येई लवलाही मायबापा।।४।। लक्ष्मणा दीना कोण पंचानना। दाखवा शंकरा त्राता कोण।।५।।

८९६. काय रे निवांत बैसलासी देवा। आकांत वर्तला आम्हावर।।१।। मन हे अनिवार स्थिर रे राहिना। येई पंचानना पवनगती।।२।। कामिनी कांचन वैभव ज्यायमान। नानापरी विघ्ने करीतसे।।३।। आता एक करा प्रभो हो शंकरा। मन स्थिर करा चरणकमळी।।४।। जैसा तो भ्रमर धावे पुष्पावर। स्वरूपी माझे मन स्थिर करा।।५।। लक्ष्मणाप्रती दान द्या पशुपती। तुझा विसर रे पडू नये।।६।।

सलगीचे भाषण

८९७. बरे झाले देवा दिवाळे काढले। वाटोळे हे झाले प्रपंचाचे।।१।। कामाजी क्रोधाजी मोहाजी तो क्रूर। हेचि कामदार मस्त होती।।२।। सहा कामदार माझे रे असून। मजवरी विघ्न केले फार।।३।। सर्वांचा अधिपती मनाजी तो फंदी। त्याने मज बंदी घातलेसे।।४।। सर्वांचा बंडावा मोडूनि सहज। दिले सुख मज तुम्ही देवा।।५।। दयाळू तू तात दया तुज आली। वासना ही केली दानादीन।।६।। दिवाळे निघाले मीपण हे गेले। लक्ष्मणा दिले सुख तुम्ही।।७।।

८९८. अज्ञान बाळाचे बोलणे बोबडे। श्रेष्ठाते आवडे प्रेमा करिती।।१।। त्याचे मुखेकरूनि प्राज्ञ बोलविती। बाळा रिझविती कवतुके।।२।। तेवी आम्हा अज्ञानाचे मुखेकरून। वदविसी गुण आपुले हो।।३।। बोबडिया बोला बोलवूनि देवा। हर्ष कृपाळुवा मानीतसे।।४।। आमुचा अधिकार नाही बोलण्याचा। नाथ तू वाचेचा बोलविसी।।५।। लक्ष्मण म्हणे भोळा भोळा भक्त। फार आवडत तुम्हा देवा।।६।।

८९९. अज्ञान बाळाचे परी मी बोलतो। तुम्हा आळवितो नित्यमुक्ता।।१।।

अर्थदृष्टी नाही काही गती नाही। अर्भक अन्यायी माते तुझा।।२।। बोबडिया बोला कोण अंगीकारी। हीन ही वैखरी आमुची गे।।३।। चंद्रचूडा तुम्ही दीनांचे माहेर। करिता अंगीकार पतितांचा।।४।। लक्ष्मण म्हणे पतिताच्या बोला। श्रेष्ठ जाश्वनिळा अंगीकारा।।५।।

९००. रूपातीत तू असून। स्वये झालासी सगुण।।१।। भक्तास्तव देहधारी। झालासी बा त्रिपुरारी।।२।। अनंत क्रीडा बा करिसी। अंत नाही त्या कर्मासी।।३।। लिप्त नाहीसी कर्माला। अंत कळेना कोणाला।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। तुज नमो रे अनंता।।५।।

९०१. तुझे गुण किती वर्णावे शंकरा। अजरा अमरा परब्रह्मा।।१।। आकाशाचा अंत मशक पाहू जाय। तैसी गणना माय आमुची गे।।२।। वेद चकित झाले वर्णिता गे गुण। तेथे मानव दीन काय वर्णू।।३।। शेषाऐसे धेंड शिणले वर्णिता। तेथे माझी कथा काय देवा।।४।। बोबडिया बोला माता प्रिय मानी। तैसे शूळपाणि बोल माझे।।५।। लक्ष्मण म्हणे बाळवत् भाषण। अंगीकारी कोण देवराया।।६।।

९०२. तुज पाहता त्र्यंबका। भक्त होतसे तो निका।।१।। भवसमुद्र हा थोर। त्याते नाही तो निर्घोर।।२।। लक्ष चौऱ्यांशी योनी। स्वप्नी नेणती ते प्राणी।।३।। भक्तिसुख भक्ता देशी। भक्तावेगळा नव्हेसी।।४।। राज्य पुत्र धन जाया। देशी कामिका स्वामिया।।५।। आम्हा कामिक रुचेना। पायी ठेवा पंचानना।।६।। लक्ष्मण दास दीन। पायी अक्षयी त्या धन।।७।।

९०३. विश्वनाथा तुझे गुण। वर्णी ऐसा प्राणी कोण।।१।। मुख्य वेद ते परतले। स्वरूपी अक्षयी राहिले।।२।। शास्त्रपुराणेही गाती। तेही स्वरूपी रमती।।३।। सनकादिक मुनीश्वर। चरणी राहिले निर्घोर।।४।। चरणगोडीत गुंतले। निजानंदी मग्न झाले।।५।। लक्ष्मण म्हणे शिवा। आपणाऐसे करिसी जीवा।।६।।

९०४. अंतःकरणापूर्वी तूचि। निज साउली सर्वांची।।१।। त्रिपदेची मांडणी। मायावेदाची जननी।।२।। आदिमायेचा तू भर्ता। पदातीत स्वयं ताता।।३।। अहं ध्वनीचा हा खेळ। तू तव अक्षयी अचळ।।४।। सूर्याअंगी तो प्रकाश। तेवी माया ही साभास।।५।। रश्मी-अंगी झाले जळ। जळी दिसे

रविमंडळ।।६।। तेवी वससी सर्वाठायी। अलिप्तपणे सर्वा देई।।७।। लक्ष्मण म्हणे शिवा। अगम्य तू सर्व देवा।।८।।

९०५. मुंगी गिळील सागरा। मशक बांधील समीरा।।१।। अहो कर्पूरपुतळा। गिळील त्या अग्निज्वाळा।।२।। अहो लवणाची पुतळी। समुद्र ग्रासील कोणे काळी।।३।। तेजा अंधार ग्रासील। हेही ताता रे घडेल।।४।। आकाशाची चौघडी। करील खद्योत बापुडी।।५।। घडू नये ते घडेल। होऊ नये ते होईल।।६।। परि तुझी गुणलीला। न कळे कोणा रे निर्मळा।।७।। महा महाश्रेष्ठ थोर। तेही शिणले नकळे पार।।८।। ताता तुज पाहू गेले। नाही पुन्हा परतले।।९।। जैसा लवणाचा पुतळा। प्रलय-उदकी बुडाला।।१०।। तैसे करिसी ईश्वरा। मायागुणाचिया परा।।११।। लक्ष्मण केवळ हीन। काही करा त्या कारण।।१२।।

९०६. शिवा तुम्हाऐसा भोळा। कोणी दिसेना स्नेहाळा।।१।। त्रैलोक्याचा अधिपती। म्हणवितोसी पशुपती।।२।। वस्त्र नाही अंगावर। राज्य करिती कामदार।।३।। अनंत ब्रह्मांडे उभविसी। क्षणी स्वेच्छे लपविसी।।४।। इतुके सामर्थ्य असून। सदा करिसी भिक्षाटन।।५।। लक्ष्मण म्हणे ताता। शाश्वत सुखाचा तू भोक्ता।।६।।

९०७. तुझे दर्शन होता। नुरे भवव्यथा ताता।।१।। मूर्ती साजरी गोजिरी। भाळी चंद्र त्रिपुरारी।।२।। भक्ताप्रती तू सुलभ। तुझा भक्त पद्मनाभ।।३।। तुझे भक्त रे अपार। भक्तजनांचे माहेर।।४।। लक्ष्मण म्हणे शिवा। माझा सांभाळ करावा।।५।।

९०८. तुझे नाम मुक्तचारा। भक्तहंसाप्रती शंकरा।।१।। भक्तहंस सेविती। ब्रह्मानंदे तृप्त होती।।२।। त्याची गोडी वायसाला। नसे नसे अभक्ताला।।३।। विष्ठा भक्षिती ते खळ। सदा सर्वदा चांडाळ।।४।। अनेक कल्पनेत भ्रमती। नाना दुःखे रे भोगिती।।५।। लक्ष्मण म्हणे ताता। नामी ठेवा मज पतिता।।६।।

९०९. शिवा तुझा महिमा थोर। गाती अठ्ठावीस भाट।।१।। सकल ध्याती रे तुजला। सर्वा वंद्य तू शिव।।२।। सुर आज्ञेने वर्तती। चरणरज वंदिती।।३।। चरणसुख भक्ता देशी। भक्ता मानिसी आत्मा।।४।। तुझे लाघव कळेना। मूळबीज तू बाप।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। अनादी तू

सर्वज्ञ।।६।।

९१०. चंद्र सूर्य अग्नी ज्योती। तुझे प्रकाशे वर्तती।।१।। आकाश वायू आदी सकळ। तुझे मायेचा गोंधळ।।२।। सर्वातीत तुझे धाम। जेथे मिळाले निगम।।३।। भक्त ज्ञानी तेथे वसती। स्वयंप्रकाश पशुपती।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। नाही फिरले ते कृपावंता।।५।।

९११. देवराया तुम्ही विश्वाचे पाळक। ब्रह्मांडनायक नाम तुझे।।१।। विश्वंभर नाम तुझे चंद्रचूडा। अनंत ब्रह्मांडे लीला तुझी।।३।। तुझी माया ब्रह्मादिका अगोचर। सकळ व्यापार सत्ते।।४।। लक्ष्मण म्हणे कृपा तू करिसी। पाय दाखविसी निजभक्ता।।५।।

९१२. तुझा म्हणवितो नको भय चिंता। उमाईच्या कांता देवराया।।१।। जातिहीन दासी रमली राया रे। सन्मानिती बा रे प्राणी तीते।।२।। तेवी मी रे खळ अती दुराचार। केला अंगीकार तुम्ही माझा।।३।। आता माझी लाज तुम्हाकडे देवा। घोर महादेवा आता नसे।।४।। लक्ष्मण म्हणे ब्रीद सांभाळावे। भवाचे तोडावे बंधन हो।।५।।

९१३. तुझे पायी देवा सुख दिसे फार। मायिक व्यापार दिसती हो।।१।। मायेचा बाजार येथे गुंता फार। म्हणविती शूर गुंतले हो।।२।। परिच्छिन्न खोटे खरे हे मानिले। पाय अंतरले तुझे देवा।।३।। भ्रम हा हो मोठा अविद्येचा घाला। प्राणी नागवला संगतीने।।४।। गुरुकृपे तुझे पाय प्राप्त झाले। लक्ष्मणा दिले सुख तुम्ही।।५।।

९१४. वेदशास्त्रे सर्व वर्णिता शिणले। कवी भांबावले सांगू किती।।१।। परि तुझा अंत नाही रे कळला। ब्रह्मांडाच्या पाळा देवराया।।२।। आकाशाची घडी करवेल देवा। पार कृपाळुवा न कळे तुझा।।३।। तूते पाहू गेले नाही परतले। गुंतूनि राहिले पायी तुझ्या।।४।। सागराचा अंत लवण पाहू गेला। नाही परतला देवराया।।५।। लक्ष्मण म्हणे शेषाची ही गती। तेथे मंदमती किती स्तवू।।६।।

९१५. नग्न दिगंबर बैसती अरण्यी। मौन ते धरूनि शिणले हो।।१।। पाला रे भक्षिती दुग्धपान करिती। साधने अर्चिती नानाविध।।२।। परि तुझी प्राप्ती होईना ईश्वरा। देवा निरंतरा निरामया।।३।। नाना मतांतरे वाचेचा

गलबला। सर्वही निमाला वेगळा तू।।४।। शिणले रे श्रेष्ठ मी तो अपराधी। काय कृपानिधी स्तवू आता।।५।। लक्ष्मण म्हणे मीपण टाकून। आले जे शरण झाले सुखी।।६।।

९१६. परिच्छिन्न खोटे हेचि प्रिय झाले। पाय अंतरले देवा तुझे।।१।। स्वप्नीचे ते सुख काय खरे ते रे। तेवी प्रपंच रे दिसे देवा।।२।। माया आवरण गोवी रे वेसणी। नाना त्या रे योनी फिरवी बा।।३।। फार युगे गेली भ्रमता भ्रमता। होती कृपावंता भ्रांती फार।।४।। तुझे दयेकरून सद्गुरू भेटले। डोळे उघडले त्यांनी माझे।।५।। मायिक रुचेना तूचि एक खरा। आता विश्वंभरा कळो आले।।६।। लक्ष्मण म्हणे तूचि आदि अंती। देवा पशुपती मी कोणी नाही।।७।।

९१७. सद्गुरू परेशा तुझा उपकार। कैसा मी पामर फेडू ताता।।१।। मजऐसा दोषी नसे त्रिभुवनी। विषयी गुंतूनि भ्रमलो रे।।२।। दोषी मी सागर अगस्ती तू तात। केलासे निःपात निमिषात।।३।। महाराजा तुज काय उतराई। होऊ माझे आई सांग आता।।४।। अंतःकरणापूर्वी तूचि रे आहेसी। अंतर्बाह्य दिससी तूचि तू रे।।५।। लक्ष्मण म्हणे मीपण हे गेले। अद्वय संचले तुझे रूप।।६।।

९१८. नाना तीर्थे व्रत नाना अनुष्ठान। करिती रे जन तुजकरिता।।१।। अग्निहोत्रादिक कर्मकांड जाण। करिती प्रयत्न तुजकरिता।।२।। मौन ते साधिती ऊर्ध्वबाहू करिती। नग्न रे फिरती तुजकरिता।।३।। धूम्रपानादिक साधने साधिती। हठयोग करिती तुजकरिता।।४।। लक्ष्मण म्हणे मार्ग रे अपार। त्राता विश्वंभर सर्वांचा तू।।५।।

९१९. भक्तास्तव तू साकार। झालासी तू निजरूपा।।१।। तुज भक्ताची आवडी। प्राणाहूनि अधिक।।२।। स्त्रीपुत्राहूनि अधिक। प्रीती भक्तावरी फार।।३।। करिसी अंगाची बा छाया। निजभक्तावरी रे।।४।। सदय तू कृपासिंधू। आलो शरण मी दीन।।५।। लक्ष्मणा कोणी नाही। शंभो तुम्हावाचूनि।।६।।

९२०. भक्तकाजा तू धावसी। अती तातडी ताता।।१।। धेनू जेवी वत्सास्तव। प्रेमभरे धावे रे।।२।। माता धावे बाळास्तव। अती तातडी

प्रेमे।।३।। भक्ते भुलविले तुज। त्या अधीन झालासी।।४।। कार्य त्याहाचे करिसी। निज अंगे तू ताता।।५।। लक्ष्मण म्हणे ताता। माझा आप्त तू सखा।।६।।

९२१. तुझे कृपे ताप हरे। अनंत जन्मांचा तो रे।।१।। जन्ममृत्यू ही घरटी। चुके तुझे प्रसादे।।२।। भक्त होय ब्रह्मरूप। शंभो तुझे प्रसादे।।३।। वेद सिद्ध ते बोलती। पुराणे ती सर्वत्र।।४।। उमावरा तू सदय। भक्तजना विसावा।।५।। लक्ष्मण म्हणे ताता। मज पाय दाखवी।।६।।

९२२. चरणावरूनि ब्रह्मांडे। अनंत ओवाळावी हो।।१।। इतर राज्यादी संपत्ती। गणना कायसी येथे।।२।। तुझे चरणीचे सुख। भक्त ज्ञानी जाणती।।३।। मायाखल्लाळी पडले। त्याहा काय कळे हो।।४।। माया दुर्धर अविद्या। भुलविले हे जग।।५।। लक्ष्मण म्हणे शंभो। चरणगोडी मज द्या।।६।।

९२३. चरणगोडी ज्या लाधली। तेचि तरले भवसिंधू।।१।। भवसिंधू अज्ञानाते। भक्ता दृष्टी दिसेना।।२।। पापपुण्य गाथागोवी। भ्रांत नराप्रती हो।।३।। तुझे किंकर शंकरा। झाले सर्वातीत ते।।४।। जागृत होता स्वप्न लटके। तेवी तुझे भक्ताते।।५।। लक्ष्मणा गोडी द्यावी। अवीट चरणीची ती।।६।।

९२४. चरणसुखालागी फार। झाले विषयी विरक्त।।१।। राज्य ब्रह्मांडसंपत्ती। वमनप्राय मानिली।।२।। अहंकाराविरहित। झाले तारक जगा।।३।। तुझे चरणकमळापाशी। सर्व सुखाचा वास।।४।। चरणी सुख अविनाश। येर सुख ते दुःख।।५।। गुरुकृपे कळले आम्हा। सेवू आम्ही सर्वदा।।६।। लक्ष्मणा देई गोडी। प्रेमभरे विरूपाक्षा।।७।।

९२५. देवराया पाय दावी। वेगी येई येई रे।।१।। आम्हा अनाथांची इच्छा। कोण पुरवी तुजविण।।२।। अज्ञान त्या बाळकाचे। माता पुरवी बा लळे।।३।। तेवी माय तू आमुची। पुरवी गे मनोरथ।।४।। हीच वासना आमुची। पाय पाहावे ताता।।५।। लक्ष्मणा दुजे प्रिय। नाही शंभो तुजविण।।६।।

९२६. देवराया तुझा भक्त। कोण्या मुखे मी वदू।।१।। दोषी सर्वापरी हीन। खोटे कर्म आचरलो।।२।। केवळ दोषाचा पुतळा। फार फार अपराधी।।३।। माझा अंगीकार कोण। करील बा तुजविण।।४।। अती हीन

लेंड ओहोळ। गंगा घेतसे पोटी।।५।। लक्ष्मण म्हणे शंभो। तू पतितपावन।।६।।

९२७. भक्तरक्षक तू हर। ऐसे वेद बोलती।।१।। सिद्धयोगी मुनीश्वर। तेही बोलती हेचि।।२।। भक्तास्तव तू सगुण। पंचवदन झालासी।।३।। कर्मकाष्ठाचे दहन। करितोसी भक्ताच्या।।४।। भुक्तिमुक्तीचा तू स्वामी। सर्वा श्रेष्ठ वरिष्ठ।।५।। लक्ष्मण म्हणे ताता। विसावा तू भक्तांचा।।६।।

९२८. स्वामी कुमारपितरा। दीनानाथा परमेश्वरा।।१।। काळाचा तू महाकाळ। शुद्ध बुद्ध जाश्वनीळ।।२।। नेति नेति म्हणती श्रुती। तुझी न कळे कोणा गती।।३।। ऐसा सुखरूप तू रे। भक्तजना सुलभ रे।।४।। भक्तामाजी माझी गणना। नाही श्वान मी तुझे प्राज्ञा।।५।। लक्ष्मण हा तुमचा। पतित आहे पदरीचा।।६।।

९२९. शंभो परमपुरुषा। पूर्ण पुराणपुरुषा।।१।। सर्वापूर्वी अंती तूचि। छाया आहेसी विश्वाची।।२।। नित्यानंद कामदहन। निरामय पंचानन।।३।। विश्वंभर नाम तुज। प्रभो विश्वाचे तू बीज।।४।। तुम्हावाचूनि शंकरा। कोण रक्षी मज पामरा।।५।। लक्ष्मणा तूचि धन। महाराज कृपाघन।।६।।

९३०. शंभो तुझे कृपेविण। सर्व दिसे अवघा शीण।।१।। धन सुत जाया बा रे। भ्रांती अज्ञान कावरे।।२।। येथे प्राणी बा गुंतले। तेणे तूते अंतरले।।३।। अगा जगद्गुरू ताता। मायामोहे झाला गुंता।।४।। तुझी कृपा ज्या लाधली। त्यांनी मायाचि ग्रासिली।।५।। लक्ष्मणावरी कृपा। वेगी करा विश्वरूपा।।६।।

९३१. आहेसी तू सूत्रकार। हृदयनिवासी शंकर।।१।। अंतःकरणा स्फुरविसी। तूचि मज बोलविसी।।२।। आपुले आपण स्तवन। करिसी बा तू त्रिनयन।।३।। बोल आम्हावरी काय। तूचि वससी अंतर्बाह्य।।४।। अवघा तुमचा विलास। परात्पर तू पुरुष।।५।। लक्ष्मण निमित्ताला। तुम्ही निर्माण हो केला।।६।।

९३२. जननी बोलू ती शिकवी। नानापरी युक्ती दावी।।१।। त्याच्या वाकुडिया बोला। रिझे ब्रह्मांडाच्या पाळा।।२।। बोल बोबडे परिसून। अती मानी समाधान।।३।। प्रेमे घेतसे उचलून। अती आल्हादेकरून।।४।। तेवी तात तू शंकर। आम्हा अनाथा माहेर।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। आम्हा अनाथा विसावा।।६।।

९३३. स्वर न कळे तानमान। वेडेवाकुडे भजन।।१।। परि गाऊ प्रेमभरे। अती आल्हादे बापा रे।।२।। जेवी लोभियाचा प्रेमा। धनापाशी सर्वोत्तमा।।३।। जारिणीचे जारापाशी। चित्त जेवी अहर्निशी।।४।। तेवी अहोरात्रंदिन। आमुचे प्रेमळ भजन।।५।। लक्ष्मणी विसर नाही। तुझे कृपे कीर्तन देही।।६।।

९३४. करूनि संसाराची होळी। आता आलो तुजजवळी।।१।। आशा पायाची धरिली। पायी वासना ठेविली।।२।। काय मागावे तुजला। तू तव निःसंग एकला।।३।। दुजा पदार्थचि नाही। तेथे मागावे ते काही।।४।। मीतू म्हणणे खुंटले। पाहाता पाहणे हरपले।।५।। लक्ष्मण नाही उरला। पायी अवघाचि विराला।।६।।

९३५. संग निःसंगाचा केला। काय भय ते आम्हाला।।१।। संसारावर सोडिले पाणी। लौकिक लज्जा ही सांडूनि।।२।। लाज धरिता कार्य नोहे। विषयी गुंता फार होये।।३।। गुरुकृपे हे कळले। कृपे मन हे फिरले।।४।। मूळधामी गेले मन। सुखी अक्षयी ते पूर्ण।।५।। लक्ष्मणा सुख फार। केवळ निःसंग आधार।।६।।

९३६. स्वरूप तुमचे अकथ्य वेगळे। अक्षयी संचले सर्वठायी।।१।। जे जे दिसे ते ते मायेची संतती। मायेचा तू पती निरामय।।२।। आदिरूपा श्रेष्ठा अनाथा सनाथ। करिसी समर्थ मायबापा।।३।। समान सर्वात आहेसी शंकरा। पार विश्वंभरा न कळे तुझा।।४।। जे जे पाहू गेले अती नेटेपाटे। न गुंतती कोठे तुजवाचूनि।।५।। लक्ष्मण म्हणे राहिले ते पायी। फिरावया नाही मार्ग तेथे।।६।।

९३७. जळी काष्ठाची उत्पत्ती। जळ तारी काष्ठाप्रती।।१।। बुडविना पाणी त्याला। पाहा अभिमान धरिला।।२।। देवा तुज रे पासून। आम्ही झालो रे उत्पन्न।।३।। आम्हा तारी बा शंकरा। नको बुडवू विश्वंभरा।।४।। लक्ष्मण म्हणे ब्रीदा। सांभाळावे ब्रह्मानंदा।।५।।

९३८. तुझ्या गुणा पार नाही। काय वर्णू मायबाई।।१।। आकाश सर्वा आवरण। तू त्याचिये वरून।।२।। सैंधव सागरा पाहू गेला। पुन्हा बाहेर नाही आला।।३।। कापूर दीपा भेटू जाये। पुन्हा परतूनि न ये।।४।। तैसी गती झाली सर्वाला। पार नाही रे कळला।।५।। मनबुद्धीच्या तू परता। काय

वर्णावे रे ताता।।६।। लक्ष्मण म्हणे देवा। अगम्य हो तुमच्या मावा।।७।।

९३९. सर्वांचा तू चाळक देवा। पूर्णब्रह्म कृपाळुवा।।१।। विश्व तुजमाजी होत जात। निश्चळ तू रे बा निवांत।।२।। माया वर्ते तव सत्ते। अनंत ब्रह्मांडे निर्मिते।।३।। अंती तूचि निर्विकार। ब्रह्म सत्य तू सर्वेश्वर।।४।। लक्ष्मणा दीना तारा। दीनानाथा विश्वंभरा।।५।।

९४०. तत्त्वे पंचवीस त्यांच्या तू वेगळा। जाणता सकळा तूचि एक।।१।। मन-बुद्धि-चित्त-अहंकारातीत। आहेसी निवांत निरामय।।२।। स्थूळ तो सूक्ष्म देह तो कारण। त्यांते तू जाणून वेगळाचि।।३।। पिंडी तू आहेसी अनंत ब्रह्मांडी। ब्रह्मांडाच्या कोडी होती जाती।।४।। लक्ष्मण म्हणे सूर्यप्रकाशात। व्यापारी वर्तत तेवी सर्व।।५।।

९४१. शिखरीच्या राया आहेसी उदार। दाता तू रे शूर म्हणविसी।।१।। फारा वर दिले सुखी फार केले। हीन दीन धाले तुझे कृपे।।२।। ब्रह्मांडाचे पती तुझे कृपेकरून। ऋषि मुनी गण तूते ध्याती।।३।। आम्हाविषयी देवा का हो निष्ठुरपणा। गिरिजारमणा दीनानाथा।।४।। राज्यवैभव धनाची आवडी। नाही आम्हा तोडी भवपाश।।५।। मनीचे जाणसी तू तो सर्वज्ञ। पायी वसावे रे हेचि इच्छा।।६।। लक्ष्मण म्हणे शंभो तुझी आण। नाही यावाचून दुजी इच्छा।।७।।

९४२. स्थावरजंगमी विश्वी तू व्यापक। विश्व तो जनक जगन्नाथ।।१।। काष्ठामाजी अग्नी परि तो न दिसे। तेवी अविनाश सर्वाठायी।।२।। आकार हा नाशे तो रे निरामय। ब्रह्मादिका माय वंद्य ती हो।।३।। लक्ष्मण म्हणे तूचि आदि अंती। चिन्मात्र ती ज्योती स्वयमेव।।४।।

९४३. ध्वजाचे ते फडके किती। शस्त्रपाणि त्या रक्षिती।।१।। राया रक्षीतसे त्याला। मोठा अभिमान रायाला।।२।। तैसा ब्रीदाचा अभिमान। शंभो तुम्हा हो कारण।।३।। वेदशास्त्रे ती गर्जती। पतितपावन पशुपती।।४।। ऐसी कीर्ती ऐकून। तुम्हा आलो मी शरण।।५।। लक्ष्मण पडला द्वारी। ब्रीद सांभाळी त्रिपुरारी।।६।।

९४४. सर्व देवांचे तू मूळ। परब्रह्म जाश्वनीळ।।१।। प्रभो अनादी अनादी। शुद्ध बुद्ध कृपानिधी।।२।। अक्षयी सुख तुजपाशी। निजभक्ता प्रेम

देशी।।३।। लक्ष्मण तुझे द्वारी। पडला प्रभो कृपा करी।।४।।

९४५. जगद्‌गुरू नाम तुजला बा साजे। त्रैलोक्याते पूज्य आहेसी बा तू।।१।। तुझे कर्तृत्व न कळे बा कोणा। सर्वत्रही आज्ञा वंदिती शिरा।।२।। चुंबक लोखंडा जैसे ते फिरवी। तैसी सत्ता तुझे ठायी देवा।।३।। अनंत ब्रह्मांडे तुझे सत्ते होती। निरामय स्थिती तुझी देवा।।४।। लक्ष्मण म्हणे आपुलेपण देशी। भक्ताते ठेविशी चरणकमळी।।५।।

९४६. अगणित दोषी तुम्ही उद्धरिले। चांडाळ तारिले कृपेकरून।।१।। कीर्ती ऐकून आलो मी शरण। पतितपावन नाम तुझे।।२।। ब्रीद त्वा बांधिले पतिता तारिसी। चरणापाशी देशी ठाव देवा।।३।। सर्वाहूनि हीन आहे मी दुर्मती। आता काही गती करी माझी।।४।। लक्ष्मण म्हणे पडलोसे द्वारी। शंभोराया करी कळेल तैसे।।५।।

९४७. गुणातीता योगिप्रिया। नीलकंठा देवराया।।१।। ब्रह्मादिका तुझा आधार। सकळा मान्य तू उमावर।।२।। सगुण आम्हास्तव देवा। झालासी रे कृपाळुवा।।३।। आगमा निगमा गोचर। नसशी तू विश्वंभर।।४।। लक्ष्मण म्हणे देवा। पार न कळे कृपाळुवा।।५।।

९४८. रतिसुखासी भुललो। तुझे भजन विसरलो।।१।। क्षणाचिया सुखाकरिता। नरक भोगिला म्या ताता।।२।। अनिवार अविद्येचा गिरका। विश्व भुलविले त्र्यंबका।।३।। स्वामी आता दया करा। नाही संग हिचा बरा।।४।। लक्ष्मणाते सोडवा। शंभो वेगी पाय दावा।।५।।

९४९. देह कुश्चळ दिसून आला। गर्व होता याचा मला।।१।। दुर्गंधीचे हे कोठार। नरक कीटक भरले फार।।२।। नाना रोग याजप्रती। न दिसे बरवी याची गती।।३।। तुझे नामस्मरणाविण। नसे शुद्ध हे हो जाण।।४।। पावन करा हो दीनाला। प्रभो वदवा आपुली लीला।।५।। लक्ष्मणा शुद्ध करा। धावा वेगेसी शंकरा।।६।।

९५०. जिकडे तिकडे तू दिससी। कैसे वर्णावे तुजसी।।१।। कोणता रे रंग योजावा। सुचेना हो देवाधिदेवा।।२।। मनाबुद्धि-अगोचर। आहेसी तू विश्वंभर।।३।। वेदा नाही कळला पार। तेथे काय मी पामर।।४।। स्वयं धोंड दिससी देवा। एकटा दिससी कृपाळुवा।।५।। लक्ष्मणा दीना तारा।

मायातीता विश्वंभरा।।६।।

९५१. जगन्नाथ तू दयाळ। नाही तुजऐसा स्नेहाळ।।१।। तुजला कोणी ओळखेना। तुजला कोणी रे स्तवीना।।२।। म्हणूनि दुःख रे पावती। नाना क्लेश रे भोगिती।।३।। पापी आम्ही रे दुर्जन। वृथा जन्मलो रे दीन।।४।। केले ते भोगणे लागेल। तुजकडे काय बोल।।५।। लक्ष्मण रे पतित। केले कर्म रे भोगीत।।६।।

९५२. शंभो तू दयाळ ब्रह्मांडाचा पाळ। हृदयी निर्मळ आदिपुरुष।।१।। तुजपाशी अती क्षमा वसतसे। परमात्मा महेश श्रुती म्हणती।।२।। अती दया ताता तुम्हा हो जवळी। प्रभो चंद्रमौळी तुम्हा नमो।।३।। लक्ष्मणाप्रती सांभाळावे प्रेमे। तुमचा अधम म्हणवितो।।४।।

९५३. तुजविण कोणा शरण म्या जावे। कोणाते पुजावे तुजविण।।१।। दीनादुर्बळाते त्राता आहे कोण। तुज रे वाचून पुरातना।।२।। मानवाने कोणा शरण जावे देवा। कोण कृपाळुवा सोडविता।।३।। लक्ष्मण म्हणे सोडवावे नाथा। अरे दीनानाथा वेगी यावे।।४।।

९५४. घनःश्याममित्रा यावे लवकर। दीनांचे माहेर तूचि देवा।।१।। भालनेत्रा शंभो सोडवा दीनासी। करुणा तुम्हासी उपजेना।।२।। कृपावंता वेगी कृपा हो करावी। भ्रांती हो हरावी माझी देवा।।३।। लक्ष्मण म्हणे फार सोडविले। आम्ही ऐकिले प्रभोनाथा।।४।।

९५५. सहस्रफणाचा शिणला विखार। त्याते तुझा पार कळला नाही।।१।। स्तविता स्तविता जिव्हा द्विविध झाली। वेद मौनावले तूते स्तविता।।२।। सर्वही शिणले तूते रे स्तविता। तेथे माझी कथा काय देवा।।३।। बोबडे हे बोल प्रभो अंगीकारा। कृपेच्या सागरा गंगाधरा।।४।। लक्ष्मण दीन सर्वस्वी अन्यायी। याची लाज आई तुजकडे।।५।।

९५६. सर्वाठायी देवा तुम्ही केली वस्ती। तुजमाजी होती जाती सर्व।।१।। आहेसी निर्गुण झालासी सगुण। स्वमाये करून क्रीडसी रे।।२।। असंख्य अवतार असंख्य रे गुण। तुझी लीला कोण जाणे देवा।।३।। लक्ष्मण म्हणे सर्वा अगोचर। अनादी ईश्वर तूचि देवा।।४।।

९५७. बोलविता तूचि आहेसी देवा रे। सर्व कर्ता बा रे म्हणविसी।।१।।

तुझे सत्तेविण हालेना रे पान। वायूते चळण तुझेनिच।।२।। रावा बोलतसे मंजुळ ते शब्द। त्याते विश्वकंद बोलवी हो।।३।। सर्व सत्तामात्रे चालविसी देवा। लिप्त कृपाळुवा नससी रे।।४।। लक्ष्मण म्हणे मायागुणापर। वेदाचे माहेर तूचि देवा।।५।।

९५८. चारी वेद तुझ्या मुखापासून झाले। सर्ववंद्य झाले वेद ते रे।।१।। पाषांडज्ञानी ते वेदा न मानिती। धर्म लोपविती मंदमती।।२।। वेदगुह्य घेती तेचि तृप्त होती। इतर भ्रमती कष्ट वाया।।३।। वेदान्तावाचूनि भ्रम हा जाईना। नवशिक जाणा भ्रम करी।।४।। लक्ष्मण म्हणे साधक जे नर। घेती ते हो सार गुरुकृपे।।५।।

९५९. नीलकंठ माझा सोयरा जिवलग। तोडिला उद्योग प्रपंचाचा।।१।। यातना हो माझी त्यांनी हटविली। कृपेची सावली केली शिवे।।२।। शिवाविण मज गमेना गे आता। त्याचे नाम घेता हरे व्याधी।।३।। लक्ष्मण म्हणे शिवा कृपावंता। मज दीना त्राता कोणी नसे।।४।।

९६०. रुद्र तू दयाळू प्रभू तू समर्था। विश्वाचिया नाथा महादेवा।।१।। क्रूररूपी तुम्ही असुर निवटिले। भक्ता हो पाळिले स्वये देवा।।२।। तुझे नाम श्रेष्ठ मंगल तू कर्ता। भवाचा तू हर्ता सदाशिव।।३।। तुझ्या भक्ता कोण गांजू शके नाथा। ब्रह्मांडाचा नाथा वंद्य सर्वा।।४।। ब्रह्म इंद्र तुझे भजनी सादर। तापसाचे भार तुज ध्याती।।५।। लक्ष्मण म्हणे पाय दाखवावे। कृपाळुवा यावे वेगी देवा।।६।।

९६१. अनंत ब्रह्मांडे उत्पन्न करिसी। पालन करिसी तूचि देवा।।१।। संहारिता तूचि आहेसी त्र्यंबका। विश्व रे व्यापका जगद्गुरू।।२।। स्वमाये करूनि कार्य हे करिसी। लिप्त तू नाहीसी परब्रह्मा।।३।। प्रपंचावेगळा तू रे देवराव। ब्रह्म तू रे शिव सत्य वस्तू।।४।। लक्ष्मण म्हणे तूचि सर्वाठायी। रिता ठाव काही दिसेना रे।।५।।

९६२. शेषशायीमित्रा प्रभो रे सत्पात्रा। देवा रे त्रिनेत्रा पुरातना।।१।। रज सत्त्व तम मायेचे हे गुण। वेगळा निर्गुण शिव तो रे।।२।। सकळही रंग तुझे रे पासूनि। रंगा रंगपण तुझेनि रे।।३।। तुझेनि व्यापार सर्वही करिती। तुझी देवा गती कळेना रे।।४।। लक्ष्मण म्हणे तूचि आदि अंती। वेदशास्त्राप्रती

अगोचर।।५।।

९६३. चहु देहावेगळा तू रे परमात्मा। सकळाचा आत्मा तू रे देवा।।१।। सकळही म्हणणे हे रे मायिक। आहेसी तू एक निरंतर।।२।। दुजा मज कोणी दिसेना ईश्वरा। मायेचिया परा देवराया।।३।। स्वरूप शाश्वत आहे अविनाश। ब्रह्म तू महेश देवराव।।४।। लक्ष्मण म्हणे पार रे लागेना। शिवा रे सर्वज्ञा देवराया।।५।।

९६४. दुष्ट रे मर्दूनि भक्त रे रक्षिसी। पावन करिसी हीना दीना।।१।। जलचरादी तुम्ही उद्धरिले। अगणित नेले स्वर्गलोका।।२।। पद फार दिले चिरंजीव केले। जातिहीना दिले पद श्रेष्ठ।।३।। जार चोर तुम्ही सर्ववंद्य केले। आपुले म्हणविले देवा तुम्ही।।४।। दयाघन तुम्ही तुम्ही फार रे दयाळ। सकळाचे मूळ तुम्ही देवा।।५।। लक्ष्मण दीना तूचि रे रक्षिता। याची लाज ताता रे तुम्हाकडे।।६।।

९६५. मदनांतका ब्रह्मांडपालका। नाना रे नाटका सूत्रकारा।।१।। बाहुले तू नाचविसी सूत्रकारा। आम्हा विश्वंभरा काय बोल।।२।। तुझे सत्तेविण वायू रे भ्रमेना। वृक्षाचे हालेना पान देवा।।३।। मायागुणा चेष्टविता तू ईश्वर। सर्वाचे माहेर तूचि देवा।।४।। मनबुद्धीप्रती तूचि चेष्टविसी। तूचि रे आहेसी आदि अंती।।५।। लक्ष्मण म्हणे आम्हा बोल नाही। त्रिभुवनगोसावी कर्ता सर्व।।६।।

९६६. सर्वज्ञ आहेसी प्रभो सदाशिवा। सर्वांच्या या मावा जाणसी तू।।१।। तुझी माया आहे सर्वा अगोचर। ब्रह्मादिका पार कळेना रे।।२।। शांभवी रे माया अगम्य सर्वाला। पार रे कोणाला कळेना रे।।३।। स्वमायेकरून क्रीडा रे करिशी। ब्रह्मांड लपविसी एका रोमी।।४।। लक्ष्मण मंद काय रे स्तवील। प्रणवाचे मूळ तूचि शिवा।।५।।

९६७. शंभो सत्ता तुझी थोर। तुझा न कळे बा पार।।१।। दगडापोटी बेंडकुळी। तेथे रक्षिसी चंद्रमौळी।।२।। अग्नीवरी आणिसी पीक। धन्य धन्य तू त्र्यंबक।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। तुज नमोजी अनंता।।४।।

९६८. तुझे चरणी शंकरा। अती सौख्य विश्वंभरा।।१।। भाग्यवंत ते सेविती। स्वानुभवे ते डुल्लती।।२।। धन्य धन्य ते पुरुष। ब्रह्मानंदी त्याहा

वास।।३।। लक्ष्मण म्हणे येर। दुःखार्णवी पडले फार।।४।।

९६९. विश्वाचा तू देवा नाथ। अनाथ केले त्वा सनाथ।।१।। सर्वांहूनि तुम्हाप्रती। भक्त देवा आवडती।।२।। वैदिक शास्त्री न पाहसी। जातिकूळ न देखसी।।३।। व्याध होता जातिहीन। पुत्र मानिला आपण।।४।। लक्ष्मण म्हणे शंकरा। वेगी मज दीना उद्धरा।।५।।

९७०. वेगी यावे हो शंकरा। ब्रह्मरूपा अजरामरा।।१।। शिवा तू कृपेचा सागर। मायागुणाचिया पर।।२।। सगुण भक्तास्तव झालासी। दीनपातकी उद्धरिसी।।३।। भक्तकैवारी तू देव। लक्ष्मणाते सोडव।।४।।

९७१. देव तू दयाळ पूर्णब्रह्म नाथ। दीनाचा तू नाथ योगिराव।।१।। योगी तुझे ध्यानी निमग्न सर्वदा। स्वहिताचा धंदा आवडे त्या।।२।। साधक तुजला गाती निरंतर। भक्तांचे माहेर तूचि देवा।।३।। काळही तुम्हाते ध्यातो चंद्रमौळी। ब्रह्मांड हरी पाळी तव कृपे।।४।। लक्ष्मण म्हणे वृषभवाहना। येऊ द्या करुणा माझी देवा।।५।।

९७२. कामातेही काम तुझेनिच देवा। निष्काम तू देवा निराभास।।१।। मना चेष्टविसी वेगळा आहेसी। बुद्धीते प्रेरिसी तूचि देवा।।२।। चित्ताचे चिंतन तुझेनिच देवा। अरे कृपाळुवा मूळ तूचि।।३।। अंतःकरण तूचि त्याचा तूचि द्रष्टा। वेगळा तू श्रेष्ठा सर्वांहूनि।।४।। तत्त्वगुण तुझेनिच शोभिवंत। मायेते जाणत आहेसी तू।।५।। सर्वा चेष्टवूनि लिप्त तू नाहीसी। हृदयनिवासी वेगळा तू।।६।। लक्ष्मण म्हणे तूचि सर्वाठायी। गुण तुज नाही निरामय।।७।।

९७३. नारायणमित्रा शंभो हो सत्पात्रा। शिवा रे त्रिनेत्रा जगद्गुरू।।१।। नाना संकटे तू हरिसी दयाळा। भक्तांते स्नेहाळा आलिंगिसी।।२।। कोट्यवधी दोष तुझे नामे जाती। ऐसी तुझी कीर्ती आहे बापा।।३।। भवरोग माते मजलागी झाला। आता या रोगाला वैद्य तूचि।।४।। लक्ष्मण म्हणे रोग हा दारुण। याचे निरसन कर्ता तूचि।।५।।

९७४. चार सहा अठरा वर्णिता शिणले। चौदा भांबावले काय सांगू।।१।। ब्रह्मा आदी देवा न कळे हो पार। कवींचे रे भार शिणले बा।।२।। अठ्ठ्यांशी सहस्र म्हणती प्रभो रे। तुझे गुण बा रे नेणो आम्ही।।३।। योगिधन आणि जपी तपी फार। म्हणती आम्ही पार नेणो तुझा।।४।। ऐसा तू प्रभो श्रेष्ठ रे

ईश्वर। तेथे मी पामर काय स्तवू।।५।। परि तुझा प्रेमा दीनावरी फार। विश्वाचे माहेर तूचि देवा।।६।। जननीचा प्रेमा अर्भका रे वरी। हर्षे अंगीकारी बोल त्याचे।।७।। श्रेष्ठ पुत्रापेक्षा कनिष्ठाचा प्रेमा। करी सर्वोत्तमा माता ती रे।।८।। उपमा न साजे मी रे दुराचारी। असे परोपरी अपराधी।।९।। लक्ष्मण म्हणे माझे हे भाषण। अंगीकारी कोण तुजविण।।१०।।

९७५. कल्पवृक्ष तू रे कल्पातीत शिव। नाना दोष बा रे हरिसी तू।।१।। कल्पित तू देसी भक्त रे रक्षिसी। कल्पना निरसी तूचि बाप।।२।। भवाचे साकडे तोडिसी तू नाथा। विश्वाचिया नाथा विश्वरूपा।।३।। विश्वाचे माहेर तूचि परमेश्वर। विश्वाते आधार तुझाचि रे।।४।। लक्ष्मण म्हणे योग्याचे तू धन। स्वरूपी रमून निर्घोर ते।।५।।

९७६. सुखरूपा शिवा तूचि सुख देशी। भक्ता प्रेम देशी दीनानाथा।।१।। फार भक्त तुझे सुख पावले रे। विघ्न हरिले रे फार त्वाचि।।२।। सायुज्यपदी त्वा फार बैसविले। कामिकाते दिले राज्यधन।।३।। नाथा तुझे गुण गाती प्रेमे फार। विश्वाचे माहेर आहेसी तू।।४।। लक्ष्मण म्हणे तुज रे वाचून। सांग त्राता कोण आहे देवा।।५।।

९७७. तत्त्वे पंचवीस त्यांच्या तू वेगळा। ब्रह्मांडाच्या पाळा देवराया।।१।। चहू देहांचे तू जाणतोसी बा रे। इंद्रियांते तू रे चेष्टविसी।।२।। सर्वांची रे शोभा तुझेनिच देवा। तूचि कृपाळुवा आदिरूप।।३।। ज्ञानदृष्टी तुझी ज्ञानी रे पाहती। योगी ते रमती सुखरूप।।४।। लक्ष्मण म्हणे हंसरूप देवा। सकलही देवा वंद्य तूचि।।५।।

९७८. प्रलयी हे तुझे रूप रे नाशेना। काळाचा तू राणा आहेसी रे।।१।। काळातेही तुझे भय आहे देवा। तुझी आज्ञा सर्वा मान्य देवा।।२।। तुझे नाम जे का अक्षयी गर्जती। तिही लोकी कीर्ती त्याहाची रे।।३।। ऐसा तुझा महिमा आहे बा शंकरा। पाय त्वा ईश्वरा दाखवावे।।४।। लक्ष्मण म्हणे निःसंगा योगिया। तापसाचा राया जगद्गुरू।।५।।

९७९. भवांतका भवाब्धीच्या तरणोपाया। त्रैलोक्यस्वामिया जगद्गुरू।।१।। सुर असुर ते तुझे किंकर हे। सर्व परिवार तुझा देवा।।२।। विश्वपिता तूते म्हणती रे प्राज्ञ। नाम रे सर्वज्ञ तुझे देवा।।३।। विश्वेश्वरा

विश्वनाथा रे सदया। प्रभो तुझी माया अगम्य रे।।४।। लक्ष्मण म्हणे आनंदभरिता। यावे कृपावंता परब्रह्मा।।५।।

९८०. भवानी तुझिया अंकी शोभतसे। पुत्र तो गणेश तुझा शूर।।१।। काळाते दंडिती तुझे गण देवा। तुझे कृपाळुवा भय क्रूरा।।२।। गजानन पुत्र तुझा विघ्नहर। पापांचा संहार करीतसे।।३।। ब्रह्मा विष्णू इंद्र तुझे कामदार। आज्ञेने व्यापार चालविती।।४।। लक्ष्मण म्हणे तुझे भक्त फार। विवेकी झुंजार शूर तेही।।५।।

९८१. तुझे स्वरूप ते सुंदर सगुण। भक्तांचे रक्षण करीतसे।।१।। निर्गुण तू रे बा उपाधीवेगळा। भक्तास्तव स्नेहाळा सगुण तू।।२।। मायागुणाप्रती तुझाचि आधार। विश्वाचे माहेर तूचि देवा।।३।। विश्वकुटुंबी तू विश्वनाथ देव। प्रभो महादेव महाथोर।।४।। लक्ष्मण म्हणे तूचि सूत्रकार। अनादी ईश्वर तुझे नाम।।५।।

९८२. शंभो तुजविण मज कोण आहे। विचारून पाहे देवराया।।१।। येथील आप्त हे सुखाचे सांगाती। तूचि कृपामूर्ती आप्त खरा।।२।। येथील हे आप्त गोविती बंधनी। मायिक कहाणी व्यर्थ ही हो।।३।। लक्ष्मणाचे रे शंभो तूचि धन। पतिताकारण रक्षिसी तू।।४।।

९८३. सुखरूप तू रे सुखाचे सदन। योगियाचे धन तूचि देवा।।१।। ब्रह्मादिकाचे तू देवार्चन देवा। तूते कृपाळुवा सर्व ध्याती।।२।। अनंत ब्रह्मांडे तुजमाजी देवा। विश्वाचा विसावा तूचि शिव।।३।। भक्तकार्यास्तव धावसी तातडी। घालितोसी उडी दीनास्तव।।४।। लक्ष्मण म्हणे भव हा दुस्तर। करी वेगी पार देवराया।।५।।

९८४. गणपतीच्या बापा। देवराया विश्वरूपा।।१।। तुझे वर्णिता पवाडे। श्रुतिशास्त्रा मौन पडे।।२।। शंभो तू रे बा अनादी। शंभो तू रे कृपानिधी।।३।। लक्ष्मणाते पदरी। घ्यावे वेगी त्रिपुरारी।।४।।

९८५. पशुपतिनाथा यावे। पशुपती वेगी धावे।।१।। पशुपक्ष्यांसी पाळिसी। ऐसी तुझी बापा कीर्ती।।२।। वेदशास्त्रे रे वर्णिती। अक्षयी तुजला स्तविती।।३।। लक्ष्मणा वेगी सोडवा। आदिनाथा महादेवा।।४।।

९८६. उमाधव तू रे ब्रह्मांडाचा राणा। तुझे आज्ञे सर्व वर्तती रे।।१।।

मूळपुरुष तू बाप शूळपाणि। अनंत ब्रह्मांडाचा तूचि कर्ता।।२।। सर्वा चेष्टविता तूचि रे शंकरा। तुझी माया न कळे ब्रह्मादिका।।३।। लक्ष्मणा दीना तूचि बोलविसी। तुझा तूचि देवा सर्वकर्ता।।४।।

९८७. अविनाश तू रे परब्रह्म शिवा। मायेचिया परा आदिनाथा।।१।। स्वमायेकरूनि क्रीडा रे करिसी। व्यापक आहेसी देवराया।।२।। साभास ती माया निराभास शिव। व्यापलासे देव सर्वघटी।।३।। तुजविण रिते न दिसे शंकरा। अनंत ब्रह्मांडे व्यापलासी।।४।। लक्ष्मण म्हणे शंभो रे सर्वज्ञा। पद्मपत्रवत् वर्तसी शिवा।।५।।

९८८. शंभोविण त्राता मज रे दिसेना। कैलासीचा राणा दयाघन।।१।। भक्ताचे मनोरथ पुरवी शंकर। राज्यवैभव मोक्ष देतो।।२।। धेनू वत्सास्तव धावे रे तातडी। तैसा धावे शिव भक्तास्तव।।३।। जननी बाळाते लावी स्तनाप्रती। भक्त उमापती आलिंगितो।।४।। लक्ष्मण म्हणे माझे निजधन। अनंत जन्मीचा सखा तोचि।।५।।

९८९. जगी भरलासी तूचि शंभोराया। तुजविण रिते काय योगिराया।।१।। स्वमाये तू सगुण झालासी। मायागुणापर प्रभो आहेसी।।२।। भक्ताचे तू निजधन देवा। वंद्य तू सर्वा रे महादेवा।।३।। उदार तू प्रभो पंचानन। इच्छित देतोसी तू वरदान।।४।। भवकूपातूनि काढीसी रे देवा। आपुले पद तू देशी कृपाळुवा।।५।। लक्ष्मणाते त्राता कोण। देवराया तुज रे वाचून।।६।।

९९०. तुझे गुण किती वर्णावे। आकाशाते केवी आवरावे।।१।। अनंत तुजला रे म्हणती। अनंत गुण तुझे पशुपती।।२।। सूत्रकार तुजला म्हणती। तूचि ब्रह्मांडाचा पती।।३।। भक्तकैवारी त्रिशूलधरा। भक्त रक्षिसी परमेश्वरा।।४।। लक्ष्मणाते सोडवावे। देवराया वेगी यावे।।५।।

९९१. प्रभो तुमचे मायेचा पार। न कळे महिमा तू ईश्वर।।१।। शिणले शेषाऐसे धेंड। स्वरूप आहे ते अखंड।।२।। चहू देहांचिया वरुता। राहसी तू पूर्णभरिता।।३।। अवकाशरूप तुम्ही देवा। सकलापरता तू कृपाळुवा।।४।। श्रुती म्हणती नेति नेति। तेथे माझी वाचा किती।।५।। लक्ष्मण लोटांगणी। करा पावन त्यालागूनी।।६।।

९९२. अनंत ब्रह्मांडांचा धनी। महाराज शूळपाणि।।१।। ब्रह्मा विष्णू

सुरवर। शंभो तुझे कामदार।।२।। त्रैलोक्याचे तू दैवत। सदासर्वदा निवांत।।३।। तुझे वैभव अपार। ब्रह्मादिका न कळे पार।।४।। भक्तजनापाशी वससी। भक्ते जिंकिले तुजसी।।५।। लक्ष्मण तुझा दीन। वेगी करा हो पावन।।६।।

९९३. एक बिल्वपत्र घेशी। राज्य त्रैलोक्याचे देशी।।१।। ऐसा उदार तू धनी। महाराज शूळपाणि।।२।। तुझे चरित्र कळेना। पार वेदांते लागेना।।३।। भक्तास्वाधीन झालासी। भक्तलळे पुरविसी।।४।। चरणी ठेविसी भक्ताला। भक्त वंद्य त्रैलोक्याला।।५।। लक्ष्मण म्हणे फार। दयाळू तू विश्वंभर।।६।।

९९४. भक्तापाशी तुझा वास। सुख अक्षयी त्याहास।।१।। जग विसरले तुला। म्हणूनि दुःख हो त्याहाला।।२।। लक्ष चौऱ्याऐंशी योनी। दुःख भोगिती ते प्राणी।।३।। तुझा स्मरचि होईना। दुःख त्याहाचे मिटेना।।४।। इंगळाचे अंथरुणी। सुख पाहती हो प्राणी।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। गेले कल्प न तुटे गोवा।।६।।

९९५. सकल तीर्थे तुझे चरणी वसती। मूळ तू पशुपती सर्वत्राचे।।१।। तीर्था तीर्थपण देवा देवपण। तुझे कृपेकरून सदाशिवा।।२।। वेदा सिद्धा थोरपण तुझे कृपे। ब्रह्मानंदरूप विश्वात्मा तो।।३।। परात्पर रूप तुझे निरंतरा। सर्वांते आधार तुझा ताता।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त तुज प्रिय। भक्तापाशी माय वसशी तू।।५।।

९९६. दीनाची माउली शीतळ साउली। तूचि चंद्रमौळी सर्वसाक्षी।।१।। तुझ्या छायेमाजी सर्वही वसती। ब्रह्मादिकाप्रती तूचि त्राता।।२।। भक्त तूते ध्याती वसती ते पायी। भवबाधा नाही भक्ताप्रती।।३।। तुज विसरले झाले मस्त जे का। दुःख ते त्र्यंबका भोगिती रे।।४।। स्फटिकमणिवत् आहेसी प्रभो रे। दुष्कर्मे दुःख रे भोगी प्राणी।।५।। लक्ष्मण म्हणे सर्वात असून। अलिप्त तू जाण दीनानाथ।।६।।

९९७. मृत्युंजय बा रे तुजला म्हणती। अविनाश मूर्ती तू रे रुद्रा।।१।। वृषभध्वज हे नाम रे शंकरा। अजर अमरा सदाशिवा।।२।। सकळही देव तुझे तान्हुले रे। विश्व सर्व झाले तुझे सत्ते।।३।। आदि-मध्य-अंती एक तूचि देवा। मायागुण देवा इच्छे तुझ्या।।४।। लक्ष्मण म्हणे शिव आदिपुरुष। ब्रह्मांडाचा अधीश स्वामी माझा।।५।।

९९८. मृत्यूपासूनि त्वा फार सोडविले। पावन रे केले हीनदीन।।१।। रंकाप्रती राज्य दिधले त्वा देवा। जार केला देवा धनपती।।२।। निधी देऊनिया केला तो कुबेर। ऐसा तो शंकर पूर्णदाता।।३।। मृग पशु व्याध पापी उद्धरिले। कैलासाते नेले मिरवीत।।४।। लक्ष्मण म्हणे सांगू कोठवर। शेषाप्रती पार लागेना रे।।५।।

९९९. जातिकूळ तू रे न पाहसी देवा। विद्या कृपाळुवा न पाहसी।।१।। धन द्रव्य राज्य तुज प्रिय नाही। भक्ती प्रिय आई तुजप्रती।।२।। शास्त्री पुराणिक न पाहसी देवा। भक्ती उमाधवा अतिप्रिय।।३।। भलतिये याती असो कोणी प्राणी। भक्ता शूळपाणि हृदयी धरी।।४।। लक्ष्मण म्हणे देवा तू दयाळ। ब्रह्मांडाचा पाळ भक्ता वश।।५।।

१०००. शिवाचा महिमा मज वर्णवेना। अगम्य पुराणा सदाशिव।।१।। पर्जन्याच्या धारा गणना होईल। गुण हे जाणेल कोण त्याचे।।२।। पृथ्वीचे रजःकण रे मोजील। शिवाते जाणेल कोण ऐसा।।३।। ब्रह्मादिका त्याचा पार रे कळेना। इतरांची गणना काय तेथे।।४।। लक्ष्मण म्हणे वेद मौनावले। तेथे काय बोल आमुचे देवा।।५।।

१००१. जुनाट आहेसी बहुता युगांचा। स्वामी तू सर्वांचा शंभुराव।।१।। ब्रह्म तू निश्चळ आहेसी निर्मळ। प्रणवाचे मूळ तूचि देवा।।२।। प्रणवापासूनि आकार हा झाला। आहेसी वेगळा निरामय।।३।। सूर्यबिंब जैसे घटी दिसे देवा। तैसा कृपाळुवा सर्वाठायी।।४।। पाताळाचे खाली स्वर्गाचिये वरी। स्वामी चराचरी आहे बाप।।५।। लक्ष्मण म्हणे एक दिसे धेंड। जड मूढ तोंड कैचे तया।।६।।

१००२. शंकर मायेचे किती गुण गाऊ। सर्व त्यापासून जहाले हो।।१।। आगम निगम गुंतले हो जेथे। मानव मी तेथे काय स्तवू।।२।। मशक हो म्हणे समुद्र ग्रासीन। तैसा मी दीन आहे देवा।।३।। तो हा सदोदित त्याचा नसे अंत। अक्षयी निवांत परब्रह्म।।४।। लक्ष्मण म्हणे पार रे कळेना। रक्षी पंचानना लाज माझी।।५।।

१००३. सूत्र तुझे हाती नाचविशी बाहुली। कृपेची साउली शिवाबाई।।१।। मायागुणा तूचि प्रभू चेष्टविता। सर्वांचा तू कर्ता सदाशिवा।।२।। मनबुद्धीप्रती

तूचि चेष्टविसी। आम्हा म्हणतोसी काय देवा।।३।। लक्ष्मण म्हणे आम्हाकडे काय। तूचि शंभोराय सर्वकर्ता।।४।।

१००४. अंबिकानाथ तू परब्रह्म शिव। योगियांचा राव सदाशिव।।१।। योगयागादिक तुजकरिता शिवा। सर्वांचा विसावा तूचि शंभो।।२।। नाना तीर्थे व्रते तुजकरिता रे। वेद पढती रे तुजकरिता।।३।। व्याकरणादी शास्त्रे पढती रे प्राणी। तुज शूळपाणि आळविती।।४।। लक्ष्मण म्हणे सर्वांते जाणता। सर्वांते पाळिता तूचि देवा।।५।।

१००५. स्थावर जंगम स्वरूप तुझे रे। जगाचा कर्ता रे तूचि देवा।।१।। सर्वा आदी तू रे आदिनाथा देवा। अनेक रे मावा तुझ्या बापा।।२।। परेच्या पर तू निःसंग महेश। आहेसी परेश कृपावंत।।३।। नद्या नद जैसे समुद्री मिळती। प्रलयी वसती तुजमाजी।।४।। लक्ष्मण म्हणे व्यापूनि वेगळा। कळेना हो कळा त्याची कोणा।।५।।

१००६. अरे विश्वनाथा अरे विश्वरूपा। चिन्मयस्वरूपा निर्विकल्पा।।१।। स्वमायेकरूनि सगुण रे लीला। करिसी दयाळा पुरातना।।२।। त्रैमूर्ती होऊनि कार्य चालविसी। उत्पत्ती करिसी पालन रे।।३।। संहारिता रुद्र तुझाचि अवतार। तू अजर अमर आदिरूप।।४।। लक्ष्मण म्हणे सर्वाठायी तूचि। माउली विश्वाची तूचि देवा।।५।।

१००७. शिवा तू निःसंग आहेसी निवांत। योगी तू विरक्त उदासीन।।१।। प्रपंचावेगळा आहेसी स्नेहाळा। निष्कामा दयाळा आहेसी तू।।२।। भूतांमाजी वास तुझा रे शंकरा। भूतनाथ धरा भक्तिबळे।।३।। लक्ष्मण म्हणे पार रे कळेना। ब्रह्मांडाचा राणा तूचि आहे।।४।।

१००८. पुरातन तू रे आहेसी त्र्यंबका। विश्व रे व्यापका दीनबंधू।।१।। गजास्यजनका ब्रह्मांडपालका। नाना रे नाटका वृषभध्वजा।।२।। अरे ज्योतिर्लिंगा प्रभो रे अभंगा। शोभे निर्मल गंगा जटेमाजी।।३।। नाना अलंकार रत्नमय शोभती। रविवत् कांती जटाभार।।४।। लक्ष्मण म्हणे त्रिपुंड्र शोभला। सर्व अंगी ल्याला भस्म प्रभू।।५।।

१००९. विश्वकुटुंबी तू धनी। तुझी कीर्ती रे पुराणी।।१।। विश्वा करिसी उत्पन्न। प्रेमे करिसी पालन।।२।। शेखी संहार करिसी। अंती एकला

राहसी।।३।। पुन्हा स्व-इच्छेकरून। करिसी ब्रह्मांड निर्माण।।४।। तुझ्या मायेचा हा खेळ। मायागुणाचा गोंधळ।।५।। ऐसी असंख्य घडामोडी। होत जातसे तातडी।।६।। कल्प असंख्य ते होती। जीव सर्वदा भ्रमती।।७।। लक्ष्मण म्हणे नाथा। पायी ठेविसी तू भक्ता।।८।।

१०१०. अनंत ब्रह्मांडे कोटी रे। तुझ्या रोमी वसती रे।।१।। विराटपुरुष तू ईश्वर। मूळ सर्वांते आधार।।२।। आदिमायेचा तू भर्ता। सर्वांवरी तुझी सत्ता।।३।। तुझे न कळे लाघव। सत्यरूप सदाशिव।।४।। वेद करिता वर्णन। झाले पायी रे तल्लीन।।५।। श्रेष्ठा श्रेष्ठा ऐसे झाले। लवण जीवनी मिळाले।।६।। लक्ष्मणा हेचि देई। दीन आपुला म्हणवी।।७।।

१०११. शंभो दयाळू तू थोर। केवळ कृपेचे भांडार। करिसी मायेचिया पर। निजभक्ताते ताता।।१।। कृपादृष्टी ज्या पाहसी। तत्क्षणी मुक्त करिसी। रंका ब्रह्मांडनिवासी। करिसी ऐसा तू श्रेष्ठ।।२।। मुका करिसी व्युत्पन्न। बृहस्पती रे समान। पांगुळ त्रैलोक्य जिंकून। येईल क्षणी तव कृपे।।३।। पांगरा तो कल्पवृक्ष। करिसी ऐसा तू विरूपाक्ष। दीनाप्रती सर्व साक्ष। करिसी ऐसा तू शिव।।४।। पाषाण ते चिंतामणी। करिसी ऐसी तुझी करणी। कामधेनू त्या अंगणी। आणूनि बांधिसी दीनाच्या।।५।। लक्ष्मण म्हणे शिवा। तुझे लाघव कृपाळुवा। नकळे ब्रह्मादी देवा। तू मूळ पुरुष।।६।।

१०१२. जेथे तेथे तूचि तू रे। दिसे भासे ही माया रे।।१।। नाना वर्ण नाना व्यक्ती। सर्वही मायेची संतती।।२।। रंगरूपातीत तू रे। आदि-मध्य-अंती बा रे।।३।। स्वयं ब्रह्म तू एकला। भास मायेने हो केला।।४।। सत्ता प्रभो तुझी थोर। करी माया ही व्यवहार।।५।। लक्ष्मण म्हणे सूत्र। हाले इच्छे तू स्वतंत्र।।६।।

१०१३. भक्तवचन सत्य करिसी। भक्तावेगळा नव्हेसी।।१।। भक्त जेथे अवलोकी रे। तेथे उभा तू शंभो रे।।२।। तुझे जिणे भक्ताधीन। करिसी भक्ताचे भजन।।३।। लक्ष्मण म्हणे देवा। भक्त तुमचा विसावा।।४।।

१०१४. तुज पाहता नयनी। मीतूपणा होय हानी।।१।। होय सुखाचा सुकाळ। शिव ब्रह्म तू निर्मळ।।२।। तीन पाच सहा बा रे। होती सुखी सर्वत्र रे।।३।। शिव आनंदाची खाणी। महाराज शूळपाणि।।४।। माझे शिर तुझे

पायी। शिवा ठेवा हो अक्षयी।।५।। लक्ष्मणा पायी ठेवा। हेचि दान देई देवा।।६।।

१०१५. तुज पाहता धुर्जटी। होय मीतूपणा आटी।।१।। अभ्र जिरूनिया जैसे। स्वच्छ आकाश ते दिसे।।२।। तैसे करिसी रे जीवा। परब्रह्म महादेवा।।३।। भक्तपण नुरविसी। निजस्वरूपी ठेविसी।।४।। तुझा स्मर उमाधवा। आम्हा अक्षयी हो द्यावा।।५।। लक्ष्मण म्हणे थोर। तुझा महिमा अपार।।६।।

१०१६. परात्पर तू शंकरा। शुद्ध बुद्ध निरंतरा।।१।। सुसंगा रे निःसंगा रे। कामधेनू अभंगा रे।।२।। सगुण भक्तालागी ताता। झालासी रे उमाकांता।।३।। मायागुणे नाना क्रीडा। करितोसी चंद्रचूडा।।४।। प्रभो सत्ता तुझी थोर। मूळ बीज तू ओंकार।।५।। लक्ष्मण म्हणे शिवा। सर्व तूचि महादेवा।।६।।

१०१७. शिव मायातीत तुम्ही निरंजन। भक्ताने सगुण केले तुम्हा।।१।। निश्चळ असता तूते नाचविती। भक्ते तुजप्रती जिंकिले रे।।२।। निःसंग तू खरा मायागुणापरा। जाशी भक्तघरा धावूनिया।।३।। शस्त्र तुझे हाती भक्ते धरविले। आभरण दिले भक्ते तुज।।४।। लक्ष्मण म्हणे देव भक्त तूचि। कीर्ती तू भक्ताची वाढविसी।।५।।

१०१८. पूर्णयोगी तुज म्हणती शंकरा। मायेचिया परा निरुपमा।।१।। सकल योगिया ज्ञान तू कथिसी। पूर्ण तू आहेसी योगिराव।।२।। बगदालभ्य आदी योगी तुज ध्याती। सनकादिक तुज स्तविती देवा।।३।। ब्रह्म तूचि सत्य तूचि योगीश्वर। तूचि चराचर नटलासी।।४।। लक्ष्मण म्हणे शंकरा सर्वज्ञा। तुझी लीला कवणा कळेना रे।।५।।

१०१९. जाणीव नेणीव मायेचे हे अंग। स्वामी तू निःसंग वेगळाचि।।१।। परा ती पश्यंती मध्यमा वैखरी। वाचा या हो चारी मायाजनित।।२।। ब्रह्मांड हिरण्यगर्भ सर्व माया। तू तव स्वामिराया सर्वातीत।।३।। चहुदेहांतीत शुद्ध बुद्ध नित्य। सर्व तत्त्वांतीत आहेसी तू।।४।। दृश्यभाग सर्व तुझी माया स्फूर्ती। अखंडित मूर्ती तुझी सदा।।५।। लक्ष्मण म्हणे तूते पाहू गेले। नाही ते फिरले वदावया।।६।।

१०२०. सर्वाप्रती देणे तुझे विश्वताता। उमादेविकांता नित्यानंदा।।१।।

निरामय नित्य नूतन तू ताता। निरामय भक्ता करिसी देवा।।२।। सर्व अगोचरा कृपेच्या सागरा। देवा विश्वंभरा कामांतका।।३।। तुझे प्रसादिक झाले ते निष्काम। अक्षयी निगम गाती तुज।।४।। लक्ष्मण म्हणे कीर्ती तुझी फार। विश्व चराचर तुजमाजी।।५।।

१०२१. सहस्रमुख तो शिणला। जिव्हा झाल्या विविध।।१।। वेद शिणले स्तविता। पार न कळे तुझा।।२।। व्यासवाल्मीकादी कवी। शिणले पार लागेना।।३।। स्तविता सर्वत्र शिणले। पार न कळे तुझा।।४।। लवण जळाचिये परी। झाले सर्वत्राप्रती।।५।। सैंधवपुतळा सागरी। शोषू गेला समुद्र।।६।। तेवी सर्वत्राते झाले। अकथ्य तू ईश्वर।।७।। लक्ष्मण म्हणे शंभो। अवघा तूचि तू सर्व।।८।।

१०२२. पृथ्वीपत्र जरी केले। शाई समुद्राची त्या।।१।। अठरा भार वनस्पती। सुरतरू आदी करूनि।।२।। लेखणी ही जरी केली। शारदा ती लेखक।।३।। अक्षयी कीर्ती लिही जरी। महाकल्पापर्यंत।।४।। नाही पार लागणार। तुझ्या चरणरजाचा।।५।। लक्ष्मण म्हणे शंभो। तुझे चरित्र अगणित।।६।।

१०२३. नित्य नूतन तू शिव। निजानंद तूचि रे।।१।। निरामय निर्विकल्प। निरूपम तू एक।।२।। निःसंग तू निराकार। निरामय तू अव्यय।।३।। शुद्ध बुद्ध नित्यमुक्ता। परात्परा परेशा।।४।। अनंत तू बा अपार। अव्यक्त तू परमात्मा।।५।। तो तू स्वमायेकरून। नाना क्रीडा करिसी।।६।। अनंत ब्रह्मांडे हा खेळ। तुझे मायागुणाचा।।७।। दृश्य तुजमाजी दिसे। मृगजळवत्।।८।। लक्ष्मण म्हणे तुझे। चरित्र न कळे कवणा।।९।।

१०२४. ज्योतिस्वरूप शंकरा। दीनानाथा गंगाधरा।।१।। तुझे इच्छेचा पसर। अवघे दृश्य अवडंबर।।२।। महा अनुभव तुम्हापाशी। महादेव तू अविनाशी।।३।। महापराक्रमी भक्त। तुझे कृपे ते निवांत।।४।। भक्तापाशी पराक्रम। शुद्ध भाव तो निस्सीम।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ते। वश केले देवा तूते।।६।।

१०२५. काशीनिवासी तू हर। भक्तजनांचे माहेर।।१।। लेकी माहेरा गे जाती। तेथे विश्रांती पावती।।२।। जेवी दरिद्रियाप्रती। मिळता

ब्रह्मांडसंपत्ती।।३।। रोगियाते बा अमृत। मिळता सौख्य ते अद्‌भुत।।४।। सर्व दृष्टान्त मायिक। नाशिवंत हे अनेक।।५।। प्रभो तुझे जे म्हणविले। ब्रह्मसुख त्या लाधले।।६।। लक्ष्मण म्हणे ताता। हीना दीना तू पाळिता।।७।।

१०२६. वेद झाले तुझे मुखी। तुझे कृपे योगी सुखी।।१।। भक्ताचा तो प्रभो प्राण। स्वामी तुझे अकथ्य गुण।।२।। भक्ता मानीतोसी प्राण। झाली बोलायाची सीमा।।३।। वाणी परेचिया पर। केवळ दिसशी निर्विकार।।४।। विकार दिसती मायेचे। दृश्य पदार्थही तिचे।।५।। लक्ष्मण म्हणे ताता। सर्वावरी तुझी सत्ता।।६।।

१०२७. रविसत्ते जग व्यापार। करिती विश्वी नारी नर।।१।। तेवी हृदयनिवासा। तूचि विश्वाते भरवसा।।२।। सकळ इंद्रियव्यापार। तुझे सत्ते तू निर्घोर।।३।। दीप गृहामाजी वसे। परि कर्मा लिप्त नसे।।४।। तेवी ब्रह्मांडपसारा। तुजमाजी गंगाधरा।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। निरामय तू कृपाळुवा।।६।।

१०२८. शुद्ध बुद्ध नित्य मुक्त। दीनानाथ तू निवांत।।१।। मायाभास हा अनेक। निरामय तू त्र्यंबक।।२।। पंचतत्त्वे गंगाधरा। तुझे वदन शंकरा।।३।। रज सत्त्व तमोगुण। देवा तुझे हे नयन।।४।। दश इंद्रिये या भुजा। तुझ्या बा रे वृषभध्वजा।।५।। प्रकृतिपर तुझे अंग। केवळ उदास निःसंग।।६।। लक्ष्मण म्हणे तूचि। ताता साउली विश्वाची।।७।।

१०२९. केवळ निजानंद राशी। तू बा श्रेष्ठ काशीवासी।।१।। कामक्रोधाची ही रक्षा। केली तुम्ही विरूपाक्षा।।२।। भस्म लाविसी ते अंगा। निजरूपा रे निःसंगा।।३।। स्वानुभव त्या स्मशानी। वसशी अक्षयी शूळपाणि।।४।। विश्वाचे तू निजधाम। भक्ता करिशी निष्काम।।५।। लक्ष्मण म्हणे हरा। आम्हा दीना तू सोयरा।।६।।

१०३०. बाळकाचे बळ मोठ्याने रडावे। मातेने पुरवावे लळे त्याचे।।१।। बाळाऐसे छंद तुझे भक्त घेती। तूही पशुपती पूर्ण करिसी।।२।। मोठमोठे तुज साकडे घालिती। परि ते तुजप्रती प्रिय वाटे।।३।। अज्ञान बाळाच्या माता लाथा खाय। परि त्याचा अन्याय मानीना ती।।४।। तैसे देवा तुज भक्त त्रासविती। परि तू उमापती क्षेम देशी।।५।। लक्ष्मण म्हणे मातेची उपमा।

तुज सर्वोत्तमा तुळेना रे।।६।।

१०३१. बाळक ते मातेप्रती सतावीत। नाना हट्ट घेत भलतेसे।।१।। त्रासूनिया माता सांडिना बाळाला। अती कनवळा त्याचा तीते।।२।। सदा त्याचे मागे मोहरे फिरत। दृष्टी उतरीत प्रेमभरे।।३।। मातेऐसे लळे पुरविसी भक्तांचे। प्रेम तुज त्यांचे अती देवा।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त नाना हट्ट। घेती तू नीलकंठ पुरविसी।।५।।

१०३२. प्रेमळ भक्तीने जैसा वश होशी। तैसा दांभिकासी न होशी प्राप्त।।१।। दांभिकाची पूजा मेरू रे समान। प्रेमळाचे जीवन किंचित् ते।।२।। दांभिकापाशी तो अहंकार फार। मीपणे थोर फुंजती हो।।३।। प्रेमळ ते म्हणती कर्ता सर्व शिव। प्रेमे अष्टभाव समर्पिती।।४।। लक्ष्मण म्हणे प्रेमळाचे घरी। वससी त्रिपुरारी दयाळू तू।।५।।

१०३३. देवराया तुम्हा प्रणाम शंकरा। सर्वा अगोचरा ब्रह्मानंदा।।१।। गुणातीता प्रभो असंगा अपारा। वेदान्ताच्या सारा निजरूपा।।२।। परात्परा प्रभो परेचिया परा। अलक्ष ईश्वरा पूर्णब्रह्मा।।३।। पद्मपत्रवत् सर्वांचे तू देही। देह तुज नाही विदेही तू।।४।। सत्तामात्रे सर्व चालतसे देवा। तुझा पार शिवा कोण जाणे।।५।। लक्ष्मण म्हणे सूर्याअंगी तेज। तेवी मायाबीज तुजमाजी।।६।।

१०३४. शंकरा तुजला पाहता नयनी। भ्रांती ही तत्क्षणी नाशे बापा।।१।। अनंत जन्मांची पापे भस्म होती। वाढे त्याची कीर्ती तिन्ही लोकी।।२।। ऐसा तुझा महिमा किती वर्णावा रे। वर्णिता शेष रे शिणला तो।।३।। आपणामाजी तू मेळविसी भक्ता। मुक्ती सायुज्यता देशी त्याते।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तिसुख देशी। सेवा त्यांची घेशी निरंतर।।५।।

१०३५. तुझे दर्शने होतसे कल्याण। किल्मिषे दारुण भस्म होती।।१।। अक्षयी कल्याण करिसी भक्ताचे। येणे जाणे त्याचे खुंटविसी।।२।। जैसे अग्नीमाजी काष्ठ ते पडता। काष्ठाची ही वार्ता नुरे काही।।३।। तैसे तुझे ध्यासे तुजऐसे होती। ताता तुझी गती न कळे कोणा।।४।। लक्ष्मण म्हणे माझ्या मायबापा। शंभो विश्वरूपा क्षेम देई।।५।।

१०३६. तुझे दर्शने नुरे मीतूपण। सर्व अंगी पूर्ण सुख भरे।।१।। सुखाचे हे सुख निजसुख हे रे। भक्ताप्रती बा रे देतोसी तू।।२।। निजसुख होता नुरे

उरी काही। झाले ते अक्षयी वस्तुरूप।।३।। ऐसा तुझा महिमा अनंता अपारा। देवा गंगाधरा निजरूपा।।४।। लक्ष्मण म्हणे शिवा योगिराया। आपुलिया ठाया न्यावे मज।।५।।

१०३७. तुझे दर्शने जीव होती मुक्त। भवरोगा अंत करिसी त्यांच्या।।१।। शिवपण देशी जीवाप्रती बापा। प्रभो विश्वरूपा आदिनाथा।।२।। अहंकार नुरे नुरे विश्वंभरा। अविद्येचा थारा मोडितोसी।।३।। ब्रह्मांडनायका पूर्ण तू दयाळू। अती तू स्नेहाळू परमधामा।।४।। लक्ष्मण म्हणे माय गे आमुची। साउली विश्वाची विश्वनाथ।।५।।

१०३८. तुझे दर्शने कर्माचे खंडन। होतसे तू पूर्णब्रह्म शिवा।।१।। आपणाऐसे पूर्ण करिसी भक्ताला। ब्रह्म या जीवाला करितोसी।।२।। तुझा महिमा नकळे ब्रह्मादिकाप्रती। ब्रह्मादी रमती तुझे स्वरूपी।।३।। सुखानंदधाम योगी ते पावले। अक्षयी रमले निष्ठाबळे।।४।। लक्ष्मण म्हणे चरणकमळ। भक्ताने धरिले प्रेमभरे।।५।।

१०३९. तुझे दर्शने माया ही नुरे रे। भक्ता तुझे ते रे सुख प्राप्त।।१।। संसारचि सर्व सुखाचा रे होय। ऐसे तुझे माय वैभव गे।।२।। दुःखाची ही वार्ता नुरे त्याते बापा। ऐसी तुझी कृपा श्रेष्ठ देवा।।३।। कृपेऐसे दुजे फळ नसे बा रे। भक्ताते खरे रे सुख साजे।।४।। लक्ष्मण म्हणे दयेची तू खाणी। कीर्ती त्या पुराणी तुझी माये।।५।।

१०४०. तुझे दर्शने मन फिरे बा रे। वासनाबीज रे दग्ध होय।।१।। वासनेचा अंत होतसे तत्काळ। जैसे लवण जीवनी मिळणी होय।।२।। भिंगुटी ती अळी होतसे रे जैसी। तैसे तू भक्तासी करिसी देवा।।३।। तुझे हे चरित्र सिद्ध गाती नित्य। सुख ते अनित्य त्यजूनिया।।४।। लक्ष्मण म्हणे सुकृती जे नर। तेचि तुझा स्मर करिती ताता।।५।।

१०४१. तुझे दर्शने सर्व गुंता तुटे। भवसिंधु आटे विश्वरूपा।।१।। संचित जळूनि जाय तत्क्षणी। ब्रह्मांडाचा धनी तू रे ताता।।२।। लक्ष चौऱ्याऐंशी फेरे चुकविसी। स्वरूपी ठेविसी दयार्णवा।।३।। कल्पवृक्षाहूनि तुझा महिमा थोर। कल्पनेते दूर करितोसी।।४।। लक्ष्मण म्हणे परिसाहूनि थोर। स्वामी गंगाधर दाता श्रेष्ठ।।५।।

१०४२. तुझे चरित्र न कळे। न कळे हे न कळे।।१।। अनंत तुझे नामगुण। काय कळेल कवणा।।२।। आकाशाते गवसणी। कासियाची शोभेल।।३।। अनंत ब्रह्मांडाच्या कोटी। तुझ्या रोमरोमी रे।।४।। अकथ्य तू अगोचर। मायबाप शंकर।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। भक्ता छाया करिसी।।६।।

प्रेमकलह

१०४३. थोर घर रे पाहून। आलो देई भिक्षादान।।१।। भीक वाढी रे वेगेसी। का रे विलंब लाविसी।।२।। श्रेष्ठ तू रे दानशूर। आम्हाविषयी का निष्ठुर।।३।। अंदाधुंद कारखाना। दिसतो रे पंचानना।।४।। लक्ष्मण हा भिकारी। उभा केव्हाचा हो द्वारी।।५।।

१०४४. दारी बैसलो तिष्ठत। कैसा झालासे निवांत।।१।। फार झाल्या येरझारा। कैसा निष्ठुर शंकरा।।२।। दानशूराचे लक्षण। ऐसे नव्हे नव्हे जाण।।३।। येता याचक दारात। पुरविसी मनोरथ।।४।। लक्ष्मण म्हणे थोर। ऐसे काय तुझे घर।।५।।

१०४५. कोठवरी रे तिष्ठावे। काय तुजला म्हणावे।।१।। कैसा झालासी तू दीन दाखवीनासी चरण।।२।। उदारत्व गेले म्हण। आम्ही जातो परतून।।३।। फार होईल अपकीर्ती। बरवे विचारावे चित्ती।।४।। लक्ष्मण म्हणे देवा। बरवा विचार करावा।।५।।

१०४६. पतितपावन नाम तुझे देवा। कीर्ती कृपाळुवा तुझी फार।।१।। जार चोर खळ तुज आले रे शरण। प्राणी ते पावन केलेसी त्वा।।२।। त्याहून मी खळ परि आलो शरण। करावे पावन दीनानाथा।।३।। नाही तरी देवा धांडोरा देईन। देव झाला दीन स्तवू नका।।४।। पतितपावन नाम त्वा सोडावे। नाही तरी घ्यावे पदरात।।५।। माथ्याचा पदर खांद्यावरी आला। भेईना तुजला देवा जाण।।६।। लक्ष्मण म्हणे निःसंग होऊन। करितो भाषण तुजप्रती।।७।।

१०४७. लाज भय देवा सोडून रे दिली। लागलो मागे रे तुझ्या आम्ही।।१।। पाहू दे चरण पाहू डोळा भरून। प्रभो यावाचून दुजे नाही।।२।। तुझी देवराया न लगे दसोडी। पाहू रूप जोडी हेचि आम्हा।।३।। लक्ष्मण म्हणे येई विश्वनाथा। भेटी दे अनाथा देवराया।।४।।

१०४८. तुजसाठी आम्ही झालो रे फकीर। सोडिला व्यवहार प्रपंचाचा।।१।। निंदिती रे लोक सहन रे केले। दाखवी पाउले त्वरे येई।।२।। आप्त गोत्र कूळ सर्वांनी टाकिले। जगाने त्रासिले म्हणती हीन।।३।। आता तुजप्रती नाही सोडणार। निःसंग मी फार झालो पाहे।।४।। न देशी भेटी सांगेन लोकाला। देव तो रे झाला कृतघ्न रे।।५।। लक्ष्मण म्हणे पाहे तो विचार। अपकीर्ती फार होईल रे।।६।।

१०४९. तुजा म्हणवितो करावा सांभाळ। देवा तू दयाळ म्हणविसी।।१।। करिसी उपेक्षा होईल अपकीर्ती। विचारूनि चित्ती पाहे तूचि।।२।। रायाचा सेवक होता अपमान। परि ते गौण वाटे राया।।३।। थोराने आपले देवा जे म्हणविले। नाही उपेक्षिले पुन्हा त्यांनी।।४।। लक्ष्मण म्हणे काही आता करी। पडलो रे द्वारी दीनानाथा।।५।।

१०५०. निर्घोर निवांत काय बैसलासी। त्रास का तुम्हासी आला देवा।।१।। प्रलय वर्तला अनिवार घाला। धर्म हा लोपला झाले कैसे।।२।। पापाचा सागर भरला रे देवा। अरे कृपाळुवा जाणसी तू।।३।। लक्ष्मण म्हणे दुःख दावू नका। सोडवा व्यापका लवकर।।४।।

१०५१. कैलासशिखराचे ठायी। सुखे बैसलासे काई।।१।। येथे झालासे अती घोर। जग हे झालेसे जर्जर।।२।। अविद्या डाकिणीने देवा। प्रलय केला कृपाळुवा।।३।। सहा कुमार तिचे बंड। त्यांनी माजविले बंड।।४।। मोठमोठे रे नाडिले। तपोधन भ्रष्टविले।।५।। अन्याय करिती रे फार। अनिवार त्यांचा मार।।६।। तेथे माझी कथा काई। फार गांजिले गे आई।।७।। काही सुचेना शंकरा। कैसे करू विश्वंभरा।।८।। सोडविता रे दिसेना। वेगी येई पंचानना।।९।। लक्ष्मण पतितासी। सोडवी बा रे त्वरेसी।।१०।।

१०५२. चार युगे गेली फिरता। काय चोरी केली ताता।।१।। अंदाधुंद सरकार। कैसा करिसी कारभार।।२।। शिंदळ होता कुबेर केला। भक्त उघडा ठेविला।।३।। फार गाफीलपणा देवा। आम्हा दीना कोण देवा।।४।। आता तरी ये लवकर। कैसा झाला निष्ठुर।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। चाल वेगी कृपाळुवा।।६।।

१०५३. तू रे दयाळू म्हणविसी। का रे निष्ठुर झालासी।।१।। दुर्दैना रे

झाली। तुझी करणी दिसून आली।।२।। सहांनी रे कहर केला। अनिवार यांचा घाला।।३।। दृष्टीने रे तू पाहासी। तू तो कृतघ्न आहेसी।।४।। तुझा दीन लक्ष्मण। सांग त्याचा त्राता कोण।।५।।

१०५४. संगती तुझी केली। अपकीर्ती जगी झाली।।१।। काय म्हणावे तुजला। संग बरवा दिसून आला।।२।। लोक म्हणती निलाजरा। कैसे केले कर्पूरगौरा।।३।। पुरता धरा अभिमान। काय लोकांसी कारण।।४।। लक्ष्मण म्हणे देवा। सांभाळ पुरता करावा।।५।।

मागणे

१७५५. तुज पाहता शंकरा। दृष्टी न फिरे माघारा।।१।। महामायेचिया पर। मूळबीज तू ओंकार।।२।। लवण जैसे मिळे जळी। तैसे करिसी चंद्रमौळी।।३।। दीपकर्पूराचे परी। भक्ता करिशी त्रिपुरारी।।४।। जीवदशा निरसून। करिसी आपुले समान।।५।। लक्ष्मण म्हणे पायी। मज ठेवा हो अक्षयी।।६।।

१०५६. तुज पाहता नयना। तृप्ती झाली पंचानना।।१।। सुख भरले सर्व देही। फुंज स्वानंद अक्षयी।।२।। मिठी घातली चरणा। शिवा स्वानंदजीवना।।३।। तुटी न पडावी आता। हेचि मागणे रे ताता।।४।। वारंवार विनवणी। हेचि तुम्हा शूळपाणि।।५।। लक्ष्मणा पायी गोडी। सदा वसवावी आवडी।।६।।

१०५७. तुज पाहता समोर। वृत्ती होय तदाकार।।१।। मीतूपणाचा संकल्प। होय दूर आपोआप।।२।। तळमळ नुरे काही। सुखा उपमा त्या नाही।।३।। बहुता जन्मांचे सुकृत। तरीच चरण तुझे प्राप्त।।४।। शिवभक्ता तूचि श्रेष्ठ। भक्ता स्वानंदाची पेठ।।५।। लक्ष्मणा भक्ती देई। मायबहिणी शिवाबाई।।६।।

१०५८. सदा प्रेम देई नसावा विसर। प्रेम तुझे सार सर्वाहूनि।।१।। मन हे माझे रे प्रेमी वसवावे। अक्षयी रमावे येणे येथे।।२।। प्रेमगोडी देई सुखसदना रे। दुजे मागणे रे नाही काही।।३।। वारंवार हेचि तुम्हा विनवणी। छाया निजसुखाची करावी हो।।४।। लक्ष्मण म्हणे अपारा ईश्वरा। सुखाचा तू सारा सदोदित।।५।।

१०५९. नको तुझी चिंधी दाखवी चरण। येई झडपून देवराया।।१।।

भस्मासुरा भेणे पळाला होतासी। क्रूराने तुजसी श्रमविले।।२।। म्हणूनि भितोसी न देसी दर्शन। देवा तुझी आण मागणे नाही।।३।। पाय ते पाहीन सुख ते पावेन। सत्यरूपा दान देई आम्हा।।४।। लक्ष्मण म्हणे देवा विश्वताता। मायेचा तू भर्ता दयाळू रे।।५।।

१०६०. दान वेगी द्यावे कृपा रे करावी। मन माझे ठेवी पायी तुझ्या।।१।। तुझा विसर रे कदा न पडावा। अक्षयी असावा स्मर तुझा।।२।। न लगे मुक्ती धन नको वैभव देवा। संतांचा असावा समागम।।३।। लक्ष्मण म्हणे सुखे जन्म देई। प्रेमा शिवाबाई देई मज।।४।।

१०६१. शेवटली विनवणी। माझी परिसावी ताता।।१।। देवा श्वान हे द्वारीचे। ऐसे म्हणा स्वमुखे।।२।। इतुक्याने समाधान। मज पतित दीना।।३।। बहू बोलणे ते काय। शंभो तू तव सर्वज्ञ।।४।। देवा तुझे द्वारी पडलो। आता सांभाळी ब्रीद।।५।। लक्ष्मणा कोणी नाही। देवा तुम्हावाचूनि।।६।।

१०६२. देवा पामराचा विसर। न पडावा कदाही।।१।। वारंवार विज्ञापना। तुम्हाप्रती सर्वज्ञा।।२।। ब्रह्मांड तो कारभार। तुम्हापाशी अक्षयी।।३।। येती जाती ब्रह्मादिक। सुर नर दिक्पाळ।।४।। मोठा गलबला तो भारी। पडेल विसर रंकाचा।।५।। तूते सर्वत्र समान। ऐसे वेदांचे वचन।।६।। लक्ष्मण म्हणे ताता। तुझी सत्ता रे थोर।।७।।

१०६३. तुझ्या चरणापरते सुख। सर्व दिसे हे मायिक।।१।। राज्य ब्रह्मांड संपत्ती। हेही दुःखचि कल्पांती।।२।। मायेचे हे अवडंबर। मृगजळवत् हे खरे।।३।। तेथे संदेहचि नाही। सदा सुख तुझे पायी।।४।। तुझे भक्त जे निधडे। सुख त्याहा हे आतुडे।।५।। लक्ष्मणा तेचि द्यावे। पायी अक्षयी ठेवावे।।६।।

१०६४. तुझे चरणकमळ शिवा। तेथे मन माझे वसवा।।१।। सदा मनभृंगा गोडी। द्यावी चरणकमली आवडी।।२।। चरणी अक्षयी वसवा। दीनबंधू कृपाळुवा।।३।। सुख तेचि देई देवा। परब्रह्म महादेवा।।४।। आम्हा सुख तेचि देई। चरणी ठेवी रे अक्षयी।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। तूच आमुचा त्राता रे।।७।।

१०६५. तुमचे चरणकमलसागरी। वसवा मन माझे लहरी।।१।।

क्षणभरीही वियोग। नसो देई चरणी संग।।२।। वारंवार विनवी। हेचि तुम्हा शूळपाणि।।३।। आर्त पुरविसी तूचि। तूचि माउली आमुची।।४।। दीनानाथा कृपा करी। प्रेम देई झडकरी।।५।। लक्ष्मण म्हणे त्वा रे। पूर्वी रक्षिले हीन रे।।६।।

१०६६. तुझे स्वरूप आकाश। सदासर्वदा अवकाश।।१।। तेथे मज वास देई। सदासर्वदा अक्षयी।।२।। जैसी सागरी सरिता। ऐसे करी मज ताता।।३।। दीपकर्पूराचे परी। करी मज झडकरी।।४।। लवण सागराचे भेटी। होता नोहे कदा तुटी।।५।। लक्ष्मण नुरवून। प्रेमे करावे भजन।।६।।

१०६७. देवा आलो लोटांगणी। करा छाया कृपेची।।१।। कामांतका शरण आलो। कृपाकटाक्षे पाहा।।२।। वाली तुजविण ताता। नाही त्रिभुवनी रे।।३।। सुखरूप निरंतरा। चरणगोडी देई रे।।४।। लक्ष्मण झाला लंड। पडला द्वारी तुझ्या रे।।५।।

१०६८. परब्रह्म उमापती। माझी परिसावी विनंती।।१।। कर जोडितो दुबळा। स्वामी ब्रह्मांडाच्या पाळा।।२।। कीर्तनी रंग वेगी भरी। ताता येई गा लवकरी।।३।। आपण असावे जवळी। दीनबंधू चंद्रमौळी।।४।। लक्ष्मणाचे जीवन। प्रभो आहा हो आपण।।५।।

१०६९. वारंवार विज्ञापना। भेटी द्यावी पंचानना।।१।। तुजप्रती गुंता फार। आम्हा दीनाचा विसर।।२।। कोण वाली आमुचा देवा। वेगी दावी महादेवा।।३।। जरी तू झालासी निष्ठुर। आमुचा करिसी अव्हेर।। ४।। पतितपावन पशुपती। कोण म्हणे रे तुजप्रती।।५।। पाहा बरवे विचारून। तुम्ही विश्वाचे जीवन।।६।। लक्ष्मण म्हणे येई। मायबहिणी शिवाबाई।।७।।

१०७०. लौकिकाची लाज आम्हा नाही ताता। देवा उमाकांता जगद्गुरू।।१।। निःसंग रे झालो करितो विनंती। देवा पशुपती परिसा हो।।२।। भ्रमराचा प्रेमा सदा पुष्पावर। वसे निरंतर प्रेमभरे।।३।। तेवी मन सदा वसावे रे पायी। मन दुजे ठायी जाऊ नये।।४।। लक्ष्मण म्हणे याविण नको रे। गुण वदवी रे तुझे प्रेमे।।५।।

१०७१. माझे ते चरण तुझे हे मस्तक। देवा करी एक विश्वरूपा।।१।। सदा मी सर्वदा असावे निमग्न। न जावे हे मन दुजे ठायी।।२।। अंबिकेच्या

नाथा स्वामी आदिनाथा। ब्रह्मांडाच्या नाथा दान देई।।३।। द्वैत नाशून करवा भजन। तेणे रे करून सुख मज।।४।। लक्ष्मण म्हणे दीन रे दयाळा। देवा जाश्वनीळा येई वेगी।।५।।

१०७२. वामदेवा विज्ञापना परिसावी। सुखरूपा देई दान दीना।।१।। दान मी मागतो द्यावी भिक्षा देवा। देवाधिदेवा निरंतरा।।२।। क्षुधित बराडी धावे अन्नावरी। देवा त्रिपुरारी तेवी करा।।३।। प्रेमयुक्त देवा गुण वदवावे। मन हे वसावे पायी सदा।।४।। लक्ष्मण म्हणे यावाचूनि बा रे। नाही मागणे रे दीनानाथा।।५।।

१०७३. परमात्मया गंगाधरा। वेगी यावे सर्वज्ञा।।१।। माझी विज्ञापना हेचि। आपण जवळी असावे।।२।। क्षणभरीही वियोग। पायाचा हा नसावा।।३।। लवणजीवनाचे परी। चरणी ठाव मज द्यावा।।४।। न लगे राज्यादी संपत्ती। न लगे स्वर्गीचे सुख।।५।। लक्ष्मणा प्रिय नाही। पायाविण दुजे बा।।६।।

१०७४. जगद्गुरू गंगाधरा। माझी विनंती एक।।१।। माझे जवळी असावे। कीर्तनी रंग भरावा।।२।। गुणदोष न पाहावे। उडी घालावी वेगी।।३।। सर्वापरी म्या भरवसा। धरिलासे पायाचा।।४।। दीनबंधू दीनानाथा। दीनरक्षक तू तात।।५।। लक्ष्मण म्हणे दावा। पाय वेगी सर्वज्ञा।।६।।

१०७५. देवा देवाधिदेवा। पाय वेगी दाखवी।।१।। पाय पाहावे ही इच्छा। दुजे कारण नाही।।२।। न लगे तुझे चिरगुट। भोग स्वर्गादिक ते।।३।। चरणसुख आम्हा प्रिय। मायबापा दयाळा।।४।। भ्रमर ते कमळावरी। तेवी चरणी मज ठेवा।।५।। वारंवार विज्ञापना। माझी कृपासमुद्रा।।६।। लक्ष्मण हा किंकर। तुमचा म्हणवीतसे।।७।।

१०७६. सख्या सोयऱ्या सजणा। मायबापा पंचानना।।१।। निजरूप तू सर्वज्ञ। आम्हा अनाथांचे धन।।२।। विश्वंभरा तू विश्रांती। आम्हा आहेसी पशुपती।।३।। जगद्गुरू सदाशिव। परात्पर महादेव।।४।। चरणी ठेवावे किंकरा। हेचि विनंती शंकरा।।५।। लक्ष्मणा दुजे काही। नको वास द्यावा पायी।।६।।

१०७७. वेडेवाकुडे उत्तर। केले अन्यायी मी फार।।१।। ब्रह्मादी तो

नारायण। तुझे कृपेने सधन।।२।। सर्व आज्ञेने वर्तती। सर्वा वंद्य तो पशुपती।।३।। अरे कारे तूते देवा। बोलिलो मी कृपाळुवा।।४।। फार अपराधी हीन। तुझे द्वारीचे बा श्वान।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। क्षमा करी सदाशिवा।।६।।

१०७८. देवा मुंगीपरी करी। नको गर्व या शरीरी।।१।। दुष्ट स्वभाव हा जाळी। महाराजा चंद्रमौळी।।२।। अती लहानपणा देई। मोठेपण हे घालवी।।३।। लक्ष्मणा दावी पाय। प्रभो करी निरामय।।४।।

१०७९. साधूंची संगती खळा आवडेना। जारा आवडेना पतिव्रता।।१।। पाखंडज्ञानी ते वेदा न मानिती। पापी हे नेणती धर्माधर्म।।२।। चोरा आवडेना चंद्राचा प्रकाश। अभक्ता महेश आवडेना।।३।। देवा विसरले म्हणूनि भ्रमले। स्वहित चुकले मंद जाणा।।४।। लक्ष्मण म्हणे नको ती संगती। अहो कृपामूर्ती देवराया।।५।।

१०८०. साधन घडले नाही काही। म्हणूनि व्यथा ही भोगावी।।१।। पुण्य नाही रे पदरी। हिंडतो मी घरोघरी।।२।। केले कर्म रे भोगावे। देवा तुम्हा काय म्हणावे।।३।। घडणार ते घडो देवा। नाम वदवा कृपाळुवा।।४।। तुझा न पडो विसर। हेचि मजवरी कृपा कर।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। गुण अक्षयी वदवा।।६।।

१०८१. द्रव्य नको देऊ देवा। गुण अक्षयी वदवा।।१।। निर्विघ्न भजन घडो। मन तुझे पायी जडो।।२।। अनेक इच्छा नसो काही। ऐसे करी मायबाई।।३।। हेचि मागणे तुजला। अनेक न लगे मजला।।४।। लक्ष्मणा सोय लावा। तूचि माझा त्राता देवा।।५।।

१०८२. होणार ते होवो भोग भोगू देवा। विसर नसावा तुमचा हो।।१।। पायाचा विसर कदाही नसावा। समागम व्हावा साधूंचा हो।।२।। वासना ही तुझे पायी वसो देवा। अहो सदाशिवा दान द्या हो।।३।। लक्ष्मणामुखे गुण वदवा हो। होणार ते होवो मग देवा।।४।।

१०८३. मानसन्मानाचा संदेह नसावा। अक्षयी असावा स्मर तुझा।।१।। वित्तेषणा चित्तेषणा ही नसावी। मन माझे लावी पायी देवा।।२।। सर्वोत्तम तू रे कृपेचा सागर। भक्तांचे माहेर साह्यकर्ता।।३।। नाम माझे मुखे वदवावे सर्वदा। भजनाचा धंदा देवा द्या हो।।४।। लक्ष्मणाप्रती दान हेचि देई। येई

शिवाबाई वेगी माय।।५।।

१०८४. वासना ही गुंतो तुझे पायी नाथा। वदवा समर्था गुण मुखे।।१।। होणार ते होवो कोण भितो त्याते। पावावे आम्हासी मायबापा।।२।। मन हे भ्रमावे अक्षयी चरणी। दान शूळपाणि द्या हो वेगी।।३।। तूचि पूर्ण ज्ञाता आहेसी रे ताता। येई कृपावंता महेश्वरा।।४।। लक्ष्मण म्हणे दान द्या मजला। ब्रह्मांडाच्या पाळा हेचि मज।।५।।

१०८५. जळी जेवी वसे मीन। नोहे वेगळा त्याविण।।१।। तैसे नाम सदाशिवा। माझे मुखे हो वदवा।।२।। नामावेगळे म्या कधी। न व्हावे कृपानिधी।।३।। लक्ष्मणा द्यावे प्रेम। अक्षयी वदवा ते नाम।।४।।

१०८६. मुंगी शर्करा ती सेवी। अतिप्रेमा स्वादाठायी।।१।। तैसे देवा मज करी। विसर नसावा क्षणभरी।।२।। अतिसदय त्रिपुरारी। नका गुंतवू संसारी।।३।। लक्ष्मणा द्यावी सेवा। अतिप्रेमे महादेवा।।४।।

१०८७. तुझे नामामृताविण। नका नेऊ कोठे मन।।१।। नामामृताची ती चवी। मने अक्षयी हो घ्यावी।।२।। वारंवार विज्ञापना। तुम्हाप्रती पंचानना।।३।। लक्ष्मणा नामामृत। पाजून करा हो निवांत।।४।।

१०८८. मन चरणी लावी रे। वदनी गुण वदवी रे।।१।। स्वरूपी सावध असावे। पाउल सन्मार्गी पडावे।।२।। माझी विनंती रे देवा। समाधान वृत्ती ठेवा।।३।। शंभोराया दर्शन देई। दीनबंधू धावी धावी।।४।। लक्ष्मणा तुम्हाविण। सांगा प्रभो आहे कोण।।५।।

१०८९. तुझे स्वरूपी निवांत। असावे म्या सदोदित।।१।। तुझे पायी वासना गुंतावी। नाम अक्षयी वदवी।।२।। हेचि मागणे तुज रे। लाज रक्षावी दातारे।।३।। लक्ष्मण अपराधी। तूचि त्राता कृपानिधी।।४।।

१०९०. हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा।।१।। धन द्रव्य नको देवा। संताचिये पायी ठेवा।।२।। मुखी नामस्मरण करवा। तुझा विसर न पडो देवा।।३।। लक्ष्मण म्हणे देवा। सदा समाधान ठेवा।।४।।

१०९१. देवराया कृपा करा। मज दीनाते उद्धरा।।१।। मन वसो तुझे पायी। हेचि दे गे मायबाई।।२।। साधुसंगत घडावी। दुष्ट संगत नसावी।।३।। आनंदभरित ठेवा मन। सर्वाभूती करा लीन।।४।। लक्ष्मण विनवी प्रभोप्रती।

दान हेचि द्या मजप्रती।।५।।

१०९२. हेचि मागणे रे देवा। तुझा विसर नसावा।।१।। माया उपाधी तोडा हो। भ्रांती माझी निरसा हो।।२।। अहंकार हा नसावा। काम निष्काम करावा।।३।। मन असावे स्वाधीन। स्वरूपी असावे निमग्न।।४।। लक्ष्मण म्हणे दयाघना। देवा हेचि द्या मज दीना।।५।।

१०९३. तूचि सर्वकर्ता आम्हाकडे काय। तुझे गुण माय वदवी गे।।१।। काही ऐकवेना सर्वापरी हीन। त्राता आमुचा कोण तुजविण।।२।। पाप नेणो पुण्य नेणो दातारा। प्रभो सूत्रकारा तुझे हाती।।३।। सर्वा मी चेष्टवी ऐसे म्हणविसी ताता। हृदयनिवासी तूचि देवा।।४।। लक्ष्मण म्हणे सर्व तुझ्याकडे। मन पायाकडे लाव देवा।।५।।

प्रेमनिष्ठा

१०९४. पूर्वीची ती पापे रोगाचिये रूपे। आली सुखरूपे भोगू आम्ही।।१।। नाना पापे केली भोगणे हे आले। देवावरी बोल काय आता।।२।। त्रिताप हा पाळा शरीराभोवता। देहाचिया माथा कर्मसूत्र।।३।। खूण आम्हाप्रती कळली हो खरी। अक्षयी अंतरी पाय ध्यातो।।४।। प्रभो कृपाबळे आम्हा सर्वकाळ। आता तळमळ काही नाही।।५।। लक्ष्मण म्हणे स्वानंदाचा कंद। शिव ब्रह्मानंद जोडिला हो।।६।।

१०९५. मायबाप धन तूचि। तूचि साउली आमुची।।१।। आप्त कुळ गणगोत। तूचि आराध्यदैवत।।२।। तूचि गुरू बा शंकरा। दीनानाथा विश्वंभरा।।३।। तूचि तू गा अवघा सर्व। प्राणपती तूचि शिव।।४।। कोणतीही उपमा रे। तुजप्रती साजेना रे।।५।। लक्ष्मणा बोलवेना। काही स्तवन सुचेना।।६।।

१०९६. मान अपमान हा रे। सारूनि ध्यातो पाय ते रे।।१।। निंदा टवाळी वारिली। प्रभोपायी वस्ती केली।।२।। माझे तुझे हे नासून। प्रेमे करितो भजन।।३।। निष्काम हे मन झाले। प्रभोपायीचि राहिले।।४।। स्वामी घनदाट भरला। तोचि सखा आम्ही केला।।५।। लक्ष्मण म्हणे बाप। स्वामी माझा विश्वरूप।।६।।

१०९७. चित्त रातले शंकरी। आता स्मरा कोण उच्चारी।।१।। वेडेवाकुडे

स्तवीन। दास शंभोचा म्हणवीन।।२।। वर्ण-उच्चारादी कळा। नेणू ध्याऊ जाश्वनीळा।।३।। लक्ष्मणाचे अंतरी। सदा वसे त्रिपुरारी।।४।।

१०९८. शंभो आमुचा तू दाता। काय आम्हा भय चिंता।।१।। सदासर्वदा आनंद। स्वामी आमुचा ब्रह्मानंद।।२।। त्यासी करितो व्यवहार। तोचि आमुचा सावकार।।३।। त्याने दाविला व्यापार। तोचि करितो निरंतर।।४।। लक्ष्मण नेणे काही। सर्वकर्ता तो गोसावी।।८।।

१०९९. पाप पुण्य नेणो काही। आम्हाकडे काही नाही।।१।। सर्वकर्ता तो ईश्वर। चालवीतसे व्यापार।।२।। तोचि आहे सूत्रकार। सकळ विश्वाचे माहेर।।३।। बाणली ही आम्हा खूण। आदि अंती तो निर्गुण।।४।। लक्ष्मणा तो बोलवी। तोचि आहे सर्वाठायी।।५।।

११००. निःसंगाचा संग आम्हा आवडला। स्वामी सखा केला निःसंग तो।।१।। निर्भय गोसावी सुखदुःखातीत। सर्वाते जाणता आहे तो रे।।२।। मोहमायापाश तोडिला दयाळे। निःसंग स्नेहाळे केले मज।।३।। लाज नाही आता निलाजरा झालो। सागरी बुडालो आनंदाच्या।।४।। लक्ष्मण म्हणे संग तोचि बरा। मायावी पसारा दिसे भासे।।५।।

११०१. त्रिभुवनतात शिव यजमान। आम्हा काय न्यून सदा सुख।।१।। यजमान श्रेष्ठ सुख फार दिले। स्तवितो पाउले प्रेमयुक्त।।२।। व्यवहार प्रभूशी करितो निरंतर। मायिक व्यापार रुचेना हो।।३।। लक्ष्मण म्हणे अनादी सोयरा। प्रभोसंग बरा करा वेगी।।४।।

११०२. आम्हा आप्त दिसे शिव सखा धनी। प्रभोचे चरणी सुख दिसे।।१।। मायावी हे आप्त दिसती सर्व हे। येथे गुंतणे हे नीट नोहे।।२।। मायेचा हा घाला मोह अनिवार। भ्रमलो मी फार संगतीने।।३।। लक्ष्मण म्हणे अनंत जन्मांचा। सोयरा आमुचा महादेव।।४।।

११०३. आमुचे तू धन आप्त गोत्र तात। नाम सदोदित गाऊ आम्ही।।१।। नामामृत रस पितो वारंवार। तुमचा चाकर म्हणवितो।।२।। लोलंगता आम्ही न करू कोणाची। माउली दीनाची सत्य सत्य।।३।। पायाची रे आशा पायी स्थिरावलो। कर्म आचवलो झालो पार।।४।। लक्ष्मण म्हणे जगासी कारण। नाही हो ठेवून झालो वेडे।।५।।

११०४. लोलंगता आम्ही कासया करावी। आम्हा न्यून नाही सदा सुख।।१।। सुख ते हो फार बोलवेना वाचे। सद्गुरू मायेचे दास आम्ही।।२।। पाजियेला रस भेदिला तो अंगी। गुण लागवेगी गातो त्याचे।।३।। लोभ मोह चिंता गेली हो पळून। प्रभोचे चरण सेवितसो।।४।। लक्ष्मण म्हणे सद्गुरू दातार। करितो व्यापार सदा त्यासी।।५।।

११०५. कर्म नेणो धर्म नेणो सदाशिवा। सर्वस्वी रे देवा हीन आम्ही।।१।। जप नेणो तप नेणो आम्ही काही। लाज शिवाबाई तुजकडे।।२।। मंत्रहीन क्रियाहीन सर्वापरी। लाज त्रिपुरारी तुजकडे।।३।। पूजाविधी भक्ती लक्षण कळेना। आहे दैन्यवान सर्वापरी।।४।। लक्ष्मण केवळ पशुवत् प्राणी। लाज शूळपाणीकडे त्याची।।५।।

११०६. उदरभरणाची चिंता। आम्हा नसे उमाकांता।।१।। प्रभो पक्षियाजवळी। नसे संग्रह चंद्रमौळी।।२।। त्याते देतोसे आहार। तुझे नाम विश्वंभर।।३।। अजगरा पडल्या ठायी। तृप्त करिसी तू आई।।४।। ऐसी सत्ता तुझी थोर। आम्ही सर्वदा निर्घोर।।५।। लक्ष्मणा न्यून नाही। शंभो सखा तू अक्षयी।।६।।

११०७. शिव हर हर मुखी हा उच्चार। आवडे व्यवहार हाचि आम्हा।।१।। प्रभुपाय हेचि आमुचे हे धन। धन्य ते जीवन आमुचे हो।।२।। धनलोभी आम्ही न विसरू धना। स्वानंदजीवना विश्वनाथा।।३।। लक्ष्मण म्हणे अक्षयी हे धन। बाह्यसुख हीन मिथ्यामय।।४।।

११०८. आम्ही हीन दीन प्राणी। पूजा आणावी कोठूनि।।१।। द्रव्यपदार्थचि नाही। काही एक शक्ती नाही।।२।। दरिद्रपणाचे पूजन। शिवा घ्या हो मानून।।३।। शुद्ध अंतःकरण हे रे। तुज अभिषेक बा रे।।४।। शुद्ध बुद्धी ही विभूती। तुम्हा पावो पशुपती।।५।। चित्तचंदन शिवा रे। समर्पिले तूते बा रे।।६।। शुद्ध भाव या अक्षता। तुज पावो उमाकांता।।७।। त्रिगुणपत्री उमाधवा। तुज पावो महादेवा।।८।। मनपुष्प तुजला रे। ताता तुज हे शोभे रे।।९।। धूप अहंकार क्रूर। जळो तुज रे समोर।।१०।। नाना सुगंध परिमळ। आशा अर्पिली निर्मळ।।११।। तृष्णादीप हो लाविला। मनशा नैवेद्य अर्पिला।।१२।। स्वानंद तांबूल दक्षिणा। तुज पावो पंचानना।।१३।। पंचप्राणाची आरती।

षड्रिपूचिया वाती।।१४।। सोहम् ज्योती प्रकाशे थोर। ओवाळिला विश्वंभर।।१५।। कल्पना ही पुष्पांजुळी। ताता तुज समर्पिली।।१६।। मीतूपणाते गाळून। तुझे धरिले चरण।।१७।। नवविधा भक्तिखाणी। समर्पिली तुझे चरणी।।१८।। लक्ष्मणाची ही सेवा। अक्षयी घ्यावी महादेवा।।१९।।

११०९. थोराची चाकरी करितो सर्वदा। दुजा कामधंदा आवडेना।।१।। न मागता देतो मुशारा चुकवून। कोठे काही न्यून पडेना हो।।२।। आता दुजियाची कैसी या चाकरी। करू त्रिपुरारी स्वामी माझा।।३।। स्वानंदमुशारा पावलो भरून। प्रभो पंचानन सखा केला।।४।। लक्ष्मण म्हणे ऐसा यजमान। दुजा असे कोण दाखवा हो।।५।।

१११०. कर्मे नाना केली भ्रम हा मिटेना। प्रभो पंचानना निरंतरा।।१।। भ्रमरूप सर्व दिसे हा पसारा। देवा गंगाधरा सर्वज्ञा रे।।२।। तुझिये भजनी सुख दिसे फार। होतसे संहार कल्पनेचा।।३।। कल्पना ती मरे मग सुख दिसे। पद अविनाश देशी देवा।।४।। लक्ष्मण म्हणे नाम श्रेष्ठ सर्वा। नाम महादेवा मंगल रे।।५।।

११११. दशभुज पंचवदन रूपडे रे। ध्यान हे आवडे आम्हासी ते।।१।। कोटी भानू ज्याचे स्वरूपी लोपले। स्वरूप फाकले तिही लोकी।।२।। वेद ज्याचे मुखी झाले हो उत्पन्न। सर्वांचे जीवन नित्यमुक्त।।३।। सनकादिक ज्याचे स्वरूपी निवांत। ब्रह्मांडे अनंत लीला ज्याची।।४।। आम्ही त्याचे दीन द्वारीचे हो श्वान। दारी हो पडून आहो सदा।।५।। लक्ष्मण म्हणे त्याते प्रिय भक्त। सर्वदा निवांत भक्तापाशी।।६।।

१११२. आम्हा आवडे तो भस्मधारी शिव। देवाधिदेव विश्वपूज्य।।१।। ज्याचे सत्ते सर्व वर्तती गीर्वाण। अनंत लोचन शुद्ध बुद्ध।।२।। पाचपंचविसांवेगळा तो पूर्ण। सगुण निर्गुण लीला ज्याची।।३।। सगुण निर्गुण आपणचि सर्व। प्रभोचे वैभव अकथ्य हो।।४।। लक्ष्मण म्हणे मीतूते गाळून। स्तवावे चरण परेशाचे।।५।।

१११३. त्रिपुर मर्दिला अनिवार क्रूर। देवा उपकार केला ज्याने।।१।। हरी विरंची हो ज्याचे आज्ञाधार। ध्यातो तो शंकर तोचि आम्ही।।२।। अनंत ब्रह्मांडे क्षणी घडी मोडी। भक्ताची आवडी अती ज्याला।।३।। त्याते

आम्ही ध्यातो मीपण गाळून। स्वानंदे कीर्तन करितो हो।।४।। लक्ष्मण म्हणे शिव पुरातन। भक्ताचे वचन सत्य करी।।५।।

१११४. आमुचे कुळीचे दैवत शंकर। अनादि ईश्वर शिव पूज्य।।१।। कुळस्वामी आमुचा निःसंग दयाळू। अती हो स्नेहाळू वर्णवेना।।२।। जाती कूळ गोत्र न पाहे तो तात। आपणाऐसे भक्त करी तो स्तवा।।३।। पूजाविधी आम्हापाशी नाही काही। मन प्रभोपायी ठेविले हो।।४।। लक्ष्मण म्हणे कुळीचा उद्धार। करितो शंकर भोळा नाथ।।५।।

१११५. कुळस्वामी आमुचा भोळा तो उदार। पत्रपुष्पहारे संतुष्टे रे।।१।। भोळी भक्ती आमुची भोळा आमुचा देव। सांब सदाशिव नाम साजे।।२।। कुळस्वामी आम्हा पावला दयाळ। गेली तळमळ कृपे त्याच्या।।३।। प्रभोकृपेचा हो महिमा अद्भुत। केला हो निःपात प्रपंचाचा।।४।। आमुच्या नवसा पावला शंकर। मीतूपणा दूर केला ताते।।५।। लक्ष्मण म्हणे त्याते श्रेष्ठ ध्याती। भक्ताची मनोवृत्ती तृप्त करी।।६।।

१११६. कुळस्वामी आमुचा पुराणपुरुष। अनादी महेश निजरूप।।१।। देह सर्वत्र हे ज्याचे अंगभूत। शिव जो विराट पुरुष तात।।२।। सप्त पाताळी चरण प्रभूचे। एकवीस स्वर्गाचे वरी मुकुट।।३।। समुद्र कक्षेत सरिता ह्या नाडी। ब्रह्मांडाच्या कोडी ज्याचे रोमी।।४।। सर्वत्र पसारा मायेचा हा सारा। निवांत ईश्वरा चळ नाही।।५।। लक्ष्मण म्हणे सर्वाठायी तूचि। साउली विश्वाची विश्वरूप।।६।।

१११७. कुळस्वामी आमुचा सर्वदा संतुष्ट। भक्ताचे तो इष्ट इच्छीतसे।।१।। त्याते पूजिलिया सर्व देव तृप्त। देव अंगभूत प्रभोच्या हो।।२।। वृक्षावरी जैशा फांद्या पत्र पुष्प। तेवी विश्व सर्व आपणचि।।३।। मूळबीज शिव वृक्षाचे आपण। मुळाते जीवन घालावे हो।।४।। मुळाते घालिता वृक्षाप्रती पावे। ऐसे गुरुदेवे सुचविले।।५।। लक्ष्मण म्हणे मुळाते धरून। बैसलोसे दीन दास त्याचा।।६।।

१११८. कुळस्वामी आमुच्या नवसा पावला। मनोरथ केला पूर्ण ताते।।१।। वासना नाशिली वंश बुडविला। सौख्य आम्हाला फार झाले।।२।। वेडेपिसे आम्ही होऊनि राहिलो। सर्व आचवलो स्वामिकृपे।।३।। लागली बायांनो

तेव्हा लाज गेली। लाधली लाधली गुरुकृपा।।४।। पिसे आम्ही मस्त सर्वदा उन्मत्त। स्वामी उमाकांत सखा आमुचा।।५।। एकाएकी ताते बत्ती हो लाविली। मुळी हो खुडिली प्रपंचाची।।६।। लक्ष्मण म्हणे आम्हा लाभ झाला। सखा तो भेटला भावाऐसा।।७।।

१११९. निष्कलंक तू हर। निजभक्ताचे माहेर।।१।। सकळ सुखाचे तू मूळ। महाराजा जाश्वनीळ।।२।। सर्वाआद्य तू जुनाट। महाराज नीळकंठ।।३।। सकळ विश्वाते विसावा। तूचि देशी उमाधवा।। ४।। तुझे सत्ते सर्वत्र हे। दृश्य ब्रह्मांड झाले हे।।५।। लक्ष्मणाचे तू धन। महाराज त्रिनयन।।६।।

११२०. शंभो स्वानंदजीवना। जीवविशी विश्वाते।।१।। योगियाचे निजधन। सुखदाता निजरूप।।२।। तुझे कर्तृत्व न कळे। परमधाम तू श्रेष्ठ।।३।। माझे मनोरथ पुरविसी। वेगी येई तातडी।।४।। चरणकमली मज ठेवावे। अक्षयी क्षयरहित।।५।। लक्ष्मणा त्राता तूचि। आप्त धन सखा तू।।६।।

११२१. शंभो यजमान केला। ताप त्रिविध निमाला।।१।। झाला सुकाळ सुखाचा। स्वाद आम्हा स्वानंदाचा।।२।। आशा ममता तृष्णा मन। केले प्रभोते अर्पण।।३।। काय कोणासी कारण। सखा आमुचा पंचानन।।४।। सुख स्वानंद हे सार। येर मायिक व्यापार।।५।। लक्ष्मणा शिव धनी। परमपुरुष शूळपाणि।।६।।

११२२. अहो स्वानंदसुखाचे। भोक्ते प्राज्ञ शुद्ध साचे।।१।। ज्याची वृत्ती समाधान। तोचि त्रैलोक्यी प्रवीण।।२।। येर शब्दज्ञानी फार। त्याहा न कळे विचार।।३।। विषयी रत झाले प्राणी। सुख नसे त्याहा स्वप्नी।।४।। राज्यवैभव संपत्ती। खोटे सर्व मिथ्या भ्रांती।।५।। लक्ष्मणा हे रुचेना। मायामय शीण हा जाणा।।६।।

११२३. आम्हा हे रुचेना मिथ्या गाथागोवी। सुख येथे नाही नाही जाण।।१।। खाता बचनाग मिष्ट फार लागे। परि मरण मागे त्याच्या आहे।।२।। तेवी विषयभोग परिच्छिन्न नाना। नाना या यातना भोगवी हो।।३।। म्हणूनि गुरुकृपे फिरलो मूळधामी। वास आत्मारामी केला बा हो।।४।। स्वानंदसुखाची तृप्ती ती अवीट। ब्रह्मानंदपेठ वसविली।।५।। लक्ष्मण म्हणे सद्गुरुमायचे। वैभव ते साचे भोगीतसो।।६।।

११२४. स्वानंद त्या पेठी घातले दुकान। शंभो साहू पूर्ण आम्हापाशी।।१।। सोऽहंभावे सदा व्यापार चालला। खंड व्यवहाराला नोहे नोहे।।२।। षड्वैरी रिपू विकिला पसारा। अविद्येचा थारा मोडिला हो।।३।। अक्षयी नामावळी खरेदी ती थोर। शिव शिव सार चालिला हो।।४।। लक्ष्मण म्हणे येणे जाणे नाही। वास प्रभोपायी व्यवहार हा।।५।।

११२५. अहो कीर्ती अपकीर्ती। ही तव प्रारब्धाची गती।।१।। खेद त्याचा तो हो काय। प्रेमयुक्त स्मरू पाय।।२।। अविनाश सुख पायी। तेचि घेऊ हो अक्षयी।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। सर्वाठायी महादेव।।४।।

११२६. देवावरी बोल काही। दिल्याविण प्राप्त नाही।।१।। पेरिली ती अर्की फळे। अमृतफळ केवी मिळे।।२।। पेरिल्याविण उगवेना। दिल्याविण रे मिळेना।।३।। देवाप्रती काय म्हणसी। विचारी आपुले कर्मासी।।४।। लक्ष्मण म्हणे देवराया। केले भोग भोगू स्वामिराया।।५।।

११२७. उठूनिया प्रातःकाळी। प्रेमे स्मरू चंद्रमौळी।।१।। स्मरणे सुख होय फार। मिथ्याभूत हा संसार।।२।। शिव वदू सदोदित। भवरोगा होई अंत।।३।। लक्ष्मणी शुद्ध भाव। भावापाशी वसे देव।।४।।

११२८. चाकरी थोराची धरिली। दरिद्रव्यथा माझी गेली।।१।। काही न्यून हो दिसेना। सुखरूप झालो जाणा।।२।। हाती नामाची फिरंग। दया ढाल ती अभंग।।३।। चहू किल्ले यमपुरी। सखा केला तो त्रिपुरारी।।४।। जबरदस्त नाथ आमुचा। नाथ आहे त्रैलोक्याचा।।५।। लक्ष्मणाचा दातार। दीनानाथ गिरिजावर।।६।।

११२९. थोराचे चाकर आम्ही म्हणवितो। आता काय भितो तुम्हाप्रती।।१।। समर्थाचा शिक्का शोभे माथ्यावरी। तुमचा विचार खुंटला हो।।२।। यजमान श्रेष्ठ मज प्राप्त झाला। भवदरिद्राला पळविले।।३।। फार सुख झाले फार सुख झाले। सिद्धांनी रे केले समाधान।।४।। सुखाचा काय हो विचार। प्रभो आमुचा थोर सुख थोर।।५।। हे सुख आम्हा आवडेना। गोष्ट ही आवडेना मायिक हो।।६।। प्रभोने हो मन नेले हो हिरून। अगम्य करणी त्याहाची हो।।७।। धन्य प्रभोराव धन्य प्रभोराव। अघटित माव याची जाणा।।८।। लक्ष्मण दीन लोळे चरणावरी। त्याचा साह्यकारी प्रभोराव।।९।।

१९३०. निंदक ते मानू सखे। आमुचे ते पाठीराखे।।१।। वस्त्र धुती मोलेविण। आम्ही वंदू ते चरण।।२।। मानू श्रेष्ठ उपकार। प्रेमे स्तवू गंगाधर।।३।। लक्ष्मणी खेद नसे। अक्षयी सखा तो महेश।।४।।

११३१. अहो विश्वनाथ सखा। तोचि आमुचा पाठीराखा।।१।। असंख्य नामांची लाखोळी। ब्रह्मलिंगा समर्पिली।।२।। नाम गाऊ नाम ध्याऊ। नाम विश्वनाथा वाहू।।३।। निशिदिनी हाच छंद। प्रेमे पूजितो स्वानंद।।४।। लक्ष्मण प्रभोद्वारी। प्रभोकृपे सेवा करी।।५।।

११३२. एक शिवनाम सार। ध्याऊ पिऊ निरंतर।।१।। अनेक पदार्थ पाहू। प्रेमे विश्वनाथा गाऊ।।२।। अनेक रुचेना रुचेना। गेलो शरण निरंजना।।३।। लक्ष्मणी तो आनंद। जेथे नाही भेदाभेद।।४।।

११३३. धनलोभी द्रव्यापाशी। गुंते जैसा अहर्निशी।।१।। तैसे नाम आम्ही गाऊ। प्रेमे शंभोलागी ध्याऊ।।२।। विषय रुचेना रुचेना। जाऊ शरण पंचानना।।३।। लक्ष्मण म्हणे बाई। चला राहू प्रभोपायी।।४।।

११३४. जारीण जाराचिये कंठी। अति प्रेमे घाली मिठी।।१।। तैसे नाम गाऊ ध्याऊ। नाम शंकराते वाहू।।२।। विषया विटून विटून। प्रेमे करितो भजन।।३।। लक्ष्मणा तोचि छंद। नामस्मरणे ब्रह्मानंद।।४।।

११३५. बाळक मातेचिये स्तनी। प्रेमे लागे कडकडूनि।।१।। तैसे शिवनाम घेऊ। प्रेमे नाम ते माये पिऊ।।२।। त्वरा करा त्वरा करा। विषया विटा या अघोरा।।३।। लक्ष्मण म्हणे थोर। लाभ होय निरंतर।।४।।

११३६. धेनू व्याली वत्सा चाटी। अती प्रेमा तिचा पोटी।।१।। तैसे नाम प्रेमे घेऊ। अती प्रेमे नाम ध्याऊ।।२।। संग सांडिला हा खोटा। दुःखरूप तो हा मोठा।।३।। लक्ष्मण करी भजन। शिवकृपे रात्रंदिन।।४।।

११३७. पतिव्रतेचे ते मन। पतिपायी रात्रंदिन।।१।। तैसे नाम घेऊ सदा। प्रेम ध्याऊ ब्रह्मानंदा।।२।। बाह्य सुख मिथ्या दिसे। सत्य प्रभो तो महेश।।३।। त्याचे नाम हो कल्पांत-। वरी श्रेष्ठ हे साधन।।४।। लक्ष्मण म्हणे बाई। सुख दिसे ते अक्षयी।।५।।

११३८. गुळा झोंबे तो माकोडा। तैसे ध्याऊ चंद्रचूडा।।१।। नाम गाऊ अती प्रेमे। भजन करू नित्यनेमे।।२।। प्रपंच अनित्य अनित्य। खोटे खोटे

मायाकृत्य।।३।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा भेटू त्या शंकरा।।४।।

११३९. भरला स्वानंदाचा गाव। तेथे वसे तो महादेव।।१।। भक्त ध्याती त्या शंकरा। चुकविल्या येरझारा।।२।। त्या सुखाची हो चवी। प्राज्ञ घेती स्वानुभवी।।३।। ब्रह्मरस तो सेविला। अक्षयी ब्रह्मानंद झाला।।४।। गुरुकृपे लक्ष्मण। उच्छिष्ट सेवी हो भक्तीने।।५।।

११४०. देव सखा हो आमुचा। तोचि त्राता हो दीनांचा।।१।। सकल दोषांते वारून। करवीतसे भजन।।२।। त्याला भजनाची आवडी। नाम वदवी तो तातडी।।३।। लक्ष्मण म्हणे देव। खरा आप्त तो उमाधव।।४।।

११४१. शिव माझा यजमान। परमात्मा पूर्णघन।।१।। आम्ही प्रभूचे चाकर। त्यासी देतो करभार।।२।। त्रिभुवनपती सखा केला। बाह्य धंदा नावडे मजला।।३।। नित्य प्रभूचे दर्शन घेतो। आवडीने त्याते गातो।।४।। चूक झाली गे साजणी। सांगवेना गे वदनी।।५।। लक्ष्मण झाला नि:संग। प्रीतीने केला प्रभोसंग।।६।।

११४२. भाग्यवंत देवराव। त्रैलोक्याचा स्वामिराव।।१।। तोचि सखा आम्ही करू। विश्वी भरला तो गुरू।।२।। जड मूढ स्वामी उद्धरी। फार दयाळू दैत्यारी।।३।। शंभोराया कृपा करा। लक्ष्मणा दीना उद्धरा।।४।।

११४३. आम्ही चाकर शंभोचे। हाती भाले शिवनामाचे।।१।। मनतुरंग अनिवार। शिवकृपे झालो स्वार।।२।। घोडा नाचे चहू फेरी। शिक्का धन्याचा तो शिरी।।३।। आम्ही मस्त झालो फार। धनी आमुचा शिरजोर।।४।। काळाचे हो भय नाही। शंभो सखा तो अक्षयी।।५।। लक्ष्मण दीन तुमचा। दास असे हो साधूंचा।।६।।

११४४. निष्कामाचा संग केला। काम माझा हरपला।।१।। मन होते अनिवार। त्याने केले त्याला स्थिर।।२।। सहा बैसले दबून। धाक प्रभोचा दारुण।।३।। आशातृष्णादी अनेक। याही न करिती हो रोक।।४।। परिवार गे हटला। निवांत केले गे मजला।।५।। लक्ष्मणाचा दातार। सुख देतसे शंकर।।६।।

११४५. शिव माझे कुलदैवत। शिव माझे गणगोत।।१।। शिव माझा रे सोयरा। शिवा या हो दातारा।।२।। तुझे पायी लक्ष देवा। असो माझे

महादेवा।।३।। लक्ष्मणा भेटी द्या हो। पाय वेगी दाखवा हो।।४।।

शिवजीवैक्य

११४६. मना लागलीसे गोडी। प्रभोचरण ना सोडी।।१।। जैसे लोभीयाचे चित्त। धनापाशी सदोदित।।२।। अति विषयी जारीण। करी तरुणा आलिंगन।।३।। दीपपतंगाचे परी। मन गेले निजघरी।।४।। लक्ष्मण नाही उरला। ब्रह्मानंदे हो निमाला।।५।।

११४७. बाह्यदृष्टीने विसर। बाह्य दृष्टीने संसार।।१।। अंतर्दृष्टीने पाहता। एकाएकी उरे ज्ञाता।।२।। शेखी एकपण नुरे। उघडे चिन्मात्र सत्य रे।।३।। लक्ष्मण वस्तुगत। जलबिंदू त्या सिंधूत।।४।।

११४८. नवल झाले ऐक वेडे। मन गेले मुळाकडे।।१।। कर्मठा गे परि बाई। नाचत होते गे अक्षयी।।२।। भृंग सोडिना कमळाला। तैसी परी झाली मला।।३।। निजानंदी वेडावले। स्वरूप चिन्मात्र संचले।।४।। बाई सुख बोलवेना। अंतर्दृष्टीच्या या खुणा।।५।। लक्ष्मण म्हणे कृपा। होता मार्ग असे सोपा।।६।।

११४९. मन ठेले प्रभोपायी। अहंभाव उरी नाही।।१।। झाला सुखाचा सुकाळ। निरसिली तळमळ।।२।। सुख बोलवेना वाचे। तरंग उठती स्वानंदाचे।।३।। साखर मुक्याने गिळिली। तैसी परी माझी झाली।।४।। सुखप्रचीती गे मात्र। स्वाद जाणती सत्पात्र।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय प्रभोप्राप्ती।।६।।

११५०. शिवदर्शन झाले। सर्व सुख हाता आले।।१।। वाचा झाली हो लज्जित। स्तविता राहिलो निवांत।।२।। मन राहिले हो पायी। सुख शोभे ते अक्षयी।।३।। मिठी घातली चरणा। देहभाव गेला जाणा।।४।। लवण सागराचे परी। सखा जोडला मदनारी।।५।। अंतर्बाह्य अवघा शिव। परब्रह्म महादेव।।६।। लक्ष्मण म्हणे तात। भरलासे सदोदित।।७।।

११५१. सहस्र ते तोंड वर्णिता शिणले। वेद ते परतले चारी ते रे।।१।। उपनिषदे ती जहाली तटस्थ। मते ही बहुत झाली नाना।।२।। शास्त्रपुराणांची बोबडी वळली। तटस्थता आली त्याते तेही।।३।। कवीश्वरांप्रती तेचि गती झाली। योगी ते शिणले शोधिता रे।।४।। सागराचा ग्रास सरिता करू

म्हणती। परि त्या मुकती आपणासी।।५।। लवणाचा पुतळा सागराचा ग्रास। करूनि हव्यास गेला त्वरे।।६।। लक्ष्मण म्हणे विराला तो बा रे। तैसे सर्वत्रा रे झाले शिवा।।७।।

११५२. मन रातले शंकरी। मनचि झाले मदनारी।।१।। अंतर्बाह्य सदाशिव। मन झाले स्वयं शिव।।२।। जागृती स्वप्न सुषुप्तीत। तुर्येमध्ये तो सतत।।३।। उन्मनीमाजी वसे शिव। स्वयंप्रकाश निरवयव।।४।। जैसे प्रलयीचे नीर। तैसा स्वामी सबराभर।।५।। लक्ष्मण जळापरी। वास ब्रह्मानंदसागरी।।६।।

११५३. चित्त चैतन्यी रातले। चित्त चैतन्य हो झाले।।१।। परिवारा सुख झाले। फुंज स्वानंदाते आले।।२।। आनंदाने आनंदाचा। घोट भरला न बोलवे वाचा।।३।। परा परतली बाई। बोलावे ते कैसे काई।।४।। ब्रह्मानंद ब्रह्मानंद। अक्षयी अवघा आनंद।।५।। लक्ष्मणी तो भरला। मीतूभाव नाही उरला।।६।।

११५४. शीतउष्णातीत प्रकाशली ज्योत। ब्रह्मांडाचा नाथ सर्वाठायी।।१।। अनंत ब्रह्मांडे तोचि व्यापलासे। पुराणपुरुष नाम साजे।।२।। स्वयं ही धोंड दिसतसे एक। सर्वही मायिक म्हणणे हो।।३।। लक्ष्मण म्हणे दुजा हो दिसेना। प्रकाशला राणा सदोदित।।४।।

११५५. नामरूपातीत प्रकाशली ज्योत। ब्रह्मांडभरित देवराव।।१।। त्याचे सत्तेविण न चाले व्यापार। ब्रह्मा हरिहर त्याचे अंश।।२।। मायागुणापर स्वामी निर्विकार। योगी निरंतर रमती जेथे।।३।। लक्ष्मण म्हणे सद्गुरू पुरुष। नाम आदिपुरुष साजे त्याला।।४।।

११५६. शिवस्वरूप देखिले। पाहता पाहणे एक झाले।।१।। ध्याता ध्येय आणि ध्यान। गेले त्रिपुटी हे भान।।२।। ज्ञाता ज्ञेय आणि ज्ञान। अवघा स्वामी पंचानन।।३।। अनंत ब्रह्मांडे हा खेळ। खेळ खेळे स्वयं लीले।।४।। लक्ष्मणी तोचि भरला। तोचि अवघा हो शोभला।।५।।

११५७. गुरुकृपा फळली माये। तेणे मन निरामय।।१।। निजानंदी केली वसती। अंतर्बाह्य पशुपती।।२।। दृश्य भूस हे उडाले। स्वरूप अविनाश संचले।।३।। अवघा बंबाळा बंबाळा। व्यक्तिरहित संचला।।४।। लक्ष्मण नाही उरला। पार नाही त्या सुखाला।।५।।

११५८. परा पश्यंती मध्यमा। चौथी वाचा वैखरी।।१।। वेदशास्त्रेपुराणादी। चहु वाचेच्या पोटी।।२।। वाच्यांश मायागुण। लक्ष्यांश तू परमात्मा।।३।। पाहता पाहणे तेही नुरे। जाणिवेचे हे अंग।।४।। वासनेचा ग्रास करिती। अक्षयी चरणी ते वसती।।५।। लक्ष्मण म्हणे शंभो। अवघा तूचि तू दिससी।।६।।

११५९. चित्त चैतन्यी रिघाले। अवघे चैतन्यचि झाले।।१।। अंतर्बाह्य चिन्मय रूप। शिव सत्य सुखरूप।।२।। अहो जिकडे पाहावे। पदार्थ भरल्या त्या देवे।।३।। सुवर्णाचे अलंकार। तेवी विश्व हे अवडंबर।।४।। स्वयं धोंड स्वयं धोंड। जड मूढ कैचे त्याते तोंड।।५।। लक्ष्मणी तो प्रकाश। एकाएकी तो अविनाश।।६।।

११६०. चित्त चैतन्य झाले। तेणे मीतूपण गेले।।१।। वायू जेवी गगनात। तेवी चित्त चैतन्यात।।२।। समुद्री तरंग हो जीवी। तेवी मन वस्तुठायी।।३।। बीजी वट तो उत्पन्न। तेवी ब्रह्मी मायागुण।।४।। गुरुकृपे मनोवृत्ती। विरली तेणे सौख्यप्राप्ती।।५।। लक्ष्मण उरला नाही। अवघा त्रिभुवनगोसावी।।६।।

११६१. अंगी दाटला हो प्रेमा। मन गेले निजधामा।।१।। वाणी गाई शिवनाम। सुखरूप इंद्रियग्राम।।२।। झाली शिवानंदी वसती। अंतर्बाह्य पशुपती।।३।। त्रिपुटीरहित भजन। जेथे नाही मीतूपण।।४।। लक्ष्मण म्हणे जीव। तोचि झाला सदाशिव।।५।।

अद्वैत

११६२. श्वान खंडेराव सुवर्णाचे केले। नाम भिन्न झाले अलंकारी।।१।। पाहता त्या मूर्ती दोन हो दिसती। परि सोन्याप्रती भेद नसे।।२।। तेवी हे हो विश्व दिसे भिन्नाभिन्न। आत्मा तो चैतन्य एक आहे।।३।। सागरा तरंगा भेदचि हो नाही। ब्रह्मी भेद काई जग ब्रह्म।।४।। लक्ष्मण म्हणे विश्व ब्रह्मरूप। चिन्मात्रस्वरूप आदि अंती।।५।।

११६३. आत्मभ्रांतीचा हा अंध:कार मोठा। मन दाही वाटा फिरे देशी।।१।। निबिड अंधार नेत्रांते न दिसे। लागलेसे पिसे प्रपंचाचे।।२।। ज्ञानसूर्य जेव्हा प्रकाश जहाला। भ्रांतितम गेला सहज तो।।३।। मन बुद्धी चित्त अहंकार जाण। जाती हे लोपून अधिष्ठानी।।४।। अंत:करण शुद्ध तेही लय होय। ब्रह्म निरामय चिन्मात्र ते।।५।। लक्ष्मण म्हणे सर्वही गलबला। स्वरूपी निमाला

ब्रह्म सत्य।।६।।

११६४. ब्रह्म निरामय ब्रह्म निराभास। ब्रह्म आसपास सर्वाठायी।।१।। ब्रह्म वारिता कदाही वारेना। ब्रह्मी रे दिसेना मायापाश।।२।। ब्रह्म हे सारिता कदाही सरेना। अविनाश जाणा ब्रह्म एक।।३।। ब्रह्म हे अनादी ब्रह्म निरुपम। आहे रे आराम निरुपाधी।।४।। लक्ष्मण दीन गुरुकृपे पाही। त्याविण रिते नाही काही एक।।५।।

११६५. ब्रह्मी हेतू हाचि मायेचा आकार। गुणतत्त्व पसर झाला जाणा।।१।। अनंत ब्रह्मांडे मायेची रचना। अनेक हे नानाविध सर्व।।२।। ब्रह्मा विष्णू रुद्र मायेचे अवतार। चालवी व्यापार परब्रह्म।।३।। सर्वा चेष्टवूनि प्रभू रे वेगळा। त्याची रे बा कळा नकळे कवणा।।४।। लक्ष्मण म्हणे तोचि आदि अंती। अचळ ती मूर्ती निरामय।।५।।

११६६. ब्रह्मी नाही मायाबंड। ब्रह्म सर्वदा अखंड।।१।। पुरुषाअंगी जैसी छाया। तेवी ब्रह्मी दिसे माया।।२।। जेवी सूर्यरश्मी जळ। सूर्यसत्ते काळवेळ।।३।। परि तो आहे हो निवांत। ब्रह्मी नाही आदि अंत।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते। नानापरी स्तविती माते।।५।।

११६७. ब्रह्मी नाही मतवाद। ब्रह्म सर्वदा अभेद।।१।। भेदभाव हा मायेचा। झाला गलबला वादाचा।।२।। अनिर्वाच्य वस्तू आहे। भेदमते वश नोहे।।३।। मी तू जेव्हा मागे सरे। तेव्हा वर्म ते बाणे रे।।४।। लक्ष्मण म्हणे सम-। बुद्धी होता साधे वर्म।।५।।

११६८. शिवाप्पा हो शेटी दुकान मांडून। बैसला आपण सूत्रकार।।१।। त्रिगुण हे पाल उभारिले ताते। माझ्या कृपावंते दीनानाथे।।२।। चहुदेहांचे हो खुंट ते गाडिले। पुढे काय केले तेही ऐका।।३।। आशा मनशा तृष्णा दोरी ती कल्पना। दोर हे हो जाणा पालाप्रती।।४।। पाच पंचवीस तत्त्वे हा पसारा। दुकानी तो सारा साठविला।।५।। वाणी मोठा भोळा दुकानी असून। स्त्री देणे घेणे करीत असे।।६।। स्त्रियांचा पगडा दिसतो हो फार। करिती व्यवहार सर्व तिशी।।७।। मनाप्पा हो तिचा असे कामदार। नीच हे चाकर चौघेजण।।८।। ऐका कामदार आणि सहाजण। दुकानी त्याहानी बंडपणा केला।।९।। बाईचा कारखाना बुडाले दुकान। एकला राहून काय करील।।१०।। जावो अथवा

राहो त्याते फिकीर नाही। दुकानी तो काही राहिना हो।।११।। लक्ष्मण म्हणे माया उभवी दुकान। वाणी तो निर्गुण वेगळाचि।।१२।।

११६९. परब्रह्म तू रे अविनाशरूप। आहेसी अविनाश सदोदित।।१।। मायागुणे करून सर्व हा आकार। मायेचिया पर अव्यक्त तू।।२।। उत्पत्ती पालन प्रभो हा संहार। मायेचा बाजार सर्व हे रे।।३।। सागरी तरंग होती जाती फार। तैसा हा आकार मायागुणे।।४।। मायेप्रती स्वत: नाही रे चलन। तुझा आश्रय जाण सर्वाप्रती।।५।। सर्व म्हणणे शिवा हेही रे मायिक। वस्तू तूचि एक मायाबापा।।६।। लक्ष्मण म्हणे तू एकाएक। मायेने अनेक दिसे भासे।।७।।

११७०. स्थूळ सूक्ष्म कारण। चौथा देह महाकारण।।१।। चारी शून्य चारी वाणी। चिन्मय वेगळे त्याहूनि।।२।। पीत श्वेत रक्त नीळ। सकळ रंगांते वेगळे।।३।। स्फटिक शिळेऐसे असे। सर्वही व्यक्तामाजी भासे।।४।। व्यक्तारहित तो लखलखाट। अवघा तोचि हो निखोट।।५।। अनंत भानू चंद्र ते रे। लोपती ते स्वरूपी रे।।६।। लक्ष्मण म्हणे बा रे। उलट मारूनि पाहा ते रे।।७।।

११७१. स्वरूप सर्वदा उघडे। कोणी न पाहे त्याकडे।।१।। दृश्य पदार्थी गुंतले। म्हणूनि स्वरूपा विसरले।।२।। फार सहवास दृश्याचा। सोस अवघा पाहण्याचा।।३।। पाहण्याऐसे काही नाही। रिता ठाव त्याविण काही।।४।। अवघा लखलखाट त्याचा। लोप तिथे त्रिगुणांचा।।५।। अनंत ब्रह्मांडे उभवी। मायास्वरूपी लोपे तीही।।६।। उलट दृष्टीची ही खूण। ब्रह्म अवघे परिपूर्ण।।७।। लक्ष्मण म्हणे ते रे। स्वानुभवेचि व्हावे रे।।८।।

११७२. ब्रह्मी नाही हा गोंधळ। त्रिपुटीतीत ते निर्मळ।।१।। पाच पंचवीस छत्तीस। बावन्न दहा हो चोवीस।।२।। शाह्यांशी भेद अनेक नाना। तत्त्वसंख्या करिती जाणा।।३।। अनंत ब्रह्मांडे पसारा। मायागुणाचा हा सारा।।४।। माया मृगजळापरी। ब्रह्म स्वच्छ ते अविकारी।।५।। जेवी सूर्याअंगी किरण। तेवी ब्रह्मी मायागुण।।६।। लक्ष्मण म्हणे ते रे। सदासर्वदा शोभे रे।।७।।

११७३. ब्रह्मी नाही भेदभाव। ब्रह्म शुद्ध स्वयमेव।।१।। भेदभाव हा मायेचा। ठसा ओतिला दृश्याचा।।२।। व्यक्ती अनेक गोंधळ। मायागुणाचा

हा खेळ।।३।। खेळ हाही लटका सर्व। प्राज्ञ जाणती स्वानुभव।।४।। स्वानुभव भासवी रे। जीवदशा काही नुरे।।५।। लक्ष्मण म्हणे भेद। नाही अवघा ब्रह्मानंद।।६।।

११७४. वस्तू मागे मोहरे दाट। अंतर्बाह्य हो निघोट।।१।। दृश्य पडदा आडवा। मायामोहाचा हा गोवा।।२।। मी तू आधार घनदाट। जीवामध्ये भरला स्पष्ट।।३।। पाहातसे चहूकडे। दृष्टी नाही म्हणूनि रडे।।४।। ज्ञानसूर्य प्रकाशता। मग कैची दृश्यवार्ता।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। वस्तू स्वयेचि आहे रे।।६।।

११७५. वस्तू दूरदेशी नाही। सदासर्वदा अक्षयी।।१।। जो जो पदार्थ पाहाल। पाहणे तितके आहे फोल।।२।। फोल भास अवघा हाही। भासातीत वस्तू पाही।।३।। पाहता पाहणे हरपे। स्वानुभवे हे हो सोपे।।४।। स्वानुभव हाही भाव। नुरे वस्तू स्वयमेव।।५।। लक्ष्मण म्हणे फिरून। पाहता वस्तूचि आपण।।६।।

११७६. आत पाणी बाहेर पाणी। जिकडे तिकडे दिसे पाणी।।१।। रानी वनी अवघे पाणी। खाली वरी पाणीच पाणी।।२।। जे जे पाहू गेले पाणी। पाहता लय झाले जीवनी।।३।। मन बुद्धी अंतःकरणी। दडली पाणी ते पाहूनि।।४।। चित्त अहंकार दोन्ही। तेही भरले अंतःकरणी।।५।। अंतःकरणी भरले पाणी। तेही विरले झाले पाणी।।६।। लक्ष्मणी उरी नाही। प्रलयांबूच अवघा तोही।।४।।

११७७. जाणीव नेणीव लाघव। हाही मायेचा हा भाव।।१।। दोही भागांपलीकडे। ब्रह्म सर्वदा उघडे।।२।। स्वरूपानंद आद्य असे। केवळ स्वयं प्रकाशे।।३।। अनंत भानू ते लोपले। ऐसे स्वरूप ते आगळे।।४।। अवघा प्रकाश बंबाळ। व्यक्तारहित निर्मळ।।५।। काहीच नुरता अनादी। शब्दातीत निजनिधी।।६।। ज्ञाना आद्य ज्ञप्तिमात्र। ब्रह्म अक्षयी स्वतंत्र।।७।। स्वानुभवे तेचि भावे। मना मुरडूनि पाहावे।।८।। लक्ष्मण म्हणे तेचि। होता मग उरी कैची।।९।।

११७८. जे जे नेत्राप्रती दिसे। ते ते स्वरूपी काही नसे।।१।। जे जे मनाते भासेल। तो तो मायेचा गोंधळ।।२।। अंतःकरण चित्तबुद्धी। हेही मायेचि

उपाधी।।३।। अंतःकरणापर वस्तू। चिन्मय सदा निवांतू।।४।। अंतःकरणपंचकाते। फिरवून पाहावे हो तीते।।५।। लक्ष्मण म्हणे मग। पाहता होतसे ते अंग।।६।।

११७९. आनंद आनंदाते घोटी। परेप्रती पडे मिठी।।१।। साखर मुक्याने भक्षिली। गोडी सांगता न ये बोली।।२।। तैसे स्वानंदसुख रे। ज्याचे त्यासीच शोभे रे।।३।। बोलता ते हे नये काही। सुख घेती स्वानुभवी।।४।। लक्ष्मण म्हणे ते रे। मी तू वारूनि घ्यावे रे।।५।।

११८०. अवघा उजाळा उजाळा। व्यक्तारहित बंबाळा।।१।। नादबिंदुकलातीत। शोभतसे सदोदित।।२।। अवघा तोचि तोचि तोचि। ढेप तेथे स्वानंदाची।।३।। योगी राहिले त्यामाजी। फिरूनि सुख घ्यावे ते जी।।४।। जैसा काष्ठी अग्नी तो रे। तैसे व्हावे आपण रे।।५।। लक्ष्मण पडला त्यात। झाला बंबाळ क्षणात।।६।।

११८१. चारी वाणी चारी खाणी। चौदा भुवनांची मांडणी।।१।। अहंकृती हो पासून। नानापरी झाले वर्ण।।२।। वेदादी हो पसारा। अहंपणाचा हो सारा।।३।। ॐकाराचे पोटी सर्व। देव दानव मानव।।४।। स्थूळ ब्रह्मांडे अनंत। होती जाती असंख्यात।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। स्वस्थ सदा स्वयमेव।।६।।

११८२. शिव करीना हो काही। स्वच्छ सर्वदा अक्षयी।।१।। सत्तामात्रेचि होतसे। सदासर्वदा अविनाश।।२।। म्हणती राये नगर केले। सर्वामाजी नाव झाले।।३।। हात नाही हो शिणले। सत्तामात्रे त्याच्या झाले।।४।। तैसे अनंत ब्रह्मांड। होती जाती ते अखंड।।५।। लक्ष्मण म्हणे माया। त्याच्या अंगीची हो छाया।।६।।

११८३. ब्रह्मी भेद काही नाही। परि ते आहे सर्वाठायी।।१।। नाना भास हे दिसती। मायागुणाचीही ख्याती।।२।। आत्मा गुणापरी दिसे। परि तो लिप्त तेथे नसे।।३।। बहू केसांचा गुंडाळा। वरी ठेविली स्फटिकशिळा।।४।। फुटली फुटली ऐसी भासे। परि ती काही फुटली नसे।।५।। लक्ष्मण म्हणे तेवी। परमात्मा तो सर्व देही।।६।।

११८४. ब्रह्मज्ञानी तोचि पुरा। कल्पनेचा नेणे वारा।।१।। निःशेष कल्पना

विराली। विधिनिषेध पळाली।।२।। आपपरभाव नाही। अवघा ब्रह्मानंद देही।।३।। देह प्रारब्धाधीन उरला। निजानंदे मुक्त झाला।।४।। जगासारखी रहाटी। ब्रह्मानंदे नोहे तुटी।।५।। लक्ष्मण म्हणे ते हो। समबुद्धी विजयी हो।।६।।

११८५. वस्तू वारिता वारेना। वस्तू सारिता सारेना।।१।। अंतर्बाह्य अवघी वस्तू। प्रकाश तोचि सदोदितू।।२।। नामरंगारूपातीतू। चिन्मय परमात्मा निवांतू।।३।। कल्पनेने ती दिसेना। कल्पना ही आड जाणा।।४।। गुरुकृपे फिरे मागे। वस्तुरूप व्हाल वेगे।।५।। लक्ष्मण म्हणे सार। घेती प्राज्ञ निरंतर।।६।।

११८६. अहो कल्पनेचा संग। मोठे जीवा लागले लंग।।१।। कल्पनेने नरकवास। कल्पना ही मायापाश।।२।। अजन्मा हा जन्मा आला। नाना अनर्थी पडला।।३।। लक्ष चौऱ्याऐंशी फेरे। घेत असे सर्वदा रे।।४।। नाना साधने करिता। अधिक वाढे ही हो कृत्या।।५।। लक्ष्मण म्हणे हिते। विरवावे उलट्या चित्ते।।६।।

११८७. स्वयं एकचि हो लाटा। व्यक्तातीत पाहा मोठा।।१।। चर्मदृष्टीने दिसेना। ज्ञानदृष्टीच्या या खुणा।।२।। अवघा प्रकाशचि बाई। पाहता पाहणे नुरे तेही।।३।। असंख्य ब्रह्मांडाच्या कोटी। होती जाती याच्या पोटी।।४।। परमात्मा तो अक्षयी। कर्तृत्वाचा हेतू नाही।।५।। लक्ष्मण म्हणे तो रे। अहंकृतीतीत बा रे।।६।।

११८८. अणुरेणूहून सान। स्थूळ तरी सर्वाहून।।१।। वटबीजन्याये तो रे। वृक्षापरी पसरे रे।।२।। भास सर्व हा मायेचा। उठला बंबाळ व्यक्ताचा।।३।। स्थूळ सूक्ष्म निवडेना। निश्चय कोणाही करवेना।।४।। परतल्या वेदश्रुती। नेति नेति हो म्हणती।।५।। जे जे पाहण्याप्रती गेले। सांगावया नाही फिरले।।६।। लक्ष्मण म्हणे लवण। जैसे सागरी जाय मिळून।।७।।

११८९. भास अवघा हा मायेचा। दृश्य पदार्थही हिचा।।१।। श्वेत पीत नील व्यक्ती। रक्तवर्णादी ज्योती।।२।। चारी देह चारी वाणी। सर्वही मायेची मांडणी।।३।। चक्रदळादी सारा। अवघा मायेचा पसारा।।४।। नामरूपातीत वस्तु। तीते नाही आदि अंतू।।५।। दृश्यातीत ब्रह्म बा रे। एक

अक्षयी वसे रे।।६।। लक्ष्मण म्हणे सत्ता-। रूप सर्वत्र ह्या वार्ता।।७।।

११९०. सोने सोनेपणा उणे। न येता झाले ते लेणे।।१।। तैसा न वेचूनि शिव। जगी दिसे स्वयमेव।।२।। सोने सोने सोने सोने। अलंकारी नामे भिन्ने।।३।। जैसे सागरी तरंग। परि सागराचे अंग।।४।। तैसा जगी जगदेश्वरी। दृश्य दिसे नानापरी।।५।। अहो भूमी होय एक। ग्रामे झाली हो अनेक।।६।। लक्ष्मण म्हणे बा रे। तोचि अवघा सर्वात्मा रे।।७।।

११९१. खंडेराव श्वान ते रे। केले सुवर्णाचे बा रे।।१।। सांभाळीत होता प्राणी। नित्य पूजी त्यालागूनि।।२।। काळ विषम हो आला। पुत्र व्यसनी निघाला।।३।। पुत्रे गमाविले वित्त। नेले श्वान विकले तेथ।।४।। दाम श्वानाचे ते आले। पुढे खंडेराव नेले।।५।। दाम तितुकेचि आले। भक्त सराफाते बोले।।६।। देव श्वान एका मोला। घेता कैसे हो भुलला।।७।। सराफ सुज्ञ होता म्हणे। आम्ही जाणतसो सोने।।८।। देव श्वान हे तुजला। सोने एक हे आम्हाला।।९।। लक्ष्मण म्हणे तैसे। साधू सराफा हो ऐसे।।१०।।

११९२. बाळ्याबुगड्या तानवड। कंठी कुडक्या नाना वेड।।१।। नाना माळा नाना हार। परि ते सोन्याचेचि खरे।।२।। वस्त्र नाना हो मोलाचे। परि ते एका कापुसाचे।।३।। सुगडे घागरी रांजण। परि ते मृत्तिकेपासून।।४।। तैसा ब्रह्मांड पसारा। अष्टधेचा पाहा सारा।।५।। लक्ष्मण म्हणे तो रे। सर्वामाजी एकला रे।।६।।

११९३. अहो सागरी लहरी। होती जाती नानापरी।।१।। सागराने नाही केले। वायूसंगे ते हो झाले।।२।। तैसे जग सर्वेश्वरी। दिसती नाना व्यक्तीहारी।।३।। मायागुणे हे हो होय। शेखी तेथे होय लय।।४।। तरंग वायूसंगे झाला। वायू सरता तरंग विराला।।५।। लक्ष्मण म्हणे तैसे। अहं सरता वस्तूचि असे।।६।।

११९४. घडे गाडगे रांजण। सुगडे परळ माथन।।१।। भूमीपासून ते झाले। परि ते तिने नाही केले।।२।। कुल्लाळाने ते घडविले। तेवी जग हे माये झाले।।३।। मायागुणाचा हा खेळ। सत्तामात्रे हो निखळ।।४।। सूर्यरश्मीपासून जळ। परि तो सूर्य हो निश्चळ।।५।। लक्ष्मण म्हणे सत्ता-। मात्रे सकळ ही वार्ता।।६।।

११९५. शत एक घट भरून। उदक ठेविले आणून।।१।। तितुक्या घटी वासरमणी। दिसे पाहावयालागूनि।।२।। त्यातील घट हो फुटला। सूर्य तेथील हरपला।।३।। आला नाही गेला नाही। परि तो दिसे जळाठायी।।४।। तैसा परमात्मा तो देही। असूनि लिप्त तेथे नाही।।५।। लक्ष्मण म्हणे तो रे। सर्वा आदी अंती बा रे।।६।।

११९६. सूर्यसत्ते तिन्ही काळ। नाना व्यापार सकळ।।१।। चाले पृथ्वीव्यापार । कर्म कर्मांतर फार।।२।। देशोदेशीचे नृपती। एकएकाते मारिती।।३।। सुष्ट दुष्ट सूर्यी नाही। सुखरूप आपुले ठायी।।४।। तैसा परमात्मा तो जाणा। नातळे तो कोण्या गुणा।।५।। लक्ष्मण म्हणे तो रे। द्वंद्वातीत अक्षयी रे।।६।।

११९७. अहो आकाश कोठे नाही। ऐसे स्थळचि हो नाही।।१।। सर्वा आवरण त्याचे। आवरण ते सर्वाचे।।२।। तैसी वस्तू घनदाट। केवळ निश्चळ निघोट।।३।। आकाश वस्तूच्या हो पोटी। पाहा वस्तूचि एकलाटी।।४।। आपण नुरोनि पाहावे। निजानंदी लीन व्हावे।।५।। लक्ष्मण म्हणे वस्तू। सकळ उपाधिरहितू।।६।।

११९८. शून्यापासूनि वायू रे। वायूपासूनि तेज रे।।१।। तेजापासूनि ते जळ। जळापासूनि भूमंडळ।।२।। ऐसी पंचभूते ही रे। ब्रह्मी होती जाती बा रे।।३।। त्रिगुण पंच मायादेवी। आपण वसे वस्तुठायी।।४।। वस्तू आधार सर्वासी। वस्तू पाहावी ती कैसी।।५।। लक्ष्मण म्हणे संग। सांडून व्हावे तेचि अंग।।६।।

११९९. नाकीचे ते मोती कानी गे घालून। करी लगबगीने काम बाई।।१।। एकाएकी मोती नाकी पाहे बाई। तव तेथे नाही आक्रंदे हो।।२।। म्हणे माझे मोती गेले गेले गेले। कपाळ फुटले झाले कैसे।।३।। शेजार सज्जन मिळाले बहुत। तेथे एक धूर्त आला प्राणी।।४।। तिचे कानी मोती पाहिले हो त्यांनी। दर्पण आणूनि दिला हाती।।५।। दर्पणी ते मुख पाहिले हो तिने। म्हणे मोती साजणी कानी की गे।।६।। तैसी निजवस्तू चुकली जवळी। भ्रांती ही पडली मायामोहे।।७।। लक्ष्मण म्हणे गुरुदेव तो रे। दाखवी वस्तू रे मोत्याऐसी।।८।।

१२००. नाना वर्ण गाई एकवर्ण दुग्ध। तैसा परमानंद सर्वाठायी।।१।।

अलंकार नाना सुवर्ण ते एक। तैसा तो त्र्यंबक सर्वांघटी।।२।। नाना झाले घट मृत्तिकेने एक। तैसा तो नायक सर्वांठायी।।३।। नाना पट झाले कापूस तो एक। ब्रह्मांडपालक तैसा जाणा।।४।। वापी ते हो कूप तटाके अनेक। परी जळ एक तैसा स्वामी।।५।। लक्ष्मण म्हणे एक माझा देव। शिव कृपाळुव पूर्णानंद।।६।।

१२०१. स्त्री पुरुष नाही नपुंसक तो रे। नामरूप ते रे तेथे नाही।।१।। परि त्या वेगळे रिते नसे काही। दिसे तो अक्षयी सदोदित।।२।। दिसतो म्हणाल तीही ऐका खूण। उलट्या दृष्टीविण न दिसे तो।।३।। नयनी नयन दृष्टीमाजी दृष्टी। उलटी हातोटी गुरुकृपे।।४।। लक्ष्मण म्हणे संग हा सरता। उघडा हो ज्ञाता सर्वकाळ।।५।।

१२०२. साखरेची गोडी पाखडिता नये। सांगता ही सोय सापडेना।।१।। मोतियाचे पाणी भरता न ये रांजणी। गगनाते गवसणी घालिता नये।।२।। सूर्याअंगी तेज करिता नये वेगळे। सुगंध कर्पुराते कैसा वेगळा होय।।३।। वाद्यावेगळा नाद नादावेगळे वाद्य। तैसा पूर्णानंद सर्वांठायी।।४।। लक्ष्मण म्हणे मायागुणे भासून। लिप्त कोठे दिसेना अगाध करणी।।५।।

१२०३. चुंबकसत्तेने लोखंडा चलन। तेवी मायागुण ब्रह्मी जाण।।१।। करवी ना तो करी परि चाले व्यापार। प्रभोसत्ता थोर अगाध हो।।२।। मायेप्रती नाही स्वतंत्रता जाणा। चुंबकन्याये नाना क्रीडतसे।।३।। ब्रह्मांडाच्या कोटी अनंत अपार। होती जाती तो रे जैसा तैसा।।४।। लक्ष्मण म्हणे निजधाम सर्वांचे। देवदानवाचे मूळ ते हो।।५।।

१२०४. चंद्राचेनि योगे सिंधूते भरते। चंद्राने हो तेथे काय केले।।१।। दो लक्ष योजनावरी तो वसे रे। समुद्रा भरते त्याचे अंगे।।२।। तैसा अवडंबर मायेचा पसारा। सत्ते त्याच्या सारा चालतसे।।३।। परमात्मा तो बा रे अक्षयी निवांत। तेथे हा संकेत नाही काही।।४।। लक्ष्मण म्हणे योगी त्याते ध्याती। तोचि सर्वांभूती वसे पाहा।।५।।

१२०५. सार्वभौम राजा सेना ती पुष्कळ। सत्ते परदळ घेती शूर।।१।। जिंकिले परदेश मारिले हो फार। रायाचे ते कर काय शिणले।।२।। सत्ता त्याची थोर चाले सृष्टीभर। परि तो असे स्थिर स्वस्थानी हो।।३।। तैसे

मायागुणे व्यवहार हे होती। परि ब्रह्माप्रती चळ नाही।।४।। लक्ष्मण म्हणे त्यातेचि स्मरावे। मीपण वारावे पडळ हे।।५।।

१२०६. देवभक्तभाव राहे हो सहज। उन्मनीचे बीज प्रकाशता।।१।। तेथे संसारा कैची हो उरी। निजाची लहरी प्रकाशता।।२।। चैतन्याची मूस अवघी भरीव। जाणीव नेणीव नुरे नुरे।।३।। स्वयं उजाळा अवघा लखलखाट। शून्याचा शेवट ब्रह्मसुख।।४।। लक्ष्मण म्हणे त्या सुखाची चवी। घेती स्वानुभवी उन्मने हो।।५।।

१२०७. सकळ श्रुतीही बोलती। नाना शास्त्रांच्या या युक्ती।।१।। केला शक्ती अंगीकार। तो हा मायावी ईश्वर।।२।। सर्वज्ञ आणि सर्वेश्वर। बोलणे हे जेथवर।।३।। तेथवरी माया आहे। शब्द दृश्य मायेचे हे।।४।। शब्द पाहाणे हरपले। अवघे अदृश्य संचले।।५।। लक्ष्मण म्हणे ते रे। उघडे उघडे परतल्या रे।।६।।

१२०८. ब्रह्मांड हिरण्यगर्भ माया। वेगळा तो देहत्रया।।१।। मूळमायेचिया पर। सकळ चक्रातीत पूर।।२।। ब्रह्मा विष्णु रुद्र बा रे। मायेचे ते निजधाम रे।।३।। ऐसी परात्पर निजवस्तू। वेदासिद्धांचा एकांतू।।४।। तीच सर्वापाशी असे। तीते नेणूनि झाले पिसे।।५।। लक्ष्मण म्हणे हीन। दुःख भोगिती दारुण।।६।।

१२०९. उत्पत्ती स्थिती हो वेगळे। पाहा ब्रह्म हे सगळे।।१।। अवघे एकजिनसी तेचि। असे अनादी एकचि।।२।। दुजे नसे तेथे भान। केवळ चिन्मात्र निर्गुण।।३।। आंतर आकाशी जाऊन। उलटे पाउल ठेवून।।४।। अभ्रपडळाऐसे विरून। जावे चिदाकाश भरून।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। ब्रह्म आकाश व्हावे रे।।६।।

१२१०. निरामय ते निज नित्य। चंचल तितुके मायाकृत्य।।१।। चंचळ चपळ मनोवृत्ती। मना मूळ ही प्रकृती।।२।। प्रकृतिपर तो धनी। आनंदाची निजजननी।।३।। जननी जनकापरता। ज्ञप्तिमात्र पूर्णज्ञाता।।४।। ज्ञाता म्हणणे हेही नुरे। स्वानुभव हाही विरे।।५।। लक्ष्मण म्हणे तो हो। योगी ध्याती सर्वदा हो।।६।।

१२११. मने मनाते मारावे। चिंते चिंतेते सारावे।।१।। बुद्धीने हो बुद्धी

प्यावी। अहंकार उरू ने काही।।२।। अहंकारे अहंकार। फिरवावा हो निर्घोर।।३।। अंतःकरणे अंतःकरण। सारावे हो निजी नेऊन।।४।। निज हिरियाची खाणी। उघडावी न उरूनि।।५।। लक्ष्मण म्हणे फिरून। पाहता कळे ही हो खूण।।६।।

१२१२. समुद्री आभाळ ताराचंद्रासहित। बुडाले दिसत देखता हो।।१।। प्रत्यक्ष दिसे हो आले गेले नाही। पाहाता तेथे काही न्यून आहे।।२।। तैसा आम्हा गुणमेळी दिसे भासे। परि तो लिप्त नसे जैसा तैसा।।३।। सत्तामात्रे असे निश्चळ अविनाश। निरामय अवकाशरूप ते हो।।४।। लक्ष्मण म्हणे नाही हलवला। परि त्या वेगळा पदार्थ नाही।।५।।

१२१३. काष्ठी अग्नी वसे परि तो न दिसे। तैसा देही आत्मा अविनाश।।१।। मंथन करिता प्रकट होऊन। करीतसे दहन काष्ठाचे हो।।२।। गुरुकृपे आत्मज्ञान होता जीवा। तुटतसे गोवा प्रपंचाचा।।३।। आत्मज्ञान होता नुरे हे शरीर। ब्रह्म निर्विकार वस्तूचि रे।।४।। लक्ष्मण म्हणे ज्ञानाग्नीकरून। जळती इंधन कर्मकाष्ठे।।५।।

१२१४. वणवा पेटला असंभाव्य अग्नी। भूतळ जाळूनि रक्षा केली।।१।। परि अग्निदाहे आकाश पोळेना। अग्नीचे चालेना तेथे काही।।२।। तैसी ब्रह्मस्वरूपी मायेची उपाधी। लागेना हो कधी कल्पांती हो।।३।। नाना कल्पे होती असंख्य अपार। परि ते निर्घोर निरामय।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते मळ नाही। द्वंद्वातीत पाही निरामय।।५।।

१२१५. देह देउळात आत्मलिंग नांदे। स्वानंद ते कंद नित्यमुक्त।।१।। मनबुद्धिरहित अहंकारातीत। अंतःकरणा अंत होय जेथे।।२।। अलक्ष ते रूप नित्य हो निवांत। कल्पनेचा अंत होय जेथे।।३।। आपण नुरावे तेव्हा ते पुजावे। मीतूपणा नावे शून्य पडे।।४।। लक्ष्मण म्हणे निःसंग होऊन। होतसे पूजन स्वानुभवे।।५।।

१२१६. देह देउळात नांदे शिव धनी। त्याचिये चरणी गोडी फार।।१।। नाना वैभव नाना अलंकार। नाना मतांपर परमात्मा हो।।२।। सहस्रदळी नांदे स्वयंप्रकाश। सर्वांचा तो ईश विश्वरूप।।३।। अनुहत ध्वनी नाना वाद्यघोष। जेथे मायापाश नसे काही।।४।। अहंकृती मीतू षड्रिपू सारून।

धरावे चरण स्वानुभवे।।५।। लक्ष्मण म्हणे पिंडी तो ब्रह्मांडी। स्वानुभवे जोडी होय त्याची।।६।।

१२१७. देह देउळात देव वसे शिव। त्याते सर्व देव पूजिती हो।।१।। गुरुकृपे होय सहज पूजन। निष्कामावाचून न घडे हे।।२।। त्याते अर्पूनिया आपण नुरावे। स्वानंदे असावे समत्वे हो।।३।। समबुद्धीविण पूजन न घडे। मी तू हे बिरडे कपाट हो।।४।। मीतू हे कपाट उघडावे खुणे। अंतर्दृष्टीविण नोहे नोहे।।५।। लक्ष्मण म्हणे धन्य राजयोगी। उन्मनीचे मार्गी करिती पूजा।।६।।

१२१८. सार्वभौम राजा स्वप्नामध्ये बा रे। झाला मजूर रे काष्ठे वाहे।।१।। शिरी मोळी वाहे झाला अती कृश। अती दुःख वसे शरीरी हो।।२।। हंबरडा फोडूनि दीर्घ रुदन करी। दुःखाचे सागरी बुडाला हो।।३।। जागा होता काहीतरी दुःख त्याते। बैसलासे स्वस्थ मंचकी हो।।४।। तैसे जीवाप्रती संसारबंधन। म्हणे लक्ष्मण झाले बा रे।।५।।

१२१९. कोणी एक विप्र होता हो प्रवीण। दैववशे विघ्न आले त्याला।।१।। भूतसंचार झाला म्हणे मी हो मांग। नीचपणा अंगी आणिला हो।।२।। लोकांनी मिळूनि पंचाक्षरी आणिला। संचार काढिला अंगीचा हो।।३।। पंचाक्षरी म्हणे आहेसी तू कोण। म्हणे मी हो वर्ण ब्राह्मण आहे।।४।। तेवी हा हो जीव ब्रह्मरूप पूर्ण। असोनिया हीन झाला पाहा।।५।। लक्ष्मण म्हणे मी देह म्हणून। अविद्यासंगाने भुलला पाहा।।६।।

१२२०. दीपप्रकाशात सर्वत्र वर्तती। परि कर्माप्रती लिप्त नाही।।१।। तैसा आत्मा देही अलिप्त सर्वदा। त्याते भवबाधा आतळेना।।२।। सर्व त्याचे सत्ते परि त्यावेगळा। मळ त्या निर्मळा लागेना हो।।३।। लक्ष्मण म्हणे मायागुणातीत। योगी तो निवांत लक्षिताती।।४।।

१२२१. एक तेचि पाणी उसामिरच्याते। एक तीक्ष्ण ते एक गोड।।१।। सर्व वनस्पतिमुळी पाणी एक। भेद ते अनेक झाले नाना।।२।। सर्पामुखी विष शुक्तिगर्भी मोती। नानापरी व्यक्ती पाणी एक।।३।। तैसा आत्मा सर्वाघटी एक वसे। जैसा घट तैसे भेद दिसती।।४।। लक्ष्मण म्हणे गुणाऐसा भासे। परि तो लिप्त नसे गुणकर्मा।।५।।

१२२२. सूर्यबिंब जैसे दिसे सर्वाठायी। परि लिप्त नाही कोठेही हो।।१।। मोरीमध्ये दिसे नाना कुश्चळ ठायी। गंगा त्या प्रवाही सागरी हो।।२।। कुश्चळ नाही झाला मोरी–उदकाने। अथवा त्या गंगेने पवित्र हो।।३।। तैसा परमात्मा सर्वाठायी वसे। परि लिप्त नसे कोणे कर्मे।।४।। गुणाऐसा दिसे गुणी लिप्त नसे। परेचा तो ईश वेगळा हो।।५।। लक्ष्मण म्हणे कोठे लिप्त नाही। स्वानंदे ही सोयी सापडेना।।६।।

१२२३. मळ त्या निर्मळा लागेना लागेना। गगन भिजेना उदकाने।।१।। अग्नीमाजी काष्ठे नाना ती पडती। अग्निरूप होती काष्ठ नुरे।।२।। तैसे निजध्यासे जीव मुक्त होती। ब्रह्मानंदप्राप्ती होय जीवा।।३।। निजध्यास त्याचा असावा असावा। स्वानंदविसावा घ्यावा तेथे।।४।। लक्ष्मण म्हणे निर्मळाचा संग। होता नुरे अंग अविद्येचे।।५।।

१२२४. फिरूनि पाहाता नुरे हा संसार। ब्रह्मरूप बा रे आपणचि।।१।। रज्जूचा तो भास जैसा होय बा रे। तैसा प्रपंच रे भासरूप।।२।। भास हा सरता सर्पत्व ते नुरे। रज्जू हेचि खरे माने मन।।३।। तैसे कल्पनेचे निरसता पडळ। ब्रह्मचि केवळ निजवस्तू।।४।। लक्ष्मण म्हणे मी तू हे कपाट। उघडे निघोट ब्रह्मचि रे।।५।।

१२२५. अंधारी तो दोर पडला विस्तीर्ण। सर्प तो म्हणून भ्याले लोक।।१।। म्हणती सर्प सर्प मिळाले हो फार। म्हणती भयंकर मोठा आहे।।२।। गव्हाळ्या म्हणती कोणी डोम्या नाग। मारा मारा जग म्हणती हो।।३।। नाना शस्त्रे लाठ्या धावले घेऊन। तेथे एक प्राज्ञ आला प्राणी।।४।। म्हणे दीप लावा पाहावा तो कैसा। दीपाने तो भासा उरी नाही।।५।। म्हणती दोर दोर हासती सर्वत्रही। शस्त्रे ठायीचे ठायी राहिली हो।।६।। तैसी नाना मते अंधारचि बा रे। आत्मज्ञान नाही जववरी।।७।। लक्ष्मण म्हणे आत्मज्ञान होता। भ्रमाची ही वार्ता नुरे काही।।८।।

१२२६. निर्विकल्प अंतःकरण। सकळ विकल्प ते मन।।१।। निश्चयात्मक ते बुद्धी। अनुसंधानात्मक चित्तवृत्ती।।२।। तेथे उठे अहंकार। होती देहाचे व्यवहार।।३।। आत्मा अंतःकरणापूर्वी। लिप्त नाही कोण्या ठायी।।४।। जैसा ग्रामामाजी दीप। तद्वत् चैतन्यस्वरूप।।५।। सूर्यप्रकाशामाझारी। जैसे

वर्तती व्यापारी।।६।। घट आकाशावेगळा। नोहे केल्या हो कोणाला।।७।। तद्वत् प्रभो सर्वाठायी। लिप्त कोणे कर्मे नाही।।८।। गुण व्यापार मायेचे। आत्मा जीवन सर्वांचे।।९।। लक्ष्मण म्हणे तात। सदासर्वदा निवांत।।१०।।

१२२७. केवळ निर्गुण निर्शून्य। तोचि झाला हो सगुण।।१।। भक्तिसुखालागी तात। स्वये झाला देव भक्त।।२।। आपुले आपण भजन। करितो मायागुणेकरून।।३।। अवघी दिसे एकात्मता। नसे द्वैताची वार्ता।।४।। लक्ष्मण म्हणे मी रे। जिरे तेव्हा तो दिसे रे।।५।।

१२२८. परा हो पश्यंती मध्यमा वैखरी। वाचा ह्या हो चारी मौनावल्या।।१।। पाहता पाहणे तेही हो लोपले। चिन्मात्र संचले एकरूप।।२।। शून्य निर्शून्य दिसे निर्शून्य। पूर्ण ते चैतन्य आदि अंती।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते पाहू गेले। तेथेचि निमाले झाले तेचि।।४।।

१२२९. इंद्रियव्यापार तुझे आज्ञेकरून। मना मनपण तुझेनि रे।।१।। बुद्धी अंतःकरण याचा तू रे द्रष्टा। तुझेनि रे श्रेष्ठा श्रेष्ठपण।।२।। पिंडी ब्रह्मांडी तू असूनि वेगळा। सकळ ही कळा तुझेनि रे।।३।। वेदान्त सिद्धान्त तुझेनि पसर। सर्वांचे माहेर तूचि देवा।।४।। तुजवाचूनिया नसे रिक्त स्थान। चिन्मात्र निर्गुण तू रे स्वस्थ।।५।। लक्ष्मण म्हणे अचल तू नाथ। स्वामी विश्वनाथ निरामय।।६।।

१२३०. जीव ब्रह्मीचा हा अंश। दुःख भोगी संगाने।।१।। ब्राह्मण होता हो जातीचा। भूतसंचार झाला।।२।। म्हणे मी हो धेड मांग। पूर्वस्मर तो नाही।।३।। तेवी झाले या जीवाला। ब्रह्मभावना गेली।।४।। विषयसंगाने भुलला। आपुले ते निजघर।।५।। लक्ष्मण म्हणे ब्रह्म। वपु आंतरबाहेरी।।६।।

१२३१. ब्रह्मभाव आम्हापाशी। तेणे सौख्य या देहासी।।१।। अवघा संसार सुखाचा। भास नसे द्वैताचा।।२।। सुखदुःखादी प्रसंग। मायागुणाचे हे अंग।।३।। देह भोगी कर्मसूत्र। आम्ही सर्वदा स्वतंत्र।।४।। स्वप्नातील सर्व भोग। जागृत आम्ही हो निःसंग।।५।। लक्ष्मण ब्रह्मानंदी। सदासर्वदा समाधी।।६।।

१२३२. जीवभावे अधोगती। ब्रह्मभावे ब्रह्मप्राप्ती।।१।। भावनेचा सर्व खेळ। भावनेने मायाजाळ।।२।। शबलभाव हा पसारा। मायागुणाचा हा

सारा।।३।। शबल सांडूनि लक्ष्यांश। घेता निरंजनी वास।।४।। तेथे कैचा संसार। निजानंद निरंतर।।५।। लक्ष्मणी ब्रह्मभाव। सदा स्वानंदवैभव।।६।।

१२३३. नादबिंदुकलातीत। तोचि साकार झाला।।१।। देवभक्त आपण झाला। स्वइच्छेकरूनि।।२।। सर्व इच्छेचा पसार। अनंत ब्रह्मांड कोटी।।३।। देव त्याचे आज्ञाधार। आज्ञे वर्तती सर्व।।४।। सर्व आपणचि झाला। अलिप्त सर्वांप्रती तो।।५।। लक्ष्मण म्हणे सूर्या-। परी चेष्टवी जग।।६।।

१२३४. स्वयंप्रकाश प्रकाश। अवघा पाहा अविनाश।।१।। आदि अंत नाही ज्याला। व्यक्तिरहित संचला।।२।। द्वैतभेद मागे सारा। सुखे पाहा विश्वंभरा।।३।। पाहाता पाहणे हे विरे। ब्रह्मानंद अंगी भरे।।४।। अवघी एक बाणे दृष्टी। वस्तू भरली पाठीपोटी।।५।। लक्ष्मणा वास तेथे। योगी रमते हो जेथे।।६।।

१२३५. सदोदित सदोदित परब्रह्म हो निवांत।।१।। सुखदायक निःसंग। निजानंदे हो अव्यंग।।२।। सर्वांमाजी वसे तात। सर्वकर्मांते अलिप्त।।३।। सत्तामात्रे हो व्यापार। शंभो स्वतः निर्विकार।।४।। पाहा पाहा डोळे भरून। अंतर्बाह्य परिपूर्ण।।५।। लक्ष्मण पाहू गेला। पाहातेपण विसरला।।६।।

१२३६. स्वस्वरूपी रमावे। वाया कासया भ्रमावे।।१।। दृष्टी फिरवूनि मागे। वस्तू हृदयी निजांगे।।२।। देह अंगुष्ठ प्रमाण। ऐसे वेदांचे वचन।।३।। सोऽहं हंसा हा विचार। गुरुकृपे निरंतर।।४।। स्वरूप अनुसंधानी वृत्ती। वृत्ती होतसे निवृत्ती।।५।। लक्ष्मण म्हणे सिद्ध। होय अवघा ब्रह्मानंद।।६।।

१२३७. चित्तचतुष्ट्यातीत। प्रभो वसे या देहात।।१।। पाचापंचविसातीत। नित्यनूतन निवांत।।२।। शब्द स्पर्श रूप रस। हा तव मायेचा विलास।।३।। इंद्रियादी पंचप्राण। हेही मायेचे हे गुण।।४।। अंतःकरणापूर्वी वसे। वस्तू स्वयं प्रकाशे।।५।। तेचि ध्यानाते आणावे। उलट दृष्टीने पाहावे।।६।। षड्चक्रांते भेदून। घ्यावे प्रेमे ते दर्शन।।७।। लक्ष्मण म्हणे बा हो। जाणीव शहाणीव सारा हो।।८।।

१२३८. वस्तू घन आकाशापरी। वस्तू आंतरबाहेरी।।१।। विश्व वर्ते स्वरूपात। म्हणती नेणो भगवंत।।२।। सकळ कर्मे स्वरूपात। करूनि कळेना ती मात।।३।। जननीजठरी जन्मले। गर्भांधळे जेवी मुले।।४।। तिचे स्वरूप

त्याहाला। न कळे ते या जगाला।।५।। लक्ष्मण म्हणे थोर। पाहा केवढा अंधार।।६।।

१२३९. ब्रह्म अद्वय एकले। सदासर्वदा संचले।।१।। अधः ऊर्ध्व मध्य तेचि। गणना न करवे ज्याची।।२।। प्रमाणातीत परमात्मा। प्रभो विश्वांचा तो आत्मा।।३।। वेदादिका उरी नाही। सिद्ध झाले हो विदेही।।४।। विषयी विटती जे नर। तेचि त्याहाते माहेर।।५।। लक्ष्मण म्हणे येरा। मायामय हा पसारा।।६।।

१२४०. अहो ब्रह्मसुख घ्या हो। आप आपणा पाहा हो।।१।। मनामागेचि ते आहे। स्वानुभवे ते पाहावे।।२।। अंतःकरणी स्फुरे स्फूर्ती। अद्वयानंद ती ज्योती।।३।। अंतःकरणा अंतर्बाह्य। वस्तू सर्वत्र ती आहे।।४।। अंतर्बाह्य अवघा तूचि। काही रिक्तही नसेचि।।५।। लक्ष्मण म्हणे सत्य। दिसे दृश्य हे अनित्य।।६।।

१२४१. शत्रुमित्रभाव नाही। आम्हापाशी द्वैत काही।।१।। सर्वांभूती पंचानन। वसे स्वामी त्रिनयन।।२।। राग द्वेष भाव नाना। हे मायागुण जाणा।।३।। आम्हापाशी ब्रह्मभाव। सदा स्वानंदवैभव।।४।। समबुद्धी रे कडून। कैचे कैचे भेदभान।।५।। लक्ष्मण म्हणे सार। अवघा स्वामी दीनोद्धार।।६।।

१२४२. सोने सोनेपणा उणे। न होऊन झाले लेणे।।१।। अहो मृत्तिकेचे घट। पाहा कापसी तो पट।।२।। पाहा जळी तो तरंग। तेवी ब्रह्मी नाना जग।।३।। पाहा परमात्मा साकार। मायागुणे विश्वंभर।।४।। जगी जगदीश्वर वसे। पाहा रिक्त त्याविण नसे।।५।। लक्ष्मण म्हणे भेद। नसे अवघा निजानंद।।६।।

१२४३. वेद त्रिकांडे बोलिला। अनेक विस्तार हा केला।।१।। कर्म उपासना ज्ञान। केले मुख्य निरूपण।।२।। चित्तशुद्धीलागी कर्म। निरूपिले धर्माधर्म।।३।। कर्म निष्काम करावे। मन विवेके फिरवावे।।४।। श्रवण मनन निजध्यासे। वश होतो तो महेश।।५।। लक्ष्मण म्हणे ज्ञान। साकार ब्रह्म पूर्ण।।६।।

१२४४. भेद नाना या मायेचे। भेदापाशी सुख कैचे।।१।। भेदे चुकेना

संसार। भेदे दुःखचि अपार।।२।। अहो भेदभावेकरून। तुटेना ते येणे जाणे।।३।। भेददृष्टी जेव्हा सरे। तेव्हा ब्रह्म दिसे सारे।।४।। ब्रह्मभाव अंगा येता। तुटे जन्ममरण गुंता।।५।। लक्ष्मण म्हणे मन। मुरवावे भजन करून।।६।।

१२४५. आपणचि देव आपणचि भक्त। आपणचि तात जग झाला।।१।। आपणचि राजा आपणचि प्रजा। आपणचि निजानंद योगी।।२।। आपणचि भोगी आपणचि त्यागी। स्वामी शिवयोगी विश्वात्मा तो।।३।। अनंत ब्रह्मांडे आपणचि झाला। अनेक हो केला खटाटोप।।४।। आपणचि आदि-मध्य-अंती तात। आपण निवांत एकला हो।।५।। लक्ष्मण म्हणे जगी सदाशिव। पाहा कृपाळुव स्वानुभवे।।६।।

१२४६. शिंपीमध्ये मुक्त असती। तेवी देही पशुपती।।१।। काष्ठामध्ये जेवी अग्नी। तेवी भूती शूळपाणि।।२।। दुग्धी वसे नवनीत। तेवी देही उमाकांत।।३।। अनेक घटी जेवी भानू। तेवी भूती पंचाननू।।४।। जेवी आकाश घटांत। तेवी प्रभो या देहांत।।५।। लक्ष्मण म्हणे भरला। उलट्या दृष्टी पाहावे त्याला।।६।।

१२४७. नाना शास्त्रांचे हे वाद। नाना झाले वर्णभेद।।१।। नाना जीव नाना याती। पशुपक्ष्यादी संपत्ती।।२।। नाना कल्पना अनेक। खळ दुर्जन भाविक।।३।। अनंत ब्रह्मांडे पसर। हा तव मायेचा बाजार।।४।। स्वरूपी भेदवाद नाही। पाहा संचले अक्षयी।।५।। लक्ष्मण म्हणे भेद। सरता भेटे निजबोध।।६।।

१२४८. भेददृष्टीची साधने। अथवा यज्ञादी यजने।।१।। अहो सकाम ही भक्ती। येथे असे फलप्राप्ती।।२।। चुकेना हा गर्भवास। म्हणूनि रुचेना प्राज्ञास।।३।। प्राज्ञ करिती साधने। जीवेभावे तनुमने।।४।। कर्ता करविता ईश्वर। ऐसा त्याहाचा निर्धार।।५।। लक्ष्मण म्हणे तेणे। नसे त्याहा येणे जाणे।।६।।

१२४९. भवसागर अज्ञाना। सज्ञानाते हो दिसेना।।१।। आधी अज्ञान असावे। तरी त्याहाते खंडावे।।२।। सत्य अज्ञान असते। तरी ज्ञाने न निरसते।।३।। रज्जू तोचि सर्प भासे। बरवे पाहता रज्जू असे।।४।। नाही नाही दुसरे हो। एक ब्रह्म अद्वय हो।।५।। लक्ष्मणी भेद नाही। वास अभेद

त्यापायी।।६।।

१२५०. कोणे कोणाते गोविले। आपणा आपण विसरले।।१।। शुक गुंते नळिकेवरी। तेवी अज्ञान शरीरी।।२।। शुक बांधले म्हणून। आपणचि बैसला धरून।।३।। तेवी झाले या जीवाला। कल्पनेने हा बांधला।।४।। जेथे कल्पनाचि नाही। तेथे कैची गाथागोवी।।५।। गुरुकृपे लक्ष्मण। नेणे कल्पना हे भान।।६।।

१२५१. देह अश्व हे भाड्याचे। येथे काय हो आमुचे।।१।। स्वार होऊनिया वरी। गेलो आम्ही निजपुरी।।२।। गेले ज्ञाते ज्या मार्गाने। आम्ही गेलो त्या पंथाने।।३।। गुरुदेवाने हो नेले। आपुले मागे बैसविले।।४।। चारी घाट उतरून। नेले युक्तीने प्रभूने।।५।। लक्ष्मणा ठेविले पायी। देहातीत देहाठायी।।६।।

१२५२. वस्तू अभेद अभेद। येथे कैचा भेदवाद।।१।। वाद झाला अहंपणे। अहं खोटे हे पाहाणे।।२।। अहंकाराचा पसर। अवघा ब्रह्मांड आकार।।३।। दृश्य मायेचिये पोटी। वस्तू मायेचे शेवटी।।४।। स्वरूपी मायाचि दिसेना। तेथे भेद कैचे नाना।।५।। लक्ष्मण म्हणे एक। अवघा स्वयंप्रकाश।।६।।

१२५३. सोने सोनेपणा उणे। न येता ते झाले लेणे।।१।। तैसा जाणा सर्वेश्वर। स्वस्थ असता हा आकार।।२।। सत्तामात्रे सर्व होय। शंभो स्वस्थ निरामय।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते। स्मरा स्वस्थ करी जीवाते।।४।।

१२५४. अहो अद्वयाच्या गावा। जाऊ स्मरू महादेवा।।१।। अहो द्वैताचा ठाव। नाही स्मरू तोचि देव।।२।। एकपणा नाही हाली। विश्व नटला चंद्रमौळी।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते। योगी ध्याती प्रेमे नित्य।।४।।

१२५५. पृथ्वीमध्ये नाना रंग। जळी होती ते तरंग।।१।। दीपामाजी तो प्रकाश। नाना अग्नीचा विलास।।२।। काजळ होय त्याचे पोटी। रंग काळा तो शेवटी।।३।। लक्ष्मण म्हणे दृश्य। नाशे वस्तू अविनाश।।४।।

१२५६. आपुलेपणाचा आठव हे ज्ञान। विस्मरणे करून जीव म्हणे।।१।। अविद्येची भ्रांती अनिवार संग। निःसंगाते संग लागला हो।।२।। अनंत यातना भोगी देहसंगाने। कर्माचे स्वाधीन झाला पाहा।।३।। संतसंगेकरून

गुरुकृपा होय। मग निरामय होय जीव।।४।। लक्ष्मण म्हणे जाय निजधामा। त्या सुखा उपमा नाही नाही।।५।।

१२५७. धन्य धन्य कारागीर। पिंजरा केला हो तयार।।१।। नाना रंग उभविले। ब्रह्मांड ऐसे हो निर्मिले।।२।। आत राघू बा आपण। पाहातसे निर्गुण।।३।। सकल भक्षूनि निराहार। हंसपक्षी तो निर्घोर।।४।। लक्ष्मण मंदमती। पाहातसे हंसाप्रती।।५।।

१२५८. ज्ञानदृष्टी पाहताना। एक दिसे सर्व जाणा।।१।। घागरी माथनी रांजणी। एक दिसे वासरमणी।।२।। सुवर्णाचे अलंकार। तैसा दिसे हा पसर।।३।। कापसाचे पट अनेक। तैसे विश्व दिसे अनेक।।४।। लक्ष्मण बोले दीन। सर्वाठायी तो भगवान।।५।।

१२५९. ब्रह्म वारिता वारेना। ब्रह्म सारिता सरेना।।१।। सकल ब्रह्ममय असे। त्याविण रिते काही नसे।।२।। नाममात्र माया वदती। तिची ब्रह्मी आहे वस्ती।।३।। स्वयं एक दिसे धोंड। जड मूढ कैचे त्याते तोंड।।४।। घट मठ आकाशात। आकाश वसे स्वरूपात।।५।। लक्ष्मण म्हणे स्वामी। दिसतसे सर्वधामी।।६।।

१२६०. लोह परिसाप्रती भेटले। तत्क्षणी सुवर्ण झाले।।१।। करिता नित्य नामस्मरण। शिवरूप होय तो जाण।।२।। गंगा समुद्री मिळाली। समुद्रचि ती हो झाली।।३।। सोऽहंमंत्र हा जपून। देव केला गे स्वाधीन।।४।। लक्ष्मण होता दीन। केला प्रभोने पावन।।५।।

१२६१. मळ कदाही लागेना निर्मळी। विचारूनि तुम्ही पाहा मुळी।।१।। ब्रह्म सहजचि आहे निर्मळ। ब्रह्मी नसे बा रे मायामळ।।२।। ब्रह्मी नसे काही एकही उपाधी। अहो ब्रह्म ते आहे स्वत:सिद्ध।।३।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मचि आहे सत्य। आकारमात्र दिसे हो नाशिवंत।।४।।

१२६२. धन्य धन्य तो एक योगी। आत्मस्वरूपी सुख भोगी।।१।। बाह्य सुख ज्या आवडेना। आत्मस्वरूपा विसरेना।।२।। संतुष्ट सदा असे मानसी। अक्षयी जडला प्रभोपदासी।।३।। जगामाजी वसे सदा। करी स्वहिताचा धंदा।।४।। फिरता समाधी मोडेना। रंगी रंगला हो जाणा।।५।। साक्षिभूत करी कर्म। जाणूनिया निजवर्म।।६।। लक्ष्मणा जन्म नाही। स्वरूपी सावध

अक्षयी।।७।।

१२६३. रागे भरू कोणावरी। देव भरला चराचरी।।१।। माझे हृदयी तोचि दिसे। सर्वाठायी तोचि असे।।२।। देह वेगळाले दिसती। आत्मा एक सर्वाभूती।।३।। लक्ष्मण विनवी प्रभोप्रती। तूचि त्राता कृपामूर्ती।।४।।

१२६४. एकपणा न होता तुटी। अनंत ब्रह्मांडांच्या पोटी।।१।। प्रभोसत्ते हो करून। पाहा झाल्या हो निर्माण।।२।। अहो सर्वत्र ती सत्ता। आम्ही स्मरू त्या अनंता।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। आदी अंती महादेव।।४।।

१२६५. कर्म ईश्वरा अर्पण। श्रेष्ठ दिसे हे साधन।।१।। मुख्य वेदांची ही आज्ञा। शास्त्री निश्चय हा जाणा।।२।। लक्ष्मण म्हणे ज्ञान। तेणे होय समाधान।।३।।

१२६६. देहरथ हा तत्त्वांचा। साठा शोभे त्रिगुणांचा।।१।। वासना ही आख सरळ। रथी जीवात्मा निर्मळ।।२।। चाक इंद्रिय हे केले। वायुप्राण अश्व जुंपिले।।३।। मन बुद्धी अहंकार। धुरकरी हे हो शूर।।४।। विषय सेविती आवडी। रथ चालिला तातडी।।५।। आत्मा साक्षी तो सर्वांचा। नाथ अलिप्त विश्वाचा।।६।। लक्ष्मण त्या शरण। तोचि विश्वाचे जीवन।।७।।

१२६७. स्वये वेद बोले जगी जगदीश्वर। व्याप्त चराचर देवराव।।१।। आदि मध्य तात प्रभू अवसानी। रिते त्यावाचूनि नाही स्थान।।२।। मायागुणेकरून दिसे भिन्नाभिन्न। चिन्मात्र निर्गुण वस्तू एक।।३।। घट तो भंगता आकाश भंगेना। आकाश जाईना कोण्या स्थानी।।४।। समुद्री तरंग तेवी हा आकार। वस्तू निरंतर सागरवत्।।५।। लक्ष्मण म्हणे दुजे हो दिसेना। एकाविण आम्हा भासेना हो।।६।।

१२६८. कर्म धर्म ज्याचा झाला शिवरूप। अलक्ष निजरूप झाला स्वये।।१।। तेथे मीतूपणा झाली बोळवण। सर्वत्रा समान समबुद्धी।।२।। तेथे ब्रह्मानंदा अक्षयी हो वास। स्वानंदविलास घेती प्राणी।।३।। जाणीव ही जिरे विज्ञान जाहले। देह हे उरले कर्मसूत्र।।४।। लक्ष्मण म्हणे सर्वातीत झाला। मुक्त तो जाहला महाराज।।५।।

१२६९. माझा देह आहे नाही। आठव विसर नाही काही।।१।। सहजचि असे अंग। विसर स्मर नसे भाग।।२।। तैसी माया सर्वेश्वरी। सूर्यरश्मिचिये

परी।।३।। जैसी वृक्षा अंगी छाया। तैसी ब्रह्मी दिसे माया।।४।। परमात्मा अनादी हो। विश्वमूळ आद्य हो।।५।। लक्ष्मण म्हणे तो रे। सदासर्वदा पूर्ण रे।।६।।

१२७०. शिवस्वरूप देखिले। मन चरणी स्थिरावले।।१।। नेत्रा सुख झाले फार। ब्रह्मानंद निरंतर।।२।। देहभाव उरी नाही। अवघा त्रैलोक्यगोसावी।।३।। अवघा संसार सुखाचा। निजानंदी भेद कैचा।।४।। अभेदभक्ती निरंतर। घेतो उमादेविवर।।५।। लक्ष्मण म्हणे त्याते। ध्या हो प्रेमे एकचित्ते।।६।।

१२७१. तुज पाहता मदनारी। वृत्ती न फिरे माघारी।।१।। माझे चित्त नदीतीर। शंभो श्रेष्ठ तो सागर।।२।। नोहे वेगळे शंकरा। तुझे कृपे गंगाधरा।।३।। सेवा घेशी निरंतर। जेवी जळी जळगार।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। अवघा तूचि कृपावंता।।५।।

१२७२. तुम्ही सुवर्ण हो शिवा। आम्ही अलंकार देवा।।१।। तुम्ही पृथ्वी आम्ही घट। तुम्ही कापूस आम्ही पट।।२।। तुम्ही सागर आम्ही लहर। तुम्ही सूर्य मी प्रकाश वर।।३।। तुम्ही कर्पूर मी परिमळ। तुम्ही चंदन मी शीतळ।।४।। तुम्ही मृदुंग मी ध्वनी। मी बाळ तू जननी।।५।। चरणावेगळा मी कधी। नोहे नोहे कृपानिधी।।६।। उरी नाही लक्ष्मणी। अवघी तुमची करणी।।७।।

१२७३. अवघा शिव शिव शिव। जगी भरला महादेव।।१।। सूर्यावरी मृगजळ। तेवी ब्रह्मी मायारोळ।।२।। माया नाही माया नाही। प्रभो शोभला अक्षयी।।३।। एकाएकी तो एकला। ब्रह्मानंदे करितो लीला।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते। स्वानुभवे ध्या हो नित्य।।५।।

१२७४. अणुरेणूहूनि सान। तेथे बैसला आपण।।१।। अनंत ब्रह्मांडाहून थोर। दिसे अवघा सबराभर।।२।। त्याते कैसे स्तवू आता। मायागुणा तो निर्मिता।।३।। वाणी लज्जित जाहली। ज्ञप्ती अवघी प्रकाशली।।४।। गुरुकृपे लक्ष्मण। प्रेमे करितो पूजन।।५।।

१२७५. अणुरेणूमाजी वस्ती। तुमची दिसे कृपामूर्ती।।१।। मोठा दिसशी सर्वाहून। अनंत ब्रह्मांडांवरून।।२।। अनंत ब्रह्मांडांच्या कोटी। वसती तुझ्या रोमदेठी।।३।। कैसे पुजावे शंकरा। तुम्हाप्रती विश्वंभरा।।४।। जेवी सागरी

तरंग। तुम्हामध्ये आम्ही जग।।५।। लक्ष्मण लहरीपरी। ब्रह्मानंदे पूजन करी।।६।।

१२७६. अणुरेणूमाजी वास। तुझा त्याहूनि तू सान।।१।। अनंत ब्रह्मांडाच्या कोटी। तुझ्या रोमी एका रे।।२।। ऐसा स्थूळ तू ईश्वर। महा आत्मा विश्वाचा।।३।। तेथे तुझी कीर्ती कोण। वर्णील रे निजरूपा।।४।। अवघा तूचि तूचि तूचि। दुजे आम्हा दिसेना।।५।। लक्ष्मण नाही उरला। पाहाता पाहणे दृष्टी।।६।।

१२७७. तुज पाहाता शंकरा। सुख झाले विश्वंभरा।।१।। झाला सुखाचा सुकाळ। दुःख गेले रे सकळ।।२।। मीतूपणा बोळवण । झाली तूचि सर्वाकारण।।३।। अंतर्बाह्य पंचवदन। तूचि अवघा ब्रह्म पूर्ण।।४।। लक्ष्मण म्हणे सर्व। करूनि अलिप्त तू देव।।५।।

१२७८. कोणी आम्हा आप्त दिसेना हो गोत्र। व्यापला त्रिनेत्र सर्वाठायी।।१।। जातीही दिसेना मीही कोणी नाही। एकाविण काही दुजे नाही।।२।। मी तू म्हणणे हा मायेचा हो घाला। भ्रमे भ्रम झाला प्राण्यालागी।।३।। लक्ष्मण म्हणे अनंत ब्रह्मांडे। स्वयं ही धोंड एक दिसे।।४।।

१२७९. शत्रू हो दिसेना मित्र कोणी नाही। स्वामी तो गोसावी सर्वाघटी।।१।। निंदा द्वेष आता करावा कोणाचा। स्वामी तो आमुचा जेथे तेथे।।२।। पाताळाखालूनि स्वर्गा हो वरूनि। देव माझा धनी स्थूळ मोठा।।३।। स्थूळ जरी म्हणू सूक्ष्म तो सान। वेद मौनावून झाले स्थिर।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते पाहू गेले। नाही परतले झाले तेचि।।५।।

१२८०. मृगजळीचे तरंग। तेवि दिसे हे हो जग।।१।। यातील सुख खरे काय। मिथ्या दिसे मायामय।।२।। म्हणूनि दृश्य ओलांडून। योगी गेले ते शरण।।३।। सिद्धकृपे लक्ष्मण। तेथे बैसला जाऊन।।४।।

१२८१. भूत झोंबलं गे भारी। काही सुचेना सुंदरी।।१।। सप्त पाताळी त्याचे चरण। एकवीस स्वर्गी मुकुट जाण।।२।। भूत महा अनिवार। त्याचा नकळे कवणा पार।।३।। सप्तपाताळ एकवीस स्वर्गावरी। स्वयम् धोंड देखिली गे सुंदरी।।४।। अनंत ब्रह्मांडे गे व्यापून। उरले भूत गे दारुण।।५।। त्याविण रिते काही नाही। लक्ष्मण दीन अन्यायी।।६।।

विरहिणी

१२८२. वेड्याने मजला वेडे केले बाई। त्रिभुवनगोसावी त्याला म्हणती।।१।। निःसंग तो असे त्याला लज्जा नाही। भक्षी सर्वाठायी निर्भय तो।।२।। असे सर्वाठायी लिप्त कोठे नाही। सर्वांप्रती बाई अगोचर।।३।। एकाएकी मजला त्याने वेडे केले। मनुष्यपण गेले झाले वेडी।।४।। घरधंदा बाई काही आवडेना। काही गे सुचेना काय करू।।५।। जनलोक मज निंदिती साजणी। खंती माझे मनी वाटेना गे।।६।। लक्ष्मण म्हणे मज भ्रष्टविले। घर बुडविले सांगू काई।।७।।

१२८३. निःसंगाचा संग मज आवडला। तुम्ही काही बोला सावकाश।।१।। खांद्यावरी पदर पडला गे बाई। लाज मज नाही निःसंग मी।।२।। सुखेनैव आता करा माझी निंदा। स्वहिताचा धंदा केला म्या गे।।३।। तुम्हासी मजला काय गे कारण। उमाईचा रमण नाथ माझा।।४।। लक्ष्मण म्हणे सत्ता त्या धन्याची। चेष्टविता तोचि सर्वांप्रती।।५।।

१२८४. परपुरुषाचा संग मज झाला। फुंज अंगी आला माझ्या बाई।।१।। सुखी मज केले दारिद्र्य निमाले। भय माझे गेले त्याच्या संगे।।२।। परपुरुषाचा संग सये बरा। तुम्ही बाई करा संग त्याचा।।३।। परेशाचा संग करावा निवांत। मायिक हे गोत मज दिसे।।४।। लक्ष्मण म्हणे संग तोचि खरा। चुके येरझारा येणे जाणे।।५।।

१२८५. परपुरुषासी रमले साजणी। मज त्यावाचूनि गमेना गे।।१।। त्याने माझे मन नेले गे हिरूनि। अगम्य करणी त्याची माये।।२।। काही आता बोला माझी लाज गेली। जाराने गे नेली बुद्धी माझी।।३।। लक्ष्मण म्हणे होणार चुकेना। कैलासीचा राणा सखा माझा।।४।।

१२८६. आमुची संगती तुम्ही न धरावी। आम्ही झालो बाई निःसंग गे।।१।। लौकिकही गेला झाली अपकीर्ती। उदास मी चित्ती झाले सये।।२।। बायांनो तुमचे घरी वसे मन। जावे परतून गृहाप्रती।।३।। घरधंदा जेव्हा तोडाल गे तुम्ही। मग तुम्ही आम्ही सांगातिणी।।४।। लक्ष्मण म्हणे सोडूनिया सर्व। स्वामी महादेव वरिला गे।।५।।

१२८७. लोकेषणा आम्ही टाकिली गे बाई। लागलेसे पायी

निःसंगाच्या।।१।। वित्तेषणा चित्तेषणा दारेषणा। टाकूनिया चरणा लागलो हो।।२।। नामरूपाचा गे पुसूनिया ठाव। स्वामी महादेव वरिला गे।।३।। मीतूपणाची गे काढूनिया खोळ। प्रभोकंठी माळ घातली गे।।४।। अंतःकरणपंचकाचिये आसनी। बैसविला धनी निजरूप।।५।। लक्ष्मण म्हणे त्याचे पायी लीन। झाले गे म्हणून सौख्य आम्हा।।६।।

१२८८. आमुचे नाचणी नाचू नका बाई। आम्हा लाज नाही गेली गेली।।१।। परपुरुषासी रमलो आम्ही गे। तुम्हाप्रती हे गे नीट नाही।।२।। तुमचा गे वंश कूळ अती श्रेष्ठ। जातीही वरिष्ठ तुमच्या गे।।३।। इतुके टाकूनि संगात रमावे। हे नव्हे नव्हे बरवे बाई।।४।। वैभवा गे वरी सोडा वेगी पाणी। तेव्हा तो गे धनी वरीतसे।।५।। लक्ष्मण म्हणे सर्वांते सोडून। परेशा रमून राहिलो गे।।६।।

१२८९. स्वानंदकीर्तनी आम्ही नाचतो गे। रंगी रंगलो गे निजरंगी।।१।। निजरंगी आम्ही सर्वदा निमग्न। मन हे उन्मन झाले बाई।।२।। देह हा शोभला प्रारब्धास्वाधीन। मीतूते गाळून नाचतो गे।।३।। बारा सोळा पाच पंचवीस तीन। दहा छत्तीसाने वेष्टिलो गे।।४।। पाळा सभोवता मध्ये मी बैसले। भजन चालिले अक्षयी गे।।५।। लक्ष्मण म्हणे निजानंद रंगी। मुरले स्वअंगी शिवरूप।।६।।

१२९०. मन नेले नेले बाई। आता गती करू मी काई।।१।। येऊ देईना माघारी। झाले वेड्यापिशापरी।।२।। वेडा मोहक हा फार। करू नेदे संसार।।३।। मोठे मोठे वेडाविले। नाही संसाराते आले।।४।। लक्ष्मण म्हणे बाई। तेथे माझी गणना काई।।५।।

१२९१. वेडा केला म्या भ्रतार। मज न सुचे घरदार।।१।। वेड्याने गे मोहिले मन। मन झाले गे उन्मन।।२।। जिकडे पाहे दिसे पती। सर्वांमाजी प्राणपती।।३।। लक्ष्मण म्हणे अहो जना। निःसंग झाले घर निघाले जाणा।।४।।

१२९२. वेडा गे माझा शिव। वेडा तो हा महादेव।।१।। त्याने मज वेडे केले। अंगी वेड गे भरले।।२।। वेड्याचा संग गे बरवा। वेड्याचा संग गे करावा।।३।। तुम्ही पाहा आपुली सोई। मी तो निःसंग झाले बाई।।४।। निःसंगाशी गे रमले। निःसंग गे मज केले।।५।। निःसंग मी फार झाले।

लज्जाही गे विसरले।।६।। गृहसुता मी अंतरले। वेड्याने गे भ्रष्टविले।।७।। वेड्याने गे मन नेले। बोलणेही गे खुंटले।।८।। वेड्याने गे मुके केले। लक्ष्मणा आपुले केले।।९।।

१२९३. घर निघाले थोराचे। आता काय भय तुमचे।।१।। तुम्ही काय कराल बाई। आता मज लाज नाही।।२।। लोक म्हणती घररिघी। अपकीर्ती झाली जगी।।३।। निंदा करीतच राहा। म्या गे सोय केली पाहा।।४।। जबरदस्ताचा तो संग। पावले मी अर्धे अंग।।५।। सुख पावले साजणी। सांगवेना गे वदनी।।६।। प्रभोशी विलास करिते। आनंदे आलिंगन देते।।७।। काय करू तुमच्या संगाला। धनी मोठा गवसला।।८।। सर्व विसर पडला। लाज आता नाही मजला।।९।। काय तुम्हासी कारण। बरवा आहे माझा रमण।।१०।। त्रैलोक्याचा नाथ तो गे। त्यासी केला म्या संग गे।।११।। लक्ष्मणा लाज नाही। लाज कोणाची धरावी।।१२।।

१२९४. शिवसखा केला माय। प्रेमे पूजिले ते पाय।।१।। नाम लाखोळी शंकरा। समर्पिली गंगाधरा।।२।। सुख झाले गे साजणी। प्रेम ठेविले चरणी।।३।। अवघा आनंद आनंद। लक्ष्मणी ब्रह्मानंद।।४।।

१२९५. वेडियाच्या गावा गेले। मन माझे वेडावले।।१।। माझा संसार बुडाला। एकाएकी झाला घाला।।२।। अग्नीमुखी गे इंधन। तेवी जाय गे जळून।।३।। वेडेपण गे निघेना। मज काही गे सुचेना।।४।। बिंदू मुकला सिंधूत। तेवि झाली माझी गत।।५।। लक्ष्मण म्हणे तो गे। जीव वदतो निज अंगे।।६।।

१२९६. बाई देव पाहाया गेले। मन देवाने गे नेले।।१।। मन माघारी फिरेना। विसरले मीतूपणा।।२।। आता मुकले संसारा। बाई तुमच्या व्यवहारा।।३।। झाली घरबुडवण। माझे झाले नि:संतान।।४।। याचा संग नाही बरा। कोणी न फिरे माघारा।।५।। लक्ष्मण म्हणे बाई। आम्हा येणे जाणे नाही।।६।।

१२९७. स्वानुभवाचे आसनी। स्वामी बैसले साजणी।।१।। गेले दर्शन घ्यावया। त्यांनी शुद्ध केली काया।।२।। परिवार फिरविला। शुद्ध पंथ तो दाविला।।३।। परेपरते ते स्थान। चहुदेहातीत पूर्ण।।४।। व्यक्त सारूनि

माघारी। सुखी बैसले मंदिरी।।५।। लक्ष्मणा चरणी वास। सदा स्वानंदविलास।।६।।

१२९८. वेडियाच्या गावा गेले। वेडी होऊनि मी आले।।१।। वेड भरले गे साजणी। मज झाली गे झडपणी।।२।। भूत झोंबले महद्भूत। न कळे कोणा अंत।।३।। लक्ष्मण म्हणे जनाप्रती। केली वेड्याची संगती।।४।।

योगपर अभंग

१२९९. भूचरी खेचरी चाचरी अगोचरी। मुद्रा या हो चारी प्रसिद्धचि।।१।। त्याहाचा तू साक्षी वेगळा तू आत्मा। दृश्य हे अनात्मा भ्रांती सांडी।।२।। दृश्याचा तू द्रष्टा चैतन्याचा लाटा। प्रपंच हा फाटा तुजवरी।।३।। सर्वांचे तू अंग आहेसी निःसंग। श्रुती शिरोभाग ते तू वस्तू।।४।। लक्ष्मण म्हणे शून्याचे शेवटी। ते तू नेटेबोटे पाहे बापा।।५।।

१३००. षड्दळावरी सातवे सहस्रदळ। निर्शून्य निखळ निश्चळ ते।।१।। कोटी सूर्यप्रभा लोपली ज्या स्थळी। स्वानंदाचे मेळी योगी रमती।।२।। मनाते मुरडूनि नेती नेटेबोटे। उघडे ते कपाट गुरुकृपे।।३।। त्या सुखाची गोडी स्वानुभवे कळे। सुखाचे सोहळे सर्वकाळ।।४।। ते सुख बाणता ब्रह्मांडसंपत्ती। वमन मानिती योगीश्वर।।५।। लक्ष्मण म्हणे सदय पुरुष। त्याहा तेथे वास अखंड हो।।६।।

१३०१. चैतन्याची मूस ओतिली सगळी। नेत्राचे बुबुळी दीप्तिरूप।।१।। तया पलीकडे ब्रह्मरूप बा रे। निघोट ते सारे दीप्तिरूप।।२।। गुरुकृपे तेचि व्हावे हो आपण। मीतूते सारून जावे तेथे।।३।। अनुर्वाच्य तरी निःसंग होऊन। उन्मनी लक्षून जावे तेथे।।४।। उन्मनीची तेथे आहे ढेप बा रे। हिरियाचे बा रे टाके उघडे।।५।। लक्ष्मण म्हणे तोचि हा उजाळा। माय ते जिव्हाळा ज्याचा तो हा।।६।।

१३०२. उन्मनीची घाटी शून्याचे शेवटी। प्रकाशाचे लाटी उघडी हो।।१।। प्रकाशाची खाणी नुरे नादध्वनी। अलक्ष लक्षूनि जावे तेथे।।२।। निःसंग होऊनि जावे निजस्थळा। उघडावा डोळा डोळियाचा।।३।। जागृती सुषुप्ती सारूनिया तुर्या। उन्मनीचे ठाया जावे वेगी।।४।। लक्ष्मण म्हणे अंगे तेचि व्हावे। स्वानुभवसोय सापडे हो।।५।।

१३०३. औटपीठ गोल्हाटा होऊनिया वाट। मार्ग तो धुदाट चालिला हो।।१।। त्रिकुट शिखरी सत्रावी सुंदरी। तिचिये आधारी देह वर्ते।।२।। अनुहत वाद्य वाद्याची झ्यांगड। नादे हे ब्रह्मांड कोंदले हो।।३।। सहस्रदळी प्रभो परमात्मा वसे। स्वयंप्रकाश तो निजरूप।।४।। अनंत भानूंचा प्रकाश लोपे रे। ऐसे ते आहे रे नित्यानित्य।।५।। लक्ष्मण म्हणे गुरुकृपे ते रे। पाहता नुरे रे जन्मगोवा।।६।।

१३०४. तुर्येपलीकडे उन्मनीची वस्ती। तेथे केली वस्ती योगिराये।।१।। तेथे गुरुराये नेले हो फिरून। दाविले निधान माझे मज।।२।। पाहाता ते डोळा भरले अंगी गे। भरला आनंद गे सर्व देही।।३।। स्वयंप्रकाश जाहला उजेड। अवघा चंद्रचूड मागेमोहरे।।४।। मीतूपणातीत तोचि तोचि तोचि। उघडी चिन्मयाची खाणी की गे।।५।। लक्ष्मण म्हणे मनचि ते झाले। गुरुमाय माये फळली हो।।६।।

१३०५. नेत्रातील बाहुली तिचे पलीकडे। चिन्मय उघडे पाहा की गे।।१।। पाहाणे ते घडे चंचळ वारून। देखणे सारून नेत्राचे गे।।२।। मनाचे शेवटी उन्मनीचे पेठी। उलटी हातोटी गुरुकृपे।।३।। अवघा तो झल्लाळ शून्यातीत निखळ। रंग ते सकळ त्याचे सत्ते।।४।। लक्ष्मण म्हणे गुरुपुत्र पाहती। तेचि अंग होती ब्रह्म स्वये।।५।।

उपदेश

पूजन

१३०६. लिंग हृदयी असून। त्याते गेले विसरून।।१।। बाह्य करिती पूजन। नेणूनिया निजधन।।२।। लिंगमहिमा नेणती। म्हणूनिया ते भ्रमती।।३।। इष्टलिंगपूजेविण। नोहे कदा समाधान।।४।। लक्ष्मण म्हणे देही। इष्टलिंग ते अक्षयी।।५।।

१३०७. लिंगाचे पूजन तुला आवडेना। बटकीचा राणा झालासी रे।।१।। डफगाणे गाशी बा रे प्रेमयुक्त। विषयी उन्मत्त झालासी रे।।२।। पापकर्मी मन गुंतविसी बापा। परि त्या विश्वरूपा अंतरलासी।।३।। पुढे दुःख बापा भोगशील फार। कृतांत हा क्रूर दंडील रे।।४।। लक्ष्मण म्हणे फार प्राणी

भुलले। जाऊनि पडले कूपामाजी।।५।।

१३०८. लिंगपूजनाचा का हो त्रास तुम्हा। ध्या हो परब्रह्मा तारक तो।।१।। निर्जर करिती शिवाचे पूजन। लक्ष्मीरमण शिव पुजी।।२।। तुम्हाप्रती का हो पूजन सुचेना। का रे योनी नाना भ्रमतोसी।।३।। व्यर्थ वल्गना करिसी वाचाळी। पुढे होशी कष्टी सत्य मान।।४।। लक्ष्मण म्हणे व्हा हो सावधान। काळ तरी जाण आला पाहे।।५।।

१३०९. वीरशैव बापा म्हणविसी तू रे। पूजेचा विचार कळेना रे।।१।। जारकर्माप्रती सावध तू होशी। हृदयनिवासी अंतरला।।२।। लिंगजंगमगुरुमहिमा कळेना। ग्रामगीते नाना गातोसी रे।।३।। उगा का उन्मत्त झालासी रे बंडा। काळाचा कोरडा वाजेल रे।।४।। लक्ष्मण म्हणे काळ तो रे क्रूर। मारा अनिवार आहे बापा।।५।।

१३१०. लिंगपूजेचा हो त्रास। मानी कुकर्मी हव्यास।।१।। मायबापा न दे अन्न। झाला दासीते शरण।।२।। डफगाणे प्रिय झाले। अर्थासंगे डोलू लागे।।३।। पुराणाचा त्रास मानी। कुटाळाचा मुकुटमणी।।४।। कैफ पिऊन धुंद झाला। म्हणे श्रेष्ठ मी सर्वाला।।५।। लक्ष्मण म्हणे ते हो। नरकी बुडाले पाहा हो।।६।।

१३११. शिवपूजनाचा उल्हास धरावा। परमात्मा स्तवावा वारंवार।।१।। कामक्रोधाप्रती विवेके आवरावे। मन हे लावावे स्वरूपी सदा।।२।। भक्तीचे लक्षण हेचि बापा जाण। नवविधा जाण भक्ती आहे।।३।। प्रभूचे हो नाम कंठी हे बांधावे। निगर्वी असावे सदा बापा।।४।। लक्ष्मण म्हणे नामे पापे हरती। उमाईचा पती वश होय।।५।।

१३१२. देह वाराणसी आत्मा विश्वनाथ। पुजावा समर्थ दयाघन।।१।। अविद्यापूर माया उतरावा बा रे। परमात्मा पुजावा शुद्ध भावे।।२।। कामक्रोधाचिये पडो नये छंदी। आत्मा कृपानिधी पुजावा हो।।३।। ऐसा तो परमात्मा देव अधिदेव। लक्ष्मण म्हणे आत्मा तोचि देव।।४।।

१३१३. देह ही अयोध्यापुरी असे जाणा। आत्माराम राणा राज्य करी।।१।। त्याचे आज्ञेकरूनि सकल वर्तती। ब्रह्मादी पूजिती अक्षयी त्याते।।२।। पिंडब्रह्मांडाचा तोचि अधिकारी। व्याप्त चराचरी आत्माराम।।३।। आत्माराम

पुजावा भावे हो करून। लक्ष्मण म्हणे हेचि पूजा जाण।।४।।

१३१४. हरीने पूजिला देव शूळपाणि। कमळे आणूनि समर्पिली।।१।। सहस्र कमळे नित्य प्रेमेकरून। प्रेमे नारायणे समर्पिली।।२।। कोणे एके दिनी पुष्प कमी आले। अघटित केले देवराये।।३।। नेत्र काढूनिया पायी रे ठेविला। शिव तोषविला भक्ती करून।।४।। शिव दयाघन झाले हो प्रसन्न। ब्रह्मांडाचे दान दिले त्यासी।।५।। ब्रह्मांडाचा अधीश त्रैलोक्याचा पती। झाला रे श्रीपती शिवकृपे।।६।। सर्व देवगण गंधर्वाचा अधीश। स्वामी तो महेश सर्वा वंद्य।।७।। त्याते विसरूनि करिता बंडाई। का रे व्यर्थ आई कष्टविली।।८।। लक्ष्मण म्हणे त्याचे पाय धरा। सुखी वास करा शिवापायी।।९।।

१३१५. अहो एका पत्रासाठी। देतो धुर्जटी भेटी।।१।। प्रेमे शंकर पुजा हो। भक्तसखा तो आहे हो।।२।। ताते सुखी केले फार। स्वामी दयेचे आगर।।३।। दुःसंग हा विसरा। तात होतसे सोयरा।।४।। अहो कैलासनिवासी। सदा वसे भक्तापाशी।।५।। लक्ष्मण म्हणे हर। भक्तजनांचे माहेर।।६।।

१३१६. आपला आपण कैसा केला घात। सोडिले निवांत पद ते हो।।१।। विषय विषपान आनंदे करून। पडले गुंतून दुःखार्णवी।।२।। कोसल्यामध्ये तो कीडा हो गुंतला। तैसे या जीवाला झाले मोहे।।३।। आता दुःखाप्रती अंतचि लागेना। स्मरू पंचानना चला चला।।४।। लक्ष्मण म्हणे आता गुंतू नका। पुजू त्या त्र्यंबका राहू पायी।।५।।

१३१७. शिवपूजक ते सर्वमान्य झाले। शिवसभे गेले भक्तराज।।१।। पापी ते गुंतले माझे माझे म्हणून। करिती भ्रमण नाना योनी।।२।। चुकले वर्माते गुह्य हो कळेना। अती विटंबना दैन्य फार।।३।। विषयी गुंतले झाले आसक्त फार। तेणे विश्वंभर दुरावला।।४।। लक्ष्मण म्हणे पशूहूनि हीन। काय ते शहाणे म्हणविती।।५।।

१३१८. द्रव्य दिले देवे करा काही हित। प्रभो भगवंत पुजा प्रेमे।।१।। अन्नदान करा योग हाचि बरा। अतिथीचा करा सन्मान हो।।२।। साधुसंग धरा चुकती येरझारा। अनादी सोयरा वश होतो।।३।। निगर्वी असावे सर्वा लीन व्हावे। स्वहित करावे काळ आला।।४।। लक्ष्मण म्हणे सफल संसार।

प्रपंची जे शूर झाले फार।।५।।

१३१९. हृदयी आत्मलिंग धन। केवळ असूनि निधान।।१।। त्याते विसरले प्राणी। म्हणूनि भोगिती जाचणी।।२।। गुरुकृपे ओळखून। प्रेमे करावे पूजन।।३।। लक्ष्मण म्हणे मन। त्याते करावे अर्पण।।४।।

१३२०. आत्माराम निरंतर। पुजावा तो सर्वेश्वर।।१।। सकल पूजेमाजी सार। योगी रमती निरंतर।।२।। शंकर सांगे देवीप्रती। आम्ही पुजितो आत्मज्योती।।३।। लक्ष्मण विनवी गुरुप्रती। तुमचे कृपे कळली युक्ती।।४।।

१३२१. शिव पूजिलिया भव हा उरेना। ब्रह्म सनातना पुजा वेगी।।१।। पूर्वी सुखी झाले पापी दुराचारी। जार आणि चोर वंद्य झाले।।२।। प्रभो तो दयाळ त्याते विसरता। वाया हो भ्रमता लाभ काय।।३।। लक्ष्मण म्हणे दृढ भाव धरा। पुजा त्या शंकरा वंद्य व्हाल।।४।।

१३२२. शिवपूजनाचा कंटाळा नसावा। अक्षयी असावा स्मर त्याचा।।१।। चालता बोलता त्याते बा स्मरावे। व्यवहारी वर्तावे सुखरूप।।२।। भोक्ता शिव म्हणूनि भोजन करावे। नाम रे स्मरावे ग्रासोग्रासी।।३।। लक्ष्मण म्हणे ऐसे जे वर्तती। त्याते भवगती आतळेना।।४।।

भजन–कीर्तन

१३२३. देवाशी म्हणशी दारिद्र्य का दिले। पूर्वकर्म केले भोगी आता।।१।। दिले ठेवीना प्रभो देईना कोणाते। विचारी मनाते पुरतेपणी।।२।। संचित क्रियमाण भोग हा चुकेना। नाना रे यातना पूर्वकर्म।।३।। लक्ष्मण म्हणे भजन करी रे। प्रभो तो हरी रे भवव्यथा।।४।।

१३२४. तुझा त्वाचि घात केला सत्य मान। पडलासी गुंतून मायामोही।।१।। बद्ध तू नाहीसी मुक्त तू आहेसी। बांधला गेलासी कल्पनेने।।२।। भ्रमे भ्रमलासी वर्म चुकलासी। सद्गुरू देवासी विचारी रे।।३।। करिती ते कृपा भ्रमनिरसन। देव पंचानन भेटविती।।४।। स्वल्प हे साधन करी तू भजन। देव दयाघन वश होय।।५।। लक्ष्मण म्हणे स्वहिताची जोडी। करी रे तातडी भ्रमू नको।।६।।

१३२५. डोळियाचा डोळा उघडिला शंकरे। भक्तांचे माहेर सत्य सत्य।।१।। अज्ञान ही धुळी भरली नेत्रात। तेणे हा आकांत दुःखाचा हो।।२।। त्रितापाबाहेर

कोणी हो निघेना। दुःख हे मिटेना गर्भवास।।३।। प्रभोते जे शरण गेले निजभक्त। सुख ते शाश्वत पावले हो।।४।। अविनाशपदी राहिले जाऊन। स्वानंदजीवन सखा केला।।५।। लक्ष्मण म्हणे करा हो भजन। स्वामी पंचानन वश होतो।।६।।

१३२६. काय जन्म व्यर्थ गमाविसी बापा। स्तवा विश्वरूपा भव हरी।।१।। तुज दिसे सत्य परि हे असत्य। असत्याते सत्य मानू नको।।२।। ज्यायमान सर्व सत्य देवराव। वेगी उमाधव वश करा।।३।। चुकतील घाले फार रे रक्षिले। तुम्ही ऐकिले असेल हो।।४।। लक्ष्मण म्हणे करा तो स्वाधीन। दीनाते पावन करीतसे।।५।।

१३२७. पायाचा रे महिमा थोर। गुण वदा निरंतर।।१।। ब्रह्मादिक वंदिती पाय। त्रैलोक्या वंद्य तू माय।।२।। ब्रह्मादिकाचे माहेर। तूचि आहेसी विश्वंभर।।३।। सनकादिक योगीश्वर। रंगले स्वरूपी निरंतर।।४।। चरणमहिमा वर्णवेना। सकळ शिणले सर्वज्ञ।।५।। लक्ष्मण काय स्तवील। तू आहेसी विश्वपाळ।।६।।

१३२८. कामांतक तो पुजा हो। काम निष्काम होतो हो।।१।। त्याचे भजन करा हो। भवपाश तो निरसी हो।।२।। इच्छित दान तो देतो हो। करी मंगल तो शिव हो।।३।। मोक्ष देतसे दातार। चुकवितो येरझार।।४।। लक्ष्मण म्हणे देवा। वेगी मज दीना सोडवा।।५।।

१३२९. सर्वाहूनि सान व्हावे ते आपण। करावे भजन प्रेमयुक्त।।१।। अहंकार वाया त्याते स्पर्शू नये। अनुभवसोय धरावी हो।।२।। मीपणा घालवी घालविले फार। मायेचा बाजार गुंतू नये।।३।। लक्ष्मण म्हणे द्वैत ते सांडून। धरावे चरण परेशाचे।।४।।

१३३०. अंती एकलेचि जावे। म्हणूनि देवासी भजावे।।१।। पृथ्वीपती शूर जाण। तेही भक्षिले काळाने।।२।। पांडवा ऐसे बलवान। तेही न राहिले जाण।।३।। अवतारादिक ज्ञाते जाती। मानवाची काय गणती।।४।। काही करा हो साधन। काळ नेईल उचलून।।५।। लक्ष्मण विनवी जना। शरण जा हो पंचानना।।६।।

१३३१. तरीच जन्मा यावे। चिन्मय स्वरूप पाहावे।।१।। अथवा

नामस्मरण। करा सगुणपूजन।।२।। खराहूनि हा रे खर। वृथा जन्मला पामर।।३।। ज्याते काही रे घडेना। व्यर्थ जन्म जाणा।।४।। लक्ष्मण म्हणे भजन। करी होशील पावन।।५।।

१३३२. कुमारीचे वय वाढे। महत्त्व तिचे वाढे पुढे।।१।। पुढे तिजला कन्या कुमर। होती तीते अती सुंदर।।२।। तैसा मुमुक्षा आनंद। भक्तियोगे फळे स्वाद।।३।। अतिप्रेमे भजन करा। प्रभोचरणी वास करा।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त। भक्तियोगे झाले स्वस्थ।।५।।

१३३३. प्रेमा वाढता असावा। भजनी प्रेमा नित्य नवा।।१।। जैसे विषयी वसे चित्त। तैसे नामी व्हावे रत।।२।। शिव होय कृपावंत। भक्ताप्रती सुख प्राप्त।।३।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा प्रिय व्हा शंकरा।।४।।

१३३४. लज्जा सांडूनिया करावे भजन। मीपण गाळून घ्यावे सुख।।१।। प्रेमयुक्त गावे आनंदे नाचावे। पाय ते स्मरावे निरंतर।।२।। भवसमुद्र हा किंचित होतसे। स्वामी तो महेश वश होतो।।३।। लक्ष्मण म्हणे करावे भजन। सुखाचे सदन करा वेगी।।४।।

१३३५. कीर्तनी तो उभा राहे दीनानाथ। स्वामी आदिनाथ दयाघन।।१।। कीर्तन तो रंग प्रिय उमाधवा। नाम कृपाळुवा अती प्रिय।।२।। प्रेमयुक्त गा हो करा तो स्वाधीन। स्वल्प हे साधन फुकाचे रे।।३।। अट्टहास नाही का हो हे रुचेना। मोल खर्चेना करा वेगी।।४।। लक्ष्मण म्हणे करा हो भजन। उमेचा रमण वश होय।।५।।

१३३६. कीर्तनी काळाचे चालेना हो काही। कीर्तनी गोसावी उभा असे।।१।। ब्रह्मानंदे करूनि डुले पंचानन। प्रभोते कीर्तन अती प्रिय।।२।। प्रेमे ते कीर्तन करावे आवडी। ब्रह्मरसगोडी घ्यावे सुख।।३।। शिव कृपाघन देतो आलिंगन। भव निःसंतान होय कृपे।।४।। लक्ष्मण म्हणे प्रभुनाम गोड। अमृताची चाड काय तेथे।।५।।

स्मरण

१३३७. जटाभार नको टिळा माळ टोपी। अक्षयी स्वरूपी रमावे हो।।१।। जिव्हा शिश्न हे हो असावे स्वाधीन। असावे निमग्न निजरूपी।।२।। अरण्याचा वास न लगे सायास। दयाळू महेश स्तवावा हो।।३।। शिवनाम प्रेमयुक्त

उच्चारावे। मन ते करावे पायी स्थिर।।४।। लक्ष्मण म्हणे शिवनाम सार। नामस्मरणे फार धाले प्राणी।।५।।

१३३८. संकट पडता आठवावा शिव। स्मरा महादेव प्रेमयुक्त।।१।। प्रेमयुक्त गाता नुरे भवचिंता। शंभो भक्ताभोवता फिरे सदा।।२।। भक्ताचे संकट स्वये गा निवारी। अंगाची हो करी छाया भक्ता।।३।। काळाचा तो काळ भक्तांचे माहेर। स्वामी विश्वंभर भोळा नाथ।।४।। शिवभक्ताचा तो काळ शरणांगत। उमादेविकांत सखा म्हणून।।५।। लक्ष्मण म्हणे कैलासीचा राव। स्मरा महादेव प्रेमयुक्त।।६।।

१३३९. सुखी संसारी वर्तावे। परि असावा स्मर।।१।। मूळ धरूनि चालावे। नाम घ्यावे सर्वदा।।२।। न लगे अरण्याचा वास। न लगे खटाटोप हो।।३।। सर्व पुराणे सांगती। नाम श्रेष्ठ सर्वांते।।४।। कलियुगी नामाविण। नाही साधन दुजे।।५।। लक्ष्मण म्हणे सुर। नाम गाती सर्वदा।।६।।

१३४०. आपला आपण करावा विचार। प्रभो विश्वंभर स्तवावा हो।।१।। स्त्री पुत्र आप्त खायाचा गोंधळ। मायेचे पडळ भ्रांतिरूप।।२।। मागे जो लागला अन्या तो दूर। स्वहित विचार चुकला हो।।३।। गुंता हा हो फार कधी निरसेना। यातना हो नाना दुःखरूप।।४।। लक्ष्मण म्हणे येथे न गुंतावे। मन ते ठेवावे प्रभुपायी।।५।।

१३४१. नाम मुखी नाही पशू तोचि प्राणी। गुंतला वेसणीमध्ये जाणा।।१।। धिक् त्याचे जिणे धिक् तो व्यवहार। प्रभो गंगाधर आठवेना।।२।। लक्ष चौऱ्यांशी दुःख त्या चुकेना। नीच योनी नाना कष्टरूप।।३।। लक्ष्मण म्हणे नसावा तो संग। साधू ते निःसंग पद देती।।४।।

१३४२. कर्पूरगौर पंचवदन शिव। देवाधिदेव पुरातन।।१।। परात्परधाम सर्वांचे जीवन। ब्रह्म सनातन पूर्णब्रह्म।।२।। आनंदाची खाणी सुखाचा सुकाळ। प्रभो जाश्वनीळ सदोदित।।३।। त्याते वेगी स्मरा भवसिंधू तरा। शंभो गंगाधरा प्रिय व्हा हो।।४।। लक्ष्मण म्हणे पद ते आपुले। देतसे पाउले ध्या हो प्रेमे।।५।।

१३४३. रावणारीमित्र स्तवा तो त्रिनेत्र। त्रैलोक्य हे सूत्र ज्याचे हाती।।१।। त्याचे नाम घेता पापे भस्म होती। अती हीन जाती मुक्त झाल्या।।२।।

इंद्रियास्वाधीन जव देह स्वस्थ। तववरी हित करूनि घ्या हो।।३।। पुन्हा देह ऐसा नाही मिळणार। पुरता विचार करा मनी।।४।। लक्ष्मण म्हणे गेले गेले वय। काही तरी सोय करा वेगी।।५।।

१३४४. नरतनूऐसे क्षेत्र हो पवित्र। मिळूनि त्रिनेत्र स्तववेना।।१।। मोठा पर्वकाळ लाधला लाधला। नरतनू जीवाला प्राप्त झाली।।२।। ऐसा पर्वकाळ वारंवार बा रे। प्राप्त हा नव्हे रे कार्य साधा।।३।। पर्वकाळ थोडा जाईल निघून। मग दैना पूर्ण होईल सत्य।।४।। लक्ष्मण म्हणे कल्प होती जाती। परि दु:खाप्रती खंड नाही।।५।।

१३४५. अहो साधनांचे सार। प्रेमे स्मरावा शंकर।।१।। फार सुलभ साधन। त्याते काही नसे विघ्न।।२।। द्रव्याविण ते होतसे। काही सायासही नसे।।३।। अहो हिंडता फिरता। सुखे व्यवहारी वर्तता।।४।। घ्यावे नाम सर्वदाही। स्मर असावा अक्षयी।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। फार साधन सोपे रे।।६।।

१३४६. कोणे एका स्त्रीचा पती। गेला देशाग्रामाप्रती।।१।। आणिले स्त्रीते अलंकार। मोती नाकीचे सुंदर।।२।। दिले स्त्रीते अलंकार। ल्याली स्त्री ती अलंकार।।३।। मोती नाकी ते घातले। फार हर्षे स्त्री ती डोले।।४।। लोका दाखवी ती बाई। माझ्या पतीऐसा पती नाही।।५।। फार उपकार मानला। तेथे होती प्राज्ञ अबला।।६।। म्हणे मोती तुज दिले। त्याचे उपकार झाले।।४।। ज्याने नाक दिले बाई। स्मर त्याचा का गे नाही।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। जग तैसेचि झाले रे।।६।।

१३४७. अहो बैसूनि एकांती। आठवावी निजमूर्ती।।१।। नानावृत्ती आवरून। मन न्यावे परतून।।२।। परतता तेचि अंग। वासनेचा तुटे संग।।३।। जेव्हा निजसंग घडे। तुटे द्वैत हे बिरडे।।४।। आत्म-अनुभव थोरी। जाणितली योगेश्वरी।।५।। निजसुखाचा सोहळा। आपआपणा बंबाळा।।६।। लक्ष्मण म्हणे बा रे। गुरुकृपे वेगी घ्या रे।।७।।

१३४८. शिव शिव प्रेमे स्मरा। तेणे चुकती येरझारा।।१।। तापत्रयाचे खंडन। होत असे हो कल्याण।।२।। नामी ठेवूनि विश्वास। त्याचा असावा निजध्यास।।३।। त्याचे कृपे सुख होय। दयाळू तो स्वामिराय।।४।। नामी

फार तरले हीन। श्रेष्ठ नामाचे महिमान।।५।। लक्ष्मण म्हणे तात। पुरवी भक्तांचे मनोरथ।।६।।

१३४९. अहो दीपावरी उडी। पतंग घाली हो तातडी।।१।। मीन गुंते स्वादास्तव। तेवी गुंते हा मानव।।२।। विषयकर्दम दारुण। येथे राहिले गुंतून।।३।। प्रभोपायाचा विसर। तेचि दुःखाचे डोंगर।।४।। दुःखा नाही पारावारा। माया-अविद्येचा फेरा।।५।। दुःखरूप हे जाणून। साधू गेले रे शरण।।६।। लक्ष्मण म्हणे शिव। प्रेमे स्तवा महादेव।।७।।

१३५०. प्रेमयुक्त नाम सदा उच्चारावे। व्यवहारी वर्तावे सुखरूप।।१।। अंतःकरण स्वच्छ होतसे निर्मळ। अविद्याकल्लोळ मागे करी।।२।। भवपाश तुटे देवराय भेटे। मायिक हे खोटे दिसे मग।।३।। स्वल्प हे साधन करा हो तातडी। काळ आला धाडी घाली जव।।४।। लक्ष्मण म्हणे पूर्वी फार धाले। तुम्हीही ऐकिले असेल हो।।५।।

१३५१. नाम ते फुकाचे मुखात येईना। कर्महो घडेना यथासांग।।१।। पूजेचा कंटाळा वृत्ती बाळपण। साधुदर्शन नसे प्रिय।।२।। परदारा परद्रव्य ते घे सदा मन। जातसे धावून अती प्रेमे।।३।। काममद अंगी द्रव्याचा तो ताठा। प्रभो नीलकंठा स्मरेनाशी।।४।। लक्ष्मण म्हणे गुंतले वेसणी। यमाने बांधूनि नेले फार।।५।।

१३५२. शिवनाम मिष्ट फार। गाती ब्रह्मादी सुरवर।।१।। अमृताहूनि फार ज्येष्ठ। गाती योगी ज्ञानी श्रेष्ठ।।२।। भवरोग निरसून। दावी चिन्मात्र निर्गुण।।३।। शिव वदता होय शिव। प्रेमयुक्त नाम गावे।।४।। लक्ष्मण म्हणे फार। नामे झाले ज्येष्ठ सुर।।५।।

१३५३. जन्म आल्याचे सार्थक। प्रेमे स्तवावा त्र्यंबक।।१।। पाय प्रभोचे सेवावे। येणे जाणे मिटवावे।।२।। नाही तरी सर्व शीण। व्यर्थ जननी कष्टवून।।३।। लक्ष्मण म्हणे ध्या हो। कार्य आपुले साधा हो।।४।।

१३५४. मी तू खोडी ही सांडावी। षड्रिपू ही दंडावी।।१।। मग पाहावे ते सुख। स्वरूप चिन्मात्र ते एक।।२।। केवळ आनंदाची राशी। स्वानुभवे ध्यावे त्यासी।।३।। मायागुणे करितो लीला। शंभो अक्षयी शोभला।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते। ध्याता नुरे जन्ममृत्यू।।५।।

१३५५. स्मरा शिव शिव शिव। स्मरे होय स्वानुभव।।१।। स्वानुभव ज्ञान होता। तुटे जन्ममरण गुंता।।२।। ऐसे स्मराचे महिमान। स्मरे ब्रह्म होय पूर्ण।।३।। विसराने संसार। नाना दुःख ते अपार।।४।। लक्ष्मण म्हणे स्मरा। संतसंग प्रेमे धरा।।५।।

१३५६. शिवनाम प्रेमयुक्त गाये सदा। त्याते भवबाधा आतळेना।।१।। असो जातिहीन कुरूप कुश्चळ। ब्रह्मांडाचा पाळ वसे तेथे।।२।। नामाचा महिमा मज वर्णवेना। नाम पंचानना अती प्रिय।।३।। लक्ष्मण म्हणे घडो त्याचा संग। पद ते अभंग देतो बाप।।४।।

१३५७. शिवनाम घेई वाचे। मग ब्रह्मपदी नाचे।।१।। नामरूपी रंगे मन। मन होतसे उन्मन।।२।। पद येतसे ते हाता। हटे भव तुटे व्यथा।।३।। लक्ष्मण म्हणे नाम। गा प्रेमे व्हा आराम।।४।।

१३५८. शिवनाम गाय नसे तुज भय। स्वये शिव होय भ्रमू नको।।१।। प्रेमयुक्त गाता वासना निर्मूळ। षड्रिपू खळ वश होती।।२।। समाधान तेणे होतसे सहज। स्वानंदाचा फुंज दाटे अंगी।।३।। शिवप्रभू भेटे भवपाश तुटे। मायावी हे खोटे दिसे मग।।४।। लक्ष्मण म्हणे देव भक्त एक। मायेने अनेक दिसे भासे।।५।।

१३५९. शिव हा अक्षयी कर्मधर्मातीत। जगी विराजित जगदीश्वर।।१।। सत्तामात्रे होय त्याच्या सर्व क्रिया। लिप्त कोणे कार्या नसे प्रभो।।२।। ब्रह्मांडा आंतरबाहेर तो तात। हृदयी नांदत त्याते स्तवा।।३।। त्याते व्हा शरण तुटती बंधन। प्रभो आपुलेपण देतो भक्ता।।४।। लक्ष्मण म्हणे येथे गुंतू नका। स्मरा त्या व्यापका वंद्य व्हाल।।५।।

१३६०. बैसता उठता चालता बोलता। स्मरावा तो ज्ञाता सदाशिव।।१।। शिव स्मरा ऐसे साधनचि नाही। स्मरावा अक्षयी सौख्य दिसे।।२।। सुख ते अविनाश अक्षयी आनंद। होय ब्रह्मानंद निजध्यासे।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त शिव होय। स्मरा प्रभुपाय द्रव्य नको।।४।।

१३६१. अनाक्षर ब्रह्म पूर्ण। तोचि प्रभो हा सगुण।।१।। भक्तिसुखालागी तात। प्रेमे झाला देव भक्त।।२।। त्याते स्मरा स्मरा स्मरा। निजानंदे रंग भरा।।३।। नका गुंतू या विषयी। दुःख दिसे हे अक्षयी।।४।। लक्ष्मण म्हणे

पायी। सुख शोभे ते अक्षयी।।५।।

१३६२. कर्म ते करावे फलाशा नसावी। विवेकाचे डोही बुडी द्यावी।।१।। मन वाटू नये लावावे स्वरूपी। चिन्मात्र त्या रूपी व्हावे मग्न।।२।। निंदा अथवा द्वेष कदा न करावा। भूती तो पाहावा भगवान।।३।। लक्ष्मण म्हणे येणे समाधान। प्रभो पंचानन वश होय।।४।।

१३६३. त्रिपुरांतक महाराज। भक्तजना विसावा।।१।। मायाव्यतिरिक्त करी। महाराज दुःख वारी।।२।। निजानंदस्वरूपी ठेवी। भक्तजनाते तात।।३।। त्याते स्मरा स्मरा वेगी। दूरदेशी राहता।।४।। सांडा दुःखप्रांत हा हो। फिरा मूळधामी त्या।।५।। लक्ष्मणा सुख दिले। मायबाप शंकरे।।६।।

१३६४. सदोदित प्रभोपाय। आठवावे प्रेमे हो।।१।। सदा व्यवहारी वर्तता। स्मर न सोडावा तो।।२।। लोभीयाचे चित्त जैसे। सदा धनापाशी त्या।।३।। सुखी संसारी वर्तावे। शिवपाय आठवूनि।।४।। लक्ष्मण म्हणे येणे। चुके चुके भवदुःख।।५।।

१३६५. अहो संकट ते भारी। ओढवे ते कैसेही।।१।। स्वामी शंकर स्तवावा। प्रेमयुक्त निजछंदे।।२।। स्वामी संकट निवारी। धावूनिया निजांगे।।३।। सर्व अंगाची तो छाया। करी स्वामी विरूपाक्ष।।४।। भक्तजनापाशी वसे। अती सदय शिव।।५।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तसंकट वारी।।६।।

१३६६. शिव तो दयाळ करितो मंगल। स्मरा तो दयाळ सुखदाता।।१।। भव अंधःकार निरसन करी। स्वामी त्रिपुरारी स्मरा वेगी।।२।। निरुपम पद देतो भक्ताप्रती। चारी त्या रे मुक्ती ओळंगिती।।३।। त्याचा तुम्हाप्रती विसर पडला। वाउगा गलबला करिता हो।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते व्हा शरण। पद ते सेवून व्हा हो तेचि।।५।।

१३६७. शंभो कैलासीचा राणा। स्मरा वेगी तो तात।।१।। मोठमोठे त्याला ध्याती। का हो तुम्ही विसरता।।२।। मोठमोठे म्हणाल कोण। तेही सांगतो ऐका।।३।। ब्रह्म इंद्र नारायण। ध्याती अक्षयी ते पाय।।४।। सिद्ध योगी मुनीश्वर। ध्याती अक्षयी शिव भोळा।।५।। दिशापती ते दिक्पाळ। त्याच्या कृपे नांदती।।६।। सर्वाप्रती देणे त्याचे। पाहा शोध पुराणी।।७।। भवबाधा निरसून। देतो पद आपुले।।८।। फार दयाळू शंकर। बहू उद्धरिले

हीन।।९।। लक्ष्मण दुराचारी। सोडविले गुरुराये।।१०।।

१३६८. अनंत ब्रह्मांडे ज्याचे रोमी वसती। तो हा पशुपती ध्या हो वेगी।।१।। ज्याचे आज्ञे सर्व वर्तती रे देव। तो हा महादेव काशीवासी।।२।। वेदा तो बोलवी सूर्या तो चालवी। ऐसा सर्वठायी अलिप्त तो।।३।। अहंकृतीने कदा तो भेटेना। गर्व त्या आवडेना दुरावला।।४।। लक्ष्मण म्हणे निगर्वी होऊन। पाहा पंचानन देही आहे।।५।।

१३६९. जानकीजीवन ध्यातो शिवाप्रती। सावित्रीचा पती गातो गुण।।१।। शिवयोगीश्वर प्राज्ञ मुनीश्वर। शिवा निरंतर प्रेमे ध्याती।।२।। श्रेष्ठ तो दयाळ प्रभो विश्वपिता। त्याते विसरता नीट नाही।।३।। नाना त्या उपाधी करिता आवडी। विषयबांदोडी गुंतती हो।।४।। लक्ष्मण म्हणे व्हा वेगी शरण। तुटती बंधन सुख दिसे।।५।।

१३७०. अहो स्वानंदनगरी। शोभे भक्त तो साह्यकारी।।१।। केवळ निर्गुण निर्गुण। भक्तजनाते सगुण।।२।। भक्त ध्याती त्या अनंता। मायागुणा त्याची सत्ता।।३।। त्याते स्मरावे अंतरी। चुकवा चौऱ्यांशीची फेरी।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। अंतर्बाह्य महादेव।।५।।

१३७१. वेदान्ताचे सार शिवब्रह्म जाणा। अगम्य पुराणा परमात्मा तो।।१।। ब्रह्मा नारायण भजनी सादर। देवाचे माहेर जगद्गुरू।।२।। अमरावतीनाथ पुरंदर स्तवी हो। सर्ववंद्य बाप उमावर।।३।। तेहतीस कोटी देव भजनी सादर। दिक्पती कुबेर शिवभक्त।।४।। लक्ष्मण म्हणे शिव आदिपुरुष। स्तवा तो महेश मोक्षदाता।।५।।

१३७२. मनाबुद्धि–अगोचर। चहुवाचेचिया पर।।१।। पाचापंचविसातीत। स्वयंप्रकाश जो निवांत।।२।। श्रुती स्मृती ज्याला ध्याती। अनंत ब्रह्मांडाचा पती।।३।। तोचि सर्वांचे ह्रदयी। असूनि कोणा शुद्धी नाही।।४।। समीपचि दूर झाले। दुःखप्रवाही पडले।।५।। लक्ष्मण म्हणे फिरा। वेगी स्मरा गंगाधरा।।६।।

१३७३. तीर्थांमध्ये ते प्रयाग। श्रेष्ठ आहे शिरोभाग।।१।। तत्त्वांमध्ये ते आकाश। सर्वत्राते तेथे वास।।२।। तेवी शंकर हा धनी। सर्वामूळ शूळपाणि।।३।। मूळपुरुषा स्मरा हो। भवदुःख हे वारा हो।।४।। प्रभुकृपा

संपादावी। सुख देतसे अक्षयी।।५।। लक्ष्मण म्हणे हीन। केले प्रभोने पावन।।६।।

१३७४. अहो स्मरा तो शंकर। व्यर्थ माया हा बाजार।।१।। मृगजळ नाही खरे। तेवी दृश्य आहे बा रे।।२।। जेवी आकाशाचा रंग। तेवी दिसे मिथ्या संग।।३।। मुले तृप्त झालो म्हणती। मृत्तिकेचे अन्न करिती।।४।। खापराचे करिती होन। काय खरे ते कांचन।।५।। लक्ष्मण म्हणे बा हो। तेवी संसार हा हो।।६।।

१३७५. नाममात्र हे लुगडे। परि ते सूतचि उघडे।।१।। तैसा जगी शिव वसे। परब्रह्म तो अविनाश।।२।। जळी तरंग हो दिसे। तत्क्षणी पाहा नाशे।।३।। तैसा जाणा हा आकार। दिसे लोपे शिव अक्षर।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते। स्मरा सुख देतो नित्य।।५।।

१३७६. अनंत ब्रह्मांडे उभवी। सत्तामात्रे हो लपवी।।१।। ऐसा श्रेष्ठ नारायण। तोही पुजी शिवचरण।।२।। ऐसा शिव हा अक्षयी। पाहा दिसे सर्वठायी।।३।। त्याते विसरले प्राणी। दुःख भोगिती म्हणूनि।।४।। लक्ष्मण म्हणे स्मरा। चुकती दुःखे येरझारा।।५।।

१३७७. सदाशिव सदा स्मरू। नाम प्रेमे ते उच्चारू।।१।। करा करा वेगी त्वरा। दुःखरूप हा संसार।।२।। येथे गुंतता सुख नाही। करा विचार धरा सोई।।३।। सुख घेऊ अविनाश। सखा करू तो महेश।।४।। लक्ष्मण म्हणे घाला। मोठा दिसे काळ आला।।५।।

१३७८. अहो पापा होय क्षय। प्रेमयुक्त स्मरा पाय।।१।। प्रेम प्रिय प्रभोप्रती। न लगे राज्यादी संपत्ती।।२।। प्रेमळाचा सखा झाला। निज अंगे रक्षी त्याला।।३।। लक्ष्मण म्हणे हर। भक्तजनांचे माहेर।।४।।

१३७९. पाहावा ॐकार पुजावा शंकर। स्मरावा शंकर अहर्निशी।।१।। हृदयी शंकर बाहेर शंकर। जगी हा शंकर भरला दाट।।२।। बोलवी शंकर चालवी शंकर। हालवी शंकर प्राणाप्रती।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते विसरू नये। करितो निरामय आपणाऐसे।।४।।

१३८०. अक्षय शंकर अद्वय शंकर। मनाहूनि पर परमात्मा तो।।१।। आनंद शंकर स्वानंद शंकर। करितो शंकर नाना लीला।।२।। निर्गुण शंकर

सगुण शंकर। भक्ताचे माहेर शंकर स्मरा।।३।। लक्ष्मण म्हणे स्मरा स्मरा तात। आपणाऐसे भक्त करितो स्मरा।।४।।

१३८१. शिव भगवान स्तवा पंचानन। करितो कल्याण दयावंत।।१।। मृगी ती पाडसा लावी स्तनाप्रती। तैसा उमापती भक्त रक्षी।।२।। दृष्टान्त मायिक साजेना त्याप्रती। स्तवा कृपामूर्ती उमापती।।३।। लक्ष्मण म्हणे स्वामी दयाघन। धरा ते चरण प्रेमयुक्त।।४।।

१३८२. शिवपूजनाचा कंटाळा नसावा। अक्षयी असावा स्मर त्याचा।।१।। चालता बोलता त्याते बा स्मरावे। व्यवहारी वर्तावे सुखरूप।।२।। भोक्ता शिव म्हणूनि भोजन करावे। नाम रे स्मरावे ग्रासोग्रासी।।३।। लक्ष्मण म्हणे ऐसे जे वर्तती। त्याते भवगती आतळेना।।४।।

१३८३. कर्णद्वारे बा रे शिवकथा प्यावी। आवडी असावी तेथे सदा।।१।। मनन करूनि जीवी ते धरावे। मन हे लावावे प्रभोपायी।।२।। निजध्यास त्याचा असावा सर्वदा। स्वानंदाच्या कंदा विसरू नये।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य तोचि नर। प्रभोचा विसर न पडे ज्यासी।।४।।

१३८४. बहुता सुकृते नरजन्म तुज। स्तवी महाराज शिव प्रेमे।।१।। ऐसा जन्म पुढे नाही मिळणार। वेगी सोय धर काळ आला।।२।। सावध होऊनि करी शिवस्मरण। मग तुज कोण बाधू शके।।३।। लक्ष्मण म्हणे शिवभक्तापुढे। यमाजी बापुडे काय करी।।४।।

१३८५. काम त्यांनी निर्दाळिला। स्मरा त्या हो जाश्वनीळा।।१।। निष्काम आहे तो शंकर। जगी भरला जगदीश्वर।।२।। सकला चेष्टवी आपण। लिप्त नसे पंचानन।।३।। निर्गुण तोचि रे सगुण। योग दावितसे करून।।४।। भक्ती प्रिय आहे त्याला। भक्तीने तो वश झाला।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। भक्तीपाशी आहे मुक्ती।।६।।

१३८६. उदार आहे तो शंकर। स्तवा का करिता उशीर।।१।। एकनिष्ठे पूजन करा। धरा गिरिजेच्या वरा।।२।। भक्तीने तो वश होतो। इच्छित वर तो देतो।।३।। मागे पुढे तो पाहीना। लुटा वेगी पंचानना।।४।। भक्तीपुढे तो जेर झाला। भक्तांनी तो दीन केला।।५।। सोऽहं शब्दे तो पूजिला। शंकर आपुला सखा केला।।६।। अंतर्बाह्य तोचि दिसे। त्याविण रिते काही नसे।।७।।

लक्ष्मण म्हणे शंकरा। हृदयी पाहा हो ईश्वरा।।८।।

१३८७. प्रभोचे चरित्र का गा ना। सुखरूप का हो व्हा ना।।१।। बिनद्रव्याचे भजन। कैसे आवडेना जाण।।२।। निष्काम वृत्ती आचरा हो। परमात्मा सखा तो करा हो।।३।। नामस्मरण हेचि सार। सर्व साधनांचे माहेर।।४।। फार यत्न नसे जाणा। सुखरूप का हो गा ना।।५।। लक्ष्मणाचा दातार। कीर्तनरंगी असे स्थिर।।६।।

१३८८. मंदाकिनी वाहे जटेमाजी सदा। त्याते वेगी वंदा कार्य साधा।।१।। भवसागर हा आहे हो दुस्तर। येथे गुंता फार गुंतू नका।।२।। प्रेमयुक्त गा हो साधन हे सार। प्राज्ञ योगीश्वर गाती गुण।।३।। लक्ष्मण म्हणे नका वाटू मन। पाय ते स्मरून तेचि व्हा हो।।४।।

१३८९. फुंजू नको वाया सर्व दिसे शीण। पाय ते स्मरून कार्य करी।।१।। पाय विसरून म्हणसी मी धन्य। फार हे बंधन झाले तुज।।२।। करू नये ते कर्म करितोसी बंडा। शिवनाम तोंडा येईना रे।।३।। लक्ष्मण म्हणे करी वेगी हित। नाम सदोदित घेई प्रेमे।।४।।

१३९०. कुमार पितर स्तवा तो शंकर। विश्वाचे माहेर विश्वनाथ।।१।। भवगर्तेतून काढी तो दयाळ। स्वामी जाश्वनीळ आदिनाथ।।२।। कामाचा तो अरी भक्तांचा कैवारी। ब्रह्म इंद्र हरी ध्याती त्याला।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते विसरून। करिता भ्रमण व्यर्थ का हो।।४।।

१३९१. व्यर्थ वल्गना लाभ त्यात काय। स्मरावे ते पाय निरंतर।।१।। ब्रह्मादिक स्तविती पाय सदोदित। विश्वंभर तात स्तवा प्रेमे।।२।। येणेचि हा लाभ आम्हा दिसे मोठा। व्यर्थ खटाटोपा गुंतू नये।।३।। लक्ष्मण म्हणे लाज सोडूनिया। लागलो त्या पाया आम्ही दीन।।४।।

१३९२. भक्ती मुक्ती भुक्ती देतसे शंकर। त्याचा का विसर पडला तुम्हा।।१।। विसर पडला म्हणूनि हे दुःख। प्रभोपाशी सुख अक्षयी शोभे।।२।। मोठा घाला झाला गेली गेली गोष्ट। महान हे कष्ट दिसती येथे।।३।। लक्ष्मण म्हणे स्मरा महादेव। इच्छा पूर्ण करी तो देव श्रेष्ठ।।४।।

१३९३. सदाशिव नाम शोभतसे त्याला। शिव हा शोभला जनी मनी।।१।। त्याचिया नामाची कोण करी गणना। ब्रह्मसनातना ध्याती सर्व।।२।। सर्वांचा

तो देव भक्तास्तव सगुण। विश्वाचे जीवन मूळ बीज।।३।। लक्ष्मण म्हणे सर्वांचे हृदयी। स्मरा तो अक्षयी सौख्य देतो।।४।।

१३९४. देव दयेचा सागर। फार कनवाळू ईश्वर।।१।। अनाथ दीनांचा तो दाता। सकल विश्वाचा तो कर्ता।।२।। हीन दीन फार रक्षिले। भक्त संकटी रक्षिले।।३।। धावूनि घालीतसे उडी। भक्त रक्षिले अनंत कोडी।।४।। लक्ष्मण म्हणे स्तवा। तोचि चुकवील गोवा।।५।।

१३९५. देव दयाळ दयाळ। देव आहे तो निर्मळ।।१।। त्याचे हृदयी दया फार। भक्तजनांचे माहेर।।२।। बहुत पातकी तारिले। दीना मार्गाते लाविले।।३।। जननीजठरी रे जाण। रस चाखवी आपण।।४।। बाहेर काढी रे तो जाण। तेथेही करितो पालन।।५।। मांसामाजी दुग्ध उत्पन्न। करीतसे तोचि जाण।।६।। स्तनामाजी दुग्ध केले। नवल त्याचे एक पाहिले।।७।। दात नव्हते म्हणून। केला केवढा प्रयत्न।।८।। दात दिधले तुजला। देतसे तोचि भक्षायाला।।९।। त्याचा केवढा उपकार। करा नामाचा गजर।।१०।। तेणेचि तो समाधान। चुकवील येणे जाणे।।११।। लक्ष्मणावरी उपकार। केला देवा तुम्ही फार।।१२।।

१३९६. शुकसनकादिक स्तविती जयाला। ब्रह्मांडाच्या पाळा तुम्ही स्मरा।।१।। प्रभो शूळपाणि ब्रह्मांडाचा धनी। त्रिभुवनमांडणी ज्याने केली।।२।। घटी मठी तोचि व्याप्त असे जाण। त्याचे महिमान कोण जाणे।।३।। सर्वात असूनि लिप्त तो होईना। पार रे कळेना सुरनरा।।४।। लक्ष्मण म्हणे पूर्णब्रह्म शिव। स्वमाये तो देव क्रीडा करी।।५।।

१३९७. शिव ब्रह्म सत्य शिव ब्रह्म सत्य। पार हो शेषाते कळेना हो।।१।। शिव सर्वोत्तम स्तवा वारंवार। मोक्षाचे आगर शिव आहे।।२।। मोक्ष तो देईल पावन करील। माया निरसील क्षणामाजी।।३।। त्याचे पाय धरा त्याचे पाय धरा। धरा महेश्वरा भक्तिबळे।।४।। लक्ष्मण म्हणे तोचि त्राता जना। स्मरा पंचानना वेगी बा रे।।५।।

१३९८. आत्मलिंग श्रेष्ठ हृदयी अक्षयी। वसे सर्वाठायी परमात्मा तो।।१।। त्याते विसरून विषयी गुंतता। सुखाची ती वार्ता स्वप्नी नाही।।२।। अनंत यातना अनंत कल्पना। येथे प्राणी जाणा सुख पाहे।।३।। भक्तिबळे ज्ञान

जेव्हा प्राप्त होय। तेव्हा निरामय दिसे बाप।।४।। लक्ष्मण म्हणे अक्षयी स्मरण। करावे जीव पूर्ण ब्रह्म होय।।५।।

१३९९. न लगे फारसा हो शीण। जप तप अनुष्ठान।।१।। नामामृत हृदयी भरा। हृदयी पाहा त्या ईश्वरा।।२।। आत्मा एक सर्वांभूती। खूण धरावी हो चित्ती।।३।। मन विवेके आकळावे। मग ब्रह्मसुख घ्यावे।।४।। लक्ष्मण पतित दीन। गेला साधूसी शरण।।५।।

१४००. वय गमाविसी रे वृथा। स्मर वेगी दीनानाथा।।१।। खळा फार भुललासी। देवराया विसरलासी।।२।। सकळ कर्मांत हुशार। येथे का रे आळस फार।।३।। कोठे चूक रे पडेना। देव का रे आवडेना।।४।। लक्ष्मण म्हणे भुलला। नरकवास त्या आवडला।।५।।

१४०१. सावध होई रे तू बापा। आठवी त्या विश्वरूपा।।१।। शिव दयेचा सागर। नाम घे रे निरंतर।।२।। नामे पापे भस्म होती। नामे विघ्ने रे पळती।।३।। लक्ष्मण म्हणे नाम। सर्व मंगलाचे धाम।।४।।

१४०२. अनंत ब्रह्मांडे उत्पन्न। करितो स्वमायेकरून।।१।। स्वइच्छे संहार करी। अनेक उत्पत्तीही करी।।२।। ऐसा शिव हा अनादी। पायापाशी सर्व सिद्धी।।३।। लक्ष्मण म्हणे स्मरा। चुकवितो येरझारा।।४।।

१४०३. अनंत ब्रह्मांडे हा खेळ। त्याचे मायेचा गोंधळ।।१।। तोचि भक्तास्तव सगुण। करितो भक्तांचे कल्याण।।२।। त्याचे नाम घेता वाचे। पर्वत जळती पापांचे।।३।। लक्ष्मण म्हणे नाम। घ्या फुकाचे हे काम।।४।।

१४०४. गिरिकाननी रे कासया वसावे। आनंदे वर्तावे जगामाजी।।१।। निष्काम प्रभूचे पूजन करावे। नाम हे वदावे प्रेमयुक्त।।२।। नागवे उघडे कासया शिणावे। मन हे लावावे प्रभोपायी।।३।। प्रारब्धयोगाने होवो जावो काही। विवेकाचे डोही बैसावे हो।।४।। लक्ष्मण म्हणे भव काय करी। प्रभो मदनारी आठवावा।।५।।

१४०५. गिरिजावराचे पाय हो स्मरावे। कासया फिरावे रानीवनी।।१।। कुसमागम कासया सेवावा। साधूचा असावा समागम।।२।। वेदांची ती आज्ञा का हो उल्लंघावी। कर्मे ती करावी साक्षिभूत।।३।। नाम ते फुकाचे का हो न स्मरावे। ग्रामगीत गावे काय लाभ।।४।। लक्ष्मण म्हणे सार्थक करावे।

का हो जन्म घ्यावे नाना योनी।।५।।

१४०६. अन्नदानाऐसे नाही दुजे दान। सुकृती जे जन घडे जया।।१।। या दानाप्रती उपमा नसे रे। यथाशक्ती द्या रे सुख फार।।२।। सर्वाभूती अन्न प्राज्ञ तेचि देती। प्रेमयुक्त गाती गुण बापा।।३।। द्यावे अन्नदान घ्यावे नामस्मरण। हेचि हो साधन श्रेष्ठ दिसे।।४।। लक्ष्मण म्हणे प्रभो दयाघन। भक्तांते धावून प्रेम देतो।।५।।

१४०७. सत्कर्माचा बा रे कंटाळा नसावा। उल्हास असावा भजनाचा।।१।। उद्या करू म्हणशी भरवसा रे नाही। नाशिवंत पाही देह हा रे।।२।। सावध होऊनि पाहे विचारूनि। व्यर्थ नाना योनी का रे जाशी।।३।। होय वेगी शूर नामाचा उच्चार। करी वारंवार प्रेमयुक्त।।४।। लक्ष्मण म्हणे साधन स्वल्प रे। द्रव्य न लगे रे घेई प्रेमे।।५।।

१४०८. शिव सखा करी वृथा का भ्रमसी। आपुले मनासी विचारी रे।।१।। मन हे अनिवार विवेके जिंकावे। काम क्रोध सहज होती दीन।।२।। अक्षयी नाम ते उच्चारावे जाण। मग त्या काळाचे भय नसे।।३।। लक्ष्मण म्हणे स्वल्प हे साधन। नामे तरले हीन दीन बापा।।४।।

१४०९. प्राण्या का भुललासी होय सावधान। काळा दया नाही तो रे अनिवार।।१।। शिवपायाचा बा रे आश्रय तो करी। नाम हे उच्चारी वारंवार।।२।। शिवभक्ताचे रे काळ भय मानी। त्राता शूळपाणि जबरदस्त।।३।। शिवाचे पूजन करी रे प्रीतीने। सुख ते रे घेई वेगी बापा।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य तो संसारी। नाम ते उच्चारी अक्षयी बापा।।५।।

१४१०. महापुरुषांचे ग्रंथ हो पाहावे। मनन करावे त्याचे सदा।।१।। शिवनाम घेता ताप हा उरेना। स्तवा पंचानना परब्रह्मा।।२।। शिव पाहू गेले तेचि शिव झाले। जीवपण गेले त्याहाचे हो।।३।। ऐसा तो दयाळ प्रभो जाश्वनीळ। ब्रह्मांडाचा पाळ स्तवा वेगी।।४।। लक्ष्मण म्हणे भव हा तरा हो। पाय ते धरा हो व्यथा जाय।।५।।

१४११. गर्भी रे रक्षिले नाना युक्तीकरून। त्याते विसरून झालो बंड।।१।। दंतहीन म्हणून दुग्ध रे उत्पन्न। केले कृपाघने स्तनामाजी।।२।। केवढा हा भ्रम केवढा अंधार। पडला विसर ताताचा रे।।३।। वाईट हे झाले पुढे हे

कठीण। दुःख हे दारुण पुढे दिसे।।४।। केवढे आंधळे पाहा हो आपण। जवळी असून दिसेना हो।।५।। गोचिडाते स्तनी दुग्ध हे कळेना। तेवी केले मने आम्हाप्रती।।६।। लक्ष्मण म्हणे मनाते वळून। प्रभूचे चरण पाहू चला।।७।।

१४१२. निदानीचा वाली कोण आहे सांगा। का हो त्या अभंगा स्तवा ना हो।।१।। गर्भामाजी ज्याने रक्षिले आपणा। त्या हो कृपाघना पुजा वेगी।।२।। बाहेर आणूनि रक्षिले रे ज्याने। मांसामाजी दुग्ध उत्पन्न केले।।३।। दंत नव्हते म्हणून दूध निर्मिले। सर्वस्वी पाळिले कृपावंते।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते विसरता। तोचि भवव्यथा चुकवी हो।।५।।

१४१३. त्रिपुर मारूनि भक्त रे रक्षिले। देवाते रक्षिले फार वेळा।।१।। इंद्र आदी देवा संकट पडता। उमाईच्या कांता स्तविती रे।।२।। धावा ऐकूनिया धावे शूळपाणि। रक्षी त्यालागूनि स्वामी माझा।।३।। ब्रह्मा नारायण करिती स्तवन। शिव पुरातन आहे देवा।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते वेगी स्तवा। चुकवा रे गोवा चौऱ्यांशीचा।।५।।

शिवभक्ती

१४१४. विश्वनाथा ऐसा धनी। कैसे विसरले प्राणी।।१।। करिती नीचाची हो सेवा। विसरले खऱ्या देवा।।२।। काय करिती चुका झाल्या। माया अविद्येचा घाला।।३।। विषयी गुंतले म्हणून। दुःख भोगिती दारुण।।४।। खरे नाणे हो चुकले। खोटे फार प्रिय झाले।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती-। विण न चुके हे भ्रांती।।६।।

१४१५. वेदशास्त्रे श्रेष्ठ सर्वही सांगती। करावी हो भक्ती प्रेमयुक्त।।१।। प्रेमळ तो भक्त फार प्रिय देवा। दुजे महादेवा प्रिय नाही।।२।। प्रेमळ भक्ताचे किंचित जीवन। तेणे पंचानन संतुष्ट रे।।३।। प्रेमयुक्त वेगी करा हो पूजन। तुटती बंधन अविद्येचे।।४।। लक्ष्मण म्हणे प्रेमळाचा सखा। स्वामी पाठीराखा दयाळू तो।।५।।

१४१६. जैसा तू आलासी नग्न दिगंबर। तैसाचि माघारा जाशील रे।।१।। राज्यवैभव मेळविले फार। परि हे राहणार येथील येथे।।२।। महाल बांधले रंगीत मंदिर। हेही राहणार येथील येथे।।३।। स्त्री पुत्र नातू आप्त सोयरा रे। कोणी रे सांगाती नोहे तुझ्या।।४।। मनाते विचारी शोध करी बरा। उमादेविवर

सखा करी।।५।। प्रपंची गुंतसी दु:खासी कारण। कृतांत बांधून नेईल तो।।६।। त्याते दया नाही नाना दंड करी। त्याते न निवारी तेथे कोणी।।७।। लक्ष्मण म्हणे शिव सखा करी। यम पाय शिरी वंदील रे।।८।।

१४१७. वारा वारा वारा वारा। वेगी भूलपणा हा वारा।।१।। सारा सारा सारा सारा। मन वेगी मागे सारा।।२।। थारा थारा थारा थारा। मोडा विकारांचा थारा।।३।। करा करा करा करा। शिवयोगी सखा करा।।४।। फिरा फिरा फिरा फिरा। मूळधामी येऊनि नुरा।।५।। लक्ष्मणा करा करा। वेगी पावन हो करा।।६।।

१४१८. करा करा करा करा। वेगी सार्थक हो करा।।१।। बरा बरा बरा बरा। बरा विचार हो करा।।२।। खरा खरा खरा खरा। खरा तोचि सखा करा।।३।। वारा वारा वारा वारा। क्रूर अहंकार वारा।।४।। धरा धरा धरा धरा। संतसंग वेगी धरा।।५।। जिरा जिरा जिरा जिरा। मूळधामी वेगी जिरा।।६।। लक्ष्मणा कृपा करा। सैंधव भेटे जैसे नीरा।।७।।

१४१९. सत्य सत्य सत्य सत्य। सत्य तेचि सत्य सत्य।।१।। नित्य नित्य नित्य नित्य। ब्रह्मसुख नित्य नित्य।।२।। कृत्य कृत्य कृत्य कृत्य। साधा वेगी निजकृत्य।।३।। सोडा भुते भुते भुते। षड्वैरी त्यजा भुते।।४।। सारा सारा सारा सारा। मीतूपणा पाश सारा।।५।। लक्ष्मण म्हणे फिरा। मूळपुरुष सखा करा।।६।।

१४२०. सांडा किंतु किंतु किंतु। सांडा मीतू हा हो किंतु।।१।। तोडा तंतू तंतू तंतू। नानावृत्ती तंतू तंतू।।२।। करा अंतू अंतू अंतू। करा आप आपणा अंतू।।३।। करा प्रांतू प्रांतू प्रांतू। आपुला मूळ तो गे प्रांतू।।४।। नका गुंतू गुंतू गुंतू। सुखी होऊ गे निवांतू।।५।। लक्ष्मण म्हणे जिंतू। जिंतू अलक्ष ते जिंतू।।६।।

१४२१. सुख संसारी नाही। लागा प्रेमे शंभोपायी।।१।। सर्वसुखाचे आगर। बाप उमादेविवर।।२।। त्याते गेले जे शरण। ब्रह्मरूप झाले पूर्ण।।३।। सुख स्वानंद लाधले। सर्वांप्रती वंद्य झाले।।४।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा ब्रह्मानंद भरा।।५।।

१४२२. शिव आहे सर्व देही। का रे लागा ना बा पायी।।१।। त्याचे सत्ते

सर्व होय। का रे धरा ना बा सोय।।२।। मना अंतर्बाह्य तोचि। भक्ती करा की हो त्याची।।३।। सर्व करा त्या अर्पण। तेणे तुष्ट पंचानन।।४।। लक्ष्मण म्हणे स्मरा। भवसिंधू हा उतरा।।५।।

१४२३. देव दयाळू तो फार। केवळ कृपेचे आगर।।१।। असंख्य दोषी उद्धरिले। चरणापाशी हो स्थापिले।।२।। जातिकूळ हो पाहिना। भक्ती प्रिय पंचानना।।३।। भक्तास्वाधीन हो झाला। भक्ते जिंकिले हो त्याला।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा वश पशुपती।।५।।

१४२४. मोहमदिरा कैफ थोर। असंख्य भ्रमती येथे नर।।१।। कैफामाजी हो लोळती। असंख्य कल्प होती जाती।।२।। मोहमदिरा उतरेना। जीवा सुख ते दिसेना।।३।। मोह भक्तिबळे जळे। मग ब्रह्मचि सगळे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त। जगी मायामोहातीत।।५।।

१४२५. षड्गुणऐश्वर्य शोभे प्रभोप्रती। अक्षयी शोभे शिव मंगलमूर्ती।।१।। मंगलायतन श्रुती म्हणती त्याला। सगुण हा झाला भक्तालागी।।२।। सुहास्यवदन स्वानंदजीवन। स्वरूपवर्णन नोहे कोणा।।३।। लक्ष्मण म्हणे त्याचे म्हणवा हो। अक्षयी देतो हो सुख भक्ता।।४।।

१४२६. त्रिपुर मर्दूनि केला उपकार। तो हा गिरिजावर विश्वरूप।।१।। देव सुखी केले पद त्याहा दिले। सर्वस्वे पाळिले देवराया।।२।। भक्तकार्या त्वरे धावे तो दयाळ। स्तवा तो स्नेहाळ कार्य साधा।।३।। येथे गुंतू नका करा तो सोयरा। कृपेच्या सागरा भक्ती प्रिय।।४।। लक्ष्मण म्हणे मायबाप शिव। नाम महादेव साजे त्याला।।५।।

१४२७. शिव कृपेचे सदन। निजभक्ताचे जीवन।।१।। त्याते स्मरा प्रेमे स्मरा। भक्ती प्रिय गंगाधरा।।२।। सुख अक्षयी देतसे। जन्ममृत्यू तोडी पाश।।३।। प्रपंचसुख खोटे जाणा। अनंत येथे हो यातना।।४।। लक्ष्मण म्हणे संग। सोडा पद पाहा ते अभंग।।५।।

१४२८. अगणित कल्प होती जाती फार। अक्षयी शंकर शोभे पाहा।।१।। अंत:करणापूर्वी मनाते चेष्टवी। वाचेते बोलवी सत्तामात्रे।।२।। सकळ इंद्रिया प्रभोची हो सत्ता। कोणी त्या शाश्वता ओळखेना।।३।। अंतर्बाह्य अवघा भरला घनदाट। सर्वांप्रती श्रेष्ठ शिव आहे।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते व्हा

शरण। प्रभो आपुलेपण देतो भक्ता।।५।।

१४२९. शिवपायाचा विसर। म्हणूनि दुःख हे अपार।।१।। रात्रंदिवस जाचणी। जाळी त्रिताप हा अग्नी।।२।। सुख दिसेना जीवाला। लक्ष चौऱ्यांशीचा घाला।।३।। योनी फिरता दुःख कोटी। झाली प्रभोपाया तुटी।।४।। मागे फिरूनि पाहिना। मूळधाम ओळखेना।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा पाहा आत्मज्योती।।६।।

१४३०. शिव सखा करा वेगी। का हो वाया भ्रमता।।१।। खोटे कैसे प्रिय झाले। खरे का हो रुचेना।।२।। गर्भी रक्षिले प्रभूने। त्याचा विसर का पडला।।३।। फिरा फिरा हो वेगेसी। पाहा मूळ ते आपुले।।४।। संग दुःखासी कारण। अनंत जन्मांची फेरी।।५।। लक्ष्मण म्हणे शंभो। दुःख चुकवितो हो।।६।।

१४३१. भक्तकाजा घाली उडी। अंगे भवबंधन तोडी।।१।। अती सदय शंकर। भक्तजनांचे माहेर।।२।। विघ्ने हरितो सर्वत्र। भक्तसखा तो त्रिनेत्र।।३।। भक्तास्वाधीन तो तात। करितो अनाथा सनाथ।।४।। सखा करा करा करा। चुकवितो येरझारा।।५।। लक्ष्मण म्हणे बा हो। का रे वेगी ते साधा हो।।६।।

१४३२. भक्तापाशी स्वामी उभा। केवळ स्वानंदाचा गाभा।।१।। भक्तकार्य अंगे करी। अती सदय त्रिपुरारी।।२।। जातिहीन नेणे धन। भक्तसखा त्रिनयन।।३।। भक्ती प्रिय प्रभोप्रती। भावास्वाधीन पशुपती।।४।। लक्ष्मण म्हणे स्मरा। निजभक्ताचा सोयरा।।५।।

१४३३. भक्तसखा सर्वोत्तम। निजभक्ताचे निजधाम।।१।। भक्ता करी आपणाऐसे। आदिपुरुष महेश।।२।। त्याते व्हा वेगी शरण। करीतसे तो कल्याण।।३।। आदि मध्य तोचि अंती। भक्तरक्षक पशुपती।।४।। महाराज वश करा। चुके भव येरझारा।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। वेगी सार्थक करा रे।।६।।

१४३४. त्र्यंबकाची भक्ती करा। दोष जळती जन्मांचे।।१।। सर्वसुख स्वामीपाशी। सुख देतो भक्ताशी।।२।। जैसे भक्त इच्छीतसे। तैसा त्यासाठी होय।।३।। प्रभो विश्वाचा पिता। पिनाकपाणि परमात्मा।।४।। त्याते शरण रिघाले। त्याहापाशी सुख फार।।५।। लक्ष्मण हा हीन हो। स्वामिकृपेने

धाला।।६।।

१४३५. अभाविकाप्रती अभावचि झाला। भाविका लाधला लाभ पूर्ण।।१।। भाविक ते झाले त्रैलोक्यविजयी। अभाविका कोठे गती नाही।।२।। पळी ती हो सर्व पदार्थी मिरवली। गोडी ती लाधली जेवणाऱ्या।।२।। तेवी विकल्पी जे पाखंडी दुर्मती। त्याहाप्रती गती वेगी नोहे।।३।। लक्ष्मण म्हणे भाविकाचे धन। शिव पंचानन सखा झाला।।४।।

१४३६. दृढ निश्चय हो झाला ज्याचा पायी। नाना त्या उपायी देव रक्षी।।१।। त्याते विसंबेना फिरे बरोबरी। सदा वसे घरी त्याच्या देव।।२।। दासापरी राबे न्यून त्या पडेना। भक्ती पंचानना अतिप्रिय।।३।। लक्ष्मण म्हणे देव भावापाशी। दांभिका खळासी भेटेना तो।।४।।

१४३७. करा वेगी हल्ला धरा तो शंकर। गिरिजेचा वर वश करा।।१।। नामखंडा घ्या हो लागवेगे हाती। वेढा पशुपती भक्तिबळे।।२।। काळाचा तो काळ भक्ताचे स्वाधीन। भक्तापुढे दीन होतो देव।।३।। अनंत ब्रह्मांडे रोमी त्याचे वसती। ब्रह्मादिकाप्रती वंद्य तो रे।।४।। भक्तीची त्याजला आहे रे वेसण। भक्ताचे स्वाधीन वर्ततसे।।५।। लक्ष्मण म्हणे प्रभो पंचानन। भक्तांनी जिंकून साठविला।।६।।

१४३८. विद्याबळ ब्राह्मणाते। योगबळ ते योग्याते।।१।। बाळकाचे बळ रुदन। पक्ष्या बळ ते उड्डाण।।२।। तस्कराचे बळ अनित्य। भावबळ भाविकांत।।३।। लक्ष्मण म्हणे शुद्ध भाव। करा भेटे तो महादेव।।४।।

१४३९. शंभो पाहा हो वेगेसी। भवरोगाते तो नाशी।।१।। नका गुंतू या व्यवहारी। फार बुडाले भवपुरी।।२।। येथील आप्त पुत्र धन। सर्व मायेचे मंथन।।३।। स्वप्नवत् सुख हे रे। बरवे मनी विचारा रे।।४।। लक्ष्मण म्हणे नाथ। करी अनाथा सनाथ।।५।।

१४४०. शिवभक्ता वंदी काळ। त्याते रक्षी जाश्वनीळ।।१।। लिंगपूजा मार्कंडेयाने। शिव पूजिला तयाने।।२।। अल्प आयुष्यी तो होता। मृत्यू समीप आला होता।।३।। लिंगपूजन देखून। दूत गेले हो परतून।।४।। क्रोधे यमराव आला। न्यावया मार्कंडेयाला।।५।। सेना आणली अपार। वेढिला तो मुनीश्वर।।६।। अक्राळविक्राळ भ्यासूर। धरू पाहाती मुनीश्वर।।७।।

मुनी पूजन टाकीना। लिंग हातीचे सोडीना।।८।। मुनींनी काळ तो पाहिला। भ्यासूर तो हो देखिला।।९।। शिवस्मरण विसरेना। भयभीत झाला जाणा।।१०।। कृतांताने पाश टाकिला। लिंगी प्रभू प्रकटला।।११।। कोटी सूर्याचा प्रकाश। प्रगटला उमाधीश।।१२।। मुनी पोटासी धरिला। काळ शंभोने दंडिला।।१३।। सकळ देवाने शिव स्तवून। काळ सोडविला तयाने।।१४।। शिव अनादी ईश्वर। ब्रह्मा विष्णू आज्ञाधार।।१५।। पाहा दयाळू शंकर। चिरंजीव केला मुनीश्वर।।१६।। चौदा कल्प आयुष्य निर्मिले। केवढा शिव तो दयाळ।।१७।। ऐसे अपार रक्षिले। सकल त्याचे इच्छे झाले।।१८।। शिवकृपे इंद्रादिदेव। भोगिती ते हो वैभव।।१९।। उमानाथ का पुजा ना। स्वहित आपुले हो करा ना।।२०।। फार दयाळू शंकर। फार आहे तो उदार।।२१।। जन्ममरण चुकवी। देतसे आपुली पदवी।।२२।। भक्तधावा ऐकून। उडी घाली पंचानन।।२३।। काळा शिक्षा हो लावून। भक्त रक्षी उमारमण।।२४।। लक्ष्मणाते शंकरा। सोडवा वेगी हो दातारा।।२५।।

१४४१. शंभो मायबाप धनी। आप्त सखा बा शूळपाणि।।१।। त्याचे म्हणवितो दीन। स्वामी स्वानंदजीवन।।२।। त्याचे कृपे सदा सुख। स्वप्नी नेणो भवदुःख।।३।। अहो विश्वंभरा हरा। शरण वेगी व्हा शंकरा।।४।। कृपा करितो दयाळ। विश्वतात जाश्वनीळ।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। वेगी वश तो करा रे।।६।।

१४४२. सनकादिकांचे दैवत। तो हा प्रभो भगवंत।।१।। भरला पाहा चराचरी। सर्वा वंद्य तो त्रिपुरारी।।२।। अंतःकरणापूर्वी असे। परात्पर तो परेश।।३।। मनाबुद्धि-अगोचर। स्वयंप्रकाश ईश्वर।।४।। सर्व क्रिया सत्ते होती। सर्वा अलिप्त पशुपती।।५।। लक्ष्मण म्हणे त्याते। पाहा वारूनि मनाते।।६।।

१४४३. जन्ममृत्यूचा हा गोवा। चुके स्मरा उमाधवा।।१।। गर्भी दुःख अती थोर। नरकी वास हो दुर्धर।।२।। त्रिताप-अग्नी प्रदीप्त। मृत्युदुःख ते अत्यंत।।३।। कोटी विंचवांच्या वेदना। अंतकाळी रोमी जाणा।।४।। शिवभक्ता दुःख नाही। सुखरूप ते अक्षयी।।५।। लक्ष्मण म्हणे फार। तरले हे महिमा अपार।।६।।

१४४४. वेगी व्हा हो सावधान। पुढे दिसे दुष्ट स्वप्न।।१।। काळ ग्रासील जगाला। दया नसे की हो त्याला।।२।। करितो ब्रह्मांडाचा घोट। अनंत ब्रह्मांडे सपाट।।३।। त्वरे शिव सखा करा। काळ भितो त्या शंकरा।।४।। भक्तजना काळ नाही। अक्षयी सुख प्रभोपायी।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। पाय वेगी ते स्मरा रे।।६।।

१४४५. ग्रहांमध्ये वासरमणी। चंद्र जेवी तारांगणी।।१।। क्षीराब्धी हा समुद्रांत। तेवी शिव या देवांत।।२।। सर्व देवांचा हा देव। महाराज सदाशिव।।३।। सदोदित ज्याची कीर्ती। ब्रह्मादिक ते वर्णिती।।४।। महाराज सखा करा। का हो करिता येरझारा।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। भक्तास्वाधीन आहे रे।।६।।

१४४६. सरितेमध्ये भागीरथी। तिची तिन्ही लोकी कीर्ती।।१।। वृक्षांमध्ये कल्पद्रुम। वासांमध्ये काशीधाम।।२।। सर्व पर्वतांत श्रेष्ठ। मेरू जेवी तो वरिष्ठ।।३।। तेवी देवांमध्ये थोर। महाराज गौरीवर।।४।। ज्याचे इच्छेचे अंकुर। अनंत ब्रह्मांडे पसर।।५।। त्याचे वेगी व्हा हो गडी। स्वामी भवपाश तोडी।।६।। लक्ष्मण म्हणे हर। भक्तजनांचे माहेर।।७।।

१४४७. व्यास वाल्मीक ते कवी। मुख्य सर्व कविठायी।।१।। जेवी गरुड पक्ष्यांत। शास्त्रांमध्ये तो वेदान्त।।२।। वेदांमध्ये सामवेद। ज्ञानांमध्ये निजबोध।।३।। तेवी देवांमध्ये शिव। महाराज कृपाळुव।।४।। उपमा न साजे प्रभूला। स्वामी तारक सर्वाला।।५।। सखा करा करा करा। भवसिंधू वेगी तरा।।६।। लक्ष्मण म्हणे शूर। झाले शिवकृपे फार।।७।।

१४४८. सिद्धांमध्ये कपिलमुनी। ज्ञान्यांमध्ये आत्मज्ञानी।।१।। भाग्यांमध्ये ते वैराग्य। श्रेष्ठ असे शिरोभाग।।२।। अक्षय भाग्य शिवापाशी। म्हणूनि पूज्य तो सर्वांसी।।३।। अनंत ब्रह्मांडांचा कर्ता। महाराज तो ज्ञाता।।४।। आपण विषयी विरक्त। निजानंदे हो निवांत।।५।। लक्ष्मण म्हणे बाप। सखा करा विश्वरूप।।६।।

१४४९. दुःख निवारी शंकर। करा वश गंगाधर।।१।। वश होतसे भक्तीने। दुजा न चाले हो यत्न।।२।। करा शुद्ध भावे भक्ती। भक्तिसुखे येई विरक्ती।।३।। निर्विषय होय मन। मन होय समाधान।।४।। समाधान होता

तृप्ती। अक्षयी सखा तो पशुपती।।५।। लक्ष्मण म्हणे दीन। चरणी ठेवी पंचानन।।६।।

१४५०. आपण करू जाय एक। कर्म घडविते अनेक।।१।। प्राक्तन चुकेना कोणाला। दुर्धर प्रारब्धाचा घाला।।२।। ईश्वराची माया थोर। ब्रह्मादिका न कळे पार।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। काही होवो ते निवांत।।४।।

१४५१. शिव सखा करा शिव सखा करा। वाया येरझारा का हो करिता।।१।। स्वहित व्यवहार रुचेना कोणासी। काशी तो निवासी आठवेना।।२।। स्वप्नीचे हो सुख हेचि प्रिय झाले। फार नागवले सांगू किती।।३।। लक्ष्मण म्हणे व्हा हो सावधान। गुंतता दारुण दुःख दिसे।।४।।

१४५२. महादेव देव वंद्य सर्वाप्रती। श्रुती स्मृती ध्याती प्रेमे त्याला।।१।। मायागुणे क्रीडे मायेच्या वेगळा। ब्रह्मांडाच्या पाळा भक्ती प्रिय।।२।। भक्तास्तव तात झाला देहधारी। व्याप्त चराचरी दिसे पाहा।।३।। लक्ष्मण म्हणे करा प्रेमे भक्ती। भक्तापाशी वस्ती केली प्रेमे।।४।।

१४५३. श्रुती स्मृती सिद्ध ज्ञातेही बोलती। भक्ती करा म्हणती सुखी व्हा हो।।१।। भक्तीविण सुख न दिसे अविनाश। तापत्रय क्लेश न तुटती हो।।२।। भक्तिबळा ऐसे दुजे बळ नाही। त्रिभुवनगोसावी वश होतो।।३।। लक्ष्मण म्हणे धरा भक्तिपंथ। भक्तापाशी नित्य सुख शोभे।।४।।

१४५४. देवराव सखा करी। नाशवंत ह्या नरनारी।।१।। नाशिवंताची आवडी। शाश्वताची ना आवडी।।२।। कैसा भुललासी बापा। पाहे त्या रे विश्वरूपा।।३।। निदानीचा सखा तोचि। जननी आहे ती दीनांची।।४।। तुझे आप्त सखे सकळ। क्षणात भक्षील तो काळ।।५।। सावध होई लवकर। होई देवाचे समोर।।६।। लक्ष्मणा द्या हो दान। स्मरा अक्षयी पंचानन।।७।।

१४५५. जगद्गुरू हा शंकर। केवळ परमात्मा ईश्वर।।१।। त्याचा विसर पडला। मोठा दुस्तर झाला घाला।।२।। म्हणूनि दुःखाचा बाजार। अती दुःख हे अनिवार।।३।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा भक्तिपंथ धरा।।४।।

१४५६. जन्मा येऊनिया सार। सेवावा तो विश्वंभर।।१।। चिन्मय मोती ते पाहावे। अक्षय मोती ते हो ल्यावे।।२।। अमोल मोती ते साजणी। रंग नाही त्यालागूनि।।३।। त्याला जोडी गे दिसेना। त्याची किंमत होईना।।४।।

योगी त्याते बाई लेती। इतरा काय त्याची गती।।५।। सद्‌गुरू सखा बाई। चिन्मय मोती ते लेववी।।६।। ब्रह्मा विष्णू तो शंकर। मोती लेती निरंतर।।७।। लक्ष्मणाचा दातार। चिन्मय स्वरूप विश्वंभर।।८।।

१४५७. काय नेशी बरोबर। पाहे आपुला विचार।।१।। नग्न तू रे बा आलासी। गड्या नागवाच जाशी।।२।। काही करी रे साधन। सखा करी पंचानन।।३।। येथेचि रे तू गुंतसी। पुढे नरक रे भोगिसी।।४।। लक्ष्मण म्हणे सावध। सोयरा करी ब्रह्मानंद।।५।।

१४५८. भुलू नको रे सावध। करी आपुले मना बोध।।१।। कोणी नाही रे कोणाचे। गुण गाई तू प्रभूचे।।२।। स्त्रीपुत्राते तूते जाण। काळ नेईल उचलून।।३।। येथे कोणी रे सोडवीना। स्तव वेगी पंचानना।।४।। लक्ष्मण म्हणे हुशार। काळ आला तो समोर।।५।।

१४५९. द्रव्य असूनि जवळ। का रे जाईना तळमळ।।१।। तळमळ करिसी निरंतर। तोचि जाणा दरिद्री नर।।२।। ज्याची वृत्ती समाधान। तोचि जाणावा सधन।।३।। करी स्वहिताचा धंदा। काय भुललासी मदा।।४।। लक्ष्मण म्हणे धरी भाव। मग भेटेल देवराव।।५।।

१४६०. प्रभोपायी होई लीन। अरे दिसे हा वृथा शीण।।१।। सखा करी पंचानन। डोळे भरले धुराने।।२।। कोणी नाही रे कोणाचे। अंती घाले त्या यमाचे।।३।। चुकवी यमाचा रे घाला। अक्षयी वद शिवलीला।।४।। लक्ष्मण म्हणे सावध। करी आपुले मना शोध।।५।।

१४६१. पुण्यश्लोक सावध झाले। प्रभोपायी लीन झाले।।१।। पुण्यश्लोकाच्या हो कीर्ती। पापी गेले अधोगती।।२।। सखा करी तो त्रिपुरारी। धन्य होशील संसारी।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य। प्रभो वश केला त्याने।।४।।

१४६२. अनंत ब्रह्मांडांचा पती। सगुण भक्तास्तव पशुपती।।१।। नकळे नकळे त्याचा महिमा। भक्ती प्रिय सर्वोत्तमा।।२।। त्याचे नाम घ्या हो प्रेमे। भक्ता देतो निजधाम।।३।। लक्ष्मण म्हणे धन। न लगे स्तवा पंचानन।।४।।

१४६३. एकपणा न होता हाली। अनंत ब्रह्मांडे ही झाली।।१।। सत्तामात्रे सर्व होय। आपण स्वस्थ निरामय।।२।। त्याते भक्ती प्रिय फार। भक्तास्वाधीन शंकर।।३।। लक्ष्मण म्हणे स्मरा। प्रभो भक्ताचा सोयरा।।४।।

१४६४. ऐसा जन्म मिळणार नाही। सावध व्हा धरा वेगी सोयी।।१।। अनेक जन्म फिरता जाण। हा जन्म प्राप्त तुजकारण।।२।। करी स्वहिताचा धंदा। शरण जाय स्वानंदकंदा।।३।। लक्ष्मण विनवी बा रे। काही सार्थक करा रे।।४।।

१४६५. प्रभो भगवान आहे दयाळू रे। वश तो करी रे भ्रमू नको।।१।। त्याते जे शरण गेले प्रेमे जाण। सुर ते होऊन वंद्य झाले।।२।। त्रिभुवनामाजी त्याहाची रे कीर्ती। अक्षयी शोभती प्रभोपाशी।।३।। जरी तू सावध होशील रे जाण। त्यामाजी जाऊन बैसशील।।४।। लक्ष्मण म्हणे नरतनू ही रे। पुन्हा न मिळे रे वेगी बापा।।५।।

१४६६. भवगर्तेमाजी प्राणी रे पडले। फार रे गुंतले गर्तेमाजी।।१।। गर्ता ती विशाळ मार्ग न सुचे रे। येथूनि निघे रे तोचि शूर।।२।। शूर त्या म्हणावे झाला जो सावध। प्रभो परमानंद वश केला।।३।। स्वहित तेचि रे खरे तेचि हित। इतर भ्रमती वाया प्राणी।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य तोचि प्राणी। गेला हो निघूनि पुण्यश्लोक।।५।।

१४६७. आनंदभरित ज्याचे मन। सर्वांभूती झाला लीन।।१।। परस्त्रीकडे पाहीना। नामस्मरण विसरेना।।२।। कामक्रोध आकळून। स्वरूपी झाला असे लीन।।३।। निंदा द्वेष तो करीना। मायामोहे झळंबेना।।४।। लक्ष्मण म्हणे मानव। तोचि जाणावा रे देव।।५।।

१४६८. शिव पाहा हो नयनी। शिव अनाथाची जननी।।१।। शिव अनाथाचा त्राता। शिव मोक्षाची सरिता।।२।। त्याचे नाम उच्चारा हो। भक्तिबळे तो जिंका हो।।३।। लक्ष्मण म्हणे नाथ। फार दयाळू समर्थ।।४।।

१४६९. शिव तो दयाळू कृपेचा सागर। भक्तावरी त्याची अती प्रीती।।१।। कुरूप कुश्चळ पावन रे केले। ऐसा दयाघन शिवयोगी।।२।। भक्तकार्यास्तव धावे तो तातडी। घालीतसे उडी उमाधव।।३।। त्या परब्रह्माचे पाय वेगी धरा। चुकवी येरझारा आदिनाथ।।४।। लक्ष्मण म्हणे गोष्ट जीवी धरा। तोषवी दातारा उमानाथा।।५।।

१४७०. देवद्वारी तरी क्षणभरी बैसावे। क्षणभरी उभे देवापुढे राहावे।।१।। साधन स्वल्प आहे तुम्हीही करा हो। योग हा बरवा बापांनो तुम्ही करा

हो।।२।। चारी मुक्ती तुम्हाप्रती विनविती। सिद्धी तुम्हापाशी धावूनिया येती।।३।। गुरुराज सखा तुम्हीही करा हो। सायुज्यपद जवळी करा हो।।४।। लक्ष्मण म्हणे देव हा पाहा हो। देही देउळी देव आहे की हो।।५।।

गुरुकृपा

१४७१. गुरुराया शरण जाई। करून घ्यावी आपुली सोई।।१।। अवघा वृथाचि रे शीण। पाहे मनी विचारून।।२।। गुरुदेव तो दयाळ। करितो दीनाचा सांभाळ।।३।। येरझार चुकवितो। पूर्वपदी बैसवितो।।४।। लक्ष्मणाते पावन। केले सद्गुरू सिद्धाने।।५।।

१४७२. करिशी करणी तूचि नारायण। नाही तरी हीन पशूहून।।१।। गुरूते शरण जावे बा वेगेसी। वाया का भ्रमसी शीण मोठा।।२।। गुरू ते दयाळ दाविती रे खूण। पतितपावन नाम त्याचे।।३।। शास्त्र गुरू आत्मप्रचीती होतसे। सर्वठायी दिसे देव मग।।४।। लक्ष्मण म्हणे ब्रह्म स्वये होशी। जन्ममरण तुजसी स्वप्नी नसे।।५।।

१४७३. अध: ऊर्ध्व शून्य त्यामाजी निर्शून्य। पाहावे उन्मन गुरुकृपे।।१।। उन्मनी जिव्हाळा स्वानंदसोहळा। तेचि अंतर्कळा गुरुपुत्रा।।२।। अंतर्कळा कळे गुरुकृपेकरून। बाह्य दृष्टीची खूण नसे बापा।।३।। सोऽहं अहं हंस ऐसे म्हणती। तत्त्वमसि ते तू ब्रह्म स्वये।।४।। लक्ष्मण म्हणे उन्मनीची खूण। घेता मीतूपण नुरे नुरे।।५।।

१४७४. ब्रह्मीचा तू अंश आहेसी। कैसी भ्रांती रे तुजसी।।१।। अजन्मा रे तू असून। दु:ख भोगिसी दारुण।।२।। मी मी करूनि गमाविले। कैसे अविद्येने केले।।३।। सावध होई रे झडकरी। सोयरा सद्गुरू तो करी।।४।। सद्गुरुराव कृपाघन। करितो आपुले समान।।५।। लक्ष्मणा देई दान। सखा करी पंचानन।।६।।

हरि–हर

१४७५. हरिहरा भेद करू नका। स्वरूप एकचि ओळखा।।१।। पुराणपुरुषापासून। दोघे झाले हो निर्माण।।२।। ब्रह्मा विष्णू महेश्वर। निर्गुणाचे हे अवतार।।३।। त्याचे आज्ञे रे करून। ब्रह्मांड रचिले मायेने।।४।। दोन्ही बरोबर आहेत। पूजन करा हो निवांत।।५।। वैष्णव शिवाते निंदिती। विष्णुपूजन

करिती।।६।। कोणी शिवाते पूजिती। विष्णुनिंदा करिताती।।७।। द्वेषभक्ती नीट नाही। त्याते काही सुख नाही।।८।। एकचि रे अवयव। कैसी भिन्नता मानावी।।९।। एक डोळा रे फोडिला। एका उपचार केला।।१०।। एक हात कुरवाळिला। एक तोडूनि टाकिला।।११।। तैसी भेदभक्ती जाणा। परमात्मा संतोषेना।।१२।। स्वरूपी काही भेद नाही। भांडू नका धरा सोयी।।१३।। एक मूर्ती आम्हा दिसती। भेद न मानू कल्पांती।।१४।। एकापासूनि अनेक। अंती स्वरूप ते एक।।१५।। सद्गुरूविण भेद जाईना। आत्मस्वरूप कळेना।।१६।। गुरुकृपे लक्ष्मण। मूर्ती एकचि दिसे जाण।।१७।।

१४७६. शिवाते निंदिती विष्णूते पूजिती। भेद ती हो भक्ती दिसे आम्हा।।१।। हरिहर एक भेद तेथे नाही। द्वैताचे नाही काम येथे।।२।। ब्रह्मांडव्यापार चालावा म्हणून। त्रयमूर्ती आपण झाले देव।।३।। ब्रह्मा विष्णू रुद्र त्रिमूर्ती सगुण। करिती रक्षण नाना युक्ती।।४।। लक्ष्मण म्हणे भेदाते ग्रासून। करावे भजन एकचि ते।।५।।

१४७७. हरिहराचे हो पूजन करावे। मन हे असावे सदा पायी।।१।। परस्त्रियेशी हो एकांत नसावा। साधूंचा करावा समागम।।२।। प्रभोचे चरित्र श्रवण करावे। काम आवरावा विवेके हो।।३।। कामामाजी काम शिवगुण गावे। निगर्वी असावे सदा लीन।।४।। प्रारब्धयोगाने द्रव्य झाले प्राप्त। बापा रे उन्मत्त होऊ नये।।५।। सर्वांभूती अन्न द्यावे हो प्रेमाने। येणे भगवान संतुष्टे रे।।६।। लक्ष्मण म्हणे सुफळ संसार। वर्ते जरी नर येणे न्याये।।७।।

स्वधर्म

१४७८. स्वधर्मलोपी तो जाणावा चांडाळ। स्वधर्माचे बळ सर्वांप्रती।।१।। ब्रह्मा विष्णू रुद्र वेद सिद्ध मुनी। म्हणती स्वधर्मानी चालावे हो।।२।। अवतार होती धर्म हो स्थापिती। परधर्मी गती कैसी होय।।३।। ज्याचा त्यासी धर्म अनादि चालला। परधर्म घाला मोठा आहे।।४।। लक्ष्मण म्हणे स्वधर्म आपुला। रक्षी तो देवाला फार प्रिय।।५।।

१४७९. स्वधर्मलोपी तो जाणावा पतित। त्याचे कोठे हित नोहे कदा।।१।। उत्तम वर्णाची स्त्री भ्रष्ट झाली। अंत्यजा रमली कामबळे।।२।। अंत्यज त्या स्त्रिया तीते म्हणती दासी। घरनिघी नीचासी मान्य नोहे।।३।। ज्याचा त्यासी

धर्म तेथे त्यासी गती। देव संतुष्ट ती पाहूनिया।।४।। लक्ष्मण म्हणे देव अर्जुनाला। पूर्वी बोध केला नानायुक्ती।।५।।

१४८०. ब्रह्मदेवे पूर्वी प्रजा शिकविल्या। म्हणे स्वधर्माला विसरू नका।।१।। स्वधर्मेचि तुम्ही तराल सर्वही। स्वधर्माविषयी प्राज्ञ असा।।२।। परधर्म कदा आचरू रे नका। परधर्मे लोका नागवण।।३।। ब्राह्मणकर्म जरी शूद्र आचरिला। तेणे तो नरकाला अधिकारी।।४।। ज्याचा धर्म त्यासी तोचि आहे तारू। ब्रह्मांडा आधारू स्वधर्माचा।।५।। लक्ष्मण म्हणे सर्वांचे वचन। पाहा हो शोधून धर्मशास्त्र।।६।।

संगती – विषयसंग

१४८१. घात आपला आपण। केला आपला आपण।।१।। संग रुचला विषयांचा। देश वसविला दुःखाचा।।२।। त्रिताप अग्निवास। सौख्य पाहाती देहास।।३।। अती दुःखे तळमळे। मायामोहे भवज्वाळे।।४।। अनेक जन्मांची ही फेरी। आठवीना मदनारी।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। बोल ठेविती कृपाळुवा।।६।।

१४८२. पाहाणे गा झाले ऐसे। अंतरला तो परेश।।१।। अमृत थुंकूनि टाकिले। मृगजळ प्रिय झाले।।२।। परीस चिंतामणी थोर। फेकूनि गारांचा आदर।।३।। कल्पवृक्ष ते तोडिले। शिंदीबन ते लाविले।।४।। कामधेनूची खिल्लारी। सांडूनि गाढवे अंगीकारी।।५।। तेवी विषयी रातले। प्राणी हृदयस्था चुकले।।६।। लक्ष्मण म्हणे थोर। पाहा केवढा अंधार।।७।।

१४८३. क्षणभरी तरी निवांत राही। निश्चळ मने परमात्मा तो पाही।।१।। मन करूनिया स्थिर। स्वस्थ पाहा तो परमेश्वर।।२।। अविद्याप्रवाही का पडलासी। कुसंगाने फार नाश पावसी।।३।। परमेश्वराचा अंश असूनि। का भुलला पाहे परतूनि।।४।। लक्ष्मण अपराधी फार। गुरूने केला त्याचा उद्धार।।५।।

१४८४. पाहा केवढा अंधार। आपणा आपला नाही स्मर।।१।। मुळाप्रती विसरले। संगे नवल हे झाले।।२।। निजप्रभूचा हा अंश। जीव म्हणे तो आपणास।।३।। आपआपणा विसरूनि। दुःख भोगिती नाना योनी।।४।। जेथे जे ये जन्माप्रती। ज्यायमानी तेचि जाती।।५।। लक्ष्मण म्हणे शूर। देही

ब्रह्म ते निर्घोर।।६।।
१४८५. काय भुललासी गुंतलासी बा रे। अविद्यासंग हा अनिवार
रे।।१।। परिवार हा दुस्तर रे जाणा। अविद्यासंगाने नाना रे यातना।।२।।
सावध वेगी होय पाही रे विचार। प्रभुगुण गाय होय शूर।।३।। नदी तरूनि
होय वेगी पार। पूर्वपदी जाय मन करी स्थिर।।४।। कामक्रोधादी क्रूर हे रे
झुंजार। विवेके करी हे जर्जर।।५।। लक्ष्मण म्हणे नाम कंठी बांधी। तुज भय
नसे स्मर कृपानिधी।।६।।
१४८६. कुतर्कादी हा पसारा। अविद्येचा संग सारा।।१।। नाना अनेक
उपाधी। मायामय ही हो संधी।।२।। यांनी सर्व भांबावले। प्राणी स्वाधीन
हे झाले।।३।। मायेचा हा दुर्धर घाला। भुलविले अनेकाला।।४।। माया
द्विरूपिणी सिद्ध। वृत्ती निवृत्ती आद्य।।५।। जग प्रवृत्तिप्रवाही। योगी निवृत्तीचे
ठायी।।६।। लक्ष्मण म्हणे सिद्ध। भेद सरता होय बोध।।७।।
१४८७. क्षणाचिया सुखा काय हो भुलला। स्वहित चुकला मंदमती।।१।।
देवाचा कंटाळा मानी मनातून। बटकीचा प्रेमे झाला दास।।२।। म्हणे तुजप्रती
शरीर अर्पण। सर्वस्वी हे धन तुझे आहे।।३।। लक्ष्मण म्हणे स्वहित कळेना।
दंड त्या चुकेना यमाजीचा।।४।।
१४८८. मीन तो गुंते हो जळी स्वादास्तव। तेवी हा मानव गुंते प्रेमे।।१।।
आप्त सुत धन येथे रममाण। गेला विसरून पूर्वपद।।२।। अती आसक्त
झाला कार्य विसरला। अविद्येचा घाला मोठा क्रूर।।३।। लक्ष्मण म्हणे
कल्पपर्यंत। प्राणी ते भ्रमत कर्मयोगी।।४।।
१४८९. विषयकर्दमी गुंतले ते खर। व्यर्थ ते पामर जन्मले हो।।१।।
सन्मार्ग रुचेना दासीचे ते दास। निंदा आणि द्वेष करिती सदा।।२।। जारकर्मी
शूर चोरांचे माहेर। रौरवी ते नर पडती हो।।३।। लक्ष्मण म्हणे सुख त्याहा
कैचे। किंकर यमाचे दंडिती त्या।।४।।
१४९०. अंतरी दृढ काम भरला। तीर्थ शुद्ध करीना त्याला।।१।। पाप
वासना अंतरी। जप त्याला काय करी।।२।। विषयामाजी वसे मन। व्यर्थ
त्याचे देव पूजन।।३।। लक्ष्मण म्हणे शुद्ध अंतःकरण। तोचि देवा प्रिय
जाण।।४।।

१४९१. मुळीचा तू एकटा आहेसी। का रे माझे माझे करिसी।।१।। रतिसुख हे किंचित। तेथेचि झालासी निवांत।।२।। क्षणाचिया सुखाकारण। कष्ट भोगिसी रात्रंदिन।।३।। हेला वाहे तो पखाला। तैसी गती झाली तुजला।।४।। इंगळाचे शेजेवरी। निद्रा लागेना क्षणभरी।।५।। कामामध्ये करी काम। वदनी वद शिवनाम।।६।। हाचि संसारी विसावा। शिव सोयरा करावा।।७।। लक्ष्मण म्हणे देवा। चुकवा चौऱ्यांशीचा गोवा।।८।।

१४९२. मुळीचा एकटा तू आहेसी बा रे। भ्रम हा झाला रे संगतीने।।१।। अविद्येचा संग भोवला रे जाण। झाले हे कारण जन्ममरण।।२।। अजन्मा असूनि जन्म लागला। मरण पावला संगयोगे।।३।। परतोन पाहे आपणा विचारी। स्मर त्रिपुरारी मूळ पाहे।।४।। लक्ष्मण म्हणे कल्पनेचा घाला। म्हणूनि हा आला जन्माप्रती।।५।।

१४९३. खळाची संगती कदा न धरावी। विचारूनि पाही मनामाजी।।१।। विद्येचा अभ्यास करावा सर्वदा। स्वानंदाच्या कंदा विसरू नये।।२।। विद्याधन गर्व कदाही नसावा। विवेक करावा वारंवार।।३।। ब्रह्मविद्येमाजी लक्ष हो असावे। गुरुकृपे घ्यावे गुह्य बा रे।।४।। आलिया अतिथा भोजन घालावे। नाम हे वदावे मुखी सदा।।५।। धन्य तो संसारी धन्य तो संसारी। मदनाचा अरी वश जया।।६।। लक्ष्मण म्हणे दयेचे सागर। त्याते विश्वंभर विसंबेना।।७।।

१४९४. आत्मलिंगाऐसा धनी। अक्षयी हृदयी असूनि।।१।। त्याची ओळखीच नाही। प्राणी गुंतले विषयी।।२।। मोठा घाला मोठा घाला। अनंत यातना जीवाला।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। सदा ध्याती तो निवांत।।४।।

१४९५. अहो कुसंग नाही बरवा। अतित्वरे तो त्यजावा।।१।। कुसंगाने अधोगती। सुख नाही जीवाप्रती।।२।। यास्तव धरावा सुसंग। पद मिळे ते अभंग।।३।। लक्ष्मण संतद्वारी। अतिप्रेमे भजन करी।।४।।

१४९६. खळाची संगती कदा न धरावी। साधूची संगती धरावी हो।।१।। कुसंगतीने फार भ्रष्ट झाले। कुसंगाने गेले नरका फार।।२।। कस्तुरीमाजी हो हिंग तो पडला। परिमळ गेला संगतीने।।३।। सुगंध जाऊनि दुर्गंधी लागली। संगतीने गेली आब तिची।।४।। लक्ष्मण म्हणे कुसंग घालवी। देवा आम्हा

देई सुसंग रे।।५।।

१४९७. धोका धोका धोका धोका। मोठा आहे पुढे धोका।।१।। नका नका नका नका। मायामोही गुंतू नका।।२।। विका विका विका विका। मी तू उपाधी ही विका।।।३।। जिंका जिंका जिंका जिंका। षड्रिपू क्रूर जिंका।।४।। गुरुकृपे निका निका। मार्ग आहे निज निका।।५।। लक्ष्मण म्हणे सखा। शिवयोगी करा सखा।।६।।

१४९८. अहो विषयाचे सुख। विषाहूनि हे अधिक।।१।। नका गुंतू येथे बापा। काळ बैसलासे मापा।।२।। वीट मानूनि विषयाचा। संग धरा त्या संतांचा।।३।। संतसंगे प्रभोप्राप्ती। प्रेमयुक्त करा भक्ती।।४।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा मिथ्या हा पसारा।।५।।

१४९९. श्रेष्ठांनी कुसंग सांडावा सांडावा। सुसंग धरावा अतिप्रेमे।।१।। मनचि कारण आहे सर्व कार्या। प्रेमे मनराया बोध करा।।२।। मनाते तुम्ही हो जिकडे लावाल। तिकडे लागेल विवेके हो।।३।। लक्ष्मण म्हणे सु-मन हे होय। शंभोप्रती प्रिय होय तेव्हा।।४।।

१५००. लक्ष शंकरी ठेवा हो। विषयसुखाते विटा हो।।१।। पंचविषय हे याने। गेले पाचाचे हो प्राण।।२।। मृग भृंग आणि मीन। कीडा पतंग हे दोन।।३।। पंचविषयी हा नर। मानी विषय हे सार।।४।। विषयी मेलाचि जाणावा। विसरला खऱ्या देवा।।५।। अनंत कल्प होती जाती। परि त्या नाही प्रभुप्राप्ती।।६।। लक्ष्मण म्हणे भक्त। भोग भोगूनि विरक्त।।७।।

१५०१. विषयसंग हा घालक। नरकवास भोगवी।।१।। दुर्धर संग या विषयाचा। महामारक क्रूर।।२।। येथे असावी विरक्ती। आसक्त मन नसावे।।३।। झाले विषयी उदास। तेचि सुखी झाले हो।।४।। आत्महित ज्या साधणे। तेणे संग सांडावा।।५।। लक्ष्मण म्हणे फिरा। दुःखरूप जाणूनि।।६।।

१५०२. रूपविषये करून। मुकला प्राणा पतंग।।१।। पाहा अनिवार संग। नाना दुःख भोगवी।।२।। योगी विटले यास्तव। दिधली पाठी दुर्जना।।३।। आत्मस्वरूपी झाले स्थिर। मोहपाश ग्रासूनि।।४।। मुमुक्षूंनी संग याचा। किमपि न धरावा।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। चुकवा घरटी याहाची।।६।।

१५०३. शब्दविषयास्तव तो मृग। मुकला प्राणाते पाहा।।१।। संग नाही नाही भला। पाहा विवेक करूनि।।२।। एका विषयी प्राण गेला। प्राणी भोगी पाचही।।३।। कैसी होईल बा गती। कोणी भय मानिना।।४।। लक्ष्मण म्हणे शूर। फिरले झाले ते विजयी।।५।।

१५०४. गंधविषयास्तव भ्रमर। गुंतला हो पाहा तो।।१।। दुर्धर संग या विषयांचा। नाना योनी भोगवी।।२।। निरय अघोर भोगवी। यमदंड तो घाला।।३।। रात्रंदिन विषयी रत। मन फिरेना मागे।।४।। खोटे खोटे हे हो कर्म। नीट न दिसे आम्हा।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। स्मरा सोडवील तो।।६।।

१५०५. रसविषयास्तव प्राण। गेला मीनाचा त्या हो।।१।। ऐसे घातकी हे विषय। पाच वधिले पाचांनी।।२।। यांचे चुकवूनि अंग। सिद्ध साधू सुखी झाले।।३।। बचनागाची ती कांडी। खाया गोड घे प्राण।।४।। तेवी विषयांची गती। शंभो सखा करा हो।।५।। लक्ष्मण म्हणे तात। करितो आपणाऐसे।।६।।

१५०६. षड्वैरी हे घालक। अति दुष्ट चांडाळ।।१।। साधुजनांचे हे वैरी। योगी ठकविले फार।।२।। मोठमोठे तपोधन। याने अती केले दीन।।३।। पैज घालूनि जिंकिती। यांनी दंगा मांडला।।४।। शंभो अन्यायी मी दीन। माझा त्राता तूचि बा।।५।। लक्ष्मणा त्राता नाही। तुम्हाविण त्र्यंबका।।६।।

१५०७. विश्वामित्राऐसा मुनी। कामक्रोधे भुलविला।।१।। तपोधनाचे हे वैरी। महादुःखाचे सदन।।२।। याचा संग हा नसावा। साधकाचे स्वप्नीही।।३।। संग याचा नीट नोहे। नरकवास भोगवी।।४।। विटा विटा या दुष्टाला। शंभो सखा करा हो।।५।। लक्ष्मणा त्राता शिव। सुख दिधले ताते।।६।।

१५०८. मोह निःसंगा घालवी। संग दुर्धर याचा।।१।। मोहे विश्व भुलविले। नसे स्मर आपुला।।२।। ज्या कार्याकरिता आले। ते कार्य विसरले।।३।। विसरामुळे दुःख कोटी। भोगिती हो यातना।।४।। लक्ष्मण म्हणे संग। सांडा दुःखरूप हो।।५।।

१५०९. भरत राजा हो विख्यात। भरतखंडीचा या हो।।१।। राज्य सोडून वना गेला। तप केले हो फार।।२।। मृगी आल्या पाण्यावरी। सिंहे गर्जना केली।।३।। मृग गेले हो पळूनि। गर्भीण होती एक मृगी।।४।। गर्भ पडला

पाण्यात। तिचा सिंहभयाने।।५।। लक्ष्मण म्हणे पुढे। झाले ऐका ती गोष्ट।।६।।

१५१०. राव जळी स्नान करिता। गर्भ आला हातात।।१।। पाडस आणिले रायाने। दया उपजली हो।।२।। फार दिवस पालन केले। अती दयेकरूनि।।३।। मोह फार त्यावरी हो। राये ठेविला जाणा।।४।। तपश्चर्या करिता विघ्न। आले मोहेकरूनि।।५।। लक्ष्मण म्हणे मोह। अती बाधक प्राण्या।।६।।

१५११. पुत्राऐसे पालन करिता। पुढे नवल झाले।।१।। समाधिसुख विसरला। मृगछंदेकरूनि।।२।। त्याते खेळवी रात्रंदिन। निजध्यास हो त्याचा।।३।। कोणे एके दिनी तेथे। मृग आले चराया।।४।। पाडसाने आपुली याती। ओळखिली हो तेव्हा।।५।। लक्ष्मण म्हणे पुढे। विघ्न ओढवले हो।।६।।

१५१२. मृग फार पाहिले त्यांनी। गेले पाडस पळूनि।।१।। स्वजाती ओळखिली। मृगसमुदायी गेला।।२।। समाधी विसर्जूनि राजा। मृग पाहू लागला।।३।। गुंफा सांडून रानोरानी। फिरू लागला राव।।४।। हे मृगा हे वत्सा म्हणूनि। शोक करी तो नृप।।५।। लक्ष्मण म्हणे संग। दुर्धर मोहाचा बा रे।।६।।

१५१३. दहा सहस्र वर्षे तप केले। पुढे संग ओढवला।।१।। हा हा करूनि शोक करी। रडे राजा वनी हो।।२।। शोक करिता प्राण गेला। जन्म मृगाचा झाला।।३।। मृगयोनी प्राप्त झाली। तपोधनाप्रती हो।।४।। ऐसे फार भुलविले। मोहसंग घालक।।५।। लक्ष्मण म्हणे संग। सोडा सोडा सोडा हो।।६।।

१५१४. मोहपाशामाजी विश्व। पडले कोण सोडवी।।१।। आपला आपण घात केला। बोल कोणावरी काय।।२।। विष पिऊन वाचू म्हणती। हे बोलणे काय।।३।। मोहेकरूनि स्वर्गनरक। नानापरी उपाधी।।४।। मोहातीत झाले प्राणी। दु:खातीत ते झाले।।५।। लक्ष्मण म्हणे मोह। त्याहा शंभोपायाचा।।६।।

१५१५. दंभ वैरी हा हो जाणा। याने बुडविले फार।।१।। गर्वे बुडाला रावण। सहपरिवारे हो।।२।। मोठमोठे झाले दीन। गर्व दुर्धर हा बापा।।३।।

दंभ सांडा सांडा वेगी। दुःखदायक हा हो।।४।। षड्रिपूंची संगती। जीव भोगी दुःख हो।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। स्मरा तुटती हे पाश।।६।।

१५१६. वस्तूमाजी हो वर्तती। सदासर्वदा हिंडती।।१।। परि ती दिसेनाचि का हो। दुर्धर माव ही आहे हो।।२।। ज्याचे सत्तेने वर्तती। परि त्या नेणूनि भ्रमती।।३।। गोचिडाते रुधिरपान। पयाजवळी असून।।४।। तैसे विषयांनी केले। आपण आपणा भुलविले।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त। वस्तुरूपचि सतत।।६।।

षड्रिपू

१५१७. षड्रिपूते जिंकून। मग साधावे आसन।।१।। अविद्या हा परिवार। याने नागविले फार।।२।। काठी विवेकाची हाती। दंडावे या क्रूरांप्रती।।३।। परिवार होता दीन। दिसे देही भगवान।।४।। लक्ष्मण म्हणे देव। सर्वांघटी कृपाळुव।।५।।

१५१८. देव तुजपाशी नाही देशावर। विश्वाचे माहेर देव आहे।।१।। त्यासी विसरूनि हिंडतोसी देशी। ब्रह्मांडनिवासी सर्वठायी।।२।। मी मी करितोसी ताठा अंगी फार। तेणे विश्वंभर भेटेना तो।।३।। षड्रिपू क्रूर हे रे अनिवार। यांनी घात फार केला तुझा।।४।। लक्ष्मण म्हणे याचे निरसन। होता भगवान भेटे बापा।।५।।

१५१९. काम क्रोध हे चांडाळ। अती पतित हे खळ।।१।। तपोधनाचे हे वैरी। भ्रष्टविती ब्रह्मचारी।।२।। फार भुलविले यती। इतरांची कथा किती।।३।। शंभो तुझे प्रसादिक। तेचि विजयी बा एक।।४।। षड्रिपूते ग्रासून। स्वानुभवे तृप्त पूर्ण।।५।। लक्ष्मण म्हणे पूर्णा। स्वप्नी दुःख हे दिसेना।।६।।

१५२०. राग द्वेष दुर्मती। पदोपदी हे छळती।।१।। यांनी जीवा केला घाला। परमार्थ हा बुडविला।।२।। अविद्येचे माजले बंड। जीवा भावे ते थोतांड।।३।। याते उपायचि नाही। देवा अती त्वरे येई।।४।। शंभो तुझे कृपेविण। नोहे याचे निःसंतान।।५।। लक्ष्मणा तुजविण। कोण त्राता दे दावून।।६।।

१५२१. राग-द्वेष ज्याचे चित्ती। तेचि जाणावे दुर्मती।।१।। सदा क्लेश

ते भोगिती। रात्रंदिन तळमती।।२।। मना नको त्यांचा संग। प्रेमे स्तवी उमारंग।।३।। लक्ष्मण म्हणे शांती। तेथे प्रभोची बा वस्ती।।४।।

काळ

१५२२. माझे माझे म्हणता गेले फार प्राणी। निदानी काळानी भक्षिले हो।।१।। हेमरत्नमय पूर हो जयाचे। महाप्रतापाचे सार्वभौम।।२।। सागरासारखा सेनाभार ज्याचा। काळाने हो त्याचा ग्रास केला।।३।। तेथे आपुली हो कथा आहे कोण। मत्कुणवत् प्राण रगडील।।४।। करा करा करा शिव सखा करा। दु:खरूप पसारा कारखाना।।५।। लक्ष्मण म्हणे हुशार हुशार। काळ मागेम्होर हिंडतसे।।६।।

१५२३. काळचक्र फिरे पृथ्वी रे वरी। कोण त्या आवरी क्रूर ते रे।।१।। मोठमोठे शूर काळाने ग्रासिले। काळ तो रे नेणे लहान थोर।।२।। सावध वेगी व्हा स्मरा तो ईश्वर। मार्ग तो दुर्धर आहे बापा।।१।। प्रभोगुण गा हो कैलासात जाल। मग सुखी व्हाल शिवकृपे।।२।। लक्ष्मण म्हणे साधन हे स्वल्प। न लगे खटाटोप फारसा हो।।३।।

१५२४. काळा दया नाही प्राण्या सावध होई। धरी वेगी सोई घेई सुख।।१।। गुरुदयाळाते वेगी व्हा शरण। क्षणात पावन करिती जाणा।।२।। ब्रह्मरसाची रे प्रेमगोडी घ्यावी। सुखा पार नाही घेई सुख।।३।। स्वये ब्रह्म गुरू तुजला करिती। मग ब्रह्मस्थिती अंगी बाणे।।४।। लक्ष्मण म्हणे गुरू कृपाघन। करिती समान आपुलिया।।५।।

१५२५. राजा रंक असो महंत संन्यासी। काळ तो सर्वांसी भक्षीतसे।।१।। स्त्री पुत्र आप्त सोयरे सज्जन। प्राणी सुख पूर्ण हेचि मानी।।२।। प्राणी येथेचि हो फार सुखावले। मुद्दल चुकले स्मर नाही।।३।। काळाचिये धाडी आली अकस्मात। भक्षिला क्षणात हीनबुद्धी।।४।। यम त्या यातना दु:ख भोगी फार। दु:खाचा सागर भरलासे।।५।। लक्ष्मण म्हणे पुन्हा गर्भवास। तेथील दु:खास पार नाही।।६।।

१५२६. अहो बहु बळी गेले। राजे छत्रपती नेले।।१।। अनंत युगाचा तो काळ। भक्षीतसे रे सकळ।।२।। आकारा जितुके आले। तितुके काळाने भक्षिले।।३।। पुण्यवंतांच्या हो कीर्ती। पापी गेले अधोगती।।४।। काही

कीर्ती उरवा हो। पाय प्रेमे ते स्तवा हो।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त। काळ ग्रासूनि निवांत।।६।।

१५२७. सार्वभौम राजा त्याची सत्ता थोर। सर्वत्र थरथर कापे जग।।१।। असंख्य हो सेनाभार तो वागवी। शूराते नागवी युद्ध करून।।२।। नाना अस्त्रे विद्या नाना युक्ती जाणे। नरेंद्राकारण पूज्यमान।।३।। परि काळापुढे न चाले हो युक्ती। भक्षितो त्याप्रती काळ क्षणी।।४।। अवतारादिकाते भक्षीतसे काळ। इंद्रादि सकळ भक्षीतसे।।५।। लक्ष्मण म्हणे मानव आपण। मशकवत् मान करा हित।।६।।

१५२८. काचेचे कंकण फुटे फट्कन। तेवी देह जाण नाशिवंत।।१।। पाण्याचा बुडबुडा तेवी हे शरीर। काय त्वा रे खरे मानिलेसी।।२।। रात्री हो पाहिला आज कैसा मेला। काय या कर्माला करावे हो।।३।। खोटे कर्म हे हो एकमेका म्हणती। करा काही भक्ती देवाची हो।।४।। बोध करी जना आपण पाषाण। स्त्रियापाशी मन वसे सदा।।५।। स्मशानवैराग्य आहे घरोघर। सुखाचा विचार काय तेथे।।६।। वाचाळी करिती अनुभव नाही। नाना त्या उपायी द्रव्य जोडी।।७।। परि विश्वंभरी लक्ष हो लाविना। व्यर्थ तो शहाणा चुकला हो।।८।। लक्ष्मण म्हणे विश्वरूप तात। उमाईचा कांत भेटेना हो।।९।।

१५२९. सर्व ज्यायमान शिव सखा करा। वाया येरझारा का हो करिता।।१।। ब्रह्मांडाचे राज्य रावणा हो प्रती। एकलाचि अंती गेला तो रे।।२।। हिरण्यकश्यपे सर्वांते जिंकिले। राज्य त्याने केले त्रैलोक्याचे।।३।। अंती तोही प्राणी एकलाचि गेला। सोडविना त्याला कोणी अंती।।४।। बळी बाणासुर मोठमोठे क्रूर। तपाचे गिरिवर गेले की हो।।५।। सहस्रार्जुने रावण जिंकिला। काळाने भक्षिला तोही राजा।।५।। वालीसुग्रीवादी कपी थोर थोर। गेले ऐसे फार सांगू किती।।६।। नहुषादी गेले राजे चक्रवर्ती। काळे सर्वांप्रती भक्षिले हो।।७।। पृथ्वीसारिखे ऐसे पुण्यशीळ। दिशेचे दिक्पाळ तेही गेले।।८।। कौरव पांडव ऐसे राजे फार। यादवांचे भार तेही गेले।।९।। अवतारादी गेले जाणे सर्वांप्रती। उमादेविपती आठवा हो।।१०।। जपी तपी गेले तापसांचे भार। ऋषी थोर थोर तेही गेले।।११।। मार्कंडेय लोमश बगदालभ्य मुनी। थोर आत्मज्ञानी तेही गेले।।१२।। पुण्यशीळ गेले कीर्ती हो

पुराणी। प्रभूचे चरणी राहिले ते।।१३।। पापी गेले वाया लक्ष चौऱ्यांशी। दुःख ते भोगिती नाना योनी।।१४।। लक्ष्मण म्हणे आला की हो काळ। प्रभू जाश्वनीळ सखा करा।।१५।।

१५३०. आला आला काळ भक्षिले बहुत। काळ जबरदस्त आहे क्रूर।।१।। तरुण म्हातारा न म्हणे तो काळ। चालिला सकळ भक्षीत हो।।२।। गाईप्रती जैसा भक्षी पंचानन। तैसा हा ओढून नेतो वेगी।।३।। बस्ताप्रती जैसा भक्षितो लांडगा। तैसा लागवेगा भक्षी काळ।।४।। ससाणा तो पक्षी भक्षी हो धावून। तैसा येऊन भक्षी जीवा।।५।। मूषका मार्जार नेतसे ओढून। तैसा गटकन् भक्षी काळ।।६।। व्याघ्र जैसा जीव मारी हो धावून। काळ तो येऊन भक्षी तैसा।।७।। राजा रंक काळ न म्हणे दुर्बळ। स्मरा जाश्वनीळ स्वामी माझा।।८।। लक्ष्मण म्हणे शिव सखा करा। स्वामी येरझारा चुकवा हो।।९।।

१५३१. बाळत्व ते गेले खेळता खेळता। तरुण अवस्था आली पुढे।।१।। येथे गुंता फार सदा खटपट। फार करी कष्ट धावू धावू।।२।। देशांतरा जाय हिंडे वनोवन। कैसेही करून भरी पोट।।३।। ऐश्वर्येकरूनि होती हो उन्मत्त। अविचारा तेथे उणे काय।।४।। कवाडाते जैसी कुलूप ते कडी। पडलीसे पायी बेडी मोठी।।५।। स्त्री पुत्र धन पडला गुंतून। वार्धक्य ते जाण आले पुढे।।६।। शरीर ते झाले सर्व अस्ताव्यस्त। नरतनू व्यर्थ गमाविली।।७।। ज्या कामाते आला कार्य विसरला। गुंतून पडला मायामोहे।।८।। जेव्हा शरीर ते फार झाले विकळ। मग जाश्वनीळ स्तवू पाहे।।९।। काळाची धाडी आली अकस्मात। नेला हो पतित बांधूनिया।।१०।। लक्ष्मण म्हणे दुःख ते दारुण। करिती भ्रमण वारंवार।।११।।

१५३२. नका गुंतू या परिवारी। नाशिवंत ह्या नरनारी।।१।। अवघे सुखाचे सांगाती। कुणी कामा न ये अंती।।२।। काळ नेईल बांधून। दुःख देईल दारुण।।३।। असंख्य यम त्या यातना। नरकी पचविती नाना।।४।। यास्तव करा शिवभक्ती। दुःख नाही भक्ताप्रती।।५।। लक्ष्मण म्हणे ताप। निवारितो विश्वरूप।।६।।

१५३३. आजा काका मामा मेला तुझी तीच गती। यमदूत नेती बांधूनिया।।१।। नेत्री तू पाहासी विचार कळेना। कळूनि वळेना झाले

कैसे।।२।। जाया पुत्र धन येथे तू निमग्न। स्वहित भुलून गेलासी रे।।३।। नाना पापकर्मे करिसी आवडी। हिची बा जोडी केली काय।।४।। लक्ष्मण म्हणे फार हे कठीण। रौरव दारुण भोगशील।।५।।

१५३४. बाळत्व ते खेळता गेले। तरुणत्व विषये नेले।।१।। वृद्धपणी तळमळ। वृत्ती सर्वदा व्याकूळ।।२।। विषयी तृप्ती झाली नाही। शून्य परमार्थाविषयी।।३।। परि हा मोठा झाला घाला। जन्म व्यर्थ गमाविला।।४।। लक्ष्मण म्हणे बा रे। नाना नरक भोगिती रे।।५।।

१५३५. घडी पळ पळ आयुष्य चालले। काळाने लाविले माप बापा।।१।। कोणे वेळ घाला घालील कळेना। शूरा आटोपेना तो रे क्रूर।।२।। मूषका मार्जार नेतसे ओढून। तेवी गटकन् काळ भक्षी।।३।। लक्ष्मण म्हणे करा हो स्वहित। पद ते निवांत पाहा वेगी।।४।।

१५३६. विषय भोगिता देह गेला। पुढे दुस्तर आला घाला।।१।। यमकिंकर बांधिती। नानापरी विटंबिती।।२।। नाना नरक त्या यातना। दुष्टाप्रती होती जाणा।।३।। येथे कलेवर पडले। आप्त सखे हो मिळाले।।४।। स्वार्थालागी ते रडती। नानापरी शोक करिती।।५।। स्त्री म्हणे घात झाला। काम नाही रे पुरला।।६।। काय करतील मुले बाळे। कैसा झाला रे उन्हाळा।।७।। माता म्हणे कोण आम्हाला। पिता म्हणे घात झाला।।८।। भाऊ म्हणती बाहू गेली। बहिणी म्हणती गोष्ट गेली।।९।। इतर सोयरे तव दूर। म्हणती मोठा झाला घोर।।१०।। कोण अन्य हे करील। आता घर हे बुडेल।।११।। नेऊन घालिती स्मशानी। घरा येती परतूनि।।१२।। खरा वाली नाही कोणी। एक शंभो रे वाचूनि।।१३।। लक्ष्मण म्हणे खरा। आप्त शंकर तो स्मरा।।१४।।

१५३७. काळ तो आला रे नेईल बांधून। सोडविता कोण येथे तुज।।१।। तुजभोवता रे मायेचा.बाजार। दुःख भोगणार तूचि एक।।२।। वय गमाविले झालासी खोकर। काही त्वा विचार केला नाही।।३।। नानापरीची कर्मे केलीसी रे बंडा। काळाचा कोरडा वाजेल रे।।४।। लक्ष्मण म्हणे ऐसे प्राणी फार। स्वहित विचार सुचेना रे।।५।।

१५३८. अहो काळ आला आला। अहो भक्षितो जगाला।।१।। अतिरथी महारथी। भक्षिले ते पृथ्वीपती।।२।। सार्वभौम गेले फार। काळ भक्षक हा

क्रूर।।३।। अहो अवतार गेले। महा महा मुनी गेले।।४।। काही करा हो स्वहित। प्रेमे स्तवा उमाकांत।।५।। लक्ष्मण म्हणे फार। दुःखरूप हा संसार।।६।।

१५३९. काळाप्रती दया नाही। जग भक्षितो अक्षयी।।१।। अहो आकाराते आले। तितुके काळाने भक्षिले।।२।। पुण्यवंतांच्या हो कीर्ती। पापी जाती अधोगती।।३।। जन्मा आल्याचे सार्थक। प्रेमे स्तवावा त्र्यंबक।।४।। शंभोपायी सदा स्थिर। होता सुख ते अपार।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। काळ मागे तो सारा रे।।६।।

१५४०. काळ आहे हो सकळासी। काळे ग्रासिले सर्वांसी।।१।। काळ न म्हणे शहाणा। काळ मानीना व्युत्पन्ना।।२।। काळ न म्हणे हा शूर। काळ न म्हणे राज्यधर।।३।। काळ न म्हणे हा जोडका। काळ न म्हणे हा बोलका।।४।। काळ म्हणेना देसाई। काळ म्हणेना गोसावी।।५।। काळ न म्हणे हा यती। काळ न म्हणे सुरपती।।६।। लक्ष्मण म्हणे जना। भावे ध्या हो पंचानना।।७।।

१५४१. अवतारादिक मोठे मोठे गेले। तुम्ही काय चिरंजीव मानिले।।१।। मार्कंडेय आदी ऋषी जाती। तेथे इतरांची काय गणती।।२।। पृथू आदी राजे ज्ञाते गेले। तुम्ही काय हे स्वस्थ मानिले।।३।। काही करा रे सार्थक। प्रीतीने पुजावा त्र्यंबक।।४।। कोणी नाही बा सांगाती। स्मरावा तो उमापती।।५।। लक्ष्मण विनवी लोका। सावध व्हा तुम्ही गुंतू नका।।६।।

देह

१५४२. नाशिवंत देह हा जाईल नासून। होय सावधान वेगी बापा।।१।। रावणाऐसे वैभव कोणाचे। निर्मूळ त्याचे जाहले रे।।२।। वालीऐसा पराक्रमी आहे कोण। भक्षिला काळाने क्षणामाजी।।३।। पृथ्वीराव गेला पुण्यशीळ जाण। त्याचे राज्य जाण सर्व करिती।।४।। सूर्यवंशी राजे मोठमोठे गेले। योगीश्वर गेले तपोधन।।५।। सोमवंशी राजे गेले पुण्यधन। महाशूर जाण पृथ्वीपती।।६।। ऋषीश्वर गेले मार्कंडेयादी मुनी। ज्याचे नामस्मरणी हरे पाप।।७।। बगदालभ्य ऐसे श्रेष्ठ गेले मुनी। इतरांची कथनी काय तेथे।।८।। अवतार आदी प्राज्ञ गड्या गेले। यादव निमाले क्षणामाजी।।९।। पुण्यश्लोक

गेले कीर्ती हो पुराणी। पापे गेले प्राणी नरकालया।।१०।। संसारसुखात प्राणी जे गुंतले। देवा अंतरले पापरूपी।।११।। माझे माझे म्हणूनि पापी बद्ध झाला। पुण्यश्लोक गेला सुटूनिया।।१२।। कुंभीपाकी प्राणी फार रे पडले। देवा अंतरले मंद जाणा।।१३।। एकटेचि यावे एकटेचि जावे। म्हणूनि भजावे प्रभूप्रती।।१४।। मायाजाळी प्राणी पापी रे गुंतले। पुण्यशीळ झाले सावध रे।।१५।। लक्ष्मण म्हणे देव वश करा। चुकवा येरझारा महादुःख।।१६।।

१५४३. रोगाचे माहेर आहे हे शरीर। पाहा हो विचार पुरतेपणी।।१।। शरीरा पाहूनि डुलतोसी फार। पुढे जर्जर होशील रे।।२।। तारुण्यमद गेला वृद्धदशे आला। कापू रे लागला चळचळा।।३।। दिव्य जे शरीर वळ्या अंगावर। कान झाला बधिर दुःखे जाणा।।४।। दंतही पडले मग विद्रूप झाले। गालही बैसले झाला क्षीण।।५।। नयन विशाळ दिसेना हो त्याला। फार दीन झाला वृद्धपणी।।६।। नाक गळे सदा खोकला लागला। घाबरा मग झाला देवा स्मरे।।७।। देव मग कैचा देव दुरावला। प्राणी रे पडला भवचक्री।।८।। लक्ष्मण म्हणे होई रे सावध। स्मर ब्रह्मानंद वेगी बापा।।९।।

१५४४. गौरचर्म वरूनि आत विष्ठा मळ। दुर्गंधी केवळ अती हीन।।१।। सांदोसांदी किडे मळमूत्र वाहे। नाकी भरलाहे शेंबूड तो।।२।। मुखद्वारावाटे बेडके पडती। त्याते उपमा देती चंद्राची हो।।३।। असत्य पसारा पापाचा हा थारा। स्त्रियापाशी खरा वसतसे।।४।। पापरूप देह याते पाहूनिया। गेला प्रभोपाया विसरूनि।।५।। लक्ष्मण म्हणे खोटे प्रिय झाले। खरे विसरले दैवहीन।।६।।

१५४५. गर्भवास चुकवा रे। दुःख सर्वदा हे खरे।।१।। सर्व दुःखाचे हे मूळ। सदा सर्वदा खळखळ।।२।। पाहा जगी सुखी कोणी। प्राणी काढा रे निवडूनि।।३।। वेगी व्हा हो सावधान। पाहा वेगी परतून।।४।। लक्ष्मण म्हणे फिरा। उमानाथ वश करा।।५।।

१५४६. देवा कोणी ओळखेना। करिती वाउगा धिंगाणा।।१।। अहंकार भरला फार। झाले पापाचे डोंगर।।२।। काय करतील बापुडी। पडली अविद्येची धाडी।।३।। मायाखलाळी पडले। देवराया विसरले।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त। प्रभोपायी सदोदित।।५।।

१५४७. अवचित नरदेह प्राप्त झाला। जैसे त्या रंकाला इंद्रपद।।१।। लक्ष चौऱ्यांशी गिरका फिरून। आलासी दारुण दुःख ते रे।।२।। फेरी चुकवी रे होय सावधान। पाहे परतून आपणाप्रती।।३।। सावध होण्याचे स्थान हेचि बा रे। हे गेल्या तूते रे सुख कैचे।।४।। लक्ष्मण म्हणे शिव सखा करा। नाही तरी घोरा पार नाही।।५।।

१५४८. प्रथम हा देह म्हणती रक्तवर्ण। स्थूळ देह जाण तू नव्हेसी।।१।। नेत्रस्थान त्याचे तू त्यावेगळा रे। ब्रह्मरूप बा रे आहेसी तू।।२।। दुसरा तो देह सूक्ष्म श्रीहाट। वस्ती ज्याची आहे कंठस्थानी।।३।। अंगुष्ठप्रमाण लिंगदेह म्हणती। चिन्मय तू ज्योती वेगळाचि।।४।। तिसरा तो देह कारणदेह म्हणती। गोल्हाट कृष्णवर्ण जाण बापा।।५।। चौथा तो देह महाकारण नीळवर्ण। मसूरप्रमाण अर्धमात्रा।।६।। लक्ष्मण म्हणे शून्याचे शेवटी। चैतन्याची खोटी बंबाळ तो।।७।।

१५४९. शरीर असार असार। केवळ दुर्गंधीचे घर।।१।। याते भुललासी खरा। दुःख भोगिसी पामरा।।२।। अनंत यातना भोगिसी। बळे सुख मानून घेसी।।३।। सोडी सोडी देहसंग। सखा करी उमारंग।।४।। सुख प्रभोपायी खरे। जन्ममृत्यू बाधा नुरे।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त। सुखी अक्षयी जगात।।६।।

१५५०. देह हाडांचा हा साठा। आत दुर्गंधी हे विष्ठा।।१।। रक्त कीडे मज्जा मांस। केवळ दुर्गंधीचा वास।।२।। शरीर असार असार। असंख्य रोगांचे माहेर।।३।। धरूनि याचा अभिमान। गेला प्रभोते विसरून।।४।। असंख्य कल्प होती जाती। देहासंगे नोहे गती।।५।। लक्ष्मण म्हणे संग। सांडून ध्या हो उमारंग।।६।।

१५५१. शरीर अनित्य अनित्य। आत्मस्वरूप ते सत्य।।१।। स्वरूप ते हो ओळखावे। प्रेमे तेथेचि वसावे।।२।। मन स्वरूपी रमता। तुटे जन्ममरणगुंता।।३।। सबाह्य वस्तूचा प्रकाश। दिसे सुख अविनाश।।४।। लक्ष्मण म्हणे गोडी। घ्यावी स्वानंदे आवडी।।५।।

१५५२. देह हा क्षणैक आहे नाशिवंत। काय हा शाश्वत मानिला हो।।१।। मृगजळवत् पाहा विचारून। आहे ज्यायमान अनित्य हो।।२।।

मिथ्यामय देह मानिला हो सार। प्रभो गंगाधर आठवेना।।३।। फार चुका झाल्या अती दु:ख फार। स्वहित विचार करा काही।।४।। लक्ष्मण म्हणे शंकर स्मरा हो। सुख ते भरा हो अक्षयी मनी।।५।।

१५५३. काचेची ती कुपी फुटे फट्कन। तेवी ज्यायमान शरीर हे।।१।। पाण्याचा बुडबुडा फुटे तत्क्षणी। पाहा विचारूनि देह तैसा।।२।। खरा हा मानूनि जग भांबावले। वर्म ते चुकले निजरूप।।३।। स्त्रीपुत्रादिक मिथ्या हो पसारा। येथे जीवे थारा केला असे।।४।। लक्ष्मण म्हणे खरे ते लोपले। फार दु:ख झाले माझे म्हणता।।५।।

१५५४. अहो काया हेचि माया। मृगजळवत् काया।।१।। खरी दिसे परि नाशे। भ्रांतस्थाते सत्य भासे।।२।। पाहा विचार करूनि। असे स्वप्नीची कहाणी।।३।। येथे भुलू नका बा रे। काही सार्थक करा रे।।४।। देही वसे अविनाश। परमपुरुष अविनाश।।५।। प्रेमे प्रेमे वेगी स्मरा। स्वानुभवरंग भरा।।६।। लक्ष्मण म्हणे फेरी। चुके स्मरा त्रिपुरारी।।७।।

१५५५. देह असार असार। केवळ नरकाचे कोठार।।१।। सदा वसतसे घाणी। अती दुर्गंधीची खाणी।।२।। सांदोसांदी अळ्याकीडे। रक्तमांस चहुकडे।।३।। चर्म याते गुंडाळिले। काय खरे हे मानिले।।४।। याचा धरूनि अहंकार। गर्वे डुलती पामर।।५।। परमात्मया विसरले। विषयसंगे वाया गेले।।६।। लक्ष्मण म्हणे ज्ञाते। विसरले अहंभावाते।।७।।

१५५६. रेतारक्ताचे हे झाले। विटाळात हे जन्मले।।१।। याची उत्पत्ती पाहाता। त्रास वाटे पाहा चित्ता।।२।। ऐसियाचा अभिमान। काय धरावा आपण।।३।। याचे वैभव हे खरे। काय मानावे बापा रे।।४।। याते विटूनि शंकर। वश करावा तो हर।।५।। लक्ष्मण म्हणे सखा। करा चुके जन्मधोका।।६।।

१५५७. अहो स्वप्नातील स्वप्न। शरीर मिथ्यामय शीण।।१।। सत्य मानू नये याला। याचे संगे नरकघाला।।२।। याचे संगे विषय वाढे। निजरूपी विसर पडे।।३।। स्वप्नवत् हे मानून। पाहावे आपणा परतून।।४।। सुखी झाले सनकादिक। मिथ्या मानूनि अनेक।।५।। लक्ष्मण म्हणे बा रे। येथे सुख दिसेना रे।।६।।

१५५८. तुझे शरीर नसे रे। कैची खरी रांडा पोरे।।१।। नाशिवंत नाशिवंत। जेवी वांझेची संतत।।२।। मृगजळापरी असे। भ्रांता सत्य हे बा दिसे।।३।। आजा काका बाप गेला। कर्ता लेक तोही गेला।।४।। हस्त पाय डोळे जाती। आपले आपणा पारखे होती।।५।। लक्ष्मण म्हणे खरे। मूळधाम आपुले रे।।६।।

१५५९. धरिता शरीराचा संग। येणे विघडे निजरंग।।१।। निजरूपाचा विसर। म्हणूनि जीवा हा संसार।।२।। संग सुटेना जीवाला। म्हणूनि नरकवास घाला।।३।। एका प्रभोकृपेविण। संग न सुटे दारुण।।४।। यास्तव प्रेमे रात्रंदिन। भावे करावे भजन।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। चुकवी घाला कृपाळुव।।६।।

१५६०. नरतनू ऐसी पुरी न मिळे रे। शोधूनि पाहे रे वेगी बापा।।१।। बहुत सुकृत म्हणूनि हा जन्म। पाहे आत्माराम गुरुकृपे।।२।। मग तुज जन्मव्यथा ही बाधेना। वासना राहिना गुरुकृपे।।३।। लक्ष्मण म्हणे सावध व्हा वेगी। ब्रह्मसुख भोगी गुरुकृपे।।४।।

१५६१. भिंतीवरी चित्र तैसा हा देह रे। मनी विचारी रे पुरतेपणी।।१।। याचा अभिमान सदा वागविसी। गर्वे डुल्लतोसी जैसा सरडा।।२।। स्वहित कळेना देव आठवेना। पुढे दैन्यवान होशील रे।।३।। लक्ष्मण म्हणे शिवाते स्मरा रे। स्वहित करा रे सुख घेई।।४।।

१५६२. नरदेहाऐसी पुण्ययोनी। मिळणार नाही पाहे विचारूनि।।१।। टाळी वाजविता का ग सापडला। अवचट जन्म हा प्राप्त तुजला।।२।। पूर्वपुण्ये द्रव्यघट भेटे जेवी रंका। पाषाण वेचू जाता परीस जोडे।।३।। ऐसा नरदेह तुज प्राप्त झाला। साधन काही करी चुकवी यमघाला।।४।। सावध होई गड्या रे लवकर। धरी सुपंथ नको करू उशीर।।५।। लक्ष्मण विनवी देवराया। मज दीना सोडवा धावा प्रभोराया।।६।।

१५६३. सावध होई रे मानवा। जन्ममरण हा गोवा।।१।। नरजन्म हा तुजला। बहुत पुण्ये प्राप्त झाला।।२।। करी काही रे साधन। चुकवी रे येणे जाणे।।३।। कामक्रोध हे आकळावे। सत्यस्वरूप पाहावे।।४।। लक्ष्मण म्हणे गुरूप्रती। शरण जाय त्वरित गती।।५।।

१५६४. ज्यायमान आहे सर्व। सत्य आहे देवराव।।१।। असत्य ते सत्य दिसे। सत्य ते असत्य भासे।।२।। कैशी झापड पडिली। भ्रांती अविद्येने केली।।३।। येथे तू रे वर्म चुकसी। पुढे नरक रे भोगिसी।।४।। जन्म हाचि नरकवास। करी विचार मनास।।५।। लक्ष्मण म्हणे नामस्मरण। करी रे फुकाचे साधन।।६।।

१५६५. नरजन्म हा तुजला। बहुता पुण्ये प्राप्त झाला।।१।। का रे वृथा गमाविसी। का रे भ्रांती बा तुजसी।।२।। करणी करी होय पावन। करी रे कल्पना निरसन।।३।। देव आहे तुजपाशी। विचारी रे सद्गुरूसी।।४।। लक्ष्मणाचा दातार। सर्वघटी सर्वेश्वर।।५।।

१५६६. नरजन्म हा नाही मिळणार। पाहे पुरता रे विचार।।१।। करी हित तू रे आपुले। चुकवी यमाजीचे घाले।।२।। येथेचि होईल उपाय। पशुजन्मी करशील काय।।३।। सावध होई रे चतुरा। करी परमात्मा सोयरा।।४।। लक्ष्मणा हेचि द्या दान। अक्षयी स्तवा पंचानन।।५।।

१५६७. कोण दिवस येईल कैसा। नाही देहाचा भरवसा।।१।। नाशिवंत हे शरीर। असंख्य रोगांचे माहेर।।२।। काय ठुमकसी तू बापा। काळ बैसलासे मापा।।३।। लक्ष्मण म्हणे सावध होई। पाहा विचार धरी सोई।।४।।

१५६८. देहामध्ये नाना विघ्न। नाना रोग ते दारुण।।१।। अनंत यातना या जीवा। देहासंगे या मानवा।।२।। देहसंग हा सुटेना। दु:ख कल्पांती मिटेना।।३।। यास्तव करू शिवभक्ती। दु:ख नाही भक्ताप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा चुकती येरझारा।।५।।

१५६९. साधन करा लवकर। देह नाशिवंत जाणार।।१।। पाण्यावरील बुडबुडा। तैसा देह हा रे मूढा।।२।। देह आहे क्षणभंगुर। काळ त्याते रे खाणार।।३।। सावध होई लवकर। करी नामाचा उच्चार।।४।। लक्ष्मण म्हणे घेता नाम। पावशील सुखधाम।।५।।

१५७०. जाणे आहे हो सर्वांसी। करा विचार मानसी।।१।। कार्य साधूनिया घ्या हो। दुर्लभ नरजन्म हा हो।।२।। ऐसे पर्व येणार नाही। धरा त्रिभुवनगोसावी।।३।। भक्तिबळे तो जिंका हो। लक्ष्मण विनवी हो।।४।।

१५७१. देह हा जाईल पाहे विचारून। करी रे साधन होय शूर।।१।।

शुक तो गुंते रे पिंजरियामाजी। तेवी तुझी परी झालीसी रे।।२।। तेवी तुजप्रती अविद्या आवरण। भुललासी जाण संगतीने।।३।। तुजला संग रे नाही खरे मान। निःसंग असून संग झाला।।४।। लक्ष्मण म्हणे पूर्व अधिष्ठान। पाहावे आपण गुरुकृपे।।५।।

१५७२. देह जाईल रे सावध होई। कोणीही तुजला त्राता नाही।।१।। देह पाहूनि फार फुंजतोसी। अशाश्वत देह तूचि जाणतोसी।।२।। कळूनि का रे वळेना तुजसी। येथे गुंतता मग पुढे भ्रमसी।।३।। लक्ष चौऱ्यांशी दुःख ते दुर्धर। दुःख सांगवेना रे अनिवार।।४।। वैभवी फार गुंतले सांगू कोठवर। गुंतू नको तू पाहे विचार।।५।। लक्ष्मण म्हणे प्रभू वश करी। प्रेमयुक्त स्मरी तो मदनारी।।६।।

१५७३. देह आहे की नाशिवंत। काय मानिसी शाश्वत।।१।। नाना रोगांचे माहेर। दुर्गंधी भरलीसे फार।।२।। रोग होती याला नाना। दुःखकारक देह जाणा।।३।। एका नामस्मरणाविण। पवित्र नसे जाणे जाण।।४।। लक्ष्मण विनवी जना। शरण जा हो पंचानना।।५।।

१५७४. हृद्रोग मोठा भारी। लागलासे या शरीरी।।१।। तेणे अंतरले सुख। म्हणूनि वाढला हा शोक।।२।। षौकचि अवघा झाला शोक। अंतरला परलोक।।३।। परात्परी दृष्टी न्यावी। ब्रह्मानंदी हो मुरवावी।।४।। अवघा आनंद आनंद। सांडा बाह्य दृष्टिभेद।।५।। लक्ष्मण म्हणे मना। छंद तोचि लावा जाणा।।६।।

१५७५. नवमास जननीजठरी। अती दुःख कल्पांत।।१।। कुंभीपाकाहूनि थोर। दुःख जननीजठरी।।२।। नरकी वास हा दुस्तर। नानापरी यातना।।३।। बाहेर येता सुख नाही। ताप त्रिविध पाळा।।४।। अंतकाळी दुःख फार। पुढे यमयातना।।५।। लक्ष्मण म्हणे सुख। नाही स्वप्नी प्राणिया।।६।।

आप्त–सखे

१५७६. आप्तसखे तुझे द्रव्याचे सांगाती। निर्वाणी पशुपती एक दाता।।१।। द्रव्य देखूनिया सर्व गोळा होती। स्तवन करिती कामिक ते।।२।। संकट देखूनि जाती रे उठून। सोडविता जाण एक देव।।३।। स्त्रीपुत्र आदी हेही रे मायिक। जाशी तूचि एक यमपुरा।।४।। लक्ष्मण म्हणे सावध रे होई। करी

शिवाबाई सखी वेगी।।५।।

१५७७. येथील हे आप्त येथेचि राहती। जाणे आपणाप्रती परलोका।।१।।
पुत्र दारा धन हेही ज्यायमान। वेगी सावधान होय बापा।।२।। ब्रह्मांडाचे
राज्य करणार गेले। तुम्हीही ऐकिले असतील।।३।। तेथे आपुली रे काय बा
गणना। स्तवी पंचानना वेगी बापा।।४।। लक्ष्मण म्हणे पाहा हो विचार।
विश्वाचे माहेर शिव आहे।।५।।

१५७८. कोणी नाही रे सांगाती। करा शोध बरवा चित्ती।।१।। आप्त
सोयरे हे धन। सर्व येथील भूषण।।२।। मृगजळ सत्य म्हणून। मग करिती
भ्रमण।।३।। नाही तृप्ती त्याची झाली। व्यर्थ बापुडी शिणली।।४।। तेवी
सुख हे जाणून। प्राज्ञ गेले जे शरण।।५।। परलोकीचा सोयरा। उमारमण वश
करा।।६।। लक्ष्मण म्हणे हीन। केले शंभोने पावन।।७।।

१५७९. कोण तुझा वाली सांग। का रे प्रिय झाले सोंग।।१।। सत्य नेले
असत्याने। झाले दुःखासी कारण।।२।। परीस हातीचा टाकिला। गळा
शिंपला बांधिला।।३।। अमृताची कूपी हाती। कांजी मागे लोकांप्रती।।४।।
गती तुजला ती झाली। भ्रांती मायेने हो केली।।५।। प्रभू जवळी असून।
विषयी झालासी निमग्न।।६।। नका गुंतू या वेसणी। प्रभू पाहा शूळपाणि।।७।।
लक्ष्मण म्हणे दाता। शंभो विश्वाचा पाळिता।।८।।

१५८०. नग्न जैसा तू आलासी। पुन्हा तैसा तू बा जाशी।।१।। स्त्रीपुत्रादी
सकळ। दिसे तुजभोवता गोंधळ।।२।। परि हे सुखाचे सांगाती। मोहपाश हे
घालिती।।३।। येथे गुंतले जे प्राणी। असंख्य भोगिती जाचणी।।४।। लक्ष्मण
म्हणे शिवा। शरण जाय तुटे गोवा।।५।।

१५८१. पुत्रा गोविले सुनेने। कन्या नेली जावयाने।।१।। द्रव्य जाता बरे
कोणी। पाहा पाहीना हो प्राणी।।२।। कन्यापुत्रामाजी मग्न। स्त्री पडली
गुंतून।।३।। भाऊबहिणी हे तव दूर। दुःखरूप हा संसार।।४।। स्मरा वाली
नाही कोणी। एका शंभू रे वाचूनि।।५।। लक्ष्मण म्हणे स्मरा। तोचि वाली
दिसे खरा।।६।।

१५८२. पक्षी वृक्षी त्या बैसती। सवेचि उडूनिया जाती।।१।। पांथस्थ
वृक्षाचिये तळी। प्रेमे वसे हो मंडळी।।२।। तेही उठूनिया जाती। काय वृक्षा

त्याची खंती।।३।। लक्ष्मण म्हणे तेवी। कन्या पुत्र मरती पाही।।४।।

१५८३. नदीमाजी काष्ठे मिळती। सवेचि वेगळे वाहती।।१।। नदी खंती ती मानीना। अनेक काष्ठे वाहती जाणा।।२।। तेवी कन्या पुत्र होती। मरती काही हो वाचती।।३।। लक्ष्मण म्हणे बा रे। सुख कोठेही नसे रे।।४।।

१५८४. बाप मेला माय मेली। भाऊ भगिनी तीही गेली।।१।। शोक करावा कोणाचा। अवघा बाजार मायेचा।।२।। जाणे आपणाते बापा। काळ बैसलासे मापा।।३।। लक्ष्मणा आप्त शिव। परब्रह्म महादेव।।४।।

१५८५. पिता मेला एकेदिनी। एकेदिनी मेली जननी।।१।। भाऊ मेला एकेवेळे। स्त्रीपुत्रादी ते गेले।।३।। कोण कोणाचा हो शोक। करावा हो फार दुःख।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। स्मरू सदा सदाशिव।।५।।

१५८६. आप्त सखे जन हेही ज्यायमान। काळ तो येऊन ग्रासीतसे।।१।। नेईल बांधून करा काही हित। आहे जबरदस्त क्रूर काळ।।२।। मोठमोठे गेले तपाचे गिरिवर। आपुला विचार काय तेथे।।३।। लक्ष्मण म्हणे शिव सखा करा। पाय दृढ धरा राहा तेथे।।४।।

१५८७. काय भुललासी मतिमंदा। शरण जाय त्या गोविंदा।।१।। द्रव्य जोडिले कोट्यानुकोटी। हाती न ये बा लंगोटी।।२।। आप्त सोयरे सांगाती नाहीत। सखा करी लक्ष्मीकांत।।३।। लक्ष्मण म्हणे व्हा सावध। ग्रंथ पाहा दासबोध।।४।।

विवेकहीन – अभक्त

१५८८. सर्पामुखी बेडुक जाऊनि पडला। म्हणे हो मजला स्थान बरवे।।१।। शीतळ हे मुख फार सुख झाले। पुढे मरण आले तत्क्षणी।।२।। मस्त्य स्वादास्तव गळी अडकला। प्राणाते मुकला गोडीस्तव।।३।। तैसे काळामुखी पडले मानव। प्रपंचवैभव सत्य मानी।।४।। परि मूर्खाप्रती विवेक सुचेना। काळाचे मानीना भय काही।।।५।। लक्ष्मण म्हणे असंख्य हो कल्प। गेले परि ताप चुकेना हो।।६।।

१५८९. परमार्थपरीस हातात असून। दिला भिरकावून कवडीसाठी।।१।। प्रपंचकवडी गळा हो बांधून। म्हणे मी प्रवीण तिही लोकी।।२।। प्रपंचकवडी दाखवी जगाला। म्हणे मेळविला नाना युक्ती।।३।। मानूनिया सुख हिंडे

हर्षभरे। म्हणे माझे खरे वैभव हे।।४।। कल्पवृक्ष द्वारी तोडूनि टाकिला। निवडुंग लाविला बागेभोवता।।५।। प्रपंचनिवडुंगामध्ये हो बैसला। सुख या देहाला पाहतसे।।६।। लक्ष्मण म्हणे खरे आवडेना। खोट्या गुणे नाना दुःख भोगी।।७।।

१५९०. सभोवती अग्नी पर्वतासमान। लावूनिया आपण सुख इच्छी।।१।। इंगळाचे शय्येवरी सुख पाहे। तैसे झाले आहे प्राण्यालागी।।२।। सुख संसाराचे तैसेचि असे रे। बरवे विचारा रे मनामध्ये।।३।। अग्नी भाजतसे वरूनि देहाला। घोर-अग्नी याला जाळी पोटी।।४।। राजा रंक असो पृथुवीचा धनी। सर्वत्रालागूनि चिंता आहे।।५।। लक्ष्मण म्हणे चिंतेच्या वेगळे। प्रभुभक्त झाले भक्तिबळे।।६।।

१५९१. कैसे करू काय करू। सदा प्राणिया हा स्मरू।।१।। सदा करी हाय हाय। गेला विसरूनि पाय।।२।। सुख तेचि दुःख झाले। प्राणी आरबळू लागले।।३।। लक्ष्मण म्हणे नाम। मुखी न ये झाला भ्रम।।४।।

१५९२. कोण कोठील तू कोण। पाहे वेगी परतोन।।१।। सुख पडणार नाही। परतल्याविण काही।।२।। मोठा धक्का बाबा थोर। करी पोक्त रे विचार।।३।। जेथे विचारचि नाही। तेथे दुःखा पार काई।।४।। लक्ष्मण म्हणे थोर। आहे विवेक विचार।।५।।

१५९३. गर्भ-आंधळे हो पोर। झाले मातेप्रती फार।।१।। परि स्वरूप मातेचे। न कळे आंधळे जातीचे।।२।। रात्रंदिन मातेपाशी। वसूनि कळेना त्याहाशी।।३।। तैसे जाहले जगाला। प्रभू दिसेना कोणाला।।४।। रात्रंदिन वस्तूमध्ये। वसूनि होईना ती साध्य।।५।। ज्ञानांजने निरसे पडळ। ब्रह्म आपण सकळ।।६।। लक्ष्मण म्हणे बाप। सर्वत्राचा विश्वरूप।।७।।

१५९४. एरंड धोतरा पेरून। करू पाहे अमृतपान।।१।। तुला केली गाजराची। वस्ती इच्छी वैकुंठीची।।२।। कैसी प्राप्त ते होईल। केवळ इच्छा दिसे फोल।।३।। कडू पेरिले भोपळे। कैसी येतील द्राक्षफळे।।४।। लक्ष्मण म्हणे बा रे। पेरिले ते उगवले रे।।५।।

१५९५. देवावरी का रुसावे। अहो मनाते पुसावे।।१।। पेरिले ते अर्कीफळ। इच्छितोसी अमृतफळ।।२।। करडी पेरल्या शेतात। गहू कैसे येतील तेथ।।३।।

केले भोगणे ते प्राप्त। कर्म श्रेष्ठ बळिवंत।।४।। एका भक्ती हो वाचून। नोहे कर्माचे खंडन।।५।। लक्ष्मण म्हणे देवा। पूर्वजन्मीचा हा ठेवा।।६।।

१५९६. जेणे समाधान वर्म ते भुलले। गर्तेत पडले प्रेमभरे।।१।। फुंजे सदोदित म्हणे मी हो धीट। मजऐसा श्रेष्ठ कोठे दावा।।२।। काम क्रोध मद दंभ अहंकार। याचा अंगी पूर भरलासे।।३।। गर्व अविचार करी सदोदित। भवानीचा कांत आठवेना।।४।। परिणामी नीट नाही हे कठीण। होय सावधान वेगी बापा।।५।। लक्ष्मण म्हणे शिव सखा करी। देव त्रिपुरारी सुख देतो।।६।।

१५९७. जारा तुजप्रती देव आवडेना। करितोसी नाना अविचार।।१।। कूळदेवता त्वा मानिली जारीण। जातोसी धावून अति प्रेमे।।२।। मन हे रे सदा तेथे वसविसी। तेवी देवापाशी का न जाशी।।३।। नरक-मूत्र-मज्जा-दुर्गंधीचे पोते। सदोदित तेथे वसतोसी।।४।। बापा चुकलासी नाही झाले नीट। प्रभो नीळकंठ अंतरला।।५।। लक्ष्मण म्हणे यमाचे ते गण। नरकी नेऊन घालतील।।६।।

१५९८. सावध रे होई पाहे रे विचार। अरे हा संसार मिथ्याभूत।।१।। संसारी रे प्राणी सावध रे झाला। वदे हरलीला निरंतर।।२।। व्यवहारी वर्तता नाम विसरेना। अतीता होईना विन्मुख तो।।३।। धन्य तो संसारी धन्य ते शरीर। तीर्थाचे माहेर तेचि जाणा।।४।। लक्ष्मण म्हणे देव दयाघन। भक्ताप्रती विघ्न लागू नेदी।।५।।

१५९९. शिवे विष्णुप्रती ज्ञान। प्रेमे केले निरूपण।।१।। हरीने ब्रह्मदेवाप्रती। ज्ञान कथिले नाना युक्ती।।२।। तेथून सनकादिका प्राप्त। सिद्ध अनेक विख्यात।।३।। नारदादी मुनीश्वर। व्यास वाल्मीक कवीश्वर।।४।। अनेक अवतारही होती। तेही मार्गचि स्थापिती।।५।। मूर्खा मार्गचि रुचेना। विषयी घालिती धिंगाणा।।६।। लक्ष्मण म्हणे मूर्ख। नरकी मानिती ते सुख।।७।।

१६००. विवेकी पुरुष तेथे समाधान। विवेकावाचून सुख नोहे।।१।। तळमळ सदा सदा करी घोर। सुखाचा विचार काय तेथे।।२।। होणार चुकेना कळे सर्वांप्रती। परि तळमळ ती रात्रंदिन।।३।। लक्ष्मण म्हणे देव आठवेना। सुख त्या पडेना शीण झाला।।४।।

१६०१. विवेकी विवेक करती। म्हणूनि सुखा पात्र होती।।१।। अविवेकी

जे प्राणी। मूर्खांचे ते मुकुटमणी।।२।। सुख नाही नाही त्याला। जन्म भांडताचि गेला।।३।। लक्ष्मण म्हणे थोर। झाले विवेकी ते फार।।४।।

१६०२. जगी देव नाही मूर्ख हे बोलती। भ्रमे ते भ्रमती नाना योनी।।१।। परब्रह्माप्रती जीवचि मानिले। मायेने गोविले फार प्राणी।।२।। सार आवडेना असाराची गोडी। धावती तातडी सेवावया।।३।। लक्ष्मण म्हणे खराहूनि खर। वर्म ते पामर चुकले हो।।४।।

१६०३. दुग्धापाशी तो गोचिड। रक्त प्राशीतसे द्वाड।।१।। कमळापाशी ती दर्दुरी। स्वाद नेला त्या भ्रमरी।।२।। वत्साप्रती दुग्धप्राप्ती। गोचिड रक्त ते प्राशिती।।३।। प्राज्ञ घेती ब्रह्मरस। मूर्खाप्रती नरकवास।।४।। भक्त अभक्ताची परी। ऐसे बोलती वेद चारी।।५।। लक्ष्मण म्हणे सिद्ध। म्हणती जगा व्हा सावध।।६।।

१६०४. काग धावे विष्ठेवरी। अमृतफळ न स्वीकारी।।१।। अहो नरकातील कीडे। त्याहा दुर्गंधी आवडे।।२।। तेवी अभक्ताते देव। आवडेना सदाशिव।।३।। निंदाद्वेषांत प्रवीण। आवडेना प्रभोभजन।।४।। लक्ष्मण म्हणे बा रे। नाना नरक भोगिती रे।।५।।

१६०५. अभक्ताचे काळे तोंड। अहंकारे झाले मूढ।।१।। परलोक त्याहा नाही। नरका कारण ते अक्षयी।।२।। धरा धरा भक्तिपंथ। भक्तीविण सर्व व्यर्थ।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। सुखी अक्षयी जगात।।४।।

१६०६. अहो कल्पवृक्षातळी। बैसून इच्छितो शिंदळी।।१।। गंगेमध्ये उभा असे। म्हणे मृगजळ स्वच्छ दिसे।।२।। तैसे झाले प्राण्याप्रती। हृदयस्थाची नेणे गती।।३।। लक्ष्मण म्हणे जन्म। पाठी लागले नाना कर्म।।४।।

१६०७. काय भुललासी तू बंडा। वय वृथा गेले दुधडा।।१।। हावे भरलासी भारी। का रे आवडेना मदनारी।।२।। डफगाण्याचा उल्हास। का रे कीर्तनाचा त्रास।।३।। सोय धरी अविचारा। करी परमात्मा सोयरा।।४।। स्वर्गलोकासी जाशील। अमृतपान रे करशील।।५।। लक्ष्मणाचा दातार। ग्रामगीतापासूनि दूर।।६।।

१६०८. का रे दुष्टा माजलासी। आप पर न ओळखिसी।।१।। फार जार तू झालासी। पुढे गती होईल कैसी।।२।। परस्त्रीभोग इच्छिसी। आठवेना

हृषिकेशी।।३।। परस्त्री नरकाते नेईल। फार दुःख भोगशील।।४।। जितुकी पाउले चालून जाशील। तितुकी युगे नरक भोगशील।।५।। पाहे परतून आपणासी। कोण्या कारणा आलासी।।६।। स्वस्त्रीशी क्रीडा करी। अधिक काय बा बाहेरी।।७।। परमात्मा सखा करी। चुके चौऱ्यांशीची फेरी।।८।। लक्ष्मण म्हणे दया करा। पूजन प्रभोरायाचे करा।।९।।

१६०९. भजन तुज रे आवडेना। परतून पाहे रे आपणा।।१।। पूजेचा कंटाळा तुजसी। दास बटकीचा झालासी।।२।। कीर्तनरंग आवडेना। ग्रामगीत प्रिय जाणा।।३।। काय सुखावसी फार। पुढे होशील बेजार।।४।। यमराव तो दंडील। तप्तस्तंभाशी बांधील।।५।। लक्ष्मण म्हणे सोय धरी। सोयरा करी त्रिपुरारी।।६।।

१६१०. काय भुललासी पापीष्ठा। जगी करिसी माकडचेष्टा।।१।। दुर्गंधीचे स्त्री कोठार। त्यासी भुललासी फार।।२।। परस्त्रीची फार आवडी। म्हणशी हेचि माझी जोडी।।३।। देवराया विसरलासी। करू नये ते कर्म करिसी।।४।। यमाप्रती दया नाही। फार दुःखी होशील पाही।।५।। लक्ष्मणाचा दातार। दुष्टापासाव आहे दूर।।६।।

१६११. नाम येईना मुखासी। सदा निंदा जल्पतोसी।।१।। याने तुज लाभ काय। धरी वेगी आपुली सोय।।२।। देवराव सखा करी। तोचि दीना पावन करी।।३।। नित्यानित्यविवेक करा। चुके चौऱ्यांशीचा फेरा।।४।। लक्ष्मण म्हणे श्रेष्ठ। गाती प्रेमे नीळकंठ।।५।।

१६१२. नाम येईना मुखासी। सदा वाचाळपणा करिसी।।१।। रात्रंदिवस रिकामट। नाही कैसा झालासी भ्रष्ट।।२।। सत्कर्म आवडेना। पापवासना जाईना।।३।। सावध होई रे गवारा। होय देवाच्या समोरा।।४।। लक्ष्मण म्हणे धरी भाव। भावापाशी आहे देव।।५।।

१६१३. देवा काय म्हणतोसी। पुण्य नाही आचरलासी।।१।। करडी शेती पेरिल्यासी। गहू तेथे कैसे इच्छिसी।।२।। देव काय करील रे। केले कर्म तू भोग रे।।३।। आपुल्या कर्मासी बोलावे। देवावरी का जल्पावे।।४।। लक्ष्मण म्हणे देवराया। तुम्हा बोल नाही स्वामिराया।।५।।

१६१४. पापकर्म आचरलासी। देवावरी बोल ठेविसी।।१।। तेव्हा नाही

केला विचार। बोल ठेविसी देवावर।।२।। केले कर्म भोगी आता। भोगी दारिद्र्य ही व्यथा।।३।। नाना रोग शरीरासी। पूर्वकर्मे रे भोगिसी।।४।। लक्ष्मण म्हणे देवा। केले कर्म भोगिती देवा।।५।।

१६१५. देवावरी का रे जल्पावे। आपुले केले ते पावावे।।१।। पूर्वी उन्मत्तपणा केला। तोचि आता फळा आला।।२।। केले कर्म ते चुकेना। प्राक्तनभोग हा सुटेना।।३।। चुकवू जाता देशावर। प्राक्तन त्याहून असे दूर।।४।। बैसता गिरिकपाटी। येतसे पाठोपाठी।।५।। लक्ष्मण म्हणे कर्मा। तुझा अगाध महिमा।।६।।

१६१६. देवपूजेचा रे त्रास। सोंगटीचा रे उल्हास।।१।। कीर्तनरंग आवडेना। डफगाणे प्रिय जाणा।।२।। आईच्या लुगड्यासी गाठी। बटकीसी घेतो धटी।।३।। संतसंग रे आवडेना। यमराव गांजील जाणा।।४।। लक्ष्मण म्हणे भुलला। वृथा त्याचा जन्म गेला।।५।।

१६१७. नको फार उन्मत्त होऊ। वृथा जन्म हा गमावू।।१।। कानावरी पागोटे ठेविसी। सदा गर्वाने फुंजसी।।२।। नम्रता रे बिलकुल नाही। द्रव्यमदे भुलला काई।।३।। संतसंग रे आवडेना। सदा करिसी वल्गना।।४।। लक्ष्मण म्हणे घे नाम। सर्व हरेल तुझा भ्रम।।५।।

१६१८. ज्या मुखी नाम नाही। जंगी कुलुपाची जाणावी।।१।। नेत्रे देव जो पाहिना। मयूराअंगी नेत्र ते जाणा।।२।। श्रवणे कीर्तन ऐकेना। मूषकदऱ्या त्या हो जाणा।।३।। हस्ते धर्म पूजन घडेना। अजाकंठीचे स्तन ते जाणा।।४।। चरणे तीर्थाटन घडेना। काष्ठवत् पाय जाणा।।५।। जेथे सत्कर्म लेश नाही। जन्म वृथा त्याचा पाही।।६।। लक्ष्मण म्हणे त्याचा। जन्म श्वानसूकराचा।।७।।

१६१९. सावध होई रे तू दादा। करी स्वाधीन ब्रह्मानंदा।।१।। विषयी भुलले म्हणून। नरक भोगिती दारुण।।२।। त्याविण त्राता कोणी नाही। दादा सावध तू होई।।३।। येथेचि तू रे गुंतसी। पुढे क्लेश रे भोगिसी।।४।। लक्ष्मण म्हणे सावध। निशिदिनी घ्या परमानंद।।५।।

१६२०. सत्कर्माचा रे त्रास। दुष्टकर्माचा उल्हास।।१।। भजन पूजन आवडेना। सदा करिसी वल्गना।।२।। अहा वृथा शीण झाला। जन्म वृथा

गमाविला।।३।। प्रपंचात परमार्थ। करी येणे होईल अर्थ।।४।। लक्ष्मण म्हणे नाम घ्या हो। नाम भव हा निरसी हो।।५।।

१६२१. अहो गोष्ट गेली गेली। भ्रांती अविद्येने केली।।१।। आपुलेपणाचा विसर। पाहा केवढा अंधार।।२।। पिशाच्चापरी नाचे। दुःख भोगी प्रपंचाचे।।३।। लक्ष्मण म्हणे सुख। नसे केवळ झाले मूर्ख।।४।।

१६२२. या युगामाजी हो अल्पायुष्यी नर। दो पायाचा खर अती द्वेषी।।१।। त्याहाप्रती कैचा रुचे भक्तिपंथ। भक्तीविण व्यर्थ महालोभी।।२।। लक्ष्मण म्हणे त्याहा बोलू नये। व्यर्थचि तो होय शीण तेथे।।३।।

१६२३. सुखदुःखे कर्मयोगे होती प्राप्त। प्राणीही भ्रमत कर्मयोगे।।१।। सुख भोगिता हो सुख वाटे फार। दुःखाचा विचार कठीण जाय।।२।। देवाप्रती शिव्या देतसे पामर। म्हणे दुःख फार झाले मज।।३।। पूर्वी कर्म करिता विचार न केला। आता काय त्याला म्हणतोसी।।४।। लक्ष्मण म्हणे केले ते चुकेना। भोग हा सुटेना देहाचा रे।।५।।

१६२४. देवावरी बोल काय ठेवितोसी। मना ना पुससी केले कर्म।।१।। शरीर या व्यथा पापाचे हे मूळ। उठे पापशूळ पापयोगे।।२।। दरिद्र भोगणे पापाचे हे मूळ। नाना दुःखे जाणा पापयोगे।।३।। पूर्वी जे केले ते भोगावे आपण। व्यर्थ रे जल्पून काय होय।।४।। लक्ष्मण म्हणे भोग हो चुकेना। नाना हो यातना जीवाप्रती।।५।।

१६२५. सोयरिया देती पक्कान्न भोजन। अतिथा काढून देती प्राणी।।१।। धर्माचा कंटाळा मानिती सर्वदा। स्वहिताचा धंदा विसरले।।२।। जारकर्माप्रती फार सादर झाले। द्रव्य गमाविले पापकर्मे।।३।। देवा आवडेना विचार पाहिना। धुंद झाला जाणा मंदमती।।४।। लक्ष्मण म्हणे नरका फार गेले। मार्गी हो लागले हेही त्यांच्या।।५।।

१६२६. स्वहित चुकला म्हणूनि भ्रमला। दुःखार्णवी पडला मायामोहे।।१।। नाना हो यातना भोगी दैन्यवान। देव आवडेना काही केल्या।।२।। हावे भरला फार रिकामा होईना। कंटाळा येईना विषयांचा।।३।। लक्ष्मण म्हणे सूर्याचा कुमर। दंडावया थोर केला देवे।।४।।

१६२७. पापपुण्य काही पाहिना उन्मत्त। झाला मगरमस्त द्रव्यबळे।।१।।

गर्वाने चालतो ताठा अंगी फार। जैसा तो कुंजर मस्त झाला।।२।। धर्माची वासना कदाही होईना। जारकर्मी जाणा शूर मोठा।।३।। श्रेष्ठा अपमानी म्हणे मीच थोर। माझे बरोबर कोणी नाही।।४।। लक्ष्मण म्हणे यमाचा किंकर। बांधूनि तस्कर नेईल तो।।५।।

१६२८. अहो अन्याय अन्याय। मोठा दिसे हा अन्याय।।१।। ज्या कार्याप्रती आले। ते कार्य विसरले।।२।। आता कैसी होईल गती। कोण त्राता आपणाप्रती।।३।। लक्ष्मण म्हणे हीन। सोडवितो पंचानन।।४।।

१६२९. खोटे खऱ्याते निंदिती। भ्रष्ट म्हणती ज्ञान्याप्रती।।१।। विषयी अती सक्त प्राणी। त्याते श्रेष्ठ म्हणती जनी।।२।। म्हणती भला संसारी। खोट्याचे हा खरे करी।।३।। याचे कायदे शिकावे। द्रव्य फार मिळवावे।।४।। नाना अनर्थ द्रव्यासाठी। कलियुगाची ही रहाटी।।५।। सत्यवादिया नपुंसक। म्हणती पशू हा हो एक।।६।। लक्ष्मण म्हणे वाद। विकत घेती बोलून शब्द।।७।।

१६३०. जेथे नाही भक्तिप्रेम। तोचि पुरुष अधम।।१।। त्याचा जन्म जंतापरी। महा नष्ट ते अघोरी।।२।। त्याचा संग हो नसावा। त्याते मोठा दिसे गोवा।।३।। लक्ष्मण म्हणे देवा। संग प्रेमळाचा द्यावा।।४।।

१६३१. देवाते म्हणतोसी तू रे काय आता। कर्म रे करिता नोहे भय।।१।। आता व्यर्थ काय जल्पूनिया होय। केले हे भोगावे लागेल बापा।।२।। आता साधन रे स्वल्प एक दिसे। देव तो महेश स्तवी वेगी।।३।। भवाचा तो हर्ता आहे देवराव। प्रभो कृपाळुव नाम त्याचे।।४।। लक्ष्मण म्हणे शिव मायबाप। प्रभू विश्वरूप त्याते म्हणती।।५।।

दांभिक

१६३२. ब्रह्मज्ञान घरोघरी। झाले कलीमध्ये भारी।।१।। वाचाळी हे फार करिती। नानापरीच्या हो युक्ती।।२।। थापा स्वरूपाच्या सांगती। दया क्षमा नाही चित्ती।।३।। इंद्रिये सर्वदा बाष्कळ। निंदाद्वेषांचा गोंधळ।।४।। षड्रिपूंचे स्वाधीन। वर्तून म्हणविती प्रवीण।।५।। बोलण्याने ब्रह्मज्ञान। नोहे वेगळी ती खूण।।६।। लक्ष्मण म्हणे ज्ञान। होता होय समाधान।।७।।

१६३३. जारीण पतीस्तव भाव। दावी वरी वरी लाघव।।१।। सासूसाठी

रडे सून। भाव अंतरीचा भिन्न।।२।। तेवी दांभिकाची भक्ती। प्रेम कैचे त्याचे चित्ती।।३।। लक्ष्मण म्हणे सोंग। तेथे कैचा उमारंग।।४।।

१६३४. बोलका हो झाला जगी तो विख्यात। नानायुक्ती गत जाणतसे।।१।। जाणिवेचा फुंज साठवेना पोटी। सांगतसे गोष्टी ज्ञानाच्या हो।।२।। परि तो बोलका वर्म ते वेगळे। स्वानुभवे कळे गुरुकृपे।।३।। जेव्हा जाणिवा हो अहंकार विरे। तेव्हा ते बापा रे सुख होय।।४।। लक्ष्मण म्हणे प्रचीतीच सत्य। सुख ते निवांत बाप घेती।।५।।

१६३५. काम क्रोध धुसधुसती। वरी मिरविसी विरक्ती।।१।। गेरूचा रे खर्च केला। अहंकार नाही गेला।।२।। अहंकृती टाकिता जाण। तूचि आहेसी भगवान।।३।। मग तू स्वरूपी मिळशील। देवा मान्य रे होशील।।४।। लक्ष्मण पतित दीन। करा दीनाते पावन।।५।।

१६३६. टिळा टोपी मिरविसी। अंतर शुद्ध न करिशी।।१।। गळा माळ रे घातली। वासना रे दृढ ठेली।।२।। काय करील टोपी माळ। अंतर नसे रे निर्मळ।।३।। काम क्रोध रे जिंकावी। टोपी माळ सुखे ल्यावी।।४।। अंतर शुद्ध होता जाण। भूती दिसे भगवान।।५।। लक्ष्मणा दीनाप्रती। पावन करा कृपामूर्ती।।६।।

१६३७. लोका सांगे फार ज्ञान। आपण निर्दय दारुण।।१।। दया क्षमा जेथे नाही। वाचाळपणे लाभ नाही।।२।। ज्ञान पुष्कळ सांगतोसी। विवेक नाही तुजपाशी।।३।। आत्मा सर्वांचा ओळखावा। तेणे संतोष उमाधवा।।४।। लक्ष्मण अन्यायी सर्वांचा। करा उद्धार दीनाचा।।५।।

१६३८. सहा वश आधी करा। साधुपणा शोभेल बरा।।१।। एकांती फार बैसतोसी। क्रोध मानीना तुजसी।।२।। मोह महा अनिवार। त्याचा करी रे धिक्कार।।३।। काम करी बा स्वाधीन। सुखरूप होशील जाण।।४।। दीन अनाथ लक्ष्मण। गेला सद्गुरूशी शरण।।५।।

१६३९. चित्ती अनुताप नाही। तीर्थे हिंडतोसी काई।।१।। वृंदावनी साखर मेळविली। संगाने साखर कडू झाली।।२।। कडू भोपळा जळी बुडविला। गोडपणा नाही आला।।३।। अंतरी भरला गढूळ। तीर्थ करीना निर्मळ।।४।। लक्ष्मण विनवी देवा। कृपा करा कृपाळुवा।।५।।

निंदक – शिवनिंदक

१६४०. निंदक ते आम्ही मानितो परीट। वस्त्र ते फुकट धुती ते रे।।१।। मोल त्या न देता वस्त्र ते धुती। फार आम्हाप्रती प्रिय झाले।।२।। निंदील हो कोणी त्यात काय गेले। कोणी हो स्तविले काय लाभ।।३।। निंदा सांडूनिया करितो भजन। जगासी कारण काय आम्हा।।४।। लक्ष्मण म्हणे स्वामी शूळपाणि। त्याचिये चरणी सुखावलो।।५।।

१६४१. शिवनिंदक ते जाणावे महार। वेदाने धिक्कार केला त्याचा।।१।। ज्यामुखी शिवनिंदा ती अंत्यजाची मोरी। ऐसा दुराचारी दुजा नाही।।२।। त्याचा स्पर्श होता करावे हो स्नान। दुष्टाचे वचन ऐकू नये।।३।। शिवनिंदक ते गेले नरकाप्रती। दुःख ते दुर्मती भोगिती हो।।४।। लक्ष्मण म्हणे शिवाचा अन्यायी। त्याने वाली नाही तिही लोकी।।५।।

शब्दज्ञान – शब्दज्ञानी

१६४२. सर्वत्र हे ज्ञान पोट भरायाचे। परि सुटकेचे वेगळेचि।।१।। वेदशास्त्रे जरी केली पाठांतर। ज्योतिष्य ते सार सांगे लोका।।२।। सिद्धी जरी झाल्या स्वाधीन त्या बा रे। त्रैलोक्याचे सारे कळे वर्म।।३।। नाना चमत्कार दाविती हातवटी। सर्वांमाजी मोठी कीर्ती झाली।।४।। स्वानुभवजन्य ज्ञान नाही झाले। तववरी फोल सर्वत्रही।।५।। लक्ष्मण म्हणे येणे जाणे हे रे। चुकवावे ते रे ज्ञान खरे।।६।।

१६४३. शब्दज्ञानी ते हो माप मोजायाचे। मोजिताचि त्यांचे जन्म गेले।।१।। दरिद्री तो प्राणी नगरी हिंडला। वैभवसोहळा पाहिला हो।।२।। नाना रत्नमय महाल लखलखाट। पाहूनिया इष्ट काय झाले।।३।। वैभवसोहळा हिंडूनि पाहिला। अस्तमान झाला स्थळा आला।।४।। अन्न खाया नाही उपवासी मेला। पाहिल्याने त्याला काय आले।।५।। लक्ष्मण म्हणे स्वानुभवगोडी। घेती ते आवडी निजभक्त।।६।।

१६४४. शब्दज्ञानियाते काय लाभ झाला। भांडताचि गेला जन्म व्यर्थ।।१।। वृषभाचे पाठी शर्करेची गोणी। वाहताचि कष्टी झाला पशू।।२।। श्रीमंत ते लोक भक्षिती शर्करा। पशुप्रती चारा तृण प्राप्त।।३।। अन्नाचे पर्वत नेत्राने पाहिले। तरी काय धाले पोट त्याचे।।४।। लक्ष्मण म्हणे अर्थ घेती भक्त।

निजानंदे तृप्त निरंतर।।५।।

१६४५. पश्चात्तापे उलटला। तोचि अधिकारी झाला।।१।। संगा विटला जो नर। त्वरे होय साक्षात्कार।।२।। गुरुकृपे ब्रह्म होती। नित्यानंदी सदा वस्ती।।३।। येर शब्दज्ञानी नर। विषयी रत निरंतर।।४।। तेथे प्राप्ती नाही जाणा। बोल बोले झाला शहाणा।।५।। लक्ष्मण म्हणे शांती-। पाशी आहे प्रभुप्राप्ती।।६।।

१६४६. खरे आवडेना खोट्याचा का मान। काय शहाणपण मिरविता।।१।। प्रवृत्तिमार्गात मिरवा शहाणपण। निवृत्तिमार्गाने मौन आहे।।२।। परमात्मा आवडेना त्यासी ओळखीना। करी जारपणा प्रेमयुक्त।।३।। परस्त्रियांपाशी सदा वसे मन। मिरवी शहाणपण जगामाजी।।४।। लक्ष्मण म्हणे वर्म तो चुकला। यमपुरा गेला शहाणा तो।।५।।

१६४७. ब्रह्मज्ञान सांगे अनुभव नाही। त्याते लाभ काय झाला सांगा।।१।। वाचा ब्रह्म झाली न कळे ती खूण। विरळाचि जाण गुरुभक्त।।२।। अन्न हो म्हणता कोण तृप्त झाला। सांगा हो आम्हाला श्रेष्ठ तुम्ही।।३।। लक्ष्मण म्हणे वेगळी ती खूण। गुरुकृपेविण कळेना हो।।४।।

अहंकार – ममत्व – गर्व

१६४८. माझे माझे म्हणूनि का रे बद्ध होशी। देवा न जाणसी दुर्मती रे।।१।। हिरा टाकूनिया गारगोटी घेशी। स्वप्नवत् सुखासी भुललाशी।।२।। अठ्ठावीस नरक आहेत कठीण। तेथे रे नेऊन बुडविती।।३।। अघोर ते नरक भोगावे लागती। फार मंदमती तेथे पाही।।४।। लक्ष्मण म्हणे पाहे रे विचार। वेगी सखा कर परमात्मा।।५।।

१६४९. अहंकारे मोठे मोठे हो गोविले। प्राणी नागविले याने फार।।१।। जेथे तेथे पाहा उभा अहंकार। अवघे अवडंबर गोविले हो।।२।। माझे खरे तुझे खोटे हे चालिले। मीतूपणे झाले भेद नाना।।३।। प्राज्ञ जे पुरुष भेदाते ग्रासून। करिती भजन स्वानुभवे।।४।। लक्ष्मण म्हणे सर्वांचे जीवन। स्वामी कृपाघन विश्वरूप।।५।।

१६५०. सूर्य ज्याचे सत्ते करी हो भ्रमण। वायूते धावणे ज्याची सत्ता।।१।। समुद्र मर्यादा उल्लंघिना ज्याची। साउली विश्वाची स्वामी माझा।।२।।

प्राणाते चलन मना मनपण। मायेचे हे गुण प्रभुसत्ता।।३।। येथे प्राणी मी मी करिती दुर्मती। अक्षयी गर्जती अहंकारे।।४।। म्हणती आम्ही थोर आम्हाऐसा नाही। पडले प्रवाही अविद्येच्या।।५।। लक्ष्मण म्हणे मीपणे भ्रमले। पाय अंतरले म्हणूनिया।।६।।

१६५१. आम्ही एक ज्ञानी झालो हो व्युत्पन्न। आम्ही सर्वमान्य श्रेष्ठ आहो।।१।। आम्हाऐसा कोठे दावा हो बोलका। आम्ही त्या व्यापका ओळखिले।।२।। आपुली हो स्तुती करी वारंवार। मुकला तो नर भुलला हो।।३।। देव तेथे नाही दरोडा पडला। प्राणी नागवला गर्वाने तो।।४।। लक्ष्मण म्हणे माया ही दुर्धर। मोहिले हो फार प्राणी तिने।।५।।

१६५२. भक्ती आम्ही केली देव तो पावेना। करिती वल्गना नानाविध।।१।। मीतूपणा मन ते हो आटोपेना। शुद्ध ते होईना अंत:करण।।२।। काम क्रोध मोह याचे हो स्वाधीन। मोठा अभिमान अंगी ताठा।।३।। आचरण खोटे भक्तिहीन करी। देव त्रिपुरारी भेटेना हो।।४।। लक्ष्मण म्हणे शुद्ध करा मन। देव पंचानन पाहा डोळा।।५।।

१६५३. जेणे तुटे बंध ते तो आवडेना। वर्म ते कळेना झाले बंड।।१।। ब्रह्मांडी शहाणा मी झालो म्हणवी। आम्हाऐसा नाही कोणी येथे।।२।। माजगा तो हेला सदा दिसे मस्त। तेवी हा डुलत मदेकरून।।३।। श्रेष्ठा अपमानी करी अविचार। खराहूनि खर जाणावा तो।।४।। लक्ष्मण म्हणे मी मी करी सदा। स्वानंदाच्या कंदा विसरला।।५।।

१६५४. देहामाजी देव नाचतो गे सये। धरा त्याचे पाय बळकट।।१।। सकळा चेष्टवी परब्रह्मदेव। पाहा कृपाळुव दीनानाथ।।२।। अहंकृती गेल्याविण तो दिसेना। योगियाचा राणा तोचि देव।।३।। ब्रह्मादी देव त्याला रे स्तविती। पाहाता ती मूर्ती भ्रम हरे।।४।। लक्ष्मण म्हणे कृपेचा सागर। जगी जगदीश्वर भरलासे।।५।।

१६५५. ज्ञातेपणाचा अभिमान जववरी वसे। तववरी निज जवळी परि न दिसे।।१।। जववरी अहंभाव गेला नाही देहीचा। वस्तूचा लाभ कोठूनि होईल कशाचा।।२।। निरभिमान होऊनि परमात्मा मग पाही। तुझे तुजपाशी आहे बापा तुझेचि रे देही।।३।। निरभिमानी लक्ष्मण दीन झाला। गुरुकृपेकरूनि

त्यासी आत्मलाभ झाला।।४।।

१६५६. अनेक शास्त्रांची व्युत्पत्ती। बोल बोले नाना युक्ती।।१।। अहंभाव हा जाईना। सौख्य त्याते हे दिसेना।।२।। अजागळीचे ते स्तन। तेवी जाणावे हे ज्ञान।।३।। आत्मप्रचीतीवाचून। नोहे कदा समाधान।।४।। समाधाना हो वाचून। खटाटोप सर्व शीण।।५।। लक्ष्मण म्हणे फेरी। चुकेना ती विघ्न भारी।।६।।

१६५७. अती बोलका हो झाला। सभा जिंकीत चालिला।।१।। सहा शास्त्रांची योग्यता। पंडित म्हणविला ज्ञाता।।२।। आत्मप्रचीती जव नाही। तेथे सौख्या ठाव काही।।३।। बाह्य सौख्या गुंतला। तोचि परमार्था चुकला।।४।। जेव्हा अहंकार जाय। तेव्हा सौख्य प्राप्त होय।।५।। लक्ष्मण म्हणे ज्ञानी। वसती स्वानुभवस्थानी।।६।।

१६५८. अभिमान नरकमूळ। गर्व आहे अती खळ।।१।। देवा गर्व आवडेना। गर्व कोणाचा राहिना।।२।। गर्वापाशी सुख काई। गर्वापाशी मोक्ष नाही।।३।। गर्व आहे रे दुर्गुणी। ब्रह्मादिका केली हानी।।४।। जेथे गर्व वसे फार। वृथा जाणावा तो नर।।५।। लक्ष्मणाचा दातार। गर्वापासून आहे दूर।।६।।

१६५९. रात्रंदिन करिसी वाद। स्मरेनाशी परमानंद।।१।। साहित्य व्याकरण पढलासी। अभ्यासही त्वा केलासी।।२।। मीपणा का रे जाईना। अहंकृती का राहिना।।३।। अहंकृती गेल्याविण। अवघा दिसे हा हो शीण।।४।। गर्व आवडेना देवा। गर्व घातकी जाणावा।।५।। लक्ष्मणाचा दातार। गर्वापासून आहे दूर।।६।।

१६६०. वादामाजी सुख नाही। वादामाजी लाभ काही।।१।। जन्म वादता रे गेला। परमात्मा दुरावला।।२।। निवांत होऊनि आपण। स्वरूपी व्हावे रे तल्लीन।।३।। लक्षिता लक्षिता रे जाण। तेथेचि जावे बा मुरून।।४।। लक्ष्मण म्हणे देव। हृदयी पाहा कृपाळुव।।५।।

१६६१. काय मी मी करितोसी। फार गाफील दिससी।।१।। सर्व कर्ता पंचानन। का रे न म्हणसी जाण।।२।। अहंकृतीने भुललासी। वर्म बापा चुकलासी।।३।। करी प्रभोचे भजन। सकल करा त्या अर्पण।।४।। लक्ष्मण

विनवी जना। का हो प्रभोते स्तवा ना।।५।।

१६६२. मन मुरल्याविण परमात्मा भेटेना। वाचाळपणे परमात्मा गवसेना।।१।। मीपणा देही अहंकृती जववरी वसे। परमात्मा जवळी परि कदाही न दिसे।।२।। मीपणा टाकी मग सुखरूप पाही। परमात्मा आहे बापा तुझिये देही।।३।। लक्ष्मण विनवी सर्वा तुम्ही ज्ञाते आहा। गर्वाते टाकूनि मग आनंदे देव पाहा।।४।।

१६६३. गर्व नाशासी कारण। गर्वे बुडाला रावण।।१।। देव ज्याचे बंदिजन। राबविले रात्रंदिन।।२।। शिववरदेकरून। देव केले अति दीन।।३।। ब्रह्मा सांगे तिथीवार। इंद्र गुंफी पुष्पहार।।४।। अग्नी नित्य धुई लुगडे। वायू धाके अंगण झाडे।।५।। वरुण संमार्जन करी। कुबेर उभा तिष्ठत द्वारी।।६।। चंद्र सूर्य मशाला हो। ज्याचे पुढे धरिल्या हो।।७।। नवग्रहांची पायरी। शोभली हो ज्याचे द्वारी।।८।। ऐसे नानापरी करून। देव राबविले ज्याने।।९।। राज्य ब्रह्मांडाचे गेले। वैभव अगणित झाले।।१०।। गर्वे कुळक्षय झाला। अंती एकलाचि गेला।।११।। लक्ष्मण म्हणे बा रे। घाला दिसे अहंकारे।।१२।।

१६६४. देव बंदी हो घातले। राज्य ब्रह्मांडाचे गेले।।१।। ब्रह्मांडातील संपत्ती। श्रेष्ठ आणिली लंकेप्रती।।२।। ऐंशी सहस्र अंगना। श्रेष्ठ शोभल्या रावणा।।३।। लक्ष पुत्र नातू फार। सव्वा लक्ष अती क्रूर।।४।। अगणित सेनाभार। राक्षस विक्राळ भ्यासूर।।५।। लंकापूर सुवर्णाचे। स्थान दिव्य शोभे ज्याचे।।६।। ज्याची वैभवाची गणना। नोहे संग्रह वस्तू नाना।।७।। अठरा क्षोणी वाजंत्री हो। ज्याचे द्वारी सर्वदा हो।।८।। देव धाके हो राबती। श्रेष्ठ धाके हो कापती।।९।। इंद्रादिक बद्धपाणि। रावण शोभे मुख्यासनी।।१०।। त्याच रावणाचे शिर। तुटून पडले भूमीवर।।११।। ग्रीध बैसले त्या शिरी। उरले नाही साह्यकारी।।१२।। अंती कोणी नाही उरले। कूळ समूळ बुडाले।।१३।। लक्ष्मण म्हणे बा रे। मिथ्यामय प्रपंच रे।।१४।।

१६६५. गर्वापाशी देव नसे बापा जाण। गर्वे नागवण फार केली।।१।। गर्व हा घालवी गर्व हा नागवी। गर्व हा करवी येरझारा।।२।। विद्याभ्यासकाने निगर्वी असावे। प्रभोते स्मरावे प्रेमयुक्त।।३।। लक्ष्मण म्हणे देवा पंचानना। नको आम्हा दीना गर्व देवा।।४।।

१६६६. नका नका नका नका। गर्वे वाया फुंजू नका।।१।। फिका फिका फिका फिका। फिका सर्व हा रंग फिका।।२।। एका एका एका एका। करा मनाचा हो एका।।३।। तेणे निका निका निका। होय स्वानुभव निका।।४।। जो का जो का जो का जो का। घेती सनकादिक जो का।।५।। लक्ष्मण म्हणे निका। अनुभव आहे निका।।६।।

१६६७. दो दिवसांची गुजराण। काय राहतोसी गर्वाने।।१।। सार्थक करी बा आपुले। पुढे सुख रे होईल।।२।। इतर करिसी वल्गना। नाम येईना रे वदना।।३।। लक्ष्मण म्हणे सोय धर। चुकवी यमाजीचा मार।।४।।

१६६८. एक नासले गर्वाने। विद्यावैभवेकरून।।१।। कर्मकांडाचा अभिमान। एकाप्रती तो दारुण।।२।। विधिनिषेधी पडले। म्हणूनि स्वरूपा अंतरले।।३।। कामी भर या मनाचा। म्हणूनि विसर पायाचा।।४।। मन शुद्ध हे होईना। तेणे सुख ते दिसेना।।५।। लक्ष्मण म्हणे शूर। समदृष्टीने चतुर।।६।।

१६६९. शास्त्र पढोनिया गर्व तो जाईना। काय तो शहाणा करावा हो।।१।। कथूनिया ज्ञान अनुभव नाही। स्वहित ते काही सुचेना हो।।२।। अंगी ताठा मोठा सदा धुसधुसी। त्याते हृषिकेशी भेटेना हो।।३।। लक्ष्मण म्हणे तेथे सुख नाही। संशयाचे डोही बुडाले हो।।४।।

१६७०. मी मी करितोसी म्हणूनि भ्रमतोसी। नाना जन्म घेशी मीपणे रे।।१।। टाकी रे मीपणा होई रे शहाणा। प्रभोचे चरणा लाग वेगी।।२।। विवेके करूनि मन आवरावे। स्वरूपी लावावे प्रेमयुक्त।।३।। मुखी नाम घेई मग भय नाही। मग तुज काही बाधेना रे।।४।। लक्ष्मण म्हणे पाहे बा विचार। पुढे विघ्न थोर आहे बापा।।५।।

१६७१. परमपुरुषा गर्व हा रुचेना। गर्वे पाहताना देव दूर।।१।। वरलिया सोंगा काय भुललासी। विचार मानसी करी बापा।।२।। नरक मांस कीटक दुर्गंधी शरीरी। त्याची काय थोरी वागविसी।।३।। गौरचर्म वेष्टिले दुर्गंधी कोठार। तेथेचि तू स्थिर झालासी रे।।४।। काय ती स्त्री तूते मोक्ष रे देईल। वय गमावील व्यर्थ बापा।।५।। लक्ष्मण म्हणे सार्थक करी रे। नरकी ही तनू रे जाईल की।।६।।

१६७२. विद्या-अभ्यासाने गर्वे जो दाटला। वर्म तो चुकला शिणला

तो।।१।। द्रव्याच्या मदाने उन्मत्त जो झाला। यमाने मानिला बस्त माझा।।२।। मदे वल्गना करीतसे फार। यमाचे किंकर हास्य करिती।।३।। म्हणती नरकी नेऊन बुडवा याला। बरवा हा माजला पशू आहे।।४।। लक्ष्मण म्हणे निगर्वी होऊन। प्रभोचे चरण धरावे हो।।५।।

१६७३. मी ज्ञाता मी श्रेष्ठ वर्ण उत्तम रे। हेचि घालवी रे प्राण्यालागी।।१।। मी श्रेष्ठ वेदान्तशास्त्राचा जाणता। मजऐसा ज्ञाता कोण दावा।।२।। व्युत्पत्तिबळे तो जय पावतसे। अंगी दाटतसे फुंज मोठा।।३।। फार अभिमान अंगी दाटला रे। प्रभू दिसेना रे अभिमाने।।४।। देही भगवान परि त्या दिसेना। काय तो शहाणा शिणला हो।।५।। लक्ष्मण म्हणे निगर्वी तो असता। भगवान हो होता तोचि स्वये।।६।।

१६७४. वेद मी पाठक दशग्रंथी मी हो। मी ज्ञाता झालो हो जगी एक।।१।। त्रिभुवनी मजऐसा कोणी नाही। ब्रह्मदेव काई आम्हापुढे।।२।। अहोरात्रंदिन मी मी करीतसे। जगी आम्हाऐसे कोण आहे।।३।। ऐसे वर्तताना गर्व अंगी आला। देव अंतरला गर्वाने रे।।४।। देही भगवान गेला विसरून। शहाणा असून चुकला हो।।५।। लक्ष्मण म्हणे गर्वे न फुंजता। भगवान होता तोचि स्वये।।६।।

१६७५. ज्ञातेपणाचा रे गर्व हा नसावा। गर्वाचा करावा चेंदा बापा।।१।। अहंकृतीने रे देव हा दिसेना। देही योगिराणा आहे पाहा।।२।। जेव्हा अभिमान गळे रे समूळ। तेव्हा तो दयाळ दिसे बाप।।३।। अभिमान हा रे नरकासी कारण। अभिमाने कोण तरला हो।।४।। लक्ष्मण म्हणे पाहा विचारून। गर्वे नागवण झाली फार।।५।।

मन

१६७६. मनचि कारण बद्धमुक्ततेला। सर्वत्र कर्माला प्रधान हो।।१।। मनाचे स्वाधीन होता सुख नाही। मन हे विषयी गुंतवी हो।।२।। हस्तपादाविण देहाते नाचवी। जीवाप्रती गोवी बंदिखानी।।३।। मर्कटवत् हा जीव याने केला। अजन्मा आणिला जन्माप्रती।।४।। लक्ष चौऱ्यांशी फिरतसे योनी। नाना त्या जाचणी भोगवी हो।।५।। लक्ष्मण म्हणे प्रभोभक्त ज्ञाते। वळूनि मनाते अक्षयी सुखी।।६।।

१६७७. अहो मनाचे शेवटी। मन न्यावे ही हातवटी।।१।। उलट मारूनिया झाले। निजरूप ते पाहावे।।२।। तेचि अंग येतसे अंगा। भक्ती प्रिय आत्मलिंगा।।३।। आप पर नुरे काही। ध्याता ध्यान नुरे तेही।।४।। ज्ञाता ज्ञान तेही नुरे। ज्ञप्तिमात्र ते असे रे।।५।। लक्ष्मण म्हणे तेही योगी। सदा वसती त्याचि जागी।।६।।

१६७८. मन हे धावता याते आवरावे। अथवा आपण व्हावे सर्व काही।।१।। आवरावे याहून सर्व आपण व्हावे। साधन हे बरवे सोपे बा हो।।२।। आपणचि होता मग भय नाही। सुख ते अक्षयी प्राप्त होय।।३।। तू एक मी एक जववरी वसे। तववरी पाश मायेचा हो।।४।। आपण होता हो माया मागे फिरे। आपणामाजी विरे ऐसा ब्रह्म।।५।। लक्ष्मण म्हणे स्वानुभव जेणे। ज्ञानाची हो चिन्हे प्राज्ञादेही।।६।।

१६७९. मन हे मातंग यावरी बैसून। विवेक अंकुशाने आवरावे।।१।। विवेकांकुशाने होतसे स्वाधीन। उन्मत्त हे मन आवरावे।।२।। ज्ञान ही संपत्ती वैराग्य हे बा रे। विवेक बा रे अंकुश हो।।३।। त्रिकोणी अंकुश याने हा उन्मत्त। राहातसे स्वस्थ सुखरूप।।४।। विवेक हा आहे दहावी हो निधी। विवेकी जे बुद्धी धन्य प्राणी।।५।। लक्ष्मण म्हणे विवेक हा सार। करा वारंवार संग त्याचा।।६।।

१६८०. मन हे चपळ अती अनिवार। हिंडे निरंतर विषयद्वारी।।१।। मुमुक्षे याप्रती अक्षयी वळवावे। स्वरूपी लावावे सदोदित।।२।। अभ्यास हो नित्य ठेवावा अंतरी। तेणे त्रिपुरारी कृपा करी।।३।। व्याघ्र सर्प पाहा अभ्यासे आकळिले। विष ते जिरविले कितीकांनी।।४।। नाना विद्या कळा अभ्यासे हो प्राप्त। अभ्यास प्रस्तुत कारण येथे।।५।। लक्ष्मण म्हणे अभ्यास हो करा। तेणे विश्वंभरा जिंकाल हो।।६।।

१६८१. मन कारण मोक्षाला। मन कारण बंधाला।।१।। मनापाशी सुखदुःख। मनोमार्गे स्वर्ग नरक।।२।। मन विषयी रतले। म्हणूनि जन्मा येणे झाले।।३।। मन अभ्यासे फिरवावे। जन्ममृत्यूते रोधावे।।४।। स्वानुभवजन्य ज्ञान। वृत्ती होय समाधान।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ति-। मार्गे फिरे मनोवृत्ती।।६।।

१६८२. ब्रह्म सदा सदोदित। स्वामी ब्रह्मांडभरित।।१।। संग नाही त्या निःसंग। परात्पर जो अव्यंग।।२।। अद्वयानंद अक्षयी। वस्तू भरली सर्वठायी।।३।। दृश्यातीत निरंजन। दृश्य मायेचे हे गुण।।४।। मन माघारी फिरवावे। आपआपणा स्मरावे।।५।। लक्ष्मणा सुख तेणे। केवळ अद्वयदृष्टीने।।६।।

१६८३. मन फिरता राहिना। विषयवासना जाईना।।१।। अहो फिरे रात्रंदिन। चरे विषयी उडून।।२।। धरू जाता घाली उडी। विषय धरीतसे तोंडी।।३।। आवरिता ना आवरे। याते युक्ती आहे बा रे।।४।। सर्वांभूती परमेश्वर। ऐसा धरावा निर्धार।।५।। अहो प्रेमे रात्रंदिन। भाव धरावा आपण।।६।। ऐसे बाणता हे फिरे। विषयवासना ही विरे।।७।। श्रवण मनन निदिध्यास। हाचि असावा मनास।।८।। लक्ष्मण म्हणे येणे। मन होय ते उन्मन।।९।।

१६८४. माशी बैसे मधावरी। मुंगी शर्करा स्वीकारी।।१।। क्षुधित पडे अन्नावरी। जार जारिणीते धरी।।२।। पतंग पडे दीपावर। नाही मरणाचा स्मर।।३।। तैसे मन प्रभोपायी। प्रेमे लावावे अक्षयी।।४।। मग होय साक्षात्कार। ब्रह्मानंद निरंतर।।५।। लक्ष्मण म्हणे शूर। स्मरे धाले पूर्वी फार।।६।।

१६८५. आकाशाची घडी करील रे कोण। वायूते वळून आणील हो।।१।। उन्मत्त हे मन आहे अनिवार। आटोपेना क्रूर धावे बंड।।२।। वायूहूनि याचा वेग आहे थोर। धावे देशावर अती क्रूर।।३।। येथे विवेकाचे आहे हो कारण। विवेकावाचून कार्य नोहे।।४।। लक्ष्मण म्हणे विवेकाचे डोही। सुखे बुडी द्यावी सुख दिसे।।५।।

मनोबोध

१६८६. मनराया तुझे स्वाधीन जाहलो। म्हणूनि भ्रमलो नाना योनी।।१।। आता नको नको मना गुंतू येथे। प्रभो विश्वनाथ सखा करी।।२।। आता मायाजळी जरी तू गुंतसी। मग त्या दुःखासी पार नाही।।३।। काळ रे येऊनि भक्षील रे जेव्हा। सोडविता तेव्हा कोणी नाही।।४।। सोडविना माय बाप भाऊ धनी। काळ तो ओढूनि नेतो त्वरे।।५।। सोडविना राजा पृथ्वीचा पती।

एका उमापतीवाचूनिया।।६।। लक्ष्मण म्हणे प्रभोपायी राही। मग भय नाही कृतांताचे।।७।।

१६८७. मना तुजप्रती करितो विनंती। प्रभोपायी वसती करी सदा।।१।। वास करी पायी भ्रमू नको वाया। वश स्वामिराया करा वेगी।।२।। तुजविण कार्य कदाही होईना। तूचि सर्व मना करविसी।।३।। लक्ष्मण म्हणे तुजला विनंती। दान आम्हाप्रती देई हेचि।।४।।

१६८८. मना पाहे ते सदन। निज प्रभूचे भुवन।।१।। अरे आनंद त्या वनी। प्रभू पाहा शूळपाणि।।२।। ज्ञानगंगेतटी वसे। परमात्मा तो महेश।।३।। स्वानुभव काशीपूर। सकळ योगिया माहेर।।४।। अती त्वरे चाल मना। पुजू योगियाचा राणा।।५।। लक्ष्मणाचे जीवन। विश्वनाथ कृपाघन।।६।।

१६८९. अरे आनंदाची खाणी। शिव श्रेष्ठ मोक्षदानी।।१।। सर्व सुखाचे ते मूळ। परब्रह्म जाश्वनीळ।।२।। त्याते कैसा तू रे मना। विसरलासी कृतघ्ना।।३।। फिर फिर बा त्वरित। सखा करी उमाकांत।।४।। लक्ष्मण म्हणे बापा। गुंतू नको खटाटोपा।।५।।

१६९०. मना शंकर हा सत्य। दृश्यभाग हा अनित्य।।१।। संग सांडी या दृश्याचा। रंग भरी स्वानंदाचा।।२।। शंभो स्वानंदाची खाणी। अक्षयी शोभे जनी वनी।।३।। तुजजवळी तो वसे। परि तुज का न दिसे।।४।। विषयसंग सोडी सोडी। चरणामृत घेई गोडी।।५।। लक्ष्मणा दान देई। वस्ती करी प्रभोपायी।।६।।

१६९१. मना मोठा लाभ घेई। जेथे नाही गाथागोवी।।१।। ते सुख प्रभोपायी वसे। अक्षयी शोभे हा महेश।।२।। अनंत ब्रह्मांडे भरला। सत्तामात्रे करितो लीला।।३।। तू त्यामाजी रे आहेसी। मूर्खा त्याते तू नेणसी।।४।। उलट मारी झडकरी। ब्रह्मसुखा तू अधिकारी।।५।। लक्ष्मण म्हणे मना। इतर लाभ विटंबना।।६।।

१६९२. नाना प्रपंचाचे सुख। केवळ जाणा हे मायिक।।१।। स्वप्नी रंक राजा झाला। नाना अलंकार ल्याला।।२।। अनंत ब्रह्मांड जिंकिले। एकछत्री राज्य केले।।३।। जागा होय झडकरी। खाया नाही बोंब मारी।।४।। लक्ष्मण म्हणे मना। सांडी सुख हे सर्वज्ञा।।५।।

१६९३. प्रपंचसुखाची कहाणी। न ऐकावी कोणाची श्रवणी।।१।। झंगळांची शेज करून। वरी निजला आपण।।२।। निद्रा कैसी येईल। प्राण व्याकूळ होईल।।३।। येथे नको गुंतू मना। अती दिसे विटंबना।।४।। लक्ष्मण म्हणे मना। शरण जाय पंचानना।।५।।

१६९४. मना शांतिचिये घरी। प्रेमयुक्त वास करी।।१।। सांडी संग या क्रूराचा। संग धरी विवेकाचा।।२।। धन्य विवेकी ते नर। सदा करिती प्रभोस्मर।।३।। स्मरापाशी वसे शांती। शांतीपाशी अक्षयी तृप्ती।।४।। लक्ष्मण म्हणे मना। प्रेमे स्मर पंचानना।।५।।

१६९५. हरिश्चंद्र पुण्यशीळ। डोंबाघरी वाहे जळ।।१।। असंख्य यातना भोगून। सत्त्व नाही ढळले पूर्ण।।२।। राजा नळ पुण्यश्लोक। नानापरी भोगिले क्लेश।।३।। पांडव वनवास भोगिती। दुर्धर प्रारब्धाची गती।।४।। प्रारब्ध हरिहरा जड। काय मानवाचा पाड।।५।। लक्ष्मण म्हणे मना। काही होवो स्मर पंचानना।।६।।

१६९६. मना भक्तिपंथे जावे। सुखा पात्र मग व्हावे।।१।। भक्तिघरी ज्ञान वसे। ज्ञानापाशी तो संतोष।।२।। मग सर्वदा आनंद। स्वानुभवे निजबोध।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। मूळ पाया सर्वाप्रती।।४।।

१६९७. मना भक्तिपंथ धरी। नको गुंतू या संसारी।।१।। विषय घालक घालक। प्रेमे स्मरी बा त्र्यंबक।।२।। सज्जनाचा संग धरी। दिसे सौख्य या शरीरी।।३।। लक्ष्मण म्हणे मना। नको सेवू कुवासना।।४।।

१६९८. मना पापबुद्धी सोडी। धरी सद्‌बुद्धी आवडी।।१।। सद्‌भाव हा तारक। क्रूर भाव हा घालक।।२।। क्रूरभावाने गेले वाया। प्रेमे स्मरा शंभोराया।।३।। लक्ष्मणा दे आनंद। तोडी नाना भेद छंद।।४।।

१६९९. मना पापबुद्धी सोडी। धरी सद्‌बुद्धी आवडी।।१।। सद्‌भावनेने सुख। भेदभावनेने दु:ख।।२।। ज्ञाते सद्‌भाव धरिती। म्हणूनि प्रिय प्रभोप्रती।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। वश होतो महादेव।।४।।

१७००. मना सुवासना धरी। कुवासना अव्हेरी।।१।। कुवासना घालक। सुवासना ही तारक।।२।। धर्मनीती न सांडावी। कृपा करी तो शिवगोसावी।।३।। लक्ष्मण म्हणे मना। प्रिय होशील पंचानना।।४।।

१७०१. मना आंतरनिष्ठा धरी। बाह्य निष्ठा या अव्हेरी।।१।। आंतरनिष्ठे झाले पूर्ण। बाह्य दृष्टीने नाना विघ्न।।२।। कल्पनातीत होय जीव। कृपा करी महादेव।।३।। लक्ष्मण म्हणे तू स्थिर। होई सुख घे अपार।।४।।

१७०२. मना संग हा घालक। नको भावना अनेक।।१।। अनेक पदार्थी जो एक। तोचि स्मरू बा त्रिंबक।।२।। ओतप्रोत हो भरला। तोचि चेष्टवी तुजला।।३।। उलट दृष्टीची ही खूण। मागे पाहे परतोन।।४।। लक्ष्मण म्हणे योगी। सदा ध्याती प्रभोलागी।।५।।

१७०३. संग धरी रे स्मराचा। सदा आठव पायाचा।।१।। प्रभूचरणीचे सुख। घेई सांडी हे अनेक।।२।। मना सावध सावध। सेवी सेवी ब्रह्मानंद।।३।। लक्ष्मण म्हणे मना। सांडी दुष्ट ही वासना।।४।।

१७०४. मना तूचि अनिवार। तुझा मारा आहे थोर।।१।। मना तुम्ही मोठे ठकविले। महा ज्ञाते भ्रष्टविले।।२।। मना तुम्हा नमस्कार। मी अनाथ हो किंकर।।३।। स्वस्थ राहा तुम्ही मना। नका छेडू लक्ष्मणा।।४।।

वाचेस बोध

१७०५. वाचे रस तू जाणसी। वल्गना नाना करिसी।।१।। प्रभोगुण न वदसी। काय म्हणावे तुजसी।।२।। परिसावी विज्ञापना। वेगी स्तवी पंचानना।।३।। लक्ष्मणा दान देई। शिवनामी स्थिर राही।।४।।

१७०६. वाचे शिवलीला गाय। दयाळू तो शंभोराय।।१।। स्वाद सर्व तू जाणसी। प्रवीण गे तू म्हणविसी।।२।। तूते हेचि गे विनंती। प्रेमे स्तवी उमापती।।३।। फार रक्षिले पतित। भवरोगा करी अंत।।४।। लक्ष्मण म्हणे वाचे। फार मिष्ट नाम त्याचे।।५।।

१७०७. वाचे जपे शिवनाम। अंतरी वसे दृढ काम।।१।। बाह्य भजने सुख पडेना। अंतर शुद्ध झाल्याविना।।२।। काही दया शांती असावी। कामक्रोध आवरावी।।३।। मग सुख पावशील। देव हृदयी दिसेल।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। सर्वाठायी कृपाळुव।।५।।

१७०८. घेई घेई माझे वाचे। गोड नाम शंकराचे।।१।। लाभ दिसे मज मोठा। प्रेमे स्तवी नीलकंठा।।२।। हरे भवपाश विघ्न। सदय तो कृपाघन।।३।। वेगी होय सावधान। प्रेमयुक्त गाय गुण।।४।। लक्ष्मणा देई दान। वश करी

पंचानन।।५।।

१७०९. वाचे वाउगे बोलसी। देवराया न स्तविसी।।१।। येणे लाभ गे दिसेना। करिसी वाउगा धिंगाणा।।२।। आता नको जल्पू व्यर्थ। तोषवी तो दीनानाथ।।३।। दोषी झाले गे पावन। प्रिय प्रभोते स्तवन।।४।। स्तव स्तव निरंतर। वद वद हर हर।।५।। लक्ष्मण म्हणे हीन। केले प्रभोने पावन।।६।।

१७१०. वाचे घेई नाम प्रभूचे। गुण गाये त्र्यंबकाचे।।१।। तुज नमन करितो। स्तवी प्रभो आवडी तो।।२।। तो आहे गे कृपाघन। सोडवील मज येथून।।३।। लक्ष्मण म्हणे वाचे। सार्थक करी जन्माचे।।४।।

संसार–प्रपंच

१७११. दीर्घ स्वप्न हा संसार। बरवा करा हो विचार।।१।। खरा जरी हा असता। नाश कदा न पावता।।२।। पाहता पाहता हो नासती। आहे सर्वत्रा प्रचीती।।३।। बापाकरिता पुत्र रडे। तूही जाय प्रचीती रोकडी।।४।। तळमळ करिती सदा। सदा प्रपंचाचा धंदा।।५।। लक्ष्मण म्हणे कोणी। मूळ पाहिना शोधूनि।।६।।

१७१२. प्रपंचसुख आहे मृगजळवत्। स्वप्नीचे रे सुख तैसे जाण।।१।। देह हा तुझा शाश्वत रे नाही। विचारूनि पाही मनी बापा।।२।। मृत्तिकेचा खेळ पदार्थ करिती। सत्य ते मानिती अज्ञानी रे।।३।। तैसे प्राण्याप्रती सत्य हे मानले। देवा विसरले मायामोहे।।४।। लक्ष्मण म्हणे खरे आवडेना। म्हणूनि चुकेना गर्भवास।।५।।

१७१३. परिच्छिन्न स्वप्नवत् हा संसार। काही येथे खरे दिसेना हो।।१।। अती दरिद्री हो स्वप्नी राजा झाला। म्हणे मी सर्वाला श्रेष्ठ झालो।।२।। स्वप्नामाजी सुख भोगिले अपार। झाला राज्यधर त्रैलोक्याचा।।३।। जागा झाला अन्न नाही खायाप्रती। काय ती संपत्ती खरी झाली।।४।। तेवी हा संसार भासलासे सत्य। परि हा अनित्य दुःखरूप।।५।। लक्ष्मण म्हणे शिव सखा करा। अक्षयी सोयरा सुख देतो।।६।।

१७१४. स्वर्गनरकादी पसारा। कल्पनेने येरझारा।।१।। काल्पनिक संसार। मायामय हा विचार।।२।। काल्पनिक खटाटोप। मायागुणाचे आटोप।।३।। कल्पनेने नाना दुःख। भ्रांताप्रती कैचे सुख।।४।। सारा कल्पना ही द्वाड। वश

करा चंद्रचूड।।५।। लक्ष्मण म्हणे फिरा। मोडा कल्पनेचा थारा।।६।।

१७१५. सुख संसारी दिसेना। दुःखरूप हा हो जाणा।।१।। इंगळाचे शेजेवरी। निद्रा लागेल हो जरी।।२।। सर्पफणिचिये छाये। नित्य बैसता सुख होय।।३।। तरीच सुख या संसारी। सौख्य पावे देहधारी।।४।। अहो सावध सावध। सखा करा परमानंद।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। भक्ता सौख्य देतो देव।।६।।

१७१६. भवसर्प हा दारुण। याने ग्रासिले त्रिभुवन।।१।। विष उतरेना बा रे। लक्ष चौऱ्यांशी फेरे रे।।२।। अती दुःखाची ही खाणी। नरकवासादी जाचणी।।३।। शिवभक्ता भव नाही। सदा सुखी ते अक्षयी।।४।। भवसर्पा रगडिले। ब्रह्मानंदे तृप्त झाले।।५।। लक्ष्मण म्हणे बाप। सखा करा हरे ताप।।६।।

१७१७. नाशिवंत हा संसार। नाशिवंत हे शरीर।।१।। नाशिवंत दिसे सर्व। सत्य दिसे देवराव।।२।। प्रभोप्रती त्या स्तवा रे। भव तोचि निरसी रे।।३।। लक्ष्मण म्हणे देव। भावापाशी कृपाळुव।।४।।

१७१८. जन्ममरण हा घाला। हाचि मोठा दिसून आला।।१।। गर्भामाजी दुःख फार। बाहेर येता श्रम थोर।।२।। प्रपंच दुःखरूप जाणा। अंती होतसे विटंबना।।३।। सहस्र विंचवांच्या वेदना। मरणसमयी होतसे जाणा।।४।। लक्ष्मण विनवी गुरुराया। जन्म नको प्रभोराया।।५।।

१७१९. भुलू नको रे संसारा। पाहे विचार तू बरा।।१।। मिथ्याभूत हा संसार। जैसा वांझेचा विस्तार।।२।। होय सावध वेगेसी। आठवी रे तू गुरूसी।।३।। लक्ष्मण म्हणे गुरू खरा। त्याचे बळकट पाय धरा।।४।।

१७२०. भव ह्या समुद्री फार रे बुडाले। देवा विसरले मंद जाणा।।१।। प्रवृत्तिमार्गात फार ते सावध। देवाचे स्मरण होईना रे।।२।। चौऱ्यांशी लक्ष योनी त्या फिरती। अविद्येचा संग अनिवार।।३।। लक्ष्मण म्हणे वर्म ते चुकले। गेले फार प्राणी नरकालया।।४।।

१७२१. प्रपंचसुख हे स्वप्नवत् जाण। स्वप्नामाजी राजा जैसा रंक।।१।। गृह सुत धन हा मायेचा बाजार। तुज संग प्राण्या नाही रे जाण।।२।। परात्पर सोयरा तोचि शिव खरा। त्याविण हे सर्व वृथा जाण।।३।। भक्तिबळे शिव

वश करी वेगी। देतसे तो पद निजभक्ता।।४।। लक्ष्मण म्हणे तोचि आप्त आमुचा। त्याविण त्राता रे कोण दीना।।५।।

व्याघ्र–सर्प

१७२२. व्याघ्र प्रतापी तो थोर। करी जीवांचा संहार।।१।। दया नाही क्रूराप्रती। जीव फार त्याते भिती।।२।। माथा शूळव्यथा त्याते। दुःख कठीण क्रूराते।।३।। लक्ष्मण म्हणे दुःख। भोगी त्याते कैचे सुख।।४।।

१७२३. सर्पाच्या ह्या हो जाती। ताप सर्वत्राते देती।।१।। त्याचे पोटी वसे शूळ। दुःखे सर्वदा तळमळ।।२।। पूर्वकर्मे दुःखप्राप्ती। पूर्वकर्मे जीवा भ्रांती।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। स्मरा सौख्य देतो देव।।४।।

स्त्री – स्त्रीसंग

१७२४. कल्पवृक्षापाशी शिंदीचे ते झाड। न शोभे ते द्वाड काढावे हो।।१।। ब्रह्मचाऱ्यापाशी दासी ती शोभेना। विघ्ने करी जाणा महाथोर।।२।। जितेंद्रिय पुरुष भय हो मानिती। इतरांची गती तेथे काय।।३।। लक्ष्मण म्हणे नारी महाविघ्न। करी सावधान असावे हो।।४।।

१७२५. पृथ्वीपती राजा त्रैलोक्य जिंकून। विजयी होऊन आला ग्रामा।।१।। ग्रामाते येऊन लुटिला चोराने। शस्त्रही हिरून घेतले कर्मे।।२।। गाफील राहिला म्हणूनि लुटिला। अविद्येचा घाला मोठा आहे।।३।। पृथ्वीवरील तीर्थे करूनि प्राज्ञ प्राणी। आला हो सदनी सुखी झाला।।४।। सदनी स्त्रियांनी केला वरी घाला। गाफिलीने त्याला लुटिले हो।।५।। लक्ष्मण म्हणे सावध असावे। प्रभोते स्मरा हो विघ्न हरितो।।६।।

१७२६. कामिनी कांचन हेचि घालविती। योगी नागविती येथे फार।।१।। घाला हा दुर्धर कर्म हे कठीण। राहिले गुंतून फार येथे।।२।। मायेचा हा घाला दुर्धर बापा रे। वेसणी गोवी रे अविद्या ही।।३।। लक्ष्मण म्हणे सद्गुरू भजन। प्रेमे करिता विघ्न काय करी।।४।।

१७२७. सदा रागात राहतोसी। परस्त्रिया न्याहाळीसी।।१।। काम आहे रे दुर्जन। याने बहुता केली घाण।।२।। स्त्री विषवल्ली ही जाणा। छंद नको होय शहाणा।।३।। लक्ष्मण म्हणे जना। प्रीतीने गा हो पंचानना।।४।।

१७२८. काय फिरसी वणवण। स्त्रिया पाहासी न्याहाळून।।१।। नाशिवंत

ते कोठार। मळमूत्राचे माहेर।।२।। तिजभोवता रे फिरसी। परस्त्री नेईल नरकासी।।३।। रौरव भोगिसी रे फार। पाहे आपुला विचार।।४।। लक्ष्मण पतित दीन। गेला साधूसी शरण।।५।।

१७२९. स्त्री कुश्चळ अमंगळ। सकळ पातकांचे मूळ।।१।। तपोधना भ्रष्टविले। योगी फार नागवले।।२।। योगिजने दूर असावे। स्त्रियामाजी न राहावे।।३।। योगियाते विषवल्ली। विघ्नकर्ती दिसून आली।।४।। लक्ष्मण विनवी योगिया। फार सावध स्वामिराया।।५।।

साधू – योगी – ज्ञानी – संत – साधक

१७३०. जगाचे बोलणे विवेके सोसावे। आनंदे करावे नामस्मरण।।१।। कामक्रोधाचिये पडो नये छंदी। प्रेमे कृपानिधी पूजावा तो।।२।। मान अपमान होवो जावो काही। त्याची खंती काही मानू नये।।३।। समान सर्वांसी पाहावे साधूंनी। तेथे शूळपाणि वसे सदा।।४।। लक्ष्मण म्हणे साधू सुखी झाले। प्रभो ते रमले सुखरूप।।५।।

१७३१. धाकुटे हो व्हावे सर्वांहूनि सान। करावे भजन प्रेमयुक्त।।१।। होवो जावो काही खंती मानू नये। धरावे ते पाय बळकट।।२।। परिवार बंड स्वाधीन असावा। विवेक करावा वारंवार।।३।। मी ज्ञाता जगी कदा वाटू नये। कर्ता देवराय मानावा हो।।४।। लक्ष्मण म्हणे विवेकविचार। साधू निरंतर करिती हो।।५।।

१७३२. क्षमा तारक साधुजनाला। तीचि तारक योगियाला।।१।। योगी करिती अंगीकार। आनंदभरित निर्घोर।।२।। शांतमूर्ती त्या शोभती। जगी आनंदे क्रीडती।।३।। क्षमा हितकारक जाणा। क्षमा सुखकारक जाणा।।४।। क्षमा हरीने धरिली। भृगूने लाथ रे मारिली।।५।। क्षमा वैराग्याची माउली। शांती ज्ञानाची साउली।।६।। लक्ष्मण म्हणे क्षमा। साधुजनाचिया ये कामा।।७।।

१७३३. देह देवालय जाणा। मध्ये शोभे विश्वराणा।।१।। चिन्मय लिंग ज्योतिर्मय। स्वयंप्रकाश तो माय।।२।। अउमकारादी शब्द। जेथूनि उत्पन्न हे भेद।।३।। अर्धमात्रेचि जीवन। साक्षी ॐकारी पूर्ण।।४।। आपण नाहीसे व्हावे। तेव्हा प्रभूते पाहावे।।५।। सोऽहंभावे ते पूजन। करिती प्राज्ञ साधुजन।।६।। लक्ष्मण म्हणे येर। मोहे भ्रमती अपार।।७।।

१७३४. नीचाची संगती न धरिती योगी। लाभ जरी जगी झाला फार।।८।। नीचाचे संगाने होय अपकीर्ती। मानहानी पुरती होय पाहा।।९।। कस्तुरीचे पोते होय सुगंधित। हिंग पडला त्यात गेली गोष्ट।।१०।। सुगंध जाऊनि दुर्गंध लागला। अनर्थ जाहला कुसंगाने।।११।। लक्ष्मण म्हणे आपुलिया मना। शिकवावे नाना युक्तीकरून।।१२।।

१७३५. आत्मलिंग स्वप्रेमज्योती। ज्ञानानंदे केवळ ज्ञप्ती।।१।। तेथे रमती योगी जन। स्वानुभवे ते पूजन।।२।। त्याते स्मरावे परतोन। विषयसुखाते विटून।।३।। लक्ष्मण म्हणे शांती। अंगा येता होतसे प्राप्ती।।४।।

१७३६. अहो ब्रह्मसुखापुढे। काय स्वर्ग ते बापुडे।।१।। राज्य ब्रह्मांड हे तृण। भक्त मानिती वमन।।२।। ब्रह्मसुख हाता येता। तेथे कैची लोलंगता।।३।। सुख अक्षयी त्याहासी। ब्रह्मानंदाची ती राशी।।४।। अनंत ब्रह्मांडे पसारा। मिथ्यामय योगीश्वरा।।५।। लक्ष्मण म्हणे तेचि। शीतळ साउली आमुची।।६।।

१७३७. सुखदुःख हे हो प्रारब्धास्वाधीन। खंती वागवून काय लाभ।।१।। रात्रंदिन चिंता केली जरी फार। तरी ते होणार चुकेना हो।।२।। प्राज्ञ जे का प्राणी आनंदे वर्तती। भोग ते भोगिती विवेकी हो।।३।। प्रभोपायी जे का प्राणी झाले स्थिर। भय आणि घोर काय त्याहा।।४।। लक्ष्मण म्हणे करा हो भजन। तुट ते बंधन अविद्येचे।।५।।

१७३८. ज्ञानी म्हणावे तयाला। ज्याने आत्मा ओळखिला।।१।। मानी सर्वांते समान। असे निगर्वी आपण।।२।। भूतदया जेथे आहे। तेथे दया वसे पाहे।।३।। वाचाळ ज्ञानी जगी फार। आहे ऐका घरोघर।।४।। लक्ष्मणाचा स्वामी दातार। वाचाळापासाव आहे दूर।।५।।

१७३९. न लगे तप्तमुद्रा घेणे। न लगे कानन सेवने।।१।। न लगे करवत तो घेणे। न लगे नग्न ते फिरणे।।२।। गुरुपाय वेगी धरा। चुके चौऱ्यांशीचा फेरा।।३।। गुरुराव कृपाघन। करिती आपुले समान।।४।। लक्ष्मण म्हणे गुरू। तोचि विश्वाते आधारू।।५।।

१७४०. आबालवृद्धाचे बोलणे सोसावे। तरीच संतपण मिरवावे।।१।। गंगा वाहे निर्मळपणी। तैसे वर्तावे साधूंनी।।२।। सदा संतुष्ट असावे। कामक्रोधाते

जिंकावे।।३।। लक्ष्मण अपराधी। सोडवा हो कृपानिधी।।४।।

१७४१. साधकांनी सदा विवेक करावा। काम हा जिंकावा बंड क्रूर।।१।। परिवार सर्व स्वाधीन असावा। आत्मा ओळखावा गुरुकृपे।।२।। व्यवहार करावा साक्षिभूत त्यांनी। देव शूळपाणि स्तवावा हो।।३।। ऊर्मी जी उठे तिजला ग्रासून। स्वरूपी निमग्न असावे हो।।४।। लक्ष्मण म्हणे करावे भजन। भूती भगवान पाहावा हो।।५।।

१७४२. साधके सर्वदा एकान्त साधावा। सदाशिव ध्यावा निरंतर।।१।। संगाते विटूनि निजरूप ध्यावे। मन आवरावे विवेके हो।।२।। अंतरा हो माजी प्रवेश करावा। संसार पाहावा स्वप्नवत्।।३।। मन हे धावता विवेके आकळावे। स्वरूपी लावावे निजध्यासे।।४।। स्वरूपानुसंधाने मनोवृत्ती मुरे। द्वैतभाव नुरे अनुसंधाने।।५।। लक्ष्मण म्हणे सर्व आपण व्हावे। ब्रह्मानंद होय येणे युक्ती।।६।।

१७४३. साधके मनाते धावता धरावे। अथवा सर्व व्हावे आपणचि।।१।। धरू जाता धावे विषयावरी बंड। धावताचि तोंड फोडावे हो।।२।। विषयी उडून चरे रात्रंदिन। यालागी आपण सर्व व्हावे।।३।। आत्मभाव सदा धरिता हे विरे। स्वानंद हो भरे सर्व अंगी।।४।। ऐसा हा अभ्यास अक्षयी असावा। तेणे होय जीवा ब्रह्मप्राप्ती।।५।। लक्ष्मण म्हणे करा हो तातडी। काळ आला धाडी पडेल हो।।६।।

संतसंग

१७४४. शीतउष्णातीत माय। वस्तू दिसे निरामय।।१।। दृश्या अंतर्बाह्य वसे। परि ती जगा का न दिसे।।२।। डोळे असूनि आंधळे। पाहा केले मायापडळे।।३।। मोहपडळ निघेना। म्हणूनि वस्तू ती दिसेना।।४।। संतसंगे प्रेम लागे। निरसे पडळ मायालंग।।५।। लक्ष्मण म्हणे मग। वस्तुरूप दिसे जग।।६।।

स्वानुभव – आत्मज्ञान

१७४५. बाप उमादेविवर केला धनी। प्रभोचे चरणी सुख फार।।१।। आता नरस्तुती नाही करणार। नाही दरकार कोणाची हो।।२।। आमुच्या

धन्याचे देणे सर्वांप्रती। आज्ञा हो वंदिती सुर नर।।३।। प्रभूचिया द्वारी पडूनि राहिलो। सुखाते लाधलो स्वानुभवे।।४।। लक्ष्मण म्हणे शंभोऐसा धनी। नाही त्रिभुवनी करा सखा।।५।।

१७४६. स्वानुभवाचे भोजन। जेवा तुटे येणे जाणे।।१।। कडू तीक्ष्ण त्यागा हो। सुखकारक जेवा हो।।२।। षड्रिपू हे तिखट। याचा मानावा हो वीट।।३।। आशा तृष्णा कडू फार। त्यांचा करा हो अव्हेर।।४।। दया क्षमा शिरापुरी। जेवा सुख या शरीरी।।५।। तेलकट निंदा द्वेष। नका सेवू होईल नाश।।६।। समबुद्धी भात जेवा। तेणे सौख्य होय जीवा।।७।। लक्ष्मण म्हणे सत्य। सेवा सांडा ते असत्य।।८।।

१७४७. न लगे पंच्याग्नी साधन। कशाकरिता धुम्रपान।।१।। स्वये कथी पंचानन। सर्वा श्रेष्ठ हे कीर्तन।।२।। अल्प आयुष्यी जाणून। साधन काढिले निवडून।।३।। मग वृथा का शिणावे। सुखरूप गुण गावे।।४।। लक्ष्मणाचा दातार। कीर्तनी उभा निरंतर।।५।।

१७४८. सहज सांडूनि सायास। करिती अभागी पुरुष।।१।। देव असूनि जवळी। हिंडताती रानोमाळी।।२।। मृगनाभी हो कस्तुरी। स्वादास्तव भ्रमण करी।।३।। तैसे झाले हो प्राण्याला। जागा ठायीची चुकला।।४।। सुकृत समागम नाही। म्हणूनि झाली गाथागोवी।।५।। सिद्धकृपे लक्ष्मण। पाहे देही हो निधान।।६।।

१७४९. दृष्टीमाजी दृष्टी बाई। उलट दृष्टीने मुरवावी।।१।। पाहातया मुळा जावे। निजरूप ते पाहावे।।२।। यापरते हो पाहाणे। नसे नसे हो देखणे।।३।। अखंडित दुमदुमित। निजस्वरूपी निवांत।।४।। स्वानुभवे तेथे जावे। सर्व अंगी तेचि व्हावे।।५।। तेचि अंग होय सार। वासना निषिद्ध विरे रे।।६।। लक्ष्मण म्हणे गुरु–। कृपे कळे हा विचारू।।७।।

१७५०. स्वरूपी विसर म्हणूनि संसार। दुःखाचा डोंगर दृष्टीपुढे।।१।। माझे तुझे हे हो विसरेकरून। नाना हे बंधन झाले जाणा।।२।। षड्रिपूंचे हे मागे हो थोतांड। वाढले हो बंड विसराने।।३।। फिरूनि राहता नुरे हा हो काही। स्वानुभवी होय मुक्त प्राणी।।४।। लक्ष्मण म्हणे मुक्तचि हो आहे। परि मायामोहे झाला बद्ध।।५।।

१७५१. अवघा देव देव देव। परब्रह्म शंभोराव।।१।। करा भाव भाव भाव। करा दृढ सत्य भाव।।२।। स्मरा स्मरा स्मरा स्मरा। परेपरता नाथ स्मरा।।३।। करा त्वरा त्वरा त्वरा। आपआपणाते वरा।।४।। उलट मारा मारा मारा। दृश्य पडदा वेगी सारा।।५।। लक्ष्मण म्हणे शिरा। मूळधामी वेगी शिरा।।६।।

१७५२. करा डोळा डोळा डोळा। सर्व डोळ्यांचा हो डोळा।।१।। करा गोळा गोळा गोळा। अंत:करणवृत्ती गोळा।।२।। मेळा मेळा मेळा मेळा। स्वानुभवे भरा मेळा।।३।। सोहळा सोहळा सोहळा सोहळा। निजानंद घ्या हो सोहळा।।४।। गिळा गिळा गिळा गिळा। नाना भेदभाव गिळा।।५।। लक्ष्मणी हो उजाळा। अवघा लखलखाट झाला।।६।।

१७५३. पाहा आपुली जन्मभूमी। काहो भ्रमता ग्रामोग्रामी।।१।। जन्मभूमीचा महिमा। वंद्य असे आगमा निगमा।।२।। जेथूनि आपण आलो हो। तेचि स्थान पाहावे हो।।३।। पाहाण्याची हेचि युक्ती। विषयी उपजावी विरक्ती।।४।। विरक्तीने गुरुदेव। कृपा करितो कृपाळुव।।५।। लक्ष्मण म्हणे मग। स्वानुभवे घडे संग।।६।।

१७५४. जीवभावनेने दु:ख। ब्रह्मभावनेने सुख।।१।। ब्रह्मभाव हा धरावा। जीवभाव हा वारावा।।२।। भक्तियोगे भाव होय। स्मरा वेगी प्रभूपाय।।३।। स्मरे कल्पना ही विरे। शांतिसुख ते लाधे रे।।४।। लक्ष्मण म्हणे ज्ञप्ति-। मात्रे होय ती प्रचीती।।५।।

१७५५. देव पाहा पाहा वेगी। तोचि हा हो भरला जगी।।१।। जगभाव हा मायिक। माया नाही अवघा एक।।२।। स्वरूपी नि:शेष हे नाही। भ्रांती हेचि मायागोवी।।३।। स्वानुभवे एकपण। नुरे हेही येथे भान।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। अंतर्बाह्य महादेव।।५।।

१७५६. पूजा घेशी पूजा करिशी। देव भक्त तू आहेसी।।१।। नाना सुगंध उपचार। तूचि आहेसी शंकर।।२।। बिल्वपुष्प आदी सर्व। स्वत: तूचि महादेव।।३।। अनंत ब्रह्मांडे हे रोळ। प्रभो तुझा सर्व खेळ।।४।। येथे मी कोण आहे दुजा। अवघा तूचि वृषभध्वजा।।५।। लक्ष्मण नाही उरी। अवघा तूचि त्रिपुरारी।।६।।

१७५७. येथे विकल्पाचे नाही हो कारण। भाविकाचे पूर्ण काम होती।।१।। वाचाळ ते मेले खरे खोटे म्हणता। अभिमाने वार्ता नेणती हो।।२।। शब्दज्ञान्यापाशी बोलाचा सुकाळ। भक्तीचा दुकाळ तेथे जाणा।।३।। बोलाऐसी करणी नाही तेव्हा फोल। स्वानंदाची ओल पाहिजे हो।।४।। स्वानुभवजन्य तेचि ज्ञान बा रे। परोक्ष ज्ञान रे घरोघरी।।५।। लक्ष्मण म्हणे स्वानुभव भाव। तेथे उमाधव अक्षयी वसे।।६।।

१७५८. यज्ञ कोट्यादी ते केले। दान पृथ्वी राज्य दिले।।१।। सिद्धी झाल्या जरी प्राप्त। कर्मकांडादी विख्यात।।२।। वेदशास्त्रे पाठांतर। नानापरी तो चतुर।।३।। एका आत्मज्ञानाविण। न तुटे जन्माचे बंधन।।४।। बाह्यकर्मे फल प्राप्त। काम्यकर्मादी विख्यात।।५।। लक्ष्मण म्हणे वेद। ऐसे बोलती ते सिद्ध।।६।।

१७५९. देव सर्वठायी आहे बाई। त्याविण रिते काही नाही।।१।। व्यापकाला धरू जाता। तो नये की गे हाता।।२।। कोठे तो गे बाई दिसेना। सत्तेविण पान हलेना।।३।। कोण्या उपाधीत नाही। कोणे कर्मी लिप्त नाही।।४।। गुरुकृपे लक्ष्मण। पाहे देवा हो लागून।।५।।

१७६०. देव सर्वठायी असे। त्याविण रिते काही नसे।।१।। ब्रह्म जैसे तैशापरी। व्याप्त तो चराचरी।।२।। गुरुकृपेविण दिसेना। सद्गुरू दावीतसे खुणा।।३।। सद्गुरूचा आधार करा। अंतर्बाह्य पाहा ईश्वरा।।४।। लक्ष्मणाचा दातार। गुरुभक्ताचे समोर।।५।।

१७६१. देव पाहा हो हृदयी। देव आहे सर्वठायी।।१।। सूर्य जैसा घटी दिसे। तैसा सर्वठायी असे।।२।। वृक्षपत्र एक हलेना। प्रभोचिया सत्तेविना।।३।। सूत्र असे त्याचे हाती। चेष्टवी तो सर्वाप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे देवा। पार न कळे कृपाळुवा।।५।।

१७६२. प्रवृत्तिमार्गचि स्वप्नवत् आहे। विचारूनि पाहे मनी बापा।।१।। येथे गुंततोसी पुढे हे कठीण। होई सावधान बापा वेगी।।२।। नाना उपासना नाना जपतप। नाना खटाटोप भ्रमचि हा।।३।। आत्मज्ञानाविना सर्व हा रे शीण। आत्मा ओळखून करी कार्य।।४।। लक्ष्मण म्हणे आत्मज्ञानेविण। भव हे बंधन तुटेना हो।।५।।

गंगामाहात्म्य

रेवातीरे तपः कुर्यात् मरणं जाह्नवीतटे।
दानं दद्यात् कुरुक्षेत्रे तत्त्रये गौतमीतटे।।१।।
कोटीधनुर्हरिगीतायां तदर्धं गौतमीतटे।
तदर्धं जपयज्ञेच तदर्धं नामकीर्तने।।२।।
नमो गंगे महागंगे महेशी शिववल्लभे।
महापात्रे महादेवी गोदावरि नमोस्तुते।।३।।

गंगा गौतमी तीर्थमालिकेचे अभंग

१७६३. ब्रह्मरूप ब्रह्मगिरी। अगणित तीर्थे वसती वरी।।१।। सिद्ध वसती तापस। तेथे केला प्रभोने वास।।२।। त्र्यंबकलिंग ते अनादी। अती सदय कृपानिधी।।३।। गौतममुनी तो विख्यात। त्याने प्रसन्न केला तात।।४।। प्रेमे स्तवन करूनि। गंगा घेतली मागूनि।।५।। करावया जगदोद्धार। प्रसन्न झाला तो शंकर।।६।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करी तिही जगा।।७।।

१७६४. माता त्रैलोक्यपावनी। जग उद्धरावया जननी।।१।। प्रथम तीर्थी त्र्यंबकतीर्थ। त्याते म्हणती कुशावर्त।।२।। अगणित उद्धरिले प्राणी। धन्य धन्य गंगा जननी।।३।। औट कोटी तीर्थमाळा। शोभती मातेचिया गळा।।४।। लिंगे वसती ठायी ठायी। जगा पावन करी ती आई।।५।। ब्रह्मदेवाचे वचन। कथिले नारदाकारण।।६।। पुढे व्यासाने कथिले। ब्रह्मपुराण नाम झाले।।७।। लक्ष्मण म्हणे थोर। महिमा वर्णिती मुनीश्वर।।८।।

१७६५. वराहतीर्थ ते पावन। बहुत उद्धरिले जन।।१।। साधुपती तो ब्राह्मण। तेथे गेला उद्धरून।।२।। अती कृपण हो होता। नेणे काही भक्तिवार्ता।।३।। धन्य गौतमी जननी। तापत्रय ती नाशनी।।४।। शिवावेगळी ती नाही। लिंगे वसती ठायीठायी।।५।। लक्ष्मण म्हणे जगदुद्धार। करी ती गंगा गंगाधर।।६।।

१७६६. पंचगंगा तो संगम। आहे श्रेष्ठ तो उत्तम।।१।। सावित्री आणि गायत्री। श्रद्धा मेधा सरस्वती।।२।। अंजनीपर्वत विख्यात। अद्रिकापिशाच्चतीर्थ तेथ।।३।। वायुदेवा हो पासून। अंजनीपुत्र हनुमान।।४।। नैर्ऋत्य अद्रिकेपासून।

पिशाच्च राहू जन्मला जाण।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। तेथे वसे महादेव।।६।।

१७६७. पिशाच्चतीर्थ गोदेतीरी। शोभे दीनाते उद्धरी।।१।। विश्वामित्रतीर्थ पावन। गोदेतीरी शोभायमान।।२।। लिंगे वसती ठायीठायी। गंगा त्रैलोकी विजयी।।३।। लक्ष्मण म्हणे माता। पावन करी ती पतिता।।४।।

१७६८. क्षुधाहरण हो तीर्थ। गंगातीरी ते विख्यात।।१।। कनकनामा महाऋषी। तेथे शोभे तपोराशी।।२।। अहिल्यासंगम वसे तेथे। इंद्रतीर्थ ते विख्यात।।३।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करी तिही जगा।।४।।

१७६९. कुमारतीर्थ गोदेतीरी। शोभे पवित्र श्रेष्ठ भारी।।१।। फार उद्धरिले दोषी। पावन करी हो जगासी।।२।। धूतपापतीर्थ वसे। जगा पावन करीतसे।।३।। क्षेत्र आहे ते जुनाट। उद्धरिले तेथे भ्रष्ट।।४।। धन्य धन्य गोदावरी। हीनादीनाते उद्धरी।।५।। लक्ष्मण म्हणे स्थान। अती पवित्र भुवन।।६।।

१७७०. अरुणवरुणतीर्थ थोर। तेथे उद्धरिले फार।।१।। तेथे महिमा आहे थोर। पवित्र होती प्राणी फार।।२।। शंकरमहिमा वरिष्ठ। प्रभो श्रेष्ठ तो नीलकंठ।।३।। लक्ष्मण म्हणे गोदा। अती प्रिय ब्रह्मानंदा।।४।।

१७७१. जनस्थान महाक्षेत्र। महान श्रेष्ठ ते पवित्र।।१।। लिंगे वसती ठायी ठायी। पंचवटीचिये ठायी।।२।। दशाश्वमेधतीर्थ। तरले फार ते पतित।।३।। राम लक्ष्मण सीता। हनुमंत शोभे ज्ञाता।।४।। गोदावरीचिये तीरी। पवित्र होती नरनारी।।५।। ऋणमोचन हे तीर्थ। फार आहे हो विख्यात।।६।। लक्ष्मण म्हणे महिमा। न कळे अगम्य आगमा।।७।।

१७७२. जनकतीर्थ गोदेतीरी। तरल्या विख्यात नरनारी।।१।। जनक राजा ब्रह्मनिष्ठ। त्याचे स्मरणे हरती कष्ट।।२।। त्याने श्रेष्ठ तीर्थ निर्मिले। जग पावन फार झाले।।३।। धन्य धन्य गोदावरी। स्नान इच्छिती ब्रह्मचारी।।४।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करी माता जगा।।५।।

१७७३. याज्ञवल्क्यतीर्थ गोदेतीरी। मुनी श्रेष्ठ तो परोपकारी।।१।। करावया जगदुद्धार। ब्रह्मवेत्ता तो निर्घोर।।२।। आपुले नामाचे ते तीर्थ। निर्मिले ते समर्थ।।३।। फार उद्धरिले दोषी। पावन करी पतितासी।।४।। लक्ष्मण म्हणे गोदा। अती प्रिय ब्रह्मवृंदा।।५।।

१७७४. इंद्रतीर्थ गोदेतीरी। शोभे श्रेष्ठ त्याची थोरी।।१।। इंद्राने हो स्थापिले। स्नान प्रेमे तेथे केले।।२।। दोषी फार उद्धरती। धन्य धन्य गोदा जगती।।३।। गोदातीर धन्य क्षेत्र। स्नाना येती ते सत्पात्र।।४।। लक्ष्मण म्हणे ज्ञानी। तेही स्तविती जननी।।५।।

१७७५. विश्वामित्रतीर्थ गोदेतीरी। महान क्षेत्र त्याची थोरी।।१।। महान महायोगेश्वर। स्नाना येती ज्ञानी थोर।।२।। अती पापी उद्धरिले। हीन पावन फार झाले।।३।। लक्ष्मण म्हणे गंगा। फार पावन करी जगा।।४।।

१७७६. श्वेततीर्थ क्षेत्र थोर। भक्तजनाचे माहेर।।१।। फार पापी उद्धरिले। तेथे पावन हो झाले।।२।। धन्य धन्य गोदावरी। न कळे मातेची त्या थोरी।।३।। हरिश्चंद्र विश्वामित्र। तीर्थ असे ते पवित्र।।४।। लक्ष्मण म्हणे थोर। स्नाना येती मुनीश्वर।।५।।

१७७७. प्रवरासंगम महान थोर। तेथे वसे तो सिद्धेश्वर।।१।। महान महिमा प्रभूचा। नाथ आहे त्रैलोक्याचा।।२।। तेथे स्नान दान करिती। प्राणी फार मुक्त होती।।३।। सिद्धेश्वर हा विख्यात। फार तरले पतित।।४।। लक्ष्मण म्हणे संगम। फार पुण्य ते भुवन।।५।।

१७७८. वृद्धासंगमतीर्थ थोर। स्नाना येती यतीश्वर।।१।। फार उद्धरिले दोषी। स्थान प्रिय ते सिद्धासी।।२।। लिंग वसे वृद्धेश्वर। वृद्ध झाले तरुण नर।।३।। धन्य धन्य गोदामाता। पावन करी ती पतिता।।४।। लक्ष्मण म्हणे परोपकार। करी दयाळू ती फार।।५।।

१७७९. धन्य धन्य कचेश्वर। परमात्मा तो विश्वंभर।।१।। विश्वामध्ये व्यापलासे। विश्वामध्ये तोचि वसे।।२।। तोचि वसे गोदेतीरी। सगुणभक्तास्तव त्रिपुरारी।।३।। भक्त पूजन करिती। षोडशोपचारे पुजिती।।४।। भक्ता देतो उत्तम गती। त्याची न कळे कोणा गती।।५।। लक्ष्मण म्हणे हर। आहे अनादी ईश्वर।।६।।

१७८०. गोदेतीरी शुक्लेश्वर। महिमा प्रभूचा अपार।।१।। त्याचे नोहे हो वर्णन। भक्तास्तव तो सगुण।।२।। त्रिकाळ पूजन स्तवन। भक्त करिती विद्वज्जन।।३।। तापसी ध्यानी हो बैसती। प्रेमयुक्त त्याते ध्याती।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। केवळ स्वानंदवैभव।।५।।

१७८१. विलासंगमतीर्थ श्रेष्ठ। अती पावन वरिष्ठ।।१।। फार उद्धरिले दोषी। स्नान करिती ज्ञानी ऋषी।।२।। भवापासूनि सोडवी। ऐसी श्रेष्ठ गंगादेवी।।३।। सोळा हजार उपतीर्थे। शोभती ते हो समर्थ।।४।। लक्ष्मण म्हणे माता। पावन करी ती पतिता।।५।।

१७८२. चक्रतीर्थ गोदेतीरी। शोभे पवित्र ते करी।।१।। पापनाशन ते तीर्थ। तारक जगाते पवित्र।।२।। लिंग वसती गोदेतीरी। धन्य धन्य तो त्रिपुरारी।।३।। जेथे गंगा तेथे शिव। श्रेष्ठ शोभे महादेव।।४।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करीतसे जगा।।५।।

१७८३. पिपलतीर्थ प्रतिष्ठानी। महान क्षेत्र भक्तजननी।।१।। प्रतिष्ठान ब्रह्मपुरी। शोभतसे गोदेतीरी।।२।। तेथे लिंग महान जुनाट। पिपलादेश्वर श्रेष्ठ।।३।। चक्रलिंग हरी तेथे। लिंग आहे ते समर्थ।।४।। तीर्थे वसती तेथे फार। धन्य धन्य ते नगर।।५।। सिद्ध वसती मुनीश्वर। महान साधू ते निर्घोर।।६।। महान ज्ञानी तेथे वसती। धन्य धन्य लिंगमूर्ती।।७।। लक्ष्मण विनवी दीन। प्रभो करा हो पावन।।८।।

१७८४. धन्य धन्य प्रतिष्ठान। महान पुण्य ते भुवन।।१।। तेथे नागतीर्थ वसे। नागेश्वर देव असे।।२।। मातृतीर्थ ते पावन। पितृतीर्थ तेथे जाण।।३।। फार उद्धरिले प्राणी। गोदा शोभे ती जननी।।४।। रुद्रतीर्थ सूर्यतीर्थ। तेथे वसे ते समर्थ।।५।। यती तापसांचे भार। स्नाना येती ते अमर।।६।। तेथे ढोलेश्वर विख्यात। फार तारिले पतित।।७।। लक्ष्मण म्हणे हीन। केले प्रभोने पावन।।८।।

१७८५. ब्रह्मतीर्थ अती श्रेष्ठ। महान पवित्र वरिष्ठ।।१।। ब्रह्मेश्वरलिंग आहे। पातकी उद्धरती पाहे।।२।। सर्वश्रेष्ठ ब्रह्मज्ञान। योगिजनांचे जीवन।।३।। ब्रह्म ब्रह्म वदती वाचे। पाप जळती तयांचे।।४।। ब्रह्मरूप प्राणी होती। स्मरणे अती हीन तरती।।५।। लक्ष्मण म्हणे स्मरा। प्रेमे गंगास्नान करा।।६।।

१७८६. ब्रह्मनिष्ठ एकनाथ। महान साधू ते वरिष्ठ।।१।। धन्य धन्य एकनाथ। महान ज्ञानी तो समर्थ।।२।। होतो सर्वदा आनंद। भक्ता देतो ब्रह्मानंद।।३।। फार दयाळू समर्थ। फार उद्धरिले अनाथ।।४।। किती वर्णावी हो थोरी। फार तरल्या नरनारी।।५।। ब्रह्मरूप पाहे जग। तेथे नाही द्वैतभाग।।६।। लक्ष्मण म्हणे दया। वसे तेथे क्षमा तया।।७।।

१७८७. शेषतीर्थ शेषेश्वर। लिंग तेथे शुक्लेश्वर।।१।। अग्निकुंड रसातळगंगा। उष्णतीर्थ तेचि जागा।।२।। प्राणी प्रवीण हो झाले। फार तेथे उद्धरिले।।३।। लक्ष्मण म्हणे गोदा। प्राणी उद्धरती सदा।।४।।

१७८८. कश्यपनदी कश्यपतीर्थ। गोदेतटी ते समर्थ।।१।। गणिकासंगम तेथे असे। जगा पावन करीतसे।।२।। शंकरलिंग चक्रतीर्थ। पापप्रनाशन विख्यात।।३।। फार उद्धरिले दोषी। शिव तारक जगासी।।४।। लक्ष्मण म्हणे स्नान। करिता होती ते पावन।।५।।

१७८९. गरुडतीर्थ गोदेतीरी। फार तरल्या नरनारी।।१।। गरुडाने ते स्थापिले। स्नान प्रेमे तेथे केले।।२।। किती वर्णावी हो थोरी। धन्य धन्य गोदावरी।।३।। आनंदलक्ष्मी वसे तेथे। धन्य धन्य ती समर्थ।।४।। लक्ष्मण म्हणे परोपकार। गंगा करी जगावर।।५।।

१७९०. गोवर्धनतीर्थ गोदेतीरी। गोवर्धनलिंग त्रिपुरारी।।१।। लिंग पावन करी जगा। पावन करी माता गंगा।।२।। असंख्य उद्धरिले प्राणी। धन्य धन्य झाले जनी।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभोप्रती।।४।।

१७९१. शुक्रतीर्थ गोदेतीरी। हीनादीनाते उद्धरी।।१।। शुक्राने हो तप केले। फार जग उद्धरिले।।२।। मुनीचे कार्य झाले तेथ। धन्य गंगा ती समर्थ।।३।। लक्ष्मण म्हणे शुक्रेश्वर। लिंग वसे निरंतर।।४।।

१७९२. सुपर्णासंगम गोदेतीरी। महिमा तीर्थाचा त्या भारी।।१।। कद्रुतीर्थ तेथे वसे। जगा पावन करीतसे।।२।। तेथे अग्निदत्तलिंग। महान श्रेष्ठ ते अभंग।।३।। सोमतीर्थ तेथे महान। करी दीनाते पावन।।४।। तेथे वसती अमित तीर्थ। धन्य गोदा ती समर्थ।।५।। लक्ष्मण म्हणे माते। क्षेम देई मज दीनाते।।६।।

१७९३. नवगाव गोदेतीरी। तेथे वसे त्रिपुरारी।।१।। पावन करी गोदामाता। दीना अनाथा पतिता।।२।। फार उद्धरिले दोषी। किती वर्णावे मातेसी।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।४।।

१७९४. बोरगाव गोदेतीरी। गोदा जगाते उद्धरी।।१।। तेथे वसे शिवलिंग। शंभो केवळ निःसंग।।२।। फार उद्धरती प्राणी। धन्य धन्य गोदा जननी।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। उभयतटी महादेव।।४।।

१७९५. गोदेतटी दत्तात्रेय। महान श्रेष्ठ तो योगिराय।।१।। पितृआज्ञे लिंग स्थापिले। प्रेमे पूजन हो केले।।२।। प्रेमे स्तविला शंकर। एकचित्ते तो निर्घोर।।३।। लिंगी शिव प्रकटला। दत्तात्रेयाते बोलिला।।४।। काय इच्छा आहे तुजला। ते त्वा मागावे मजला।।५।। दत्त म्हणे गा शंकरा। हेचि मागणे ईश्वरा।।६।। मज आत्मज्ञान द्यावे। म्या तेथेचि वसावे।।७।। लक्ष्मण म्हणे शिव। झाला प्रसन्न महादेव।।८।।

१७९६. शिवे ज्ञानबोध केला। ब्रह्मानंद प्रकटला।।१।। आधीच योगी तो संपन्न। ज्ञान कथिता झाला पूर्ण।।२।। आधीच दिव्य ते सुवर्ण। वरी जडले कोंदण।।३।। रत्ने शोभती त्यावरी। तैसी तेथे झाली परी।।४।। ब्रह्मानंद प्रकटला। योगी ब्रह्मानंदे धाला।।५।। महान आनंद आनंद। तेथे अवघा ब्रह्मानंद।।६।। लक्ष्मण म्हणे एकपण। दोघा ऐक्यत्वे वर्तन।।७।।

१७९७. धन्य धन्य प्रभू शिव। धन्य धन्य दत्तात्रेय देव।।१।। दोघा नाही वेगळीक। ऐक्यपणे दोघे एक।।२।। अक्षयी समाधी खंडेना। वृत्ती कदा पालटेना।।३।। करावया जगदुद्धार। प्रभोने घेतला अवतार।।४।। विज्ञानेश्वर पुजिती। त्याहा होय प्रभुप्राप्ती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभोप्रती।।६।।

१७९८. वोडवा नदी वसे तेथे। एक सहस्र उपतीर्थ।।१।। धन्य धन्य गोदावरी। दीना अनाथा उद्धरी।।२।। धन्य धन्य तो शंकर। दीनानाथ विश्वंभर।।३।। त्याचे मायेचा हा खेळ। अनंत ब्रह्मांडे हा रोळ।।४।। लक्ष्मण पतिताते। रक्षिले हो कृपावंते।।५।।

१७९९. निर्विघ्नेश्वरतीर्थ। महान आहे ते विख्यात।।१।। विघ्ने हरिली देवांची। मनोरथे पुरविली त्याहांची।।२।। गोदेतीरी शोभे तीर्थ। महान श्रेष्ठ ते विख्यात।।३।। देवा झाली तेथे सिद्धी। तुटली देवांची उपाधी।।४।। गणपतीचे पूजन। केले सर्वत्र देवाने।।५।। लक्ष्मण म्हणे गोदा। तोडी भवाची ही बाधा।।६।।

१८००. सूर्यपुत्र शनैश्वर। महान श्रेष्ठ ग्रह क्रूर।।१।। गोदेतटी वसतसे। जगा सौख्य देतसे।।२।। बहुत दिवस तये स्थानी। पूजन करिती त्याचे प्राणी।।३।। विल्वल वातापी असुर। त्यांनी दंगा केला फार।।४।। यास्तव

अगस्तीते आणिले। त्याने दैत्याते जाळिले।।५।। जगा सुख दिधले मुनींनी। यज्ञ केला तये स्थानी।।६।। लक्ष्मण म्हणे मुनी। परोपकारी महाज्ञानी।।७।।

१८०१. तेथे तीर्थ शनितीर्थ। दुसरे अगस्ती ते तीर्थ।।१।। अश्वत्थतीर्थ तेथे वसे। याज्ञिक तीर्थ तेथे असे।।२।। अष्टोत्तर शत तीर्थे वसती। तेथे शोभे शनिमूर्ती।।३।। शनिवारी अमावस्येसी। भक्त पुजिती शनीसी।।४।। स्नानदाने विघ्ने हरती। सौख्य होय भक्ताप्रती।।५।। तेथे वसले राक्षसभुवन। तेथे वसती ते ब्राह्मण।।६।। लक्ष्मण म्हणे क्षेत्र। गोदेतीरी ते पवित्र।।७।।

१८०२. सामगतीर्थ इंद्रतीर्थ। तेथेचि वसती उपतीर्थ।।१।। गोदावरी जगपावनी। माता जगाची जननी।।२।। लिंगे वसती ठायीठायी। महिमा प्रभूचा अक्षयी।।३।। जेथे गंगा तेथे शिव। प्रेमे वसे महादेव।।४।। लक्ष्मण म्हणे गोदा। शिवापाशी वसे सदा।।५।।

१८०३. गोदावरी पराशक्ती। तिने धरिली हो व्यक्ती।।१।। माता भक्तास्तव सगुण। करी जगाचे कल्याण।।२।। तिचे तीरी पिंपळगाव। तेथे शोभे महादेव।।३।। लक्ष्मण म्हणे गोदा। पावन करीतसे सदा।।४।।

१८०४. धन्वंतरीतीर्थ गुरुतीर्थ। तेथेचि वसती समर्थ।।१।। उपतीर्थे तेथे वसती। शिवलिंग स्वयंज्योती।।२।। यमतीर्थ तेथे वसे। जगा पावन करीतसे।।३।। अनेक तीर्थे तये स्थानी। पावन होती फार प्राणी।।४।। धन्य धन्य गोदावरी। तटी शोभती ब्रह्मचारी।।५।। लक्ष्मण म्हणे स्नान। करिती होती ते पावन।।६।।

१८०५. अदितीने पुत्रास्तव। गोदेतटी पुजिला देव।।१।। भक्ती केली अती प्रेमे। सखा केला सर्वोत्तम।।२।। मरुद्गण तीते झाले। इंद्रे स्वर्गाप्रती नेले।।३।। धन्य धन्य ते हो स्थळ। पावन होती शिव दयाळ।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।५।।

१८०६. शहागड गोदेतीरी। फार रमणीय ती पुरी।।१।। तेथे आहे शिवलिंग। प्रभो आहे तो निःसंग।।२।। गंगा भक्तांची माउली। जगास्तव साकारली।।३।। तिचे स्नाने उद्धरती। फार सौख्य हो भोगिती।।४।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा भवसिंधू हा उतरा।।५।।

१८०७. गोदेतीरी सिद्धेश्वर। शोभतसे परमेश्वर।।१।। भक्तजनास्तव

शिव। प्रेमे साकारला देव।।२।। इंद्राप्रती झाली सिद्धी। प्रसन्न झाला कृपानिधी।।३।। लिंग आहे सुप्रसन्न। हरितो भक्ताचे तो विघ्न।।४।। भक्त करिती जयजयकार। अती दयाळू ईश्वर।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। प्रिय आहे प्रभोप्रती।।६।।

१८०८. पाथरवाल गोदेतीरी। फार रम्य आहे पुरी।।१।। गुरुशिष्याचा संवाद। तेथे झाला हो आनंद।।२।। लिंग स्थापिले भक्तीने। करिती जगाचे कल्याण।।३।। धन्य धन्य तो सद्‌गुरू। दीना अनाथा माहेरू।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभोप्रती।।५।।

१८०९. गोदेतीरी साडेगाव। तेथे वसे महादेव।।१।। लिंग आहे कृपाघन। प्रभो करितो कल्याण।।२।। त्याते भक्ती अती प्रिय। भक्ता दावी निजवैभव।।३।। तेथे वसे तो श्रीराम। भक्तहृदयी आत्माराम।।४।। लक्ष्मण म्हणे तात। करितो भक्ताते निवांत।।५।।

१८१०. भोगलगाव गोदेतीरी। गंगा जगाते उद्धरी।।१।। माता पतितपावन। करी भक्ताचे कल्याण।।२।। तेथे शिवलिंग आहे। भक्ता कृपादृष्टी पाहे।।३।। लक्ष्मण म्हणे हर। झाला भक्तास्तव साकार।।४।।

१८११. जोगलादेवी ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। गंगा दीनाते उद्धरी। भक्तजनाप्रती तारी।।२।। प्रभुकृपे फार धाले। हीनदीन ते तरले।।३।। लक्ष्मण म्हणे लिंग। शोभतसे हो अभंग।।४।।

१८१२. गोदातीरा राम आले। त्यांनी गंगास्नान केले।।१।। नित्यनेमाते सारिले। राम तेथे स्थिरावले।।२।। तेथे दशरथाचे शव। उतरले पाहती देव।।३।। रामा केले हो भाषण। रामा सत्पुत्रा तू जाण।।४।। माझा करावा उद्धार। रामा दयाळू तू फार।।५।। रामे नमिला तो पिता। म्हणे धन्य धन्य तू ताता।।६।। लक्ष्मण म्हणे राम। सर्ववंद्य तो आत्माराम।।७।।

१८१३. तेथे पिंड प्रदान केले। कार्ये पितृचे ते झाले।।१।। दशरथ गेला स्वर्गाप्रती। त्याते उत्तम झाली गती।।२।। लिंग रामाने स्थापिले। नाम रामेश्वर ठेविले।।३।। पावन होती तेथे जग। धन्य धन्य भक्तिमार्ग।।४।। लिंग सीतेने स्थापिले। लक्ष्मणेही तैसे केले।।५।। करावया जगदुद्धार। धन्य प्रभूचा अवतार।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभूप्रती।।७।।

१८१४. तेथे शिव प्रकटला। राम प्रेमे आलिंगिला।।१।। फार आनंद ते स्थळी। धन्य धन्य चंद्रमौळी।।२।। राम गेले जनस्थाना। अती स्थळ श्रेष्ठ जाणा।।३।। लक्ष्मण म्हणे फार। गंगा दयाळू ती थोर।।४।।

१८१५. शेवतरामसगाव वसले। स्तवीत प्रभूची पाउले।।१।। धन्य धन्य गोदावरी। महिमा मातेचा तो भारी।।२।। करावया जगदुद्धार। धन्य मातेचा अवतार।।३।। लिंगे वसती ठायीठायी। शंभू वसे सर्वठायी।।४।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करी माता जगा।।५।।

१८१६. गोदेतीरी ते मंगरुळ। तेथे वसे जाश्वनीळ।।१।। शिवलिंग गंगेतीरी। महिमा प्रभूचा तो भारी।।२।। भक्त करिती पूजन। अती प्रेमे नामस्मरण।।३।। नामस्मरणे उत्तम गती। होय स्मरा पशुपती।।४।। ऐसे स्मराचे महिमान। स्मरे झाले ब्रह्म पूर्ण।।५।। लक्ष्मण अती हीन। करितो प्रभूचे भजन।।६।।

१८१७. मुधरेश्वर महादेव। गोदेतटी वसे शिव।।१।। तेथे वसले मुधरगाव। भक्त पुजिती तो देव।।२।। गोदेचिये उत्तरतीरी। शोभतसे ती हो पुरी।।३।। त्याचे भजनपूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त। त्याते स्तविती सदोदित।।५।।

१८१८. गोदेतीरी रामपुरी। तेथे रामेश्वर त्रिपुरारी।।१।। रामेश्वराचा महिमा थोर। धन्य धन्य तो शंकर।।२।। करिती प्रभूचे पूजन। श्रेष्ठ होती ते प्रवीण।।३।। प्रभो कल्याण करीतसे। भक्ता सौख्य देतसे।।४।। प्रेमे करावी हो भक्ती। प्रभू देतो उत्तम गती।।५।। लक्ष्मण म्हणे नाम। घेता हरे भवभ्रम।।६।।

१८१९. गोदेतीरी राजेश्वर। धन्य धन्य तो ईश्वर।।१।। तपेश्वर महादेव। परमात्मा कृपाळुव।।२।। तेथे वसली टाकळी। धन्य धन्य चंद्रमौळी।।३।। तेथे उद्धरिले प्राणी। धन्य धन्य गंगा जननी।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभोप्रती।।५।।

१८२०. गोदातट ते पवित्र। तेथे वसे तो त्रिनेत्र।।१।। लिंगा नाम उत्तरेश्वर। करितो जगाचा उद्धार।।२।। पतितपावन चंद्रमौळी। भक्तजनाते सांभाळी।।३।। लक्ष्मण म्हणे तात। स्मरा करितो निवांत।।४।।

१८२१. भवपाश तोडीतसे। करी भवाब्धीचा नाश।।१।। प्रेमयुक्त पूजन करा। रात्रंदिन प्रभोते स्मरा।।२।। भवाब्धी हा आटतसे। प्रेमे स्तवा तो महेश।।३।। तेथे शमीवृक्ष असे। अश्वत्थही तेथे वसे।।४।। चैत्र शुद्ध एकादशी। यात्रा भरते प्रभोपाशी।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। दयाळू तो महादेव।।६।।

१८२२. गोदेतीरी पिंपळगाव। तेथे वसे महादेव।।१।। महादेव तयेस्थानी। शिव विश्वाची जननी।।२।। करिती भजन पूजन। त्याचे होतसे कल्याण।।३।। नामस्मरणे गती होय। शिव आहे तो सदय।।४।। लक्ष्मणा तो बोलवी। लिंगाविना स्थळ नाही।।५।।

१८२३. गोदेतीरी सीवनगाव। तेथे वसे महादेव।।१।। महान वैभव प्रभोचे। नामस्मरण करा त्याचे।।२।। नाम मंगल मंगल। शिवनाम सुमंगल।।३।। शिव अनादी अनादी। प्रभो आहे कृपानिधी।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभूप्रती।।५।।

१८२४. रिधोरीमध्ये रिधोरेश्वर। वसे प्रभो गंगाधर।।१।। करावया हो कल्याण। सगुण झाला पंचानन।।२।। फार पावन केले प्राणी। सदय श्रेष्ठ तो शूळपाणि।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। आदि अनादी तो देव।।४।।

१८२५. गोदेतीरी शिवलिंग। प्रभो आहे तो नि:संग।।१।। त्याते म्हणती भद्रेश्वर। आहे कल्याणाचे घर।।२।। संगातीत महादेव। पुरातन सदाशिव।।३।। गंगा फार प्रिय त्याला। गंगातटी तो शोभला।।४।। गंगास्नान ते करावे। प्रेमे प्रभूते पुजावे।।५।। तेणे होय उत्तम गती। भक्ती प्रिय प्रभूप्रती।।६।। ग्रामा नाम ती भादली। गोदेतीरी ती वसली।।७।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा पुजा गंगाधरा।।८।।

१८२६. ग्रामा नाम आहे गुंज। तेथे वसे तो नि:संग।।१।। गोदेतीरी लिंगे वसती। भक्ता पावन करिती।।२।। जेथे गंगा तेथे शिव। प्रभो स्मरा महादेव।।३।। त्याचे नाम घेता वाचे। पर्वत जळती पापांचे।।४।। तेथे वसे व्यंकटेश। भक्ता सौख्य देतसे।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभूप्रती।।६।।

१८२७. अहो गोदेचिये तीरी। गुंज नामक ती पुरी।।१।। शिवलिंग परमेश्वर। परमात्मा तो शंकर।।२।। करितो भक्ताचे कल्याण। करी जगाते

पावन।।३।। तेथे सिद्धाची समाधी। ब्रह्मनिष्ठ कृपानिधी।।४।। राजाराम सिद्धा म्हणती। ब्रह्मचारी कृपामूर्ती।।५।। भक्त येती दर्शनाते। जयजयकार होतो नित्य।।६।। लक्ष्मण पतित दीन। करितो प्रभूचे भजन।।७।।

१८२८. गंगेतीरी हिवग्राम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। लिंग आहे जगदीश्वर। भक्तजनांचे माहेर।।२।। शिव सच्चिदानंदघन। दीनबंधू कृपाघन।।३।। गंगा जगा पावन करी। अनाथदीनाते उद्धरी।।४।। स्नानमात्रे पावन होती। न कळे मातेची ती गती।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। उभयतटी महादेव।।६।।

१८२९. धन्य धन्य गोदावरी। हीनादीना पावन करी।।१।। लिंग संगमेश्वर जुनाट। गंगातीरी प्रभो श्रेष्ठ।।२।। तेथे संगमतीर्थ नदी। तेथे हरती भवव्याधी।।३।। तेथे स्नान दान करिती। तेथे होय उत्तम गती।।४।। लक्ष्मण म्हणे स्नान। करा तुटती बंधन।।५।।

१८३०. चांगतपुरी गंगेतटी। तेथे वसे तो धुर्जटी।।१।। शिवलिंग चांगेश्वर। तेथे जुनाट ईश्वर।।२।। त्याचे घ्यावे दर्शन। प्रेमे करावे पूजन।।३।। धन्य धन्य माता गंगा। पावन करीतसे जगा।।४।। लक्ष्मण हीन दीन। केला मातेने पावन।।५।।

१८३१. गंगेतीरी माहादपुरी। महादेवाची ती पुरी।।१।। तेथे वसे भैरवमूर्ती। महान प्रभूची त्या ख्याती।।२।। करितो भक्ताचे कल्याण। अती आहे दयाघन।।३।। भैरवनाथ शिवा प्रिय। शिव आहे तो सदय।।४।। लक्ष्मण प्रेमेकरून। करितो प्रभूचे भजन।।५।।

१८३२. जुनाट लिंग गोदेतीरी। महिमा प्रभूचा तो भारी।।१।। प्रभू अनादी अनादी। गोकुळेश्वर कृपानिधी।।२।। तेथे वसले गोळेगाव। तेथेचि पांडुरंग देव।।३।। लिंगे वसती ठायीठायी। महिमा प्रभूचा अक्षयी।।४।। तीरी वसती ब्राह्मण। श्रेष्ठ ज्ञानीही प्रवीण।।५।। लक्ष्मण हीन दीन। करितो प्रभूचे भजन।।६।।

१८३३. गंगेतटी गोळेगाव। तेथे वसे सदाशिव।।१।। त्याचे नाम रामेश्वर। करावया जगदुद्धार।।२।। लिंग आहे ते जुनाट। धन्य धन्य तो नीळकंठ।।३।। तेथेचि सिद्धाची समाधी। स्वामी ज्ञानाचा तो अब्धी।।४।। वेदघोष तेथे होती। शास्त्रे पढती वेदान्ती।।५।। तेथे मायादेवी वसे। जगा पावन करीतसे।।६।।

लक्ष्मण हीन दीन। करितो प्रभूचे भजन।।७।।

१८३४. पुरुषोत्तम ती पुरी। शोभतसे गोदेतीरी।।१।। तेथे वसे पुरुषोत्तम। भक्तसखा सर्वोत्तम।।२।। तेथे लिंगही जुनाट। परमात्मा तो वसे श्रेष्ठ।।३।। भक्त येती दर्शनाते। प्रेमे स्तविती प्रभूते।।४।। तेथे भूदेव ब्राह्मण। वसती फार ते प्रवीण।।५।। तेथेचि स्वामीची समाधी। स्वामी होते ज्ञाननिधी।।६।। ब्रह्मनिष्ठ कृपानिधी। केवळ ज्ञानाचा तो अब्धी।।७।। लक्ष्मण अती हीन। करितो प्रभूचे भजन।।८।।

आष्टीमाहात्म्य

१८३५. गोदेतीरी अरिष्टसेन। राव होता तो प्रवीण।।१।। त्याने महान यज्ञ केला। ऋषी समुदाय मिळाला।।२।। तेथे मिथुळादैत्य आला। त्याने यज्ञ विध्वंसिला।।३।। राजा पत्नी पुरोहित। धरूनि नेले पाताळात।।४।। पुरोहिताचा हो पुत्र। नामे देवापी विख्यात।।५।। लक्ष्मण म्हणे त्याने। महान पराक्रम करून।।६।।

१८३६. देवापी म्हणे मातेप्रती। पिता का नाही मजप्रती।।१।। माता करी हो रुदन। बोले पुत्रा हो कारण।।२।। तुझा पिता राजा राजपत्नी। नेले दैत्याने धरूनि।।३।। यज्ञ करीत होते बापा। सर्व पावले रे तापा।।४।। लक्ष्मण म्हणे पुत्र। फार होता तो विख्यात।।५।।

१८३७. माता म्हणे बाळाप्रती। ऐक कर्माची रे गती।।१।। यज्ञ करिती ऋषीश्वर। मंडळी होती तेथे फार।।२।। मंत्रघोष स्वाहाकार। होत होता तेथे थोर।।३।। दैत्याने घातला घाला। यज्ञ सर्व विध्वंसिला।।४।। राजा राजपत्नी पुरोहित। धरूनि नेले पाताळात।।५।। ऋषी पळूनिया गेले। फार अन्याय कर्म झाले।।६।। ऋत्विज नेले पाताळाते। बंदी घातले हो त्याते।।७।। लक्ष्मण म्हणे पुत्र म्हणे। माते स्वस्थ तू असणे।।८।।

१८३८. देवापी म्हणे ऋषीप्रती। कैसी तुमची महती।।१।। तुम्हामध्ये सामर्थ्य नाही। मग का केली गाथागोवी।।२।। लक्ष्मण म्हणे देवापी। फार होता तो प्रतापी।।३।।

१८३९. देवापी म्हणे रे ब्राह्मणा। कैसे विघ्न केले जाणा।।१।। ब्राह्मण म्हणती आम्हा बोल नाही। आहुती पडती अग्निठायी।।२।। अग्नीप्रती काही

म्हण। करील काही तो प्रयत्न।।३।। त्वरे अग्नीकडे गेला। अग्नीप्रती तो भांडला।।४।। म्हणे अरे गोळे खाणार। आणून द्या माझा पितर।।५।। शिक्षा करीन तुजला। अग्नीप्रती तो बोलला।।६।। लक्ष्मण म्हणे अग्नी। फार विस्मित झाला मनी।।७।।

१८४०. देवापीते म्हणे अग्नी। आहुती माझ्या मुखेकरूनि।।१।। भक्षिताती यज्ञभाग। ऐसा आहे बापा मार्ग।।२।। तू देवाकडे जाय। देव करतील हा उपाय।।३।। देवापी देवाकडे गेला। जाऊनिया इंद्राते बोलला।।४।। माझा पिता आणि यजमान। देवा त्वरे द्या आणून।।५।। लक्ष्मण म्हणे देव। म्हणती पराक्रमी हा मानव।।६।।

१८४१. देवापीते म्हणे इंद्र। तुम्ही वेदा जा शरण।।१।। तुझे कार्य ते करतील। फार आहेत दयाळ।।२।। आम्ही आहेत जेवणार। आम्हा न सुचे विचार।।३।। वेदाकडे गेला त्वरे। नमिले ते प्रेमभरे।।४।। वेदपुरुषाचे स्तवन। केले त्वरे देवापीने।।५।। लक्ष्मण म्हणे देवापी। होता महान प्रतापी।।६।।

१८४२. वेद म्हणती हा मानवी। फार विचार याचे ठायी।।१।। चारी वेद आनंदले। बाळके नवल हो केले।।२।। दैत्य आहेत दुर्मती। त्याते काय करावी युक्ती।।३।। ऋग्वेद म्हणे रे बाळका। आता तू स्तवी रे त्र्यंबका।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।५।।

१८४३. वेद म्हणती ईश्वरमुखातून। आम्ही झालो रे उत्पन्न।।१।।...............। जाऊनि त्याचे स्तवन करा।।२।। भक्तकाम प्रभू करी। आहे तो भक्ताचा कैवारी।।३।। वेदपुरुषाते नमून। देवापी आला अती त्वरेने।।४।। प्रेमभरे गंगास्नान। केले लिंगाचे पूजन।।५।। प्रेमे शंकर स्तविला। शिव प्रसन्न तो झाला।।६।। लक्ष्मण म्हणे शंकर। आहे कल्याणाचे घर।।७।।

१८४४. भक्त हृदयी आलिंगिला। काय इच्छा बा तुजला।।१।। माग माग अती त्वरे। तुझे कार्य होईल रे।।२।। देवापी म्हणे गा शंकरा। अती दयाळा विश्वंभरा।।३।। पिता राजा राजपत्नी। ऋत्विज द्यावे हो आणूनि।।४।। हेचि माझी विज्ञापना। तुम्हा असे त्रिनयना।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। आनंदला महादेव।।६।।

१८४५. शिव म्हणे बसवेश्वरा। आता तुम्ही त्वरा करा।।१।। माझा त्रिशूल नेऊन। करा दैत्याप्रती विघ्न।।२।। दैत्य मारा दुर्मती। त्वरे आणा रायाप्रती।।३।। मारा मिथुळदैत्याते। वेगी आणा त्या रायाते।।४।। माझ्या भक्ता विघ्न केले। दैत्ये पाताळाते नेले।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।६।।

१८४६. नंदी शिवाते नमून। गेला पाताळाकारण।।१।। रसातळा त्वरे गेला। असुराप्रती वधिता झाला।।२।। युद्ध झाले तेथे भारी। निवटिले दुराचारी।।३।। राजा पुरोहित ऋषी मंडळी। सोडविली तये काळी।।४।। नंदीने आणिले शिवापाशी। अती सौख्य झाले त्यासी।।५।। लक्ष्मण म्हणे धनी। केला स्वाधीन भक्तांनी।।६।।

१८४७. देवापीते वर देऊन। शिव पावला अंतर्धान।।१।। देवापीने यज्ञ केला। देव आले त्या यज्ञाला।।२।। फार मिळाले ब्राह्मण। राजा फार तो प्रवीण।।३।। राये अश्वमेध केला। नृपसमुदाय मिळाला।।४।। लक्ष्मण म्हणे शूर। होता हो राजेश्वर।।५।।

१८४८. यथासांग यज्ञ झाला। शिवकृपा लाधली त्याला।।१।। मोठा झाला जयजयकार। ....।।२।। दिधली ब्राह्मणा दक्षिणा। ब्राह्मण तृप्त झाले नाना।।३।। यज्ञ समाप्त तो झाला। फार सौख्य रायाला।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभूप्रती।।५।।

१८४९. धन्य धन्य अरिष्टसेन। महान प्रतापी प्रवीण।।१।। त्याचा पुत्र अभय नृपती। राज्य करी पुण्यमूर्ती।।२।। बारा योजने नगर। प्रजापालक तो नृपवर।।३।। अक्षयी सुख ते नगरी। धर्मशील नरनारी।।४।। पुनीततीर्थ गोदेतीरी। महान विस्तीर्ण नगरी।।५।। राजा होता शिवभक्त। अती प्रवीण विख्यात।।६।। लक्ष्मण म्हणे पुण्यशीळ। जन होते ते सकळ।।७।।

१८५०. नंदिनीसंगम विख्यात। सिद्धेश्वरलिंग तेथ।।१।। तेथे आपस्तंभ ब्राह्मण। अगस्तीतीर्थ ते पावन।।२।। सोमेश्वरलिंग असे। तपोधनतीर्थ वसे।।३।। तेथे सुवर्णरितादेवी। शार्दूलतीर्थ तयेठायी।।४।। अगणिततीर्थ विष्णुतीर्थ। शंकरलिंग चक्रतीर्थ।।५।। आनंदसंगम महान तीर्थ। तीस हजार उपतीर्थ।।६।। तेथे सावंगी ग्राम वसे। समीप नाथरी ही असे।।७।। धन्य

धन्य गोदावरी। किती वर्णावी हो थोरी।।८।। लक्ष्मण म्हणे गंगा। स्नाने पातके जाती भंगा।।९।।

१८५१. गोदा केवळ ज्ञानमूर्ती। केवळ आहे पराशक्ती।।१।। करावया जगदुद्धार। माता झालीसे साकार।।२।। योगी येती स्नानाप्रती। प्रेमे स्नान तिचे करिती।।३।। हीन दीन उद्धरिती। माता देते उत्तम गती।।४।। तिचे तटी महादेव। आहे परमात्मा तो शिव।।५।। तिचे तटी सादुळ ग्राम। शिवलिंग सर्वोत्तम।।६।। तेथे महादेवी असे। जगा पावन करीतसे।।७।। गंगास्नान नामस्मरण। हे तव महान साधन।।८।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।९।।

१८५२. गोदेतीरी गौतममुनी। रम्य स्थान ते पाहूनि।।१।। त्याहाचे चरण जेथे जाती। ते स्थळ पूज्य सर्वांप्रती।।२।। किती वर्णू त्याची थोरी। धन्य गौतम परोपकारी।।३।। करावया जगदुद्धार। प्रभोचे शोभती अवतार।।४।। समीप वसे मंजरथ ग्राम। भक्तजनाचे सुखधाम।।५।। शिवलिंग तेथे आहे। पवित्र होय तेथे देह।।६।। लक्ष्मण विनवी संता। पावन करा मज पतिता।।७।।

१८५३. आबजैकतीर्थ गोदेतीरी। जगा पावन ते करी।।१।। तेथे विष्णू त्रिविक्रम। प्रभो वसे मेघःश्याम।।२।। तेथे वृषाकपी तीर्थ। फेनासंगम विख्यात।।३।। हनुमंततीर्थ तेथे असे। मार्जरतीर्थ तेथे वसे।।४।। आपस्तंभ मुनी वसे। सोमेश्वरलिंग असे।।५।। उपतीर्थे अकरा हजार। हृदयस्थान हृदय थोर।।६।। स्थान अती ते पवित्र। धन्य धन्य ते हो क्षेत्र।।७।। फार उद्धरिले प्राणी। स्नाना येती सिद्धमुनी।।८।। तेथे वसले मंजतीर्थ। महान असे ते पवित्र।।९।। लक्ष्मण विनवी दीन। घ्या हो प्रभूचे दर्शन।।१०।।

१८५४. मंजरथीचा महिमा थोर। भूदेव वसती तेथे फार।।१।। वेदशास्त्रांचे जाणते। वेदघोष होतो तेथे।।२।। तेथे वसती महान ज्ञानी। सिद्ध येती तये स्थानी।।३।। लिंगे वसती ठायी ठायी। महिमा प्रभूचा अक्षयी।।४।। लक्ष्मण हीन दीन। करितो प्रभूचे भजन।।५।।

१८५५. गोदेतीरी बाणेगाव। तेथे वसे महादेव।।१।। तेथे मातादेवी वसे। जगा पावन करीतसे।।२।। तिचे पूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।३।। तेथे वसे महारुद्र। प्रभू कृपेचा समुद्र।।४।। धन्य धन्य गंगामाता। पावन करी

ती पतिता।।५।। लक्ष्मण म्हणे स्नाने। फार उद्धरिले तिने।।६।।

१८५६. गोदेचिये उत्तरतीरी। इंद्रेश्वर त्रिपुरारी।।१।। इंद्रतीर्थ तेथे असे। ईश्वरलिंग तेथे वसे।।२।। उपतीर्थे सात हजार। शोभती महिमा अपार।।३।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करी माता जगा।।४।।

१८५७. गोदेचिये दक्षिणतटी। सोमेश्वर धुर्जटी।।१।। लिंग आहे पुरातन। त्याते पुजिती भक्तजन।।२।। तेथे वसले बोरगाव। तेथेचि वसती भूदेव।।३।। धन्य धन्य गोदामाता। पावन करी ती पतिता।।४।। लक्ष्मण म्हणे थोर। महिमा मातेचा अपार।।५।।

१८५८. मरडजगाव गोदेतीरी। तेथे वसे त्रिपुरारी।।१।। लिंग जुनाट जुनाट। गंगेमाजी वसे श्रेष्ठ।।२।। मार्कंडेयाने ते स्थापिले। प्रेमे पूजन हो केले।।३।। त्याचे करिता पूजन। विघ्ने हरती दारुण।।४।। फार उद्धरिले दोषी। भक्ती प्रिय त्या प्रभोसी।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। आहे अनादी तो देव।।६।।

१८५९. गोदेतटी गोपेगाव। तेथे असे महादेव।।१।। शिवलिंग ते अनादी। भक्ता देतो निजसिद्धी।।२।। त्याचे घेता दर्शन। होती पतित पावन।।३।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करीतसे जगा।।४।।

१८६०. धन्य धन्य गंगामाता। पावन करी ती पतिता।।१।। फार उद्धरिले प्राणी। अगम्य मातेची करणी।।२।। तिचे तीरी आंबेगाव। तेथे वसे महादेव।।३।। त्याचे पूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।५।।

१८६१. यक्षिणीसंगम गोदेतीरी। यक्षेश्वर त्रिपुरारी।।१।। महान तीर्थ तेथे थोर। लिंग वसे ते निर्घोर।।२।। तेथे स्नान दान करिती। त्याहा होय उत्तम गती।।३।। तेथे वसली रामपुरी। रत्नेश्वर त्रिपुरारी।।४।। लक्ष्मण म्हणे फार। तेथे उद्धरले नर।।५।।

१८६२. गोदेचिये उत्तरतीरी। रामपुरी हो माझारी।।१।। तेथे लिंग रत्नेश्वर। महिमा प्रभूचा अपार।।२।। तेथे भूदेव महाज्ञानी। वसतात तये स्थानी।।३।। त्रिकाळ पूजन रुद्रघोष। अक्षयी शोभे तो महेश।।४।। त्याचे होता दर्शन। होती पतित पावन।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभोप्रती।।६।।

१८६३. गंगेमध्ये मोरेश्वर। धन्य धन्य तो विंघ्नहर।।१।। कल्याण करितो जगाचे। ताप हरितो भक्तांचे।।२।। रिद्धीसिद्धी पायापाशी। संकटहरण नाम त्यासी।।३।। लक्ष्मण म्हणे शिवलिंग। उभयतटी महालिंग।।४।।

१८६४. गुंजमध्ये जगदीश्वर। प्रभो आहे गंगाधर।।१।। गंगातीरी ग्राम वसे। तेथे वसे तो महेश।।२।। मनोरथ पुरवितो भक्तांचे। महान वैभव प्रभोचे।।३।। भजन पूजन करिती। त्याते होय उत्तम गती।।४।। समान सर्वांते शंकर। दीनानाथ विश्वंभर।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। गंगेपाशी महादेव।।६।।

१८६५. गंगातीरी देवी वसे। तीते सौख्य अक्षयी असे।।१।। माता भक्ता पावन करी। तीते वैभव ते भारी।।२।। अवघा मायेचा विलास। माया रक्षी ती सर्वांस।।३।। तिने उद्धरिले प्राणी। देवी विश्वाची जननी।।४।। गौडगाव ग्रामा नाम। भक्ताप्रती सुखधाम।।५।। लक्ष्मण म्हणे गोदा। पावन करी माता सदा।।६।।

१८६६. गोदेतटी शुक्लतीर्थ। शुक्लेश्वर तो समर्थ।।१।। चक्रतीर्थ बाणतीर्थ। गौतीर्थ इंद्रतीर्थ।।२।। विष्णुतीर्थ यमतीर्थ। ब्रह्मतीर्थ ते समर्थ।।३।। उपतीर्थे सहस्र आठ। तेथे वसे तो नीळकंठ।।४।। लक्ष्मण म्हणे स्नानदान। करिती होती ते पावन।।५।।

१८६७. गोदा स्वानंदजीवनी। माता विश्वाची जननी।।१।। तिचा महिमा कळेना। सांभाळी ती भक्तजना।।२।। तीरी लिंग दयाघन। प्रभो कल्याणा जीवन।।३।। परोपकारास्तव साकार। त्याचे नाम विश्वंभर।।४।। ग्रामा नाम हो मोगर। भक्त वदती शिव हर हर।।५।। लक्ष्मण हीन दीन। करितो प्रभूचे भजन।।६।।

१८६८. गोदेतीरी पिंपरी गाव। तेथे वसे तो महादेव।।१।। भक्तीस्तव तात वसे। परब्रह्म तो महेश।।२।। कृपा करी दीनावरी। अनाथदीनाते उद्धरी।।३।। पतितपावन नाम त्याचे। करितो कल्याण भक्ताचे।।४।। लक्ष्मण म्हणे गंगा। प्रेमे उद्धरी ती जगा।।५।।

१८६९. कंदेश्वर महादेव। गोदेतटी कृपाळुव।।१।। लिंग आहे ते जुनाट। कंदेश्वर प्रभू श्रेष्ठ।।२।। त्याचे घेता दर्शन। होती पतित पावन।।३।। तेथे वसे

कानसुर। महिमा प्रभूचा अपार।।४।। लक्ष्मण म्हणे गोदा। पावन करी माता सदा।।५।।

१८७०. गंगेतीरी पोहोनेर। लिंग तेथे रामेश्वर।।१।। तेथे स्नानदान करिती। त्याहा होय उत्तम गती।।२।। गोदा उद्धरी जड जीवा। अती प्रिय महादेवा।।३।। तिचे तटी जे वसती। तेही पावन हो होती।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय मातेप्रती।।५।।

१८७१. लिंब्यामध्ये महादेव। गंगेमध्ये कृपाळुव।।१।। लिंग आहे ते जुनाट। प्रभो श्रेष्ठ तो नीळकंठ।।२।। तेथेचि वसे गजानन। विघ्न हरी तो कृपाघन।।३।। फार उद्धरिले दोषी। पावन करी पतितासी।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभूप्रती।।५।।

१८७२. पोहोनेरी महासिद्ध। आहे श्रेष्ठ तो प्रसिद्ध।।१।। मकाजीबोवा त्याते म्हणती। त्यांनी केली फार ख्याती।।२।। साधू कृपेचे आगर। कृपा करिती जगावर।।३।। त्याहाचे कर्तृत्व कळेना। उद्धरिती पतितदीना।।४।। ग्रामामध्ये शिवलिंग। आहे परमात्मा निःसंग।।५।। धन्य धन्य गोदावरी। श्रेष्ठ वसती तिचे तीरी।।६।। लक्ष्मण पतित दीन। करितो प्रभूचे भजन।।७।।

१८७३. गोदेतटी लिंग श्रेष्ठ। महान महिमा वरिष्ठ।।१।। वाणीसंगम विख्यात। तेथे वसे उमाकांत।।२।। वागेश्वर नाम त्याचे। पुरवी मनोरथ भक्तांचे।।३।। हरीने स्थापिले ते लिंग। कल्याणकारक निःसंग।।४।। वाणीसंगमी ते लिंग। सदासर्वदा निःसंग।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। आदि अनादी तो देव।।६।।

१८७४. हरि-ब्रह्माचा विवाद। दुटकक्षेत्र ते अभेद।।१।। ब्रह्मदेवे स्तविला शिव। प्रसन्न झाला महादेव।।२।। पंचमुख शापिले होते। नदीरूप झाले तेथे।।३।। ओघ मिळाला गंगेत। तीर्थ झाले ते विख्यात।।४।। वाणीसंगमतीर्थ थोर। स्नाना येती नारी नर।।५।। त्याते वर हो दिधला। ब्रह्मदेव तोषविला।।६।। लक्ष्मण म्हणे शिव। परात्पर महादेव।।७।।

१८७५. तीर्था वर हो दिधला। ब्रह्मा पावन तो केला।।१।। तीर्था वर प्रभूचा थोर। उद्धरती नारी नर।।२।। तेथे स्नानदान करिती। त्याहा होय उत्तम गती।।३।। फार उद्धरिले प्राणी। धन्य धन्य गोदा जननी।।४।। लक्ष्मण

म्हणे भक्ती। करा होय प्रभुप्राप्ती।।५।।

१८७६. विटय्यामध्ये शिवलिंग। शोभे परमात्मा निःसंग।।१।। करितो भक्ताचे कल्याण। शंभो त्रैलोक्यजीवन।।२।। अनंत ब्रह्मांडा आंतर-। बाहेरही परमेश्वर।।३।। भक्तास्तव सगुण झाला। मायागुणे करितो लीला।।४।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करीतसे जगा।।५।।

१८७७. तेथेचि विष्णुतीर्थ थोर। महाक्षेत्र ते सुंदर।।१।। तेथे मुद्गल नामा ऋषी। फार प्रिय तो प्रभूसी।।२।। हरीचे नित्य करी पूजन। प्रेमयुक्त ते भजन।।३।। कर्मनिष्ठ तो प्रवीण। वृत्ती ज्याची समाधान।।४।। जाबाला त्याची भार्या। प्रेमे स्तवी पतिपाया।।५।। दारिद्र्य होते त्याहा फार। हरीने केले ते हो दूर।।६।। बहुत दिधली संपत्ती। त्याहाची हरली विपत्ती।।७।। नित्य त्याहाते दर्शन। देत असे नारायण।।८।। लक्ष्मीतीर्थ तेथे असे। जगा सौख्य देतसे।।९।। तेथे मुद्गलेश्वरलिंग। महान आहे ते अभंग।।१०।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करीतसे जगा।।११।।

१८७८. तेथे स्नानदान करिती। त्याहा होय उत्तम गती।।१।। मुद्गलेश्वराचे दर्शन। सर्व देवांचे पूजन।।२।। कल्याण होतसे भक्तांचे। फार महिमान प्रभूचे।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूते ती।।४।।

१८७९. भानुतीर्थ गोदेतीरी। तेणे तरल्या नरनारी।।१।। भानुप्रसाद राया झाला। मोठा चमत्कार झाला।।२।। मृत नारी उठविल्या। अती सौख्य त्या पावल्या।।३।। धन्य धन्य नारायण। सूर्य पतितपावन।।४।। तेथे स्नान दान करिती। त्याहा होय उत्तम गती।।५।। पाच सहस्र उपतीर्थ। तेथे वसती पवित्र।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। प्रिय आहे प्रभूप्रती।।७।।

१८८०. गंगा परोपकारी फार। केवळ आनंदाचे घर।।१।। फार उद्धरिले दोषी। सौख्य देतसे भक्तासी।।२।। तिचे तीरी लासीन ग्राम। तेथे वसे सर्वोत्तम।।३।। लिंगा नाम सिद्धेश्वर। भक्तजनांचे माहेर।।४।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।५।।

१८८१. ग्रामा नाम ती कुंभारी। गोदेचिये उत्तरतीरी।।१।। देवी जगाची जननी। प्रेमे वसे तये स्थानी।।२।। महारुद्र दयाघन। करितो भक्ताचे कल्याण।।३।। भक्ती करा करा त्वरे। धन्य धन्य ती भक्ती रे।।४।। लक्ष्मण

म्हणे शिव। आदि अनादी तो देव।।५।।

१८८२. पाप दंडी रामपुरी। वसे गोदेचिये तीरी।।१।। तेथे वसे महारुद्र। अकरावा तो प्रभू रुद्र।।२।। कल्याण करितो भक्तांचे। ऐसे महिमान प्रभूचे।।३।। भक्तजना साह्यकारी। भक्तसंकट निवारी।।४।। तेथे लिंग पुरातन। नाम शोभे मल्लिकार्जुन।।५।। करितो दीनाते पावन। महाराज कृपाघन।।६।। त्याचे नाम घेती प्राणी। पावन होती तये स्थानी।।७।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।८।।

१८८३. अहो साळी ब्रह्मपुरी। वसली आहे गंगेतीरी।।१।। तेथे शिवलिंग ईश्वर। बैसलासे गंगाधर।।२।। भक्तास्तव तो साकार। आहे भक्तांचे माहेर।।३।। महान वैभव प्रभूचे। कोणा वर्णन नोहे त्याचे।।४।। गोदावरी मायादेवी। तिचे वैभव अक्षयी।।५।। फार उद्धरिले दोषी। केवळ स्वानंदाची राशी।।६।। लक्ष्मण अती हीन। केला प्रभूने पावन।।७।।

१८८४. धारासुर गंगेतीरी। उत्तम आहे ती हो पुरी।।१।। आहे पवित्र भुवन। तेथे वसे त्रिनयन।।२।। भक्तांचा तो साह्यकारी। हीनदीनाते उद्धरी।।३।। त्रिकाळ पूजन भजन। भक्त करिती नामस्मरण।।४।। त्याचे वैभव अगणित। कोणा न कळे त्याचा अंत।।५।। भक्तसखा सत्य सत्य। प्रेमे स्तवा हो प्रभूते।।६।। मिथ्याभूत हा संसार। येथे दुःखाचा बाजार।।७।। लक्ष्मण म्हणे शिव। आहे अनादी तो देव।।८।।

१८८५. गउंडगाव पोहोडुळ। तेथे वसे जाश्वनीळ।।१।। गोदेतीरी शिव नांदे। वसतसे ब्रह्मानंदे।।२।। विश्वा करावे पावन। म्हणूनि प्रभू तो सगुण।।३।। केवळ स्वानंदाची खाणी। धन्य धन्य तो शूळपाणि।।४।। त्याची लीला नकळे कोणा। शिव ब्रह्मांडाचा राणा।।५।। करावया परोपकार। गंगातीरी वसे हर।।६।। लक्ष्मण त्याचा दीन। प्रेमे करितो भजन।।७।।

१८८६. गंगा केवळ ब्रह्मायनी। भक्तजना ती जननी।।१।। तिचे तीरी माहादपुरी। महादेवाची नगरी।।२।। तेथे शिवलिंग शिव। दीनबंधू कृपाळुव।।३।। महादेवाचे वैभव। कोणा न कळे श्रेष्ठ तो देव।।४।। भक्तास्वाधीन तो झाला। अती भक्ती प्रिय त्याला।।५।। करावया जगदुद्धार। सगुण झाला गंगाधर।।६।। लक्ष्मण म्हणे शिव। आहे स्वानंदा वैभव।।७।।

१८८७. कपिलसंगम गोदेतटी। महिमा फार त्याची मोठी।।१।। कपिले केले अनुष्ठान। उर्वशीने केले विघ्न।।२।। कपिले शाप तीते दिधला। नदी झाली ती अबला।।३।। तिने शापिले ऋषीला। तोही नदीरूप झाला।।४।। मोठा हाहाकार झाला। देव आले दर्शनाला।।५।। अठ्ठ्यांशी सहस्र मुनी। त्वरे आले तये स्थानी।।६।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। विचार केला तये स्थानी।।७।।

१८८८. दोघे केले पूर्ववत्। अप्सरा गेली ती स्वर्गात।।१।। मुनीने यज्ञ तेथे केला। महान उत्सव तो झाला।।२।। अठ्ठ्यांशी सहस्र तीर्थ। झाले तेथे ते समर्थ।।३।। परुष्णी अंगीरा संगम। तेथे कालजेर लिंगा नाम।।४।। लक्ष्मण म्हणे स्नान। करिती होती ते पावन।।५।।

१८८९. गंगेतीरी कुंदेश्वर। आहे अनादी ईश्वर।।१।। लिंग पुजिती ते प्राणी। त्याहा सौख्य दे शूळपाणि।।२।। तेथे वसले गंगाखेड। ग्राम आहे ते प्रचंड।।३।। गंगेमाजी तो नरसिंह। त्याचे अगणित वैभव।।४।। तेथे वसे चिंतामणी। अगम्य प्रभूची करणी।।५।। सुख देतसे भक्ताते। प्रेमे पुजिती हो त्याते।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।७।।

१८९०. तेथे वसे मुरलीधर। प्रभू कृपेचे आगर।।१।। तेथे वसे तो गोविंद। वैकुंठरमण तो प्रसिद्ध।।२।। प्रभू लक्ष्मीचा पती। त्याची अगणित संपत्ती।।३।। करितो कल्याण भक्तांचे। मनोरथ पुरवितो त्यांचे।।४।। धन्य धन्य गिरिनिवासी। फार सांभाळी भक्तांसी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।६।।

१८९१. तुळतुंब महादेव। तेथे वसे स्वयमेव।।१।। लिंग आहे ते अनादी। अती सदय कृपानिधी।।२।। लिंगे वसती तये ठायी। तेथे वसतसे देवी।।३।। तेथे वसती भूदेव। शास्त्रचर्चा करिती सर्व।।४।। वेदघोष होत असे। जग सौख्य भोगीतसे।।५।। वाद्ये वाजती सुस्वर। भक्त करिती जयजयकार।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।७।।

१८९२. धारखेड गोदेतीरी। फार उत्तम ती पुरी।।१।। तेथे वसे महारुद्र। शिव अकरावा तो रुद्र।।२।। अकरा रुद्र प्रभूपासून। शिव अनादी निर्गुण।।३।। करावया जगदुद्धार। आपण झालासे साकार।।४।। जेथे गंगा तेथे शिव।

शोभतसे महादेव।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा उत्तम देतो गती।।६।।

१८९३. पिंपरीमध्ये महादेव। बहुता युगांचा तो देव।।१।। गोदा फार प्रिय त्याला। गोदातीरी तो बैसला।।२।। आनंदस्वरूपी शंकर। भक्तजनास्तव साकार।।३।। त्याचे पूजन करिती। त्याते देतो उत्तम गती।।४।। शिव शिव वदती प्राणी। त्याचा सखा शूळपाणि।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।६।।

१८९४. गोदेची महिमा न कळे। वश होय भक्तिबळे।।१।। करी जगाचा उद्धार। अंबा दयाळू ती फार।।२।। भक्तजनाची माउली। अती प्रेमे हो सांभाळी।।३।। गोदेतटी ग्राम सोल। ग्रामी वसती जग दयाळ।।४।। शिवावतार मारुती। महारुद्राची ती मूर्ती।।५।। त्याचे करिता पूजन। होत असे हो कल्याण।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।७।।

१८९५. अंगलगाव ग्रामा नाम। भक्तजना ते सुखधाम।।१।। भक्ता सुख ते भक्तीचे। तेचि वैभव त्याहाचे।।२।। प्रेमे करिती गंगास्नान। प्रेमे करिती पूजन।।३।। शिवनाम घेती वाचे। करिती स्मरण प्रभूचे।।४।। तेणे सफळ संसार। धन्य भाविक ते नर।।५।। लक्ष्मणा स्मर नामाचा। सदा व्यवहार हो त्याचा।।६।।

१८९६. ग्रामा नाम ती सावंगी। येती तेथे महायोगी।।१।। गंगातीरी वसे पूर। सदा होतो जयजयकार।।२।। धन्य धन्य गोदावरी। स्नाना येती ब्रह्मचारी।।३।। महान ज्ञानी येती स्नाना। पावन करिती सर्व जना।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय मातेप्रती।।५।।

१८९७. धसाड वसे गोदेतटी। महिमा गोदेची ती मोठी।।१।। तिचे स्नान जे करिती। त्याहा होय उत्तम गती।।२।। गंगा गंगा वदती वाचे। पातक जळती तयांचे।।३।। फार भूमी ती पवित्र। स्नाना येती ते सत्पात्र।।४।। जेथे गंगा तेथे शिव। सकळ देवांचा तो देव।।५।। त्याचा अवतार महारुद्र। आहे कृपेचा समुद्र।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।७।।

१८९८. ब्राह्मण गाव ते विख्यात। तेथे वसे उमाकांत।।१।। गंगा फार शिवा प्रिय। शिव आहे निरामय।।२।। गंगातीरी वसती प्राणी। शिव प्राणचि त्या मानी।।३।। गंगापूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।४।। भजन

करिती प्रभूचे। सार्थक होतसे जन्माचे।।५।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।६।।

१८९९. गोदेतीरी रामेश्वर। लिंग अनादी ईश्वर।।१।। ग्रामा नाम ते वझर। फार पवित्र ते पूर।।२।। पूजन करिती लिंगाचे। होय कल्याण तयांचे।।३।। फार उद्धरिले दोषी। पावन करितो भक्तांशी।।४।। अती दयाळू शंकर। आहे कल्याणाचे घर।।५।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।६।।

१९००. वझर वसे गंगेतीरी। गंगा सदा परोपकारी।।१।। परोपकार आहे थोर। सकळ साधनांचे सार।।२।। ऐसे व्यासाचे वचन। सकळ शास्त्रांचे प्रमाण।।३।। म्हणूनि माता परोपकार। करीतसे जगावर।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय मातेप्रती।।५।।

१९०१. देवठाण ग्रामा नाम। आहे सुखाचे ते धाम।।१।। गोदावरीचिये तीरी। फार पवित्र ती पुरी।।२।। गंगेमध्ये शिवलिंग। वसे परमात्मा निःसंग।।३।। दर्शनमात्रे देतो गती। धन्य धन्य ती शिवभक्ती।।४।। भजन पूजन करिती। धन्य धन्य प्राणी होती।।५।। त्याते भक्ती प्रिय असे। भक्तसखा तो महेश।।६।। लक्ष्मण म्हणे तात। केला भक्ताने अंकित।।७।।

१९०२. वाणीमध्ये महादेव। वसे परमात्मा तो शिव।।१।। कल्याण करितो भक्तांचे। संकट वारीतसे त्यांचे।।२।। प्रेमे करा शिवपूजन। मुखे करा नामस्मरण।।३।। साधन फुकाचे सुखाचे। नाही कारण द्रव्याचे।।४।। भक्ती करावी प्रभूची। प्राप्ती होय त्या सुखाची।।५।। लक्ष्मण म्हणे सुर। झाले भक्तिबळे थोर।।६।।

१९०३. देऊळगाव गंगातीरी। गोदा दीनाते उद्धरी।।१।। थोर सान ती पाहिना। राजा रंक ती म्हणेना।।२।। करी जगाचे कल्याण। माता साधूंचे जीवन।।३।। तेथे वसे महारुद्र। प्रभू कृपेचा समुद्र।।४।। कल्याण करितो भक्तांचे। दुःख हरितो हो त्यांचे।।५।। लक्ष्मण म्हणे शूर। स्मरती सर्वदा ईश्वर।।६।।

१९०४. उंबरग्राम गोदेतीरी। वसे उत्तम ती पुरी।।१।। पंचक्रोशीमध्ये वसती। त्याहा होय उत्तम गती।।२।। ऐसा महिमा मातेचा। ताप हरे ती

जगाचा।।३।। स्नान दान जे करिती। त्याहा होय प्रभुप्राप्ती।।४।। लक्ष्मणा सुख झाले। सुख मातेने हो दिले।।५।।

१९०५. गोदेतीरी गोळेगाव। फार उत्तम असे गाव।।१।। धन्य धन्य गोदा माता। पावन करी ती पतिता।।२।। जेथे गंगा तेथे शिव। धन्य धन्य महादेव।।३।। त्याचा अवतार मारुती। सांभाळी तो भक्ताप्रती।।४।। त्याचे करिती पूजन। त्याचे होतसे कल्याण।।५।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करी ती हो जगा।।६।।

१९०६. आरखेड गोदेतटी। तेथे वसे धुर्जटी।।१।। करावया जगदुद्धार। प्रभू झालासे साकार।।२।। मायागुणे क्रीडा करी। कृपा करी जगावरी।।३।। साधू करिती उपकार। शिव अनादी ईश्वर।।४।। गंगा इच्छा ही प्रभूची। माता माउली जगाची।।५।। लक्ष्मण म्हणे गंगा। अती प्रिय उमारंगा।।६।।

१९०७. ग्रामा नाम ते उंबर। पवित्र आहे ते हो पूर।।१।। गंगातीरी शोभतसे। गंगेपाशी तो महेश।।२।। महिमा प्रभूचा अक्षयी। धन्य धन्य ते विजयी।।३।। त्रिविध ताप निरसती। प्राणी पावन ते होती।।४।। रुद्र अवतार मारुती। वसतसे कृपामूर्ती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय उत्तम गती।।६।।

१९०८. सोमेश्वर नामक ग्राम। सोमेश्वर लिंगा नाम।।१।। फार दयाळू त्रिपुरारी। हीनादीनाते उद्धरी।।२।। त्याचे जिणे भक्ताधीन। भक्ता वश पंचानन।।३।। अहो भक्तालागी भोळा। निजभक्ताने जिंकिला।।४।। गंगा वाहे प्रभूजवळी। हीनादीनाते सांभाळी।।५।। लक्ष्मण म्हणे तात। स्वयंप्रकाश उमाकांत।।६।।

१९०९. अहो गोदेचिये तीरी। धानुर नामक ती पुरी।।१।। धन्य धन्य गोदा देवी। माता त्रैलोक्यविजयी।।२।। शिवावेगळी ती नाही। शिव वसती तिचे ठायी।।३।। परोपकार जगावर। करावया ती साकार।।४।। रुद्र अवतार हनुमान। करितो भक्तांचे कल्याण।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।६।।

१९१०. फरकंड गोदेचिये तीरी। वसतसे ती हो पुरी।।१।। अवघा मायेचा विलास। एकपणा नाही नाश।।२।। शिव दयाळू आपण। करितो

जगाचे कल्याण।।३।। कर्मकाष्ठाचे दहन। करी प्रभू तो आपण।।४।। प्रेमे करा नामस्मरण। प्रेमे करावे पूजन।।५।। लक्ष्मण म्हणे हीन। फार सोडविले त्याने।।६।।

१९११. केळगाव बाणेगाव। तेथे वसे महादेव।।१।। तेथे बाणेश्वर लिंग। शुद्ध बुद्ध ते निःसंग।।२।। करितो भक्तांचे कल्याण। धन्य धन्य त्रिनयन।।३।। गोदातीरी प्रभूची वस्ती। भक्ता देतो उत्तम गती।।४।। पाप ताप दैन्य हरी। अती दयाळू मदनारी।।५।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करी माता जगा।।६।।

१९१२. डिगरस वसे गोदेतटी। तेथे परमात्मा धुर्जटी।।१।। परमधाम परमपुरुष। परात्पर तो अविनाश।।२।। सगुण झाला जगास्तव। त्याचे नकळे वैभव।।३।। श्रुती स्तविती प्रभूते। तोचि पाळितो जगाते।।४।। लक्ष्मण म्हणे तात। सदा स्वानंदभरित।।५।।

१९१३. महागाव गोदेतीरी। अती पवित्र ती पुरी।।१।। गोदा आनंदाची खाणी। शिवा प्रिय ती जननी।।२।। तेथे सिदोबा त्रिपुरारी। भक्तजना साह्यकारी।।३।। भक्तसखा दीनानाथ। महाराज तो समर्थ।।४।। आपुले चरणी ठेवी भक्ता। नमू नमू त्या शाश्वता।।५।। लक्ष्मण म्हणे तात। आपण झाला देव भक्त।।६।।

१९१४. गोदेतीरी कंठेश्वर। महाराज विश्वंभर।।१।। फार पवित्र ते पूर। भक्तजनांचे माहेर।।२।। भक्तास्तव कार्तिकस्वामी। वसतसे तये धामी।।३।। शिवपुत्र तो विजयी। अलिप्तपणे तये ठायी।।४।। तेथे पूर्णासंगम। अती पवित्र ते धाम।।५।। तेथे कार्तिकेश्वरलिंग। दयाळू तो उमारंग।।६।। स्वामी वसे गंगेमध्ये। महाराज तो स्वतःसिद्ध।।७।। लक्ष्मण म्हणे फार। उद्धरती तेथे नर।।८।।

१९१५. बरबडी ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। वसे गोदेचिये तीरी। फार पवित्र ती पुरी।।२।। तेथे शिवलिंग शिव। केवळ परमात्मा तो देव।।३।। भजन पूजन करिती। त्याहा होय प्रभुप्राप्ती।।४।। शिव स्वानंदजीवन। करितो भक्तांचे कल्याण।।५।। लक्ष्मण म्हणे हीन। झाले कृपेने पावन।।६।।

१९१६. राहटी ग्राम गोदेतीरी। फार पवित्र ती पुरी।।१।। गंगा फाराते

उद्धरी। तिची न वर्णवे थोरी।।२।। माता परोपकारास्तव। दावी सगुण वैभव।।३।। तिचे तीरी शिव वसे। शिवावेगळी ती नसे।।४।। शिवावतार हनुमान। भक्तास्तव तो सगुण।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। उभयतटी महादेव।।६।।

१९१७. पिंपळगाव ऋषिस्थळ। तेथे वसे जाश्वनीळ।।१।। ऋषी सत्कर्म आचरती। जगा पावन करिती।।२।। धन्य धन्य हा संतसंग। संतसंगे तरले जग।।३।। अमर इच्छिती संतसंग। श्रेष्ठ संग तो अभंग।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ति-। योगे घडे ती संगती।।५।।

१९१८. टाकळीनाम ग्राम असे। तेथे वसे तो महेश।।१।। महान वैभव प्रभूचे। दुःख निवारी भक्तांचे।।२।। प्रभुकृपे आनंद भक्ता। नमो नमो त्या शाश्वता।।३।। गोदेतीरी वश्य ग्राम। तेथे वश सर्वोत्तम।।४।। भक्ती प्रिय प्रभूप्रती। प्रभू स्वानंदाची मूर्ती।।५।। लिंगा नाम रामेश्वर। सदा होतो जयजयकार।।६।। लक्ष्मण म्हणे शिव। दयाळू तो कृपाळुव।।७।।

१९१९. दुटक वसे गंगेतीरी। गंगा जगाते उद्धरी।।१।। जगद्गुरू शिव तात। गंगाधर तो विख्यात।।२।। भक्तकैवारी तो हर। करितो जगाचा उद्धार।।३।। गंगा अनाथाते तारी। हीनादीनाते उद्धरी।।४।। स्नान दान जे करिती। त्याहा होय उत्तम गती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।६।।

१९२०. ग्रामा नाम रुंज ग्राम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। गोदेतीरी ते प्रसिद्ध। तेथे वसती महान सिद्ध।।२।। ऋषिसमुदाय तो फार। वसती तापसांचे भार।।३।। महान सौख्य तयेठायी। वेदघोष ठायी ठायी।।४।। भक्ती वैराग्य हे ज्ञान। सिद्धाचे ते हो भूषण।।५।। शिवपूजन तये ठायी। भक्तिसुखा पार नाही।।६।। लक्ष्मण म्हणे ऋषी। फार तारक जगासी।।७।।

१९२१. गंगातीरी वसे गुंज। तिचे तीरी वृषभध्वज।।१।। तिच्या वेगळा तो नाही। त्यावेगळी गंगा नाही।।२।। सूर्याअंगी जेवी कांती। तैसी उभयताची गती।।३।। प्रेमे करा गंगास्नान। करा प्रभूचे स्मरण।।४।। लक्ष्मण म्हणे फार। दयाळू तो विश्वंभर।।५।।

१९२२. सातेफळ गोदेतीरी। गोदा पापाते संहारी।।१।। तिचे जया घडे

स्नान। प्राणी होती ते प्रवीण।।२।। माता त्रितापाते वारी। करी मोक्षाचा अधिकारी।।३।। मिथ्या दिसे हा संसार। तेथे दुःखाचा बाजार।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। स्मरा दयाळू तो देव।।५।।

१९२३. आतेसर अनंतऋषी। ऋषी तारिती जगासी।।१।। परोपकारी ऋषी फार। ऋषी सुखाचे माहेर।।२।। त्यांचे कृपे सुख फार। साधू पावन करिती फार।।३।। भक्ती श्रवण मनन। करिती प्रभूचे ते ध्यान।।४।। ध्यानामाजी आनंद होय। कृपे ब्रह्मानंद होय।।५।। करा करा प्रभोचा स्मर। स्मरे होतसे उद्धार।।६।। लक्ष्मण म्हणे गंगा। फार प्रिय ती निःसंगा।।७।।

१९२४. भारस्वाड भारतऋषी। आहे तारक जगासी।।१।। ऋषी तारती कृपेने। तरती अनाथ ते दीन।।२।। श्रुती स्मृती ही बोलती। उत्तम आहे संतसंगती।।३।। सुसंगाने सुख होय। प्रेमयुक्त स्मरू पाय।।४।। धन्य धन्य गंगादेवी। तिचे वैभव अक्षयी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय मातेप्रती।।६।।

१९२५. गंगेतीरी ते पेनूर। ग्राम पवित्र ते फार।।१।। जेथे वाहे गंगाबाई। महिमा तेथे हो अक्षयी।।२।। तिचे तीरी वसती नर। ते हो पवित्र ते फार।।३।। महारुद्र तेथे वसे। जगा सौख्य देत असे।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। गंगां स्मरे महादेव।।५।।

१९२६. धन्य धन्य कपिलेश्वर। भूमी पवित्र ती फार।।१।। यज्ञ झाले गोदेतीरी। कोण गणना त्यांची करी।।२।। स्वर्गवासी ते इच्छिती। आम्हा होवो भक्तिप्राप्ती।।३।। तेथे कपिलेश्वर हर। भक्तजनांचे माहेर।।४।। त्याचे पूजन करिती। त्याते महासौख्य प्राप्त होती।।५।। तेथे ग्राम ते धानूर। आहे शिवा प्रिय फार।।६।। लक्ष्मण म्हणे तात। प्रेमे वसे त्या ग्रामात।।७।।

१९२७. शेवडी वसे गोदेतीरी। फार पवित्र ती पुरी।।१।। तेथे वसे लिंग दयाळ। प्रभो वसे तो स्नेहाळ।।२।। राहाटी ग्राम ते उत्तम। तेथे वसे सर्वोत्तम।।३।। शिव अनादी अनादी। केवळ आहे तो दयाब्धी।।४।। पतितपावन नाम त्याचे। करितो कल्याण भक्ताचे।।५।। धन्य धन्य कपिलेश्वर। जगद्गुरू विश्वंभर।।६।। लक्ष्मणा पावन केले। आपुले भजनी लाविले।।७।।

१९२८. कागल गाव गंगेतटी। तेथे वसे तो धुर्जटी।।१।। भक्तीस्तव हा सगुण। झाला गंगाधर पूर्ण।।२।। गंगेमध्ये लिंग असे। स्थान पवित्र ते असे।।३।। फार पापी उद्धरती। ऐसी प्रभूची त्या ख्याती।।४।। गंगा आणि गंगाधर। करिती जगाचा उद्धार।।५।। हरेश्वर लिंगा नाम। स्मरता हरतसे विघ्न।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।७।।

१९२९. ग्राम वसे गोदेतीरी। पवित्र आहे ती हो पुरी।।१।। सावंगी म्हणती त्या ग्रामाला। सुख होतसे जगाला।।२।। तेथे परमेश्वर त्रिपुरारी। हीनादीनाते उद्धरी।।३।। त्यांनी अगणित तारिले। भक्तिमार्गाते लाविले।।४।। प्रभोचा थोर उपकार। प्रेमे सांभाळी शंकर।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अति प्रिय प्रभोप्रती।।६।।

१९३०. जयतापूर ग्रामा नाम। आहे पवित्र ते धाम।।१।। जय मिळतसे भक्ता। प्रभो विश्वाचा पाळिता।।२।। विश्वंभर त्याचे नाव। विश्वसखा सर्वोत्तम।।३।। भवसिंधू हा दुर्धर। येथे बुडती प्राणी फार।।४।। यास्तव प्रभो देहधारी। झाला फार कृपा करी।।५।। लक्ष्मण म्हणे तात। स्वये झाला देव भक्त।।६।।

१९३१. बेट महान ऋषीचे स्थळ। महान ज्ञाते ते निर्मळ।।१।। मळ हरती जगाचे। स्मरण करा प्रेमे त्याचे।।२।। जग विसरले पाया। म्हणोनि दु:ख वसे तया।।३।। स्मरणी सादर प्रभोभक्त। त्याहा सुख ते अद्भुत।।४।। प्रपंचसुख हे अनित्य। खोटे खोटे मायाकृत।।५।। भक्त सेविती ती गोडी। सदा स्मरणाची आवडी।।६।। लक्ष्मण म्हणे स्मरे। प्राणी झाले ब्रह्म बा रे।।७।।

१९३२. गंगेतटी मोहनपूर। तेथे लिंग ते मोहनेश्वर।।१।। लिंग अनादी अनादी। पायापाशी सर्वसिद्धी।।२।। महादेवा जे स्मरती। त्याचे त्रिताप जळती।।३।। महिमा स्मरणाचा थोर। ज्ञाते जाणती हा विचार।।४।। लक्ष्मण म्हणे हर। करितो मायेचिया पर।।५।।

१९३३. सोमेश्वर ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। त्याची नामे अगणित। प्रभो परमात्मा निवांत।।२।। नाम ठेविले भक्तांनी। भक्तास्वाधीन शूळपाणि।।३।। त्रिशूळ हस्ती भक्तास्तव। धरिता झाला महादेव।।४।।

भक्तकैवारी तो हर। करितो दीनाचा उद्धार।।५।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करी माता जगा।।६।।

१९३४. मार्कंडेय ऋषीश्वर। त्याचा आश्रम तो थोर।।१।। प्रभोचे वैभव अगणित। कोण जाणेल त्याचा अंत।।२।। परोपकारी महामुनी। तारक आहे जगालागूनि।।३।। त्याचे नाम वदती वाचे। पातक जळती तयाचे।।४।। धन्य धन्य मुनीश्वर। महिमा प्रभूचा अपार।।५।। गोदेतीरी केली वस्ती। हीनादीनाते तारिती।।६।। लक्ष्मण हीन दीन। करितो प्रभूचे भजन।।७।।

१९३५. गोदेतीरी पिंपळगाव। तेथे परमात्मा तो देव।।१।। गंगा त्याची पराशक्ती। भक्तास्तव धरिली व्यक्ती।।२।। गंगा आणि गंगाधर। भक्तास्तव तो साकार।।३।। जगाचा उद्धार करिती। भक्ता आपुलेपण देती।।४।। लक्ष्मण म्हणे धनी। केला स्वाधीन भक्तांनी।।५।।

१९३६. इष्टपुरी गोदेतीरी। फार रम्य ती हो पुरी।।१।। तेथे ईश्वर अनादी। भक्तजना कृपानिधी।।२।। प्रभोपाशी कृपा फार। प्रभो स्वानंदाचे घर।।३।। महाकालेश्वर शंकर। केवळ परमात्मा तो थोर।।४।। अगोचर असे तात। भक्तजना सांभाळीत।।५।। लक्ष्मण म्हणे पूजन। करिती होती ती पावन।।६।।

१९३७. कोटीतीर्थ ग्रामा नाम। धन्य धन्य ते हो ग्राम।।१।। तेथे कोटी तीर्थे वसती। असंख्य जीव उद्धरती।।२।। गोदेतीरी महान स्थान। ज्ञाते वसती तेथे महान।।३।। महान आनंद तये ठायी। ज्ञाते घेती ते अक्षयी।।४।। अहो आनंद आनंद। प्रभोभक्ता ब्रह्मानंद।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। स्वानंदी आनंदवी देव।।६।।

१९३८. हासापूर ग्रामा नाम। आहे श्रेष्ठ सर्वोत्तम।।१।। गोदेतीरी तो ईश्वर। वसे प्रभू निरंतर।।२।। तिचे आंतरबाह्य वसती। लीला करी ज्ञानमूर्ती।।३।। आपणचि देव भक्त। भक्ती करूनि दावीत।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।५।।

१९३९. उसरनी ग्रामा नाम। आनंदरूप आहे धाम।।१।। तेथे गंगा जगतारिणी। निजभक्ताची जननी।।२।। उरू नेदी भवदुःख। तिचे भक्ता सदा सुख।।३।। प्रपंचसुख खोटे खोटे। गेले सोडून मोठे मोठे।।४।। अहो सावध

सावध। डोळे असता झाले अंध।।५।। लक्ष्मण हा विनवी। काहीतरी धरा सोई।।६।।

१९४०. वसली स्वानंदाची पेठ। तेथे वसती श्रेष्ठ श्रेष्ठ।।१।। तेथे वसती स्वानुभवी। ब्रह्मानंदे ते विदेही।।२।। विटले विटले संगाला। तुटला मायेचा गलबला।।३।। त्याहा कळले स्वहित। मीतूपणा जेथे अंत।।४।। ब्रह्मायनी माता गंगा। स्मरतसे ब्रह्मलिंगा।।५।। लिंग आहे सबराभर। अनंत ब्रह्मांडाचा आधार।।६।। लक्ष्मण हीन दीन। करितो प्रभोचे भजन।।७।।

१९४१. गोदेतीरी मार्कंडीतीर्थ। अप्सरायुग्म समर्थ।।१।। कण्वऋषीचा पुत्र बाल्हिक। कोटी यज्ञ केले नेमक।।२।। तेथे कोटी तीर्थ झाले। कोटेश्वर लिंग स्थापिले।।३।। उपतीर्थ तेथे वसती। उत्तरतीरी नरसिंहमूर्ती।।४।। पिशाच्चतीर्थ उत्तरतीरी। श्रेष्ठ शोभती हो भारी।।५।। अनेक तीर्थे सात शत। नांदेड ग्राम शोभे तेथ।।६।। लक्ष्मण म्हणे माता। पावन करी ती पतिता।।७।।

१९४२. भावतीर्थ गोदेतीरी। दीना पावन ते करी।।१।। तीर्था सहस्रकुंड नाम। दक्षिणतीरी कपिलासंगम।।२।। तेथे सिंहकामतीर्थ। महान आहे ते समर्थ।।३।। तेथे नरसिंह देव। महान श्रेष्ठ तो कृपाळुव।।४।। नवानंदाचे नांदेड। तेथे तारातीर्थ प्रचंड।।५।। तेथे स्नान दान करिती। त्याहा होय स्वर्गप्राप्ती।।६।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करीतसे जगा।।७।।

१९४३. शंखोदयतीर्थ गोदेतीरी। तेथे तरल्या नरनारी।।१।। आयुतसंख्या उपतीर्थ। उत्तम आहे ते विख्यात।।२।। तेथे स्नान दान करिती। होय त्याहा उत्तम गती।।३।। गोदामाता जगदोद्धार। करी क्षेत्र ते हो थोर।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय मातेप्रती।।५।।

१९४४. किष्किंधातीर्थ गोदेतटी। महिमा क्षेत्राची त्या मोठी।।१।। गोदातीरा राम आले। त्याने क्षेत्र ते स्थापिले।।२।। रामलिंग हो स्थापिले। प्रेमयुक्त पूजन केले।।३।। बहुत उत्सव हो केला। राम फार संतोषला।।४।। लक्ष्मण म्हणे थोर। महिमा मातेचा अपार।।५।।

१९४५. सहपरिवारे रावण। वधिला श्रीरामचंद्राने।।१।। श्रीराम झाले विजयी। फार सौख्य तये ठायी।।२।। सर्वा झाला हो आनंद। रामापाशी ब्रह्मानंद।।३।। बिभीषणा राज्य दिधले। राम विमानी बैसले।।४।। लक्ष्मण

म्हणे राम। केवळ स्वानंदाचे धाम।।५।।

१९४६. श्रीरामा देव स्तविती। प्रेमे अप्सरा नाचती।।१।। नारदतुंबर गायन करिती। गंधर्व नानापरी गाती।।२।। अयोध्येचा मार्ग लक्षून। त्वरे चालले विमान।।३।। बिभीषण सवे घेतला। वानरभार तो शोभला।।४।। लक्ष्मण म्हणे फार। होतो तेथे जयजयकार।।५।।

१९४७. स्वर्गपंथे विमान आले। गोदेतीरी उतरले।।१।। गंगा नमिली रामाने। तैसीच नमिली सर्वांनी।।२।। केले साष्टांग नमन। फार आनंद तो पूर्ण।।३।। रामे गंगास्नान केले। कर्म कर्मांतर साधिले।।४।। यथासांग केला विधी। परोपकारी कृपानिधी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

१९४८. श्रीरामे शिवस्तवन। केले हो प्रेमेकरून।।१।। लिंग प्रेमे हो स्थापिले। रामेश्वर नाम ठेविले।।२।। षोडशोपचारे पूजन। प्रेमे केले श्रीरामाने।।३।। परोपकारास्तव भक्ती। करूनि दावी कृपामूर्ती।।४।। लक्ष्मण हा किंकर। प्रेमे वदे शिव हर हर।।५।।

१९४९. पाहूनि रामाची ती भक्ती। सर्वही तैसेचि वर्तती।।१।। लक्ष्मणे केले पूजन। केले तेथे लिंग स्थापन।।२।। लक्ष्मणेश्वर नाम। पाहता हरती सर्व भ्रम।।३।। अष्टसुगंध षोडशोपचार। प्रेमे पुजिला ईश्वर।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।५।।

१९५०. स्नान करूनि सीताबाई। लिंग स्थापी तये ठायी।।१।। पूजन केले हो मातेने। धन्य धन्य माता ती धन्य।।२।। कृपा करी दीनावरी। किती वर्णावी ही थोरी।।३।। मोठे मोठे तीते स्तविती। प्रेमे भजन करिती।।४।। लक्ष्मण म्हणे माता। पावन करी ती पतिता।।५।।

१९५१. बिभीषणे स्नान केले। प्रेमे लिंग हो स्थापिले।।१।। आपुले नामाचे ते लिंग। स्थापिले भक्त तो निःसंग।।२।। पूजन केले प्रेमयुक्त। प्रेमे स्तविला उमाकांत।।३।। ध्यान प्रेमे केले त्याने। भक्त श्रेष्ठ तो प्रवीण।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करिता होय प्रभुप्राप्ती।।५।।

१९५२. सुग्रीवाने केले स्नान। केले गंगेचे पूजन।।१।। स्तवन केले हो गंगेचे। पाय स्मरिले रामाचे।।२।। लिंग स्थापिले सुग्रीवेश्वर। प्रेमे पुजिला

शंकर।।३।। पूजा केली प्रेमभावे। स्तविले शिवाचे ते नाव।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। आदि अनादी तो देव।।५।।

१९५३. नळे केले गंगास्नान। केले मातेचे पूजन।।१।। प्रेमे स्तविला शंकर। दीनानाथ गंगाधर।।२।। लिंग स्थापिले नळाने। केले प्रेमे हो पूजन।।३।। बिल्वदळे शिव पुजिला। फार आनंद मानिला।।४।। लक्ष्मण म्हणे कल्याण। करीतसे पंचानन।।५।।

१९५४. नील भक्त तो प्रवीण। प्रेमे केले गंगास्नान।।१।। गोदा पुजिली ती माता। पावन करी ती पतिता।।२।। लिंग स्थापिले नीलाने। प्रेमे केले हो पूजन।।३।। बिल्वदळ हरा वाहिले। स्तवन प्रेमयुक्त केले।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।५।।

१९५५. जांबुवंत वृद्ध जुनाट। महान भक्त तो वरिष्ठ।।१।। त्यांनी केले गंगास्नान। प्रेमे केले हो पूजन।।२।। त्यांनी लिंग हो स्थापिले। प्रेमयुक्त पूजन केले।।३।। बिल्व पुष्प धूप दीप। नैवेद्य आदी हो तांबूल।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। स्तविला प्रेमे महादेव।।५।।

१९५६. अंगदाने गंगास्नान। केले प्रेमे हो करून।।१।। शिवलिंग हो स्थापिले। प्रेमभावे पूजन केले।।२।। प्रेमे स्तविला हो शिव। विश्वंभर महादेव।।३।। आनंद भक्तीने होतसे। भक्तापाशी तो महेश।।४।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तसखा उमाकांत।।५।।

१९५७. प्रेमे केले गंगास्नान। केले मातेचे पूजन।।१।। माता भक्ताची जननी। केवळ स्वानंदाची खाणी।।२।। दिव्य भक्त तो जुतपती। स्थापिले दिव्य लिंगमूर्ती।।३।। लिंग स्थापिले प्रेमयुक्त। प्रेमे स्तविला उमाकांत।।४।। याते नाही आदि अंत। प्रभो स्वानंदभरित।।५।। लक्ष्मणा तो बोलवी। त्याचे वैभव अक्षयी।।६।।

१९५८. अहो गोदेचिये तीरी। महान वैभव ते भारी।।१।। स्नान केले त्या भक्तांनी। केले गोदेचे पूजन।।२।। सदाशिव मायातीत। तोचि झाला सगुण तात।।३।। करितो पातका निःपात। जगद्गुरू कृपावंत।।४।। मारुती हा ब्रह्मचारी। लिंग स्थापिले त्रिपुरारी।।५।। लक्ष्मण म्हणे योगी। प्रेमे स्तविती प्रभोलागी।।६।।

१९५९. सर्व वानरांनी स्नान। केले प्रेमयुक्तकरून।।१।। गोदादेवी भक्त माता। अती प्रिय उमाकांता।।२।। पृथक् पृथक् लिंग स्थापिले। प्रेमयुक्त पूजन केले।।३।। वानर प्रेमे आनंदाने। करिती प्रभोचे भजन।।४।। लक्ष्मण म्हणे नाचती। तेथे वानरांच्या मूर्ती।।५।।

१९६०. अठरा पद्म ते वानर। मेळा त्याहांचा तो फार।।१।। त्याहांनी केले हो भजन। शब्द झाला तो दारुण।।२।। गंगातीरी जयजयकार। महान आनंद तो थोर।।३।। वानर देवाचे अवतार। त्याहाचे सामर्थ्य ते थोर।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। आधार आहे सर्वांप्रती।।५।।

१९६१. उड्या मारिती वानर। करिती प्रभोचा तो स्मर।।१।। गंगेमाजी हो नाचती। एकएका भेडसाविती।।२।। अनेक करिती हो क्रीडा। भक्ती प्रिय चंद्रचूडा।।३।। राम आनंदले फार। भक्तजनाचे माहेर।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।५।।

१९६२. गोळांगुळ सर्व आले। त्याने गंगास्नान केले।।१।। केली मातीची हो स्तुती। पुजिली गोदा ज्ञानमूर्ती।।२।। तिचे वैभव न कळे। जिचा सखा जाश्वनीळ।।३।। गोळांगुळे लिंग स्थापिले। आपआपले नाम ठेविले।।४।। लिंग स्थापिले रिसांनी। प्रेमे पुजिला शूळपाणि।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। भक्तीपाशी चारी मुक्ती।।६।।

१९६३. गोळांगुळे उत्सव थोर। केला धन्य भक्त शूर।।१।। पाला पुष्कळ वाहिला। प्रेमे शिव तो स्तविला।।२।। प्रेमे नाचे लिंगापुढे। अती भक्त ते हो गाढे।।३।। त्या आनंदा उपमा नाही। सर्वसुख भक्तीठायी।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। वंद्य आहे सर्वाप्रती।।५।।

१९६४. सर्वत्रांनी केले स्नान। केले सर्वांनी पूजन।।१।। केले भजन सर्वत्रांनी। ध्यान केले हो त्याहांनी।।२।। झाला सर्वत्र आनंद। शिव स्वानंदाचा कंद।।३।। श्रीरामापाशी आनंद। अक्षयी तो ब्रह्मानंद।।४।। लक्ष्मण म्हणे तात। स्वये झाला देव भक्त।।५।।

१९६५. रामाने उत्सव पाहून। आनंद मानिला तो पूर्ण।।१।। सर्वत्र लिंग ते पुजिले। तंदुल बिल्व ते वाहिले।।२।। लिंगा दिधले वरदान। राम बोलिले वचन।।३।। हे लिंग जे पुजिती। त्याहा होय उत्तम गती।।४।। अती सौख्य

भोगतील। ते नर वैकुंठा जातील।।५।। लिंगा आहे माझा वर। सत्य सत्य हा निर्धार।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। स्थापीतसे अयोध्यापती।।७।।

१९६६. तेथे स्नान दान करिती। प्राणी सौख्य ते भोगिती।।१।। विमान गेले अती त्वरे। धन्य धन्य तो प्रभू रे।।२।। गोदावरी वृद्ध गंगा। अती प्रिय ब्रह्मलिंगा।।३।। लक्ष्मण म्हणे वैभव। न कळे मातेचे लाघव।।४।।

१९६७. श्रीरामाने मारुतीते। सांगितले प्रेमयुक्ते।।१।। त्या क्षेत्री तुम्ही राहावे। क्षेत्र प्रेमे सांभाळावे।।२।। त्याचे पूजन करतील। ते नर वैकुंठा जातील।।३।। ऐसे माझे वरदान। रुद्रा सांभाळा आपण।।४।। लक्ष्मण म्हणे मारुती। सांभाळितो क्षेत्राप्रती।।५।।

१९६८. राम गेले अयोध्येप्रती। विमान चाले शीघ्रगती।।१।। धन्य धन्य तो श्रीराम। राम आहे सर्वोत्तम।।२।। मारुती क्षेत्र ते सांभाळी। सदा वसे रामाजवळी।।३।। लीला प्रभूची कळेना। अंत प्रभोचा लागेना।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। गंगातीरी महादेव।।५।।

१९६९. लिंगे अगणित तिचे तीरी। मुनी वसती ब्रह्मचारी।।१।। यज्ञ झाले अगणित। न कळे मातेचा तो अंत।।२।। गोदावरी ज्ञानखाणी। भक्तजनांची जननी।।३।। भक्ती ज्ञान हे वैराग्य। मातेचे हे सर्व भाग्य।।४।। लक्ष्मणा ती बोलवी। महामाया ती अक्षयी।।५।।

१९७०. अग्निपुत्र दश अंगिरा। प्रेमे आले गौतमी तीरा।।१।। सांबलिंगाचे पूजन। केले अष्टभावेकरून।।२।। बहुत दिवस पूजन। फार केले अनुष्ठान।।३।। त्याची भक्ती हो पाहून। शिव झाला तो प्रसन्न।।४।। त्याते वर हो दिधला। शिव अती संतोषला।।५।। पृथ्वी उत्पन्न करण्याचे। सामर्थ्य जाहले तयाचे।।६।। पुढे तुम्ही व्यास व्हाल। सृष्टी निर्माण कराल।।७।। यास्तव व्यासतीर्थ झाले। तीर्था नाम हो शोभले।।८।। लक्ष्मण म्हणे भक्ती। सर्व सौभाग्या संपत्ती।।९।।

१९७१. तेथे मांजरासंगम झाला। तेथे शंकर तो बैसला।।१।। गंगा मांजरासंगम। तेथे उद्धरले अधम।।२।। फार पवित्र ते स्थान। प्राणी होती हो पावन।।३।। फार दोषी उद्धरिती। मातेचा महिमा वर्णू किती।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। उभयतटी महादेव।।५।।

१९७२. अहो प्रणितासंगम थोर। महान महिमा असे फार।।१।। तेथे

देवागम नाम तीर्थ। फार आहे ते समर्थ।।२।। कुशतर्पण नामे तीर्थ। शहाऐंशी सहस्र उपतीर्थ।।३।। मनुतीर्थ शाश्वततीर्थ। फार आहे ते समर्थ।।४।। तेथे देहान्ती मुक्ती। ऐसी आहे व्यास-उक्ती।।५।। तेथे दोषी उद्धरिती। हीन दीन पावन होती।।६।। लक्ष्मण म्हणे शिव। गंगेतटी महादेव।।७।।

१९७३. गोदेतीरी याचिकातीर्थ। भद्रकनाम ते समर्थ।।१।। पवनतीर्थ तेथे वसे। विप्रतीर्थ तेथे असे।।२।। भानुतीर्थ तये ठायी। तेथे महिमा थोर पाही।।३।। तेथे स्नान दान करिती। त्यांचे क्लेश सर्व जाती।।४।। त्याते सुख फार होय। भक्त होती निरामय।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।६।।

१९७४. गोदेतीरी भिल्लतीर्थ। आहे महान ते समर्थ।।१।। चक्षुतीर्थ तेथे वसे। योगेश्वरलिंग महेश।।२।। महिमा प्रभूचा तो थोर। सदा होतो जयजयकार।।३।। तेथे बिभीषण येतसे। प्रेमे शिवा पूजीतसे।।४।। नित्य पूजन तो करी। प्रेमे स्तवनही करी।।५।। फार दोषी उद्धरती। धन्य धन्य शिवभक्ती।।६।। लक्ष्मण म्हणे गोदा। जगा पावन करी सदा।।७।।

१९७५. उर्वशीतीर्थ गोदेतीरी। महान क्षेत्र ते हो भारी।।१।। प्रमथनामा राजेश्वर। त्याने तप केले फार।।२।। राव स्वर्गाप्रती गेला। इंद्रपद भोगिता झाला।।३।। त्याते अहंकार आला। राव गंधर्वे जिंकिला।।४।। राव घातला तो बंदी। तेथे वाढली उपाधी।।५।। लक्ष्मण म्हणे घाला। फार अहंकार झाला।।६।।

१९७६. त्याचा पुत्र हो सुमती। प्रेमे आला गोदेप्रती।।१।। गुरु आज्ञे तप केले। जनार्दना तोषविले।।२।। प्रसन्न झाली विष्णुमूर्ती। आणून दिधले पित्याप्रती।।३।। पितापुत्र नगरा गेले। अती सौख्य ते पावले।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभोप्रती।।५।।

१९७७. नमो नमो गंगादेवी। माता त्रैलोकी विजयी।।१।। स्वर्गामाजी तुझी वसती। परोपकार ते जाणती।।२।। स्वर्गवासी तूते शरण। माता भक्ताचे जीवन।।३।। त्रिभुवनी वससी माते। किती वर्णावे गे तूते।।४।। लक्ष्मण हा किंकर। फार अन्यायी पामर।।५।।

१९७८. चित्त मलिन हे झाले। फार विषयी गुंतले।।१।। कामक्रोध हे

दुर्मती। सदा दुःख हे देती।।२।। त्याहाचा दंगा दिसे फार। अवघा अविद्याबाजार।।३।। येथे धामधूम मोठी। दुष्ट जगाची रहाटी।।४।। लक्ष्मण हा अन्यायी। सांभाळावे माते देवी।।५।।

१९७९. कर्ममार्ग हा लोपला। वर्णसंकर जाहला।।१।। धार्मिक होती कासावीस। सत्य रुचेना कोणास।।२।। फार दिसे हा अनर्थ। खोट्या म्हणती समर्थ।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ति-। मार्ग दुष्ट उच्छेदिती।।४।।

१९८०. सिद्ध दडले विवरी। पाखंड झाले घरोघरी।।१।। तर्कवादी झाले फार। कुतर्कादी घरोघर।।२।। वेदशास्त्रे उच्छेदिती। कुतर्क मते ते स्थापिती।।३।। लक्ष्मण म्हणे थोर। दंगा दिसे जगावर।।४।।

१९८१. कलियुगाची रहाटी। माते खोटी दिसे मोठी।।१।। लोपले ज्ञान वैराग्य। जगी भरला फार रोग।।२।। लोपला ज्ञानाचा आनंद। अवघा झाला विषयानंद।।३।। लक्ष्मण हा अन्यायी। याते त्राता तूचि देवी।।४।।

१९८२. नमो नमो ज्ञानगंगे। नमो नमो गे अभंगे।।१।। नमो नमो विश्वभरिते। नमो नमो ज्ञानसरिते।।२।। नमो नमो शिवप्रिये। नमो नमो महामाये।।३।। लक्ष्मण दीनावरी। कृपा करी झडकरी।।४।।

१९८३. नमो नमो सदानंदे। नमो नमो ब्रह्मानंदे।।१।। नमो नमो शुद्धे बुद्धे। नमो नमो पूर्णानंदे।।२।। नमो नमो कृपासरिते। नमो नमो ज्ञानभरिते।।३।। लक्ष्मण म्हणे देवी। माते तू सर्वदा विजयी।।४।।

१९८४. अनंत ब्रह्मांडे उत्पन्न। करितो तो पंचानन।।१।। त्याचे मुकुटी तुझा वास। तुझा आधार सर्वांस।।२।। परोपकार तुजपाशी। वसतसे अहर्निशी।।३।। लक्ष्मण म्हणे माते। वेद स्तविती गे तूते।।४।।

१९८५. तुझे गुण अगणित। तुझे वैभव सदोदित।।१।। कामिकाते वैभव देशी। भक्ता चरणी ठेविशी।।२।। प्रवृत्ती निवृत्ती तुजपाशी। तू तव स्वानंदाची राशी।।३।। लक्ष्मण हा सांभाळी। ठेवी स्वानंदकल्लोळी।।४।।

१९८६. माते तुझे कृपेविण। नोहे नोहे गे कल्याण।।१।। कल्पवृक्ष चिंतामणी। तेही न तुळती तुळणी।।२।। परेपरता आनंद। कृपे देशी निजबोध।।३।। लक्ष्मण हा अन्यायी। माते सोडवी सोडवी।।४।।

१९८७. समुद्रतीर्थ ते विख्यात। गंगा आली प्रेमे तेथ।।१।। समुद्र उभा

कर जोडूनि। केली साष्टांग विनवणी।।२।। अहो गंगे जगन्माते। पावन करा वेगी माते।।३।। अगस्ती पीत मी अन्यायी। मज दीना क्षेम देई।।४।। ऐसी विनविली माता। पावन करी ती पतिता।।५।। लक्ष्मण म्हणे थोर। महिमा मातेचा अपार।।६।।

१९८८. परिसा माझी विनवणी। जीवजंतू माझे स्थानी।।१।। यासी होईल कल्पान्त। फार होतील दु:खित।।२।। यास्तव सप्तमुखे यावे। समुद्रे नमिली ती भावे।।३।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करीतसे जगा।।४।।

१९८९. सहदंपत्ये संयुक्त। सप्त ऋषी आले तेथ।।१।। त्यांनी नमिली ती गंगा। अती प्रेमे ती अभंगा।।२।। सप्त ऋषी सप्त ओघी। राहिले स्मरण त्या मार्गी।।३।। सप्त ओघ समुद्रात। प्रेमे मेळविले सुचित।।४।। लक्ष्मण म्हणे आनंद। ऋषिवृंदा ब्रह्मानंद।।५।।

१९९०. तेथे ऋषींनी यज्ञ केले। भीमेश्वराते पुजिले।।१।। तेथे गौतमेश्वरलिंग। महान आहे ते अभंग।।२।। तेथे वसे ब्रह्मेश्वर। श्रेष्ठ लिंग सोमेश्वर।।३।। महिमा प्रभूचा अपार। नित्य होतो जयजयकार।।४।। लक्ष्मण म्हणे तेथे। देव येती दर्शनाते।।५।।

१९९१. उपतीर्थे कोटी वसती। प्राणी त्याहाते नमिती।।१।। ब्रह्मा विष्णू महेश्वर। तेथे वसती निरंतर।।२।। सकळ देव तेथे वसती। वसती दिक्पाळ स्तविती।।३।। सिद्धमुनी ऋषीश्वर। वसती तापसांचे भार।।४।। गणगंधर्व किन्नर। स्तविती प्रेमयुक्त फार।।५।। यावत् सागर गोदादेवी। सकल तीर्थे तये ठायी।।६।। धन्य धन्य गोदादेवी। महिमा मातेचा अक्षयी।।७।। फार उद्धरले हीन। केले मातेने पावन।।८।। असंख्य तीर्थे मातेपाशी। लिंगे वसती अहर्निशी।।९।। लक्ष्मणा पतिताते। पावन करा वेगी माते।।१०।।

दक्षिणतटी पंचक्रोशीचे अभंग

१९९२. गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। काठवाड ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।२।। तेथेचि मारुतीही वसे। रुद्र अकरावा तो असे।।३।। त्याचे भजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।४।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।५।।

१९९३. गोळेगाव ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। पंचक्रोशी हो

माझारी। फार रम्य आहे पुरी।।२।। तेथे शिवलिंग परमात्मा। प्रभू विश्वाचा तो आत्मा।।३।। त्याचा अवतार मारुती। वसतसे रुद्रमूर्ती।।४।। त्याचे भजन पूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार होय प्रभूप्रती।।६।।

१९९४. ग्रामा नाम रोहीतळ। तेथे वसला जाश्वनीळ।।१।। पंचक्रोशीमाजी शिव। तेथे वसे महादेव।।२।। तेथेचि मारुतीही असे। जगा पावन करीतसे।।३।। त्याचे पूजन करिती। त्याते देतो उत्तम गती।।४।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। फार सोडविले प्राणी।।५।।

१९९५. पांगरी ग्रामा म्हणती। तेथे केली प्रभूने वस्ती।।१।। गोदेचिये दक्षिणतीरी। फार रम्य आहे पुरी।।२।। शिवलिंग पुरातन। निजभक्तांचे जीवन।।३।। तेथे वसे महारुद्र। प्रभू कृपेचा समुद्र।।४।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। फार सोडविले प्राणी।।५।।

१९९६. गोदेचिये दक्षिणप्रांती। ठाकरवन आहे वस्ती।।१।। पंचक्रोशी हो माझारी। शोभली हो उत्तम पुरी।।२।। तेथे वसे शिवलिंग। परमात्मा तो अभंग।।३।। महारुद्र मारुती। सांभाळितो भक्ताप्रती।।४।। त्याचे पूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

१९९७. जातेगाव ग्रामा म्हणती। तेथे प्रभोने केली वस्ती।।१।। गोदेचिया दक्षिणप्रांती। पंचक्रोशीमाजी वस्ती।।२।। महारुद्र हा मारुती। वसतसे रुद्रमूर्ती।।३।। महारुद्राजवळी लिंग। वसे परमात्मा अभंग।।४।। त्याचे करिती नामस्मरण। त्याते रक्षी पंचानन।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

१९९८. गोदेचिये दक्षिणतीरी। रिधोरी नामक असे पुरी।।१।। शिवलिंग वसतसे। परब्रह्म तो महेश।।२।। करितो भक्तांचे कल्याण। भक्ता देतो आपुलेपण।।३।। शिव अवतार मारुती। रक्षीतसे भक्ताप्रती।।४।। जग बुडाले अहंपणे। सांडिला हो हा स्वधर्म।।५।। यास्तव प्रभो हा साकार। करीतसे जगदुद्धार।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। प्रिय आहे प्रभोप्रती।।७।।

१९९९. गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। शेलू नामक

ती पुरी। तेथे वसे त्रिपुरारी।।२।। शिवलिंग पुरातन। सकळ विश्वाचे जीवन।।३।। त्याचा अवतार मारुती। सांभाळितो भक्ताप्रती।।४।। त्याचे पूजन करिती। त्याते देतो उत्तम गती।।५।। लक्ष्मण म्हणे तात। केला भक्ताने अंकित।।६।।

२०००. मारफळ नाम ग्रामा। तेथे वास सर्वोत्तमा।।१।। गोदेचिये दक्षिणतीरी। अती रम्य आहे पुरी।।२।। तेथे वसे महारुद्र। प्रभो अकरावा तो रुद्र।।३।। त्याचे पूजन करिती। त्याते देतो उत्तम गती।।४।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। फार उद्धरिले प्राणी।।५।।

२००१. वाडी शोभे जायकची। तेथे वस्ती महादेवाची।।१।। गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।२।। तेथे वसे महारुद्र। प्रभो कृपेचा समुद्र।।३।। त्याचे नाम घेता वाचे। पर्वत जळती पापाचे।।४।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।५।।

२००२. वारुळ हो ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। पंचक्रोशीमाजी वसे। दक्षिणतटी हो असे।।२।। तेथे शिवलिंग परमात्मा। प्रभो विश्वाचा तो आत्मा।।३।। महारुद्र त्याहा जवळी। प्रेमे भक्ताते सांभाळी।।४।। लक्ष्मण म्हणे थोर। भक्तजनांचे माहेर।।५।।

२००३. पंचक्रोशीमाजी वस्ती। राजेगाव त्याते म्हणती।।१।। गोदेचिये दक्षिणतीरी। फार रम्य आहे पुरी।।२।। तेथे वसे पंचानन। शिव अनादी तो पूर्ण।।३।। त्याहाजवळी मारुती। वसतसे रुद्रमूर्ती।।४।। त्याचे पूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।५।। लक्ष्मण म्हणे त्वरा। प्रेमे भक्तिपंथ धरा।।६।।

२००४. सुरडी हो ग्रामा नाम। तेथे वसे पंचानन।।१।। पंचक्रोशीमाजी असे। तेथे वसे तो महेश।।२।। तेथे मारुतीही असे। प्रेमे भक्त रक्षीतसे।।३।। लक्ष्मण म्हणे देवा। दीन आपुला म्हणावा।।४।।

२००५. पंचक्रोशी हो माझारी। पारगाव नामक पुरी।।१।। धन्य धन्य गोदावरी। तिची वर्णवेना थोरी।।२।। तेथे वसे शिवलिंग। शिव सर्वदा निःसंग।।३।। संगातीत महादेव। फार पुरातन शिव।।४।। त्याचा अवतार मारुती। सांभाळितो भक्ताप्रती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय भक्ताप्रती।।६।।

२००६. गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। वाघुर ते ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।२।। आदिनाथ महादेव। विश्वव्यापक तो शिव।।३।। शिवलिंग भक्ता तारी। धन्य धन्य त्रिपुरारी।।४।। महारुद्र प्रभो अवतार। प्रभो कृपेचे आगर।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ता। सांभाळितो पूर्ण ज्ञाता।।६।।

२००७. गोदेचिये दक्षिणप्रांती। लिंबगाव आहे वस्ती।।१।। पंचक्रोशी हो प्रमाण। गंगा भक्ताचे जीवन।।२।। माता तारी कृपेकरून। अमर इच्छिती हो स्नान।।३।। शिवलिंग तेथे वसे। जगा पावन करीतसे।।४।। हनुमान शिवावतार। आहे कृपेचा सागर।।५।। भक्ता देतो उत्तम पद। शिवकृपे ब्रह्मानंद।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। तारक आहे जगाप्रती।।७।।

२००८. गोदा स्वानंदजीवनी। माता त्रैलोक्यपावनी।।१।। धन्य धन्य तिचे तीर। महिमा मातेचा अपार।।२।। मातेचे हो दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।३।। तालखेड ग्रामा नाम। तेथे शिव तो सर्वोत्तम।।४।। महारुद्र प्रभो अवतार। प्रभो कृपेचे आगर।।५।। त्याते प्रिय आहे भक्ती। सांभाळितो भक्ताप्रती।।६।। देवीदेवही वसती। ठायी ठायी लिंगमूर्ती।।७।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।८।।

२००९. सावरगाव ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।२।। तेथे शिवलिंग परमेश्वर। वसे अनादी ईश्वर।।३।। त्याहाजवळी महारुद्र। प्रभो अकरावा तो रुद्र।।४।। त्याचे पूजन करिती। त्याहा होय सौख्यप्राप्ती।।५।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। फार सोडविले प्राणी।।६।।

२०१०. गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। ग्रामा नाम आडगाव। तेथे परमात्मा तो शिव।।२।। शिवलिंग पुरातन। आदि अनादी तो पूर्ण।।३।। तेथे हनुमानही वसे। जगा पावन करीतसे।।४।। त्याचे पूजन करिती। त्याहा देतो उत्तम गती।।५।। लक्ष्मण म्हणे तात। केला भक्ताने अंकित।।६।।

२०११. गोदेचिये दक्षिणतीरी। माळवाडी नामे पुरी।।१।। धन्य धन्य पंचक्रोशी। गंगा तारी ती जगासी।।२।। गोदावरी आदिशक्ती। उद्धरी ती

जगाप्रती।।३।। करावया जगदुद्धार। शोभे मातेचा अवतार।।४।। शिवलिंग तेथे वसे। मारुतीही तेथे असे।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय मातेप्रती।।६।।

२०१२. डोहोरगाव ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। गोदेच्चिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।२।। तेथे शिवलिंग अनादी। भक्तजना कृपानिधी।।३।। तेथेचि मारुतीही वसे। जगा पावन करीतसे।।४।। त्याचे करिती पूजन। त्याचे हरती बा विघ्न।।५।। लक्ष्मण म्हणे तात। केला भक्ताने अंकित।।६।।

२०१३. ग्रामा नाम केसापुरी। गोदेच्चिये दक्षिणतीरी।।१।। शिवलिंग पुरातन। भक्तजना दयाघन।।२।। केशवराज विष्णुमूर्ती। शोभतसे कृपामूर्ती।।३।। महारुद्र तये ठायी। लिंगे वसती ठायीठायी।।४।। भक्त करिती जयजयकार। भक्तिमार्ग दिसे थोर।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२०१४. गोदेच्चिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। वडगाव ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।२।। शिवलिंग दयाघन। शोभतसे कृपाघन।।३।। हनुमान वसतसे। ग्रामा रक्षण करीतसे।।४।। धन्य धन्य पंचक्रोशी। गंगा तारक जगासी।।५।। लक्ष्मण म्हणे माता। करी उद्धार पतिता।।६।।

२०१५. पिंपळगाव नाम ग्रामा। तेथे वास सर्वोत्तमा।।१।। गोदेच्चिये दक्षिणतीर। नित्य नूतन शंकर।।२।। पुरातन तो हो आहे। भक्ता कृपादृष्टी पाहे।।३।। त्रिविध ताप जाळी हर। प्रभो भक्तांचे माहेर।।४।। महारुद्र प्रभो आज्ञे। वर्ते श्रेष्ठ तो हो प्राज्ञ।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ता-। पाशी वसे तो हो ज्ञाता।।६।।

२०१६. गोदेच्चिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। माजलगाव ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।२।। शिवलिंग दयाघन। करितो भक्तांचे कल्याण।।३।। शिव अनादी अनादी। भक्तजना कृपानिधी।।४।। शिवलिंगे ठायी ठायी। विष्णूप्रती माता विजयी।।५।। तेथे सिद्धाचा तो मठ। स्थान शोभते हो श्रेष्ठ।।६।। महारुद्र हे शोभती। भजन पूजन करिती।।७।। फेनातीर्थ नदी वसे। जगा पावन करीतसे।।८।। तेथे सिद्धाची समाधी। राजाराम

कृपानिधी।।९।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।१०।।

२०१७. ग्रामा नाम पातरूड म्हणती। तेथे अवलियाची वस्ती।।१।। बोवा सिद्ध तेथे वसती। दयाळू ते कृपामूर्ती।।२।। त्याहाचे दर्शन जे घेती। त्याहा सौख्याची प्राप्ती।।३।। पंचक्रोशीमाजी ग्राम। फार पवित्र ते धाम।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय त्याहाप्रती।।५।।

२०१८. नितरूड म्हणती ग्रामाप्रती। पंचक्रोशीमाजी वस्ती।।१।। शिव अनादी ईश्वर। प्रभो मायेचिया पर।।२।। भक्तीस्तव सगुण झाला। प्रेमे रक्षितो भक्ताला।।३।। प्रेमे करिती भजन। करितो त्याहाचे कल्याण।।४।। महारुद्र मारुती। सौख्य देतो भक्ताप्रती।।५।। करितो जगाचे कल्याण। दूर करीतसे विघ्न।।६।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।७।।

२०१९. वाडी म्हणती गळाट्याची। तेथे वस्ती महारुद्राची।।१।। गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।२।। महारुद्राजवळी लिंग। वसे परमात्मा अभंग।।३।। त्याचे पूजन करिती। त्याहाची विघ्ने हो हरती।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय प्रभोप्राप्ती।।५।।

२०२०. आडगाव ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।२।। तेथे वसे महारुद्र। प्रभो अकरावा तो रुद्र।।३।। महारुद्राजवळी लिंग। वसे शिव तो अभंग।।४।। त्याचे करिती नामस्मरण। सकल हरती त्याचे विघ्न।।५।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। फार उद्धरिले प्राणी।।६।।

२०२१. मणुर म्हणती ग्रामाप्रती। पंचक्रोशीमाजी वस्ती।।१।। तेथे वसे मातादेवी। भक्तजनाची ती आई।।२।। शिवलिंग तये ठायी। वसे त्र्यैलोक्यगोसावी।।३।। महारुद्राचे पूजन। करिती प्रेमे भक्तजन।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा तुटे भवभ्रांती।।५।।

२०२२. गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। फेनेचिये उत्तरतीर। चिंचोली नामक नगर।।२।। समीप देवगाव असे। तेथे मारुतीही वसे।।३।। दोही ग्रामी महारुद्र। प्रभू कृपेचा समुद्र।।४।। त्याचे भजन पूजन करिती। शिवलिंगाते स्तविती।।५।। लक्ष्मण म्हणे स्मरा। चुकवितो येरझारा।।६।।

२०२३. आंधापुरी नागडगाव। समीप वसले दोन्ही गाव।।१।। दोन्ही

ग्रामी मारुती। शोभती हो रुद्रमूर्ती।।२।। गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।३।। तेथेचि फेनानदी असे। भक्ता रक्षितो महेश।।४।। लक्ष्मण म्हणे तात। केला भक्ताने अंकित।।५।।

२०२४. पंचक्रोशीमाजी असे। परब्रह्म तो महेश।।१।। प्रभो भक्ताचा कैवारी। अती सदय त्रिपुरारी।।२।। ग्रामा नाम आडगाव। तेथे वसे महादेव।।३।। हनुमान मारुती। शिवावतार कृपामूर्ती।।४।। भक्ता सांभाळी सांभाळी। हीनादीनाते तो पाळी।।५।। लक्ष्मण म्हणे फार। जगा रक्षितो शंकर।।६।।

२०२५. गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। टाकळी हो ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।२।। शिव कृपेचे आगर। भक्तजनांचे माहेर।।३।। आपुलेपण देतो भक्ता। स्मरा स्मरा त्या शाश्वता।।४।। अकरावा रुद्र प्रभो अवतार। करितो कृपा जगावर।।५।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। फार सोडविले प्राणी।।६।।

२०२६. गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। वाडी म्हणती मसल्याची। तेथे प्रभूची हो वस्ती।।२।। नाथ सदय सदय। केवळ भक्ताप्रती माय।।३।। भक्ती प्रिय नाथाप्रती। भक्ता देतो उत्तम गती।।४।। हनुमंत महाबळी। तेथे वसे चंद्रमौळी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२०२७. वांगी म्हणती ग्रामाप्रती। तेथे प्रभूने केली वस्ती।।१।। गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।२।। तेथे शिवलिंग परमात्मा। प्रभो विश्वाचा तो आत्मा।।३।। त्याहाजवळी महारुद्र। शोभे कृपेचा समुद्र।।४।। लक्ष्मण म्हणे त्याचे। नाम घेता दुःख कैचे।।५।।

२०२८. गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। शिरसाळ नामक नगर। फार रम्य आहे पूर।।२।। तेथे वसे महादेव। भक्तकैवारी तो शिव।।३।। त्याचा अवतार मारुती। रक्षीतसे भक्ताप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे शिवा। स्मरा तुटे दुःखगोवा।।५।।

२०२९. गोवर्धन ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। पंचक्रोशी महान क्षेत्र। तेथे वसे तो त्रिनेत्र।।२।। भक्तकैवारी तो हर। त्याचे नाम विश्वंभर।।३।।

तया ग्रामी मारुती। वसतसे रुद्रमूर्ती।।४।। लक्ष्मण म्हणे स्मरा। नामे चुकती येरझारा।।५।।

२०३०. हिवर म्हणती ग्रामाप्रती। तेथे प्रभूने केली वस्ती।।१।। पंचक्रोशी हो माझारी। वसती पवित्र नरनारी।।२।। महारुद्र तेथे वसे। भक्ता कृपाळू तो असे।।३।। करिती त्याचे नामस्मरण। त्याहाचे हरती बा विघ्न।।४।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा भक्तिपंथ धरा।।५।।

२०३१. पंचक्रोशीमाजी वसे। शिव दयाळू असे।।१।। तेथे वसे कौडगाव। महान उत्तम आहे गाव।।२।। तया ग्रामी मारुती। वसतसे रुद्रमूर्ती।।३।। त्याचे करिती पूजन। त्याहाचे होतसे कल्याण।।४।। लक्ष्मण म्हणे देव। परब्रह्म महादेव।।५।।

२०३२. ममदापूर नाम ग्रामा। तेथे वास सर्वोत्तमा।।१।। पंचक्रोशीमाजी वसे। महालिंग तेथे असे।।२।। तया ग्रामी मारुती। शोभतसे रुद्रमूर्ती।।३।। त्याचे करिती पूजन। प्राणी होती ते पावन।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ता-। पाशी वसे तो हो ज्ञाता।।५।।

२०३३. पंचक्रोशीमाजी वस्ती। कसारवाडी तीते म्हणती।।१।। शिव अनादी अनादी। अती सदय कृपानिधी।।२।। भक्तीस्तव तो साकार। जाहलासे विश्वंभर।।३।। मारुती प्रभू-अवतार। भक्त तारिले अपार।।४।। लक्ष्मण म्हणे तात। केला भक्ताने अंकित।।५।।

२०३४. नाकलगाव ग्रामा म्हणती। तेथे केली प्रभोने वस्ती।।१।। गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।२।। तेथे वसे सदाशिव। ज्योतिर्लिंग महादेव।।३।। तेथे वसे महारुद्र। प्रभो अकरावा तो रुद्र।।४।। त्याचे करिती पूजन। प्राणी होती ते पावन।।५।। लक्ष्मण म्हणे त्याचे। नाम घेता दुःख कैचे।।६।।

२०३५. गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। नाथर म्हणती ग्रामाप्रती। तेथे केली प्रभोने वस्ती।।२।। शिव आहे दयाघन। केवळ कृपेचे सदन।।३।। त्याचा अवतार मारुती। रक्षीतसे भक्ताप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।५।।

२०३६. धन्य धन्य गोदावरी। तीते स्तविती ब्रह्मचारी।।१।। अमर

इच्छिती तिचे स्नान। माता भक्ताचे जीवन।।२।। तिचे दक्षिण हो प्रांती। डिघोळ नामे आहे वस्ती।।३।। परमात्मा सदाशिव। वसतसे महादेव।।४।। करितो पतिता पावन। नामस्मरणे हरती विघ्न।।५।। प्रेमे पूजन करिती। अती सौख्य ते भोगिती।।६।। मारुती प्रभू-अवतार। रक्षीतसे भक्ता फार।।७।। लक्ष्मण म्हणे भक्ता। फार सांभाळी तो ज्ञाता।।८।।

२०३७. सोनखेड ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। पंचक्रोशी हो माझारी। गोदेचिये दक्षिणतीरी।।२।। तेथे शिवलिंग परमात्मा। प्रभो विश्वाचा तो आत्मा।।३।। त्या ग्रामी मारुती। वसतसे रुद्रमूर्ती।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते। स्मरा हरी भवदुःखाते।।५।।

२०३८. गोदेचिये दक्षिणतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। सोनपेठ ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।२।। नगरेश्वर लिंगा म्हणती। धन्य धन्य तो पशुपती।।३।। केवळ परमात्मा ईश्वर। भक्तजनास्तव साकार।।४।। तेथे वसे तो श्रीराम। भक्तसखा सर्वोत्तम।।५।। व्यंकटेश विठ्ठलमूर्ती। वसताती कृपामूर्ती।।६।। लिंगे वस्ती ठायी ठायी। महिमा प्रभूचा अक्षयी।।७।। दत्तात्रेयाचे ते स्थान। पवित्र आहे ते भुवन।।८।। महारुद्र मारुती। वसताती रुद्रमूर्ती।।९।। देवी वसती अनेक देव। धन्य प्रभोचे वैभव।।१०।। अनेकी एकला आपण। वसून प्रभू तो निर्गुण।।११।। तेथे सिद्धांचे ते मठ। वसताती महान श्रेष्ठ।।१२।। गंगादेवी धन्य माता। पावन करी ती पतिता।।१३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय मातेप्रती।।१४।।

उत्तरतटी पंचक्रोशीचे अभंग

२०३९. विहा मांडव ग्रामा म्हणती। फार उत्तम आहे वस्ती।।१।। येथे शिवलिंगे वसती। भक्त भावे त्या पुजिती।।२।। शिव अनादी अनादी। प्रभो कृपेचा तो अब्धी।।३।। पुराणपुरुष त्याते म्हणती। श्रुती प्रेमयुक्त गाती।।४।। मारुती प्रभू-अवतार। भक्तजनांचे माहेर।।५।। त्याहाचे भजन करिती। त्याहा होय प्रभुप्राप्ती।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा तुटे भवभ्रांती।।७।।

२०४०. ग्रामा नाम ते चौंडाळ। फार रम्य आहे स्थळ।।१।। तेथे देवी जगन्माता। पावन करी ती पतिता।।२।। करी ती भक्तांचे कल्याण। माता कृपेचे सदन।।३।। शिवलिंग तेथे वसे। शिव दयाळू महेश।।४।। मारुती तो

भक्ताप्रती। रक्षीतसे कृपामूर्ती।।५।। लक्ष्मण म्हणे स्मरा। नका गुंतू या संसारा।।६।।

२०४१. ग्राम आहे ते सुंदर। त्याते म्हणती नांदूर।।१।। वाडीजवळी ते वसे। प्रभू भक्तापाशी वसे।।२।। शिवलिंग उभयग्रामी। भक्त पुजिती नित्य नेमी।।३।। करिती भक्ती ते प्रवीण। त्याहाचे होतसे कल्याण।।४।। महारुद्र हो मारुती। दोही ग्रामी त्याच्या मूर्ती।।५।। करितो भक्ताचे कल्याण। हरितो जगाचे ते विघ्न।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।७।।

२०४२. ग्रामा नाम टाक हून गाव। पृथक् वसले दोन्ही गाव।।१।। दोन्ही ग्रामी वसती लिंग। शिव परमात्मा निःसंग।।२।। त्याते भक्ती फार प्रिय। शिव आहे तो सदय।।३।। त्याचा अवतार महारुद्र। आहे दयेचा समुद्र।।४।। दोन्ही गावी तो मारुती। पुजिता कार्य त्याचे होती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२०४३. ग्रामा नाम शहापूर। तेथे वसे गंगाधर।।१।। महारुद्राजवळी शिव। प्रेमे वसे महादेव।।२।। त्याचा अवतार मारुती। सांभाळितो भक्ताप्रती।।३।। जगपीडा दूर करी। भक्तजनाते उद्धरी।।४।। भक्ती प्रिय प्रभूप्रती। ठायी ठायी केली वस्ती।।५।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा मिथ्या हा पसारा।।६।।

२०४४. दाढेगाव ग्रामा म्हणती। नदीतीरी आहे वस्ती।।१।। शिव कृपेचे आगर। करावया जगदुद्धार।।२।। ग्रामोग्रामी त्याची वस्ती। वसतसे सर्वांभूती।।३।। मायागुणे क्रीडा करी। हीनादीनाते उद्धरी।।४।। महारुद्र तो मारुती। रक्षीतसे भक्ताप्रती।।५।। शिव-आज्ञे वर्ततसे। जगा सौख्य देत असे।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।७।।

२०४५. रुईमध्ये तो शंकर। वसतसे विश्वंभर।।१।। करावया जगदुद्धार। प्रभो झालासे साकार।।२।। सगुण निर्गुण आपण। शिव स्वानंदजीवन।।३।। त्याते फार प्रिय भक्ती। तारीतसे जगाप्रती।।४।। मारुती तो दयाघन। रुद्रावतार सगुण।।५।। लक्ष्मण म्हणे जगा। सांभाळितो प्रभू तो गा।।६।।

२०४६. भराडी ग्राम म्हणती लोक। तेथे वसे तो त्र्यंबक।।१।। त्र्यंबक जगाचे जीवन। त्र्यंबक सुखाचे सदन।।२।। त्याचा अवतार हनुमान। प्रभू

पतितपावन।।३।। त्याचे पूजन करिती। भजन प्रेमयुक्त करिती।।४।। मारुतीपाशी वसे लिंग। शिव स्वानंदी निमग्न।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। प्रिय फार प्रभूप्रती।।६।।

२०४७. ग्रामा नाम तीर्थपुरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। धन्य धन्य गोदावरी। तिची वर्णवेना थोरी।।२।। तिचे स्नाने जग उद्धरती। नामस्मरणे पावन होती।।३।। अविद्येचा संग थोर। महान मोह अनिवार।।४।। यास्तव महान हे साधन। गंगास्नान नामस्मरण।।५।। तीर्थपुरीमध्ये शिव। वसे दत्तात्रेय महादेव।।६।। महारुद्र हा मारुती। वसतसे कृपामूर्ती।।७।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।८।।

२०४८. आरगडगव्हाण त्याते म्हणती। पंचक्रोशीमाजी वस्ती।।१।। धन्य धन्य पंचक्रोशी। गंगा तारी ती जगासी।।२।। तेथे शंकर भक्तीस्तव। शिवलिंग महादेव।।३।। तेथे वसे तो बलभीम। मारुती हे त्याचे नाम।।४।। भक्तावरी कृपा करितो। स्मरा स्मरा सौख्य देतो।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय प्रभुप्राप्ती।।६।।

२०४९. खालापुरी ग्राम म्हणती। पंचक्रोशीमाजी वस्ती।।१।। तेथे प्रभू तो शंकर। भक्तसखा गंगाधर।।२।। त्याते स्तविती पुजिती। सुखा पात्र ते हो होती।।३।। लिंग कृपेचे सदन। भक्तास्तव तो सगुण।।४।। त्याचा अवतार मारुती। सांभाळितो दयामूर्ती।।५।। त्याचे पूजन करिती। त्याहा होय सुखप्राप्ती।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार होय प्रभोप्राप्ती।।७।।

२०५०. ग्रामा नाम हो खडक। तेथे वसे तो त्र्यंबक।।१।। शिवप्रभू कृपाघन। करितो भक्तांचे कल्याण।।२।। महारुद्राजवळी लिंग। भक्ता करितो नि:संग।।३।। भक्तजनांचा कैवारी। पतितपावन त्रिपुरारी।।४।। महारुद्र तो मारुती। त्याचा अवतार कृपामूर्ती।।५।। दीनानाथ दयाघन। करितो भक्तांचे कल्याण।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।७।।

२०५१. बोडखं हो ग्रामा नाम। तेथे शिव तो सर्वोत्तम।।१।। सदासर्वदा संतुष्ट। त्याते म्हणती नीलकंठ।।२।। भक्तास्तव विष प्याला। देवा सांभाळिता झाला।।३।। भक्तास्तव तो सगुण। महाराज कृपाघन।।४।। महारुद्राजवळी लिंग। भक्ता करितो नि:संग।।५।। त्याचा अवतार महारुद्र। प्रभो दयेचा

समुद्र।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ता। सांभाळितो प्रभू ज्ञाता।।७।।

२०५२. ग्रामा नाम हो लिंबोली। पुरी बरवी ती शोभली।।१।। तेथे वसे महादेव। पुरातन सदाशिव।।२।। त्यापासूनि मारुती। अवतरला रुद्रमूर्ती।।३।। जगा पावन करीतसे। विघ्न त्याचे हरीतसे।।४।। फार दया प्रभोपाशी। सांभाळितो हो भक्तासी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा तुटे भवभ्रांती।।६।।

२०५३. पिंपळगावी महारुद्र। वसे अकरावा तो रुद्र।।१।। त्याते मारुती हे नाम। भक्तसखा सर्वोत्तम।।२।। तेथे श्रीरामाच्या मूर्ती। गजाननही वसती।।३।। तेथे आहे शिवलिंग। प्रभू शिव तो नि:संग।।४।। पंचक्रोशीमाजी ग्राम। प्रभू स्तवा सर्वोत्तम।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।६।।

२०५४. ग्रामा नाम आहे मूर्ती। तेथे शिवलिंगमूर्ती।।१।। भक्त करिती पूजन। प्रेमे करिती स्तवनं।।२।। प्रेमे शिव शिव वदती। त्याते होय उत्तम गती।।३।। शिव भक्ताचा साह्यकारी। आले संकट निवारी।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा तुटे भवभ्रांती।।५।।

२०५५. धन्य धन्य पंचक्रोशी। लिंबी म्हणती ग्रामासी।।१।। पंचक्रोशीमाजी पुरी। गंगा दीनाते उद्धरी।।२।। महारुद्र दयाघन। केवळ स्वानंदाचे सदन।।३।। सदाशिव जगद्गुरू। भक्तजनाप्रती तारू।।४।। महारुद्राजवळी लिंग। शिव अक्षयी नि:संग।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय प्रभुप्राप्ती।।६।।

२०५६. ग्रामा नाम हो भडाळ। तेथे वसे जाश्वनीळ।।१।। शिव दयाळू तो फार। प्रभू कृपेचे आगर।।२।। जगावरी उपकार। केला प्रभूने हो फार।।३।। महारुद्र तो मारुती। ग्रामोग्रामी त्याच्या मूर्ती।।४।। भय विघ्न तो निवारी। भक्तजनाते उद्धरी।।५।। शिवावतार बलभीम। भक्ता देतो सुखधाम।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।७।।

२०५७. देवी विश्वाची जननी। केवळ माता ब्रह्मायनी।।१।। असंख्य ब्रह्मांडे उभवी। क्षणामाजी ती लपवी।।२।। न कळे मातेचे वैभव। ऋषी मुनी स्तविती देव।।३।। भक्तीस्तव देहगावी। बैसलीसे अंबादेवी।।४।। करी ती जगाचे कल्याण। भक्ता देई सौख्य पूर्ण।।५।। तेथे वसतसे रुद्र। अकरावा तो महारुद्र।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।७।।

२०५८. ग्रामा नाम हो कोटाळ। तेथे वसे जाश्वनीळ।।१।। निरामय तो

दयाळ। केवळ प्रभू तो अचळ।।२।। जगा पावन करावे। भक्तजना सांभाळावे।।३।। यास्तव लीला करी हर। मायागुणे साह्यकर।।४।। त्याचा अवतार हनुमान। ग्रामोग्रामी तो सगुण।।५।। तेथे पार्श्वनाथ सिद्ध। भक्ता करीतसे बोध।।६।। लक्ष्मण म्हणे तात। पावन करितो पतित।।७।।

२०५९. ग्रामा नाम संकनपुरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। तेथे शंकर तो वसे। पतितपावन तो असे।।२।। त्याचा अवतार महारुद्र। आहे कृपेचा समुद्र।।३।। भजन पूजन करिती। विघ्ने तयांची हरती।।४।। त्याते आहे भक्ती प्रिय। प्रभू आहे तो सदय।।५।। लक्ष्मण म्हणे तात। फार तारितो पतित।।६।।

२०६०. धामणगावी शिवलिंग। आहे केवळ नि:संग।।१।। तेथे वसे मायादेवी। जिचे वैभव अक्षयी।।२।। माता भक्ताचे कल्याण। करी ती सुखाचे सदन।।३।। नित्य होतो जयजयकार। माता आनंदाचे घर।।४।। लक्ष्मण म्हणे ज्ञाते। प्रेमे स्तविती मातेते।।५।।

२०६१. ग्रामा नाम महातगाव। तेथे वसे सदाशिव।।१।। लिंग पुजिती स्तविती। त्याहा होय उत्तम गती।।२।। शिव कल्याणाचे घर। भक्तजनांचे माहेर।।३।। भक्तास्तव साकारला। मायागुणे करितो लीला।।४।। त्याते प्रिय आहे भक्ती। त्याची हातगावी वस्ती।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। अनादी तो महादेव।।६।।

२०६२. ढोनवाडी ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। भक्ती प्रिय त्या शंकरा। प्रभू भक्तांचा सोयरा।।२।। त्याचे करिती पूजन। फार होती ते पावन।।३।। त्याचे करिती नामस्मरण। त्याहाचे हरती जन्ममरण।।४।। त्याचा अवतार मारुती। सांभाळितो जगाप्रती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।६।।

२०६३. ग्रामा नाम आसनगाव। तेथे वसे सदाशिव।।१।। शिवलिंग दयाघन। परब्रह्म ते सर्वज्ञ।।२।। कामांतक त्याते म्हणती। त्याचा अवतार मारुती।।३।। करितो विघ्नांची हो शांती। तारीतसे जगाप्रती।।४।। त्याचे पूजन करावे। प्रेमयुक्त नाम घ्यावे।।५।। लक्ष्मण म्हणे त्वरा। प्रेमे भक्तिपंथ धरा।।६।।

२०६४. पंचक्रोशी हो माझारी। जांबनामक आहे पुरी।।१।। ग्रामा नाम जांब झाले। उत्तम लोक तेथे राहिले।।२।। तेथे मारुती–अवतार। झाला तो हो विश्वंभर।।३।। परोपकारी ब्रह्मचारी। किती वर्णावी हो थोरी।।४।। भक्ती ज्ञान ते वैराग्य। प्रभूचे अक्षयी ते भाग्य।।५।। तेथे श्रीरामाच्या मूर्ती। वसती आनंद भक्ताप्रती।।६।। प्रभोपाशी आनंद थोर। सदा होतो जयजयकार।।७।। तेथे शिवलिंगेही वसती। भक्त प्रेमे हो पुजिती।।८।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय प्रभुप्राप्ती।।९।।

२०६५. ग्रामा नाम हो सातार। तेथे रुद्र तो परमेश्वर।।१।। शिवलिंग तेथेचि वसे। केवळ परमात्मा महेश।।२।। त्याचे पूजन करिती। त्याहा देतो उत्तम गती।।३।। करितो भक्तांचे कल्याण। प्रभो आहे दयाघन।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। प्रिय आहे प्रभूप्रती।।५।।

२०६६. ग्रामा नाम वाहेगाव। तेथे वसे सदाशिव।।१।। महारुद्राजवळी लिंग। शिव आहे तो निःसंग।।२।। त्याचे दर्शने होय गती। देव त्याते हो स्तविती।।३।। शिव अनादी अनादी। सर्ववंद्य कृपानिधी।।४।। त्याचे भजन पूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।६।।

२०६७. ग्रामा नाम हो पोखरी। तेथे वसे त्रिपुरारी।।१।। लिंग आहे आनंदभरित। अती सदय उमाकांत।।२।। लिंगपूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।३।। प्रेमे करिती शिवपूजन। त्याहा देतो आपुलेपण।।४।। त्याचा अवतार मारुती। ग्रामोग्रामी रुद्रमूर्ती।।५।। लक्ष्मण म्हणे शिव। आहे अनादी तो देव।।६।।

२०६८. पाटवद ग्रामा नाव। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। शिवलिंग आनंदभरित। महाराज उमाकांत।।२।। त्याचे पूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।३।। भजन करिती प्रेमयुक्त। सुख देतो त्या शाश्वत।।४।। पतितपावन शंकर। आहे कल्याणाचे घर।।५।। शिवभजने तरले फार। शिव अनादी ईश्वर।।६।। त्याचे देणे सर्वाप्रती। त्याचा अवतार मारुती।।७।। लक्ष्मण हीन दीन। करितो प्रभूचे भजन।।८।।

२०६९. ग्रामा नाव ठेविले माव। तेथे वसे महादेव।।१।। शिवलिंग

जगदीश्वर। भक्तजनांचे माहेर।।२।। पूजन भजन करिती। त्याहा देतो उत्तम गती।।३।। त्याचा अंश मल्हारी। वसतसे ते नगरी।।४।। करितो भक्तांचे कल्याण। हरीतसे महाविघ्न।।५।। शिवावतार मारुती। वसतसे रुद्रमूर्ती।।६।। करितो जगाचे कल्याण। महाराज कृपाघन।।७।। ग्रामोग्रामी त्याची वस्ती। सौख्य देतो भक्ताप्रती।।८।। लक्ष्मण हीन दीन। करितो प्रभूचे भजन।।९।।

२०७०. श्रीष्टीमध्ये सोमेश्वर। प्रभो वसे गंगाधर।।१।। करावया जगदुद्धार। प्रभो झाला साह्यकर।।२।। त्याचे पूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।३।। भवविपत्ती दूर करी। भक्ता साह्य त्रिपुरारी।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा वश तो पशुपती।।५।।

२०७१. श्रीष्टीमध्ये परमेश्वर। वसतसे सर्वेश्वर।।१।। करावे भक्ताचे कल्याण। म्हणूनि प्रभू तो सगुण।।२।। त्याचे पूजन करिती। स्तवन प्रेमयुक्त करिती।।३।। त्याहांचे हरीतसे विघ्न। भक्तसखा पंचानन।।४।। त्याते भक्ती प्रिय आहे। सदय तो निरामय।।५।। लक्ष्मण म्हणे स्तवा। तोडी जन्ममरण गोवा।।६।।

२०७२. श्रीष्टीमध्ये मायादेवी। तिचे वैभव अक्षयी।।१।। कोकाबाई तीते म्हणती। भक्त प्रेमे तीते गाती।।२।। करी ती भक्तांचे कल्याण। अनेक हरिते ती विघ्न।।३।। तेथेचि तुळजापूरवासिनी। माता शोभे ती भवानी।।४।। तिचे करिती पूजन। माता करी ती कल्याण।।५।। रुद्र-अवतार मारुती। शोभतसे कृपामूर्ती।।६।। लक्ष्मण म्हणे हीन दीन। करितो प्रभूचे भजन।।७।।

२०७३. ग्रामा नाम सुरुम गाव। तेथे वसे महादेव।।१।। त्याचे नाम सुरमेश्वर। प्रभो भक्तांचे माहेर।।२।। तेथे वसे हो मारुती। सांभाळितो भक्ताप्रती।।३।। शिवपूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।४।। प्रभुभक्ती करा करा। नका गुंतू या संसारा।।५।। भक्ती प्रिय प्रभूप्रती। न पाहे तो उत्तम याती।।६।। लक्ष्मण म्हणे तात। शिव स्वानंदभरित।।७।।

२०७४. नंदिनीतटी आशापूर। अरिष्टसेनाचे नगर।।१।। तेथे लिंग खंडेश्वर। सन्निध वसे रामेश्वर।।२।। लिंग बापा हे जुनाट। सिद्धेश्वर प्रभो श्रेष्ठ।।३।। तेथे यात्रा येती फार। करिती नामाचा गजर।।४।। सिद्धाचे ते स्थान श्रेष्ठ। योगी वसती तेथे वरिष्ठ।।५।। तेथे श्रीरामही वसे। नरसिंहमूर्ती तेथे असे।।६।।

विठ्ठलमूर्ती पांडुरंग। तेथे देवी ती अभंग।।७।। अनेक वसती गजानन। महारुद्र कृपाघन।।८।। ठायी ठायी त्या वसया। श्रावक जाती जीनालया।।९।। कादर बादशा अवलिया। निर्गुणभक्ती प्रिय जया।।१०।। लक्ष्मण विनवी देवा। माझा सांभाळ करावा।।११।।

२०७५. जवळ्यामध्ये महादेव। आदि अनादी तो शिव।।१।। कृपा वसे प्रभोपाशी। पावन करितो दीनासी।।२।। त्याचे भजन पूजन करिती। त्याते देतो उत्तम गती।।३।। महारुद्र प्रभोजवळी। भक्तजनाते सांभाळी।।४।। पंचक्रोशी हो माझारी। शोभतसे उत्तम पुरी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभूप्रती।।६।।

२०७६. पंचक्रोशी हो पवित्र। नंदिनीतीर ते हो क्षेत्र।।१।। ग्रामा नाम आनंदगाव। तेथे वसे महादेव।।२।। महारुद्र तो मारुती। रक्षीतसे भक्ताप्रती।।३।। पूजन करिती जे प्राणी। प्रभो रक्षी त्यालागूनि।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय मातेप्रती।।५।।

२०७७. पंचक्रोशी हो माझारी। पळसी नामक आहे पुरी।।१।। नंदिनीतीरी हो ती पुरी। तेथे लिंग त्रिपुरारी।।२।। त्याहाजवळी मारुती। शोभतसे कृपामूर्ती।।३।। त्याचे पूजन करिती। भजने फार उद्धरती।।४।। लक्ष्मण म्हणे त्वरा। करा नाम ते उच्चारा।।५।।

२०७८. कारलेश्वर कारळ्यात। प्रभो बैसला निवांत।।१।। भक्तसखा तो शंकर। आहे कल्याणाचे घर।।२।। त्याचे पूजन करिती। त्याची हरे हो विपत्ती।।३।। शिव दयाळू तो फार। करितो दीनांचा उद्धार।।४।। तेथेचि महारुद्र वसे। जगा पावन करीतसे।।५।। लक्ष्मणा तो बोलवी। निजभक्ता दावी सोयी।।६।।

२०७९. लिंगस नाम त्या ग्रामाचे। स्थळ आहे ते शिवाचे।।१।। लिंग आहे सर्वेश्वर। निजभक्तांचे माहेर।।२।। लिंगे वसती ठायी ठायी। शिव त्रिभुवनगोसावी।।३।। करितो भक्तांचे कल्याण। भक्ता देतो आपुलेपण।।४।। तेथे मातादेवी वसे। भक्तजना रक्षीतसे।।५।। त्याचे पूजन करिती। त्याते होय उत्तम गती।।६।। लक्ष्मण म्हणे बिल्व-। दले पुजा महादेव।।७।।

२०८०. गोदेचिये उत्तरतीरी। काशीनामक आहे पुरी।।१।। तेथे

सिद्धेश्वरलिंग। शिव अक्षयी नि:संग।।२।। करितो कल्याण भक्तांचे। मनोरथ पुरवितो त्यांचे।।३।। तेथेचि वसे महारुद्र। प्रभो अकरावा तो रुद्र।।४।। फार दोषी उद्धरिले। चरणापाशी हो स्थापिले।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय प्रभोप्राप्ती।।६।।

२०८१. पाथरगव्हान ग्रामा म्हणती। बरवी दिसत असे वसती।।१।। तेथे शिव जगदीश्वर। दयाघन विश्वंभर।।२।। पतितपावन नाम त्याचे। शिव घर कल्याणाचे।।३।। त्याचा अवतार मारुती। शोभतसे कृपामूर्ती।।४।। भक्तजनाचा कैवारी। महादु:ख तो निवारी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२०८२. ग्रामा नाम फुलवाडी। शिव बंधन तो तोडी।।१।। शिवलिंग पुरातन। नित्य नवा पंचानन।।२।। परोपकारास्तव हर। सगुण झाला गंगाधर।।३।। त्याचे नाम घेता वाचे। पातक जळती जन्माचे।।४।। प्रभो देतो उत्तम गती। महाराज कृपामूर्ती।।५।। त्याचा अवतार मारुती। सांभाळितो जगाप्रती।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।७।।

२०८३. ग्रामा नाम राहेगव्हाण। तेथेही मारुतीचे स्थान।।१।। तेथे शिवलिंग वसे। भक्ती प्रिय त्याहा असे।।२।। मारुती शिवाचा अवतार। भक्ती करा हो निर्घोर।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। सुख देतो कृपामूर्ती।।४।।

२०८४. ब्राह्मणवाडी ग्रामा नाम। तेथे शिव तो सर्वोत्तम।।१।। शिव अक्षयी विजयी। भक्तजना ठेवी पायी।।२।। त्याचा अवतार मारुती। शोभतसे रुद्रमूर्ती।।३।। त्याचे करिती पूजन। त्याचे करितो कल्याण।।४।। तुळजापूरवासिनी देवी। वसतसे तये ठायी।।५।। तिचे करिती पूजन। माता करी ती कल्याण।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।७।।

२०८५. आकोलीत हा मारुती। तेथेचि मल्हारीची मूर्ती।।१।। खंडेराव दयाघन। करितो भक्ताचे कल्याण।।२।। भक्त करिती पूजन। प्रेमे करिती नामस्मरण।।३।। यात्रा भरे ती प्रभोपाशी। भक्त येती दर्शनासी।।४।। भक्ती प्रिय हो प्रभोला। सांभाळीतसे भक्ताला।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त। त्याते स्तविती प्रेमयुक्त।।६।।

२०८६. पिंपरीमध्ये महादेव। वसे परमात्मा तो शिव।।१।। त्याचा

अवतार मारुती। तेथेचि प्रभोने केली वसती।।२।। शिवनाम घेता वाचे। करितो कल्याण भक्ताचे।।३।। शिव अनादी तो असे। जगी भरला तो जगदीश।।४।। भुक्ती मुक्ती तो देतसे। भक्ता पायी ठेवीतसे।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२०८७. टाकळीमध्ये महादेव। वसे विश्वात्मा तो शिव।।१।। त्याचा अवतार मारुती। अती प्रिय शिवाप्रती।।२।। तेथेचि राहिला शंकर। धन्य धन्य तो गंगाधर।।३।। जातिकूळ तो पाहिना। उद्धरितो हीनादीना।।४।। त्याचे करा हो पूजन। प्रेमे करा नामस्मरण।।५।। लक्ष्मण म्हणे कल्याण। करितो श्रेष्ठ उमारमण।।६।।

२०८८. ग्रामा नाम बोरगाव। तेथे परमात्मा तो शिव।।१।। लिंग आहे तये स्थानी। शिव भक्ताची जननी।।२।। त्याचे करिती पूजन। त्याहाचे होतसे कल्याण।।३।। त्याचा अवतार महारुद्र। आहे अकरावा हा रुद्र।।४।। तया ग्रामी मारुती। वसतसे कृपामूर्ती।।५।। त्याचे करिती पूजन। त्याहाचे होतसे कल्याण।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।७।।

२०८९. डासाळ हो ग्रामा नाम। तेथे शिव तो सर्वोत्तम।।१।। लिंग आहे सुप्रसन्न। करितो भक्ताचे कल्याण।।२।। देवी वसे तये ठायी। माता जगाची ती आई।।३।। महारुद्र हा मारुती। शिव अवतार कृपामूर्ती।।४।। भजनपूजन होतसे। प्रभो कल्याण करीतसे।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२०९०. ग्रामा नाम देऊळगाव। तेथे परमात्मा तो शिव।।१।। लिंगा नाम सोमेश्वर। अती दयाळू शंकर।।२।। आपुलेपण देतो भक्ता। भक्ती प्रिय उमाकांता।।३।। जातिकूळ न देखे हर। भक्ता वश विश्वंभर।।४।। देवी देव तेथे वसती। प्रभो शोभतो मारुती।।५।। प्रभोचे भजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। प्रिय असे प्रभोप्रती।।७।।

२०९१. गोदेचिये उत्तरतीरी। पिंपरी नामक असे पुरी।।१।। पंचक्रोशीमध्ये महेश। शिवलिंग तेथे वसे।।२।। प्रभोचे पूजन करिती। त्याहा होय ब्रह्मप्राप्ती।।३।। मारुती हा अवतार। रुद्र अकरावा तो थोर।।४।। करितो भक्ताचे कल्याण। विघ्न हरितो दारुण।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार

प्रिय प्रभोप्रती।।६।।

२०९२. ग्रामा नाम ते नांदर। तेथे परमात्मा शंकर।।१।। त्याचे भजन पूजन करिती। त्याते देतो उत्तम गती।।२।। तेथे वसे तो भैरव। वसे महारुद्र देव।।३।। भक्तसखे ते दयाळ। करिती दीनाचा सांभाळ।।४।। भैरव शिवा अती प्रिय। शिव आहे निरामय।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभोप्रती।।६।।

२०९३. ग्रामा नाम डोंगरगाव। तेथे वसे महादेव।।१।। रुद्र–अवतार मारुती। वसतसे कृपामूर्ती।।२।। करितो भक्ताचे कल्याण। प्रेमे करावे पूजन।।३।। प्रभो विघ्नाते संहारी। भक्तावरी कृपा करी।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा देतो उत्तम गती।।५।।

२०९४. वरखेड ग्राम म्हणती। गोदेचिये उत्तरप्रांती।।१।। तेथे शिवलिंग वसे। महारुद्रापाशी असे।।२।। शिव अवतार मारुती। रक्षीतसे भक्ताप्रती।।३।। त्याचे भजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।४।। परोपकारास्तव हर। सगुण झाला गंगाधर।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२०९५. गोदेचिये उत्तरतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। तेथे वसले हातगाव। तेथे आहे तो महादेव।।२।। वैराग्याचा मुकुटमणी। त्याची न कळे करणी।।३।। करितो भक्ताचे कल्याण। भक्ता देतो आपुलेपण।।४।। कामिकाते द्रव्यसंपत्ती। वैभव देतो जगाप्रती।।५।। निष्कामाते चरणी ठेवी। सेवा घेतसे अक्षयी।।६।। शिवनाम घेती वाचे। मनोरथ पुरती हो त्याचे।।७।। शिव भाविकाचा सखा। आहे सत्य पाठिराखा।।८।। जातिकूळ तो पाहेना। भक्ती प्रिय पंचानना।।९।। लक्ष्मण हीन दीन। करितो प्रभोचे भजन।।१०।।

२०९६. पंचक्रोशी हो माझारी। वडी नामक आहे पुरी।।१।। तेथे परमात्मा शंकर। वसतसे विश्वंभर।।२।। लिंग स्वानंदभरित। महाराज उमाकांत।।३।। करितो भक्ताचे कल्याण। अती दयाळू त्रिनयन।।४।। करितो जगाचा उद्धार। अती दयाळू शंकर।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२०९७. पंचक्रोशी हो माझारी। सारुळ नामक आहे पुरी।।१।। महारुद्राजवळी शिव। वसे प्रभो महादेव।।२।। मारुती शिवाचा अवतार। कृपा करितो जगावर।।३।। भजन पूजन करिती। त्याते देतो उत्तम गती।।४।।

लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।५।।

२०९८. ग्रामा नाम रेनाखळी। प्रभो वसे चंद्रमौळी।।१।। शिव अनादी अनादी। भक्तजना कृपानिधी।।२।। देवी माता तेथे वसे। जगतारिणी ती असे।।३।। तेथे महारुद्र अवतार। शोभतसे विश्वंभर।।४।। अहो जगाचे कल्याणा। नाना रूपे धरिली जाणा।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२०९९. झरी नामक आहे ग्राम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। मायागुणे करितो लीला। आपण निजानंदे धाला।।२।। एकपणा न होता तुटी। झाल्या ब्रह्मांडाच्या कोटी।।३।। त्याचे वैभव अपार। कोण जाणे त्याचा पार।।४।। त्याचा अवतार मारुती। सांभाळितो जगाप्रती।।५।। लक्ष्मण म्हणे हर। आहे अनादी ईश्वर।।६।।

२१००. ग्रामा नाम ते गव्हान। तेथे वसे पंचानन।।१।। त्याचा अवतार मारुती। सांभाळितो भक्ताप्रती।।२।। भक्तास्तव सगुण झाला। रक्षीतसे तो भक्ताला।।३।। अनेक लीला करितो हर। त्याचे नाम विश्वंभर।।४।। त्याचे नाम घेती प्राणी। तेही जाती उद्धरूनि।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२१०१. पंचक्रोशी हो माझारी। हौसी नामक वसे पुरी।।१।। तेथे हरिभक्त वसती। प्रेमयुक्त भजन करिती।।२।। तेथे महारुद्राजवळी। प्रेमे वसे चंद्रमौळी।।३।। भक्त करिती पूजन। प्रेमे करिती नामस्मरण।।४।। भक्ती प्रिय प्रभोप्रती। भक्तास्वाधीन पशुपती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। आहे ज्ञानाची संपत्ती।।६।।

२१०२. ग्रामा नाम धामणगाव। तेथे वसे सदाशिव।।१।। शिव अनादी ईश्वर। केवळ स्वानंदाचे घर।।२।। करितो भक्ताचे कल्याण। भक्ता देतो आपुलेपण।।३।। पंचक्रोशी हो माझारी। वसे तो हो त्रिपुरारी।।४।। महारुद्र प्रभो अवतार। भक्तजनाचे माहेर।।५।। भजन पूजन करिती। त्याहा देतो उत्तम गती।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।७।।

२१०३. पंचक्रोशी उत्तरतीरी। किनुळ नामक ती पुरी।।१।। तेथे वसे महारुद्र। प्रभो अकरावा तो रुद्र।।२।। त्याहाजवळी शिवलिंग। वसे परमात्मा

अभंग।।३।। त्याचे भजन पूजन करिती। त्याते देतो उत्तम गती।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। प्रिय आहे प्रभोप्रती।।५।।

२१०४. खेरड्यामध्ये शिवलिंग। वसे स्वानंदाचा कंद।।१।। शिवभजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।२।। पूजन करिती सुख भोगिती। दर्शनाने पावन होती।।३।। मारुतीजवळी लिंग असे। सर्ववंद्य तो महेश।।४।। मारुती शिवाचा अवतार। करावया परोपकार।।५।। त्याचे पूजन करिती। विघ्न त्याहाचे हरती।।६।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करिता देतो उत्तम गती।।७।।

२१०५. पंचक्रोशी हो माझारी। गोदेचिये उत्तरतीरी।।१।। पाथरी नामक नगर। महान श्रेष्ठ आहे पूर।।२।। रामचंद्राचे मंदिर। व्यंकटेश लक्ष्मीवर।।३।। विठ्ठल वसे तो श्रीरंग। सदासर्वदा निःसंग।।४।। विघ्नहराचे मंदिर। विघ्नहर्ता तो निर्घोर।।५।। शिवलिंगे ठायी ठायी। महामाया तेथे देवी।।६।। तेथे वसे महारुद्र। प्रभो कृपेचा समुद्र।।७।। वसती सिद्धांचे ते मठ। अवलिया तेथे श्रेष्ठ।।८।। लक्ष्मण म्हणे थोर। महिमा प्रभोचा अपार।।९।।

२१०६. मानवत ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। शिव अनादी अनादी। त्याची न मोडे समाधी।।२।। लिंगा नाम अमरेश्वर। तेथेचि वसे चेनेश्वर।।३।। त्याची वसती सर्वाठायी। लिप्त प्रभो कोठे नाही।।४।। लक्ष्मण म्हणे हीन। केले प्रभूने पावन।।५।।

२१०७. गोदेचिये उत्तरप्रांत। तेथे वसे मानवत।।१।। पंचक्रोशी हो माझारी। फार रम्य ती हो पुरी।।२।। तेथे वसे मातादेवी। तिचे वैभव अक्षयी।।३।। माता भक्ता प्रतिपाळी। अती प्रेमे त्या सांभाळी।।४।। तेथेचि मारुती शोभती। महारुद्राच्या त्या मूर्ती।।५।। तेथेचि वसती गजानन। भक्ता होती ते प्रसन्न।।६।। तेथेचि सिद्धांचे ते मठ। सिद्ध वसती तेथे श्रेष्ठ।।७।। लक्ष्मण म्हणे भक्ती। तेथे ज्ञानाची हो प्राप्ती।।८।।

२१०८. मानवत नामक नगर। तेथे व्यंकटरमण ईश्वर।।१।। प्रभो लक्ष्मीचा पती। सांभाळितो भक्ताप्रती।।२।। शेषाचल हो निवासी। प्रेमे वसे भक्तापाशी।।३।। तेथेचि लिंग मल्लिकार्जुन। शिव अनादी तो पूर्ण।।४।। पतितपावन नाम त्याचे। करितो कल्याण भक्ताचे।।५।। तेथे अनेक देव वसती। जग पुजिती त्याहाप्रती।।६।। भक्त जैसा धरी भाव। त्याते तैसा दिसे

देव।।७।। लक्ष्मण म्हणे भक्ती। त्याते प्रिय आहे अती।।८।।

२१०९. ग्रामा नाम आहे तुर। तेथे वसे परमेश्वर।।१।। महारुद्र प्रभोजवळी। भक्तजनाते सांभाळी।।२।। कल्याण करितो भक्तांचे। ताप निवारितो त्यांचे।।३।। पूजन करिती भावेकरून। त्याचे तोडी तो बंधन।।४।। लक्ष्मण म्हणे बा रे। प्रेमयुक्त नाम घ्या रे।।५।।

२११०. पंचक्रोशीमाजी वसती। बाभुळगाव त्याते म्हणती।।१।। तेथे लिंग परमेश्वर। भक्तजनाचे माहेर।।२।। शिव दयाघन तात। फार उद्धरिले पतित।।३।। पतितपावन त्याते म्हणती। भक्तापाशी केली वसती।।४।। त्याचे पूजन करिती। नामस्मरण जे करिती।।५।। त्याचा अवतार महारुद्र। भक्तजना कृपासमुद्र।।६।। लक्ष्मण म्हणे ताप। वारीतसे शांतरूप।।७।।

२१११. पंचक्रोशीमाजी वसे। लोणी नामक ती असे।।१।। तेथे वसे शिवलिंग। परमात्मा तो अभंग।।२।। मारुती त्याचा अवतार। रुद्र अकरावा तो थोर।।३।। त्याचे पूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।४।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।५।।

२११२. ग्रामा नाम केसरजवळा। तेथे प्रभो तो दयाळ।।१।। शिव वसे कृपाघन। करितो भक्ताचे कल्याण।।२।। मारुतीपाशी आहे लिंग। प्रभो आहे तो नि:संग।।३।। भजन पूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।४।। पंचक्रोशीमाजी प्राणी। गंगा त्याहाची जननी।।५।। भक्ती प्रिय मातेप्रती। साधू येती स्नानाप्रती।।६।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करी माता जगा।।७।।

२११३. ग्रामा नाम रत्नापूर। तेथे वसे तो शंकर।।१।। शिवलिंग पुरातन। भक्तजनाचे जीवन।।२।। भक्तजनाचे कल्याण। करीतसे कृपाघन।।३।। त्याचे पूजन करिती। सुखा पात्र ते होती।।४।। महारुद्र प्रभोजवळी। भक्तजनाते सांभाळी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय सुखप्राप्ती।।६।।

२११४. रामेटाकळी तीते म्हणती। तेथे केली प्रभोने वसती।।१।। शिवलिंग दयाघन। शंभो भक्ताचे जीवन।।२।। भक्ता द्यावयाते सुख। रूपे धरितो अनेक।।३।। शिवाजवळी मारुती। वसतसे कृपामूर्ती।।४।। जगा फार सांभाळिती। भक्तापायी हो ठेविती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय मातेप्रती।।६।।

२११५. पंचक्रोशीमाजी वसे। मंगरुळ नामक ती असे।।१।। तेथे वसे महालिंग। भक्ता करितो निःसंग।।२।। त्याचे पूजन करिती। त्याहा देतो उत्तम गती।।३।। तेथे वसे महारुद्र। प्रभो कृपेचा समुद्र।।४।। लक्ष्मण म्हणे त्याचे। नाम घेता दुःख कैचे।।५।।

२११६. भारस्वाड ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। आनंदभरित शंकर। आहे कृपेचे आगर।।२।। शिव मंगलायतन। आहे आनंदा जीवन।।३।। भक्तजनाचे कल्याण। करितो प्रभो पंचानन।।४।। त्याचे भजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।५।। लक्ष्मण म्हणे मारुती। प्रभोजवळी रुद्रमूर्ती।।६।।

२११७. वझुर ग्राम ते पवित्र। तेथे वसे तो त्रिनेत्र।।१।। पंचक्रोशी हो माझारी। शोभतसे ती हो पुरी।।२।। गंगा जगा तारावया। अवतरली महामाया।।३।। शंकर भक्ताचा कैवारी। भक्ता तारी त्रिपुरारी।।४।। हनुमान महाबळी। भक्तजनाते सांभाळी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२११८. लहूरभोस ग्रामा नाम। तेथे वसे सर्वोत्तम।।१।। शिव अनादी अनादी। भक्तजना कृपानिधी।।२।। लिंग ब्रह्म सनातन। आहे भक्ताचे जीवन।।३।। भक्ती फार प्रिय त्याला। नाथ विश्वाचा शोभला।।४।। महारुद्र हनुमान। करितो भक्ताचे कल्याण।।५।। लक्ष्मण म्हणे तात। सदासर्वदा निवांत।।६।।

२११९. दैठण नामक ते पूर। पंचक्रोशी उत्तरतीर।।१।। लिंग महारुद्राजवळी। भक्तजनाते सांभाळी।।२।। ठाकूरबोवाची समाधी। भक्तजना कृपानिधी।।३।। नित्य होतो जयजयकार। होतो भजनाचा गजर।।४।। यात्रा भरते तयाजवळी। मिळतसे भक्तमंडळी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।६।।

२१२०. गोदेचिये उत्तरतीरी। उंबर नामक वसे पुरी।।१।। पंचक्रोशीमाजी ग्राम। तेथे वसे सर्वोत्तम।।२।। शिवलिंग जगद्गुरू। ज्याचा विश्वाते आधारू।।३।। भक्ता देत असे सुख। निवारितो भवदुःख।।४।। बलभीम तो मारुती। सांभाळितो भक्ताप्रती।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय प्रभोप्राप्ती।।६।।

२१२१. ग्रामा नाम सदापूर। तेथे वसे परमेश्वर।।१।। आनंद प्रभोपाशी

थोर। प्रभो आनंदाचे घर।।२।। शिव सद्गुरू दयाळ। भक्तजना अती स्नेहाळ।।३।। त्याचा अवतार मारुती। सांभाळितो भक्ताप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे ज्ञाते। प्रेमे स्तविती प्रभोते।।५।।

२१२२. ग्रामा नाम रेनापूर। तेथे परमात्मा ईश्वर।।१।। पंचक्रोशी हो माझारी। फार रम्य आहे पुरी।।२।। तेथे महारुद्र मारुती। शोभतसे रुद्रमूर्ती।।३।। त्याचे पूजन करिती। त्याहा होय उत्तम गती।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।५।।

२१२३. विंदेवाडी म्हणती ग्रामा। तेथे वास सर्वोत्तमा।।१।। प्रभो अती दयाघन। केवळ भक्ताचे जीवन।।२।। जातिकूळ तो पाहिना। थोर सान तो म्हणेना।।३।। विद्यावैभव न पाहे। त्याते भक्ती प्रिय आहे।।४।। लक्ष्मण म्हणे रुद्र। तेथे शोभे महारुद्र।।५।।

२१२४. वाडी शोभे नायकाची। तेथे वसती महारुद्राची।।१।। महारुद्र भक्तास्तव। अवतरला प्रभुदेव।।२।। अनेक क्रीडा करी तात। भक्तापाशी तो निवांत।।३।। शिवअवतार महारुद्र। प्रभो कृपेचा समुद्र।।४।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करी माता जगा।।५।।

स्तुतिपर अभंग

(अ) देवी–देव

रेणुका

२१२५. आदिदेवी माय रेणुके भवानी। विश्वाची जननी तूचि माय।।१।। तुझे भक्त माये काळाते अनिवार। दीनाचे माहेर तूचि माये।।२।। शुंभ निशुंभ त्वा माते निर्दाळिले। देव सुखी केले त्वाचि माये।।३।। सहज लीला हे ब्रह्मांड उत्पन्न। रक्षिसी धावून भक्ताप्रती।।४।। लक्ष्मण तुझा म्हणवितो माय। दाखवावे पाय दीनाप्रती।।५।।

२१२६. सह्याद्री पर्वती आहे जगन्माता। तिचे नाम घेता भव हरे।।१।। दर्शन घ्या हो माय दयाळू ती। ब्रह्मांडनिर्मिती माया तिची।।२।। परशुरामाने केले रे पूजन। अवतार जाण हरीचा तो।।३।। ब्रह्मादी देव दर्शना रे येती। मातेते वंदिती प्रेमयुक्त।।४।। लक्ष्मण म्हणे करिता पूजन। सुखरूप जाण

होशील रे।।५।।

२१२७. देवी पाय दावी येई लवकर। म्हणवितो किंकर माये तुझा।।१।।
अगणित पापी माये उद्धरिले। पायी त्वा ठेविले भक्त माये।।२।। काळा
शिक्षा करिशी भक्त तू रक्षिसी। सुख फार देशी भक्ता तू गे।।३।। नाना
अवतार घेशी माय तूचि। माउली विश्वाची महामाय।।४।। लक्ष्मण दीन
पतित पामर। म्हणवितो किंकर तुझा माते।।५।।

२१२८. मायेचे वैभव किती म्या वर्णावे। कोण्या मुखे गावे गुण माये।।१।।
ब्रह्मा आदी देव तान्हुले गे तुझे। काय तेथे माझे वर्णन गे।।२।। उत्पत्ती
पालन संहार करिसी। नाना कार्ये करिसी तूचि मायें।।३।। कोट्यवधी सूर्य
स्वरूपी लोपले। चंद्र मावळले फार तेथे।।४।। आदिपुरुषाअंगी माय तू
तन्वंगी। सकळही जगी तुझी वस्ती।।५।। लक्ष्मण म्हणे सर्व तू जाणसी। मज
अभाग्यासी कोण नाही।।६।।

२१२९. भवानी तू दुःख हरिसी गे माये। निर्जराते पाय दुर्लभ तुझे।।१।।
प्रणवरूपिणी विश्वाची जननी। त्रैलोक्यस्वामिणी देवी तूचि।।२।। दैत्य ते
मर्दूनि विजयी झालीसी। ब्रह्मांड रक्षिसी माये तूचि।।३।। तुझे नाम घेता भव
हा दिसेना। चुकवी यातना नानाविध।।४।। लक्ष्मण दीन लोळे चरणावरी।
माते कृपा करी दीन तुझा।।५।।

२१३०. महालक्ष्मी ये महाकाली माय। सरस्वती माय ताप हरी।।१।।
तुझी कृपा होता ज्ञान गे रोकडे। भव हे बिरडे तुटे माये।।२।। भव हरूनिया
पद तूचि देशी। अधिष्ठानी नेशी तूचि माये।।३।। माते तुझे गुण किती म्या
वर्णावे। मशके गिळावे केवी नभ।।४।। लक्ष्मण म्हणे शेष गे शिणला। वेद
मौनावला ध्याता माये।।५।।

२१३१. अनंत ब्रह्मांडे तुझे रोमी माते। पार अनंताते कळेना गे।।१।।
सहज लीला ही सहज लाघव। ब्रह्मादिका लाघव कळेना गे।।२।। तुझा खेळ
तूचि जाणसी गे माये। इतरांते काय कळेल गे।।३।। पुराणपुरुषा तूचि
चेवविशी। अनेक करिशी क्रीडा माये।।४।। लक्ष्मण दीन दारीचा किंकर।
दीनांचे माहेर तूचि माये।।५।।

२१३२. महामाया देवी प्रभोअंगी वससी। तुझिया भाग्यासी पार नाही।।१।।

अनंत ब्रह्मांडे दाविसी लपविसी। नाही हालवलीसी ठायीहूनि।।२।। तुझे लाघव जाणे ऐसा नाही कोणी। अगम्य करणी तुझी माये।।३।। योगी सिद्ध मुनी सनकादिक थोर। तेही कृपे पार झाले तुझ्या।।४।। तुझ्या कृपेविण सर्व दिसे शीण। नोहे समाधान जगन्माते।।५।। उमादेवी माय मज दीनावरी। कृपा झडकरी करी माते।।।६।। लक्ष्मण म्हणे शंभोपायी ठेवी। दुजे मागणे नाही महामाये।।७।।

२१३३. दुर्गे दुर्घट विघ्ने गे हरिशी। पतित दीनासी उद्धरिशी।।१।। महिषासुरादी दुष्ट त्वा मर्दिले देवत्वा रक्षिले धावूनिया।।२।। धेनू धावूनिया येतसे तातडी। तैसी माये उडी घालीसी तू।।३।। कीर्ती ऐकून आलो मी शरण। करावे पावन दीनालागी।।४।। तोडावे बंधन करावे रक्षण। वदवावे गुण दीनामुखे।।५।। लक्ष्मण म्हणे मन वसो पायी। हेचि मायबाई दान देई।।६।।

२१३४. मूळ प्रकृती तू अंबे। तुज नमो गे जगदंबे।।१।। महामाये तू भवानी। त्रैलोक्याची तू जननी।।२।। ब्रह्मा आदी सुर तूते। प्रेमे स्तविती जगन्माते।।३।। करिसी भक्ताचे कल्याण। विघ्ने हरिसी दारुण।।४।। कृपाकटाक्षे पाहसी। त्याते मुक्त तू करिसी।।५।। लक्ष्मणाते सोडवी। दीन आपुला म्हणवी।।६।।

२१३५. अनादी तू आदिशक्ती। ब्रह्मानंदी तुझी वस्ती।।१।। तूते नमो ब्रह्मायणी। वेद सिद्धांची जननी।।२।। तुझा आधार सर्वासी। ब्रह्मा आदी त्या देवासी।।३।। अनंत ब्रह्मांडे हा खेळ। प्रेमे घालिसी गोंधळ।।४।। तुझे कर्तृत्व कळेना। पार वेदाते लागेना।।५।। लक्ष्मण म्हणे माते। किती वर्णावे गे तूते।।६।।

२१३६. भक्तकाजा तू सगुण। दैत्य मर्दिले दारुण।।१।। शुंभ निशुंभ महिषासुर। असंख्य मर्दिले भ्यासुर।।२।। क्रूराप्रती तू गे क्रूर। भक्तजनांचे माहेर।।३।। अष्टभुजा पसरून। भक्ता देशी आलिंगन।।४।। लक्ष्मण म्हणे माते। प्रेम देई मज दीनाते।।५।।

२१३७. अनंत ब्रह्मांडे उत्पन्न। करिसी प्रेमे गे पालन।।१।। शेखी संहार करिसी। परब्रह्मी तू वससी।।२।। तुझे कर्तृत्व विचित्र। अनेक नाचविसी

सूत्र।।३।। नाही हालवलीसी ठायीची। केली उभवणी विश्वाची।।४।। विश्व हेही तुझे अंग। परब्रह्मी तू अभंग।।५।। लक्ष्मण म्हणे अंबे। ब्रह्मरूप तू जगदंबे।।६।।

२१३८. अंबे विनंती परिसावी। अक्षयी प्रेम मज देई।।१।। प्रेमा असावा सदा। संतसंग देई सदा।।२।। मुखी नाम वदवावे। द्वैतभावाते वारावे।।३।। एकपण नुरवून। सुखे करावे भजन।।४।। लक्ष्मण म्हणे माये। तुझे कृपे कार्ये होय।।५।।

अन्नपूर्णा

२१३९. अन्नपूर्णादेवी तू विश्वाची जननी। विश्वाते पाळूनि तृप्तकर्ती।।१।। भक्ती देशी माते मुक्तही करिसी। तुझ्याही भाग्यासी पार नाही।।२।। अनंत ब्रह्मांडे तुझा क्रीडारोळ। स्वानंदगोंधळ तुज प्रिय।।३।। लक्ष्मण म्हणे मज सुख देई। ठेवी गे अक्षयी पायापाशी।।४।।

२१४०. सदोदित आनंद तुजपाशी माये। प्रभो निरामय तुज वश।।१।। योगियाची माता तू गे ब्रह्मायणी। स्वानंदाची खाणी तू गे माये।।२।। तुझे वैभव अक्षयी अक्षयी। ज्ञानियाते देवी वंद्य तू गे।।३।। लक्ष्मण म्हणे तुझी कृपा थोर। सर्वांते आधार माते तुझा।।४।।

२१४१. वेद तुझे गुण माते गे वर्णिती। सिद्ध तूते ध्याती प्रेमयुक्त।।१।। भक्ता देशी क्षेम करिसी कल्याण। दया वसे पूर्ण तुजपाशी।।२।। अनंत ब्रह्मांडे क्षणी गे उभविसी। क्षणात लपविसी अंबे तू गे।।३।। लक्ष्मण म्हणे पतित अन्यायी। दीनाते सोडवी कृपा करूनि।।४।।

२१४२. तापत्रय खंडन करूनि क्षेम देशी। निजपदी ठेविसी निजभक्ता।।१।। तुझे कृपेविण सर्व दिसे शीण। दुःख हे दारुण भोगिती प्राणी।।२।। जीवा पडली भ्रांती कुसंगास्तव माते। सोडविसी त्याते कृपादृष्टी।।३।। लक्ष्मण दीन फार हा अन्यायी। त्वरे गे सोडवी जगन्माते।।४।।

२१४३. अन्नपूर्णे माते तू मंगलाचे धाम। भक्ताते निजधाम दाखविसी।।१।। दीन सोडविसी कृपे गे करूनि। त्रैलोक्यजननी तू गे माये।।२।। जीव हा अनादी भ्रमला भ्रमला। विसर पडला पायाचा गे।।३।। लक्ष्मण म्हणे तुझे भक्त शूर। सुख ते अपार भोगिती गे।।४।।

२१४४. अंबे त्वरे कृपा करी। श्रमलो सोडवी लवकरी।।१।। फार दुःखार्णवी पडलो। अति कासावीस झालो।।२।। कामक्रोध हे तोडती। कैसी करावी गे गती।।३।। लक्ष्मण म्हणे माते। कृपा करी कृपासरिते।।४।।

२१४५. अंबे सोडवी सोडवी। पतित बहू मी अन्यायी।।१।। फार कष्ट गे भोगिले। अंग त्रितापे पोळिले।।२।। कोणी वालीच दिसेना। फार भोगिल्या यातना।।३।। लक्ष्मण विनवी देवी। बहू मी अन्यायी अन्यायी।।४।।

२१४६. भवगर्तेमाजी पडलो गे माये। काढी वेगी पाय दावी।।१।। नको अंत पाहू कृपादृष्टीकरूनि। घेई गे ओढूनि दुःख मोठे।।२।। तुझी कृपा होता मग दुःख नाही। सुख ते अक्षयी देशी अंबे।।३।। लक्ष्मण म्हणे फार मी अन्यायी। भक्तिसुख देई अति त्वरे।।४।।

२१४७. त्रिगुण त्रिकुटी तुजमाजी वसे। न कळे विलास अंबे तुझा।।१।। तुझे गुणा अंत नाही नाही माय। ब्रह्मानंदी ठाव तुझे कृपे।।२।। सिद्धयोगी तुझी कृपा संपादिती। तेव्हा ते सेविती ब्रह्मसुख।।३।। लक्ष्मण दीन फार हा श्रमला। वेगी अभाग्याला सोडवी गे।।४।।

२१४८. अंबे तुझा महिमा कळेना कळेना। अमरादी सुरगणा अति श्रेष्ठ।।१।। आकाशा गवसणी घालील गे कोण। स्वानंदजीवन तूचि माये।।२।। क्षुल्लकानंदाहून ब्रह्मानंद थोर। अक्षयी शंकर सेवितो गे।।३।। लक्ष्मण म्हणे तो देई मजला। नको या सुखाला गुंतवू गे।।४।।

२१४९. नको नको माते नको हा संसार। फार मी जर्जर झालो देवी।।१।। दुःखाचे पर्वत अंगी आदळती। दुःख मजप्रती सोसवेना।।२।। त्वरे धाव धाव चरणी देई ठाव। स्वानंदवैभव देई माते।।३।। लक्ष्मण दीन त्वरेने सांभाळ। अन्यायी तो खळ सोडवी गे।।४।।

राम

२१५०. शिव तोचि राम जाणा। राम तोचि शिव माना।।१।। स्वरूप एकचि निर्गुण। ब्रह्म विश्वपती तो जाण।।२।। स्वरूपी काही भेद नाही। वादू नका धरा सोई।।३।। लक्ष्मण म्हणे जनाप्रती। आम्हा दिसे एकचि मूर्ती।।४।।

२१५१. रामं स्तवा निरंतर। राम पाहा निर्घोर।।१।। आत्माराम अक्षयी जाणा। राम त्रैलोक्याचा राणा।।२।। अंतर्बाह्य आत्माराम। सर्वघटी

मेघःश्याम।।३।। लक्ष्मण म्हणे रामा। भक्तकामकल्पद्रुमा।।४।।

२१५२. राम पतितपावन। राम विश्वाचे जीवन।।१।। राम आदि-मध्य-अंती। राम त्रिभुवनपती।।२।। पाय प्रेमे ते स्तवावे। येणे जाणे मिटवावे।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भवरोगा करी अंत।।४।।

२१५३. रामा द्यावे दर्शन। तुझा म्हणवितो मी दीन।।१।। दोषी दीन त्वा रक्षिले। हीन सर्वमान्य केले।।२।। ऐसी कीर्ती तुझी देवा। दीनबंधू कृपाळुवा।।३।। लक्ष्मण म्हणे नाथ। परब्रह्म दीनानाथ।।४।।

२१५४. रामनामे फार धाले। परब्रह्मी ते राहिले।।१।। नाम प्रेमे ते स्मरा हो। भवसिंधू हा तरा हो।।२।। दुःखरूप हा संसार। येथे गुंतती पामर।।३।। लक्ष्मण म्हणे राम। ध्या प्रेमे व्हा आराम।।४।।

२१५५. राम प्रतापी हो थोर। केला क्रुराचा संहार।।१।। गणिकादी उद्धरिले। बिभीषणा राज्य दिले।।२।। प्रभो दयेचे आगर। भक्तजनांचे माहेर।।३।। प्रेमे स्तवा तो सोयरा। नका गुंतू या संसारा।।४।। लक्ष्मण म्हणे नाथ। करी अनाथा सनाथ।।५।।

कृष्ण

२१५६. देव भक्ताने जिंकिला। भक्ती प्रिय त्या देवाला।।१।। रोमी ब्रह्मांडे अनंत। वसती प्रभो तो निवांत।।२।। ब्रह्मादिकांचा पितर। झाला नंदाचा किशोर।।३।। गोपामाजी चेंडूफळी। प्रेमे खेळे वनमाळी।।४।। लक्ष्मण म्हणे तात। केला भक्ताने अंकित।।५।।

हनुमंत

२१५७. रुद्र अकरावा तो थोर। भक्तजनांचे माहेर।।१।। लंकेची त्वा होळी केली। राक्षस दुर्मती मारिली।।२।। ब्रह्मांड नेशी उचलून। ऐसा प्रतापी तू पूर्ण।।३।। रामराया तोषविले। अनेक कार्य तू केले।।४।। लक्ष्मण म्हणे देवा। दीन आपुला म्हणावा।।५।।

२१५८. तुम्हा नमो नित्यमुक्ता। महाराजा हनुमंता।।१।। महारुद्रा दयाघना। पूर्णब्रह्म सनातना।।२।। राघवाचा तू आत्मा। महारुद्रा तू परमात्मा।।३।। भक्तास्तव अवतार। धरिशी श्रेष्ठ तू ईश्वर।।४।। लक्ष्मण तुझा दीन। शंभो करा हो पावन।।५।।

सूर्य

२१५९. लक्ष योजना हो वरी। तुमची श्रेष्ठ शोभे पुरी।।१।। तुमचे वैभव अगणित। सुख सेविती शाश्वत।।२।। परोपकारास्तव भ्रमण। करिसी भक्ताचे कल्याण।।३।। लक्ष्मणा सुख द्या हो। प्रभो दीना सोडवा हो।।४।।

२१६०. प्रभो सूर्यनारायणा। अती सदया कृपाघना।।१।। उच्चै:श्रवा श्रेष्ठ वारू। त्वरे चाले रहिवरू।।२।। ऋषी स्तविती तुम्हाते। शोभती ते सभोवते।।३।। लक्ष्मण म्हणे वैभव। श्रेष्ठ आहेसी तू देव।।४।।

२१६१. प्रभो सूर्यनारायणा। प्रकाशरूपा ज्ञानघना।।१।। ब्रह्मांडातील अंधार। दूर करिसी महिमा थोर।।२।। महा महा ते हो ज्ञाते। तूते स्तविती निवांत।।३।। व्यापार तुझे सत्ते होय। परि तू आहेसी निरामय।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। पावन करा मज पतिता।।५।।

२१६२. भक्तजनाचा तू सखा। आहेसी बा पाठीराखा।।१।। तुझे पूजन करिती। अती सौख्य ते भोगिती।।२।। फार सुखी केले प्राणी। न कळे प्रभोची करणी।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। तुम्हा प्रिय कृपामूर्ती।।४।।

२१६३. भवव्यथा करिसी दूर। आहेसी कृपेचे आगर।।१।। तुझे नाम अगणित। पावन करिसी पतित।।२।। विश्वंभर तुझे नाम। आहेसी सुखाचे तू धाम।।३।। लक्ष्मणाचा सांभाळ। करा फार अन्यायी खळ।।४।।

चंद्र

२१६४. दो लक्ष योजनांवरी। तुमची श्रेष्ठ शोभे पुरी।।१।। तुझी संपत्ती अपार। जगा देशी सौख्य फार।।२।। भक्तजनाचे कल्याण। करिसी चंद्र तू दयाघन।।३।। लक्ष्मण म्हणे शिवा। अती प्रिय आहेसी देवा।।४।।

२१६५. आहेसी शिवाचा तू सखा। भक्तजना पाठीराखा।।१।। परोपकार तुम्हापाशी। सौख्य देतोसी जगासी।।२।। तुझे वंशी पुण्यशीळ। महान झाले ते भूपाळ।।३।। लक्ष्मण म्हणे समर्थ। आहेसी तू दीनानाथ।।४।।

२१६६. करावया रे कल्याण। तुमचे अक्षयी भ्रमण।।१।। तुझी भक्ती जे करिती। महान सुखा पात्र होती।।२।। तुम्हा भक्ती अती प्रिय। भक्ताजना तू सदय।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ता। अती प्रेमे रक्षिसी ताता।।४।।

२१६७. सुवर्णाची तुमची पुरी। ब्राह्मणाचा सहकारी।।१।। अनसूया

तुमची माता। दत्तात्रेय तुमचा भ्राता।।२।। अत्रिऋषी तुमचा पिता। असे ब्रह्मांडनिर्मिता।।३।। लक्ष्मण म्हणे चंद्रा। मान्य आहेसी तू इंद्रा।।४।।

२१६८. नमो नमो प्रभो चंद्रा। अती प्रिय महारुद्रा।।१।। तुझे भक्त विजयी। भक्तजना प्रभो आई।।२।। इच्छिले पुरविसी मनोरथ। अती आहेसी समर्थ।।३।। लक्ष्मणा सुख द्या हो। प्रेमे भजन करवा हो।।४।।

व्यंकटेश

२१६९. अहो शेषाचल पर्वती। प्रभो लक्ष्मीचा पती।।१।। पुण्यगिरी श्रेष्ठ स्थान। केवळ वैकुंठ भुवन।।२।। भक्तास्तव प्रकटला। अती भक्ती प्रिय त्याला।।३।। लक्ष्मण म्हणे गोविंद। रक्षितो भक्ताते आनंदे।।४।।

२१७०. सदय तो नारायण। करितो भक्ताचे कल्याण।।१।। चरणकमळी भक्तभ्रमर। रुंजी घालिती प्रेमभरे।।२।। कटी पितांबर पिवळा। गळा वैजयंती माळा।।३।। लक्ष्मण म्हणे तात। करितो भक्ताते निवांत।।४।।

२१७१. कर्णी कुंडले मकराकार। नाना शोभती अलंकार।।१।। रत्नजडित मुकुट शिरी। मुद्रिका शोभती दिव्य करी।।२।। त्याचे वैभव अपार। ब्रह्मादिका कळेना पार।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तसखा लक्ष्मीकांत।।४।।

२१७२. चंद्र सूर्य तारांगण। गेले स्वरूपी लोपून।।१।। मदन लज्जित पाहूनि मूर्ती। धन्य धन्य तो श्रीपती।।२।। अमर येती दर्शनाते। प्रेमे पुजिती प्रभोते।।३।। लक्ष्मण म्हणे तात। सौख्य भोगितो सदोदित।।४।।

२१७३. यात्रा प्रभोपाशी नित्य। वेद स्तविती प्रभो सत्य।।१।। ऋषी स्तविती सर्वज्ञ। भक्त घालिती लोटांगण।।२।। नारद तुंबर गायन। करिती आनंदेकरून।।३।। लक्ष्मण म्हणे तात। केला भक्ताने अंकित।।४।।

२१७४. असंख्य तीर्थे प्रभोपाशी। पावन करितो जगाशी।।१।। धन्य धन्य ते पुष्करणी। पातकी उद्धरिती ते स्थानी।।२।। गरुड हनुमंत द्वारी। तेथे वसती ब्रह्मचारी।।३।। सदा होतो जयजयकार। प्रभो आनंदाचे घर।।४।। लक्ष्मण म्हणे तात। आपणाऐसे करितो भक्त।।५।।

२१७५. जाती वैकुंठाते नर। महिमा प्रभोचा अपार।।१।। वसती तये स्थानी। चतुर्भुज ते होऊनि।।२।। धन्य धन्य तो व्यंकटेश। प्रभोचा सखा तो महेश।।३।। महान वैभव प्रभोचे। कल्याण करितो भक्ताचे।।४।। करावया

जगदुद्धार। सुमंगल हा अवतार।।५।। लक्ष्मण म्हणे शांती। प्रभोपाशी नित्य तृप्ती।।६।।

२१७६. धन्य धन्य तो अनंत। याच्या गुणा नाही अंत।।१।। स्वमाये क्रीडा करी। भक्तसंकट निवारी।।२।। कामिकाते देतो धन। देतो निष्कामा भजन।।३।। लक्ष्मण म्हणे श्रुती। प्रेमे प्रभोते स्तविती।।४।।

२१७७. धन्य धन्य गिरिनिवासी। कल्पवृक्ष हा भक्तासी।।१।। कल्पवृक्षाची उपमा। न साजे त्या सर्वोत्तमा।।२।। कामधेनू चिंतामणी। हेही न तुळती तुळणी।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। आपणाऐसे करितो तात।।४।।

२१७८. धन्य धन्य श्रीनिवास। तेथे अक्षयी सुखवास।।१।। त्याते विसरले प्राणी। असंख्य भोगती जाचणी।।२।। काम क्रोध करिती दंगा। विसरले त्या श्रीरंगा।।३।। लक्ष्मण म्हणे स्मरा। भवसिंधू हा उतरा।।४।।

२१७९. विसरे होतसे जाचणी। विसरे भोगिती नाना योनी।।१।। विसरे नाना क्लेश होती। विसरे होय अधोगती।।२।। प्रभोचा विसर पडला। म्हणोनि दुःख या जीवाला।।३।। लक्ष्मण म्हणे स्मरा। प्रभोचरणी वास करा।।४।।

२१८०. चौऱ्यांशी लक्ष योनी। विसरे भोगिती जाचणी।।१।। पाहा केवढा अंधार। नाही प्रभोचा तो स्मर।।२।। मोठा घाला झाला झाला। घाला अविद्येने केला।।३।। लक्ष्मण म्हणे श्रीधर। आहे कल्याणाचे घर।।४।।

२१८१. नमो नमो व्यंकटरमणा। नमो नमो नारायणा।।१।। नमो नमो ज्ञानमूर्ती। नमो नमो विश्वपती।।२।। नमो नमो विश्वंभरा। नमो नमो अगोचरा।।३।। लक्ष्मण हा किंकर। तुमचा म्हणवितो पामर।।४।।

२१८२. व्यंकटेश तू दयाळ। करिसी भक्तांचा सांभाळ।।१।। जननी रक्षी त्या बाळाला। तैसा रक्षिसी भक्ताला।।२।। मृगी पाडसाचे परी। भक्ता रक्षिसी तू हरी।।३।। लक्ष्मण म्हणे तूते। साधू स्तविती एकचित्ते।।४।।

२१८३. नमो नमो बा अनंता। नमो नमो रे शाश्वता।।१।। नमो नमो तुज दैत्यारी। तुज ध्याती ब्रह्मचारी।।२।। सर्व सुखाचा तू अब्धी। महाराज कृपानिधी।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

२१८४. तुमचे द्वारी सर्वही सिद्धी। तिष्ठती बा कृपानिधी।।१।। तुमचा

भांडारी कुबेर। तुमचे वैभव अपार।।२।। तुम्ही त्रैलोक्याचे पती। तुमचे वर्णन करू किती।।३।। लक्ष्मण तुमचा दीन। प्रभो करा हो पावन।।४।।

२१८५. व्यंकटरमणा संकटहरणा। शुद्ध बुद्ध निरंजना।।१।। अनेक क्रीडा बा करिसी। सगुण भक्तास्तव झालासी।।२।। जैसा जैसा समय पडे। तैसे तुम्हा होणे घडे।।३।। तुमचे नाम घेती वदनी। धन्य धन्य ते हो प्राणी।।४।। लक्ष्मण हा अपराधी। सोडवा हो कृपानिधी।।५।।

२१८६. व्यंकटेशा पुरातना। भक्तवत्सला सर्वज्ञा।।१।। तुमचे नाम हे मंगल। मंगलायतन तू परमेश्वर।।२।। नामामृत प्राशन करिती। सर्वमान्य ते हो होती।।३।। नामामृत लक्ष्मणा। पाजावे हो कृपाघना।।४।।

२१८७. व्यंकटेशा कृपानिधी। क्रीडसी बा विश्वामधी।।१।। तुज स्तविती दिक्पाळ। तू तव ब्रह्मांडाचा पाळ।।२।। भक्त जैसा धरी भाव। तैसा दिसशी तू देव।।३।। लक्ष्मणा प्रेम द्यावे। नाम मुखी वदवावे।।४।।

२१८८. व्यंकटेशा गिरिराया। नमो नमो तुमचे पाया।।१।। तुम्ही भक्ताचे स्वाधीन। भक्तसखा तू परिपूर्ण।।२।। दीनानाथा कृपाळुवा। जाशी भक्ताचिया गावा।।३।। ठायी ठायी तुझ्या मूर्ती। ब्राह्मणमुखे तुझी तृप्ती।।४।। लक्ष्मण हा पतित। पावन करी तू अनंत।।५।।

२१८९. पाहूनि रायाची त्या भक्ती। देऊळगावी केली वस्ती।।१।। धन्य धन्य ते जाधवराव। आपुले नगरा आणिला देव।।२।। सदासर्वदा मंगल। मंगलायतन तू सुमंगल।।३।। सदा होतो जयजयकार। तुझ्या वैभवा नाही पार।।४।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।५।।

२१९०. वाल्मीकाचे ते भुवन। वालुग्राम पुण्यस्थान।।१।। तेथे भक्तांचिया काजा। प्रगटलासी गरुडध्वजा।।२।। भक्तमनोरथ पुरविसी। भक्तसखा तू आहेसी।।३।। व्यंकटरमणा संकटहरणा। सौख्य देशी भक्तजना।।४।। लक्ष्मण पतिताते। सांभाळावे कृपावंते।।५।।

वीरभद्र

२१९१. ब्रह्मपुत्र प्रजापती। शिवद्रोह घडला त्याप्रती।।१।। दक्षजामात तो शिव। अती श्रेष्ठ महादेव।।२।। त्याते टाकून यज्ञ केला। बोलाविले सर्वत्राला।।३।। शिवनिंदा केली फार। अन्याय केला पाहा थोर।।४।। ऋषी

देव ते दिक्पाळ। बोलाविले हो सकळ।।५।। लक्ष्मण म्हणे होणार। न चुके माया ही दुर्धर।।६।।

२१९२. ऐसा अन्याय पाहून। देवीने शरीर केले दहन।।१।। ज्ञान अग्नी हो करून। झाली स्वरूपी निमग्न।।२।। रुद्रभाग हो वाचून। दक्षे चालविला यज्ञ।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। यास्तव कोपला तो देव।।४।।

२१९३. यास्तव जटा आपटली। मूर्ती वीरभद्र निघाली।।१।। प्रतिरुद्र तू आहेसी। शिव-आज्ञा प्रतिपाळिसी।।२।। आज्ञे यज्ञ विध्वंसिला। दंड केला दिक्पाळाला।।३।। जितुके यज्ञा आले होते। तितुके दंडिले रुद्रमूर्ते।।४।। लक्ष्मण म्हणे रुद्रा। भक्तसखा तू महारुद्रा।।५।।

२१९४. वीरभद्रा महारुद्रा। भक्तसखा तू रे रुद्रा।।१।। तुम्ही दक्षाते वधिले। मुख बस्ताचे लाविले।।२।। देव केले ते जर्जर। दंगा केला अती थोर।।३।। लक्ष्मण म्हणे अती दयाळ। आहेसी भक्ताते स्नेहाळ।।४।।

२१९५. तुम्हाभोवती शिवगण। शोभताती रात्रंदिन।।१।। प्रभोपाशी तू वससी। अती प्रिय तू आहेसी।।२।। शिवपूजका रक्षिसी। शिवनिंदका दंडिसी।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

२१९६. वीरभद्रा शिवपुत्रा। भक्तजनाचिया मित्रा।।१।। ज्ञानघन तू आहेसी। भक्ती प्रिय रे तुजसी।।२।। तुझा महिमा कळेना। सांभाळिसी भक्तजना।।३।। लक्ष्मण म्हणे श्रेष्ठा। सुरनराते वरिष्ठा।।४।।

२१९७. वीरभद्रा तू सुखरूप। हरिसी भक्ताचे बा ताप।।१।। तापत्रयाचे खंडन। करिसी भक्ताचे कल्याण।।२।। तुझे भक्त वीरशैव। तुझे अगणित वैभव।।३।। लक्ष्मणा द्यावी भक्ती। महाराजा कृपामूर्ती।।४।।

२१९८. तुझी भक्ती जया घडे। त्याते सुख फार जोडे।।१।। शिवनिंदा न ऐकिसी श्रवणी। तू तव अक्षयी स्मरणी।।२।। क्रुराप्रती तू अती क्रूर। भक्तजनाचे माहेर।।३।। लक्ष्मणा द्यावी भक्ती। तुम्हा वश तो पशुपती।।४।।

२१९९. वीरभद्रा सर्वोत्तमा। तुमचा कळेना महिमा।।१।। आहेसी काळाचा तू काळ। भक्तजना तू दयाळ।।२।। तुझे भक्त अगणित। सोडविले त्वा पतित।।३।। तुझ्या भक्ता भय नाही। रक्षिसी त्याते तू अक्षयी।।४।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।५।।

२२००. अहो कर्नाटकप्रांती। तुझ्या फार आहेत मूर्ती।।१।। वीरशैवा तुझे भजन। फार प्रिय ते प्रवीण।।२।। तुझे भक्त ते त्रिभुवनी। तुमची न कळे करणी।।३।। लक्ष्मण हा सोडवा। तू तव भक्ताचा विसावा।।४।।

२२०१. वीरशैवामुखी तृप्ती। तुझी आहे कृपामूर्ती।।१।। भक्तास्तव अवतार। घेशी तू रे निर्घोर।।२।। असंख्य लीला बा करिसी। दीनानाथ तू आहेसी।।३।। लक्ष्मणामुखेकरून। प्रेमे करवा भजन।।४।।

कार्तिकस्वामी

२२०२. धन्य धन्य हा कुमार। स्वामी साक्षात ईश्वर।।१।। भक्तकार्यास्तव सगुण। प्रभो शोभे षडानन।।१।। देवकार्य प्रभोने केले। देवा अती सौख्य दिले।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ता। प्रेमे रक्षिसी पूर्ण ज्ञाता।।४।।

२२०३. पूर्वी तारकासुर महान। योद्धा होता तो प्रवीण।।१।। असुरे महान तप केले। देव बंदी हो घातले।।२।। त्रैलोक्याचा अधिपती। महान शोभे त्याची कीर्ती।।३।। लक्ष्मण म्हणे युद्ध। केले महान ते प्रसिद्ध।।४।।

२२०४. त्याचा दर्प तो दारुण। देव धाके झाले दीन।।१।। देवे रूप पालटले। रूप माकडाचे धरिले।।२।। विष्णू झाला हो खेळविणार। खेळ करी रायासमोर।।३।। लक्ष्मण म्हणे प्राक्तन। आहे सर्वत्रा कारण।।४।।

२२०५. विष्णू अती तो लाघवी। नानापरीच्या माया दावी।।१।। दैत्य झाला तो प्रसन्न। अती चतुराई पाहून।।२।। हरीने ज्ञान हो कथिले। तेणे हरी ओळखिले।।३।। मर्कट खेळवित्या ज्ञान। कैचे विष्णू हा प्रवीण।।४।। लक्ष्मण म्हणे राव। करी अचंबा म्हणे हा देव।।५।।

२२०६. राया विष्णूप्रती बोले। फार कपट हे त्वा केले।।१।। तू आमुचा अक्षयी वैरी। घात करिशी नानापरी।।२।। तुझे ज्ञान आमुच्या कामा। न ये रे सर्वोत्तमा।।३।। परि तू आता माग काही। विष्णू म्हणे आम्हा सोडवी।।४।। देव सर्वही सोडिले। परि त्याने एक मागितले।।५।। जोवर माझा राज्यसमय। तोवरी राहा निरामय।।६।। परि तुम्ही मर्कटरूपे राहा। प्राक्तन दुर्धर ते पाहा।।७।। लक्ष्मण म्हणे दैत्य। महान होता तो धूर्त।।८।।

२२०७. मर्कटरूपे रहावे। वेष न हो पालटावे।।१।। वेष हो पालटाल। तुम्हा दंड रे होईल।।२।। विष्णूने समय पाहून। कबूल केले त्या कारण।।३।।

त्या वेषाने ते देव। पर्वती राहिले हो सर्व।।४।। लक्ष्मण म्हणे देव। समय पाहूनि वर्तती सर्व।।५।।

२२०८. शिववीर्या हो पासून। पुत्र होईल हो निर्माण।।१।। त्याचे हस्ते तारकासुर। पुढे आहे तो मरणार।।२।। ब्रह्मदेवे महाकाली। प्रेमयुक्त ती आराधिली।।३।। लक्ष्मण म्हणे देवी। प्रसन्न झाली ती हो आई।।४।।

२२०९. ब्रह्मदेव सप्तऋषी। त्वरे आले शिवापाशी।।१।। शिव आज्ञा घेऊन। गेले मुहूर्त पाहून।।२।। ब्रह्मदेवे रायाप्रती। बोध केला नाना युक्ती।।३।। राये गोष्ट ती मानिली। म्हणे उत्तम गोष्ट ही झाली।।४।। पार्वती दिधली शंकरा। म्हणे लग्न वेगे करा।।५।। लक्ष्मण म्हणे फार। आनंद झाला शिवा थोर।।६।।

२२१०. शिवे विष्णू बोलविला। बोलविले सर्वत्राला।।१।। त्रैलोक्यातील मंडळी। लग्नसमारंभा आली।।२।। हिमालये हो पर्वत। मेळवले समस्त।।३।। दहा हजार योजने। मंडप निर्मिला रायाने।।४।। विश्वकर्मा बोलविला। अती चतुराई करता झाला।।५।। रत्नजडित मंडप थोर। पाहूनि विस्मित ते सुरवर।।६।। विष्णूप्रती बोले शिव। मर्कट झाले सर्व देव।।७।। याते लग्ना कैसे न्यावे। काय दैत्याते म्हणावे।।८।। शिव-आज्ञे पूर्ववत। देव झाले ते समस्त।।९।। पर्वताचे घरी लग्न। महान उत्सव तो पूर्ण।।१०।। देव ऋषी गण गंधर्व। मुनी सिद्ध मिळाले सर्व।।१।। ब्रह्मांडातील लोक सर्व। आले पाहाया वैभव।।१२।। लक्ष्मण म्हणे सुख थोर। महान सुख ते अपार।।१३।।

२२११. लग्न लागले शिवाचे। महान वैभव प्रभोचे।।१।। देव ऋषी गण गंधर्व। सिद्धचारणादी सर्व।।२।। अठ्यांशी सहस्र महामुनी। ब्राह्मण शोभती तया स्थानी।।३।। नारद तुंबर वाद्ये नाना। अनंत ब्रह्मांडातील रचना।।४।। शोभा आली तया स्थाना। ओसरला मीतूपणा।।५।। अरुंधती अनसूया। महान पतिव्रता माया।।६।। ब्रह्मदेवे लग्न लाविले। यथासांग लग्न झाले।।७।। हरी विरंची अग्रगण। तेथे काय पडेल न्यून।।८।। लक्ष्मण म्हणे आनंद। तेथे शंभो ब्रह्मानंद।।९।।

२२१२. नारद दैत्यापाशी गेला। समूळ वार्ता कथिली त्याला।।१।। देव मर्कट झाले होते। ते देव झाले मागुते।।२।। तारकाने ते ऐकून। क्रोधे आला

तो धावून।।३।। सर्वत्रही दैत्य आले। अती देवावरी क्षोभले।।४।। मंडपामध्ये ते असुर। आले महान ते विक्राळ।।५।। तारक होता तो शिवभक्त। उगीच बैसला तटस्थ।।६।। म्हणे लग्न झाल्यावर। देव मारीन हे सारे।।७।। घाबरले देव सर्वत्रही। म्हणती गोष्ट नाही बरवी।।८।। शिव होता बोहल्यावरी। म्हणे गोष्ट नाही बरी।।९।। शिवे नवल तेथे केले। आपण बालरूप धरिले।।१०।। महान तेजस्वी ते बाळ। केवळ तेजाचा कल्लोळ।।११।। पाहोनिया ते बाळ। विस्मित झाले हो सकळ।।१२।। रांगत रांगत ते हो बाळ। गेले दैत्याच्या जवळ।।१३।। तारकासुरे बाळ उचलून। अंकी बैसविले ते धन्य।।१४।। शिवकृपे शांत झाला। मोह फार त्या पडला।।१५।। दैत्य सर्वत्र शांत झाला। उगी तटस्थ बैसला ।।१६।। बालकाने माया केली। घ्राणस्वरे ते उडविली।।१७।। नेऊन टाकिले हो दूर। देवे केला जयजयकार।।१८।। लक्ष्मण म्हणे शंकर। केवळ कल्याणाचे घर।।१९।।

२२१३. आनंद झाला सर्वत्राला। समारंभ श्रेष्ठ झाला।।१।। देव गेले हो सर्वही। वऱ्हाड गेले सर्वत्रही।।२।। शिव राहिले पर्वती। गणसमुदायी पशुपती।।३।। देवकार्य ते जाणून। शिव रमले आपण।।४।। रत्नमय मंदिर करून। एकांती राहिला पंचानन।।५।। लक्ष्मण म्हणे देव। आनंद मानिते झाले सर्व।।६।।

२२१४. पार्वती परमेश्वर। एकांती रमले निर्घोर।।१।। वनही देवे शृंगारिले। प्रभो आनंदे रमले।।२।। अग्नी मयूर हो झाला। वनी नाचू लागला।।३।। अतिथिवेष हो धरिला। रेत मागता झाला।।४।। देवाने भविष्य जाणून। शिवरेत दिले दान।।५।। अग्नी प्राशन करिता झाला। तेणे गरोदर झाला।।६।। भये प्रयागाशी गेला। तेथे युक्ती करिता झाला।।७।। ऋषिकन्या हो उदरी। रेत ठेवी झडकरी।।८।। त्याही झाल्या गरोदर। त्यांनी चिरिले उदर।।९।। गर्भ टाकिला हा कुपी। शुद्ध झाल्या स्वच्छरूपी।।१०।। लक्ष्मण म्हणे आनंद। शिवरूपी ब्रह्मानंद।।११।।

२२१५. नारद आला पार्वतीजवळी। म्हणे आपला पुत्र सांभाळी।।१।। पार्वतीने तत्क्षणी। पुत्र आणिला उचलूनि।।२।। स्तनी लाविले स्वामीशी। षडानन नाम त्याशी।।३।। देव आले दर्शनाशी। महामुनी सिद्ध ऋषी।।४।।

महान उत्सव तो थोर। ऋषी करिती जयजयकार।।५।। स्वामी शिवा हो समान। ब्रह्मनिष्ठ झाला तो पूर्ण।।६।। लक्ष्मण म्हणे ज्ञाते। प्रेमे स्तविती कुमाराते।।७।।

२२१६. सर्व विद्या हो स्वामीशी। शिवे पढविल्या त्याशी।।१।। मस्तकी हस्त तो ठेविला। स्वामी प्रवीण तो झाला।।२।। देव सर्वत्र मिळाले। पूजन स्वामीचे हो केले।।३।। ब्रह्मा विष्णू आदी गीर्वाण। गेले युद्धा हो कारण।।४।। महान युद्ध झाले थोर। सात दिवसांचा कुमार।।५।। महान युद्ध केले थोर। महाबळी तारकासुर।।६।। लक्ष्मण म्हणे श्रेष्ठ। स्वामी बळी तो वरिष्ठ।।७।।

२२१७. स्वामीने निर्वाण युद्ध केले। तारकासुराते मारिले।।१।। मर्दिले ते असुर। तारकाते दिधला वर।।२।। तारकाते दिधली मुक्ती। सौख्य दिधले देवांप्रती।।३।। स्वर्गपदी हो स्थापिले। सौख्य त्याते फार झाले।।४।। सुमंगल ज्ञानमूर्ती। स्वामी चिन्मय ही ज्योती।।५।। लक्ष्मण म्हणे तात। आपणाऐसे करिती भक्त।।६।।

२२१८. महाराज ब्रह्मचारी। हीनादीनाते उद्धरी।।१।। कार्तिक मासाचिये लयी। कृतिका नक्षत्र समयी।।२।। घेता प्रभोचे दर्शन। अंत्यजाचा होय ब्राह्मण।।३।। भक्ता नामस्मरणे गती। देतसे तो कृपामूर्ती।।४।। पतितपावन नाम साजे। पिता ज्याचा वृषभध्वज।।५।। लक्ष्मण म्हणे तात। ब्रह्मानंदी तो निवांत।।६।।

२२१९. अनंत ब्रह्मांडसंपत्ती। वमनप्राय प्रभोप्रती।।१।। भक्ती ज्ञान ते वैराग्य। प्रभोचे अक्षयी ते भाग्य।।२।। सनकादिकाप्रती ज्ञान। पूर्वी कथिले प्रभोने।।३।। देवकार्य हे जाणून। गेला युद्धाकारण।।४।। लक्ष्मण म्हणे तात। सदासर्वदा ध्यानस्थ।।५।।

२२२०. प्रभोची समाधी खंडेना। अद्वैतसुखाचा तो राणा।।१।। भक्ताचा तो सखा खरा। प्रभो भक्ताचा सोयरा।।२।। प्रभो भक्ताचा कैवारी। असंख्य तारिले दुराचारी।।३।। स्वामी ज्ञानाचा सागर। केवळ स्वानंदाचे घर।।४।। नमो नमो विश्वंभरा। नमो नमो परात्परा।।५।। तुमचे भाग्य अगणित। वेदशास्त्रा न कळे अंत।।६।। तेथे माझी वाणी किती। काय वर्णू मी दुर्मती।।७।। माझे हृदयी प्रकटून। तुम्ही करविले भजन।।८।। अहो स्कंद त्या पुराणी।

आहे व्यासाची हो वाणी।।९।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।१०।।

खंडोबा

२२२१. ज्ञानखंडाहाती क्रूर। करिसी दुष्टाचा संहार।।१।। मलिमलादी दुर्मती। निवटिले कृपामूर्ती।।२।। भक्त रक्षिसी अती प्रेमे। अती मंगल तुझे नाम।।३।। लक्ष्मणा मुखेकरून। वदवावे आपुले गुण।।४।।

२२२२. कैलासा हो निजभक्तकाजा। आलासी बा वृषभध्वजा।।१।। केली अश्वावरी स्वारी। भांडार उधळी अंगावरी।।२।। औट कोटी भोवते गण। सभोवते ते प्रवीण।।३।। केला दीनाचा उद्धार। तू तव कृपेचे आगर।।४।। लक्ष्मणा प्रेम द्यावे। अती प्रेमे सांभाळावे।।५।।

२२२३. रुद्र अवतार तू थोर। करी पापाचा संहार।।१।। देवकार्ये तुम्ही केले। दैत्य दुर्मती तुम्ही मर्दिले।।२।। दैत्यांनी दंगा फार। केला म्हणूनि तुम्हा अवतार।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। जगी सर्वदा सुखात।।४।।

२२२४. जगावरी दंगा फार। करिती दुर्मती असुर।।१।। देवाब्राह्मणा पीडिती। नानापरी क्लेश देती।।२।। करावया दीनोद्धार। प्रभो तुमचे अवतार।।३।। लक्ष्मण विनवी दीन। दयाळू तू कृपाघन।।४।।

२२२५. अती कृपा तुजपाशी। भक्तजना सांभाळिसी।।१।। क्रुराप्रती प्रभो क्रूर। साधुजनांचे माहेर।।२।। भक्ता आनंद तू देशी। चरणापाशी बा स्थापिसी।।३।। लक्ष्मणाते सोडवा। दीनानाथा कृपाळुवा।।४।।

२२२६. भक्तसंकट वारिसी। त्याहा आपुलेपण देशी।।१।। केवळ सुखाचा तू अब्धी। भक्ता देतोसी निजसिद्धी।।२।। तापत्रय बा वारिसी। आपुले चरणी स्थापिसी।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

२२२७. अगणित तुझी कीर्ती। किती वर्णू मी दुर्मती।।१।। जैसे जैसे कारण पडे। तैसे तुम्हा होणे घडे।।२।। पूर्वी फार सोडविले। दीना मार्गाते लाविले।।३।। लक्ष्मण विनवी दीन। करा अनाथा पावन।।४।।

२२२८. नमो नमो महारुद्रा। प्रभो कृपेच्या समुद्रा।।१।। करूनि दैत्यांचा संहार। कृपा भक्तावरी फार।।२।। नाना रत्नांच्या त्या माळा। पिवळा पितांबर शोभला।।३।। लक्ष्मण म्हणे तात। पावन करा मज पतिता।।४।।

२२२९. तुम्हा नमो खंडेराया। दीनानाथा प्रभोराया।।१।। ज्ञानजडित भांडारी। तुमचे शोभे स्कंधावरी।।२।। नाना अलंकार माळा। तुम्हा शोभल्या स्नेहाळा।।३।। लक्ष्मणा सोडवावे। दीनाप्रती सांभाळावे।।४।।

२२३०. छत्तीस दिवट्या लावून। मधे बैसला आपण।।१।। वेद शरण प्रेमे येती। भक्त आनंदे नाचती।।२।। भक्तास्तव देहधारी। क्रीडा करिसी नानापरी।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

शिंगणापूरचा महादेव

२२३१. लिंगरूप तो पर्वत। तेथे शिव तो निवांत।।१।। पुण्यस्थान ते पवित्र। तेथे वसती सत्पात्र।।२।। योगी वसती ठायी ठायी। तापसमंडळी अक्षयी।।३।। लक्ष्मण म्हणे स्थान। अतिश्रेष्ठ पुण्य भुवन।।४।।

२२३२. महादेव त्याचे नाम। भक्तसखा सर्वोत्तम।।१।। तेथे शिंगणापूर ग्राम। अतिप्रिय शिवधाम।।२।। महादेव भक्तास्तव। प्रेमे वसे देवराव।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तसखा उमाकांत।।४।।

२२३३. महादेव कृपाघन। महादेव पुरातन।।१।। महादेव ज्ञानखाणी। महादेव सर्वस्थानी।।२।। महादेव विश्वंभर। महादेव परात्पर।।३।। लक्ष्मण म्हणे तात। सदासर्वदा निवांत।।४।।

२२३४. महादेव वंद्य वेदा। महादेव वंद्य सिद्धा।।१।। महादेव हा व्यापक। अनंत ब्रह्मांडनायक।।२।। महादेव कृपानिधी। प्रभोपाशी सर्व सिद्धी।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते। देव येती शरणांगत।।४।।

२२३५. महादेव भोलानाथ। अती सदय समर्थ।।१।। महादेव पुरातन। सकल विश्वाचे जीवन।।२।। महादेव जगन्नाथ। महादेव विश्वनाथ।।३।। लक्ष्मणा महादेव। बोलवितो कृपाळुव।।४।।

२२३६. महादेव कामांतक। महादेव भवांतक।।१।। महादेव विश्वांतक। महादेव हा त्र्यंबक।।२।। महादेव सुखी सदा। नमो नमो ब्रह्मानंदा।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।४।।

२२३७. महादेव बद्रिनाथ। महादेव सोमनाथ।।१।। महादेव वैद्यनाथ। महादेव नागनाथ।।२।। महादेव दीनानाथ। महादेव अनाथनाथ।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते। प्रेमे स्तवा घ्या सुखाते।।४।।

२२३८. महादेव चिन्मयज्योती। महादेव ज्ञानमूर्ती।।१।। महादेव केवळ ज्ञप्ती। महादेव प्राणपती।।२।। महादेव सिद्धराणा। महादेव पूर्ण जाणा।।३।। लक्ष्मण म्हणे त्याला। भक्ती प्रिय पाहू चला।।४।।

२२३९. महादेवापाशी देव। प्रेमे स्तविती महादेव।।१।। महादेवापाशी सिद्धी। महादेवापाशी निधी।।२।। महादेवापाशी सर्व। महादेव स्वयंमेव।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा होय आत्मप्राप्ती।।४।।

२२४०. महादेव हा निर्गुण। महादेव हा सगुण।।१।। महादेवाअंगी माया। नमो नमो प्रभोपाया।।२।। महादेवाचे म्हणविले। तेचि सुखा पात्र झाले।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भक्ता करितो तो निवांत।।४।।

२२४१. महादेव विश्वा आद्य। महादेव विश्वा मध्य।।१।। महादेव सबराभर। महादेव अनाक्षर।।२।। महादेव हा अक्षर। मायागुणे दिसे क्षर।।३।। लक्ष्मण म्हणे देव-। भक्त आपणचि महादेव।।४।।

२२४२. स्वयंप्रकाश पशुपती। स्तवा उत्तम देतो गती।।२।। थोरला तो महादेव। थोर म्हणती त्याते देव।।३।। थोर थोर याते ध्याती। त्याचे कृपे थोर होती।।३।। थोर महिमा प्रभोचा। स्वामी आहे तो सर्वांचा।।४।। लक्ष्मण म्हणे ईश्वर। आहे भक्तांचे माहेर।।५।।

२२४३. महादेव हा हो थोर। थोर देवांते हा थोर।।१।। ब्रह्मा इंद्र नारायण। प्रेमे करिती पूजन।।२।। महान महिमान प्रभोचे। महान श्रेष्ठ नाम त्याचे।।३।। लक्ष्मण विनवी बा रे। अती प्रेमे त्याते ध्या रे।।४।।

२२४४. महादेव दिक्पाळांनी। पुजिला प्रेमे तो शूळपाणि।।१।। महादेव भक्त रक्षी। महादेव सर्वसाक्षी।।२।। महादेव कृपा करी। महादेव हा दैत्यारी।।३।। लक्ष्मण म्हणे दीना। रक्षी कैलासीचा राणा।।४।।

२२४५. महादेव हा ब्रह्मांडी। महादेव वसे पिंडी।।१।। महादेव करी कल्याण। अनंत ब्रह्मांडा कारण।।२।। महादेवा व्हा शरण। करितो आपुले समान।।३।। लक्ष्मणा महादेव। पावन करितो कृपाळुव।।४।।

२२४६. महादेवा हो पासून। अनंत ब्रह्मांडे निर्माण।।१।। महादेव कृपा करी। तुटे जन्ममरण फेरी।।२।। महादेवाऐसा धनी। प्राणी गेले विसरूनि।।३।। लक्ष्मण म्हणे स्तवा। तोडी जन्ममरणगोवा।।४।।

२२४७. महादेवाचे वैभव। कोण जाणेल हो देव।।१।। त्याते प्रिय ते वैराग्य। अती प्रिय त्याते भाग्य।।२।। देवा दिधले नाना पद। भक्ता दिधला निजबोध।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते। योगी ध्याती परतल्या चित्ते।।४।।

२२४८. शुकमुनीचा हो तात। व्यासमुनी तो विख्यात।।१।। त्यांनी केली काव्यरचना। अष्टादश त्या पुराणा।।२।। स्कंदपुराणी वर्णन। पर्वतलिंग हा हो जाण।।३।। तेथे वसे महादेव। सकळ देवांचा हा देव।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। भक्तास्वाधीन महादेव।।५।।

२२४९. महादेवापाशी सत्य। तेथे न शोभे अनित्य।।१।। अनित्य या जगाला। सुख देतसे भक्ताला।।२।। वेदघोष निरंतर। वाद्ये वाजती सुस्वर।।३।। लक्ष्मण म्हणे तात। सदासर्वदा निवांत।।४।।

२२५०. भक्ताचे करावे कल्याण। अनेक लिंग झाला आपण।।१।। अनंतरूपे प्रभो आपण। क्रीडा करतो पंचानन।।२।। त्याच्या नामा नाही अंत। धन्य धन्य तो उमाकांत।।३।। लक्ष्मण विनवी जना। मिथ्या संसार हा जाणा।।४।।

२२५१. महादेवाचे म्हणवा। तुटे जन्ममरणगोवा।।१।। येथे गुंता मोठा दिसे। स्तवा स्तवा तो महेश।।२।। प्रभोचे घ्या हो दर्शन। अनेक हरती बा विघ्न।।३।। लक्ष्मण प्रभोद्वारी। पडला प्रेमे स्तवन करी।।४।।

२२५२. पर्वत उंच शिखर। तेथे पूर शिंगणापूर।।१।। स्थान पवित्र हो सदा। तेथे वास ब्रह्मानंदा।।२।। कामिका हो प्रती ते रे। स्थान उदास दिसे रे।।३।। स्थान प्रिय ते सिद्धाला। योगिराव तो शोभला।।४।। योगी तापसी वितरागी। मध्ये शोभे शिवयोगी।।५।। सुख स्वानंदकल्लोळी। शुद्ध बुद्ध चंद्रमौळी।।६।। अनंत ब्रह्मांडे हे धन। शिव मानितो वमन।।७।। भक्ती प्रिय प्रभोलागी। सदा संतुष्ट शिवयोगी।।८।। नाना पूजेचा संभार। भक्त करिती जयजयकार।।९।। चैत्र शुद्ध एकादशी। यात्रा भरते प्रभूपाशी।।१०।। ध्वजपताकांचा भार। येती कावडी हो फार।।११।। नाना वाद्ये नामघोष। भक्त पुजिती महेश।।१२।। ब्रह्मा आदी सुर नर। भावे पुजिती शंकर।।१३।। करितो दीनांचा उद्धार। महाराज गंगाधर।।१४।। भक्ताप्रती करी छाया। ध्यावे वेगी प्रभोराया।।१५।। लक्ष्मण म्हणे शिव। पाहा वेगी महादेव।।१६।।

सिद्धेश्वर

२२५३. सिद्धेश्वर हा निर्गुण। सकळ विश्वाचे जीवन।।१।। केवळ ब्रह्म जे शाश्वत। प्रभो स्वानंदभरित।।२।। ब्रह्मानंदाची जे खाणी। योगियाचा मुकुटमणी।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।४।।

२२५४. केवळ चैतन्यस्वरूप। तोचि झाला विश्वरूप।।१।। विश्वा आदि-मध्ये-अंती। केवळ ज्ञानाची ती ज्योती।।२।। लक्ष्मण म्हणे सिद्ध। तेथूनि पावले ब्रह्मबोध।।३।।

२२५५. सकळ तत्त्वांच्या वेगळा। मायागुणे करितो लीला।।१।। पाच पंचवीस छत्तीस। प्रभुइच्छेचा विलास।।२।। एकापासूनि अनेक। अवघा एकाचा विलास।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते। भक्ती प्रिय अती सत्य।।४।।

२२५६. साकारला योगिराव। परात्पर महादेव।।१।। सिद्ध ध्याती अजरामर। प्रभो सुखाचा तो सागर।।२।। निगमागमा अगोचर। ब्रह्मादिकाचे ते घर।।३।। लक्ष्मण म्हणे सदय। प्रभो आहे निरामय।।४।।

२२५७. सकळ सिद्धांचा विसावा। पूज्य आहे सर्व देवा।।१।। अहो वेदान्त सिद्धान्त। त्यापासूनि विख्यात।।२।। भानू लिप्त नसे कर्मा। तैसा अक्षयी परमात्मा।।३।। लक्ष्मण म्हणे तात। फार दयाळू समर्थ।।४।।

२२५८. सिद्धेश्वरा साधू ध्याती। विश्वंभर कृपामूर्ती।।१।। अणुरेणूमाजी वसे। श्रुती म्हणती त्या महेश।।२।। मोठा आहे सर्वाहून। अनंत ब्रह्मांडांवरून।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। अती प्रिय प्रभोप्रती।।४।।

२२५९. अहो कामामाजी काम। करा घ्या हो प्रभूचे नाम।।१।। नामामृताची ती चवी। श्रेष्ठ घेती स्वानुभवी।।२।। नामस्मरणी रत झाले। त्यांनी फार स्वहित केले।।३।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। जिंकिला तो शूळपाणि।।४।।

२२६०. प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहता। दुजिया बोधही करिता।।१।। परि चित्त पालटेना। अहंभावही जाईना।।२।। वस्तुमाजीही वसता। ज्ञान लोकांते कथिता।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ति-। युक्त स्मरा पशुपती।।४।।

२२६१. पशुपती सिद्धेश्वर। भक्तजनास्तव साकार।।१।। दशबाहू उभारून। देतो भक्ता आलिंगन।।२।। आपुले सुख देतो भक्ता। तेचि सुख देतो मुक्ता।।३।। लक्ष्मणाचा यजमान। सिद्धेश्वर कृपाघन।।४।।

२२६२. सिद्धेश्वर गंगेतटी। सिद्धेश्वर रेवेतटी।।१।। तूचि ब्रह्मांडी व्यापला। अनेक व्यक्ती धरिता झाला।।२।। एकपण सदोदित। श्रुती म्हणती त्या अनंत।।३।। लक्ष्मणाचे हृदयी। शाश्वत तोचि सर्वदेही।।४।।

२२६३. नमो नमो सिद्धेश्वरा। तू तव अनादी सोयरा।।१।। प्रभो ब्रीदाचा अभिमान। आहे तुम्हाप्रती पूर्ण।।२।। पतितपावन तुम्हा म्हणती। तुमची शोभे अक्षयी कीर्ती।।३।। लक्ष्मण पायाजवळी। पडला ब्रीद तू सांभाळी।।४।।

खंडेश्वर

२२६४. गोदेचे हो उत्तरतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। तेथे वसे पुण्यपूर। अष्टसेनाचे नगर।।२।। तेथे लिंग खंडेश्वर। स्वयंभू तो परमेश्वर।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तजना कृपावंत।।४।।

२२६५. प्रभोपाशी कृपा फार। शिव भक्तांचे माहेर।।१।। त्याते प्रिय ते वैराग्य। योगिजनाचे ते भाग्य।।२।। देवा दिधली संपत्ती। वैभव प्रेमे ते भोगिती।।३।। प्रभो निजानंदे तृप्त। त्याचे भाग्य ते सतत।।४।। लक्ष्मण म्हणे तात। आपणाऐसे करितो भक्त।।५।।

२२६६. ब्रह्मानंदाचे जीवन। प्रभू स्वानंदजीवन।।१।। त्याते प्रिय असे भक्ती। भक्ताप्रती नित्य तृप्ती।।२।। तृप्ती प्रभोकृपेविण। नोहे नोहे ते कल्याण।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।४।।

२२६७. प्रभोपाशी ब्रह्मानंद। पुजा देतो तो आनंद।।१।। क्षुल्लकानंदी पडले प्राणी। अनेक भोगिती जाचणी।।२।। सुख खरे खरे दिसे। परि या सुखा आहे नाश।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। करा वश तो पशुपती।।४।।

२२६८. खंडेश्वर हा अनादी। खंडेश्वर कृपानिधी।।१।। करितो भवाचे खंडन। अती सदय पंचानन।।२।। अहो प्रभूचिया भक्ता। नसे भवाची ही व्यथा।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। भक्तीपाशी चारी मुक्ती।।४।।

२२६९. नमो नमो खंडेश्वरा। नमो नमो रे ईश्वरा।।१।। नमो नमो ज्ञानमूर्ती। तुम्हा नमो हो पशुपती।।२।। पतितपावन तो हर। भक्तजनास्तव साकार।।३।। लक्ष्मणा चरणसेवा। अक्षयी द्यावी महादेवा।।४।।

२२७०. करितो पातकांची होळी। खंडेश्वर हा चंद्रमौळी।।१।। भक्ता मानितो तो प्राण। भक्तसखा त्रिनयन।।२।। भक्ता देतसे संपत्ती। त्याचे कृपे

ज्ञानप्राप्ती।।३।। लक्ष्मण खंडेश्वर। त्राता आहे तो ईश्वर।।४।।

२२७१. तुझे नाम अगणित। तुझे नामा नाही अंत।।१।। महाराजा खंडेश्वरा। तू तव भक्तांचा सोयरा।।२।। भक्तमनोरथ पुरवीसी। त्याहावेगळा नोहेसी।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

२२७२. पुजा पुजा खंडेश्वर। प्रभो कृपेचे माहेर।।१।। करी पापाचे खंडन। प्रभो पतितपावन।।२।। फार उद्धरिले प्राणी। प्रेमे राहा शिवस्मरणी।।३।। लक्ष्मण म्हणे तात। करी जन्ममरणातीत।।४।।

२२७३. अहो स्तवा खंडेश्वर। मिथ्याभूत हा संसार।।१।। अहो प्रभोचे म्हणविले। तेचि ब्रह्मानंदे धाले।।२।। क्षुल्लकानंदी नाही सुख। मिथ्या पाहा हे मायिक।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। देतो शाश्वत वैभव।।४।।

२२७४. खंडेश्वर महादेव। सर्व देवांचा हा देव।।१।। त्रिकाल भजन पूजन। भक्त करिती नामस्मरण।।२।। वेदघोष प्रभूपाशी। भक्त येती दर्शनासी।।३।। त्याचे वैभव अपार। नित्य होतो जयजयकार।।४।। लक्ष्मण प्रभोद्वारी। पडला अन्यायी तो भारी।।५।।

आष्टीतील देव

२२७५. नंदिनीतटी आशापूर। अष्टसेनाचे नगर।।१।। रामेश्वरलिंग श्रेष्ठ। नरसिंहमूर्ती ती वरिष्ठ।।२।। अती दयाळू श्रीराम। भक्तजनाते सुखधाम।।३।। लिंग बापा हे जुनाट। सिद्धेश्वर प्रभू श्रेष्ठ।।४।। देवी वसती ठायी ठायी। गजानन ते विजयी।।५।। सिद्धाचे हे स्थान थोर। सदा होतो जयजयकार।।६।। लक्ष्मण हीन दीन। करितो प्रभूचे भजन।।७।।

२२७६. विठ्ठलमूर्ती पांडुरंग। वसे प्रभो तो श्रीरंग।।१।। ठायी ठायी ते मारुती। वसतसे रुद्रमूर्ती।।२।। कादर बादशा तो अवलिया। निर्गुण भक्ती प्रिय तया।।३।। वसया त्या ठायी ठायी। श्रावक जाती जीनालयी।।४।। लक्ष्मण हीन दीन। स्तवितो प्रभूचे चरण।।५।।

(आ) ज्योतिर्लिंगे

१. विश्वनाथ

२२७७. नमो नमो विश्वनाथा। परब्रह्म गा समर्था।।१।। अविनाश क्षेत्र काशी। तेथे वास निज प्रभोसी।।२।। असंख्य कल्पे होती जाती। अनंत

अवतार बा होती।।३।। तुझे वैभव अपार। न कळे ब्रह्मादिका पार।।४।। लक्ष्मणा प्रेम द्यावे। अक्षयी तुझे चरणी ठेवावे।।५।।

२२७८. काशीनाथा कीर्ती फार। तू तव स्वानंदा माहेर।।१।। ज्योतिर्लिंग तू अविनाश। तोडितोसी भवपाश।।२।। अनंत ब्रह्मांडामाझारी। ऐसी न दिसे हो पुरी।।३।। लक्ष्मण म्हणे वेद। तूते स्तविती ब्रह्मानंदे।।४।।

२२७९. नमो नमो विश्वेश्वरा। तू तव अनादी सोयरा।।१।। भक्तसखा तू शंकर। सकळ विश्वाचा पितर।।२।। पुराणपुरुष श्रुती म्हणती। अनंत ब्रह्मांडाचा पती।।३।। भुक्ती मुक्ती देशी भक्ती। तुझी न कळे कोणा गती।।४।। लक्ष्मणा चरणसेवा। द्यावी प्रेमे सदाशिवा।।५।।

२२८०. विश्वनाथ विश्वामधी। वससी बा कृपानिधी।।१।। भूकैलास काशीस्थान। अक्षयी तुमचे सदन।।२।। अमर वास बा इच्छिती। तुझे आज्ञे बा वर्तती।।३।। लक्ष्मणा पायी ठेवा। पूर्णब्रह्म सदाशिवा।।४।।

२२८१. नमो नमो विश्वंभरा। विश्वनाथा अगोचरा।।१।। नमो नमो विश्वरूपा। परात्परा ज्ञानदीपा।।२।। विज्ञानाचे तू माहेर। आहेसी बा विश्वेश्वर।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ता। चरणी ठेविसी पतिता।।४।।

२२८२. विश्वनाथा तू परमात्मा। आहेसी विश्वाचा तू आत्मा।।१।। जळामध्ये ते आकाश। तैसा भूती तो महेश।।२।। आहेसी तू सर्वसाक्षी। अनंत ब्रह्मांडाचा अध्यक्ष।।३।। लक्ष्मण म्हणे श्रुती। तुम्हा अक्षयी स्तविती।।४।।

२२८३. काशी तुम्हा अती प्रिय। प्रभो आहेसी सदय।।१।। सगुण भक्तकाजास्तव। भक्ता देशी ब्रह्मभाव।।२।। मग त्या सुखा अंत नाही। भक्त ब्रह्मांडी विजयी।।३।। लक्ष्मणा चरणसेवा। अक्षयी द्यावी महादेवा।।४।।

२२८४. नमो नमो विश्वभरिता। नमो नमो मायातीता।।१।। नमो जगद्गुरू। केवळ स्वानंदचा मेरू।।२।। नमो नमो शुद्ध बुद्धा। नुरविसी भवबाधा।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ता। दुःख नाही कृपावंता।।४।।

२२८५. कृपा तुझी संपादिती। कामिक वैभव इच्छिती।।१।। त्याहा होय ब्रह्मप्राप्ती। त्याते देतोसी संपत्ती।।२।। जैसा ज्याचा देवभाव। तैसा त्यासी तू बा देव।।३।। लक्ष्मणा द्यावी गोडी। चरणामृताची आवडी।।४।।

२२८६. अनंत ब्रह्मांडाच्या कोटी। तुझे इच्छे गा धुर्जटी।।१।। तुझे इच्छेची मांडणी। सर्वाआद्य तू शूळपाणि।।२।। कैवल्यकाशी तुझे स्थान। आहेसी भक्ताचे जीवन।।३।। लक्ष्मण म्हणे काशी। केवळ स्वानंदाची राशी।।४।।

२२८७. विश्वनाथासभोवती। लिंगे अगणित शोभती।।१।। धन्य धन्य आनंदवन। धन्य धन्य तुझे भुवन।।२।। आकाराते जितुके आले। त्याने लिंग हो स्थापिले।।३।। तुझे वैभव अगणित। प्रभो आहेसी निवांत।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ता। मुक्ती देतोसी विरक्ता।।५।।

२. वैद्यनाथ

२२८८. वैद्यनाथा मायातीता। तुम्हा नमो नमो अनंता।।१।। अनंत ब्रह्मांडाचा पती। आहेसी बा कृपामूर्ती।।२।। ज्योतिर्लिंग पुरातन। केवळ आहेसी निर्गुण।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। आनंद देतोसी तू भक्ता।।४।।

२२८९. वैद्यनाथा नमो पूर्णा। प्रभो ब्रह्मसनातना।।१।। परळीक्षेत्र ते अनादी। तेथे वससी तू कृपानिधी।।२।। सकळ तीर्थे तुम्हापाशी। पावन करिसी जगासी।।३।। सगुण भक्तास्तव झालासी। प्रेमे क्षेम भक्ता देशी।।४।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।५।।

२२९०. नमो नमो वैद्यनाथा। परात्परा हो समर्था।।१।। सकळ सिद्धांचा तू राणा। तुम्हा नमो निरंजना।।२।। अनंत क्रीडा बा करिसी। वंद्य सर्वत्रा आहेसी।।३।। लक्ष्मणाते सोडवा। दीना चरणकमळी ठेवा।।४।।

२२९१. वैद्यनाथा अती सदया। तुमचे सत्ते क्रीडे माया।।१।। आनंद आनंद आनंद। तुम्हापाशी ब्रह्मानंद।।२।। ते सुख भक्ताप्रती। कामिका वैभवसंपत्ती।।३।। लक्ष्मणा चरणसेवा। अक्षयी द्यावी महादेवा।।४।।

२२९२. वैद्यनाथ तू ईश्वर। आहेसी ज्ञानाचे माहेर।।१।। चारी वाणीच्या खाणी। तुमचे इच्छेची मांडणी।।२।। अनंत शक्तीचा तू स्वामी। अक्षयी वससी निजधामी।।३।। लक्ष्मण हा अन्यायी। द्वारी पडला क्षेम देई।।४।।

२२९३. तुमच्या नामा नाही अंत। आहेसी तू कर्मातीत।।१।। भक्तास्तव नाना क्रीडा। करितोसी चंद्रचूडा।।२।। नाम ठेविले भक्तांनी। निजभक्ताची तू जननी।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। कल्याण करितोसी तू महादेव।।४।।

२२९४. वैद्यनाथ ज्योतिर्लिंग। करिसी भक्ताते निःसंग।।१।। आदि-मध्ये विश्वामधी। वससी तू कृपानिधी।।२।। अनंत ब्रह्मांडांचा आधार। तुझा आहेसी निर्घोर।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्ध। तुम्हा स्तविती ब्रह्मानंदे।।४।।

२२९५. वैद्यनाथ विश्वंभर। मायागुणाचिया पर।।१।। तोडितो भव ही उपाधी। भक्ता ठेवी निजपदी।।२।। त्याचे कृपे सुख सिद्धा। त्याचे कृपे सौख्य वेदा।।३।। लक्ष्मण म्हणे जीवा। सोडवितो प्रेमे स्तवा।।४।।

२२९६. वैद्यनाथ ब्रह्मानंदी। अक्षयी वसतो कृपानिधी।।१।। अनंत ब्रह्मांडे हा खेळ। सत्तामात्रे हा व्यापार।।२।। चुंबक लोखंडाचे परी। व्याप्त दिसे चराचरी।।३।। लक्ष्मण म्हणे लीला। न कळे सर्वांते वेगळा।।४।।

२२९७. वैद्यनाथ भक्तास्तव। साकारला महादेव।।१।। त्रैलोक्ये ही उपाधी। मायागुणाची ही सिद्धी।।२।। देवादिक्पाळाचे मूळ। केवळ ब्रह्म तो निर्मळ।।३।। लक्ष्मणाचे तू धन। आदि अनादी पंचानन।।४।।

२२९८. वैद्यनाथ तू सदय। भक्ता दावितोसी पाय।।१।। जननी बाळा लावी स्तनी। अती प्रेमा तिचे स्थानी।।२।। तैसा भक्ता सुख देशी। त्याहा वेगळा नोहेसी।।३।। लक्ष्मणा सुख ते द्यावे। चरणी सर्वदा ठेवावे।।४।।

३. बद्री-केदार

२२९९. बद्रिका आश्रम स्थळ पवित्र। योगिजना ते क्षेत्र।।१।। सिद्ध योगी मुनीश्वर। वसती ज्ञानियांचे भार।।२।। तापसांचा मेळा वसे। स्थळ अती श्रेष्ठ असे।।३।। त्यामध्ये नीळकंठ। केवळ स्वानंदाची पेठ।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। अक्षयी समाधिस्थ देव।।५।।

२३००. नमो नमो प्रभो केदारा। मायागुणाचिया परा।।१।। ज्योतिर्लिंगा गा अभंगा। नमो नमो बा निःसंगा।।२।। असंख्य युगे होती जाती। तुझी अविनाश ज्ञप्ती।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ता। सुख देशी विश्वभरिता।।४।।

२३०१. वैराग्याचा मुकुटमणी। आहेसी बा शूळपाणि।।१।। बद्रिनाथा कामांतका। अनंत ब्रह्मांडनायका।।२।। स्वर्गतरंगिणी गंगा। तुम्हापाशी ब्रह्मलिंगा।।३।। भक्तास्तव तू साकार। करिसी दीनांचा उद्धार।।४।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।५।।

२३०२. तुमचे वैभव अगणित। वेदा सिद्धा न कळे अंत।।१।। तुम्हापाशी

ब्रह्मज्ञानी। अक्षयी शोभती शूळपाणि।।२।। अनंत ब्रह्मांडाचा पती। प्रभो श्रेष्ठ कृपामूर्ती।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। स्वानंदसुखाचा तू भोक्ता।।४।।

२३०३. ब्रह्मकल्प निमिषात। ऐसे मुनी ते निवांत।।१।। स्वये ब्रह्म मुनी झाले। आपआपणा ओळखिले।।२।। त्याहामाजी बद्रिनाथ। शोभे स्वानंदभरित।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। प्रभोसखे ते निवांत।।४।।

२३०४. नमो नमो प्रभो केदारा। जगद्गुरू गंगाधरा।।१।। गंगा चंद्र शोभे भाळी। तृप्त स्वानंदकल्लोळी।।२।। मायागुणा चेष्टविसी। स्वयंप्रकाश आहेसी।।३।। लक्ष्मणा स्मरणी ठेवा। पूर्णब्रह्म सदाशिवा।।४।।

२३०५. बद्रिनाथा तुमची कीर्ती। भाट अठ्ठावीस वर्णिती।।१।। सिद्ध अक्षयी तुझे ध्यानी। ब्रह्मानंदाची खाणी।।२।। भक्ता देशी तो आनंद। परमात्मा तू शुद्ध बुद्ध।।३।। लक्ष्मण हा अपराधी। सोडवा हो कृपानिधी।।४।।

२३०६. ज्योतिर्लिंग तू स्वयंभ। तुजमाजी वसे नभ।।१।। सकळ तत्त्वांचा पसारा। तुजमाजी वसे सारा।।२।। भक्तास्तव देहधारी। क्रीडा करिसी नानापरी।।३।। लक्ष्मणावरी कृपा। करावी हो विश्वरूपा।।४।।

२३०७. परब्रह्म तू केदार। भक्तजनांचे माहेर।।१।। देव येती दर्शनाते। प्रेमे पुजिती तुम्हाते।।२।। तुमची कृपा संपादिती। म्हणूनि सुखा पात्र होती।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। तुझे चरणी निवांत।।४।।

२३०८. नरनारायण मुनी। सदा रत तुमचे ध्यानी।।१।। लिंग पुजिती सप्रेम। सर्वत्राचे तू निजधाम।।२।। अगणित तुझ्या विभूती। केदार तू कृपामूर्ती।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। आपुलेपण देशी भक्ता।।४।।

२३०९. अनादी तू प्रभो केदार। तुझे वैभव अपार।।१।। वैभव देशी भक्ताप्रती। ब्रह्मसुख ते भोगिती।।२।। ब्रह्मांड राज्य ते कामिका। देशी विश्व रे व्यापका।।३।। लक्ष्मणा प्रेम द्यावे। अक्षयी गुण वदवावे।।४।।

२३१०. भजा भजा रे केदार। केदार सकळाचे माहेर।।१।। बद्रिनाथ लिंग जाणा। बद्रिनाथ पाहा नयना।।२।। नांदे हेमाद्री गिरीवरी। दर्शन घ्या हो लवकरी।।३।। लक्ष्मण म्हणे बद्रिराणा। पाहा तो पूर्णब्रह्म जाणा।।४।।

४. महाकालेश्वर

२३११. अहो क्षिप्रागंगेतीरी। शोभे उज्जयिनी ती पुरी।।१।। अती पवित्र

ते स्थान। तेथे वसे पंचानन।।२।। ज्योतिर्लिंग महाकाल। मायातीत तो निर्मळ।।३।। भक्तास्तव तो साकार। भक्तजनांचे माहेर।।४।। लक्ष्मण म्हणे तात। सदा स्वानंदभरित।।५।।

२३१२. कालातीत कर्मातीत। केवळ प्रभो तो निवांत।।१।। महाकाल श्रुती म्हणती। भक्तसखा तो पशुपती।।२।। अनंत क्रीडा भक्तास्तव। त्याचे न कळे वैभव।।३।। लक्ष्मण म्हणे योगी। प्रेमे ध्याती प्रभोलागी।।४।।

२३१३. देव तो आहे सर्वत्राचा। प्रभो असंख्य कालाचा।।१।। केवळ निर्गुण निर्शून्य। भक्तास्तव तो सगुण।।२।। अर्ध्या अंगी मायादेवी। त्याचे वैभव अक्षयी।।३।। लक्ष्मणाचे अंतरी। तोचि वसे चराचरी।।४।।

२३१४. नामरूप भक्तासाठी। विष धरिले बा कंठी।।१।। केवळ निष्काम निष्काम। भक्तास्तव शोभे त्या धाम।।२।। अनंत ब्रह्मांडा आंतर-। बाहेर तो विश्वंभर।।३।। लक्ष्मणा तो बोलवी। स्वस्थ स्वानंदाचे ठायी।।४।।

२३१५. कालावरी ज्याची सत्ता। प्रभो कालाते निर्मिता।।१।। आपण सर्वदा विजयी। वसे भक्ताचे हृदयी।।२।। क्रुराप्रती अती क्रूर। चालवी ब्रह्मांडव्यापार।।३।। लक्ष्मण म्हणे धनी। केला स्वाधीन भक्तांनी।।४।।

२३१६. महाकाला परात्परा। नित्यमुक्ता निरंतरा।।१।। नित्य आनंद तुजपाशी। केवळ निजानंदाची राशी।।२।। काळ भक्षितो जगाला। तू तव वंद्य बा काळाला।।३।। साधुजनाते सदय। दाखविसी त्याते पाय।।४।। लक्ष्मणाचे तू धन। भक्तकाजा तू सगुण।।५।।

२३१७. जग भांबावले फार। करिती असत्य व्यापार।।१।। स्वधर्म सांडती दुर्मती। भक्तिमार्ग तो सोडिती।।२।। यास्तव तुमचा अवतार। आहेसी भक्ताचे माहेर।।३।। लक्ष्मण म्हणे सत्य। तुजपाशी सदोदित।।४।।

२३१८. नमो नमो महाकाला। प्रभो तुमची न कळे लीला।।१।। अनंत ब्रह्मांडसंपत्ती। वमन मानिता पशुपती।।२।। ब्रह्मसुख तुम्हा साजे। देवा तुमचे कृपे राज्य।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। वंद्य आम्हासी कृतांता।।४।।

२३१९. प्रभो उज्जयिनीचे ठायी। लिंगरूपी तू अक्षयी।।१।। करिसी भक्ताचे कल्याण। भक्त करिती पूजन।।२।। अमर पुजिती प्रभोते। सौख्य देतोसी त्याहाते।।३।। लक्ष्मणा अनाथाते। सोडवावे कृपावंते।।४।।

२३२०. सनकादिक महायोगी। प्रेमे ध्याती तुम्हालागी।।१।। निष्काम करिसी तू भक्ता। तुम्हा नमो हो अनंता।।२।। दुष्ट मारिले दुर्मती। भक्ती स्थापिता पशुपती।।३।। लक्ष्मण हा सोडवा। चरणकमळी प्रभो ठेवा।।४।।

२३२१. महिमा तुमचा कळेना। दीनानाथा विश्वजीवना।।१।। अक्षर अनादी आहेसी। मायागुणे क्षर दिससी।।२।। स्वेच्छे आकाशाचे परी। व्याप्त दिससी चराचरी।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। पावन करा मज पतिता।।४।।

५. ओंकार अमलेश्वर

२३२२. नमो नमो मूळ ओंकारा। अमलेश्वरा परात्परा।।१।। तुम्हापासून वेद झाले। विश्व तुम्हीच निर्मिले।।२।। आकार उकार मकार। अर्धमात्रा तू ओंकार।।३।। लक्ष्मण म्हणे श्रुती। अक्षयी तुम्हाते स्तविती।।४।।

२३२३. नमो नमो ओंकारेश्वरा। दीनानाथा अजरामरा।।१।। भक्तास्तव रेवातीरी। वससी बा मदनारी।।२।। निष्काम करिसी तू भक्ता। शाश्वत सुखाचा तू भोक्ता।।३।। लक्ष्मणा सुख ते द्यावे। चरणापाशी हो ठेवावे।।४।।

२३२४. रेवातीरी ते पवित्र। आदि अनादी ते क्षेत्र।।१।। सहपरिवारे तेथे वससी। पावन करिसी जगासी।।२।। नमो नमो मूळ ओंकारा। विश्वव्यापका विश्वेश्वरा।।३।। लक्ष्मण म्हणे पूर्णा। तुम्हा नमो निरंजना।।४।।

२३२५. नमो नमो विश्वंभरा। नमो नमो मूळ ओंकारा।।१।। तुझे स्वरूप अलक्ष्य। आहेसी तू सर्वसाक्ष।।२।। असंख्य क्रीडा बा करिसी। कर्मा लिप्त न बा होसी।।३।। लक्ष्मणावरी कृपा। करावी हो विश्वरूपा।।४।।

२३२६. नमो नमो प्रभो ओंकारा। तू तव अनादी सोयरा।।१।। साधू सिद्ध तुम्हा ध्याती। तू तव चिन्मात्र बा ज्योती।।२।। भक्तास्तव अनेक क्रीडा। करिसी बा चंद्रचूडा।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। पावन करितोसी पतिता।।४।।

२३२७. नमो नमो कामांतका। नमो नमो भवांतका।।१।। नमो नमो विश्वांतका। नमो नमो दैत्यांतका।।२।। नमो नमो मृत्युंजया। नमो नमो ज्ञानसूर्या।।३।। लक्ष्मण म्हणे ओंकारा। आहेसी भक्ताचा सोयरा।।४।।

२३२८. अनंत ब्रह्मांडे उभविसी। क्षणामाजी लपविसी।।१।। ऐसा तुझा दिसे खेळ। खेळ खेळूनि निर्मळ।।२।। कृपा अक्षयी भक्तावरी। व्याप्त

दिससी चराचरी।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

२३२९. परमात्मा तू ओंकार। ज्योतिर्लिंग जगदीश्वर।।१।। करावया जगदुद्धार। ज्योतिर्लिंग तू सबराभर।।२।। स्वयंप्रकाश आहेसी। क्षेम निजभक्ता देशी।।३।। हीन विनवी लक्ष्मण। भक्तास्तव तू सगुण।।४।।

२३३०. ज्योतिर्लिंगा बा ओंकारा। तुम्हा नमो निर्विकारा।।१।। विकार भक्तांचे वारिसी। निजपदी बैसविसी।।२।। तुजपाशी अद्वयसुख। ब्रह्मादिका न करवे लेख।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। सुख देशी निजभक्ता।।४।।

२३३१. केवळ अनाक्षर आहेसी। सगुण भक्तास्तव झालासी।।१।। स्वमाये बा क्रीडा करिसी। अंत नाही त्या भाग्यासी।।२।। तुजऐसा भाग्यवंत। कोणी नाही त्रैलोक्यात।।३।। लक्ष्मण म्हणे ओंकारा। भक्ता देशी तेथे थारा।।४।।

२३३२. अरे नर्मदेचे काठी। बैसलासी बा धुर्जटी।।१।। जगा करिसी पावन। आहेसी भक्ताचे जीवन।।२।। मूळ ओंकारा विश्वेश्वरा। पतितपावन दिससी खरा।।३।। लक्ष्मण हा पतित। पावन करा हो त्वरित।।४।।

६. सोमनाथ

२३३३. अहो सौराष्ट्र त्या देशी। अति प्रेमे बैसलासी।।१।। सोमनाथ जगद्गुरू। केवळ स्वानंदाचा मेरू।।२।। भक्ता आनंद तो देशी। त्याहा वेगळा नव्हेसी।।३।। अनंत ब्रह्मांडमांडणी। केली स्वमायेकरूनि।।४।। लक्ष्मणा प्रेम द्यावे। दीनाप्रती सांभाळावे।।५।।

२३३४. सोमनाथा ज्योतिर्लिंगा। तुम्हा नमो बा नि:संगा।।१।। स्वामी कीर्ती तुझी थोर। आहेसी दयेचे आगर।।२।। त्रैलोक्याचे तू दैवत। प्रभो आहेसी निवांत।।३।। लक्ष्मणा द्यावी भक्ती। तुमचा म्हणवितो पशुपती।।४।।

२३३५. अद्वयसंपत्ती तुजपाशी। निजभक्ताते तू देशी।।१।। कामिक भजती तुजला। राज्यवैभव देशी त्याला।।२।। तापत्रय तू वारिसी। भक्तास्वाधीन झालासी।।३।। लक्ष्मण विनविता। सोमनाथा विश्वभरिता।।४।।

२३३६. पूर्वी सोमाने पूजन। तुमचे केले प्रेमेकरून।।१।। अती आनंद त्याते दिला। चंद्र अती प्रिय तुजला।।२।। सोमनाथा दयानिधी। तुम्हापाशी

तिष्ठती सिद्धी।।३।। लक्ष्मण म्हणे मुनी। प्रेमे ध्याती तुजलागूनि।।४।।

२३३७. देव येती तुम्हा शरण। करिसी त्याहाचे कल्याण।।१।। प्रभो ब्रह्मांडसंपत्ती। तुझे कृपे ते भोगिती।।२।। अती उदार तू धनी। तुम्हा शरण चक्रपाणि।।३।। पुराणपुरुष सोमनाथा। पावन करिसी अनाथा।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। पावन करा मज पतिता।।५।।

२३३८. नमो नमो सोमनाथा। अनंत ब्रह्मांडाच्या नाथा।।१।। गुणातीत तू निर्गुण। भक्तकाजास्तव सगुण।।२।। तुझे कर्तृत्व कळेना। पार कोणाते लागेना।।३।। लक्ष्मण म्हणे तूचि। आशा पुरविसी दीनाची।।४।।

२३३९. नमो नमो सोमनाथा। अति स्नेहाळा समर्था।।१।। स्त्रीपुत्राहूनि थोर। तुमचा प्रेमा भक्तावर।।२।। भक्ते जिंकिले बा तूते। भक्तिसुख देशी त्याते।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। तोडिसी जन्ममरण गुंता।।४।।

२३४०. सोमनाथा विश्वभरिता। सोमनाथा विश्वातीता।।१।। सोमनाथा अती शांता। दयेचा तू अब्धी ताता।।२।। शरणांगता देशी शांती। ब्रह्मानंदी त्याहा वस्ती।।३।। लक्ष्मणा सुख ते द्यावे। चरणापाशी बा ठेवावे।।४।।

२३४१. सोमनाथा नित्यानंदा। सोमनाथा ब्रह्मानंदा।।१।। सोमनाथा चिन्मयखाणी। योगी रमती तुझे चरणी।।२।। चरणकमळी सुख भक्ता। नमो नमो प्रभो अनंता।।३।। लक्ष्मण म्हणे दीना। प्रेमे रक्षिसी कृपाघना।।४।।

२३४२. सोमनाथा विश्वामधी। आहेसी बा कृपानिधी।।१।। आहेसी स्थूळ अति सूक्ष्म। निर्द्वंद्व तू आत्माराम।।२।। स्वमाये तू सगुण। झालासी बा पंचवदन।।३।। जैसा जैसा पडे वख्त। तैसा दिससी बा अनंत।।४।। लक्ष्मणावरी कृपा। करावी हो मायबापा।।५।।

२३४३. सोमनाथा बहु शिणलो। अति कासावीस झालो।।१।। तुमचा पडला विसर। दुःख भोगिले अपार।।२।। म्हणूनि आलो बा शरण। त्वरे सोडवा येथून।।३।। लक्ष्मणा चरणी ठेवा। प्रभो तोडा भवगोवा।।४।।

७. त्र्यंबकेश्वर

२३४४. ब्रह्मगिरीवरी वससी। पूर्णब्रह्म बा आहेसी।।१।। ब्रह्मानंदाची तू खाणी। ब्रह्मसनातन तू शूळपाणि।।२।। ब्रह्म करिसी तू भक्ता। भक्तापाशी वससी ताता।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। देतोसी बा भक्ताप्रती।।४।।

२३४५. ब्रह्मगिरी ब्रह्मस्थान। योगियाचे रम्य स्थान।।१।। तापस बैसले लिंगार्चनी। कोणी धाले शिवध्यानी।।२।। लिंगस्थळी स्थळी वस्ती। तेथे अक्षयी पशुपती।।३।। लक्ष्मण म्हणे निरामय। स्तविती कोणी प्रभोपाय।।४।।

२३४६. तेथे मुख्य त्र्यंबकराज। ज्योतिर्लिंग सर्वा पूज्य।।१।। त्र्यंबक अनादी अनादी। भक्ता देतो निजसिद्धी।।२।। सिद्ध मुनी योगीश्वर। प्रभो ध्याती निरंतर।।३।। लक्ष्मण म्हणे तात। प्रेमे पावन करितो भक्त।।४।।

२३४७. नमो नमो बा त्र्यंबका। नमो नमो बा व्यापका।।१।। नमो नमो ज्ञानसूर्या। नमो नमो योगिराया।।२।। नमो नमो अती सदया। केवळ ब्रह्मा निरामया।।३।। अनंत ब्रह्मांडाचा राजा। आहेसी बा वृषभध्वजा।।४।। तुझे वैभव अगणित। ब्रह्मादिका न कळे अंत।।५।। लक्ष्मण म्हणे किती। वर्णू केवळ मी दुर्मती।।६।।

२३४८. नमो नमो केवळ अजरामरा। नमो नमो गंगाधरा।।१।। नमो नमो अगोचरा। नमो नमो परात्परा।।२।। भक्तास्तव तू साकार। अनेक करिसी व्यापार।।३।। लक्ष्मणा दीनाप्रती। सोडवावे कृपामूर्ती।।४।।

२३४९. देवा वैभवी गोविले। राज्य ब्रह्मांडाचे दिले।।१।। मानव तूते विसरले। ते तव दुःखार्णवी पडले।।२।। जन्म मृत्यू येरझारा। करिताती गंगाधरा।।३।। लक्ष्मण म्हणे श्रमले। तुझे पायी विसरले।।४।।

२३५०. गंगेमुळी बैसलासी। हीना दीना उद्धरिसी।।१।। करिसी धर्माचे स्थापन। दुष्ट काढीसी भवातून।।२।। प्रभो भवानी रे कांता। शाश्वतपदीचा तू भोक्ता।।३।। लक्ष्मणा पतिताते। सुख दिले बा हीनाते।।४।।

२३५१. भक्तवत्सल आहेसी। भक्ता अती सौख्य देशी।।१।। वैराग्य हे तुझे भाग्य। केवळ आहेसी निःसंग।।२।। देव येती दर्शनासी। प्रेमे पुजिती तुम्हासी।।३।। लक्ष्मण म्हणे कृपा। संपादिती स्वस्वरूपा।।४।।

२३५२. त्र्यंबकराजा मायातीता। आहेसी तू विश्वपिता।।१।। तुझे सत्तेने गीर्वाण। अती झाले बा सधन।।२।। हरी विरंची तुझे स्मरणी। वेद झाले तुजपासूनि।।३।। लक्ष्मण म्हणे क्रीडा। करिसी अगणित चंद्रचूडा।।४।।

२३५३. वैभव तुमचे अक्षयी। अतिक्षेम तुमचे ठायी।।१।। सनकादिकाची संपत्ती। तुझे भक्त ते भोगिती।।२।। कामिका राज्यवैभव। देशी श्रेष्ठ तू

महादेव।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

२३५४. त्र्यंबकराजा मी अन्यायी। मज पतिता कोणी नाही।।१।। आम्हा सर्वस्वी आधार। तुम्ही कृपेचे आगर।।२।। प्रेमे कृपा करा करा। आहेसी अनादी सोयरा।।३।। लक्ष्मण म्हणे चरणी। मज ठेवा हो शूळपाणि।।४।।

८. भीमाशंकर

२३५५. भक्ती निर्मिली नवविधा। तुमचे कृपे वैभव सिद्धा।।१।। नवविधा तुमची भक्ती। भक्तापाशी सर्व मुक्ती।।२।। वैराग्य तुम्हापाशी। विश्वा वंद्य तू आहेसी।।३।। लक्ष्मण म्हणे सगुण। भक्तास्तव पंचवदन।।४।।

२३५६. भीमाशंकर तू हर। भीमाउगमी परात्पर।।१।। दैत्य मर्दिले दुर्मती। सौख्य देशी भक्ताप्रती।।२।। लक्ष्मणा भक्ती द्यावी। दुजे न लगे त्याते काही।।३।।

२३५७. भीमा तुम्हापासून झाली। जगा उद्धरी माउली।।१।। तिचे स्नाने उद्धरले। जग पावन बा झाले।।२।। सकळ तापसांचा राजा। आहेसी बा वृषभध्वजा।।३।। लक्ष्मण म्हणे जगा। पावन करिसी ब्रह्मलिंगा।।४।।

२३५८. ज्योतिर्लिंग तू बा हर। श्रेष्ठ तू भीमाशंकर।।१।। कीर्ती तुझी त्रिभुवनी। भक्तजनांची तू जननी।।२।। फार क्रूर निवटिले। जगाप्रती सांभाळिले।।३।। भक्ता वेगळा न होशी। अक्षयी वससी भक्तापाशी।।४।। लक्ष्मण म्हणे ज्ञान। देऊनि छेदिसी अज्ञान।।५।।

२३५९. चारी वाणी चारी खाणी। तुमचे माये हो पासूनि।।१।। मायेपासून या झाले। अनंत ब्रह्मांडे रचिले।।२।। मायागुणा तुझी सत्ता। सर्वसाक्षी मायातीता।।३।। लक्ष्मण म्हणे स्वस्थ। आहेसी बा तू शाश्वत।।४।।

२३६०. ज्योतिर्लिंगा तुम्हाप्रती। ज्ञानी अक्षयी बा ध्याती।।१।। ध्यान धारणा समाधी। तुमचे कृपे सर्वसिद्धी।।२।। अष्टांगयोग ज्ञानयोग। तुजपासूनि कर्ममार्ग।।३।। सर्वा आदि-मध्ये तू अंती। केवळ ब्रह्मानंद ज्ञप्ती।।४।। लक्ष्मण म्हणे सत्ता। तुझी श्रेष्ठ मायातीता।।५।।

२३६१. भक्त जैसा धरी भाव। तैसा त्यासी दिसशी देव।।१।। परि तू अनादी एकला। अनंत करितोसी लीला।।२।। भक्तमनोरथ पुरविसी। आपुलेपण त्याहा देसी।।३।। लक्ष्मण विनवी शंकरा। भक्तास्वाधीन तू खरा।।४।।

२३६२. भक्तास्तव तू येरझार। भक्तास्तव तू साकार।।१।। त्रिशूल भक्तास्तव हाती। नाना आयुधे शोभती।।२।। भक्तास्तव गजांबर। भक्तास्तव व्याघ्रांबर।।३।। भक्तीस्तव फणिवर। वसती बा अंगावर।।४।। लक्ष्मण म्हणे शंकर। भक्तास्वाधीन तू हर।।५।।

२३६३. भीमाअंगीचा हा घाम। तू तव ब्रह्मीचे निजधाम।।१।। भीमाशंकर हे नाम। भक्ते ठेविले निष्काम।।२।। नामरूपातीत तू शिव। सकळ देवांचा तू देव।।३।। लक्ष्मण म्हणे पूर्णा। अतिप्रिय तू नारायणा।।४।।

२३६४. नमो नमो कृपासमुद्रा। नमो नमो महारुद्रा।।१।। भीमाशंकर तू दयाळ। परब्रह्म जाश्वनीळ।।२।। नित्यानंद तुम्हापाशी। सुख देशी ते भक्तासी।।३।। लक्ष्मणा सांभाळावे। प्रभो आपुले म्हणावे।।४।।

२३६५. नमो नमो जगद्गुरू। नमो नमो विश्वंभरू।।१।। दीनानाथा विश्वपती। भक्ता देशी उत्तम गती।।२।। अति श्रेष्ठा निरुपमा। आहेसी विश्वाचा तू आत्मा।।३।। लक्ष्मण बहू अन्यायी। शंभो वेगी ठेवा पायी।।४।।

९. नागनाथ

२३६६. नागेंद्र कुंडल तू हर। नागाचे तुज अलंकार।।१।। नागाचे तुज यज्ञोपवित। नागाचे कटिसूत्र शोभते।।२।। नागाचा कंठी शोभे हार। नागनाथ तू विश्वंभर।।३।। लक्ष्मण विनवी प्रेमे। केवळ स्वानंदाचे धाम।।४।।

२३६७. ज्योतिर्लिंगा नागनाथा। तुम्हा नमो हो समर्था।।१।। प्रभोचे वैभव अपार। वेदशास्त्रा नकळे पार।।२।। सहस्रमुख तो शिणला। जिव्हा द्विविध झाल्या।।३।। शंभो तू बा विश्वपती। देव दर्शनाते येती।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। शाश्वत सुखाचा तू भोक्ता।।५।।

२३६८. नागनाथा अगोचरा। दीनानाथा परात्परा।।१।। भक्तास्तव नाना व्यक्ती। धरिसी बा कृपामूर्ती।।२।। शूलपाणि सर्वेश्वर। तू बा विश्वाचे माहेर।।३।। लक्ष्मणा सांभाळावे। दीन अनाथा तारावे।।४।।

२३६९. दीनानाथा तू अनंत। आहेसी आनंदभरित।।१।। मायागुणे क्रीडा करिसी। अति सदय आहेसी।।२।। अनंत ब्रह्मांडाच्या कोटी। होती तुझे मायेपोटी।।३।। लक्ष्मण म्हणे वेगळा। आहेसी बा जाश्वनीळा।।४।।

२३७०. नागनाथा ज्योतिर्लिंगा। केवळ ब्रह्म तू नि:संगा।।१।। भक्ताप्रती

तुझा स्मर। पडला जगाते विसर।।२।। ताप त्रिविध भोगती। नाना कासावीस होती।।३।। लक्ष्मण म्हणे शिवा। सोडविसी महादेवा।।४।।

२३७१. औंढ्यामध्ये नागनाथ। वसतो दयाळू समर्थ।।१।। त्याचे करा हो पूजन। करा प्रेमे हो भजन।।२।। भजने तरल्या नरनारी। व्याप्त दिससी चराचरी।।३।। लक्ष्मणाते बोलवी। तोचि वसे सर्वठायी।।४।।

२३७२. अहो साधुत्व देतसे। निजभक्ताते महेश।।१।। त्याते भक्ती अति प्रिय। प्रभो करतो निरामय।।२।। केवळ निर्गुण निर्गुण। भक्तास्तव पंचवदन।।३।। नागनाथ ज्योतिर्लिंग। लक्ष्मणा केले नि:संग।।४।।

२३७३. अहो सत्त्व रज तम। त्याचे मायेचे ते गुण।।१।। अनंत ब्रह्मांडे मांडणी। त्याचे मायेची ही करणी।।२।। माया त्याचे सत्ते क्रीडे। आपण साक्षी चंद्रचूड।।३।। लक्ष्मण म्हणे आत्मा। नागनाथ तो सर्वात्मा।।४।।

२३७४. तुझी कीर्ती ही अक्षयी। तुझ्या भाग्या पार नाही।।१।। तुझ्या लीला अगणित। भाग्य वैराग्य सतत।।२।। ते भाग्य भक्ता देशी। चरणापाशी त्या स्थापिसी।।३।। नागनाथा ज्योतिर्लिंगा। तुम्हा नमो हो नि:संगा।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। पायी ठेवा मज पतिता।।५।।

२३७५. नमो नमो नागनाथा। अति सदया समर्था।।१।। दयेचा तू केवळ निधी। ज्ञानाचा तू बा क्षीराब्धी।।२।। पतितपावन नाम तुमचे। करिता कल्याण भक्ताचे।।३।। लक्ष्मण विनवी दीन। तोचि सर्वांचे जीवन।।४।।

२३७६. नागनाथा तू अनादी। ज्योतिर्लिंग कृपानिधी।।१।। अति अन्यायी अन्यायी। पडलो अविद्याप्रवाही।।२।। कोण सोडवील दीना। तुम्हाविण पंचानना।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

१०. घृष्णेश्वर

२३७७. कामिकवनी केला वास। तुमचा न कळे विलास।।१।। भक्ता करिसी निष्काम। तू तव स्वानंदाचे धाम।।२।। भोग भोगूनि अभोक्ता। कर्म करूनि अकर्ता।।३।। लक्ष्मण म्हणे नि:संग। घृष्णेश्वर तू ज्योतिर्लिंग।।४।।

२३७८. पद्मपत्र जळावरी। तैसा जगी तू त्रिपुरारी।।१।। जळामध्ये ते आकाश। तैसा विश्वी तू महेश।।२।। लोहचुंबकाचे परी। क्रीडा करिसी नानापरी।।३।। लक्ष्मण म्हणे हर। अतिश्रेष्ठ तू घृष्णेश्वर।।४।।

२३७९. कामिक वनामाजी वससी। स्वयंप्रकाशी आहेसी।।१।। भक्ता भवव्याधी नाही। सखा तू त्याते अक्षयी।।२।। षड्वैरी हे अती खळ। भक्तापुढे न चले बळ।।३।। लक्ष्मण अती हीन। कोण त्राता त्याकारण।।४।।

२३८०. भक्तास्तव देहधारी। झालासी बा त्रिपुरारी।।१।। नामे तूते अगणित। सहस्रमुखा न कळे अंत।।२।। घृष्णेश्वर तू वेरुळी। भक्तसखा चंद्रमौळी।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

२३८१. घृष्णेश्वरा ब्रह्मसदना। शुद्ध बुद्ध निरंजना।।१।। जनी वनी सबराभर। शोभसी बा विश्वंभर।।२।। मायागुणे तू क्रीडसी। अनंत विलास करिसी।।३।। लक्ष्मण म्हणे वेद। प्रेमे ध्याती तूते सिद्ध।।४।।

२३८२. घृष्णेश्वर कामांतक। आहेसी बा विश्वव्यापक।।१।। प्रभो तुझे जे का सुख। प्रेमे सेविती भाविक।।२।। अभाविक गेले वाया। वाया शिणविली काया।।३।। लक्ष्मण म्हणे तूचि। सावली आहेसी सर्वांची।।४।।

२३८३. नमो नमो घृष्णेश्वरा। नमो नमो परात्परा।।१।। तुजपाशी ब्रह्मानंद। मिथ्या दिसे बाह्यानंद।।२।। क्षुल्लकानंदी पडले प्राणी। त्याहा सुख नसे स्वप्नी।।३।। लक्ष्मण बहु चुकला। तुमचे पाय विसरला।।४।।

२३८४. तूते चुकलो चुकलो। मायाप्रवाही पडलो।।१।। म्हणूनि यातना यातना। भोगीतसे प्रभो नाना।।२।। त्रिशूल खड्ग घेऊन। करी तापाचे खंडन।।३।। लक्ष्मण तुझे श्वान। धरा त्याचा अभिमान।।४।।

२३८५. घृष्णेश्वरा तू दयाळ। भक्तास्तव हा केला खेळ।।१।। बुद्धिबळाचे सैन्य। खेळविती श्रीमंत जन।।२।। काय कष्टाप्रती बळ। श्रीमंत खेळती खेळ।।३।। तैसा ब्रह्मांडव्यापार। तुझे सत्ते तू ईश्वर।।४।। लक्ष्मण म्हणे सत्ता। तुझी श्रेष्ठ विश्वताता।।५।।

२३८६. घृष्णेश्वर तू शंकर। आदि अनादी ईश्वर।।१।। ज्योतिर्लिंग भक्तासाठी। विष शोभे तुझे कंठी।।२।। अनेक तीर्थे चरणापाशी। शोभती बा अहर्निशी।।३।। देव येती हो दर्शना। शंभो पतितपावना।।४।। दीन विनवी लक्ष्मण। तुजविण त्राता कोण।।५।।

२३८७. नमो नमो घृष्णेश्वरा। तू तव भक्ताचा सोयरा।।१।। मायिक सोयरा नाहीसी। भक्तलळे पुरविसी।।२।। तुजपाशी परोपकार। शंभो दिसे

रे अपार।।३।। लक्ष्मण दीन विनवी। तुझा महिमा अक्षयी।।४।।

११. श्रीशैल्य मल्लिकार्जुन

२३८८. लिंगपर्वत भूकैलास। तेथे प्रभोने केला वास।।१।। श्रीशैल ते शिखर। सकळ योगियांचे घर।।२।। अनंत ब्रह्मांडाचा पती। लिंगरूप तू पशुपती।।३।। भक्तकाजा तू साकार। दीनानाथ विश्वंभर।।४।। लक्ष्मण म्हणे हर। केवळ कल्याणाचे घर।।५।।

२३८९. ज्योतिर्लिंग कृपानिधी। पायापाशी सर्वसिद्धी।।१।। योगी तापस तेथे वसती। दर्शनमात्रे देतो गती।।२।। लिंग अनेक तेथे वसती। जगा पावन करिती।।३।। त्याहामध्ये ज्योतिर्लिंग। मल्लिकार्जुन ते नि:संग।।४।। अनंत ब्रह्मांडे उभवी। क्षेत्रामाजी तो लपवी।।५।। लक्ष्मण म्हणे तात। अनंत ब्रह्मांडभरित।।६।।

२३९०. अमर करिती लिंगपूजन। येती सर्वत्र गीर्वाण।।१।। ब्रह्मदेव नारायण। प्रेमे करिती पूजन।।२।। अठ्ठ्यांशी सहस्र मुनी। येती दर्शनालागूनि।।३।। त्याच्या वैभवा नाही अंत। प्रभो स्वानंदभरित।।४।। लक्ष्मण म्हणे शिव। सदासंतुष्ट महादेव।।५।।

२३९१. त्रिविध तापाचे खंडन। करितो अक्षयी कल्याण।।१।। साधुत्व येतसे अंगा। तोडीतसे भवसंगा।।२।। ब्रह्मसुख होय प्राप्त। मीतूपणा होय अंत।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्ध। भोगिती ते ब्रह्मानंद।।४।।

२३९२. अहो वेदान्ता सिद्धान्ता। मूळ तुम्ही आहा ताता।।१।। प्रभो श्रेष्ठा गंगाधरा। नमो नमो अनाक्षरा।।२।। विश्वामध्ये क्रीडतोसी। विश्वा प्रेमे बा पाळिसी।।३।। लक्ष्मण म्हणे कृपा। तुजपाशी विश्वरूपा।।४।।

२३९३. तुम्हापाशी आनंद मोठा। भक्ता देतोसी नीळकंठा।।१।। मल्लिकार्जुन तुझे नाम। तूते स्तविती निगम।।२।। सर्व सूत्र तुझ्या हाती। मायागुणे क्रीडतोसी।।३।। भक्तलळे पुरविसी। भक्तास्वाधीन झालासी।।४।। लक्ष्मण म्हणे देव। परमात्मा तू सदाशिव।।५।।

२३९४. वाट पाहतो भक्ताची। अति प्रीती निजभक्ताची।।१।। पाताळगंगा तेथे वसे। जगा पावन करीतसे।।२।। अगणित देतो भाग्य। त्याते प्रिय ते वैराग्य।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ता। आपुलेपण देतो ध्याता।।४।।

२३९५. मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग। स्मरा तोडितो भवसंग।।१।। वस्तुमय तो एकान्त। भक्ता होतसे हो प्राप्त।।२।। धन्य प्रभोची करणी। त्याचे भाग्य नेणती प्राणी।।३।। दीन विनवी लक्ष्मण। प्रभो विश्वाचे जीवन।।४।।

२३९६. कामिकाचे पुरवी काम। निजभक्ता देतो प्रेम।।१।। प्रेमे करिती ते भक्ती। त्याहापाशी चारी मुक्ती।।२।। भक्ती माहेर सिद्धांचे। स्थान आहे विश्रांतीचे।।३।। लक्ष्मण विनवी प्रेमे। करा भक्ती नित्यनेमे।।४।।

२३९७. मल्लिकार्जुन कृपा करी। त्याचा प्रेमा भक्तावरी।।१।। निवारूनि भवकष्ट। पावन करितो नीलकंठ।।२।। स्थान प्रभोचे अति श्रेष्ठ। निवारितो जन्मकष्ट।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।४।।

२३९८. मल्लिकार्जुन अति सदय। प्रभो आहे निरामय।।१।। अनंत ब्रह्मांडे हे रोळ। त्याचे मायेचा हा खेळ।।२।। लिंग आहे ते स्वयंभ। प्रभो स्वानंदाचा स्तंभ।।३।। लक्ष्मणाचे तो धन। ज्योतिर्लिंग पुरातन।।४।।

१२. रामेश्वर

२३९९. श्रीरामाचा तू आत्मा। आहेसी प्रभू तू विश्वात्मा।।१।। तुझे नामा नाही अंत। श्रुती म्हणती अनंत।।२।। अनंत ब्रह्मांडाअंतरी। वसतोसी बा बाहेरी।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्धा। वंद्य आहे तो सर्वदा।।४।।

२४००. सिंधुतीरी त्रिपुरारी। बैसलासी सहपरिवारी।।१।। त्रैलोक्य यात्रा प्रभोपाशी। अमर येती पुजनासी।।२।। ऋषी सिद्ध महाज्ञानी। येती दर्शनालागूनि।।३।। लक्ष्मण म्हणे आनंद। अक्षयी तेथे ब्रह्मानंद।।४।।

२४०१. प्रभो श्रेष्ठा रामेश्वरा। मायागुणाचिया परा।।१।। तुज नाही एक स्थान। काय करावे वर्णन।।२।। श्रुती म्हणती नेति नेति। कोण जाणे तुमची गती।।३।। लक्ष्मण म्हणे देवा। अनादी तू महादेवा।।४।।

२४०२. नमो नमो रामेश्वरा। अति प्रिय योगेश्वरा।।१।। महायोगी सनकादिक। अनेकी पाहाती ते एक।।२।। तेही येती दर्शनाते। प्रेमे स्तविती प्रभोते।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। आहेसी पुरातन देव।।४।।

२४०३. रामेश्वर परब्रह्म। ब्रह्मानंदाचे तू धाम।।१।। ब्रह्मदेव तू नारायण। तुझे करिती पूजन।।२।। सर्वत्रही ऋषीश्वर। प्रभो करिती तुमचा स्मर।।३।। सर्वत्रही तुझे म्हणविती। भक्त आनंदे नाचती।।४।। लक्ष्मण म्हणे गंगा।

अति प्रिय तुम्हा निःसंगा।।५।।

२४०४. जगाचे करावे कल्याण। म्हणूनि झालासी सगुण।।१।। गंगातीरी श्वानाप्रती। प्रिय मानिसी पशुपती।।२।। येती कावडीचे भार। भक्त करिती जयजयकार।।३।। रुद्राभिषेक पूजन। करिती ते भक्तजन।।४।। लक्ष्मण म्हणे सुख देशी। भक्ता प्राण तू मानिसी।।५।।

२४०५. रामेश्वरा ज्योतिर्लिंगा। अतिप्रिय तू निःसंगा।।१।। अनिवार हा भवसंग। येथे बुडाले बा जग।।२।। त्याहाचे कल्याण करावे। त्याहा राज्यवैभव द्यावे।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। देशी निजभक्ताप्रती।।४।।

२४०६. नमो नमो रामेश्वरा। नमो नमो विश्वंभरा।।१।। तुज मोठे हे व्यसन। दिसे महान दारुण।।२।। भक्ताभोवता फिरसी। त्याहाचे स्वाधीन झालासी।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। तुझे दिसती ते आप्त।।४।।

२४०७. प्रभो श्रेष्ठा रामेश्वरा। चुकवितोसी येरझारा।।१।। गर्भवास चुकविसी। आपुले चरणी ठेविसी।।२।। पान घेऊन बेलाचे। कल्याण करिसी भक्ताचे।।३।। अहो घेऊनि किंचित जळ। करिसी सर्वस्वी सांभाळ।।४।। लक्ष्मण म्हणे देवा। अति सदय कृपाळुवा।।५।।

२४०८. रामेश्वरा कृपामूर्ती। तुम्हा अतिप्रिय भक्ती।।१।। स्त्रीपुत्राहूनि प्रेमा। भक्तावरी सर्वोत्तमा।।२।। प्राणाहूनि भक्त प्रिय। प्रभो आहेसी सदय।।३।। लक्ष्मण म्हणे कृपा। अक्षयी भक्तावरी बापा।।४।।

२४०९. रामेश्वरा ज्योतिर्लिंगा। पुराणपुरुषा बा अभंगा।।१।। रोमी अनंत ब्रह्मांड। ऐसा श्रेष्ठ तू बा धेंड।।२।। तो तू किंचित उदकासाठी। मुख पसरसी धुर्जटी।।३।। लक्ष्मण विनवी दीन। भक्ता देशी आपुलेपण।।४।।

२४१०. स्वयंप्रकाश आहेसी। भक्तास्वाधीन झालासी।।१।। प्रभो श्रेष्ठा रामेश्वरा। वेदसिद्धा अगोचरा।।२।। फार सोडविले प्राणी। भक्त ठेविले बा चरणी।।३।। लक्ष्मणा चरणसेवा। अक्षयी द्यावी महादेवा।।४।।

ज्योतिर्लिंगे : २

२४११. येई येई मल्लिकार्जुना। दीनानाथा पूर्णघना।।१।। शैलपर्वतवासिया। जगद्गुरू देवराया।।२।। तुझे नाम मुखी घेता। सर्व दोष हरती ताता।।३।। होता शिखराचे दर्शन। ताप हरती दारुण।।४।। लक्ष्मण म्हणे शैलवासिया।

वेगी दावा आपुले पाया।।५।।

२४१२. रामप्रिया रामेश्वरा। जगद्गुरू विश्वंभरा।।१।। नित्य गंगोत्रीचे स्नान। करीतसा हो प्रीतीने।।२।। मोक्षदाता रामेश्वर। परब्रह्म सर्वेश्वर।।३।। काशीचिये यात्रेकरी। नित्य येती तुझे द्वारी।।४।। सदा आनंदभरित। आहेसी तू उमाकांत।।५।। लक्ष्मण विनवी रामेश्वरा। कृपा करावी ईश्वरा।।६।।

२४१३. यावे यावे नागनाथा। ज्योतिर्लिंगा हो समर्था।।१।। लिंग जुनाट बहुता युगीचे। विश्वंभर नाम तुमचे।।२।। नाग खेळे अंगावरी। समाधिस्थ तो दैत्यारी।।३।। नागनाथ वाचे स्मरा। स्तवा अक्षयी ईश्वरा।।४।। लक्ष्मण हीन विनवी। नागनाथ माझी आई।।५।।

२४१४. यावे यावे वैद्यनाथा। योगेश्वरा हो समर्था।।१।। परळीपुरी ते पवित्र। तेथे नांदे तो सत्पात्र।।२।। नाथ आहे तो सकळांचा। आत्मा आहे हो सर्वांचा।।३।। भक्त कैलासासी नेली। तूचि सकळाची साउली।।४।। लक्ष्मण विनवी वैद्यनाथा। कृपा करी दीनानाथा।।५।।

२४१५. भयंकरा भीमाशंकरा। उग्ररूपा हो शंकरा।।१।। दैत्य मर्दिला त्रिपुर। देवा केला हो उपकार।।२।। भीमा अंगा हो पासून। करिती जगाते पावन।।३।। शंखीण डंखीण असे तेथे। उदासीन तू जगन्नाथ।।४।। प्रलयरुद्रा भयंकरा। प्रतापरुद्रा तू शंकरा।।५।। लक्ष्मण म्हणे तापहरा। वेगी यावे भीमाशंकरा।।६।।

२४१६. त्र्यंबकलिंग जुनाट जाणा। वेगी नमो त्या निर्गुणा।।१।। त्रिपुटीवेगळे स्वरूप। त्र्यंबकलिंग आत्मस्वरूप।।२।। राजयोग क्रीडा करी। सर्वा अगम्य मदनारी।।३।। मुकुट शोभे रत्नखचित। नाना अलंकार शोभत।।४।। त्रिकालपूजा लिंगापाशी। वेदघोष अहर्निशी।।५।। नित्य कुशावर्ताचे स्नान। करीतसे पंचानन।।६।। नाना वाद्ये रे वाजती। नित्य तोफा रे सुटती।।७।। सदा आनंदभरित। वसे तेथे उमाकांत।।८।। लक्ष्मण विनवी त्र्यंबका। कृपा करावी हो व्यापका।।९।।

२४१७. कामिकवना रे माझारी। नांदतो हो त्रिपुरारी।।१।। उमादेवी आणि शंकर। क्रीडा केली तेथे अपार।।२।। परब्रह्मे क्रीडा केली। हरीने पुण्यभूमी योजिली।।३।। ब्रह्मादिक लिंग पुजिती। घृष्णेश्वर आदिमूर्ती।।४।।

सकल तीर्थांची रचना। तेथे केली असे जाणा।।५।। वेरुळीचा महिमा अगाध असे। परब्रह्म तेथे वसे।।६।। लक्ष्मण विनवी घृष्णेश्वरा। कृपा करावी हो दातारा।।७।।

२४१८. सोरठ देशा हो माझारी। नांदतसे तो दैत्यारी।।१।। सागर तेथे प्रभोते स्तविती। अक्षयी गर्जना करिती।।२।। सोमनाथ परमात्मा तो। विश्वगुरू सर्वात्मा तो।।३।। गोमतीतीर्थ आहे जाणा। पापहारक लिंग माना।।४।। त्रिकालपूजा प्रभोची होती। अगम्य महिमा प्रभोची।।५।। लक्ष्मण विनवी सोमनाथा। कृपा करावी समर्था।।६।।

२४१९. रेवातीरी केली वसती। ममलेश्वरा कृपामूर्ती।।१।। ममलेश्वरलिंग पूजा हो। परमात्मा तुम्ही पाहा हो।।२।। नर्मदेचे करा स्नान। ओंकार पाहा हो दृष्टीने।।३।। ओंकारेश्वरी करा पूजन। मूळ ओंकार तो निर्गुण।।४।। ऐलतीरी अमलेश्वर। पैलतीरी तो ओंकार।।५।। त्याचे नाम घेता वाचे। दोष हरती जन्माचे।।६।। लक्ष्मण विनवी ओंकारा। अमलेश्वरा विश्वंभरा।।७।।

२४२०. उज्जयनीपुरी मोक्षकारक जाणा। तेथे नांदे महांकालेश्वर राणा।।१।। क्षीप्रगंगा तेथे वाहे पुण्यखाणी। सकल तापहारक ती जननी।।२।। पुण्यपुरी ते असे अगाध। तेथे नांदे तो ब्रह्मानंद।।३।। रुद्र अभिषेक निरंतर। योगी बैसले अपार।।४।। मोक्षदाता तो शूलपाणि। विश्वंभर तो मोक्षदानी।।५।। महाकाल सत्यस्वरूप जाणा। अक्षयी योग प्रभोचा माना।।६।। होता लिंगाचे दर्शन। किल्मिषे हरती दारुण।।७।। लक्ष्मण विनवी महाकालेश्वरा। कृपानिधी या कृपा करा।।८।।

२४२१. वाराणसी मोक्षसदन। प्रलयी अविनाशी जाण।।१।। विश्वनाथ आत्मज्योती। नांदतसे त्रिभुवनपती।।२।। अनंत युगाचे ते लिंग। पुरी असे ती अभंग।।३।। ब्रह्मकल्प जेव्हा होय। त्रिशुलाग्री पुरी राहे।।४।। शिवाचे ते निजधाम। सदा वसे पूर्णकाम।।५।। ब्रह्मा विष्णू आदिकरून। स्तविती ते काशीभुवन।।६।। भागीरथी वाहे निर्मळ नीर। समुद्रगामिनी वाहे स्थिर।।६।। करिता भागीरथीचे स्नान। ताप हरती दारुण।।८।। तेहतीस कोटी देव जाणा। नित्य येती तेथे स्नाना।।९।। नित्य करिती लिंगार्चन। परमात्मा स्तविती प्रीतीने।।१०।। चला चला हो लवकर। वेगी पाहा तो शंकर।।११।। स्नान

करा भागीरथीचे। दर्शन घ्या हो विश्वेशाचे।।१२।। लक्ष्मण म्हणे विश्वनाथा। कृपा करावी हो समर्था।।१३।।

२४२२. पुण्यगिरी हेमाद्री जाणा। सकल गिरींचा तो राणा।।१।। पुण्यस्थल ते बद्रिकाश्रम। सकल योगियांचे धाम।।२।। मुख्य योगी पंचानन। तेथे तप करी दारुण।।३।। सहस्र अठ्ठ्यांशी ऋषेश्वर। तेथे वसती निरंतर।।४।। परब्रह्म लिंग केदार। सकल स्तविती निरंतर।।५।। ब्रह्मा विष्णू हो सुरपती। अक्षयी लिंग ते पुजिती।।६।। मंदाकिनी वाहे समीप। स्वच्छ गंगेचे स्वरूप।।७।। तेथे कलीचा प्रवेश नाही। देव अरण्य ते पाही।।८।। धन्य धन्य बद्रिनाथ। महाराज तो समर्थ।।९।। घेती केदाराचे दर्शन। लक्ष्मण म्हणे तेचि धन्य।।१०।।

ज्योतिर्लिंगे : ३

२४२३. वाराणसी क्षेत्र अक्षयी असे हो। तेथे तो वसे हो विश्वनाथ।।१।। भागीरथी पायापाशी वसे गंगा। पावन ती जगा करी माता।।२।। अन्नपूर्णा माता सर्वा तृप्त करी। स्वामी त्रिपुरारी मोक्ष देतो।।३।। पातकी हीन दीन चांडाळ पतित। शुद्ध करितो तात स्मरा पाय।।४।। कुळाचा उद्धार करी विश्वंभर। दयाळू शंकर भोळा नाथ।।५।। त्रैलोक्याची यात्रा येते प्रभोपाशी। प्रेम तो सर्वांसी देतो नाथ।।६।। हरी ब्रह्मा देव दिक्पाळाचे भार। येती विश्वंभर पुजावया।।७।। वेगी घ्या दर्शन व्हा वेगी पावन। भक्ताचे स्वाधीन विश्वनाथ।।८।। लक्ष्मण म्हणे त्याचे नाम घेता। भवाची ही वार्ता नुरे काही।।९।।

२४२४. बदरिका आश्रम योगियाचे स्थान। तेथे विश्वजीवन बद्रिनाथ।।१।। सिद्धांचिये मेळी वसे चंद्रमौळी। तापस मंडळी पाळा भवता।।२।। अठ्यांशी सहस्र मुनी महाराज। स्तविती वृषभध्वज ज्ञाते ते हो।।३।। ब्रह्मांडसंपत्ती वमन त्याहासी। कैलासनिवासी ध्याती शिव।।४।। केदार ते लिंग श्रेष्ठ पुरातन। ब्रह्मादी सुरगण ध्याती सदा।।५।। स्वर्गतरंगिणी तेथे गंगाबाई। पावन ती आई करी भक्ता।।६।। भक्त तेथे जाती घेती हो दर्शन। शंभो त्या पावन करितो तात।।७।। लक्ष्मण म्हणे त्याचे नाम घेती। पावन ते होती सर्वमान्य।।८।।

२४२५. क्षिप्रागंगेतीरी शोभे श्रेष्ठ पुरी। तेथे त्रिपुरारी वसे तात।।१।। महांकाळ लिंग वंद्य त्रैलोक्या रे। वेगी तो स्तवा रे विश्वरूप।।२।। उज्जयिनी हो नाम आहे त्या पुरीचे। स्थान त्या प्रभोचे सर्वमान्य।।३।। काळाचा हो काळ महाकाळ शिव। प्रभोचे लाघव न कळे कोणा।।४।। यात्रा भक्तजन येती दर्शनाते। पुजिती शंभोते अष्टभावे।।५।। वेगी घ्या दर्शन करितो कल्याण। पतितपावन भोळा नाथ।।६।। लक्ष्मण म्हणे त्याते जे शरण। गेले ते पावन झाले सुर।।७।।

२४२६. ॐकार अमलेश्वर लिंग पाहा। बिल्वदळ वाहा दयाळू तो।।१।। रेवातीरी शोभे शिव विश्वतात। उमादेविकांत शुद्ध बुद्ध।।२।। ॐकारस्वरूप अलक्ष तो शिव। ब्रह्मादी देव ध्याती ज्याला।।३।। ॐकारापासूनि विश्व हे उत्पन्न। विश्वाचे जीवन शिवयोगी।।४।। भक्तकाजा शिव झालासे साकार। चालवी व्यापार ब्रह्मांडाचा।।५।। प्रभोचे भजन करिती सर्वही। त्रिभुवनगोसावी सर्ववंद्य।।६।। भक्तकाजा तो रे घालीतसे उडी। स्तवा हो तातडी कार्य साधा।।७।। लक्ष्मण म्हणे त्याते वेगी स्मरा। तात वश करा भक्तिबळे।।८।।

२४२७. सौराष्ट्र त्या देशी सोमनाथलिंग। प्रभो तो अभंग विश्वरूप।।१।। ज्योतिर्लिंगमहिमा अगाध पुराणी। वदली व्यासवाणी पाहा शोध।।२।। प्रभोचा महिमा श्रेष्ठ गाती लीला। ब्रह्मांडाच्या पाळा भक्ती प्रिय।।३।। वेदघोष तेथे होतो निरंतर। भक्त जयजयकार करिती सदा।।४।। सहस्र नामाचा करिती उच्चार। पूजेचा संभार नाना द्रव्ये।।५।। वाद्यांचा गजर यात्रा येते फार। वैभव अपार प्रभोचे हो।।६।। दर्शन घेता चुके भवव्यथा। देवा सोमनाथा स्तविता हो।।७।। लक्ष्मण म्हणे त्याचे नाम घ्या हो। भव हा तरा हो दुःख मोठे।।८।।

२४२८. ब्रह्मगिरी तो पर्वत। तेथे वसे उमाकांत।।१।। त्र्यंबकलिंग पुरातन। ब्रह्मादिकाचे जीवन।।२।। शिव त्रैलोक्यगोसावी। तेथे वसे तो अक्षयी।।३।। सिद्धी बुद्धी पायापाशी। देव येती दर्शनासी।।४।। ब्रह्मगिरी प्रदक्षिणा। करिती स्तविती पंचानना।।५।। त्रिकाळ करिती पूजन। वेद स्तविती विद्वज्जन।।६।। गोदा वाहे पायापाशी। पावन करी ती जगासी।।७।। ब्रह्मगिरी प्रदक्षिणा। होता पापे जळती नाना।।८।। प्रभोचे वैभव अपार। शेषाप्रती न कळे

पार।।९।। यात्रा येते प्रभोपाशी। पावन करी तो दीनासी।।१०।। घ्या वेगी दर्शन। करितो त्रितापखंडन।।११।। लक्ष्मण म्हणे त्याचे। नाम घेता दुःख कैंचे।।१२।।

२४२९. भीमाउगमी भीमाशंकर। वसे विश्वाचा पितर।।१।। त्रिपुर मर्दिला तो क्रूर। केला देवा उपकार।।२।। भीमा घाम हो अंगीचा। करी उद्धार जगाचा।।३।। सदोदित उदासीन। त्याते वैराग्यभूषण।।४।। अनंत ब्रह्मांडसंपत्ती। वमनप्राय प्रभोप्रती।।५।। राज्यवैभव विष्णूला। त्याचे देणे हो सर्वाला।।६।। आपण निजानंदे धाला। बाह्यसुख नावडे त्याला।।७।। भक्तजनांचा साह्यकारी। पाय पाहा हो झडकरी।।८।। लक्ष्मण म्हणे स्तवा। चुकवी तो जन्मगोवा।।९।।

२४३०. कामिकवन ते वेरुळ। तेथे वसे जाश्वनीळ।।१।। घृष्णेश्वर लिंगा नाम। भक्ता करी तो निष्काम।।२।। तीर्थ शेवाळे पावन। करी त्रितापखंडन।।३।। वेरुळीचा महिमा थोर। तीर्थे प्रभोपाशी फार।।४।। प्रभोपायाचा महिमा। अती प्रिय रघूत्तमा।।५।। यात्रा येते प्रभोपाशी। प्रेमे पुजिती शंभोसी।।६।। सर्व सुखाचे आगर। महाराज घृष्णेश्वर।।७।। तात पाहा हो वेगेसी। भवरोगाते तो नाशी।।८।। लक्ष्मण म्हणे स्मरा। भक्ती प्रिय घृष्णेश्वरा।।९।।

२४३१. औंढ्यामध्ये नागनाथ। महाराज तो समर्थ।।१।। ज्योतिर्लिंग पुरातन। सकळ विश्वाचे जीवन।।२।। विश्वंभर नाम त्याचे। करितो कल्याण विश्वाचे।।३।। नागभूषण प्रभूला। नाना अलंकार ल्याला।।४।। भक्त येती दर्शनाते। भावे पुजिती शंभोते।।५।। त्रिकाल पूजन स्तवन। वेद पढती विद्वज्जन।।६।। वेगी पाहा हो चरण। मनबुद्धी ही वळून।।७।। नागभूषण ते पाही। श्रेष्ठ लोळती अक्षयी।।८।। लक्ष्मण म्हणे त्याला। भक्ती प्रिय पाहू चला।।९।।

२४३२. परळीक्षेत्र ते पवित्र। तेथे अक्षयी त्रिनेत्र।।१।। पूर्णब्रह्म उमारमण। योगियांचे निजधन।।२।। ब्रह्मा इंद्र अग्नी हरी। ज्याची आज्ञा वंदिती शिरी।।३।। सत्ता प्रभोची हो थोर। वैद्यनाथ तो निर्घोर।।४।। लिंगी प्रकाश ज्योती। नाना अलंकार दीप्ती।।५।। चार सहा ते अठरा। प्रेमे ध्याती गंगाधरा।।६।। नाना पूजेचा संभार। भक्त करिती जयजयकार।।७।। ऋषी पढती नामावळी।

सिद्ध स्तविती चंद्रमौळी।।८।। नाना वाद्यांचा गजर। वाद्ये वाजती सुस्वर।।९।। भक्तजनाचा कैवारी। महाराज त्रिपुरारी।।१०।। लक्ष्मण म्हणे त्याते। स्मरा हरितो भवदु:खाते।।११।।

२४३३. भूकैलास हे स्थान। श्रीशैल्य मल्लिकार्जुन।।१।। लिंगपर्वत ते स्थान। लिंग ब्रह्मरूप पूर्ण।।२।। सिद्धयोगी मुनीश्वर। मोठे मोठे दिगंबर।।३।। प्रभोभोवते शोभले। ब्रह्मानंदे तृप्त झाले।।४।। पाळा भोवता गणांचा। तात बैसला विश्वाचा।।५।। अमर स्वर्गवासी सर्व। येती दर्शनाते देव।।६।। शिवरात्री हो जागर। भक्त करिती जयजयकार।।७।। पाताळगंगेचे हो स्नान। घेती प्रभूचे दर्शन।।८।। शिखरदर्शने हो मुक्ती। होते पाहा प्रभोप्रती।।९।। क्षेत्रमहिमा अपार। धन्य धन्य तो शंकर।।१०।। वाट पाहतो भक्तांची। तात साउली सर्वांची।।११।। अती प्रेमा भक्तावर। फार दयाळू शंकर।।१२।। लक्ष्मण म्हणे तात। भक्ता करितो निवांत।।१३।।

२४३४. सिंधुतटी रामेश्वर। वसे अक्षयी उमावर।।१।। कोटी सूर्यसम कांती। ज्याच्या स्वरूपाची दीप्ती।।२।। कमलोद्भव कमलावर। त्याते ध्याती निरंतर।।३।। सकल तीर्थे प्रभोपायी। शिव त्रिभुवनगोसावी।।४।। सकल देव आज्ञांकित। आपण सर्वदा निवांत।।५।। त्याचे वैभव अपार। वेदा सिद्धा नकळे पार।।६।। इतरांची गणना कोण। शिव ब्रह्म परिपूर्ण।।७।। सगुण क्रीडा करी नाना। त्याचे वैभव नकळे कोणा।।८।। अक्षयी यात्रा अक्षयी गजर। भक्त करिती जयजयकार।।९।। गंगा स्वर्गतरंगिणी। नित्य स्नाना पुण्यजीवनी।।१०।। भक्त कावडी आणिती। प्रभोलागी हो पुजिती।।११।। शिव त्याचा सखा झाला। देतो क्षेम तो भक्ताला।।१२।। भक्तांचा तो साह्यकारी। आले संकट निवारी।।१३।। घ्या हो प्रभोचे दर्शन। करितो आपुले समान।।१४।। लक्ष्मण म्हणे तात। स्मरा करितो निवांत।।१५।।

(इ) सिद्धपुरुष

आचार्य रेवणसिद्ध

२४३५. सद्गुरू प्रसिद्धा रेवणा रे सिद्धा। ब्रह्मीच्या आनंदा भोक्ता स्वामी।।१।। ब्रह्मानंदी वास तुम्हा निरंतर। ज्ञानाचे आगर तुम्ही सिद्धा।।२।। स्वानंदाची खाणी लज्जित परावाणी। त्या आनंदस्थानी वस्ती तुमची।।३।।

लक्ष्मण म्हणे कृपेचे आगर। भक्ताचे माहेर सत्य सत्य।।४।।

२४३६. उपाधिवेगळा प्रभो तू असून। भक्तास्तव सगुण क्रीडा करिसी।।१।। आचार्य तू सिद्ध धर्माचे स्थापन। करूनि निमग्न ज्ञानामाजी।।२।। भक्ती क्रिया ज्ञान आचरूनि दाविसी। स्वत:सिद्ध आहेसी निरामय।।३।। लक्ष्मण म्हणे फार मी अपराधी। प्रभू कृपानिधी कृपा करा।।४।।

२४३७. अवघ्या ठायी धर्माचे स्थापन। वीरशैवा जीवन स्वामी श्रेष्ठ।।१।। ज्ञानाचा तो अब्धी प्रभू कृपानिधी। राबती त्या सिद्धी चरणापाशी।।२।। लक्ष्मणा दीनावरी कृपा करा। अनादी सोयरा आहेसी तू।।३।।

२४३८. आचार्य तू पूर्ण सुखाचा सागर। स्वानंदा माहेर तूचि स्वामी।।१।। तुमचे ते सुख अप्राप्त कामिका। गुंतले अनेका दु:खामाजी।।२।। यास्तव अवतार तुम्हा युगी युगी। सुख भक्तालागी देता स्वामी।।३।। लक्ष्मण दीन फार हो अन्यायी। कृपा हो करावी दीनावरी।।४।।

२४३९. स्वामी तुम्हाप्रती मायिक रुचेना। स्वानंदाच्या घना योगिराया।।१।। स्वर्गवासी देव येती तुम्हा शरण। मानवी हे जन क्षुल्लकानंदी।।२।। अमृत टाकूनि कांजी स्वीकारिती। त्याहा पडली भ्रांती संगास्तव।।३।। लक्ष्मण म्हणे तुझे भक्त सुखी। एकला अनेकी ओळखिला।।४।।

२४४०. रेवणा हो सिद्धा नमो तुम्हा पूर्णा। सिद्धा आम्हा दीना सोडवा हो।।१।। उत्तर दक्षिण पूर्व पश्चिम दिशा। मठ त्वा सर्वेशा स्थापिले रे।।२।। धर्म तू स्थापिसी भक्ता सुख देशी। वीरशैवा आहेसी पाठीराखा।।३।। लक्ष्मण म्हणे त्र्यैलोक्यी भ्रमण। ज्ञानाचे तू धन आहेसी प्रभो।।४।।

२४४१. शिवाचा तू आत्मा आहेसी सर्वोत्तमा। नेशी निजधामा भक्ताप्रती।।१।। सर्वत्रही गण तुम्हा सन्मानिती। सिद्धा तुमची कीर्ती तीही लोकी।।२।। तुम्हा नमो नमो स्वामी परात्परा। सदया ईश्वरा नमो नमो।।३।। लक्ष्मणा दीना चरणसुख द्यावे। प्रभो सांभाळावे वारंवार।।४।।

२४४२. भक्तास्तव त्वा उपाधी। अंगीकारिली कृपानिधी।।१।। आचार्यत्व स्वीकारून। करिसी जगाचे कल्याण।।२।। परोपकार हा थोर। सर्व योगांचे हे सार।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्धा। तुम्हा नमो ब्रह्मानंदा।।४।।

२४४३. अहो वेदान्त सिद्धान्त। ज्ञान जाणूनि निवांत।।१।। जगास्तव

क्रिया करिसी। निरपेक्ष तू आहेसी।।२।। महालिंगी तुमचा वास। तोडितोसी भवपाश।।३।। लक्ष्मण म्हणे स्वामी। सदा शोभसी निजधामी।।४।।

२४४४. अहो रेवणा सिद्धा श्रेष्ठा। तुम्हा नमो हो वरिष्ठा।।१।। अलक्षपुरी तुमचा मठ। वसविली भक्तिपेठ।।२।। साक्षीभूत शिवज्ञानी। क्रीडतोसी जनी वनी।।३।। लक्ष्मणा सुख द्यावे। चरणापाशी हो ठेवावे।।४।।

२४४५. रेवणसिद्धा निजरूपा। जाळितोसी भवतापा।।१।। तुझे भक्ता भव नाही। तिही लोकी ते विजयी।।२।। कृपे कल्पनाचि नुरे। सदा सुख त्या शोभे रे।।३।। लक्ष्मणा द्यावे सुख। विषय वाटती ते विख।।४।।

२४४६. रेवणसिद्ध आचार्या। निरसा निरसा माझी माया।।१।। स्वामी जहालो जर्जर। मिथ्या दिसे हा बाजार।।२।। कृपा करा करा वेगी। पावन करा दीनालागी।।३।। लक्ष्मण हा तुमचा। रंक असे हो द्वारीचा।।४।।

आचार्य मरुळसिद्ध

२४४७. मरुळसिद्धा ज्ञानसूर्या। तुम्हा नमो योगिराया।।१।। निजानंदी तुमची वस्ती। ज्ञानामृते तुमची तृप्ती।।२।। वस्तू भरली सबराभर। तेथे क्रीडसी योगेश्वर।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। स्थापिसी तू कृपामूर्ती।।४।।

२४४८. त्रेतायुगी केली ख्याती। सुख दिले जगाप्रती।।१।। त्रेतायुगी तू आचार्या। करूनि दाविसी बा क्रिया।।२।। परोपकारास्तव उपाधी। अंगीकारिली कृपानिधी।।३।। लक्ष्मणा पावन करा। अति हीना हो उद्धरा।।४।।

२४४९. मार्ग वीरशैव स्थापून। केले भक्तांचे कल्याण।।१।। चहू दिशा चारी मठ। स्थापिले त्वा प्रभो श्रेष्ठ।।२।। अष्टावरण क्रिया स्थापिसी। निजभक्ता सुख देसी।।३।। लक्ष्मण बहू अन्यायी। दीनाप्रती पायी ठेवी।।४।।

२४५०. शैवा-वीरशैवांते ज्ञान। देऊन करिसी पावन।।१।। तू ज्ञानाचा समुद्र। सखा तुमचा महारुद्र।।२।। सदा महालिंगी वास। पावन करितो दीनास।।३।। लिंग-अंगा संबंध करून। तोडितोसी रे बंधन।।४।। कामक्रोधादी दुर्मती। शिक्षा करिसी त्याहाप्रती।।५।। लक्ष्मणाते सोडवा। स्वामिराया कृपाळुवा।।६।।

२४५१. क्रिया आचरूनि दाविसी। स्वतः निष्क्रीय आहेसी।।१।। पद्मपत्र जळावरी। तैसा तू बा ब्रह्मचारी।।२।। बाह्य क्रिया अंतरी ज्ञान। स्वतः

दावितो आचरून।।३।। परोपकार आहे थोर। सकळ साधनांचे सार।।४।। लक्ष्मण हीन दीन। ताता करा हो पावन।।५।।

२४५२. मरुळसिद्धा पूर्ण ज्ञानी। शिवज्ञानाची तू खाणी।।१।। वैराग्य ते अतिश्रेष्ठ। तुम्हापाशी कडकडाट।।२।। शिवोपासना स्थापिसी। भक्ती करूनि दाविसी।।३।। लक्ष्मणा सुख द्यावे। अति प्रेमे सांभाळावे।।४।।

२४५३. अनंत ब्रह्मांडे उभवी। क्षणामाजी तो लपवी।।१।। ऐसा श्रेष्ठ तो शंकर। सकळ विश्वाचे माहेर।।२।। विश्वा आदि-मध्य वसे। तुम्हा स्वाधीन तो महेश।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। ब्रह्मानंदाचा तू भोक्ता।।४।।

२४५४. अति सदय शंकर। योगिजनांचे माहेर।।१।। गुणातीत तो निर्गुण। तुम्हास्तव तो सगुण।।२।। तुमचे पूजन तो करी। तुम्हा रक्षी नानापरी।।३।। लक्ष्मण विनवी ताता। शाश्वत सुखाचा तू भोक्ता।।४।।

२४५५. आगम अठ्ठावीस बोलती। वेदशास्त्रेही सांगती।।१।। भक्ती सर्वत्र प्राधान्य। भक्तीपासूनि होय ज्ञान।।२।। आचार्य तुम्हीही भ्रमता। स्वधर्म प्रभो हो स्थापिता।।३।। मरुळसिद्धा स्वामिराया। ताप निरसिता स्वामिया।।४।। लक्ष्मण म्हणे फार। करिता दीनांचा उद्धार।।५।।

२४५६. फार सोडविले प्राणी। तुम्हा वश तो शूळपाणि।।१।। मरुळसिद्धा कृपाघना। प्रभो पतितपावना।।२।। सदा स्वानंदी निमग्न। तुम्हापाशी अक्षय धन।।३।। लक्ष्मणा सुख ते द्या हो। पायी अक्षयी ठेवा हो।।४।।

२४५७. अविद्येचे अवडंबर। तेथे दंगा दिसे फार।।१।। मोठा दंगा झाला झाला। स्वधर्म हा हा लोपला।।२।। प्रभो तुमचे कृपेविण। नोहे जगाचे कल्याण।।३।। मरुळसिद्धा धावा धावा। अनाथ दीनाते सोडवा।।४।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।५।।

आचार्य एकोरामाराध्य

२४५८. एकोराम शिवज्ञानी। आहे चिन्मयाची खाणी।।१।। भक्तास्तव तू साकार। झालासी बा विश्वंभर।।२।। युगायुगाठायी भ्रमण। करिता भक्ताचे कल्याण।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्धा। तुम्हा नमो ब्रह्मानंदा।।४।।

२४५९. द्वापरयुगाच्या आचार्या। आहेसी बा योगिराया।।१।। योगामाजी तो निपुण। वैराग्याचा सिंधू पूर्ण।।२।। षट्स्थल तू ज्ञानिया। निरसतोसि दुर्धर

माया।।३।। लक्ष्मण पतिताते। सांभाळावे कृपावंते।।४।।

२४६०. सत्य शैव तुम्हाप्रती। अतिप्रेमे बा पूजिती।।१।। तुमची अक्षयी समाधी। खंडेना बा कृपानिधी।।२।। भक्ती ज्ञान आणि प्रिया। आचरून दाविता स्वामिया।।३।। लक्ष्मणाते पावन। करा तुमचा म्हणवितो दीन।।४।।

२४६१. वीरशैव तुम्हाप्रती। अतिप्रिय कृपामूर्ती।।१।। वीरशैवाचा तू आत्मा। आहेसी बा सर्वोत्तमा।।२।। विषया विटले विटले। प्रभो तुम्हा शरण आले।।३।। महालिंगी त्याहा वास। तारक जाहले जगास।।४।। लक्ष्मणाते सोडवा। सिद्धराया कृपाळुवा।।५।।

२४६२. चहुदिशा चारी मठ। स्थापिले तू अतिश्रेष्ठ।।१।। षट्स्थलाचा जाणता। हीनादीनाते पाळिता।।२।। लिंग-अंगाचा संबंध। करूनि करिसी ज्ञानबोध।।३।। लक्ष्मण म्हणे पूर्ण। करिसी आपुले समान।।४।।

२४६३. लिंग-अंगाचे ते लग्न। लाविसी तू कृपाघन।।१।। सद्गुरू तू आचार्या। अतिश्रेष्ठा योगिराया।।२।। एकोरामया प्रसिद्धा। तोडितोसी भवबाधा।।३।। लक्ष्मण हा सोडवा। द्यावी प्रभू चरणसेवा।।४।।

२४६४. अविद्येने जग भुलले। अति कासावीस झाले।।१।। स्मर नाही हो आपुला। दुर्धर पडला मोहघाला।।२।। ज्ञानखड्गे भवबंधन। तोडितोसी कृपाघन।।३।। लक्ष्मण म्हणे सद्गुरू। सिद्धा आहेसी तू दातारू।।४।।

२४६५. लिंगैक्य ज्ञान तुम्हापाशी। ज्ञानसिंधू तू आहेसी।।१।। कल्पनेचे ते खंडन। करिसी आपुले समान।।२।। सकल योगाची ती सिद्धी। तुम्हापाशी कृपानिधी।।३।। लक्ष्मणा सुख द्यावे। चरणी अक्षयी ठेवावे।।४।।

२४६६. षट्चक्रांते भेदून। योगी झाले झाले पूर्ण।।१।। पावले ते निजसुख। अनेकी ओळखिला एक।।२।। झाले ते हो महाज्ञानी। गेले विषयी विटूनि।।३।। लक्ष्मण म्हणे ते सुख। देशी स्वानंद नावेक।।४।।

२४६७. केवळ ब्रह्म ते अद्वय। शुद्ध बुद्ध निरामय।।१।। तेथूनि जाहला विलास। मायागुणाचा प्रकाश।।२।। अनेकत्व एकाअंगी। शोभतसे एकालागी।।३।। युगरहाटी लोटली। नाना उपाधी वाढली।।४।। धर्म स्थापन करावया। अवतरलासी गुरुराया।।५।। लक्ष्मण हा अन्यायी। सोडवूनि चरणी ठेवी।।६।।

२४६८. एकोरामया दयाळा। अगणित तुमची लीला।।१।। असंख्य युगे होती जाती। तेथे आहे तुमची वस्ती।।२।। प्रभूचे हो तुम्ही सखे। आहेत बा पाठीराखे।।३।। धर्म वारंवार स्थापिता। जगदुद्धार हो करिता।।४।। लक्ष्मण तुमचा दीन। त्याते त्राता दावा कोण।।५।।

आचार्य पंडिताराध्य

२४६९. योगी तुम्हा सन्मानिती। आहेसी तू ज्ञानमूर्ती।।१।। षट्स्थलातील सार। घेऊनि झालासी निर्घोर।।२।। आनंद अक्षयी अक्षयी। खंड आनंदाते नाही।।३।। लक्ष्मणा सुख द्यावे। अति दीना सांभाळावे।।४।।

२४७०. पंडिताराध्य आचार्या। तुम्हा नमो ज्ञानसूर्या।।१।। अज्ञान हा अंधार। तुमचे सत्ते होय दूर।।२।। करावया दीनोद्धार। प्रभो तुमचे अवतार।।३।। लक्ष्मण हा अपराधी। सोडवा हो कृपानिधी।।४।।

२४७१. कलियुगाची रहाटी। फार देखूनिया खोटी।।१।। जगामाजी दंगा फार। यास्तव झालासी साकार।।२।। धर्म आचरूनि दाविसी। क्रियामार्ग बा स्थापिसी।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। आम्हा लावी भक्तिपंथा।।४।।

२४७२. आचार्यत्व स्वीकारून। तोडिसी जगाचे बंधन।।१।। सदा करिता परोपकार। तुमचा ब्रह्मांडा आधार।।२।। तुम्हापाशी सर्व सिद्धी। तिष्ठती बा कृपानिधी।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्ध। भक्ता करिता ज्ञानबोध।।४।।

२४७३. लिंगरूपी प्रभो शिव। अंगरूपी हा हो जीव।।१।। तुमचे कृपे होय संबंध। ऐक्य होती ते ज्ञानबोध।।२।। षट्स्थल ज्ञान तुमचे। कृपे प्रकाशे आपेआप।।३।। लक्ष्मण विनवी आचार्या। मग कैची तेथे माया।।४।।

२४७४. भक्ती क्रिया आणि ज्ञान। तुमचे कृपे समाधान।।१।। भक्ती निष्काम करिती। त्याते होय ज्ञानप्राप्ती।।२।। लिंगार्चन ते करिती। सदा महालिंगी रमती।।३।। लक्ष्मण म्हणे थोर। तुमचा अति उपकार।।४।।

२४७५. तुमचे ज्ञान स्वच्छ दिसे। तुम्हा स्वाधीन तो महेश।।१।। अनंत ब्रह्मांडे ते रोमी। ऐसा श्रेष्ठ शिवस्वामी।।२।। तो तुमचे स्वाधीन। वर्ततसे कृपाघन।।३।। लक्ष्मण विनवी प्रेमे। तुमची महिमा अगम्य।।४।।

२४७६. चहू देशी चार मठ। स्थापिले त्वा प्रभो श्रेष्ठ।।१।। अगणित जीव सोडविले। भक्तिपंथा हो लाविले।।२।। वीरशैवा तू आचार्या। कृपे निरसिसी

माया।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

२४७७. षड्रिपूंते जिंकून। षट्चक्रांते भेदून।।१।। षट्स्थलाचे ते ज्ञान। तुम्हापाशी योग पूर्ण।।२।। भक्तमनोरथ पुरविसी। अनेक लीला बा करिसी।।३।। लक्ष्मण हा अन्यायी। प्रभो कृपा हो करावी।।४।।

२४७८. पंडिताराध्य समर्थ। करिसी अनाथा सनाथ।।१।। जैसा अग्नी धगधगीत। तैसा वर्तसी जगात।।२।। अष्टावरण भक्ती क्रिया। स्थापितोसी योगिराया।।३।। लक्ष्मण म्हणे ज्ञान। तुमचे कृपे समाधान।।४।।

२४७९. तुमचे वर्णन होईना। तुमचा पार हो कळेना।।१।। आकाशाते गवसणी। कोण घालील बा प्राणी।।२।। आता चरणा नमन। नका पाहू दोष गुण।।३।। लक्ष्मणा चरणसेवा। अक्षयी द्यावी कृपाळुवा।।४।।

जगद्गुरू पलसिद्ध

२४८०. रत्नजडित सिंहासन। वरी बैसले आपण।।१।। मूर्ती दिव्य ती पाहिली। नाना अलंकारे शोभली।।२।। चंद्रसूर्य स्वरूपी लोपले। ऐसे सिद्धराव पाहिले।।३।। मस्तकी जटा रविवत् कांती। सिद्धेश्वर आदिमूर्ती।।४।। भाळी त्रिपुंड्र रेखिला। सर्व अंगी भस्म ल्याला।।५।। कंठी रत्नखचित हार। ऐसा शोभे सिद्धेश्वर।।६।। शोभले रुद्राक्षांचे हार। मुक्तमाळा त्या सुंदर।।७।। काषाय वस्त्रे हो शोभती। महावस्त्रे विराजती।।८।। कर्णी कुंडले प्रकाश फार। सुवर्णाचे चोंगाकार।।९।। स्वामी पितांबर नेसले। रत्नखचित हार शोभले।।१०।। करभूषणे रत्नखचित। पायी पादुका विराजित।।११।। दोही बाजू चामरे उडती। रत्नखचित छत्रे शोभती।।१२।। त्रिकाळ पूजन प्रभूचे। नाना सुगंध अत्तरगंधाचे।।१३।। बिल्व प्रभोप्रती वाहाती। पुष्पहार हो शोभती।।१४।। अलंकार ल्याले रत्नखचित। वस्त्रे शोभले भरजरित।।१५।। ऐसा योगी सिद्धराव। शोभला तो सद्गुरुराव।।१६।। ऐसा स्वामी दीनानाथ। दीना करितो सनाथ।।१७।। भक्तजनावरी प्रीती। भक्त रक्षी नाना रीती।।१८।। तप:सामर्थ्येकरून। स्वत:सिद्ध ते आपण।।१९।। अनादी तो सिद्धेश्वर। स्वामी शिवाचे अवतार।।२०।। अती दोषी उद्धरिले। दीन अनाथ रक्षिले।।२१।। मार्ग स्थापिला प्रभोनी। दीन अनाथांची जननी।।२२।। यात्रा भरली श्रावणमासीची। कीर्ती आहे हो प्रभोची।।२३।। यात्रा येते दूरदूरची।

मनोरथे पुरवी तो सकळांची।।२४।। यात्रा मिळाली हो फार। होतो वाद्यांचा गजर।।२५।। वीरशैव मंडळी फार। पटाधीश स्वामी थोर थोर।।२६।। महासमर्थ जंगम ज्ञानी। येती यात्रे हो लागूनि।।२७।। वीरशैव स्तोत्र पढती। प्रेमे आनंदे नाचती।।२८।। शंखनाद टाळमृदुंग। वीणावेणू भेरी घडयाळ।।२९।। शिवभक्त यात्रा आली। दाटी दर्शनाची झाली।।३०।। गंध धूप दीप नैवेद्ये। समर्पिती ब्रह्मानंदे।।३१।। सुवासिक अन्न हो निर्मिले। यात्राजन तृप्त झाले।।३२।। मंडप दिधले सुंदर। विद्वज्जन बैसले थोर।।३३।। हरदास कीर्तन करिती। मंगळ वाद्ये हो वाजती।।३४।। यात्रा पंचरात्र राहे। सिद्धस्वामी प्रसन्न होये।।३५।। पटाधीश बैसले लिंगपूजना। नित्य होतसे जंगमार्चना।।३६।। विरक्त बैसले पूजना। तीर्थप्रसाद होतसे जाणा।।३७।। तीर्थमहिमा अपार। वर्णितो कैलासी शंकर।।३८।। प्रसादमहिमा वर्णवेना। प्रसादमहिमा अगम्य जाणा।।३९।। शिव शिव नामोच्चार। रुद्रघोष निरंतर।।४०।। जंगम बैसले भोजना। वीरशैव पंगती जाणा।।४१।। सुवासिक अन्न महाप्रसाद। तृप्त होतो जंगमवृंद।।४२।। धन्य धन्य सिद्धेश्वर। सकल जनांचे माहेर।।४३।। वीरशैवांचा दातार। सिद्धस्वामी सर्वेश्वर।।४४।। सर्वांप्रती समान पाहे। पदब्रह्म सिद्ध आहे।।४५।। सबाह्य वृत्ती पलसिद्धांची। अगम्य महिमा प्रभूची।।४६।। शिवभक्ताचे अधिष्ठान। तख्त साखरखेरडे जाण।।४७।। पटाधीश स्वामी गंगाधर। सिद्धांनी कृपा केली फार।।४८।। लक्ष्मण म्हणे काशी। आहे सिद्ध चरणापाशी।।४९।।

प्रभोस्वामी (अल्लमप्रभू)

२४८१. शिव-अवतार प्रभो ज्ञानी । प्रभोस्वामी तू चिन्मय खाणी।।१।। स्वमाये तू सगुण। झालासी बा कृपाघन।।२।। करावया दीनोद्धार। स्वामी तुमचे अवतार।।३।। लक्ष्मणावरी कृपा। करावी हो ब्रह्मस्वरूपा।।४।।

२४८२. विषया विरक्त झालासी। षड्वैरी जिंकलेसी।।१।। निराभार वीरशैव। तुम्ही देवाचेही देव।।२।। अमर येती लोटांगणी। अद्वय ज्ञानाची ही खाणी।।३।। लक्ष्मण हा सोडवा। प्रभो आपुला म्हणावा।।४।।

२४८३. अक्षयी क्षमा दया शांती। तुम्हापाशी नित्य तृप्ती।।१।। ज्ञानामृते

समाधान। करिता भक्तांचे कल्याण।।२।। परीस लोहाचे सुवर्ण। करी इतुकेन तो धन्य।।३।। आपणाऐसे करवेना। आपुलेपण देववेना।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। षट्स्थलाचा जाणता।।५।।

२४८४. षट्स्थलाचा जाणता। षट्स्थलाच्या हो परता।।१।। आगमनिगमांतील जे सार। घेऊनि झालासी निर्घोर।।२।। योग करूनि दाविता। आहेसी योगाच्या परता।।३।। लक्ष्मण विनवी ताता। मज सोडवा पतिता।।४।।

२४८५. केवळ परमहंस क्रिया। तुम्हापाशी योगिराया।।१।। महालिंगी त्याहा वास। ते सुख देतोसी भक्तास।।२।। विदेही स्थितीने वर्तता। तिही लोकी हो भ्रमता।।३।। लक्ष्मण म्हणे थोर। आहा विज्ञाना माहेर।।४।।

२४८६. लिंगांगसंबंधी जे ज्ञानी। तुम्हा येती लोटांगणी।।१।। त्याहा ज्ञान पूर्ण झाले। प्रभो विषया विटले।।२।। शिवानंदी त्याहा वास। तुटला तो मायापाश।।३।। लक्ष्मण म्हणे सुख। इच्छिताती ब्रह्मादिक।।४।।

२४८७. लिंग-अंगाचा विचार। जाणूनि ज्ञाते झाले थोर।।१।। विषया विटले विटले। केवळ ज्ञाना पात्र झाले।।२।। ते सुख अनुभवे जाणती। ब्रह्मानंदे ते डुलती।।३।। लक्ष्मण म्हणे ज्ञाना। पात्र झाले ते सर्वज्ञा।।४।।

२४८८. प्रभोस्वामी मायातीता। केवळ आनंदभरिता।।१।। सर्व गण तुम्हा स्तविती। प्रेमयुक्त ते पूजिती।।२।। महिमा तुमचा अपार। आहेसी कल्याणाचे घर।।३।। लक्ष्मणाते उद्धरा। तुम्हा नमो परात्परा।।४।।

२४८९. बसवेश्वरादी गण। तुम्हा येती हो शरण।।१।। अष्टभावे ते पूजिती। तुम्हा योगी शरण येती।।२।। जगा करिता पावन। तोडीतसा भवबंधन।।३।। लक्ष्मणा पतिताते। सोडवावे कृपावंते।।४।।

२४९०. आचार्य तुम्हा शरण येती। फार तुम्हा सन्मानिती।।१।। प्रेमे पूजन करिती। ज्ञानामृते नित्य तृप्ती।।२।। पादोदक प्रसाद सेविती। तुमची कृपा संपादिती।।३।। लक्ष्मणा द्यावे सुख। तुमचे द्वारीचा तो रंक।।४।।

२४९१. प्रभोस्वामी नित्य तृप्ता। ब्रह्मानंदाचा तू भोक्ता।।१।। आपुलेपण देशी दासा। तोडितोसी भवफासा।।२।। पुनर्जन्म भक्ता नाही। सदासर्वदा विजयी।।३।। लक्ष्मणा चरणी ठेवा। दास आपुला म्हणावा।।४।।

म. बसवेश्वर

२४९२. बसव अक्षर जपती जे शूर। पापाचा संहार होय नामे।।१।। बकार हा शब्द बद्धाते उद्धरी। सकार अंतरी कार्य साधे।।२।। बकार हा शब्द वासनेचे मूळ। तोडी हो तत्काळ मंत्रराज।।३।। अहोरात्रंदिन जप निजध्यास। होता मायापाश तुटती हो।।४।। करा हो सार्थक नका गुंतू वाया। दुर्धर ही माया दुःख मोठे।।५।। लक्ष्मण म्हणे बसव अनादी। जपा कार्यसिद्धी होती सर्व।।६।।

२४९३. बसव त्रिअक्षरी जपा सुख होय। स्वानुभव सोय सापडे हो।।१।। ब्रह्मरूप करी होय ब्रह्मानंद। स्वानंदाचा कंद जोडे बाप।।२।। मन बुद्धी चित्त लावा प्रभोपायी। सुख ते अक्षयी देतो तात।।३।। शिवयोगी ध्याती बस्वलिंगाप्रती। मायापाश भ्रांती नुरे तेथे।।४।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मरूप होती। बस्वलिंगाप्रती शरण व्हा हो।।५।।

२४९४. धन्य धन्य बसवेश्वर। प्रभो मायागुणापर।।१।। प्रभो शिवाचा तो आत्मा। केवळ आहे तो परमात्मा।।२।। प्रभो अनादी अनादी। भक्तजना कृपानिधी।।३।। लक्ष्मण म्हणे तात। आपण झाला देवभक्त।।४।।

२४९५. शिव तोचि बसवेश्वर। बसवेश्वर तोचि ईश्वर।।१।। नोहे त्याहा वेगळेपण। भक्तजनाचे जीवन।।२।। अवघा आपणचि नटला। अनंत रूपे करतो लीला।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। भक्तजना कृपावंता।।४।।

२४९६. बसवेश्वर विश्वामधी। बसवेश्वर कृपानिधी।।१।। बसवेश्वर जगद्गुरू। बसवेश्वर परात्परू।।२।। करावया जगदुद्धार। प्रभो झाला तो साकार।।३।। लक्ष्मण त्याचे द्वारी। पडला सांभाळ तो करी।।४।।

२४९७. शिवगणाचा तो आत्मा। योगी ध्याती सर्वोत्तमा।।१।। बसवेश्वर शिवध्यानी। अक्षयी असे शिवस्मरणी।।२।। त्याची अक्षयी समाधी। भक्तजना कृपानिधी।।३।। लक्ष्मण तो बोलवी। तोचि वश सर्वाठायी।।४।।

२४९८. वेदान्ताचे घेऊनि सार। प्रभो सर्वदा निर्घोर।।१।। ब्रह्मानंदी हो निमग्न। प्रभो भक्तास्तव सगुण।।२।। भक्ती मार्ग स्थापितात। आपण सर्वदा निवांत।।३।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। फार सोडविले मानी।।४।।

२४९९. वैराग्याचा केवळ निधी। बसवेश्वर विश्वाआदी।।१।। पायापाशी

तिष्ठती सिद्धी। पायापाशी सर्व ही निधी।।२।। अनंत ब्रह्माडे उभवी। क्षणामाजी तो लपवी।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते। योगी ध्याती परतल्या चित्ते।।४।।

२५००. वीरशैवांमाजी शूर। आहे शैवांचे माहेर।।१।। राज्य ब्रह्मांडसंपत्ती। वमनप्राय प्रभोप्रती।।२।। बाह्यानंद नावडे त्याला। ब्रह्मानंदी मग्न झाला।।३।। लक्ष्मण म्हणे शिवयोगी। प्रेमे ध्याती प्रभोलागी।।४।।

२५०१. शतकोटी शिवगण। करिती प्रभोचे पूजन।।१।। चौसष्ट कोटी गण। आहेत शिवा हो समान।।२।। ते ही बसवेश्वरा स्तविती। प्रभो ते वेष्टून चालती।।३।। वैराग्याचा मुकुटमणी। बसवा चिन्मयखाणी।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते। भक्ती प्रिय स्तवू नित्य।।५।।

२५०२. प्रभोते स्तविती निगम। स्तविती अठ्ठावीस आगम।।१।। पुराणी ही प्रभोची कीर्ती। भक्त स्वानंदे गाती।।२।। प्रभो ज्ञानाचा तो अब्धी। तेथे नाही भव उपाधी।।३।। लक्ष्मणाचे जीवन। प्रभो कृपेचे सदन।।४।।

२५०३. नमो नमो ज्ञानमूर्ती। बसवेश्वरा कृपामूर्ती।।१।। तुझे वैभव अपार। आहेसी सिद्धाचे माहेर।।२।। स्वयंप्रकाश अजरामर। काय वर्णू मी पामर।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

२५०४. त्रिविध तापांते जाळिसी। भक्ता चरणी ठेवीसी।।१।। तुझे नाम घेती वदनी। धन्य धन्य ते त्रिभुवनी।।२।। बसवेश्वर वदती वाचे। अती सखे ते शंभोचे।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। मज सोडवा पतिता।।४।।

२५०५. तुझी लीला अगणित। तुज नाही आदि अंत।।१।। सच्चिदानंद घन। बसवा अनादी निर्गुण।।२।। शिवावेगळा न होशी। ध्यानी तत्पर आहेसी।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। तुम्हा स्वाधीन तो देव।।४।।

२५०६. शिवभक्त शिखामुनी। गेला इंद्राचे भुवनी।।१।। त्यांनी सन्मानिले नाही। मुनी दुखावला हृदयी।।२।। समर्थाचा अपमान। हे तव अनर्था कारण।।३।। लक्ष्मण म्हणे गर्व। आहे दुःखदायक स्वभाव।।४।।

२५०७. मुनीने तप केले दारुण। शिव केला तो प्रसन्न।।१।। शिवे मंत्र उपदेशिला। मुनी ते जपता झाला।।२।। मुनीची पाहूनि भक्ती। शिखेतूनि प्रकटली मूर्ती।।३।। त्रिविधाकार तू बसवा। मान्य आहेसी सर्व देवा।।४।। गायत्री मंत्रा हो पासून। आपण झालात सगुण।।५।। वत्सरूपी प्रकटलासी।

दंड केला त्या देवासी।।६।। लक्ष्मण म्हणे तुझी कीर्ती। महासिद्ध ते वर्णिती।।७।।

२५०८. मुनिआज्ञेने क्षीराब्धी। प्राशिला त्वा कृपानिधी।।१।। युद्धी हर तोषविला। मुनी फार संतोषला।।२।। तुझा प्रताप अगणित। तुझ्या वैभवा नाही अंत।।३।। तुझ्या अंगा हो पासून। निघालेत पुरातन।।४।। लक्ष्मण म्हणे ताता। तू तव धर्माचा रक्षिता।।५।।

२५०९. मुनि-आज्ञे नंदिकेश्वरा। गेलासी तू अमरपुरा।।१।। पितृ-आज्ञे इंद्र जिंकिला। फार दंड त्याते केला।।२।। युद्ध केले बा दुर्धर। इंद्र केला तो जर्जर।।३।। नंदनवन विध्वंसिले। देव सर्वत्र गांजिले।।४।। लक्ष्मणा द्यावी सेवा। बसवेश्वरा कृपाळुवा।।५।।

२५१०. घ्राणस्वरे इंद्र उडविला। कैलासासी जाऊन पडला।।१।। शिवगणांनी उचलून। नेला गण तो प्रवीण।।२।। त्याते शिवे आश्वासिले। आपणापाशी बैसविले।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। आला युद्धालागी देव।।४।।

२५११. तुम्ही लीला केली फार। युद्धी जिंकिला ईश्वर।।१।। युद्ध महान केले थोर। प्रतापे जिंकिला शंकर।।२।। महान युद्धाचा प्रसंग। तोषविला उमारंग।।३।। लक्ष्मण म्हणे कीर्ती। अक्षयी तुमची धन्य मूर्ती।।४।।

२५१२. अनंत ब्रह्मांडे रोमी वसती। ऐसा शिव ज्ञानमूर्ती।।१।। तो त्वा स्वाधीन बा केला। प्रेमे हृदयी साठविला।।२।। प्रभोचे झालासी वाहन। पृष्ठीवरी ब्रह्म सगुण।।३।। लक्ष्मण म्हणे बसवा। भक्तजना तू विसावा।।४।।

२५१३. मुनीप्रती तोषविले। शिवसख्य त्वा जोडले।।१।। शिवकार्ये अक्षयी करिसी। त्यावेगळा नोहेसी।।२।। करावया जगदुद्धार। देवभक्त तो ईश्वर।।३।। प्रभो तुझिया रे भक्ता। नसे भवाची ही वार्ता।।४।। लक्ष्मण हो तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।५।।

२५१४. नमो नमो बसवेश्वरा। नमो नमो विश्वंभरा।।१।। अवघा तूचि बा दिससी। स्वानंदाचे बीज आहेसी।।२।। तुझी लीला नकळे नकळे। ब्रह्मरूप तू निर्मळ।।३।। अहो स्कंद त्या पुराणी। आहे व्यासांची हो वाणी।।४।। लक्ष्मणा सेवा द्यावी। चरणी वासना ठेवावी।।५।।

२५१५. ताता बसवलिंगा प्रभोचा तू प्राण। धन्य तू प्रवीण महाराज।।१।।

तुझे प्रतापाची सीमा हो जाहली। देव त्वा जिंकिले तिन्ही बापा।।२।। शिवाप्रती ताता स्वाधीन त्वा केले। ब्रह्मांड जिंकिले प्रतापे रे।।३।। तुजऐसा भक्त दुजा कोण शूर। मायेचिया पर झालासी तू।।४।। ब्रह्मांडसंपत्ती करूनि उपेक्षा। वश विरूपाक्षा केलेसी त्वा।।५।। वीरशैव तू रे महाराज भक्त। सर्वदा ध्यानस्थ शिवापाशी।।६।। लक्ष्मण म्हणे मजलाही पायी। ठेवा हो अक्षयी महाराज।।७।।

२५१६. अनादी बसवा योगिया विसावा। मन हे वसवा तेथे वेगी।।१।। बस्वलिंगापायी मन वसता रे। होतसे सुख रे निरंतर।।२।। शिवयोगी त्याचे ध्यानी निरंतर। प्रकृतीच्या पर स्वामिराव।।३।। अगोचर स्वामी सर्वांचा जाणता। कोणे कर्मी ज्ञाता लिप्त नसे।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते स्मरता रे। तेचि अंग सारे होत असे।।५।।

२५१७. अलक्ष बसवा अनादी विसावा। सर्वातीत ध्यावा निजनिष्ठ।।१।। नामरूपातीत निरंतर तो रे। उलट उलट्या दृष्टी रे पाहावा तो।।२।। उलटा उलटा स्मरा वेगी श्रेष्ठा। व्यर्थ खटाटोपा गुंतू नका।।३।। गुरुकृपे मन संतसंगतीने। मागे परतून पाहातसे।।४।। लक्ष्मण म्हणे महालिंगी भेटी। होता जन्मतुटी होत असे।।५।।

२५१८. बसवा अनाम नामरूपातीत। पूर्ण तो सतत भरलासे।।१।। भरूनि उरला योगिया हृदयी। योगी तो अक्षयी ध्याती नित्य।।२।। देवभक्त तात आपणचि सर्व। मायेचा लाघव त्याचे सत्ते।।३।। त्रिपुटी पसारा होत जात असे। बसवा अविनाश निजवस्तू।।४।। लक्ष्मण म्हणे शिव त्याचे ध्यानी। स्वानंदाची खाणी बसवलिंग।।५।।

२५१९. बसवा निर्गुण परात्पर पूर्ण। ब्रह्म सनातन स्वामी माझा।।१।। त्रिपदा गायत्रीरूप तो बसवा। त्रिनेत्री विसावा तोचि जाणा।।२।। अकार उकार मकार मांडणी। त्रिपुटी ही खाणी वेगळा तो।।३।। सर्वत्रा हो ठायी असे सबराभर। जेवी दिनकर व्यापाराते।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते आठवा रे। आटणी होय रे मीतूपणा।।५।।

२५२०. अक्षर बसवा तोचि रे क्षरला। आकार हा झाला मायागुणे।।१।। क्षर अक्षर ह्या बाहू त्याच्या दोन्ही। द्वैत उभारणी मायागुणे।।२।। माया ही

प्रभोच्या अंगभूत सदा। त्रिलोकी संपदा तिचीच हो।।३।। आपणचि सर्व नटला सदनी। आपुलिया स्थानी स्वस्थ असे।।४।। सूर्याअंगी किरण तद्वत् हा पसारा। आपण संसारा आला नाही।।५।। लक्ष्मण म्हणे निर्गुण बसवा। शिवाचा विसावा आदिगुरू।।६।।

२५२१. शिवाचा तो आत्मा स्वामी तो बसवा। प्रभो महादेवाचा तो सखा।।१।। उमापती शिव ध्यानी त्याचे रत। महिमा अद्भुत स्वामीचा हो।।२।। निरामय तात निःसंग निर्द्वंद्व। केवळ ब्रह्मानंद निजतत्त्व।।३।। ब्रह्मानंद प्राप्त होतसे त्या ध्याता। जन्ममरण वार्ता कैची उरे।।४।। लक्ष्मण म्हणे सुकृती जे प्राणी। तेचि याचे ध्यानी निरंतर।।५।।

२५२२. बसवा परमधाम विश्रांतीचे। कल्याण भक्ताचे करीत असे।।१।। कल्याण करूनि देतसे निजपद। बसवा परमानंद निजमूर्ती।।२।। आगम ते योगी कीर्ती गाती बा रे। कीर्तीचा शोभला स्तंभ प्रभो।।३।। शिवभक्ताचे ते माहेर सुखाचे। त्रिताप भक्ताचे भस्म होती।।४।। लक्ष्मण म्हणे बसवा तो शिव। दोघे ऐक्यमेव निजवस्तू।।५।।

२५२३. बसव आमुचा मूळ हो पुरुष। त्याचे आम्ही वंश म्हणवितो।।१।। त्याच्या वंशामध्ये आमुचा हा जन्म। पाहू निजधाम आपुले ते।।२।। मूळ पुरुषाची भेटी घ्यावी इच्छा। पूर्ण होय वांछा त्याची म्हणून।।३।। थोर आमुचा स्वामी बसवा दयाळू। अती हो स्नेहाळू माय बाप।।४।। लक्ष्मण म्हणे चला मूळधामी। आपुला तो स्वामी भेटू त्याते।।५।।

२५२४. बसवा सुखाचा अक्षयी जवळी। असे सर्वास्थळी पाहा वेगी।।१।। अंतर्बाह्य बसवा भरलासे दाट। अक्षयी निघोट निरंतर।।२।। अनंत ब्रह्मांडा आवरण त्याचे। मूळ तो विश्वाचे नित्य सदा।।३।। मीतूपणा सारा शुद्ध भाव धरा। कृपेच्या सागरा पाहा वेगी।।४।। लक्ष्मण म्हणे वय हे चालले। स्वहित आपुले करा वेगी।।५।।

२५२५. चिन्मय बसवा प्रेमे तो वसवा। आठवा आठवा स्वानंदे तो।।१।। पीत श्वेत रक्त नील उल्लंघून। व्यक्ती सर्वाहून परता जो का।।२।। षट्चक्रापर शुद्ध निर्विकार। दळादी आकार नाशिवंत।।३।। कोटी भानू जेथे लोपले जाऊनि। चिन्मयाचि खाणी उघडिते।।४।। लक्ष्मण म्हणे दृश्याते सारूनि।

व्हावे हो आपण निजअंग।।५।।

२५२६. त्रिअक्षरी बसवा त्रिताप ते वारी। स्मरा झडकरी कार्य साधा।।१।। स्मराचा महिमा अद्भुत आहे रे। फार मुक्त झाले ते रे प्राणी।।२।। भवदुःख काही नुरे नुरे सत्य। ब्रह्मांडभरित देवराव।।३।। गुरुकृपा सार करावा विचार। कृपे निरंतर सुख होय।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ताची माउली। बसवा साउली भक्ताप्रती।।५।।

२५२७. कल्याणी अवतार घेतला प्रभोने। धर्मसंरक्षण केले ताते।।१।। वीरशैव धर्माचा तोही मुकुटमणी। बसवपुराणी प्रसिद्ध हो।।२।। प्रमथादी गण आले भूतळाते। दिधले भक्तांते सुख फार।।३।। गणाधीश्वराचा महिमा अपार। प्रभो गंगाधर वश त्याहा।।४।। लक्ष्मण म्हणे लिंगी ऐक्य झाले। त्याहाचे पाउल ध्यातो आम्ही।।५।।

२५२८. गणाधीश्वराचे स्वाधीन शंकर। वश निरंतर भक्तिबळे।।१।। शिवार्पित क्रिया होती हो त्याहाची। सहज क्रियेच्या वेगळी ते।।२।। संसारी वर्तती पद्मपत्रापरी। निर्घोर अंतरी सदा सुखी।।३।। षट्स्थलज्ञान त्याहाप्रती शोभे। जैसे शुद्ध नभ तैसे ते हो।।४।। लक्ष्मण म्हणे इष्ट भाव प्राण। ऐकता पूर्ण वश तात।।५।।

२५२९. बसव दयाळू दयेचे आगर। कृपेचे भांडार दीनबंधू।।१।। सत्याचे आगर शुद्ध बुद्ध मुक्त। ब्रह्मांडभरित बस्वलिंग।।२।। बसव शिवाते अतिप्रिय बा रे। शिव त्या स्मरी रे भक्तिबळे।।३।। नमो सर्वोत्तमा केवळ आरामा। निष्कामा आरामा देवराया।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते स्तवा बा रे। बसव सखा रे निजभक्तांचा।।५।।

२५३०. बसव त्रिपुटीवेगळा तो मुक्त। नामरूपातीत निजरूप।।१।। निराभार वीरशैवांची माउली। कृपेची साउली परात्पर।।२।। भक्ताप्रती करितो आपुले समान। सगुण आपण भक्तास्तव।।३।। शिवभक्ताचा तो साह्यकारी जाणा। त्याचिया चरणा स्तवा वेगी।।४।। लक्ष्मण म्हणे स्वानंदाची खाणी। महिमा पुराणी प्रसिद्ध हो।।५।।

२५३१. बसवा बसवा प्रेमे जे स्तविती। सखा पशुपती त्याचा झाला।।१।। बसव हा जप शिवाचे अंतरी। स्मरा झडकरी बस्वलिंगा।।२।। संसारकबाड

वाहता मराल। दंड तो भोगाल कृतांताचा।।३।। कृतांताचा दंड आहे तो दुस्तर। नरक ते अघोर नाना दुःख।।४।। लक्ष्मण म्हणे स्वामी सखा करा। सूर्य त्या कुमरा वंद्य व्हाल।।५।।

२५३२. बस्वण्णाचे भक्त सर्वदा विजयी। भक्तिसुख त्याही स्वीकारिले।।१।। दुजे प्रिय नसे स्वरूपी रमले। कल्पनेच्या झाले पर ते बा रे।।२।। कल्पना हेचि हो अविद्या सुंदरी। धरूनिया पदरी भ्रमवी हो।।३।। निजभक्त तिच्या पलीकडे गेले। सुखाते पावले म्हणूनिया।।४।। लक्ष्मण म्हणे प्रभुभक्त थोर। व्हा हो वेगी पार कृपाबळे।।५।।

२५३३. बसव कर्माचे करितो खंडन। बसव निर्गुण चिन्मात्र तो।।१।। भक्तास्तव सगुण झाला मायातीत। सर्वदा ध्यानस्थ शिवाजवळी।।२।। बसव शिवाचे ध्यान करीतसे। शिव तो महेश बसवा स्तवी।।३।। उभयता एक स्वरूप प्रसिद्ध। पूर्ण ब्रह्मानंद निजस्वरूप।।४।। लक्ष्मण म्हणे बसवा स्तवा हो। मुक्त वेगी व्हा हो महिमा श्रेष्ठ।।५।।

२५३४. बसव आमुचे जीवीचे जीवन। ब्रह्मसनातन बस्वलिंग।।१।। आम्ही त्याचे दीन म्हणवितो बा रे। आमुचा सखा रे दयाघन।।२।। भक्त त्याहा फार आवडती जाणा। भक्त मानी प्राणाहूनि अधिक।।३।। भक्तास्तव स्वामी अवतार धरी। भक्तांचा कैवारी बसव पूर्ण।।४।। लक्ष्मण म्हणे बसव अगोचर। स्मरा निरंतर मुक्त व्हाल।।५।।

२५३५. बसव गणांचा अधिकारी जाणा। सर्वत्रही गणा प्रिय तो हो।।१।। स्वामी गजानन वीरभद्रादिकरून। बसवेशाकारण मान देती।।२।। शिवाते विसावा आहे तो बसवा। सर्वत्रही देवा पूज्य आहे।।३।। याते स्तविता शिवा अतिप्रिय वाटे। सखा नीलकंठ अक्षयी त्याहा।।४।। लक्ष्मण म्हणे स्तवा बस्वराज। सर्वत्रही काज पूर्ण होती।।५।।

२५३६. बसव आमुचा कूळस्वामी पूर्ण। बसव जीवन आमुचे हो।।१।। तोचि आमुचे देही वसतो दयाळ। क्रिया ह्या सकळ त्याचे सत्ते।।२।। वाचे तो बोलवीतसे हो बसव। प्राणाते बसव चेष्टवी हो।।३।। अंतःकरणापूर्वी बसव सर्वठायी। रिता ठाव नाही स्वामीविण।।४।। लक्ष्मण म्हणे स्वानंदजीवन। बसव परिपूर्ण ब्रह्मलिंग।।५।।

२५३७. बसवा बसवा बसवा बसवा। जिवाचा विसावा घ्या हो वेगी।।१।। विसाव्याची जागा आहे तो बसवा। प्रपंच हो गोवा चुकवी हा।।२।। अक्षयी कल्याण जन्ममरणातीत। करीतसे तात स्मरा वेगी।।३।। जन्ममरणातीत व्हावे हे बरवे। काळातीत व्हावे कृपे त्याच्या।।४।। लक्ष्मण म्हणे आपणा आपण। कोण हे समजून घ्यावे बा रे।।५।।

२५३८. बस्वलिंग ताता तुझे आम्ही दीन। आम्हाते पावन करावे हो।।१।। तुम्ही पतिताते पावन करिता। दयाळा समर्था दीनबंधू।।२।। आम्हा पामरांची हेचि विनवणी। अक्षयी चरणी वसावे हो।।३।। तुमचा भरवसा आहे ताता म्हणून। आलो मी शरण मनोभावे।।४।। लक्ष्मण म्हणे स्वामी तूते भक्ती। प्रिय कृपामूर्ती बस्वलिंगा।।५।।

सिद्धरामेश्वर

२५३९. सोलापुरी सिद्धराम। केवळ परमात्मा निष्काम।।१।। भक्तास्तव सगुण झाला। करितो निष्काम भक्ताला।।२।। प्रेमे करावे भजन। तुटती भव हे बंधन।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तापाशी सदोदित।।४।।

२५४०. सिद्धराम शिवयोगी। पावन करितो भक्तालागी।।१।। अति दुष्ट उद्धरिले। चरणापाशी हो स्थापिले।।२।। प्रभू कृपेचे आगर। केवळ ज्ञानाचा सागर।।३।। लक्ष्मण म्हणे तात। शुद्ध बुद्ध नित्य मुक्त।।४।।

२५४१. सिद्धराम शिवज्ञानी। केवळ स्वानंदाची खाणी।।१।। आनंद देतसे भक्ताला। पावन करितो दीनाला।।२।। नाम पतितपावन। प्रभो करितो कल्याण।।३।। लक्ष्मण म्हणे संग। तोडूनि करितो निःसंग।।४।।

२५४२. सिद्धराम पूर्णज्ञानी। भक्तजनाची जननी।।१।। दया प्रभोपाशी फार। केवळ स्वानंदाचे घर।।२।। घ्या हो प्रभोचे दर्शन। प्रभो करितो कल्याण।।३।। लक्ष्मण दीन त्याचा। दास असे हो प्रभूचा।।४।।

२५४३. अहो सिद्धरामेश्वर। केवळ ज्ञानाचे आगर।।१।। वेदान्त सिद्धान्त त्यापाशी। ज्ञान वसे अहर्निशी।।२।। भक्ती स्थापितसे तात। पावन करितो पतित।।३।। लक्ष्मण म्हणे बा रे। अति प्रेमे त्याते ध्या रे।।४।।

२५४४. नमो नमो सिद्धरामा। मायातीता हो निष्कामा।।१।। भक्तजनांचा तू दाता। महाराजा कृपावंता।।२।। भवार्णवी पडलो ताता। आम्हा सोडवा

पतिता।।३।। तुम्ही पतितपावन। करिता दीनाचे रक्षण।।४।। लक्ष्मण तुमचा दीन। प्रभो करा हो पावन।।५।।

२५४५. तुम्हा नमो सिद्धरामा। केवळ स्वानंदाच्या धामा।।१।। भक्तास्तव तू सगुण। झालासी बा कृपाघन।।२।। कर्म उपासना ज्ञान। तुम्हापाशी योग पूर्ण।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

२५४६. सिद्धरामा योगिराया। तुम्हा नमो स्वामिराया।।१।। तुझी माया ती कळेना। मायातीता सिद्धा पूर्णा।।२।। अनेक क्रीडा तू करिसी। वससी बा भक्तापाशी।।३।। लक्ष्मण अति दीन। प्रभो करा हो पावन।।४।।

२५४७. अति श्रेष्ठा सिद्धरामा। भक्ता नेशी निजधामा।।१।। केवळ ज्ञानाचा तू निधी। राबताती सर्व सिद्धी।।२।। प्रभो स्वानंदजीवना। अतिप्रिय तू पंचानना।।३।। लक्ष्मण म्हणे ताता। पावन करा मज पतिता।।४।।

२५४८. प्रभो सिद्धा जगद्गुरू। दीनानाथा कल्पतरू।।१।। कल्पवृक्ष न्यून दिसे। परमात्मा तू अविनाश।।२।। कामधेनू चिंतामणी। हेही न तुळती तुळणी।।३।। आपणाऐसे करिसी। भक्ता चरणी ठेविसी।।४।। लक्ष्मणा द्यावी गोडी। नामामृताची आवडी।।५।।

२५४९. सिद्धरामा तू दयाळ। अतिश्रेष्ठ बा निर्मळ।।१।। पतितांते देशी गती। धन्य धन्य तू कृपामूर्ती।।२।। साधुजना तू विश्रांती। तुजपाशी निजशांती।।३।। लक्ष्मणाते पावन। करा तुम्ही कृपाघन।।४।।

२५५०. सिद्ध ज्ञानियाचा राजा। अवतरला भक्तकाजा।।१।। गणांमाजी ज्याची कीर्ती। स्वतःसिद्ध कृपामूर्ती।।२।। सिद्धयोगामाजी श्रेष्ठ। वसविली भक्तिपेठ।।३।। लक्ष्मण म्हणे तात। पद देतसे निवांत।।४।।

२५५१. षड्रिपूते जिंकून। योगामाजी तो प्रवीण।।१।। आत्मसुखामाजी रत। सदासर्वदा ध्यानस्थ।।२।। त्याची खंडेना समाधी। भक्ता देतो निजनिधी।।३।। लक्ष्मण त्याचा दास। सेवीतसे त्या सुखास।।४।।

२५५२. सिद्धरामा आत्मज्ञानी। ब्रह्मानंदाची ती खाणी।।१।। विषयानंदाते विटून। ब्रह्मानंदी तो निमग्न।।२।। राज्य ब्रह्मांड वमन। मानिती ते ज्ञानी पूर्ण।।३।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। फार सुखी केले प्राणी।।४।।

२५५३. सिद्धराम भक्तसखा। मेळवितो निजसुखा।।१।। सुख अगणित

त्यापाशी। तोडितसे भवविवसी।।२।। भवाब्धी हा भयंकर। त्याचे कृपे हा व्यापार।।३।। लक्ष्मण म्हणे स्तवा। तुटे जन्ममृत्यू गोवा।।४।।

२५५४. सिद्धराम ज्ञानमूर्ती। ब्रह्मानंदी त्याची वस्ती।।१।। त्याते स्मरा प्रेमे स्मरा। भक्ती प्रिय विश्वंभरा।।२।। त्याचे कृपे ज्ञान होय। स्मरा स्मरा प्रभोपाय।।३।। सुख स्वानंद देतसे। शिवज्ञानी तो अविनाश।।४।। लक्ष्मण म्हणे बा रे। प्रेमयुक्त त्याते ध्या रे।।५।।

२५५५. नमो सिद्धा सिद्धरामा। नमो तू बा निगमागमा।।१।। शैव वीरशैव तूते। स्तविती बा प्रेमयुक्त।।२।। अद्वय सुख देशी त्याते। राज्यवैभव सकामाते।।३।। लक्ष्मणा पायी ठेवा। महाराजा सिद्धा देवा।।४।।

२५५६. सिद्धराम सिद्धासनी। बैसला तो ब्रह्मज्ञानी।।१।। तीर्थ शोभले प्रभूजवळी। त्याते वश चंद्रमौळी।।२।। भक्ती दाविली आचरून। भक्ती ज्ञानाचे निजधन।।३।। लक्ष्मण म्हणे तात। स्मरा करितो मायातीत।।४।।

२५५७. षट्चक्रांते भेदून। महालिंगी तू निमग्न।।१।। अक्षयी महालिंगी वास। अनेक करिसी विलास।।२।। पूर्णब्रह्म तू अविनाश। सर्वसाक्षी सिद्धपुरुष।।३।। लक्ष्मणाते अक्षयी। प्रभू चरणसेवा द्यावी।।४।।

२५५८. अनंत ब्रह्मांडांचा पती। तुम्हा स्वाधीन पशुपती।।१।। तुमचे भाग्य वर्णू किती। अन्यायी मी मंदमती।।२।। प्रभो सिद्धा सिद्धरामा। प्रभूचा तू केवळ आत्मा।।३।। लक्ष्मणा सांभाळावे। प्रभू दीनाते तारावे।।४।।

२५५९. दीनदयाळू तू धनी। आम्हा दीनांची जननी।।१।। तुझे नाम घेता वाचे। पर्वत जळते पापाचे।।२।। योगिराया सिद्धरामा। तुम्हापाशी अक्षयी क्षमा।।३।। लक्ष्मण हा पावन। करा तुमचा म्हणवितो दीन।।४।।

शरण

२५६०. शरण ते धन्य भक्तिसुख घेती। लिंगी मनोवृत्ती लय झाली।।१।। षट्स्थलज्ञान परिपूर्ण वसे। देह उरलासे प्रारब्धाधीन।।२।। महालिंगी मन राहिले निश्चळ। व्यापार सकळ तेचि झाले।।३।। अवघा महालिंग अंतर्बाह्य धनी। राहिले रमूनि तेचि ठायी।।४।। लिंगी ऐक्य झाले तेचि ऐक्यस्थळ। एकचि बंबाळ झाला जाण।।५।। लक्ष्मण म्हणे स्वानुभवगोडी। घेती ते आवडी निजभक्त।।६।।

२५६१. शरण ते सदा संसारी उदास। परमपुरुष ध्याती शिव।।१।। परात्पर शिव धाम विश्रांतीचे। स्थान ते सुखाचे सदोदित।।२।। तेचि सुख त्याहा आवडले सत्य। सुख हे अनित्य तृणप्राय।।३।। शांतीचे सागर दयेचे आगर। लिंग अगोचर वश त्याहा।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य ते प्रवीण। त्याहाते नमन आमुचे हो।।५।।

२५६२. शरणाचे दास आम्ही हो उदास। घालूनिया कास स्तवितो त्याहा।।१।। त्याहाची संगती आम्हा गोड वाटे। भवसिंधू आटे कृपे त्यांच्या।।२।। धन्य धन्य प्राणी उद्धरिती जग। शिव उमारंग वश त्याहा।।३।। उमाविलास ते स्वस्थ त्या हो देही। आठविले पाही भक्तिबळे।।४।। लक्ष्मण म्हणे महालिंगी वस्ती। केली म्हणूनिया नित्य मुक्त।।५।।

सिद्धेश्वर

२५६३. विश्वमना प्रभोराया। सिद्धगुरू दावा पाया।।१।। तुझ्या पायाची केली आस। कधी भेटसी तू जगदीश।।२।। कंठी उरलासे प्राण। भेटी द्यावी बा आपण।।३।। लक्ष्मण विनवी स्वामीसी। चित्त लागले तुम्हापाशी।।४।।

२५६४. सिद्धराया मायबापा। वेगी यावे जंगमरूपा।।१।। स्थावरामाजी तुझी वस्ती। अगम्य हो तुमची कीर्ती।।२।। काय वर्णू मी मंद हीन। अलक्ष बा तू निर्गुण।।३।। लक्ष्मण आपुले स्वहिता। ध्यातसे तुम्हाप्रती ताता।।४।।

२५६५. सिद्धेश्वरा यावे सगुणा। वीरशैवा बा सर्वज्ञा।।१।। मस्तकी शोभे जटाभार। भस्म शोभे अंगावर।।२।। काषाय वस्त्र तुम्हा शोभती। पायी पादुका विराजती।।३।। लक्ष्मणाचा दातार। सिद्धस्वामी सर्वेश्वर।।४।।

२५६६. सिद्धराजा परमेश्वरा। अनाथनाथा हो दातारा।।१।। करावया जगदुद्धार। स्वामी घेतला अवतार।।२।। संतसंगाचा महिमा थोर। नामस्मरणे तरले फार।।३।। लक्ष्मणाचे तू धन। तुजवाचोनि त्राता कोण।।४।।

२५६७. येई येई बा निरुपमा। परात्परा सुखधामा।।१।। सिद्धराज आनंदमूर्ती। सकलकारणा प्राणपती।।२।। तुम्हावाचोनि क्षणभरी मज। न गमे झाले मी निर्लज्ज।।३।। लक्ष्मणाची तू आई। झाला लीन तुझे पायी।।४।।

२५६८. सिद्धगुरू सखा केला। आता मी भिईना कोणाला।।१।। सहा जणा मी मानीना। जबरदस्त मी झाले जाणा।।२।। आशा मनशा तृष्णादी

करोनि। यासी मी न मानी साजणी।।३।। लक्ष्मणा संग सिद्धाचा। कुसंग नाही हो कामाचा।।३।।

वडवाळसिद्ध नागनाथ

२५६९. वडवळसिद्धा नमो नागनाथा। स्नेहाळ समर्था दीनानाथा।।१।। ज्ञानाचे आगर सिद्धा तू सर्वज्ञा। आहेसी बा प्राज्ञा अतिश्रेष्ठा।।२।। तुझी कीर्ती थोर सर्वदा विजयी। तुझ्या भक्ता नाही दुःख स्वप्नी।।३।। लक्ष्मणा दीना प्रेमसुख द्यावे। स्मरणी ठेवावे निरंतर।।४।।

२५७०. नागनाथा सिद्धा तुम्ही फार केली ख्याती। साधू तुम्हा ध्याती योगिराया।।१।। आले जे शरण केले त्वा पावन। पतितपावन नाम तुमचे।।२।। ज्ञानाचा सागर विज्ञाना माहेर। कृपा निरंतर तुम्हापाशी।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तमनोरथ। पुरविसी समर्थ आहेसी तू।।४।।

२५७१. नागनाथा तुम्हापाशी कृपा फार। भक्ताचे माहेर सत्य सत्य।।१।। सकामाते देशी स्त्रिया पुत्र धन। निष्कामा पावन करितोसी।।२।। निष्काम ते भक्त तुम्हा अतिप्रिय। दाखविसी पाय त्याहाप्रती।।३।। लक्ष्मणावरी कृपा हो करावी। साधुराया देई भक्तिसुख।।४।।

२५७२. नागनाथा सिद्धा तुम्ही नित्यमुक्ता। भक्ताते निवांत करिता ताता।।१।। बहिरंभट भ्रष्ट झाला तो अपवित्र। त्याते त्वा पवित्र केले सिद्धा।।२।। त्याचा देह नवीन केला तो उत्पन्न। साधुत्व देऊन श्रेष्ठ केला।।३।। लक्ष्मण म्हणे तुमचे सामर्थ्य अपार। नित्य परोपकार करीत आहा।।४।।

२५७३. जगाच्या कल्याणा तुमचे अवतार। दया निरंतर तुम्हापाशी।।१।। अति हीन जीव झाले कुसंगाने। पडले गुंतून मायामोही।।२।। कुसंग हा आहे दुःखासी कारण। जहाले बंधन जीवालागी।।३।। लक्ष्मण म्हणे त्याहाचे बंधन। ज्ञानखड्गे करून छेदितोसी।।४।।

२५७४. ज्ञानसिंधू तुम्ही आहा नागनाथा। पावन अनाथा करितोसी।।१।। तुमची समाधी अक्षयी अक्षयी। भक्ताप्रती पायी ठेवितोसी।।२।। क्षुल्लकानंद तुम्हा रुचेना रुचेना। समाधी खंडेना तुमची हो।।३।। लक्ष्मणावरी कृपा हो करावी। भ्रांती निवारावी प्रभो श्रेष्ठा।।४।।

२५७५. विषया विटून स्वरूपी निमग्न। स्वतःसिद्ध पूर्ण झालासी तू।।१।।

ब्रह्मांड हे राज्य सुख ते मायिक। तुम्ही तो त्र्यंबक सखा केला।।२।। अज्ञानी हे जीव या सुखा गुंतले। कासावीस झाले कामबळे।।३।। लक्ष्मण म्हणे त्याहाचा उद्धार। करिता परात्पर आहेसी तू।।४।।

२५७६. नमो सिद्धा नमो नमो ज्ञानमूर्ती। देव सन्मानिती तुम्हा सिद्धा।।१।। नागनाथा श्रेष्ठा पतिता पावन। केले तू सगुण भक्तास्तव।।२।। दया क्षमा शांती अक्षयी विजयी। तुम्हापाशी नाही द्वैतबोध।।३।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मानंद घेशी। विषयी विटलासी नित्यमुक्ता।।४।।

२५७७. जगी असूनि तू वेगळा आहेसी। स्वानंदाची राशी आहेसी तू।।१।। पद्मपत्रापरी वर्तता तू जगी। लिप्त कर्मालागी नाहीत हो।।२।। मायातीता तुम्ही अनाथांचे नाथ। करिता समर्थ आहात हो।।३।। चुंबकाचे परी करिता कल्याण। प्रभो महिमान न कळे हो।।४।। चुंबकलोहाचा दृष्टांत साजेना। क्रीडा तुम्ही नाना करीतसा।।५।। लक्ष्मणावरी प्रभू कृपा करा। अनादी सोयरा आहेसी तू।।६।।

२५७८. नवविधा भक्ती वसे तुजपाशी। करुणाघन आहेसी योगिराया।।१।। अनंत ब्रह्मांडे करिता पंचानन। तो तुम्हा स्वाधीन झाला सिद्धा।।२।। कामाचा अंतक भक्ता सुखदाता। प्रभो मायातीता तुम्ही प्रिय।।३।। लक्ष्मण म्हणे तुमचा मी दीन। दीनाते पावन करा स्वामी।।४।।

२५७९. नागनाथा माझा करावा सांभाळ। अन्यायी मी खळ अती दीन।।१।। बहु अपराधी बहु अपराधी। पावन कृपानिधी करावे हो।।२।। सिद्धा तुमची कीर्ती ब्रह्मांडी अक्षयी। योगिराया देई प्रेम आम्हा।।३।। लक्ष्मणा द्यावी अद्वय ती भक्ती। प्रभो स्वयंज्योती आहेसी रे।।४।।

मन्मथस्वामी

२५८०. मन्मथस्वामी सिद्धपुरुष। स्तवा तोडी भवपाश।।१।। तापत्रय तो निवारी। भक्तजना साह्यकारी।।२।। अति हीन उद्धरिले। निरुपम सुख दिले।।३।। लक्ष्मण त्याचा दीन। प्रेमे करी हो स्मरण।।४।।

२५८१. मन्मथस्वामी आत्मज्ञानी। निजभक्ता ठेवी चरणी।।१।। भक्तास्तव सगुण झाला। पावन करितो दीनाला।।२।। भक्ती क्रिया आणि ज्ञान। आचरूनि वैराग्यसंपन्न।।३।। लक्ष्मण विनवी बा रे। प्रेमयुक्त त्याते ध्या

रे।।४।।

२५८२. करूनि मनाचे मंथन। सुख घेतले काढून।।१।। ब्रह्मानंदे तृप्त झाला। पावन करी तो जगाला।।२।। वीरशैवांमध्ये मान्य। भक्त ध्याती त्याकारण।।३।। लक्ष्मण त्याचा दीन। प्रेमे ध्यातसे चरण।।४।।

२५८३. मन्मथस्वामी ब्रह्मज्ञानी। भक्तजना ठेवी चरणी।।१।। सुख देतसे निजभक्ता। स्मरा स्मरा मायातीता।।२।। प्रभो आपणाऐसे करी। भक्तसंकट निवारी।।३।। लक्ष्मण म्हणे तात। केवळ ब्रह्म तो निवांत।।४।।

२५८४. शुद्ध बुद्ध नित्य मुक्त। मन्मथस्वामी तो निवांत।।१।। भक्तजना दावी वाट। सखा केला नीलकंठ।।२।। शिवभक्तामाजी मान्य। प्रभू विजयी सर्वज्ञ।।३।। लक्ष्मण म्हणे स्मरा। भवसिंधू हा उतरा।।४।।

२५८५. मन्मथ प्रिय शिवाप्रती। त्याची पाहूनिया भक्ती।।१।। विषयी उदास पाहून। संतोषला पंचानन।।२।। वीरशैव तत्त्वज्ञानी। केवळ ज्ञानाची ही खाणी।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते। स्तवा सुख देतसे भक्ताते।।४।।

२५८६. मन्मथस्वामी महाराज। भक्ता दावी निजबीज।।१।। प्रेमे भक्ती करा करा। नका गुंतू या संसारा।।२।। येथे सुख नाही नाही। प्रेमे लागा प्रभूपायी।।३।। लक्ष्मण त्याचा दास। विषयी सर्वदा उदास।।४।।

२५८७. मन्मथस्वामी तू विजयी। रमला ज्ञानाचिये ठायी।।१।। सदा विषयी विरक्ती। स्थापी जगामाजी भक्ती।।२।। कामक्रोधाते जिंकून। मायातीत झाला पूर्ण।।३।। लक्ष्मण म्हणे तात। स्तवा करी तो विरक्त।।४।।

२५८८. मन्मथस्वामी कृपाघन। भक्तास्तव तो सगुण।।१।। भक्तिपंथ हा स्थापिला। पावन करितो दीनाला।।२।। दीनानाथ दीनबंधू। महाराज कृपासिंधू।।३।। लक्ष्मण झाला शरण। ताते केला हो पावन।।४।।

२५८९. मन्मथस्वामी कृपामूर्ती। स्तवा होय ज्ञानप्राप्ती।।१।। त्याचे कृपे सुख होय। वृत्ती होय आनंदमय।।२।। प्रेमे भक्ती करा करा। भवसिंधू हा उतरा।।३।। लक्ष्मण म्हणे बा रे। मिथ्याभूत हा देह रे।।४।।

२५९०. स्वामिराया हो सर्वज्ञा। तुम्हा नमो नमो पूर्णा।।१।। आम्ही अन्यायी अन्यायी। पतित पावन तू आई।।२।। मन्मथस्वामी मायातीता। भक्तजना वरदाता।।३।। बहुत रक्षिले अन्यायी। भक्तजनाते तू आई।।४।।

लक्ष्मण दास तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।५।।

पाथरीच्या मठातील मूळपुरुष

२५९१. बल्हाळी ते सिंहासन। फार पवित्र भुवन।।१।। धन्य धन्य ते हो शूर। धन्य वीर माहेश्वर।।२।। कामक्रोधाते जिंकून। स्वस्थ झाले ते प्रवीण।।३।। षड्वैरी रगडिले पायी। प्रभो सर्वदा विजयी।।४।। लक्ष्मण म्हणे तात। सदा स्वानंदभरित।।५।।

२५९२. षट्स्थलमहाज्ञानी। न कळे प्रभोची करणी।।१।। परोपकारी सदा चित्त। सदासर्वदा ध्यानस्थ।।२।। आनंदमय जातीवृत्ती। स्वानुभवे सदा तृप्ती।।३।। लक्ष्मण म्हणे तात। भक्तजना करी तृप्त।।४।।

२५९३. वेदशास्त्रे ही बोलती। आगम अठ्ठावीस गर्जती।।१।। परोपकार श्रेष्ठ सार। सकळ साधना माहेर।।२।। हरिहरादी बोलती। सिद्धमुनीही सांगती।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। महाश्रेष्ठ ते स्थापिती।।४।।

२५९४. जग अज्ञाने गुंतले। आपुलेपणा विसरले।।१।। बाह्यानंदी पडले प्राणी। गेले प्रभोते विसरूनि।।२।। मग तेथे सुख कैचे। मिथ्या गुंते प्रपंचाचे।।३।। लक्ष्मण म्हणे खोटे। फार प्रिय त्याहा मोठे।।४।।

२५९५. परोपकार हा करावा। जगा मार्ग दाखवावा।।१।। यास्तव स्वामी हो निघाले। भ्रमण करीत चालले।।२।। भक्ती करूनि दाविती। लिंग-अंगाची गती।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।४।।

२५९६. अंगी वैराग्याचा भर। सदा संतुष्ट निर्घोर।।१।। प्रेमे लिंगार्चन करिती। प्रेमे लिंगाते पुजिती।।२।। वीरशैव भक्ती थोर। करोनि दाविती निर्घोर।।३।। लक्ष्मण म्हणे योगी। ज्ञानी महान वितरागी।।४।।

२५९७. तुंगभद्रा ओलांडून। आले स्वामी त्या मार्गाने।।१।। योग अष्टांग जाणती। ज्ञानमार्गी त्याची वसती।।२।। दया क्षमा प्रभोपाशी। केवळ आनंदाची राशी।।३।। लक्ष्मण म्हणे सिद्ध। योग त्याहाचा प्रसिद्ध।।४।।

२५९८. अंधा डोळस धरून। जेवी नेती हो मार्गाने।।१।। फार फार सांभाळिती। उंचनीच त्या दाविती।।२।। तैसे महान ते ज्ञानी। क्रिया दाविती आचरूनि।।३।। धन्य धन्य परोपकारी। त्याचा सखा त्रिपुरारी।।४।। लक्ष्मण म्हणे स्वधर्म। करूनि दाविती ते नेम।।५।।

२५९९. भ्रमण करीत करीत। स्वामी आले दयावंत।।१।। स्वामी आले कृष्णातीरा। स्वामी भक्तांचा सोयरा।।२।। तेथे स्नान दान केले। प्रेमे लिंगार्चन केले।।३।। लक्ष्मण म्हणे शिवस्मरण। अक्षयी प्रभो हो कारण।।४।।

२६००. शिव शिव वदती वाचे। करिती कल्याण भक्ताचे।।१।। बाह्यानंद मायिक। ऐसे जाणती धार्मिक।।२।। क्रिया आचरूनि दाविती। जड मूढ प्राणी उद्धरिती।।३।। लक्ष्मण म्हणे निःसंग। ब्रह्मरूप पाहती जग।।४।।

२६०१. स्वामी भ्रमत भ्रमत। चालले तीर्थ हो पाहात।।१।। योगी फार परोपकारी। त्याहाची न वर्णवे थोरी।।२।। करिती विवेक विचार। वारंवार प्रभोस्मर।।३।। लक्ष्मण म्हणे शांती। प्रभोपाशी तिची वसती।।४।।

२६०२. धन्य धन्य गोदादेवी। तिचे वैभव अक्षयी।।१।। योगियांते फार प्रिय। माता आहे निरामय।।२।। तिचे दर्शने सुख होय। गंगा ताप वारी माय।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।४।।

२६०३. स्वामी भ्रमत भ्रमत। आले गंगा हो तीराते।।१।। प्रेमे केले गंगास्नान। केले प्रेमे लिंगार्चन।।२।। रमला प्रभो गंगातीरी। स्थान पवित्र ते भारी।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त। येऊन प्रभोते वंदीत।।४।।

२६०४. पाहून प्रभोची ती मूर्ती। भक्त आनंद मानिती।।१।। भक्त दर्शनाते येती। भावे स्वामीसी पुजिती।।२।। गंगातीरी केला वास। फार सौख्य त्याहास।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। फार प्रिय प्रभोप्रती।।४।।

२६०५. स्वामी फार तपोधन। कळले सर्वत्रा कारण।।१।। लोक दर्शनाते येती। प्रेमे स्वामीसी वंदिती।।२।। स्वामी तेजस्वी दयाळू। भक्तजनाते कृपाळू।।३।। लक्ष्मण म्हणे ज्ञानी। येती दर्शनालागूनि।।४।।

२६०६. शिवज्ञानाचा ज़ाणता। स्वामी तो हो पूर्ण ज्ञाता।।१।। भक्ती प्रिय प्रभोप्रती। भक्ती करूनि दाविती।।२।। जडमूढाते पावन। करीतसे कृपाघन।।३।। लक्ष्मण म्हणे ज्ञानी। येती प्रभोते लोटांगणी।।४।।

२६०७. गोदेचिये उत्तरतीरी। पंचक्रोशी हो माझारी।।१।। पाथरी नामक ते पुर। लोक सधन तेथे थोर।।२।। तेथील भक्त हो मंडळी। आली धावूनि स्वामी जवळी।।३।। लक्ष्मण म्हणे त्यांनी। स्तविले स्वामी हो लागूनि।।४।।

२६०८. भक्तमंडळी प्रवीण। होते महा महाजन।।१।। स्वामी त्याहांनी

स्तविला। आपुले स्वनगरा आणिला।।२।। प्रेमभावे हो पुजिला। फार आनंद त्या ग्रामाला।।३।। लक्ष्मण म्हणे फार। उत्सव झाला तेथे थोर।।४।।

२६०९. नाना वाद्ये हो वाजती। भक्त नमस्कार करिती।।१।। आनंद वसे भक्ताघरी। दर्शना येती नरनारी।।२।। येती ज्ञानी दर्शनाते। प्रेमे स्तविती प्रभोते।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती। घरी वसती त्या हो मुक्ती।।४।।

२६१०. पाहून त्याहाची ती भक्ती। स्वामी संतोषले चित्ती।।१।। भावबळे वसे देव। भावापाशी वसे देव।।२।। अहो ब्रह्मांडनिवासी। वश होतो तो भक्तासी।।३।। लक्ष्मण म्हणे शिवज्ञानी। केला प्रसन्न हो भक्तांनी।।४।।

२६११. स्वामी रमले तये स्थानी। वश केला त्या भक्तांनी।।१।। मठ बांधूनि राहिले। जगा मार्गात लाविले।।२।। वीरशैव ही हो भक्ती। स्थापिती ते कृपामूर्ती।।३।। लक्ष्मण हीन दीन। स्तवितो प्रभोचे चरण।।४।।

(ई) तीर्थस्थळे

काशी (वाराणसी)

२६१२. कैलासाहूनि शिव तो आला काशीपुरा। सभोवती सुरगण प्रेमे स्तविती ईश्वरा।।१।। शृंगारिली काशीपुरी आनंद घरोघरी। आनंद झाला फार शंभो पूजिती मदनारी।।२।। नगरनारी आरत्या करिती प्रेमे शंकराला। जगन्नाथ प्रभू जातसे भक्ताचिया घरा।।३।। अक्षयी कल्याण करी तो भक्त कैवारी। त्रैलोक्याची यात्रा येती पूजिती मदनारी।।४।। लक्ष्मण म्हणे अक्षयी ते भुवनी सुख। जगद्गुरू तो स्तवा हरे तो भवव्यथाताप।।५।।

२६१३. दशाश्वमेधेश्वरलिंग। काशीमध्ये ते अभंग।।१।। ब्रह्मदेवाने स्थापिले। प्रेमे पूजन हो केले।।२।। त्याचे पूजन करिती। प्राणी मुक्त ते होती।।३।। त्याचे घेता हो दर्शन। पूर्वज होती हो पावन।।४।। लक्ष्मण म्हणे तेथ। ब्रह्मदेव सदोदित।।५।।

२६१४. वाराणसी क्षेत्र जाणा। तेथे नांदे विश्वराणा।।१।। तेथे वसे गंगामाई। पुण्यजीवनी ती आई।।२।। विश्वनाथ मोक्षदाता। अन्नपूर्णा जगन्माता।।३।। होता प्रभोचे दर्शन। पापे हरती दारुण।।४।। लक्ष्मण म्हणे देवा। पाय दावी उमाधवा।।५।।

२६१५. काशीपुरीनिवासिया। वेगी यावे शंभोराया।।१।। दीनबंधू विश्वनाथा। भेटी द्यावी जगन्नाथा।।२।। तुझे भेटीची आवडी। भेटी द्यावी रे तातडी।।३।। लक्ष्मण हीन देवा। त्राता तूचि महादेवा।।४।।

२६१६. काशीक्षेत्र श्रेष्ठ महा। विश्वनाथ लिंग पाहा।।१।। भागीरथीचे करा स्नान। करा लिंगाचे पूजन।।२।। घ्या प्रभोचे हो नाम। शिव करील आराम।।३।। लक्ष्मण म्हणे शिव। दया करील देवराव।।४।।

२६१७. काशीपुरीचा तो नाथ। दीनबंधू विश्वनाथ।।१।। देव दयाळू तू खरा। चुकविसी येरझारा।।२।। पापी रक्षिले त्वा ताता। कृपाळुवा उमाकांता।।३।। लक्ष्मणा सोडवा हो। पाय वेगी दाखवा हो।।४।।

२६१८. वाराणसी दावा क्षेत्र। वेगी दावा तो त्रिनेत्र।।१।। मज दीनाते दर्शन। केव्हा देईल श्रीरमण।।२।। वाराणसीच्या रे नाथा। पाय दावी विश्वनाथा।।३।। लक्ष्मण हा तुमचा। करा सांभाळ दीनाचा।।४।।

२६१९. तुझे नाम आदिनाथ। तुझे नाम विश्वनाथ।।१।। तुझी नामाची गणना। शेषाप्रती करवेना।।२।। तुज किती बा स्तवावे। कैसे आकाश कवळावे।।३।। लक्ष्मण म्हणे देवा। पार न कळे कृपाळुवा।।४।। लक्ष्मणाची रे आस। पुरविता तू जगदीश।।४।।

२६२०. धन्य वाराणसी धन्य विश्वनाथ। शेषाप्रती महिमा वर्णवेना।।१।। ब्रह्मा हरी करिती लिंगाचे पूजन। त्रैलोक्य पावन शिव करी।।२।। स्वर्गतरंगिणी तेथे गंगाबाई। लिंगमय वाराणसी क्षेत्र।।३।। लिंगाचे पूजन प्रेमे जे करिती। जन्ममरण त्याते नसे जाण।।४।। लक्ष्मण म्हणे धाम ते दाखवा। नामस्मरणे हरती नाना विघ्ने।।५।।

२६२१. वाराणसी क्षेत्र करी रे पवित्र। परब्रह्माप्रती स्थान प्रिय।।१।। वाराणसीविना शिवाते गमेना। कैलासीचा राणा सदा वसे।।२।। प्रलयसमयी अविनाश ती पुरी। त्रिशूलाचे अग्री शिव ठेवी।।३।। ती पुरी पाहा हो पापा होय हानी। दाता शूळपाणि मोक्ष देतो।।४।। लक्ष्मण म्हणे महिमा वर्णवेना। सहस्रवदना नकळे पार।।५।।

२६२२. धन्य काशीपुरी धन्य मनकर्णिका। पाहा त्या व्यापका विश्वनाथा।।१।। धन्य भागीरथी धन्य तो भैरव। पाहा वेगी देव दंडपाणि।।२।।

धन्य अन्नपूर्णा धन्य विनायक। भव रे नाशक क्षेत्र जाणा।।३।। ब्रह्मादिक पुरी वंद्य आहे जाण। ब्रह्मांडाचा राणा नांदे तेथे।।४।। लक्ष्मण म्हणे करा हो पूजन। मोक्षदाता जाण पंचानन।।५।।

२६२३. काशीपुरी पाहा भूकैलास ते। वंद्य हो सर्वाते स्थान आहे।।१।। लिंग देव विश्वनाथ पुरातन आहे। गंगाबाई आहे स्नान करा।।२।। स्नान रे करिता पापे भस्म होती। ऐसी आहे कीर्ती पुराणी हो।।३।। ब्रह्म विश्वनाथ आहे परिपूर्ण। त्याचा महिमा कोण वर्णू शके।।४।। लक्ष्मण म्हणे शेषाप्रती महिमा। नकळे सर्वोत्तमा पाहा वेगी।।५।।

२६२४. काशीपुरीमाजी उमाईचा नाथ। अक्षयी समर्थ रहातो रे।।१।। काशीपुरीविना त्याते रे गमेना। त्याते विसंबेना शंभो तो रे।।२।। ब्रह्मांडाचे राज्य मानितो वमन। त्याचे आज्ञे जाण सर्व देव।।३।। ब्रह्मा विष्णू इंद्र त्याचे रे अंकित। योगी तो निवांत परब्रह्म।।४।। त्या प्रभोप्रती प्रिय वाराणसी। पाहा वेगी काशी भुवन ते।।५।। लक्ष्मण म्हणे तेथीचा महिमा। शेषा वर्णवेना काय वाणू।।६।।

२६२५. आनंदवनाचा महिमा वर्णवेना। का हो ते दावा ना स्थान मज।।१।। धन्य पंचक्रोशी धन्य वाराणसी। त्रिभुवनवासी नांदतसे।।२।। ब्रह्म आदि देव वास रे इच्छिती। ऐसी आहे कीर्ती पुराणी रे।।३।। आनंदवन ते पुण्यश्लोका प्राप्त। धन्य पुण्यवंत नर ते हो।।४।। लक्ष्मण म्हणे आम्हा दीनाप्रती। केव्हा कृपामूर्ती दावील हो।।५।।

२६२६. वाराणसी मध्ये माझे मायबाप। शिव विश्वरूप बैसलासे।।१।। त्याते नाम शोभे पतितपावन। भक्ताचे जीवन स्वामी माझा।।२।। खळ हीन असो भलते यातीचा। स्वामी करितो त्याचा उद्धार हो।।३।। भ्रष्ट हीन जाती शुद्ध होऊनि येती। त्राता पशुपती भक्ताचा हो।।४।। लक्ष्मण म्हणे पाहावे चरण। करूनि कल्याण सुख देतो।।५।।

२६२७. स्वर्गीचे अमृत इच्छितताती मनी। जन्म काशीस्थानी व्हावा आम्हा।।१।। धन्य जे सुकृत त्याहा काशीवास। अक्षयी महेश वसे जेथे।।२।। स्वर्गवासी म्हणती पडलो गुंतून। पद अभिमान आला अंगी।।३।। काशीवासाहून स्वर्ग ओवाळून। टाकावे म्हणूनि इच्छिती हो।।४।। मुक्तीचे ते धाम देतो

शिव मुक्ती। स्थान आम्हाप्रती कैचे प्राप्त।।५।। लक्ष्मण म्हणे एकवेळा तरी जावे। भवताप गोवा हरी तात।।६।।

२६२८. इंद्र आदि देव म्हणती प्रभोप्रती। कैसे आम्हाप्रती ठकविले।।१।। खोट्या वैभवाते पडलो गुंतून। पाय विसरून गेलो तात।।२।। पायाचे ते सुख निष्काम भक्ताला। कामाने हो घाला केला आम्हा।।३।। ब्रह्मांड हे राज्य दु:खासी कारण। पडलो गुंतून कर्मयोगे।।४।। अविनाश सुख वसे भक्तापाशी। कल्पांती त्याहासी दु:ख नाही।।५।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य शूर। भक्ताचा आधार ब्रह्मांडाते।।६।।

२६२९. मुक्ताचे ते धाम पाहा काशीपुरी। ब्रह्मांड अधिकारी जेथे वसे।।१।। असंख्य ते कल्प होती जाती फार। काशी निरंतर पुरी शोभे।।२।। अक्षयी महिमा अक्षयी ती पुरी। भक्ताचा कैवारी क्षेम देतो।।३।। असंख्य अवतार माळा होती जाती। स्वामी उमापती सर्ववंद्य।।४।। विश्वनाथा भक्त फार आवडती। देतो भक्ताप्रती अक्षयपद।।५।। लक्ष्मण म्हणे काशीऐसी पुरी। नाही हो दुसरी व्यासवाक्य।।६।।

२६३०. गळा शिवसूत्र त्रिपुंड्र तो भाळी। मुखी नामावळी गाती भक्त।।१।। रुद्राक्ष आभरण शोभती शैवाला। महारुद्र त्याला रक्षीतसे।।२।। त्रिकाळ पूजन करिती जयजयकार। ध्यान निरंतर प्रभोचे हो।।३।। निष्काम त्या क्रिया होती शिवार्पण। प्रभो त्या स्वाधीन वर्ततसे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ताची मंडळी। अंगे चंद्रमौळी रक्षीतसे।।५।।

२६३१. काशीपुरी सर्वाहूनि आहे थोर। महिमा अपार वर्णवेना।।१।। व्यासाने वर्णिला महिमा तो ऐका। स्थान ब्रह्मादिका दुर्लभ ते।।२।। ब्रह्मदेव हरी म्हणती महिमा थोर। शेषाप्रती पार नकळे हो।।३।। सर्वत्रही देव वास हो इच्छिती। जेथे विश्वपती विश्वनाथ।।४।। स्वर्गीचे अमर त्याहाहूनि थोर। काशीचे जलचर म्हणे व्यास।।५।। स्कंद हो पुराणी आहे व्यासवाणी। वाउगे बोलोनि गेलो नाही।।६।। लक्ष्मण म्हणे सर्वांचे जीवन। काशी मोक्षसदन पाहा वेगी।।७।।

२६३२. ब्रह्मांडे उत्पन्नकर्ता महामुनी। कीर्ती हो पुराणी ज्याची श्रेष्ठ।।१।। समुद्र आचमना नाही हो पुरला। मुनी तो सर्वाला वंद्य थोर।।२।। देव

सर्वत्रही येती लोटांगणी। अगस्ती तो मुनी महाराज।।३।। काशीचा वियोग त्यातेही साहिना। अहोरात्र जाणा इच्छी वास।।४।। काशीविना दुजे आवडेना काही। काशीचा अक्षयी छंद असे।।५।। लक्ष्मण म्हणे महा महा थोर। वास निरंतर इच्छिती हो।।६।।

२६३३. अनंत ब्रह्मांडे क्षणे घडी मोडी। ऐसा हो कापडी दुजा कोण।।१।। शिवाप्रती काशी प्रिय प्राणाहून। वाराणशी स्थान वंद्य सर्वा।।२।। काशीचा वियोग शिवाते साहिना। इतरांची गणना काय तेथे।।३।। अनंत ब्रह्मांडे पाहता हो पुरी। काशीऐसी दुसरी दिसेना हो।।४।। श्रेष्ठाचे ते धाम आहे विश्रांतीचे। पाहा हो जाऊन वंद्य व्हाल।।५।। लक्ष्मण म्हणे करा हो स्वहित। पद ते निवांत पाहा वेगी।।६।।

२६३४. ऐसे आनंदवन ऐसे मोक्षस्थान। ऐसे शिवगण कोठे दावा।।१।। ऐसे काशीपूर ऐसे गंगानीर। ऐसा विश्वेश्वर कोठे दावा।।२।। ऐसी अन्नपूर्णा ऐसे लिंग नाना। ऐसा योगिराणा दावा कोठे।।३।। ऐसा क्षेत्रपाळ ऐसा महांकाळ। ऐसा ब्रह्मगोळ कोठे दावा।।४।। ऐसा शैवभार ऐसा विघ्नहर। यात्रा निरंतर कोठे दावा।।५।। ऐसा दंडपाणि ऐसी वेदध्यानी। ऐसे सिद्धमुनी कोठे दावा।।६।। ऐसे उपचार ऐसे सुर नर। कोठे निरंतर येती दावा।।७।। लक्ष्मण म्हणे सर्वदा आनंद। पहा विश्वकंद डोळेभरी।।८।।

२६३५. कर्मकाष्ठाचे दहन ती करी। पाहा हो झडकरी भक्तिस्थान।।१।। योगी वितरागी संन्यासी तापसी। अक्षयी प्रभोपाशी वसती हो।।२।। शिवालय हुडे सुवर्ण कळस। पडला प्रकाश सभोवता।।३।। अगणित लिंगे लिंगा नाही पार। भक्त निरंतर पुजिती हो।।४।। अक्षयी नामाचा होतसे उच्चार। भक्त जयजयकार करिती सदा।।५।। खट नट जाती शुद्ध होऊनि येती। स्थान सर्वाप्रती वंद्य ते हो।।६।। लक्ष्मण म्हणे भक्तांचा साह्यकारी। पहा हो झडकरी क्षेम देतो।।७।।

२६३६. मज दीनाते दावा वेगी काशीपुरी। जेथे सहपरिवारी शिव नांदे।।१।। आधारकमळ वरी स्वाधिष्ठान। मनपुरावरून मार्ग नीट।।२।। त्याहीवरी अनुहात विशुद्धकमळ। वरी ते निर्मळ सहस्रदळ।।३।। त्रिकूट शिखरी चहुशून्यावरी। शोभली ती पुरी विश्वेशाची।।४।। श्वेत पीत रक्त

नील शाम वर्ण। वर्णातीत पूर्ण विश्वनाथ।।५।। चारी वेद वाचा सर्वही परिवार। दिक्पाळाचे भार भोवते उभे।।६।। ब्रह्मा विष्णू रुद्र प्रभोते स्तविती। वाराणसीपती विश्वनाथ।।७।। जागृती सुषुप्ती तुर्या ती उन्मनी। प्रभोचे चरणी लीन झाल्या।।८।। लक्ष्मण म्हणे पुरी ती अक्षयी। त्रिभुवनगोसावी महाराज।।९।।

२६३७. स्वानंदजीवनु शिव तृतीयनयनु। गौरीरमणु स्वामी माझा।।१।। देखिला गे माय शिव मनकर्णिकेतटी। सांगतसे गोष्टी निजभक्ता।।२।। शुभ्रवर्ण कांती सर्वांगी विभूती। अंगी तेज दीप्ती निरुपम।।३।। हेममय काशी वंद्य हो सर्वांसी। ब्रह्मांडनिवासी अक्षयी जेथे।।४।। शिवालय रत्नमय ते शोभती। पताका तळपती आकाशी हो।।५।। अहो जगाप्रती म्हणती या रे या रे। शुद्ध होऊनि जा रे सर्वत्रही।।६।। लक्ष्मण म्हणे लिंगांची गणना। शेषाते करवेना स्थान श्रेष्ठ।।७।।

२६३८. काशी नाम जपे कोणे एक देशी। त्रितापाते नाशी महिमा श्रेष्ठ।।१।। पुण्यशील प्राणी त्याहा घडे काशी। कैलासनिवासी संतुष्टे रे।।२।। तापाचे खंडन करीतसे तात। स्वानंदभरित स्वामी माझा।।३।। वाराणसीमाजी प्राणी ते शिवरूप। बोलिलासे बाप शुकाचा हो।।४।। शिवाचे निजधाम सर्वा अगोचर। ब्रह्मा हरी पार नेणती ज्याचा।।५।। लक्ष्मण म्हणे जन्मा येऊनि रे। पहावे स्थान रे विश्वेशाचे।।६।।

२६३९. शंख वाजवी बम् बम् शिवाचा हो राणा। करीतसे क्रीडा नाना अंगे।।१।। देखिला गे माये शिव मंदाकिनीतटी। भक्ताचिये कंठी मिठी शोभे।।२।। नग्न दिगंबर योगियांचे भार। करिती जयजयकार ब्रह्मानंदे।।३।। लुटिला त्याहांनी त्रिभुवनगोसावी। शिव तो अक्षयी साठविला।।४।। प्रभोचे ते गण प्रभो हो समान। करिती गायन अष्टभावे।।५।। लक्ष्मण म्हणे सुखी ते अक्षयी। त्रैलोक्यी विजयी महाराज।।६।।

२६४०. डमरू वाजवी त्रिभुवनगोसावी। नि:संगाचे आई संग नसे।।१।। देखिला गे माय शिव क्षिप्रागंगेतीरी। स्वामी त्रिपुरारी विश्वपिता।।२।। दयेचे आगर कृपेचे भांडार। भक्ताचे माहेर सत्य सत्य।।३।। भक्ता देतो प्रेम देतसे क्षेम रे। त्रिताप वारी रे मायबाप।।४।। लक्ष्मण म्हणे परम पद रे। देतसे

स्तवा रे महाराज।।५।।

२६४१. काम गे दहनु शिव पंचाननु। ब्रह्मसनातनु स्वामी माझा।।१।। देखिला गे माये स्वर्गतरंगिणीतीरी। अर्ध्या अंगी गौरी शोभे माता।।२।। अर्धांगी गौरी म्हणवी ब्रह्मचारी। वेद श्रेष्ठ चारी ग्वाही देती।।३।। सर्वत्रही त्याते ऊर्ध्वरीता म्हणती। त्याची मावगती नकळे कोणा।।४।। जुनाट तो योगी अनंता काळाचा। सकळ देवाचा मूळपुरुष।।५।। लक्ष्मण म्हणे त्याचे म्हणवा रे। मग दुःख बा रे स्वप्नी नाही।।६।।

२६४२. वाराणसीऐसे क्षेत्र। नाही त्रैलोक्यामाजी।।१।। सकळ तीर्थे वसती पायी। परब्रह्म ईश्वर।।२।। ऐसा श्रेष्ठ विश्वनाथ। वसे जेथे ऐसा।।३।। स्वर्गतरंगिणी गंगा। वाहे पायापाशी हो।।४।। सर्व लिंगमय काशी। नाही रिते हो स्थान।।५।। शेष म्हणती नकळे पार। लिंगमहिमा अगाध।।६।। हरी विरंची सुरगण। वास इच्छिती पायी।।७।। आकाराते जितुके आले। त्यांनी स्थापिले लिंग।।८।। सिद्ध योगी मुनीश्वर। जुनाट वसती जेथे।।९।। लक्ष्मण म्हणे चला। पाहू स्थान प्रभोचे।।१०।।

२६४३. रूप पाहा हो सगुण। निजभक्ताचे जीवन।।१।। पंचवदन विरूपाक्ष। शिव ब्रह्मांडाचा अध्यक्ष।।२।। वाराणसी पुण्यक्षेत्र। प्रभो शोभला त्रिनेत्र।।३।। वेगी घ्या हो दर्शन। स्वामी पतितपावन।।४।। लक्ष्मण म्हणे बाप। हरी भवव्यथा ताप।।५।।

२६४४. सुंदर ते ध्यान शोभे काशीपुरी। वामांगी गौरी जगन्माता।।१।। कोटी सूर्यप्रभा प्रभोअंगी कांती। कोटी शीतल दिसती चंद्रप्रभा।।२।। दशबाहू त्रिनेत्र स्वामी पंचानन। कंठी ते भूषण नीलशोभा।।३।। गजव्याघ्रांबर शोभतसे त्याला। भस्म अंगी ल्याला विश्वपिता।।४।। नाना अलंकार गंगा चंद्रमौळी। दिव्य ते शोभली शस्त्रे हाती।।५।। लक्ष्मण म्हणे सर्वा लिंगी तोचि। सर्वांभूती त्याची वस्ती आहे।।६।।

गंगा

२६४५. गंगाबाई तुझा महिमा वर्णवेना। हीना दीना पावन करिसी तू।।१।। तुझे स्नान करिता पापे भस्म होती। पुराणी वो कीर्ती तुझी माये।।२।। तुझे दर्शन ब्रह्मादी इच्छिती। स्नाना येती तुझ्या देव सर्व।।३।। तुझे वायूकरून

पवित्र करिसी। भवतापनाशिनी नाम तुझे।।४।। लक्ष्मण म्हणे जगउद्धारास्तव। आलीसी तू माये भूमंडळी।।५।।

२६४६. गंगाबाई तू गे स्वर्गतरंगिणी। शिवाचे मुकुटी वससी माये।।१।। अपवित्रा पवित्र करिसी माये वो। बादरायण व्यास महिमा वर्णी।।२।। जल हे माये तुझे स्वच्छ निर्मळ। मलरहित तू करिसी माये।।३।। अठ्ठ्यांशी सहस्र मुनी स्नान करिती। सनकादिक योगी स्नान करिती।।४।। सर्वाप्रती माये जल तुझे प्रिय। तुझे स्नानमात्रे पाप नाशे।।५।। लक्ष्मणा दीना करी गे पावन। दाखवी चरण माये वेगी।।६।।

२६४७. धन्य धन्य गंगा त्रितापनाशिनी। सिद्ध योगी मुनी इच्छिती स्नान।।१।। शिवाचे मुकुटी तुझा असे वास। भव या रोगास मात्रा तू गे।।२।। पातकी हे जन पतित गे खळ। माते तू निर्मळ करितेसी।।३।। फार तुझे स्नाने झाले गे पावन। अमरादी सुरगण इच्छिती स्नान।।४।। लक्ष्मण म्हणे तुझा लक्ष्मण। दीनाते पावन करी माये।।५।।

२६४८. स्वर्गतरंगिणी माय। मज दीना दावी पाय।।१।। तुझा महिमा अपार। अमरादिका न कळे पार।।२।। शिव ब्रह्मा विष्णू तो गे। तुझे स्नान इच्छिती गे।।३।। शुक सनकादिक योगी। येती तुझे स्नानालागी।।४।। कर्मजंतांचा उद्धार। करावया तू गे थोर।।५।। लक्ष्मण म्हणे तूचि। निजछाया तू भक्ताची।।६।।

२६४९. शिवमुकुटी तू वससी। सर्वा वंद्य तू आहेसी।।१।। भगीरथे उपकार। केला जगावरी फार।।२।। केला तपाचा गिरिवर। तुज आणिले तू थोर।।३।। भक्तीस्तव तू भूतळी। आलिसी तू भूमंडळी।।४।। फार उद्धरिले दोषी। हीना दीना पतितासी।।५।। लक्ष्मण म्हणे माय। देशी स्वानुभव सोय।।६।।

२६५०. जाह्नवी तू गे जगउद्धरणी। तुझी अगाध करणी।।१।। स्वर्ग मृत्यू ते पाताळ। तिन्ही लोकी तू निर्मळ।।२।। त्रैलोक्याचा उद्धार। करावया तू गे थोर।।३।। तुझे स्नान जे करिती। वंद्य कृतांताते होती।।४।। अपवित्राते पवित्र। करिसी माये तू सत्पात्र।।५।। लक्ष्मण म्हणे माते। किती वर्णावे गे तूते।।६।।

२६५१. स्वर्ग सरिता तू गंगा। पावन करिसी गे जगा।।१।। तुझे आचमन घडे। त्रिविध ताप माते झडे।।२।। तुझे तटी जे वसती। त्याहा अमरादी वंदिती।।३।। तुजवरून वायु येता। पावन करितो पतिता।।४।। सिद्ध मुनी ब्रह्मचारी। तुझी वर्णिती गे थोरी।।५।। लक्ष्मण केवळ हीन। माते करावा पावन।।६।।

२६५२. तुझे तीरीची गे माती। प्रेमे भावे जे वंदिती।।१।। मृत्तिकेचा गे टिकला। तुझे जळीचा लाविला।।२।। तो गे पवित्र जगाला। करी अनाथ दीनाला।।३।। ऐसा महिमा अद्भुत। गंगा वस्तू तू निवांत।।४।। पुराणी गे तुझी कीर्ती। ऋषी मुनी स्नाना येती।।५।। स्वर्गवासी तुझे स्नान। करिती अमरादी सुरगण।।६।। लक्ष्मणाते पावन। करी माते तुझा दीन।।७।।

२६५३. गंगा गर्भवासा दूर। करी महिमा अपार।।१।। नरकयातना चुकवी। प्रभोचिया पायी ठेवी।।२।। ऐसा महिमा मायेचा। करी उद्धार दीनाचा।।३।। करा स्नान हो मातेचे। पूज्य व्हाल त्या यमाचे।।४।। लक्ष्मण विनवी दीन। वेगी पहा आनंदवन।।५।।

२६५४. गर्भवासाते चुकवी। स्वर्गतरंगिणी आई।।१।। कीर्ती मातेची अद्भुत। शिवमुकुटी निवांत।।२।। दीन उद्धरावे म्हणून। आली भूतळी आपण।।३।। तिन्ही लोकी तुझी ख्याती। महिमा वर्णावा हो किती।।४।। लक्ष्मण म्हणे गंगा। अती प्रिय उमारंगा।।५।।

२६५५. नवखंडी नवओघ। करी पावन हे जग।।१।। पर्वत पापाचे दहन। करी करा गंगास्नान।।२।। ऐसा सत्यवतिसुत। बोलिला तो व्यासतात।।३।। ब्रह्म इंद्र नारायण। हेचि बोलिले वचन।।४।। भरतखंडी नाम सीता। पावन करिती पतिता।।५।। हिमाचली उतरली। प्रेमे आनंदवना आली।।६।। विश्वनाथाचिये पाशी। वाहे गंगा अहर्निशी।।७।। लक्ष्मण म्हणे स्नान। करा घ्या ते शिवदर्शन।।८।।

२६५६. किती वर्णू तुझी थोरी। तुझी धन्य ती लहरी।।१।। पातक जंबुकाचा ग्रास। करी लहरी सिंहग्रास।।२।। दोष पळती दाही दिशा। अती प्रिय तू महेशा।।३।। शिव इच्छेची लहरी। शोभसी तू नानापरी।।४।। लक्ष्मण म्हणे गंगे। पावन करी मज वेगे।।५।।

२६५७. गगनाऐसी निर्मळ। माते तू गे सर्वकाळ।।१।। सकळ पापाते नाशून। स्वच्छ सर्वदा तू पूर्ण।।२।। शिवप्रिया तू कल्याणी। विजयी तू त्रिभुवनी।।३।। तुझे गुण किती वानू। भक्ता तू गे कामधेनू।।४।। गंगा माय तू आमची। छाया आहेसी दीनाची।।५।। लक्ष्मण म्हणे माते। देई क्षेम आम्हाते।।६।।

प्रयाग

२६५८. त्रिवेणी हो तापनाशी। स्नान प्रिय हो सर्वांसी।।१।। गंगा यमुना सरस्वती। त्रिविध ताप ते नाशिती।।२।। त्रिवेणीचे होता स्नान। कूळ होतसे पावन।।३।। ब्रह्मदेवे केले याग। नाम झाले ते प्रयाग।।४।। प्रयाग राजा तो तीर्थाचा। करी उद्धार जगाचा।।५।। लक्ष्मण म्हणे दोषी। उद्धरती अहर्निशी।।६।।

२६५९. ब्रह्मदेवे तप केले। क्षेत्र प्रयाग स्थापिले।।१।। अक्षयवट तेचि स्थानी। यात्रा येती हो दुरूनि।।२।। शुलकंठेश्वर लिंग। तेथे अक्षयी अभंग।।३।। ब्रह्मदेवाने स्थापिले। शिवपूजन हो केले।।४।। त्रिवेणी तो वाहे ओघ। करी त्रितापाते भंग।।५।। माधवमूर्ती तेथे वसे। स्थान पवित्र ते असे।।६।। लक्ष्मण म्हणे थोर। महिमा प्रयागी अपार।।७।।

२६६०. दिव्य स्थान ते प्रयाग। करी भवरोगा भंग।।१।। ऋषी मुनी निरंतर। येती स्नाना यतीश्वर।।२।। त्रिवेणीचे स्नान करिता। वट अक्षयी पूजिती।।३।। माघस्नाना सुरवर। येती महिमा अपार।।४।। महिमा वर्णावा हो किती। ब्रह्मादिक स्नाना येती।।५।। लक्ष्मण म्हणे हीन। तेथे होती हो पावन।।६।।

२६६१. प्रयागमहिमा पुराणी। वेदव्यास बोलिला मुनी।।१।। सरस्वती गंगा यमुना। त्रिवेणी ते म्हणती जाणा।।२।। स्नान अमरादी इच्छिती। प्रेमे मातेते वंदिती।।३।। वेगी करा तेथे स्नान। करी भवरोगा दहन।।४।। लक्ष्मण म्हणे बा रे। स्थान वेगी ते पाहा रे।।५।।

२६६२. येते प्रयागी हो यात्रा। प्रेमे पुजिती त्रिनेत्रा।।१।। स्नान त्रिवेणीचे घडे। पाप व्यथा रोग झडे।।२।। काशी प्रयागी हो दान। किंचित देता फार पुण्य।।३।। ऐसा क्षेत्राचा महिमा। भक्ती प्रिय सर्वोत्तमा।।४।। प्रयागराज तो

पावन। करी दयाळू तो पूर्ण।।५।। लक्ष्मण म्हणे क्षेत्र। श्रेष्ठ असे ते पवित्र।।६।।

२६६३. प्रयागमहिमा वर्णवेना मज। तीर्थराज आहे प्रयाग तो।।१।। अक्षयी वट तो अविनाश जाणा। दर्शनमात्रे पापे हरती रे।।२।। गंगा ती यमुना सरस्वती माता। तिघींचा संगम तेथे झाला।।३।। त्रिवेणी तुजला म्हणती सुरवर। स्नान करिता पापे भस्म होती।।४।। बिंदुमाधव तो परब्रह्म जाणा। ज्याचे नामस्मरणे भव नाशे।।५।। प्रयागमहिमा पुराणी आहे हो। सत्यवतिसुते वर्णिलासे।।६।। धन्य ते प्रयाग धन्य तो माधव। सहस्रवदना न कळे पार।।७।। लक्ष्मण विनवी प्रभू रे माधवा। दाखवावे वेगी पाय देवा।।८।।

गोदावरी

२६६४. ब्रह्मगिरीहूनि उत्पन्न। माते झालीसी तू पूर्ण।।१।। ब्रह्म तू गे ब्रह्मायणी। तुझी अगम्य करणी।।२।। गौतममुनी भक्त थोर। जगा केला उपकार।।३।। त्याने स्तवूनि यमाते। तूते आणिले भूतळाते।।४।। असंख्य उद्धरिले प्राणी। तुझे स्नाने गे करूनि।।५।। गोदावरी तूते म्हणती। त्रिभुवनी तुझी कीर्ती।।६।। लक्ष्मण म्हणे शिव। अक्षयी तुजपाशी देव।।७।।

२६६५. गोदे तुझी महिमा थोर। स्नान इच्छिती सुर नर।।१।। तुझे तटी प्राणी वसती। पुण्यरूप त्यागमूर्ती।।२।। तुझे स्नान जया घडे। सुख अक्षयी ते जोडे।।३।। पंचक्रोशीमाजी वसती। तेही पावन गे होती।।४।। लक्ष्मण म्हणे तुझा दीन। त्वरे करावा पावन।।५।।

२६६६. ब्रह्मगिरीहूनि निघाली। सागरी ती हो मिळाली।।१।। करावया जगदुद्धार। मातेचा हा अवतार।।२।। उभयतटीचे ते प्राणी। फार गेले उद्धरूनि।।३।। प्रेमयुक्त स्नान करा। शिवनाम हो उच्चारा।।४।। लक्ष्मण म्हणे गंगा। पावन करी तिन्ही जगा।।५।।

गोकर्ण

२६६७. गोकर्णक्षेत्र थोर। तेथे अक्षयी उमावर।।१।। महाबळ साजे नाम। भक्ता करितो आराम।।२।। आत्मलिंग मायातीत। सदासर्वदा निवांत।।३।। सिंधुतटी विश्वंभर। सकळ विश्वाचे माहेर।।४।। सगुण क्रीडा करितो नाना। परात्पर योगिराणा।।५।। कोटी सूर्यासम प्रभा। केवळ स्वानंदाचा गाभा।।६।। ब्रह्मा हरी सुर नर। प्रभोपाशी निरंतर।।७।। सकळ तीर्थे पायापाशी।

पावन करितो दीनासी।।८।। त्रैलोक्ययात्रा प्रभोपाशी। येत असे अहर्निशी।।९।। सदा होतो जयजयकार। वेद स्तविती निरंतर।।१०।। वेगी घ्या हो दर्शन। स्वामी पतितपावन।।११।। लक्ष्मण म्हणे स्तवा। जन्ममृत्यू चुके गोवा।।१२।।

२६६८. गोकर्णक्षेत्र पहा हो पवित्र। तेथे तो त्रिनेत्र वसे सदा।।१।। आत्मलिंग आहे श्रेष्ठ ते भुवन। ब्रह्मा नारायण उभे तेथे।।२।। अष्ट रे दिक्पती तेथे रे तिष्ठती। वेद रे स्तविती प्रभोप्रती।।३।। तेहतीस कोटी देव उभे तेथे। ब्रह्मीचा हो नाथ शिव पाहा।।४।। अठ्ठ्यांशीं सहस्र ऋषी हो वसती। नारद तुंबर गाती गुण सदा।।५।। तापसांचे भार तेथे रे अपार। होतो जयजयकार शिवनाम।।६।। त्रिकाल पूजन करिती सुर नर। पूजेचा प्रकार वर्णवेना।।७।। अठराही भाट गर्जती रे जाणा। चौदा सहा जण मानवले।।८।। आनंदे नाचती प्रेमे गुण गाती। ब्रह्मांडाचा पती शिव आहे।।९।। अप्सरा नाचती वाद्य रे वाजती। शंख वाजविती स्वरयुक्त।।१०।। सनकादिक योगी तेथे रे वसती। अक्षयी स्मरती आत्मलिंग।।११।। लिंगाचे दर्शने पापे भस्म होती। अगम्य रे किर्ती वर्णवेना।।१२।। नाना अलंकार शिवाते शोभती। चंद्र सूर्य दीप्ती लोपली हो।।१३।। वेगी वेगी पुजा पुजा प्रेमे त्या शंकरा। कृपेच्या सागरा स्तवा वेगी।।१४।। लक्ष्मण म्हणे महाबळेश्वरा। सोडवा दातारा मज दीना।।१५।।

पंढरी

२६६९. भवनाशनी पंढरी। पाहू चला हो झडकरी। पूर्णब्रह्म तो श्रीहरी। भीमातटी शोभतसे।।१।। पुंडलिक तो प्रवीण। तेणे आणिले निधान। ब्रह्मादिकाचे जीवन। विश्वरूप विश्वात्मा।।२।। विठू श्याम तो सुंदर। कटी ठेवूनिया कर। ब्रह्मादिकाचा पितर। वाट पाहे भक्तांची।।३।। कोटी सूर्य हो लोपले। स्वरूप प्रभोचे फाकले। भक्तजन स्थिरावले। चरणकमळ ते पाहू।।४।। भूवैकुंठ हे पूर। साधुसंतांचे माहेर। ब्रह्मादी हो सुरनर। येती दर्शना नित्य।।५।। ध्वज पताका शोभती। प्रेमे वैष्णव नाचती। ब्रह्मानंदे हो डुल्लती। भक्तप्रभु ते शूर।।६।। खळ दुर्मती दुर्जन। तेथे होती हो पावन। भवरोगाचे दहन। करी तात तो श्रेष्ठ।।७।। हौस वाहे हे हो वृत्ती। क्षेत्र निरुपम ते हो।।८।। लक्ष्मण म्हणे ताता। पाय दावा मज पतिता। कोणी नाही आम्हा ताता। प्रभो तुम्हावाचूनि।।९।।

कथात्मक अभंग

१. बीजे महादेवी (बिज्ज महादेवी)

२६७०. बीजे महादेवी नाम एक बाई। होती प्रभोपायी निमग्न ती।।१।। होती भोळी बाई प्रेमळ ती फार। केला गंगाधर बाळ तिने।।२।। आपुले ते घरी स्वस्थ होती बाई। कल्पना ते जीवी करिती झाली।।३।। आपुलिया मना आपणचि बोले। नवल ते झाले पुढे ऐका।।४।। लक्ष्मण म्हणे बोले ती गर्जोन। म्हणे पंचानन एकटा हा।।५।।

२६७१. याते कोणी मज दिसेना गे बाई। उघडा अक्षयी फिरतसे।।१।। माय याते नाही बापही दिसेना। आप्त सखे जाणा याते कैचे।।२।। माय याते असती जटा न होऊ देती। फणी फिरविती वारंवार।।३।। केसाच्या गे बाई कैशा झाल्या लाटा। कोणी नीलकंठा दिसेना गे।।४।। लक्ष्मण म्हणे अती भोळी बाई। भाव तिच्या ठायी प्रेमा मोठा।।५।।

२६७२. याते नाहावया तेलही मिळेना। वस्त्रही दिसना याते एक।।१।। कातडे हा बाई पांघरतो सदा। खायाची आपदा दिसते गे।।२।। माय याते असती कुंची न का शिविती। टोपडे शिविती यासी ती गे।।३।। याच्या अंगाप्रती राख का लाविती। चंदन चर्चिती प्रेमे ती गे।।४।। लक्ष्मण म्हणे आपुलिया मना। आपणचि जाणा गोष्टी करी।।५।।

२६७३. भोळी म्हणे याते माय का असती। सर्पाचे का करिती अलंकार।।१।। बायको का याचे बैसती अंगावर। एक डोईवर एक अंकी।।२।। माय ती असती भीक मागू न देती। दळून पोसिती याते की गे।।३।। तिन्ही ताळी याते कोणी गे दिसेना। अती दैन्यवान दिसतो हा।।४।। लक्ष्मण म्हणे ऐसी नानापरी। कल्पना ती करी भोळी बाई।।५।।

२६७४. ज्याते कोणी नाही त्यातेचि पाळावे। हेचि आहे बरवे सर्वामाजी।।१।। आता मी शिवाची माता गे होईन। पालन करीन बाळाऐसे।।२।। इष्टलिंग तिने घेतले हो करी। म्हणे त्रिपुरारी बाळ माझे।।३।। चुंबन तिने हो दिधले लिंगाला। वारंवार त्याला कुरवाळी हो।।४।। लक्ष्मण म्हणे पायावरी ठेवी। न्हाऊ त्याते बाई घालीतसे।।५।।

२६७५. तेल लिंगा लावी घालीतसे स्नान। बाळाऐसे तिने केले देवा।।१।। आपुल्या पायाची माती लावी त्याला। म्हणे या बाळाला विघ्न नसो।।२।। स्तनी त्याते लावी दुग्ध पेई म्हणे। ऐसी त्या भोळीने भक्ती केली।।३।। पालखी निजवी हालवी बाळाला। नानापरी त्याला गाणे गाये।।४।। लक्ष्मण म्हणे ऐसे रात्रंदिन। बाळाऐसे तिने केले लिंगा।।५।।

२६७६. बाईची त्या भक्ती देखिली शंकरे। झाला विश्वंभर बाळ तिचे।।१।। पाषाणाचे लिंग तेचि बाळ झाले। अघटित घडले भक्तिबळे।।२।। बाळ रडतसे हालवी हातपाय। आनंद न माये भोळी बाई।।३।। उचलूनि त्याते त्वरे लावी स्तनी। स्तन शूळपाणि पेता झाला।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य भक्तिबळ। ब्रह्मांडाचा पाळ बाळ झाला।।५।।

२६७७. अनंत ब्रह्मांडे ज्याचे रोमी वसती। वेदशास्त्रांप्रती अगोचर जो।।१।। योगियांशी वेगी ध्यानी गवसेना। तोचि प्रभो जाणा बाळ झाला।।२।। परब्रह्म पहा कैसा वेडावला। भक्तीमुळे झाला वश तिला।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य तिची भक्ती। भक्तीची हो मुक्ती दासी आहे।।४।।

२६७८. रात्रंदिन बाई रंजवी शंकरा। गाणे विश्वंभरा गात असे।।१।। आंगडे टोपडे शिविले बाळाला। हातवाक्या त्याला केल्या पहा।।२।। पायी ते पैंजण कानी ते हो घोसे। बिंदले बाळास केले तिने।।३।। गळा ते गाठले शिरी पिंपळपान। रांगे पंचानन तिजभोवता।।४।। लक्ष्मण म्हणे कुंची शोभे शिरी। भक्तसाह्यकारी भुलला हो।।५।।

२६७९. स्वर्गींचे अमर म्हणती धन्य बाई। पूर्णकाम खरी तीच आहे।।१।। बीजे महादेवी धन्य धन्य माता। तिने या अनंता आकळिले।।२।। ज्याचे चरणरज आम्हाते दुर्लभ। भक्तीने सुलभ कैसा झाला।।३।। आपुल्या पायाची माती शिवाभाळी। लावी चंद्रमौळी आनंदे तो।।४।। लक्ष्मण म्हणे अमर पस्तावले। व्यर्थ ते गोविले आम्हा येथे।।५।।

२६८०. बीजे महादेवी बाळा आनंदाने। करवी स्तनपान प्रेमा मोठा।।१।। मातेहूनि प्रेमा अधिक हो तिचा। देव तो प्राणाचा सखा झाला।।२।। अती आनंद ती मानोनीया होती। पुढे पशुपती काय करी।।३।। भाव त्या बाईचा पहावा म्हणोन। रोग तो उत्पन्न करी देही।।४।। लक्ष्मण म्हणे दाह त्या

बाळाचा। वाढला हो त्याचा विघ्न आले।।५।।

२६८१. बाई तळमळे करी हो रुदन। म्हणे बाळा विघ्न कैसे आले।।१।। देतसे औषध गुण तो येईना। करीतसे नाना यत्न ती हो।।२।। तेथे साधू होता गेली त्याचे घरा। म्हणे या शंकरा पहा की हो।।३।। त्याने ते बालक पाहिले नेत्राने। म्हणे धन्य धन्य हिचे भाग्य।।४।। लक्ष्मण म्हणे साधू आनंदला। शिव तो ओळखिला त्याने तेव्हा।।५।।

२६८२. साधू म्हणे हिची पाहतसे भक्ती। भाषण तिजप्रती करिता झाला।।१।। तुझिये बाळाचा रोग हा दुर्धर। कोणाच्याने दूर नोव्हे नोव्हे।।२।। याची मी गे तुज सांगतो गे कथा। रोग जगन्नाथा झाला याने।।३।। पूर्वी कोणी एक बाई गे गोंडीण। आंब्याते रक्षण करीत होती।।४।। लक्ष्मण म्हणे सत्पुरुष तीते। सांगतसे कृत्य शिवाचे हो।।५।।

२६८३. तिच्या उष्ट्या कैऱ्या तुझिया बाळाने। भक्षिल्या म्हणोन रोग झाला।।१।। सासुरवाशीण होती एक बाई। तिचे प्रभोपाई प्रेम होते।।२।। दळता दळता पीठ शंकराते। अर्पित होती प्रेमे बाई।।३।। कच्चे पीठ भक्षी म्हणोनी हा रोग। आता तूते काय सांगू बाई।।५।। लक्ष्मण म्हणे बीजे महादेवी। ऐकतसे तीही भोळी बाई।।६।।

२६८४. एका बाईचा गे होता नित्यनेम। शिवार्पण धर्म होता तिचा।।१।। सर्वकर्म करी ती गे शिवार्पण। ते ते पंचानन स्वीकारीतसे।।२।। उच्छिष्ट खरकटे पाणी त्या बाईचे। अर्पिले ते याने स्वीकारले।।३।। त्याने याते रोग झालासे गे जाण। अवगुणी नंदन बाळ तुझा।।४।। लक्ष्मण म्हणे साधू बोध करी। ऐके ती सुंदरी प्रेमभावे।।५।।

२६८५. सासुरवाशीण गे होती एक बाई। सांगतो मी तेही ऐक गोष्ट।।१।। गव्हाचे राशीपाशी होती ती बाई। तिने प्रेमभरे काय केले।।२।। गव्हाचे टोपले घेतले चोरून। शिवाशी अर्पिले तेथेचि गे।।३।। तोंड पसरोनी भक्षिले याने। रोग हा दारुण झाला याते।।४।। लक्ष्मण म्हणे साधू म्हणे बाई। बराडी हा पाही बाळ मोठा।।५।।

२६८६. चांडाळादि भिल्ल गोंड अतिदुष्ट। त्यांचे नीळकंठ अन्न भक्षी।।१।। भलते सलते खाये त्या हो घरी। फार दुराचारी तुझा पुत्र।।२।। ऐसे फार काम

केले या शिवाने। कोणाते गणना नोव्हे त्याची।।३।। येथे वैद्याचे काम काही नाही। आपुल्या तू जाई सदनाप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे बीजे महादेवी। आली सदनाठायी आपुलिया।।५।।

२६८७. घरा येतानाचि मूल कासावीस। करी वरसोस लागला त्या।।१।। डोळे ते फिरवी आपटी हातपाय। पाहोनी ते माय रडू लागे।।२।। मोठ्याने ती रडे मुखा लावी मुख। म्हणे बा त्र्यंबका कैसे केले।।३।। आता बापा तुझा जाईल रे प्राण। मग मी वाचोन काय पाहू।।४।। लक्ष्मण म्हणे थोर तो गहिवर। सत्त्व उमावर पाहतसे।।५।।

२६८८. माता म्हणे बाळा कैसे त्वा हे केले। उफराटे झाले वत्सा माझ्या।।१।। मजला मृत्यूने का नाही भक्षिले। कासिया ठेविले व्यर्थ आता।।२।। तुझे दुःख मज पाहवेना बाळा। प्राण जाश्वनीळा देते मी रे।।३।। मस्तक आपटोन द्यावा जव प्राण। प्रभो पंचानन गहिवरला।।४।। म्हणे धन्य धन्य झाली हिची भक्ती। सायुज्यता मुक्ती द्यावी हिते।।५।। लक्ष्मण म्हणे शिव प्रकटला। म्हणे या मातेला श्रमविले।।६।।

२६८९. कोटी सूर्यप्रभा वामांगी पार्वती। गण ते शोभती सभोवते।।१।। देवाने ती माता आलिंगिली प्रेमे। म्हणे धन्य धन्य प्रेमा तुझा।।२।। तुझा उपकार माझ्याने फिटेना। मज पंचानना वश केले।।३।। काय इच्छा असे माग मायबाई। विलंब तू काही करू नको।।४।। लक्ष्मण म्हणे परब्रह्म शिव। झाला महादेव भक्ताधीन।।५।।

२६९०. माता म्हणे हेचि देई गा शंकरा। रोग विश्वंभरा जावा तुझा।।१।। भाषण ऐकोनी शिव संतोषला। निजपदी दिधला ठाव तीते।।२।। जन्म मृत्यू तिचा चुकविला शंकरे। भक्तकैवारी स्वामी माझा।।३।। असंख्य ते भक्त उद्धरिले ताते। माझे कृपावंते दयाघने।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तापाशी उभा। कोटी सूर्यप्रभा ज्याचे अंगी।।५।।

२६९१. बसवपुराणात आहे हे चरित्र। श्रवणे त्रिनेत्र गती देतो।।१।। भक्तांच्या ह्या कथा गाती जे आनंदे। तेथे ब्रह्मानंदे नाचे बाप।।२।। जाती कूळ गोत्र न पाहे तो काही। विद्या धन तेही तुच्छ मानी।।३।। प्रेमळाचा सखा झाला महादेव। देवाधिदेव जगद्गुरू।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते व्हा

शरण। आपुले समान करितो भक्ता।।५।।

२. शिवभक्त बालिका

२६९२. कर्नाटक प्रांती होता एक शिवभक्त। शिवलिंग पूजीत नित्य नेमे।।१।। ग्रामाचे बाहेर होते शिवालय। नित्य तेथे जाय पूजनाप्रती।।२।। काही एक दिन गेले हो क्रमोन। शिवपूजेविण अन्न न घे।।३।। एक कन्या होती भक्तराजाप्रती। कुमारी ती होती भाविक हो।।४।। लक्ष्मण म्हणे पुढे कैसे झाले। ऐकिले पाहिजे श्रोतेजनी।।५।।

२६९३. त्या मुलीचे लग्न नव्हते झाले। खेळतसे मुलांमाजी बाई।।१।। त्या हो भक्ताप्रती तातडीचे काम। आले म्हणून जाणे ग्रामा।।२।। भक्त म्हणे लिंगाचे न होय पूजन। तेणे तो दारुण दुःखी झाला।।३।। लहान ती बालिका खेळे मुलीमाजी। पित्याते ती पाही चिंतातुर।।४।। कन्या म्हणे ताता तुम्ही जावे ग्रामा। रक्षीन मी नेमा तुमचिया।।५।। लक्ष्मण म्हणे मुलगी ती म्हणे। शिवलिंग जावोन पूजीन मी।।६।।

२६९४. मुलीचे भाषण ऐकोनी तोषला। आनंदला चित्तामाजी प्रेमे।।१।। कन्येप्रती म्हणे राऊळा जाऊन। पूजी त्रिनयन प्रेमे बाई।।२।। मीही परतोन येईन लवकर। बोलोनी तो त्वरे गेला ग्रामा।।३।। दुसरे दिवशी मुलीने त्या स्नान। करोनी पूजना गेली प्रेमे।।४।। लक्ष्मण म्हणे करी ती पूजन। बिल्व ते चंदन प्रेमभावे।।५।।

२६९५. नित्य तिचा पिता नैवेद्याते दुग्ध। नेत होता म्हणोन तिने नेले।।१।। मुलीने त्या प्रेमे केले हो पूजन। नैवेद्य अर्पिला दुग्धाचा हो।।२।। दुग्धाची ती लोटी अर्पिली शंकरा। म्हणे विश्वंभरा पेई दुग्ध।।३।। म्हणे त्वरे पेई मज उशीर झाला। देवा भूक मजला लागली रे।।४।। लक्ष्मण म्हणे देव भावापाशी। भक्ताने देवाशी जिंकिले रे।।५।।

२६९६. मुलगी ती म्हणे दुग्ध हे चांगले। नाही उच्छिष्ट केले पेई वेगी।।१।। झाकोन हे देवा ठेविले रे होते। आता प्या लौकरी विलंब झाला।।२।। माझिया पित्याच्या हातीचे रे दुग्ध। नित्य तू आनंदे पिशी देवा।।३।। माझिया हातीचे का रे न बा पिशी। काय रे तुजशी म्हणावे बा।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य तिची भक्ती। भक्ताचा पशुपती सखा खरा।।५।।

२६९७. मुलगी ती म्हणे अज्ञान मी म्हणोन। हे दुधपान न करिसी।।१।। देवा तू सर्वत्राप्रती असशी समान। आज का विषमभाव धरिला।।२।। मोठ्याने ती रडे स्फुंदे आक्रंदोन। म्हणे तू कठीण देवराया।।३।। मजप्रती क्षुधा लागली शंकरा। तुजला विश्वंभरा दया न ये।।४।। लक्ष्मण म्हणे मोठ्याने ती रडे। म्हणे चंद्रचूड निर्दय खरा।।५।।

२६९८. असो माझा पिता आणील खायाला। तोही मी तुजला देईन रे।।१।। पिता मजप्रती आणील फडका। तुजला त्र्यंबका नेसवीन रे।।२।। परि तू रे देवा वेगी पेई दुग्ध। मजला आनंद होईल तेणे।।३।। मला माझा पिता आणील रे चोळी। तीही चंद्रमौळी देईन तुज।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य बाई भोळी। भाविकाजवळी वसे शिव।।५।।

२६९९. माझा पिता मजला आणील रे चुडा। तोही चंद्रचूडा देईल तूते।।१।। भावल्या आणील मज खेळावया। त्याही देवराया देईन तुज।।२।। परि तू रे देवा दुग्ध पे लवकर। मजला उशीर झाला बापा।।३।। मजला जी वस्त्रे आणील तो पिता। तेही तुज ताता देईन मी।।४।। लक्ष्मण म्हणे लालूच ती दावी। म्हणे देवा पेई दुग्ध वेगी।।५।।

२७००. ऐसी त्या मुलीची विनंती परिसोन। संतोषला पूर्ण सदाशिव।।१।। अति दया शिवा उपजली तिची। म्हणे तू आमुची सखी खरी।।२।। अज्ञान हे बालक धरिला हो हट्ट। म्हणे नीळकंठा प्यावे दुग्ध।।३।। पाषाणाचे लिंग दुग्ध ते हो प्याले। अघटित झाले भक्तिबळे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ताचे मनोरथ। पुरवितो समर्थ सखा खरा।।५।।

२७०१. नित्य तिचे दुग्ध पितसे महेश। भक्तीने परमेश वश झाला।।१।। तिचा तो पिता ग्रामाहूनी आला। भेटला कन्येला मुख चुंबी।।२।। कन्या म्हणे तुमचा नेम चालविला। नित्य मी शिवाला पूजीतसे ।।३।। आजचे दिवस करीन पूजन। उद्या हो पासून तुम्ही जावे।।४।। लक्ष्मण म्हणे पिता आनंदला। म्हणे पूजनाला जाई बाई।।५।।

२७०२. कन्या ती पूजना गेली शिवालया। प्रेमे देवराया पूजीतसे।।१।। पिता तो मागोन गेला दर्शनाते। प्रेमे हर्षयुक्त शिवापायी।।२।। मुलीने पूजन करोनी नैवेद्य। अर्पिला आनंदे देवाप्रती।।३।। दुग्ध प्यावे तव आला तिचा

पिता। देव तो लाजता झाला पहा।।४।। पेईना तो दुग्ध मुलगी म्हणे देवा। आज कृपाळुवा काय झाले।।५।। लक्ष्मण म्हणे देव तो पिईना। मुलगी पंचानना काय बोले।।६।।

२७०३. नित्य पिशी दुग्ध आज कैसी गती। तुज पशुपती झाली देवा।।१।। देव तो पेईना कन्या ऐकेना। नवलाव जाणा पाहे भक्त।।२।। भक्त म्हणे मनी मूल वेडावली। म्हणे चाल मुली घराकडे।।३।। वेडी तू झालीसी कळेना तुजला। चाल गे घराला त्वरे बाई।।४।। लक्ष्मण म्हणे कन्या ऐकेना। म्हणे पंचानना पाजीन दुग्ध।।५।।

२७०४. मुलगी म्हणे दुग्ध नित्य हो पीतसे। आज हा महेश पिईना का।।१।। पिता म्हणे हिते भ्रमचि हा झाला। आता या मुलीला काय करू।।२।। पिता मारावया गेला कन्येप्रती। नवलचि गती झाली तेथे।।३।। शिव तो दयाळू लिंगी प्रकटला। घेतले मुलीला उचलोनी।।४।। लक्ष्मण म्हणे मुख चुंबी शिव। लिंगी महादेव गुप्त झाला।।५।।

२७०५. मुलगी आपण लिंगी गुप्त झाली। भक्ते हे देखिले कौतुक।।१।। भक्त म्हणे देवा मज का टाकिले। म्या रे काय केले दोष देवा।।२।। त्याचाही उद्धार केला महादेवे। चरणापाशी ठाव दिधला त्याते।।३।। ऐसे ते असंख्य उद्धरिले प्राणी। भक्तापाशी धनी उभा पाहा।।४।। लक्ष्मण म्हणे स्मरा तो शंकर। पतितांचा उद्धार करी वेगी।।५।।

२७०६. बसवपुराणात आहे ही हो कथा। भक्ती विश्वनाथा आवडती।।१।। त्याते प्राणाहून भक्त आवडती। सखा पशुपती सत्य सत्य।।२।। त्रिशूल घेऊनि हिंडे भक्ताभोवती। अविनाश गती देतो दासा।।३।। त्याते व्हा शरण तुटती बंधन। स्वामी पंचानन सखा खरा।।४।। लक्ष्मण म्हणे माझा मायबाप। शिव विश्वरूप दयाघना।।५।।

३. रुद्रपशुपती

२७०७. रुद्रपशुपती अती भोळा भक्त। त्याने उमाकांत वश केला।।१।। शिवालयी पुराण नित्य होत होते। गेला भोळा भक्त पुराणाते।।२।। शिव विष प्याला निघाले पुराणी। शिवभक्त मनी दचकला।।३।। पुराणिका म्हणे शिवभक्त भोळा। काय या कर्माला करावे हो।।४।। शिव विष प्याला मरेल

की आता। आता कैसे ताता करू याला।।५।। लक्ष्मण म्हणे रडे आक्रंदून। म्हणे मोठे विघ्न ओढवले।।६।।

२७०८. सर्वत्र श्रोत्यांते म्हणे तो भाविक। कैसा हा त्र्यंबक वाचेल हो।।१।। त्याते आता काही उपाय दिसेना। मरण पंचानना आले पाहा।।२।। निघाला तेथोनी पुसे सर्वत्राते। म्हणे शंकराते वाचवा हो।।३।। लोक म्हणती त्याते लागले रे पिसे। म्हणोनी हा ऐसा बोलतसे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तराज शूर। ग्रामाचे बाहेर निघाला हो।।५।।

२७०९. आपुलिया मना आपणचि म्हणे। कैसे या देवाने केले पहा।।१।। आपुल्या हाताने आपुला हो घात। केला उमाकांत वेडा कैसा।।२।। पार्वतीने का हो वर्जिले नसेल। गजानन बाळ तोही कैसा।।३।। कुमाराने का हो विष पिऊ दिले। त्याचे डोळे गेले होते काय।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य मुग्ध भक्त। भक्ताने अनंत सखा केला।।५।।

२७१०. भक्त म्हणे तेथे होते शिवगण। महंत प्रवीण ते हो कैसे।।१।। चौसष्ट कोटी जवळी असोन। त्यांनी पंचानन वर्जिला नाही।।२।। वेडा तो शंकर वेडे त्याचे गण। आता पंचानन मरेल की।।३।। विष्णू तो कपटी लक्ष्मी आणिली। कपटविद्या केली देवे पहा।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त तो भाविक। म्हणे हा त्र्यंबक वेडा फार।।५।।

२७११. आपुल्या प्राणाते आपण रक्षावे। वेड्याते शिकवावे कैसे आम्ही।।१।। लेकरू शंकर म्हणोनि शिकवावे। काय त्या करावे वेड्याप्रती।।२।। धांगड पार्वती तीते कळेना का। विष त्या त्र्यंबका पिऊ दिले।।३।। सर्वत्र देवांनी रत्ने स्वीकारिली। माझ्या देवा दिले विष दुष्टे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त करी शोक। म्हणे हा त्र्यंबक वाचवा हो।।५।।

२७१२. अरण्याचे ठायी हिंडतसे भोळा। म्हणे या कर्माला काय करू।।१।। शिवाचे मरण नेत्राने पाहवेना। आता आपण वाचावे कशाकरिता।।२।। आपुला आपण आधी प्राण द्यावा। मग महादेवा काही होवो।।३।। ऐसे म्हणोनिया प्राण द्यावयाते। भक्तराज तेथे सिद्ध झाला।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य भक्तिबळ। देव तो जवळ आणिला हो।।५।।

२७१३. कैलासनिवासी म्हणे धन्य भक्त। प्राण हा त्वरित देईल की।।१।।

आता याते भेटी द्यावी लवकर। म्हणोनि शंकर धाविन्नला।।२।। भक्तापुढे शिव उभा तो ठाकला। म्हणे या भक्ताला काय देऊ।।३।। भक्ताने शंकर पाहिला दयाळ। म्हणे जाश्वनीळ आला की हो।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त म्हणे देवा। विष कृपाळुवा का पिलासी।।५।।

२७१४. भक्त म्हणे देवा कैसे त्वा हे केले। विघ्न ओढवले मोठे बापा।।१।। विष पिऊनिया गोष्ट गमावली। आता चंद्रमौळी मरशील तू।।२।। आता या विषाच्या येतील लहरा। प्राण गंगाधरा जाईल की।।३।। अरे वेड्या तुज कळेना रे काही। फार शिवाबाई भोळी तू गे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तसाह्यकारी। ऐके त्रिपुरारी गोष्टी त्याच्या।।५।।

२७१५. अज्ञान बाळाचे बोलणे बोबडे। मातेते आवडे अति प्रेमा।।१।। वेडे ते वाकुडे बाळाचे भाषण। माता ती आपण आनंदे हो।।२।। मातेच्या पोटात आनंद न माये। सांगता तो नये प्रेमा मोठा।।३।। मातेहूनि प्रेमा अधिक शंकरा। भक्ताचा तो खरा सखा शिव।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ताचे भाषण। ऐकोनि आपण काय बोले।।५।।

२७१६. शिव म्हणे भक्ता मजला मरण। नाही सत्य ते जाण भिऊ नको।।१।। विष बा म्या रे कंठी धरिले। नाही उतरले पोटात हे।।२।। देवाचे भाषण ऐकोनि भक्त। बोले प्रेमयुक्त अति भोळा।।३।। कंठीचे हे विष उतरेल पोटी। आता रे धुर्जटी मरशील।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य भक्तिबळ। भक्तीने स्नेहाळ वश होय।।५।।

२७१७. भक्त म्हणे देवा मज मृत्यू आधी। मग तुज कृपानिधी काही होवो।।१।। शिव म्हणे बा रे विष कंठी धरिले। अक्षयी शोभले पाहे तेथे।।२।। कंठाखाली कधी नाही उतरणार। बाळा काही घोर करू नको।।३।। विषाची ही बाधा नाही मजप्रती। स्वस्थ बा चित्ती असावे त्वा।।४।। लक्ष्मण म्हणे शिव त्या भक्ताला। बोध करिता झाला नाना युक्ती।।५।।

२७१८. परि त्या भक्ताप्रती होईना हो बोध। भक्त तो हो मुग्ध खरा भोळा।।१।। भक्त म्हणे कोठवरी तू जपशील। धार उतरेल तुझे पोटी।।२।। जागृतीत तू रे सांभाळशी शिवा। निद्रेमाजी देवा काय करिसी।।३।। तुजला बा काही कळेना शंकरा। प्रभो गंगाधरा गेली गोष्ट।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य

भोळा भाव। भाविकाचा देव सखा खरा।।५।।

२७१९. मजला आधी रे मरू दे शंकरा। मग तुज गंगाधरा काही होवो।।१।। तुझे अगोदर मरेन मी आधी। दुःख कृपानिधी दावू नको।।२।। भक्त भाषण ते ऐकोनि शंकर। बोले गंगाधर भक्ताप्रती।।३।। आपुले अंकी मी तूते बसवीन। कंठ तू लक्षून बैस माझा।।४।। विष खाली येता मग देई प्राण। मजप्रती विघ्न नाही बापा।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त आनंदला। म्हणे या कामाला हुषार मी।।६।।

२७२०. विष खाली येता देईन मी प्राण। सत्य हे वचन माझे देवा।।१।। त्रिशूल मी करी घेऊनि बैसेन। विष खाली येता प्राण देईन।।२।। शिव संतोषला भक्त उचलिला। अंकी बैसविला दयाघने।।३।। दक्षिण मांडीवरी शोभतसे भक्त। कंठ तो लक्षीत बैसलासे।।४।। लक्ष्मण म्हणे वामांगी पार्वती। दक्षिणांगी पशुपती शोभतसे।।५।।

२७२१. भक्ताचे तो लळे पुरवी शंकर। नाम विश्वंभर शोभे त्याला।।१।। भक्ताचा अंकित झालासे तो तात। भक्तमनोरथ पूर्ण करी।।२।। त्याते भक्ताविण दुजे प्रिय नाही। हिंडतो अक्षयी भक्ताभोवता।।३।। बसवपुराणात आहे ही हो कथा। भक्त विश्वनाथा आवडती।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते व्हा शरण। तुटती बंधन जन्मपाश।।५।।

४. शिवभक्त धनगरपुत्र

२७२२. श्रीशैल्य पर्वता यात्रा हो चालली। प्रभो चंद्रमौळी पाहावया।।१।। भूकैलास ऐसे वदती त्या स्थाना। ज्योतिर्लिंग जाणा अनादी ते।।२।। मल्लिकार्जुन तो दयाळू हो तात। निजभक्ताते मुक्त करीतसे।।३।। श्रीशैल्य शिखर पाहताचि मुक्ती। बोलिलासे बाप शुकाचा हो।।४।। शिवरात्री पर्वणी आला हो सुदिन। भक्त ते त्वरेने चालिले हो।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त आनंदे नाचती। प्रेमभरे स्तविती महादेवा।।६।।

२७२३. आपुलाले मेळी चालिले हो भक्त। मार्ग तो क्रमीत चालिले हो।।१।। धनगर गावंडा तेथे मार्गावरी। बस्त मेंढ्या चारीत होता तो।।२।। जाती त्याची हीन भोळा तो भाविक। भाविका त्र्यंबक वश होतो।।३।। त्याने यात्रेकरा केला नमस्कार। म्हणे मी किंकर तुमचा हो।।४।। शिवभक्त तुम्ही

श्रेष्ठ शिवमूर्ती। माझी एक विनंती तुम्हाप्रती।।५।। लक्ष्मण म्हणे शूद्र वर्तमान। पुसे त्याकारण प्रेमभावे।।६।।

२७२४. म्हणे महाराजा कोणे यात्रेप्रती। जाता कृपामूर्ती सांगा आम्हा।।१।। मल्लिकार्जुनाप्रती जातो म्हणती भक्त। प्रभो उमाकांत पाहावया।।२।। लिंगाचे दर्शन घेता होय मुक्ती। ऐसे त्या हो प्रती बोलिले ते।।३।। धनगर तो म्हणे मज ते दर्शन। होईल कोठून अभागी मी।।४।। प्रभोने आम्हाते जन्म कासिया। दिला स्वामिराया व्यर्थ जिणे।।५।। मजलागी एक लिंग आणून द्यावे। पूजीन मी भावे येथेचि त्या।।६।। लक्ष्मण म्हणे पुढे वर्तमान। झाले ते ऐकोन घ्या हो श्रोते।।७।।

२७२५. यात्रेकरूमाजी होता एक कुटील। होता अती खल द्रव्यलोभी।।१।। ठकविद्येमाजी होता तो निपुण। म्हणे मी आणून देईन लिंग।।२।। धनगराने दोन मोहरा काढून। दिल्या तत्क्षणी त्याजवळी।।३।। नमस्कार त्याने केला त्या ठकाते। म्हणे तू भगवंत भेटलासी।।४।। यात्रा तुम्ही करा लिंग द्या आणोन। पूजीन मी दीन शिवलिंगाते।।५।। लक्ष्मण म्हणे ठक तो निघाला। श्रीशैली गेला यात्रेमाजी।।६।।

२७२६. श्रीशैल यात्रा केली हो भक्तांनी। आले परतोनी त्या हो ठाया।।१।। मार्गावरी धनगर बैसला हो होता। त्याने त्या समस्ता नमिले हो।।२।। कुटीलही त्या समुदायी होता। धनगर म्हणे ताता द्यावे लिंग।।३।। कुटिले हो तेथे काय केली युक्ती। लेंडी त्याचे हाती दिली एक।।४।। म्हणे म्या हे लिंग आणिले युक्तीने। प्रेमे तू पूजन करी बापा।।५।। लक्ष्मण म्हणे धनगर तो भोळा। मानली हो त्याला गोष्ट त्याची।।६।।

२७२७. सर्वत्र यात्रा गेली ती निघोन। ठकही आपण निघता झाला।।१।। भोळा तो भक्त काय करिता झाला। प्रेमे त्या लिंगाला पुजीतसे।।२।। अभाग्या निधान सापडे हो जैसे। तेवी त्या भक्ताशी झाले पहा।।३।। स्थान त्याने तेव्हा निवांत पाहिले। लिंग ते स्थापिले प्रेमभरे।।४।। मातीचा ओटा केला त्या वनात। लेंडी लिंगाजैसी मांडिली हो।।५।। लक्ष्मण म्हणे भोळा तो भाविक। त्याने तोचि त्र्यंबक मानिला हो।।६।।

२७२८. प्रेमयुक्त तेव्हा करी तो पूजन। झालेसे तल्लीन मन त्याचे।।१।।

सर्वत्र मेंढ्याचे दुग्ध ते आणून। करी लिंगार्चन अभिषेक।।२।। लिंगावरी घाली दुग्ध आवडीने। पाला तो तोडून वाहतसे।।३।। अंतःकरणवृत्ती झाली लिंगमय। धन्य भक्तराय भाविक तो।।४।। संसार तो धंदा विसरला सर्व। नाम महादेव जपतसे।।५।। लक्ष्मण म्हणे धन्य त्याची माता। स्मरे उमाकांता पवित्र तो।।६।।

२७२९. त्याचे सांगती म्हणती नवल झाले। पिसे या लागले ऐसे वाटे।।१।। त्याचिया पित्याला सांगावे जाऊन। जाईल घेऊन गृहाप्रती।।२।। सर्वत्र ते म्हणती त्याचिया पित्याला। पुत्र तो जाहला वेडा तुमचा।।३।। सर्वत्र मेंढ्यांचे दुग्ध ते काढोनी। सांडीतसे रानी वेडा झाला।।४।। आमुची ती गोष्ट ऐकेना काही। जा तू लवलाही आणा त्याते।।५।। लक्ष्मण म्हणे ऐसे ते वदले। पुढे काय झाले तेही ऐका।।६।।

२७३०. ऐसे ऐकोनिया पिता तो तेथूनी। गेला त्या अरण्यी पुत्रापाशी।।१।। म्हणे हे अर्भका करितोसी काय। कोणी हा उपाय सांगितला।।२।। सर्वत्र दुग्धाचे केले निःसंतान। वेडा तू होऊन बैसलासी।।३।। व्यर्थ हा पाला तोडूनि का वाहसी। व्यर्थ का भुललासी वेड्या पोरा।।४।। क्रोध तो उत्पन्न झाला तत्क्षणी। म्हणे या दुष्टाने काय केले।।५।। लक्ष्मण म्हणे पिता तो कोपला। लत्ताप्रहार केला लिंगाप्रती।।६।।

२७३१. पूजा विखुरली दिली भिरकावूनी। अघटित करणी झाली तेथे।।१।। ऐसे पाहोनिया भक्त कासावीस। मनी तो महेश आठवी हो।।२।। म्हणे हा हा काय कर्म ओढवले। लिंग हे भंगिले आता यांनी।।३।। देवा कैसी मी रे गती करू आता। स्वामी उमाकांता दीनानाथा।।४।। चांडाळ मी दीन अती दुराचारी। म्हणोनि त्रिपुरारी ऐसे केले।।५।। लक्ष्मण म्हणे कुठार घेऊनी। प्राण तत्क्षणी देईन म्हणे।।६।।

२७३२. प्राण द्यावयाते भक्त सिद्ध झाला। कळाले शंभोला कैलासी हो।।१।। भक्ताची जननी सत्य सत्य शिव। नाम महादेव साजे त्याते।।२।। दीन तो दयाळू कृपेचे सदन। भक्ता मानी प्राण सदाशिव।।३।। घालीतसे उडी भक्तकार्याप्रती। स्वामी पशुपती महाराज।।४।। लिंगी प्रकटला भक्तास्तव तात। उचलोनि भक्त आलिंगिला।।५।। लक्ष्मण म्हणे स्वामी माझा भोळा।

भाविके जिंकिला भक्तिबळे।।६।।

२७३३. कोटी सूर्यप्रभा अंगी तेज दीप्ती। स्वामी पशुपती शोभला हो।।१।। वामांगी ती उमा शोभली हो माता। शोभतसे पिता महादेव।।२।। नंदीवरी स्वार स्वामी पंचानन। चौसष्ट कोटी गण सभोवते।।३।। शंभोने तो भक्त प्रेमे आलिंगिला। हृदयी धरिला अति प्रेमे।।४।। मुख चुंबी त्याचे तो वारंवार। म्हणे धन्य धन्य झालो आज।।५।। लक्ष्मण म्हणे भावबळ थोर। भावे परमेश्वर वश होतो।।६।।

२७३४. शिव म्हणे वत्सा झालो मी प्रसन्न। माग वरदान इच्छित ते।।१।। भक्त म्हणे ताता नाही इच्छा काही। सदय तू आई आम्हापाशी।।२।। अमृत जवळी कैचे त्या मरण। राया रंकपण स्पर्शेना रे।।३।। तेवी आम्हापाशी दयाळू तू ताता। मागण्यात अर्थ नाही आता।।४।। कल्पवृक्ष जवळी वन घनदाट। शिंदीचे ते बेट इच्छावे का।।५।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त शूर। निष्काम निर्घोर विजयी ते।।६।।

२७३५. भक्त म्हणे देवा नको काही आता। विज्ञापना ताता परिसावी।।१।। या क्रूरे तुज रे केला लत्ताप्रहार। करावा संहार त्याचा आता।।२।। चरणे करोनि पूजा रे भंगिली। अपकीर्ती झाली तिही लोकी।।३।। करी याते शिक्षा स्वामी विरूपाक्षा। ब्रह्मांड अध्यक्षा देवराया।।४।। शिवद्वेषी दुष्ट जाती नर्कालया। ऐसे योगिराया वेद वदे।।५।। लक्ष्मण म्हणे शिवकृपेकरून। झाला तो प्राज्ञ भोळा भक्त।।६।।

२७३६. भक्त म्हणे देवा ऐसीयाचे पोटी। जन्म का धुर्जटी दिला आम्हा।।१।। बुडवी हे कूळ करी निःसंतान। हेचि आता मागणे तुजलागी।।२।। दंड करी याते वेगी वृषभध्वजा। शंभो शिवशंकरा मायबापा।।३।। शिव म्हणे वत्सा धन्य तूचि तू रे। प्राणाहूनि थोर आवडशी।।४।। तुजऐसे भक्त मज आवडती। तुमची संगती मज प्रिय।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ती अती थोर। भक्तीचा आधार सर्वाप्रती।।६।।

२७३७. तुझिया पित्याने पूजा रे भंगिली। खंत ही वाटली म्हणोनि तुज।।१।। त्याते शिक्षा करा म्हणतोसी आम्हा। भक्ता सर्वोत्तमा प्राणसख्या।।२।। सुपुत्र तू त्याच वंशी जन्मलाशी। आता दंड त्यासी कैसा

बापा।।३।। धन्य तुझा पिता धन्य तुझी माता। वंद्य त्यांना कृतांता केले म्या रे।।४।। भक्तासखा माझ्या जिवाचिया जीवा। जिवाचा विसावा तूचि एक।।५।। लक्ष्मण म्हणे दीनानाथ शिव। भक्ताधीन देव झाला पाहा।।६।।

२७३८. शिव म्हणे वत्सा कूळ रे पवित्र। झाले मी त्रिनेत्र साह्य झालो।।१।। ब्रह्मांड हे राज्य देईन तुजला। भक्ता माझ्या बाळा जिवलगा।।२।। भक्ताचिया लाथा मज आवडती। भक्ता मी पशुपती पुजीतसे।।३।। उच्च नीच जाती न पाहे मी काही। विद्या धन काही तेही बापा।।४।। भाविकापाशी मी सदोदित असे। बोलिला महेश विश्वपिता।।५।। लक्ष्मण म्हणे स्वामी माझा भोळा। रक्षितो भक्ताला निज अंगे।।६।।

२७३९. सदाशिवे तेव्हा केली गणा आज्ञा। म्हणे वेगी आणा विमान रे।।१।। तत्क्षणी त्यांनी आणविले विमान। देदीप्यमान तेजोराशी।।२।। भक्त बैसविला कूळ त्याचे सर्व। देवाधिदेव तुष्ट झाला।।३।। कैलासाचे वाटा निघाले विमान। सर्वत्र ते गण सभोवते।।४।। वाद्यघोष होती नाना शब्द वाक्ये। कोंदला आनंद भक्तीमुळे।।५।। लक्ष्मण म्हणे झाला जयजयकार। करिती अमर पुष्पवृष्टी।।६।।

२७४०. स्वर्गवासी त्याते येऊनि वंदिती। म्हणती पशुपती सखा केला।।१।। म्हणती धन्य धन्य तुम्ही भक्तराज। तुम्हा वृषभध्वज वश झाला।।२।। वर देण्याप्रती प्रभो हो समर्थ। अनाथा सनाथ करितो हा।।३।। कोटी सूर्यप्रभा तेज ते फाकले। विमान चालले स्वर्गपंथे।।४।। कैलासभुवनी नेला भक्तराज। स्वामी वृषभध्वजे स्थापिला हो।।५।। लक्ष्मण म्हणे अगाध महिमा। भक्त सर्वोत्तमा आवडती।।६।।

२७४१. पूजा विखुरली होती ते स्थानी। अघटित करणी केली ताते।।१।। मणिमय लिंग प्रकट हो केले। देवालय झाले सुवर्णाचे।।२।। सुवर्णप्राकार सुवर्णाच्या भिंती। नाना वर्ण दीप्ती शोभविली।।३।। रमणीय स्थान केले सदाशिवे। देवाधिदेवे दीनानाथे।।४।। भक्ताचे मनोरथ पुरवी दीनानाथ। प्रभो विश्वनाथ सखा खरा।।५।। लक्ष्मण म्हणे मिथ्या हा संसार। सखा विश्वंभर करा वेगी।।६।।

२७४२. बसवपुराणी हे चरित्र सुरस। आहे भक्तिरसपूर्ण पुण्यकथा।।१।।

पाप ताप दहन होतसे श्रवणे। भाविक पावन होती येथे।।२।। अभाविक गेले कुतर्क करिता। त्याते भक्तकथा प्राप्त कैची।।३।। भाविक जे भक्त शिवसखे झाले। मतवादी गेले दुःखालया।।४।। सांडा गाथागोवी शंभो सखा करा। वाया येरझारा का हो करिता।।५।। लक्ष्मण म्हणे भाविकाचा सखा। शंभो पाठीराखा सत्य सत्य।।६।।

५. जार पुरुष

२७४३. कोणी एक जार होता अती जार। जारिणीबरोबर हिंडे वनी।।१।। काही एक दिन गेले हो क्रमोन। उन्मत्त दारुण अति क्रूर।।२।। विंध्याद्री पर्वती गेले क्रीडा करीत। पुढे तो वृत्तांत ऐका श्रोते।।३।। रम्य स्थळ होते एक त्या हो वनी। मंद्रिर त्या स्थानी दिव्य केले।।४।। लक्ष्मण म्हणे नाना क्रीडा करिती। भोग ते भोगिती विलासी हो।।५।।

२७४४. कोणे एके दिनी पुष्पे आणावया। हार गुंफावया करिता ते हो।।१।। विलंब लागला यावयाते त्याते। कोपली तेव्हा ते जारीण हो।।२।। त्या स्थळी तेथे शिवालय होते। जारीण ती तेथे गेली क्रोधे।।३।। रुसोनिया गेली बैसली देऊळी। लिंग ते न्याहाळी शिवालयी।।४।। लक्ष्मण म्हणे जार तेथे आला। विनवी जारिणीला अति प्रेमे।।५।।

२७४५. जारीण न बोले विनवी हो तीते। न जाये सदनाते अति क्रोधे।।१।। नानापरी लाडीगोडी करी तो हो जार। अति कामातुर विषयासक्त।।२।। कामातुराप्रती लज्जा ती नसे हो। विषयी अंध ते हो दुष्ट प्राणी।।३।। करी नमस्कार म्हणे क्षमा करी। चाल लवकरी क्रीडा करू।।४।। लक्ष्मण म्हणे ती त्याते बोलेना। गेला तो हो सदना परतोनी।।५।।

२७४६. दिव्य अलंकार वस्त्रे ती सुंदर। पुष्पाचे ते हार घेतले तबकी।।१।। आबीर अर्गजा नाना ते सुगंध। घेऊनि विषयांध आला त्वरे।।२।। प्रसन्न ती व्हावी म्हणोनि उपचार। करी तो पामर विषयलोभी।।३।। तीते म्हणे येथे करू गे विलास। काम त्या दुष्टास झोंबला हो।।४।। लक्ष्मण म्हणे जारीण निजून। राहिली वचन ती न बोले हो।।५।।

२७४७. जाराने उठवून बैसविले तीते। म्हणे का आम्हासी बोलनेसी।।१।। घाली अलंकार दिव्य वस्त्र घेई। सुगंध हे लावी अंगाप्रती।।२।। दिव्य हे गे

वस्त्र दिव्य अलंकार। आणिले म्या फार तुजकरिता।।३।। लक्ष्मण म्हणे जार विनवी फार। परि ती सुंदरी बोले ना हो।।४।।

२७४८. जार म्हणे प्राणप्रिये न बोलसी। गती या कर्मासी काय करू।।१।। तू जे इच्छिशील देईन मी तूते। बोल गे आम्हासी अति त्वरे।।२।। मजला या वनी तुजविण कोण। प्रिये तू भाषण न करिशी।।३।। तुजवरूनिया शरीर ओवाळून। टाकीन भाषण करी प्रिये।।४।। लक्ष्मण म्हणे जारीण बोलेना। जार वल्गना करी नाना।।५।।

२७४९. भाषण ऐकोनि उठली ती बाई। पूर्वपुण्य काही होते तिचे।।१।। कर्मासारखी हो सुचतसे युक्ती। उदास ती चित्ती झाली तेव्हा।।२।। गेली लिंगापाशी केला नमस्कार। वदे हर हर प्रेमभरे।।३।। स्नान केले होते लिंगा घाली पाणी। सुगंध चर्चोनि नमिला देव।।४।। जाराने उपचार आणिले जे होते। सर्वही लिंगाते अर्पिले हो।।५।। लक्ष्मण म्हणे पुढे नवल झाले। तीते हो सुचले काय पुढे।।६।।

२७५०. दिव्य ते हो वस्त्र वाहिले शिवाते। अलंकार त्याते समर्पिले।।१।। पुष्पाचे ते हार लिंगाकंठी घाली। सुगंधही लावी लिंगाप्रती।।२।। जाराने आणिले होते जे पक्वान्न। तेही शिवार्पण केले तिने।।३।। विड्याचे तबक अर्पिले शंकरा। सर्वही पसारा अर्पिला हो।।४।। महाशिवरात्री होता पर्वकाळ। पूजन सकळ घडले तीते।।५।। लक्ष्मण म्हणे लिंगाते पाणी। कोणी त्या अरण्यी घालीत नव्हते।।६।।

२७५१. रात्र झाली फार दीपही लाविला। पूजन शंकराला आवडले।।१।। भोलानाथ शिव प्रसन्न जाहला। म्हणे त्या बाईला काय देऊ।।२।। अशा अरण्यात हिने हो पूजिले। पाप हे जळाले हिचे सर्व।।३।। तृणाचे पर्वती पेटता हो अग्नी। जाती हो जळोनि संगे त्याच्या।।४।। लक्ष्मण म्हणे शिव आनंदले। पुढे काय केले कृपाघने।।५।।

२७५२. गणांप्रती शिव वदला दयाळ। प्रभो जाश्वनीळ भक्तसखा।।१।। आणा रे विमान न्यावे या बाईला। हिने मजला तोषविले।।२।। भोलानाथ भोळा आहे भक्ताप्रती। भक्त जे इच्छिती ते तो पुरवी।।३।। गणांनी विमान आणिले तत्क्षणी। प्रभो शूळपाणि पाहतसे।।४।। लक्ष्मण म्हणे बाई ती

विमानी। घातली शिवगणी नवल झाले।।५।।

२७५३. तिने त्या जाराचा हात हो धरिला। ओढूनि घेतला विमानी तो।।१।। कोटी सूर्यप्रभा विमान शोभले। गण ते बैसले महाराज।।२।। करिती जयजयकार वदती शिव शिव। मोठा तो आनंद वर्णवेना।।३।। दशबाहू त्रिनेत्र गण ते सर्वत्र। दीनाते पवित्र करिती ते।।४।। लक्ष्मण म्हणे विमान चालले। अमरांनी नमिले त्याहाप्रती।।५।।

२७५४. जार ती जारीण केली शिवरूप। सखा विश्वरूप झाला त्यांचा।।१।। कैलासाप्रती गेले ते विमान। देवांनी सन्मान केला त्यांचा।।२।। शिवपदी तेव्हा स्थापिले दोघाशी। वंद्य गीर्वाणाशी केले पाही।।३।। लक्ष्मण म्हणे करा शिवभक्ती। भक्ताघरी मुक्ती राबतसे।।४।।

२७५५. स्कंदपुराणात आहे हे चरित्र। शिवरहस्यात पुण्यकथा।।१।। व्यास महामुनी वदला भक्तिरस। भक्ताते महेश वश होतो।।२।। भक्ती वेगी करा मिथ्या हा संसार। दुःखाचा बाजार दिसे आम्हा।।३।। संसारी गुंतले देवा विसरले। दुःखी ते पडले कल्पवरी।।४।। लक्ष्मण म्हणे स्मरा स्मरा शिव। स्मरा महादेव भक्ती देतो।।५।।

६. पातकी ब्राह्मण

२७५६. कोणी एक ब्राह्मण होता हो कृपण। अती कर्महीन द्रव्यलोभी।।१।। सत्कर्म तो नेणे नेणे काही भक्ती। रेवातीरी वस्ती होती त्याची।।२।। कद्रू तो फार होता अती जार। खिस्तीचा व्यवहार होता गृही।।३।। होता हो सधन द्रव्य होते घरी। अती दुराचारी द्रव्यलोभी।।४।। लक्ष्मण म्हणे कोणा न दे अन्न। पशूप्रती तृण न घाली हो।।५।।

२७५७. एक वेळा पाक करी अस्तमानी। आणी हो मागोनी तेचि भक्षी।।१।। कोणा काही मागे आणी भाजीपाला। आपुल्या द्रव्याला खर्च न करी।।२।। कन्या पुत्र बंधू झाले हो जर्जर। पोटभरी आहार न दे त्याहा।।३।। लक्ष्मण म्हणे द्रव्य जतन करी। क्षणभरी घरी न वसे हो।।४।।

२७५८. ग्रामातील ब्राह्मण निंदिती हो त्याते। न मानी कोणाते द्रव्यमदे।।१।। जारकर्मी शूर पापखाणी बोलका। न मानी तो लोका अती भ्रष्ट।।२।। व्याजा व्याज लावी करी नीचकर्म। तयाने ब्राह्मणधर्म बुडविला।।३।। अहोरात्रंदिन

जारिणीचे घरी। करीतसे फेरी नसे तृप्ती।।४।। लक्ष्मण म्हणे द्रव्य मेळवी फार। होता अती क्रूर निर्भीड तो।।५।।

२७५९. ख्रिस्तीचा व्यवहार स्त्रियांप्रती भोंदी। नाना त्या उपाधी करी लोभे।।१।। असत्य भाषण बोले रात्रंदिन। ब्राह्मण ज्ञाती असोन भयचि नसे।।२।। रसविक्रय करी गाई विकीतसे। अती हो कर्कश दुराचारी।।३।। शूद्राचिये हाती गाई विकतसे। हेड करीतसे ढोरांचीही।।४।। लक्ष्मण म्हणे करी नाना कर्म। कोणाप्रती वर्म दिसो नेदे।।५।।

२७६०. तर्कज्ञानी होता तार्किक तो फार। बोलकाही शूर बोलावया।।१।। शूद्राचे हाताने पशू विकी फार। म्हणे सावकार मी हो आहे।।२।। म्हणे शूद्राचे हो कर्म शूद्र करी। आम्ही सावकारी करितो हो।।३।। नफा आपण खाई त्याते दे महिना। कळू न दे कोणा पाखंडी तो।।४।। लक्ष्मण म्हणे ब्राह्मण न्यून पाहती। कोठेही दुर्मती गवसेना।।५।।

२७६१. जारिणीचे घरी भोजनही करी। परि दुराचारी कळो नेदी।।१।। घरची माणसे कंटाळली त्यासी। परि तो कोणाते न मानी हो।।२।। होता हो भांगीष्ट मद्यपान करी। परि ते बाहेरी दिसो नेदी।।३।। असो द्रव्य त्याने फार मिळविले। करू नये ते केले द्रव्यबळे।।४।। लक्ष्मण म्हणे द्रव्याने अनर्थ। पापिया समर्थ म्हणती लोक।।५।।

२७६२. द्रव्याने अनर्थ झाकोनिया जाती। द्रव्यवंताप्रती लोक भीती।।१।। द्रव्यापाशी बहुत आहेत अनर्थ। जगी ते समर्थ द्रव्य आहे।।२।। पूर्वपुण्याविण द्रव्य ते न मिळे। पुण्याचे ते बळ द्रव्याप्रती।।३।। सत्कर्मी ते द्रव्य खर्चिती जे प्राणी। सुख त्यालागोनि होई फार।।४।। लक्ष्मण म्हणे अधर्मा हो प्रती। द्रव्य जे वेचिती जाती नर्की।।५।।

२७६३. असो तो ब्राह्मण उठे प्रात:काळी। घरची मंडळी उठवी त्वरे।।१।। शौच्याशी जाय न धुता पाय। ग्रामामाजी जाय फिरावया।।२।। कानी ते वेढे यज्ञोपविताचे। फिरणे हो त्याचे घरोघरी।।३।। होता अस्तमान येतसे घरासी। त्याच्या अन्यायासी पार नाही।।४।। लक्ष्मण म्हणे दिन गेले फार। व्यवहारी तो शूर होता प्राणी।।५।।

२७६४. ऐसे नित्य त्याचे होते आचरण। करी रात्रंदिन व्यवहार तो।।१।।

गृहाशी तो नित्य जाय अस्तमानी। लिंगाशी नमन जाता करी।।२।। त्याच्या मार्गावरी होते शिवालय। येता जाय दृष्टी लिंगावरी।।३।। नमन करूनि जाई भोजनाशी। इतुकेचि त्याशी घडले पुण्य।।४।। लक्ष्मण म्हणे आले त्या मरण। गेला त्याचा प्राण यमा कळले।।५।।

२७६५. यमाने आपले पाठविले दूत। आले ते त्वरित प्रेतापाशी।।१।। शंकराशी कळता केली गणा आज्ञा। म्हणे त्या ब्राह्मणा आणा त्वरे।।२।। शिवगण आले ते विमान घेऊन। तेथे यमगण पाहिले त्यांनी।।३।। म्हणती तुमचे येथे नाही रे कारण। आहे हा ब्राह्मण शिवभक्त।।४।। लक्ष्मण म्हणे यमदूत म्हणती। सांगा कृपामूर्ती याचे पुण्य।।५।।

२७६६. शिवगण म्हणती ऐका यमदूता। त्याचे पुण्य आता श्रवण करा।।१।। प्रदोषकाळी रे याने शिवलिंगाते। नमिले प्रेमयुक्त नित्यनेमे।।२।। नंतर भोजन जाऊनिया करी। तेणे त्रिपुरारी संतोषला।।३।। प्रदोषकाळाचा तो महिमा मोठा। पूजन नीळकंठा आवडते।।४।। लक्ष्मण म्हणे यमदूत म्हणती। धन्य पशुपती महाराज।।५।।

२७६७. यमदूत म्हणती अहो शिवगणा। अन्याय हो नाना याने केले।।१।। याच्या या पातकाची झाली म्हणता होळी। धन्य चंद्रमौळी महाराज।।२।। तुम्हापुढे आमुचे सामर्थ्य ते किती। जातो कृपामूर्ती आमुच्या ठाया।।३।। करोनि नमन गेले यमदूत। म्हणती पंचानन खरा श्रेष्ठ।।४।। लक्ष्मण म्हणे पतिताचा उद्धार। करितो गंगाधर दयाळू तो।।५।।

२७६८. शिवगणांनी तो ब्राह्मण उचलिला। विमानी घातला प्रेमभरे।।१।। दिव्य देह त्याते दिला हो गणांनी। पुण्यवंत प्राणी केला कृपे।।२।। विमान मिरवत गेले गगनपंथे। अमरांनी त्याते नमिले हो।।३।। धन्य शिवभक्ती धन्य तो शंकर। पातकी अपार उद्धरिले।।४।। लक्ष्मण म्हणे शिवपदी भक्त। स्थापी उमाकांत अतिप्रेमे।।५।।

२७६९. शिवगणांनी भक्त कैलासाते नेला। शिवपदी स्थापिला शिवआज्ञे।।१।। भेटले शंकर भक्तराजाप्रती। अती दयामूर्ती भोलानाथ।।२।। चरणापाशी जागा दिधली शंकरे। भेटले ते सारे शिवभक्त।।३।। शिवदर्शनाचा महिमा ऐसा थोर। पूजक अपार उद्धरिले।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती करा

करा। भक्त त्या शंकरा आवडती।।५।।

२७७०. स्कंद हो पुराणी चरित्र सुरस। बोलिला तो व्यास महामुनी।।१।। व्यासमुनी आहे त्रिलोकी तो वक्ता। त्यांनी ही कथा वर्णन केली।।२।। श्रवण करिती तेही उद्धरती। श्रवणमात्रे गती देतो तात।।३।। लक्ष्मण म्हणे स्मरा तो शंकर। स्तवा विश्वंभर प्रेमभरे।।४।।

७. नर्मदातीरावरील भिल्लीण

२७७१. नर्मदा हो तीरी होती एक भिल्लीण। तिचे वर्तमान ऐका श्रोते।।१।। बिल्ववृक्षाची झाडी तेथे भिल्ल मंडळी। राहिली त्या स्थळी वृक्षाखाली।।२।। गुंफा बांधोनिया राहिले ते भिल्ल। वन ते विक्राळ भ्यासूर हो।।३।। त्यामाजी जारीण होती एक भिल्लीण। करी नाना कर्म हीन ते हो।।४।। नर्मदेचे जळ आणी ती पिण्याला। मद्य मांस तिजला अति प्रिय।।५।। लक्ष्मण म्हणे राहिली त्या तीरी। करूनिया चोरी भरी उदर।।६।।

२७७२. नर्मदेते गेली बाई ती भिल्लीण। करोनिया स्नान काय करी।।१।। कुंभ भरोनिया घेतला शिरी। गोटा एक सवे घेतला हो।।२।। कुंभ झाकावया घेतला तो गोटा। बिल्ववृक्ष मोठा तेथे राहे।।३।। नर्मदाजलातील गोटा कुंभावरी। ठेवोनिया करी कामधंदा।।४।। झाकण म्हणोनि गोटा धूत असे। बहुत दिस ऐसे क्रमिले हो।।५।। तिचा अंत आला मेली ती भिल्लीण। आले यमगण न्यावयाते।।६।। यमपुराप्रती चालविले त्यांनी। केवळ पापखाणी म्हणोनिया।।७।। लक्ष्मण म्हणे तेथे चमत्कार। झाला की थोर ऐका श्रोते।।८।।

२७७३. शिवाने विमान पाठविले तीते। शिवगण तेथे आले त्वरे।।१।। कोटी सूर्यप्रभा पडला प्रकाश। स्तविती महेश शिवगण।।२।। नाना वाद्यघोष अप्सरा नाचती। चामरे ढाळिती शिवभक्त।।३।। यमगणापाशी आणिले विमान। म्हणती तुम्ही कोण नेणारे रे।।४।। लक्ष्मण म्हणे कोपले शिवगण। यमाचे ते गण भ्याले तेव्हा।।५।।

२७७४. यमदूत म्हणती अहो शिवगणा। चांडाळी ही जाणा महादोषी।।१।। हिने पाप फार केले महाराजा। कैसी वृषभध्वजा आवडली।।२।। हिचे पाप लिहिता न पुरे धरणी। कैसे हिजलागानि नेता तुम्ही।।३।। जन्मापासोनिया दोष आचरिले। काही नाही केले पुण्य हिने।।४।। लक्ष्मण म्हणे ऐकोनि

भाषण। तेव्हा शिवगण बोलले हो।।५।।

२७७५. शिवगण म्हणती अहो यमगणा। तुम्हा ते कळेना पुण्य हिचे।।१।। हिच्या पुण्याप्रती जाणे तो शंकर। प्रभो गंगाधर विश्वनाथ।।२।। हिला लिंगार्चन घडले प्रवीण। हिला हो जारीण म्हणता तुम्ही।।३।। लक्ष्मण म्हणे यमाचे ते दूत। होवोनिया स्तब्ध बैसले हो।।४।।

२७७६. शिवगण म्हणती हिते पुण्य घडले। ऐकिले पाहिजे यमदूता।।१।। नर्मदेतील हे पाषाण शिवरूप। ऐसा षण्मुखबाप बोलिला रे।।२।। शिवाचे वरदान आहे नर्मदेते। रेवा ही सर्वांते पूज्य आहे।।३।। लक्ष्मण म्हणे होऊनिया स्वस्थ। होऊनि निवांत ऐकती ते।।४।।

२७७७. शिवगण म्हणती नर्मदा हो तीर। पवित्र हे फार उत्तम क्षेत्र।।१।। येथे हिजप्रती घडले पूजन। शंभो कृपाघन संतोषला।।२।। पाप ते जळाले शिवकृपेकरून। पवित्र ही जाण श्रेष्ठ झाली।।३।। लक्ष्मण म्हणे यमदूत म्हणती। न कळे कोणाप्रती शिवमहिमा।।४।।

२७७८. नर्मदेश्वराचे घडले हीस पूजन। ऐसे शिवगण म्हणती दूता।।१।। कुंभावरी झाकण होता तो रे बाण। नित्य ती धुवोन ठेवीत होती।।२।। हाचि अभिषेक मानिला शंकरे। बिल्वदळे बा रे पडती लिंगी।।३।। गळती ते पत्र लिंगावरी पडती। दीप ती तेथे लावीत होती।।४।। गुंफेतील दीप हाचि नंदादीप। मानिला विश्वरूपे महादेवे।।५।। लक्ष्मण म्हणे ऐसे शिवगण। करिती भाषण यमदूता।।६।।

२७७९. घरामाजी अन्न करी ती हो पाक। नैवेद्य त्र्यंबक मानी तोच।।१।। अन्नाचा सुवास येतसे बाहेर। तेणे तृप्त भोळा शिव तो।।२।। भक्ती त्या बाईस सहजचि घडली। प्रभो चंद्रमौळी दयाळू तो।।३।। लक्ष्मण म्हणे यमदूत म्हणती। धन्य पशुपती महाराज।।४।।

२७८०. यमदूते तेव्हा केला नमस्कार। म्हणती शंकर सर्वा पूज्य।।१।। आम्हाकडोनिया अपराध झाला। सांभाळा बाईला जातो आम्ही।।२।। गणांते नमोन गेले यमदूत। शिवाते स्तवीत यमापाशी।।३।। शिवगणे तीते दिव्य देह दिधला। जयजयकार केला प्रेमभरे।।४।। लक्ष्मण म्हणे विमान मिरवत। गेले गगनपंथे कैलासाते।।५।।

२७८१. शिव तीते पाहोन फार संतोषले। पुढे नवल झाले तेही ऐका।।१।। तीते जन्म दिधला नर्मदा हो तीरी। तिला राजकुमारी केली श्रेष्ठ।।२।। जन्मताचि कन्या बोले रायाप्रती। म्हणे शिवभक्ती करीन ताता।।३।। भस्म भाळी शोभे वदे शिव शब्द। मोठा तो आनंद भक्तीचा हो।।४।। लक्ष्मण म्हणे राव नवल करी। म्हणे ही कुमारी धन्य श्रेष्ठ।।५।।

२७८२. कन्या म्हणे ताता पूर्वी मी भिल्लीण। होते मी जारीण अती हीन।।१।। दुष्टकर्म करी नाना अविचार। अन्यायी मी फार होते ताता।।२।। रेवातीरी येथे माझा रहिवास। माझ्या अन्यायास गणना नाही।।३।। रेवेतील गोटा कुंभाते झाकण। केला म्हणोन हे पद प्राप्त।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य शिवभक्ती। भक्ताची ती कीर्ती तीही लोकी।।५।।

२७८३. जनलोक म्हणती जन्मता हे बाळ। कथा ती सकळ सांगतसे।।१।। धन्य तो शंकर दयाळू दयाळ। प्रभो जाश्वनीळ भक्तसखा।।२।। कन्या म्हणे ताता लिंग ते स्थापून। करीन पूजन एकनिष्ठे।।३।। महाशैव राजा होता हो भाविक। म्हणे तू त्र्यंबक पूजी बाई।।४।। रेवातीरी त्यांनी लिंग हो स्थापिले। मंदिर ते केले सुवर्णाचे।।५।। असंख्य ती लिंगे स्थापिली रायाने। बिल्वाचे ते वन लाविले हो।।६।। तेथे नगरही मोठे वसविले। शिवभक्त आले तेथे फार।।७।। लक्ष्मण म्हणे नित्य जयजयकार। करिती भक्त शूर शिवाचे ते।।८।।

२७८४. कन्या रात्रंदिन शिवभक्ती करी। प्रभो त्रिपुरारी पूजितसे।।१।। रेवातीरी तेव्हा आनंद अक्षयी। पुण्या पार नाही बाईच्या त्या।।२।। ऋषी थोर थोर येती सुरभार। म्हणती स्थान थोर दिसे हे हो।।३।। सर्वत्रही मुनी आले त्या हो स्थळा। पूजिती जाश्वनीळा येवोनिया।।४।। कैलासमंदिरा ऐसे शोभे स्थळ। भक्तीचे ते स्थळ मोठे मोठे।।५।। त्रैलोक्यातील लोक येती दर्शनाते। नमिती बाईते भक्तराज।।६।। लक्ष्मण म्हणे भजन पूजन। होय आनंदाने अक्षयी तेथे।।७।।

२७८५. द्रव्याचे पर्वत वाटी नित्य बाई। रिद्धी सिद्धी ठायी त्या राबती हो।।१।। पुण्य ते अपार झाले त्या बाईचे। बळ त्या भक्तीचे श्रेष्ठ श्रेष्ठ।।२।। शिव ब्रह्मदेवा तेव्हा आज्ञा करी। म्हणे झडकरी कार्य साधा।।३।। राजकुमारीचा

करावा विवाह। इंद्राशी नेमावा तिचा वर।।४।। इंद्रपत्नी ती व्हावी भक्त माझी थोर। आज्ञा गंगाधर देता झाला।।५।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मदेव तो रे। आला रेवातीरी शिव-आज्ञे।।६।।

२७८६. कन्येने नमिले ब्रह्मदेवाप्रती। लिंग ती पूजिती झाली त्वरे।।१।। ब्रह्मदेव म्हणे तुझी भक्ती पूर्ण। झाली पंचानन तोषला गे।।२।। शिव-आज्ञा आता करी बाई लग्न। शिववरदान तूते आहे।।३।। राजकन्या म्हणे नको तो संसार। प्रेमे गंगाधर पूजीन मी।।४।। संसारी त्या सुख दिसेना मजला। नका त्या कर्माला गोवू आता।।५।। लक्ष्मण म्हणे कन्या ती ऐकेना। ब्रह्मदेव नाना बोध करी।।६।।

२७८७. शिव-आज्ञा आहे करी मुली लग्न। भक्ती तुझी पूर्ण पावली गे।।१।। इंद्राची इंद्राणी केलीसी म्या बाई। सुख ते अक्षयी भोगी आता।।२।। शिवभक्ती करी ऐसाचि आनंद। तुजला स्वानंद होईल प्राप्त।।३।। कन्या म्हणे ताता तुमची आज्ञा शिरी। वंदीन परि गोष्ट ऐका माझी।।४।। वरीन इंद्राते नित्य या लिंगाते। पूजावे वदे ते उभयतांनी।।५।। इंद्र म्हणे नित्य येऊ दर्शनाते। पुजू या लिंगाते प्रेमभरे।।६।। तेव्हा ब्रह्मदेवे लाविले हो लग्न। ऋषी ते गीर्वाण होते सर्व।।७।। लग्नसमारंभ झाला मोठा थोर। वैभव अपार रायाचे त्या।।८।। लक्ष्मण म्हणे पृथ्वीचे भूपती। आले लग्नाप्रती तेथे त्वरे।।९।।

२७८८. इंद्र तेव्हा गेला इंद्राणी घेऊन। सवे सुरगण गेले सर्व।।१।। इंद्र इंद्राणी नित्य रेवातीरी। येती गंगाधर पूजिती हो।।२।। त्या बाईचा पिता गेला उद्धरोन। कैलासभुवन त्या प्राप्त झाले।।३।। असंख्य ते भक्त ऐसे उद्धरिले। शिवसभे गेले भक्तिबळे।।४।। लक्ष्मण म्हणे करा शिवभक्ती। भक्ताघरी मुक्ती राबतसे।।५।।

२७८९. स्कंद हो पुराणी आहे हे चरित्र। शिवरहस्यात घ्या हो शोध।।१।। पापाची ती होळी होय श्रवणमात्रे। स्तवा तो त्रिनेत्र कृपाघन।।२।। त्रिशूल घेऊनि फिरे भक्ताभोवती। सखा पशुपती भक्ताचा हो।।३।। अगणित पातकी उद्धरिले ताते। स्तवा प्रेमयुक्त सखा हो तो।।४।। लक्ष्मण म्हणे येथे गुंतू नका। संसार हा फिका भक्तिविण।।५।।

८. राजा चन्मू

२७९०. चन्मू हा राजा होता पुण्यशीळ। त्याते जाश्वनीळ वश झाला।।१।। चक्रवर्ती राजा प्रतापी हो थोर। तपाचा डोंगर केला त्याने।।२।। सहस्रवर्षे करूनि तपार्चन। केला हो प्रसन्न उमाधव।।३।। शिवमस्तकीची विभूती आधारी। त्याते त्रिपुरारी देता झाला।।४।। विभूतिमहिमा अपार जाणूनी। राये हो मागोनी घेतली हो।।५।। लक्ष्मण म्हणे प्रताप थोर। केला राये फार तोही ऐका।।६।।

२७९१. कैलासी शंकर बैसला आसनी। स्वामी शूळपाणि सहपरिवारे।।१।। अप्सरा गायन करिती हो स्तुती। स्वामी उमापती स्तविला त्यांनी।।२।। नारद तो मुनी होता हो जवळी। सभा हो मंडळी घनदाट।।३।। अप्सरेते मुनी बोलिला हासोनी। काय शूळपाणि स्तविता तुम्ही।।४।। भक्ता हो आधीन जिणे या शिवाचे। भक्तापुढे याचे न चाले काही।।५।। लक्ष्मण म्हणे नारद तो मुनी। चेन्मूची करणी कथिता झाला।।६।।

२७९२. कथा ती ऐका पुण्य हो पवित्र। भक्त तो सत्पात्र विजयी झाला।।१।। पृथ्वीचे राज्य करितो नृपती। सुख सर्वांप्रती सर्वकाळ।।२।। विभूतिबळाने सर्व सिद्धी पूर्ण। कोठे काही काही न्यून पडेना हो।।३।। देवराज्याहून सुख तेथे फार। लोक ते कुबेर घरोघरी।।४।। मृत्यू आला त्याते भस्म हो लावोन। उठवी आपण राव बळे।।५।। लक्ष्मण म्हणे भस्मबळेकरून। झाला तो प्रवीण जगामध्ये।।६।।

२७९३. मेले प्राणी राजा भस्माने उठवी। कोणा मृत्यू नाही पृथ्वीवरी।।१।। यमपुरीचा तो मार्गही मोडला। सुखाचा हो केला सुकाळ त्यांनी।।२।। रायाचा सेवक होता भृत्यजन। त्याने शिव प्रसन्न केला प्रेमे।।३।। शिवाने तो भृत्य कैलासासी नेला। रायाते कळाला वृत्तांत हो।।४।। राव तो कोपला शिवावरी फार। म्हणे तो शंकर काय श्रेष्ठ।।५।। लक्ष्मण म्हणे पुढे जे जाहले। तेही ऐका हो श्रोतेजन।।६।।

२७९४. राव म्हणे आमुचा सेवक न्यायाला। काय त्या शिवाला कारण हो।।१।। करा स्वारी सिद्ध प्रधाना बोलला। सेनाभार केला त्वरे सिद्ध।।२।। चार चार पंख एका अश्वाप्रती। सर्वांगी विभूती वीरांच्या हो।।३।। रुद्राक्ष

आभरण वीरांते शोभले। त्वरे हो निघाले देवावरी।।४।। श्रीशैल्य पर्वताहूनि उडाले। अती त्वरे गेले यमलोका।।५।। लक्ष्मण म्हणे यमाते जिंकले। पुढे ते निघाले शिवभक्त।।६।।

२७९५. अग्नी वरुण वायू जिंकिला कुबेर। अमरादी सुरवर जिंकिले हो।।१।। इंद्राते जिंकून पुढे हो निघाले। दिक्पाल जिंकिले सर्व त्यांनी।।२।। सूर्य चंद्रलोक तारा ते मंडळ। जिंकिले भूपाल प्रतापी हो।।३।। बृहस्पती शुक्र शनी राहू केतू। पुढे हो जिंकीत चालिला तो।।४।। सप्तऋषी आदी सर्वही जिंकिले। ध्रुवाते वेष्टिले प्रतापे हो।।५।। लक्ष्मण म्हणे ध्रुव तो जिंकिला। पुढे तो निघाला राजा श्रेष्ठ।।६।।

२७९६. भूर्लोक महर्लोक हो जिंकिले। वीर ते शोभले प्रतापी हो।।१।। जनलोक तपोलोक आदी सर्व। जिंकोनि तो राव निघाला हो।।२।। सत्यलोक त्यांनी जिंकिला विधाता। सृष्टीचा तो कर्ता शरण आला।।३।। पद्मनाभ त्यांनी जिंकिला वैकुंठी। भस्ममहिमा श्रेष्ठ अगाध हो।।४।। गेले शिवावरी कैलासशिखरी। स्वामी त्रिपुरारी वेढिला हो।।५।। लक्ष्मण म्हणे भक्तिबळ थोर। महिमा अपार भक्ताचा हो।।६।।

२७९७. शिवगण थोर धावले हो शूर। ब्रह्मांडा आधार ज्यांचा हो।।१।। शिव तो आपुल्या वीरांते बोलिला। शस्त्र हे अंगाला लागू न द्यावे।।२।। शिवगणांचे तेव्हा शस्त्रचि खुंटले। शिणले गण ते चौसष्ट कोटी।।३।। राये सर्वांप्रती भस्म हो चर्चिले। अजिंक्य ते झाले सर्वांप्रती।।४।। शिववीर तेव्हा फिरले माघारी। तेव्हा त्रिपुरारी काय करी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त तो विख्यात। प्रताप अद्भुत केला त्याने।।६।।

२७९८. शिवाने मस्तकी आधारी पाहिली। ती तव दिधली रायाप्रती।।१।। नारद तो बोले तेव्हा मी तेथ हो। होतो अप्सरे हो ऐका पुढे।।२।। तेव्हा हा शंकर कापला थरथर। मजला समोर पाठविले।।३।। शिव हा निघाला कैलासाबाहेर। सहपरिवारे भेटावया।।४।। बाहू पसरोनि निघाला शंकर। रायाते ईश्वर शरण आला।।५।। रायाचा तो भृत्य दिधला रायाप्रती। भक्ताने शिवाशी जिंकिले हो।।६।। लक्ष्मण म्हणे भक्तप्रतिज्ञा हो। सत्य करितो हो महाराज।।७।।

२७९९. रायाप्रती शिवे आणिले आदरे। नाना उपचारे तोषविले।।१।। सहपरिवारे शिव रायाप्रती। स्तवोनि नृपती आणिला हो।।२।। आपुले जवळी बैसविला ताते। भक्तांनी गे याते जिंकिले हो।।३।। नारद तो बोले अप्सरे हो प्रती। कोण आम्हाप्रती सांगा श्रेष्ठ।।४।। धन्य हा शंकर धन्य ती विभूती। धन्य तो नृपती भक्तराज।।५।। नाना उपचारे राजा तो गोविला। शंकर तयाला जावो नेदी।।६।। चन्मू हा पुढे जाईल भूतळा। उद्धार सकळा करील गे।।७।। लक्ष्मण म्हणे नारद तो श्रेष्ठ। बोलिला वरिष्ठ अप्सरेशी।।८।।

२८००. नारदसंवाद स्कंदे अगस्तीला। पूर्वी सांगितला नाना युक्ती।।१।। पुढे हे चरित्र व्यासांनी कथिले। पुराणी वर्णिले स्कंद त्या हो।।२।। व्यासाचे वचन चरित्र जुनाट। भक्ती श्रेष्ठ पेठ सर्वाहून।।३।। भक्तिविण शिव कदा वश नव्हे। भक्ती श्रेष्ठ आहे सर्वाहूनी।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ताचा जिव्हाळा। शिव प्रभो भोळा सत्य सत्य।।५।।

९. राजा चित्रकेतू

२८०१. चित्रकेतू राजा होता शिवभक्त। ऐका हो वृत्तांत प्रेमे त्याचा।।१।। शिवालयी राव बैसला पूजना। लिंग पूजी नाना द्रव्येकरून।।२।। रायाचे तेथेचि आयुष्य सरले। काळाचे ते आले दूत त्वरे।।३।। रायाते ओढोनि न्यावे जव त्यांनी। आले हो धावोनि शिवगण।।४।। षडानने यमदूत तो मारिला। राव सोडविला स्वामींनी हो।।५।। यमाते कळाला वृत्तांत हो सर्व। म्हणे हे अपूर्व कैसे झाले।।६।। लक्ष्मण म्हणे यम क्रोधावला। अविद्येचा घाला पडला त्यासी।।७।।

२८०२. यमराव क्रोधे बोले हो उत्तर। म्हणे करू थोर युद्ध आता।।१।। आमुच्या भृत्याते मारिले शिवगणे। काय हेचि प्रवीण सर्वांमध्ये।।२।। आमुच्या कामाशी आम्ही हो मुखत्यार। काय हेचि थोर जगामध्ये।।३।। ब्रह्मदेव त्याची नोव्हे की हो प्राज्ञा। आमुचिया गणा दंडावया।।४।। यम तो कोपला कळले गजवदनाला। धावोनिया आला यमपुरा।।५।। लक्ष्मण म्हणे शिवाचा तो सुत। कोपला अद्भुत पुढे केले।।६।।

२८०३. चौसष्ट ते कोटी गण महाशूर। स्वामी विघ्नहर श्रेष्ठ सर्वा।।१।। शिवसुते रे तेथे युद्ध केले थोर। सूर्याचा कुमर मारिला हो।।२।। हेमरत्नमय

यमाचे ते पुर। सुवर्ण प्राकार शोभती तेथे।।३।। रत्नमय हुडे शतखणी गोपुरे। दिव्य त्या अंबरी पताका हो।।४।। गोपुरावरती कळस शोभती। फार ती संपत्ती यमाची हो।।५।। लक्ष्मण म्हणे पुढे वर्तमान। झाले ते ऐकोन घ्या हो श्रोते।।६।।

२८०४. अमरावती ऐसे पुर त्या यमाचे। आधिपत्य दंडाचे त्याहाकडे।।१।। लक्ष चौऱ्याऐंशी जीव बंदिशाळा। तोडिल्या सकळा विघ्नहरे।।२।। असंख्य हो दोषी होते तेथे फार। पापाचे गिरिवर महादोषी।।३।। सर्वत्रा हो प्रती सोडविले ताते। शिवाचिया सुते विघ्नहरे।।४।। यमपुराप्रती लाविला हो अग्नी। रक्षा हो होऊनि गेली त्याची।।५।। लक्ष्मण म्हणे शिवमहिमा थोर। त्याचे कामदार सर्वत्रही।।६।।

२८०५. कुंभपाकादिक सर्व विध्वंसिले। रौरव जाळिले सर्वत्रही।।१।। शिवसुत तेथूनि निघाला सत्वर। यमाचे कलेवर घेऊनिया।।२।। यमाचेही प्रेत पडले द्वारी। सहस्र वरुषेवरी पडले तेथे।।३।। यमाचे ते गण काही उरले होते। लपले जे होते गिरिकंदरी।।४।। सूर्य-आज्ञे गेले ब्रह्मदेवा शरण। कथिले वर्तमान सर्वत्रही।।५।। लक्ष्मण म्हणे पिता महातात। झाला चिंताग्रस्त ऐकूनिया।।६।।

२८०६. ब्रह्मदेव म्हणे शिव क्रोधयुक्त। कैसे याते आता करावे हो।।१।। राहिला व्यवहार सृष्टीचे कर्तृत्व। ब्रह्मदेव स्वस्थ बैसला हो।।२।। पापी दोषी खळ पुण्यस्थळा जाती। खुंटली हो गती यमपुरीची।।३।। ब्रह्मदेवे तेव्हा केला हो विचार। म्हणे एकाकार झाले सर्व।।४।। ब्रह्मदेव तेव्हा निघाला तपाते। आराधी शिवाते अष्टभावे।।५।। प्रभोचिया ध्यानी बैसला निवांत। करूनिया चित्त एकाग्र ते।।६।। सहस्र वर्षे त्याते गेली गुजरोन। तपाचे अवसान झाले पूर्ण।।७।। भक्ताचा कैवारी महाराजा शिव। प्रकटला देव सर्वांचा तो।।८।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मांडाचा पती। त्याची कोणाप्रती न कळे लीला।।९।।

२८०७. कोटी चंद्रसूर्यप्रभा कांती। पडली हो दीप्ती दिव्य तेज।।१।। ब्रह्मदेवे तेव्हा नमिले चरण। केले हो स्तवन अती प्रेमे।।२।। म्हणे महाराजा तुझे आज्ञेकरोन। करितो उत्पन्न जगाप्रती।।३।। तुझे कृपेकरून आमुचे कल्याण।

विश्वाचे जीवन तुम्ही ताता।।४।। ब्रह्मदेवे शिव स्तविला प्रेमे हो। म्हणे स्वामिया हो कृपा करा।।५।। लक्ष्मण म्हणे दयेचे आगर। शिव तो भांडार कृपेचे हो।।६।।

२८०८. ब्रह्मदेव म्हणे देवाधिदेवा। यम तो उठवा दास तुमचा।।१।। शिव वदे तेव्हा ब्रह्मदेवाप्रती। आम्ही त्याप्रती हो न उठवू कदा।।२।। आमुचिया भक्ता यमलोकी नेई। त्याने न उठवू आम्ही कदा।।३।। ब्रह्मदेवे तेव्हा नानापरी विनवणी। केली शिवाप्रती अती प्रेमे।।४।। शिव म्हणे आम्हा पत्रिका लिहून। द्यावी हो आपण ब्रह्मदेव।।५।। लक्ष्मण म्हणे लिहिली पत्रिका। दिली तत्क्षणी चतुराननें।।६।।

२८०९. शिवभक्ता यमलोक नाही स्वप्नी। दिधले हो लिहूनि ब्रह्मदेवे।।१।। शिवांनी हो तेव्हा केली गणा आज्ञा। उठवा या दीना वेगी आता।।२।। गण ते धावले आणिले गंगानीर। मुखी ते सत्वर घातले हो।।३।। यमाचे ते प्रेत उठविले त्यांनी। अगम्य करणी प्रभूची हो।।४।। यमाने उठूनि स्तविला शंकर। म्हणे मी अपार अपराधी हो।।५।। लक्ष्मण म्हणे नाना युक्तीकरून। त्याने शिव पंचानन स्तविला हो।।६।।

२८१०. ब्रह्मदेवे यमे शिवाते नमून। आले हो धावून यमपुरा।।१।। विश्वकर्म्याहाती रचिले नगर। सूर्याचा किंकर स्थापिला हो।।२।। देव सर्वत्रही दिक्पाल मिळाले। यमाते स्थापिले पूर्वस्थानी।।३।। ब्रह्मदेवे आज्ञा केली यमाप्रती। शिवभक्ताचे वाटे न जावे तुवा।।४।। ब्रह्मदेव गेला सत्यलोकाप्रती। अगम्य हो कीर्ती शिवाची हो।।५।। शिवभक्ताचा महिमा अपार। भक्ताचा साह्यकारी सत्य सत्य।।६।। असंख्य ते पापी त्याने उद्धरिले। स्मरा हो पाउले परमात्म्याची।।७।। व्यासांनी वर्णन केले हो चरित्र। स्कंदपुराणात महामुनी।।८।। शिवाने तो राजा चरणी स्थापिला। मृत्युंजय त्याला नाम झाले।।९।। लक्ष्मण म्हणे भक्तकैवारी। स्वामी त्रिपुरारी सखा खरा।।१०।।

१०. शिवभक्त ब्राह्मण

२८११. धर्मशीळ ब्राह्मण होता अग्निहोत्री। पुण्य त्या हो क्षेत्री वास त्याचा।।१।। होता हो शिवभक्त होता तो सात्त्विक। परम भाविक दयाळू

हो।।२।। षट्कर्मनिपुण होता हो व्युत्पन्न। लिंगपूजेविण अन्न न घे।।३।। सधनही होता होता भाग्यवंत। अती कृपावंत सर्वामान्य।।४।। लक्ष्मण म्हणे होता आत्मज्ञानी। दानशूर प्राणी होता तो हो।।५।।

२८१२. परि त्या ब्राह्मणाते नव्हती हो संतती। परि खंत न करी काही तो।।१।। सर्वदा संतुष्ट होता तो ब्राह्मण। विवेकी तो पूर्ण केवळ साधू।।२।। परि त्याची पत्नी रात्रंदिन तळमळी। म्हणे चंद्रमौळी कोपला का।।३।। लक्ष्मण म्हणे स्त्री त्या भ्रताराते। म्हणे शंकराते पुत्र मागा।।४।।

२८१३. म्हणे आमुचा जन्म व्यर्थचि चालिला। पुत्राविण कोणाला गती नाही।।१।। पुत्राविण मंदिर दिसे हो स्मशान। करा काही यत्न स्वामिराया।।२।। संततीवाचून संपत्ती शोभेना। मागा पंचानना पुत्र स्वामी।।३।। धिक् हे जिणे धिक् हा संसार। दुःख हे अपार मज दिसे।।४।। लक्ष्मण म्हणे भ्रताराते बाई। नानापरी विनवी पुत्रास्तव।।५।।

२८१४. विप्र म्हणे प्रिये खेद व्यर्थ करिशी। होणार ते कोणाशी चुकेना गे।।१।। आपुले प्रारब्धी पुत्र नाही कांते। व्यर्थ का शोकाते वाढविसी।।२।। देवावरी शब्द व्यर्थ तू ठेविसी। आपुल्या कर्माशी विचारावे।।३।। स्त्री म्हणे माझे प्रारब्ध हे हीन। आता दुजे लग्न करा तुम्ही।।४।। लक्ष्मण म्हणे लग्नाची योजना। बाईने त्या जाणा मांडली हो।।५।।

२८१५. ग्रामातील लोक तिने बोलाविले। ज्ञाते ते भले भले ब्राह्मण हो।।१।। श्रीमंत ते लोक तिने बोलावून। म्हणे काही यत्न करा तुम्ही।।२।। आमुच्या वंशाचे खंडन जाहले। व्यर्थ जिणे गेले आमुचे पहा।।३।। आमुच्या स्वामीचे करूनि द्यावे लग्न। एवढा प्रयत्न करा तुम्ही।।४।। द्रव्य आम्हापाशी आहे ते खर्चावे। स्वामीते बोधावे तुम्ही आता।।५।। लक्ष्मण म्हणे सर्वांते मानले। म्हणती लग्न त्वरे केले पाहिजे हो।।६।।

२८१६. सर्वांनी मिळून नमिला ब्राह्मण। म्हणती त्वरे लग्न करा स्वामी।।१।। गृहस्थ आश्रमाचा हाचि असे बाणा। पुत्रावाचोनी जाणा अपुरा तो।।२।। तुम्ही ज्ञाते आहा समाधानी वृत्ती। खेद तुमच्या चित्ती नसे काही।।३।। परि जगरहाटीने चालावे आपण। मानावे वचन तुम्ही आमुचे।।४।। लक्ष्मण म्हणे सर्वत्र म्हणती। स्वामी आम्हाप्रती द्यावे इतुके।।५।।

२८१७. सर्वांचे भाषण ऐकूनि ब्राह्मण। बोले तो हसून प्रेमभरे।।१।। मजला व्याधी नका लावू ही हो। मोठा अनर्थ हो दिसे येथे।।२।। पुढे कलहासी दिसे हे कारण। मोठे दिसे विघ्न करा शोध।।३।। स्त्रियांच्या या जाती मोठ्या अनिवार। तयाचा विचार करा काही।।४।। लक्ष्मण म्हणे सर्वत्र ऐकती। बोले ब्रह्ममूर्ती महाराज।।५।।

२८१८. भाषण ऐकूनि ब्राह्मणपत्नी बोले। भ्रतारा नमिले तिने तेव्हा।।१।। म्हणे महाराजा परिसावी विज्ञापना। स्वामी हो सर्वज्ञा मुनिवर्या।।२।। तुम्ही हो भाषण केले हे प्रमाण। स्त्रियांची लक्षणे वानिली तुम्ही।।३।। स्त्रियांचा स्वभाव आहे हा हो दुष्ट। म्हणून आम्ही कष्ट भोगीतसो।।४।। लक्ष्मण म्हणे विनवी ती भ्रतारा। म्हणे लग्न करा स्वामी सुखे।।५।।

२८१९. मी जाऊनि आता आणिते मुलीला। ताप तो तुम्हाला लागू नेदी।।१।। कन्येऐसे तिचे करीन मी पालन। तिचे मी साहीन सर्व बोल।।२।। तिने नित्य मज मारिले हो जरी। साहीन ते भारी कष्ट स्वामी।।३।। तिची दासी मी हो होईन दयाळा। व्यर्थ हा चालला जन्म माझा।।४।। लक्ष्मण म्हणे प्रेमे विनवी बाई। म्हणे चिंता काही करू नका।।५।।

२८२०. वंशखंडन होईल स्वामिराया। यास्तव हा उपाय यत्न करिते।।१।। बाईचे भाषण सर्वांते मानले। म्हणती आता केले पाहिजे लग्न।।२।। मुलगी आणिली प्रयत्ने करून। लाविले हो लग्न सर्वत्रांनी।।३।। लिंगार्चन नित्य करी तो ब्राह्मण। आनंदे तो पूर्ण सर्वकाळ।।४।। लक्ष्मण म्हणे काही दिस गेले। ऋतू प्राप्त झाला मुलीप्रती।।५।।

२८२१. त्या मुलीचे नाम होते घृष्णाबाई। पतिसेवेठायी अती सूज्ञ।।१।। पती पत्नी दोघे नित्य करती लिंगार्चन। शिवाचे कीर्तन प्रिय त्यांना।।२।। त्या बाईप्रती हो दिव्य पुत्र झाला। आनंद सर्वाला झाला तेव्हा।।३।। पुढे त्या मुलाचे केले व्रतबंधन। पुढे त्याचे लग्न केले त्वरे।।४।। लक्ष्मण म्हणे कलह उत्पन्न। झाला पुढे विघ्न आले मोठे।।५।।

२८२२. मुलाते पाहोन ब्राह्मण आनंदे। त्या स्त्रीते खेद उपजे तेव्हा।।१।। ब्राह्मण स्त्रियेचे करी समाधान। म्हणे तुजकारण सांगत होतो।।२।। मत्सर वाढेल सांगत होतो तूते। तेव्हा त्वा ते कांते ऐकिले नाही।।३।। घृष्णा म्हणे

बाई मी तुझी गे दासी। पालन तुम्हासी करणे आमुचे।।४।। घृष्णा त्या बाईचे दास्यत्व हो करी। पुत्र मांडीवरी बैसवी तिच्या।।५।। लक्ष्मण म्हणे घृष्णा ती चतुर। म्हणे तू माहेर आमुची गे।।६।।

२८२३. मुलाते पाहता मानी ती हो दुःख। हृदयी तिच्या शोक तळमळे ती।।१।। म्हणे माझे पोटी काही झाले नाही। वांझ मी अक्षयी राहिले हो।।२।। घृष्णेवरी माझ्या भ्रताराचे मन। वसे रात्रंदिन काय करू।।३।। या मुलाचे माझ्या काय येईल हाता। दुःख मोठे चित्ता वाटे माझ्या।।४।। लक्ष्मण म्हणे पुत्र तो प्रवीण। मोठा विद्वान निघाला तो।।५।।

२८२४. वेदशास्त्रांमाजी कुशल चतुर। सन्मानही फार लोक करिती।।१।। काही एक दिन गेले हो क्रमोन। पुढे त्याते विघ्न आले पहा।।२।। स्त्री भ्रतार तो एकांती असता। गेली उठोनि कांता दळावया।।३।। उत्तररात्र झाली म्हणोनि दळी बाई। विघ्न त्या हो ठायी मोठे झाले।।४।। सापत्न ती माता उठली झडकरी। शस्त्र ते करी घेतले हो।।५।। घरा जाऊनि कंठ त्या मुलाचा। छेदिला हो त्याचा प्राण गेला।।६।। लक्ष्मण म्हणे स्त्रिया अगोचर। केला हो संहार क्रोधभरे।।७।।

२८२५. अती क्रोधे त्याचे शिर ते कापिले। धडही तोडिले ठायी ठायी।।१।। मोट बांधोनि तिने घेतली हो शिरी। ग्रामाचे बाहेरी गेली त्वरे।।२।। पडकी विहीर त्यात ती टाकिली। अती त्वरे आली सदनाप्रती।।३।। निजली ती स्वस्थ प्रातःकाळ झाला। विप्र तो स्नानाला गेला त्वरे।।४।। लक्ष्मण म्हणे अग्निहोत्री ब्राह्मण। करीत लिंगार्चन बैसला हो।।५।।

२८२६. घृष्णाबाईनेही लिंगार्चन केले। लिंग ते पूजिले मृत्तिकेचे।।१।। इकडे ती मुलगी उठली दळून। गेली आत सदना पाहावया।।२।। रक्ताचा तो सडा पाहिला मुलीने। मोठ्याने रुदन करिती झाली।।३।। शंखध्वनी करी करी हाहाकार। म्हणे येथे घात मोठा झाला।।४।। भ्रतार हा माझा कोणे गे मारिला। काय या कर्माला करू आता।।५।। लक्ष्मण म्हणे मिळाले हो लोक। सर्वत्रही शोक करिते झाले।।६।।

२८२७. ग्रामातील लोक सर्वत्र मिळाले। म्हणती कैसे झाले कर्म हे हो।।१।। करिती हाहाकार आकांत वर्तला। कोणीही कोणाला समजावीना।।२।।

सर्वाहून शोक सापत्न माता करी। आकांत नगरी वर्तलासे।।३।। घृष्णा अग्निहोत्रियाते म्हणती जन। जळो लिंगार्चन उठा वेगी।।४।। लक्ष्मण म्हणे धारिष्ट्य त्यांचे थोर। म्हणती होणार ते होऊनि गेले।।५।।

२८२८. शंकरांनी पुत्र आम्हाप्रती दिला। घेऊनिया गेला त्या तोचि।।१।। पूजन दोघांनी नाही हो सोडिले। जन म्हणती भले निर्दय दोघे।।२।। पूजा करोनिया उठला ब्राह्मण। श्रीमंत ते जन मिळाले हो।।३।। रक्ताचे ते बिंदू पडले मार्गाने। तिकडे तिकडे जन चालले हो।।४।। पडीक विहीर तेथवरी गेले। वापीत पाहिले सर्वत्रांनी।।५।। पुढे काही त्याचा मागचि दिशेना। करिती जन नाना तर्क तेही।।६।। लक्ष्मण म्हणे घृष्णेने पाहून। मोठ्याने रुदन करिती झाली।।७।।

२८२९. दयाळू शंकर दया त्याते आली। भक्ताची माउली भोलानाथ।।१।। कोटी सूर्यप्रभा प्रकटला शिव। गणसमुदाय सभोवता।।२।। आलिंगिली बाई म्हणे पुत्रा हाक मारी। प्रसन्न त्रिपुरारी झाला तात।।३।। घृष्णेने हो तेव्हा पुत्र बोलविला। तत्क्षणी आला जवळी तिच्या।।४।। वापीतूनि पुत्र आला पाहिला सर्वांनी। म्हणती धन्य धन्य भक्ती हिची।।५।। लक्ष्मण म्हणे भक्तापाशी शिव। वसे महादेव जगद्गुरू।।६।।

२८३०. शिव म्हणे घृष्णे तुझी ही सवत। हिने केला घात पुत्राचा या।।१।। आता ही पापीण जाईल नरकाप्रती। आहे ही दुर्मती चांडाळीण।।२।। घृष्णा म्हणे देवा माझी ही बहीण। नका करू विघ्न हिते काही।।३।। माझी विज्ञापना परिसावी अनंता। देवा उमाकांता दीनानाथा।।४।। लक्ष्मण म्हणे शिव आनंदला। म्हणे या बाईला काय देऊ।।५।।

२८३१. शिव म्हणे माग माग माझे आई। मागण्याविषयी भिऊ नको।।१।। ब्रह्मांड हे राज्य देईन तुजला। भाषण मजला तुझे प्रिय।।२।। घृष्णा म्हणे मज चरणी द्या ठाव। पुढे माझे नाव चालवावे।।३।। हस्तकी धरिला तिचा तो भ्रतार। तेथेचि शंकर गुप्त झाला।।४।। तत्क्षणी तेथे लिंग प्रकटले। नाम त्याते शोभले घृष्णेश्वर।।५।। लक्ष्मण म्हणे शिव भक्ताधीन। भक्ताचे वचन सत्य करी।।६।।

२८३२. तिच्या पुत्राप्रती वैभव दिधले। नाम ते चालिले कल्पवरी।।१।।

अमरादी सुरगण येती दर्शनाते। पूजिती शंभो ते अष्टभावे।।२।। शिवपुराणात आहे हे चरित्र। श्रवणी त्रिनेत्र गती देतो।।३।। शिवभक्ती करा मिथ्या हा पसारा। चुकती येरझारा भक्तिबळे।।४।। भक्ती ऐसा श्रेष्ठ नाही हो पदार्थ। भक्तीने समर्थ जीव होतो।।५।। लक्ष्मण म्हणे गुंता येथे फार। चुकवा येरझार दुःख मोठे।।६।।

११. गुणनिधी

२८३३. कथा ही जुनाट स्कंद हो पुराणी। आहे व्यासवाणी प्रमाण हो।।१।। कलिंग त्या देशी कपिल नगरी। लिंग त्रिपुरारी कपिलेश्वर।।२।। अग्निदत्त नामा होता एक ब्राह्मण। षट्कर्मी निपुण पुण्यशीळ।।३।। दीक्षितायनी ती स्त्री पतिव्रता। पतिमनोगता जाणे ती हो।।४।। धन द्रव्य त्यापाशी होते हो अपार। सर्वदा निर्घोर सुखरूप।।५।। लक्ष्मण म्हणे गृहकर्मी शूर। होता तो चतुर ब्राह्मण हो।।६।।

२८३४. गुणनिधी नामा त्याते पुत्र झाला। आनंद विप्राला झाला फार।।१।। धनद्रव्य त्यांनी दिले विप्राप्रती। आनंदे वर्तती स्त्री पुरुष।।२।। मौजी हो बंधन केले त्या पुत्राचे। गुण ऐका त्याचे तुम्ही पुढे।।३।। वेद पढविता पुत्र तो पढेना। निघाला तो जाणा शतमूर्ख।।४।। पिता पुत्राप्रती बोधे नाना युक्ती। परि मूर्खाप्रती बोध नाही।।५।। लक्ष्मण म्हणे शिणला ब्राह्मण। म्हणे दैवहीन पुत्र ऐसा।।६।।

२८३५. अनुष्ठानाप्रती गेला तो ब्राह्मण। पुढे वर्तमान काय झाले।।१।। गुणनिधी पुत्र निघाला व्यसनी। पतित अवगुणी दुराचारी।।२।। सप्त हो व्यसनी सदा करी चोरी। फिरे घरोघरी दासीचिया।।३।। मद्यपान करी मच्छ हो आहारी। द्यूतकर्मी हारवी नाना वस्तू।।४।। पित्याचे हो धन हरविले दुर्जने। काही हो केल्याने उमजेना।।५।। लक्ष्मण म्हणे माता पुत्राप्रती। शिकवी नाना युक्ती परि ऐकेना।।६।।

२८३६. माता म्हणे बाळा ऐसे ना करावे। किती शिकवावे तुजला रे।।१।। द्रव्य सर्व त्वा रे नेलेसी चोरून। झाला अपमान जगामध्ये।।२।। तुझिया पित्याचे कूळ ते रे थोर। कीर्ती त्यांची थोर फार जगामध्ये।।३।। माझिया पित्याचा वंश आहे थोर। कैसा तू पामर जन्मलासी।।४।। उभय रे

पक्षी कूळ ते पवित्र। कैसा तू अपवित्र जन्मलासी।।५।। लक्ष्मण म्हणे माता म्हणे त्याला। डाग त्वा लाविला दोन्ही कुळा।।६।।

२८३७. माता म्हणे पुत्रा मजला मरण। का रे नये अजून हरपले।।१।। तुजऐसा पुत्र दुःखाशी कारण। काय प्रसवून शीण झाला।।२।। गुणनिधी म्हणे ऐक मायबाई। भोजन लवलाही घाली मज।।३।। इतःपर हे कर्म नाही करणार। सत्य हे वचन घेई माझे।।४।। शपथ देवाची माते तुझी आण। गेलियाही प्राण न करी कर्म हे।।५।। ऐसे ऐकोन माता संतोषली। घाली ती भोजन पुत्रालागी।।६।। लक्ष्मण म्हणे पुत्र तो निघाला। दासीसदना गेला वेगेसी हो।।७।।

२८३८. अग्निदत्त आला अनुष्ठानाहून। कांतेशी वचन काय बोले।।१।। म्हणे पतिव्रते पुत्र कोठे गेला। सांग गे आम्हाला खरी गोष्ट।।२।। स्त्री म्हणे आता देवपूजा करून। तुमचा नंदन बाहेर गेला।।३।। अग्निदत्त म्हणे पतिव्रतेपाशी। गोष्ट आम्हाप्रती असत्य कां कथिशी।।४।। गोष्ट नाही बरी दुःखाशी कारण। पुत्रापायी विघ्न आले तुज।।५।। होणार ते होवो पाणी देई स्नाना। आम्हा अनुष्ठाना जाणे त्वरे।।६।। जाता जाता त्याने मुद्रिका काढून। स्त्रीपाशी जाण ठेविली हो।।७।। लक्ष्मण म्हणे मुद्रिका ती तिने। बोटात घालून बैसली हो।।८।।

२८३९. गुणनिधी पुत्र आला भोजनाशी। वचन मातेशी काय बोले।।१।। म्हणे माते वेगी घाल गे भोजन। जाऊ पाहे प्राण भूक मोठी।।२।। मातेने हो तेव्हा घातले भोजन। आपण जेवून निद्रा केली।।३।। मुद्रिका हातीची घेतली काढून। गुणनिधी आपण पळाला हो।।४।। मुद्रिका ती नेली खेळला हो द्यूत। हरविली वस्तू डावामधी।।५।। दीक्षितायनी ती जागृत होवोन। करी अवलोकन हाताकडे।।६।। पुत्रे नेली वस्तू करी हो रुदन। देवराया विघ्न वोढवले।।७।। लक्ष्मण म्हणे तिचा तो भ्रतार। आला लवकर सदनाप्रती।।८।।

२८४०. अग्निदत्त म्हणे पाणी देई स्नाना। आम्हा अनुष्ठाना जाणे त्वरे।।१।। तेव्हा अती त्वरे करोनिया स्नान। निघाला ब्राह्मण अनुष्ठाना।।२।। मार्गी जाता तेथे नवल वर्तले। ब्राह्मणे पाहिली वस्तू आपुली।।३।। जुवारीच्या हाती मुद्रिका पाहिली। म्हणे कोणे दिली तुज ही रे।।४।। जुवारी ते म्हणती

ऐक रे ब्राह्मणा। आपुले नंदना शिकवी तू।।५।। तुझिया नंदने मुद्रिका हारविली। आम्ही ही जिंकिली डावावर।।६।। लक्ष्मण म्हणे ब्राह्मण कोपला। काय हो बोलिला जुवारिया।।७।।

२८४१. अग्निदत्त म्हणे तुम्हाते दंडीन। मुद्रिका घेईन क्षणामध्ये।।१।। माझिया मुलाते नासिले रे तुम्ही। शिक्षा आता आम्ही लावू तुम्हा।।२।। जुवारी म्हणती ऐक रे ब्राह्मणा। आपुल्या नंदना शिकवावे।।३।। काल त्याने आमुचा पीतांबर जिंकिला। दासीप्रती दिला नेऊनिया।।४।। ग्रामातील मुले बिघडिली तेणे। वसे रात्रंदिन दासीपाशी।।५।। लक्ष्मण म्हणे खचला ब्राह्मण। म्हणे देवा विघ्न ओढवले।।६।।

२८४२. जुवारी म्हणती कैसा तू ब्राह्मण। लोकांप्रती ज्ञान सांगतोशी।।१।। तुझा पुत्र जार चोर दुराचारी। मद्यपान करी रात्रंदिन।।२।। अभक्ष्य भक्षिले आम्ही रे पाहिले। तुझे काय गेले डोळे विप्रा।।३।। ऐसे कोठवरी सांगावे लक्षण। जाई परतोन सदनाप्रती।।४।। तेव्हा तो ब्राह्मण खचला मानसी। म्हणे आता याशी काय बोलू।।५।। लक्ष्मण म्हणे तेव्हा तो ब्राह्मण। गेला परतोन सदनाप्रती।।६।।

२८४३. लज्जित जाहला जावो म्हणे प्राण। काय हे वदन दावू लोका।।१।। दुष्ट पुत्र ऐसा देवा का दिधला। काय या कर्माला करू आता।।२।। माझिया कुळाते डाग हो लागला। आता या पुत्राला काय करू।।३।। स्त्रीप्रती म्हणे तुझा लाड भोवला। पुत्र ऐसा झाला दुराचारी।।४।। जे झाले ते बरे मुद्रिका दे मज। नाही तरी तुज दंडीन गे।।५।। लक्ष्मण म्हणे ब्राह्मण कोपला। म्हणे गे स्त्रीयेला मुद्रिका दे।।६।।

२८४४. स्त्री म्हणे मुद्रिका ठेवली जतन। वस्तू ती बांधोन ठेविली हो।।१।। पुत्राचिया मोहे बोले खोटे वचन। विप्र तो ऐकोन कोपला हो।।२।। म्हणे मुद्रिका देई वेगी गे त्वरित। मग तू निवांत पाक करी।।३।। मुद्रिका हो नाही स्त्री झाली दीन। म्हणे देवा विघ्न आले कैसे।।४।। कोपला ब्राह्मण स्त्रीयेते काढून। दिधले सदनातून तत्क्षणी।।५।। लक्ष्मण म्हणे तेव्हा तो ब्राह्मण। दर्भ हो आणून पिंड पाडी।।६।।

२८४५. क्रिया त्याने केली केले दुजे लग्न। तेव्हा तो ब्राह्मण सुखी

झाला।।१।। गुणनिधी माता करी हो रुदन। पुत्राते धरोन बैसली हो।।२।। म्हणे पुत्रा दुष्टा तुजकरिता विघ्न। माझे कर्म हीन तुज काय बोलू।।३।। गुणनिधीप्रती पस्तावा घडला। म्हणे व्यर्थ गेला जन्म माझा।।४।। नानापरी पाप केले म्या पामरे। कोणता विचार करू आता।।५।। लक्ष्मण म्हणे ऐका श्रोतेजन। पुढे वर्तमान काय झाले।।६।।

२८४६. दुष्काळ पडला पुढे घोर झाला। कोणी हो कोणाला पुसेना हो।।१।। गुणनिधीप्रती मिळेना हो अन्न। झाले उपोषण पाच दिवस।।२।। होता माघमास शिवरात्री दिन। भक्त लिंगार्चन करिते झाले।।३।। शिवभक्त गेले कपिलेश्वराशी। पूजिती शिवाशी प्रेमभरे।।४।। रुद्राचा अभिषेक करिती जयजयकार। समारंभ फार मिळाला हो।।५।। लक्ष्मण म्हणे तेथे तो दुर्जन। गुणनिधी दीन जाता झाला।।६।।

२८४७. मध्यान्ह रजनी झाली दोन प्रहर। भक्त ते जागर करिते झाले।।१।। भक्त ते निद्रेने व्यापिले देखोन। तेव्हा तो दुर्जन काय करी।।२।। गेला देऊळात गेला लिंगापाशी। न्याहाळी लिंगाशी गुणनिधी।।३।। नंदादीप मंद जाहला म्हणून। वस्त्र हो फाडून वात केली।।४।। दीपात हो तेव्हा वात हो घातली। ज्योती सरसाविली जारे तेव्हा।।५।। शिवाचा प्रसाद घेतला बांधोन। चोर तो पळोन चालला हो।।६।। लक्ष्मण म्हणे भक्त जागे झाले। मागे हो लागले चोर म्हणून।।७।।

२८४८. राजियाचे दूती विंधिला तो बाणी। पडला उलथोनि प्राण गेला।।१।। यमदूत आले बांधिला दुर्जन। चालले घेऊन यमपुरा।।२।। कैलासाहूनि शिवे धाडिले विमान। आले शिवगण गर्जत हो।।३।। प्रकाश पडला अप्सरा नाचती। वाद्ये हो वाजती नानाविध।।४।। पंच हो वदन शिवा हो समान। आले शिवगण तयापाशी।।५।। लक्ष्मण म्हणे शिवगण आले। यमदूत झाले भयभीत।।६।।

२८४९. शिवगण म्हणती यमदूताप्रती। का हो याप्रती नेता तुम्ही।।१।। यमदूत म्हणती दोषी हा चांडाळ। पातकी हा खळ दुराचारी।।२।। सप्त हो व्यसनी जार आणि चोर। करी अविचार रात्रंदिन।।३।। ऐसा आम्ही दोषी नाही हो देखिला। याने घात केला फारांचा हो।।४।। कल्पपर्यंत हा रौरवी

पडेल। फार याने केले अपराध।।५।। लक्ष्मण म्हणे तेव्हा शिवगण। काय ते हसून बोलले हो।।६।।

२८५०. तुम्हा नाही ज्ञान केवळ अज्ञान। सूक्ष्म ती खूण न कळे तुम्हा।।१।। शिवाचा हा भक्त केवळ पवित्र। याते अपवित्र म्हणता तुम्ही।।२।। सूक्ष्म ते पुण्य सांगतो तुम्हाला। शिव तोषविला याने पाहा।।३।। पाच दिन याते घडले उपोषण। शिवरात्री दिन पर्वकाळ।।४।। जागर घडला दीप सरसाविला। तम हो नाशिला अंधःकार।।५।। लक्ष्मण म्हणे शिव संतोषला। स्वामी माझा भोळा दयाळू तो।।६।।

२८५१. शिवगण म्हणती ऐसा हो हा शूर। याने तो शंकर तोषविला।।१।। यमदूत म्हणती शिवगणांप्रती। धन्य शिवभक्ती अगाध हो।।२।। आम्ही अपराध केला की हो थोर। तुमचा किंकर बांधिला हो।।३।। महाराज क्षमा करावी हो आम्हा। नकळता ताता घडला दोष।।४।। करोनि नमन तेव्हा यमगणे। सोडिला ब्राह्मण तत्क्षणी।।५।। लक्ष्मण म्हणे यमदूत गेले। अपूर्व वर्तले पुढे ऐका।।६।।

२८५२. गुणनिधी तेव्हा घातला विमानी। अगम्य करणी शिवाची हो।।१।। आपुले सारिखा केला पंचवदन। चालले विमान कैलासाशी।।२।। गण ते स्वविती शिव शिव वदती। प्रकाशल्या दीप्ती दिव्य प्रभा।।३।। गेले ते विमान कैलासा हो प्रती। शंभो उमापती धाविन्नला।।४।। गुणनिधी भक्त धरिला हृदयी। सुखा पार नाही काय वर्णू।।५।। लक्ष्मण म्हणे दयाळू त्रिपुरारी। भक्ताचा कैवारी सत्य जाणा।।६।।

२८५३. शिव म्हणे वत्सा मज तोषविले। अघटित केले त्वा रे वत्सा।।१।। माझे मस्तकीचा आधार हरविला। आता मी तुजला काय देऊ।।२।। दयाळू शंकर झाला हो प्रसन्न। अघटित धन दिले त्याला।।३।। कृपेचे भांडार शिव तो हो भोळा। तिज्या जन्मी केला कुबेर तो।।४।। कुबेर तो केला आपुला भांडारी। ब्रह्मा हरी ज्याला सन्मानिती।।५।। ब्रह्मांडातील धन त्याचिया स्वाधीन। सर्वांप्रती मान्य केला शिवे।।६।। लक्ष्मण म्हणे ऐसा दाता कोणी। नाही त्रिभुवनी उदार हो।।७।।

२८५४. नवनिधी घरी ऐसा तो कुबेर। सिद्धी अष्टौप्रहर दास्य करिती।।१।।

जैशी अमरावती ऐसे त्याचे पूर। होतो जयजयकार शिव शब्द।।२।। शंभोने आपला मानिला कुमर। स्वामी विघ्नहरा ऐसा तोही।।३।। शंभो दयाळू तो दयेचे आगर। कृपेचे भांडार शिव भोळा।।४।। ऐसे हो पातकी अपार रक्षिले। हीनदीना दिले मोक्ष ताते।।५।। लक्ष्मण म्हणे माय ती दीनाची। साउली कृपेची निरंतर।।६।।

२८५५. जाती कूळ गोत्र न पाहे शंकर। भक्ताचे माहेर स्वामी माझा।।१।। भक्तावाचोनिया दुजे प्रिय नाही। अनाथाची आई स्वामी माझा।।२।। त्याते वेगी स्तवा करा हो सार्थक। सुख हे अनित्य नाशिवंत।।३।। येथे गुंतू नका करा हो सोयरा। कृपेच्या भांडारा भक्ती प्रिय।।४।। लक्ष्मण म्हणे स्वामी सखा करा। वाया येरझारा का हो करिता।।५।।

१२. ताराक्ष पिंगाक्ष

२८५६. विंध्याद्री पर्वती होता एक कोळी। निषाद मंडळी जवळी फार।।१।। भिल्लाचा हो राजा नाम हो पिंगाक्ष। होता फार दक्ष भक्तराज।।२।। जातीचा तो कोळी होता दयावंत। उमादेविकांत स्तवी सदा।।३।। वायसाचे पोटी होय तो कोकिळा। तैसा हा जन्मला व्याधांमाजी।।४।। होता दानशूर दयाळू चतुर। करी हो सत्कार अतिर्थीचा।।५।। काशीची हो यात्रा आली गावावर। नामाचा उच्चार करिती भक्त।।६।। लक्ष्मण म्हणे राव आनंदला। सामोरा हो गेला धावोनिया।।७।।

२८५७. घाली लोटांगण करी हो स्तवन। म्हणे मी पावन झालो आज।।१।। केले हो पूजन आणिले सदनासी। इच्छादान त्यासी दिले त्याने।।२।। दोन रात्री त्यांना ठेवोनि घेतले। इच्छाभोजन दिले त्यासी त्याने।।३।। कापड्यांचा भार निघाला तेथोनी। चालली मार्गनि यात्रा सर्व।।४।। पिंगाक्षाने यात्रा केली हो मार्गस्थ। आपुले ग्रामात आला तो हो।।५।। लक्ष्मण म्हणे कापड्यांचे भार। करीत जयजयकार चालले हो।।६।।

२८५८. ताराक्ष हो नामे त्याचा पितृबंधू। होता हो निषाद दुराचारी।।१।। त्याने यात्रेवरी केला हो कल्पांत। लुटिले सर्वत्र कापडी ते।।२।। तेव्हा ते कापडी करिती हाहाकार। पिंगाक्षा लवकर धाव म्हणती।।३।। आकांत ऐकोनि राव तो धावला। अति त्वरे आला यात्रेमागे।।४।। तेव्हा तो ताराक्ष

धावला दुर्जन। पिंगाक्षाकारण वेढिले हो।।५।। लक्ष्मण म्हणे युद्ध झाले फार। परि तो तस्कर आटोपेना।।६।।

२८५९. तराक्षा हो पाशी होते भिल्ल फार। पिंगाक्ष जर्जर केला त्यांनी।।१।। पिंगाक्ष हो म्हणे ऐक रे दुर्जना। काय कर्म हीना करितोसी।।२।। रौरवी पडशी अरे दुराचाऱ्या। काय हे पामरा कर्म करिसी।।३।। ऐसे ऐकोन ताराक्ष धावला। म्हणे करा हल्ला एकदाचि।।४।। एकामागे एक मारिती शरघाव। मिळोनि सर्वांनी पाडिला तो।।५।। लक्ष्मण म्हणे गेला त्याचा प्राण। यात्रा नागवोन गेले चोर।।६।।

२८६०. कैलासाचे ठायी जाणवली मात। शंभो उमाकांत सर्वज्ञ तो।।१।। गणांप्रती आज्ञा केली हो शंभोने। म्हणे त्वरेने रे आणा भक्त।।२।। चालिले विमान अति शीघ्र गती। वाद्ये हो वाजती नानाविध।।३।। अप्सरा नाचती पुष्पे हो वर्षती। आनंदे गर्जती शिवगण।।४।। चंद्रसूर्यप्रभा विमानी लोपली। प्रभा ती फाकली दिव्य तेज।।५।। लक्ष्मण म्हणे आले शिवगण। करीत स्तवन पिंगाक्षाचे।।६।।

२८६१. पिंगाक्ष विमानी बैसविला त्यांनी। शिव शब्द वाणी गर्जती हो।।१।। चालिले विमान शीघ्रगती त्वरे। गण म्हणती थोर भक्त हा हो।।२।। कैलासाते तेव्हा गेले ते विमान। निरुपम स्थान कैलास ते।।३।। भक्त तो शंभोने धरिला हृदयी। म्हणे धन्य आई तुझी भक्ता।।४।। फार उपकार तुझा मजवर। भक्तांमाजी शूर तूचि एक।।५।। लक्ष्मण म्हणे शिव आनंदले। हृदयी धरिले भक्ताप्रती।।६।।

२८६२. शिव म्हणे भक्ता दयाळू तू फार। तुझा उपकार कोठे फेडू।।१।। माझ्या यात्रेकरूशी दिले त्वा रे अन्न। त्याकरिता प्राण दिलाशी त्वा।।२।। दयाळू शंकर झाले हो प्रसन्न। वर त्या कारण दिला थोर।।३।। नैर्ऋत्य दिशेचा केला राजेश्वर। इंद्रादी सुरवर सन्मानिती।।४।। मेरुशिखरावर शोभे त्याचे पूर। केला तो अमर विश्वनाथे।।५।। लक्ष्मण म्हणे शंभो ऐसा दाता। का हो विसरता तुम्ही त्याते।।६।।

२८६३. दिशेचा दिक्पाल केला तो सधन। ऐसा कृपाघन कोण दुजा।।१।। अडीच सहस्र योजने ते पूर। सुवर्णप्राकार पुरामाजी।।२।। जैसी अलंकावती

तैसे त्याचे पूर। होतो जयजयकार आनंद हो।।३।। लक्ष्मण म्हणे सर्वामान्य केला। देवे सन्मानिला नैर्ऋत्य राजा।।४।।

२८६४. कथा ही पुराणी आहे व्यासवाणी। स्कंद हो पुराणी वदला देव।।१।। शिवाऐसा दाता नाही त्रिभुवनी। अगम्य करणी शिवाची हो।।२।। असंख्य हो भक्त रक्षिले शंकरे। दोषी दुराचारी उद्धरिले।।३।। करा हो सार्थक स्वामी सखा करा। मायावी पसारा नाशिवंत।।४।। जाया पुत्र धन सर्व ज्यायमान। प्रभोचे चरण अविनाश।।५।। लक्ष्मण म्हणे स्वामी माझा भोळा। भक्तांनी जिंकिला भक्तिबळे।।६।।

१३. ऋग्वेदी ब्राह्मणाचा दासीपुत्र

२८६५. स्कंद हो पुराणी सत्यवतिसुत। बोलिला मात ऐका श्रोते।।१।। रेवातीरी होता ऋग्वेदी ब्राह्मण। जन्मोनिया त्याने शिणविली माता।।२।। कर्मभ्रष्ट करी सदोदित चोरी। अति दुराचारी अपवित्र।।३।। सप्त हो व्यसनी भक्षी मद्य मांस। पापाचा उल्हास सदोदित।।४।। त्याने एक दासी ठेविली जवळी। सदा सर्वकाळी रमे तिशी।।५।। लक्ष्मण म्हणे तीते पुत्र झाला। विप्र आनंदला प्रेमभरे।।६।।

२८६६. आपुल्या होशात आला तो कुमार। पित्यापेक्षा क्रूर झाला तोही।।१।। पित्याहून शतगुणी तो अधिक। चोरांचा नायक दुराचारी।।२।। ब्रह्महत्या त्याने केल्या की हो फार। गाईची खिल्लारे वधियेली।।३।। मद्य मांस भक्षी सप्त हो व्यसनी। पापाची तो खाणी केवळ मूर्ख।।४।। जारांचा तो होता केवळ मुकुटमणी। प्रभो शूळपाणि स्मरिला नाही।।५।। लक्ष्मण म्हणे फार दुराचारी। केला घात फार त्या क्रूराने।।६।।

२८६७. त्या ग्रामामध्ये होता एक चांभार। त्याची स्त्री जार होती दुष्ट।।१।। चर्मकारे निर्मळ तीते धिःकारिले। विपरित झाले पुढे ऐका।।२।। दुर्जने या तिचा केला अंगीकार। दासीपुत्र क्रूर रमला तिसी।।३।। तिला घेऊनिया निघाला तेथोन। चालला घेऊन दक्षिण दिशे।।४।। मार्गाने हो जाता भक्षिला व्याघ्राने। यमगणे धरून नेला दोषी।।५।। लक्ष्मण म्हणे पक्ष्याने शरीर। भक्षिले हो फार मिळाले तेथे।।६।।

२८६८. एका गिधाडाने त्याचा एक चरण। घेतला चोंचीत उडाला

हो।।१।। पंचक्रोशीमध्ये गेला तो उडोन। वाराणसी स्थान श्रेष्ठ पूर।।२।। गंगेमध्ये अस्थी अकस्मात पडली। अघटित घडली गोष्ट ऐका।।३।। शिवाची हो आज्ञा झाली गणांप्रती। वेगी भक्ताप्रती आणा तुम्ही।।४।। शिवाचे हो गण गेले यमपुरा। स्वामी विघ्नहरासहित हो।।५।। गजानने तेव्हा यमाकडे दूत। अती हो त्वरित पाठविला।।६।। दूत बोले यमा द्यावा वेगी भक्त। नाही तो पतित भक्तराज।।७।। गंगेमध्ये त्याची पडली हो अस्थी। त्याच्या पुण्याप्रती पार नाही।।८।। यम म्हणे गणा नेदे कदा दोषी। सांगा गजवदनासी जाऊनिया।।९।। लक्ष्मण म्हणे गजवदन कोपला। त्रिशूल घातला यमपुरीखाली।।१०।।

२८६९. लंबोदर म्हणे करीन संहार। जाळू यमपूर क्षणामाजी।।१।। तेव्हा तो कृतांत गेला हो पळोन। पुढे वर्तमान झाले काय।।२।। तेथे काही होते महा पुण्यशीळ। त्यांनी तो दयाळ विनविला।।३।। गजवदनाचा स्तव केला सर्वांनी। लागले चरणी येऊनिया।।४।। म्हणती महाराजा रक्षावे अनाथा। स्वामी गणनाथा विघ्नहरा।।५।। लक्ष्मण म्हणे यमाते आणूनी। भेटविले त्यांनी गजवदनाशी।।६।।

२८७०. कृतांताने तेव्हा केली फार स्तुती। म्हणे कृपामूर्ती दास मी तुमचा।।१।। त्याने तो कुटील आणूनि दिधला। म्हणे स्वामी मजला श्रुत नाही।।२।। विमानी तो कुटील घातला गजवदने। दिव्य पंचवदन केला भक्त।।३।। कैलासा हो प्रती नेला मिरवीत। स्वामी उमाकांत दयाळू तो।।४।। लक्ष्मण म्हणे कैलासा तो नेला। पदी हो स्थापिला कुटील तो।।५।।

२८७१. धन्य ती हो काशी धन्य तो शंकर। कृपेचे भांडार स्वामी माझा।।१।। ऐसे पातकी हो उद्धरिले फार। दीनाचा उद्धार करी तात।।२।। भक्ताचा कैवारी स्वामी त्रिपुरारी। ब्रह्मा इंद्र हरी त्याचे भक्त।।३।। भक्ताचा अभिमान फार स्वामीप्रती। उमादेविपती वश करा।।४।। लक्ष्मण म्हणे स्वामीऐसा धनी। नाही त्रिभुवनी दुजा कोणी।।५।।

१४. प्रसादमाहात्म्य

२८७२. कोणी एक भिल्लीण कुरूप कुश्चळ। होती अती खळ पापीण हो।।१।। व्याधी सर्वांगा झालीसे जर्जर। नेत्रहीन बधिर होती ती हो।।२।।

पुत्र तिला नसे अती हो दरिद्र। कधी महारुद्र स्मरिला नाही।।३।। मोळी नेऊनिया नित्य विकीतसे। होती हो कर्कश द्रव्यलोभी।।४।। तिच्या मार्गावरी होते एक देऊळ। होता पर्वकाळ सुदिन हो।।५।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त मंडळी। आली लिंगाजवळी पूजावया।।६।।

२८७३. लिंगाचे पूजन केले शिवभक्तांनी। वाद्य हो त्या ध्वनी होतो शब्द।।१।। कोणी पूजा करिती कोणी नामघोष। स्तविती महेश अती प्रेमे।।२।। तेथे शिवभक्तांनी केले हो भोजन। पात्रे आणून टाकिली मार्गावरी।।३।। लक्ष्मण म्हणे मोळी घेऊनिया। आली तया ठाया भिल्लीण ती।।४।।

२८७४. होता उष्णकाळ झालासे मध्यान्ह। आली ती भिल्लीण पात्रापाशी।।१।। मोळी तिचे शिरी कापे चळचळा। काप तो अंगाला होता तिच्या।।२।। पडली अटकळोन मोळीही पडली। कासावीस झाली आले मरण।।३।। मरतेसमयी पात्राते देखिले। अन्नावरी गेले मन तिचे।।४।। लक्ष्मण म्हणे उच्छिष्ट ते अन्न। भक्षिले हो तिने अंतकाळी।।५।।

२८७५. शिवभक्ताचे अन्न भक्षी त्रिनयन। पवित्र म्हणोन मान हालवी।।१।। प्रसादमहिमा आहे फार थोर। जाणे तो शंकर महाराज।।२।। प्रसाद हो तिने भक्षिला भक्ताचा। प्राण तेव्हा तिचा गेला तेथे।।३।। शिव कृपाघन अति संतोषला। महिमा वाढला भक्ताचा हो।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तसाह्यकारी। भक्तांचे ते कार्य करी अंगे।।५।।

२८७६. शिव म्हणे हिने प्रसाद सेविला। अंतकाळी मजला नमिले हो।।१।। अंतकाळी नमन हे तव महापुण्य। इतुक्याने धन्य झाली ही हो।।२।। या करिता लोक करिती जप तप। साधनेचे कष्ट भोगिती हो।।३।। वेदांचे पठण शास्त्र अध्ययन। वाचती पुराण प्राप्तीलागी।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ताचे जीवन। स्वामी पंचानन भोळा नाथ।।५।।

२८७७. शिव म्हणे तीर्थी भ्रमती कोणी एक। साधने अनेक करती जग।।१।। पंचाग्नी साधती करिती धुम्रपान। करिती कीर्तने आनंदे हो।।२।। यज्ञयागादिक करिती प्राज्ञ मुनी। करिती लिंगार्चन कोणी भक्त।।३।। अंतकाळी हिने स्मरिले मजला। आता या बाईला उद्धरावे।।४।। लक्ष्मण म्हणे केली गणा आज्ञा। विमान ते आणा बाईप्रती।।५।।

२८७८. विमान ते त्या बाईकरिता आणिले। विमानी बैसले शिवगण।।१।। नाना वाद्यघोष पडला प्रकाश। स्तविती महेश शिवभक्त।।२।। ढाळती चामरे अप्सरा नाचती। आनंदी आनंद चहुकडे।।३।। लक्ष्मण म्हणे दशबाहू त्रिनयन। आले शिवगण महाराज।।४।।

२८७९. पूर्वीचे सुकृत होते तिचे काही। अंतकाळ समयी सुचले भले।।१।। म्हणे माझा जन्म व्यर्थचि हा गेला। पुण्याच्या मार्गाला गेले नाही।।२।। बहुत म्या पाप केले रे शंकरा। प्रभो गंगाधरा वाली तूचि।।३।। काही एक म्या रे नाही केली भक्ती। देवा पशुपती काय करू।।४।। लक्ष्मण म्हणे पश्चात्ताप झाला। औषध दुःखाला मिळाले हो।।५।।

२८८०. लिंगाकडे हस्त जोडूनि नमन केले। नाम ते घेतले शिवाचे हो।।१।। म्हणे देवा मज सोडवा येथून। पतितपावन नाम तुझे।।२।। असंख्य त्वा पापी उद्धरिले ताता। देवा उमाकांता जगद्गुरू।।३।। आम्हा पतिताते वाली तूचि खरा। तुजला विश्वंभरा दया फार।।४।। लक्ष्मण म्हणे करी ती रुदन। म्हणे देवा कोण मज आता।।५।।

२८८१. तुजऐसा देव दयाळू रे कोणी। नाही त्रिभुवनी मायबापा।।१।। मातेची उपमा साजेना तुजला। माता पंचानना येथे गोवी।।२।। येथील हे आप्त गोवती व्यसनी। याचे संगतीने दुःख फार।।३।। आम्हाऐसे दोषी फार त्वा रक्षिले। दाखवी पाउले मज आता।।४।। लक्ष्मण म्हणे वदे शिव शिव। प्रभो महादेव आठवी हो।।५।।

२८८२. आपुले समान केली ती हो बाई। दिली हो पदवी श्रेष्ठ तीते।।१।। विमानी तिजला बैसविले त्यांनी। स्तवन करूनि तोषविली।।२।। स्वर्गपंथे तेव्हा विमान चालले। अमरांनी वंदिले चरण तिचे।।३।। कैलासशिखरी गेले ते विमान। स्थापिली नेऊन शिवपदी।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य शिवभक्ती। भक्तीविण गती नव्हे कदा।।५।।

२८८३. चरित्र हे आहे स्कंदपुराणात। शिवरहस्यात घ्या हो शोध।।१।। व्यासांनी वर्णिले अति प्रेमयुक्त। धन्य शिवभक्त व्यासमुनी।।२।। भक्ती प्रेमे करा चुकती येरझारा। नका या संसारा गुंतू येथे।।३।। संसार हा आहे मृगजळावाणी। येथे तृप्त कोणी झाला नाही।।४।। लक्ष्मण म्हणे शिवा स्तवा

स्तवा। जन्ममृत्यू गोवा तोडी बाप।।५।।

१५. भस्ममाहात्म्य

२८८४. स्कंद हो पुराणी सत्यवतिसुत। बोलिला समर्थ तेचि ऐका।।१।। दक्षिण हो देशी संगमनगरी। लिंग त्रिपुरारी संगमेश्वर।।२।। त्या हो ग्रामामध्ये होता एक ब्राह्मण। सप्तही व्यसने त्याचे अंगी।।३।। ब्रह्महत्या केल्या चोरांचा नायक। जार तो हो मूर्ख होता फार।।४।। मद्य मांस भक्षी उन्मत्त शिरजोर। करी अनाचार रात्रंदिन।।५।। लक्ष्मण म्हणे पापाचा सागर। दोषांचा डोंगर केला त्याने।।६।।

२८८५. अंतकाळ समय आला त्या दुष्टाते। कोणीही मूर्खाते नीट न पाहे।।१।। नाना हो यातना भोगी तो हो खळ। स्पर्श त्या चांडाळा न करी कोणी।।२।। स्मशानात जाऊन पडला दुर्जन। तेथेचि हो प्राण गेला त्याचा।।३।। श्वापदेही त्याला कोणी हो भक्षीना। पक्षीही शिवेना कोणी त्याला।।४।। कोणीही हो जन स्पर्शिना प्रेताला। दुष्ट तो पडला स्मशानी हो।।५।। जीवकळा नेली यम हो दूतांनी। रौरवी नेऊन घातला हो।।६।। लक्ष्मण म्हणे नवल वर्तले। पुढे काय झाले तेही ऐका।।७।।

२८८६. संगमेश्वरी हो यज्ञ झाला होता। भस्मकुंड होते तेथे जाणा।।१।। भस्मामाजी श्वान लोळले जाऊन। श्वान ते तेथून निघाले हो।।२।। स्मशानी ते श्वान गेले हो तत्काळ। प्रेत ते विकळ पडले होते।।३।। प्रेताचे मस्तकी पाय हो ठेविला। त्रिपुंड्र उमटला भाळी त्याच्या।।४।। हुंगून पाहिले दोषी प्रेत म्हणोन। श्वान ते तेथून पळाले हो।।५।। लक्ष्मण म्हणे भस्ममहिमा थोर। प्रभो विश्वंभर संतुष्टला।।६।।

२८८७. शिव म्हणे गणा जावे लवकर। भक्त तो लवकर आणावा हो।।१।। दोषी तो ब्राह्मण खरा दुराचारी। भस्माने उद्धार केला त्याचा।।२।। तत्काळ विमान पाठविले शिवे। स्वामी महादेवे कृपावंते।।३।। विमान ते आले स्मशानी तत्काळ। प्रेत ते विकळ पडले होते।।४।। जीवकळा नेली यमाने जाणून। विमान परतोन गेले शिवापाशी।।५।। लक्ष्मण म्हणे शिवाते गाऱ्हाणे। सांगती शिवगण वर्तमान।।६।।

२८८८. म्हणती महाराजा परिसा विज्ञापना। विश्व हो जीवना

विश्वरूपा।।१।। आपुला हो भक्त भस्मधारी जाणा। नेला पंचानना यमाने हो।।२।। शिवभक्त जेव्हा नेला कृतांताने। गोष्ट कठीण झाली आता ताता।।३।। ऐसे ऐकूनि शिव तो कोपला। जा हो त्या भक्ताला आणा वेगी।।४।। लक्ष्मण म्हणे भोलानाथ शिव। नाम महादेव साजे त्याला।।५।।

२८८९. विघ्नहराप्रती केली आज्ञा शिवे। तुम्ही वेगी जावे यमपुरा।।१।। आपुला हो भक्त आणा हो गणा। सकळही गणा केली आज्ञा।।२।। शिवा हो समान शिवगण श्रेष्ठ। निघाले वरिष्ठ महाशूर।।३।। चौसष्ट कोटी गण गेले यमपुरा। स्वामी विघ्नहरासमवेत।।४।। यमाकडे दूत पाठविला त्यांनी। म्हणती त्वरेकरूनि द्यावा भक्त।।५।। लक्ष्मण म्हणे यम तो दोषी देईना। तेव्हा शिवगणा आला कोप।।६।।

२८९०. केला हल्ला तेव्हा जाळिले यमपूर। दोषी ते अपार सोडविले।।१।। सकळही दोषी दिधले सोडून। कृतांत बांधोन आणिला हो।।२।। यमाप्रती शिक्षा फार केली त्यांनी। अगम्य करणी शिवाची हो।।३।। बारा कोटी सेना यमाची दारुण। सर्वही पळोन गेली तेव्हा।।४।। सर्वत्रही रोग यमाची ती सेना। करिती यातना जीवाप्रती।।५।। लक्ष्मण म्हणे यम आला काकुळती। करी शिवस्तुती अष्टभावे।।६।।

२८९१. विघ्नहराची हो केली स्तुती फार। म्हणे मी किंकर तुमचा ताता।।१।। तुमचे आज्ञेने करितो व्यापार। शिवसत्ता थोर अगाध हो।।२।। धन्य ते हो भस्म धन्य तो शंकर। ब्रह्मादिका पार न कळे ज्याचा।।३।। प्रेताप्रती भस्मसंस्कार झाला। तेणे उद्धरिला दुराचारी।।४।। कल्पपर्यंत पडावा गुंतून। दोषी तो पावन केला तुम्ही।।५।। शिवाचा महिमा न कळे कवणा। त्रैलोक्याचा राणा विश्वनाथ।।६।। लक्ष्मण म्हणे यमाने स्तवन। केले म्हणे धन्य शिवभक्ती।।७।।

२८९२. स्तुती ऐकोन तोषला गजवदन। कृतांत सोडोन दिधला हो।।१।। कृतांताते तेव्हा स्थापिले पूर्वस्थानी। यम त्या भुवनी विघ्नहरे।।२।। भस्मधारी तो हो घातला विमानी। कैलासा घेऊनि गेले गण।।३।। अप्सरा नाचती वाद्ये हो वाजती। करिती शिवस्तुती शिवगण।।४।। भस्मामाजी श्वान लोळले जे होते। तेही कृपावंते शिवे आणविले।।५।। लक्ष्मण म्हणे प्रभोसत्ता थोर।

कोणा तो विचार न कळे त्याचा।।६।।

२८९३. श्वान आणि दोषी केले हो पावन। धन्य पंचानन भोळा देव।।१।। ऐसा भोळा देव दुजा नाही कोणी। प्रभोची करणी अगम्य हो।।२।। किंचित् भक्तीने होतसे प्रसन्न। भक्ताचे स्वाधीन भोळा देव।।३।। भक्तीचे त्याजला आहे हो व्यसन। भक्ता हो वाचोन प्रिय नाही।।४।। दीनाचा दयाळू स्वामी त्रिपुरारी। भक्ताबरोबरी फिरे सदा।।५।। लक्ष्मण त्याच्या द्वारीचे हो श्वान। शंभोकृपेकरून भुंकतसे।।६।।

१६. गुंडूसया आणि मधूसया

२८९४. मधूसया दोषी भस्मे उद्धरिला। कैलासाते नेला होता शिवे।।१।। श्वान भस्मामाजी लोळले जे होते। त्याते उमानाथे उद्धरिले।।२।। दोघाप्रती जन्म दिला महादेवे। जगा उद्धरावे म्हणोनिया।।३।। श्वाना जन्म दिला वोलंग नगरी। श्रेष्ठ पुण्यपुरी पुण्यधाम।।४।। क्षत्रियाचे वंशी जन्म त्या दिधला। नाम शोभे त्याला प्रतापरुद्र।।५।। प्रतापरुद्र तो राजा राज्य करी। सहपरिवारे पुण्यश्लोक।।६।। लक्ष्मण म्हणे पुण्यशीळ राजा। पाळीतसे प्रजा नीतिन्यायें।।७।।

२८९५. मधूसया केला ब्राह्मण पवित्र। पटण त्या क्षेत्री जन्मला हो।।१।। शैव ब्राह्मण तो लिंगपूजा करी। भस्म अंगावरी सदा शोभे।।२।। लिंगपूजेमध्ये सदा तो निमग्न। लिंग त्याचे धन सदोदित।।३।। स्वस्थ तो असता पुढे काय झाले। अघटित केले विश्वनाथे।।४।। मधूसयाचे हो सत्त्व ते पाहावे। प्रभो महादेवे इच्छिले हो।।५।। लक्ष्मण म्हणे भक्तांचा कैवारी। भक्तांची हो थोरी वाढवितो।।६।।

२८९६. भक्तमहिमा तो वाढावा म्हणून। निघाला आपण विश्वनाथ।।१।। ब्रह्मा हरी आणि नारद तो मुनी। सांगाती घेऊनि निघाला हो।।२।। सत्त्व पाहावया निघाला शंकर। ब्रह्मांडा आधार जयाचा हो।।३।। वोलंग नगरा आले हो सत्वर। ब्रह्मा हरी हर नारद तो।।४।। वेष पालटिले झाले हो खानोरी। नगराभीतरी प्रवेशले।।५।। लक्ष्मण म्हणे वेषधारी ते हो। झाले तस्कर हो चौघेजण।।६।।

२८९७. राजगृही गेले केली त्यांनी चोरी। रत्न त्या भांडारी प्रवेशले।।१।।

नाना रत्न दिव्य फोडिले भांडार। नाना अलंकार चोरिले हो।।२।। दिव्य ते अंबर चोरिले हो त्यांनी। तस्कर तेथूनि निघाले हो।।३।। राजद्वारीचा तो गज हो सोडून। गेले हो घेऊन द्विज नगरा।।४।। राजदूत त्याहा मागे हो लागले। नगरी पळाले तस्कर ते।।५।। लक्ष्मण म्हणे द्विजाचिये घरी। गेले ते खानोरी अति त्वरे।।६।।

२८९८. ब्राह्मणाचे दारी गज तो बांधिला। स्तविते झाले त्याला तस्कर ते।।१।। गुंडूसयाप्रती केली हो विनंती। म्हणती आम्हाप्रती वाचवा आता।।२।। तस्कर रे आम्ही जीव वाचवी आता। प्रवेशले गृही त्याचे त्वरे।।३।। त्याचिये सदनी ठेविली संपत्ती। सदनी त्या मूर्ती राहिल्या हो।।४।। गुंडूसयाद्वारी राजदूत आले। गजाते देखिले कोपले ते।।५।। लक्ष्मण म्हणे केला दंगा फार। म्हणती तू तस्कर गुंडूसया।।६।।

२८९९. गुंडूसया आणि त्याचा बंधू तो हो। बांधोनी नेते हो झाले त्वरे।।१।। नगरलोक तेथे मिळाले हो फार। म्हणती हे तस्कर खरे खरे।।२।। गावामाजी चोऱ्या केल्या यांनी फार। करिती दंभाचार शिवभक्तीचा।।३।। रायापाशी नेले म्हणती हे तस्कर। यांनी चोऱ्या फार केल्या राया।।४।। राव तो कोपला त्याहा दोघावरी। म्हणे अनाचारी प्रवर्तले।।५।। लक्ष्मण म्हणे राजा तो कोपला। बोलता हो झाला दोघाप्रती।।६।।

२९००. म्हणे शिवभक्त तुम्ही कैसे रे। लिंग पूजिता रे सर्वकाळ।।१।। रुद्राक्ष आभरण लाविता विभूती। आणि चोरीप्रती जाता कैसे।।२।। रायाप्रती बोले तेव्हा तो ब्राह्मण। चोर आम्ही पूर्ण खरे राया।।३।। तुमचा हो गज आमुच्या हो द्वारी। चोरी आम्ही खरी केली राया।।४।। ग्रामलोक म्हणती यांनी चोऱ्या फार। केल्या हे तस्कर खरे खरे।।५।। लक्ष्मण म्हणे शिवमाया थोर। सर्वांनी तस्कर केले त्यांना।।६।।

२९०१. राये आज्ञा केली द्यावे शूळावरी। घाला झडकरी नेवोनिया।।१।। नेले हो तेव्हा ते नगराबाहेर। शूळ खांद्यावरी देऊनिया।।२।। ताडाच्या वृक्षाचे शूळ तेव्हा केले। नेऊनि रोविले अती त्वरे।।३।। दोघे शिवभक्त करिती शिवस्तुती। उमादेविपती आठविती।।४।। शूळाचा नैवेद्य दाविला लिंगाला। नवलाव झाला तेथे एक।।५।। लक्ष्मण म्हणे तेथे ज्ञानी जन। होते

भाविक हो कोणी एक।।६।।

२९०२. त्याने रायाप्रती केली हो विनंती। रायाते म्हणती प्राज्ञ जन।।१।। म्हणती गुंडूसया नव्हे हा तस्कर। केवळ सत्त्वधीर पुण्यशीळ।।२।। त्याच्याकडोन कर्म नाही हे घडणार। परि ते होणार दुर्धर हो।।३।। ईश्वराने काय केले हे कळेना। होणार चुकेना कोणाप्रती।।४।। आता राया असो होणार ते झाले। आता त्या सोडिले पाहिजे हो।।५।। लक्ष्मण म्हणे रायाते मानले। सर्वांनी स्तविले म्हणोनिया।।६।।

२९०३. शूळ वर्ज केला त्या हो शिवभक्ताते। आणावे त्याहाते म्हणे राजा।।१।। गुंडूसयापाशी आले लोक त्वरे। राज-आज्ञा त्वरे घेवानिया।।२।। गुंडूसयाप्रती बोलले ते जन। चलावे परतोन राज-आज्ञा।।३।। शिवभक्त म्हणती ऐका हो सकळ। तुम्ही पुण्यशीळ जनलोक।।४।। लिंगाते नैवेद्य शूळाचा दाविला। आम्ही त्या शूळाला कैसे सोडू।।५।। लक्ष्मण म्हणे भक्त ते निःसीम। शिव सर्वोत्तम सखा त्यांचा।।६।।

२९०४. आता शूळावरी आम्हाते घालावे। राये कृपाळुवे आता त्वरे।।१।। शंभोते नैवेद्य शूळाचा दाविला। आता या देहाला न ठेवू हो।।२।। सेवक अणि राजा निघाले हो वनी। सेवके परतोनी केवी जावे।।३।। स्वामिद्रोह अम्हा घडेल हो आता। राहण्याची वार्ता नीट नाही।।४।। गुप्त रूपे त्यांना पहती हो देव। म्हणती भक्तराव धन्य धन्य।।५।। लक्ष्मण म्हणे नारद तो मुनी। म्हणे शूळपाणि ऐक ताता।।६।।

२९०५. आता या भक्ताचे किती सत्त्व पाहसी। सांभाळी ब्रीदासी नीळकंठा।।१।। कृपाळू शंकर दयेचे आगर। तोषला ईश्वर मायातीत।।२।। प्रसन्न जाहला मायातीत शिव। देवाधिदेव दीनानाथ।।३।। तेव्हा शूळाप्रती पल्लव फुटले। बिल्ववृक्ष झाले शूळाचे हो।।४।। पंचवदन रूप प्रकट हो केले। भक्ता आलिंगिले दीनानाथे।।५।। लक्ष्मण म्हणे शिव पंचानन। विश्वाचे जीवन भोळा नाथ।।६।।

२९०६. पतींप्रती शूळ जाहला हो प्राप्त। कळला वृत्तांत स्त्रियांप्रती।।१।। दोघाचिया स्त्रिया आल्या हो धावोनी। केले नवलाव जाण त्या स्त्रियांनी।।२।। शिर ते कापोनी घेतले हो करी। सत्त्व त्यांनी भारी दाखविले।।३।।

शिरकमळाच्या केल्या पंचारत्या। आल्या पतीप्रती ओवाळाया।।४।। सर्वांप्रती तेव्हा नवल वाटले। देव संतोषले पाहोनिया।।५।। लक्ष्मण म्हणे नारद देवाला। विनविता झाला मुनिराव।।६।।

२९०७. विमान आणिले शिवाने झडकरी। म्हणे अती त्वरे न्या हो भक्त।।१।। गुंडूसया म्हणे शिव कृपावंता। विज्ञापना ताता परिसावी।।२।। रायाचे नगर आणि माझे पूर। दोन्हीही नगरे उद्धरा हो।।३।। ग्रामलोकांचा हो करावा उद्धार। हाचि द्यावा वर मज ताता।।४।। भोळा नाथ शिव भक्ताचे स्वाधीन। भक्ताचे वचन न उल्लंघी।।५।। लक्ष्मण म्हणे फार भोळा देव। वर सदाशिव देतो पूर्ण।।६।।

२९०८. किंचित् भक्तीने होतसे हो तृप्त। वरही अद्भुत देतो तात।।१।। कोटी रत्नमय विमान आणिले। अघटित केले विश्वनाथे।।२।। घरोघरी शिवगण हो फिरती। चला वेगी म्हणती नगरलोक।।३।। नगरलोकांच्या भाळी हो विभूती। गण ते लाविती अति प्रेमे।।४।। स्तविती शिवगण नगरलोकाप्रती। प्रेमे विनविती म्हणती चला।।५।। लक्ष्मण म्हणे आनंद तो थोर। विमान घरोघर उतरले।।६।।

२९०९. असंख्य विमाने आणिली शंकरे। नगरलोक सारे बैसविले।।१।। दोही नगरीचे सर्वत्रही जन। गेला हो घेऊन भोलानाथ।।२।। कैलासाते नेळे विमान मिरवीत। सुख ते अद्भुत अनुपम्य।।३।। कैलासी नेऊनि स्थापिल शिवाने। अगम्य करणी शिवाची हो।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तापाशी उभा। आणीतसे शोभा निज अंगे।।५।।

२९१०. धन्य ती विभूती धन्य तो शंकर। धन्य भक्त शूर महाराज।।१।। लक्ष्मण म्हणे चरित्र हे जुनाट। बोलिलासे श्रेष्ठ स्वामी माझा।।२।।

२९११. षण्मुखे मुनीप्रती हो कथिले। पुराण जाहलें स्कंद ते हो।।१।। स्वामी अगस्तीचा संवाद हा पूर्ण। किल्मिषे दारुण भस्म होती।।२।। व्यासाचे हो वाक्य स्कंद हो पुराणी। बोलिलासे मुनी महाराज।।३।। सत्यवतिसुत दयेचे आगर। केला उपकार त्याने आम्हा।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य तो दयाळ। पुराणे सकळ बोलिला तो।।५।।

१७. पातकी भिल्लीण

२९१२. विंध्याद्री पर्वती होती एक भिल्लीण। अती ती जारीण दुष्ट होती।।१।। दहा पाच जार घेऊनि त्या वनी। हिंडे ती पापिणी भोगी त्याते।।२।। तिच्या कार्याची हो तृप्ती नव्हे कदा। हिंडे ती सर्वदा वनामाजी।।३।। वन ते विक्राळ स्थान ते भ्यासूर। तेथे रात्रंदिन वसे ती हो।।४।। लक्ष्मण म्हणे भ्रतारे टाकिली। उन्मत्त ती झाली विषयमदे।।५।।

२९१३. जार ते जारीण घेऊनि फिरे वनी। मद्य ते पिऊनि उन्मत्त झाली।।१।। होता उष्णकाळ अभ्र तेथे आले। विजा चमकल्या वात मोठा।।२।। गारा त्या पडती मोठ्या त्यांच्यावरी। पळाले झडकरी जार ते हो।।३।। अंधार पडला रात्र झाली फार। वनी त्या वनचर मेले फार।।४।। लक्ष्मण म्हणे कल्पांतासमान। झाला हाहाकार त्याहा स्थानी।।५।।

२९१४. वनी त्या जारीण फिरे त्या एकली। म्हणे चंद्रमौळी कोपला का।।१।। पडे बदबदा रडे आक्रंदोन। म्हणे मज कोण वाली आता।।२।। माझे ते सांगाती पळाले सर्वही। करू गत काई आता येथे।।३।। कापे हो थरथरा पडे अडखळोन। म्हणे मज मरण आले आता।।४।। लक्ष्मण म्हणे पर्जन्य तो भारी। गारा तिचे शिरी पडती मोठ्या।।५।।

२९१५. वीज चमकता चाले झडकरी। मोठ्याने रुदन करीत हो।।१।। शिवालय तेथे होते एक जुनाट। स्थान मोठे श्रेष्ठ गवसले।।२।। वीजप्रकाशाने गेली त्या देऊळी। प्रभो चंद्रमौळी पाहिला तो।।३।। वायूने हो तिचे वस्त्र गेले होते। नग्नचि हो तेथे आली पाहा।।४।। लक्ष्मण म्हणे लिंगाते नमोन। बैसली जाऊन लिंगाजवळी।।५।।

२९१६. लिंगावरी गळे बदबदा पाणी। तिने ते नयनी पाहिले हो।।१।। म्हणे या लिंगाते काय करू आता। पाणी त्याच्या माथा पडतसे।।२।। गाळही हो त्याचे पडतसे शिरी। आता त्रिपुरारी काय करू।।३।। उठली त्वरेने गेली देऊळावरी। पर्जन्य तो भारी पडतसे।।४।। लक्ष्मण म्हणे गाराही पडती। अंधारही भारी वीज चमके।।५।।

२९१७. कर्दम करोनी छिद्र ते छापिले। गोटे बसविले छिद्रामाजी।।१।। उतरली खाली आली लिंगाजवळी। चापोनी देवासी पाहती झाली।।२।।

छिद्र ते फुटले आणिक आले पाणी। गेली झडकरी आणिक वरी।।३।। छिद्र बुजविले आली आणिक खाली। अती कष्टी झाली शीत मोठे।।४।। लक्ष्मण म्हणे छिद्र ते फुटले। देवावरी आले जळ आणिक।।५।।

२९१८. तिने ते पाहोनि आणिक गेली वरी। नग्नचि ती नारी कष्टली हो।।१।। कर्दम करोनि गोटे बसविले। छिद्र ते बुजविले आणखी तिने।।२।। तीन वेळा ऐसे केले त्या बाईने। कष्ट ते दारुण भोगिले हो।।३।। घट भरोनिया आणिले ते जळ। लिंगाते तत्काळ धुतले हो।।४।। लक्ष्मण म्हणे पाहोनि ते कष्ट। तेव्हा तो नीळकंठ संतोषला।।५।।

२९१९. शीत फार झाले गेला तिचा प्राण। आले यमगण न्यावयाते।।१।। शिवाने ते दूत पाहिले हो येता। दया उमाकांता उपजली।।२।। शिवगणांप्रती केली शिवे आज्ञा। म्हणे त्वरे आणा विमान ते।।३।। हिने मजकरिता कष्ट रे भोगिले। मज तोषविले भक्तिबळे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ताचा कैवारी। सखा त्रिपुरारी सत्य सत्य।।५।।

२९२०. शिव म्हणे यम कष्टवील हिते। दुःख ते अद्भुत दावील रे।।१।। विमान आणविले बैसविली तीते। गण सभोवते शिवाचे हो।।२।। यमदूत म्हणती अहो शिवगणा। पापिणी ही जाणा नेता कैसी।।३।। शिवगण म्हणती हिचे पुण्य थोर। जाणे तो शंकर दयाघन।।४।। लक्ष्मण म्हणे शिवगण म्हणती। हिच्या पुण्याप्रती पार नाही।।५।।

२९२१. हिने सोवळ्यात लिंग ते पूजिले। कष्ट ते भोगिले शिवाकरिता।।१।। तीन वेळा गेली देऊळा हो वरी। पर्जन्य तो भारी होत होता।।२।। गारा मोठ्या मोठ्या पडती तिचे शिरी। वायू रे तो भारी शीतल तो।।३।। शिवकार्याकरिता हिचा प्राण गेला। कोण या पुण्याला गणना करी।।४।। लक्ष्मण म्हणे यमदूत म्हणती। धन्य पशुपती भक्तसखा।।५।।

२९२२. किंचित् भक्तीने होतसे प्रसन्न। देतो वरदान अति श्रेष्ठ।।१।। जातिकूळ काही न पाहे शंकर। दयाळू तो फार दिसे नाथ।।२।। जारचोराप्रती पावन हो करी। जबरदस्त भारी देव तो हो।।३।। काही यापुढे चालेना आपुले। फार सोडविले याने दुष्ट।।४।। लक्ष्मण म्हणे यमदूत क्रूर। परि ते किंकर झाले तेथे।।५।।

२९२३. शिवगणांप्रती करोनि नमन। गेले यमगण फिरोनिया।।१।। सदाशिवे तीते दिव्य देह दिला। पापाचा हो केला क्षय कृपे।।२।। पंचवदन दशबाहू त्रिनयन। चंद्रमा तो पूर्ण शोभे शिरी।।३।। आपले समान केली तत्क्षणी। अगम्य करणी शिवाची हो।।४।। लक्ष्मण म्हणे त्याची कृपा होता। पापाची ती वार्ता स्वप्नी नसे।।५।।

२९२४. कोटी सूर्याचा हो प्रकाश पडला। देव ते पाहायला आले तेथे।।१।। अप्सरा नाचती नाना वाद्यघोष। स्तवीत महेश चालले हो।।२।। किन्नर गायन करिती जयजयकार। आनंद तो फार वर्णवेना।।३।। यमपुराहून गेले ते विमान। यमाने पूजन केले तिचे।।४।। लक्ष्मण म्हणे प्रभोसत्ता थोर। ब्रह्मादिका पार न कळे ज्याचा।।५।।

२९२५. विमान मिरवत गेले स्वर्गभुवनी। सर्व दिक्पाळांनी वंदिली ती।।१।। सर्वत्रही पद ओलांडूनि वरी। नेले त्रिपुरारी वसे जेथे।।२।। कैलास ते पूर देवा अगोचर। पुण्यवंत नर वसती तेथे।।३।। त्या स्थळाचे वर्णन करवेना कोणाला। नाथ तो शोभला त्रैलोक्याचा।।४।। लक्ष्मण म्हणे नेली त्या भुवनी। समस्त सुरांनी मिळोनिया।।५।।

२९२६. ऐसे अगणित पापी उद्धरिले। पुराणी वर्णिले व्यासदेवे।।१।। स्कंदपुराणात आहे ही हो कथा। भक्त विश्वनाथा आवडती।।२।। त्याचे म्हणवा हो उद्धरील सत्य। भक्ताते निवांत पद देतो।।३।। संसार हा मिथ्या दिसे गाथागोवी। येथे सुख नाही दुःख मोठे।।४।। लक्ष्मण म्हणे स्तवा स्तवा शिव। सखा महादेव होतो सत्य।।५।।

१८. दोन गुरू – एक शिष्य

२९२७. कोणी एक शिवभक्त होता लिंगधारी। लिंगपूजा करी प्रेमयुक्त।।१।। त्रिकाळ पूजन करी हो भजन। होते आत्मज्ञान भक्ताप्रती।।२।। शांती दया क्षमा वसे निरंतर। सर्वदा निर्घोर भक्तराज।।३।। काही कार्य आले चालिला ग्रामाते। स्तवीत प्रभोते हर्षभरे।।४।। लक्ष्मण म्हणे कर्नाटक प्रांती। वस्ती त्याची होती पवित्र हो।।५।।

२९२८. चालला मार्गाने वृक्ष घनदाट। स्तवी नीळकंठ अति प्रेमे।।१।। पर्वताचा दरा होता मार्गावरी। तेथूनि झडकरी चालला तो।।२।। तेथे एक

भिल्ल आला हो तस्कर। होता मोठा चोर अति पापी।।३।। बहुत ते जीव वधिले दुष्टाने। मार्ग तो धरोन नित्य बैसे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तावरी आला। शस्त्राने हो त्याला मारू पाहे।।५।।

२९२९. नग्न शस्त्र त्याचे ठेवी कंठावरी। म्हणे दे झडकरी वस्त्र द्रव्य।।१।। भक्ताने त्या वस्तू दिधल्या चोराते। म्हणे तस्कराते घ्या हो सर्व।।२।। द्रव्य आम्हापाशी नाही बापा काही। आहे हेचि घेई महाराजा।।३।। भिल्लाने हो झाडा घेतला झडकरी। क्रोध होता भारी त्याचे अंगी।।४।। लक्ष्मण म्हणे सर्व घेतले हिरोन। दाखवी सोडोन काय आहे।।५।।

२९३०. शिवपूजेची पेटी भक्ताचे हाताने। सोडविली त्याने तत्क्षणी।।१।। म्हणे याचे नाम सांगा रे आम्हाला। माळा ह्या कशाला ठेविल्यात।।२।। भक्त म्हणे रुद्राक्षाच्या माळा कंठी। घालता धुर्जटी आनंदतो।।३।। घंटा शंख वाजविता पूजनकाळी। तेणे चंद्रमौळी संतोषतो।।४।। भस्म हे हो आहे लावावे अंगासी। तेणे त्या पापासी क्षय होय।।५।। लक्ष्मण म्हणे तस्कर म्हणे सांग। कैसा उमारंग संतोषतो।।६।।

२९३१. भक्त म्हणे धूप गुगुळ हा कापूर। जाळिता शंकर कृपा करी।।१।। बिल्वाचे ते दळ वाहता लिंगासी। राज्य तो भक्तासी देत असे।।२।। शर्करा ही आहे अर्पिता शंकर। पापाचा तो वारा लागो नेदी।।३।। कंठी हे बांधिले सोडूनि दाखीव। पाहू दे लवलाही भिल्ल म्हणे।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त दचकला। म्हणे या कर्माला काय करू।।५।।

२९३२. लिंग त्याते कैसे दाखवू मी आता। घेईल उमाकांता हिरूनि हा।।१।। होणारे चुकेना आले मोठे विघ्न। प्रभो पंचानन काही करो।।२।। भिल्ल म्हणे त्वरे दाखवी सोडून। नाही तरी प्राण घेईन मी।।३।। भक्त म्हणे हे हो आहे शिवलिंग। पूजिता अभंगपद प्राप्त।।४।। लक्ष्मण म्हणे पुढे नवल झाले। भक्त भिल्ला बोले ऐकावे हो।।५।।

२९३३. कैलासशिखरा नेतसे शंकर। भक्ता गंगाधर प्राण मानी।।१।। भाषण ऐकोनि भिल्ल संतोषला। म्हणे ते मजला देई लिंग।।२।। साधुदर्शने पश्चात्ताप झाला। भाषण ते त्याला मात्रा झाली।।३।। रडे आक्रंदोन अती शोक करी। म्हणे दुराचारी मी हो पापी।।४।। कुटुंबाकरिता केले पाप फार।

हिंसा म्या अपार फार केली।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ता लोटांगण। घाली प्रेमेकरून भिल्ल तो हो।।६।।

२९३४. भिल्ल म्हणे आता द्यावे मज लिंग। पूजीन वृषभध्वज स्वामिराय।।१।। भक्ताने तेव्हा हो तेथे केली युक्ती। खडा त्याचे हाती दिला एक।।२।। म्हणे हा त्र्यंबक पूजा बापा लिंग। पद ते अभंग पावशील।।३।। जाई आपुले सदना करी रे पूजन। भिल्ल म्हणे सदन जळो आता।।४।। लक्ष्मण म्हणे भिल्ल आनंदला। म्हणे या पायाला सोडीना मी।।५।।

२९३५. सद्गुरू तुमचे दास्यत्व करीन। शरीर ओवाळीन तुम्हावरूनि।।१।। दोघेही तेथूनि निघाले झडकरी। स्तवीत त्रिपुरारी चालिले हो।।२।। भक्ताप्रती मार्गी तृष्णा हो लागली। म्हणे ही निर्जळी भूमी दिसे।।३।। शिष्य म्हणे त्वरे आणितो उदक। बैसा क्षण एक तुम्ही येथे।।४।। पडके देऊळ भक्त पारावरी। बैसला झडकरी भिल्ल गेला।।५।। इकडे एक विघ्न हो ओढवले। भक्तावरी आले विघ्न मोठे।।६।। लक्ष्मण म्हणे रायाचे नगरी। करोनिया चोरी तस्कर आले।।७।।

२९३६. देऊळा मागे हो विभाग करीत। बैसले तव तेथ राजसेना आली।।१।। त्याते पाहोनि तस्कर पळाले। राजदूते धरिले भक्ताप्रती।।२।। म्हणती हा तस्कर शिर हो कापिले। घेऊनिया गेले रायापाशी।।३।। रायाने ते शिर वृक्षाते बांधिले। कर्मयोगे तेथे झाले ऐसे।।४।। लक्ष्मण म्हणे इकडे उदक घेऊन। भिल्ल आला त्वरे गुरूपाशी।।५।।

२९३७. गुरूचे ते शिर नसे धडावरी। पाहोनि तो करी शोक शिष्य।।१।। म्हणे शंभोराया कैसे हे रे केले। सद्गुरूचे नेले शिर कोणी।।२।। आता आपुला मी प्राणचि देईन। द्यावयाते प्राण सिद्ध झाला।।३।। शंभोने ते त्याचे धारिष्ट्य पाहोन। आला पंचानन धावोनिया।।४।। लक्ष्मण म्हणे निश्चयाचे बळ। फळे हो तत्काळ भक्तियोगे।।५।।

२९३८. शिवकृपेकरून फुटले त्या शिर। शिष्य जयजयकार करी तेव्हा।।१।। भक्त सजीव केला शिव गुप्त झाला। प्रभोच्या कृपेला अंत नाही।।२।। गुरू शिष्य तेव्हा निघाले तेथूनी। चालले मार्गनि शिव स्तवीत।।३।। त्या रायाच्या

नगरा आले दोघे जण। भक्ते सरितास्नान नीरे केले।।४।। लक्ष्मण म्हणे शिष्य गुरु-आज्ञे। गेला हो त्वरेने बिल्ववृक्षी।।५।।

२९३९. कोमल ते पत्र तोडिले शिष्याने। पुष्प ते घेऊन चालला हो।।१।। येताना शिष्याने गुरूचे ते शिर। पाहोनी हाहाकार करी शिष्य।।२।। म्हणे हे शंकरा कैसी गती झाली। गुरू ही माऊली कष्टली की।।३।। सद्गुरूचे शिर लोंबतसे वृक्षा। कैसे विरूपाक्षा केले ताता।।४।। लक्ष्मण म्हणे शिष्य विनवी देवा। म्हणे कृपाळुवा धाव त्वरे।।५।।

२९४०. प्रेमयुक्त त्याने स्तविला शंकर। म्हणे दे शरीर सद्गुरूचे।।१।। गुरुकार्याकरिता प्राण मी देईन। तनुमनधन अर्पीन मी।।२।। नको अंत पाहू घाली ताता उडी। येई बा तातडी देवराया।।३।। भक्तसाह्यकारी खरा तू असशी। तरीच धावोन येशी आमुच्या काजा।।४।। लक्ष्मण म्हणे शिष्य स्तवन क़री। प्रेमे त्रिपुरारी ऐकतसे।।५।।

२९४१. शिष्य म्हणे ताता किती अंत पाहसी। त्वरे मी प्राणासी देईन रे।।१।। शिव प्रकटला म्हणे माग वत्सा। काय तुझी इच्छा असेल ते।।२।। शिष्य म्हणे धड देई या शिराते। मागणे तुज हो निवेदिले।।३।। शिवे कृपा केली फुटले त्या धड। धन्य चंद्रचूड महाराज।।४।। सजीव तो केला दिला शिष्याहाती। शिव कृपामूर्ती गुप्त झाला।।५।। लक्ष्मण म्हणे धन्य शिवभक्ती। भक्ताची ती कीर्ती तिही लोकी।।६।।

२९४२. दोन ते स्वरूप सारखेचि झाले। अघटित केले विश्वनाथे।।१।। दोन गुरू एक शिष्य सेवा करी। भक्तीची ती थोरी ऐसी आहे।।२।। रमत गमत गेले कल्याणात। भक्तासभोवते पाळा फार।।३।। दोन्ही मूर्ती एकसारिख्या दिसती। नवलचि गती श्रेष्ठ आहे।।४।। असंख्य ते लोक येती दर्शनाते। देवादानवांते नवल झाले।।५।। लक्ष्मण म्हणे शिवकृपा थोर। ब्रह्मादिका पार नकळे ज्याचा।।६।।

२९४३. बसवेश्वरांप्रती कळला वृत्तांत। म्हणती शिवभक्त चला पाहू।।१।। भक्त ती मंडळी आली त्या जवळी। म्हणती चंद्रमौळी धन्य धन्य।।२।। सर्वत्र ते भक्त भेटले त्याहासी। अति सन्मानेसी नेले सदना।।३।। फार तोषविले केला हो आनंद। पूजन ब्रह्मानंदे केले त्यांचे।।४।। लक्ष्मण म्हणे

कल्याणपट्टण। फार उत्तम स्थान भक्ताचे ते।।५।।

२९४४. बसवराजांनी हो विमान आणविले। भक्ता पाठविले कैलासाते।।१।। शिवसभेमाजी अक्षयी सन्मान। झाले शिवगण महाराज।।२।। संतसमागम आहे श्रेष्ठ थोर। भक्तीचा विचार संतापाशी।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य ती संगती। पापी उद्धरती अन्यायी ते हो।।४।।

२९४५. लोह-परिसाची उपमा साजेना। भक्त पंचानना आवडती।।१।। कुसंग सांडोनि सुसंग धरावा। देह हा लावावा भक्तिमार्गी।।२।। भक्तीविण ज्ञान न होय कोणाते। भक्ती ही शिवाते अति प्रिय।।३।। भक्तवचनात आहे हे चरित्र। श्रवणे पवित्र होती प्राणी।।४।। लक्ष्मण म्हणे मिथ्या हा संसार। येथे गुंता फार गुंतू नका।।५।।

१९. भीमाशंकर लिंग

२९४६. भीम नामा दैत्य होता एक क्रूर। प्रतापी रणशूर योद्धा होता।।१।। तपश्चर्या त्याने केली उग्र फार। ब्रह्मादी सुरवर कंपित झाले।।२।। ब्रह्मदेव तेव्हा आला क्रूरापाशी। वर हो तयाशी दिधला श्रेष्ठ।।३।। ब्रह्मांड हे राज्य दिले त्या दैत्याला। अजिंक्य तो झाला सुरांप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे दैत्य मेळवून। जिंकिले ते सुरगण पुण्येकरून।।५।।

२९४७. चक्रवर्ती राजे जिंकिले सर्वही। झाला तो विजयी त्रैलोक्यात।।१।। उन्मत्त तो क्रूर ताप दे जगाशी। अजिंक्य सुरांते झाला तो हो।।२।। इंद्रादी सुरगण पडले बंदिखानी। यमवरुणअग्निनैर्ऋत्यादी।।३।। लक्ष्मण म्हणे असुरराज्य झाले। ऋषींप्रती दिधले दुःख त्यांनी।।४।।

२९४८. यज्ञयागादिक राहिले हो कर्म। लोपले स्वधर्म सर्वत्राचे।।१।। इंद्रपदी असुर शोभला समुदाय। इंद्राचे वैभव भोगिती ते।।२।। भीम दैत्य तो शोभे इंद्रासनी। अप्सरा येऊनि नृत्य करिती।।३।। गंधर्व येऊनि गायन करिती। बंदीजन स्तविती रायाप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे पुण्यबळ थोर। पुण्याने ईश्वर सुख देतो।।५।।

२९४९. नारद तुंबरू गायन नृत्य करिती। भीम तो सर्वांते अजिंक्य झाला।।१।। देव झाले दीन राबती हो द्वारी। कृतांत थरारी न चले काही।।२।। देवांगना नित्य राबती दुर्मती। सुख कोणाप्रती पडो नेदी।।३।। देवालय पाडी

ब्राह्मणाते ताडी। मूर्ती त्या हो फोडी देवाचिया।।४।। लक्ष्मण म्हणे क्रूर दैत्य फार। करिती अनाचार राजमदे।।५।।

२९५०. आधीच मर्कट मद्यपान केले। विंचवाने चाविले वरूनि त्याते।।१।। तटतटा माकड उडे तेव्हा जैसे। दैत्याते तैसे झाले पहा।।२।। आधीच तो क्रोधी दैत्य तमोगुणी। ब्रह्मांडाचा धनी झाला श्रेष्ठ।।३।। तेथे पापपुण्या कैची ओळखण। मोठा अभिमान राजमदे।।४।। लक्ष्मण म्हणे दंगा जगावरी। करिती असुर मस्त झाले।।५।।

२९५१. गिरी त्या कंदरी लपती धार्मिक। म्हणती तो त्र्यंबक कोपला का।।१।। पुण्यश्लोक प्राणी रडती रात्रंदिन। म्हणती देवा विघ्न वोढवले।।२।। मृत्यू देई देवा दुःख सोसवेना। कल्पांत तो जाणा तिही लोकी।।३।। जगाचिया स्त्रिया दुष्ट धरोनिया नेती। क्षेत्र भ्रष्टविती पातकी हो।।४।। लक्ष्मण म्हणे पृथ्वीत आकांत। झाला उल्कापात कर्मयोगे।।५।।

२९५२. वेद अध्ययन राहिले पुराण। नामसंकीर्तन राहिले हो।।१।। शास्त्र ते लोपले कर्म ते राहिले। कर्मभ्रष्ट झाले जगी प्राणी।।२।। देवाचे ते नाव घेता कोणी वाचे। दैत्य हो त्याचे छेदिती शिर।।३।। त्रैलोक्यात श्रेष्ठ असुर ते झाले। कोणाचे न चाले त्याहापुढे।।४।। लक्ष्मण म्हणे हेर पृथ्वीवरी। फिरती दुराचारी असुर ते।।५।।

२९५३. भीमाने एक पूर वसविले पृथ्वीवरी। तेथेही असुर ठेविले हो।।१।। पर्वतशिखरी केला एक किल्ला थोर। तेथेही असुर ठेविले हो।।२।। पृथ्वीवरी नृपती किल्ल्यात ठेविले। बंदीत घातले सर्व राजे।।३।। धार्मिक ते लोक आणूनि कोंडिले। पाप ते वर्तले तेथे फार।।४।। भीम त्या किल्ल्यात आला एके दिनी। पाहूनि ते प्राणी कंपित झाले।।५।। तेथे लिंगार्चन करीत होता एक। होता पुण्यश्लोक राजा तो हो।।६।। लिंगपूजेविना अन्न न घे राजा। प्रेमे वृषभध्वजा स्मरे मनी।।७।। चोरोनि पूजन करी तो नृपती। मात कोणाप्रती कळो नेदी।।८।। लक्ष्मण म्हणे लिंग मृत्तिकेचे। करी प्रेम त्याचे लिंगाठायी।।९।।

२९५४. ते दिनी तो राजा बैसला पूजनासी। येणे त्या भीमासी तेथे झाले।।१।। दैत्याने त्या पाहोन मोठा कोप केला। रायावर धावला भीम

दैत्य।।२।। खड्गाने तो भक्त हाणिला भीमाने। शंभोचे स्मरण केले राये।।३।। मृत्तिकेचे लिंग रायाकरी होते। शस्त्र त्या लिंगाते लागले हो।।४।। लक्ष्मण म्हणे दोन भाग झाले। लिंग ते भंगले मृत्तिकेचे।।५।।

२९५५. लिंगातून शंकर निघाला आपण। दशबाहू त्रिनेत्र चंद्र भाळी।।१।। वामांगी ती उमा गंगा शोभे शिरी। पाळा बरोबरी गणांचा तो।।२।। कोटी सूर्यप्रभा पडली हो कांती। शस्त्र ते मिरविती नानाविध।।३।। लक्ष्मण म्हणे तेथे युद्ध झाले थोर। शंभोने असुर वधिला तो।।४।।

२९५६. दैत्याचा प्राण चालला तो जेव्हा। शंभो म्हणे तेव्हा माग वर।।१।। दैत्याने तेव्हा केले हो स्तवन। म्हणे त्वा पावन केले मज।।२।। तुझिया हाताने माझा मृत्यू झाला। गणना या पुण्याला कोण करी।।३।। सहस्रमुखाने नोव्हे हो वर्णन। शंभो मी पावन झालो आता।।४।। परि नाम माझे चालवी रे काही। वरदान देई हेचि देवा।।५।। लक्ष्मण म्हणे भोलानाथ शिव। झाला महादेव प्रसन्न त्या।।६।।

२९५७. सायुज्यता मुक्ती दिली त्या दैत्याला। ब्रह्मानंद झाला भक्ताप्रती।।१।। तत्क्षणी तेथे लिंग प्रकटले। नाम त्या ठेविले भीमाशंकर।।२।। भीमाशंकरलिंग वंद्य त्रैलोक्याला। वर तो शोभला स्वामीचा हो।।३।। शंभोने तो राजा हृदयी धरिला। सायुज्यता त्याला देता झाला।।४।। लक्ष्मण म्हणे दोघा एक गती। दिधली पशुपती दयाळू तो।।५।।

२९५८. देव बंदी होते सोडविले ताते। सौख्य सर्वांते झाले फार।।१।। इंद्रपदाचे भोगते झाले देव। लिंगी महादेव गुप्त झाला।।२।। दैत्य ते गेले सर्व पाताळाते। राजे त्या पृथ्वीचे भोगते झाले।।३।। ब्रह्मांडातील सर्व लोक आनंदले। देव ते मिळाले यज्ञभागा।।४।। लक्ष्मण म्हणे शिव सखा खरा। भक्ताचिया घरा येतो नाथ।।५।।

२९५९. शिवपुराणात आहे हे चरित्र। भक्तीने त्रिनेत्र वश होतो।।१।। सत्यवतिसुत व्यास महामुनी। बोलला पुराणी भक्तिरस।।२।। भक्ती वेगी करा मिथ्या हा पसारा। भक्ती विश्वंभरा अति प्रिय।।४।। भक्ती प्रिय शिवा दुजे प्रिय नाही। वसतो गोसावी भक्तापाशी।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती मूळ पाया। भक्तिविना वाया शब्दज्ञान।।५।।

२०. महाशैव राजा

२९६०. कोणी एक ब्राह्मण होता हो अन्यायी। स्वधर्माविषयी अती भ्रष्ट।।१।। जार चोर दुष्ट महान तो भ्रष्ट। अती तो पापिष्ट होता प्राणी।।२।। नित्य हो ग्रामात फिरे दुर्व्यसनी। जारिणीसदनी पडतसे।।३।। लक्ष्मण म्हणे कोणे एके दिनी। रायाचे सदनी प्रवेशला।।४।।

२९६१. मध्यान्ही रात्री शस्त्रपाणि क्रूरे। केला स्त्रियावर दंगा त्याने।।१।। स्त्रियांनी तेव्हा गलबला हो केला। राजदूते धरिला ब्राह्मण तो।।२।। दूताने तो दुष्ट बांधिला दुर्मती। राजदूत बोलती तस्कराते।।३।। लक्ष्मण म्हणे प्रसिद्ध होता चोर। अन्याय त्याने फार केले होते।।४।।

२९६२. दूत म्हणती दुष्टा कैसा तू ब्राह्मण। अरे तू ब्राह्मण दिसतोसी।।१।। उत्तम कुलात जन्म रे घेवोन। काय हे साधन करितोसी।।२।। राजा तो गलबला ऐकोनि उठला। तस्कर आणविला आपुले जवळी।।३।। लक्ष्मण म्हणे ब्राह्मण ओळखिला। म्हणे या विप्राला सोडा सोडा।।४।।

२९६३. महाशैव राजा होता तो दयाळ। महान पुण्यशीळ भक्तराज।।१।। राजा म्हणे त्या ब्राह्मणा हो प्रती। कैसी पडली भ्रांती अरे विप्रा।।२।। आता ऐसे कर्म नको करू बा रे। भक्तिपंथ तू रे धरी काही।।३।। उत्तररात्र आता समय जाहला। आता चंद्रमौळी स्मरावा तो।।४।। मजवरी तुझा उपकार झाला। आता मी शंभोला स्तवीन रे।।५।। राजा नित्य ते हो शिवपूजन करी। स्मरी मदनारी प्रेमभरे।।६।। लक्ष्मण म्हणे शिव तो दयाळ। अती तो स्नेहाळ परोपकारी।।७।।

२९६४. राजा म्हणे आता मजपाशी राही। भक्तिसुख घेई सांडी हे कर्म।।१।। तत्क्षणी त्यांनी सोडिला ब्राह्मण। आता सावधान होई म्हणे।।२।। आपणापाशी त्याने ठेवोनि घेतले। भक्तीते लाविले रायाने त्या।।३।। लक्ष्मण म्हणे सुसंगती थोर। साधू उपकार करिती प्रेमे।।४।।

२९६५. पाहा तो हा खळ लाविला भक्तीते। आपुले सदनाते ठेविला हो।।१।। रायाबरोबर नित्य पूजन करी। भजनही करी नित्य नेमे।।२।। त्रिकाळ पूजन राजा नेमे करी। विप्र तैसे करी नित्य नित्य।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य भक्ती। भक्ताते पशुपती। सांभाळी हो।।४।।

२९६६. तपोधन राजा प्रवीण तो बळी। त्याने चंद्रमौळी सखा केला।।१।। रायाचे संगाने उद्धरिला पापी। राव तो स्वरूपी रममाण।।२।। प्रभोभक्तीमाजी होता तो कुशल। अंतरी निर्मळ नृपनाथ।।३।। लक्ष्मण म्हणे चंदनवृक्ष थोर। सुगंध अंगी फार शोभतसे।।४।।

२९६७. चंदनवृक्षा भोवती वृक्ष जे असती। सुगंधित होत समागमे।।१।। कस्तुरीसंगाने सुगंध प्राप्त होय। तैसे निरामय संतसंगे।।२।। हाही दृष्टांत साजेना त्या भक्ता। भक्त त्या अनंता अती प्रिय।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तिमहिमा थोर। भक्तांनी शंकर वश केला।।४।।

२९६८. राजियाने दोषी आप्त तो मानिला। फार त्या दोषियाला सांभाळिले।।१।। पुत्राऐसे त्याने केले त्याकारण। नित्य भजन पूजन करवी त्याते।।२।। रत्नमय लिंग स्थापिले रायाने। नर्मदालिंग त्याने स्थापिले हो।।३।। लक्ष्मण म्हणे सुवर्ण मंदिर। लिंगाप्रती फार केले त्यांनी।।४।।

२९६९. शांभवाचे भार वसती त्या मंदिरी। प्रेमे त्रिपुरारी पूजिती हो।।१।। बिल्वाचे ते वन लाविले रायाने। भक्त लिंगार्चन करिती प्रेमे।।२।। त्रिकाळ पूजन अक्षयी भजन। करिती प्रेमेकरून भक्तराज।।३।। लक्ष्मण म्हणे अन्नदान फार। करी तो नृपवर प्रेमभरे।।४।।

२९७०. अर्चन ती भक्ती करितो नृपती। श्रवणे पावन होती भक्तराज।।१।। निजध्यास त्याते अक्षयी अक्षयी। त्याच्या भाग्या नाही अंत काही।।२।। धनलोभियाचा प्राण द्रव्याजवळी। तैसा चंद्रमौळी भजे सदा।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तिमहिमा थोर। सर्वांते आधार भक्तीचा हो।।४।।

२९७१. पतिव्रतेचा तो प्रेमा पतिपायी। स्मरे ती अक्षयी पतिपाया।।१।। धेनू ती हो प्रेमे सांभाळी वत्साते। अती प्रेमा तीते मनातून।।२।। तैसा तो नृपती रंगला रंगला। शिवस्मरणाला विसरेना।।३।। लक्ष्मण म्हणे आनंद आनंद। तेथे दुसरा छंद नसे काही।।४।।

२९७२. जारिणीचे चित्त जैसे जारापाशी। तैसा तो प्रभोसी स्मरे राजा।।१।। लोभियाचे चित्त जैसे धनाजवळी। तैसा चंद्रमौळी स्मरे राजा।।२।। पतिव्रता नारी न विसंबे भ्रतार। प्रेमा भारी फार पतीप्रती।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य भक्त। भक्ताने अनंत वश केला।।४।।

२९७३. रायाचा तो देश भक्तीते लागला। आनंदे प्रभोला पूजिती हो।।१।। संसार हे सुख मानिती ते खोटे। भक्तीमाजी वाटे मोठेपणा त्या।।२।। मृगजळवत् देह हो मानिती। भक्ती हा पंथ आवडे त्या।।३।। लक्ष्मण म्हणे स्मरा स्मरा शिव। भक्ता महादेव सांभाळी तो।।४।।

२९७४. महाशैव राजा महान प्रवीण। प्रजेचे पालन करी प्रेमे।।१।। यथाशास्त्रन्याये प्रजा राजा पाळी। महान तो बळी शूर मोठा।।२।। बहुत दिन राज्य केले स्वधर्माने। कोठे काही न्यून्य न दिसे तेथे।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य भक्ती। धन्य ती संगती भक्ताची हो।।४।।

२९७५. संतती संपत्ती रायाते आनंद। अक्षयी आनंद भक्तीचा तो।।१।। सर्वत्र ते लोक लाविले भक्तीते। राज्य ते पुत्राते दिले राये।।२।। आपण अक्षयी शिवभजनी रत। सर्वदा ध्यानस्थ शिवस्वरूपी।।३।। लक्ष्मण म्हणे शिव संतोषला। विमान रायाला पाठविले।।४।।

२९७६. आले शिवगण शिवा हो समान। महाराज पूर्ण शिवयोगी।।१।। कोटी सूर्यप्रभा पडली हो दीप्ती। अप्सरा नाचती आनंदे हो।।२।। राजा तो ब्राह्मण नेला शिवापाशी। शिव ते सभेसी बैसले हो।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य भक्ती। भक्ताची संपत्ती भक्ती आहे।।४।।

२९७७. शिवरहस्यात आहे हे चरित्र। भजने त्रिनेत्र गती देतो।।१।। धन्य धन्य भक्ती धन्य तो शंकर। भक्ताचा उद्धार करितो तात।।२।। फार तो सांभाळी भक्तजनाप्रती। वेद त्याते स्तविती प्रेमभरे।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ताचा तो सखा। प्रभो पाठीराखा सत्य सत्य।।४।।

२९७८. धन्य व्यासमुनी त्रिभुवनवक्ता। काव्यरचनाकर्ता महाराज।।१।। त्याने हे चरित्र शिवरहस्यात। वर्णिले अद्भुत भक्तिरस।।२।। धन्य जगद्गुरू शिव तो दयाळ। प्रभो जाश्वनीळ महाराज।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती करा करा। मिथ्या या संसारा गुंतू नका।।४।।

२१. महापातकी ब्राह्मण

२९७९. कोणी एक ब्राह्मण होता दुराचारी। नित्यनेमे करी पापे फार।।१।। अती जार भ्रष्ट होता तो पापीष्ट। कधी नीलकंठ स्मरिला नाही।।२।। सप्त हो

व्यसनी अती तो अपवित्र। त्याचे दुष्ट मित्र दुराचारी।।३।। लक्ष्मण म्हणे कर्मभ्रष्ट भारी। नित्य परनारी भोगीतसे।।४।।

२९८०. पापपुण्याचे त्या भयचि हो नाही। द्रव्य तो अक्षयी खर्चीतसे।।१।। दुष्टकर्मी द्रव्य खर्चितो दुर्मती। सत्कर्माची गती नेणेचि तो।।२।। अन्याय कर्मा खर्ची प्रेमभरे। सत्कर्मा किंचित् खर्च न करी।।३।। लक्ष्मण म्हणे कर्मगती अनिवार। माया ही दुर्धर प्रभोची ती।।४।।

२९८१. असो येक दिनी अन्याय केला फार। अती तो हो जार होता प्राणी।।१।। मंदिरही त्याचे मोठे होते फार। त्याने हे अनिवार कर्म केले।।२।। लक्ष्मण म्हणे मातेकडे गेला। पाडिले मातेला भोगिली ती।।३।।

२९८२. बलात्कारे माता भोगिली दुष्टाने। पाप ते दारुण केले भ्रष्टे।।१।। फार तो अपराधी फार तो अपराधी। फार तो दुर्बुद्धी होता प्राणी।।२।। जारिणी घेऊनि फिरे अरण्यात। अती तो उन्मत्त होता दोषी।।३।। लक्ष्मण म्हणे त्या हो अरण्यात। शिवलिंग तेथे होते श्रेष्ठ।।४।।

२९८३. त्या लिंगापाशी होते शिवभक्त। पूजीत लिंगाते अती प्रेमे।।१।। मंदिर सुंदर बिल्ववृक्ष फार। करिती जयजयकार भक्त शूर।।२।। रुद्राचे अभिषेक कोणी करिताती। कोणी ते नाचती लिंगापुढे।।३।। वाद्ये हो वाजती कीर्तन करिती। शिवनाम घेती कोणी भक्त।।४।। भस्मरुद्राक्षाचे आभरण शैवाला। आनंद तो त्याला सर्वकाळ।।५।। लक्ष्मण म्हणे तेथे तो दुर्मती। येऊनि लिंगाशी पाहता झाला।।६।।

२९८४. लिंगाप्रती त्याने नमस्कार केला। वंदिले शैवाला प्रेमभरे।।१।। महान एक शैव होता शिवज्ञानी। त्यातेही नमोनि बैसला हो।।२।। प्रभोदर्शनाने पालटली वृत्ती। भाषण साधूप्रती करिता झाला।।३।। लक्ष्मण म्हणे शिवमहिमा थोर। महिमा अपार प्रभूचा हो।।४।।

२९८५. महाशैवा म्हणे अती तो दुर्जन। सांगा मज गती होईल काय।।१।। फार मी हो जार उन्मत्त मी फार। केले म्या अपार दोष ताता।।२।। विचार मी नाही कधी केला। फार उन्मत्त मी केवळ अविचारी।।३।। आता माझी गती बरवी दिसेना। माझिया अवगुणा पार नाही।।४।। लक्ष्मण म्हणे पश्चात्ताप झाला। पुसे त्या शैवाला प्रायश्चित्त।।५।।

२९८६. माता ती म्या हो बलात्कारे भोगिली। ताता गोष्ट गेली काय करू।।१।। आता या दोषाते सांगा हो उपाय। तुम्ही निरामय श्रेष्ठ आहा।।२।। आता प्रायश्चित्त द्यावे मज अनाथा। दयाळा समर्था महाराजा।।३।। लक्ष्मण म्हणे लागला तो पायी। म्हणे मी अन्यायी सांभाळा हो।।४।।

२९८७. महाशैव त्याते प्रसन्न हो झाला। म्हणे मी तुजला सांगतो युक्ती।।१।। तन मन धन अर्पी तू शंकरा। प्रेमयुक्त कर भक्ती सुखे।।२।। अती भावयुक्त करी लिंगार्चन। मनोभावे पूजन करी बापा।।३।। पूर्वी अतिदोषी मातृगमनी फार। उद्धरिले ते थोर झाले पाहे।।४।। लक्ष्मण म्हणे शैव बोध करी। शिवभक्तीची थोरी सांगतसे।।५।।

२९८८. पूर्वी एक दोषी होता रे ब्राह्मण। अन्यायी तो पूर्ण दोषसिंधू।।१।। महादुष्ट जाण जीवहिंसा करी। अन्याय ते भारी करी फार।।२।। दुराचारी दुष्ट प्राणी अगणित। वधिले पापिष्ठे महान नष्टे।।३।। ब्रह्महत्या त्याने कोट्यवधी केल्या। परस्त्रिया भोगिल्या अगणित।।४।। लक्ष्मण म्हणे महाशैव म्हणे। धन्य अति धन्य शिवभक्ती।।५।।

२९८९. अगणित स्त्रिया भोगिल्या रे त्याने। मातेते भोगून तृप्ती नाही।।१।। माता बलात्कारे भोगितो दुर्मती। त्याच्या पापाप्रती अंत नाही।।२।। ऐसा तो पातकी महान हो दुष्ट। फार तो रे भ्रष्ट प्राणी होता।।३।। लक्ष्मण म्हणे पाप ताप दैन्य। हरी पंचानन भक्तिबळे।।४।।

२९९०. प्रदोषकाळी त्याला लिंगदर्शन घडले। नाम मुखा आले प्रेमभरे।।१।। त्याचा प्राण गेला शिवलिंगा पाहोनी। अति त्वरे मरण पावला तो।।२।। शिवनाम त्याच्या आले मुखाप्रती। तितुक्याने गती झाली त्याते।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य शिव। भक्ता महादेव गती देतो।।४।।

२९९१. शिवलिंगासन्निध गेला त्याचा प्राण। लिंगा अवलोकन केले त्याने।।१।। पातकांची होळी झाली शिवकृपे। धन्य विश्वरूप महादेव।।२।। त्याची कृपा होता मग विघ्न नाही। पतित अन्यायी सोडवितो।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते व्हा शरण। करावे भजन प्रेमभरे।।४।।

२९९२. साधूचे भाषण अमृतासमान। ब्राह्मण ऐकोन संतोषला।।१।। म्हणे महाराजा झालो मी पावन। तुमचे भाषण ऐकोनिया।।२।। धन्य तू

सद्‌गुरू धन्य तू सद्‌गुरू। स्वानंदाचे घरी वसती तुमची।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य समागम। धन्य समागम सत्पुरुषाचा।।४।।

२९९३. नमोनिया ज्ञाता झाला तो स्तविता। म्हणे पावन ताता तुझे कृपे।।१।। त्यांनी कृपा करूनि दिली शिवदीक्षा। प्रिय तो विरूपाक्षा झाला पापी।।२।। शिव शिव शब्द वदे सदोदित। पूजीतसे नित्य शिवलिंगाप्रती।।३।। लक्ष्मण म्हणे शिवमहिमा थोर। भक्ताचा शंकर त्राता सत्य।।४।।

२९९४. अती तो पातकी शिवपूजन करी। झाला तो पावन मातृगमनी।।१।। शिवपदाते गेला पूजन करोन। अमरांनी चरण वंदिले हो।।२।। शिवपदाते गेला पूजन करोन। अमरांनी चरण वंदिले हो।।३।। शिवसभेमध्ये शोभतो अन्यायी। भाग्या पार नाही त्याचिया।।४।। लक्ष्मण म्हणे आपुले समान। करी पंचानन महाश्रेष्ठ।।५।।

२९९५. शिवरहस्यात आहे हे चरित्र। बोलिला त्रिनेत्र देवीप्रती।।१।। पुढे व्यासांनी हे चरित्र वर्णिले। आनंदे तो डुले व्यास वक्ता।।२।। त्रैलोक्यात तो वक्ता आहे व्यासमुनी। प्रभोचे चरणी लीन सदा।।३।। लक्ष्मण म्हणे शिवा भक्ती प्रिय। भक्तिविण उपाय शीण मोठा।।४।।

२२. अविचारी ब्राह्मण

२९९६. कोणी एक ब्राह्मण अति अविचारी। नाना कर्मे करी द्रव्यलोभे।।१।। दुष्ट तो दान घेतसे प्रेमाने। फिरे रात्रंदिन घरोघरी।।२।। अनेकांचे दान घेतसे चोरून। लोकांते दिसू न देतो विप्र।।३।। लक्ष्मण म्हणे द्रव्य मिळविले। अन्याय हो केले लोभाकरिता।।४।।

२९९७. असो एके दिनी ग्रामाप्रती गेला। बरोबरी स्त्रीयेते घेतले हो।।१।। जाता हो मार्गाने वन ते देखिले। वृक्ष ते शोभले बिल्वाचे ते।।२।। नर्मदेतील तेथे होते बाणलिंग। नमिले लिंगाते त्याने प्रेमे।।३।। स्नान करोनिया पूजन हो केले। मन संतोषले विप्राचे त्या।।४।। लक्ष्मण म्हणे विप्र स्त्रीते म्हणे। आवडे पूजन लिंगाचे मज।।५।।

२९९८. काही पुण्य त्याचे पूर्वीचे ते होते। म्हणोनिया चित्त फिरले हो।।१।। स्त्रीयेप्रती म्हणे बरवे हे अरण्य। राहावे आपण येथे कांते।।२।। पतित मी खूप दुष्टांचा दुष्ट। घडले मम हाते पर्वत पापांचे।।३।। शिवलिंगपूजने

वृत्ती पालटली। म्हणे चंद्रमौळी पूजीन मी।।४।। लक्ष्मण म्हणे फार उदास तो। जाहला लिंगार्चनाशी लागला।।५।।

२९९९. ग्रामाप्रती गेला आणिले बाणलिंग। स्थापूनि त्याते पूजा करी।।१।। रात्रंदिन त्याते छंद तो लागला। क्षणभरी लिंगाला विसंबेना।।२।। बिल्वदळेकरून लिंग पूजीतसे। प्रेमभरे महेशा स्तवी सदा।।३।। दोन महिने त्याने केले हो पूजन। शिव पंचानन संतोषला।।४।। लक्ष्मण म्हणे आणविले विमान। आले शिवगण महाराज।।५।।

३०००. विमानी त्या सहपत्नी ब्राह्मण। नेले बसवून अति प्रेमे।।१।। स्वर्गपंथे तेव्हा गेले हो विमान। इंद्राने पूजन केले त्यांचे।।२।। विमान ते गेले ब्रह्मलोकाप्रती। धन्य शिवभक्ती अती श्रेष्ठ।।३।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मदेवे पूजन। केले भक्तिभावे भक्ती श्रेष्ठ।।४।।

३००१. कल्पपर्यंत तेथे तो राहिला। शिव संतोषला दयाघन।।१।। आपुले भृकुटीतूनि त्या जन्म दिला। नवलाव झाला भक्तिबळे।।२।। शिव कृपाघन शिव कृपाघन। प्रभोची ती महिमा न कळे कोणा।।३।। रायाचे भुवनी ठेविले ते बाळ। गौतम मुनी दयाळ आला तेथे।।४।। लक्ष्मण म्हणे गौतमांनी राजा। प्रेमे तो बोधिला सांगितले त्यासी।।५।।

३००२. अरे शिवाने हा तूते पुत्र दिला। सांभाळी बाळाला अति प्रेमे।।१।। धन्य तुझे भाग्य धन्य तुझे भाग्य। पुत्र हा निःसंग महान श्रेष्ठ।।२।। कीर्तिमान नृपती होईल हा पुढे। धन्य पशुपती महादेव।।३।। शिवभृकुटीतूनि उत्पन्न हा बाळ। याते जाश्वनीळ रक्षीतसे।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य शिवभक्ती। प्रभोची ती गती न कळे कोणा।।५।।

३००३. गौतम म्हणती याची फार होईल कीर्ती। अमरादी वंदितील बाळाप्रती।।१।। गौतमाने त्याते शिवदीक्षा दिली। फार कीर्ती झाली रायाची त्या।।२।। बलिवर्धन नाम ठेविले बालका। चक्रवर्ती झाला लक्ष स्त्रियांचा स्वामी।।३।। पतिव्रता स्त्रिया लावण्यवती अती। त्याशी न्यून नाही धन्य उमापती।।४।। लक्ष्मण म्हणे पंचलक्ष पुत्र झाले त्यासी। महान पवित्र शिवभक्त तो।।५।।

३००४. अगणित संपत्ती बलिवर्धनाशी लाभली। पृथ्वीचा नृपती झाला

महाराज।।१।। त्रैलोक्यामध्ये अति श्रेष्ठ झाला। त्याच्या वैभवाला पारचि नाही।।२।। कल्पवृक्ष कामधेनू असती घरोघरी। पतिव्रता नारी राज्यात त्याच्या।।३।। लक्ष्मण म्हणे त्रिकाळ तो विजयी। त्रिभुवनगोसावी सखा त्याचा।।४।।

३००५. पृथ्वीचे नृपती देती करभार। स्वर्गींचे अमर पूजिती त्या।।१।। सर्वत्रही प्रजा शिवभक्ती करिती। न्यून त्याप्रती न पडे काही।।२।। सोमवारव्रत प्रदोष करिती। त्रिकाळ पूजिती शिवलिंग।।३।। ग्रामोग्रामी लिंगे स्थापिती शिवभक्त। त्यांना तो अनंत सांभाळी हो।।४।। लक्ष्मण म्हणे अक्षयी आनंद। राया ब्रह्मानंद शिवकृपे।।५।।

३००६. राज्यभोग सर्व झाला संपूर्ण। प्रसन्न त्र्यंबक झाला त्याते।।१।। रायाचे ते पुत्र जाती स्वर्गाप्रती। अमर त्या पूजिती भक्तिभावे।।२।। भक्ती सर्वत्र स्थापिती सर्वा सुख देती। कोणाते विपत्ती दिसेना हो।।३।। लक्ष्मण म्हणे समर्थाची कृपा। त्याते मार्ग सोपा झाला पाहा।।४।।

३००७. लिंगपूजेविण कोणी न घेती अन्न। प्रेमे लिंगार्चन करिती शैव।।१।। तेथे अधर्माची वृत्तीच हो नाही। अक्षयी प्रभोपायी वृत्ती जडली।।२।। बिल्ववन नृपे लाविले आनंदाने। शिवालये महान निर्मिली हो।।३।। लक्ष्मण म्हणे द्रव्याचे पर्वत। वाटिती ते नित्य भक्ताप्रती।।४।।

३००८. असंख्य ती लिंगे स्थापिली त्यांनी। बिल्वाचिये वनी लिंगे फार।।१।। दान अगणित करीतसे राजा। आनंदाने प्रजा वर्ततसे।।२।। भिक्षुक ते दान घेता कंटाळले। अन्नदान केले बहु रायाने।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य तो नृपती। महान दाते येती दर्शनाप्रती।।४।।

३००९. मंदिर सुवर्णाचे त्याने उभविले। शांभव ठेविले लिंगापाशी।।१।। अक्षयी जयजयकार लिंगापाशी फार। शांभवाचे भार येती प्रेमे।।२।। वेदघोष नित्य होतो लिंगापाशी। राव शांभवासी पाळी प्रेमे।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य राजा। राजाऐशा प्रजा वर्तती हो।।४।।

३०१०. इंद्राऐसे सदन शोभे त्या रायाचे। त्याच्या वैभवाचे वर्णन नोहे।।१।। सत्कर्मावाचोन न जाय एक क्षण। धन्य नृपनंदन महान श्रेष्ठ।।२।। सर्वत्र ते पुत्र शोभती सभोवते। स्वधर्म पाळिती पितृ–आज्ञा।।३।। लक्ष्मण

म्हणे धन्य ते हो शैव। त्यांनी महादेव वश केला।।४।।

३०११. भस्म रुद्राक्ष हो सर्वांते शोभती। रविवत् कांती त्यांच्या अंगी।।१।। त्यांची सेना फार महान ते शूर। काळ जिंकणार शिवकृपे।।२।। शिव शिव शब्द ध्वनी रात्रंदिन। प्रजाही प्रवीण रायाची त्या।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य त्याची भक्ती। भक्तीपाशी मुक्ती निरंतर।।४।।

३०१२. रायाची ती सेना भस्मधारी प्राणी। रुद्राक्ष आभरणी शोभती हो।।१।। लिंगपूजेविण न घेती ते अन्न। शिवतीर्थ प्राशन करिती शैव।।२।। त्याच्या राज्यामध्ये शैवचि ते सारे। संतुष्ट महादेव भोलानाथ।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य त्याचा जन्म। प्रभोचे ते धाम घेतले हो।।४।।

३०१३. पुत्राप्रती राये धर्मनीती शिकविली। पुत्र प्रवीण झाले सर्व कर्मा।।१।। गौतम महाराज आला रायाचे सदना। महान ज्ञानी जाणा गौतम महामुनी।।२।। गौतममुनीचे पूजन केले प्रेमभावे। ज्ञानयोग त्या राये विचारिला।।३।। गौतमाच्या आज्ञे उमामाहेश्वरव्रत। केले ते विख्यात महान उत्सव।।४।। लक्ष्मण म्हणे राया ज्ञानप्राप्ती झाली। गौतममुनी महाराज गेले स्वस्थानी।।५।।

३०१४. पुत्राप्रती राज्य दिले रायाने हो। अरुणाचला जाऊन लिंग पूजिले।।१।। त्याची भक्ती पाहोन शिव तेथे आला। वेष पालटिला शिवाने हो।।२।। एकविध ऐसी भक्ती हो पाहिली। विष्णुरूप धरिले महादेवे।।३।। लक्ष्मण म्हणे गरुडावरी बैसोन। आला नारायण सन्मुख त्याच्या।।४।।

३०१५. शंख चक्र गदा आयुधे ते हाती। कंठी कौस्तुभदीप्ती प्रकाशली।।१।। तेव्हा त्या अरण्यी रायाप्रती हरी। म्हणे लौकरी माग वर।।२।। मी तुजलागी झालो रे प्रसन्न। इच्छित वरदान माग बापा।।३।। राव म्हणे तुम्ही जावे परतोन। नलगे वरदान तुमचे मज।।४।। नानापरी हरीने राया बोध केला। राजा म्हणे मजला न लागे काही।।५।। माझा तो यजमान आहे हो समर्थ। मागण्याचे तुम्हा कारण नाही।।६।। लक्ष्मण म्हणे शिव संतोषला। वेष पालटिला जगन्नाथे।।७।।

३०१६. स्वरूप पाहून राजा संतोषला। पूजन करिता झाला प्रेमभरे।।१।। देवभक्ता झाले प्रेमे आलिंगन। भक्त उचलोन हृदयी धरिला।।२।। शिवभक्त

तो हो अक्षयी भक्ती करी। मागण्याची उरी नाही काही।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती सर्वश्रेष्ठ। भक्ताने नीळकंठ जिंकिला हो।।४।।

३०१७. नर्मदातीराते राव त्वरे गेला। पूजिले लिंगाला प्रेमभरे।।१।। असंख्य ती तीर्थे तेथे ती शोभती। राये लिंगाप्रती पूजिले हो।।२।। शिव होऊनिया शिवपूजन करी। त्याते क्षणभरी विसर नाही।।३।। धन्य शिवभक्ती धन्य शिवभक्ती। भक्तीची हो मुक्ती दासी आहे।।४।। त्याचा ज्येष्ठ पुत्र चंद्रमौळी राजा। तोही वृषभध्वजा आवडे हो।।५।। त्याचा बंधू तोही प्रतापी हो थोर। त्याचे कन्या कुमर शिवभक्त।।६।। लक्ष्मण म्हणे लिंगमय झाला। त्याच्या आनंदाला पार नाही।।७।।

३०१८. शिवरहस्यात आहे हे चरित्र। भक्ताचा त्रिनेत्र सखा आहे।।१।। व्यास महामुनी महान तो भक्त। कीर्ती त्रैलोक्यात शोभे त्याची।।२।। फार परोपकारी महान अधिकारी। जगाते उद्धरी मार्ग दावी।।३।। लक्ष्मण म्हणे परोपकाराहून। साधन ते कोण श्रेष्ठ आहे।।४।।

२३. दुराचारी ब्राह्मण

३०१९. कोणी एक ब्राह्मण होता दुराचारी। जीव तो संहारी महा दुष्ट।।१।। कोटी ब्रह्महत्या केल्या त्या दुष्टाने। अगणित प्राणी वधियेले।।२।। जार चोर फार बलवान होता। चोरामाजी होता मुकुटमणी।।३।। लक्ष्मण म्हणे अरण्याचे ठायी। हिंडे तो अक्षयी शस्त्रपाणि।।४।।

३०२०. सर्वत्र ते भिल्ल त्यामाजी तो शूर। होता धनुर्धर योद्धा मोठा।।१।। फार तो उन्मत्त होता जबरदस्त। द्रव्यही बहुत मेळवी हो।।२।। त्याते दया नाही फार तो अन्यायी। कामिनीचे ठायी सक्त सदा।।३।। लक्ष्मण म्हणे कर्मभ्रष्ट होता। व्यर्थ त्याने माता शिणविली।।४।।

३०२१. उत्तम वर्णामाजी जन्मोनि अपवित्र। कधीही त्रिनेत्र स्मरिला नाही।।१।। दीपाचिये पोटी काजळ ते झाले। तैसे त्याचे गेले वय व्यर्थ।।२।। सप्त हो व्यसनी पापाचा तो निधी। नित्य जीव वधी दुरात्मा तो।।३।। लक्ष्मण म्हणे त्याते भय नाही। उन्मत्त अक्षयी जीव वधी।।४।।

३०२२. परस्त्रिया आणोनि करी बलात्कार। पापाचा सागर भरला त्याने।।१।। ब्रह्महत्यारी तो त्याते दया कैची। तेथे असत्याची वस्ती सदा।।२।।

तेथे स्वधर्म तो अनायासे बुडाला। झाला तो नरकाला अधिकारी।।३।। लक्ष्मण म्हणे दुर्बुद्धी तो फार। अक्षयी अविचार तेथे वसे।।४।।

३०२३. शूद्राहूनि शूद्र झाला तो दुर्मती। अति शूद्राप्रती भय त्याचे।।१।। थरथरा कापती लोक त्या दुष्टाते। त्याच्या अन्यायाते पार नाही।।२।। लक्ष्मण म्हणे जन म्हणती देवा। त्राता महादेवा आम्हा नाही।।३।।

३०२४. वाल्या कोळी पूर्व दुष्ट होता चोर। त्यानेही अविचार फार केले।।१।। मारिले जीव बहुत होता तो उन्मत्त। जगावरी आकांत केला होता।।२।। परि तो जार नव्हता चोरचि होता। जारामाजी नेता हा महान हो।।३।। लक्ष्मण म्हणे सर्व त्या त्रासले। म्हणती याने केले दुष्ट कर्म।।४।।

३०२५. लोक म्हणती त्याने स्त्रिया अगणित। भोगिल्या उन्मत्त फार हा हो।।१।। सर्वत्र जातीच्या स्त्रिया भोगी दुष्ट। फार हा पापिष्ट महाक्रोधी।।२।। लक्ष्मण म्हणे जन म्हणती देवा। फार कृपाळुवा ताप दिला याने।।३।।

३०२६. लोक म्हणती याचे पूर्वपुण्य फार। म्हणोनि अविचार निभतसे।।१।। याचे पुढे आता कोणाचे चालेना। दिवसेंदिवस जाणा त्याचे द्रव्यबळ वाढे।।२।। वैभवही फार वाढत चालले। याने जे जे केले ते ते होय।।३।। लक्ष्मण म्हणे जगावरी आकांत। करिती उन्मत्त फार शूर।।४।।

३०२७. जन म्हणती हा हो केवढा अन्यायी। कन्येचिये ठायी रत झाला।।१।। आपुली हो कन्या आपणचि भोगी। काही दुष्टालागी भय नाही।।२।। पुण्यवंताशीही छळी हा अपवित्र। का दुष्टावरी त्रिनेत्र कोपेना हो।।३।। कन्येशी रमला भय नाही याला। कोणीही याजला शास्ता नाही।।४।। लक्ष्मण म्हणे लोक शाप देती। परि दुष्टाप्रती लागेना हो।।५।।

३०२८. लोक म्हणती याने तपस्वी वधिले। याचे वय गेले पापामाजी।।१।। पातकी याप्रती अधिक येई जय। चालिलासे क्षय करीत हा।।२।। देवा आम्हाप्रती वालीच दिसेना। कैसे या दुर्जना करावे रे।।३।। लक्ष्मण म्हणे प्रहार प्रहार वदे। रात्रंदिन छंद हाचि मोठा।।४।।

३०२९. बहुत दिन गेले पाप अगणित झाले। पुण्य ते सरले दुष्टाचे हो।।१।। व्याधी प्राप्त झाली महाव्यथा झाली। अगणित भोगिली यातना हो।।२।। महान ते दुःख भोगिले दुष्टाने। आले त्याते मरण प्राण गेला।।३।।

अंतकाळी हर हर वदला इतुकेचि पुण्य। म्हणे लक्ष्मण नवल झाले।।४।।

३०३०. प्रहार प्रहारचि वदला अंतकाळी। परि अस्पष्ट उच्चारे हर हर नाम।।१।। प्रभोची ती लीला न कळे कोणाप्रती। अगणित कीर्ती प्रभोची हो।।२।। विमानी दोषी घातला शिवगणांनी। गेले हो घेऊनि शिवसदना।।३।। कैलासा नेऊनि स्थापिला शिवपदी। शिव कृपानिधी जगद्गुरू।।४।। लक्ष्मण म्हणे करा नामस्मरण। नामाचे महिमान मोठे आहे।।५।।

३०३१. नामस्मरण करा चुकती येरझारा। भक्ता भववारा लागेना हो।।१।। अगणित पापी नामे उद्धरिले। पुराणी वर्णिले व्यासदेवे।।२।। नाम ते फुकाचे का हो आवडेना। व्यर्थ वल्गना का हो करिता।।३।। नाम अग्नीमाजी तृण ती पातके। जळती नामसुखे गा हो शिव।।४।। लक्ष्मण म्हणे त्वरा करा करा। मिथ्या या संसारा गुंतू नका।।५।।

३०३२. शिवरहस्यात आहे हे चरित्र। बोलला त्रिनेत्र देवीप्रती।।१।। पुढे व्यासाने हो वर्णन हे केले। स्मरा हो पाउले प्रेमयुक्त।।२।। व्यासमुनी आहे त्रैलोक्य तो वक्ता। महान तो ज्ञाता परोपकारी।।३।। लक्ष्मण म्हणे सुलभ साधन। प्रयत्नेकरून नाम स्मरा।।४।।

२४. मित्रसह राजा

३०३३. मित्रसह राजा होता तो प्रवीण। ऐश्वर्यसंपन्न होता नृप।।१।। पतिव्रता त्याची भार्या ती महान। करी शिवस्मरण अती प्रेमे।।२।। प्रदोषकाळी राव कामाने गांजिला। कामासक्त झाले मन त्याचे।।३।। लक्ष्मण म्हणे कामाचा हो मारा। महा महाधीरा गांजीतसे।।४।।

३०३४. स्त्रीप्रती म्हणे मज भोग देई। प्रदोषसमयी झाले ऐसे।।१।। स्त्री म्हणे राया प्रदोष हा समय। कैसा हा अन्याय करिता स्वामी।।२।। माझे हे शरीर अपवित्र फार। मळमूत्राचे घर आहे पाहा।।३।। लक्ष्मण म्हणे बोध करी बाई। विवेक तिचे ठायी फार होता।।४।।

३०३५. मुखाप्रती पहा चंद्राची उपमा। कोठे तो चंद्रमा कोठे मुख।।१।। मुखावाटे पहा बेडके पडती। राया तुम्हाप्रती आवडे कैसे।।२।। नाकातून राया पडे हा शेंबूड। नेत्रांते चिपडे येती पहा।।३।। लक्ष्मण म्हणे महान ती सती। बोधी नृपाप्रती नानापरी।।४।।

३०३६. दुर्गंधीचे पोते नर्क भरले यात। मलमूत्र भरले यात राया।।१।। सांदोसांदी किडे आणि जंत। राहती या देहात अमंगळ ते।।२।। कफ वात यात अनेक रोग। तुम्हा त्याचा त्रास कधी उपजे।।३।। लक्ष्मण म्हणे महान ती सती। बोधी रायाप्रती प्रेमभरे।।४।।

३०३७. नवद्वारे वाहती खळखळा फार। अमंगळ देह माझा राया।।१।। पत्नी म्हणे राया विचार हा करा। प्रेमे त्या शंकरा पूजा स्मरा।।२।। गौरचर्म वरोनि मढविले न्याहाळा। तुम्हा त्याचा कंटाळा का हो नये।।३।। असार असार शरीर असार। नाही यात सार प्रभोविण।।४।। लक्ष्मण म्हणे बाई ती प्रवीण। राव तो बोधून स्थिर केला।।५।।

३०३८. स्त्री म्हणे राया प्रदोष हा काळ। पूजा जाश्वनीळ कार्य साधा।।१।। प्रदोष ही पूजा आवडे शंकरा। अती त्वरे करा लिंगपूजा।।२।। प्रदोषपूजन करी प्रेमे हरी। फार ब्रह्मचारी पूजिती नित्य।।३।। ब्रह्मदेव प्रेमे करी हो पूजन। शंकर तो पूर्ण करी भक्तमनोरथ।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती सर्वा सार। सर्वांते आधार भक्तीचा हो।।५।।

३०३९. पत्नी म्हणे राया स्वर्गीचे अमर। पूजिती गंगाधर अती प्रेमे।।१।। शिवकृपे फार सुख ते भोगिती। अक्षयी संपत्ती प्राप्त त्याहा।।२।। प्रदोषपूजन सौख्य हे स्वीकारा। प्रेमभरे पूजा तुम्ही राया।।३।। लक्ष्मण म्हणे नृप संतोषला। फार आनंद झाला रायाप्रती।।४।।

३०४०. सुसंगाचे फळ मन उलटले। राया आवडले भाषण ते।।१।। रायाते वैराग्य झाले हो उत्पन्न। करी लिंगार्चन प्रेमयुक्त।।२।। असंख्य ती लिंगे रायाने स्थापिली। शिवालये केली सुवर्णाची।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य पतिव्रता। राव तो ज्ञाता झाला पाहा।।४।।

३०४१. अक्षयी जयजयजकार होय तया स्थानी। राव शिवस्मरणी मग्न झाला।।१।। शिवलिंगापाशी शैवाची मंडळी। प्रेमे चंद्रमौळी पूजिती भक्त।।२।। रत्नाचे मंडप उभविले राये। मंदिर शिवालये उभविले।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त नामस्मरण। करिती कीर्तन कोणी एक।।४।।

३०४२. ब्राह्मणांच्या पंगती अक्षयी अन्नदान। अगणित ब्राह्मण तृप्त होती।।१।। सर्वाना अन्न देतसे नृपती। अक्षयी शिवाप्रती पूजीतसे।।२।।

द्रव्यदान पुष्कळ केले त्या रायाने। वस्त्रदान त्याने फार केले।।३।। लक्ष्मण म्हणे अक्षयी आनंद। वसे ब्रह्मानंद भक्तापाशी।।४।।

३०४३. बिल्वाची ती वने त्या राये लाविली। लिंगेही स्थापिली बिल्ववृक्षापाशी।।१।। पुष्पाच्या त्या बागा रायाने लाविल्या। शैवांप्रती दिधल्या नाना वस्तू।।२।। द्रव्याचे पर्वत नित्य वाटी राजा। फार वृषभध्वजा आवडे तो।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य त्याची पत्नी। अक्षयी शिवस्मरणी बाई ती हो।।४।।

३०४४. शिवभक्त मंडळी अक्षयी शोभली। फार कीर्ती झाली रायाची त्या।।१।। वेदघोष तेथे होय निरंतर। भक्त ते जागर करिती हो।।२।। पुराणश्रवणी बैसले कोणी प्राणी। अक्षयी नामस्मरणी कोणी रत।।३।। लक्ष्मण म्हणे महा महाज्ञानी। येती तये स्थानी प्रेमभरे।।४।।

३०४५. अक्षयी ती यात्रा शोभे लिंगापाशी। आनंद भक्तासी तेथे फार।।१।। ध्वज त्या पताका अगणित शोभती। गायन करिती कोणी भक्त।।२।। अगणित दीपमाळा शोभती लिंगापाशी। पाळितो प्रजेशी दया फार।।३।। लक्ष्मण म्हणे राव साधू झाला। कृपा त्याला फार उपजली।।४।।

३०४६. भिक्षुक ते राये तृप्त केले फार। आपण निरामय झाला राजा।।१।। श्रवण मनन आणि निजध्यास। अक्षयी रायास प्रिय झाला।।२।। महा महाज्ञानी वसती रायापाशी। तेथे वेदान्तासी काय उणे।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य नृप। अक्षयी निजरूप पाहतसे।।४।।

३०४७. रायाचा तो देश पवित्र झाला। अक्षयी जगाला भक्तिसुख।।१।। लिंगपूजेविण अन्न ते न घेती। धन्य ती शिवभक्ती धन्य भक्त।।२।। कल्पवृक्ष द्वारी कामधेनू ऐशा गाई। वसती भक्तागृही सुख फार।।३।। असत्याची वस्ती नाही हो राज्यात। लोक ते निवांत भक्तराज।।४।। पतिव्रता नारी वसती घरोघरी। पुण्य घरोघरी स्वर्गाऐसे।।५।। लक्ष्मण म्हणे धन्य शिवभक्ती। भक्तापाशी मुक्ती वसतसे।।६।।

३०४८. रायाने लोकाते भक्तीते लाविले। कल्याण हो झाले जगाचे ते।।१।। पत्नी आणि राजा गेले शिवसदना। अक्षयी ते जाणा सुख भोगी।।२।। अक्षयी ते सुख असे शिवपदी। राव ब्रह्मानंदी मग्न झाला।।३।। लक्षातीत

सुख झाले रायाप्रती। झाली प्रभोप्राप्ती स्वानंदे हो।।४।। लक्ष्मण म्हणे त्या आनंदापुढे। दिसे हो बापुडे स्वर्गपद।।५।।

३०४९. शिवरहस्यात आहे हे चरित्र। धन्य तो सत्पात्र व्यासमुनी।।१।। व्यासाने वर्णन केले प्रेमयुक्त। श्रवणे पतित उद्धरती।।२।। फार उद्धरले श्रवणे करून। करा हो श्रवण सुख होय।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तिपंथ थोर। सर्वांते आधार भक्तीचा हो।।४।।

२५. एक शिवभक्त

३०५०. कोणी एक शैव होता हो भाविक। नित्य तो त्र्यंबक पूजीतसे।।१।। लिंगपूजेविण अन्न न स्वीकारी। अक्षयी वैखरी वदे नाम।।२।। त्रिकाळ पूजन करी प्रेमयुक्त। अंगाते चर्चीत भस्म सदा।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य भक्ती। भक्तीने विरक्ती येते अंगा।।४।।

३०५१. भस्माविण अंग कदा राहो नेदी। कामाची उपाधी आवडेना।।१।। रुद्राक्ष आभरण मिरवी प्रेमयुक्त। भक्तीमाजी चित्त त्याचे वसे।।२।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य भक्ती। भक्तीने ती शांती येते अंगा।।३।।

३०५२. अष्ट सुगंधाने पूजीतसे लिंग। भक्त तो निःसंग भाविक हो।।१।। भजन पूजन करी भक्तराज। प्रेमाचे ते बीज हृदयी त्याच्या।।२।। कोणे एके दिनी बिल्व आणावया। वनाचिया ठाया गेला तो हो।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तिसुख थोर। ज्ञानाचे माहेर भक्ती आहे।।४।।

३०५३. बिल्व ते कोमल तोडिले भक्ताने। मुखे नामस्मरण करीतसे।।१।। बिल्वही पुष्कळ तोडोनि घेतले। भक्त तो सदना चालिला हो।।२।। मार्गामध्ये त्याते चोराने अडविले। कासावीस झाले प्राण त्याचे।।३।। शस्त्रपाणि दुष्ट लागला त्यामागे। होता तो निःसंग भक्तराज।।४।। लक्ष्मण म्हणे भक्त घाबरला। म्हणे हे का मला विघ्न आले।।५।।

३०५४. त्याला ते पाहोन भय प्राप्त झाले। नवल ते झाले तये स्थानी।।१।। जिवाचे ते भय आहे सर्वाप्रती। म्हणे हे दुर्मती मारतील।।२।। बिल्वाचे ते पोते टाकिले दरीत। आपण पळाला गेला पुढे।।३।। लक्ष्मण म्हणे होणार ते होय। स्मरी प्रभोपाय भक्तराज।।४।।

३०५५. त्या दरीमध्ये गुप्तलिंग होते। तेथे ते बहुत नवल झाले।।१।।

लिंगावरी पाला बेलाचा पडला। शिव संतोषला महाराज।।२।। शिव म्हणे बिल्व मज अती प्रिय। बिल्व भक्तराये वाहिले हो।।३।। लक्ष्मण म्हणे प्रभो कृपावंत। नवलाव बहुत झाला तेथे।।४।।

३०५६. शिव म्हणे मज बिल्व नित्य वाहती। त्यांच्या पुण्याप्रती पार नाही।।१।। पूर्वीही मजला पूजिले फारांनी। भक्तांच्या पुराणी कीर्ती वसती।।२।। कोमल हे दल मज अती प्रिय। धन्य भक्तराय पूजिती मज।।३।। लक्ष्मण म्हणे शिव तो दयाळ। भक्ताने स्नेहाळ जगद्गुरू।।४।।

३०५७. शिव म्हणे मज भक्ती फार प्रिय। भक्त निरामय माझे जगी।।१।। मजवरी लक्ष माझिया भक्ताचे। प्रेमे ते आमुचे पूजन करिती।।२।। प्रेमळाचा सखा जाहलो मी सत्य। आनंदे मी नित्य भक्तापाशी।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त ईश्वराते। फार आवडती प्राणाऐसे।।४।।

३०५८. शिव कृपाळू तो जाहला प्रसन्न। आनंद तो पूर्ण मानिता झाला।।१।। गणा आज्ञा करी प्रभो तो स्नेहाळ। भक्त हा निर्मळ न्यावा श्रेष्ठ।।२।। गणांनी प्रभोते नंदन हो केले। कैलासाते नेले मिरवीत।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य शिव। फार महादेव सुखदाता।।४।।

३०५९. विमान आणिले प्रेमे शिवगणांनी। प्रभो शूळपाणि संतोषला।।१।। कोटी सूर्याचा तो प्रकाश पडला। भक्त ते शिवाला स्तविती हो।।२।। नाना वाद्यघोष अप्सरा नाचती। चामरे ढाळिती शिवगण।।३।। लक्ष्मण म्हणे शिवभक्ती थोर। ज्ञानाचे माहेर भक्ती आहे।।४।।

३०६०. शिवाऐसा शैव केला हो गणांनी। स्तवोनि तयांनी तोषविला।।१।। विमान ते गेले कैलासपुराते। वंद्य तो अमरांते झाला भक्त।।२।। रत्नसिंहासनी बैसविला भक्त। फार झाला तृप्त भक्तराज।।३।। लक्ष्मण म्हणे फार त्यांनी सन्मान। भक्ताचा केला महाराज।।४।।

३०६१. शिवरहस्यात आहे हे चरित्र। धन्य तो त्रिनेत्र भक्तसखा।।१।। व्यासांनी वर्णन केले प्रेमभरे। धन्य तो व्यास रे त्रिभुवनवक्ता।।२।। ऐसे अगणित प्राणी उद्धरिले। शिवसभे गेले भक्तराज।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती करा करा। शंभो येरझारा चुकवितो।।४।।

२६. करकोटक ब्राह्मण

३०६२. करकोटक नामा होता एक ब्राह्मण। महाशैव विद्वान भाविक हो।।१।। लिंगपूजा नित्य करी अतिप्रेमे। त्रिकाळ तो नेमे भक्तराजा।।२।। भस्मरुद्राक्षाचे आभरण शोभती। प्रेमे प्रभोपती स्मरतसे।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तांमाजी शूर। प्रभोचा विसर पडो नेदी।।४।।

३०६३. बिल्व आणावया गेला भक्तराज। भक्तीचा तो फुंज मोठा अंगी।।१।। कोमल ते पत्र तोडी हो भाविक। तेथे नवलाव एक झाला पाहा।।२।। मोठे ते अरण्य विशाल भ्यासुर। श्वापदांचे भार वसती तेथे।।३।। लक्ष्मण म्हणे बिल्वाचे ते वन। तेथे तो ब्राह्मण बिल्व तोडी।।४।।

३०६४. पर्वतावरोनि राक्षस उतरला। अंगावरी धावला ब्राह्मणाच्या।।१।। पर्वतासमान शरीर विक्राळ। दिसे महाकाळ भयंकर।।२।। काजळाऐसे ते शरीर दिसतसे। लागले पाठीशी पूर्वकर्म।।३।। लक्ष्मण म्हणे कर्माची ती गती। न चुके भोगिती प्राणी जाणा।।४।।

३०६५. विक्राळ त्या दाढा भाळी तो शेंदूर। वाजे घरघर नरडे मोठे।।१।। मानवी शिरांच्या त्यांच्या कंठी माळा। हातामाजी त्याचा मोठा शूळ।।२।। पिशाच्च तो धावला अती त्वरे। ब्राह्मणास तो रे भक्षावया।।३।। लक्ष्मण म्हणे ब्राह्मणे देखिला। भस्म मंत्रिता झाला शिवमंत्रे।।४।।

३०६६. त्या दुष्टावरी भस्म ते टाकिले। अंगाशी चर्चिले आपुल्याही।।१।। शिवमंत्राचा तो मुखे कडकडाट। प्रेमे नीळकंठ स्तवी विप्र।।२।। शिवमंत्राचे अस्त्र राक्षसा लागती। ओरडे तो राक्षस दुर्मती हो।।३।। लक्ष्मण म्हणे शिवनाम थोर। सर्वांते आधार नामाचा हो।।४।।

३०६७. भस्माचे ते अस्त्र पडले दुष्टावरी। नवलचि परी झाली तेथे।।१।। ओरडला तो पापी शरीर जळाले। दिव्य देह झाला महिमा मोठा।।२।। दिव्य देह त्याचा झाला तत्क्षणी। लागे तो चरणी दुरात्मा हो।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य ही विभूती। धन्य तो पशुपती महाराज।।४।।

३०६८. धन्य तुम्ही शैव शिवाचे हो दास। अक्षयी तुम्हास शिव वश।।१।। तुमचा महिमा महान अद्भुत। धन्य उमाकांत महादेव।।२।। नामाचा महिमा महान अद्भुत। धन्य उमाकांत महादेव।।३।। नामाचा महिमा शंकरचि जाणे। अक्षयी नामस्मरण तुम्हाप्रती।।४।। लक्ष्मण म्हणे राक्षस दुर्मती।

त्याते उपरती झाली पहा।।५।।

३०६९. धन्य ते सद्भक्त महिमा त्यांचा थोर। ब्रह्मांडा आधार भक्तांचा हो।।१।। लोह-परिसाचा दृष्टांत साजेना। धन्य धन्य जाणा भक्तराज।।२।। परीस लोखंडाचे सुवर्ण हो करी। हेचि परिसाची थोरी जाणा।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य भक्त। भक्ता उमाकांत वश झाला।।४।।

३०७०. कल्पवृक्षाची ती उपमा न साजे। धन्य धन्य निजभक्त ते हो।।१।। साधुदर्शने तो पापी झाला पवित्र। म्हणे मज शापी भक्तराया।।२।। बहुत या वनी म्या जीव भक्षिले। अन्याय ते केले फार बापा।।३।। लक्ष्मण म्हणे पश्चात्ताप झाला। प्रेमे तो शैवाला वदता झाला।।४।।

३०७१. ब्राह्मण भक्षिले म्या रे या वनात। फारांचे म्या घात केले स्वामी।।१।। फार अपराधी फार अपराधी। तुम्ही कृपानिधी सोडविले।।२।। तुमच्या उपकारा नाही पारावार। तुम्ही त्या शंकरा आवडता।।३।। लक्ष्मण म्हणे स्तवी बद्धपाणि। वारंवार चरणी लागतसे।।४।।

३०७२. पूर्वी महाराज गंधर्व मी होतो। गर्वे मी उन्मत्त दुराचारी।।१।। शरीरलावण्याचा मज होता गर्व। कधी महारुद्र स्मरिला नाही।।२।। आपुल्या वैभवाने झालो अति मस्त। अन्याय बहुत केले ताता।।३।। लक्ष्मण म्हणे खेद फार करी। म्हणे दुराचारी फार मी हो।।४।।

३०७३. गायनाचा फुंज माझे अंगी मोठा। प्रेमे नीळकंठा पूजिले नाही।।१।। शैवांच्या मी निंदा करी रात्रंदिन। वैभवाने फार अज्ञान अंगी।।२।। हाल्या जैसा मस्त तैसा मी उन्मत्त। दुःख म्या बहुत दिले भक्ता।।३।। लक्ष्मण म्हणे फार अपराधी। शिवभक्ता निंदी वारंवार।।४।।

३०७४. शैवाप्रती मी हो निष्ठुर बोले सदा। का हो ही आपदा भोगीतसा।।१।। कस्तुरी चंदन न लाविता अंगा। भस्माचा वाउगा लेप देता।।२।। राख लावण्याने काय होय प्राप्त। गर्दभ राखेत लोळती ते।।३।। ऐसी मी हो त्यांची हेटाळणी करी। अन्यायी मी भारी द्वेषी फार।।४।। लक्ष्मण म्हणे वैभवाने गर्व। त्याते कैचा देव आवडे हो।।५।।

३०७५. फार पाप झाले छळता छळता। आली उन्मत्तता माझे अंगी।।१।। महान तो शैव होता अरण्यात। परम शिवभक्त भाविक हो।।२।। तेथे म्या

जाऊन छळले त्या भक्ता। वर्ते मी अन्याय पदोपदी।।३।। लक्ष्मण म्हणे द्वेष हा घातक। द्वेषाने अनेक पापे होती।।४।।

३०७६. गंधर्व तो वदे गेलो त्याहापाशी। म्या त्या भक्ताशी छळले हो।।१।। तोही श्रेष्ठ होता विवेकी हो धीर। न बोले उत्तर काही एक।।२।। निष्ठुर बोललो फार निंदा केली। म्हणोनि ही झाली गोष्ट ऐसी।।३।। शाप त्यांनी दिला म्हणे हो राक्षस। अरण्यी बहुत दिवस राहे।।४।। लक्ष्मण म्हणे कर्म बळिवंत। कर्माने ते प्राप्त दुःख झाले।।५।।

३०७७. गंधर्व म्हणे ताता म्या त्या विनविले। शापमुक्त मजला करा म्हणूनि।।१।। साधू तो दयाळू उःशाप दिधला। भक्तदर्शने तुजला होईल गती।।२।। महाराजा तुम्ही मज सोडविले। शापमुक्त केले मोठा उपकार।।३।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त दयाळ। त्यांना जाश्वनीळ रक्षीतसे।।४।।

३०७८. शैवाते नमोन गंधर्व तो गेला। स्तवीत भक्ताला स्वर्गपंथे।।१।। शिवरहस्यात आहे हे चरित्र। सखा तो त्रिनेत्र होतो श्रवणमात्रे।।२।। धन्य व्यासमुनी महा परोपकारी। जगाचा उद्धार करीतसे।।३।। लक्ष्मण म्हणे धरा भक्तिपंथ। भक्तीने समर्थ वश होतो।।४।।

२७. कामातुर ब्राह्मण

३०७९. आर्यखंडामध्ये होता एक ब्राह्मण। पत्नी त्याची प्रवीण पतिव्रता।।१।। सौभाग्यसंपन्न सौख्य ते भोगिती। दोघांची प्रीती परस्परावरी।।२।। उभयता बैसले तेथे नवल झाले। कामाने पीडिले ब्राह्मणाप्रती।।३।। लक्ष्मण म्हणे काम हा विकार। झोंबला अनिवार ब्राह्मणाशी त्या।।४।।

३०८०. प्रदोषकाळी त्याची बिघडली वृत्ती। काम हा दुर्मती अनिवार।।१।। म्हणे तो ब्राह्मण भोग मज देई। विलंब तू मुळी करू नको।।२।। लक्ष्मण म्हणे पतिव्रता थोर। म्हणे स्वामी स्थिर गोष्टी ऐका।।३।।

३०८१. स्त्री म्हणे स्वामी प्रदोषसमय। स्वस्थ निरामय असावे हो।।१।। प्रदोषकाळाचा महिमा अद्भुत। जाणे रमाकांत महाविष्णू।।२।। प्रदोषसमयी विष्णू पूजन करी। ब्रह्मदेव करी लिंगार्चन।।३।। दिक्पाल दिशेचे कुबेरादी सर्व। पूजिती महादेव स्वस्थ चित्ते।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य पतिव्रता।

पतिमनोगता जानती हो।।५।।

३०८२. स्त्री म्हणे स्वामी प्रदोषकाळी पूजन। करिता सधन होती प्राणी।।१।। सर्व ऐश्वर्य देतसे शंकर। भक्ती निरंतर घेतसे हो।।२।। या काळी दितीने भोगिला कश्यप। पुढे ती दुःखाला कारण झाली।।३।। लक्ष्मण म्हणे पतिव्रता बाई। पतीते शिकवी नाना युक्ती।।४।।

३०८३. कश्यपाने तीते बोध केला फार। परि तिने विचार केला नाही।।१।। कामाने गांजिली रमली स्वामीसी। म्हणोनि हो तिजसी दैत्य पुत्र।।२।। स्वामी सावध व्हा हो अति त्वरे करून। दुःखाशी कारण आहे हे हो।।३।। माझे शरीर विष्ठामूत्रेकरून। भरले दारुण दुर्गंध हो।।४।। लक्ष्मण म्हणे बाई ती विवेकी। पतीप्रती सुखी केले तिने।।५।।

३०८४. तुमचे शरीर काळ हो भक्षील। व्यर्थ हो जाईल भक्ती करा।।१।। हस्ताने पूजन करा दानधर्म। तेणे हो पावन होईल स्वामी।।२।। नाही तरी काष्ठासमान हे हस्त। भक्तीविण व्यर्थ पहा स्वामी।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य ती हो बाई। विवेक तिचे ठायी फार होता।।४।।

३०८५. स्त्री म्हणे स्वामी हे काम हो करा। नका या संसारा गुंतू आता।।१।। श्रवणे प्रभोचे गुणगान ऐका। नेत्राने त्र्यंबका पाहा प्रेमे।।२।। मुखाने प्रभोचे करा नामस्मरण। पादाने भ्रमण तीर्थयात्रा।।३।। लक्ष्मण म्हणे नानापरी युक्ती। शिकवी तिची भक्ती धन्य धन्य।।४।।

३०८६. स्त्रीयेचे भाषण ऐकोनि ब्राह्मण। संतोष मानून घेता झाला।।१।। म्हणे स्त्री ही हो फार प्रवीण। आम्हाप्रती ज्ञान सांगतसे।।२।। लक्ष्मण म्हणे ब्राह्मण म्हणे कांते। तुज पतिव्रते ज्ञान झाले।।३।।

३०८७. कोठून हे तुज प्राप्त हे गे ज्ञान। वैराग्य हे पूर्ण तुज प्राप्त।।१।। आम्ही गे पुरुष पढोनि चुकलो। फार भांबावलो शीण झाला।।२।। स्त्री म्हणे पूर्वी होते मी कुमारी। मायबापाजवळी खेळतसे।।३।। बिल्ववृक्ष एक मज गवसला। मी त्या वृक्षाला पाणी घाली।।४।। लक्ष्मण म्हणे पती ऐके गोष्टी। म्हणे धुर्जटी धन्य धन्य।।५।।

३०८८. स्त्री म्हणे स्वामी मी नित्य पूजन। करी भावेकरून वृक्षाचे त्या।।१।। तेणेकरून मजला फार सौख्य झाले। ऐश्वर्य भोगिले

जन्मोजन्मी।।२।। तीनशे जन्मांचा मज आहे स्मर। वैभव अपार भोगिले म्या।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य भक्ती। भक्ताने पशुपती जिंकिला हो।।४।।

३०८९. ब्राह्मण म्हणे कांते फार तू प्रवीण। मजला पावन केले त्वा गे।।१।। वैराग्य त्या विप्रा झाले तत्क्षणी। अक्षयी स्मरणी रत झाला।।२।। फार त्या विप्राते आनंद हो झाला। मिथ्या वैभवाला मानिता झाला।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य भक्ती। भक्ताने पशुपती जिंकिला हो।।४।।

३०९०. असो तो ब्राह्मण विषया विटला। धिक्कार मानिला वैभवाचा।।१।। म्हणे खोटे खोटे सर्व दिसे खोटे। राज्य सोडोनि मोठे मोठे राजे गेले।।२।। खोट्याते भुलोनि खरे गमाविले। दुर्धर ही भ्रांती पडली जगा।।३।। लक्ष्मण म्हणे सत्य आकळले। वैभव मानिले मिथ्या त्यांनी।।४।।

३०९१. ब्राह्मण म्हणे पाहा हृदयी शंकर। अक्षयी सबराभर दिसे तात।।१।। त्याते कोणी प्राणी न पाहती। प्रभोचे सूत्र न कळे त्या अपवित्रा।।२।। मृगजळवत् दिसे हा संसार। येथे दंगा फार दिसतसे।।३।। लक्ष्मण म्हणे उदास तो झाला। मनी विचार करी पुढे।।४।।

३०९२. शिवस्तुती करी म्हणे धन्य हर। भक्ताते तो फार सुखदायी।।१।। बिल्वाचा तो वृक्ष स्त्रियेने लाविला। तेणे संतोषला कृपासिंधू।।२।। तीनशे जन्मांचा तीते स्मर झाला। निरंतर भक्ती ती करीतसे।।३।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त शूर। सर्वांते आधार भक्तीचा हो।।४।।

३०९३. माझिये स्त्रियेला प्रभोकृपा झाली। केवढी दिधली पदवी हीते।।१।। सौख्य नाही शरीरा प्रभुकृपेविण। स्वानंदजीवन शिवचि आहे।।२।। आता शंभोराया वेगी त्वरा करा। सोडवा पामरा वेगी आम्हा।।३।। लक्ष्मण म्हणे प्रभोचा महिमा। न कळे तयासी भक्ती प्रिय।।४।।

३०९४. प्रभोचे भक्त पूर्वी फार झाले। शिवसभे गेले भक्तिबळे।।१।। भक्तिपंथाहून काही श्रेष्ठ नाही। भक्तांनी अक्षयी भक्ती केली।।२।। शंकरकृपेने तृप्त वृत्ती झाली। संपत्ती वाटिली त्यांनी सर्व।।३।। लक्ष्मण म्हणे उभविले मंदिर। शिवलिंग थोर स्थापिले हो।।४।।

३०९५. शिव संतोषला त्याचे भक्तिकरोन। ब्राह्मणा विमान पाठविले।।१।।

कोटी सूर्यप्रभा दिव्य ते विमान। आले शिवगण महाराज।।२।। स्त्री पतिव्रता धन्य तो ब्राह्मण। उभयताकारण स्तविले गणे।।३।। दिव्य देह दिले नेले कैलासाते। शिवपदी त्याते स्थापिले हो।।४।। शिवरहस्यात आहे ही हो कथा। भक्त विश्वनाथा आवडती।।५।। लक्ष्मण म्हणे व्यास महामुनी। स्तविती ईश्वराशी प्रेमभरे।।६।।

२८. महाशैव ब्राह्मण

३०९६. कोणी एक होता महाशैव ब्राह्मण। प्रेमे महादेव पूजीतसे।।१।। शिवलिंग त्रिकाळ पूजी आनंदाने। स्वानंदाचा कंद स्मरे सदा।।२।। अती प्रेमा त्याचा शिवलिंगावरी। नाम तो उच्चारी मुखी सदा।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तिपंथ थोर। ज्ञानाचे माहेर भक्त आहे।।४।।

३०९७. अति प्रेम त्याचे लिंगाचिये ठायी। विषयासक्ताचे जेवी कामिनीवरी।।१।। जारीण ती जैसी सक्त जारावरी। तैसा तो हो शैव लिंगी रत।।२।। धनलोभियाचे लक्ष द्रव्यापाशी। तैसे लिंगापाशी मन त्याचे।।३।। लक्ष्मण म्हणे पतिव्रतेचे चित्त। पतिचरणी रत जैसे तैसे।।४।।

३०९८. बैसता उठता ध्यास तो लिंगाचा। आणिक कर्माचा छंद नाही।।१।। आसनी शयनी नयनी लिंग दिसे। परमात्मा महेश जगद्गुरू।।२।। त्रिकाल पूजन नित्य प्रेमेकरून। प्रेमभरे पूजी अर्ची देवा।।३।। लक्ष्मण म्हणे विषयी उदासीन। सर्वदा निमग्न पूजेमध्ये।।४।।

३०९९. रुद्राक्ष आभरण सर्व अंगा भस्म। मुखे शिवनाम घेतो भक्त।।१।। भोगावरी सक्त नसे तो हो प्राणी। स्त्री त्याची तरुणी पतिव्रता।।२।। दास्यत्व ती करी अती प्रेमभरे। रात्रंदिन ती वसे पतीजवळी।।३।। परि त्या पुरुषाशी विकारचि नाही। वृत्ती लिंगाठायी निमग्न झाली।।४।। लक्ष्मण म्हणे स्त्री म्हणे देवा। गती कृपाळुवा करू कैसी।।५।।

३१००. माझा हा भ्रतार याचे सार्थक झाले। मन हे ठेविले लिंगापाशी।।१।। लिंगमय वृत्ती तीते चळ नाही। गृहकर्माविषयी शून्य पडले।।२।। माझिया मनाते ध्यास हो पुत्राचा। आता या कर्माला काय करू।।३।। लक्ष्मण म्हणे देवा विनवी बाई। मज त्राता नाही तुजविण।।४।।

३१०१. पती ती सेवा करी आनंदाने। शिवाचे चिंतन करीतसे।।१।।

पूजन करोन भक्त बाहेर आला। तिने हो पाहिला एकांती तो।।२।। महाराजा तुमचे सार्थक हो झाले। मन तुमचे झाले लिंगमय।।३।। लक्ष्मण म्हणे पतिव्रता भ्रतारा। म्हणे तुम्ही ईश्वरा प्रिय झाला।।४।।

३१०२. तुमचे लिंगमय झाले अंत:करण। भोग हा वमनवत् झाला तुम्हा।।१।। मन विषयाते स्वीकारीना काही। पूजनाविषयी दक्ष आहा।।२।। धन्य धन्य स्वामी तुमचे जीवित्व। अक्षयी महत्त्व मेळविले।।३।। लक्ष्मण म्हणे स्त्री म्हणे भ्रतारा। मीही त्या शंकरा पूजीन नित्य।।४।।

३१०३. पुसोनि भ्रतारा बाई ती निघाली। महाशैवा गेली शरण माता।।१।। महाशैवाशी तिन शरण जाऊन। पतीचे वर्तमान निवेदिले।।२।। महान तो साधू त्यासी दया आली। म्हणे ही माउली पतिव्रता।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तिबळ थोर। भक्तीचा आधार सर्वाप्रती।।४।।

३१०४. बिल्वाचे ते वन तेथे शैव फार। वदती हर हर रात्रंदिन।।१।। महान ते भक्त लिंगपूजा करिती। पुराणे वाचिती प्रेमे कोणी।।२।। त्यामाजी श्रेष्ठ होता साधू थोर। सर्वदा निर्घोर महान ज्ञाता।।३।। बाई ती सुभगा त्याते शरण गेली। त्याने कृपा केली तिजवरी।।४।। लक्ष्मण म्हणे गुरुमंत्र दिधला। मंत्र पंचाक्षरी तिजला प्रेमे।।५।।

३१०५. पूजेचे विधान सांगितले त्यांनी। बाई ती प्रेमाने पूजा करी।।१।। सुभगेचा गुण आवडे गुरुप्रती। धन्य तिची मती सात्त्विक ती।।२।। आधीच सुवर्ण वरी जडले रत्न। सद्गुरू तो पूर्ण भेटला तीते।।३।। लक्ष्मण म्हणे बाणलिंगाचे पूजन। करी प्रेमेकरून अष्टभावे।।४।।

३१०६. पतीऐसे तिचे धारिष्ट्य जाहले। प्रेमयुक्त केले तिने पूजन।।१।। सुसमागम असे रात्रंदिन। प्रेमे ती भजन करी बाई।।२।। धन्य ती सुभगा तिचा पती थोर। महिमा अपार त्या भक्ताचा।।३।। लक्ष्मण म्हणे शिव तिजजवळी। येऊनि चंद्रमौळी काय बोले।।४।।

३१०७. तरुण ब्राह्मण झाला चंद्रमौळी। एकांती तिजजवळी आला तो हो।।१।। लावण्यपुतळा मदनाऐसी कांती। भाषण सुभगेप्रती करिता झाला।।२।। तुमचे लावण्य हे फार सुंदर। का हो तुम्ही भक्तीचे श्रम करिता।।३।। लक्ष्मण म्हणे बोले नाना युक्ती। तुम्ही का विपत्ती भोगिता

येथे।।४।।

३१०८. चंद्राऐसे वदन दिसे हो तुमचे। विषयभोगाचे वय आहे।।१।। पतीचा भोग नाही संपादिला। व्यर्थ या वयाला गमाविले।।२।। दिव्य हे शरीर चालिले गे व्यर्थ। पती तो समर्थ तुझा आहे।।३।। भोग वेगी भोगी ते साधन करी। व्यर्थ का सुंदरी कष्टी होशी।।४।। पतीते तू भोगी यात सुख नाही। जावे लवलाही प्रार्थी पती।।५।। लक्ष्मण म्हणे तो म्हणे पूजन। व्यर्थ हे करून काय लाभ।।६।।

३१०९. सुभगा म्हणे तुम्ही व्यर्थ का जळता। मज ह्या हो कथा नावडती।।१।। भक्ती मी करीन अती प्रेमेकरून। मज पंचानन सांभाळील।।२।। शरीर अती ते दुर्गंधीचे घर। अपवित्र फार जायमान।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य पतिव्रता। विकार तिचे चित्ती नसेचि हो।।४।।

३११०. ब्राह्मण म्हणे फार हे लावण्य। व्यर्थ गमवावे योग्य नाही।।१।। भोगाकरिता देह हा दिधला प्रभोने। तू प्रीतीने भोग भोगी।।२।। कामातुर गोष्टी ऐकोनि सुभगा। म्हणे बोध मज वाउगा करू नका।।३।। फार बोलू नका देईन मी शाप। मज विश्वरूप प्रिय आहे।।४।। मज विषयाची काही इच्छा नाही। भाषण ते काही रुचेना हो।।५।। लक्ष्मण म्हणे चमकला ब्राह्मण। म्हणे ही प्रवीण पतिव्रता।।६।।

३१११. तिचा पती थोर विरक्त केवळ। कृपेचे ते फळ तिज झाले।।१।। सद्गुरू भेटले कृपा ती लाधली। आनंदाची झाली वस्ती तेथे।।२।। कृपेचे ते फळ श्रेष्ठ सर्वामध्ये। पुण्य ते अगाध श्रेष्ठ श्रेष्ठ।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य शिवभक्ती। भक्तीने विरक्ती प्राप्त झाली।।४।।

३११२. पतीऐसे चित्त झाले सुभगेचे। शिवपूजेचे ते फळ श्रेष्ठ।।१।। काम जाऊनिया निष्काम ती झाली। लिंगी वृत्ती जडली सौख्य झाले।।२।। त्या सुखाची चव घेती भक्तराज। स्वानंदाचा फुंज त्यांच्या अंगी।।३।। योगियाचे फळ होय भक्तिबळे। भक्तीने निर्मळ होय वृत्ती।।४।। लक्ष्मण म्हणे ब्राह्मणवेषात शिव। म्हणे धन्य धन्य हिची भक्ती।।५।।

३११३. शिव कृपाघन भक्ताते सांभाळी। धन्य चंद्रमौळी म्हणे भक्ती।।१।। पती पत्नी दोघे नेले शिवपदाते। अक्षयी त्याते सुख दिधले।।२।। धन्य धन्य

भक्ती धन्य ती विरक्ती। धन्य पशुपती महाराज।।३।। लक्ष्मण म्हणे शिवरहस्यात। कथिले शुकताते चरित्र हे।।४।।

२९. भिल्लिणीचा उद्धार

३११४. कोणी एक भिल्लीण वसे अरण्यात। भिल्ल ते उन्मत्त वसती तेथे।।१।। नित्य काष्ठाची हो मोळी विकूनि ती। तेणे प्रतिपाळी मुलेबाळे।।२।। तृणाचे ते भारे नेऊनिया विकी। फळमूळही विकी भक्षी काही।।३।। तिचे मार्गावरी होते शिवालय। कोणी भक्तराय येती पूजनाते।।४।। शिवलिंग होते फार पुरातन। तेथे शैवजन येती प्रेमे।।५।। लक्ष्मण म्हणे नित्य जयजयकार। भक्त तेथे फार येती पूजना।।६।।

३११५. रुद्राचे अभिषेक करिती भक्तजन। प्रेमे ते चंदन अर्पिती हो।।१।। अक्षता तांदूळ अर्पिती शंकरा। बिल्व विश्वंभरा समर्पिती।।२।। पुष्प सुगंधित वाहती प्रेमाने। धूप निरंजन समर्पिती।।३।। लक्ष्मण म्हणे नैवेद्य तांबूल। अर्पिती प्रेमळ भक्तियुक्त।।४।।

३११६. अक्षयी नंदादीप शोभे लिंगापाशी। वाद्ये अहर्निशी वाजती हो।।१।। दीपमाळ देवापाशी हो शोभती। भजन करिती कोणी भक्त।।२।। शैवाचे ते भार येती लिंगापाशी। पूजिती प्रभोशी अतिप्रेमे।।३।। बिल्वाचे ते वृक्ष शोभती सभोवते। बाग ती शोभती पुष्पाची हो।।४।। लक्ष्मण म्हणे अक्षयी शिव शब्द। भक्तीचा आनंद वर्णवेना।।५।।

३११७. त्रिकाळ पूजन करिती भक्तराज। टाकूनिया लाज नाचती भक्त।।१।। बिल्वाच्या लाखोळ्या कोणी हो वाहती। नानापरी स्तुती करिती भक्त।।२।। कर्पूराचे दीप लाविती हो भक्त। कोणी घृतदीप लाविती हो।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तिसुख थोर। भक्तीचे ते सार सेविती हो।।४।।

३११८. अन्नदान तेथे होतसे हो फार। पूजेचा गजर नित्य तेथे।।१।। शैवाचिया पंगती होती प्रेमभरे। सर्वाते अन्न ते देती भक्त।।२।। वेदघोष तेथे होती हो पुराणे। प्रेमे ते कीर्तन करिती भक्त।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त सत्त्वधीर। करिती जयजयकार ब्रह्मानंदे।।४।।

३११९. तत्त्वज्ञानी कोणी तत्त्वाचे वर्णन। करिती प्रेमेकरून ज्ञानी भक्त।।१।। ब्रह्मज्ञानी कोणी ब्रह्मचर्चा करिती। आत्मा पाहती हो सर्वांभूती।।२।। श्रवण

मनन करिती कोणी भक्त। भक्त सदोदित आनंदती।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तिबळ थोर। भक्तांचा आधार ब्रह्मांडाते।।४।।

३१२०. मोळी घेऊनिया भिल्लीण मार्गाने। जाताना नमन करी लिंगा।।१।। जाऊनि ग्रामात मोळी विकी बाई। मार्गाने अक्षयी जात होती।।२।। कोणी एके शैवे पूजिले लिंगाते। अती प्रेमयुक्त प्रेमभरे।।३।। लिंगापुढे प्रेमे नाचला आनंदे। प्रेमे ब्रह्मानंदे भक्तराज।।४।। तेथे ती भिल्लीण आली पाहती झाली। नमस्कार तिनेही केला लिंगासी।।५।। शैवाते पाहोन आपणही नाचली। शिव शिव वदली प्रेमभरे।।६।। लक्ष्मण म्हणे झाला चमत्कार। तेणे तो शंकर संतोषला।।७।।

३१२१. केली गणा आज्ञा आणविले विमान। करिती स्तवन महागण।।१।। रत्नमय विमान आणिले बाईपाशी। शिवगणे तियेसी वंदिले हो।।२।। कोटी सूर्यप्रभा प्रकाश पडला। जयजयकार झाला तये स्थानी।।३।। आपुले समान केली ती हो बाई। भक्ताते अक्षयी सुख प्राप्त।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तमहिमा थोर। अक्षयी शंकर भक्तापाशी।।५।।

३१२२. ऐसे अगणित प्राणी उद्धरिले। दयार्णव झाले भक्तिबळे।।१।। कैलासशिखरा गेले ते विमान। स्वानंदजीवन तेथे वसे।।२।। आनंदाचे धन सदा भक्त घेती। भक्ताची ती गती न कळे कोणा।।३।। चरित्र हे आहे शिवरहस्यात। अगणित भक्त उद्धरिले।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती करा त्वरे। वैभव शंकर देतो तात।।५।।

३०. कुष्ठरोग्याचा उद्धार

३१२३. हिमालय पर्वताकडील ब्राह्मण। होता एक प्रवीण महाराज।।१।। स्वधर्मी तो रत श्रेष्ठ होता प्राणी। शिवनामस्मरणी रत होता।।२।। भस्म रुद्राक्ष तो वागवी अंगावरी। लिंगार्चन करी नित्य नेमे।।३।। लक्ष्मण म्हणे महाराज साधू होता। काशीयात्रे ज्ञाता निघाला हो।।४।।

३१२४. त्याचे बरोबर यात्रा होती फार। वदती हर हर प्रेमभरे।।१।। त्याच्या बरोबर भक्त मंडळी। आनंदे त्रिनेत्र स्तविती हो।।२।। प्रात:स्नान करिती लिंगार्चन करिती। बिल्वदळे वाहती लिंगावरी।।३।। अस्तमानी नित्य करिती कीर्तन। वेदान्ती प्रवीण महाज्ञानी।।४।। लक्ष्मण म्हणे करिती

जयजयकार। चालिले विश्वंभर पाहावया।।५।।

३१२५. त्यांचे मार्गावरी एक कुष्ठरोगी। पडला अमंगळ अती पापी।।१।। सर्वांगा किडे दुर्गंधी चालली। कधी चंद्रमौळी स्मरिला नाही।।२।। लक्ष्मण म्हणे अती अपराधी। आक्रंदे तो व्याधीने महाभ्रष्ट।।३।।

३१२६. मोठ्याने तो रडे पडला मार्गावरी। अन्यायी तो भारी दुष्ट होता।।१।। यात्रेकरू पाहती त्यासी दया उपजे। दुर्गंधीही येई शरीराची त्याच्या।।२।। दयाळू तो साधू आला त्याच्या जवळी। म्हणे चंद्रमौळी कैसे झाले।।३।। लक्ष्मण म्हणे सत्पुरुष दयाळ। म्हणे जाश्वनीळ कोपला या।।४।।

३१२७. सत्पुरुष म्हणे कर्म अनिवार। दुःखरूप संसार दिसे हा हो।।१।। पातकी तळमळी अती दुःख त्याते। कोण वाली याते ऐसे स्थानी।।२।। हात पाय खोडी घाबरा हो होय। म्हणे म्या अन्याय फार केले।।३।। लक्ष्मण म्हणे सत्पुरुषाते म्हणे। पातकी मी पूर्ण दोषसिंधू।।४।।

३१२८. म्हणे महाराजा ब्रह्महत्या फार। केल्या मी पामर फार आहे।।१।। साधुदर्शने पश्चात्ताप झाला। वंदन सत्पुरुषाला केले त्यांनी।।२।। केले कर्म सांगे म्हणे मी अन्यायी। माझ्या पापा नाही गणना स्वामी।।३।। लक्ष्मण म्हणे पातकी तो बोले। म्हणे म्या कर्म केले नाही बरे।।४।।

३१२९. माता म्या भोगिली बलात्कारेकरून। कन्याही भोगून तृप्ती नाही।।१।। मद्यमांसाचा मी भक्षक दुर्मती। आता माझी गती कैसी प्रभो।।२।। स्त्रिया म्या भोगिल्या अंत्यजाच्या फार। अन्याय कोठवर सांगू आता।।३।। लक्ष्मण म्हणे गडबडा तो लोळे। अती तळमळे यातना फार।।४।।

३१३०. म्हणे महाराजा सोडवा सोडवा। उपाय कृपाळुवा करा काही।।१।। केले कर्म आता भोगावे लागेल। कोणावरी बोल काय बापा।।२।। सुख दुःख हे हो कर्मेकरोन प्राप्त। कर्मे म्या अद्भुत केली ताता।।३।। लक्ष्मण म्हणे साधुदर्शने। पश्चात्ताप पूर्ण झाला त्याला।।४।।

३१३१. दोषी म्हणे मज तुमचे दर्शन। होणार कोठून नवल झाले।।१।। लेंडी ओव्हाळावरी जैसी गंगा आली। तैसी गती झाली माझी आता।।२।। आता मज भय न दिसे हो ताता। वैद्य तू माता भवरोगासी।।३।। लक्ष्मण म्हणे काही पूर्वपुण्य। होते हो म्हणोन भाषण सुचले।।४।।

३१३२. दोषी म्हणे ताता सद्गुरू दयाळा। मजसी निर्मूळ करी आता।।१।। लोखंडाप्रती तो परीस हो भेटे। लोखंडत्व तेथे कोठे राहे।।२।। लोहपरिसाचा दृष्टांत साजेना। सद्गुरू रे पूर्ण दयाळू तू।।३।। लक्ष्मण म्हणे भाषण ऐकोन। सत्पुरुष प्रसन्न झाला त्याते।।४।।

३१३३. कृपेकरूनिया त्याते अवलोकिले। साधन सांगितले सुलभ हो।।१।। टाकिले भस्म त्याच्या अंगावर। म्हणे चंद्रमौळी स्तवी बापा।।२।। शिव शिव शब्द नित्य वदी रे। याने शुद्ध बा रे होशील तू।।३।। लक्ष्मण म्हणे सत्पुरुष प्रसन्न। झाला कृपाघन महाराज।।४।।

३१३४. महामंत्र दिधला तुजला म्या बा रे। शैव तो बोले कुष्ठरोग्याशी।।१।। या मंत्रेकरून पापी उद्धरले। शिवसभे गेले महादोषी।।२।। शिवनाम अग्नी पापतृण जाळी। होय चंद्रमौळी सखा त्वरे।।३।। लक्ष्मण म्हणे सत्पुरुष म्हणे। करा नामस्मरण अती प्रेमे।।४।।

३१३५. सप्तकोटी मंत्र त्यामाजी हा सार। भक्त निरंतर जपती बा रे।।१।। आता अति त्वरे जप हर हर। साधनाचे सार कार्यसिद्धी।।२।। महाशैव महाप्राज्ञ हो जपती। त्यांना सिद्धी प्राप्त होय येणे।।३।। लक्ष्मण म्हणे छंद त्या लागला। शिव शिव वदता झाला शिवचि तो।।४।।

३१३६. दोषियासी गुरुकृपा लाभली। कार्यसिद्धी झाली गुरुकृपा।।१।। अती प्रेमभरे जपे तो शिवनाम। नामोच्चारे अधम शुद्ध झाला।।२।। दुःख त्याचे गेले मिळाले औषध। पाप ताप दग्ध झाले पाहा।।३।। लक्ष्मण म्हणे फुकाचे साधन। द्रव्याचे कारण नाही त्याते।।४।।

३१३७. नामस्मरण करिता त्याचा प्राण गेला। दोषी तो झाला भक्तराज।।१।। नामामृतापुढे अमृत फिके दिसे। स्मरा तो महेश भक्तत्राता।।२।। त्रिविध तापाचा संहार तो करी। पापाची ती उरी उरेना हो।।३।। लक्ष्मण म्हणे शिव कृपाघन। धाडिले विमान दोषियाला।।४।।

३१३८. कोटी सूर्यप्रभा प्रकाश पडला। महान आनंद झाला गणांप्रती।।१।। दशभुज त्रिनयन शिवा हो समान। आले शिवगण महाराज।।२।। अप्सरा नाचती नारद तुंबरु गाती। शिव शिव वदती महागण।।३।। लक्ष्मण म्हणे महादोषी भक्त। केला शिवाऐसा शिवनामे।।४।।

३१३९. स्वर्गपंथे विमान गेले मिरवत। अमरांनी त्याते वंदिले हो।।१।। कैलासशिखरा नेला शिवसभेसी। सन्मानिती त्यासी महागण।।२।। धन्य ती शिवभक्ती धन्य तो शंकर। करितो उद्धार दोषियांचा।।३।। लक्ष्मण म्हणे करा नामस्मरण। प्रभो भक्ताधीन आहे तात।।४।।

३१४०. काशीयात्रा ती गेली काशीप्रती। म्हणती धन्य भक्ती शिवाची हो।।१।। काशीवास करूनि राहिले ते शैव। सखा महादेव त्यांचा तो।।२।। शिवरहस्यात आहे हे चरित्र। धन्य तो त्रिनेत्र भक्तसखा।।३।। लक्ष्मण म्हणे महान तो ज्ञाता। धन्य धन्य वक्ता तिही लोकी।।४।।

३१. शिवभक्त भिल्ल

३१४१. कोणी एक ब्राह्मण होता शिवभक्त। प्रभोस्मरणी रत होता प्राणी।।१।। ग्रामाते चालिला अती तातडीने। त्याते भिल्लाने हो अडविले।।२।। मारावया भिल्ल आला ब्राह्मणाते। म्हणे वधीन तुजला या शस्त्राने।।३।। ब्राह्मण म्हणे मी शिवभक्त। मज मारिता कोपेल त्र्यंबक तुजवरी।।४।। लक्ष्मण म्हणे हात आवरी भिल्ल। नमन शैवाशी करिता झाला।।५।।

३१४२. भस्मधारी होता शैव तो चतुर। रुद्राक्षांच्या माळा कंठी त्याच्या।।१।। शैव बोले भिल्ला भस्मरुद्राक्षधारी। शिवपूजन करी तोचि शैव।।२।। नित्य शिवाप्रती बिल्वपत्र अर्पी। तोचि शैव तारी जगाप्रती।।३।। लक्ष्मण म्हणे भिल्ल संतोषला। नीती पुसता झाला शैवाप्रती।।४।।

३१४३. भिल्लाप्रती शैव म्हणे रे प्रवीणा। ऐक विचक्षणा भक्तिमार्ग।।१।। नित्य लिंगाप्रती आनंदे पूजावे। नाम मुखे घ्यावे प्रेमभरे।।२।। लिंगाचा नैवेद्य सेवावा आपण। लिंगपूजेविण राहू नये।।३।। शैवाते पुसोन निघाला तो भिल्ल। म्हणे भक्तिबळ श्रेष्ठ होय।।४।। भिल्लाप्रती नेम लागता पूजेचा। रात्रंदिन त्याचा भाव लिंगी।।५।। लक्ष्मण म्हणे बिल्वाचिये वनी। हिंडे शूळपाणि पूजीतसे।।६।।

३१४४. लक्ष शैव एकदा आले त्या अरण्यात। त्यांनी लिंग तेथ पूजियेले।।१।। भिल्लाचा हा नेम लिंगार्चनाचा होता। बिल्व उमाकांता वाही तो।।२।। सर्वांशी नमून भिल्ल तो निघाला। बिल्वदळ तोडी अति आदरे।।३।। बिल्वाप्रती द्रोण मोठा भिल्लाने केला। बिल्वपत्रे ठेविली त्यामध्ये।।४।।

लक्ष्मण म्हणे शिव पंचानन। सूक्ष्मरूपे करून राहिला त्या द्रोणी।।५।।

३१४५. स्नान करोनिया भिल्ल पूजन करी। प्रेमा लिंगावरी त्याचा फार।।१।। बिल्वार्चने त्याने केले हो पूजन। नैवेद्य केला अर्पण मांसाचा हो।।२।। मृत्युंजय शिव त्याते प्रसन्न झाला। माग म्हणे त्याला इच्छित ते।।३।। लक्ष्मण म्हणे भिल्ल आनंदला। म्हणे देवा मजला भक्ती देई।।४।।

३१४६. राज्यवैभव हे तव जायमान। येथे दिसे शीण फार मोठा।।१।। म्हणून नित्य नेमे लिंग पूजीतसे। मुखी नामघोष करितो हो।।२।। गुरू शैवाप्रती कथिले भिल्लाने। म्हणे पंचानन प्रसन्न झाला।।३।। लक्ष्मण म्हणे शैव आनंदला। म्हणे प्रभोलीला अघटित।।४।।

३१४७. ब्राह्मण म्हणे मज मारू आला। तोचि पहा ज्ञाता झाला शूर।।१।। मतिहीन असूनि प्रभो प्रसन्न झाला। त्याते वर दिला महान हो।।२।। आपुला प्राण वाचवावा म्हणून। उपदेशिले पूजन धन्य झाला।।३।। लक्ष्मण म्हणे गुरु-आज्ञा घेऊन। गेला तो सर्वज्ञ भिल्ल वना।।४।।

३१४८. बिल्ववृक्षापाशी आला तो धावोन। वृक्षा एका पान नाही तेथे।।१।। शिवे माया केली वृक्षाची पाने गेली। गेला लवलाही वना दुज्या।।२।। त्याही अरण्यात वृक्षा पान नाही। म्हणे करू गती कैसी आता।।३।। लक्ष्मण म्हणे फार कष्टी झाला। फिरोनि शिणला उष्ण मोठे।।४।।

३१४९. तृष्णा त्या लागली मुख पडले कोरडे। झाले कासावीस प्राण त्याचे।।१।। शिवे माया केली त्या हो वनी फार। शीतल पाणी निर्मिले तेथे।।२।। छायाही शीतळ पाणीही शीतळ। वृक्ष हो दिव्य तये स्थानी।।३।। लक्ष्मण म्हणे भिल्ल म्हणे देवा। बिल्व कृपाळुवा का न मिळे।।४।।

३१५०. वृद्ध शैवाचे रूप हो धरून। आला पंचानन भिल्लापाशी।।१।। म्हणे अरे भिल्ला फळे भक्षी ही रे। पाणी शीतल रे प्यावे बापा।।२।। पाणी त्वरे पी हे वाचवी आपुला प्राण। व्यर्थ का पाण्याविण मरतोसी।।३।। लक्ष्मण म्हणे भिल्ल हो ऐकेना। वृद्ध त्या सज्जना बोध करी।।४।।

३१५१. भिल्ल म्हणे पूजन केल्याविण। मी न करी जलपान ऐक ताता।।१।। शरीर हे आहे मिथ्याभूत बा रे। कधीही जाईल नासोनिया।।२।। अरे हे शरीर असार असार। दुर्गंधीचे घर केवळ खोटे।।३।। लक्ष्मण म्हणे निर्धार त्याचा

थोर। धन्य भक्त शूर महाराज।।४।।

३१५२. पूर्वी फार गेले आपण जाणार। धिक्कार धिक्कार शरीराचा।।१।। प्रभोचे पूजन राहिले राहिले। व्यर्थ वय गेले माझे आता।।२।। माझिया भक्तीत फार विघ्न आले। अन्याय म्या केले पूर्वक्रम।।३।। लक्ष्मण म्हणे पाणी तो पेईना। गोष्टही ऐकेना वृद्धाची त्या।।४।।

३१५३. वृद्ध म्हणे अरे शरीर हे सार। नाही मिळणार पुन:पुन्हा।।१।। शरीर रक्षावे अति यत्नेकरोन। बहुत पुण्येकरून प्राप्त झाले।।२।। शरीरा सांभाळी वाचवी तू प्राण। नंतर पूजन करी बापा।।३।। लक्ष्मण म्हणे बहुतापरी बोध। करीतसे वृद्ध परि ऐकेना तो।।४।।

३१५४. वृद्ध म्हणे पूर्वी फार भक्त झाले। शरीर रक्षिले त्यांनी रे।।१।। शरीर सांभाळून करावी रे भक्ती। शास्त्रेही बोलती रे धर्माधर्म।।२।। शरीर हे पुन:पुन्हा न मिळे भक्ता। त्वरे बापा रे जलपान करी।।३।। लक्ष्मण म्हणे नाना युक्तीकरोन। वृद्ध तो भाषण करीतसे।।४।।

३१५५. वृद्ध म्हणे आता व्यर्थ का मरसी। फार यत्ने यासी सांभाळावे।।१।। जैसी धेनू प्रेमे वत्साते सांभाळी। धावोनि जवळी येतसे।।२।। अनेक हे जन्म दु:खासी कारण। येथे सौख्य पूर्ण प्राप्त होय।।३।। याची तू उपेक्षा करू नको बापा।। प्रिय विश्वरूपा नरदेह हा।।४।। लक्ष्मण म्हणे वृद्ध तो शिणला। भाषण भिल्लाला मानेना त्या।।५।।

३१५६. भिल्ल म्हणे ताता माझा एक निर्धार। पूजिलियाविण शंकर तृप्ती नाही।।१।। तनुमनधन म्या त्या अर्पिले। शरीर लाविले भक्तिपंथा।।२।। धिक्कार या शरीरा शिवभक्तीविण। काय हे सार्थक राहोन हो।।३।। लक्ष्मण म्हणे निर्धार तो खरा। भक्त त्या शंकरा आवडती।।४।।

३१५७. वृद्धाने नवल मांडिले त्या स्थळी। झाला चंद्रमौळी प्रकट तो।।१।। कोटी सूर्यप्रभा पडला प्रकाश। आलिंगी भक्तास म्हणे तू धन्य।।२।। वामांगी पार्वती त्रैलोक्यजननी। धन्य शूळपाणि भक्तसखा।।३।। लक्ष्मण म्हणे लळे नानापरी। पुरवी त्रिपुरारी जगद्गुरू।।४।।

३१५८. केली गणा आज्ञा आणविले विमान। भक्त पंचवदन केला कृपे।।१।। नेला कैलासाते स्थापिला शिवचरणी। धन्य शूळपाणि महाराज।।२।।

गणांमाजी त्यांचा होतसे सन्मान। अमरादींनी वंदन केले त्या हो।।३।। लक्ष्मण म्हणे शिवभक्ती थोर। महिमा अपार भक्तीचा हो।।४।।

३१५९. शिवरहस्यात आहे हे चरित्र। बोलिला त्रिनेत्र देवीप्रती।।१।। व्यासांनी ते प्रेमे सांगितले सुता। धन्य व्यास वक्ता महाराज।।२।। भक्तिरस फार यामाजी असे हो। न्यून सुधारस या रसापुढे।।३।। भक्ताचिया कथा शोभती शोभती। भक्ती प्रभोप्रती अती प्रिय।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य तो शंकर। भक्ताचे माहेर सत्य सत्य।।५।।

३२. दुष्ट भिल्ल

३१६०. कोणी एक भिल्ल होता अति जार। अन्याय तो फार करीतसे।।१।। ब्रह्महत्या फार केल्या त्या दुष्टाने। मार्गाशी जाऊन वधी प्राणी।।२।। बलाढ्य हो होता राजियाच्या नगरा। गेला आकांता प्रर्वतला।।३।। लक्ष्मण म्हणे तस्कर अविचारी। राजाचे नगरी राहिला होता।।४।।

३१६१. गुप्तरूपे चोर रायाचे मंदिरी। राहिला अविचारी अति दुष्ट।।१।। अन्याय तो भारी करिता झाला भिल्ल। रायाते मारिले निद्रेमाजी।।२।। रायाची स्त्री उचलोनि आणिली। मोठी गर्दी केली गावावरी।।३।। लक्ष्मण म्हणे तस्कर अनिवार। करी दंगा फार जगावरी।।४।।

३१६२. अती तो उन्मत्त स्त्रिया भोगी बहुत। राजपत्नी ती हो भोगिता झाला।।१।। तया पुत्र बलवान हो होता। त्याते ही वार्ता कळली हो।।२।। शिकारीप्रती तो गेला होता दूर। मागे हा हो थोर दंगा झाला।।३।। लक्ष्मण म्हणे धावोनि तो आला। अनर्थ देखिला महान हो।।४।।

३१६३. बापाचे क्रियाकर्म केले पुत्राने। दुःख ते दारुण त्याते झाले।।१।। पितृवध करोनि गेला तो भिल्ल। कर्म दुष्ट केले दुष्टाने ते।।२।। असो आता मज याचा खेद नाही। मारीन अन्यायी अती त्वरे।।३।। माझी माता गेली अपकीर्ती झाली। कैसा चंद्रमौळी कोपला हो।।४।। लक्ष्मण म्हणे कर्माची ती गती। न चुके कल्पांती कर्म श्रेष्ठ।।५।।

३१६४. भिल्लाचिया ग्रामी आला सेना घेऊन। ग्रामावरी विघ्न करिता झाला।।१।। भिल्ल तो दुर्मती तेथूनि निघाला। पळोनिया गेला वनाप्रती।।२।। कुटील दुर्जन अती तो दुर्मती। त्याच्या पापाप्रती पार नाही।।३।। लक्ष्मण

म्हणे अन्यायी तो फार। सेविले दुर्धर वन त्याने।।४।।

३१६५. राजाने हो त्याचे नगर लुटिले। भिल्ल ते पळाले सर्वत्रही।।१।। क्षेत्री राजा थोर प्रतापी तो होता। महान योद्धा होता अनिवार।।२।। धनुर्विद्येमाजी होता तो प्रवीण। स्वरूप लावण्य चतुर होता।।३।। लक्ष्मण म्हणे काही गृहदशा। म्हणोनि ह्या ऐशा गोष्टी घडल्या।।४।।

३१६६. काळ फिरलिया न होती गोष्ट होय। ते समयी उपाय न चाले काही।।१।। कर्म बळिवंत न चुके कोणाते। महान दुःख ते भोगिती हो।।२।। हरिश्चंद्र ऐसे झाले हो जर्जर। दुःखी तो अपार नळराजा।।३।। लक्ष्मण म्हणे कर्म मोठे बळी। कर्माची ती होळी भक्ती करी।।४।।

३१६७. असे राजा तो हो भिल्ल पाहतसे। भिल्ल न दिसे शोध करी।।१।। चमूबरोबरी फिरतसे वनी। भिल्ल तो लपोनि राहिला।।२।। तस्कराते वन लपोनि राहिले। त्याप्रती युक्ती लपण्याची।।३।। लक्ष्मण म्हणे राव कोपारूढ। म्हणे मारीन मूढ तस्कर तो।।४।।

३१६८. महान एक दरा तेथे तो लपला। राव उतरला वनामाजी।।१।। हेर पाठविले पाहावया करिता। दुष्ट तो लपता झाला तोही।।२।। तस्करांनी युक्ती केली एक तेथे। राजा तो समर्थ आला वनी।।३।। लक्ष्मण म्हणे वन ते विक्राळ। वाहतसे जळ जेथे तेथे।।४।।

३१६९. बिल्वाची झाडी होती त्या दऱ्यात। भिल्ल तो हो आला तेथे त्वरे।।१।। जिकडे तिकडे राजाची फौज। गेला वृक्षावर भीतीमुळे।।२।। रायाची माता बरोबरी होती। तीही वृक्षावरी बैसविली।।३।। लक्ष्मण म्हणे रात्री तो अंधार। तेथे तो तस्कर बैसला हो।।४।।

३१७०. बिल्ववृक्षाप्रती बिल्वपत्र दाट। म्हणोनि तस्कर तोडोनि टाकी।।१।। निद्रा त्याते नये राजाचिया भये। प्रभोचे लाघव न कळे कोणा।।२।। बिल्वपत्रे तोडी टाकी खाली। पडती कोठे त्यासी ठावे नाही।।३।। लक्ष्मण म्हणे नवल तेथे झाले। अघटित घडले घडू नये ते।।४।।

३१७१. बिल्ववृक्षातळी नारदलिंग होते। त्यावरी पडती बिल्वदळे।।१।। शिवरात्री दिन महापर्वकाळ। भक्त स्थळोस्थळी पूजिती लिंग।।२।। नारदलिंगावरी पडला तो बेल। शंभो तो स्नेहाळ संतोषला।।३।। चारी प्रहर

रात्री बिल्वपत्र ते पडती। पूजन मानिले ते सदाशिवे।।४।। लक्ष्मण म्हणे भवरोगा औषध। मिळाल्या आनंदचि होय पुढे।।५।।

३१७२. रायाप्रती कळले आला तो धावून। सकळ सैन्य घेऊनिया।।१।। पाहिला तो भिल्ल बाण ते सोडिले। भिल्लाते मारिती सर्वत्र ते।।२।। शर त्याच्यावर सर्वांनी सोडिले। नाही त्या लागले नवल झाले।।३।। नाना अस्त्र तेथे टाकीतसे राव। तेथे तो नवलाव झाला ऐसा।।४।। लक्ष्मण म्हणे थकला नृपती। म्हणे न कळे गती याची ही हो।।५।।

३१७३. सर्वत्रांनी तेव्हा केला हल्ला फार। शरावरी शर सोडिती हो।।१।। अस्त्रविद्या सरली शस्त्राने मारिती। परि त्या भिल्लाप्रती लागेना हो।।२।। राजा मनी फार श्रमला तो थोर। कोणता विचार चालेना हो।।३।। लक्ष्मण म्हणे आश्चर्य करिती लोक। त्याते शस्त्र एक लागेना हो।।४।।

३१७४. वज्रदेही झाला काय करावे त्याला। भिल्ल वृक्षी बैसला पाहती सर्व।।१।। नारदलिंगावरी पाला तो टाकिला। इतुक्याने याला बळ आले।।२।। पातकी हा फार केले अविचार। धन्य तो ईश्वर महादेव।।३।। लक्ष्मण म्हणे अचंबा करिती। नानापरी युक्ती करिते झाले।।४।।

३१७५. शिवरात्री दिन महापर्वकाळ। पूजा ती सकळ पावली शिवा।।१।। शिवरात्री पर्व महान ते श्रेष्ठ। आनंद नीळकंठ मानिता झाला।।२।। भिल्ल उद्धरिला कृपेकरूनिया। भक्ती शंभोराया आवडे हो।।३।। लक्ष्मण म्हणे महान अपराधी। उद्धरी कृपानिधी पूजन करा।।४।।

३१७६. अनंत पातकी पूजेने उद्धरिले। भजने तारिले फार प्राणी।।१।। श्रवणेकरून फार उद्धरिले। शिवसभे गेले महाराज।।२।। शिवाचा महिमा अगणित अगणित। कोणा त्याचा अंत कळेना हो।।३।। लक्ष्मण म्हणे भस्मधारणेने। कित्येक रुद्राक्षाने उद्धरिले।।४।।

३१७७. राजा तो शिणला आपुले नगरा गेला। म्हणे शंकरलीला अघटित।।१।। रायाचे त्या तेज पडेना त्यावरी। राजा विवेकी भारी गेला ग्रामा।।२।। रावही तो प्रेमे करी लिंगार्चन। त्याचेही कल्याण फार झाले।।३।। लक्ष्मण म्हणे राजमाता भिल्ल। तारिले विश्वनाथे महिमा मोठा।।४।।

३१७८. शिवरहस्यात चरित्र जुनाट। धन्य नीळकंठ महाराज।।१।। व्यासांनी

वर्णन केले प्रेमयुक्त। धन्य शुकतात व्यासमुनी।।२।। धन्य शिवभक्त धन्य शिवभक्ती। प्रभोची ती गती न कळे कोणा।।३।। लक्ष्मण म्हणे अन्यायी मी फार। कृपे शंकर बोलवितो।।४।।

३३. सत्त्वपरीक्षा

३१७९. कोणी एक ब्राह्मण होता शिवभक्त। अति प्रेमयुक्त पूजी शिवा।।१।। त्याचा प्रेमा अति लिंगावरी प्राण। महान सर्वज्ञ भक्तराज।।२।। लोभियाचे चित्त जैसे धनावरी। तैसा लिंगावरी प्राण त्याचा।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य भक्ती। भक्तांनी पशुपती जिंकिला हो।।४।।

३१८०. जारिणीचे चित्त जैसे जारावरी। त्याते क्षणभरी विसंबेना।।१।। तिचे अंत:करण अहोरात्र तेथे। असे ती तल्लीन मनोभावे।।२।। लक्ष्मण म्हणे तैसा तो सद्भक्त। लिंगी अती सक्त मनोभावे।।३।।

३१८१. धेनू वनी चरे चित्त वत्सापाशी। न विसंबे त्यासी धावे त्वरे।।१।। तान्हुले ते वत्स त्यास्तव प्रेमे धावे। तैसे हे लागावे मन लिंगी।।२।। त्या शैवाचे मन रात्रंदिन लिंगी। तेथेचि निमग्न तो महाराज।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य भक्त शूर। महिमा अपार भक्ताचा हो।।४।।

३१८२. पतिव्रता नारी पतिसेवा करी। तेवी त्रिपुरारी पूजितो भक्ता।।१।। एकविधा भक्ती विसरेना शिव। भक्त महादेवा आवडती।।२।। माकोडा तो जेवी गुळाते सोडीना। तैसा प्राण जाय भक्ताचा तो।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य नाम सार। दयाळू तो फार भक्तराज।।४।।

३१८३. महान तो भक्त शिव फार प्रिय। प्रभोचे ते पाय स्मरी सदा।।१।। भस्म रुद्राक्ष हो आभरणे शोभती। पूजी पशुपती प्रेमभरे।।२।। ग्रामाबाहेर लिंग होते नर्मदेश्वर। वृक्षही सुंदर शोभती तेथे।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तमहिमा थोर। भक्ताचा शंकर सखा आहे।।४।।

३१८४. बाणलिंग श्रेष्ठ महिमा अपार। बोलिला ईश्वर देवीप्रती।।१।। स्वयंभू ते लिंग म्हणे विश्वंभर। आनंदाचे घर लिंग आहे।।२।। नित्य शैवभक्त अति आनंदाने। करी हो पूजन महाराज।।३।। लक्ष्मण म्हणे बिल्वाची ती जाळी। होती लिंगाजवळी सुंदर ती।।४।।

३१८५. महिमा लिंगाचा भक्त ते जाणती। पूजनाते येती भक्तराज।।१।।

शिवालय ते थोर भोवता प्राकार। शैव निरंतर वसती तेथे।।२।। शिव शिव शब्दाचा नामघोष। वाचिती पुराण वसती तेथे।।३।। लक्ष्मण म्हणे शिवा भक्ती प्रिय। प्रभो निरामय भक्ता वश।।४।।

३१८६. महाशैव भक्त ब्राह्मण लिंगाजवळी। प्रेमे चंद्रमौळी पूजीतसे।।१।। त्रिकाळ पूजन करिती नित्य नेमे। त्या हो न दुजे काम रुचे।।२।। बिल्वदळेकरून नित्य पूजा करी। स्तवी पशुपती वारंवार।।३।। रुद्राचा अभिषेक त्रिकाळ तो करी। प्रेमा त्याचा भारी लिंगावरी।।४।। षोडशोपचारे करी हे पूजन। आनंदे कीर्तन करी प्रेमे।।५।। दीपमाळ लावी लिंगासभोवती। आलिया अतिथी भोजन दे तो।।६।। लक्ष्मण म्हणे होता ज्ञानवान। विवेकी तो पूर्ण केवळ साधू।।७।।

३१८७. सुसंगतीने प्राणी सुखी होती। आनंद पावती भक्तीचा हो।।१।। दया शांती क्षमा वसे त्याजजवळी। प्रभो चंद्रमौळी स्मरे सदा।।२।। स्मरण मनन करी तो भक्तजन। असे रात्रंदिन स्मरणी देवाच्या।।३।। लिंगाते लाखोळी वाहती सद्भक्त। कोणी ते ध्यानस्थ शिवाजवळी।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य ते भुवन। महान ते पुण्यवंत येती तेथे।।५।।

३१८८. नवविधा भक्ती जाणती ते भक्त। स्वानंदी ते तृप्त सदोदित।।१।। भक्तिसुखाचा हो भोक्ता तो शंकर। भक्तापाशी स्थिर राजयोगी।।२।। आनंद आनंद महान आनंद। भक्ता ब्रह्मानंद होय प्राप्त।।३।। लक्ष्मण म्हणे भक्ती जेथे स्थिर। तेथे उमावर वसे बापा।।४।।

३१८९. महापूजा तेथे झाली आनंदाने। उत्सव तो महान झाला तेथे।।१।। सर्वांचे भोजन झाले आनंदाने। इच्छित भोजने झाले तृप्त।।२।। फार रात्र झाली सर्वत्र झोपले। आला चंद्रमौळी विप्रवेशे।।३।। लक्ष्मण म्हणे त्वरे देई अन्न। चालिला रे प्राण माझा आता।।४।।

३१९०. छळावया आला ब्राह्मण वेषेकरून। साधूप्रती म्हणे अन्न देई।।१।। गडबडा तो लोळे म्हणे अन्न अन्न। इच्छित भोजन घेईन म्हणे।।२।। कोठे अन्न नाही किंचित राहिले। त्यानेच उडविले सत्त्व घेण्यास्तव।।३।। लक्ष्मण म्हणे तळमळे तो फार। म्हणे मज लवकर अन्न देई।।४।।

३१९१. सत्पुरुषाने अन्न आणिले अतित्वरे। पाक तो सुंदर निर्मिला

हो।।१।। पायस हो अन्न निर्माण करून। घातले भोजन विप्राप्रती।।२।। भोजन करूनि विप्र संतोषला। म्हणे या साधूला छळू नये।।३।। लक्ष्मण म्हणे शिवा दया आली। मूर्ती प्रकटली दिव्य तेथे।।४।।

३१९२. कोटी सूर्यप्रभा शिव प्रकटला। स्वानंदे भक्ताला आलिंगिले।।१।। दिव्य ते विमान आणले अती त्वरे। गण ते शोभले महाराज।।२।। नाना वाद्ये ते हो वाजती आनंदे। स्तविती प्रेमानंदे भक्ताला त्या।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य शिवभक्ती। भक्तीपाशी मुक्ती शोभती हो।।४।।

३१९३. शिवा हो समान शिवाचे ते गण। महा ते प्रवीण महाराज।।१।। आपुले समान केला तो ब्राह्मण। इच्छा त्याची पूर्ण केली ताते।।२।। गण त्या भक्तावरी चामरे ढाळिती। अप्सरा नाचती प्रेमयुक्त।।३।। नारद तुंबर गायन करिती। भक्ताप्रती स्तविती अतिप्रेमे।।४।। लक्ष्मण म्हणे शिवभक्त श्रेष्ठ। सखा नीळकंठ महाराज।।५।।

३१९४. शिवपदाते नेला भक्त आनंदाने। अमरांनी वंदन केले त्याते।।१।। दिव्य सिंहासनी बैसविला भक्त। सत्कार बहुत होतसे त्याचा।।२।। मुक्ती भक्तापाशी आनंदे विराजे। महान ते तेज शोभे अंगी।।३।। लक्ष्मण म्हणे शिवरूप झाला। आनंदे बैसला सिंहासनी।।४।।

३१९५. शिवरहस्यात आहे ही हो कथा। भक्त विश्वनाथा आवडती।।१।। धन्य व्यासमुनी धन्य व्यासमुनी। परोपकारी ज्ञानी महाराज।।२।। श्रवणमात्रे प्राणी पापी उद्धरती। सौख्य पावती श्रवणेकरून।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तिपंथ थोर। भक्तांनी शंकर जिंकिला हो।।४।।

३४. शिवभक्त स्त्री

३१९६. कोणी एक ब्राह्मण अति अविचारी। कर्मभ्रष्ट भारी मलीन तो।।१।। अति जार होता सप्त तो व्यसनी। दुरात्मा दुर्गुणी महान तो।।२।। अरण्याचे ठायी गेला तो अन्यायी। अधर्माविषयी दक्ष मोठा।।३।। तेथे सरोवर होते एक सुंदर। पाहोनि सत्वर आला तेथे।।४।। लक्ष्मण म्हणे चांडाळी ती स्थान। तेथे निवांत करीत होती।।५।।

३१९७. चांडाळीजवळी आला तो ब्राह्मण। तीते पाहोन संतोषला।।१।। बैसला तो तेथे महारीण ती म्हणे। जावा हो उठोन त्वरे तुम्ही।।२।। तुम्ही

उत्तम वर्ण आहा हो ब्राह्मण। आम्हा न्हाता अवलोकून काय लाभ।।३।। मी आहे हीन अंत्यज जातीची। वृत्ती हो तुमची बिघडली।।४।। वस्त्र नाही आता माझ्या अंगावरी। उठून जावे झडकरी विप्रवरा।।५।। लक्ष्मण म्हणे ती बोधी नानापरी। फार अविचारी ब्राह्मण तो।।६।।

३१९८. ब्राह्मण तो म्हणे मज भोग देई। तुझी प्रीती मज वाटे बरी।।१।। चांडाळी ती म्हणे मी तव पतिव्रता। कोणासी भाषण करीत नाही।।२।। माझा तो भ्रतार उन्मत्त तो क्रूर। जाये अति त्वरे बोलू नको।।३।। लक्ष्मण म्हणे झाला कामातुर। दुष्टे अविचार केला तेथे।।४।।

३१९९. बलात्कार केला त्याने तिजवरी। महा दुराचारी होता तो हो।।१।। तिचा तो भ्रतार आला तयेवेळी। होता बहुबळी शस्त्रपाणि।।२।। शस्त्राने हो त्याचा घ्यावा जव प्राण। स्त्री ती भाषण करिती झाली।।३।। नका त्याते मारू आहे तो ब्राह्मण। नरकासी कारण होईल हो।।४।। लक्ष्मण म्हणे नानापरी बोधी। होती ती चतुर सावध हो।।५।।

३२००. स्त्रीयेचे भाषणे सोडिला ब्राह्मण। अत्यंत सदना गेला त्वरे।।१।। मातीचे ते लिंग करी ती महारीण। गुप्तरूपे पूजन करिती झाली।।२।। असो एके दिनी मेली ती महारीण। यमाने तिजकारण पुन्हा जन्म दिला।।३।। विदर्भराजाची केली ती कुमरी। भक्ताची हो थोरी पाहा श्रेष्ठ।।४।। लक्ष्मण म्हणे भक्ती महाश्रेष्ठ। भक्तीने समर्थ जीव होतो।।५।।

३२०१. राजकुमारी झाली ती प्रवीण। जन्मता स्मरण राहिले तीते।।१।। रायाने जन्मविधी संस्कार। केला उत्सव थोर तो हो।।२।। याचकाशी तृप्त केले त्या रायाने। सर्वत्रा कारण हर्ष झाला।।३।। द्रव्य वस्त्र त्याने भिक्षुकाते दिले। विप्र आनंदले शैव ते हो।।४।। लक्ष्मण म्हणे भक्तिबळ थोर। भक्तीचा आधार सर्वत्राते।।५।।

३२०२. मुलीप्रती छंद सर्वदा भक्तीचा। भस्मधारणेचा अति प्रेमा।।१।। रुद्राक्ष आभरण घाली अंगावर। बागे त्या माझारी खेळे कन्या।।२।। आपुल्या हाताने बिल्व पुष्प तोडी। अती हो आवडी पूजनाची।।३।। लक्ष्मण म्हणे राजा म्हणे बाई। तू हे कर्म काई करितेसी।।४।।

३२०३. रत्नाची आभरणे काढून ठेविसी। भस्म का लावसी तू गे

अंगा।।१।। रुद्राक्षाच्या माळा गळ्यात घालीशी। तुझे लक्षण मजसी आवडेना।।२।। बिल्ववनामाजी फिरसी आवडीने। वस्त्रभूषणी आवड नाही।।३।। कन्या म्हणे ताता पूर्वी मी महारीण। चोरून लिंगार्चन करीत होते।।४।। मृत्तिकेचे लिंग पूजी मी चोरून। त्या पूजनेकरून जन्म हा माझा।।५।। लक्ष्मण म्हणे राव संतोषला। आनंद जाहला रायाप्रती।।६।।

३२०४. रावही भाविक होता तो दयाळू। म्हणे जाश्वनीळ पूजावा हो।।१।। कनकाचे लिंग केले अति त्वरे। कन्या प्रेमे बा रे लिंग पूजी।।२।। शैवाचा आदर फार बाई करी। बागेमाझारी गेली ती।।३।। तेथे एक शैव होता प्रवीण महान। त्याते पूजोन शरण गेली।।४।। पंचाक्षरी मंत्र दिधला बाईते। आनंदे शिवाते पूजिती झाली।।५।। लक्ष्मण म्हणे पूजन स्मरण। अक्षयी अन्नदान होय तेथे।।६।।

३२०५. बिल्वाचे ते वन लाविले बाईने। अति प्रेमाने ती भक्ती करी।।१।। मणिमय लिंग स्थापिले भक्तीने। पुष्पाचे वन लाविले हो।।२।। नर्मदालिंग स्थापिले बिल्ववृक्षातळी। शिवभक्त मंडळी वसती तेथे।।३।। सुवर्ण मंदिर केले लिंगाप्रती। शैव लिंगाप्रती पूजिती हो।।४।। लक्ष्मण म्हणे राव आनंदला। प्रेमा त्या रायाला भक्तीचा हो।।५।।

३२०६. रत्नमय लिंग उभविले मंदिर। सुवर्णप्राकार शिवालया।।१।। त्रिकाल पूजन करीतसे बाई। शैव तये ठायी अगणित।।२।। नाना उपचारे पूजिती शंकर। आनंदाचा सार कळा येथे।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य धन्य भक्ती। भक्त पशुपती पूजिती हो।।४।।

३२०७. नाना वाद्ये तेथे वाजती सुस्वरे। होतो जयजयकार महान भक्ती।।१।। पुराण वेदघोष होती निरंतर। आनंदाचे घर मंदिर ते।।२।। नामघोष तेथे अखंड ती भक्ती। श्रवण मनन करिती भक्तराज।।३।। लक्ष्मण म्हणे भक्त ते नाचती। आनंदे स्तविती शिवाप्रती।।४।।

३२०८. रत्नाचे ते दीप शोभती तये ठायी। कर्पूर अक्षयी जळे तेथे।।१।। दीपमाळा तेथे अगणित शोभती। घृतयुक्त ज्योती शोभती त्या।।२।। षोडशोपचारे लिंग ते पूजिती। शैव सर्व वसती लिंगापाशी।।३।। लक्ष्मण म्हणे त्रिकाल पूजन। करिती भक्तीने भक्तराज।।४।।

३२०९. इच्छाभोजन तेथे मिळे सर्वाप्रती। दानाची गणती कोण करी।।१।। इच्छित ते दान देतसे ती बाई। न्यून कशाचेही तेथे नाही।।२।। स्वर्गभुवनाऐसे शोभे ते हो स्थान। भक्त लिंगार्चन करिती सदा।।३।। लक्ष्मण म्हणे महिमा अपार। झाला विश्वंभर कृपाळू तो।।४।।

३२१०. सुवर्णाचा रथ रत्नजडित केला। लक्ष चाके त्याला बसविली।।१।। अगणित पताका कलश शोभती। ध्वज अनेक शोभले वरी।।२।। स्वर्गलोकी जैसा रथ तो जाहला। अमर त्या रथाशी पाहती हो।।३।। लक्ष्मण म्हणे शोभा तेथे फार। स्वर्गीचे अमर धन्य म्हणती।।४।।

३२११. रत्नाचे ते दीप शोभती रथावरी। आनंद होई पाहता सोहळा हो।।१।। रथावरी शिवमूर्ती ती स्थापिली। शेजारी अर्धांगी हिमात्मजा।।२।। रत्नसिंहासन शोभले सुंदर। नाना अलंकार शोभले हो।।३।। लक्ष्मण म्हणे महान मंदिर। रथ दिव्य थोर महान तो।।४।।

३२१२. रथावरी शोभा अपार आणिली। भक्त ते शोभले अगणित।।१।। वाद्ये हो वाजती नानापरी तेथे। स्तविती चंद्रमौळी भक्तराज।।२।। कन्या रथापुढे चालली नाचत। प्रेमभरे स्तवीत शंकराशी।।३।। अगणित दिंड्या पताका शोभती। प्रेमे भजन करिती भक्तराज।।४।। अनेक स्त्रिया कन्येसवे नाचती। आनंदे स्तविती विश्वनाथा।।५।। लक्ष्मण म्हणे धन्य त्यांचा प्रेमा। त्यांच्या हो आनंदा उपमा नाही।।६।।

३२१३. रथ उत्सव महान पाहोन। झाला प्रसन्न गिरिजावर।।१।। कोटी सूर्यप्रभा प्रकटला शिव। धन्य महादेव भक्तसखा।।२।। आलिंगिली बाई म्हणे माग वरदान। तुज मी प्रसन्न झालो बाई।।३।। लक्ष्मण म्हणे बाई म्हणे देवा। भक्ती कृपाळुवा अक्षयी देई।।४।।

३२१४. शिव म्हणे कन्ये धन्य तू चतुर। वर मी थोर देतो बाई।।१।। तीनशे कल्प तू राहशील पृथ्वीवरी। प्रेमे भक्ती करी यथासुखे।।२।। निर्विघ्न भक्ती करिशील बाई। तुझ्या भाग्या नाही अंत आता।।३।। लक्ष्मण म्हणे शिव दयाघन। झाला तो प्रसन्न प्रेमानंदे।।४।।

३२१५. बारा लक्ष पुत्र तुजला होतील। महान भक्त शूर प्रतापी गे।।१।। नातू तुजप्रती होतील बहुत। इंद्राहूनी संपत्ती अधिक गे।।२।। तिही लोकी

कीर्ती होईल गे थोर। भक्ती निर्घोर करी कन्ये।।३।। लक्ष्मण म्हणे भोलानाथ शिव। न कळे लाघव त्याचे कोणा।।४।।

३२१६. कुबेराऐसी संपत्ती होईल। सर्वदा मंगल तुझे कन्ये।।१।। प्रभोकृपा झाली अती सौख्य झाले। भक्त आनंदले शिवकृपे।।२।। वर देऊनिया शिव गुप्त झाला। आनंद बाईला सदोदित।।३।। लक्ष्मण म्हणे धन्य शिवभक्ती। धन्य तो पशुपती जगद्गुरू।।४।।

३२१७. बारा लक्ष पुत्र महान ते भक्त। शिवकृपे प्राप्त झाले तीते।।१।। महान ते बळी पराक्रमी थोर। स्वर्गीचे अमर सन्मानिती।।२।। पौत्रही फार झाले त्या बाईला। आनंद त्याजला महान थोर।।३।। लक्ष्मण म्हणे सर्वदा विजयी। त्यांना भय नाही कृतांताचे।।४।।

३२१८. अगणित लिंगे स्थापिली तयांनी। अक्षयी शिवभजनी रत ते हो।।१।। सर्वत्र ती प्रजा शिवाते पूजिती। प्रेमभरे ध्याती महादेवा।।२।। स्वधर्माविषयी दक्ष फार प्राणी। असत्याची कानी वार्ता नाही।।३।। लक्ष्मण म्हणे पतिव्रता नारी। वसती घरोघरी शिवकृपे।।४।।

३२१९. रायाची सेनाही सर्व भस्मधारी। आनंद घरोघरी सामावेना।।१।। कल्पवृक्ष तेथे वसती घरोघरी। कामधेनू द्वारी तिष्ठती हो।।२।। वैभव अपार न कळे कोणा पार। मृत्युव्यथा दूर केली शिवे।।३।। लक्ष्मण म्हणे भक्तिसुख थोर। आनंद घरोघर शिवकृपे।।४।।

३२२०. धन्य ती बाई धन्य तो शंकर। महिमा अपार प्रभोचा हो।।१।। तीनशे ते कल्प वैभव अपार। अक्षयी गजर भक्तीचा हो।।२।। निरुपम सुख भोगले भक्ताने। केले लिंगार्चन प्रेमभरे।।३।। लक्ष्मण म्हणे महिमा अपार। शिवकृपेचा पार न कळे न कळे।।४।।

३२२१. सौख्य भोगोनिया शिवपदाशी बाई। गेली पुण्या नाही पार तिच्या।।१।। तिचा तो भ्रतार सकळ तिचे कूळ। गेले ते सकळ शिवपदा।।२।। शिवरहस्यात आहे हे चरित्र। धन्य तो त्रिनेत्र भक्तसखा।।३।। व्यासांनी वर्णन केले अती प्रेमे। आनंदाचे धाम शिवकृपा।।४।। लक्ष्मण म्हणे धन्य शिवभक्ती। भक्तीपाशी मुक्ती तिष्ठती हो।।५।।

३५. दिवोदास राजा

३२२२. कोणे एके काळी शिव मंदराचळी। होते चंद्रमौळी सहपरिवारे।।१।। सकळही देव सकळ परिवार। होता विश्वंभर पर्वती त्या।।२।। ऐंशी सहस्र वर्षे वास केला होता। विश्वाचा तो पिता गंगामौळी।।३।। दिवोदास राजा होता काशीपुरी। सहपरिवारी तपोबळे।।४।। सप्त द्वीपावतीमाजी तो प्रवीण। देवाप्रती न्यून आणिले त्याने।।५।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मांडाचे राज्य। केले तेणे पूज्य सर्वमान्य।।६।।

३२२३. देव राज्यातून दिले हो काढून। सर्वही आपण झाला अंगे।।१।। ऐंशी सहस्र वर्षे वर होता त्याला। म्हणूनि सर्वाला अजिंक्य तो।।२।। तपाचे गिरिवर सत्त्वाचा सागर। होता नृपवर सूर्यवंशी।।३।। ब्रह्मदेवाचा हो वर होता त्यासी। राव तो सर्वांसी अजिंक्य झाला।।४।। शिवाते वियोग काशीचा जहाला। गमेना शिवाला काशीविण।।५।। लक्ष्मण म्हणे शिवा काशीविण। न गमे हो क्षण महिमा श्रेष्ठ।।६।।

३२२४. रायाचे हो छिद्र पाहावयाप्रती। पाठवी पशुपती मोठे मोठे।।१।। योगिनी तो सूर्य ब्रह्मदेव गण। गेले परिपूर्ण कार्य नोहे।।२।। ऐंशी सहस्र वर्षे सरता सरता। पाठविले सुता विघ्नहरा।।३।। विघ्नहरे कार्य साधिले जाऊन। रायाते जिंकून केले कार्य।।४।। राजा तो मोहिला माये हो करून। केला हो स्वाधीन गणनाथे।।५।। लक्ष्मण म्हणे हरीते शंकर। पाठवी झडकर काशीस्थळा।।६।।

३२२५. हरी गजवदनाने राव तो बोधून। दिला पाठवून वैकुंठासी।।१।। आनंद हो झाला सर्वाप्रती फार। हरी विघ्नहर संतोषले।।२।। गरुड तो शिवाकडे पाठविला। त्याने तो आणिला शिव त्वरे।।३।। सहपरिवारे आला हो शंकर। देवाचे ते भार सभोवते।।४।। वृषभध्वज तो चमकला थोर। प्रकाश अपार पडियेला।।५।। कोटी सूर्याचा हो प्रकाश पडियेला। नाना वाद्ये माळा अपार त्या।।६।। लक्ष्मण म्हणे स्वामींनी ही कथा। कथिली ऋषिनाथा अगस्तीसी।।७।।

३२२६. स्कंद हो पुराणी सत्यवतिसुत। बोलिला ती मात ऐका श्रोते।।१।। पताका अपार वाद्यघोष थोर। करिती जयजयकार देव सर्व।।२।। विमानाचे भार प्रकाश तो थोर। तेणे ते अंबर कोंदले हो।।३।। नाना वाद्ये दिव्य सुरवर

वाजविती। अप्सरा नाचती दिव्य छंदे।।४।। वाद्यांचा तो नाद ब्रह्मांडी भरिला। त्रैलोक्यी झाला एक घोष।।५।। लक्ष्मण म्हणे समुदाय थोर। मिळाला अपार सेनागण।।६।।

३२२७. हरी गजानन म्हणती शिव आला। निघाले प्रभोला भेटावया।।१।। स्वामी म्हणे ऐक अगस्ती रे ऋषी। तेव्हा शिवापाशी मी रे होतो।।२।। पाहिले ते तूते मी रे बा सांगेना। असत्य वचन नोहे माझे।।३।। शिवाबरोबर होते कोण कोण। घ्यावे ऐकून शिवभक्ता।।४।। सहस्रमुख तो शेष सहपरिवारी। होता बरोबरी शिवाच्या हो।।५।। लक्ष्मण म्हणे सत्तावीस कूळ। नाग ते सकळ होते सवे।।६।।

३२२८. नर ते मानव यक्ष ते राक्षस। गण ते गंधर्व भैरव होते।।१।। वेगळाले भार चालिले हो त्वरे। आपुलाले भारे मेळाकारे।।२।। चौसष्ट कोटी शिवाचे ते गण। प्रतापे प्रवीण महाबळी।।३।। भूत ते भैरव वेगळाले भार। गर्जताती क्रूर नाचती हो।।४।। आठ कोटी सवे शिवाचे नंदन। मज रे समान म्हणे स्वामी।।५।। लक्ष्मण म्हणे प्रभो तो शंकर। भोवताले भार चालिले हो।।६।।

३२२९. एक कोटी होते भैरव ते क्रूर। गण ते समोर चालिले हो।।१।। आठ कोटी होता भूतांचा तो पाळा। तो चाले वेगळा सेनेपुढा।।२।। चौसष्ट कोटी योगिनींचा भार। चाले हो समोर गणांचिया।।३।। नव कोटी कात्यायनी अती क्रूर। त्याहाचा तो भार वेगळाचि।।४।। छपन्न त्या कोटीच्या मुंडा विक्राळी। आपुलाले मेळी चालिल्या हो।।५।। लक्ष्मण म्हणे भोळा चक्रवर्ती। त्रिभुवनसंतती त्याची सर्व।।६।।

३२३०. आठ कोटी स्वामी ऐसे षडानन। चालिले वेष्टून शिवाप्रती।।१।। स्वामी म्हणे त्यातील मी एक कार्तिक। अगस्ती तू ऐक पुढे कथा।।२।। शिवमाया थोर अकथ्य विचार। ब्रह्मादिका पार न कळे ज्याचा।।३।। सात कोटी होते पुढे गजानन। करीत गायन नृत्य ते नाना।।४।। अष्ट ते दिक्पाळ त्याहाचा परिवार। चालतसे भार शिवापुढे।।५।। लक्ष्मण म्हणे देवाचे ते भार। चालती समोर शिवाच्या हो।।६।।

३२३१. तेहतीस कोटी देवाचे ते भार। इंद्र तो चालिला शिवापुढे।।१।।

अठ्यांशी सहस्र मुनी ते प्रवीण। होते हो वेष्टून शिवाप्रती।।२।। सिद्धांचे ते भार तापस अपार। चालिले शंकर वेष्टूनिया।।३।। कद्रूचे कुमर विशाळ फणिवर। तीन कोटी भार शिवासवे।।४।। चार कोटी दैत्य होते हो दानव। स्तवीत शिवनाम प्रेमभरे।।५।। ऐंशी सहस्र होते हो गंधर्व। स्तविती महादेव नाना युक्ती।।६।। लक्ष्मण म्हणे शिवस्तुती करिती। आनंदे नाचती प्रेमभरे।।७।।

३२३२. अर्ध कोटी होते यक्ष निशाचर। होते विद्याधर पंच लक्ष।।१।। शिवसभेचे ते नृत्यकार जाणा। प्रेमे पंचवदना स्तविती हो।।२।। साठी सहस्र सरिता होत्या हो त्या थोर। शिवाबरोबर तेथे त्या हो।।३।। सोळा हो हजार होत्या कामधेनू। कासा हो भरून पंचामृत।।४।। एक लक्ष वीस सहस्र सुपर्ण। गरुड समान होते सवे।।५।। लक्ष्मण म्हणे दीनांचा दातार। मध्ये गंगाधर मुख्यासनी।।६।।

३२३३. हेमाद्रीसमान पर्वत ते थोर। आठ कोटी भार तोही होता।।१।। तीन कोटी वनस्पती त्या पवित्र। तीन हो सहस्र होत्या सवे।।२।। दिशा कुंजर ते प्रतापी हो थोर। शिवाबरोबर तेही होते।।३।। ब्रह्मांड हो भार वाहती हो मोळी। तेही शिवाजवळी होते जाणा।।४।। चंद्रसूर्या तेथे नाही हो गणना। अग्निमूर्ती जाणा बारा सवे।।५।। लक्ष्मण म्हणे अगस्तीसी स्कंद। सांगे ब्रह्मानंद प्रेमभरे।।६।।

३२३४. स्वामी म्हणे ऐका अगस्ती रे ऋषी। ऐसा परिवारेसी आला शिव।।१।। शिव तो रे आला आनंद त्या वनी। ब्रह्मांडभरूनि सुख झाले।।२।। सुख ते अपार सर्वांप्रती झाले। वर्णिता शिणले वेद ते रे।।३।। लक्ष्मण म्हणे विश्वाची माउली। स्वामी चंद्रमौळी सत्य जाणा।।४।।

३६. शिव-पार्वती विवाह

३२३५. हिमालयापोटी देवी अवतरली। त्रैलोक्यमाउली जगन्माता।।१।। पर्वताचा राजा हिमालय पर्वत। मेरूचा जामात महाश्रेष्ठ।।२।। मेनका स्त्री त्याची पतिव्रता। पतिमनोगता जाणती हो।।३।। तिचे उदरी माया जन्मली पार्वती। सर्व देवांप्रती आनंद झाला।।४।। इंद्राऐसे वैभव होते त्या पर्वती। श्रेष्ठ तो हो ज्ञाता महाशूर।।५।। लक्ष्मण म्हणे कन्येवरी प्रीती। रायाची त्या होती अती अती।।६।।

३२३६. वर्णवेना कन्येचे लावण्य कोणा। कन्या पंचानना पुजी नित्य।।१।। सप्त ऋषीप्रती शिवे केली आज्ञा। लग्नाची योजना करा वेगी।।२।। ब्रह्म सप्तऋषी शिवाते नमून। गेले हो त्वरेने शिवकार्या।।३।। हिमालयाप्रती बोधिले तयांनी। म्हणे शूळपाणि जामात करी।।४।। धन्य भाग्य तुझे ईश्वर जामात। करी उमाकांत सखा त्वरे।।५।। त्याते हे मानले लग्न ते नेमिले। शिवाकडे आले अती त्वरे।।६।। लक्ष्मण म्हणे देव सर्व आले। ऋषी बोलाविले शिवे सर्व।।७।।

३२३७. हरी ब्रह्मदेव मिळाले दिक्पती। सर्वत्रही येती शिवलग्ना।।१।। नंदीवरी स्वार झाला पंचानन। गण ते गीर्वाण सभोवते।।२।। भूलोकाते आले हिमालयाजवळी। आपुलाले मेळी चालिले हो।।३।। मेनकेते कळले आला तो शंकर। देवांचे ते भार घेऊनिया।।४।। लक्ष्मण म्हणे मंडप सुवर्णाचा। भार पर्वताचा मिळाला हो।।५।।

३२३८. मेनका नारद गोपुरावरी गेले। उभयता बैसले पाहावया।।१।। गोपुरापासून सर्वही चालिले। मेनका ती बोले नारदाते।।२।। देव हे हो सांगा कोण याचे नाम। पुसतसे प्रेमे तुम्हाप्रती।।३।। नारद म्हणे ही हो शोभे ऋषिमंडळी। देवही जवळी आले पाहा।।४।। लक्ष्मण म्हणे संतोषली बाई। म्हणे देव दावी नारदाते।।५।।

३२३९. ऋषीमागूनिया देव ते हो आले। इंद्राते चालिले वेष्टूनिया।।१।। ऐरावतावरी इंद्र तो शोभला। प्रकाश पडला स्वरूपाचा।।२।। तेहतीस कोटी देव इंद्र हा शोभला। नारद मेनकेला पाहे म्हणे।।३।। शिवकृपे याहा वैभव हे प्राप्त। प्रभो उमाकांत स्वामी यांचा।।४।। लक्ष्मण म्हणे आनंदली बाई। म्हणे भाग्या नाही पार माझ्या।।५।।

३२४०. कुबेर तो आला यम वरुण अग्नी। दिक्पती ते तिने पाहिले हो।।१।। अष्टही दिक्पाळ वेगळाले दळ। तेजाचे कल्लोळ पाहिले हो।।२।। नारद म्हणे बाई हेही कामदार। स्वामी तो शंकर सर्वत्राचा।।३।। वैभव पाहूनि हरुशली बाई। म्हणे भाग्या नाही पार माझ्या।।४।। लक्ष्मण म्हणे आनंद तो थोर। वैभव अपार देवाचे ते।।५।।

३२४१. ब्रह्मदेव आला मागूनि तो हरी। पाहूनि सुंदरी संतोषली।।१।।

म्हणे धन्य धन्य स्वर्गींचे हे देव। त्याहाचे वैभव अपार हे।।२।। मागूनि शंकर आला तो दयाळ। गण ते सकळ दिव्य मूर्ती।।३।। शंकरे पाहिली बाई माडीवरी। नवल त्रिपुरारी करिते झाले।।४।। लक्ष्मण म्हणे स्वरूप पालटिले। गण ते हो केले भुतावळी।।५।।

३२४२. भ्यासूर विक्राळ पाहिला तो पाळा। शंकर देखिला विद्रूप तो।।१।। भूत ते विक्राळ आले माडीवरी। पाहूनि सुंदरी भ्याली ती हो।।२।। नारदाते म्हणे हे कोण भ्यासूर। म्हणे हा शंकर चालिला गे।।३।। खाली आली बाई कोपली दारुण। म्हणे हे दारुण विघ्न आले।।४।। भ्रताराते म्हणे राहिले हे लग्न। जावे परतून सर्वत्रांनी।।५।। लक्ष्मण म्हणे कोपली सुंदरी। म्हणे त्रिपुरारी पिसाट हा।।६।।

३२४३. सर्व ग्रामामाजी भुतावळ झाली। मंडपी बैसली पिसाट हो।।१।। आणा सप्तऋषी मध्यस्थ तो ब्रह्मा। त्यांनी कैसे विघ्ना आणिले हो।।२।। ब्रह्मदेवाचिया भादरीन मिशा। कन्या ही हो पिशा दिधली कैसी।।३।। हाहाकार करी रडे आक्रंदून। म्हणे हे दारुण विघ्न आले।।४।। लक्ष्मण म्हणे मेनका ती म्हणे। जावे परतोन देवांनी ह्या।।५।।

३२४४. कन्या मी आपुली कुपात लोटीन। प्राण मी देईन आपुला हा।।१।। पार्वती येऊन मातेते समजावी। म्हणे तू गे काही भिऊ नको।।२।। म्हणे हा ईश्वर यांनी केली माया। प्रेमे शंकरपाया स्मरी माते।।३।। अनंत ब्रह्मांडे म्हणे हा उभवी। स्व-इच्छे लपवी एका रोमी।।४।। मेनका कोपली ताडिले हो तीते। म्हणे त्या पिशाते भाळलीसी।।५।। लक्ष्मण म्हणे हिमालय समजावी। परि ती दुःखार्णवी पडली कोपे।।६।।

३२४५. हरीते कळले आला तो धावून। मेनकेकारण बोध करी।।१।। हरी म्हणे बाई विचार तू करी। पाहे त्रिपुरारी परमात्मा हा।।२।। सर्व वैभव नाशिवंत आहे। शाश्वत हा आहे परब्रह्म।।३।। अनंत ब्रह्मांडे प्रभो हा भरला। याची मायालीला न कळे कोणा।।४।। तुझेही हृदयी आहे हा ईश्वर। मायागुणापर परमात्मा हा।।५।। लक्ष्मण म्हणे हरी म्हणे बाई। शिव तुझे हृदयी आहे पाहे।।६।।

३२४६. मद मत्सर हा मोहपाश सोडी। स्वानंदाची गुढी उभारी गे।।१।।

अंतःकरणा अंतर्बाह्य याची वस्ती। इंद्रिये चेष्टती याचे सत्ते।।२।। चहु देहांचिया वेगळा हा आत्मा। पाहे परमात्मा शोक सोडी।।३।। मिथ्या हा संसार मिथ्या हा बाजार। अक्षयी शंकर अनादी हा।।४।। लक्ष्मण म्हणे हरीचे वचन। ऐकूनि समाधान झाले तिचे।।५।।

३२४७. अहंकृती गेली मोह क्रोध गेला। नवलाव झाला तेथे पाहा।।१।। शंकरे स्वरूप पालटिले वेगी। आनंद तो जगी झाला मोठा।।२।। कोटी सूर्यप्रभा प्रकाश पडला। शिव तो शोभला गणांमाजी।।३।। शंकरासारिखे शोभले ते गण। सर्वत्र गीर्वाण सभोवती।।४।। लक्ष्मण म्हणे ग्रामातील लोक। आले तो त्र्यंबक पाहावया।।५।।

३२४८. सर्वत्राच्या वृत्ती शिवे आकर्षिल्या। नरनारी त्या मोहिल्या नगरातील।।१।। स्नान करिता करिता निघाल्या हो कोणी। भोजन टाकूनि कोणी आल्या।।२।। मुला स्तन देता मुलाते टाकून। आल्या हो त्वरेने दर्शनाते।।३।। पाक करिता करिता आल्या कोणी बाया। शिव पाहावया अती प्रेमे।।४।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मानंदी मग्न। झाल्या हो तल्लीन शिवस्वरूपी।।५।।

३२४९. कोणी नग्नचि चालिल्या नहाता। प्रभो उमाकांता पाहावया।।१।। काजळ लाविले मस्तकाते कोणी। आल्या शूळपाणि पाहावया।।२।। कुंकुम नेत्रांत घातले बायांनी। आल्या शूळपाणि पाहावया।।३।। काढिता काढिता बाया त्या हो आल्या। धावत चालिल्या अती त्वरे।।४।। ग्रामातील स्त्रिया सर्वत्रही आल्या। प्रेमे स्तवित्या झाल्या शिवाप्रती।।५।। लक्ष्मण म्हणे स्त्री पुरुष आले। प्रेमे स्तविते झाले शिवाप्रती।।६।।

३२५०. कैलासाची शोभा आली मंडपात। प्रभो उमाकांत शोभला हो।।१।। त्रैलोक्यातील जन आले दर्शनाते। स्तविती शिवाते सर्वत्रही।।२।। ब्रह्मदेवे लग्न लाविले हो प्रेमे। ऋषी सर्वोत्तम पाळा भोवता।।३।। लक्ष्मण म्हणे आनंद तो फार। पार्वती शंकर शोभले ते।।४।।

३२५१. यथासांग लग्न झाला तो सोहळा। वर्णन शेषाला न करवे हो।।१।। लक्ष्मी सावित्री देवांचिया स्त्रिया। ऋषीचिया भार्या सर्वत्रही।।२।। वधूवराभोवती स्त्रिया त्या शोभती। अप्सरा नाचती सभारंगी।।३।। ऋद्धी

सिद्धी तेथे तिष्ठती हो द्वारी। ब्रह्मदेवादी तेथे अग्रगण।।४।। तेथे न्यून काय पडेल पदार्थ। ब्रह्मांडाचे नाथ देव ते हो।।५।। लक्ष्मण म्हणे नारद तुंबर। सर्वत्र किन्नर गायन करिती।।६।।

३२५२. मेनकेते तेव्हा फार हर्ष झाला। म्हणे पार्वतीला वैभव श्रेष्ठ।।१।। ब्रह्मांडस्वामिनी झाली ही पार्वती। हिच्या भाग्याप्रती पार नाही।।२।। पर्वताच्या स्त्रिया पर्वता म्हणती। धन्य ही पार्वती विश्वा वंद्य।।३।। पाच दिन झाला मोठा समारंभ। म्हणे पद्मनाभ निघाले आता।।४।। लक्ष्मण म्हणे आंदण फार दिधले। हिमालये पुजिले देवऋषी।।५।।

३२५३. निघाला शंकर पार्वती घेऊन। समस्त सुरगण ऋषिमुनी।।१।। आपुलाले मेळी गेले आपुल्या स्थळा। शंकर तो गेला कैलासाते।।२।। त्रैलोकी आनंद झाला तो फार। अक्षयी शंकर अनादी तो।।३।। शंकराची लीला शंकरचि जाणे। भक्तास्तव सगुण झाला नाथ।।४।। लक्ष्मण म्हणे वेद स्तविती त्याते। पाहूनि भक्ताते आनंदे तो।।५।।

३२५४. शिवपुराणात आहे हे चरित्र। प्रभोलीलासूत्र न कळे कोणा।।१।। व्यासांनी वर्णिले अती प्रेमयुक्त। धन्य शिवभक्त व्यासमुनी।।२।। श्रवणे पठणे अती सौख्य होय। स्तवा प्रेमे पाय शंकराचे।।३।। शंकर कल्याण करितो भक्ताचे। जीवन भक्ताचे परमात्मा तो।।४।। लक्ष्मण म्हणे त्याते विसरू नये। प्रभो निरामय करितो दासा।।५।।

३७. मनकर्णिका माहात्म्य

३२५५. स्वामी-अगस्तीचा ऐका हो संवाद। बोलिलासे स्कंद महाराज।।१।। उमा हर पूर्वी बोलिले कैलासी। कथा अगस्तीसी बोले स्वामी।।२।। बाळपणी शिवाअंकी मी होतो रे। तेव्हा ही वार्ता रे ऐकिली।।३।। अगस्ती त्वा प्रश्न केलासी रे थोर। जगाचा उद्धार होय जेणे।।४।। मनकर्णिकेची त्वा पुसिली उत्पत्ती। सांगू तुजप्रती ऐक आता।।५।। स्वामी म्हणे श्रेष्ठ ऐक कुंभोद्भवा। जन्ममरणगोवा तुटे जेणे।।६।। लक्ष्मण म्हणे सत्यवतिसुत। व्यासदेव ताते कथिली ते ऐका।।७।।

३२५६. स्वामी म्हणे पूर्वी नव्हता पवन। पाणी तत्त्वाची मांडणी नव्हती जेव्हा।।१।। ब्रह्मा विष्णू नव्हते काही एक वार्ता। समुद्र त्या सरिता कैचा

तेथे।।२।। एकला तो शिव होता ध्यानस्थ रे। असंख्य युग रे नोहे गणना।।३।। ध्यान विसर्जूनि इच्छा हो ती झाली। माया ती जन्मली तन्वंगी ते।।४।। इच्छे हो पासून पुतळा उत्पन्न। झाला नारायण इच्छाविष्णू।।५।। ब्रह्मांड आकार इच्छेने हो झाला। पुढे तो देखला इच्छाविष्णू।।६।। लक्ष्मण म्हणे अनादि ती काशी। अक्षयी शिवाशी वास तेथे।।७।।

३२५७. पंचक्रोशी स्थान गुप्तचि होते रे। विश्वनाथे ते रे प्रकट केले।।१।। विष्णूप्रती तेव्हा बोले पंचानन। तू इच्छेपासून जन्मलासी।।२।। तुझे नाम इच्छाविष्णू ठेविले रे। भक्त प्रवीण रे तू बा होसी।।३।। सहस्र कमळे नित्य हो आणूनि। करी हो पूजन नित्य विष्णू।।४।। तेथे नारायणे चक्र हो मारून। कूप तो उत्पन्न केला थोर।।५।। पाताळउदक आले त्या कुपात। स्तवी विश्वनाथ नित्यतेने।।६।। दहा लक्ष वर्षे विष्णूने शंकर। पुजिला गंगाधर अष्टभावे।।७।। चक्र पुष्करणीच्या तटी चक्रपाणि। बैसला हो ध्यानी मेरू जैसा।।८।। लक्ष्मण म्हणे पद्मासनी हरी। बैसूनि त्रिपुरारी लक्षीतसे।।९।।

३२५८. अजपा हो जप केला नारायणे। षट्चक्र भेदूनि गेला वरी।।१।। सहस्र त्या दळी शिवस्वरूप ते। लक्षिले तेणे भक्तिबळे।।२।। शिवस्वरूपी तो झाला हो निमग्न। भक्त हो निर्वाण शिवाचा हो।।३।। वर द्यावयाते शिव प्रकटला। माथा तुकविला पाहूनि भक्ती।।४।। म्हणे ऐसी भक्ती कोणी नाही केली। त्वा रे तोषविली वृत्ती माझी।।५।। महातप भक्ती केली त्वा दारुण। नाम तुजला पूर्ण महाविष्णू।।६।। लक्ष्मण म्हणे शिव आनंदला। वर देता झाला असंख्य हो।।७।।

३२५९. प्रेमे धावूनिया दिले आलिंगन। पुढे वरदान देता झाला।।१।। शिवकर्णीचा मणी त्या कुपी रे। गळाला तेव्हा रे शिव येता।।२।। शिव बोले तेव्हा विष्णूप्रती बा रे। या कूपा नाम रे मनकर्णिका।।३।। या कुपाते म्या वर हा दिधला। पावन जगाला करील ही।।४।। मनकर्णिका स्नान घडले जयाला। अक्षयी वास त्याला मजपाशी।।५।। मनकर्णिका नाम घेतील जे वदनी। तेही स्वर्गभुवनी वसती रे।।६।। लक्ष्मण म्हणे पुढे सदाशिव। स्वामी कृपाळुव काय बोले।।७।।

३२६०. शिव म्हणे वत्सा माग रे वरदान। प्राणाचाही प्राण तू रे माझ्या।।१।।

वर मागण्याचे नाही तुज ज्ञान। घेई वरदान भक्तराया।।२।। ब्रह्मांडराज्य दिधले तुजप्रती। त्रैलोक्यसंपत्ती सर्वत्रही।।३।। चतुर्मुख ब्रह्मा तुज रे पासून। होईल उत्पन्न दिधला वर।।४।। क्षणे ही ब्रह्मांडे करिसी उत्पन्न। मनेही पालन करिसी त्याचे।।५।। त्रैलोक्य नखाग्री ऐसा पराक्रम। दिधला सर्वोत्तम होशी तू रे।।६।। लक्ष्मण म्हणे कृपाळू दयाळ। शंभो तो स्नेहाळ वरदाता।।७।।

३२६१. शिव म्हणे वर घेई आणिक रे। मजहूनि तुज रे श्रेष्ठ वैभव।।१।। लक्ष्मी तुजला कौस्तुभ मणी रे। होईल प्राप्त रे वर माझा।।२।। चक्र हो दिधले दिव्य ती कुंडले। अलंकार दिले नानाविध।।३।। शेष तो तुजला शय्या रे होईल। श्रेष्ठत्व स्तवील वेद तूते।।४।। क्षीरसागरी तो वास रे तुजला। वैकुंठ राहायला स्थळ श्रेष्ठ।।५।। असंख्य हो वर वदला ईश्वर। केला सारंगधर सर्वा पूज्य।।६।। लक्ष्मण म्हणे कृपेचे आगर। दयाळू शंकर भोलानाथ।।७।।

३२६२. अपार सामर्थ्य दिधले शिवाने। रत्नसिंहासनी बैसविला।।१।। पार्वतीने मंत्र अक्षता हो शिरी। टाकिल्या विष्णूवरी कृपेकरून।।२।। पट्टाभिषेक केला हो दोघांनी। त्रैलोक्याचा धनी हरी केला।।३।। आपुले शिरीचे छत्र दिले त्याला। प्रकाश पडला ब्रह्मांडी हो।।४।। दोन हो हजार छत्र उंची ते हो। तीन सहस्र तो हो परीघ त्याचा।।५।। रत्नमय छत्र वर्ण हो ती कांती। पडली हो दीप्ती नानावर्ण।।६।। लक्ष्मण म्हणे उमामहेश रे। दिधले राज्य सारे हरीप्रती।।७।।

३२६३. हरीने प्रभोचे केले हो स्तवन। नाना युक्तीकरून अष्टभावे।।१।। प्रभोकृपे सदा कल्याण हरीचे। अक्षयी पायाचे स्मरण त्याते।।२।। मनकर्णिका ती वंद्य हो सर्वाला। देवादिक्पाळाला जगन्माता।।३।। ब्रह्मा आदि सुरगण इच्छिती हो स्नान। शिववरदान श्रेष्ठ तीते।।४।। स्वामी म्हणे ऐक मित्रा वरुणिसुता। असे पुण्यसरिता क्षेत्र पवित्र।।५।। काशीस्थानी ती आहे पुण्यजीवनी। स्वर्गतरंगिणी आली पुढे।।६।। लक्ष्मण म्हणे विश्वनाथापाशी। वसे अहर्निशी मनकर्णिका ते।।७।।

३२६४. स्कंदपुराणीचे आहे हो संमत। बोलिला समर्थ व्यासमुनी।।१।। पाहा वेगी स्थान घ्या वेगी दर्शन । पूर्वज पावन होती स्मरणे।।२।। मनकर्णिका

तोये शिव पूजिलिया। सर्व पापे लया जाती क्षणे।।३।। लक्ष्मण म्हणे अनाथांचा नाथ। सखा विश्वनाथ सत्य सत्य।।४।।

३८. विष्णु–ब्रह्मदेव गर्वहरण

३२६५. चरित्र हे आहे बहुता युगीचे। स्वामी अगस्तीचे भाषण हो।।१।। स्वामीप्रती वदे प्रेमे महामुनी। माझी विनवणी पृच्छा एक।।२।। काशीमध्ये कालभैरव कोठून। आला हा उत्पन्न कैसा झाला।।३।। याची उत्पत्ती हो सांगावी आम्हाला। स्वामी तो वदला अष्टभावे।।४।। हीच कथा वदे पुढे व्यासमुनी। स्कंद त्या पुराणी बोलिला हो।।५।। लक्ष्मण म्हणे ऐका ते चरित्र। जेणे तो त्रिनेत्र सखा होय।।६।।

३२६६. स्वामी म्हणे ऐका अगस्ती महंता। जुनाट ही वार्ता ऐकावी त्वा।।१।। हरि–विरंचीते मायेचे आवरण। पडले म्हणून विवादिले।।२।। महदादी शिवाची कोपली त्याहाते। म्हणूनि विपरीत बुद्धी झाली।।३।। ब्रह्मकल्प आला विनाश तो काळ। मती ती विकळ झाली म्हणून।।४।। अहंकारे दोघे फुंजू हो लागले। मायेने टाकिले आवरण।।५।। लक्ष्मण म्हणे प्रभोमाया थोर। माया ही दुर्धर ब्रह्मादिका।।६।।

३२६७. हरी म्हणे मी रे श्रेष्ठ सर्वाहून। ब्रह्मदेव तो उत्पन्न मजपासून।।१।। वृथा यज्ञ तप करिसी रे वाया। मज परमात्मया विसरून।।२।। मजपरता देव नाही त्रिभुवनी। मी रे चक्रपाणि पूर्णब्रह्म।।३।। नाही मजपरता मुक्तीचा रे ठाव। मज सोडूनिया भाव धरिसी परता।।४।। मज विसरेल ऐसा पशू कोण। मीच ब्रह्म पूर्ण सत्य सत्य।।५।। ब्रह्मदेव म्हणे ऐक रे उत्तर। मीच ब्रह्म थोर सर्वाहून।।६।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मदेव तो हो। क्रोधे बोलिला हो ऐका तेही।।७।।

३२६८. सर्व सृष्टिकार्य मज रे पासून। ऐसा चतुरानन बोलिला हो।।१।। सृष्टीचा मी कर्ता ब्रह्मांड निर्माण। केले मी प्रवीण श्रेष्ठ आहे।।२।। मजपासाव हे सर्व सृष्टिसूत्र। नाना पुण्यक्षेत्र तरणी तारा।।३।। मजपासाव हे पृथ्वीकुळाचळ। सकळ भूगोल मी रे कर्ता।।४।। स्थूळ मी सूक्ष्म अनादि पुरुष। मजमाजी वास सर्वत्रांचा।।५।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मा तो कोपला। पुढे वदता झाला तेही ऐका।।६।।

३२६९. नाही मजपरते परम हो तत्त्व। मीचि शुद्ध सत्त्वापरता आहे।।१।। चहू खाणीचा रे मीचि गा निर्मिता। मजपुढे कथा काय तुझी।।२।। मजपुढे काय तू मिरविसी महत्त्व। मी ब्रह्म ऐसे वदतोस हरी।।३।। मीचि पिंपलिका विहंगम मार्ग। मीचि ब्रह्म ते रे अभंग बा।।४।। मजप्रती का रे तू रे विसरसी। मीचि ऋषिकेशी ब्रह्म आहे।।५।। स्वात्मबुद्धी तू सांडी नारायणा। मज चतुरानना स्तवी वेगी।।६।। लक्ष्मण म्हणे तेव्हा नारायण। म्हणे घे ऐकून चतुरानना।।७।।

३२७०. हरी म्हणे वेद हरविले त्वा होते। ते म्या अनंते आणिले मी श्रेष्ठ।।१।। शंखासुर क्रूर मारिला म्या तो रे। तूते स्थापिले रे सत्यलोकी।।२।। जीवनरूपी मी रे साक्षात् गा हरी। माझे कृपे थोरी तुजप्रती।।३।। जीवनेकरून करिसी संध्यास्नान। होशी रे पावन सृष्टिकर्मा।।४।। मीचि यज्ञकर्ता बोले चतुरानन। घेई रे ऐकून अनंता तू।।५।। ब्रह्मा म्हणे हरी मीचि तुजला रे। तृप्त करितो रे यज्ञद्वारे।।६।। लक्ष्मण म्हणे ऐसे नानापरी। विरंची तो हरी बोलिले हो।।७।।

३२७१. हरी विरंची ते दोघे विवादिती। खुंटली उत्पत्ती पालन ते।।१।। आकांत वर्तला त्रैलोक्या हो प्रती। नानापरी युक्ती बोलती हो।।२।। विरंची म्हणे रे ऐक नारायणा। तुजप्रती खुणा सांगतो मी।।३।। पितामह मी रे सर्वांचाही पिता। देवादिक्पाळाचा तात मी रे।।४।। हरी म्हणे मेरुरूप मी श्रीहरी। वाहातो माथ्यावरी सर्वांते मी।।५।। ब्रह्मा म्हणे ऐक तू रे नारायणा। पृथ्वी हे जाण माझे रूप।।६।। म्याचि सर्वांचा रे घेतलासे भार। स्वर्ग तेही थोर मजवरी।।७।। लक्ष्मण म्हणे क्रोधे हो बोलती। आपुलाले वदती पुरुषार्थ।।८।।

३२७२. हरी म्हणे जीवनरूप मी श्रीहरी। धरिली उदकावरी पृथ्वी ही।।१।। अनेक त्या युक्ती बोलिला अनंत। लक्ष्मीचा तो कांत महाविष्णू।।२।। ब्रह्मदेव तेव्हा बोले क्रोधभरे। ऐक रे उत्तर या प्रश्नाचे।।३।। केशवा तो माझ्या पुत्राचा पुत्र रे। त्याचा पुत्र तो रे बळी शेष।।४।। त्याने सर्वाप्रती घेतलेसे शिरी। सांग रे श्रीहरी कोण श्रेष्ठ।।५।। लक्ष्मण म्हणे हा हरी तो बोलिला। ब्रह्म त्या देवाला ऐका तेचि।।६।।

३२७३. हरी म्हणे शेष सत्त्वे म्या धरिला। म्हणूनि तो मजला झाला शय्या।।१।। वराह मी झालो पृथ्वी दंतावरी। धरिली मी श्रीहरी पूज्य सर्वा।।२।। सप्तपाताळ हे एकवीस स्वर्ग रे। माझे सत्ते मी रे बोले श्रीहरी।।३।। ब्रह्मा म्हणे तू रे ऐक पुरुषोत्तमा। वाउगा महिमा मिरविसी।।४।। शुद्ध सत्त्व म्हणसी राखिले ब्रह्मांडा। परिसी आता पुढे बोल माझे।।५।। शुद्ध सत्त्व म्या रे निजतत्त्वेकरून। राखिलेसे पूर्णब्रह्म मी रे।।६।। लक्ष्मण म्हणे क्रोधभरे थोर। करिती उच्चार नाना शब्द।।७।।

३२७४. तव तेथे आला तेव्हा नारदमुनी। दोघाते पाहूनि विस्मित झाला।।१।। दोघांप्रती केले नमन मुनीने। म्हणे हे मायेने भुलविले।।२।। ब्रह्म हो कल्पाची संख्या हो पुरली। म्हणूनि ही झाली भ्रांती त्याहा।।३।। नारद तो तेव्हा बोले दोघांप्रती। म्हणे ही विनंती परिसा माझी।।४।। आता हा विवाद नका करू व्यर्थ। दोघेही किमर्थ शिणता हो।।५।। बद्रिकाश्रमा जावे तुम्ही त्वरे। तेथे ऋषीश्वर श्रेष्ठ वसती।।६।। ब्रह्माचा विचार जाणती ते ज्ञानी। बगदालभ्य मुनी आदी सर्व।।७।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मा नारायण। गेले हो धावून बदरिकाश्रमा।।८।।

३२७५. अठ्यांशी सहस्र महा महामुनी। देखिले त्याहांनी दोघे येता।।१।। सन्मानून त्याहा केले हो नमन। मुनी ते प्रवीण जुनाट ते।।२।। स्वरूपी निमग्न स्वये ब्रह्म झाले। ब्रह्मी हो मुराली मनोवृत्ती।।३।। देह जाणिले हे अनित्य त्याहांनी। असंख्य क्रमूनि गेले युग।।४।। ब्रह्मा नारायण बोलिले त्याहाला। उत्तर आम्हाला द्या प्रश्नाचे।।५।। लक्ष्मण म्हणे हरी चतुरानन। म्हणती श्रेष्ठ कोण निवडा हो।।६।।

३२७६. हरी म्हणे ब्रह्म मी हो पुरातन। मजपरता कोण देव आहे।।१।। तव ब्रह्मा म्हणे ब्रह्म मी स्वयंभू। काय पद्मनाभ आणिला हो।।२।। मुनी सर्वत्रही आश्चर्य पावले। म्हणती भुलविले मायेने हे।।३।। ब्रह्मकल्प आला समीप म्हणून। ऐसे हे वचन याहांचे हो।।४।। अत्री मार्कंडेय हे बगदालभ्य मुनी। म्हणती घ्या ऐकूनि दोघेही हो।।५।। ब्रह्म तो वेगळा परात्पर शिव। तुम्ही कृपाळुव स्मरा तोचि।।६।। लक्ष्मण म्हणे महामुनी बोलती। त्याहा दोघाप्रती विवेक हो।।७।।

३२७७. तुम्ही मायेचे हे अंकुर दोघेही। त्रिभुवनगोसावी वेगळाचि।।१।। ऐसे ऐकूनिया दोघेही कोपले। म्हणती हे भ्रमले ऋषीश्वर।।२।। आम्हापरता शिव कोणता आणिला। कळेना याहाला मायामोहे।।३।। याहाच्यांनी न्याय तुटेना आमुचा। भ्रम हो त्याहाचा गेला नाही।।४।। ब्रह्मा म्हणे मजला तुम्ही हो भजावे। विष्णू म्हणे मीचि श्रेष्ठ सर्वा।।५।। लक्ष्मण म्हणे मार्कंडेय मुनी। बगदालभ्य ज्ञानी काय बोलती।।६।।

३२७८. म्हणती वेदांचे आणा ते हो पत्र। सोडू तो त्रिनेत्र तुम्हा स्तवू।।१।। तेव्हा वेदांकडे गेले ते दोघेही। मेरूच्या त्या ठायी ईशान्यकोनी।।२।। तेथे वेद्पुरा गेले त्या ठायासी। बोलिले वेदासी ब्रह्मा हरी।।३।। आम्हा दोघामध्ये ब्रह्म आहे कोण। द्यावे हो निवडून वेदा श्रेष्ठा।।४।। वेद म्हणती तुम्ही मायेचे अंकुर। ब्रह्म तो ईश्वर वेगळाचि।।५।। अनंत ब्रह्मांडे मायेचा हा खेळ। ब्रह्म ते वेगळे मायातीत।।६।। लक्ष्मण म्हणे चारीही ते वेद। म्हणती ब्रह्मानंद शिव तो हो।।७।।

३२७९. ऐसे ऐकून कोपले दोघेही। म्हणती याहा नाही ब्रह्मशुद्धी।।१।। भ्रमले ही वेदशास्त्रे हे पुराण। आम्हा विसरून गोष्ट कथिती।।२।। ऋग्वेद यजुर्वेद साम अथर्वण। चहूंचे वचन एकचि हो।।३।। वेद म्हणती जावे ॐकाराकडे हो। ती आहे जननी हो आमुची माता।।४।। ॐकाराकडे हो गेले दोघेजण। म्हणती कोण थोर सांग आम्हा।।५।। विश्वमाता ती हो गायत्री प्रवीण। म्हणे शिव पूर्णब्रह्म आहे।।६।। लक्ष्मण म्हणे पुढे वर्तमान। झाले ते ऐकून घ्यावे पुढे।।७।।

३२८०. गायत्री म्हणे रे तुम्ही मायागुण। शिव तो निर्गुण वेगळाचि।।१।। निरंजन निरामय ते स्वरूप। शिव विश्वरूप सबराभर।।२।। ॐकाराते तेव्हा ब्रह्मा नारायण। म्हणती तुम्हा खूण न कळेचि।।३।। वेदांचा अपमान केला या दोघांनी। ॐकार जननी धिक्कारिली।।४।। ब्रह्मकल्प समय जाणूनि विवेके। कोपला नायक ब्रह्मांडाचा।।५।। लक्ष्मण म्हणे शिव तो कोपला। हात आपटला वामभुजा।।६।।

३२८१. हात आपटता उद्भवला तो काळ। महा तो विक्राळ भैरव।।१।। जटाभार शिरी तीन नेत्र त्याला। भस्मधुळी ल्याला सर्व अंगी।।२।। नाना

अलंकार उग्र मूर्ती तो हो। नाना शस्त्रे ते हो शोभले त्या।।३।। शिवापुढे उभा बद्धपाणि काळ। म्हणे जाश्वनीळ काय आज्ञा।।४।। कोण्या कार्याकरिता झालो मी उत्पन्न। सांगावे आपण महाराज।।५।। लक्ष्मण म्हणे शिव त्या बोलिला। म्हणे ऐक बोल वत्सा माझे।।६।।

३२८२. हरी ब्रह्मदेव दोघे विवादती। मायेचि रे भ्रांती पडली त्याहा।।१।। अहंकार त्याहा चढलासे फार। वेदांचा अव्हेर केला त्यांनी।।२।। पृथ्वीव्यापार राहिला सर्वही। संशयाचे डोही बुडाले रे।।३।। त्याहाचा विवाद निवडावा तुम्ही हो। जावे भैरवा हो वेगी आता।।४।। अनृत बोलिले शिक्षा त्या करावी। त्रिभुवनगोसावी बोलिला हो।।५।। लक्ष्मण म्हणे भैरव नमून। गेला त्वरेकरून दोघापाशी।।६।।

३२८३. ब्रह्मा विष्णू दोघे निकुरे भांडती। गेला काळमूर्ती त्वरे तेव्हा।।१।। दोघाप्रती त्यांनी वारिले जाऊन। मध्ये तो आपण महांकाळ।।२।। दोघांनी पाहिला काळ तो भैरव। विष्णू ब्रह्मदेवा आश्चर्य झाले।।३।। म्हणती कोठील रे आहेसी तू कोण। आलासी धावून काय काजा।।४।। भैरव तो म्हणे विवाद तोडावे। हेचि आम्हा देवे कथिले हो।।५।। लक्ष्मण म्हणे दोघेही बोलती। श्रेष्ठ आम्हाप्रती कोण सांगा।।६।।

३२८४. विराटस्वरूप धरिले भैरवाने। सप्त पाताळी ते चरण ज्याचे।।१।। एकवीस स्वर्गावरी मुकुट ज्याचा। शिव त्या कृपेचा महिमा मोठा।।२।। ब्रह्मदेवा त्वा रे मुकुट पाहावा। विष्णूने साधाव्या पादुका या।।३।। अगोदर येईल तोचि मानू थोर। जावे लवकर दोघांनीही।।४।। तथास्तु म्हणूनि दोघेही निघाले। दोहीकडे गेले दोघे ते हो।।५।। लक्ष्मण म्हणे शिवमहिमा थोर। ब्रह्मादिका पार नकळे ज्याचा।।६।।

३२८५. नारायण गेला पादुका पाहायासी। देव हृषीकेशी पद्मनाभ।।१।। जाता जाता पुढे खेद शीण झाला। पुढे तो देखिला शिवगण।।२।। पाताळस्कंद तो गण योगेश्वर। पाहे सारंगधर दिव्य दीप्ती।।३।। शिवस्वरूपी तो झालासे निमग्न। मीतूते गाळून स्वस्थ असे।।४।। असंख्य ती युगे गेली हो क्रमूनि। स्वस्थ तो आसनी बैसलासे।।५।। लक्ष्मण म्हणे शिवध्यान सदा। स्वानंदाच्या कंदा ध्यात असे।।६।।

३२८६. विष्णूने त्याते हो केला नमस्कार। म्हणे तू निर्घोर कोण येथे।।१।। गण म्हणे शिवाचा मी किंकर रे। त्याचे निरंतर ध्यान आम्हा।।२।। गणा म्हणे तू रे कोठूनि आलासी। कोणत्या कार्यासी जाणे आहे।।३।। विष्णू म्हणे महाविष्णू मी प्रवीण। आलोसे कारण काही आहे।।४।। विरंचीने आम्ही केलासे रे पण। आलोसे धावून त्याच कार्या।।५।। लक्ष्मण म्हणे हरी म्हणे गणा। ऐका वर्तमान पुढील ते।।६।।

३२८७. ब्रह्मा गेला शिवमुकुट पाहायासी। पादुका पाहायासी चालिलो मी।।१।। पाताळस्कंद तो बोलला हसून। म्हणे महाविष्णू कोणता रे।।२।। विष्णूप्रती झाला अचंबा ऐकून। बोलिला परतून उत्तर त्यासी।।३।। महाविष्णू एक मीचि त्रिभुवनी। कोणता म्हणूनि बोलता हो।।४।। गण म्हणे कोटी विष्णू या मार्गाने। गेले परतून नाही आले।।५।। तुजऐसे पाय पाहायाप्रती गेले। नाही परतले अद्यापि ते।।६।। लक्ष्मण म्हणे विष्णू दचकला। म्हणे हे आम्हाला नवल वाटे।।७।।

३२८८. पद्मासनी मी रे बैसलोसे ध्यानी। मजला पुसूनि गेले पुढे।।१।। त्यांनी माझी गोष्ट नाही हो ऐकिली। पाय पाहाया गेले फार विष्णू।।२।। खेद शीण हरीसी झाला तो हो फार। ऐकूनि उत्तर पस्तावला।।३।। गण म्हणे या रे मार्गे तुज येता। किती दिन आता झाले सांग।।४।। हरी म्हणे गणा फार दिन झाले। पाय हे भ्रमले चालवेना।।५।। लक्ष कोटी युगे गेली हो क्रमून। परि ते चरण न दिसती।।६।। लक्ष्मण म्हणे गण तो ऐकून। बोलिला परतून तेही ऐका।।७।।

३२८९. आताशी तू एक ब्रह्मांड उतरून। आलासी ऐकून घेई पुढे।।१।। अनंत ब्रह्मांडे पुढे जाणे फार। पायाचा त्या पार अप्राप्त रे।।२।। प्रभोचा हो अंत नकळे कोणासी। काय भ्रमलासी नारायणा।।३।। मायेने तुज रे घातली भूल रे। म्हणूनि भ्रमसी रे वाया व्यर्थ।।४।। शिवाचा तू प्रिय कैलासा भुललासी। अद्यापि तुजसी नकळे सोय।।५।। तुज गुरुकृपा नाही नारायणा। म्हणूनि चरणा शोधितोसी।।६।। लक्ष्मण म्हणे गण पुरातन। शिवस्वरूप पूर्ण ब्रह्मरूप।।७।।

३२९०. गणाचे भाषण हरीने ऐकून। म्हणे नागवण गर्वे झाली।।१।।

हरीने साष्टांग केला नमस्कार। म्हणे गुरू पूर्ण तूचि माझा।।२।। सद्गुरू गणाने कृपेने पाहिले। ज्ञान हो कथिले नारायणा।।३।। मस्तकी त्या हस्त ठेविला गुरूंनी। मंत्र तो सांगूनि केले तृप्त।।४।। वेदान्त ते ज्ञान कथिले गणांनी। म्हणे परतूनि पाहे हरी।।५।। लक्ष्मण म्हणे गण तो ईश्वर। शिवयोगेश्वर सखा त्याहा।।६।।

३२९१. गण म्हणे हरी अहंकार विरे। मग ब्रह्म ते रे प्राप्त होय।।१।। मी–तू जववरी वरी अभिमान। तववरी खूण नकळे ती।।२।। अभिमान आता सांडी हृषीकेशी। हृदयी पायाशी पाहे वेगी।।३।। गुरुकृपे विष्णू पाहे परतोन। हृदयी चरण देखिले हो।।४।। तेव्हा ब्रह्मानंद झाला दोघा फार। नाना तो विचार कथिला त्यांनी।।५।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मसुख थोर। मायावी व्यवहार सर्वत्र हा।।६।।

३२९२. तेव्हा हरीने करूनि नमन। आला परतून पूर्वस्थळा।।१।। भैरवाते केले नमन हरीने। म्हणे मी हो दीन आता रंक।।२।। तुमचे पायाचा न कळे हो पार। परमात्मा ईश्वर तू रे श्रेष्ठ।।३।। वाम हस्ताकडे बैसला तो हरी। शिव त्रिपुरारी स्तवीत हो।।४।। ब्रह्मदेव गेला होता मुकुटावरी। वेगे भ्रमण करी अती त्वरे।।५।। चालिला स्वर्गात मंडळ पाहात। पुढील वृत्तांत ऐका आता।।६।। लक्ष्मण म्हणे पुढे तो चालिला। धुंडीत मुकुटाला अती त्वरे।।७।।

३२९३. एकवीस स्वर्ग गेला हो पाहात। आयुष्याचा अंत सरला त्याच्या।।१।। मुकुटी ती कामधेनू ती पाहिली। केतकी देखिली तिजपाशी।।२।। दोघांचा संवाद जाहला तो हो फार। त्रिपदा उत्तर बोलिली हो।।३।। ब्रह्मदेवा कोठे चालिलासी त्वरे। सांगावे ते बा रे मजप्रती।।४।। ब्रह्मा म्हणे माझा विष्णूचा गे पण। पडला म्हणून आलो मी येथे।।५।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मदेव तेव्हा। त्रिपदेते काय बोलिला हो।।६।।

३२९४. विष्णू गेला पाय पाहाया तातडी। मी आलो इकडे स्वर्गलोका।।१।। आधी जो जाईल तो होईल मोठा। पाहावया त्या मुकुटा जाणे त्वरे।।२।। कामधेनू म्हणे ब्रह्मदेवा तू रे। वृथा का शिणशी रे फार तू बा।।३।। तुजऐसे ब्रह्म असंख्य ते फार। गेले ते माघारे नाही आले।।४।। तुझे आयुष्य सरले सर्वही। शिणसी तू काई व्यर्थ बापा।।५।। ब्रह्मदेव म्हणे त्रिपदे वो माते।

सर्वदा मी तूते स्तवितो की गे।।६।। लक्ष्मण म्हणे गायत्रीची स्तुती। करितो वेदमूर्ती ब्रह्मदेव।।७।।

३२९५. ब्रह्मा म्हणे तुझे सत्ते गे करून। करितो मी उत्पन्न सर्वाप्रती।।१।। तरी आता माझे माये कार्य करी। प्रसन्न झडकरी होय मज।।२।। शिवाचे मुकुटी आहेसी तू माते। साक्षी द्यावयाते चाल वेगी।।३।। मुकुट पाहिला ऐसी साक्ष देई। म्हणजे मी विजयी होईन आता।।४।। कामधेनू वदे तेव्हा विधात्यासी। साक्षी तू देण्यासी नेऊ नको।।५।। खोटी साक्ष देता लागेल दूषण। यमाचे दंडन होईल मज।।६।। ब्रह्मदेवा खोटे कदा न वदावे। देवाधिदेव कोपेल रे।।७।। लक्ष्मण म्हणे पुढे काय झाले। भाषण जे झाले तेचि ऐका।।८।।

३२९६. कामधेनू म्हणे मुकुटी मी सदा। परि त्या ब्रह्मानंदा नेणे कैसा।।१।। त्याचा पार शिव अगोचर। असत्य उत्तर कैसी बोलू।।२।। ब्रह्मदेव म्हणे तुजला दूषण। नाही तू गे पूर्ण विश्वमाता।।३।। विष्णू तो येईल चल झडकरी। साक्षी दे लवकरी चल आता।।४।। होणार ते हो चुकेना हो कदा। गायत्री त्रिपदा झाली वश।।५।। लक्ष्मण म्हणे कामधेनू ती हो। झाली प्रसन्न हो ब्रह्मदेवा।।६।।

३२९७. ब्रह्म कामधेनू केतकी घेऊन। आला त्वरेकरून पूर्वस्थळा।।१।। भैरवाजवळी त्वरे हो करून। संगे कामधेनू घेऊनिया।।२।। येता त्यांनी विष्णू पाहिला हो डोळा। म्हणे हे कपाळा कैसे झाले।।३।। माझे आधी विष्णू आलासे पाहून। मज हीनपण आले आता।।४।। भैरवाते म्हणे मुकुट पाहून। आलो मी जाऊन स्वामिनाथा।।५।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मदेव तो हो। पुढे बोलिला हो तेही ऐका।।६।।

३२९८. ब्रह्मा म्हणे कामधेनू ही केतकी। आणिली द्यायाप्रती साक्षी हो।।१।। भैरव तो बोले कामधेनूप्रती। सत्य आम्हाप्रती वद तू गे।।२।। ब्रह्म या देवाने मुकुट पाहिला। दृष्टीने पाहिला त्वा गे काय।।३।। कामधेनू म्हणे मुकुट पाहिला। सत्य आहे गोष्ट महाराजा।।४।। तेव्हा भैरवाते कोप हो चढला। शिरच्छेद केला ब्रह्मयाचा।।५।। लक्ष्मण म्हणे कोपला भैरव। प्रभोचे लाघव न कळे कोणा।।६।।

३२९९. ब्रह्मदेव म्हणूनि न खाते शिर। कापिले शरीर पडियेले।।१।। भैरवाचा कोप दुर्धर पाहून। विष्णू तो पळून गेला त्वरे।।२।। कामधेनूवरी केला कोप फार। म्हणे घे सत्वर शाप माझा।।३।। नाना वर्ण होशी मुख ते अपवित्र। असत्य तू वक्त्रे बोलिलीसी।।४।। तेव्हा कामधेनू म्हणे महाराजा। अन्याय हा माझा क्षमा करी।।५।। लक्ष्मण म्हणे भैरव तोषला। कृपेने बोलिला तेही ऐका।।६।।

३३००. गोमय गोमूत्र केले हो पवित्र। दुग्ध हे पवित्र तुझे जाण।।१।। केतकीते शाप दिला भैरवाने। म्हणे मुकुटी राहणे नोहे तुझे।।२।। कंटक होतील तुझ्या अंगी फार। पुढील विचार तोही ऐका।।३।। ब्रह्मयाचे शिर पडले भूतळी। शिर करकमळी भैरवाच्या।।४।। गणांसमवेत तेथे पंचानन। आला हो धावून अती त्वरे।।५।। लक्ष्मण म्हणे वीरभद्रादी गण। प्रभोचे प्रवीण भक्त ते हो।।६।।

३३०१. ब्रह्माचे ते प्रेत पाहिले शिवाने। म्हणती या दीनाने काय केले।।१।। भैरवा या दीना मारिले का व्यर्थ। तेव्हा विश्वनाथा कृपा आली।।२।। ब्रह्महत्या तुज घडली रे जाण। जाय झडकरून तीर्थाप्रती।।३।। तुझ्या हाताचे हे कपोल पडेल। तेथे ही जाईल ब्रह्महत्या।।४।। तेव्हा तो भैरव निघाला तीर्थासी। मागे ती विवसी ब्रह्महत्या।।५।। लक्ष्मण म्हणे विक्राळी भ्यासूर। चालिली माघारे भैरवाच्या।।६।।

३३०२. शिवाने इकडे गणा केली आज्ञा। आता या ब्राह्मणा उठवा त्वरे।।१।। गण त्वरे गेले जाह्नवीचे पाणी। आणिले जाऊनि अती त्वरे।।२।। शिवे त्याचे प्रेत गजांबरेकरून। टाकिले झाकून विश्वनाथे।।३।। भस्म हो मंत्रून जाह्नवीचे पाणी। टाकिले शिवांनी प्रेतावरी।।४।। भोळा नाथ तात दयेचे आगर। कृपेचा भांडार भक्ताविषयी।।५।। लक्ष्मण म्हणे भक्ताचा दातार। स्वामी गंगाधर सत्य सत्य।।६।।

३३०३. चतुर्मुख ब्रह्मदेव केला ताते। चार मुखे त्याते लाविली हो।।१।। वेदाचे ते मुख लाविले शिवांनी। स्वामी शूळपाणि वरदाता।।२।। उठविला ब्रह्मा झाला जयजयकार। केला नमस्कार शिवाप्रती।।३।। ब्रह्मदेव उभा बद्धपाणि स्तवन। करी लोटांगण घाली प्रेमे।।४।। वारंवार ब्रह्मा घाली

लोटांगण। अष्टभावे स्तवन केले प्रेमे।।५।। लक्ष्मण म्हणे ब्रह्मदेवे स्तुती। केली नाना युक्ती प्रेमभरे।।६।।

३३०४. ब्रह्मदेव म्हणे निंदिले ज्या मुखे। छेदिले त्र्यंबके बरे झाले।।१।। शिवनिंदा घडली दुष्ट ते आनन। गेले हो तुटून भैरवाहस्ते।।२।। शिवस्तुती केली शिव तोषविला। ब्रह्मा जाता झाला सत्यलोका।।३।। विरूपाक्ष गेला गणांसमवेत। उमादेविकांत स्वस्थळाते।।४।। ब्रह्मदेवा पूर्वी एक मुख होते। चतुर्मुख ताते पुढे केले।।५।। लक्ष्मण म्हणे परात्पर शिव। नाम महादेव साजे त्याला।।६।।

३३०५. भैरवे ते केले पाताळीचे तीर्थ। पुढे स्वर्गपंथे गेला त्वरे।।१।। स्वर्गीचे ते तीर्थ केले हो सर्वही। वैकुंठा लवलाही जाता झाला।।२।। हरि-कमळजेने भैरवपूजन। केले प्रेमेकरून अष्टभावे।।३।। नाना रत्नेकरून केले हो पूजन। उपचारकरून पुजियेला।।४।। दिव्य ते कमळ भैरवाच्या गळा। घालूनि कमळा स्तविती झाली।।५।। बद्धपाणि हरीने केले हो स्तवन। झाला तो प्रसन्न महांकाळ।।६।। उग्रमूर्ती तेव्हा वर देता झाला। अक्षयी तुजला जय असो।।७।। लक्ष्मण म्हणे महांकाळ तो हो। पुढे बोलिला हो तेही ऐका।।८।।

३३०६. अक्षयी विजयी होशील तू हरी। कमळजा सुंदरी तीही तैसी।।१।। हरीते पुसूनि निघाला तो काळ। सखा जाश्वनीळ अक्षयी ज्याचा।।२।। ब्रह्महत्या क्रूर पाहिली हरीने। पदरी धरून उभी केली।।३।। म्हणे तू का गे यामागे भ्रमसी। सांग गे आम्हासी जाय त्वरे।।४।। विक्राळी ती म्हणे शिवाज्ञेकरून। आले मी धावून याचे पाठी।।५।। त्यांनी मज याचे पाठी हो लाविले। आणि सांगितले एक मज।।६।। लक्ष्मण म्हणे बोले ती हरीसी। म्हणे हृषीकेशी ऐक पुढे।।७।।

३३०७. विक्राळी ती म्हणे ऐक नारायणा। भक्तकल्पद्रुमा दीनानाथा।।१।। शिव ते वदले यांचे मागे जाय। म्हणजे तुझी सोय होईल गे।।२।। त्याचिये हातीचे कपोल गळेल। तेथे गे होशील मुक्त तू गे।।३।। बहुता युगीची आहे मी पापीण। शिवे वरदान दिले मज।।४।। म्हणूनि मी त्याहा मागे हो भ्रमते। निघाली हरीते पुसूनिया।।५।। लक्ष्मण म्हणे भैरव भूतळी। आला चंद्रमौळी

स्तवीत हो।।६।।

३३०८. केदार महांकाल सोमनाथ शिव। पुजूनि भैरव निघाला हो।।१।। त्र्यंबक पुजिला भीमा तो शंकर। परळी वैजेश्वर पुजियेला।।२।। नागेश पुजिला स्वामी मल्लिकार्जुन। ॐकारी पुजून घृष्णेश्वर।।३।। रामेश्वरलिंग पुजूनि तो काळ। उडाला विक्राळ स्वर्गपंथे।।४।। आनंदवन ते देखिली हो काशी। संतोष मानसी फार झाला।।५।। लक्ष्मण म्हणे आनंदाचे वन। शिवाचे भुवन निजकाशी।।६।।

३३०९. पंचक्रोशीमध्ये गेला तो भैरव। शिव कृपाळुव सखा ज्याचा।।१।। हातीचे कपोल गेले हो गळून। विक्राळी पावन झाली कृपे।।२।। मनकर्णिकास्नान केले मग त्यांनी। लिंग ते स्थापूनि बैसला हो।।३।। आसनी बैसून आराधी शिव। देवाधिदेव भोळा नाथ।।४।। आठ लक्ष वर्षे केले तप थोर। तेथे उमावर प्रकटला।।५।। लक्ष्मण म्हणे शिवे दिला वर। हृदयी कुमर धरियेला।।६।।

३३१०. शिव म्हणे वत्सा केलासी प्रवीण। माझे वरदान घेई आता।।१।। गणांमाजी श्रेष्ठ केले म्या तुज रे। आणिक घेई बा रे वर माझा।।२।। काशीचा अधिकार दिला रे तुजला। अग्रपूजा तुजला दिली म्या रे।।३।। माझे आधी तुझे होईल पूजन। काशीचे रक्षण करावे त्वा।।४।। शिवकृपे सदा भैरव विजयी। त्रिभुवनगोसावी सखा ज्याचा।।५।। लक्ष्मण म्हणे काशी तो निवासी। अक्षयी भैरवासी दिले शिवे।।६।।

३३११. अगस्तीप्रती हो कथिले स्वामींनी। तोषले ते मुनी महाराज।।१।। व्यासदेवे तेचि कथिले पुराणी। स्कंद त्या पुराणी महिमा मोठा।।२।। पापाचे क्षालन होय हो म्हणून। चरित्रकथन केले त्यांनी।।३।। शिवसखा होय कैलास तो वासी। अक्षयी महेश कृपा करी।।४।। लक्ष्मण म्हणे व्यासाची हो वाणी। बोलिले पुराणी सत्य सत्य।।५।।

□□

उर्वरित अभंग

३३१२. शंभो भेटी द्यावी देवा। पूर्णब्रह्म सदाशिवा।।१।। ऐसे वाटे माझे मनी। दृढ असावे चरणी।।२।। माझी पुरवावी आस। पायी ठेवा हो दीनास।।३।। का हो विलंब लाविता। देवराया श्रमविता।।४।। फार भ्रमण म्या केले। नाना दुःख हो पाहिले।।५।। लक्ष्मणा तुजविण। कोण सोडवी येथून।।६।।

३३१३. धन्य क्षेत्र काशीपुरी। तेथे नांदे तो त्रिपुरारी।।१।। ब्रह्मांडातील दैवत। वसती वाराणसी आत।।२।। ब्रह्मा विष्णू अमरपती। केली अक्षयी त्यांनी वस्ती।।३।। अष्टदिशेचे दिक्पाळ। मेरुमांदारादी भूपाळ।।४।। सकळ तीर्थे वसती जाणा। सप्तसमुद्र लिंगे नाना।।५।। अठ्ठ्यांशी सहस्र ऋषीश्वर। तपी बैसले योगीश्वर।।६।। लिंगमय वाराणसी। लक्ष्मण विनवी विश्वनाथासी।।७।।

३३१४. वाराणसी पुण्यभूमी। तेथे राहे मोक्षदानी।।१।। बहुता पुण्याचिया राशी। महायात्रा घडे त्यासी।।२।। काशी काशी स्मरता वाचे। दोष हरती जन्मांचे।।३।। लक्ष्मण म्हणे तेचि धन्य। विश्वेश्वरी केले पूजन।।४।।

३३१५. स्वर्गतरंगिणीचे स्नान। ब्रह्मादिक करिती प्रीतीने।।१।। तिचे नामस्मरणेकरून। पातके नाशती दारुण।।२।। सकल देव येती स्नाना। गंगेतटी बैसले जाणा।।३।। धन्य धन्य तेचि जन। नित्य करिती गंगास्नान।।४।। सकळ जगाचा उद्धार। करिसी तू निरंतर।।५।। लक्ष्मण हीन दीन। गेला प्रभोसी शरण।।६।।

३३१६. पूजा कोठे म्या वाहावी। शंभो वसे सर्वठायी।।१।। करू गेलो अभिषेक। जळी पाहिला त्र्यंबक।।२।। नाना सुगंध उपचार। तेथे भासला ईश्वर।।३।। समर्पावे बिल्वदळ। पत्री वसे जाश्वनीळ।।४।। धूप अर्पू गेलो त्यासी। धूपी कैलासनिवासी।।५।। दीपी उजळिल्या वाती। दीपामाजी पशुपती।।६।। नैवेद्य ठेविला पक्वान्न। माजी वसे पंचानन।।७।। तांबूल अर्पिली दक्षिणा। मध्ये त्रैलोक्याचा राणा।।८।। करू गेलो पुष्पांजुळी। पुष्पी

वसे चंद्रमौळी।।९।। ध्यानी पाहिली हो मूर्ती। अंतर्बाह्य पशुपती।।१०।। मग स्तवन आरंभिले। स्वरूप प्रभोचे फाकले।।११।। आदि-मध्य-अवसानी। सर्वाठायी चिन्मयखाणी।।१२।। सर्व म्हणती हे मायिक। वस्तू चिन्मय ती एक।।१३।। अहंकृती हो सांडून। वेगी घ्या हो दर्शन।।१४।। लक्ष्मण म्हणे खूण। जाणती हे योगी जन।।१५।।

द्विरावृत्त अभंग

पुढील अभंग दोन वेळा आवृत्त (मुद्रित) झाले. ती स्थले अशी:-

१. तुझा तूचि देव	...	अभंग क्र. १७१ - ६५४
२. धाव धाव वेगी	...	अभंग क्र. ८५० - ८५२
३. नरदेहाऐसी पुण्ययोनी	...	अभंग क्र. ७०० - १५६२
४. शिवपूजनाचा कंटाळा	...	अभंग क्र. १३२२- १३८२
५. शिवाप्रती बिल्व नित्य	...	अभंग क्र. २४० - ६४३

अभंगसूची

(सूचीतील आकडे अभंगांचे आहेत.)

श्री मन्मथस्वामींचे अभंग

अवघ्या शकुनाचा १०
असे शुद्ध भाव १०३
अहो दीपकीं पतंग ९२
आर्धीं आम्हीं १८
आपुल्या ब्रीदाचा ४९
आपोनारायण २२
आमुचें प्रारब्ध ७४
आम्हां नसेची ७६
आम्ही वंद्य म्हणा ६५
आलीया संकट ५४
इष्टलिंग हृदयावरी ६६
उठोनिया प्रात: १९
उदास असावें ४२
उमारंग आमुची ९८
ऐक पंढरीच्या १२९
ऐका कथेचें १०२
करितो शिवरात्री ११८
कार्नी ठेवूनीया ९१
काम जिंकिला ९४
कामें नाडिलें ९५
काय केलें रांड ५३
काय कैलासा १०६
कैलासीचें ठार्यी १०५
कोणी एक चोर ४
कोण्याही साधनीं ३०
गुरु आणि लिंग १०९
गुरुदेव सार ११३
घेवोनिया सोंग ५०
जटाजूटीं गंगा २
जन्मा आलिया ७०
जयजय मदनांतका १०१
जयासी नावडे ६१
जळो त्याचें ज्ञान ८२
जाणोनि नेणें करी १०४
जारिणीसी ८४
जेणे देव चढे १२२
जोडोनिया हात ३४
ज्योतिर्लिंग आदि १३६
तया भावें शरण ९३
तया भुकेचिया १२१
तुजलागीं हेंची ११०
तेची पुण्यवंत नर १५
तेणें सर्व केलें ८३
तोंवरीच देवा ७८
तोची शिवभक्त ६२
दुष्ट लोक जरी १२८
देऊळा आधार ८५
देव शरणांगता ११
देवा मज तारी ४७
देह नोव्हें साच ४०
द्विविध हें कर्म ४३
धन्य तयाचा ९०
धन्य धन्य गुरुराया १३५
धरी इच्छा २०
न करिती सोमवार ६८
न पडो विसर ८१
नाम सार नाम ११६
नाहीं मज ज्ञान ४८
निजूं नका जागा ५७
पतिव्रता न पाहे २७
पातकी म्हणोनि ३८
पार्वतीशी म्हणे १२
पिंडीवरी ठेवितां ८
पुण्यवंत तोची १३
प्रदोष शिवरात्र ११९
प्रमथ गणाचिये १
पंचाचार हेचि १३२
फट् रे द्वाडा ५६
बहुता सुकृती ३९
बा रे गेलों गेलों ७२
भक्ताचिया घरी ८६
भवरोग जाय जेणें ३७
भस्म आम्ही १३०
भाळीं भस्म लिंग १४
भाळीं भस्मरेखा ८९
भावेविण ज्ञान ४१
भोळ्या शंकरा १०७
माझें जीवीचें १७

माझ्या मना लागो ७५
मुळीं शिंपिलिया ३५
लिंग म्हणे धोंडा १२७
लिंगबोली वेद १२६
लिंगांगासी लग्न २५
वरवर दावी ६९
वर्णांमाजी श्रेष्ठ ८०
वाचें वदा नमः १०८
वाणूं नये गुणदोष ९
वासनेचा फासा ७३
वीरशैवमार्ग क्रिया ६३
वेडा झालों ७९
शरण आले त्याचें ३३
शिव तोचि देव ५
शिव नाद शिव ७१
शिव शिव गर्जे ३१
शिव शिव म्हणतां ६७
शिव शिव वेळो.. ११५
शिवभक्ताचें कुळीं २८
शिवभक्तिविन्मुख २३
शिवरात्री व्रत ११७
शिवसुता गणपती १३४
शंकर तोची २१
शंकर हा मंत्र २९
शंकरा शरण १६
शंभु महादेवा ४६
सत्संगे न धरी ५२
सदा भस्म लावा ४४
सदाशिव श्रीमहेशा १३१
सद्गुरूशी शरण ११४
सनकादिकांचे जे ३
सर्व देवांमाजी श्रेष्ठ ११२
सर्वगत तुझें राहो ५१
सांडोनि शिवातें २४
सांडोनि सकळ २६
सांडोनी स्वधर्म ६०
साठविला पोटी १२३
साधन तें हेंची ३६
साधूच्या वचनीं ५९
सायंकाळी शिव ८७
सार सकल ७
सुंदर ते रूप १११
सुखी केलें मज ६
सुखेंअसा गृहाश्रमी ६४
सोडोनिया आत्म..५५
सोपे आहे बहू ४५
स्वधर्माचा त्याग ५८
संन्याशाचे सोंग १२०
संसाराचें ठायीं ७७
षट्स्थल ज्ञान १३३
हर जित्ता मेल्या ८८
हर मुखीं नाम ३२
हर रे निर्मळ ही ९९
हर रे वीरशैवधर्म ९६
हर रे शंकर मंत्र ९७
हर हर गेलो १२५
हर हर शिव १३७
हलवूनिया खुंटा १२४
ज्ञानगर्वें झाला १००

श्री शिवलिंगस्वामींचे अभंग

अंतरीचा सर्व ५
अहंकार हा तो ७
कोणेक अभागी १२
खऱ्या नागोबाचें २
जरीपटका तो न १०
तुझें नाम पशुपति १
बाळपण व्यर्थ ११
भक्तकामकल्पद्रुम ९
मागे बहुतांची ३
होणार तें सुखें ४
होणाराच्या पुढे ६
ज्ञानियाचे कर्म ८

श्री लिंगेश्वरांचे अभंग

ॐ नमो सद्गुरु २७
अणुहूनि आम्ही ४६
अध्यात्माचे ग्रंथ ४५
अंतरात्मया ३
आतां मी सांगेन ३५
उत्तम क्षीरामाजी ४८
उदयालागी कैसा १४
उपदेश करिती ४०
एक वेळां मिळे १८
ऐका नवल वर्तले ५०
ऐसा कोण आहे १२
कामसर्पे मज २२
कोणी एक अभागी १५
कोणी एक मेंडका ९
कांता पुत्र वित्त ४३
गुरु ध्याई गुरु १
गुरुराया धन्य धन्य ४१
चहू युगामाजी १७
चौऱ्याऐंशी लक्षें ५
जसी सिंधु आपणा ३६
जाणा पशु पक्षी २८
जास्वंदाचे पुष्प ११
तारु बांधोनिया २०
तृषाक्रांता जैसी ४
दळण दळितां १९
देहात्मभावना ४४
देही घरामाजी ६
नाहीं तो प्रकाश ३०
पटकर पोतेरें करी १३
पतितपावन शिव. ४९
पांच गेले पांचा ७
पाहाता स्वरूप ४७
प्रथगाकार ब्रह्म ३८
फाकट फुकट २१
बोली बोलवेना ३२
ब्रह्मत्व वर्तती २९
भावना भावितां ३३
भावना विपरीत ३४
भोळा चक्रवर्ती १६
येई बा शंकरा २
रुईच्या फळामाजीं ८
विषय स्मरता ५३
वृक्ष परब्रह्म ३७
शंकर पाहुणा ५२
सद्गुरु सज्जन माय २६
सर्व साधनाचें २३
सांडोनियां जन १०
सावध होई सावध २४
सिंह व्याघ्र सर्प ४२
स्वामीसी चुकलें २५
हरपलें मन इंद्रिया ३९
हाय हाय हाय ५१
क्षरक्षरातीत उत्तम ३१

श्री बसवलिंगांचे अभंग

ॐकारस्वरूपा ८४
असतां वैभव १२८
अष्टदळाचा जो १३
अष्टावरणा चारी ६६
अंबे तुझे अंकी १३०
आकार मिथ्या २
आजानवृक्षातळी ८१
आत्मा नाहीं येत ४०
आदी नमो आदी ६
आनंदल्या नरनारी ६८
आपुला निश्चय १५
उदयाचळी निघाला ११६
उदास शंकर कृपा. ५७
ऐसियासी माझें १८
कपिलधार क्षेत्र ८८
करी निंदा द्वेष ५१
करीन अट्टाहास १६
कळंबीचा स्वामी ६०
काय करी प्राणी ४६
काय तैसा भाव २५
काय होती संत १०४
काया हेच काशी १२३
का रे माझे मना १२२
कैसा तू सीलवंत १२०
कैसी सभेसी आली १२१
कैसे या जीवाचा ६५
कोण जन्मले हो ३०

गर्भवासाचे ते ११४
गुरुवाक्य धरा १
चिद्गगनाचे सुंदर ५५
चौसष्ट अधिक ११५
जना हा सारिखा ९५
जप करोनी काय ३६
जीव आणि शिव ४३
जीव शिवा वेगळा २७
जीव शिवाचा ९
जो जो करी माझे ७४
ज्याचे संचित त्या ११
जंगम शिवयोगी ११७
झाला भक्ताचा ११८
तैसा नोहे माझा १०२
दिधलें ते घेत नाही २६
दुर्जना नावडे ९८
देव आपणा जवळीं २१
देव जडला जाईना ४९
देवें माझा जन्म १७
देह देऊळ शिरो. ८
देहीच असता ७६
दैवत कवण तत्त्वाचें ३८
धन्य कपिलमुनी ५४
धन्य त्याचा जन्म २३
धन्य भूकैलास ५३
धन्य भूकैलास धन्य ८३
धवळा हिमालय १०८
धाव धाव गौरीवरा १०१
नागनाथ सिद्ध ९१
नाहीं इंद्रिय ज्यासी ५०
निज ज्ञानी उन्मत्त २०
परमार्थ हा नोहे ४४
पवित्र ते कुळ ५९
पश्चिमेची न कळे २९
पाहूनिया भस्मधारी १००
पुत्रप्राप्तीलागी ११३
प्रतापी माझा हा १३१
प्रथम अंत:करण ९२
प्रथम शुक्तिका १०९
प्रदोष शिवरात्र ६२
प्रात:काळ झाला ७९
प्रारंभी शिवराज ७०
पंचभूतिक सर्व ४८
फळ देठीचे ९२
बहुत दिवस नाही ८६
बहुता जन्मोनी १२४
बा रे नंदीश्वरा १११
बाळा कळवळा १२५
बोलती शिवराज ८२
बोलोनि वचन कष्ट. १२६
ब्रह्मस्थिती पूर्ण ७३
भक्तीचें धनुष्य ४१
भावार्थ तो ऐसा १९
भोळ्या चक्रवर्ती ८७
मते ती पाखंड ११०
मना तुजलागी ९६
मन्मथ शिवराजे ८९
मरण कवणासी न ३
मरणाभेणें भीती २४
महाराष्ट्र देशी झाला ५६
मादिराज भक्त ११२
मायाबाप सखया ८५
माहेर निनगुरू ६३
मी तूं हें विराले ४२
मुळीं बाप होता ५२
मंगळ बुधी दिन ७८
मंगळमूर्ती मोरेश्वरा ७
युतीच्या प्रसंगीं ४५
येई बा मन्मथा ९०
येणें जाणें नाही ३९
रुद्र अनुहताचा २२
रुद्रस्वरूप तेजाळ ३५
रुद्राच्या तेजांशें १३२
लिंगस्थानीं ब्रह्म १०
वास केला जेथे ७५
विष्णु आपरूप ३४
विष्णु मन पवनीचा ११९
शिवजटा भारी १२९
शिव जीवासी उद्धरी ४
शिव झाला गेला ५
शिव निराकार ३२
शिव पतिसेवा ६१
शिवभक्तालागी ९९
शिवराज सद्गुरू ७२
शिवराजे आपण ८०
शंकर न म्हणे १०३
शंकर म्हणे गौरी ९४
सकळ जिवाचा २८
सकळ मंगळ ६९
सत्पुरुषाची चिन्हें १४
सत्य तोची धर्म १२
सदाशिव कैसा ३७
सदाशिव ये गा ३१

सद्गुरू शिवराज ७७
सद्भाव देखोन ४७
सरले नऊ मास ६७
सर्व मायेचे ९४
सर्व विश्वाचा तू १०६
सारा ब्रह्माकार ३३
सेविता विषय ९७
स्मरण करा हो १०७
स्वहित कीजे १०५
संतांची संगती ६४
संताचे ते ब्रीद ५८
श्रेष्ठ पद पाहाता १२७
ज्ञानिया तो ऐसा ७१

श्री महादेव प्रभूंचे अभंग

अकरावा रुद्र २६०
अखंड मंडलाकार १३३
अठरा युगे शिव २३
अठरा योगामाजी २१४
अढळ समाधी १७०
अधिकार काय ५६
अधिकार काय ८०
अनंत जन्मीचे २१
अनंत ब्रह्मांड १९४
अनिर्वाच्य जाती १३२
अर्धनारीनटेश्वर ६
अष्टप्रहर गेले ५४
आज भाग्याचा १३७
आणिले उजेडा २००
आता आम्ही काय १४३
आत्मबोध झाल्या १६१
आत्मा अविनाश १९७
आत्मा ब्रह्मरूप १९८
आपण असावे २०६
आपुला म्हणोनि ७०
आपुल्या स्वहिता ९६
आम्हा न लगे ९९
आम्हासी चोरूनि ५७
आम्ही ब्रह्म झालो १६४
आरंभिला यज्ञ २३२
इतुकेचि आता ७३
इतुकेचि..मागणे ७४
उदार म्हणोनि ९३
उपदेशिले मज ६७
उफराटे वृक्षी १८९
उमावल्लभ शंकराचे ८
ऋषिलागी राव २२२
ऋषी म्हणे राया २२९
कनकाचळी वाहे २५२
करी फोडी काष्ठे ३८
कलियुगामाजी १९
कलियुगी धन्य २१५
कलियुगी नाम सार १४
कलीमाजी घटिका १६८
काय गावे काय १३५
काय मी पामरे ५१
काया काशीक्षेत्र २५८
काशीवासालागी २५१
किती वेळ जन्म ३६
किरीट कुंडले ७९
कुरंग नाभीचा २०१
कुरंगाचे नाभी १९१
कुर्मा तान्ही बाळे १२३
कूर्मनाभीसी आधार ८२
कृतयुगी लक्ष १५८
कोटि कीटकाचे ३५
कोटि सूर्यसम प्रभा ४
कोटी पुण्याचे पर्वत १०२
कोटी यागांचे सुकृत ११६
कोठील मी कोण २११
क्रियेविण बोले १५५
गंगा भगीरथे २५०
गंगाजळे तरु २५६
गंगेने त्यागिले ४९
गगन सरिता १५१
गजचर्माचे भूषण ७
गर्जती पुराणे ९४
गर्भवास प्रिय मोठा ६०
गळा रुंडहार १२
गावीचे ते ओहळ ४०
गुरु उपदेशिती २५
गुरूरूप हे कोणचे २८
गुरू देवांचाही देव २४
गोड नाम शंकराचे १५
गोफाणिला हिरा १८१
ग्रंथ वाचोनी काय ४५
घनगर्जनेचा ऐकूनि २०

घृत कणिकेचा १४७
चतुर्दली गणपती २१३
चहू वेदांचे जिव्हार ७६
चातकाने काय ११३
चिताभस्म भाळी १११
चित्त चैतन्य ध्येय १५०
जनी वनी पाहता १९६
जन्म घेऊ वारंवार ६३
जन्मताचि अंगी २२१
जन्मा आलियाचे १२९
जयजयकार गर्जि २३३
जरायुज अंडज १२५
जळपानालागी २४१
जाळिला मदन ९१
जीव-शिवऐक्य १८५
जेणे हृदयसंपुटी १६६
डोळियाचा डोळा १२६
डोळे तुम्हासी ९७
तपे करूनि मोक्ष १५९
तिसरी कुरंगी २४४
तीही लोकामाजी २४९
तृषाक्रांता लाभ ४७
तोचि एक भाग्यवंत १२०
तोडी तोडी ह्या ६४
त्रिगुणाची वळली १३८
त्रिवेणी संगम २५४
त्रिवेणीसंगम पर्व १४९
दग्ध झाले लिंग २२६
दीनानाथा ब्रीद ७१
दुजी कुरंगिणी २४३
देऊनि आसन २३४
देव कोठे आहे ३
देव जोडे ऐसा ५५
देव पाहता आहे ८८
देव पाहता पंचमुख २
देव शिंगणापुरीचा २५९
देवद्वारी उभा राहे १०८
देह काशीक्षेत्र २१९
देही देव आहे २०४
दोची अक्षरांचा १५२
द्यावी सेवेची निकट ६२
धन्य काशीपुर २५५
धन्य गुरुराया १५३
धन्य ती माऊली १८३
धन्य धन्य काशी २५७
धन्यधन्य शिवदीक्षा १०४
धन्यधन्य शिवभक्ति १०५
धन्य धन्य साधुसंग ११९
धन्य राजयोगी १४४
धालेपणाचे ढेकर १६७
नको कोरडे हे १५४
नको मज मोक्ष ५९
नको शास्त्राभ्यास ११५
नको षड्मुद्रा २१६
नगदुहितेचा पति १०७
नग्न मौन जयासाठी १३९
नरजन्म गेला वाया ४६
नरजन्म जलावरील १७४
नवनिधी द्रव्य ६८
नादबिंदा पडल्या १५७
नाम गोड नाम १६
नामामृत गोड १८
नाही केले तीर्थाटन ४१
निराकाररूप १४५
नृत्यशाळा भस्म २२५
पंचमहाभूते झड ११४
पंचवटीमाजी २६२
पंचवदनाचे एक्या ८४
पतिव्रतेमाजी शिरो २३७
पराशर म्हणे राया २२८
परिसाचा अधिकार १५६
परिसाचे थोरपण १०३
परोपकारे मेरू १८२
पस्तीस गुणांचा १९९
पाषाण परीस १२४
पाहूं भूकैलास २५३
पिंडी ते ब्रह्मांडी २०३
पुत्रालागी राज्य २३५
पृथ्वीवरी तीर्थे २४७
प्रपंच परमार्था १७७
प्राणहीन वपू ९५
प्रात:काळी होता ११०
प्रेमळाचा देव १०९
प्रेमे पाझरे सर्वांग १२८
बद्ध आणि मोक्ष १८४
बहुत जन्मांचा १४२
बीज रोपिले श्रवणी २६
ब्रह्मचि ब्रह्मार्पण १६०
ब्रह्मरूप भासे २१८
ब्रह्मांडपालक ३१
ब्रह्मांडमंडप भासे २०८
भक्षातुर मृग २४५
भवरूपी आणिले १९०
भवरोगियासी नाम १७
भवरोगियासी ब्रह्म ३०
भवसागरीचे नाम १७६

भस्म जयाचे ललाटी १०१
भाळी स्रवते चंद्रा ६६
भाविकासी देव २०७
भ्रमता शिणला २४०
मज कैचे ज्ञान ४४
मज भेटो ऐसा ४३
मन मोहिले शंकर १४०
मसुरे प्रमाण जेवी १४६
महानंदा भावे २२४
महालाभ आजि १३६
महालाभ हाचि १८०
माघ कृष्णपक्ष २३९
माझी दीनाची ३९
माझे अपराधे ३७
माझे जीवीचे १००
माझे मज दाखविले १३४
मानवाचा जन्म १८७
माय भागीरथी २६३
मृग म्हणे मज २४६
मृगअक्षासम नरा १७५
मौनावला देव २१७
मंत्रामाजी पंचाक्षर ११७
मंद माझी बुद्धी ४८
मंदिरांत लिंग २२३
यथासांग कर्म १७९
रत्नजडित सिंहासन ५
रामे रामेश्वर २६१
रूप सगुण सुंदर १
रोपिले ते वरी १६२
लक्षचौऱ्यांशीचे फेरे ४२
लक्षचौऱ्यांशीचे पोटी ६१
लडिवाळ आपुले ५८
ललाट पटांत ५०
लोकलाजेवरी ९०
लोहाने परिसाची १२२
लोहामाजी सोने २७
लिंग अंगा समरस १९५
वत्सलांछन हृदयी ८१
वर्णाश्रम धर्म कर्म २१०
वर्णिता शिणले ८७
वाटुळे बिंदुले जेणे ३३
वाहे भागीरथी २४८
विधी लिहीतसे १८८
विबुध अवतार ७२
विश्वनाथ नाम ११
व्यर्थ गेला जन्म ३४
व्याध म्हणे तुझा २४२
वंद्य अभिमान १८६
शतरुद्र करूनि पुत्र २३१
शब्द ब्रह्मचि १६५
शरण रिघेल जो ११२
शिव म्हणे तुज २२७
शिव शिव दोचि २०९
शिव शिव वाचे १७३
शिव शिव वेळो १६९
शिव शिव शिव १७२
शिव शिव हाचि १०६
शिवचरणी जडले १९३
शिवभक्त ऐसे ८९
शिवरात्रि पर्व थोर २३८
शुद्ध संकल्पाचे १३०
शेवटची विनवणी ६५
सकळांसी हेचि ७५
सगुण निर्गुण २०५
सगुण स्वरूप १७१
सदाशिव नाम मंत्र ८३
सद्गुरुरायाचे पद २९
सबाह्य आभ्यंतर ११८
सर्व देवांमध्ये थोर ७८
सर्व वैराग्याचे मूळ १६३
सर्व सुखाचे भांडार ९८
सहस्रमुख शेष ८५
सारीपाट खेळ २३६
साहिना हा योग २३०
सिंधू मषीपात्र ८६
सिंधू सरितेसी ५३
सुंदर ती मूर्ती ९
सुंदर रूपडे १०
सुंदर रूपांचे १४८
सुकृताचा मित्र १४१
सुखा नाही अंत १२७
सुधेहुनी गोड नाम २२
सोडिता प्रपंच १७८
स्कंदपुराणीचे २२०
स्थिरचर भरूनि ३२
स्थूल म्हणू जरी २०२
संचित प्रारब्ध ६९
हरीच्या पाडिया ५२
हिरियाचे खांब १३
हृत्कमलामधी २१२
हृदयमंदिरी साठ १९२
श्रुती शास्त्रे मौना ७७
क्षीरसिंधुतीरी ९२
ज्ञान अज्ञानाची १३१
ज्ञान चातुर्य वैराग्य १२१

श्री शिवदासांचे अभंग

ॐ नमोजी सदा. ८०
अगा शंभुराया २५
अग्नी भेटतां कर्पूरा १२
अनंत जन्मीचें १७३
अनन्य शरण ७७
अन्न आच्छादन १७१
अन्य साधनांत १७९
अलभ्य हा लाभ १६५
अवघे नाठाळ २०४
अव्यक्त चित्तासी १७५
असकृदुच्चारें १५९
अहो तुम्ही जड १४१
अहो देवराया कोठें ८५
अहो या स्वरूपाचा ११६
आजि भूमिसुत दिन ११०
आता लवकरी २८
आतां नमस्कार माझा १०६
आतां नमस्कार पाया ७८
आतां मी कोणाची २३
आदि अंती चंद्र. १८६
आदि अंती सुख. १३५
आधी नमू उमापती ९६
आपुले वागणे ते २१८
आपुलें कल्याण १६८
आमुचे ते आप्त २०९
आम्हां ऐसे पुण्यवंत ५१
आम्हां पतितासी ८६
आम्ही जाऊ तया १८४
आम्ही न करू ही १०२
आम्ही नेणो भक्ति ४४
आम्ही वीरशैव ३०
आम्ही शरण शरण १९६
आम्ही शिवदास १८८
आम्हीं अपराधी ६३
आम्हीं शरण शरण ६२
आसनीं शयनीं १६९
इतके देई गा तूं १०३
इंद्रावन पाहता २१५
उदंड तें गाती ९५
उपनिषद जे कां १५८
करा करा शिवरात्र २२६
करुणाकर दीना. १२१
का हो मजलागीं ३३
कांहीं न मागे ६१
कांहीं न रुचे बा ६६
कामें क्रोधें लोभें ५७
काय करूं कोठें १०१
काय करूं देवा २६
काय तुज आम्ही ४६
काय बोलूं मी १२६
काय माझा गुण १४८
काय माझें मन २२
काय म्यां करावें ३९
काय वांचोनिया ५३
काळाचिया दाढी १९७
किती उदार सद्गुरु ११३
किती तुम्हांलागी ९१
किती तुम्हांलागीं ८८
किती पहासी निर्वाण ७२
कैचा दाता आणि १२८
कैसा माझा तुज ३८
कैसें असें तुझें रूप ७१
कैसें करूं मी ४३
कैसें परी तुझें १८
कांता पुत्र वित्त १६७
गाऊं वाटें तुज १४४
गाळांमाजी पशु ९३
गेले मोठे मोठे थोर १२४
घडोघडी प्रेमभावा ११९
घालूनिया पद्मासन १००
चरणीं नृत्य करीं १५०
चवदा वर्षांचे २१०
चहुशून्याचे शिखरी १८७
चित्तीं विषयाचा ४२
चौऱ्यांशी लक्ष ५८
चौऱ्याऐंशी लक्ष १७२
जयजयाजी जाश्व. ८४
जरी सुख व्हावे १९६
जे का शिवरात्र २२५
जिव्हीं नाम श्रवणीं ९७
जीव शिवाची १४२
जेथे गाती माझे २०५
जेथे जाय आमुची २१६
जैसी कळे तैसी ३१
जो कां म्हणवी ६८
जो पोटाचा भुकेला २१७
जोंवरी काळ होता १०५

जोंवरीं काळ पाठीं १५
ज्याचें चित्तीं तुझा ४१
टाकून प्रपंच व्यव. ६७
डोळेंभरीं तुझें २९
तानुलीया बाळा ११५
तीर्थ व्रत दान १६२
तुज करिता प्रणाम २००
तुज रिघालों शरण १०७
तुजविण नेणो ३२
तुजविण शंभुराया १०९
तुजविण शंभुलिंगा १३१
तुझा बा विसर ९०
तुझी धरियेली कास ४९
तुझे न करितां दास्य ६५
तुझें कराया पूजन ५९
तुझें नामीं प्रीती ६०
तुझे रूप घडोघडी २२२
तुझ्या कृपें देवा ९
तूंचि सखा माझा १४
तूचि सखा माझा १८५
तेणे जोडिल्या १९३
तोचि दैवाचा १३३
दशभुज पंचमुख ८१
दावी रूप आता २२७
दास तुझे आम्ही १३९
दृष्टी करूनी उफराटी ५
देखोनिया उंच माडी १२७
देव येता तुम्हा २२८
देवा तूंचि अंगीकार १२०
देवामाजी देव ८७
देहीं असतांचि १४३
द्रव्य नाहीं जया. १११
धन्य आजि दिन १
धन्य धन्य गुरुमाय ११२
धन्य धन्य वारकरी २२३
धरी हातीं किंवा ५६
धर्म आणि कर्म २१९
धांव धांव चंद्र. ८
धांव न पुरे मनाची ११७
धांव पाव वेगी २७
न कळोनि अर्थ १८२
नको मना गुंतू २११
नको वेळ बा रे १३२
नमस्कार माझा १५१
नरदेहा ऐसा लाभ १०८
नरदेहासी येऊनी १०४
नाम गाई नाम २२१
नाम स्मरे त्याच्या १७७
नामावांचूनिया १६०
नाहीं तुझी बरी १३०
निजानंदीं ठाव ७
निजूं नका जागा ४८
निर्गुणीं निर्गुण १७४
नेणो योगज्ञान १९०
पतित मी पापी ५४
पतितपावन तुझें ६९
पळपळ व्यर्थ २४
पश्चात्ताप देई देवा ४७
पहा देवाचे कौतुक २३०
पाहा पाहो हो २०८
पाहूनियां नीळकंठा १३
पाहूनी शुक्तीक ९४
पुरे पुरे हा संसार १२५
पुरे पुरे हा संसार ३
पूर्ण ब्रह्म निराकार २०१
प्रभुराया तुज आलों १४७
प्रभू शिवलिंग २१४
बहु जन्मीचा ८२
बहु माझ्या जीवा २१
बहुत दिवस लागली ३४
बहुरूपीं सोंग ४०
बा या निजसुखा. ६
बाळकासी माता २०
बीज धाकटे एकटे २०६
भय कासियाचें १२२
भवरोगावरी दिव्य १६६
मज सम पापी १४०
मना करी लागवेग ४
मना कळ आहे १३६
मना धैर्य वळें १३४
मना शिव तोचि २०२
मना सर्वकाळ २०३
मार्गे बहुतांचे ५२
माझेचिं प्रारब्ध ५५
माझे माहेर कपिल २२०
माझ्या विश्वेश्वरा ४५
माया मोह हा १९९
मुख पाहता लाळ २१३
मुखीं नाम मनीं ७५
मृत्यु असोनिया ७३
म्हणती आजी पुढें १६
येई माय आतां ८३
येई माय माझे १८९

येई येई आतां ११४
रामचंद्राचा ईश्वर ७६
रूप तेंचि नाम १७८
रांडेच्या दर्शनी २१२
लक्ष लावा शिवा. १२३
लवण गेलिया ११८
लागा वेगीं आतां ७९
वाचे शिवहर १९१
वारंवार तुम्हां ८९
विश्वी असोनी ९८
विष्णु थोर शिव ७४
वेगीं झडकरी ३५
शरण आलों मी ६४
शरण मी आलों ३७
शरण्या सोयऱ्या १९८
शिरीं जटा आणि १७
शिरीं जटा हेम. ९९
शिव शिव नाम १९२
शिवद्वारीं उभी १५२
शिवनाम कीर्ति १५६
शिवनाम पाठ १५५
शिवनाम पाठ १५७
शिवपाठ करा १५४
शिवपाठ पाठ १८१
शिवभक्तिविण १६४
शिवराज पाहुणा २२९
शिवरात्रीस निरा. २२४
शिवाबाई शिवा. ११
षोडश वर्षांचें ९२
सगुण प्रसाद १७६
सदा प्रेमयुक्त १६३
समर्थाचा झालो २०७
सर्व करिता समर्पण १९५
सर्व घेऊनिया चवी १३७
सर्व देवांमाजीं थोर ५०
सर्व देवाची उत्पत्ति १४५
सर्व धरोनिया वीट १४६
सर्व माझी लाज ३६
सर्व विश्वाचा तू १९४
सर्व साधनांत १८०
सर्वांभूतीं दया १२९
साधनाचें सार १६१
सुखी असो ही १४९
सुवर्णात नग नगीं १७०
स्मरण करा हो १५३
हीनाचा तांब्याचा १९
हृदयसंपुटी १८३
हेंचि मागो तुजप्रती ७०
होतां ज्याचें सम. २
होई सावधान मना १३८
क्षणैक जाणोनी १०

श्री जीवन महाराजांचे अभंग

अनंत ब्रह्मांडे ६
अन्य अन्य आडवी १५
आज भाग्य उदया १७
आजि मोठा लाभ १८
आत्मा नाही नाही १३
आनंदी आनंद १
काय करू देवा ४
गुरु तोचि शिव ८
गुंतोनिया विषय १४
जावे जावे जावे ५
जीव तोचि शिव ७
तेथीचे ते सुख न ९
दया करा स्वामी २
मोक्षप्राप्तीलागी १२
योगयागादी साधन १०
वासना ही रांड ३
सांडी देहाची १६
सुखी होई सुखी ११

श्री लक्ष्मण महाराजांचे अभंग

१. स्फुट अभंग

अगणित कल्प १४२८
अगणित दोषी ९४६
अगाध नामाचा ४९७
अग्निदेवे केले प्रेमे २१७
अज्ञान बाळाचे परी ८९९
अज्ञान बाळाचे बोलणे ८९८
अणुरेणूमाजी वस्ती १२७५
अणुरेणूमाजी वास १२७६
अणुरेणूहून सान ११८८
अणुरेणुहूनि सान १२७४
अत्रिसुत तुझे २५७
अत्रीचा कुमर चंद्र ३७७
अध:ऊर्ध्व शून्य १४७३
अनंत आनना २९०
अनंत ब्रह्मांडपसारा १९९
अनंतब्रह्मांडाचा पती १४६२
अनंत ब्रह्मांडाचा ९९२
अनंत ब्रह्मांडीचा ३७२
अनंत ब्रह्मांडाचा ५१६
अनंत ब्रह्मांडाच्या ५०२
अनंत ब्रह्मांडी ३७३
अनंत ब्रह्मांडे क्षणी २८३
अनंत ब्रह्मांडे उभवी १३७६
अनंत ब्रह्मांडे उत्पन्न ९६१
अनंत ब्रह्मांडे उत्पन्न १४०२
अनंत ब्रह्मांडे कोटी १०१०
अनंत ब्रह्मांडे ज्याचे १३६८
अनंत ब्रह्मांडे निर्मिली ५३२
अनंत ब्रह्मांडे राज्ये २८१
अनंत ब्रह्मांडे स्फुरण ३४३
अनंत ब्रह्मांडे हा १४०३
अनंत यातना शरीरी ८४२
अनंत ते ब्रह्म २७६
अनाक्षर ब्रह्म पूर्ण १३६१
अनाथ मी दीन ८६५
अनेक कल्पनेचे ६५०
अनेक जन्मांचा ५०५
अनेक शास्त्रांची १६५६
अन्नदानाऐसे नाही १४०६
अन्यायी मी खरा ७८३
अभक्ताचे काळे १६०५
अभाविकाप्रती १४३५
अभिमान नरकमूळ १६५८
अभ्यासेकरून ४०३
अमृताते आणिले ४१४
अरे आनंदाची १६८९
अरे गंगाधरा ७९६
अरे विश्वनाथा १००६
अरे सूत्रकारा ८६०
अती बोलका हो १६५७
अती हिंसक ४५५
अवघा उजाळा ११८०
अवघा देव देव १७५१
अवघा शिव शिव १२७३
अवचित नरदेह १५४७
अवतारादिक १५४१
अविद्या कौटाळीण १७८
अविद्या ही काटी ८०६
अविद्येने मज ८९४
अविद्येने हो तुम्हा १२९
अविनाश तू रे ९८७
अहंकारे मोठे मोठे १६४९
अहो अद्वयाच्या १२५४
अहो अनंताचे ३४१
अहो अनादी ३२६
अहो अन्याय १६२८
अहो अपरोक्ष ५०६
अहो आकाश ११९७
अहो एका पत्रा १३१५
अहो कल्पनेचा ११८६
अहो कल्पवृक्षा १६०६
अहो काया हेचि १५५४
अहो काळ आला १५३८
अहो कीर्ती अप.. ११२५
अहो कुसंग नाही १४९५
अहो कैवल्य कैलास ३२९
अहो गुरुदेवा १०१
अहो गोष्ट गेली १६२१
अहो जगद्गुरू शंकर ३२५
अहो दीपावरी उडी १३४९
अहो धन्य तोचि ६०४
अहो नामामृतापुढे ४६२
अहो पापा होय १३७८
अहो पालथे घागरी ६०१

अहो बहु बळी १५२६
अहो बैसूनि एकांती १३४७
अहो ब्रह्मसुख घ्या १२४०
अहो ब्रह्मसुखा १७३६
अहो भेदभाव ६८४
अहो मनाचे शेवटी १६७७
अहो महादेव धनी ३३४
अहो रुद्राक्षाच्या २४५
अहो विश्वनाथ ११३१
अहो विषयाचे सुख १४९८
अहो शंकर हा ३२४
अहा संकट ते १३६५
अहो सागरी ११९३
अहो साधनांचे १३४५
अहो सुख भक्ती ६१८
अहो स्मरा तो १३७४
अहो स्वप्नातील १५५७
अहो स्वानंदनगरी १३७०
अहो स्वानंदसुखा ११२२
अक्षय शंकर १३८०
अक्षयी समाधी ७०२
अक्षयी सुख तुज ६१६
अक्षयी सुख तुझे ३११
आकाशाचा गुण ६९८
आकाशाची घडी १६८५
आगम निगम श्रेष्ठ ५२५
आजा काका १५३३
आज्ञा प्रभोची ३४४
आदि शारदे तू १६
आदिपुरुषा तू १८
आदी भक्ती ती ५२७
आनंद आनंदाते ११७९
आनंद भोगिती २१४
आनंदभरित ज्याच १४६७
आपण एकला ३४६
आपण करू जाय १४५०
आपणचि देव ५२१
आपणचि देव..तात १२४५
आपणा..ओळखिले ६०९
आपला.. विचार ६०८
आपला.. आपण १३४०
आपला.. कैसा १३१६
आपुलिये देही देवं ६५१
आपुलेपणाचा १२५६
आप्त सखे जन १५८६
आप्तसखे तुझे १५७६
आबालवृद्धाचे १७४०
आमुची संगती १२८६
आमुचे कुळीचे १११४
आमुचे नाचणी १२८८
आमुचे तू धन ११०३
आम्हा आप्त दिसे ११०२
आम्हा आवडे तो १११२
आम्हा सुख दिस ७३५
आम्हा हीना मुखे ८१२
आम्हा हे रुचेना ११२३
आम्ही एक ज्ञानी १६५१
आम्ही चाकर ११४३
आम्ही हीन दीन ११०८
आत्मनिवेदन ५४४
आत्मभ्रांतीचा ११६३
आत्मलिंग श्रेष्ठ १३९८
आत्मलिंग सदा ३४०
आत्मलिंग स्वप्रेम १७३५
आत्मलिंगाऐसा १४९४
आत्मशुद्धीविना १६७
आत्माराम निरंतर १३२०
आला आला काळ १५३०
आत पाणी बाहेर १९७६
आवडीने कर्म ६७८
आहेसी तू सूत्रकार ९३१
इष्टलिंगी प्रेम ठेवा २०७
इंद्र आदी देव ३९२
इंद्रियव्यापार तुझे १२२९
उठूनिया प्रातः ११२७
उदरभरणाची चिंता ११०६
उदार आहे तो १३८६
उदार स्वामी शंभो ८१५
उन्मनीची घाटी १३०२
उमाधव तू रे ९८६
उमारमणा मन ७९४
उमावरा पाय दावी ७५७
उमावरा पाय दावी ७६४
उमावल्लभाचे ३८७
उत्पत्ती स्थिती हो १२०१
ऊर्मी जी उठे ७०३
एक नासले गर्वाने १६६८
एक बिल्वपत्र ९९३
एक तेचि पाणी १२२१
एक शिवनाम सार ११३२
एकपणा न होता ३३७
एकपणा न तुटी १२६४
एकपणा न होता १४६३
एकपणाचा अभि. ३३८
एकांत आवडे ६६९
एकादशस्वरूपा ८७६

एकापासून अनेक ३३९
एके वृक्षाप्रती ७२०
एरंड धोतरा पेरून १५९४
ऐक दक्षिणदिशा.. ५७०
ऐसा जन्म मिळ.. १४६४
औटपीठ गोल्हाट १३०३
अंगाची साउली ३२२
अंगी दाटला हो ११६१
अंधकासुराते २९४
अंधारी तो दोर १२२५
अंबिकानाथ तू १००४
अंतःकरणाचा हो २८९
अंतःकरणापूर्वी ९०४
अंतरी दृढ काम १४९०
अंती एकलेचि १३३०
कमलोद्भव ३०९
करा करा करा १४१८
करा डोळा डोळा ७५२
करा वेगी हल्ला १४३७
करिशी करणी १४७२
करूनि संसाराची ९३४
कर्णद्वारे बा रे १३८३
कर्पूरगौर पंचवदन १३४२
कर्पूरगौरा वेगी येई ७७२
कर्म ईश्वरा अर्पण १२६५
कर्म उपासना ५५४
कर्म कैसे देवा ७८२
कर्म धर्म ज्याचा १२६८
कर्म नेणो धर्म ११०५
कर्म ते करावे १३६२
कर्मकाष्ठाचे दहन ४३१
कर्मनदी लोंढा ५०९
कर्मातीत शिव ३३६
कर्मे नाना केली १११०
कलियुग हे हो ४४६
कल्पवृक्ष न्यून २८
कल्पवृक्ष तू रे ९७५
कल्पवृक्षापाशी १७२४
कवणिया स्थानी ८५६
कश्यपनदी कश्यप १७८८
का रे दुष्टा १६०८
का हो वाया ८८
काग धावे १६०४
काचेची ती कुपी १५५३
काचेचे कंकण १५२८
काम क्रोध हे १५१९
काम जाळूनि ३३२
काम योग्याने ६७०
काम तयांनी १३८५
काम हा रे ७९७
कामक्रोध धुस.. १६३५
कामक्रोध हे रे ७१३
कामक्रोधाते ६४५
कामांतक तो पुजा १३२८
कामाचा तो आहे ८४३
कामाजी क्रोधाजी ८०७
कामाजीबुवाचा ७९८
कामातेही काम ९७२
कामिनी कांचन १७२६
काय जन्म व्यर्थ १३२६
काय नेशी बरोबर १४५७
काय पाहतोसी ८३९
काय फिरसी १७२८
काय भुललासी १४८५
काय भुललासी १६१०
काय भुललासी मति १५८७
काय भुललासी तू १६०७
काय मी मी १६६१
काय रे निवांत ८९६
काळ आहे हो १५४०
काळ तो आला १५३७
काळचक्र फिरे १५२३
काळा दया नाही १५२४
काळाने भक्षिले ३९८
काळाप्रती दया १५३९
काशीधीशा गा ७६९
काशीधीशा वेगी ७६८
काशीनिवासिया ३१०
काशीनिवासी तू १०२५
काशीयात्रेते हो ५७८
काष्ठी आनी वसे १२१३
कीर्तनभक्ती ही ५३७
कीर्तनी काळाचे १३३६
कीर्तनी तो उभा १३३५
कुमार पितर स्तवा १३९०
कुमार तुझा पुत्र ३६०
कुमारीचे वय वाढे १३३२
कुतर्कादी हा १४८६
कुळस्वामी आमुचा १११६
कुळस्वामी भोळा १११५
कुळस्वामी सर्वदा १११७
कुळस्वामी नवसा १११८
कुसंग हा देवा ८१९
कूळ ते पवित्र ५८१
कृपाळू तू रे ८८३
कृपेच्या सागरा ८५९

केला अंगीकार ८३३
केले वंदन खंडेना ५४१
केवळ चिन्मात्र तू ३०४
केवळ निजानंद १०२९
केवळ निर्गुण १२२७
कैलास तो गिरी ३१७
कैलासशिखराचे १०५१
कैलासाच्या राया ७७०
कैसे करू काय १५९१
कोट्यवधी चंद्रसूर्य ३३५
कोठवरी रे तिष्ठावे १०४५
कोठे गुंतलासी ७४५
कोठे गुंतलासी देवा ७६६
कोठे गुंतलासी न ७४७
कोठे गुंतलासी नेणो ७४१
कोठे गुंतलासी गंगा ७४४
कोठे गुंतलासी माय ७९०
कोठे गुंतलासी पूर्ण ७४२
कोठे गुंतलासी प्रभू ७४३
कोठे गुंतलासी र ८९३
कोठे गुंतलासी सिद्धा ७४६
कोठे गुंतलासी देवा ८३८
कोण कोठील तू १५९२
कोण दिवस येईल १५६७
कोण मी कोठून १४८
कोण तुझा वाली १५७९
कोणी आम्हा आप्त १२७८
कोणी एक विप्र १२१९
कोणी नाही रे १५७८
कोणी म्हणती चला ५४६
कोणी रे दिसेना ८६९
कोणो स्तवा निंदा ८५
कोणे एका स्त्रीचा १३४६
कोणे कोणाते १२५०
कोणे गोष्टीचे हे ७४९
कोमल बिल्वपत्र ६२०
कौस्तुभ त्या रत्नांत ३७१
क्रोध साधूसी नसावा ६९३
कंठी बांधी बा रे ४८४
खरे आवडेना १६४६
खळाची संगती कदा १४९३
खळाची संगती १४९६
खोटे खऱ्याते १६२९
खंडराव श्वान ते ११९१
गजवदन तू विघ्न १०
गजवदना वेगी ९
गणपती कृपावंता ११
गणपतीच्या बापा ९८४
गणराया येई १२
गणराया लौकर ६
गणाधीशा पाय २
गर्भआंधळे हो १५९३
गर्भवास चुकवा रे १५४५
गर्भवास हाचि ८३५
गर्भी ते रक्षिले १४११
गर्वापाशी देव नसे १६६५
गर्वनाशासी कारण १६६३
गर्वे पुंजता हो १६८
गळा रुद्रवीणा २८४
गाईते तारावे ७२१
गिरिकाननी रे १४०४
गिरिजावराचे पाय १४०५
गुण रे वदवी ८६८
गुणातीता योगि.. ९४७
गुरुकृपा फळली ११५७
गुरुकृपा होता भ्रम १५१
गुरुकृपे बद्ध प्राणी ५५
गुरुकृपेने नवल ८७
गुरुदास्यत्वावाचून ५२
गुरुदेवा तो अक्षयी ३७
गुरुदेव बाई ६६
गुरुदेवा कृपा करा ११०
गुरुदेवा मायातीता २३
गुरुदेवा मी हो दास १३२
गुरुदेवा मीपणे रे ५१
गुरुदेवा या हो ९०
गुरुदेवा तुझा उप.. ७०
गुरुदेवा तुझा महिमा ७२
गुरुदेवा तुझी कीर्ती २६
गुरुदेवा तुझी छाया ७७
गुरुदेवा तुझे पद २५
गुरुदेवा तुम्ही १३६
गुरुदेवा तू निर्गुण ६९
गुरुदेवाचे रे पाय १४६
गुरुदेवे कृपा १७०
गुरुपायी सुख २९
गुरुप्रसादाची थोरी ५६
गुरुब्रह्म निजवस्तू ४२
गुरुभक्त जागे ६६०
गुरुभक्त झाले ६६२
गुरुभक्ताप्रती नाही ६६१
गुरुभक्ताप्रती शंकर ६५८
गुरुभक्ताप्रती स्वप्नी ६५७
गुरुभक्ती आधी ६५६
गुरुभजन हे सार ३४
गुरुमहिमा श्रेष्ठ ३९

गुरुमाय वोळली ७१
गुरुराया तुझा १५०
गुरुराया शरण १४७१
गुरुरायाविण आप्त १४५
गुरुराये कृपा केली ३५
गुरुराये नवल केले ५७
गुरुराव आमुचा ३३
गुरुतीर्थमहिमा ४०
गुरू अनाथाची ३०
गुरू कृपामेघ पूर्ण ४३
गुरू जीवन सर्वांचे ५४
गुरू दयाळाने १३१
गुरू दयावंत ९९
गुरू दो अक्षरी ४१
गुरू ध्या हो गुरू ४८
गुरू बृहस्पती ३८६
गुरू माउली २७
गुरू माय हो ५३
गुरू वत्सालागी ३२
गुरू स्तवा गुरू २४
गुरूचे चरण विसरू १०९
गुरूचे ते भक्त ६६३
गुरूने रक्षिले फार १०६
गुरूते विचारी १३०
गुरुविना काही १४३
गुळा झोंबे तो ११३८
गौरचर्म वरूनि १५४४
गौतमऋषीते २६६
ग्रहांमध्ये वासरमणी १४४५
गंगा जैसी शुद्ध ७२८
गंधविषयास्तव भ्रमर १५०४
घडी पळ पळ १५३५
घडे गाडगे ११९४
घन:श्याममित्रा ९५४
घर रिघाले १२९३
घरच्या उजेड ७२२
घात आपला १४८१
घृत दुग्धा हो ६९१
घेई घेई माझे १७०६
चरण अंगुष्ठी ४६
चरणगोडी ज्या ९२३
चरणसुखालागी ९२४
चरणावरूनि ब्रह्मांडे ९२२
चवसष्ट कोटी गण ६६५
चहुदेहांचे आसन ८२
चहुखाणीमाजी ८०१
चहुदेहांचे आसन ४७
चहुदेहावेगळा तू ९६३
चाकरी थोराची ११२८
चार युगे गेली १०५२
चार सहा अठरा ९७४
चारी वाणी चारी ११८१
चारी वेद तुझ्या ९५८
चित्त चैतन्य झाले ११६०
चित्त चैतन्यी रातले ११५३
चित्त चैतन्यी रिघाले ११५९
चित्त रातले शंकरी १०९७
चित्तचतुष्टयातीत १२३७
चित्ती अनुताप १६३९
चुंबकसत्तेने लोखंडा १२०३
चैतन्याची मूस १३०१
चंदनाअंगी तो ६२४
चंद्र सूर्य अग्नी ९१०
चंद्र पुत्र बुध २२२
चंद्रसूर्यनि शंकर २१६
चंद्राचेनि योगे १२०४
छत्रपती राज्यधर ६८२
जग मोहाने नासले ४६४
जगद्गुरू कृपा ८९१
जगद्गुरू गंगाधरा १०७४
जगद्गुरू नाम ९४५
जगद्गुरू नाम तूते ३२८
जगद्गुरू हा शंकर १४५५
जगन्नाथ तू ९५१
जगती भरला ३६८
जगाचे बोलणे १७३०
जगी असूनि वेगळे ६८७
जगी देव नाही १६०२
जगी भरलासी ९८९
जटाभार नको १३३७
जननी बोलू ती ९३२
जन्मा आल्याचे १३५३
जन्म घेता कंटाळा ८१७
जन्म घेता शिणलो ८६१
जन्ममरण हा १७१८
जन्ममृत्यूचा १४४३
जन्मा येऊनिया १४५६
जपा पलसिद्ध ११८
जलाचा गुण घ्या ६९७
जळी काष्ठाची ९३७
जळी जेवी वसे १०८५
जाणीव मायेचे १०१९
जाणीव लाघव ११७७
जाणीवनेणिवेवेगळा ४०८
जाणे आहे हो १५७०
जानकीजीवन ध्याती १३६९

जारा तुजप्रती १५९७
जारीण जाराचिये ११३४
जारीण पतीस्तव १६३३
जाती कूळ गोत्र ५५२
जातिकूळ तू रे ९९९
जिकडे तिकडे ९५०
जी जी उपमा ७५०
जीव ब्रह्मीचा १२३०
जीव मोहे झाला ६२५
जीवभावनेने दुःख १७५४
जीवभावे अधोगती १२३२
जुनाट आहेसी १००१
जे जे नेत्राप्रती ११७८
जेणे तुटे बंध १६५३
जेणे समाधान १५९६
जेथे आनंद आनंद ३२७
जेथे नाही भक्ति.. १६३०
जेथे माझे नाम ५६८
जेथे तेथे तूचि १०१२
जेथे वसे भक्ती ५२९
जेथे वसे भक्तिलेश ५२३
जैसा भक्ता भाव ३६६
जैसा तू आलासी १४१६
जैसी विषयाची ४७९
जो का अंतरीचा ६४७
जो का चित्ताचा ६४६
जो जो पदार्थ ५३०
ज्या नामी रतले ४९२
ज्या नामे आत्म.. ४९४
ज्या नामे क्रोध ४९३
ज्या नामे प्रभो ४९१
ज्या नामे ब्रह्म ४९०
ज्या मुखी नाम १६१८
ज्याची मनोवृत्ती ६७४
ज्यायमान आहे १५६४
ज्याते झाली ब्रह्म.. ६८५
ज्योतिस्वरूप १०२४
जंगममहिमा २२९
टिळा टोपी १६३६
डोळियाचा डोळा १३२५
डोळियाचा गुरूने ६४
तत्त्वे पंचवीस ९४०
तत्त्वे पंचवीस ९७७
तपाचे गिरिवर ३९१
तरीच जन्मा यावे १३३१
तळमळ ज्याची ७१२
ताप अनेका रे ८२२
तापसाचे भार ६३९
तीन कोटी गाव.. ३८२
तीर्थप्रसादाचा..भक्त २४८
तीर्थप्रसादाचा..भव २४९
तीर्थामध्ये तो १३७३
तीर्थे सर्वत्रही पायी ३१
तुज पाहता त्र्यंबका ९०२
तुज पाहता धुर्जटी १०१५
तुज पाहता नयना १०५६
तुज पाहता नयनी १०१४
तुज पाहता मदनारी १२७१
तुज पाहता शंकरा १०५५
तुज पाहता समोर १०५७
तुज पाहाता ईश्वरा ८१३
तुज पाहाता शंकरा १२७७
तुजविण कोणा ९५३
तुजसाठी आम्ही १०४८
तुझा उपकार ७३
तुझा मोठेपणा ७५५
तुझा म्हणवितो १०४९
तुझा म्हणवितो नको ९१२
तुझा त्वाचि घात १३२४
तुझा तूचि देव १७१
–''–(द्विरावृत्त) ६५४
तुझा विसर पडला ८०८
तुझा शिक्का ज्याचे ४५
तुझिया स्वरूपी ८४७
तुझी कृपा बाणे ७४
तुझे कृपे ताप ९२१
तुझे कृपे वेद २७३
तुझे गुण किती ९०१
तुझे गुण किती ९९०
तुझे चरणकमळ १०६४
तुझे चरणकमळी ५९४
तुझे चरणाची गोडी ४४
तुझे चरणी शंकरा ९६८
तुझे चरित्र न १०४२
तुझे दर्शन होता ९०७
तुझे दर्शने कर्माचे १०३८
तुझे दर्शने जीव १०३७
तुझे दर्शने नुरे १०३६
तुझे दर्शने मन १०४०
तुझे दर्शने माया १०३९
तुझे दर्शने सर्व १०४१
तुझे दर्शने होतसे १०३५
तुझे द्वारीचे मी ७७६
तुझे द्वारीचे रे ८४८
तुझे नाम उमापती ४३८
तुझे नाम करी ४४५

तुझे नाम गंगाधरा ४३७
तुझे नाम गोड ४४८
तुझे नाम महादेवा ४३५
तुझे नाम मुक्तचारा ९०८
तुझे नाम विश्वनाथा ४४२
तुझे नाम सदाशिवा ४३६
तुझे नाम सुख ४३९
तुझे नाम सुधारस ४६१
तुझे नामामृताविण १०८७
तुझे नामे जीवन्मुक्ता ४४०
तुझे नावरी सोंग ८४०
तुझे पाय वंदू १२४
तुझे पायी देवा ९१३
तुझे मायेचा विलास ६२१
तुझे शरीर नसे रे १५५८
तुझे स्वरूप आकाश १०६६
तुझे स्वरूप पाहता ४९
तुझे स्वरूप ते ९८१
तुझे स्वरूपी निवांत १०८९
तुझ्या गुणा पार ९३८
तुझ्या चरणाची ७८
तुझ्या चरणापरते १०६३
तुमचे चरणकमल १०६५
तुम्ही सुवर्ण हो १२७२
तुर्येपलीकडे १३०४
तू रे दयाळू १०५३
तू रे स्वतंत्र ५८३
तूचि सर्वकर्ता १०९३
तू ते गुंते फार ८३०
तोचि धन्य प्राणी ६१३
तोडा अविद्येची ७७६
त्रयदेव तुझे भजनी ५०
त्रिकालपूजन ६२७
त्रिपुर मर्दिला १११३
त्रिपुर मर्दूनि १४२६
त्रिपुर मारूनि १४१३
त्रिपुरांतक महाराज १३६३
त्रिपुर त्रिपुटी २९७
त्रिपुर मर्दिला तो ५९७
त्रिभुवनजननी शारदा १३
त्रिभुवनमाते शारदे १९
त्रिभुवनतात शिव ११०१
त्रिभुवन व्यापका ८७५
त्रिशूल ते खड्ग ८१६
त्रिशूल हे खड्ग २६५
त्र्यंबका बा यावे ८५३
त्र्यंबकाची भक्ती १४३४
थोर घर रे १०४३
थोराची चाकरी ११०९
थोराचा चाकर ११२९
दत्त सांगती यदूला ६९९
दशभुज पंचवदन ११११
दशभुजा पंचवदना ७४८
दहा सहस्र वर्षे १५१३
दान वेगी द्यावे १०६०
दारी बैसलो तिष्ठत १०४४
दास्य भक्ती ही ५४२
दीन तो दयाळ ३१९
दीनाची माउली ९९६
दीनानाथा देवा यावे ७५३
दीनानाथा यावे देवा ८७३
दीपप्रकाशात सर्वत्र १२२०
दीर्घ स्वप्न हा १७११
दुःख निवारी शंकर १४४९
दुःख मोठे मुखे ८६४
दुकान मांडिले २८८
दुग्धपाणी एक ६०३
दुग्धापाशी तो १६०३
दुरितकाननदहना ३०५
दुर्वासमुनी तो ६३५
दुष्ट रे मर्दूनि ९६४
दृढ निश्चय हो १४३६
दृष्टीमाजी दृष्टी १७४९
देव जिंका याचे ५५६
देव दयाळ दयाळ १३९५
देव दयावंत आहे १८७
देव दयेचा सागर १३९४
देव दूर नाही १६६
देव पाहा पाहा १७५५
देव पाहा हो १७६१
देव फार तो ३४५
देव बंदी हो १६६४
देव भक्तांचा कैवारी ३२३
देव भावाचा भुकेला ५३३
देव तुजपाशी नाही १५१८
देव तू दयाळ ९७१
देव दयाळू तो १४२३
देव सखा करा ४१६
देव सखा हो ११४०
देव सर्वठायी असे १७६०
देव सर्वठायी आहे १७५९
देवद्वारी तरी १४७०
देवपूजेचा रे त्रास १६१६
देवभक्तभाव राहे १२०६
देवराया कृपा करा १०९१
देवराया पाय दावी ९२५

देवराया भ्रमे ८३२
देवराया तुझा भक्त ९२६
देवराया तुम्हा प्रणाम १०३३
देवराया तुम्ही ९११
देवराव वश करा १६९
देवराव सखा करी १४५४
देव समुदायामाजी ३००
देवा आलो लोटांगणी १०६७
देवा काय म्हण.. १६१३
देवा कुठे गुंतलासी ७६५
देवा कोणी १५४०
देवा देवाधिदेवा १०७५
देवा धाव धाव ८२१
देवा पामराचा विसर १०६२
देवा पाय दावी ८४७
देवा प्रळय वर्तला ८४४
देवा फार युग ७३८
देवा भ्रम निरसा ८८५
देवा मज पामराते ८८
देवा मुंगीपरी करी १०७८
देवा तुझा दास ७८०
देवा विषयी रे ७८१
देवा शूळपाणि येई ७४०
देवा ते म्हणतोसी १६३१
देवावरी का रुसावे १५९५
देवावरी का रे १६१५
देवावरी बोल काय १६२४
देवावरी बोल काही ११२६
देवाशी म्हणशी १३२३
देवी भक्त तोचि ५९२
देवी भक्ताचे ५९३
देशाधिपती झाला ५७९
देह अश्व हे १२५१
देह असार असार १५५५
देह आहे की १५७३
देह कुश्चळ ९४९
देह देउळात आत्म.. १२१५
देह देउळात देव १२१७
देह देउळात नांदे १२१६
देह देवालय जाणा १७३३
देह वाराणसी १३१२
देह हा क्षणैक १५५२
देह हा जाईल १५७१
देह हाडांचा हा १५५०
देह ही अयोध्या १३१३
देह रथ हा तत्त्वांचा १२६६
देह जाईल रे १५७२
देहामध्ये नाना १५६८
देहामाजी देव १६५४
देही असूनि विदेही ६८९
दो दिवसांची १६६७
द्रव्य असूनि जवळ १४५९
द्रव्य दिले देवे १३१८
द्रव्य नको देऊ १०८१
दंभ वैरी हा १५१५
धनलोभी द्रव्या.. ११३३
धन्य आजिचा दिन ७३१
धन्य धन्य कारागीर १२५७
धन्य धन्य तुमची १२८
धन्य धन्य तो १२६२
धन्य धन्य तोचि ७१५
धन्य धन्य हा ७२३
धन्य मानू तोचि ६८६
धन्य तो संसार ६१२
धन्य तो संसारी ६११
धन्य तो सद्गुरू १६०
धन्य तोचि रे २२७
धन्य तो कैलास ३१८
धन्य क्षेत्र काशी ३३१३
धरिता शरीराचा १५५९
धाकुटे हो व्हावे १७३१
धाव धाव गंगाधरा ७३९
धाव धाव वेगी ८५०
–’’–(द्विरावृत्त) ८५२
धावा धावा बा ८७९
धावा धावा हो ८७०
धावा हो नि:संगा १२०
धेनू जैसी ये २८७
धेनू वनी चरे ४०५
धेनू व्याली वत्स ११३६
धोका धोका १४९७
ध्वजाचे ते फडके ९४३
न लगे अरण्य ४६३
न लगे अरण्यसेवन ४८६
न लगे पंचाग्नी १७४७
न लगे फारसा १३९९
न लगे तप्त मुद्रा १७३९
नंदीवरी तो शोभला ३२०
नका गुंतू या १५३२
नका झिडकावू ८२४
नका नका नका १६६६
नको नको ताता ८१८
नको फार उन्मत्त १६१७
नको तुझी चिंधी १०५९
नग्न जैसा तू १५८०
नग्न दिगंबर बैसती ९१५

नदीमाजी काष्ठे १५८३
नयनी दिसतो गुरू १४४
नयनी दिसतो गुरू ६३
नरजन्म हा नाही १५६६
नरजन्म हा तुजला १५६५
नरदेहाऐसे पुण्य ७००
-''-(द्विरावृत्त) १५६२
नरतनू ऐसी १५६०
नरतनू ऐसे क्षेत्र १३४४
नवमास जननी १५७५
नवल झाले ऐक ११४८
नाकीचे ते मोती ११९९
नाग रे भूषणा ७५८
नादबिंदूकलातीता १२३३
नाना प्रपंचाचे १६९२
नाना मते ज्यास्तव २८२
नाना तीर्थे व्रत ९१८
नाना वर्ण गायी १२००
नाना शास्त्रांचे हे १२४७
नाम गोड फार ४८३
नाम परीस शुद्ध ४५७
नाम पतिताते तारी ४८२
नाम फुकाचे सुखाचे ४५६
नाम बळकट ४१९
नाम मंगल मंगल ४२९
नाम मुखी नाही १३४१
नाम येईना..निंदा १६११
नाम येईना..वाचाळ १६१२
नाम त्याला नाही ३५०
नाम तारक तारक ४६८
नाम तुझे पंचानना ४३४
नाम..पंचानना ग्रासी४५३
नाम तुझे मात्रा ४५२
नाम तुझे रे ४४७
नाम तुझे सदाशिवा ४४९
नाम तुझे हे अगस्ती ४५०
नाम ते फुकाचे १३५१
नाम वदवा शंकरा ४८९
नाम वेदांचे मंथन ४४३
नाममात्र हे लुगडे १३७५
नाममात्रा हेचि ४८१
नामरूपातीत ११५५
नामव्याघ्रापुढे ४५८
नामस्मरण विसरू ४९८
नामस्मरण वेगी ४८०
नामस्मरणाचा महिमा४६९
नामस्मरणे फार ४९६
नामस्मरणे रे प्राणी ४१८
नामाऐसे सार ४७३
नामामृत गोडी घेती ३९५
नामामृत ..भक्त ४४४
नामामृताची ती ४७२
नामी विश्वास ४७८
नामे फार सुखी ४८७
नारायण मित्रा ९७३
नावडे कैलास २८०
नाशिवंत देह हा १५४२
नाशिवंत हा संसार १७१७
निःसंगाचा..आम्हा ११००
निःसंगाचा..मज १२८३
निंदक ते आम्ही १६४०
निंदक ते मानू ११३०
निंदास्तुतीवरी ८६
निंद्य कर्म आचरलो८५१
निजरूप नेणोनि १३५
निदानीचा वाली १४१२
निरामय तो निज़ १२१०
निर्घोर निवांत १०५०
निर्विकल्प अंतः.. १२२६
निर्विघ्न साधन ४१३२
नित्य नूतन तू १०२३
नित्य बिल्वदळ ५७५
नित्य सुख तुज ८३
निष्कपट शिव २६४
निष्कलंक तू हर १११९
निष्कामाचा संग ११४४
निचाची संगती १७३४
नीलकंठ माझा ९५९
नीलकंठ तू रे ३६९
नेत्रातील बाहुली १३०५
नैर्ऋत्य लिंगपूजा २१२
पक्षी वृक्षी त्या १५८२
पत्र पुष्प अथवा २७९
परपुरुषाचा संग १२८४
परपुरुषाशी रमले १२८५
परब्रह्म उमापती १०६८
परब्रह्म तू रे शिवा ३६१
परब्रह्म तू रे ११६९
परब्रह्मा कृपा करी ८८७
परब्रह्मा मन आहे ७९३
परमपुरुषा गर्व हा १६७१
परमपुरुषा येई ८८६
परमार्थपरीस हातात१५८९
परमात्मया गंगाधरा १०७३
परस्त्री माता परद्रव्य७१७
परा पश्यंती मध्यमा ११५८

परा हो पश्यंती १२२८
परात्पर तू शंकरा १०१६
परिच्छिन्न खोटे ९१६
परिच्छिन्न स्वप्नवत् १७१३
परीस लोखंडाते ५२२
पलसिद्ध माते १८०
पलसिद्ध.. आहे ९२
पलसिद्ध.. सुखाचा १३७
पलसिद्ध स्वामी १३९
पतितपावन..वेदी ५६०
पतितपावन..देवा १०४६
पतिव्रतेचा तो ४०७
पतिव्रतेचे ते मन ११३७
पळसच्छायेशी बैसला १४०
पशुपतिनाथा कृपा ७८९
पशुपतिनाथा यावे ९८५
पश्चात्तापे उलटला १६४५
पादसेवन ही ५३९
पाप पुण्य नेणो १०९९
पाप ताप दैन्य ४२५
पापकर्म आचर.. १६१४
पापपुण्य काही १६२७
पापपुण्य स्वर्ग ६८३
पापरूपी मी कोण ८६६
पापरूपी मी दीन ८८९
पाय रे दाखवी ७८८
पाय ते तारक २५६
पायाचा रे महिमा १३२७
पाहा आपुली जन्म १७५३
पाहा केवढा अंधार १४८४
पाहाणे गा झाले १४८२
पाहावा ॐकार १३७९
पिता मेला एके १५८५
पुण्यश्लोक सावध १४६१
पुण्याचा सागर १०७
पुत्रा गोविले सुनेने १५८१
पुत्राऐसे पालन १५११
पुराणे अठरा ३९३
पुरातन तू रे १००८
पूजा कोठे म्या ३३१६
पूजा घेशी पूजा १७५६
पूर्णयोगी तुज १०१८
पूर्वीची ती पापे १०९४
पृथ्वी शाळुंका २०५
पृथ्वीपत्र जरी केले १०२२
पृथ्वीपती राजा १७२५
पृथ्वीमध्ये नाना १२५५
प्रथम भक्ती ही ५३६
प्रथम हा देह १५४८
प्रपंचकर्माचा ४०४
प्रपंचसुख आहे १७१२
प्रपंचसुख हे १७२१
प्रपंचसुखाची कहाणी १६९३
प्रभू नारदमुनी ३७५
प्रभो भगवान आहे १४६५
प्रभो तळमळ ८३१
प्रभो तुझे नामामृत ४५४
प्रभो तुमचे मायेचा ९९१
प्रभो गुण गाता ४३३
प्रभोचे चरित्र का १३८७
प्रभोपायी होई १४६०
प्रभोराया तू रे १४२
प्रभोस्वामी सफल १२७
प्रलयी हे तुझे ९७८
प्रवृत्तिमार्गचि स्वप्न १७६२
प्राण्या का भुललासी १४०९
प्रात:काली शिव.. ३७४
प्रेमयुक्त नाम सदा १३५०
प्रेमयुक्त ..धन्य ६४१
प्रेमयुक्त ..प्रिय ५३५
प्रेमळ भक्तीने १०३२
प्रेमा वाढता १३३३
प्रेमे कर्म हो ५९९
पंचाक्षरी मंत्र २५०
फार अपराध माझे ७६०
फार गांजलो ईश्वरा ८७१
फार म्या भ्रमण ८४६
फार शीण आला ८६३
फिरूनि पाहाता १२२४
फुंजू नको वाया १३९८
बगदालभ्य आदी २३५
बरे झाले देवा ८९७
बहुत पुण्य हो २२०
बहुता युगाचा हा ३३३
बहुता सुकृते नर १३८४
बाई देव पाहाया १२९६
बाप उमादेवीवर १७४५
बाप मेला माय १५८४
बाळक मातेचिये ११३५
बाळक ते मातेप्रती १०३१
बाळकाचे बळ १०३०
बाळत्व ते खेळता १५३४
बाळत्व ते गेले १५३१
बाळ्याबुगड्या ११९२
बाह्यदृष्टीने विसर ११४७
बिल्व वाहे नित्य २२४

बेल म्हणूनि गंगा.. ८११
बैसता उठता १३६०
बैसा नावनौके ४५९
बोलका हो झाला १६३४
बोलविता तूचि ९५७
ब्रह्म अद्वैय एकले १२३९
ब्रह्म ऐसे असूनि १४९
ब्रह्म निरामय ब्रह्म ११६४
ब्रह्म वारिता वारेना १२५९
ब्रह्म सदा सदोदित १६८२
ब्रह्मज्ञान घरोघरी १६३२
ब्रह्मज्ञान सांगे १६४७
ब्रह्मज्ञानी तूचि ११८४
ब्रह्मदेव लिंगस्मरणी २०९
ब्रह्मदेवे पूर्वी १४८०
ब्रह्मभाव आम्हा १२३१
ब्रह्मसुखे तृप्त ६८१
ब्रह्मा इंद्र हरी ६६४
ब्रह्मा विष्णू सुर ५९५
ब्रह्मांड हिरण्यगर्भ १२०८
ब्रह्मांडदायक विष २६२
ब्रह्मी नाही भेद ११७३
ब्रह्मी नाही मत ११६७
ब्रह्मी नाही माया ११६६
ब्रह्मी नाही हा ११७२
ब्रह्मी भेद काही ११८३
ब्रह्मी हेतू हाचि ११६५
ब्रह्मीचा तू अंश १४७४
बंदीखानी रे पडलो ८८४
भक्त देवा आवडती ५९१
भक्त पाहू गेला ५९६
भक्त तूचि थोर ५८०
भक्त संसारी उदास ६०२
भक्तकाजा.. अती २५४
भक्तकाजा.. अंगे १४३१
भक्तकाजा तू ९२०
भक्तरक्षक तू हर ९२७
भक्तवचन सत्य १०१३
भक्तसखा सर्वोत्तम १४३३
भक्ताने तुजला ५५८
भक्ताने स्वामी तो ५५५
भक्ताचे स्वाधीन ५५७
भक्ताने तुजला ५६१
भक्तापाशी भक्ति ६०५
भक्तापाशी तुझा ९९४
भक्तापाशी स्वामी १४३२
भक्तापुढे तुझे ५७१
भक्तास्तव तू ९१९
भक्तास्तव विष २६३
भक्ती आम्ही केली १६५२
भक्ती ज्ञान..आगर ५०४
भक्ती ज्ञान..जीवन ५०३
भक्ती निष्काम ५३४
भक्ती पाचवी ५४०
भक्ती माता भक्ती ५०७
भक्ती मुक्ती भुक्ती १३९२
भक्ती मूळपाया ५१७
भक्ती सर्वत्र . ६०७
भक्तीचा जिव्हाळा ५५९
भक्तीपाशी चारी ५२०
भक्तीप्रती..खटपट ४०१
भक्तीप्रती..द्रव्याचा ४००
भक्तीविण उद्धरिले ५११
भक्तीविण सर्व शीण ५००
भक्तिसुख घेऊ ५२६
भगवद्भक्त तोचि ६४८
भजन तुज रे १६०९
भरतराजा हो १५०९
भरला स्वानंदाचा ११३९
भव कैसा हा ८९०
भव ह्या समुद्री १७२०
भवगर्तेमाजी १४६६
भवचक्र हे रे ८०५
भवभवान्तका ८०२
भवसर्प हा दारुण १७१६
भवसागर अज्ञाना १२४९
भवान्तका भवा ९७९
भवानी तुझिया ९८०
भवापासूनि रे ८०३
भस्म चर्चिती महा २३४
भस्मरुद्राक्ष.. प्रेमे २४२
भस्मरुद्राक्ष.. महा २४३
भस्मधारकाते व्यथा २३२
भस्मधारणेने प्राणी २३६
भस्ममहिमा अपार २३३
भस्मरुद्राक्ष धारक २४४
भस्माचा महिमा २३०
भाग्यवंत देवराव ११४२
भाग्यवंत ते पुरुष ५८९
भाव साधनांचे मूळ ५१४
भावापाशी देव वसे ५१३
भावापाशी देवराव ५३१
भास अवघा हा ११८९
भिंतीवरी चित्र तैसा १५६१
भिंतीवरी चित्रे ३९९
भुलू नको रे सावध १४५८

भुलू नको रे संसारा १७१९
भूचरी खेचरी १२९९
भूत झोंबलं गे १२८१
भृगूचा कुमर तो ६३६
भेटी देई देवा ७५४
भेद नाना या १२४४
भेददृष्टीची साधने १२४८
भ्रम फार झाला ८००
भ्रम फार .. सुचेना ८२५
मदनांतका ब्रह्मांड ९६५
मदनारी या हो ७८६
मदर्पण क्रिया २२१
मन कारण बंधाला ६४९
मन कारण मोक्षाला १६८१
मन केले ज्याने ६७३
मन चरणी लावी १०८८
मन ठेले प्रभोपायी ११४९
मन धावता वळिती ६८८
मन नेले नेले १२९०
मन फिरता राहिना १६८३
मन मुरल्याविणे १६६२
मन मोकळी हो ७१९
मन रातले शंकरी ११५२
मन हे चपळ ८५४
मन हे चपळ अती १६८०
मन हे धावता १६७८
मन हे मातंग १६७९
मन हे तस्कर ८५५
मनचि कारण १६७६
मन राया तुझे १६८६
मना आंतरनिष्ठा १७०१
मना पापबुद्धी १६९८
मना पापबुद्धी १६९९
मना पाहे तो १६८८
मना भक्तिपंथ १६९७
मना भक्तिपंथे जावे १६९६
मना मोठा लाभ १६९१
मना लागलीसे ११४६
मना तुजप्रती १६८७
मना तूचि अनिवार १७०४
मना शंकर हा १६९०
मना शांतिचिये १६९४
मना संग हा १७०२
मना सुवासना १७००
मनाचा हा वेग ८२७
मनाचे केले ते ६६८
मनाबुद्धि-अगोचर १३७२
मने मनाते १२११
मतिमंद हीन ८३७
मळ कदाही १२६१
मळ त्या निर्मळा १२२३
महाज्ञाते योगेश्वर २४६
महादेव देव वंद्य १४५२
महादेवनाम कल्याण ४७०
महादेव नाम साजे २७५
महापुरुषांचे ग्रंथ १४१०
मागणे रे नाही ७५६
माझा देह आहे १२६९
माझे अवगुण ८४१
माझे आचरण ८८८
माझे माझे म्हणता १५२२
माझे माझे म्हणूनि १६४८
माझे ते चरण १०७१
माझ्या सिद्धाचे ११६
मान अपमान हा १०९६
मानसन्मानाचा १०८३
मायबाप धन १०९५
मायेचा भ्रतार ३८३
मार्ग तो कठीण १३३
माते शारदे सुंदरी २०
माते शारदे..ब्रह्म २१
माशी बैसे मधावरी १६८४
मी ज्ञाता मी १६७३
मी नित्यप्रेमे ५४९
मी मी करितोसी १६७०
मी न तो गुंते १४८८
मी तू खोडी ही १३५४
मुंगी गिळील ९०५
मुंगी शर्करा ती १०८६
मुक्याने साखर १७३
मुखे वेद तो ५०८
मुख्य भक्तीचा ५१८
मुळीचा एकटा तू १४९२
मुळीचा तू एकटा १४९१
मूळ ॐकार ४
मूळ प्रकृती तू १७
मूळ ॐकारस्वरूपा २५२
मृग फार पाहिले १५१२
मृगजळीचे तरंग १२८०
मृत्यंजय बा रे ९९७
मृत्युंजय म्हणती ६२२
मृत्यूपासूनि ९९८
मेघ:श्याममित्रा ७३६
मोठे सुख प्रभो ६१७
मोह नि:संगा १५०८
मोहपाशामाजी १५१४

मोहमदिरा कैफ १४२४
मोहाजी बाजीने ६७२
मंगळ तो ग्रह ३७९
मंदाकिनी वाहे १३८८
यज्ञ कोट्यादी १७५८
यम करी लिंगार्चन २१५
यम सांगे दूताप्रती ४३०
यम म्हणे उमाधव ५६९
यमाप्रती बोले ५६६
या युगामाजी १६२२
या युगी हे नाम ४७४
यावे यावे गणपती ७
यावे यावे गुरुदेवा ६८
यावे यावे सिद्धरामा १२३
यावे यावे सिद्धराया ६२
यावे यावे सिद्धेश्वरा १२५
युगी युगी तू ३०७
येई कैलासनिवासा ७६७
येई येई आदि ८७७
येई येई बा १२१
येई येई रे ८१४
येई येई त्वरे ७५९
येई येई शारदे १४
येई येई शिवाबाई ७७१
येई येई सिद्धदेवा ११३
येई येई सिद्ध..ब्रह्म ११४
येई येई सिद्धाबाई १२२
येई रे दयाळा ८५७
येई वेगी देवा ८०४
येथील हे आप्त १५७७
येथे विकल्पाचे १७५७
योगमार्ग हा ३९६
योगी पावन ६६७
योगी तो.. तो गे २६९
योगी तो.. तोचि २७०
योगीजना मोह ६७१
योगीराया शिवा ७९५
रमे कैलास .. देवा २७१
रमे कैलास..निरुपम २७४
रत्नजडित सिंहासन ३६४
रत्नमय सिंहासनी ३५२
रतिसुखासी ९४८
रविसत्ते जग १०२७
रसविषास्तव १५०५
राग द्वेष दुर्मती १५२०
राग मानावा १५५
राग द्वेष ज्याचे १५२१
रागे भरू कोणावरी १२६३
राजा रंक असो १५२५
रात्रंदिन करिसी १६५९
राव जळी स्नान १५१०
रावणारीमित्र १३४३
राहू केतू ग्रह ३८०
रुद्र अक्षातून २४१
रुद्र तू दयाळू ९६०
रुद्राक्षमहिमा २४७
रूप देखिले १६५
रूप सगुण २८५
रूपविषये करून १५०२
रूपसुंदर सगुण २७२
रूपातीत तू ९००
रेतारक्ताचे हे १५५६
रोगाचे माहेर १५४३
लक्ष चौऱ्यांशी ग्रामे ७८७
लक्ष चौऱ्याऐंशी ८२८
लक्ष शंकरी ठेवा १५००
लज्जा सांडूनिया १३३४
लाज भय देवा १०४७
लाज माझी रक्षी ८५८
लिंग अद्वैय एकले २००
लिंग आमुचे जीवन १९५
लिंग आमुचे हो १९६
लिंग धरूनि मस्तकी २०८
लिंग धरूनिया २०६
लिंग पाताळी २०१
लिंग पुजी प्रेमे २१०
लिंग पूजितो कुबेर २११
लिंग स्थूळ १९७
लिंग स्वानंदाची १९८
लिंग हृदयी असून १३०६
लिंगपूजनाचा का १३०८
लिंगपूजनाचा महिमा २२६
लिंगपूजनाचा.. हो १९३
लिंगपूजेचा हो १३१०
लिंगमहिमा श्रेष्ठ १९४
लिंग रूप शिव २१८
लिंगा नाही आदि २०२
लिंगाचे पूजन १३०७
लिंगामध्ये जग २०४
लिंगार्चन करी २२३
तिन्ही लोकी भक्त ६२०
तिसरी भक्ती ही ५३८
लोका सांगे फार १६३७
लोकेषणा आम्ही १२८७
लोलंगता आम्ही ११०४
लोहपरिसाप्रती १२६०

लौकिकाची लाज १०७०
वणवा पेटला १२१४
वय गमाविसी रे १४००
वस्तू अभेद अभेद १२५२
वस्तू घन आकाशा १२३८
वस्तू दूरदेशी ११७५
वस्तू मागे मोह रे ११७४
वस्तू वारिता वारेना ११८५
वस्तू माझी हो १५१६
वाचे घेई नाम १७१०
वाचे जपे शिव १७०७
वाचे रस तू १७०५
वाचे वाउगे १७०९
वाचे शिवलीला १७०६
वाच्यांशाकडून ४०९
वाट पाहू पाहू ७७५
वादामाजी सुख १६६०
वामदेव महान २३७
वामदेवा विज्ञापना १०७२
वायू करी लिंगार्चन २१३
वारंवार विज्ञापना १०६९
वारा वारा वारा १४१७
वाराणसीपती ८७४
वाराणसी पुण्यभूमी ३३१४
वासना ही गुंतो १०८४
वासना हे बेट ८२०
विघ्नहरा गजानना ५
विघ्नहरा विज्ञापना ८
विघ्नहरा वेगी १
विघ्नांते हरूनि ३
विद्या-अभ्यासाने १६७२
विद्याबळ ब्राह्मणाते १४३८
विभूती महिमा मज २३८
विभूतीमहिमा अगाध २३१
विरोधेकरून दैत्या २९५
विवेकी पुरुष तेथे १६००
विवेकी विवेक १६०१
विवेके पाहता देह ४०६
विश्वकुटुंबी तू १००९
विश्वजनका रे ७९१
विश्वनाथा ऐसा १४१४
विश्वनाथा तुझे ९०३
विश्वनाथा विश्व ८०९
विश्वपती महारुद्रा ७६१
विश्वमुख तू शंकर ३०८
विश्वाचा तू देवा ९६९
विश्वाचे माहेर ३४९
विश्वामित्रा ऐसा १५०७
विषय भोगिता १५३६
विषयकर्दमी गुंतले १४८९
विषयसंग हा १५०१
विषयी उदास ३९४
विषयी हे मन ४०२
विष्णुमित्रा शंभो ७५२
विष्णू म्हणे तुम्ही ५५३
वीरशैव धर्म रे ११९
वीरशैव बापा १३०९
वृषभावरी स्वार ३६२
वेगी यावे दीनानाथा ८७२
वेगी यावे देवा अंत ८६७
वेगी यावे देवा तोडावे ७८४
वेगी यावे देवा फार ८६२
वेगी यावे हो ९७०
वेगी येई की ७३७
वेगी येई देवा ८९२
वेगी व्हा हो १४४४
वेडा एक योगी २६७
वेडा केला म्या १२९१
वेडा गे माझा १२९२
वेडा तामस गे २६८
वेडियाच्या.. मन १२९५
वेडियाच्या.. वेडी १२९८
वेडे वेड्याते ६०६
वेडेवाकुडे उत्तर १०७७
वेड्याने मजला १२८२
वेद झाले तुझे १०२६
वेद त्रिकांडे १२४३
वेद मी पाठक १६७४
वेद म्हणती ईश्वर १८४३
वेद म्हणती हा १८४२
वेदशास्त्रे श्रेष्ठ १४१५
वेदशास्त्रे सर्व ९१४
वेदान्ताचे सार १३७१
वेदाप्रती जो ३६७
वैद्य मिळाला १६४
व्यर्थ वल्गना १३९१
व्याघ्रप्रतापी तो १७२२
व्यास वाल्मिक १४४७
व्युत्पत्तिबळे रे ६५३
वंदू सद्गुरूची १६३
शत्रुमित्रभाव १२४१
शत्रू हो दिसेना १२७९
शब्दज्ञानियाते काय १६४४
शब्दज्ञानी ते हो १६४३
शब्दविषयास्तव १५०३
शम दम शांती ६५५

शरीर अनित्य १५५१
शरीर असार १५४९
शत एक घट ११९५
शांती साधूची ६९२
शारदा ती माया २२
शारदे वो माये १५
शास्त्र पढोनिया १६६९
शिंपीमध्ये मुक्त १२४६
शिखरीच्या राया ९४१
शिडी भक्तीची ५८२
शिव अक्षरे ही ४६०
शिव अचल ३३१
शिव अवघा जनी ६४०
शिव असंख्य ३३०
शिव आदिपुरुष २६१
शिव आप्त खरा २६०
शिव आहे सर्व १४२२
शिव आहे हो ३०३
शिव एकटा ३४२
शिव करीना हो ११८२
शिव कृपावंत ६२८
शिव कृपेचे सदन १४२७
शिव कैवारी रे २९६
शिव गुणांच्या ३५७
शिव दयावंत असे ३७०
शिव दयावंत कृपेचा २५८
शिव ध्यावा तो ७३३
शिव पाहा हो १४६८
शिव पुरातन ३०१
शिव पूजिलिया १३२१
शिव बहुता युगीचा १७४
शिव ब्रह्म रे ३५९
शिव ब्रह्म सत्य १३९७
शिवब्रह्मांडाचा..कर्ता ३५८
शिवब्रह्मांडाचा..राणा ३५५
शिव भक्ताची ५१०
शिव भगवान १३८१
शिव मनी स्मरा ३८९
शिव माझा यजमान ११४१
शिव माझे कुल ११४५
शिव माय माझी ८८१
शिव मायातीत १०१७
शिव मायेचिया ३५६
शिव माहेर देवांचे ३५४
शिव म्हणे कृतांता ५६७
शिव म्हणे कृतांताते ५६२
शिव म्हणे..प्रिय ६३०
शिव म्हणे..भक्त ६२९
शिव म्हणे देवी ६३१
शिव म्हणे रे ५६५
शिव योगियांचा ३५३
शिव त्या पुराणी ५४५
शिव तो दयाळ १३६६
शिव तो दयाळू १४६९
शिव तोचि गुरू ८४
शिव ते स्वरूप ९३
शिव वसे ज्याचे ५९०
शिव विसंबेना ५२८
शिव वेगी..पाय ४२३
शिव वेगी..भवाचा ४६५
शिव शब्द हा ४१२
शिव शिव नाम ४९५
शिव शिव प्रेमे १३४८
शिव शिव सदा ४३२
शिव षडक्षरी मंत्र २५१
शिव सखा..का १४३०
शिव सखा..शिव १४५१
शिव सखा करी १४०८
शिव सर्वदा ६८०
शिव सर्वांचिये ३१६
शिव हर हर ११०७
शिव हा अक्षयी १३५९
शिवकथामृत ४१७
शिवदर्शन झाले ११५०
शिवनाम अग्नी ४२८
शिवनाम अती गोड ४२६
शिवनाम अती सार ४१३
शिवनाम आहे ४११
शिवनाम कंठी ४६६
शिवनाम गाय १३५८
शिवनाम घेई पावन ४१५
शिवनाम घेई वाचे १३५७
शिवनाम घेता पाप ४७६
शिवनाम घेता पापे ४१०
शिवनाम प्रेमयुक्त १३५६
शिवनाम प्रेमे ४७७
शिवनाम मिष्ट १३५२
शिवनाम हे केसरी ४५१
शिवनामाग्नी हा ४७१
शिवनामाचा रे ४७५
शिवनामाची हो ४४१
शिवनिंदक ते १६४१
शिवपदी स्थिर ६१५
शिवपायाचा विसर १४२९
शिवपूजक ते १३१७
शिवपूजकाचा महिमा ५८४

शिवपूजकाचा साह्य५८८
शिवपूजकाते भव ५८६
शिवपूजनाचा उल्हास१३११
शिवपूजनाचा कंटाळा १३२२
–''–(द्विरावृत्त) १३८२
शिवपूजनाचा महिमा ३८१
शिवपूजनाची आवडी ५८५
शिवभक्त ते हो ६३८
शिवभक्ता वंदी १४४०
शिवभक्ताचा हो ६४४
शिवभक्ताचिये ६४२
शिवभक्ताचे रे ५७३
शिवभक्तापुढे ५७२
शिवभक्ती केली ५९८
शिवभक्ती सर्वश्रेष्ठ ४९९
शिवभजनी तो ३८८
शिवयोगी देखियेला ३६३
शिवयोगी तेचि ६६६
शिवलिंगपूजा ५८७
शिवव्रत आहे २२५
शिव सखा केला १२९४
शिवस्वरूप..पाहाता ११५६
शिवस्वरूप..मन १२७०
शिवा तुझा महिमा ९०९
शिवा दयाघना ७९९
शिवा या..कृपा ८३६
शिवा या..त्रासलो ८२९
शिवा या..सोडवा ८९५
शिवा या हो तोडा ७९२
शिवा या..कृपेच्या ७८५
शिवा या हो..पाय ७७८
शिवा तुम्हाऐसा ९०६
शिवा तुम्ही आहा २९२
शिवा तू निःसंग १००७
शिवाचा महिमा १०००
शिवाचे पूजन अक्षयी ५७४
शिवाचे पूजन अगस्ती ३८५
शिवाचे पूजन करिती ३८४
शिवाचे पूजन प्रेमे ६१०
शिवाचे ते..असंख्य ६३७
शिवाचे ते..काळाते ६३२
शिवाचे ते..प्रेमळ ६३३
शिवाप्पा हो शेटी ११६८
शिवाप्रती गाता ५२४
शिवाप्रती बिल्व २४०
–''–(द्विरावृत्त) ६४३
शिवाप्रती भस्म २३९
शिवाबाई ये ग ७७४
शिवाते जे ध्याती ६१४
शिवाते निंदिती १४७६
शिवाते पूजिती ५७६
शिवे ज्ञानबोध १७९६
शिवे विष्णूप्रती १५९९
शीतउष्णातीत प्रका ११५४
शीतउष्णातीत माय १७४४
शुकनळिका यंत्री ६७७
शुकसनकादिक १३९६
शुद्ध बुद्ध नित्य १०२८
शुद्धभावाचे उदक ५१५
शुभ्र ते कैलास २७७
शुभ्र शोभला तो ३२१
शुभ्रवर्ण नंदीवाहन २९९
शून्यापासूनि वायू ११९८
शेवटली विनवणी १०६१
शेषशायीमित्रा ९६२
श्रुती शास्त्र वेद १०८
श्रुती स्मृती सिद्ध १४५३
श्रेष्ठांनी कुसंग १४९९
श्वान खंडेराव ११६२
शंकर मायेचे १००२
शंकर हा मंत्र ४२१
शंकर हे नाम ४२७
शंकरा तुजला १०३४
शंभो आमुचा १०९८
शंभो ऐसा देव २५३
शंभो ऐसा भोळा ३६५
शंभोकृपा हो ७७९
शंभो कृपावंता २५९
शंभो कैलासीचा १३६७
शंभो जगी भरला ३०२
शंभो त्रिताप ७६३
शंभो दयाळू तू १०११
शंभो परमपुरुषा ९२९
शंभो पायाचा ८१०
शंभो पाहा हो १४३९
शंभो बुडालो ८२६
शंभो मायबाप १४४१
शंभो भेटी द्यावी ३३१२
शंभो मायेचिया ८८०
शंभो मुकुटमणी ३०६
शंभो यजमान ११२१
शंभो योगीश्वरा ८४९
शंभो तुजविण ९८२
शंभो तुझे कृपेविण ९३०
शंभो तू दयाळ ९५२
शंभो वेगी कृपा ७७३

शंभो सत्ता तुझी ९६७
शंभो सर्वस्वी ७५१
शंभो स्वानंद..परा ७६२
शंभो स्वानंद..जीव ११२०
शंभोविण त्राता ९८८
षड्गुण ऐश्वर्य १४२५
षड्दळावरी सातवे १३००
षड्रिपूते जिंकून १५१७
षड्वैरी हे घालक १५०६
सकल तीर्थे तुझे ९९५
सकळ श्रुती ही १२०७
सकळ सुखाचा तू ३१२
सकामाते प्रपंच ६९०
सख्य भक्ती ही ५४३
सख्या सोयऱ्या १०७६
सगुण भक्ताने बा ५१९
सज्जन ते आले ७२९
सत्त्वगुणी स्वर्गा ७१४
सदा प्रेम देई १०५८
सदा रागात १७२७
सदाशिव नाम १३९३
सदाशिव सदा १३७७
सदोदित प्रभोपाय १३६४
सदोदित सदोदित १२३५
सद्गुरुकृपा बापा १५७
सद्गुरुचरणी मन १४७
सद्गुरुदेव तो कृपा ९५
सद्गुरुदेव तो ९८
सद्गुरुदेवाचा संग १०४
सद्गुरुदेवाने भ्रांती ६५
सद्गुरुदेवाते शरण १०२
सद्गुरुनाथ दयाळू ९४
सद्गुरू माय ती १०३
सद्गुरुरायाचे पायी १५३
सद्गुरुराव तो १००
सद्गुरुवाक्ये १५८
सद्गुरुसंग मज ६५२
सद्गुरू दयाळ १०५
सद्गुरू परेशा ९१७
सद्गुरू पलसिद्धा ११२
सद्गुरू माझा देव ६१
सद्गुरू माझा तो ५९
सद्गुरू माझा विश्व ६०
सद्गुरू सिद्धराया १९१
सद्गुरूचे आम्ही १५९
सद्गुरूचे केलेले १६२
सद्गुरूचे चरणी ९६
सद्गुरूचे दास ६५९
सद्गुरूचे पूजन १६१
सद्गुरूचे..सर्वदा ७६
सद्गुरूचे..स्वानुभवे ८०
सद्गुरूने ..आम्हा १५६
सद्गुरूने.. चित्त ५८
सद्गुरूने ..संसार १३४
सद्गुरूने दया १७२
सद्गुरूने नवल ८९
सद्गुरूप्रती शरण १५४
सद्गुरुमाईची कृपा ७५
सद्गुरू मायेचे ७९
सद्गुरूसारखा सखा ९७
सनकादिक मुनी ५०१
सनकादिकांचे १४४२
सनातन धर्म ५५०
सभोवती अग्नी १५९०
समुद्र हा झाला ५४८
समुद्रमंथनी विष २९३
समुद्री आभाळ १२१२
सरितेमध्ये भागीरथी १४४६
सर्पाच्या ह्या हो १७२३
सर्पामुखी बेडुक १५८८
सर्व ज्यायमान १५२९
सर्व देवांचे तू ९४४
सर्व देवांमध्ये देव २५५
सर्व भवबाधा २८६
सर्वज्ञ आहेसी ९६६
सर्वज्ञ तो शिव ३५१
सर्वठायी देवा ९५६
सर्वत्र हे ज्ञान १६४२
सर्वा अगम्य जंगम २२८
सर्वा आद्य शिव ५४७
सर्वाचा तू चाळक ९३९
सर्वाप्रती देणे १०२०
सर्वाहूनि सान १३२९
सत्कर्माचा बा रे १४०७
सत्कर्माचा रे त्रास १६२०
सत्यभाव नंदी २९८
सत्य सत्य सत्य १४१९
सत्यवतिसुत गातसे ६३४
सहज सांडूनि १७४८
सहस्र ते तोंड ११५१
सहस्रफणांचा ९५५
सहस्रमुख तो १०२१
सहा वश आदि १६३८
सांडा किंतु किंतु १४२०
सांब सदाशिव मंत्र ४२०
साखरेची गोडी १२०२

साधकांनी सदा १७४१
साधके मनाते १७४३
साधके सर्वदा १७४२
साधन करा..काळ ४८८
साधन करा..देह १५६९
साधन घडले १०८०
साधुसंग करी ७२७
साधुसंग बरा ७०५
साधुसंगतीने कोण ७०१
साधू अग्नीचा तो ७०८
साधू आकाशाचा ७१०
साधू जळाचा ७०७
साधू जाणूनिया ७११
साधू पृथ्वीचा ७०६
साधू तोचि श्रेष्ठ ७१८
साधू ते दयाळ ७२६
साधू ते निर्घोर ७२५
साधू ते निवांत ७१६
साधू ते सदय ७०४
साधू वायूचा ७०९
साधू सूर्यगुण ६९६
साधूंनी पृथ्वीचा ६९४
साधूंनी वायूचा ६९५
साधूची संगती १०७९
सार्वभौम..त्याची १५२७
सार्वभौम..सेना १२०५
सार्वभौम..स्वप्ना १२१८
सावध रे होई १५९८
सावध होई..दादा १६१९
सावध होई..बापा १४०१
सावध होई..मानवा १५६३
सिद्ध निरंजन ११५
सिद्ध परब्रह्म १८२
सिद्ध माझी माय १८८
सिद्ध म्या देखिला १८६
सिद्ध तुझे नाम १७६
सिद्ध स्तवा वाचे १८५
सिद्धगुरूची साउली १११
सिद्धनाम घेता ९१
सिद्ध योगीराव १३८
सिद्धराज पाहा ११७
सिद्धराया पापी १४१
सिद्धराया या हो १७५
सिद्धराया तुझा १८३
सिद्धराया..कैवारी १७९
सिद्धराया..जननी १७७
सिद्धराव माझे १८४
सिद्ध स्वामिया १२६
सिद्धा यावे हो ८७८
सिद्धांमध्ये कपिल १४४८
सिद्धाचे स्मरणे १८१
सिद्धाबाई सौख्याची १९०
सिद्धामाई धावे १८९
सुंदर ते..आम्हा २९१
सुंदर ते.. काशी ३१५
सुंदर ते..पद्मा ३१४
सुंदर ते.. हृदय ३१३
सुकृत असता ४६७
सुख देईल शंकर ४८५
सुख या संसारी ६००
सुख रे पडेना ८३४
सुख संसारी दिसेना १७१५
सुख संसारी नाही १४२१
सुखदुःखे कर्मयोगे १६२३
सुखदुःख हे हो १७३७
सुखरूप तू रे ९८३
सुखरूपा शिवा ९७
सुखी संसारी १३३९
सूत्र तुझे हाती १००३
सूर्य ज्याचे सत्ते १६५०
सूर्यकुमर तो ६२६
सूर्यनारायणे ३७६
सूर्यपुत्राते शंकर ५६४
सूर्यबिंब जैसे १२२२
सूर्यसत्ते तिन्ही ११९६
सूर्याअंगी जेवी २०३
सूर्याचा कुमर ३७८
सोनार तो साने ५१२
सोने सोने.. होता ११९०
सोने सोने.. होऊन १२४२
सोने सोने.. न येता १२५३
सोयरिया देती १६२५
स्त्री कुश्चळ १७२९
स्त्री पुरुष नाही १२०१
स्थावर जंगम १००५
स्थावर जंगमी ९४२
स्थूळ सूक्ष्म कारण ११७०
स्मरा शिव शिव १३५५
स्वर्गतरंगिणीचे ३३१५
स्वधर्म..चांडाळ १४७८
स्वधर्म.. पतित १४७९
स्वयं एकचि हो ११८७
स्वयंप्रकाश प्रकाश १२३४
स्वये वेद बोले १२६७
स्वर न कळे तान ९३३
स्वरूप तुमचे अकथ्य ९३६

स्वरूप सर्वदा उघडे ११७१
स्वरूपी.. म्हणूनि १७५०
स्वरूपी.. म्हणोनि ३९७
स्वर्गनरकादी १७१४
स्वर्गवासियांनी २१९
स्वस्वरूपी रमावे १२३६
स्वहित चुकला १६२६
स्वानंद त्या पेठी ११२४
स्वानंद कीर्तनी १२८९
स्वानुभवसुख ५७७
स्वानुभवाचे १२९७
स्वानुभवाचे भोजन १७४६
स्वामिकृपा हो ३८
स्वामी कुमारपितरा ९२८
स्वामी माझा दया ३६
संकट पडता १३३८
संग धरी रे १७०३
संग निःसंगाचा ९३५
संगती तुझी केली १०५४
संत बळवान ४२४
संतसंग ज्या ७३०
संतसंगतीने सुख ७३२
हर हर वदा ४२२
हरिपुत्र ब्रह्मा ३९०
हरिश्चंद्र पुण्यशीळ १६९५
हरिहरा भेद १४७५
हरिहराचे हो १४७७
हरी म्हणे त्वरा ५५१
हरी लोळे २७८
हरीने पुजिला १३१४
हस्तकी धरूनि ६७
हाचि दिवाळी ७२४
हृदयी असूनि देव १५२
हृदयी आत्मलिंग १३१९
हृदयी हे लिंग १९२
हृद्रोग मोठा भारी १५७४
हेचि दान देगा १०९०
हेचि मागणे रे १०९२
हेमाद्रिजामाता ८२३
हेमाद्री तो..असे ३४७
हेमाद्री तो.. तेथे ३४८
होणार ते होवो १०८२
होते समस्त गीर्वाण ५६३
क्षणभरी तरी १४८३
क्षणाचिया सुखा १४८७
क्षमा तारक १७३२
क्षमा शांती ७३४
क्षुल्लकानंद ६१९
क्षेत्र ब्रह्मांडीचे ८१
ज्ञानदृष्टी पाहताना १२५८
ज्ञानी म्हणावे १७३८
ज्ञानी तोचि ६७६
ज्ञानी वाद हो ६७९
ज्ञाते जगात ६७५
ज्ञातेपणाचा अभि. १६५५
ज्ञातेपणाचा रे गर्व १६७५

२ . गंगामाहात्म्य

अग्निपुत्र दश १९७०
अठरा पद्म ते १९६०
अदितीने पुत्रास्तव १८०५
अनंत ब्रह्मांडे १९८४
अरुणवरुणतीर्थ १७७०
अहो गोदे..गुंज १८२७
अहो..धानुर १९०९
अहो.. महान १९५८
अहो..प्रणितासंगम १९७२
अहो..साळी ब्रह्मपुरी १८८३
अंगदाने गंगा १९५६
अंगलगाव १८९५
आकोलीत मारुती २०८५
आडगाव ग्रामा २०२०
आबजैक तीर्थ १८५३
आरखेड गोदेतटी १९०६
आरगडगव्हाण २०४८
आतेसर अनंत १९२३
आंधापुरी नागडगाव २०२३
इष्टपुरी गोदेतीरी १९३६
इंद्रतीर्थ गोदेतीरी १७७४
उड्या मारिती १९६१
उपतीर्थे कोटी १९९१
उवर्शीतीर्थ १९७५
उसरणीग्रामा १९३९
उंबरग्राम गोदेतीरी १९०४
कपिलसंगम १८८७
कर्ममार्ग हा १९७९
कलियुगाची रहाटी १९८१
कश्यपनदी कश्यप १७८८

कागलगाव १९२८
कारलेश्वर २०७८
किष्किंधातीर्थ १९४४
कुमारतीर्थ १७६९
केळेगाव बाणेगाव १९११
कोटीतीर्थ ग्रामा १९३७
कंदेश्वर महादेव १८६९
खालापुरीग्राम २०४९
खेरड्यामध्ये शिव २१०४
गउंडगाव पोहोडुळ १८८५
गरुडतीर्थ गोदेतीरी १७८९
गुंजमध्ये जगदीश्वर १८६४
गोदा केवळ ज्ञान १८५१
गोदा..विश्वाची १८६७
गोदा..त्रैलोक्य २००८
गोदातट ते पवित्र १८२०
गोदातीरा राम १८१२
गोदावरी पराशक्ती १८०३
गोदेचिये उत्तरप्रांत २१०७
गोदेचिये..इंद्रेश्वर १८५६
गोदेचिये..उंबर २१२०
गोदेचिये..काशी २०८०
गोदेचिये..पिंपरी २०९१
गोदेचिये..रामपुरी १८६२
गोदेचिये..हातगाव २०९५
गोदेचिये..ठाकरवन १९९६
गोदेचिये..लिंबगाव २००७
गोदेचिये..सोमेश्वर १८५७
गोदेचिये..आडगाव २०१०
गोदेचिये..काठवाड १९९२
गोदेचिये..चिंचोली २०२२
गोदेचिये..टाकळी २०२५
गोदेचिये..नाथर २०३५
गोदेचिये..माजलगाव २०१६
गोदेचिये..माळवाडी २०११
गोदेचिये..रिधोरी १९९८
गोदेचिये..वडगाव २०१४
गोदेचिये..वाघूर २००६
गोदेचिये..वाडी २०२६
गोदेचिये..शिरसाळ २०२८
गोदेचिये..शेलू १९९९
गोदेचिये..सोनपेठ २०३८
गोदेचि महिमा न १८९४
गोदेतटी गोपेगाव १८५९
गोदेतटी दत्तात्रेय १७९५
गोदेतटी लिंग श्रेष्ठ १८७३
गोदेतटी शुक्लतीर्थ १८६६
गोदेतीरी अरिष्टसेन १८३५
गोदेतीरी कंठेश्वर १९१४
गोदेतीरी गोळेगाव १९०५
गोदेतीरी गौतममुनी १८५२
गोदेतीरी पिंपरीगाव १८६८
गोदेतीरी पिंपळगाव १८२२
गोदेतीरी पिंपळगाव १९३५
गोदेतीरी बाणेगाव १८५५
गोदेतीरी भिल्लतीर्थ १९७४
गोदेतीरी मार्कंडीतीर्थ १९४१
गोदेतीरी याचिका.. १९७३
गोदेतीरी राजेश्वर १८१९
गोदेतीरी रामपुरी १८१८
गोदेतीरी रामेश्वर १८९९
गोदेतीरी मंगरुळ १८१६
गोदेतीरी शिवलिंग १८२५
गोदेतीरी शुक्लेश्वर १७८०
गोदेतीरी साडेगाव १८०९
गोदेतीरी सिद्धेश्वर १८०७
गोदेतीरी सीवनगाव १८२३
गोळांगुळ सर्व १९६२
गोळांगुळे उत्सव १९६३
गोळेगाव ग्रामा १९९३
गोवर्धन ग्रामा २०२९
गोवर्धनतीर्थ १७९०
ग्रामनाम ते उंबर १९०७
ग्राम वसे गोदेतीरी १९२९
ग्राम आहे ते २०४१
ग्रामा आसनगाव २०६३
ग्रामा आहे १८२६
ग्रामा..मूर्ती २०५४
ग्रामा..तुर २१०९
ग्रामा..केसरजवळा २११२
ग्रामा..केसापुरी २०१३
ग्रामा..टाक हून २०४२
ग्रामा..डोंगरगाव २०९३
ग्रामा..देऊळगाव २०९०
ग्रामा..धामणगाव २१०२
ग्रामा..पातरूड २०१७
ग्रामा..फुलवाडी २०८२
ग्रामा..बोरगाव २०८८
ग्रामा..महातगाव २०६१
ग्रामा..रत्नापूर २११३
ग्रामा..राहेगव्हाण २०८३
ग्रामा..रुंज ग्राम १९२०
ग्रामा..रेनाखळी २०९८
ग्रामा..रेनापूर २१२२
ग्रामा..रोहीतळ १९९४
ग्रामा नाम ती १८९६

ग्रामा..कुंभारी १८८१
ग्रामा..गव्हाण २१००
ग्रामा..चौंडाळ २०४०
ग्रामा..नांदर २०९२
ग्रामा..वाहेगाव २०६६
ग्रामा..शहापूर २०४३
ग्रामा..संकनपुरी २०५९
ग्रामा..सदापूर २१२१
ग्रामा..सुरुम २०७३
ग्रामा..कोटाळ २०५८
ग्रामा..खडक २०५०
ग्रामा..पोखरी २०६७
ग्रामा..भडाळ २०५६
ग्रामा..लिंबोली २०५२
ग्रामा..सातार २०६५
ग्रामा..माव २०६९
ग्रामा..तीर्थपुरी २०४७
गंगा केवळ ब्रह्म १८८६
गंगा परोपकारी १८८०
गंगातीरी देवी १८६५
गंगातीरी..गुंज १९२१
गंगेमध्ये मोरेश्वर १८६३
गंगेतटी गोळेगाव १८३३
गंगेतटी मोहनपूर १९३२
गंगेतीरी कुंदेश्वर १८८९
गंगेतीरी पोहोनेर १८७०
गंगेतीरी महादपुरी १८३१
गंगेतीरी ते पेनूर १९२५
गंगेतीरी हिवरग्रामी १८२८
चक्रतीर्थ गोदेतिरी १७८२
चित्त मलीन १९७८
चांगतपुरी गंगेतटी १८३०
जनकतीर्थ १७७२
जनस्थान महाक्षेत्र १७७१
जयतापूर ग्रामा १९३०
जवळ्यामध्ये महा.. २०७५
जांबुवंत वृद्ध १९५५
जातेगाव ग्रामा १९९७
जुनाट लिंग १८३२
जोगलादेवी ग्रामा १८११
झरीनामक २०९९
टाकळी नाम १९१८
टाकळीमध्ये २०८७
डासाळ हो ग्रामा २०८९
डिगरस वसे १९१२
डोहोरगाव ग्रामा २०१२
ढोणवाडी ग्रामा २०६२
तीर्थावर हो १८७५
तुझे गुण अगणित १९८५
तुळतुंब महादेव १८९१
तेथे ऋषीने यज्ञ १९९०
तेथे पिंड प्रदान १८१३
तेथे मांजरासंगम १९७१
तेथे तीर्थ शनितीर्थ १८०१
तेथे वसे मुरलीधर १८९०
तेथे शिव प्रकटला १८१४
तेथे स्नानदान १८७८
तेथे स्नानदान १९६६
तेथेचि विष्णुतीर्थ १८७७
त्याचा पुत्र हो १९७६
दाढगाव ग्रामा २०४४
दुटक वसे १९१९
देऊळगाव गंगा १९०३
देवठाण ग्रामा १९०१
देवापी म्हणे ऋषी १८३८
देवापी म्हणे माते १८३६
देवापी म्हणे रे १८३९
देवापीते म्हणे अग्नी १८४०
देवापीते म्हणे इंद्र १८४१
देवापीते वर १८४७
देवी विश्वाची २०५७
दैठण नामक २११९
दोघे केले पूर्ववतख १८८८
धन्य..अरिष्टसेन १८४९
धन्य..कचेश्वर १७७९
धन्य..कपिलेश्वर १९२६
धन्य..गंगा १८६०
धन्य..गोदा..हीना १८२९
धन्य..गोदा..तीते २०३६
धन्य..पंचक्रोशी २०५५
धन्य धन्य प्रभू १७९७
धन्य धन्य प्रतिष्ठान १७८४
धन्वंतरीतीर्थ १८०४
धसाड वसे १८९७
धामणगावी शिवलिंग २०६०
धाडखेड गोदेतीरी १८९२
धारासुर गंगेतीरी १८८४
नमो नमो गंगादेवी १९७७
नमो नमो ज्ञानगंगे १९८२
नमो नमो सदानंदे १९८३
नळे केले गंगा १९५३
नवगाव गोदेतीरी १७९३
नाकलगाव ग्रामा २०३४
निर्विघ्नेश्वर तीर्थ १७९९
नितरूड म्हणती २०१८
नील भक्त तो १९५४

नंदिनीतटी आशापूर २०७४
नंदिनीसंगम १८५०
नंदी शिवाते १८४६
परिसा माझी १९८८
पांगरी ग्रामा १९९५
पाटवद ग्रामा २०६८
पाथरगव्हाण ग्रामा २०८१
पाथरवाल गोदेतीरी १८०८
पाप दंडी रामपुरी १८८२
पाहूनि रामाची १९४९
पिंपरीमध्ये महादेव १८९३
पिंपरीमध्ये महादेव २०८६
पिंपळगाव ऋषि.. १९१७
पिंपळगाव नाम २०१५
पिंपळगावी महारुद्र २०५३
पिपलतीर्थ १७८३
पिशाच्चतीर्थ १७६७
पुरुषोत्तम ती पुरी १८३४
पोहोनेरी महासिद्ध १८७२
प्रवरासंगम महान १७७७
प्रेमे केले गंगास्नान १९५७
पंचक्रोशी हो २०९६
पंचक्रोशी उत्तरतीरी २१०३
पंचक्रोशी हो पवित्र २०७६
पंचक्रोशी..पारगाव २००५
पंचक्रोशी..जांब २०६४
पंचक्रोशी..पळसी २०७७
पंचक्रोशी..सारूळ २०९७
पंचक्रोशी..हौसी २१०१
पंचक्रोशी.. असे २०२४
पंचक्रोशी.. शिव २०३१
पंचक्रोशी..लोणी २१११
पंचक्रोशी..मंगळूर २११५
पंचक्रोशी..वस्ती २००३
पंचक्रोशी..वस्ती २०३३
पंचक्रोशी..वसती २११०
पंचक्रोशी हो २१०५
पंचगंगा तो १७६६
फरकंड गोदेचिये १९१०
बरबडी ग्राम नाम १९१५
बिभीषणे स्नान १९५१
बेट महान ऋषीचे १९३१
बोडख हो ग्रामा २०५१
बोरगाव गोदेतीरी १७९४
ब्रह्मनिष्ठ एकनाथ १७८६
ब्रह्मरूप ब्रह्मगिरी १७६३
ब्रह्मतीर्थ अती १७८५
ब्राह्मणगाव ते १८९८
ब्राह्मणवाडी ग्रामा २०८४
भक्त हृदयी १८४४
भराडी ग्राम २०४६
भवपाश तोडीतसे १८२१
भानुतीर्थ गोदेतीरी १८७९
भारस्वाड ग्रामा २११६
भारस्वाड भारत.. १९२४
भावतीर्थ गोदेतीरी १९४२
भोगलगाव गोदेतीरी १८१०
मणुर म्हणती ग्रामा २०२१
ममदापूर नाम २०३२
मरडजगाव गोदेतीरी १८५८
महागाव गोदेतीरी १९१३
मानवत ग्रामा नाम २१०६
मानवत नामक २१०८
मारफळ नाम २०००
मार्कंडेय ऋषीश्वर १९३४
माता त्रैलोक्य.. १७६४
माता म्हणे बाळा १८३७
माते तुझे कृपेविण १९८६
मुधरेश्वर महादेव १८१७
मंजरथीचा महिमा १८५४
यक्षिणीसंगम १८६१
यथासांग यज्ञ १८१८
याज्ञवल्क्यतीर्थ १७७३
राम गेले अयोध्ये.. १९६८
रामाने उत्सव १९६५
रामेटाकळी तीते २११४
राहटी..गोदेतीरी १९१६
रिधोरीमध्ये १८२४
रुईमध्ये तो २०४५
ल्हुरभोस ग्रामा २११८
लिंगस नाम त्या २०७९
लिंगे अगणित १९६९
लिंब्यामध्ये महादेव १८७१
वझर वसे १९००
वझुर ग्राम ते २११७
वरखेड ग्राम २०९४
वराहतीर्थ ते १७६५
वसली स्वानंदाची १९४०
वांगी म्हणती ग्रामा २०२७
वाडी..गळाट्याची २०१९
वाडी..जायकची २००१
वाडी..नायकाची २१२४
वाणीमध्ये महादेव १९०२
वारुळ हो ग्रामा २००२
विंदेवाडी म्हणती २१२३
विट्यामध्ये शिव.. १८७६

विलासंगमतीर्थ १७८१
विश्वामित्र तीर्थ १७७५
विहा मांडव ग्रामा २०३९
वृद्धासंगमतीर्थ १७७८
वेद म्हणती ईश्वर.. १८४३
वेद म्हणती हा १८४२
वोडवानदी वसे १७९८
शहागड गोदेतीरी १८०६
शिव म्हणे बसवे.. १८४५
शिवे ज्ञानबोध १७९६
शुक्रतीर्थ गोदेतीरी १७९१
शेवडी वसे गोदेतीरी १९२७
शेवतरामसगाव १८१५
शेषतीर्थ शेषेश्वर १७८७
श्रीरामा देव १९४६
श्रीरामाने मारुतीते १९६७
श्रीरामे शिवस्तवन १९४८
श्रीष्टीमध्ये परमेश्वर २०७१
श्रीष्टीमध्ये मायादेवी २०७२
श्रीष्टीमध्ये सोमेश्वर २०७०
श्वेततीर्थ क्षेत्र १७७६
शंखोदय तीर्थ १९४३
समुद्रतीर्थ ते १९८७
सर्व वानरांनी स्नान १९५९
सर्वत्रांनी केले १९६४
सहदंपत्ये संयुक्त १९८९
सहपरिवारे रावण १९४५
सामगतीर्थ इंद्रतीर्थ १८०२
सातेफळ गोदेतीरी १९२२
सावरगाव ग्रामा २००९
सिद्ध दडले विवरी १९८०
सुग्रीवाने केले १९५२
सुपर्णासंगम १७९२
सुरडी हो ग्रामा २००४
सूर्यपुत्र शनैश्वर १८००
सोनखेड ग्रामा २०३७
सोमेश्वर ग्रामा १९३३
सोमेश्वर नामक १९०८
स्नान करूनि सीता १९५०
स्वर्गपंथे विमान १९४७
हरि-ब्रह्माचा १८७४
हासापूर ग्रामा १९३८
हिवर म्हणती २०३०
क्षुधाहरण हो तीर्थ १७६८

३. स्तुतिपर अभंग

अक्षयी क्षमा दया २४८३
अक्षर बसवा २५२०
अगणित तुझी २२२७
अद्वैय संपत्ती तुज २३३५
अनंत ब्रह्मांडे संपत्ती २२१९
अनंत ब्रह्मांडा..पती २५५८
अनंत ब्रह्मांडा..कोटी २२८६
अनंत ब्रह्मांडे क्षणे २६३३
अनंत ब्रह्मांडे उभविसी २३२८
अनंत ब्रह्मांडे उभवी २४५३
अनंत ब्रह्मांडे उत्पन्न २१३७
अनंत ब्रह्मांडे रोमी २५१२
अनंत ब्रह्मांडे तुझे २२३१
अनादी बसवा २५१६
अनादी तू आदि २१३५
अनादी तू प्रभो २३०९
अन्नपूर्णा देवी तू २१३९
अन्नपूर्णे माते तू २१४३
अमर करिती लिंग २३९०
अरे नमर्देचे काठी २३३२
अलक्ष बसवा २५१७
अती कृपा तुज २२२५
अती श्रेष्ठा सिद्ध २५४७
अती सदय शंकर २५५४
अवघ्या त्या ठायी २४३७
अविद्येचे अवडंबर २४५७
अविद्येने जग २४६४
असंख्य तीर्थे प्रभो २१७४
अहो क्षीप्रा गंगे २३११
अहो कर्नाटकप्रांती २२००
अहो कामामाजी २२५९
अहो रेवणसिद्धा २४४४
अहो वेदान्त २४४३
अहो वेदान्ता २३९२
अहो शेषाचल २१६९
अहो सत्त्व रज तम २३७३
अहो साधुत्व देतसे २३७२
अहो सिद्धरामेश्वर २५४३
अहो सौराष्ट्र त्या २३३३
अहो स्तवा खंडेश्वर २२७३
अंगी वैराग्याचा २५९६
अंधा डोळस २५९८

अंबे त्वरे कृपा २१४४
अंबे तुझा महिमा २१४८
अंबे विनंती २१३८
अंबे सोडवी २१४५
आगम अष्टावीस २४५५
आचार्य तुम्हा २४९०
आचार्य तू पूर्ण २४३८
आचार्य तू स्वीका. २४७२
आदिदेवी माये २१२५
आनंद झाला २२१३
आनंदवनाचा २६२५
आहेसी शिवाचा २१६५
इंद्र आदि देव २६२८
उज्जयनीपुरी मोक्ष २२२०
उपाधीवेगळा प्रभो २४३६
एकोराम शिवज्ञानी २४५८
एकोराम या दयाळा २४६८
ऐसा अन्याय पाहून २१९२
ऐसे आनंदवन २६३४
ओंकार ममलेश्वर २४२६
औंढ्यामध्ये नागनाथ २३७१
औंढ्यामध्ये नाग. २४३१
करावया रे कल्याण २१६६
करितो पातकांची २२७०
करूनि मनाचे मंथन २५८२
कर्णी कुंडले २१७१
कर्मकाष्ठाचे दहन २६३५
कलियुगाची रहाटी २४७१
कल्याणी अवतार २५२७
काम गे दहनु २६४१
कामिक वनामाजी २३७९
कामिक वन ते २४३०
कामिक वना रे २४१७
कामिक वनी केला २३७७
कामिकाचे पुरवी २३९६
कालातीत कर्मातीत २३१२
कालावरी ज्याची २३१५
काशी तुम्हा अती २२८३
काशीक्षेत्र श्रेष्ठ २६१६
काशीनाथा कीर्ती २२७८
काशीनाम जपे २६३८
काशीपुरी पाहा २६२३
काशीपुरी सर्वाहून २६३१
काशीपुरीचा तो २६१७
काशीपुरीनिवासिया २६१५
काशीपुरीमाजी २६२४
किती वर्णू तुझी २६५६
कृपा तुझी संपा. २२८५
केवळ अनाक्षर २३३१
केवळ चैतन्यस्वरूप २२५४
केवळ परमहंस २४८५
केवळ ब्रह्म ते २४६७
कैलासा हो निज. २२२२
कैलासाहूनि शिव २६१२
क्रिया आचरूनि २४५१
खंडेश्वर महादेव २२७४
खंडेश्वर हा अनादी २२६८
गगनाऐसी निर्मळ २६५७
गणाधीश्वराचे २५२८
गर्भवासाते चुकवी २६५४
गळा शिवसूत्र २६३०
गोकर्णक्षेत्र थोर २६६७
गोकर्ण क्षेत्र पाहा २६६८
गोदे तुझी महिमा २६६५
गोदेचिये उत्तरतीरी २६०७
गोदेचे हो उत्तरतीरी २२६४
गंगा गर्भवासा २६५३
गंगाबाई तुझा २६४५
गंगाबाई तू गे स्वर्ग २६४६
गंगेमुळी बैसलासी २३५०
घृष्णेश्वर कामांतक २३८२
घृष्णेश्वर तू शंकर २३८६
घृष्णेश्वरा ब्रह्म. २३८१
घृष्णेश्वरा तू दयाळ २३८५
घ्राणस्वरे इंद्र २५१०
चहु दिशा चारी २४६२
चहू देशी चार २४७६
चारी वाणी चारी २३५९
चिन्मय बसवा २५२५
चौऱ्यांशी लक्ष २१८०
चंद्र सूर्य तारांगण २१२७
छत्तीस दिवट्या २२३०
जग अज्ञाने गुंतले २५९४
जग भांबावले २३१७
जगाचे करावे २४०४
जगाच्या कल्याणा २५७३
जगावरी दंगा २२२४
जगी असूनि तू २५७७
जाती वैकुंठाते २१७५
जाह्नवी तू गे जग २६५०
ज्योतिर्लिंग कृपा. २३८९
ज्योतिर्लिंग तू बा २३५८
ज्योतिर्लिंग तू स्वयंभ २३०६
ज्योतिर्लिंगा नाग. २३६७
ज्योतिर्लिंगा बा २३३०
ज्योतिर्लिंगा तुम्हा. २३६०

डमरू वाजवी २६४०
तापत्रयखंडन २१४२
ताता बसवलिंगा २५१५
तुंगभद्रा ओलांडून २५९७
तुझी कीर्ती ही २३७४
तुझी भक्ती जया २१९८
तुझी लीला अग. २५०५
तुझे नाम अगणित २२७१
तुझे नाम आदिनाथ २६१९
तुझे तीरीची गे २६५२
तुमचे ज्ञान स्वच्छ २४७५
तुमचे द्वारी सर्वही २१८४
तुमचे वर्णन होईना २४७९
तुमचे वैभव अग. २३०२
तुमच्या नामा नाही २२९३
तुम्हा नमो खंडेराया २२२९
तुम्हा नमो नित्य २१५८
तुम्हा नमो सिद्ध. २५४५
तुम्हापाशी आनंद २३९३
तुम्हा भोवताली २१९५
तुम्ही लीला केली २५११
तूते चुकलो चुकलो २३८४
तेथे मुख्य त्र्यंबक २३४६
त्याचा दर्प तो २२०४
त्रिअक्षरी बसव २५२६
त्रिगुण त्रिकुटी २१४७
त्रिविध तापाचे २३९१
त्रिविध तापाते २५०४
त्रिवेणी हो ताप २६५८
त्रेतायुगी केली २४४८
त्र्यंबकराजा माया. २३५२
त्र्यंबकलिंग जुनाट २४१६
त्र्यंबक राजा मी २३५४
दशाश्वमेधेश्वर २६१३
दिव्य स्थान ते २६६०
दीनदयाळू तू २५५९
दीनानाथा तू अनंत २३६९
दुर्गे दुर्घट विघ्ने २१३३
देव भक्ताने २१५६
देव येती तुम्हा २३३७
देव तो आहे २३१३
देवा वैभवी गोविले २३४९
देवी पाय दावी २२१७
दो लक्ष योजनावरी २१६४
द्वापरयुगाच्या २४५९
धन्य काशीपुरी २६२२
धन्य धन्य गंगा २६४७
धन्य धन्य गिरि. २१७७
धन्य धन्य गोदा. २६०२
धन्य.. बसवेश्वर २४९४
धन्य धन्य तो २१७६
धन्य.. श्रीनिवास २१७८
धन्य .. हा कुमार २२०२
धन्य वाराणसी २६२०
नको नको माते २१४९
नमो नमो ओंकारे. २३२३
नमो.. कामांतका २३२७
नमो नमो कृपा २३६४
नमो नमो केवळ २३४८
नमो नमो खंडेश्वरा २२६९
नमो नमो घृष्णेश्वरा २३८३
नमो नमो घृणेश्वरा २३८७
नमो नमो जगद्गुरू २३६५
नमो नमो ज्ञानमूर्ती २५०३
नमो नमो नागनाथा २३७५
नमोप्रभो..ओंकारा २३२६
नमो नमो केदारा २३००
नमो नमो केदारा २३०४
नमो नमो चंद्रा २१६८
नमो नमो बसवे. २५१४
नमो ..बा अनंता २१८३
नमो ..बा त्र्यंबका २३४७
नमो ..महाकाला २३१८
नमो नमो महारुद्रा २२२८
नमो नमो मूळ २३२२
नमो नमो रामेश्वरा २४०२
नमो नमो रामेश्वरा २४०६
नमो नमो विश्वंभरा २२८१
नमो नमो विश्वंभरा २३२५
नमो नमो विश्व. २२७७
नमो ..विश्वभरिता २२८४
नमो .. विश्वेश्वरा २२७९
नमो नमो वैद्यनाथा २२९०
नमो ..व्यंकटरमणा २१८१
नमो नमो सिद्धरामा २५४४
नमो नमो सिद्धेश्वरा २२६३
नमो..सोमनाथा अनंत २३३८
नमो..सोमनाथा अति २३३९
नमो सिद्धा नमो २५७६
नमो .. सिद्धरामा २५५५
नरनारायण मुनी २३०८
नवखंडी नवओघ २६५५
नवविधा भक्ती २५७८
नागनाथा अगोचरा २३६८
नागनाथा ज्योति. २३७०
नागनाथा माझा २५७९

नागनाथा तुम्हा. २५७१
नागनाथा तू २३७६
नागनाथा सिद्धा २५७२
नागनाथा..फार २५७०
नागेंद्र कुंडल तू २३६६
नाना वाद्ये हो २६०२
नामरूप भक्तांसाठी २३१४
नारद आला पार्वती २२१५
नारद दैत्यापाशी २२१२
नंदिनीतटी आशापूर २२७५
पद्मपत्रजळावरी २३७८
परब्रह्म तू केदार २३०७
परमात्मा तू २३२९
परळी क्षेत्र ते २४३२
परोपकार हा २५९५
पर्वत उंच शिखर २२५२
पशुपती सिद्धेश्वर २२६१
पार्वती परमेश्वर २२१४
पाहून प्रभोची ती २६०४
पाहून त्याहाची ती २६१०
पाहूनि रायाची त्या २१८९
पुजा पुजा खंडेश्वर २२७२
पुण्यगिरी हेमाद्री २४२२
पूर्वी तारकासूर २२०३
पूर्वी सोमाने पूजन २३३६
प्रभो उज्जयिनीचे २३१९
प्रभो श्रेष्ठा रामेश्वरा २४०१
प्रभो श्रेष्ठा रामेश्वरा २४०७
प्रभो सिद्धा जगद्. २५४८
प्रभो सूर्यनारायणा २१६०
प्रभो सूर्यनारायण २१६१
प्रभोची समाधी २२२०
प्रभोपाशी कृपा २२६५
प्रभोपाशी ब्रह्मानंद २२६७
प्रभो ते स्तविती २५०२
प्रभोस्वामी नित्य २४९१
प्रभोस्वामी माया २४८८
प्रयाग महिमा २६६३
प्रयागमहिमा पुराणी २६६१
प्रत्यक्ष डोळ्यांनी २२६०
पंडिताराध्या २४७०
पंडिताराध्य समर्थ २४७८
फार सोडविले २४५६
बदरीका आश्रम २४२४
बद्रिनाथ तुमची २३०५
बद्रिका आश्रम २२९९
बळ्ळारी ते सिंहा. २५९१
बसव अक्षर जपती २४९२
बसव आमुचा कूळ २५३६
बसव आमुचा मूळ २५२३
बसव आमुचे जीवी. २५३४
बसव कर्माचे २५३३
बसव गणांचा २५३५
बसव त्रिअक्षरी २४९३
बसव त्रिपुटीवेगळा २५३०
बसव दयाळू २५२९
बसव निर्गुण २५१९
बसव परमधाम २५२२
बसव बसव प्रेमे २५३१
बसव सुखाचा २५२४
बसवा अनाम २५१८
बसवा बसवा २५३७
बसवेश्वर विश्वा. २४९६
बसवेश्वरादी गण २४८९
बस्वण्णाचे भक्त २५३२
बस्वलिंग ताता २५३८
ब्रह्मकल्प निमि. २३०३
ब्रह्मगिरी ब्रह्मस्थान २३४५
ब्रह्मगिरी तो पर्वत २४२८
ब्रह्मगिरीवरी वससी २३४४
ब्रह्मगिरीहूनि उत्पन्न २६६४
ब्रह्मगिरीहूनि निघा. २६६६
ब्रह्मदेव सप्तऋषी २२०९
ब्रह्मदेवे तप २६५९
ब्रह्मदेवपुत्र प्रजापती २१९१
ब्रह्मांड उत्पन्नकर्ता २६३२
ब्रह्मानंदाचे जीवन २२६६
भक्तजैसा घरी २३६१
भक्तकाजा तू २१३६
भक्तजनाचा तू २१६२
भक्तमंडळी प्रवीण २६०८
भक्तवत्सल २३५१
भक्तसंकट वारिसी २२२६
भक्ताचे करावे २२५०
भक्तास्तव देह. २३८०
भक्तास्तव त्या २४४२
भक्तास्तव तू येर. २३६२
भक्ती क्रिया २४७४
भक्ती निर्मिली नव. २३५५
भजा भजा रे केदार २३१०
भयंकरा भीमाशंकरा २४१५
भवगर्तेमाजी पडलो २१४६
भवनाशनी पंढरी २६६९
भवव्यथा करिसी २१६३
भवानी तू दुःख २१२९
भीमा तुम्हापासून २३५७

भीमा अंगीचा हा २३६३
भीमाउगमी भीमा २४२९
भीमाशंकर तू हर २३५६
भूकैलास हे स्थान २४३३
भ्रमण करीत करीत २५९९
मज दीनाते दावा २६३६
मन्मथ प्रिय शिवा. २५८५
मन्मथस्वामी आत्म. २५८१
मन्मथस्वामी कृपा. २५८८
मन्मथ.. कृपामूर्ती २५८९
मन्मथ.. ब्रह्मज्ञानी २५८३
मन्मथ.. महाराज २५८६
मन्मथस्वामी तू २५८७
मन्मथस्वामी सिद्ध. २५८०
मरुळसिद्धा ज्ञान. २४४७
मरुळसिद्धा पूर्ण २४५२
मर्कटरूपे राहावे २२०७
मल्लिकार्जुन अती २३९८
मल्लिकार्जुनकृपा २३९७
मल्लिकार्जुन ज्योति. २३९५
महाकाला परात्परा २३१६
महादेव कामांतक २२३६
महादेव कृपाघन २२३३
महादेव चिन्मय २२३८
महादेव दिक्पाळांनी २२४४
महादेव बद्रिनाथ २२३७
महादेव भोलानाथ २२३५
महादेव त्याचे नाम २२३२
महादेव वंद्य वेदा २२३४
महादेव विश्वाआद्य २२४१
महादेव हा निर्गुण २२४०
महादेव हा ब्रह्मांडी २२४५
महादेव हा हो थोर २२४३
महादेवा हो पासून २२४६
महादेवाचे म्हणवा २२५१
महादेवाचे वैभव २२४७
महादेवापाशी देव २२३९
महादेवापाशी सत्य २२४९
महामाया देवी २१३२
महाराज ब्रह्मचारी २२१८
महालक्ष्मी ये २१३०
महिमा तुमचा २३२१
मायेचे वैभव २१२८
मार्ग वीरशैव २४४९
मुक्ताचे ते धाम २६२९
मुनी-आज्ञे नंदिके. २५०९
मुनिआज्ञेने क्षीरा. २५०८
मुनीने तप केले २५०७
मुनीप्रती तोषविले २५१३
मूळ प्रकृती तू २१३४
यात्रा प्रभोपाशी २१७३
यावे यावे नागनाथा २४१३
यावे यावे वैद्यनाथा २४१४
यास्तव जटा आप. २१९३
येइे येई बा निरुपमा २५६७
येई येई मल्लिका. २४११
येते प्रयागी हो २६६२
योगी तुम्हा सन्मा. २४६९
रत्नजडित सिंहासन २४८०
राम पतितपावन २१५२
राम प्रतापी हो २१५५
राम स्तवा निरंतर २१५१
रामनामे फार २१५४
रामप्रिया रामेश्वरा २४१२
रामा द्यावे दर्शन २१५३
रामेश्वर परब्रह्म २४०३
रामेश्वरा कृपामूर्ती २४०८
रामेश्वरा ज्योति. २४०५
रामेश्वरा ज्योति. २४०९
राया विष्णूप्रती २२०६
रुद्र अकरावा तो २१५७
रुद्र अवतार तू २२२३
रूप पाहा हो २६४३
रेवणसिद्धा आचार्या २४४६
रेवणसिद्धा निज. २४४५
रेवणा हो सिद्धा २४४०
रेवातीरी केली २४१९
रेवातीरी ते पवित्र २३२४
लक्ष योजना हो २१५९
लग्न लागले शिवाचे २२११
लिंग-अंगाचा २४८७
लिंग-अंगाचे ते २४६३
लिंगपर्वत भूकैलास २३८८
लिंगरूप तो पर्वत २३३१
लिंगरूपी प्रभो २४७३
लिंगांगसंबंधी जे २४८६
लिंगैक्यज्ञान तुम्हा २४६५
वडवळसिद्धा नमो २५६९
वाट पाहतो भक्ता. २३९४
वाराणसीक्षेत्र जाणा २६१४
वाराणसीक्षेत्र अक्षयी २४२३
वाराणसीक्षेत्र करी २६२१
वाराणसी दावा क्षेत्र २६१८
वाराणसी मोक्षसदन २४२१
वाराणसीऐसे क्षेत्र २६४२
वाराणसीमध्ये माझे २६२६

वाल्मीकाचे ते २१९०
विठ्ठलमूर्ती पांडुरंग २२७६
विश्वनाथ विश्वा. २२८०
विश्वनाथा तू २२८२
विश्वनाथा सभो. २२८७
विश्वमना प्रभो. २५६३
विषया विटून २५७५
विषया विरक्त २४८२
विष्णू अती तो २२०५
विसरे होतसे २१७९
वीरभद्रा महारुद्रा २१९४
वीरभद्रा तू सुखरूप २१९७
वीरभद्रा शिवपुत्रा २१९६
वीरभद्रा सर्वोत्तमा २१९९
वीरशैव तुम्हाप्रती २४६१
वीरशैवामाजी २५००
वीरशैवामुखी २२०१
वेद तुझे गुण २१४१
वेदशास्त्रे ही २५९३
वेदान्ताचे घेऊनि २४९८
वैद्यनाथ ज्योतिर्लिंग २२९४
वैद्यनाथ ब्रह्मानंदे २२९६
वैद्यनाथ भक्तास्तव २२९७
वैद्यनाथ तू ईश्वर २२९२
वैद्यनाथ तू सदय २२९८
वैद्यनाथ विश्वंभर २२९५
वैद्यनाथा अती २२९१
वैद्यनाथा नमो २२८९
वैद्यनाथा मायातीता २२८८
वैभव तुमचे २३५३
वैराग्याचा केवळ २४९९
वैराग्याचा मुकुट २३०१
व्यंकटरमणा संकट २१८५
व्यंकटेश तू दयाळ २१८२
व्यंकटेशा कृपा. २१८७
व्यंकटेशा गिरिराया २१८८
व्यंकटेशा पुरातना २१८६
शरण ते धन्य २५६०
शरण ते सदा २५६१
शरणांचे दास २५६२
शतकोटी शिवगण २५०१
शिव तोचि बसवे. २४९५
शिव तोचि राम २१५०
शिव शिव वदती २६००
शिव अवतार प्रभो २४८१
शिव गणांचा तो २४९७
शिव ज्ञानाचा २६०६
शिवभक्त शिखा. २५०६
शिव वीर्याहो पासून २२०८
शिवाचा तू आत्मा २४४१
शिवाचा तो आत्मा २५२१
शिवे विष्णू बोल. २२१०
शुकमुनीचा हो २२४८
शुद्ध बुद्ध नित्य २५८४
शैवा वीरशैवाते २४५०
श्रीरामाचा तू २३९९
शिवमुकुटी तू २६४९
शंख वाजवी बम् २६३९
षट्चक्रांते..योगी २४६६
षट्चक्रांते..महालिंगी २५५७
षट्स्थलमहाज्ञानी २५९२
षट्स्थलाचा जाणता २४८४
षड्रिपूते जिंकून २४७७
षड्रिपूते जिंकून २५५१
सकळ तत्त्वांच्या २२५५
सकळ सिद्धांचा २२५७
सदय तो नारायण २१७०
सदोदित आनंद २१४०
सद्गुरू प्रसिद्धा २४३५
सनकादिक महा. २३२०
सर्व विद्या हो २२१६
सत्य शैव तुम्हा २४६०
सह्याद्रीपर्वती आहे २१२६
साकारला योगीराव २२५६
सिंधूतटी रामेश्वर २४३४
सिंधुतीरी त्रिपुरारी २४००
सिद्ध ज्ञानियांचा २५५०
सिद्धगुरू सखा २५६८
सिद्धराजा परमे. २५६६
सिद्धराम आत्म. २५५२
सिद्धराम ज्ञानमूर्ती २५५४
सिद्धराम पूर्ण ज्ञानी २५४२
सिद्धराम भक्तसखा २५५३
सिद्धराम शिवज्ञानी २५४१
सिद्धराम शिवयोगी २५४०
सिद्धराम सिद्धासनी २५५६
सिद्धरामा योगिराया २५४६
सिद्धरामा तू दयाळ २५४९
सिद्धराया मायबापा २५६४
सिद्धेश्वर गंगेतटी २२६२
सिद्धेश्वर हा निर्गुण २२५३
सिद्धेश्वरा यावे २५६५
सिद्धेश्वरा साधू २२५८
सुंदर ते ध्यान २६४४
सुवर्णाची तुमची २१६७
सोमनाथ ज्योति. २३३४

सोमनाथा नित्या. २३४१
सोमनाथा बहू २३४३
सोमनाथा विश्व. २३४०
सोमनाथा विश्वा. २३४२
सोरठ देशा हो २४१८
सोलापुरी सिद्धराम २५३९
सौराष्ट्र त्या देशी २४२७
स्वयंप्रकाश आहेसी २४१०
स्वयंप्रकाश पशुपती २२४२
स्वर्गतरंगिणी माय २६४८
स्वर्गसरिता तू गंगा २६५१
स्वर्गीचे अमृत २६२७
स्वानंदजीवनु शिव २६३७
स्वामिराया हो २५९०
स्वामी फार तपोधन २६०५
स्वामी भ्रमत..आले २६०३
स्वामी ..चालले २६०१
स्वामी रमले तये २६११
स्वामी तुम्हाप्रती २४३९
स्वामीने निर्वाण २२१७
क्षिप्रा गंगेतीरी २४५५
ज्ञानखंड हाती २२२१
ज्ञानसिंधू तुम्ही २५७४

४. कथात्मक अभंग

कथा	अभंग क्रमांक	कथा	अभंग क्रमांक
अविचारी ब्राह्मण	२९९६-३०१८	भस्ममाहात्म्य	२८८४-२८९३
एक शिवभक्त	३०५०-३०६१	भिल्लिणीचा उद्धार	३११४-३१२२
ऋग्वेदी ब्राह्म.दासीपुत्र	२८६५-२८७१	भीमाशंकर लिंग	२९४६-२९५९
करकोटक ब्राह्मण	३०६२-३०७८	मनकर्णिकामाहात्म्य	३२५५-३२६४
कामातुर ब्राह्मण	३०७९-३०९५	महापातकी ब्राह्मण	२९७९-२९९५
कुष्ठरोग्याचा उद्धार	३१२३-३१४०	महाशैव ब्राह्मण	३०९६-३११३
गुंडूसया/ मधूसया	२८९४-२९११	महाशैव राजा	२९६०-२९७८
गुणनिधी	२८३३-२८५५	मित्रसह राजा	३०३३-३०४९
जार पुरुष	२७४३-२७५५	राजा चन्मू	२७९०-२८००
ताराक्ष-पिंगाक्ष	२८५६-२८६४	राजा चित्रकेतू	२८०१-२८१०
दिवोदास राजा	३२२२-३२३४	रुद्रपशुपती	२७०७-२७२१
दुराचारी ब्राह्मण	३०१९-३०३२	विष्णुब्रह्मदेव गर्वहरण	३२६५-३३११
दुष्ट भिल्ल	३१६०-३१७८	शिवपार्वती विवाह	३२३५-३२५४
दोन गुरू-एक शिष्य	२९२७-२९४५	शिवभक्त धनगरपुत्र	२७२२-२७४२
नर्मदातीरावरील भिल्लीण	२७७१-२७८९	शिवभक्त बालिका	२६९२-२७०६
पातकी ब्राह्मण	२७५६-२७७०	शिवभक्त ब्राह्मण	२८११-२८३२
पातकी भिल्लीण	२९१२-२९२६	शिवभक्त भिल्ल	३१४१-३१५९
प्रसादमाहात्म्य	२८७२-२८८३	शिवभक्त स्त्री	३१९६-३२२१
बीजे महादेवी	२६७०-२६९१	सत्त्वपरीक्षा	३१७९-३१९५

संदर्भसाहित्य

०१. **श्री मन्मथस्वामी गाथा**, प्रकाशक– काडादी धर्मादाय निधी, सोलापूर, १९६५

०२. **सांप्रदायिक सप्तरत्न गाथा**, संपादक– डॉ. शिवलिंग शिवाचार्य, संस्कृती प्रकाशन, अहमदपूर, १९८०

०३. **श्री महादेव प्रभू गाथा**, संपादक– पं. शिवाप्पा खके, श्री सिद्धेश्वर प्रकाशन, वसमत नगर, जि. हिंगोली, २००२

०४. **श्री महादेव प्रभू गाथा**, संपादक– भाऊराव स्वामी, सातारा, २०११

०५. **श्री लक्ष्मण गाथा** : संपादक– डॉ. शे. दे. पसारकर, श्री सिद्धेश्वर प्रकाशन, आष्टी, जि. जालना, २००१

०६. **शिवलिंगस्वामींचे अभंग**, संपादक– डॉ. शे. दे. पसारकर, अबोली प्रकाशन, सोलापूर, २०१०

०७. **श्री संतशिरोमणी मन्मथस्वामी : व्यक्तिरेखा व ग्रंथसंपदा**, डॉ. शिवलिंग शिवाचार्य, संस्कृती प्रकाशन, अहमदपूर, शके १९०९

०८. **मराठी वीरशैव संतांची अभंगवाणी**, डॉ. राम तोंडारे, अप्रकाशित प्रबंध, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९८०

०९. **वीरशैवांची स्फुट कविता**, संपादक– शांतितीर्थ स्वामी, श्रीकाशीजगद्गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ,जंगमवाडी मठ, वाराणसी (उ.प्र.), १९९८

१०. **श्री बसवगाथा**, संपा.– दौ. शं. साखरे, मानवता प्रकाशन, उदगीर, २०१३

शैवभारती शोधप्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी (उ.प्र.) यांची प्रकाशने

११. **मन्मथस्वामी : व्यक्ती आणि वाङ्मय**, डॉ. चंद्रकांत देऊळगावकर, २००३

१२. **श्री मन्मथशिवलिंगकृत परमरहस्य**, संपादक– डॉ. शे. दे. पसारकर, २००१

१३. **मराठी वीरशैव संतकवी बसवलिंग : चरित्र व वाङ्मय**, डॉ. चंद्रशेखर कपाळे, १९९४

१४. **लक्ष्मण महाराज : व्यक्ती आणि वाङ्मय**, डॉ. भी. शि. स्वामी, १९९४

१५. **वीरशैव संतकवी शिवदास : एक अभ्यास** : डॉ. वैजनाथ फास्के, २००८

१६. **वीरशैवांचे मराठी हिंदी वाङ्मय : एक अभ्यास**, डॉ. श्यामा घोणसे, २००२

१७. **वीरशैव मराठी अभंगकविता : एक विवेचक अभ्यास**, डॉ. शोभा कराळे, २००३

१८. **म्हणे मन्मथशिवलिंग**, स्वाती साखरकर कराळे, २०१८

१९. **विभूतिवैभव** (त्रैमासिक) : अंक ५४, ऑक्टो. ते डिसें. २००५ / अंक ११३, जुलै ते सप्टें. २०२०

महाराष्ट्रीय वीरशैव समाजाला साहित्याचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. ग्रंथरचना, अभंगरचना, स्फुट रचना असे अनेक पदर या वैभवाला आहेत. सोळाव्या शतकातील श्री शांतलिंगस्वामी हे पहिले मराठी वीरशैव ग्रंथकार मानले जातात. त्यांचेच समकालीन असलेले श्री मन्मथस्वामी हे ग्रंथकार आणि पहिले अभंगकारही होते. एवढेच नव्हे, तर मराठीतील पहिली लावणी उपलब्ध झाली ती मन्मथस्वामींनीच लिहिलेली आहे.

परधर्मीयांचे आक्रमण आणि वारकरी संप्रदायाचे आकर्षण अशा दोन आव्हानांशी सामना करीत मन्मथस्वामींनी वीरशैव धर्मज्योतीचे प्राणपणाने रक्षण केले. 'निजू नका जागा जागा। आपुल्या स्वधर्माने वागा' असे अभंगातून आवाहन केले आणि 'मन्मथ आलासे भूलोका। आता कुणी भिऊ नका' असा दिलासा भयग्रस्त समाजाला दिला. मन्मथस्वामींनी वीरशैव मराठी अभंगवाणीची पायाभरणी केली आणि पुढील संत-भक्तकवींनी ती अभंगवाणी समृद्ध केली.

'वीरशैव अभंगगाथा' नामक हा प्रकल्प असून तो तीन खंडांत प्रकाशित होणार आहे. त्यांपैकी पहिला खंड प्रस्तुत ग्रंथाच्या रूपाने वाचकाच्या हाती देत आहोत.

इ.स. १८८५ ते १९५१ या कालखंडात प्रकाशित झालेल्या वीरशैव कवींच्या अभंगसाहित्याचे सुसूत्रपणे संपादन करून पुनर्मुद्रण करणे हा उद्देश समोर ठेवलेला आहे. श्री मन्मथस्वामींपासून भावंडीबाईपर्यंत सुमारे ३५० वर्षांच्या कालखंडातील ही सर्व रचना असून 'वीरशैव अभंगगाथे'च्या या पहिल्या खंडात श्री मन्मथस्वामी, शिवलिंगस्वामी, लिंगेश्वर, बसवलिंग, महादेव प्रभू, शिवदास, जीवन महाराज आणि लक्ष्मण महाराज यांच्या ४१५६ अभंगांचा समावेश केलेला आहे.

शैवभारती शोधप्रतिष्ठान